श्रीसमर्थ

रामदासांचे समग्र ग्रंथ

वैराग्यभाग्य भरलें असतां अनन्या ।
आल्या जयाप्रति चतुर्विध मुक्तिकन्या ॥
चौथी तयांत वरिली उरल्या न पाहे ।
तो आमुचा गुरु समर्थ समर्थ आहे ॥ १ ॥

रघुनाथ पंडित

मुद्रक व प्रकाशक

शंकर नरहर जोशी.

'चित्रशाळा स्टीम प्रेस', ८१८ सदाशिव पेठ, पुणें शहर.

शा. श. १८४०

सन १९१८ इसवी

किंमत अडीच रुपये.

श्रीरामदासस्वामिविरचित

दासबोध.

दशक पहिला.

श्रीगणेशायन नमः ॥ ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥ श्रोते पुसती कोणे ग्रंथ। काय बोलिले जी येथ । श्रवण केलियानें प्राप्त । काय आहे ॥ १ ॥ ग्रंथा नाम दासबोध । गुरुशिष्यांचा संवाद । येथे बोलिला विशद । भक्तिमार्ग ॥ २ ॥ नवविधा भक्ति आणि ज्ञान । बोलिलें वैराग्याचें लक्षण । बहुधा अध्यात्मनिरूपण । निरूपिलें ॥ ३ ॥ भक्तिचेनि योगें देव । निश्चयें पावती मानव । ऐसा आहे अभिप्राव । ईयें ग्रंथीं ॥ ४ ॥ मुख्य भक्तीचा निश्चय । शुद्ध ज्ञानाचा निश्चय । आत्मस्थितिचा निश्चय । बोलिला असे ॥ ५ ॥ शुद्ध उपदेशाचा निश्चय । सायुज्यमुक्तिचा निश्चय । मोक्षप्राप्तीचा निश्चय । बोलिला असे ॥ ६ ॥ शुद्धस्वरूपाचा निश्चय । विदेहस्थितिचा निश्चय । अलिप्तपणाचा निश्चय । बोलिला ॥ ७ ॥ मुख्य देवाचा निश्चय । मुख्य भक्ताचा निश्चय । जीवाशिवांचा निश्चय । बोलिला असें ॥ ८ ॥ मुख्य ब्रह्माचा निश्चय । नाना मतांचा निश्चय । आपण कोण हा निश्चय । बोलिला असे ॥ ९ ॥ मुख्य उपासनालक्षण । नाना कवित्वलक्षण । नाना चातुर्यलक्षण । बोलिले असे ॥ १० ॥ मायोद्भवाचें लक्षण । पंचभूताचें लक्षण । कर्ता कोण हें लक्षण । बोलिलें असे ॥ ११ ॥ नाना किंतु निवारले । नाना संशय छेदिले । नाना आशंका फोडिलें । नाना प्रश्न ॥ १२ ॥ ऐसें बहुधा निरूपिलें । ग्रंथगर्भी जें

---

१ कोणता. २ अहो. ३ दासांनीं-रामदासांनीं-सकल जनांस केलेला उपदेश. ४ स्पष्ट, उघड. ५ श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, पूजन, वंदन, दास्य, सख्य आणि आत्मनिवेदन (आपल्यासु अर्पण करणें) अशी नऊ प्रकारची जी प्रेमानें उपासना ती. ६ आत्मज्ञानविषयीं प्रतिपादन. ७ हेतु. ८ ज्ञा. ९ निर्मल. १० आत्मस्वरूपाचा निर्णय. ११ मुक्ती चार आहेत-सलोकता, सरूपता, समीपता व सायुज्यता. या पैकीं 'सायुज्यता' म्हणजे जीव व ब्रह्म यांचें ऐक्य होणें. १२ मोक्ष प्राप्त करून देणाऱ्या उपायांचा निर्णय. १३ मायातीत आत्मस्वरूप. १४ देहांत असून देहादिकांबर अहंता व ममता नसलेल्या स्थितीचा. १५ संबंधराहितपणा, अकर्तृत्व. १६ जीव आणि ईश्वर यांचा. १७ निरनिराळी. १८ भक्तीचें स्वरूप. १९ मायेच्या उत्पत्तीचें, प्रगटपणाचें. २० पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश हीं पंचभूतें. २१ शंका, संशय. २२ बारीक सारीक शंका. २३ पुष्कळ प्रकारांनीं. २४ ग्रंथांत.

बोलिलें । तें अवघेंचि अनुवादलें । नें वेंचें कीं कैंदा ॥ १३ ॥ तथापि अवघा दासबोध । दशक फोडोनि केला विशद । जे जे दशकींचा अनुवाद ते ते दशकीं बोलिला ॥ १४ ॥ नाना ग्रंथाच्या संमती । उपनिषदें वेदांत श्रुती । आणि मुख्य आत्मप्रचीती शास्त्रेंसहित ॥ १५ ॥ नानासंमतिअन्वयें । म्हणोनि मिथ्या म्हणतां नये । तथापि हें अनुभवास ये । प्रत्यक्ष आतां ॥ १६ मत्सरें यासि मिथ्या म्हणती । तरी अवघेंचि ग्रंथ उच्छेदती । नाना ग्रंथांच्या संमती । भगवद्वाक्यें ॥ १७ ॥ शिवगीता रामगीता । गुरुगीता गर्भगीता । उत्तरगीता अवधूतगीता । वेद आणि वेदांत ॥ १८ ॥ भगवद्गीता ब्रह्मगीता । हंसगीता पांडवगीता । गणेशगीता यमगीता । उपनिषदें भागवत ॥ १९ ॥ इत्यादिक नाना ग्रंथ । संमतीस बोलिले येथ । भगवद्वाक्यें यथार्थ । निश्चयेसी ॥ २० ॥ भगवद्वचनीं अविश्वासे । ऐसा कोण पतित असे । भगवद्वाक्याविरहित नसे । बोलणें येथिचे ॥ २१ ॥ पूर्ण ग्रंथ पाहिल्यावीण । उगाच ठेवी जो दूषण । तो दुरात्मा दुरभिमान मत्सरें करी ॥ २२ ॥ अभिमाने उठे मत्सर । मत्सरें ये तिरस्कार । पुढें क्रोधाचा विकार । प्रबळे बळें ॥ २३ ॥ ऐसा अंतरीं नासला । कामक्रोधें खवळला । अहंभावें पालटला । प्रत्यक्ष दिसे ॥ २४ ॥ कामक्रोधें लिथाडिलां । तो कैसा म्हणावा भला । अमृत सेवितांचि पावला । मृत्यु राहू ॥ २५ ॥ आतां असो हें बोलणें । अधिकारासारिखें घेणें । परंतु अभिमान त्यागणें । हें उत्तमोत्तम ॥ २६ ॥ मागां श्रोतीं आक्षेपिलें । जी ये ग्रंथीं काय बोलिलें । तें सकळही निरूपिलें । संकलितमार्गें ॥ २७ ॥ आतां श्रवण केलियाचें फळ । क्रियें पालटे तात्काळ । तुटे संशयाचें मूळ । ऐकेसरां ॥ २८ ॥ मार्ग सांपडे सुगम । नलगे साधन दुर्गम । सायुज्यमुक्तीचें वर्म । ठायीं पडे ॥ २९ ॥ नासे अज्ञान दुःख भ्रांती । शीघ्राचें येथें ज्ञानप्राप्ती । ऐसी आहे फल श्रुती । इथें ग्रंथीं ॥ ३० ॥ योगियांचें परमभाग्य । अंगीं बाणें वैराग्य । चातुर्यकळा यथायोग्य । विवेकेंसहित ॥ ३१ ॥ भ्रांत अवगुणी अवलक्षण । तेचि होती

---

१ सांगेतलें, वर्णन केलें. २ जात नाहीं. ३ कधींही. ४ दासबोधाच्या भागाचे नांव. ५ पाडून. ६ आधार. ७ वेदशिरोभाग; तीं उपनिषदें हीं ईश-केन-कठ-प्रश्न-मुंड-मांडूक्य-नैत्तिरिः । ऐतरेयं च छांदोग्यं बृहदारण्यकं तथा. ८ उत्तरमीसांसा शास्त्र. ९ आत्मस्वरूप ओळखणें. १० तत्वज्ञानपर ग्रंथांच्या विचारासहित; हीं शास्त्रें सहा आहेत; (१ न्याय, २ वैशेषिक, ३ योग किंवा सेश्वर सांख्य, ४ निरीश्वर किंवा कापिल सांख्य, ५ पूर्व मीमांसा, ६ उत्तर मीमांसा). ११ शिष्टांच्या पुष्कळ संमति आहेत त्यांस अनुसरून. १२ अप्रमाण ठरतील. १३ पापी. १४ शिवाय. १५ दुर्बुद्धि. १६ दुराग्रह. १७ प्रसंग. १८ बळावतो. १९ अभिमानानें विकार पावलेला. २० व्यापलेला. २१ जसा राहूस अमृतप्राशनानें इष्ट लाभ झाला नाहीं, तसा मलिन अंतःकरणाच्या दुराग्रही पुरुषास या ग्रंथापासून लाभ होणार नाहीं. २२ शंकित होऊन प्रश्न केला. २३ एकंदरीनें, गोळा बेरीज करून. २४ आचरण, वर्तन. २५ एकदम. २६ सोपा. २७ कठीण. २८ निश्चित कळून येते. २९ आत्मस्वरूपाचा विसर. ३० विपरीत ज्ञान. ३१ तात्काल, लौकर. ३२ भ्रम पावलेले.

सुलक्षण । धूर्त तार्किक विचक्षण । समय जाणती ॥ ३२ ॥ आळसी तेचि सोक्षेपी होती । पापी तेचि पस्तावती । निंदक तेचि वंदूं लागती । भक्तिमार्गासी ॥ ३३ ॥ बद्धचि होती मुमुक्षु । मूर्खाचि होती अतिदक्ष । अभक्तचि पावती मोक्ष । भक्तिमार्गें ॥ ३४ ॥ नाना दोष ते नासती । पतित तेचि पावन होती । प्राणी पावे उत्तम गती । श्रवणमात्रें ॥ ३५ ॥ नाना धोके देहबुद्धीचे । नाना किंतु संदेहाचे । नाना उद्वेग संसाराचे । नासती श्रवणें ॥ ३६ ॥ ऐसी याची फळश्रुती । श्रवणें चुके अधोगती । मनासी होय विश्रांती । समाधान ॥ ३७ ॥ जयाचा भावार्थ जैसा । तयास लाभ तैसा । मत्सर धरी जो पुंसा । तयासि तेंचि प्राप्त ॥ ३८ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे प्रथमदशके ग्रंथारंभनिरूपणं नाम प्रथमः समासः ॥ १ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ॐनमो जी गणनायका । सर्वसिद्धिफलदायका । अज्ञानभ्रांतिछेदका । बोधरूपा ॥ १ ॥ माझिये अंतरीं भरावें । सर्वकाळ वास्तव्य करावें । मज वाक्शून्यासि वदवावें । कृपाकटाक्षेकरूनी ॥ २ ॥ तुझिये कृपेचेनि बळें । वितुळती भ्रांतीचीं पडळें । आणि विश्वभक्षकें काळें । दास्यत्व कीजे ॥ ३ ॥ येतां निजकृपेची उडी । विघ्नें कांपती बापुडीं । होऊनि जाती देशधडी । नाममात्रें ॥ ४ ॥ ह्मणोनि नामें विघ्नहर । आह्मां अनाथांचें माहेर । आदिकरूनी हरिहर । अमर वंदिति ॥ ५ ॥ वंदूनियां मंगळनिधी । कार्य करितां सर्व सिद्धी । आघात अडथळे उपाधी । बाधूं शकेना ॥ ६ ॥ जयाचें आठवितां ध्यानें । वाटे परम समाधान । नेत्रीं रिघोनियां मन । पांगुळे सर्वांगीं ॥ ७ ॥ सगुण रूपाची ठेवे । महालावण्यलाघव । नृत्य करितां सकळ देव । तटस्थ होती ॥ ८ ॥ सर्वकाळ मदोन्मत्त । सदा आनंदें डुल्लत । हर्षे निर्भर उदित । सुप्रसन्नवदन ॥ ९ ॥ भव्य रूप वितंड । भीममूर्ति महाप्रचंड । विस्तीर्ण मस्तका उदंड । सिंदूर चर्चिला ॥ १० ॥ नाना सुगंधपरिमळे । थबथबां गळती गंडस्थळें । तेथें आलीं षट्पदकुळें । झंकारशब्दें ॥ ११ ॥ मुरडीवें शुंडादंड सरळे । शोभे

---

१ ज्ञाते. २ प्रयत्न, उद्योग करणारे. ३ मोक्ष इच्छिणारे. ४ फार सावध. ५ पवित्र. ६ संकट, विघ्न. ७ देहादिक जडास आत्मा समजण्याचे. ८ चिंता, भय, खेद. ९ मनुष्य, पुरुष. १० सिद्धि आठ आहेत. त्या—अणिमा महिमा चैव लघिमा गरिमा तथा । प्राप्तिः प्राकाम्यमीशित्वं वशित्वं चाष्टसिद्धयः ११ ज्ञानरूपा. १२ वाणी नसलेला, वर्णन करण्याची शक्ति—स्फूर्ति—नसलेला, मुका त्यास. १३ कृपादृष्टीनें. १४ पडदे. १५ सर्व जगाला खाणाऱ्या. १६ हर्षीपलीकडे. १७ देव. १८ कल्याणाचा ठेवा (गणपति). १९ दुःखाचे तडाखे. २० त्रास, दुःख. २१ स्वरूप, मूर्ति, रूप. २२ कुंठित होतें. २३ बांधा, डौल. २४ कौशल्य. २५ सुंग, स्तब्ध. २६ पूर्ण. २७ प्रकट, स्पष्ट. २८ प्रसन्नमुख. २९ हत्तीसारखें. ३० भयंकर आकृति. ३१ पुष्कळ. ३२ वासानें. ३३ भुंग्यांचे थवे. ३४ वळलेलें. ३५ सोंड.

अभिनव[1] आवाळें । लंबित अधर तीक्ष्ण गळें । क्षणक्षणा मदस्रवी[2] ॥ १२ ॥ चौदा विद्यांचा गोसावी[3] । ह्रस्व लोचन ते हालवी । लवलवीत फडकावी । फडे फडे कर्णपाळी[4] ॥ १३ ॥ रत्नखचित मुगुटी झळाळे नाना सुरंग फांकती कीळे[5] । कुंडलें तेजपती बीळे[6] । वरीं जडले झळकती ॥ १४ ॥ दंत शुभ्र संदेटे[7] । रत्नखचित हेमकेटे[8] । तया तळवटीं पत्रें नीट । तळपती लघुलघु[9] ॥ १५ ॥ लवथवीत मेळपे दोंदे[10] । वेष्टित रुटी[11] नागबंद । क्षुद्रघंटिका[12] मंदमंद । वाजती झणत्कारें ॥ १६ ॥ चतुर्भुज लंबोदर । काशिले[13] कशिलें[14] पीतांबर । फडके दोंदीचा फणिवर[15] । धुधुःकार टाकी ॥ १७ ॥ डोलवी मस्तक जिव्हा लोळी[16] । घालूनी बैसला वेंटाळी[17] । उभारोनी नाभिकमळों । टकमकां पाहे ॥ १८ ॥ नानाभरणांची[18] कुसुममाळा । व्योमपर्यंत रुळती गळां । रत्नजडित हृदयकमळा— । वरी पदक शोभे ॥ १९ ॥ शोभे फरंश[19] आणि कमळ । अंकुश तीक्ष्ण तेजाळ । एके करीं मोदकगोळ । तयावरी अतिप्रीती ॥ २० ॥ नटनाट्यकळा[20] कुसरी । नानाछंदे नृत्य करी । गाळ मृदंग[21] भरोवरी[22] । उपांग हुंकारें[23] ॥ २१ ॥ स्थिरता नाहीं एक क्षण । चपळ विषयीं अग्रगण । साजिरी[24] मूर्ति सुलक्षण । लावण्यखाणी ॥ २२ ॥ रुणझुणा वाजती नेपुरें[25] । वांकी[26] बोभाटती[27] गजरें । घागरियांसहित मनोहरें । पाउलें दोनी ॥ २३ ॥ ईश्वरसभेसी आली शोभा । दिव्यांबरांची[28] फांकली प्रभा । साहित्यविषयीं[29] सुलभा[30] । अष्टनायका होती ॥ २४ ॥ ऐसा सर्वांगे सुंदर । सकळ विद्यांचा आगर[31] । त्यासी माझा नमस्कार । साष्टांगभावें[32] ॥ २५ ॥ ध्यान गणेशाचें वर्णितां । मतिप्रकाश होय भ्रांतां[33] । गुणानुवाद श्रवण करितां । बोले[34] सरस्वती ॥ २६ ॥ जयास ब्रह्मादिक वंदिती । तेथें मानव बापुडे किती । असो प्राणी मंदमती[35] । तिहीं गणेश चिंतावा ॥ २७ ॥ जे मूर्ख अवलक्षण । जे कां हीनाहूनि हीन । तेचि होती दक्ष[36] प्रवीण । सर्व विषयीं ॥ २८ ॥ ऐसा जो परमसमर्थ । पूर्ण करी मनोरथ । संतांतीते भजनस्वार्थ । " कलौ चंडीविनायकौ " ॥ २९ ॥ ऐसा गणेश

---

१ नूतन, अद्भुत. २ ओष्ठप्रांत. ३ खालचा ओठ. ४ ज्यांतून मद पाझरत आहे अशीं गंडस्थळें. ५ ऋग्वेदादि चार वेद, शिक्षाकल्पादिक सहा वेदांगे, पद्मादिक पुराणे, धर्मशास्त्र, न्यायशास्त्र आणि मीमांसा, अशा चौदा विद्या. ६ स्वामी, मालक. ७ बारीक. ८ डोळे. ९ कानांच्या पाळी. १० झुलझुलीत. ११ प्रभा. १२ चकाकतात. १३ रत्नविशेष; या रंगाचा व या नांवाचा मणि. १४ घट्ठशीत, बळकट. १५ लहान सोन्याचें कडे. १६ लहान. १७ गुलगुलीत. १८ हालें. १९ हेरपोट. २० कंबर. २१ नागांचा करदोटा. २२ बारीक. २३ घागऱ्या. २४ कमरेला. २५ घट्ट नेसलेला. २६ जोठा नाग. २७ आंत बाहेर काढणें. २८ अनेक वर्तीच्या. २९ कमरेंत असलेल्या सर्पापर्यंत. ३० परशु. ३१ कौशल्य. ३२ गर्दा. ३३ अवांतर गाण्याचीं साहित्यें. ३४ सुंदर. ३५ पैंजण, चाळ. ३६ चाळे. ३६ वाजतात. ३८ कांतियुक्त वस्त्राचीं. ३९ उपांगांची साथ करण्यांत. ४० तत्पर. ४१ खाण. ४२ जानुभ्यांच तथा पद्भ्यां पाणिभ्यामुरसा धिया । शिरसा वचसा दृष्ट्या प्रणामोऽष्टांग ईरितः॥ १ ॥ ४३ अज्ञानी मूर्ख. ४४ प्रसन्न होते. ४५ जडबुद्धीचे. ४६ तत्पर, चतुर. ४७ अनुभवयुक्त. ४८ कलियुगामध्यें देवी आणि गणपति या दोन देवता त्वरित प्रसन्न होतात.

मंगळमूर्ती । तो म्यां स्तविला यथामती । वांछा धरूनिया चित्तीं । परमार्थाची ॥ ३० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे प्रथमदशके गणेशस्तवनं नाम द्वितीयः समासः ॥ २ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ आतां वंदीन वेदमाता । श्रीशारदा ब्रह्मसुता[1] । शब्दमूळ वाग्देवता[2] । महामाया ॥ १ ॥ जे उठवी शब्दांकुर । वदे वैखरी[3] अपार । जे निःशब्दांचें अभ्यंतर । उकलूनि दावी ॥ २ ॥ जे योगियाची[4] समाधी । जे धारिष्टांची कृतबुद्धी[5] । जे विद्या अविद्या उपाधी[6] । तोडून टाकी ॥ ३ ॥ जे महापुरुषाची[7] भार्या । अति संलग्न अवस्था तुर्या[8] । जियेचेनि[9] महत्कार्या । प्रवर्तले साधु ॥ ४ ॥ जे महंतांची[10] शांती । जे ईश्वराची निजशक्ती । जे ज्ञानियांची विरक्ती[11] । नराश्यशोभा ॥ ५ ॥ जे अनंत ब्रह्मांडें घडी[12] । लीलाविनोदेंचि[13] मोडी । आपण आदिपुरुषा[14] दडी[15] । मारूनि राहे ॥ ६ ॥ जे प्रत्यक्षें पाहतां आढळे । विचार घेतां[16] नाढळे । जियेचा पार न कळे[17] । ब्रह्मादिकांसी ॥ ७ ॥ जेसर्वनाटकेअंतर्कळा[18] । जे जाणीवस्फूर्ति[19] निर्मळा[20] । जियेचेनि स्वानंदसोहळा[21] । ज्ञानशक्ती ॥ ८ ॥ जे लावण्य स्वरूपाची शोभा । जे परब्रह्मसूर्याची प्रभा[22] । जे शब्दीं[23] वेदोनि उभा[24] । संसार नाशी ॥ ९ ॥ जे मोक्षश्रियेची[25] महामंगळा । जे सत्रावी[26] जीवनकळा । जे सत्त्वलीला सुशीतळा[27] । लावण्यखाणी ॥ १० ॥ जे अव्यक्त पुरुषाची व्यक्ती । जे विस्तारें वाढली इच्छाशक्ती । जे कलिकाळाची नियंती । सद्गुरुकृपा ॥ ११ ॥ जे परमार्थभागींचा[28] विचार । निवडोनि दावी सारासार । भवसिंधूचा पैलपार[29] । पाववी शब्दबळें ॥ १२ ॥ ऐसी बहु वेगें नटली । माया शारदा एकली । सिद्धाचि अंतरीं

---

१ आत्मप्राप्तीची. २ ब्रह्मदेवाची कन्या. ३ वाचेची देवता. ४ स्थूल वाणी. ५ शब्दांनीं वर्णितां येत नाहीं, जेथें शब्दाची गति कुंठित होते त्या परब्रह्म-वस्तूचें, ६ ध्येय, ध्यान व ध्याता यांच्या स्मरणतंतूने अंतःकरणाची एकाग्रता करणाऱ्यांची. ७ धैर्यवान पुरुषांची. ८ दृढनिश्चयाची बुद्धि. ९ ज्ञान. १० अज्ञान. ११ अहंकारादिरूप उपसर्ग. १२ परमेश्वराची. १३ साक्षात्कारअवस्था, विषयापासून पराङ्मुख आणि ब्रह्मावस्तूस अवलोकन करणारी अशी जी ज्ञानवृत्ति ती. जागृति, स्वप्न, निद्रा या तीन अवस्थांहून, निराळी अशी एक चौथी अवस्था. १४ जिच्या योगानें. १५ महात्मे, साधुपुरुष. १६ आत्मस्वरूपाविरहित पदार्थमात्राविषयी अप्रीति. १७ आशेच्या जयानें आलेली शोभा. १८ रचते, तयार करिते. १९ सहज खेळतां खेळतां. २० परमेश्वराचे ठिकाणीं. २१ दडी मारणें, लपणें, सृष्टीच्यां आंधीं आणि नंतर उल्लेखास न येई अशा रीतीनें परब्रह्माचे ठिकाणी गुप्त असते. २२ स्थूलदृष्टीनें पाहिलें तर. २३ विचार करून पाहिलें तर. २४ अंत. २५ जगद्रूप नाटकांची चालकशक्ति. २६ ज्ञानाचे स्मरण, ज्ञानाचें भासणें, ज्ञानाचा आठव. २७ शुद्ध. २८ आत्मानंदाचा उत्सव. २९ परब्रह्माच्या कोणी सूर्य. ३० त्याची कांत. ३१ शब्दांनीं बोलून, वैखरी वाणीनें. ३२ सज्ज, सिद्ध, मांडलेला. ३३ मोक्षाची शोभा. ३४ सोळा कलांनीं युक्त अशा लिंगदेहास चेतना व पुष्टि देणारी म्हणून सत्रावी जीवनकळा असें तिला म्हणतात; ब्रह्मरंध्रांतून जो अमृताचा स्राव होतो तो. ३५ सत्त्वगुणाची लीला करणारी. ३६ चांगली थंड. अध्यात्मिक वगैरे तीन तापांस शांतकरणारी. ३७ तत्वज्ञानाचा. ३८ पलीकडला किनारा.

संचली । चतुर्विध प्रकारें ॥ १३ ॥ तिहीं वाचा अंतरीं आलें । तें वैखरीया प्रगट केलें । ह्मणोनि कर्तृत्व जितुकें जालें । तें शारदागुणें ॥ १४ ॥ जे ब्रह्मादिकांची जननी । हरिहर जियेपासुनी । सृष्टिरचना लोकांतिन्ही । विस्तार जियेचा ॥ १५ ॥ जे परमार्थाचें मूळ । नातरी सद्विद्येंच केवळ । निवांत निर्मळ निश्चळ । स्वरूपस्थिती ॥ १६ ॥ जे योगियांयांचे ध्यानीं । जे साधकांचे चिंतनीं । जे सिद्धांचे अंतःकरणीं । समाधिरूपें ॥ १७ ॥ जे निर्गुणाची ओळखण । जे अनुभवाची खूण । जे व्यापकपणें संपूर्ण । सर्वा घटीं ॥ १८ ॥ शास्त्रें पुराणें वेदें श्रुती । अखंड जियेचें स्तवन करिती । नाना रूपीं जियेसि स्तविती । प्राणिमात्र ॥ १९ ॥ जे वेदशास्त्रांची महिमा । जे निरुपमाची उपमा । जियेकरितां परमात्मा । ऐसें बोलिजे ॥ २० ॥ नाना विद्या कळा सिद्धी । नाना निश्चयांची बुद्धी । जे सूक्ष्म वस्तूची शुद्धी । ज्ञप्तिमात्र ॥ २१ ॥ जे हरिभक्तांची निजभक्ती । जे अंतर्निष्ठांची अंतरस्थिति जे जीवन्मुक्तांची मुक्ति सायुज्यता ॥ २२ ॥ जे अनंत माया वैष्णवी । न कळे नाटक लाघवी । जे थोरथोरांस गोवी । जाणपणें ॥ २३ ॥ जें जें दृष्टीनें देखिलें । जें जें शब्दें बोलिखिलें । जें जें मनास भासलें । तितुकें रूप जियेचें ॥ २४ ॥ स्तवन भजन भक्तिभाव । मायेवांचूनी नाहीं ठाव । या वचनाचा अभिप्राव । अनुभवी जाणती ॥ २५ ॥ ह्मणोनि थोराहूनि थोर । जे ईश्वराची ईश्वर । तियेसी माझा नमस्कार । तेदंशेंचि आतां ॥ २६ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे प्रथमदशके शारदास्तवनं नाम तृतीयः समासः ॥ ३ ॥

---

१ परा, पश्यंती, मध्यमा व वैखरी या चार प्रकारांनी. २ वैखरी वाणीने, शब्दांनी. ३ सरस्वतीच्या योगानें. ४ स्वर्ग, मृत्यु, पाताळ. ५ आध्यात्मविद्या. ६ सत्य, ज्ञान आणि आनंदरूप अशी अवस्था. ७ विषयांपासून मन निवृत्त होऊन ते परमेश्वराचे ठिकाणीं लागावें म्हणून प्राणायामादिक उपायांनी जी एकाग्रता साधतात तिच्या रूपाने. ८ निर्गुण-ब्रह्माची. ९ ईश्वराने निर्माण केलेले जग किंवा तदंतर्गत प्रत्येक पदार्थ त्याच्या ठायीं. १० शास्त्रे सहा आहेत तीं हीं:—पूर्वमीमांसा, उत्तरमीमांसा, न्याय, वैशेषिक, सांख्य व योग. ११ पुराणें अठरा, तीं हीं:—मत्स्य, मार्कंडेय, भविष्य, भागवत, ब्रह्मांड, गरुड, लिंग, पद्म, वामन, अग्नि, कूर्म, स्कंद, नारद, वाराह, ब्रह्मवैवर्त, विष्णु, वह्न व शिव. १२ ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद. १३ वेदगत प्रमाणभूत वाक्यें. १४ मोठेपणा. १५ उपमारहित महात्म्य त्याची. १६ जिच्या मुळें. १७ ब्रह्माची. १८ शोध, पत्ता, विचार. १९ ज्ञानरूप. २० ज्यांनी आपली वृत्ती बाह्यविषयापासून काढून हृदयस्थ परमात्म्याकडे लाविली आहे अशांची. २१ अंतर्मुख वृत्तीची स्थिति. २२ ऐहिक विषयांपासून परावृत्त होऊन व देहाभिमान टाकून जे सर्व पदार्थ ईश्वररूपीं मानतात अशांची. २३ चौथी मुक्ति. २४ अवस्तूच्या ठिकाणी वस्तुत्वबुद्धि उत्पन्न करिते ती, चिच्छक्ति. २५ विष्णूची. २६ जिचें नाटक कळत नाहीं अशी लाघवी. २७ गुंतवते, घोटाळ्यांत घालते. २८ ज्ञानाभिमानानें. २९ मायेमध्यें म्हणजे द्वैतांत आल्यावांचून भजन पूजन वगैरे होत नाहीं. केवल स्वरूपानुभव स्थितींत भजन पूजन वगैरे नाहीं. ३० अर्थ. हेतु. ३१ त्या मायेचाच अंश म्हणून जीव या दृष्टीने.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ आतां सद्गुरु वर्णवेना । जेथें माया स्पर्शों शकेना । तें स्वरूप मज अज्ञाना । काय कळे ॥ १ ॥ न कळे न कळे नेति[1] नेती[1] । ऐसें बोलतसे श्रुती[2] । तेथें मज मूर्खांची मती । पोंवाडेल कोठें[3] ॥ २ ॥ मज न कळे हा विचार । दुरून माझा नमस्कार । गुरुदेवा पैलपार । पाववीं मज ॥ ३ ॥ होती स्तवनाची दुराशा[4] । तुटला मायेचा भरवसा[5] । आतां असाल तैसे असा । सद्गुरूस्वामी ॥ ४ ॥ मायेच्या बळें करीन स्तवन । ऐसें वांछित होतें मन । ते माया जाहली लज्जायमान । काय करूं ॥ ५ ॥ नाँतुडे मुख्य परमात्मा[6] । म्हणोनि करावी लागे प्रतिमा[7] । तैसा मायायोगें महिमा[8] । वर्णीन सद्गुरूचा ॥ ६ ॥ आपल्या भावासारिखा मनीं[9] । देव आठवावा ध्यानीं । तैसा सद्गुरू हा स्तवनी[10] । स्तवूं आतां ॥ ७ ॥ जयजयाजी सद्गुरुराजा[11] । विश्वंभरा विश्वबीजा[12] । परमपुरुषा मोक्षध्वजा[13] । दीनबंधू ॥ ८ ॥ तुझियेनि अभयकरें[14] । अनावर हे माया[15] वोसरे[16] । जैसे सूर्यप्रकाशें अंधारें । पळोनिजाय ॥ ९ ॥ आदित्यें[17] अंधकार निवारे । परंतु मागुते ब्रह्मांड भरे । निशी[18] जाहलिया नंतरें । पुनः काळोखें ॥ १० ॥ तैसा नव्हे स्वामीराव । करी जन्ममृत्यू वाव[19] । समूळ अज्ञानाचा ठाव । पुसून टाकी ॥ ११ ॥ सुवर्णाचें लोहे[20] कांहीं । सर्वथा होणार[21] नाहीं । तैसा गुरुदास संदेही[22] । पडोंचि नेणे सर्वथा ॥ १२ ॥ कां सरिता[23] गंगेसि मिळाली । मिळणी होतां गंगाचि जाहली । मग जरी वेगळी केली । तरी होणार नाहीं सर्वथा ॥ १३ ॥ परी ते सरिता मिळणीमार्गें । वोहळ मानिजेत जगें । तैसा नोहे शिष्य वेगें । स्वामीची होय ॥ १४ ॥ परीस आपणाऐसें करीना । सुवर्णें लोह पालटेना । उपदेश करी बहुत जनां । अंकित[24] सद्गुरूचा ॥ १५ ॥ शिष्या गुरुत्व प्राप्त होय । सुवर्णें सुवर्ण करितां नये । म्हणोनि उपमा काय । सद्गुरूसी पारिसाची ॥ १६ ॥ उपमे द्यावा सागर । तरी तो अत्यंतचि क्षारे । अथवा म्हणों क्षीरसागर । तरी तो नासेल कल्पांतीं[25] ॥ १७ ॥ उपमे द्यावा जरी मेरू । तरी तो जड पाषाण कठोरू । तैसा नव्हे कीं सद्गुरू । परम कोमळ दीनाचा ॥ १८ ॥ उपमे म्हणों गगन । परी गगनापरीस तो निर्गुण[26] । या कारणें दृष्टांत हीन । सद्गुरुसि गगनाचा ॥ १९ ॥ धीरपणें उपमूं जगती[27] । तरी हेही खचेल[28] कल्पांतीं । म्हणोनि धीरत्वासि दृष्टांतीं । हीन[29] वसुंधरा

---

१ हे नाहीं. २ वेद. ३ शिरणार कशी ? ४ स्तुतीची. ५ वाईट आशा, खोटी इच्छा. ६ आधार. ७ सांपडत नाहीं. ८ परमेश्वर. ९ मूर्ति. १० आपल्या निष्ठेसारखा. ११ जगाचें पालनकरणाऱ्या. १२ जगाची उत्पत्ति करणाऱ्या. १३ मोक्षाची पताका अशा. १४ नाश पावते. १५ सूर्याच्या योगानें १६ रात्र. १७ नाश. १८ लोखंड. १९ परिसानें लोखंडाचें सोने होते; पण त्या सोन्याचें पुनः मूळ लोखंड होत नाहीं. २० संशयांत. २१ नदी. २२ संगम होण्यापूर्वी. २३ परिसानें लोखंडाचें सोनें केले त्या सोन्याचे योगानें दुसऱ्या लोखंडाचें सोनें होत नाहीं. २४ दास, शिष्य. २५ खारट. २६ दुधाचा समुद्र. २७ प्रलयकालाच्या वेळीं. २८ आकाश. २९ आकाशाहून. ३० गुणरहित. ३१. पृथ्वी. ३२ नाशहोईल. ३३ कमी.

॥ २० ॥ आतां उपमावा गभस्ती । तरी गभस्तीचा प्रकाश किर्ती । शास्त्रें मर्यादा बोलती । सद्गुरु तो अमर्याद ॥ २१ ॥ ह्मणोनि उपमे उणा दिनेकर । सद्गुरु ज्ञानप्रकाश थोर । आतां उपमावा फणिवर[1] । तरी तो भारवाही[2] ॥ २२ ॥ आतां उपमे द्यावें जळ । तरी तें कालांतरें आटेल सकळ । सद्गुरुरूप तें निश्चळ । जाणार नाहीं ॥ २३ ॥ सद्गुरूस उपमावें अमृत । तरी अमर[3] धेरिती मृत्युपंथ[4] । सद्गुरु कृपा यथार्थ । अमरपरि करी[5] ॥ २४ ॥ सद्गुरूसे ह्मणावें कल्पतरू[6] । तरी हा कल्पनातीत विचारू[7] । कल्पवृक्षाचा अंगिकारू । कोण करो ॥ २५ ॥ चिंता मात्र नाहीं मनीं । कोण पुसे चिंतामणी[8] । कामधेनूची दुर्भणी[9] । निष्कामासि न लगती ॥ २६ ॥ सद्गुरू ह्मणों लक्ष्मीवंत । तरी ते लक्ष्मी नाशवंत । ज्याचे द्वारीं अष्ट तिष्ठत । मोक्षलक्ष्मी[10] ॥ २७ ॥ स्वर्गलोक इंद्रसंपत्ती[11] । हे कालांतरीं विटंबती[12] । सद्गुरुकृपेची प्राप्ती । कालांतरीं चळेना ॥ २८ ॥ हरिहरब्रह्मादिक । नाश पावती सकळिक । सर्वदा अविनाश[13] एक । सद्गुरुपद ॥ २९ ॥ तयास उपमा काय द्यावी । नाशवंत सृष्टी आणवी । पंचभौतिके[14] उठाठेवी[15] । न चले तेथें ॥ ३० ॥ ह्मणोनि सद्गुरु वर्णवेना । हेंग[16] हेचि माझी वर्णना[17] । अंतरस्थितीचिया खुणा । अंतर्निष्ठ[18] जाणती ॥ ३१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे प्रथमदशके गुरुस्तवनं नाम चतुर्थः समासः ॥ ४ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ आतां वंदीन संतसज्जन . परमार्थाचें अधिष्ठान[19] । जयांचेनि गुह्यज्ञान[20] । प्रगटे जनीं[21] ॥ १ ॥ जें वस्तु परम दुर्लभ । जयाचा अलभ्य लाभ । तेंचि होय परम सुलभ । संतसंगेंकरूनी ॥ २ ॥ वस्तु प्रगटाचि असे । पाहतां कोणासीच न दिसें । नाना साधनीं सायासें । न पडे ठाईं[22] ॥ ३ ॥ जेथें परीक्षावंत ठकले । नातरी डोळसचि अंध झाले । पाहत असतांचि चुकले । निजवस्तूसी ॥ ४ ॥ जें दीपाचेनि[23] दिसेना । नाना प्रकाशें गवसेना[24] । नेत्रांजनेंहि वसेना[25] । दृष्टीपुढें ॥ ५ ॥ सोळा कळा[26] पूर्ण शशी[27] । दाखवूं शकेना वस्तूपी । तीव्र आदित्य[28] कळा[29]राशी । तोहि दाखवीना[30] ॥ ६ ॥ जया सूर्याचेनि प्रकाशें । ऊर्णतंतू[31] तोहि दिसे । नाना सूक्ष्म पदार्थ भासे । अणुरेणुवा-

---

१ सूर्य. २ शेष. ३ भार वाहणारा. ४ देव. अमर=मरत नाहात ते. ५ मरतात. देव देखील पुण्याचा क्षय झाला असतां मरतात. ' क्षीणे पुण्ये मर्त्यलोके विशन्ति, (गीता.) ६ नाशराहित. ७ कल्पनेच्या पलीकडील. ८ चिंतिलेली वस्तु देणारें रत्न. ९ दोहन. १० इच्छारहिताला. ११ मोक्षरूपी संपत्ति. १२ नाश पावतात. १३ नाशरहित. १४ सर्व. १५ पृथ्वी, आप, इत्यादि पंच भूतांची. १६ खटपट, उठाठेव. १७ अशी. १८ सद्गुरूचें वर्णन करितां येत नाहीं, हेंच माझें सद्गुरूचें वर्णन आहे. १९ अंतर्मुख दृष्टीनें परमात्म्यास ओळखणारे. २० ईश्वरसाधनरूप पुरुषार्थाचें. २१ आश्रय. २२ ब्रह्मज्ञान. २३ लोकांत. २४ कळत नाहीं. २५ किंवा. २६ दिव्याच्या योगान. २७ सांपडत नाहीं. २८ जें अंजन डोळ्यांत घातलें असतां गुप्त वस्तूही दिसते, अशा अंजनानें देखील ही ब्रह्मवस्तु दिसेना, २९ कलांनीं. ३० चंद्र. ३१ सूर्य. ३२ केवळ प्रकाशाची रासच. ३३ ब्रह्म वस्तु दाखवीना ३४ ऊर्णनाभी- कोळ्याचा तंतू=सूत. ३५ अतिसूक्ष्म पृथ्वीचे अंश कण. वगैरे.

दिक ॥ ७ ॥ चिरलें बालाग्र तेंहि प्रकाशी । परी तो दाखवीना वस्तूसी । तें जयाचेनि साधकासी । प्राप्त होय ॥ ८ ॥ जेथें आक्षेप आटले । जेथें प्रयत्न पर्तावले । जेथें तर्क मंदावले । तोंकेतां निजवस्तूसी ॥ ९ ॥ वळे विवेकाची वेगडी । पडे शब्दाची बोबडी जेथें मनाची तांतडी । कामा नये ॥ १० ॥ जो बोलकेपणें विशेष । सहस्रमुखांचा जो शेष । तोहि शिणला निःशेष । वस्तु न सांगवे ॥ ११ ॥ वेदें प्रकाशिलें सर्वही । वेदविरहित कांहां नाहीं । तो वेद कोणासही । दाखवूं शकेना ॥ १२ ॥ तेंचि वस्तु संतसंगें । स्वानुभवें कळों लागे । त्याचा माहमा वचनों सांगे । ऐसा कवण ॥ १३ ॥ विचित्र कळा ये मायेची । परी ओळखी न सांगवे वस्तूची । मौनातीता अनंताची । संत सोये सांगती ॥ १४ ॥ वस्तूसि वर्णिलें न वचे । तेंचि स्वरूप संतांचे । या कारणें वचनाचें । कार्य नाहीं ॥ १५ ॥ संत आनंदाचें स्थळ । संत सुखाचे केवळ । नाना संतोषांचें मूळ । ते हे संत ॥ १६ ॥ संत मोक्षाची विश्रांती । संत तृप्तीची निजतृप्ती । नातरी भक्तीची फळश्रुती । ते हे संत ॥ १७ ॥ संत धर्माचें क्षेत्र । संत स्वरूपाचें सत्पात्र । नातरी पुण्याचि पवित्र । पुण्यभूमी ॥ १८ ॥ संत समाधीचें मंदिर । संत विवेकाचें भांडार । नातरी बोलिजे माहेर । सायुज्यमुक्तीचें ॥ १९ ॥ संत सत्याचा निश्चय । संत सार्थकाचा जय । संत प्राप्तीचा समय । सिद्धस्वरूपें ॥ २० ॥ मोक्षश्रियें अलंकृत । ऐसे हे संत श्रीमंत । जीव दरिद्री असंख्यात । नृपती केले ॥ २१ ॥ जे समर्थपणें उदार । जे कां अत्यंत दानशूर । तयांचेनि हा ज्ञानविचार । दिधला न वचे ॥ २२ ॥ महाराजे चक्रवर्ती । झाले आहेत, पुढें होती । परंतु कोणी सायुज्यमुक्ती । देणार नाहीं ॥ २३ ॥ जें त्रैलोक्यीं नाहीं दान । तेंचि करिती संतसज्जन । तयां संतांचें महिमान । काय म्हणोनि वर्णावें ॥ २४ ॥ जें त्रैलोक्याहूनि वेगळे । जें वेदश्रुतीसी नाकळे । तेंचि जयांचेनि बोळे । परब्रह्म अंतरीं ॥ २५ ॥ ऐसा संतांचा महिमा । बोलिजे तितुकी उणी उपमा । जयांचेनि मुख्य परमात्मा । प्रगट होय ॥ २६ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे प्रथमदशके संतस्तवनं नामः पंचमः समासः ॥ ५ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ आतां वंदूं श्रोतेजन । भक्त ज्ञानी संत सज्जन । विरक्त योगी गुणसंपन्न । सत्यवादी ॥ १ ॥ एक सत्वाचे सागर । एक बुद्धीचे आगर । एक

---

१ केसाचें अग्र. २ पूर्वपक्ष. प्रश्न, शंका. ३ व्यर्थ गेले. ४ तर्क करीत असतां. ५ विवेकास पेटके येतात म्हणजे तो लंगडा होऊन पडतो. ६ घाई, सत्वरपणा. ७ पूर्णपणें. ८ वस्तु दाखवूं शकेना. ९ शब्दांनी वस्तूचें वर्णन. १० लीला, ११ मायेपल्लीकडील, १२ रस्ता, वाट. १३ वस्तूचें वर्णन केलें जात नाहीं. १४ जें वस्तूचें स्वरूप तेंच संताचे स्वरूप. १५ चिंतिलेली वस्तु देणारें रत्न. १६ शेत, ठिकाण. १७ ब्रह्मस्वरूपाचें. १८ स्थान. १९ विचाराचें. २० ज्यांत ब्रह्मस्वरूप प्राप्त होतें अशा चोथ्या मुक्तीचें. २१ सार्थक=विवक्षेप्रमाणें योग्य विनियोग पावणें. २२ ब्रह्मस्वरूप. २३ मोक्षरूपी लक्ष्मीनें. २४ दिला जात नाहीं. २५ सार्वभौम. २६ कळत नाहीं. २७ वळतें, साठतें. २८ ऐकणारे. २९ आत्मस्वरूपाहून इतर सर्व विषयांवर प्रीति न ठेवणारे. ३० प्राणनिरोधानें अंतःकरणाची एकाग्रता संपादन करणारे. ३१ सत्त्वगुणाचे. ३२ क्षेत्र, ठिकाण.

श्रोते वैरागरे । नाना शब्दरत्नांचे ॥ २ ॥ जे नाना अर्थामृताचे भोक्ते । जे प्रसंगीं वक्तयाचे वक्ते । नाना संशयांते छेदिते । निश्चयीं पुरुष ॥ ३ ॥ ज्यांची धारणा अपार । जे ईश्वराचे अवतार । नातरी प्रत्यक्ष सुरवर । बैसले जैसे ॥ ४ ॥ कीं हे ऋषीश्वरांची मंडळी । शांतस्वरूप सत्वांगळी । जयांचेनि सभामंडळीं । परम शोभा ॥ ५ ॥ हृदयीं वेदगर्भ विलसे । मुखीं सरस्वती विलासे । साहित्य बोलतां जैसे । भासती देवगुरु ॥ ६ ॥ जे पवित्रपणें वैश्वानर । जे स्फूर्तिकिरणांचे दिनकर । ज्ञातेपणें दृष्टी समोर । ब्रह्मांड नये ॥ ७ ॥ जे अखंड सावधान । जयांसि त्रिकाळाचें ज्ञान । सर्वकाळ निरभिमान । आत्मज्ञानी ॥ ८ ॥ ज्यांचे दृष्टीखालून गेले । ऐसें कांहींच नाहीं उरलें । पदार्थमात्रासी लक्षिलें । मनें जयांच्या ॥ ९ ॥ जें जें कांहीं आठवावें । तें तें तयांसि पूर्वीच ठावें । तेथें काय अनुवादावें । ज्ञातेपणेंकरूनी ॥ १० ॥ परंतु हें गुणग्राहक । म्हणोनि बोलतों निःशंक । भाग्यपुरुष काय एक । सेवीत नाहीं ॥ ११ ॥ सदा सेविती दिव्यान्नें । पालटाकारणें अवीट अन्नें । तैसी हों माझीं वचनें । प्राकृत ॥ १२ ॥ आपुलें शक्त्यनुसार । भावें पूजावा परमेश्वर । परंतु पुजूं नये हा विचार । कोठेंचि नाहीं ॥ १३ ॥ तैसा मी एक वाग्दुर्बळ । श्रोते परमेश्वराचि केवळ । त्यांची पूजा वाचाबरळ । करूं पाहें ॥ १४ ॥ व्युत्पत्ति नाहीं कळा नाहीं । चातुर्य नाहीं प्रबंध नाहीं । भक्ति ज्ञान वैराग्य नाहीं । गौल्यता नाहीं वचनाची ॥ १५ ॥ ऐसा माझा वाग्विलास । म्हणोन बोलतों सावकाश । भावाचा भोक्ता जगदीश म्हणोनियां ॥ १६ ॥ तुम्हीं श्रोते जगदीशमूर्ती । तेथें माझी व्युत्पत्ति किती । बुद्धिहीन अल्पमती । सलगी करितों ॥ १७ ॥ समर्थाचा पुत्र मूर्ख जगीं । परी सामर्थ्य असे त्याचिया अंगी । तुम्हां संतांची मी सलगी । म्हणोनि करितों ॥ १८ ॥ व्याघ्र सिंह भयानक । देखोनि भयचकित होती लोक । परी त्यांचीं पिलीं निःशंक । तयांपुढें खेळती ॥ १९ ॥ तैसा मी संतांचा अंकित । तुम्हां संतांपाशीं बोलत । तरी माझी चिंता तुमचें चित्त । वाहेलचि कीं ॥ २० ॥ आपुलेचि बोल बोलिजे । त्याची संपादणी करणें लागे । परंतु कांहीं सांगणें नलगे । न्यून तें पूर्ण करावें ॥ २१ ॥ हें तों प्रीतीचें लक्षण । स्वभावेंचि करी मन । तैसे तुम्ही संत

---

१ खाण. २ बुद्धि, ग्रहणशक्ति. ३ देवांतील श्रेष्ठ देव. ४ सत्त्वगुणाच्या आधिक्यानें संपन्न. ५ ज्यांच्या योगानें. ६ वेदगुह्य जें ब्रह्मज्ञान. ७ वाचेची देवता. ८ साहित्यशास्त्र=अलंकारादिसंबंधी शास्त्र. ९ देवांचा गुरु बृहस्पति. १० अग्नि. ११ स्वरूपाचा आठव हींच ज्याचीं किरणें असा. १२ सूर्य. १३ स्वरूपज्ञानसंपन्न असल्यामुळे. १४ सदोदित. १५ ज्यांनीं पाहिलें नाहीं. १६ पाहिलें, विचार केला. १७ माहीत. १८ वर्णन करावें. १९ गुण घेणारे. २० भाग्यवान लोक. २१ श्रीमंतीजेवण, पक्वान्नें. २२ ज्यांचा कंटाळा येत नाहीं अशीं, आमटी, भात, भाजी, भाकरी वगैरे रोज खाण्यांत येणारीं अन्नें. २३ वाणीनें बडबड करणारा. २४ शास्त्रादिक ग्रंथज्ञान, विद्वत्ता. २५ ग्रंथ किंवा काव्यरचनेचें चातुर्य. २६ गोडी, मधुरपणा. २७ भाषणपद्धति. २८ निष्ठेचा. २९ परमेश्वरस्वरूप. ३० मैत्री, स्नेह, लडिवाळपणा. ३१ भयंकर. ३२ सेवक. ३३ आपलें म्हटलेलें मनुष्य. ३४ निरर्थक. ३५ सुधारून घेणें.

सज्जन । मायबाप विश्वांचे ॥ २२ ॥ माझा आशय जाणोनि जीवें । आतां उचित तें करावें । पुढें कथेसि अवधान द्यावें । म्हणे दासानुदास ॥ २३ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्य-संवादे प्रथमदशके श्रोतृस्तवनं नाम षष्ठः समाप्तः ॥ ६ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ आतां वंदूं कवीश्वर । जे शब्दसृष्टीचे ईश्वर । नातरी हे परमेश्वर । वेदावतारी ॥ १ ॥ कीं हें सरस्वतीचें निजस्थान । कीं हें नाना कळांचें जीवन । नाना शब्दांचें भुवन । यथार्थ होय ॥ २ ॥ कां हें पुरुषार्थांचें वैभव । कीं हें जगदीशाचें महत्व । नाना लाघवें सत्कीर्तीस्तव । निर्माण कवी ॥ ३ ॥ कीं हे शब्द-रत्नांचें सागर । कां हे मुक्तांचें मुक्त सरोवर । नाना बुद्धीचे वैरागर । निर्माण जाहले ॥ ४ ॥ कीं हे अध्यात्मरत्नांची खाणी । कां हे बोलके चिंतामणी । नाना कामधेनूंची दुभणी । ओळली श्रोतयांवरी ॥ ५ ॥ कीं हे कल्पनेचे कल्पतरु । कीं हे मोक्षाचे मुख्य पाडिभरू । नाना सायुज्यतेचे विस्तारू । विस्तारले ॥ ६ ॥ कीं हा परलोकींचा निजस्वार्थ । कीं हा योगियांचा गुप्त पंथ । नाना ज्ञानियांचा परमार्थ । रूपासि आला ॥ ७ ॥ कीं हे निरंजनाची खूण । कीं हे निर्गुणाची वोळखण । मायाविलक्षणाचें लक्षण । ते हे कवी ॥ ८ ॥ कीं हा श्रुतीचा भवगर्भ । कीं हा परमेश्वराचा अलभ्य लाभ । नातरी होय सुलभ । निजबोधें कविरूपें ॥ ९ ॥ कवि मुमुक्षूंचें अंजन । कवि साधकांचें साधन । कवि सिद्धांचें समाधान । निश्चयात्मक ॥ १० ॥ कवि स्वधर्माचा आश्रय । कवि मनाचा मनोजय । कवि धार्मिकांचा विनय । विनयकर्ते ॥ ११ ॥ कवि वैराग्याचें संरक्षण । कवि भक्तांचें भूषण । नाना स्वधर्माचें स्थापन । ते हे कवी ॥ १२ ॥ कवि प्रेमळांची प्रेमस्थिती । कवि ध्यानस्थांची ध्यानमूर्ती । कवि उपासकांची वाढे कीर्ती । विस्तारली ॥ १३ ॥ नाना साधनांचें मूळ । कवि नाना प्रयत्नांचें फळ । नाना कार्यसिद्धि केवळ । कवीचेनि प्रसादें ॥ १४ ॥ आधीं कवीचा वाग्विलासु । तरी मग श्रवणीं तुंबळे रस । कवीचेनि मतिप्रकाशें । कवित्वास होय ॥ १५ ॥ कवि व्युत्पन्नाची योग्यता । कवि सामर्थ्यवंताची सत्ता । कवि विचक्षणाची कुशलता । नाना प्रकारें ॥ १६ ॥ कवि कवित्वाचा प्रबंध । कवि नाना धाटी मुद्रा छंद । कवि गद्यपद्य-

---

१ जगताचे. २ हेतु, उद्देश. ३ लक्ष. ४ शब्दशास्त्राचे. ५ वसतिस्थान. ६ आश्रय. ७ जन्मसाफल्याचें. ८ कौशल्याने. ९ सत्कीर्तीकरिता. १० उत्पन्न झाले आहेत. ११ प्रपंचादिबंधना पासून सुटलेल्यांचें. १२ मुक्त पुरुष हीच मोत्ये ज्यांत सांपडतात असे सरोवर, म्हणजे मुक्तपुरुषांचें वर्णन करणारे कवी. १३ खाण. १४ ब्रह्मज्ञानरूपी रत्नांची. १५ दुग्धस्राव. १६ वळली, येऊन ठेपली. १७ भर, डौल, शोभा. १८ स्वस्थता मुक्तीचे. १९ मायारहित ब्रह्माची. २० सत्व, रज, तमादि गुणरहित ब्रह्माची. २१ मायेहून विलक्षण असें जें ब्रह्म. २२ चिन्ह, खूण. २३ इंगित अर्थ. २४ आत्मज्ञान २५ मोक्षमार्ग इच्छणाऱ्यांचें. २६ यथार्थज्ञानदृष्टी प्राप्त करून देणारे डोळ्यांचे औषध. २७ भ्रांतीचा नाश होऊन ब्रह्मस्वरूप झाले त्यांचे. २८ नम्रपणा. २९ मोठी. ३० वाणीचा विहार. ३१ पसरतो, उचंबळतो. ३२ बुद्धिप्रभाव. ३३ विद्वानांचा. ३४ शहाण्याची. ३५ रचना. ३६ धाटणी. रीत. ३७ लक्षणें.

भेदाभेद । पदप्रासकर्ते ॥ १७ ॥ कवि सृष्टीचा अलंकार । कवि लक्ष्मीचा शृंगार । सकळ सिद्धींचा निर्धार । ते हे कवि ॥ १८ ॥ कवि सभेचें मंडन । कवि भाग्याचे भूषण । नाना सुखांचें संरक्षण । ते हे कवि ॥ १९ ॥ कवि देवांचें रूपकर्ते । कवि ऋषींचे महत्ववर्णिते । नाना शास्त्रांचे सामर्थ्यातें । कवि वाखाणिती ॥ २० ॥ नसता कवीचा व्यापार । तरी कैंचा असता जगदुद्धार । म्हणोनि कवि हे आधार । सकळ सृष्टीसी ॥ २१ ॥ नाना विद्या ज्ञातृत्व कांहीं । कवीश्वरावीण तें नाहीं । कवीपासून सर्वही । सर्वज्ञता ॥ २२ ॥ मागां वाल्मीक व्यासादिक । जाहले कवीश्वर अनेक । तयांपासून विवेक । सकळ जनांसी ॥ २३ ॥ पूर्वी काव्यें होतां केलीं । तरीच व्युत्पत्ति प्राप्त जाहली । तेणें पंडिताअंगीं बाणली । परम योग्यता ॥ २४ ॥ ऐसे पूर्वी थोर थोर । जाहले कवीश्वर आपार । आतां आहेत पुढें होणार । नमन त्यांसी ॥ २५ ॥ नाना चातुर्याच्या मूर्ती । कीं हे साक्षात् बृहस्पती । वेद श्रुती बोलां म्हणती । ज्यांच्या मुखें ॥ २६ ॥ परोपकाराकारणें । नाना निश्चय अनुवादणें । सेखीं बोलिले पूर्णपणें । संशयातीत ॥ २७ ॥ कीं हे अमृताचे मेघ वोळले । कीं हे नवरसांचे वोघ लोटले । नाना सुखांचें उचंबळलें । सरोवर हें ॥ २८ ॥ कीं हीं विवेकनिधीचीं भांडारें । प्रगट जाहलीं मनुष्याकारें । नाना वस्तूंचेनि विचारें । कोंदाटले हे ॥ २९ ॥ कीं हे आदिशक्तीचें ठेवणें । नाना पदार्थांसि आणी उणें । लाधलें पूर्वसंचिताच्या गुणें । विश्वजनासी ॥ ३० ॥ कीं हीं सुखांची तारवें लोटलीं । अक्षय आनंदे उतरलीं । विश्वजनासि उपेगा आलीं । नानाप्रयोगाकारणें ॥ ३१ ॥ कीं हे निरंजनाची संपत्ती । कीं हे विरांटाची योगस्थिती । कीं हे भक्तीची फलश्रुती । फळासि आली ॥ ३२ ॥ कीं हा ईश्वराचा पवाड । पाहतां गगनाहून वाड । ब्रह्मांडाहून जाड । कविप्रबंधरचना ॥ ३३ ॥ आतां असो हा विचार । जगासि आधार कवीश्वर । तयांसि माझा नमस्कार । साष्टांगभावें ॥ ३४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे प्रथमदशके कवीश्वरस्तवनं नाम सप्तमः समासः ॥ ७ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ आतां वंदू सकळ सभा । जियें सभेसी मुक्ति सुलभा । जेथें जगदीश स्वयें उभा । तिष्ठत प्रेमभरें ॥ १ ॥ श्लोक ॥ ॥ नाहं वसामि वैकुंठे योगिनां हृदये रवौ । मद्भक्ता यत्र गायंति तत्र तिष्ठामि नारद ॥ १ ॥ टीका ॥ नाहीं वैकुंठींच्या ठायीं । नाहीं योगियांचे हृदयीं । माझे भक्त गाती जे ठायीं । तेथें मी तिष्ठत नारदा ॥ २ ॥ या कारणें सभा श्रेष्ठ । भक्त गाती तें वैकुंठ । नामघोषे घडघडाट । जयजयकारें गर्जती ॥ ३ ॥ प्रेमळ भक्तांचीं गायनें । भगवद्वाक्यें हरिकीर्तनें । वेदव्या-

---

१० भूषण. २ जाणतेपण. ३ ज्ञान. ४ दृढ प्राप्त झाली. ५ बोलणें, वर्णन करणें. ६ शेवटीं. ७ संशयरहित. ८ वळले, प्राप्त झाले. ९ शृंगारादि नऊ रसांचे. १० विचाररूप खजिन्यांतील. ११ खचुन भरले. १२ आदिमायेचें. १३ पूर्वजन्मीच्या पुण्यानें. १४ भरून वाहिली. १५ निराकार परमेश्वराची. १६ विश्रान्त्या देवाचें समाधिस्थानच. १७ मोठेपणा, कीर्ति. १८ थोर.

ख्यान पुराणश्रवणें । जेथें निरंतर ॥ ४ ॥ परमेश्वराचे गुणानुवाद । नाना निरूपणांचे संवाद । अध्यात्मविद्या भेदाभेद । मंथन जेथें ॥ ५ ॥ नाना समाधानें तृप्ती । नाना आशंकानिर्वृत्ति । चित्ती बैसे ध्यानमूर्ती । वाग्विलासें ॥ ६ ॥ भक्त प्रेमळ भाविक । सभ्य सखोलँ सात्विक । रम्य रसाळ गायक । निष्ठावंत ॥ ७ ॥ कर्मशील आचारशील । दानशील धर्मशील । शुचिष्मंतँ पुण्यशील । अंतरशुद्ध कृपाळू ॥ ८ ॥ योगी विरागी उदास । नेमनिग्रही तापस । विरक्त निस्पृह बहुवस । अरण्यवासी ॥ ९ ॥ दंडधारी जटाधारी । नाँथपंथी मुद्राधारी । एक बाळब्रह्मचारी । योगीश्वर ॥ १० ॥ पुरश्चरणी आणि तपस्वी । तीर्थवासी आणि मँनस्वी । महायोगी आणि जैनँस्वी । जनासारिखे ॥ ११ ॥ सिद्ध साधु आणि साँधक । मंत्रयंत्रादिशोधक । एकनिष्ठ उपासक । गुणग्राही ॥ १२ ॥ संत सज्जन विद्वज्जन । वेदज्ञ शास्त्रज्ञ महाजन । प्रबुद्ध सर्वज्ञ समाधान । विमँळ कर्ते ॥ १३ ॥ योगि व्युत्पन्न ऋषीश्वर । धूर्त तैाँर्किक कवीश्वर । मनोजयाचे मुनीश्वर । आणि दिग्वल्कलँ ॥ १४ ॥ ब्रह्मज्ञानी आत्मज्ञानी । तत्वज्ञानी पिंडज्ञैानी । योगाभ्यासी योगज्ञानी । उदँासीन ॥ १५ ॥ पंडित आणि पुराणिक । विद्वांस आणि वैदिकँ । भट्ट आणि पाठक । यजुर्वेदी ॥ १६ ॥ महाभलं महाँश्रोत्री । याज्ञिकँ आणि अँग्निहोत्री । वैद्य आणि पंचाँक्षरी । परोपकारकर्ते ॥ १७ ॥ भूत भविष्य वर्तमान । जयासी त्रिकाळाचें ज्ञान । बहुश्रुत निरभिमान । निरपेक्षी ॥ १८ ॥ शांतिक्षमादयाशील । पवित्र आणि सत्वशील । अंतरशुद्ध ज्ञानशील । ईश्वरी पुरुष ॥ १९ ॥ ऐसे जे कां सभानायक । जेथें नित्यँानित्यविवेक । त्यांचा महिमा अलौकिक । काय ह्मणून वर्णावा ॥ २० ॥ जेथें श्रवणाचा उपाँय । आणि परमार्थसँमुदाय । जेथें जनास तरणोपाय । सहजचि घडे ॥ २१ ॥ उत्तम गुणांची मंडळी । सत्वधीर सत्वाँगळी । नित्यसुखाची नेँव्हाळी । जेथें वसे ॥ २२ ॥ विद्यापात्रें कळापात्रें । विशेष गुणांचीं सत्पात्रें । भगवताचीं प्रीतिपात्रें । मिळालीं जेथें ॥ २३ ॥ प्रँवृत्ति आणि निँवृत्ती । प्रपंची आणि परमार्थी । गृहस्थाश्रमी वैाँनप्रस्थी । संन्यासादिक ॥ २४ ॥ वृद्ध तरुण आणि बाळ । पुरुषस्त्रियादिक सकळ । अखंड ध्याती तैमालनीळ । अंतर्याँमीं ॥ २५ ॥ ऐसे परमेश्वराचे जन । त्यांसि माझें अभिवंदँन । जयाचेनि समाधान । अकस्मात बाणे ॥ २६ ॥ ऐसिये सभेचा

---

१ वेदांतविद्या. २ चर्चा. ३ शंका निरसन. ४ गंभीर. ५ पवित्र. ६ विरक्त. ७ नवनाथसांप्रदायी. ८ गायत्र्यादि मंत्रांचें अनुष्ठान करणारे. ९ मन ताब्यांत ठेवणारे. १० लोकाप्रमाणे वागणारे. ११ मोक्षादिकार्य साधण्याविषयी तत्पर. १२ निर्मळ, शुद्ध. १३ तर्कशास्त्रवेत्ते. १४ दिगंबर, दिशारूप वस्त्र परिधान करणारे. १५ शरीरज्ञानी. १६ विरक्त. १७ वेदविद्या जाणणारा. १८ महावेदवेत्ते. १९ यज्ञकर्म करणारे. २० आग्नबाळगून सांजसकाळ होमकरणारे. २१ मांत्रिक. २२ निरिच्छ. २३ शाश्वत व अशाश्वत यांचा म्हणजे ब्रह्म शाश्वत व जगत् अशाश्वत असा विचार. २४ मार्ग, क्रम. २५ परमार्थाच्या अनेक गोष्टे. २६ सत्वशील. २७ नवीनपणा. २८ कर्मकांडे वृत्ते. २९ मोक्ष मार्ग. ३० स्त्रीसह वनांत तप करण्याचा तृतीय आश्रम स्वीकारलेले. ३१ तमालसम नीलमूर्ति विष्णु. ३२ चित्तांत. ३३ नमन.

गजर । तेथें माझा नमस्कार । जेथें नित्यनिरंतर । कीर्तन भगवंताचें ॥ २७ ॥ जेथें भगवंताच्या मूर्ती । तेथें पाविजे उत्तम गती । ऐसा निश्चय बहुतां ग्रंथी । महंत बोलिले ॥ २८ ॥ केलों कीर्तन वरिष्ठ । जेथें होय ते सभा श्रेष्ठ । कथाश्रवणे नाना नेष्ट । संदेह मावळती ॥ २९ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे प्रथमदशके सभावर्णनं नाम अष्टमः समाप्तः ॥ ८ ॥

श्रीगणेशायनमः ॥ ॥ आतां स्तवूं हा परमार्थ । जो साधकांचा निज स्वार्थ । नातरी समर्थांमध्यें समर्थ । योग हा ॥ १ ॥ आहे तरी परम सुगम । परी जनासि जाहला दुर्गम । कां जयाचें चुकलें वर्म । सत्समागमाकडे ॥ २ ॥ नाना साधनांचे उधार । हा रोकडा ब्रह्मसाक्षात्कार । वेदशास्त्रां जें सार । तें अनुभवास ये ॥ ३ ॥ आहे तरी चहूंकडे । परी अणुमात्र दृष्टीस न पडे । उदास परी एकीकडे । पाहतां दिसेना ॥ ४ ॥ आकाशमार्गीं गुप्त पंथ । जाणती योगिये समर्थ । इतरांस हा गुह्यार्थ । सहसा न कळे ॥ ५ ॥ साराचें हि निजसार । अखंड अक्षय अपार । नेऊं न शकती तस्कर । कांहीं केल्या ॥ ६ ॥ तयासि नाहीं राजभय । अथवा नाहीं अग्निभय । श्वापदभय बोलोंच नये ॥ ७ ॥ परब्रह्म तें हालवेना । अथवा ठावही चुकेना । काळांतरीं चळेना । जेथिंचें तेथें ॥ ८ ॥ ऐसें तें निज ठेवणें । कदापि पालटों नेणें । अथवा नव्हे अधिक उणें बहुतां काळें ॥ ९ ॥ अथवा तें घसवटेना । अथवा तें अदृश्य होईना । नातरी पाहतां दिसेना । गुरुअंजनेविण ॥ १० ॥ मागां योगिये समर्थ । त्याचाहि निजस्वार्थ । त्यासि बोलिजे परमार्थ । परम गुह्य ह्मणोनि ॥ ११ ॥ ज्यांहीं शोधून पाहिला । त्यांसीच अर्थ सांपडला । येरां असोनि अलभ्य जाहला । जन्मोजन्मां ॥ १२ ॥ ॥ अपूर्वता या परमार्थाची । वार्ता नाहीं जन्ममृत्यूंची । आणि पदवी सायुज्यतेची । सन्निधचि लाभे ॥ १३ ॥ माया विवेकें मावळे । सारासारविचारकळे । परब्रह्म तेंहि निवळे । अंतर्यामीं ॥ १४ ॥ ब्रह्म भासलें उदंड । ब्रह्मीं बुडालें ब्रह्मांड । पंचभूतांचें थोतांड । तुच्छ वाटे ॥ १५ ॥ प्रपंच वाटे लटिका । माया वाटे लापणिका । शुद्ध आत्मा विवेकाकां—। अंतरीं आला ॥ १६ ॥ ब्रह्मस्थिति बाणतां अंतरीं । संदेह गेला ब्रह्मांडाबाहेरी ।

---

१ कलियुगांत. २ अत्यंत घातकी, वाईट. ३ ईश्वरसाधनरूप पुरुषार्थ. ४ स्वाहित, अपूर्वठेवा. ५ श्रेष्ठ, बलवान्. ६ सोपा. ७ कठीण. ८ मर्म. ९ सत्पुरुषांच्यासंगतीचें. १० कालांतरीं प्राप्त होणारे. ११ ब्रह्मप्राप्ति. १२ रोख, तत्क्षणीच प्राप्त होणारा. १३ थोडाही, किंचित्. १४ अलिप्त. १५ सर्वव्यापी असल्यामुळें फक्त एकीकडेच दिसत नाहीं १६ गुह्ययोगाचे मार्ग. १७ चोर. १८ पशूंपासून भीति. १९ बदलणें. २० घांसलेंजात नाहीं. २१ गुरूच्या कृपेच्या अंजना शिवाय. २२. अपूर्व ठेवा. २३ तत्त्व. २४ दुसऱ्याना, इतरांना. २५ आश्चर्यकारकपणा, इतर ठिकाणीं न सांपडणारा गुण. २६ अगदी जवळ. २७ प्रगट होते. २८ हृदयांत. २९ पुष्कळ. ३० बंड, नसतें महत्व. ३१ संसार. ३२ खोटा. ३३ व्यर्थ, पोकळ मिथ्या. ३४ विचारामध्यें. ३५ ब्रह्मज्ञानाचा अनुभव. ३६ ठसतां, दृढ होतां. ३७ संशय.

दृश्याची जुनी जर्जरी[1] । कुंहिट जाहली[2] ॥ १७ ॥ ऐसा हा परमार्थ । जो करील त्याचा निजस्वार्थ । आतां या समर्थासि समर्थ । किती म्हणोनि म्हणावें ॥ १८ ॥ या परमार्थाकारितां[4] । ब्रम्हांदिकांसि विश्रामेता[5] । योगी पावती तन्मयता[6] । परब्रह्मीं ॥ १९ ॥ परमार्थ सकळांस विसावा । सिद्ध साधु महानुभावा । सेखीं[7] सात्विक जड जीवां । सत्संगें करूनी । २० ॥ परमार्थ जन्माचें सार्थक । परमार्थ संसारीं तारक । परमार्थ दाखवी परलोक । धार्मिकासी ॥ २१ ॥ परमार्थ तापसांसी थार[8] । परमार्थ साधकासी आधार । परमार्थ दाखवी पार । भवसागराचा ॥ २२ ॥ परमार्थी तो राज्यधारी । परमार्थ नाहीं तो भिकारी । या परमार्थाची सरी[9] । कोणास द्यावी ॥ २३ ॥ अनंत जन्मींचें पुण्य जोडे । तरीच परमार्थ घडे । मुख्य परमात्मा[10] आतुंडे । स्वानुभवासी ॥ २४ ॥ जेणें परमार्थ वोळखिला । तेणें जन्म सार्थ केला । येर[11] तो पापी जन्मला । कुळक्षयाकारणें ॥ २५ ॥ असो भगवत्प्राप्तीविण । करी संसाराचा शीण[12] । त्या मूर्खाचें मुखावलोकन । करूंच नये ॥ २६ ॥ भल्यानें परमार्थीं भरावें । शरीरसार्थक करावें । पूर्वजांसी उद्धरावें । हरिभक्ती करूनी ॥ २७ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे प्रथमदशके परमार्थस्तवनं नाम नवमः समासः ॥ ९ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ धन्य धन्य हा नरदेहो । येथील अपूर्वता[13] पहा हो । जो जो कीजे परमार्थलाहो[14] । तो तो पावे सिद्धीतें ॥ १ ॥ या नरदेहाचेनि लोगेंवेगें[15] । एक लागले भक्तिसंगे । एकी परम वीतरागें[16] । गिरिकंदरें[17] सेविलीं ॥ २ ॥ एक फिरती तीर्थाटनें । एक करिती पुरश्चरणें । एक अखंड नामस्मरणें । निष्ठावंत राहिले ॥ ३ ॥ एक तपें करूं लागले । एक योगाभ्यासी महा भले । एक अभ्यासयोगें जाहले । वेदशास्त्रीं व्युत्पन्न[18] ॥ ४ ॥ एकीं हटनिग्रहे[19] केला । देह अत्यंत पीडिला । एकीं देव[20] ठाईं पाडिला[21] । भावार्थबळें ॥ ५ ॥ एक महानुभाव[22] विख्यात । एक भक्त झाले ख्यात[23] । एक सिद्ध अकस्मात । गगन वोळंगती[24] ॥ ६ ॥ एक तेजीं तेजाचे जाहले । एक जळीं मिळोन गेले । एक दिसतचि अदृश्य जाहले । वायुस्वरूपीं ॥ ७ ॥ एक एकचि बहुधा होती । एक देखतांचि निघोन जाती । एक बसले असतांचि भ्रमती । नाना स्थानीं

---

१ दिसणारें सर्व त्याची, जगाची. २ जुनी पुराणी गोधडी. ३ कुजली, नाश पावली. ४ परमार्थामुळें. ५ शांती. ६ तद्रूपता. ७ कामक्रोधादि दोषांनी चंचल न होणारा अशा पुण्यात्म्यास विश्रामध्यें देव भरला आहे असा ज्यांचा अनुभव आहे ते. ८ शेवटीं. ९ बरोबरी. १० प्राप्त होणें, मिळतो. ११ दुसरा. इतर, म्हणजे परमार्थ न करणारा. १२ कष्ट, यातायात. १३ दुसरे ठिकाणीं न आढळणारी गोष्ट. १४ परमार्थाचा लाभ. १५ नरदेह मिळाल्याबरोबर त्वरेनें. १६ वैराग्यानें. १७ पर्वतांतील गुहा. १८ विद्वान्. १९ सतत एका पायावर उभें राहणें, अधोमुख करून धुम्रपानकरणें, बाहू उर्ध्व धरणें. अशा प्रकारचें हटयोगाचें तप. २० प्राप्त करून घेतला. २१ भक्तीच्या सामर्थ्यानें. २२ ब्रह्मानुभवी. २३ प्रसिद्ध. २४ आकाशांत संचार करितात.

समुद्री ॥ ८ ॥ एक भयानकावरी बैसती । एक अचेतनें चालविती । एक ते प्रेतें उठविती । तपोबळेंकरून ॥ ९ ॥ एक तेजें मंद करिती । एक जळें आटविती । एक वायु निरोधिती[3] विश्वजनाचा ॥ १० ॥ ऐसे हटनिग्रही कृतबुद्धी । जयांसि वोळल्या नाना सिद्धी । ऐसे सिद्ध लक्षावधी । होऊनी गेले ॥ ११ ॥ एक मनःसिद्ध एक वाचासिद्ध । एक अल्पसिद्ध एक सर्वसिद्ध । ऐसे नानाप्रकारचे सिद्ध । विख्यात जाहले ॥ १२ ॥ एक नवविधाभक्तिराजपथें । गेले तरले परलोकींच्या निजस्वार्थें । एक योगी गुप्त पंथें । ब्रह्मभुवना पावले ॥ १३ ॥ एक वैकुंठास गेले । एक सत्यलोकीं राहिले । एक कैलासीं बैसले । शिवरूप होऊनी ॥ १४ ॥ एक इंद्रलोकीं इंद्र जाहले । एक पितृलोकीं मिळाले । एक ते उडुगणीं बैसले । एक ते क्षीरसागरी ॥ १५ ॥ सलोकता समीपता । सरूपता सायुज्यता । या चार मुक्ती तत्त्वतां । इच्छा सेवून राहिले[4] ॥ १६ ॥ ऐसे सिद्ध साधु संत । स्वहिता प्रवर्तले अनंत । ऐसा हा नरदेह विख्यात । काय म्हणोनि वर्णावा ॥ १७ ॥ या नरदेहाचेनि आधारें । नाना साधनांचेनि द्वारें । मुख्य सारासार-विचारें । बहुत सुटले ॥ १८ ॥ या नरदेहाचेनि संबंधें । बहुत पावले उत्तम पदें । अहंता[5] सोडोनि स्वानंदे । सुखी जाहले ॥ १९ ॥ नरदेहीं येऊनि सकळ । ऊर्ध्वगती पावले केवळ । एथें संशयाचें मूळ । खंडोनि गेलें ॥ २० ॥ पशुदेहीं नाहीं गती । ऐसें सर्वत्र बोलती । म्हणोनि नरदेहींच प्राप्ती । परलोकाची ॥ २१ ॥ संत महंत ऋषि मुनी । सिद्ध साधु समाधानी । भक्त मुक्त ब्रह्मज्ञानी । विरक्त योगी तपस्वी ॥ २२ ॥ तत्वज्ञानी योगाभ्यासी । ब्रह्मचारी दिगंबर संन्यासी । षट्दर्शनी तापसी । नरदेहींच जाहले ॥ २३ ॥ म्हणोन नरदेह श्रेष्ठ । नाना देहामध्यें वरिष्ठ । जयाचेनि चुके अरिष्ट । यमयातनेचें ॥ २४ ॥ नरदेह हा स्वाधीन । सहसा नव्हे पराधीन । परंतु हा परोपकारी झिजवून । कीर्तिरूपें उरवावा ॥ २५ ॥ अश्व वृषभ गाई म्हैसी । नाना पशु स्त्रिया दासी । कृपाळूपणें सोडितां त्यांसी । कोण तरी धरील ॥ २६ ॥ तैसा नव्हे नरदेहो । इच्छा जावो अथवा राहो । परी यास कोणी पहा हो । बंधन करूं शकेना ॥ २७ ॥ नरदेह पांगुळो असता । तरी तो कार्यास न येता । अथवा थोंटा जरी असता । तरी परोपकारास नये ॥ २८ ॥ नरदेह अंध असिला । तरी तो निपटे वांयां गेला । अथवा बधिर जरी असिला । तरी निरूपण नाहीं ॥ २९ ॥ नरदेह

---

१ भयंकर प्राण्यावर. २ निर्जीव पदार्थ. ३ रोधितात. ४ दृढनिश्चयी. ५ साध्य झाल्या. ६ मन ताब्यांत ठेवणारे. ७ ब्रह्मलोकीं. ८ नक्षत्रसमूहांत. ९ ईश्वराचे लोकीं वास. १० ईश्वराचें सान्निध्य. ११ ईश्वरसदृशरूपपणा. १२ ईश्वराशीं आणि जीवाशीं अभेदता. १३ खरोखर. १४ आपल्या इच्छे-प्रमाणें जी मुक्ती आवडेल ती संपादन करून तिचें सेवन करीत राहिले. १५ मीपणा. १६ आत्मा-नदाच्या योगानें. १७ उच्चस्थितीस, मोक्षगतीस. १८ नग्न. १९ न्याय, वैशेषिक, सांख्य, पातंजल, पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा हीं सहा शास्त्रें जाणणारे. २० बैल. २१ लंगडा, लुला. २२ अगदीं, केवळ. २३ कथन.

असिला मुका । तरी घेतां नये आशंका । अशक्त रोगी नासका । तरी तो निष्कारण ॥ ३० ॥ नरदेह असिला मूर्ख । अथवा फेंपऱ्या समंधाचें दुःख । तरी तो जाणावा निरर्थक । निश्चयेंसि ॥ ३१ ॥ इतुकेंही नसतां व्यंग । नरदेह आणि सकल सांग । तेणें धरावा परमार्थमार्ग । लागवेगें ॥ ३२ ॥ सांग नरदेह जोडला । आणि परमार्थ बुद्धि विसरला । तरी तो मूर्ख कैसा भ्रमला । मायाजाळीं ॥ ३३ ॥ मृत्तिका खणोनि घर केलें । तें माझें असें दृढ कल्पिलें । परी हें बहुतांचें कळलें । नाहींच तयासी ॥ ३४ ॥ मूषक म्हणती घर आमुचें । पाली म्हणती घर आमुचें । मक्षिका म्हणती घर आमुचें । निश्चयेंसी ॥ ३५ ॥ कांतण्या म्हणती घर आमुचें । मुंगळे म्हणती घर आमुचें । मुंग्या म्हणती घर आमुचें । निश्चयेंसी ॥ ३६ ॥ विंचू म्हणती आमुचें घर । सर्प म्हणती आमुचें घर । झुरळें म्हणती आमुचें घर । निश्चयेंसी ॥ ३७ ॥ भ्रमर म्हणती आमुचें घर । भिंगोऱ्या म्हणती आमुचें घर । आळिका म्हणती आमुचें घर । काष्ठाभेद्यें ॥ ३८ ॥ मार्जारें म्हणती आमुचें घर । श्वानें म्हणती आमुचें घर । मुंगुसें म्हणती आमुचें घर । निश्चयेंसी ॥ ३९ ॥ ढेंकूण म्हणती आमुचें घर । चांचण्या म्हणती आमुचें घर । घुंगरडीं म्हणती आमुचें घर । निश्चयेंसी ॥ ४० ॥ पिंगूळ म्हणती आमुचें घर । वाळेभ्या म्हणती आमुचें घर । पिसुवा म्हणती आमुचें घर । निश्चयेंसी ॥ ४१ ॥ पिसोळे म्हणती आमुचें घर । गांधले म्हणती आमुचें घर । सोट म्हणती आमुचें घर । आणि गोमी ॥ ४२ ॥ बहुत किड्यांचा जोजार । किती सांगावा विस्तार । समस्त म्हणती आमुचें घर । निश्चयेंसी ॥ ४३ ॥ पाहुणे म्हणती आमुचें घर । मित्र म्हणती आमुचें घर । ग्रामस्थ म्हणती आमुचें घर । निश्चयेंसी ॥ ४४ ॥ पशु म्हणती आमुचें घर । दासी म्हणती आमुचें घर । घरचीं म्हणती आमुचें घर । निश्चयेंसी ॥ ४५ ॥ तस्कर म्हणती आमुचें घर । राजकीय म्हणती आमुचें घर । अग्नि म्हणे आमुचें घर । भस्म करूं ॥ ४६ ॥ समस्त म्हणती घर माझें । हें मूर्खही म्हणे माझें माझें । शेवटीं जड जाहलें वोझें । टाकिला देश ॥ ४७ ॥ अवघीं घरें भंगलीं । गांवाचीं पांढरी पडिली । मग ते गृहीं राहिलीं । अरण्यश्वापेदें ॥ ४८ ॥ किडा मुंगी वाळवी मूषक । त्यांचेंच घर निश्चयात्मक । हे प्राणी बापुडे मूर्ख । निघोनि गेले ॥ ४९ ॥ ऐसी गृहांची स्थिती । मिथ्या आली आत्मप्रतीती । जन्म दों दिवसांची वस्ती । कोठें तरी करावी ॥ ५० ॥ देह म्हणावें आपुलें । तरी हें बहुतां कारणें निर्मिलें । प्राणियांच्या माथां घर केलें । उवा मस्तकीं भक्षिती ॥ ५१ ॥ रोमभुळीं किडे भक्षिती । खांडूक झाल्या किडे पडती । पोटामध्यें जंत होती । प्रत्यक्ष प्राणियांच्या ॥ ५२ ॥ कीड लागे दातांसीं । कीड लागे डोळ्यांसी । कीड लागे

---

१ शंका. २ अपस्मारी. ३ सर्व इंद्रियें शाबूत असा. ४ त्वरेनें, तात्काल. ५ सर्व इंद्रियांनीं पूर्ण. ६ उंदीर. ७ माशा. ८ एक जातीचे कीडे. ९ भ्रमरी. १० किडी. ११ लाकडांत. १२ कुत्रीं. १३ चांचड. १४ वाळवी, पांढऱ्या मुंग्या. १५ समूह. १६ गांवकरी. १७ चोर. १८ गांव ओसाड पडला. १९ जंगलांतील पशु. २० खोटी. २१ आपलें घर असें ज्ञान. २२ दोन. २३ केसांच्या मुळांत. २४ गळूं.

कर्णासी । आणि गोमाशा भरती ॥ ५३ ॥ गोचीड अशुद्धें सेविती । चामवा मांसांत घुसती । पिसोळे चावून पळती । अकस्मात ॥ ५४ ॥ भुंगे गांधले चाविती । गोमी जळवा अशुद्ध घेती । विंचू दंश करिती । कांनटे फुशी ॥ ५५ ॥ जन्मोन देह पाळिलें । तें अकस्मात व्याघ्रें नेलें । कीं तें लांडगेंचि भक्षिलें । बलात्कारें ॥ ५६ ॥ मूषकमार्जार दंश करिती । श्वानें अश्वें लोळे तोडिती । रिसें मर्कटें मारिती । कासावीस करूनी ॥ ५७ ॥ उष्ट्रें डसोन उचलिती । हस्ती चिरडोनि टाकिती । वृषभ टोंचोन मारिती । अकस्मात ॥ ५८ ॥ तस्कर तडतडां तोडिती । भुतें झडपोनी मारिती । असोया देहाची स्थिती । ऐसी असे ॥ ५९ ॥ ऐसें शरीर बहुतांचें । मूर्ख म्हणे आमुचें । परंतु खोंजें जिवांचें । तापत्रयीं बोलिलें ॥ ६० ॥ देह परमार्थीं लाविलें । तरीच याचें सार्थक जाहलें । नाहीं तरीं हें व्यर्थाचे गेलें । नाना आघातें मृत्युपंथें ॥ ६१ ॥ असो जे प्रापंचिक मूर्ख । ते काय जाणती परमार्थसुख । त्या मूर्खांचें लक्षण कांहींएक । पुढें बोलिलें असे ॥ ६२ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे प्रथमदशके नरदेहस्तवनं नाम दशमः समासः ॥ १० ॥ ओंवीसंख्या ॥ ३२६ ॥

दशक दुसरा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ॐनमोजी गजानना । एकदंता त्रिनेत्रेना । कृपादृष्टीं भक्तजना । अवलोकावें ॥ १ ॥ तुज नमूं वेदमाते । श्रीशारदे ब्रह्मसुते । अंतरीं वसें कृपावंते । स्फूर्तिरूपें ॥ २ ॥ वंदूनि सद्गुरुचरण । करूनि रघुनाथस्मरण । त्यागार्थ मूर्ख लक्षण । बोलिजेल ॥ ३ ॥ एक मूर्ख एक पढतेमूर्ख । उभयलक्षणीं कौतुक । श्रोतीं सादर विवेक । केला पाहिजे ॥ ४ ॥ पढतमूर्खांचें लक्षण । पुढिले समासीं निरूपण । सावध होऊनि विचक्षण । परिसोत पुढें ॥ ५ ॥ आतां प्रस्तुत विचार । लक्षणें सांगतां अपार । परी कांहीं एक तत्पर । होऊनि ऐका ॥ ६ ॥ जे प्रापंचिक जन । जयांसि नाहीं आत्मज्ञान । जे केवळ अज्ञान । त्यांची हीं लक्षणें ॥ ७ ॥ जन्मला जयाचे उदरीं । तयासि जो विरोध करी । सखी मानिली अंतुरी । तो एक मूर्ख ॥ ८ ॥ सांडोनि सवहा गोत । स्त्रियेआधीन जीवित । सांगे अंतरींची मात । तो एक मूर्ख ॥ ९ ॥ परस्त्रियेसी प्रेमा धरी । श्वशुरगृहीं वास करी । कुळेंविण कन्या वरी । तो एक मूर्ख ॥ १० ॥ सामर्थ्यावरी अहंता । अंतरीं मानी समता । सामर्थ्येंविण करी सत्ता । तो एक मूर्ख ॥ ११ ॥

---

१ रक्त. २ क्षुद्र कीडे. ३ अत्यंत विषारी व लहान सर्पांची जात. ४ मांसाचे भाग. ५ अस्वलें. ६ माकडे. ७ उंट. ८ हत्ती. ९ बैल. १० भक्ष्य, खावयाचा जिन्नस. ११ आधिदैविक, आध्यात्मिक आणि आधिभौतिक ह्या तीन प्रकारच्या तापांमध्यें. १२ तीन डोळे असलेल्या. १३ हे देवि सरस्वति. १४ ब्रह्मदेवाच्या कन्ये. १५ ज्ञानरूपानें. १६ त्याग करावा म्हणून. १७ शास्त्रज्ञ असून कार्याकार्यविचारशून्य. १८ चतुर, ज्ञाते. १९ एकाग्र चित्तानें. २० द्वेष. २१ स्त्री. २२ अभिप्राय, गोष्ट. २३ सासुरवाडीला. २४ नीच कुळांतील. २५ श्रेष्ठ किंवा बलिष्ठ त्याच्याशी. २६ बरोबरी.

आपली आपण करी स्तुती । स्वदेशीं भोगी विपत्ती । सांगे वडिलांची कीर्ती । तो एक मूर्ख ॥ १२ ॥ अकारणें हास्य करी । विवेक सांगतां न धरी । जो बहुतांचा वैरी । तो एक मूर्ख ॥ १३ ॥ आपुलीं धरूनियां दूरीं । पराव्यांसी मैत्री करी । परन्यूनें बोले अहोरात्रीं । तो एक मूर्ख ॥ १४ ॥ बहुत जागतें जन । तयांमध्यें करी शयन । परस्थळीं बहु भोजन । करी तो एक मूर्ख ॥ १५ ॥ मान अथवा अपमान । स्वयें करी परिच्छिन्न । सदा व्यसनीं जयाचें मन । तो एक मूर्ख ॥ १६ ॥ धरूनि पराँवी आस । प्रयत्न सांडी सावकाश । निर्लुगाईचा संतोष । मानी तो एक मूर्ख ॥ १७ ॥ घरीं विवेक उमजे । आणि सभेमध्यें लाजे । शब्द बोलतां निर्बुजे । तो एक मूर्ख ॥ १८ ॥ नायके त्याप्त शिकवी । वडिलांसि जाँणीव दावी । जो आरजांसि गोवी । तो एक मूर्ख ॥ १९ ॥ आपणाहून जो श्रेष्ठ । तयासि अत्यंत निकटे । शिकवणीचा मानी वीट । तो एक मूर्ख ॥ २० ॥ एकाएकीं एकसरी । जाहला विषयीं निलाजिरा । मर्यादा सांडोनि सैरा । वर्ते तो एक मूर्ख ॥ २१ ॥ औषध न घे असोनि व्यथा । पथ्य न करी सर्वथा । न मिळे आलिया पदार्था । तो एक मूर्ख ॥ २२ ॥ संगेविण विदेशं करी । ओळखीविण संग धरी । उडी घाली महापूरीं । तो एक मूर्ख ॥ २३ ॥ आपणासि जेथें मान । तेथें अखंड करी गमन । रक्षूं नेणे मानाभिमान । तो एक मूर्ख ॥ २४ ॥ सेवक जाहला लक्ष्मीवंत । तयाचा होय अंकित । सर्वकाळ जो दुश्चित । तो एक मूर्ख ॥ २५ ॥ विचार न करितां कारण । दंड करी अपराधावीण । स्वल्पासाठीं जो कृपण । तो एक मूर्ख ॥ २६ ॥ देवलंडे पितृलंडे । शक्तिविण करी तोंड । ज्याचे मुखीं भंडउभंड । तो एक मूर्ख ॥ २७ ॥ घरींच्याँवरी खाय दाढा । बाहेर दीन बापुडा । ऐसा जो कां मूढ वेडा । तो एक मूर्ख ॥ २८ ॥ नीच यातीसि सांगातें । परांगनेसि एकांत । मार्गें जाय खात खात । तो एक मूर्ख ॥ २९ ॥ स्वयें नेणें परोपकार । उपकाराचा अनुपकार । करी थोडें बोले फार । तो एक मूर्ख ॥ ३० ॥ तपिळे खादाड आळसी । कुश्चिळे कुटिळे मानसीं । धारिष्ट नाहीं जयापाशीं । तो एक मूर्ख ॥ ३१ ॥ विद्या वैभव ना धन । पुरुषार्थ सामर्थ्य ना मान । कोरडाच वाहे अभिमान । तो एक मूर्ख ॥ ३२ ॥ लंडी लटिका लबाड । कुकर्मी कुटिल निचोड । निद्रा जयाची वाँड । तो एक मूर्ख ॥ ३३ ॥ दंत चक्षु आणि घ्राण । पाणी वसन आणि चरण ।

---

१ कांहीं कारण नसतां. २ स्वजनांस. ३ परक्यांशी. ४ दुसऱ्याचें उणें. ५ जागणारे. ६ प्रगट करतो. ७ दुसऱ्याची आशा. ८ निर्लज्जपणाचा, अमंगलपणाचा. ९ भांबावतो, अडखळतो. १० शहाणपणा, दिमाख. ११ श्रेष्ठ किंवा सात्विक मनुष्यास, भाविकाला. १२ घोटाळ्यांत पडतो. १३ दाट संबंध ठेवणारा. १४ दुसऱ्यांनां कांहीं नीट शिकविलें किंवा समजावून सांगितलें तर. १५ कंटाळा. १६ सरसकट. १७ स्वछंदी, वाटेल तसें. १८ स्वीकार करितो. १९ सोबतीवांचून. २० परदेशीं प्रवास. २१ आधीन. २२ खिन्न. २३ थोड्यासाठीं. २४ देवास न जुमानणारा. २५ पितरांस जो मानीत नाहीं. २६ भलभलते उद्गार. २७ घरच्या माणसांवर. २८ संगति, सहवास. २९ परस्त्रीशीं. ३० कृतघ्नता. ३१ तापट. ३२ कुत्सित स्वभावाचा, ३३ कपटी, वांकडा. ३४ भेकड, भित्रा, फजितखोर. ३५ निर्लज्ज. ३६ अतिशय. ३७ डोळे. ३८ नाक. ३९ हात. ४० वस्त्र.

सर्वकाळ जयाचें मलिन । तो एक मूर्ख ॥ ३४ ॥ उंचीं[1] जाऊनि वस्त्र नेसे । चौबारां[2] बाहेरी बैसे । सर्वकाळ नग्न दिसे । तो एक मूर्ख ॥ ३५ ॥ वैधृति[3] आणि व्यतीपात[4] । नाना कुमुहूर्तें[5] जातें । अपशकुनें करी घात । तो एक मूर्ख ॥ ३६ ॥ क्रोधें अभिमान कुबुद्धी । आपणासि आपण वधी[6] । जयासि नाहीं दृढबुद्धी । तो एक मूर्ख ॥ ३४ ॥ जिवलगांसी परम खेदी[7] । सुखाचा शब्द तोही नेदी । नीच जनासि वंदी । तो एक मूर्ख ॥ ३८ ॥ आपणासि राखे परोपरी । शरणांगतासि अंव्हेरी । लक्ष्मीचा भरवंसा धरी । तो एक मूर्ख ॥ ३९ ॥ पुत्र कलत्र[8] आणि दारा । इतुकाचि मानूनियां थोरा । विसरोन गेला ईश्वरा । तो एक मूर्ख ॥४०॥ जैसें जैसें करावें । तैसें तैसें पावावें । हें जयासी नेणवें । तो एक मूर्ख ॥ ४१ ॥ पुरुषाचेनि-अष्टगुणें[9] । स्त्रियांसी ईश्वरी[10] देणें । ऐशा केल्या बहुत जेणें[11] । तो एक मूर्ख ॥ ४२ ॥ दुर्जनाचेंने बोलें[12] । मर्यादा सांडोनि चाले । दिवसा झांकिले डोळे । तो एक मूर्ख ॥ ४३ ॥ देवद्रोही[13] गुरुद्रोही । मातृद्रोही पितृद्रोही । ब्रह्मद्रोही स्वामिद्रोही । तो एक मूर्ख ॥ ४४ ॥ आदरेंविण बोलणें । न पुसतां साक्ष देणें । निंद्य वस्तु आंगिकारणें । तो एक मूर्ख ॥ ४५ ॥ तुर्क[14] तोडोनि बोले । मार्ग सोडोनि चाले । कुकर्मी मित्र केले । तो एक मूर्ख ॥ ४६ ॥ परपीडेचें मानी सुख । परसंतोषाचें मानी दुःख । गेले वस्तूचा करी शोक । तो एक मूर्ख ॥ ४७ ॥ पैत[15] राखों नेणे कदा । विनोद करी सर्वदा । हांसतां खिजे[16] पेटे[17] द्वंद्वा[18] । तो एक मूर्ख ॥ ४८ ॥ होडं[19] घाली अवघड । कार्जेविण[20] करी बडबड । बोलेंचि नेणे मुखजड । तो एक मूर्ख ॥ ४९ ॥ वस्त्र शस्त्र दोनी नसे । उंच स्थानीं जाऊनि बैसे । जो गोत्रजांसि विश्वासे । तो एक मूर्ख ॥ ५० ॥ तस्करासी वोळखी सांगे । देखिली वस्तु तेंचि मागे । आपुलें अनहित करी रागें । तो एक मूर्ख ॥ ५१ ॥ हीनं[21] जनासि बराबरी । बोल बोले सरोत्तरीं[22] । वामहस्तें प्राशन करी । तो एक मूर्ख ॥ ५२ ॥ समर्थासी मत्सर धरी । अलभ्य वस्तूचा हेवा[23] करी । घरींच्या घरीं करी चोरी । तो एक मूर्ख ॥ ५३ ॥ सांडोनियां जगदीशा । मनुष्याचा मानी भरंवसा । सार्थकेंविण वेंची[24] वयसा[25] । तो एक मूर्ख ॥ ५४ ॥ संसारदुःखाचेनि गुणें । देवासी गोळी देणें । मैत्राचें बोलणें उणें । तो एक मूर्ख ॥ ५५ ॥ अल्प अन्याय क्षमा न करी । सर्वकाळ धारेकी[26] धरी । जो विश्वासघात करी । तो एक मूर्ख ॥ ५६ ॥ समर्थाचे मनींचा तुटे । जयाचेनि सभा विटे । क्षणा बरा क्षणीं पालटे । तो एक मूर्ख ॥ ५७ ॥ बहुत दिवसांचे सेवक । त्यागून ठेवी आणिक । ज्याची सभा निर्नायकं[27] । तो एक मूर्ख ॥ ५८ ॥ अनी-

---

१ उंच जागेवर. २ चव्हाट्यावर. ३ ज्योतिषशास्त्रांतील संकेताप्रमाणे ठरलेले या नांवांचे वाईट योग. ४ वाईट मुहूर्तावर . ५ बाहेर गांवीं जातो. ६ ठार मारतो. ७ कष्टी करतो. ८ तिरस्कारानें त्याग करी. ९ स्त्री. १० आश्रय. ११ पुरुषांच्या आठपटीनें. १२ ईश्वराची देणगी " स्त्रीणांमष्टगुणः कामः " १३ सांगण्यावरून. १४ देवाशीं द्रोह करणारा. १५ ब्राह्मणांशीं वैर करणारा. १६ वजन, महत्त्व. १७ सचोटी, आब्रू. १८ चिडतो. १९ मारामारीवर येतो. २० पैज. २१ कारणावांचून. २२ नातलगांवर. २३ अकल्याण. २४ हलकट. २५ बरोबरीनें. २६ डाव्याहातानें. २७ इच्छा. २८ सफलतेशिवाय. २९ खर्चेकरी. ३० वय, आयुष्य. ३१ शिवी. ३२ धारेवर धरतो. ३३ प्रमुखा विरहित.

तीनें द्रव्य जोडी । धर्मनीतिन्याय सोडी । संगतीचें मनुष्य तोडी । तो एक मूर्ख ॥ ५९ ॥ घरीं असोनि सुंदरी[1] । जो सदा परद्वार करी[2] । बहुतांचें उच्छिष्ट अंगीकारी । तो एक मूर्ख ॥ ६० ॥ आपलें अर्थ[3] दुसऱ्यापाशीं । आणि दुसऱ्याचें अभिलाषी । पर्वत[4] करी हीनासी । तो एक मूर्ख ॥ ६१ ॥ अतीतांचा अंत पाहे । कुग्रामामध्यें राहे । सर्वकाळ चिंता वाहे । तो एक मूर्ख ॥ ६२ ॥ दोघे बोलत असती जेथें । तिसरा जाऊन बसे तेथें । डोई खाजवी दोहीं हातें । तो एक मूर्ख ॥ ६३ ॥ उदकामध्यें सांडी गुरळी[5] । पायें पाय खांजोळी[6] । सेवा करी हीन कुळीं[7] । तो एक मूर्ख ॥ ६४ ॥ स्त्रीबाळकांसी सलगी देणें । पिशाचासन्निध बैसणें । मर्यादेविण पाळी सुनें[8] । तो एक मूर्ख ॥ ६५ ॥ परस्त्रीशीं कलह करी । मुकी वस्तु निघातें मारी[9] । मूर्खाची संगति धरी । तो एक मूर्ख ॥ ६६ ॥ कलह पाहत उभा राहे । सोडवीना कौतुक पाहे । खरें असतां खोटें साहे[10] । तो एक मूर्ख ॥ ६७ ॥ लक्ष्मी आलियावरी[11] । जो मागील ओळखी न धरी । देवीं ब्राह्मणीं सत्ता करी । तो एक मूर्ख ॥ ६८ ॥ आपुलें कार्य होय तोंवरी । बहुसाल[12] नम्रता धरी । पुढीलांचें कार्य न करी[13] । तो एक मूर्ख ॥ ६९ ॥ अक्षरें गाळून वाची । कांहीं घालीं पदरींचीं । निगा[14] न करी पुस्तकाची । तो एक मूर्ख ॥ ७० ॥ आपण वाचीना कधीं । कोणासि वाचाया नेदी । बांधोनि ठेवी बंदीं[15] । तो एक मूर्ख ॥ ७१ ॥ ऐसीं हीं मूर्खलक्षणें । श्रवणें चातुर्य बाणे । चित्त देऊनियां शाहाणे । ऐकती सदा ॥ ७२ ॥ लक्षणें अपार असती । परी कांहीं एक यथामती । त्यागार्थ[16] बोलिलों श्रोतीं । क्षमा केली पाहिजे ॥ ७३ ॥ उत्तम लक्षणें घ्यावीं । मूर्खलक्षणें त्यागावीं । पुढिले समासीं ओंधवीं[17] । निरूपिलीं ॥ ७४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे द्वितीयदशके मूर्खलक्षणनिरूपणं नाम प्रथमः समासः ॥ १ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ श्रोतीं व्हावें सावधान । आतां सांगतों उत्तम गुण । जेणें करितां[18] बाणे खूण । सर्वज्ञपणाची ॥ १ ॥ वाट पुसल्याविण जाऊं नये । फळ वोळखिल्याविण खाऊं नये । पडली वस्तु घेऊं नये । एकाएकीं ॥ २ ॥ अतिवाद करूं नये । पोटीं कपट धरूं नये । शोधिल्याविण करूं नये । कुळहीन कांता[19] ॥ ३ ॥ विचारेंविण बोलूं नये । मर्यादेविण हालूं नये । विवेचनेंविण[20] चालूं नये । कांहीं केल्या ॥ ४ ॥ प्रीतीविण रुसूं नये । चोरासि वोळखी पुसूं नये । रात्रीं पंथें[21] क्रमूं[22] नये । एकाएकीं ॥ ५ ॥ जनीं आजेव[23] तोडूं नये । पापद्रव्य जोडूं नये । पुण्यमार्ग सोडूं नये । कदाकाळीं ॥ ६ ॥ निंदा द्वेष करूं नये । अलतलंग धरूं नये । द्रव्य दारा हरूं नये । बलात्कारें ॥ ७ ॥ वक्त्यास[24] खंडूं[25] नये । ऐक्यतेसि फोडूं नये । विद्याभ्यास सोडूं नये । कांहीं केल्या ॥ ८ ॥

---

१ सुंदर स्त्री. २ परस्त्रीगमन. ३ धन. ४ पर्वताप्रमाणे उंच. ५ पादुण्याचा. ६ चूळ. ७ खाजवी. ८ कुत्रें. ९ प्रहारानें. १० सहन करितो. ११ संपत्ति. १२ पुष्कळ. १३ दुसऱ्यांचे. १४ जपणूक रक्षण. १५ पेटींत वगैरे. १६ टाकावीं म्हणून. १७ सर्व. १८ ज्या योगानें. १९ स्त्री. २० विचार केल्याशिवाय. २१ वाट. २२ चालूं नये. २३ सरळपणा. २४ वाईटांची संगत. २५ भाषण करणाऱ्यास. २६ अडथळा करूं नये.

तोंडाळासि भांडूं नये । वाचाळासि तंडूं[1] नये । संतसंग खंडूं नये । अंतर्यामी[2] ॥ ९ ॥ अतिक्रोध करूं नये । जिवलगासि खंदूं नये । मनों वीट मानूं नये । शिकवणीचा ॥ १० ॥ क्षणक्षणा रुसूं नये । लटिका पुरुषार्थ बोलूं नये । केल्याविण सांगूं नये । आपुला पराक्रम ॥ ११ ॥ बोलिला बोल विसरूं नये । प्रसंगीं सामर्थ्य चुकूं नये । केल्याविण निखंदूं[3] नये । पुढिलासी कदा ॥ १२ ॥ आळसें सुख मानूं नये । चाहाडि मनासि आणूं नये । शोधिल्याविण करूं नये । कार्य कांहीं ॥ १३ ॥ सुखा अंग देऊं नये । प्रयत्न पुरुषें सांडूं नये । कष्ट करितां त्रासूं नये । निरंतर ॥ १४ ॥ सभेमध्यें लाजूं नये । बाष्कळपणें बोलूं नये । पंज होड[4] घालूं नये । कांहीं केल्या ॥ १५ ॥ बहुत चिंता करूं नये । निसुगपणें राहूं नये । परस्त्रीतें पाहूं नये पापबुद्धी ॥ १६ ॥ कोणाचा उपकार घेऊं नये । घेतला तरी राखूं नये । परपीडा करूं नये । विश्वासघात ॥ १७ ॥ शौचें विण असूं नये । मळिण वस्त्र नेसूं नये । जाणारासि पुसूं नये । ' कोठें जातोसि ' म्हणोनी ॥१८॥ व्यापकपणें सोडूं नये । पराधीन होऊं नये । आपुलें ओझें घालूं नये । कोणा एकासी ॥ १९ ॥ पत्रेंविण पर्वते[5] करूं नये । हीनाचे[6] ऋण घेऊं नये । ग्वाहीविण जाऊं नये । राजद्वारीं ॥ २० ॥ लटकी जोखीम घेऊं नये । सभेसि लटकें करूं नये । आदर नसतां बोलूं नये । स्वाभाविक ॥ २१ ॥ अदेखणेपणें[7] करूं नये । अन्यायाविण गांजूं नये । अनीतीनें वर्तूं नये । अंगबळें ॥ २२ ॥ बहुत अन्न खाऊं नये । बहुत निद्रा करूं नये । बहुत दिवस राहूं नये । पिशुनाचे येथें ॥ २३ ॥ आपुल्याची ग्वाही देऊं नये । आपुली कीर्ति वर्णूं नये । आपुले आपण हांसूं नये । गोष्टी सांगोनी ॥ २४ ॥ भूम्रपान घेऊं नये । उन्मत्त द्रव्य सेवूं नये । बहुचकांशीं[8] करूं नये । मैत्री कदा ॥ २५ ॥ कामेंविण राहूं नये । नीच उत्तर साहूं नये । अंसुदें अन्न सेवूं नये । वडिलांचें ॥ २६ ॥ तोंडीं शिवी असूं नये । दुसऱ्यासि देखोन हासूं नये । उणें अंगीं संचारूं नये । कुळवंताचें ॥ २७ ॥ देखिली वस्तु चोरूं नये । बहुत कृपण होऊं नये । जिवलगासि करूं नये । कलह कदा ॥ २८ ॥ कोणाचा घात करूं नये । लटकी ग्वाही देऊं नये । अप्रमाण वर्तूं नये । कदाकाळीं ॥ २९ ॥ चाहाडी चोरी करूं नये । परद्वार करूं नये । मागें उणें बोलूं नये । कोणी एकाचें ॥ ३० ॥ समयीं यावा चुकूं नये । सत्वगुण सांडूं नये । वैरीयास दंडूं नये । शरण आलिया ॥ ३१ ॥ अल्प धनें माजूं नये । हरिभक्तीसि लाजूं नये । मर्यादेविण चालूं नये । पवित्र जनीं[9] ॥ ३२ ॥ मूर्खासि संबंध पाडूं नये । अंधारीं हात घालूं नये । दुश्चितपेणें विसरूं नये । वस्तु आपुली ॥ ३३ ॥ स्नान संध्या

---

१ वाद करूं नये. २ अंतःकरणामध्ये. ३ तिरस्कार, निषेध करूं नये. ४ प्रतिज्ञा. ५ दुराचाराने, निर्लज्जपणे. ६ पवित्रतेशिवाय, दोषक्षालनावांचून. ७ उद्योगीपणा. ८ परस्वार्थीन. ९ दस्तैवजा शिवाय. १० देवघेव, व्यापार. ११ नीचाचें. १२ आरोप, साक्षीशिवाय. १३ खोटी. १४ आळ. १५ मत्सर. गुजराथी भाषेंत अदेखाई=मत्सर. १६ चहाडखोराचे. १७ वाचाळाशी. १८ सोसूं नये. १९ यत्नावांचून, आयते. २० मित्राशीं. २१ खोटेपणानें. २२ परस्त्रीगमन. २३ धैर्य, बळ, उदय. २४ पवित्र पुरुषामध्यें. २५ निष्काळजीनें, खिन्न होऊन.

सांडूं नये । कुलाचार खंडूं नये । अनाचार मांडूं नये । कुचरपणें ॥ ३४ ॥ हरिकथा सांडूं नये । निरूपण तोडूं नये । परमार्थासि मोडूं नये । प्रपंचबळें ॥ ३५ ॥ देवाचा नवस बुडवूं नये । आपुला धर्म उडवूं नये । भलतें भरीं भरूं नये । विचारेंविण ॥ ३६ ॥ निष्ठुरपण धरूं नये । जीवहत्या करूं नये । पाऊस देखोनि जाऊं नये । अथवा अवकाळीं ॥ ३७ ॥ सभा देखोनि गळूं नये । समयीं उत्तर टळूं नये । धिक्कारितां ढळूं नये । धारिष्ट आपुलें ॥ ३८ ॥ गुरुविरहित असूं नये । नीच यातीचा गुरु करूं नये । जिणें शाश्वत मानूं नये । वैभवेशा ॥ ३९ ॥ सत्य मार्ग सोडूं नये । असत्य पंथें जाऊं नये । कदा अभिमान घेऊं नये । असत्याचा ॥ ४० ॥ अपकीर्ति ते सांडावी । सत्कीर्ति वाढवावी । विवेकें दृढ धरावी । वाट सत्याची ॥ ४१ ॥ न घेतां हे उत्तम गुण । तो मनुष्य अवलक्षण । ऐक त्याचें लक्षण । पुढिलिये समायीं ॥ ४२ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे द्वितीय दशके उत्तमलक्षणवर्णनं नाम द्वितीयः समासः ॥ २ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ऐका कुविद्येचीं लक्षणें । अतिहीनें कुलक्षणें । त्यागार्थ बोलिलों श्रवणें । त्याग घडे ॥ १ ॥ ऐका कुविद्येचा प्राणी । जन्मा येऊनि केली हानी । सांगिजेल इहीं लक्षणीं । श्रोतां ओळखावा ॥ २ ॥ कुविद्येचा प्राणी असे । तो कठिण निरूपणीं त्रासे । अवगुणांची समृद्धि असे । म्हणोनियां ॥ ३ ॥ दंभो दर्पोऽभिमानश्च क्रोधः-पारुष्यमेवच । अज्ञानं चाभिजातस्य पार्थ संपदमासुरीम् ॥ १ ॥ काम क्रोध मद मत्सर । लोभ दंभ तिरस्कार । गर्व ताठा अहंकार । द्वेष विषाद विकल्पी ॥ ४ ॥ आशा ममता तृष्णा कल्पना । चिंता अहंता कामना भावना । असूया अविद्या ईषणा वासना । अतृप्ति लोलंगता ॥ ५ ॥ इच्छा वांच्छा चिकित्सा निंदा । अनीति ग्रामणी मस्ती सदा । जाणिव भवज्ञा विपत्ति आपदा । दुर्वृत्ति दुर्वासना ॥ ६ ॥ स्पर्धा खटपट आणि चटपट । तऱ्हे झटपट आणि वटवट । सदा खटखट आणि लटपट । परम व्यथा आणि कुविद्या ॥ ७ ॥ कुरूप आणि कुलक्षण । अशक्त आणि दुर्जन । दरिद्री आणि कृपण । अतिशयेंसी ॥ ८ ॥ आळसी आणि खादाड । दुर्बळ आणि लाताडे । तुटके आणि लबाड । अतिशयेंसी ॥ ९ ॥ मूर्ख आणि तापिळ । वेडे आणि वाचाळ । लटिके आणि तोंडाळ । अतिशयेंसी ॥ १० ॥ नेणे आणि नायके । नये आणि न शिके । न करी आणि न देखे ।

---

१ चुकारपणानें. २ अकाळीं, भलत्या वेळेवर. ३ भिऊन जाऊं नये. ४ जातीचा. ५ ऐश्वर्ययुक्त. ६ मार्गानें. ७ अवगुणी, वाईट लक्षणांचा. ८ चिन्ह. ९ वाईट चिन्हें. १० टाकावीं म्हणून. ११ ऐकल्यानें. १२ तोटा, नाश. १३ ह्या. १४ कथनानें. १५ दुर्गुणांची. १६ मनांत आणी. १७ मीपणा. १८ इच्छा. १९ मनोव्यापार. २० मत्सर, द्वेष. २१ अज्ञान. २२ स्त्री पुत्र इत्यादींच्या ठायी आस्था. २३ आसक्ति. २४ नानाप्रकारच्या साधकबाधक कल्पना काहूनकेलेली परीक्षा. २५ गांवगुंडपणा, हरामीपणा. २६ पंडितंमन्यता, 'मी सर्वज्ञ' असा अभिमान. २७ तिरस्कार. २८ संकट, अरिष्ट. २९ उतरती दशा, अकल्याण. ३० दुर्वर्तन. ३१ दुष्ट इच्छा. ३२ तऱ्हेवाईकपणा. ३३ त्रासदायक काम, भांडण. ३३ थांदल. ३४ लाथ मारण्याची संवय असलेला. ३५ स्नेह-मैत्री तोडणारा, कठोर. ३६ आपण जाणत नाहीं. ३७ व दुसऱ्यानें सांगितले तर ऐकत नाहीं, ३८ स्वतःला येत नाहीं, ३९ व दुसऱ्याजवळ शिकत नाहीं.

अभ्यासदृष्टी ॥ ११ ॥ अज्ञान आणि अविश्वासी । छेळवादी आणि दोषी । अभक्त आणि भक्तासी । देखों शकेना ॥ १२ ॥ पापी आणि निंदक । कष्टी आणि घातक । दुःखी आणि हिंसक । अतिशयेंसी ॥ १३ ॥ हीन[1] आणि कृत्रिमी[2] । रोगी आणि कुकर्मी । आचंगुल अधर्मी । वासनेरसें ॥ १४ ॥ हीन देह आणि ताठा । अप्रमाण आणि फांटा । बाष्कळ आणि करंटा । विवेक सांगे ॥ १५ ॥ लंडी[3] आणि उन्मत्त । निकोमी आणि डुल्लत । भ्यांड आणि बोलत । पराक्रम ॥ १६ ॥ कनिष्ठ आणि गर्विष्ठ । नेपरते आणि नष्ट । द्वेषी आणि भ्रष्ट । अतिशयेंसी ॥ १७ ॥ अभिमानी आणि निःसंगळ । वोडंगस्त आणि खळ । दांभिक आणि अनंगळ । अतिशयेंसी ॥ १८ ॥ वोखटें[4] आणि विकारी । खोटें आणि अनुपकारी । अवलक्षण आणि धिक्कारी । प्राणिमात्रासी ॥ १९ ॥ अल्पमति आणि वेदक । दीनरूप आणि भेदक । सूक्ष्मरूपें आणि त्रासक । कुशब्देंकरूनी ॥ २० ॥ कठिणवचनी आणि कर्कशवचनी । कापट्यवचनी संदेहवचनी । दुःखवचनी तीव्रवचनी । क्रूर निष्ठुर दुरात्मा ॥ २१ ॥ न्यूनवचनी पैशून्यवचनी । अशुभवचनी अनित्यवचनी । द्वेषवचनी अनृतवचनी । बाष्कळवचनी धिःक्कारी ॥ २२ ॥ कपटी कुटिळ[5] गोंड्याळ । कुरटें[6] कुचर[7] नाठाळ[8] । कोपी कुधन टवाळ । अतिशयेंसी ॥ २३ ॥ तपिळ तामसी अविचार । पापी अनर्थी अपस्मार । भूत समंधी संचार । अंगीं वसे ॥ २४ ॥ आत्महत्यारा स्त्रीहत्यारा । गोहत्यारा ब्रह्महत्यारा । मातृहत्यारा पितृहत्यारा । महापापी पतित[9] ॥ २५ ॥ उणें कुगात्र कुतर्की । मित्रद्रोही विश्वासघातकी । कृतघ्न गुरुतल्पी नरकी । अतित्याई जल्पक ॥ २६ ॥ भांडण झगडा कलह । अधर्म अनाहाटी शोक संग्रह । चाहाड व्यसनी विग्रहे । निग्रहकर्ता ॥ २७ ॥ द्वाड अपेशी अंगळ । चाळक चुंबक लचांळ । स्वार्थी अभिलाषी वोढाळ । अदत्ते झोंड[10] अदेखणारा ॥ २८ ॥ शठे शुंभ कातरु । लंड[11] तुरमुडे सितरु । बंड पाखांड तस्करु । अपहारकर्ता ॥ २९ ॥ धीट सैराट मोकाट । चोट चावट वाजट ।

---

१ छळण करणारा, कपट करणारा. २ नीच. ३ कृपण. ४ पूर्व जन्मांतील इच्छेच्या संस्कारानें. ५ गर्व. ६ अप्रामाणिक, खोटसाळ. ७ बडबड. ८ योग्यायोग्य न जाणणारा, बेताल, सैरगती. ९ दैवहीन. १० हरामी, धूर्त. ११ निरुद्योगी. १२ धुंद, नादी. १३ भित्रा. १४ ज्यास उपरती नाही असा, विषयासक्त. १५ निर्लज्ज. १६ देणेकरी. १७ स्वच्छंदी. १८ वाईट. १९ वाद घालणारा. २० अशक्त, यःकश्चित असा दिसणारा. २१ संशयाचे भाषण करणारा. २२ दुष्ट. २३ दुसऱ्याच्या अप्रतिष्ठेचे अथवा दुष्टरीतीनें बोलणारा. २४ खोटें बोलणारा. २५ वांकडा. २६ आंतल्या गाठीचा, कपटी. २७ मनाचा कपटी, मनांत कुढणारा. २८ कामचोर, नीच. २९ अतिद्वाड. ३० जातिभ्रष्ट. ३१ गुरुपत्नी शी जाणारा. ३२ अघोर कृत्यें करणारा. ३३ बडबड्या. ३४ वाईट मार्ग. ३५ तंटा, भांडण. ३६ लोकांस दाबांत ठेवणारा. ३७ वाईट. ३८ चाळविणारा. ३९ कृपण, कद्रू. ४० लोंचट, लांचखाऊ. ४१ द्वाड. ४२ न देणारा. ४३ कोडगा. ४४ मत्सरी. ४५ लबाड. ४६ टोणगा. ४७ भित्रा. ४८ धूर्त. ४९ घुसणारा. ५० ठकविणारा. ५१ चोर. ५२ अडाणी, हट्टी, हेंगाडा. ५३ मोकळा सुटलेला, नियमरहित. ५४ छट, सोदा, वरून गोड आंतून घातकी, ढोंगी. ५५ ज्याच्याविषयीं बोभाट झालेला आहे असा, अपकीर्तीचा, बदलौकिकाचा.

थोंटे[1] उद्धट लंपट[2] । बटवाल[3] कुबुद्धी ॥ ३० ॥ मारेकरी वरपेकरी[4] । दरवडेकरी खोणोरी[5] । मैंद[6] भोंदु[7] परद्वारी[8] । भुरेरकरी[9] चेटकी ॥ ३१ ॥ निःशंक निलाजिरा कलभंट[10] । टोणपा[11] लौंदे[12] ध[13] उद्धट । ठेसे[14] ठोंबेसे[15] खेटनट[16] । जगभांड[17] विकारी ॥ ३३ ॥ अधीर[18] आळंकी[19] अनाचारी[20] । अंध पंगु खोकलेकरी । थोंटा बधिर दमेकरी । तरी ताठा न सांडी ॥ ३४ ॥ विद्याहीन वैभवहीन । कुळहीन लक्ष्मीहीन । शक्तिहीन सामर्थ्यहीन । अदृष्टहीन[21] मिकारी ॥ ३५ ॥ बळहीन कळाहीन । मुद्राहीन दीक्षाहीन[22] । लक्षणहीन लावण्यहीन । अंगहीन विपारा[23] ॥ ३६ ॥ युक्तिहीन बुद्धिहीन । क्रियाहीन सत्वहीन । आचारहीन विचारहीन । विवेकहीन संशयी ॥ ३७ ॥ भक्तिहीन भावहीन । ज्ञानहीन वैराग्यहीन । शांतिहीन क्षमाहीन । सर्वहीन क्षुल्लक ॥ ३८ ॥ समय नेणे प्रसंग नेणे । प्रयत्न नेणे अभ्यास नेणे । आर्जव[24] नेणे मैत्रिकी नणे । कांहींच नेणे अभागी ॥ ३९ ॥ असो ऐसे नाना विकार । कुलक्षणांचे कोठार । ऐसे कुविद्येचे नर । श्रोतीं वोळखावे ॥ ४० ॥ ऐसीं कुविद्येचीं लक्षणें । ऐकोनि त्यागचि करणें । अभिमानें तेंहें भरणें । हें विहितें[25] नव्हे ॥ ४१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे द्वितीयदशके कुविद्यालक्षणकथनं नाम तृतीयः समासः ॥ ३ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ नाना सुकृतांचे फळ । तो हा नरदेह केवळ । त्याहीमध्यें भाग्य सफळ । तरीच सन्मार्ग लागे ॥ १ ॥ नरदेहीं विशेष ब्राह्मण । त्याहीवरी संध्यास्नान । सद्वासना भगवद्भजन । घडे पूर्वपुण्ये ॥ २ ॥ भगवद्भक्ति हे उत्तम । त्याहीवरी सत्समागम । काळसार्थक हाचि परम । लाभ जाणावा ॥ ३ ॥ प्रेम प्रीतीचा सद्भाव । आणि भक्तांचा समुदाव । हरिकथामहोत्सव । तेणें प्रेम दुणावे ॥ ४ ॥ नरदेहीं आलिया एक । कांहीं करावें सार्थक । जेणें पाविजे परलोक । परम दुर्लभ जो ॥ ५ ॥ विधियुक्त ब्रह्मकर्म । अथवा दया दान धर्म । अथवा करणें सुगम । भजन भगवंताचें ॥ ६ ॥ अनुतापें करावा त्याग । अथवा करणें भक्तियोग । नाहीं तरी धरणें संग । साधुजनांचा ॥ ७ ॥ नाना शास्त्रें धांडोळांवीं । अथवा तीर्थें तरी करावीं । अथवा पुरश्चरणें बरवीं । पापक्षयाकारणें ॥ ८ ॥ अथवा कीजे परोपकार । अथवा ज्ञानाचा विचार । निरूपणीं सारासार–। विवेक करणें ॥ ९ ॥ पाळावी वेदाची आज्ञा । कर्मकांड[26] उपासना[27] । जेणें होइजे ज्ञाना–। अधिकारपात्र ॥ १० ॥ काया वाचा आणि मनें । पत्रें पुष्पें फळें जीवनें[28] । कांहीं तरी एक भजनें[29] । सार्थक करावें ॥ ११ ॥ जन्मा आलियाचें फळ । कांहीं करावें सफळ । ऐसे न करितां निष्फळ । भूमिभार होय ॥ १२ ॥

---

१ लुच्चा, हरामी. २ कामासक्त. ३ अनाचारी. ४ लुटारू. ५ खादाड. ६ कपटी, आळशी. ७ ठक. ८ परस्त्रीगमन करणारा. ९ भूल पाडणारा, वेड लावणारा. १० कलहशूर. ११ गलेलठ्ठ. १२ धटिंगण. १३ निर्भीड. १४ अक्षरशत्रू. १५ शठ, नष्ट. १६ जगाशी भांडणारा. १७ एखाद्या गोष्टीविषयीं अत्यंत उत्सुक, हांवरा. १८ दुर्दैवी. १९ कोणत्याही प्रकारची रीत नाहीं असा. २० कुरूप. २१ सरळपणा. २२ टाकणें. २३ हट्टास पेटणें. २४ योग्य. २५ पुण्यांचें २६ साधूंची संगति. २७ साफल्य. २८ शास्त्राप्रमाणें. २९ पश्चात्तापाच्या योगानें. ३०शोधावी. ३१ कर्ममार्गप्रतिपादक वेदभाग. ३२ भक्तिमार्गप्रतिपादणारा वेदभाग ३३ उदकानें. ३४ भक्तीनें.

नरदेहाचें उचितें । कांहीं करावें आत्महित । यथानुशक्त्या चित्तवित्त । सर्वोत्तमीं[1] लावावें ॥ १३ ॥ हें कांहींच न धरी जो मनीं । तो मृतप्राय वर्ते जनीं । जन्मास येऊन तेणें जननीं । वांयांच कष्टविली ॥ १४ ॥ नाहीं संध्या नाहीं स्नान । नाहीं भजन देवतार्चन । नाहीं मंत्र जप ध्यान । मानसपूजा ॥ १५ ॥ नाहीं भक्ति नाहीं प्रेम । नाहीं निष्ठा नाहीं नेम । नाहीं देव नाहीं धर्म । अतीतअभ्यागत ॥ १६ ॥ नाहीं सद्बुद्धि नाहीं गुण । नाहीं कथा नाहीं श्रवण । नाहीं अध्यात्मनिरूपण । ऐकिलें कदा ॥ १७ ॥ नाहीं भल्याची संगती । नाहीं शुद्ध चित्तवृत्ती । नाहीं कैवल्याची प्राप्ती । मिथ्या मर्दे[6] ॥ १८ ॥ नाहीं नीति नाहीं न्याय । नाहीं पुण्याचा उपाय । नाहीं परत्रींची सोय । युक्तायुक्त क्रिया ॥ १९ ॥ नाहीं विद्या नाहीं वैभव । नाहीं चातुर्याचा भाव । नाहीं कळा नाहीं लाघव । रम्य सरस्वतीचें ॥ २० ॥ शांति नाहीं क्षमा नाहीं । दीक्षा नाहीं मैत्री नाहीं । शुभाशुभ कांहींच नाहीं । साधनादिक ॥ २१ ॥ शुचि[10] नाहीं स्वधर्म नाहीं । आचार नाहीं विचार नाहीं । अत्रैत्र नाहीं परत्र नाहीं । मुक्ति क्रिया मनाची ॥ २२ ॥ कर्म नाहीं उपासना नाहीं । ज्ञान नाहीं वैराग्य नाहीं । योग नाहीं धारिष्ट नाहीं । कांहींच नाहीं पाहतां ॥ २३ ॥ उपरति नाहीं त्याग नाहीं । समता नाहीं लक्षण नाहीं । आदर नाहीं प्रीति नाहीं । परमेश्वराची ॥ २४ ॥ परगुणाचा संतोष नाहीं । परोपकारें सुख नाहीं । हरिभक्तीचा लेश नाहीं । अंतर्यामीं ॥ २५ ॥ ऐसे प्रकारचे पाहतां जन[16] । ते जिताचि[16] प्रेतासमान । त्यांसि न करावें संभाषण । पवित्र जनीं ॥ २६ ॥ पुण्यसामग्री पुरती । तयासीच घडे भगवद्भक्ती । जे जे[17] जैसे करिती । ते ते पावती तैसेची ॥ २७ ॥ ३ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे द्वितीयदशके भक्ति निरूपणं नाम चतुर्थः समासः ॥ ४ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ मुळीं देह त्रिगुणांचा । सत्व रज तमांचा । त्यांमध्यें सत्वाचा । उत्तम गुण ॥ १ ॥ सत्वगुणें भगवद्भक्ती । रजोगुणें पुनरावृत्ती । तमोगुणें अधोगती । पावती प्राणी ॥ २ ॥ श्लोक ॥ ऊर्ध्वं गच्छन्ति सत्वस्था मध्ये तिष्ठन्ति राजसाः । जघन्यगुणवृत्तिस्था अधो गच्छन्ति तामसाः ॥ १ ॥ ॥ टी० ॥ ॥ त्यांतही शुद्ध आणि शबळ । तेहि बोलिजेती सकळ । शुद्ध तेंचि जें निर्मळ । शबल बाधक जाणावें ॥ ३ ॥ शुद्धशबलाचें लक्षण । सावध परिसा विचक्षण । शुद्ध तो परमार्थी जाण । शबल तो संसारिक ॥ ४ ॥ तया संसारिकाची स्थिती । देहीं त्रिगुण वर्तती । एक येतां दोनी जाती । निघोनियां ॥ ५ ॥ रज तम आणि सत्व । तेणेंचि चाले जीवित्व[12] । रजोगुणांचें कर्तृत्व । दाखवूं आतां ॥ ६ ॥ रजोगुण येतां शरीरीं । वर्तणूक कैसी करी । सावध होऊनियां चतुरी । परिसावें ॥ ७ ॥ माझें घर माझा संसार । देव कैंचा आणिला

---

१ योग्य कर्तव्यकर्म. २ परमेश्वराचे ठिकाणीं. ३ अतिथि, वगैरेचा सत्कार करणें. ४ ब्रह्मज्ञानसंबंधीं विवेचन. ५ मोक्षाची. ६ खोट्या गर्वानें. ७ परलोकाची. ८ योग्यायोग्य कर्म. ९ विद्यादेवीचें. १० पवित्र, शुद्ध. ११ इहलोक. १२ परलोक. १३ नियमरहित. १४ पूजादि क्रियाद्वारा परमेश्वराला भजण्याचा प्रकार १५ वैराग्य. १६ जिवंत आहेत तरी. १७ पापपुण्यात्मक कर्म. १८ पुनर्जन्म. १९ पतन, नरकवास. २० मायिक, औपाधिक. २१ पंडित लोक हो. २२ जिणें, वांचणें.

थोर । ऐसा करी जो निर्धार । तो रजोगुण ॥ ८ ॥ माता पिता आणि कांता । पुत्र सुना आणि दुहिता[1] । इतुकियांची वाहे चिंता । तो रजोगुण ॥ ९ ॥ बरें खावे बरें जेवावें । बरें ल्यावें बरें नेसावें । दुसऱ्याचें अभिलाषावें । तो रजोगुण ॥ १० ॥ कैंचा धर्म कैंचें दान । कैंचा जप कैंचें ध्यान । विचारीना पापपुण्य । तो रजोगुण ॥ ११ ॥ नेणे तीर्थ नेणे व्रत । नेणे अतीतअभ्यागत । अनाचारीं मनोगतें[2] । तो रजोगुण ॥ १२ ॥ धन-धान्यांचें संचितें[3] । मन होय द्रव्यासक्त । अत्यंत कृपण जीवित । तो रजोगुण ॥ १३ ॥ मी तरुण मी सुंदर । मी बलाढ्य मी चतुर । मी सकळांमध्यें थोर । म्हणे तो रजोगुण ॥ १४ ॥ माझा देश माझा गांव । माझा वाडा माझा ठाँव । ऐसी मनीं धरी हाव । तो रजोगुण ॥ १५ ॥ दुसऱ्याचें सर्व जावें । माझेंचि बरें असावें । ऐसें आठवें स्वभावें । तो रजोगुण ॥ १६ ॥ कपट आणि मत्सर । उठें देहीं तिरस्कार । अथवा कामाचा विकार । तो रजोगुण ॥ १७ ॥ बाळकावरी ममता । प्रीतीनें आवडे कांता । लोभ वाटे समस्तां । तो रजोगुण ॥ १८ ॥ जिवलगाची खंती । जेणेंकाळें वाटे चित्तीं । तेणेंकाळें शीघ्रगती । रजोगुण आला ॥ १९ ॥ संसाराचे बहुत कष्ट । कैसा होईल शेवट । मनास आठवे संकट । तो रजोगुण ॥ २० ॥ वैभव देखोनि दृष्टीं । आवडी उपजली पोटीं । आशागुणें हिंपुटी[10] करी तो रजोगुण ॥ २१ ॥ कां मागें जें जें भोगिलें । तें तें मनीं आठवलें । दुःख अत्यंत वाटलें । तो रजोगुण ॥ २२ ॥ जें जें दृष्टीं पडलें । तें तें मनें मागतिलें । लभ्य नसतां दुःख जाहलें । तो रजोगुण ॥ २३ ॥ विनोदार्थ भरे मन । शृंगारिक करी गायन । रागरंग तानमान । करी तो रजोगुण ॥ २४ ॥ टवाळी ढवाळी निंदा । सांगणें घडे विवादा । हास्य विनोद करी सर्वदा । तो रजोगुण ॥ २५ ॥ आळस उठे प्रबळ । कर्मणुकीचे नाना खेळ । कां उपभोगाचे गोंधळ । तो रजोगुण ॥ २६ ॥ कळावंत बहुरूपी । नटावेलोकीं सोंक्षेपी[11] । नाना खेळों दाखवी अर्पी । तो रजोगुण ॥ २७ ॥ उन्मत्त द्रव्यावरी अति प्रीती । आवडे नीचाची संगती । ग्राम्यें[12] आठवे चित्तीं । तो रजोगुण ॥ २८ ॥ तस्करविद्या जीवीं उठे । परन्यून बोलावें वाटे । नित्यनेमासि मन विटे । तो रजोगुण ॥ २९ ॥ देवकारणीं लाजाळू । उदरालागीं कष्टाळू । प्रपंचीं जो स्नेहाळू । तो रजोगुण ॥ ३० ॥ गोड ग्रासीं ओलेकेपण[13] । अत्यादरें पिंडपोषेपण[14] । रजोगुणें उपोषण । केलें न वचे[15] ॥ ३१ ॥ शृंगारिक तें आवडे । भक्ति वैराग्य नावडे । कळा-लाघवीं मन पवाडे[16] । तो रजोगुण ॥ ३२ ॥ नेणोनियां परमात्मा । सकळ पदार्थीं प्रेमा । बळात्कारें घाली जन्मा । तो रजोगुण ॥ ३३ ॥ असो ऐसा रजोगुण । लोभें दावी जन्ममरण । प्रपंची तो सबळें[17] जाण । दारुण दुःख भोगवी ॥ ३४ ॥ आतां रजोगुण हा सुटेना । संसारिक हेतु तुटेना । प्रपंचीं गुंतली वासना । यासि उपाय कोण ॥ ३५ ॥

---

१ कन्या. २ धारण करावे. ३ इच्छा करावी. ४ वांइट आचरणाचे ठिकाणी. ५ वासना, इच्छा. ६ सांठा. ७ स्थान. ८ ज्या वेळीं. ९ तेव्हां. १० कष्टी. ११ ढवळाढवळ. १२ स्त्रियांची वगैरे सोंगें घेणाऱ्यांस पहाण्याकरितां. १३ दांडगा यत्न करणारा. १४ ग्राम्य धर्म, मैथुन. १५ चौर्यविद्या. १६ आवड, अत्यंत इच्छा. १७ शरीरपोषण. १८ करवत नाहीं, केलें जात नाहीं. १९ शिरे. २० अत्यन्त, फार.

उपाय एक भगवद्भक्ती । जरी ठाकेना विरक्ती । तरी यथानुशक्ती । भजन करावें ॥ ३६ ॥ काया वाचा आणि मनें । पत्रें पुष्पें फळें जीवनें । ईश्वरी अर्पोनिया मनें । सार्थक करावें ॥ ३७ ॥ यथानुशक्ति दानपुण्य । परी भगवंतीं अनन्य । सुखदुःखें परी चिंतन । देवाचेंचि करावें ॥ ३८ ॥ आदींअंतीं एक देव । मध्येंचि लाविली मांव । म्हणोनियां पूर्ण भाव । भगवंतीं असावा ॥ ३९ ॥ ऐसा सबळ रजोगुण । संक्षेपें केलें कथन । आतां शुद्ध तो तूं जाण । पारमार्थिक ॥ ४० ॥ त्याचें वोळखीचें चिन्ह । सत्वगुणीं असे जाण । तो सत्वगुण परिपूर्ण । भजनमूळ ॥ ४१ ॥ ऐसा रजोगुण बोलिला । श्रोतीं मनें अनुभविला । आतां पुढें परिसिला । पाहिजे तमोगुण ॥ ४२ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे द्वितीयदशके रजोगुणनिरूपण नाम पंचमः समासः ॥ ५ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ मागां बोलिला रजोगुण । क्रियेसहित लक्षण । आतां ऐका तमोगुण । तोहि सांगिजेल ॥ १ ॥ संसारीं दुःखसंबंध । प्राप्त होतां उठे खेद । कां अद्भुत आला क्रोध । तो तमोगुण ॥ २ ॥ शरीरीं क्रोध भरतां । नोळखे माता आणि पिता । बंधु बहिण आणि कांता । तोंडी तो तमोगुण ॥ ३ ॥ दुसऱ्याचा प्राण घ्यावा । आपला आपण स्वयें द्यावा । विसरवी जीवभावा । तो तमोगुण ॥ ४ ॥ भरलें क्रोधाचें कांविरें । पिशाच्यापरी वावरे । नाना उपायों नावरे । तो तमोगुण ॥ ५ ॥ आपला आपण शस्त्रपातें । पराव्याचा करी घात । ऐसा समय वर्तत । तो तमोगुण ॥ ६ ॥ डोळां युद्धचि पहावें । रण पडिलें तेथें जावें । ऐसें घेतलें जीवें । तो तमोगुण ॥ ७ ॥ अखंड भ्रांति पडे । केला निश्चय बिघडे । अत्यंत निद्रा आवडे । तो तमोगुण ॥ ८ ॥ क्षुधा जयाची वोंडे । नेणे कडू अथवा गोड । अत्यंत जो कां मूढ । तो तमोगुण ॥ ९ ॥ प्रीतिपात्र गेलें मरणें । तयालागीं जीव देणें । स्वयें आत्महत्या करणें । तो तमोगुण ॥ १० ॥ किडा मुंगी आणि श्वापदें । यांचा करूं आवडे वध । अत्यंत जो कृपामंद । तो तमोगुण ॥ ११ ॥ स्त्रीहत्या बाळहत्या । द्रव्यालागीं ब्रह्महत्या । करूं आवडे गोहत्या । तो तमोगुण ॥ १२ ॥ इसाळांचेनि नेटें । विष घ्यावें ऐसें वाटे । परवध मना उठे । तो तमोगुण ॥ १३ ॥ अंतरीं धरूनि कपट । पराचें करी तळपट । सदा मस्त सदा उद्धट । तो तमोगुण । ॥ १४ ॥ युद्ध देखावें ऐकावें । स्वयें युद्धचि करावें । मरावें कां मारावें । तो तमोगुण ॥ १५ ॥ कलह व्हावा ऐसें वाटे । झोंबी घ्यावी ऐसें उठे । अंतरीं द्वेष प्रगटे । तो तमोगुण ॥ १६ ॥ मत्सरें भक्ति मोडावी । देवालयें विघडावीं । फळतीं झाडें तोडावीं । तो तमोगुण ॥ १७ ॥ सत्कर्में तीं नावडतीं । नाना दोष ते आवडती । पापभय नाहीं चित्तीं । तो तमोगुण ॥ १८ ॥ ब्रह्मवृत्तीचा उच्छेद । जीवमात्रांस देणें खेद । करूं आवडे प्रमाद । तो तमोगुण ॥ १९ ॥ अग्निप्रळय शस्त्रप्रळय । भूतप्रळय विष-

---

१ प्राप्त होत नाही. २ वैराग्य. ३ साफल्य. ४ माया. ५ थोडक्यांत. ६ श्रोत्यांनी. ७ मारतो. ८ वेड, वाहूर. ९ भटकतो. १० आवरत नाहीं. ११ शस्त्राचे योगानें वध. १२ मोठी, दांडगी. १३ पशु. १४ ब्रह्मसंबंधाचा संचार, यांच्या नेटानें. १५ कुळक्षय. १६ ब्राम्हणांच्या उपजीविकेचें साधन. १७ नाश. १८ दोष, चूक, अपराध.

प्रळय । मत्सरें करी जीवक्षय । तो तमोगुण ॥ २० ॥ भांडण लावून द्यावें । स्वयें कौतुक पहावें । कुबुद्धि घेतली जीवें । तो तमोगुण ॥ २१ ॥ प्राप्त जाहलिया संपत्ती । जीवासि करी यातायाती । कळवळा न ये चित्तीं । तो तमोगुण ॥ २२ ॥ नावडे भक्ति नावडे भाव । नावडे तीर्थ नावडे देव । वेदशास्त्र नलगे सर्व । तो तमोगुण ॥ २३ ॥ पीडेचा संतोष । निष्ठुरपणाचा हव्यास । संसाराचा न ये त्रास । तो तमोगुण ॥ २४ ॥ स्नानसंध्या नेम नसे । स्वधर्मी भ्रष्टला दिसे । अकर्तव्य करीतसे । तो तमोगुण ॥ २५ ॥ ज्येष्ठ बंधु बाप माये । यांचीं वचनें न साहे । शीघ्रकोपी निघूनि जाये । तो तमोगुण ॥ २६ ॥ उगेंचि खावें उगेंचि असावें । स्तब्ध होऊनि बैसावें । कांहींच स्मरेना स्वभावें । तो तमोगुण ॥ २७ ॥ चेटकी विद्येचा अभ्यास । शास्त्रावेद्येचा हव्यास । मलविद्या व्हावी ज्यास । तो तमोगुण ॥ २८ ॥ केले गळाचे नवस । रोडीवेडीचे सायास । काष्ठयंत्रें छेदी जिव्हेस । तो तमोगुण ॥ २९ ॥ मस्तकीं भेदें जाळावें । पोतें अंग हुरपळावें । स्वयें शस्त्र टोंचून घ्यावें । तो तमोगुण ॥ ३० ॥ निर्ग्रह करून धरणें । कां तें टांगून घेणें । देवद्वारीं जीव देणें । तो तमोगुण ॥ ३१ ॥ देवासि शिर वाहावें । कां तें अंग समर्पावें । कडणीवरून घालून घ्यावें । तो तमोगुण ॥ ३२ ॥ निराहार उपोषण । पंचाग्नि धूम्रपान । आपणास घ्यावें पुरून । तो तमोगुण ॥ ३३ ॥ सकाम जें कां अनुष्ठान । कां तें वायुनिरोधन । अथवा रहावें पडोन । तो तमोगुण ॥ ३४ ॥ नखें केश वाढवावे । हस्तचि वरते करावे । अथवा वाक्शून्य व्हावें । तो तमोगुण ॥ ३५ ॥ नाना निग्रहीं पीडावें । देहदुःखें चरफडावें । क्रोधें देवास फोडावें । तो तमोगुण ॥ ३६ ॥ देवाची जो निंदा करी । तो आशाबद्ध अघोरी । जो संतसंग न धरी । तो तमोगुण ॥ ३७ ॥ ऐसा हा तमोगुण । सांगतां तो असाधारण । परी त्यागार्थ निरूपण । कांहींएक ॥ ३८ ॥ ऐसें वर्तें तो तमोगुण । परी हा पर्तनासि कारण । मोक्षप्राप्तीचें लक्षण । नव्हे येणें ॥ ३९ ॥ केल्याकर्माचें फळ । प्राप्त होईल सकळ । जन्मदुःखाचें मूळ । तुटेना कीं ॥ ४० ॥ व्हावया जन्माचें खंडन । पाहिजे तो सत्वगुण । तेंचि असे निरूपण । पुढिलिये समासीं ॥ ४१ ॥ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे द्वितीयदशके तमोगुणनिरूपणं नाम षष्ठः समासः ॥ ६ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ मागां बोलिला तमोगुण । जो दुःखदायक दारुणे । आतां ऐका सत्वगुण । परम दुर्लभ जो ॥ १ ॥ जो भजनाचा आधार । जो योगियांचा थोर । जो निरसी संसार । दुःखमूळ जो ॥ २ ॥ जेणें होय उत्तम गती । मार्ग फुटे भगवंतीं ।

---

१ कटकट, दगदग. २ छंद. ३ मंत्रविद्येचा. ४ गळफासाचें. ५ धमधमीत निखाऱ्यावरून चालत जाण्याचें. ६ आंत अग्नि घातलेलें खापर त्याने. ७ दिवटीनें. ८ नियम, आग्रह. ९ कड्यावरून. १० उडी टाकावी. ११ चारी बाजूला चार अग्नि व वर सूर्य अशा रीतीची तपश्चर्या. १२ धूरापिणें. १३ श्वास कोंडणें. १४ हात. १५ मुकें रहावें. १६ हट्ट, आग्रह, नियम यांयोगें. १७ भयंकर. १८ अधोगतीस. १९ भयंकर. २० आश्रय, स्थान. २१ दूर करितो. २२ जो संसार.

जेणें पाविजे मुक्ती । सायुज्यता ती ॥ ३ ॥ जो भक्तांचा कोंवसा[1] । जो भवार्णवींचा भरंवसा[2] । मोक्षलक्ष्मीची दशा[3] । तो सत्वगुण ॥ ४ ॥ जो परमार्थाचे मंडण[4] । जो महंतांचें[5] भूषण । रजतमांचें निरसन[6] जयाचेनी ॥ ५ ॥ जो परम सुखकारी । जी आनंदाची लहरी[7] । देऊनियां निवारी । जन्ममृत्यु ॥ ६ ॥ जो अज्ञानाचा शेवटे[8] । जो पुण्याचें मुळेंपीठ[9] । जयाचेनि सांपडे वाट । परलोकाची ॥ ७ ॥ ऐसा हा सत्वगुण । देहां उमटतां[10] आपण । तया क्रियेचें लक्षण । ऐसें असे ॥ ८ ॥ ईश्वरीं प्रेम अधिक । प्रपंच संपादणें लौकिकें[11] । सदा सन्निध विवेक । तो सत्वगुण ॥ ९ ॥ संसारदुःख विसरवी । भक्तिमार्ग विमळें[12] दावी । भजनक्रिया जो उपजवी । तो सत्वगुण ॥ १० ॥ परमार्थाची आवडी । उठे भावार्थाची गोडी । परोपरीं तांतडी[13] । तो सत्वगुण ॥ ११ ॥ स्नानसंध्या पुण्यशीळ । अभ्यंतरींचा[14] निर्मळ । शरीर वस्त्रें सोज्वळ[15] । तो सत्वगुण ॥ १२ ॥ यजनें[16] आणि याजनें[17] । अध्ययनें[18] आणि अध्यापनें[19] । स्वयें करी पुण्यदान । तो सत्वगुण ॥ १३ ॥ निरूपणाची आवडी । जया हरिकथेची गोडी । क्रिया पालटे रोकडी[20] । तो सत्वगुण ॥ १४ ॥ अश्वदानें गजदानें । गोदानें भूमिदानें । नाना रत्नांचीं दानें । करी तो सत्वगुण ॥ १५ ॥ धनदान वस्त्रदान । अन्नदान उदकदान । करी ब्राह्मणसतर्पण[21] । तो सत्वगुण ॥ १६ ॥ कार्तिकस्नानें माघस्नानें । व्रतें उद्यापनें[22] दानें । निष्कामें तीर्थें उपोषणें । तो सत्वगुण ॥ १७ ॥ सहस्त्रभोजनें लक्षभोजनें । विविध प्रकारचीं दानें । निष्काम करी सत्वगुणें । कामनें[23] रजोगुण ॥ १८ ॥ तीर्थीं अर्पी जो अग्रहारें[24] । बांधों वापीं कूपें[25] सरोवरें । बांधीं देवालयाशिखरें[26] । तो सत्वगुण ॥ १९ ॥ देवद्वारीं पडसाळी[27] । पायरिया दीपमाळा । वृंदावनें पारे[28] पिंपळा । बांधी तो सत्वगुण ॥ २० ॥ लावी वनें उपवनें[29] । पुष्पवाटिका जीवनें[30] । निववी तापसियांचीं मनें । तो सत्वगुण ॥ २१ ॥ संध्यामठ आणि भुयारीं । पायरिया[31] नदीतीरीं । भांडारग्रहें देवद्वारीं । बांधी तो सत्वगुण ॥ २२ ॥ नाना देवांचीं जीं स्थानें । तेथें नंदादीप घालणें । वाहे अलंकारभूषणें । तो सत्वगुण ॥ २३ ॥ जेंगट[32] मृदंग टाळ । दमामे[33] नगारे कर्हावे[34] । नाना वाद्यांचे कल्लोळ[35] । सुस्वरादिक ॥ २४ ॥ नाना सामुग्री सुंदर । देवालयीं घाली नर । हरिभजनीं जो तत्पर । तो सत्वगुण ॥ २५ ॥ छत्रें आणि सुखासनें । दिंड्या पताका निशाणें । वाहे चामरें सूर्यपानें[36] । तो सत्वगुण

---

१ आश्रय, आधार. २ संसारसागराचा. ३ खात्रीनें तारणारा. ४ मोक्षरूपी संपत्तीची. ५ स्थिति, रूप. ६ अतिश्रेष्ठ इष्ट उद्देश, आत्मलाभ. ७ भूषण. ८ साधु. ९ नाश. १० लाट. ११ नाश करणारा. १२ मूळ ठिकाण. १३ प्रगट होतां. १४ कीर्ति. १५ शुद्ध, पवित्र. १६ घाई. १७ अंतःकरणाचा. १८ स्वच्छ. १९ होम करणें व करावणें. २० शिकणें आणि शिकविणें. २१ लक्षण, स्वरूप आणि प्रमाणानें कथनाची. २२ तत्काल. २३ अन्नादि दानें करून ब्राह्मणांस तृप्त करणे. २४ व्रताच्या समाप्तीकरतां कांहीं कर्मविशेष. २५ कांहींहि हेतु न धरतां. २६ वासना, इच्छा. २७ ब्राह्मणांस ईश्वरप्रीत्यर्थ गांव, जमीन, इत्यादि देतात ती. २८ पायऱ्यांच्या विहिरी. २९ आड. ३० धर्मशाळा. ३१ वाटोळा ओटा. ३२ बागबगीचे. ३३ पुष्पवृक्षांनीं सुशोभित स्थळें. ३४ उदकानें. ३५ घाट. ३६ जंगट, तास (एक वाद्य). ३७ मोठे नगारे. ३८ झांज. ३९ आवाज. ४० अब्दागिरी.

॥ २६ ॥ वृंदावनें तुलसीवनें । रंगमाळा संमार्जनें । ऐसी प्रीति घेतली मनें । तो सत्व-गुण ॥ २७ ॥ सुंदर नाना उपकरणें । मंडप चांदवे आसनें । देवालयीं समर्पणें । हा सत्वगुण ॥ २८ ॥ देवाकारणें खाद्यें । नाना प्रकारचे नैवेद्य । अपूर्व फळें अर्पी सद्यें । तो सत्वगुण ॥ २९ ॥ ऐसी भक्तीची आवडी । नीचं दास्यत्वाची गोडी । स्वयें देवद्वार झाडी । तो सत्वगुण ॥ ३० ॥ तिथि पर्व महोत्साव । तेथें ज्याचा अंतर्भाव । काया-वाचामनें सर्व । अर्पी तो सत्वगुण ॥ ३१ ॥ हरिकथेसि तत्पर । गंधमाळा आणि धूपशर । घेऊन उभा निरंतर । तो सत्वगुण ॥ ३२ ॥ नर अथवा नारी । यथानुशक्ति सामुग्री । घेऊन उभीं देवद्वारीं । तो सत्वगुण ॥ ३३ ॥ महत्कृत्य सांडूनि मागें । देवास ये लौगवेगें । भक्ति निकटें अंतरंगें । तो सत्वगुण ॥ ३४ ॥ थोरपण सांडूनि दूरी । नीचकृत्य अंगिकारी । तिष्टत उभीं देवद्वारीं । तो सत्वगुण ॥ ३५ ॥ देवालागीं उपो-षण । वर्जी तांबूल भोजन । नित्यनेम जप ध्यान । करी तो सत्वगुण ॥ ३६ ॥ शब्द कठिण न बोले । अति नेमेसि चाले । योगी जेणें तोषविले । तो सत्वगुण ॥ ३७ ॥ सांडूनिया अभिमान । निष्काम करी कीर्तन । स्वेदरोमांच स्फुरण । तो सत्वगुण ॥ ३८ ॥ अंतरीं देवांचें ध्यान । तेणें निर्डारले नयन । पडे देवाचें विस्मरण । तो सत्वगुण ॥ ३९ ॥ हरिकथेची अति प्रीती । सर्वथा न ये विकृती । अधिक प्रेमा आदिअंतीं । तो सत्वगुण ॥ ४० ॥ मुखीं नाम हातीं टाळी । नाचत बोले बिरुदावळी । घेऊनि लावी पायधुळी । तो सत्वगुण ॥ ४१ ॥ देहाभिमान गळे । विषयीं वैराग्य प्रबळे । मिथ्या माया ऐसे कळे । तो सत्वगुण ॥ ४२ ॥ कांहीं करावा उपाय । संसारीं गुंतोनि काय । उकलवी ऐसें हृदय । तो सत्वगुण ॥ ४३ ॥ संसारासि त्रासे मन । कांहीं करावें भजन । ऐसें मनीं उठे ज्ञान । तो सत्वगुण ॥ ४४ ॥ असतां आपुले आश्रमीं । अत्यादरें नित्यनेमीं । सदा प्रीति लागे रामीं । तो सत्वगुण ॥ ४५ ॥ सकळांचा आला वीट । परमार्थी जो निकटें । आधौतीं उपजे धारिष्ठ । तो सत्वगुण ॥ ४६ ॥ सर्वकाळ उदासीन । नाना भोगीं विटे मन । आठवें भगवद्भजन । तो सत्वगुण ॥ ४७ ॥ पदार्थीं न बैसें चित्त मनीं आठवे भगवंत । ऐसा दृढ भावार्थ । तो सत्वगुण ॥ ४८ ॥ अंतरीं स्फूर्ति स्फुरे । स्वस्वरूपीं तर्क भरे । नष्ट संदेह निवारे । तो सत्वगुण ॥ ४९ ॥ लोक बोलती विकारी । तरी अधिक प्रेमा धरी । निश्चय बाणे अंतरीं । तो सत्वगुण ॥ ५० ॥ शरीर लावावें कारणीं । साक्षेपें उठे अंतःकरणीं । सत्वगुणाची करणी । ऐसी असे ॥ ५१ ॥

---

१ झाडून साफ करणें. २ पूजेचा भांडी. ३ छत. ४ खाण्याचे पदार्थ. ५ लागलीच, ताबडतोब. ६ नित्य. ७ सेवेची. ८ पूर्णिमा, अमावास्या इत्यादि स्नानदानादि पुण्यकर्माविषयीं सांगितलेले काळ. ९ निष्ठा. १० बुक्का. ११ जलदीनें. १२ जवळ. १३ सोडतो. १४ घाम येऊन अंगावर रोमांच उभे राहणें. १५ भरून आले. १६ इतर विकार, वीट. १७ प्रारंभीं व शेवटीं. १८ गुणानुवाद. १९ विषयांच्या ठिकाणीं. २० विरक्ति, अनासक्ति. २१ खोटी. २२ असा मनांत विचार करतो. २३ दररोजच्या नेमधर्माच्या ठिकाणीं रत. २४ जवळ. २५ संकटकालीं. २६ उपभोगांनीं. २७ स्फुरण. २८ आत्मस्वरूपाचे ठिकाणीं. २९ संशय. ३० विकारयुक्त. वेडा. ३१ उत्सुकता, उत्कंठा.

शांति क्षमा आणि दया । निश्चय उपजे जया । सत्वगुण जाणावा तया । अंतरीं आला ॥ ५२ ॥ आले अतीतअभ्यागत । जाऊं नेदी जो क्षुधित । यथाशक्ति दान देत । तो सत्वगुण ॥ ५३ ॥ तडीतापडी दैन्यवाणे । आले आश्रमाचेनि गुणें । तयालागीं स्थळ देणें । तो सत्वगुण ॥ ५४ ॥ आश्रमीं अन्नाची आपदा[1] । परी विमुखे नव्हे कदा । भक्त्यनुसार दे सर्वदा । तो सत्वगुण ॥ ५५ ॥ जेणें जिंकिली रसना[2] । तृप्त जयाची वासना । जयासि नाहीं कामना । तो सत्वगुण ॥ ५६ ॥ होणार तैसें होत जात । प्रपंची झाला आघात[3] । डळमळीना ज्याचें चित्त । तो सत्वगुण ॥ ५७ ॥ एका भगवंताकारणें । सर्व सुख सोडिलें जेणें । केलें देहाचें सांडणें[4] । तो सत्वगुण ॥ ५८ ॥ विषयीं धांवे वासना । परी तो कदा डळमळीना । ज्याचें धारिष्ट चळेना[5] । तो सत्वगुण ॥ ५९ ॥ देह आपदेनें पीडिला । क्षुधेतृषेनें वोसावेला[6] । तरी निश्चय राहिला । तो सत्वगुण ॥ ६० ॥ श्रवण आणि मनन । निजध्यास समाधान । शुद्ध झालें आत्मज्ञान । तो सत्वगुण ॥ ६१ ॥ सकळांसि नम्र बोले । मर्यादा धरून चाले । सर्व जन तोषविले । तो सत्वगुण ॥ ६२ ॥ जयासि अहंकार[7] नसे । नैराश्यता विलसे । जयापाशीं कृपा वसे । तो सत्वगुण ॥ ६३ ॥ सकळ जनांसि आंजवे[8] । नाहीं विरोधासी ठाव । परोपकारीं वेंची[9] जीव । तो सत्वगुण ॥ ६४ ॥ आपकाजाहूनि जीवीं । परकार्यसिद्धि करावी । मरून कीर्ति उरवावी । तो सत्वगुण ॥ ६५ ॥ पराव्याचे दोष गुण । दृष्टीस न देखे आपण । समुद्राऐसें सांठवण । तो सत्वगुण ॥ ६६ ॥ नीचउत्तर सोहेणें[10] । प्रत्युत्तर न देणें । आपुला क्रोध सांवरणें । तो सत्वगुण ॥ ६७ ॥ अन्यायेंविण गांजिती । नानापरी पीडा करिती । तितुकेंही सांठवी चित्तीं । तो सत्वगुण ॥ ६८ ॥ शरीरें घीसे[11] साहणें । दुर्जनांसि मिळोन जाणें । निंदकास उपकार करणें । तो सत्वगुण ॥ ६९ ॥ मन भलतीकडे धांवें । ते विवेकें[12] आवरावें । इंद्रियेंदमन करावें । तो सत्वगुण ॥ ७० ॥ सत्क्रिया आचरावी । असत्क्रिया त्यागावी । वाट भक्तीची धरावी । तो सत्वगुण ॥ ७१ ॥ जया आवडे प्रातःस्नान । आवडे पुराणश्रवण । नाना मंत्रीं देवतार्चन । करी तो सत्वगुण ॥ ७२ ॥ पर्वकाळीं अतिसादर[13] । वसंतपूजेसि तत्पर । जयाचीप्रीति थोर । तो सत्वगुण ॥ ७३ ॥ विदेशीं[14] मेले[15] मरणें । तयांसि संस्कार देणें[16] । अथवा सादर होणें । तो सत्वगुण ॥ ७४ ॥ कोणी एकास मारी । तयासि जाऊन वारी[17] । जीव बंधनमुक्त करी । तो सत्वगुण ॥ ७५ ॥ लिंगें लाखोली अभिशेषे[18] । नामस्मरणीं विश्वास । देव-

---

१ गोसावी, वैरागी इत्यादि. २ भुकेला. ३ जागा. ४ विपत्काल, अभाव. ५ पाठमोरा. ६ जिव्हा. ७ इच्छा. ८ धक्का, संकट. ९ कुर्वंडी, ओवाळणी. १० ढळेना. ११ वाळला, गळाला. १२ मनाच्या इतर सर्व वृत्तींचा त्याग करून 'अहं ब्रह्मास्मि' अशा एका च वृत्तीनें परब्रह्मस्वरूपाचें एकाग्रतेतें चिंतन करण्यानें. १३ गर्व. १४ सरळपणा. १५ विरुद्धभावाला. १६ खर्च करी. १७ स्वतःचें काम. १८ परक्याचे. १९ सोसणें. २० झीज. २१ विचारानें. २२ इंद्रियांस जिंकणें. २३ देवपूजा. २४ जन्मोत्साह वगैरेसंबंधीं. २५ परदेशांत. २६ जे मेले. २७ अग्निसंस्कार वगैरे. २८ निवारण करितो. २९ अभिषेक.

दर्शनीं अवकाश । तो सत्वगुण ॥ ७६ ॥ संत देखोनि धांवे । परमसुखें हेलावें[1] । नमस्कारी सर्वभावें । तो सत्वगुण ॥ ७७ ॥ संतकृपा होय जयास । तेणें उद्धरिला वंश[2] । तो ईश्वराचा अंश । सत्वगुणें ॥ ७८ ॥ सन्मार्ग दाखवी जना । जो लावी हरिभजना । ज्ञान शिकवी अज्ञाना । तो सत्वगुण ॥ ७९ ॥ आवडे पुण्यसंस्कार । प्रदक्षिणा नमस्कार । जया राहे पाठांतर । तो सत्वगुण ॥ ८० ॥ भक्तीचा हव्यास भारी । ग्रंथसामुग्री जो करी । धातुमूर्ति नानापरी । पूजी तो सत्वगुण ॥ ८१ ॥ झळझळीत उपकरणें । माळा गर्वाळों आसनें । पवित्रें सोज्वळें वस्त्रनें[3] । तो सत्वगुण ॥ ८२ ॥ परपीडेचें वाहे दुःख । परसंतोषाचें सुख । वैराग्य देखोनि मानी हरिख[4] । तो सत्वगुण ॥ ८३ ॥ परभूषणीं भूषण । परदूषणीं दूषण । परदुःखीं शिणे जाण । तो सत्वगुण ॥ ८४ ॥ आतां असो ह बहुत । देवा धर्मीं ज्याचें चित्त । भजे कामनारहित । तो सत्वगुण ॥ ८५ ॥ ऐसा हा सत्वगुण सात्विक । संसारसागरीं तारक । येणें उपजे विवेक । ज्ञानमार्गाचा ॥ ८६ ॥ सत्वगुणें भगवद्भक्ती । सत्वगुणें ज्ञानप्राप्ती । सत्वगुणें सायुज्यमुक्ति[5] पाविजे ते ॥ ८७ ॥ ऐसी सत्वगुणाची स्थिति । स्वल्प बोलिलों यथामती । सावध होऊनि श्रोतीं । पुढें अवधान द्यावें ॥ ८८ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे द्वितीयदशके सत्वगुणनिरूपणं नाम सप्तमः समासः ॥ ७ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ऐका सद्विद्येचों लक्षणें । परम शुद्ध सुलक्षणें । विचार घेतां बळेंचि बाणे । सद्विद्या अंगीं ॥ १ ॥ सद्विद्येचा जो पुरुष । तो उत्तम लक्षणीं विशेष । त्याचे गुण ऐकतां संतोष । परम वाटे ॥ २ ॥ भाविक सात्विक प्रेमळ । शांतिक्षमादयाशीळ । लीन तत्पर केवळ । अमृतवचनीं ॥ ३ ॥ परमसुंदर आणि चतुर । परम सबळ आणि धीर । परम संपन्न आणि उदार । अतिशयेंसी ॥ ४ ॥ परम ज्ञाता आणि भक्त । महापंडित आणि विरक्त[6] । महातपस्वी आणि शांत । अतिशयेंसी ॥ ५ ॥ वक्ता आणि नैराश्यता[7] । सर्वज्ञ आणि सादरता । श्रेष्ठ आणि नम्रता । सर्वत्रांसी ॥ ६ ॥ राजा आणि धार्मिक । शूर आणि विवेक । तारुण्य आणि नेमक[8] । अतिशयेंसी ॥ ७ ॥ वृद्धाचारी कुळाचारी । युक्ताहारी निर्विकारी[9] । धन्वंतरी[10] परोपकारी । पक्षहंती[11] ॥ ८ ॥ कार्यकर्ता निरभिमानी । गायक आणि वैष्णव जनीं । वैभव आणि भगवद्भजनीं । अत्यादरें ॥ ९ ॥ तत्त्वज्ञ आणि उदासीन । शाश्वत आणि सज्जन । मंत्री आणि सगुण । नीतिवंत ॥ १० ॥ साधु पंडित पुण्यशीळ । अंतरशुद्ध धर्मात्मा कृपाळ ।

---

१ जागा देतो, तत्पर असतो. २ डोलतो. ३ कुल, कुटुंब. ४ टिकेना. ५ नाद, छंद. ६ मुकटा वगैरे ठेवण्याकरितां सोंवळ्या पिशव्या. ७ वस्त्रें. ८ मानी. ९ हर्ष. १० ईश्वराशीं जीवाचा अभेद करणारी मुक्ति. ११ लक्ष. १२ गोड भाषण करणारा. १३ द्रव्य, विद्यादिकांनीं युक्त. १४ वैराग्यशील. १५ आशारहितपणा. १६ नेमानें-नियमानें वर्तन करणारा. १७ वाडवाडलांपासून चालत आलला आचार पाळणारा. १८ कुलधर्मानें वागणारा. १९ नेमस्त खाणारा. २० विकाररहित. २१ वैद्यावद्यानिष्णात. २२ दैववान, अंगीकृत कार्यांत यश मिळविणारा. २३ विष्णूची उपासना करणारे. २४ आत्मतत्व जाणणारा.

कर्मनिष्ठ स्वधर्मे निर्मळ । निर्लोभ अनुतापी ॥ ११ ॥ गोडी आवडी परमार्थप्रीती । सन्मार्ग सत्क्रिया धारणा धृती । श्रुती स्मृती लीला युक्ती । स्तुती मती परीक्षा ॥ १२ ॥ दक्ष धूर्त योग्य तार्किक । सभ्य साहित्य नेमक भेदक । कुशळ चपळ चमत्कारिक । नानाप्रकारें ॥ १३ ॥ आदर सन्मान तारतम्य जाणे । प्रयोग समय प्रसंग जाणें । कार्य कारण चिन्ह जाणें । विचक्षण बोलका ॥ १४ ॥ सावध साक्षेपी साधक । आगमनिगमशोधक । ज्ञानविज्ञानबोधक । निश्चयात्मक ॥ १५ ॥ पुरश्चरणीं तीर्थवासी । दृढवृत्ति कायक्लेशी । उपासक निग्रहांसी । करूं जाणे ॥ १६ ॥ सत्यवचनी शुभवचनी । कोमळवचनी एकवचनी । निश्चयवचनी सौख्यवचनी । सर्वकाळ ॥ १७ ॥ वासनातृप्त संतोषी योगी । भक्त सुप्रसन्न वीतरागी । सौम्य सात्विक शुद्धमार्गी । निष्कपट निर्व्यसनी ॥ १८ ॥ सुघेड संगीत गुणग्राही । अनपेक्ष लोकसंग्रही । आर्जव सख्य सर्वही । प्राणिमात्रांसी ॥ १९ ॥ द्रव्यशुची दाराशुची । न्यायशुची अंतरशुची । प्रवृत्तिशुची निवृत्तिशुची । सर्वशुची निःसंगपणें ॥ २० ॥ मित्रपणें परहितकारी । वाङ्माधुर्य परशोकहारी । सामर्थ्यपणें वज्रधारी । पुरुषार्थें जगमित्र ॥ २१ ॥ संशयछेदक विशाळ वक्ता । सकळ कलेसि असोनि श्रोता । कथानिरूपणीं शब्दार्था । जाऊंच नेदी ॥ २२ ॥ विवादरहित संवादी । संगरहित निरूपाधी । दुराशारहित अक्रोधी । निर्दोष निर्मत्सरी ॥ २३ ॥ विमळज्ञानी निश्चयात्मक । समाधानी आणि भजक । सिद्ध असोनि साधक । साधन रक्षी ॥ २४ ॥ सुखरूप संतोषरूप । आनंदरूप हास्यरूप । ऐक्यरूप आत्मरूप । सर्वत्रांसी ॥ २५ ॥ भाग्यवंत जयवंत । रूपवंत गुणवंत । आचारवंत क्रियावंत । विचारवंत स्थिति ॥ २६ ॥ यशवंत कीर्तिवंत । शक्तिवंत सामर्थ्यवंत । वीर्यवंत । वैराग्यवंत । सत्यवंत सुकृती ॥ २७ ॥ विद्यावंत कळावंत । लक्ष्मीवंत लक्षणवंत । कुळवंत शुचिष्मंत । बळवंत तयाकडे ॥ २८ ॥ युक्तिवंत गुणवंत वरिष्ठ । बुद्धिवंत बहुधारिष्ट । दीक्षावंत सदा संतुष्ट । निस्पृह वीतरागी ॥ २९ ॥ असो ऐसे उत्तम गुण । हें सद्विद्येचें लक्षण । अभ्यासावयासि निरूपण । अल्पमात्र बोलिलों ॥ ३० ॥ रूप लावण्य अभ्यासितां नये । सहजगुणासि न चले उपाये । कांहीं तरी धरावी सोये । आगंतुक गुणांची

---

१ पश्चात्ताप करणारा. २ ग्राहकबुद्धि. ३ धैर्य. ४ तर्कवान्, हुशार, चतुर. ५ मर्म जाणणारा. ६ शाहणा, सुज्ञ. ७ प्रयत्नशील, उद्योगी. ८ धर्मशास्त्र, वेदशास्त्र, यांचा शोध करणारा. ९ ईश्वरस्वरूपज्ञानाचा अनुभव सांगणारा. १० मंत्रसिद्धीकरितां ज्या मंत्राचा शास्त्रोक्त जप करणारा. ११ शरीरक्लेश सोसणारा. १२ इंद्रियादिकांचें आकर्षण–दमन–त्याला. १३ दूरवर विचार करणारा. १४ वैराग्यशील. १५ कुशल, चतुर. १६ कोणावर अवलंबून नसणारा. १७ लोकांस अधर्मापासून निवृत्त करून स्वधर्माकडे प्रवृत्त करणारा. १८ सरळपणा. १९ कर्ममार्गानें वागणारा, पुण्य कर्माकडे मनाचा कल असलेला २० मोक्षमार्गी, पापाकडे मनाचा कल नसलेला. २१ सर्व संग अंतःकरणपूर्वक सोडून. २२ परक्याचा शोक हरण करणारा. २३ रक्षण करणारा, शिक्षण देणारा. २४ ज्ञाता, जाणता. २५ उपाधिरहित. २६ हसतमुख. २७ वर देण्याविषयीं समर्थ. २८ पुण्यवान्. २९ पवित्र. ३० चिन्ह, खूण. ३१ शिकावेंम्हणून. ३२ स्वभाविक गुण. ३३ मार्ग, आरंभ. ३४ अंगांत आणतां येणाऱ्या.

॥ ३१ ॥ ऐसी हे सद्विद्या बरवी । सर्वत्रांपासीं असावी । परी विरक्त पुरुषें अभ्यासावी । अगत्यरूप ॥ ३२ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे द्वितीयदशके सद्विद्यानिरूपणं नाम अष्टमः समासः ॥ ८ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ऐका विरक्तांचीं लक्षणें । विरक्तें असावें कोण्या गुणें । जेणें अंगीं सामर्थ्य बाणे । योगियाचे ॥ १ ॥ जेणें सत्कीर्ति वाढे । जेणें सार्थकता घडे । जेणें करितां महिमा चढे । विरक्तांसी ॥ २ ॥ जेणें परमार्थ फावे । जेणें आनंद हेलावे । जेणें विरक्ति दुणावें । विवेकेंसहित ॥ ३ ॥ जेणें सुख उचंबळे । जेणें सद्विद्या वोळे । जेणें भाग्यश्री प्रबळे । मोक्षसहित ॥ ४ ॥ मनोरथ पूर्ण होती । सकळ कामना पुरती । मुखीं राहे सरस्वती । मधुर शब्द बोलावया ॥ ५ ॥ हीं लक्षणें श्रवण कीजे । आणि सुदृढ जीवीं धरिजे । तरी मग विख्यात होइजे । भूमंडळीं ॥ ६ ॥ विवेकें विरक्तें असावें । विरक्तें अध्यात्म वाढवावें । विरक्तें धारिष्ट धरावें । दर्मनाविषयीं ॥ ७ ॥ विरक्तें राखावें साधन । विरक्तें लावावें भजन । विरक्तें विशेष ब्रह्मज्ञान । प्रगटवावें ॥ ८ ॥ विरक्तें भक्ति वाढवावी । विरक्तें शांति दाखवावी । विरक्तें यत्नें करावी । विरक्ती आपुली ॥ ९ ॥ विरक्तें सत्क्रिया प्रतिष्ठावी । विरक्तें निवृत्ति विस्तारावी । विरक्तें नैराश्यता धरावी । सदृढ जीवीं ॥ १० ॥ विरक्तें धर्मस्थापना करावी । विरक्तें नीति अवलंबावी । विरक्तें क्षमा सांभाळ वी । अत्यादरें ॥ ११ ॥ विरक्तें परमार्थ उजळावा । विरक्तें विचार शोधावा । विरक्तें सन्निध ठेवावा । सन्मार्ग सत्वगुण ॥ १२ ॥ विरक्तें भावकें सांभाळावा । विरक्तें प्रेमळें निववावा । विरक्तें सांबडा नुपेक्षावा । शरणागतें ॥ १३ ॥ विरक्तें असावें परम दक्ष । विरक्तें असावें अंतरसाक्ष । विरक्तें ओढवावा कैपक्षें । परमार्थाचा ॥ १४ ॥ विरक्तें अभ्यास करावा । विरक्तें संक्षेप धरावा । विरक्तें वक्तृत्वें उभारावा । मोडला परमार्थ ॥ १५ ॥ विरक्तें विमळ ज्ञान बोलावें । विरक्तें वैराग्य स्तवीत जावें । विरक्तें निश्चयाचें करावें । समाधान १६ ॥ पर्वे करावा अचाटें । चालवावीं भक्तीचीं थाटें । नाना वैभवें कचाटें । उपासनामार्ग ॥ १७ ॥ हरिकीर्तनें करावीं । निरूपणें माजवावीं । भक्तिमार्गें लाजवावीं । निंदक दुर्जनें ॥ १८ ॥ बहुतांस करावे परोपकार । भलेपणाचा जीर्णोद्धार । पुण्यमार्गाचा विस्तार । बळेंचि करावा ॥ १९ ॥ स्नान संध्या जप ध्यान । तीर्थयात्रा भगवद्भजन । नित्यनेम पवित्रपण । अंतर शुद्ध असावें ॥ २० ॥ दृढ निश्चय धरावा । संसार सुखाचा करावा । विश्वजन उद्धरावा । संसर्गमात्रें ॥ २१ ॥ विरक्तें असावें धीर । विरक्तें असावें उदार । विरक्तें असावें तत्पर । निरूपणविषयीं ॥ २२ ॥ विरक्तें

---

१ सफलता. २ प्राप्त होतो. ३ उचंबळतो. ४ दुप्पट वाढते. ५ वळते, प्राप्त होते. ६ पृथ्वीवर. ७ आत्मज्ञान. ८ इंद्रियनिग्रहाविषयी. ९ स्थापन करावी. १० विषयांपासून वासना व इंद्रियें परतविणें, मोक्ष. ११ जवळ. १२ भोळीं माणसें. १३ तुच्छ समजून टाकूं नये. १४ अंतःकरणांतील भाव समजणारा. १५ बाजू, केवार. १६ उद्योग. १७ एकाग्रस्थिति. १८ पर्वकाळीं दानधर्मादि क्रिया. १९ मोठीं. २० समारंभ. २१ खटपटी. २२ पूजादि क्रियाद्वारां ईश्वरास भजणें. २३ जोरानें चालवावीं. २४ स्पर्शानें, संबंधानें.

सावध असावें । विरक्तें शुद्धमार्गें जावें । विरक्तें झिजोनि उरवावें । सत्कीर्तीसी ॥ २३ ॥ विरक्तें विरक्त धुंडावें[1] । विरक्तें साधु वोळखावे । विरक्तें मित्र करावे । संत योगी सज्जन ॥ २४ ॥ विरक्तें करावीं पुरश्चरणें[2] । विरक्तें फिरावीं तीर्थाटणें । विरक्तें करावीं नाना स्थानें । परम रमणीय ॥ २५ ॥ विरक्तें उपाधी[3] करावी । आणि उदासवृत्ति न सांडावी । दुराशा जडों न द्यावी । कोणे एक विषयीं ॥ २६ ॥ विरक्तें असावें अंतर्निष्ठ[4] । विरक्तें नसावें क्रियाभ्रष्ट । विरक्तें न व्हावें कनिष्ठ । पराधीनपणें ॥ २७ ॥ विरक्तें समय जाणावा । विरक्तें प्रसंग वोळखावा । विरक्त चतुर असावा । सर्व प्रकारें ॥ २८ ॥ विरक्तें एकदेशी नसावें । विरक्तें सर्व अभ्यासावें । विरक्तें अवघें जाणावें । ज्याचें त्यापरी ॥ २९ ॥ हरिकथानिरूपण । सगुणभजन ब्रह्मज्ञान । पिंडज्ञान तत्वज्ञान । सर्व जाणावें ॥ ३० ॥ कर्ममार्ग उपासनामार्ग । ज्ञानमार्ग सिद्धांतमार्ग । प्रवृत्तिमार्ग निवृत्तिमार्ग । सकळ जाणावें ॥ ३१ ॥ प्रेमळस्थिती उदासस्थिती । योगस्थिती ध्यानस्थिती । विदेहस्थिती सहजस्थिती । सकळ जाणावें ॥ ३२ ॥ ध्वनि लक्ष मुद्रा आसनें । मंत्र यंत्र विधि विधानें । नाना मतांचें देखणें । पाहून सांडावें ॥ ३३ ॥ विरक्तें असावें जगमित्र । विरक्तें असावें स्वतंत्र । विरक्तें असावें विचित्र । बहुगुणी ॥ ३४ ॥ विरक्तें असावें विरक्त । विरक्तें असावें हरिभक्त । विरक्तें असावें नित्यमुक्त । अलिप्तपणें ॥ ३५ ॥ विरक्तें शास्त्रें धांडोळावीं । विरक्तें मतें विभांडावीं । विरक्तें मुमुक्षें लावावीं । शुद्धमार्गीं ॥ ३६ ॥ विरक्तें शुद्धमार्ग सांगावा । विरक्तें संशय छेदावा । विरक्तें आपुला म्हणावा । विश्वजन ॥ ३७ ॥ विरक्तें निंदक वंदावे । विरक्तें साधक बोधावे । विरक्तें बद्ध चेववावे । मुमुक्ष निरूपणें ॥ ३८ ॥ विरक्तें उत्तम गुण घ्यावे । विरक्तें अवगुण त्यागावे । नाना अपाय भंगावे । विवेकबळें ॥ ३९ ॥ ऐशीं हीं उत्तम लक्षणें । ऐकावीं एकाग्रमनें । यांचा अव्हेर न करणें । विरक्त पुरुषें ॥ ४० ॥ इतुकें बोलिलें स्वभावें । त्यांत मानेल तितुकें घ्यावें । श्रोतीं उदास न व्हावें । बहु बोलिलों म्हणोनी ॥ ४१ ॥ परंतु हीं लक्षणें न घेतां । अवलक्षणें बाष्कळता । तेणें त्यास पढतमूर्खता । येऊं पाहे ॥ ४२ ॥ त्या पढतमूर्खाचें लक्षण । पुढिलिये समासीं निरूपण । बोलिलें असें सावधान । होऊनि ऐका ॥ ४३ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे द्वितीय दशके विरक्तलक्षणनिरूपणं नाम नवमः समासः ॥ ९ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ मागां सांगितलीं लक्षणें । मूर्खांअंगीं चातुर्य बाणे । आतां

---

१ शोधावे. २ अनुष्ठानें. ३ उपसर्ग. ४ ब्रह्मनिष्ठ. ५ एकाच बाजूने विचार करणारा, अल्पज्ञ. ६ सगुणोपासना, सगुणमूर्तीचें भजन. ७ शरीरज्ञान. ८ भक्तिमार्ग. ९ गुरुभक्तिमार्ग. १० कर्ममार्ग. ११ मोक्षमार्ग. १२ जीमध्यें ध्येयाकार वृत्ती होते अशी स्थिति. १३ देहादिकांवर ममता नाहीं अशी स्थिति. १४ सर्वदा समाधानस्थिति. १५ खेचरी. गोचरी इत्यादि धारणा. १६ शरीराच्या बैठकीचे प्रकार. १७ नियम. १८ पूजा, व्रत, अनुष्ठान वगैरे करण्याची रीत. १९ प्रकार पहाणें. २० शोधून पहावी. २१ खंडून टाकावी. २२ सकल जन. २३ मोक्षादि कार्य साधण्याविषयीं उत्सुक. २४ जाग करावें. २५ अध्यात्मकथन. २६ त्याग, अनादर.

ऐका शहाणे । असोन मूर्ख ॥ १ ॥ तयां नांव पढतमूर्ख । श्रोतीं न मानावें दुःख । अवगुण त्यागितां सुख । प्राप्त होय ॥ २ ॥ बहुश्रुत आणि व्युत्पन्न । प्रांजळ बोले ब्रह्मज्ञान । दुराशा आणि अभिमान । धरी तो एक पढतमूर्ख ॥ ३ ॥ मुक्तक्रिया प्रतिपादी । सगुणभक्ति उच्छेदी । स्वधर्म आणि साधन निंदी । तो एक पढतमूर्ख ॥ ४ ॥ आपुलेनि ज्ञातेपणें । सकळांस शब्दें ठेवणें । प्राणिमात्राचें पाहे उणें । तो एक पढतमूर्ख ॥ ५ ॥ शिष्यासि अवज्ञा घडे । कां तो संकटीं पडे । ज्याचेनि शब्दें मन मोडे । तो एक पढतमूर्ख ॥ ६ ॥ रजोगुणी तमोगुणी । कपटी कुटिल अंतःकरणीं । वैभव देखोनि वाखाणी । तो एक पढतमूर्ख ॥ ७ ॥ समूळ ग्रंथ पाहिल्याविण । उगाच ठेवी जो दूषण गुण सांगतां अवगुण । पाहे तो एक पढतमूर्ख ॥ ८ ॥ लक्षणें ऐकोनि मानी त्रिट । मत्सरें करी खटपट । नीति नायके उद्धट । तो एक पढतमूर्ख ॥ ९ ॥ जाणपणें भरीं भरे । आला क्रोध नावरे । क्रियेसि शब्दांस अंतरे । तो एक पढतमूर्ख ॥ १० ॥ वक्ता अधिकारेविण । वक्तृत्वाचा करी शिण । वचन जयाचें कठिण । तो एक पढतमूर्ख ॥ ११ ॥ श्रोता बहुश्रुतपणें । वक्त्यासि आणी उणें । वाचाळपणाचेनि गुणें । तो एक पढतमूर्ख ॥ १२ ॥ दोष ठेवी पुढिलांसी । तेंचि स्वयें आपणापाशीं । ऐसें कळेना जयासी । तो एक पढतमूर्ख ॥ १३ ॥ अभ्यासाचेनि गुणें । सकळ विद्या जाणे । जनासि निववूं नेणे । तो एक पढतमूर्ख ॥ १४ ॥ हस्ती बांधी ऊर्णतंतें । लोभें मृत्यु भ्रमरातें । ऐसा जो प्रपंचीं गुंते । तो एक पढतमूर्ख ॥ १५ ॥ स्त्रियांचा संग धरी । स्त्रियांसि निरूपणें करी । निंद्य वस्तु अंगिकारी । तो एक पढतमूर्ख ॥ १६ ॥ जेणें उणीव ये अंगासी । तेंचि दृढ धरी मानसीं । देहबुद्धि जयापाशीं । तो एक पढतमूर्ख ॥ १७ ॥ सांडूनियां श्रीपती । जो करी नरस्तुती । कां दृष्टि पडल्याची कीर्ति । वर्णी तो एक पढतमूर्ख ॥ १८ ॥ वर्णी स्त्रियांचे अवयव । नाना नाटकें हावभाव । देवास विसरे जो मानव । तो एक पढतमूर्ख ॥ १९ ॥ भरोनि वैभवाचे भरीं । जीवमात्रास तुच्छ करी । पाषांड मत थोवरी । तो एक पढतमूर्ख ॥ २० ॥ व्युत्पन्न आणि वीतरागी । ब्रह्मज्ञानी महायोगी । भविष्य सांगों लागे जगीं । तो एक पढतमूर्ख ॥ २१ ॥ श्रवण होतां अभ्यंतरीं । गुणदोषांची चाळणा करी । परभूषणें मत्सरी । तो एक पढतमूर्ख ॥ २२ ॥ नाहीं भक्तीचें साधन । नाहीं वैराग्य ना भजन । क्रियेविण बोले ब्रह्मज्ञान । तो एक पढतमूर्ख ॥ २३ ॥ न मानी तीर्थ न मानी क्षेत्र । न मानी वेद न मानी शास्त्र । पवित्र कुळीं जो अपवित्र । तो एक पढतमूर्ख ॥ २४ ॥ आदर देखोनि मन धरी । कीर्तीविण स्तुति करी ।

१स्पष्ट. २ मुक्त पुरुषांचें आचरण. ३ प्रतिपादन करितो. ४ खंडन करतो, मोडतो. ५ आपण मोठे ज्ञानी आहोंत अशा अभिमानानें. ६ नांव ठेवणें, निंदा करणें. ७ अपमान. ८ मनाला दुःख होतें. ९ स्तुती करी. १० हट्टाला पेटतो. ११ बोलण्याप्रमाणें कृती घडत नाहीं. १२ दुसऱ्यास. १३ समाधान करणें. १४ कोळसुतानें. १५ कथन, विवेचन. १६ देहाच्या ठिकाणीं अहंता. १७ वैभवानें जो मस्त होतो. १८ वेदशास्त्रविरुद्ध. १९ प्रतिपादन करतो, सिद्ध करतो. २० विद्वान्. २१ वैराग्यशील. २२ अंतःकरणांत.

सर्वांचि निंदी अनादरी । तो एक पढतमूर्ख ॥ २५ ॥ मागें एक पुढें एक । ऐसा जयाचा दंडेक । बोले एक करी एक । तो एक पढतमूर्ख ॥ २६ ॥ प्रपंचविषयीं सादर । परमार्थी जयाचा अनादर । जाणतपणें घे अंधार । तो एक पढतमूर्ख ॥ २७ ॥ यथार्थ सांडूनि वचन । जो रक्षून बोले मन । ज्याचे जिणें पराधीन । तो एक पढतमूर्ख ॥ २८ ॥ सींग संपादी वरिवरी । करूं नये तेंचि करी । मार्ग चुकोन भरे भरीं । तो एक पढतमूर्ख ॥ २९ ॥ रात्रंदिवस करी श्रवण । न सांडी आपुले अवगुण । स्वहित आपुलें नेणे आपण । तो एक पढतमूर्ख ॥ ३० ॥ निरूपणीं भले भले । श्रोते येऊन बैसले । क्षुद्र लक्षूनि बोले । तो एक पढतमूर्ख ॥ ३१ ॥ शिष्य जाहला अनधिकारी । आपुली अवज्ञा करी । पुन्हा त्याची आशा धरी । तो एक पढतमूर्ख ॥ ३२ ॥ होत असतां श्रवण । देहास आलें उणेंपण । क्रोधें करी चिणचिणे । तो एक पढतमूर्ख ॥ ३३ ॥ भरोनि वैभवाचे भरीं । सद्गुरूची उपेक्षा करी । गुरुपरंपरा चोरी[11] । तो एक पढतमूर्ख ॥ ३४ ॥ ज्ञान बोलोनि करी स्वार्थ । कृपणा ऐसा सांची[12] अर्थ[13] । अर्थासाठीं लावी परमार्थ । तो एक पढतमूर्ख ॥ ३५ ॥ वर्तल्याविण शिकवी । ब्रह्मज्ञान लावणी लावी । पराधीन गोसांवी । तो एक पढतमूर्ख ॥ ३६ ॥ भक्तिमार्ग अवघा मोडे । आपणामध्यें थोरपें[16] पडे । ऐसिये कर्मीं देवांड । तो एक पढतमूर्ख ॥ ३७ ॥ प्रपंच गेला हातींचा । लेश नाहीं परमार्थाचा । द्वेषी देवांब्राह्मणांचा । तो एक पढतमूर्ख ॥ ३८ ॥ त्यागावया अवगुण । बोलिलों पढतमूर्खांचें लक्षण । विचक्षणीं न्यूनपूर्ण । क्षमा केली पाहिजे ॥ ३९ ॥ परममूर्खांमाजी मूर्ख । जो या संसारीं मानी सुख । या संसारदुःखा ऐसे दुःख । आणिक नाहीं ॥ ४० ॥ तेंचि पुढें निरूपण । जन्मदुःखांचें लक्षण । गर्भवास हा दारुण । पुढे निरूपिला ॥ ४१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे द्वितीयदशके पढतमूर्खलक्षण निरूपणं नाम दशमः समासः ॥ १० ॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥ ओंवीसंख्या ॥ ४८० ॥ अथ द्वितीयदशकः समाप्तः ॥ शुभं भवतु ॥

दशक तिसरा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ जन्म दुःखाचा अंकुर । जन्म शोकाचा सागर । जन्म भयाचा डोंगर । चळेना ऐसा ॥ १ ॥ जन्म कर्मांची आटणी । जन्म पातकाची खाणी । जन्म काळाची जाचणी । नित्य नवी ॥ २ ॥ जन्म कुविद्येचें फळ । जन्म लोभांचें कमळ । जन्म भ्रांतीचें पेंडळ । ज्ञानहीन ॥ ३ ॥ जन्म जीवासि बंधन ।

---

१ आचरणाचा क्रम, नियम. २ जाणून, मुद्दाम. ३ अज्ञान. ४ योग्य, खरे. ५ लोकांच्या मनास वरें वाटेल असें बोलतो. ६ वाईट गुण. ७ त्यांस कस्पटासारखे मानून, क्षुल्लक गोष्ट ध्यानांत घेऊन. ८ अपमान. ९ चडफडतो. १० हयगय, योग्य मान न देणें ११ लपवून ठेवतो. १२ सांठवितो. १३ धन, द्रव्य. १४ द्रव्य संपादन करण्याकरितां परमार्थ सांगतो. १५ पेरतो, लागवड करतो. १६ भेद, व्यवस्था. १७ पडतो, प्रवृत्त होतो. १८ शहाण्यानीं. १९ आरंभ, मोड. २० मूस. २१ पटल, पडदा.

जन्म मृत्यूसि कारण । जन्म हेंचि अकारण । गाथागोंवी[1] ॥ ४ ॥ जन्म सुखाचा विसर । जन्म चिंतेचा आगर[2] । जन्म वासनाविस्तार । विस्तारला ॥ ५ ॥ जन्म जीवाची अवदसा[3] । जन्म कल्पनेचा ठसा । जन्म लावेचा[4] वळसा[5] । ममतारूप ॥ ६ ॥ जन्म मायेचे मैंदावें[6] । जन्म क्रोधाचें विरावें[7] । जन्म मोक्षास आडवें । विघ्न आहे ॥ ७ ॥ जन्म जीवाचें मीपण[8] । जन्म अहंतेचा गुण । जन्म हेंचि विस्मरण । ईश्वराचें ॥ ८ ॥ जन्म विषयांची आवडी । जन्म दुराशेची बेडी । जन्म काळाची कांकडी[9] । भक्षिताहे ॥ ९ ॥ जन्म हाचि विषम काळ । जन्म हेंचि ओंखटी[10] वेळ । जन्म हें अतिकुश्चेळ[11] । नरकपतन ॥ १० ॥ पाहतां शरीराचें मूळ । याऐसें नाहीं अमंगळ । रजस्वलेचा जो विटाळ[12] । त्यामध्यें जन्म यासी ॥ ११ ॥ अत्यंत दोष ज्या विटाळा । त्या विटाळाचाचि पुतळा । तेथें निर्मळपणाचा सोहळा । केवीं घडे ॥ १२ ॥ रजस्वलेचा जो विटाळ । त्याचा आळोनि[13] झाला गाळ । त्या गाळाचोंचि केवळ । शरीर हें ॥ १३ ॥ वरी वरी दिसे वैभवाचें । अंतरीं पोतडें नरकाचें । जैसें झांकणें चर्मकुंडाचें । उघडितांचि नये ॥ १४ ॥ कुंड धुतां शुद्ध होतें । यास प्रत्यहीं धुईजेतें[14] । तरी दुर्गंधि देहातें[15] । शुद्धता नये ॥ १५ ॥ अस्थिपंजर[16] उभविलों[17] । शिरा नाडी गुंडाळिला । मेदमांसें[18] सरसाविला । सांदी सांदी भरोनी ॥ १६ ॥ अशुद्ध शब्दें शुद्ध नाहीं । तेंही भरलें असे देहीं । नाना व्याधि दुःखें तींही । अभ्यंतरीं वसती ॥ १७ ॥ नरकाचें कोठार भरलें । आंत बाहेरी लिडबिडिलें[19] । मुत्र पोतडें जमलें । दुर्गंधीचें ॥ १८ ॥ जंत किडे आणि आंतडीं । नाना दुर्गंधीचीं पोतडीं । अमूप[20] लवथवती कातडीं । कंटाळवाणीं ॥ १९ ॥ सर्वांगास शिर प्रमाण । तेथें वळसें[21] वाहे घ्राण । उठे घाणीं फुटतां श्रवण । ते दुर्गंधि न घेववे ॥ २० ॥ डोळां निघती चिपडें[22] । नाकीं दाटलीं मेकडें[23] । प्रातःकाळीं घाणी पडे । मुखीं मळासारखी ॥ २१ ॥ लाळ थुंका आणि मळ । पित्त[24] श्लेष्मा प्रबळ । तयास म्हणती मुखकमळ । चंद्रासारिखें ॥ २२ ॥ मुख ऐसें कुश्चिळ दिसे । पोटीं विष्टा भरली असे । प्रत्यक्षास प्रमाण नसे । भूमंडळीं ॥ २३ ॥ पोटीं घालितां दिव्यान्न । कांहीं विष्टा कांहीं वमन[25] । भागीरथीचें घेतां जीवन । त्याची होय लघुशंका ॥ २४ ॥ एवं मळ मूत्र आणि वमन । हेंचि देहाचें जीवन[26] । येणेंचि देह वाढे जाण । यदर्थीं[27] संशय नाहीं ॥ २५ ॥ पोटीं नसतां मळ मूत्र वोक[28] । तरी मरोन जाती सकळ लोक । झाला राव[29] अथवा रंक[30] । पोटीं विष्टा चुकेना ॥ २६ ॥ निर्मळपणें काढूं जातां । तरी देह पडेल तत्त्वतां[31] । एवं देहाची व्यवस्था । ऐसी असे ॥ २७ ॥ ऐसा हा धड असतां । यथाभूत[32] पाहूं जातां । मग ते दुर्दशा सांगतां । शंका

---

१ गुंतागुंत. २ क्षेत्र, ठिकाण. ३ दुर्दशा. ४ डाकिणीचा. ५ फेरा, भोंवरा. ६ मोहपाश घालून लुटारूपणा. ७ शौर्य. तत्वांश. ८ मीपणाचा. ९ वाईट. १० अतिघाणेरडे, वाईट. ११ ऋतुमती स्त्रीचा. १२ आटून. १३ प्रत्येक दिवशीं. १४ धुतलें जातें. १५ हाडांचा सांगाडा. १६ उभा केला. १७ चरबी मांस यांनीं. १८ रक्त. १९ बहुत. २० शेंबुड. २१ उकीर. २२ कफ. २३ ओक. २४ प्राणधारणाचें साधन. २५ या विषयीं. २६ राजा. २७ भिकारी. २८ खरोखर २९ जसा झाला तसा.

बाधी ॥ २८ ॥ ऐसिया कारागृहीं वस्ती । नवमास भोगिल्या बहु विपत्ती । नवहि द्वारें निरोधिती[1] । वायु कैंचा तेथें ॥ २९ ॥ वोका नरकाचे रस झरपंती[2] । ते जठराग्नीस्तव तापती । तेणें सर्वहि उकडती । अस्थिमांस ॥ ३० ॥ त्वचेविण[3] गर्भ खोळे[4] । तंव मातेसि उठती डाहळे । कटु आम्ल तीक्ष्णें सर्वांग पोळे । तया बाळकाचें ॥ ३१ ॥ बांधलें चर्माचें मोटोळें[5] । तेथें विष्टेचें पेटाळें[6] । रस उपाय वंकनाळें[7] । होत असे ॥ ३२ ॥ विष्ठा मूत्र वात पित्त । नाकीं तोंडीं निघतीं जंत । तेथें निर्बुजलें चित्त[8] । अतिशयेंसी ॥ ३३ ॥ ऐसिये कारागृहीं प्राणी । पडिला अत्यंत दाटणीं[9] । कळकळोनि म्हणे चक्रपाणी[10] । सोडवीं येथुनि आतां ॥ ३४ ॥ देवा सोडविसी येथून[11] । तरी मी स्वहित करीन । गर्भवास हा चुकवीन । पुन्हा न ये येथें ॥ ३५ ॥ ऐसी दुखवूनि प्रतिज्ञा केली । तंव जन्मवेळ पुढें आली । माता आक्रंदों लागली[12] । प्रसूतकाळीं ॥ ३६ ॥ नाकीं तोंडीं बैसलें मांस । मस्तकद्वारें सांडी श्वास । तेंही बुजलें निःशेष । जन्मकाळीं ॥ ३७ ॥ मस्तकद्वार तें बुजलें । तेणें चित्त निर्बुजलें । प्राण तळमळूं लागले । चहूंकडे ॥ ३८ ॥ श्वासोच्छ्वास कोंडला[13] । तेणें प्राणी जाजावला[14] । मार्ग दिसेनासा जाहला । होतो कासावीस ॥ ३९ ॥ चित्त बहू निर्बुजले । तेणें आडेभरी[15] भरलें । लोक म्हणती आडवें आलें । खंडोनि काढा ॥ ४० ॥ मग तें खंडोनि काढिती । हस्त पाद छेदूनि घेती । हांतों सांपडलें तेंचि कापिती । मुख नासिका उदर ॥ ४१ ॥ ऐसे टवके[16] तोडले[17] । बाळकें प्राण सोडिले । मातेनेंही सांडिलें । कलेवरें[18] ॥ ४२ ॥ मृत्यु पावला आपण । मातेचा घेतला प्राण । दुःख भोगिलें दारुण । गर्भवासीं ॥ ४३ ॥ तथापि सुकृतेंकरूनी[19] । मार्ग सांपडला योनी[20] । तरी अडकला जाऊनी । कंठीं स्कंधों मागुता ॥ ४४ ॥ तये संकोचित पंथी । बळेंचि ओढूनि काढिती । तेणें गुणें प्राण जाती । बाळकाचे ॥ ४५ ॥ बाळकाचा जातां प्राण । अंतीं होय विस्मरण । तेणें पूर्वील स्मरण । विसरोनि गेला ॥ ४६ ॥ गर्भीं म्हणे सोहं[21] सोहं[22] । बाहेर पडतां म्हणे कोहं[23] कोहं[24] । ऐसा कष्टी जाहला बहु । गर्भवासीं ॥ ४७ ॥ दुःखा वैरपडा[25] होता जाहला । थोर कष्टीं बाहेर आला । सर्वांचि कष्ट विसरला । गर्भवासाचे ॥ ४८ ॥ शून्याकार[26] जाहली वृत्ती । कांहीं आठवेना चित्तीं । अज्ञानें पडली भ्रांती । तेणें सुखचि मानिलें ॥ ४९ ॥ देह विकार पावलें । सुखदुःखें[27] झळंबलें[28] । असो ऐसें गुंडाळलें[29] । मायाजोळीं[30] ॥ ५० ॥ ऐसें दुःख गर्भवासीं । होतें प्राणिमात्रासी । म्हणोनियां भगवंतासी । शरण जावें ॥ ५१ ॥ जो भगवंताचा भक्त । तो जन्मापासूनि मुक्त[31] । ज्ञानबळें विरक्त । सर्वकाळ ॥ ५२ ॥ ऐशा गर्भवासीं विपत्ती । निरूपिल्या यथामती । सावध होऊनियां श्रोतीं । पुढें

---

१ कोंडतात. २ पाझरतात. ३ शरीरावरील चमांशिवाय. ४ गर्भवेष्टन, पोट हालचाल करितो. ५ गांठोडी, मोटली. ६ पोटाशीं धरणें. ७ ज्या वाटेनें मातेनें खालेला अन्नरस गर्भास पोचतो तें नाळ. ८ घाबरलें. ९ दहपणीमध्यें १० हे विष्णो. ११ त्रासला. १२ आडबाजूला. १३ तुकडे. १४ शरीर. १५ पुण्याच्यायोगानें. १६ स्त्रीचें जननेंद्रिय. १७ तो मी तो मी. १८ कोण मी, कोण मी. १९ पात्र झाला. २० शून्यरूप (कांहीं नाहीं अशी.). २१ व्यापलें, पोखून गेलें. २२ मायेच्या मिथ्या पसाऱ्यामध्यें, मोहामध्यें. २३ प्रपंचादिकांच्या बंधनापासून मोकळा.

अवधान द्यावें ॥ ५३ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्य-संवादे तृतीयदशके जन्मदुःखनिरूपणं नाम प्रथमः समासः ॥ १ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ संसार हाचि दुःखमूळ । लागती दुःखाचे इंगळ । मागां बोलिली तळमळ । गर्भवासाची ॥ १ ॥ गर्भवासीं दुःख झालें । तें बाळक विसरलें । पुढें वाढों लागलें । दिवसेंदिवस ॥ २ ॥ बाळपणीं त्वचा कोंवळी । दुःख होतांचि तळमळी । वाचा नाहीं तये काळीं । दुःख सांगावया ॥ ३ ॥ देहास कांहीं दुःख झालें । अथवा क्षुधेनें पीडिलें । तरी तें परम आक्रंदलें । परी अंतर नेणेंचि ॥ ४ ॥ माता कुरवाळी वरिवरी । परी जे पीडा जाहली अंतरीं । ते मायेसि न कळे अभ्यंतरीं । दुःख होय बाळकासी ॥ ५ ॥ मागुतें मागुतें स्फुंदे रडे । माता बुजावी घेऊनि कडे । व्यथा नेणती बापुडे । तळमळी जीवीं ॥ ६ ॥ नाना व्याधींचे उमाळे । तेणें दुःखें आंदोळे । रडे पडे कां पोळे । अग्निलोगें ॥ ७ ॥ शरीर रक्षितां नये । घडती नाना अपाय । खोडी अधांतरीं होय । अवयवहीन बाळक ॥ ८ ॥ अथवा अपाय चुकले । पूर्वपुण्य पुढें ठाकलें । मातेसि वोळखूं लागलें । दिवसेंदिवस ॥ ९ ॥ क्षणभरी मातेसि न देखे । तरी आक्रंदोनि रुदन करी दुःखें । ते समयीं मातेसारिखें । आणिक कांहीच नाहीं ॥ १० ॥ आस करूनि वाट पाहे । मातेविण कदा न राहे । वियोग पळमात्र न साहे । स्मरण झालियानंतर ॥ ११ ॥ जरी ब्रह्मादिक देव आले । लक्ष्मीनें अवलोकिलें । तरी ने वेंचे बुजाविलें । आपुले मातेवांचुनी ॥ १२ ॥ कुरूप अथवा कुलक्षणी । सकळांहूनि करंटेपणीं । तरी नाहीं ती समान । भूमंडळीं कोणही ॥ १३ ॥ ऐसें तें केविलेवाणें । मातेविण दिसे उणें । रागें परतें केलें तिणें । तरी आक्रंदोनि मिठी घाली ॥ १४ ॥ सुख पावे मातेजवळी । दूरी करितांचि तळमळी । अति प्रीति तये काळीं । मातेवरी लागली ॥ १५ ॥ तंव ते मातेसि मरण आलें । प्राणी पोरटें जाहलें । दुःखें झुरणीं लागलें । आई आई म्हणोनी ॥ १६ ॥ आई पाहतां दिसेना । दीनरूप पाहे जना । आस लागलीसे मना । आई येईल म्हणोनी ॥ १७ ॥ माता म्हणोनि मुख पाहे । तंव ती आपुली माता नोहे । मग हिंवसलेंसें राहे । दैन्यवाणें ॥ १८ ॥ मातावियोगें कष्टलें । तेणें मानसीं दुःख झालें । देहहि क्षीणत्व पावलें । अतिशयेंसी ॥ १९ ॥ अथवा माताहि वांचली । मायलेकरां भेटी झाली । बाळदशा ते राहिली । दिवसेंदिवस ॥ २० ॥ बाळपण जाहलें उणें । दिवसेंदिवस होय शाहणें । मग तें मायेचें अत्यंत पेखणें । होतें तें राहिलें ॥ २१ ॥ पुढें लोभ लागला खेळाचा । कळप मेळवी पोरांचा । आल्या गेल्या डायाचा । आनंद शोक वाहे ॥ २२ ॥ मायबापें शिकविती पोटें । तयाचें दुःख परम वाटे । चेटें ला-

---

१ निखारे. २ कातडी. ३ भुकेनें. ४ ओरडल. ५ समजत नाहीं. ६ समजूत करी. ७ लोट, बाहेर पडणें. ८ कांपतो. ९ नाश, धोके. १० मध्यंतरीं, मध्येंच. ११ संकट. १२ पूर्वपुण्य पुढें उभें राहिलें व त्यायोगानें. १३ आशा, इच्छा. १४ मार्गप्रतीक्षा. १५ समजूत पाडली जात नाहीं. १६ वाईटलक्षणी. १७ दैवहीनपणा. १८ दीन. १९ दूर केलें. २० हिरमुसलें तोंड करून. २१ आईविषयीं. २२ वाट पाहणें; अत्यंत प्रेमा, आवड. २३ समुदाय. २४ खेळाचा, डावाचा. २५ अगत्यपूर्वक काळजीपूर्वक. २६ संक्य.

गली न सुटे । संगति लेंकुरांची ॥ २३ ॥ लेंकुरांमध्यें खेळतां । नाठवे माता आणि पिता । तंव तेथेंहे अवचिता । दुःख पावलां ॥ २४ ॥ पडिले दांत फुटला डोळा । मोडला पाय झाला खुळा । गेला माजे अवकळा । ठाकोनि आली ॥ २५ ॥ निघाल्या देवी । आणि गोंवर । उठलें कपाळ लागला ज्वर । पोटशूळ निरंतर । वायगोळा ॥ २६ ॥ लागलों भुतें जाहली झपणी । जळोंच्या मेसको मायराणी । मुंज्या झोटिंग करणी । म्हसोबांची ॥ २७ ॥ वेताळ खंकाळ लागला । ब्रह्मग्रह संचारला । नेणों चेडा वोलांडिला । कांहीं कळेना ॥ २८ ॥ एक म्हणती वीरदेव । एक म्हणती खडेराव । एक म्हणती सर्व वावे । हा ब्रह्मसंमंध ॥ २९ ॥ एक म्हणती कोणी केलें । अंगां दैवत घातलें । एक म्हणती चुकले । सटवाईचें ॥ ३० ॥ एक म्हणती कर्मभोग । अंगां जडले नाना रोग । वैद्य पंचाक्षरी चांग । बोलाऊनि आणिले ॥ ३१ ॥ एक म्हणती हा वांचेना । एक म्हणती हा मरेना । भोग भोगितो यातना । पापास्तव ॥ ३२ ॥ गर्भदुःख विसरला । तो त्रिविधतापें पोळला । प्राणी बहुत कष्टी जाहला । संसारदुःखें ॥ ३३ ॥ इतकेंहि चुकोनि वांचला । तरी मार मारोनि शाहणा केला । लौकिकीं नेटका झाला । नांव राखे ऐसा ॥ ३४ ॥ पुढें मायबापें लोभास्तव । संभ्रमें मांडिला विवाह । दाऊनियां सकळ वैभव । नोवरी पाहिली ॥ ३५ ॥ वऱ्हाडीं वैभव दाटलें । देखोनि परम सुख वाटलें । मन हें रंगोनि गेलें । सासुरवाडीकडे ॥ ३६ ॥ मायबापें भलतैसें असावें । परी सासुरवाडीकडे नेटकें जावें । द्रव्य असेल तरी द्यावें । ऋण केलांतरें ॥ ३७ ॥ अंतरभाव ते सासुरवाडी । मायबापें राहिलीं बापुडीं । होताति सर्वस्वें कुडकुडीं । तितुकींचि कार्य त्यांचें ॥ ३८ ॥ नोवरी आलिया घरा । अति हव्यास वाटे वरा । म्हणे मजसारिखा दुसरा । कोणीच नाहीं । ॥ ३९ ॥ माय बाप बंधु बहिणी । नोवरी न देखतां वाटती कोणी । अत्यंत लोधला पापी प्राणी । अविद्येनें भुलविला ॥ ४० ॥ संभोग नसतां इतुका प्रेमा । योग्य झालिया उलंघी सीमा । प्रीति वाढविती कामा । करितां प्राणी गुंतला ॥ ४१ ॥ जरी न देखे क्षण एक डोळां । तरी जीव होय उतावळा । प्रीतिपात्र अंतरकळा । घेऊनि गेली ॥ ४२ ॥ कोंवळे कोंवळे शब्द मंजुळ । मर्यादा लज्जा मुखकमळ । वक्त्रावलोकनें केवळ । मन ज्याचें मैंदावे ॥ ४३ ॥ कळवळा येतां सांव-

---

१ अकस्मात. २ मस्ती. ३ तेजोहीन स्थिति. ४ भूतबाधा. ५ जलदेवता. ६ देवताविशेष. ७ क्रूर, उग्र. ८ ब्रह्मसंमंध. ९ चेटूक. १० मंत्रसाध्य देवता. ११ व्यर्थ. १२ षष्ठी म्हणून जी देवी तिचें. १३ चांगले उत्तम. १४ आधिदैविक, आधिभौतिक आणि आध्यात्मिक दुःखांनीं; आधिदैविक=देवसंबंधीं उ०–यक्ष, किन्नर, भुतें, देवता इत्यादिकांपासून जी पीडा ती; आधिभौतिक=पृथिव्यादिकांपासून होणारी उ०– धरणिकंप, अतिवृष्टि वगैरे, आध्यात्मिक=मानसिक उ०–काळजी, ताप वगैरे. १५ कीर्तिविषयीं, व्यवहारामध्यें. १६ समारंभानें, उत्सुकतेनें. १७ वाटेल तसें. १८ व्याज देण्याच्या बोलीनें. १९ मनाचा प्रेमा. २० दुःखी, कष्टी. २१ छंद, इच्छा. २२ नवऱ्याला. २३ क्लेश देणारी. २४ चिकटला, झोंबला. २५ अज्ञानानें. २६ मनोवृत्ति. २७ मुख पाहूनच. २८ गुंगतें.

रेना । शरीरविकेल आवरेना । अन्यत्र व्यवसायीं क्रमेना । हुरहुर वाटे ॥ ४४ ॥ व्यवसाय करितां वाहेरी । मन लागलेंसे घरीं । क्षणक्षणा अभ्यंतरीं । स्मरण होय कामिनीचें ॥ ४५ ॥ ' तुम्हीं माझेया जिवांतील जीव ' । म्हणोनि अत्यंत लाघव । दाऊनियां चित्त सर्व । हिरुनि घेतलें ॥ ४६ ॥ मैंदे सोयरिक काढिती । फांसे घालोनि प्राण घेती । तैसें आयुष्य गोलेया अंतीं । प्राणियास होय ॥ ४७ ॥ प्रीति कामिनीसि लागली । जरी तियेसि कोणी रागेजली । तरी परम क्षिति वाटली । मानसा गुप्तरूपें ॥ ४८ ॥ तये भायेचेनि कैवारें । मायबापांसी नीच उत्तरें । बोलोनियां तिरस्कारें । वेगळा निघे ॥ ४९ ॥ स्त्रीकारणें लाज सांडिली । स्त्रीकारणें सखे सोडिलीं । स्त्रीकारणें बिघडेलों । सकळहि जिवलगें ॥ ५० ॥ स्त्रीकारणें देह विकिला । स्त्रीकारणें सेवक जाहला । स्त्रीकारणें सांडविला । विवेकासी ॥ ५१ ॥ स्त्रीकारणें लोलंगता । स्त्रीकारणें अतिनम्रता । स्त्रीकारणें पराधीनता । अंगीकारिली ॥ ५२ ॥ स्त्रीकारणें लोभी जाहला । स्त्रीकारणें धर्म सांडिला । स्त्रीकारणें अंतरला । तीर्थयात्रा स्वधर्म ॥ ५३ ॥ स्त्रीकारणें सर्वथा कांहीं । शुभाशुभ विचारिलें नाहीं । तेनें मन धन सर्वही । अनन्यभावें अर्पिलें ॥ ५४ ॥ स्त्रीकारणें परमार्थ बुडविला । प्राणी स्वहितासि नागवला । ईश्वरीं कोनकोंडा जाहला । स्त्रीकारणें कामबुद्धी ॥ ५५ ॥ स्त्रीकारणें सोडिली भक्ती । स्त्रीकारणें सोडिली विरक्ती । स्त्रीकारणें सायुज्यमुक्ती । तेही तुच्छ मानिली ॥ ५६ ॥ एके स्त्रियेचेनि गुणें । ब्रह्मांड मानिलें उणें । जिवलगें तीं पिसुणें । ऐसीं वाटलीं ॥ ५७ ॥ ऐसी अंतरीं प्रीति जडली । सर्वस्वाची सांडी केली । तंव ते मरोनि गेली । अकस्मात भोंयां ॥ ५८ ॥ तेणें मनीं शोक वाटला । म्हणे थोर घात झाला । आतां कैंचा बुडाला । संसार माझा ॥ ५९ ॥ जिवलगांचा सोडिला संग । अवचिता झाला घरभंग । आतां करूं देहत्याग । म्हणे दुःखें ॥ ६० ॥ स्त्री घेऊनि आडवी । ऊर बडवी पोट बडवी । लाज सांडोनि गौरवी । लोकांदेखता ॥ ६१ ॥ म्हणे माझें बुडालें घर । आतां न करी हा संसार । दुःखें आक्रंदे थोर । घोर घोषें ॥ ६२ ॥ तेणें जीव वारयावेंधला । संसाराचा उबग आला । तेणें दुःखें झाला । जोगी कां महात्मा ॥ ६३ ॥ कां तें निघोन जाणें चुकलें । पुनः मागुतें लग्न केलें । तेणें अत्यंतचि मग्न झालें । मन द्वितीय संबंधीं ॥ ६४ ॥ जाहला द्वितीय संबंध । सवेंचि मांडिला आनंद । श्रोतीं व्हावें सावध । पुढिलिये समासीं ॥ ६५ ॥ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे तृतीयदशके प्रथमसंबंधनिरूपणं नाम द्वितीयः समासः ॥ २ ॥

---

१ गळलेलें, अव्यवस्थित. २ उद्योगांत. ३ स्त्रीचें. ४ गोड गोड बोलणें, आर्जव इत्यादि युक्त्या. ५ घातकी. ६ नातें, संबंध. ७ लावतात. ८ तिच्यावर जर कोणी रागावलें. ९ कष्ट, दुःख. १० अगदीं जवळचे नातलग जसें सख्खा भाऊ, बहीण वगैरे. ११ वांकडी झाली, अंतरलीं. १२ आसक्तपणा. १३ परस्वाधीनपणा. १४ पुण्य पाप. १५ शरीर. १६ एकनिष्ठेनें. १७ संकुचित, विन्मुख. १८ ईश्वरीं मिळणें. १९ दुष्ट, शत्रूसमान. २० स्त्री. २१ घराचा नाश. २२ रडे. २३ वाऱ्याप्रमाणें सर्वत्र हिंडूं लागला. २४ कंटाळा, वीट.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ द्वितीय संबंध जाहला । दुःख मागील विसरला । सुख मानोनि राहिला । संसाराचें ॥ १ ॥ झाला अत्यंत कृपण । पोटा न खाय अन्न । रुक्या-कारणें सोडी प्राण । एकसरा ॥ २ ॥ कदा कल्पांतीं न वेंची । सांचिलेंचि पुनः साची । अंतरीं असेल कैंची । सद्वासना ॥ ३ ॥ स्वयें धर्म न करी । धर्मकर्त्यासही वारी । सर्व-काळ निंदा करी । साधुजनाची ॥ ४ ॥ नेणे तीर्थ नेणे व्रत । नेणे अतीत अभ्यागत । मुंगीमुखींचें जें शित । तेंही वेंचून सांची ॥ ५ ॥ स्वयें पुण्य करवेना । केलें तरी देख-वेना । उपहास करी मना-। न ये म्हणोनी ॥ ६ ॥ देवां भक्तांस उच्छेदी । अंगबळें सक-लांसि खेदी । निष्ठुर शब्दें अंतरें भेदी । प्राणिमात्रांचें ॥ ७ ॥ नीति सांडोनि मागें । अनीतीनें वर्तों लागे । गर्व धरून फुगे । सर्वकाळ ॥ ८ ॥ पूर्वजांसि सिंतरिलें । पक्ष श्राद्ध नाहीं केलें । कुळदैवत ठकिलें । कोणे परी ॥ ९ ॥ अक्षत भरली भोंगा । दुजा ब्राह्मण मेहुणा । आला होता पाहुणा । स्त्रियेसि मूळें ॥ १० ॥ कदा नावडे हरिकथा । देव नलगे सर्वथा । स्नान संध्या म्हणे वृथा । कासया करावी ॥ ११ ॥ अभिलाषें सांची वित्त । स्वयें करी विश्वासघात । मदें मातला उन्मत्त । तारुण्यपणें ॥ १२ ॥ तारुण्य अंगीं भरभरलें । धारिष्ट न वचे धरिलें । करूं नये तेंचि केलें । महापाप ॥ १३ ॥ स्त्री केली परी धाकुटी । धीर न धरवे पोटीं । विषयलोभें शेवटीं । वोळखी सांडिली ॥ १४ ॥ माय बहिणी न विचारी । जाहला प्राणी पैरद्वारीं । दंड पावला राजद्वारीं । तरी पाल-टेना ॥ १५ ॥ परस्त्री देखोन दृष्टीं । अभिलाष उपजे पोटीं । अकर्तव्यें हिंपुटी । पुनः होय ॥ ॥ १६ ॥ ऐसें पाप उदंड केलें । शुभाशुभ नाहीं उरलें । तेणें दोषें दुःख भरलें । अकस्मात अंगीं ॥ १७ ॥ व्याधी भरली सर्वांगीं । प्राणी जाहला क्षयरोगी । केले दोष आपुले भोगी । शीघ्रकाळें ॥ १८ ॥ दुःखें सर्वांग फुटलें । नासिक आघवेंचि बैसलें । लक्षण जाऊनि झालें । कुलक्षण ॥ १९ ॥ देहास क्षीणता आली । नाना व्यथा उद्भ-वली । तारुण्यशक्ति राहिली । खंगलेला प्राणी ॥ २० ॥ सर्वांगीं लागल्या कळा । देहास आली अवकळा । प्राणी कांपें चळचळां । शक्ति नाहीं ॥ २१ ॥ हस्तपादादिक झडले । सर्वांगीं किडे पडले । देखोनि थुंकों लागले । लहान थोर ॥ २२ ॥ जाहली विष्टेची सारणी । भोंवती उठली वर्ढाणी । अत्यंत खंगला प्राणी । जीव न वचे ॥ २३ ॥ आतां मरण देगा देवा । बहु कष्ट झाले जीवा । जाहला नाहीं नेणों ठेवा । पात-कांचा ॥ २४ ॥ दुःखें घळघळां रडे । जों जों पाहे अंगाकडे । तों तों दैन्यवाणें बा-पुडें । तळमळी जीवीं ॥ २५ ॥ ऐसे कष्ट झाले बहुत । सळक झाले वाताहात ।

---

१ चिक्कु, कद्रू. २ दमडीसाठीं. ३ एकदम. ४ खर्च करी. ५ बंद करी. ६ निवडून. ७ संग्रह करितो. ८ मनाला येत नाहीं, आवडत नाहीं म्हणून. ९ नाश करतो. १० अंगमस्तीनें. ११ चित्त, मन. १२ फसविलें. १३ आमंत्रण, शेस. १४ बहिणीला. १५ माहेरीं नेण्याकरितां आलेला मनुष्य. १६ जात नाहीं. १७ विषयवासनेनें. १८ परस्त्रीगमन करणारा. १९ दुःखी, कष्टी. २० पुष्कळ. २१ पुण्य पाप. २२ उपदंश गरमी वगैरे रोग. २३ सर्व. २४ खचला, कृश झाला. २५ विरूपता, निस्तेजता. २६ अतिसार. २७ दुर्गंधी, घाण. २८ अजून पापसंचय संपला नाहीं. २९ सांठा. ३० उध्वस्त.

दरवडा घालूनि वित्त । चोरटीं नेलें ॥ २६ ॥ जाहलें अत्र नां परत्र । प्रारब्ध ठाकलें विचित्र । आपुलें आपण मळमूत्र । सोवितें दुःखें ॥ २७ ॥ पापसामुग्री सरली । दिवसेंदिवस व्यथा हरली । वैद्यें औंषधें दिधलीं । उपचार झाला ॥ २८ ॥ मरत मरत वांचला । यास पुनः जन्म झाला । लोक म्हणती पडिला । माणसांमध्यें ॥ २९ ॥ येरें स्त्री आणिली । पुन्हा घरवांत मांडिली । अति स्वार्थबुद्धि धरिली । पुन्हा मागुती ॥ ३० ॥ कांहीं वैभव मेळविलें । पुन्हा सर्वहि संचिलें । परंतु गृह बुडाल । संतान नाहीं ॥ ३१ ॥ पुत्रसंतान नसतां दुःखी । वांझ नांव पडलें लोकां । तें न फिटे म्हणोनि लेंकीं । तरी हो होतां ॥ ३२ ॥ म्हणोनि नाना सयास । बहुत देवास केले नवस । तीर्थें व्रतें उपवास । धरणेंपारणें मांडिलें ॥ ३३ ॥ विषयसुख तें राहिलें । वांझपणें दुःखी केलें । तंव तें कुळदैवत पावलें । झाली वृद्धी ॥ ३४ ॥ त्या लेंकरावरी अतिप्रीति । दोघेंहि क्षण एक न विसंबती । कांहीं झाल्या आक्रंदती । दीर्घस्वरें ॥ ३५ ॥ ऐसीं तीं परम दुःखित । पूजित होतीं नाना दैवत । तंव तेंहि मेलें अवचित । पूर्वपापें करूनी ॥ ३६ ॥ तेणें बहुत दुःखी झाले । घरीं अंधारें पडिलें । म्हणती आम्हांस कां ठेविलें । देवें वांझ करूनी ॥ ३७ ॥ आम्हां द्रव्य काय करावें । तें जावें परी अपत्य व्हावें । अपत्यालागीं त्यजावें । लागे सर्व ॥ ३८ ॥ वांझपण संदिसें गेलें । तीं मरतवांझ नांव पडलें । तें न फिटे कांहीं केलें ॥ तेणें दुःखें आक्रंदती ॥ ३९ ॥ आमुची वेली कां खुंटली । हाहा देवा वृत्ति बुडाली । कुळस्वामिनी कां क्षोभली । विझाला कुळदीप ॥ ४० ॥ आतां लेंकराचें मुख देखेन । तरी आनंदें रांडा चालेन । आणि गळही टोंचीन । कुळस्वामिनीपाशीं ॥ ४१ ॥ आई भुत्या करीन तुझा । नांव ठेवीन केरपुंजा । वेसनां घालीन माझा । मनोरथ पुरवी ॥ ४२ ॥ बहुत देवांस नवस केले । बहुत गोसांवी धुंडिलें । गटगटां गिळिलें । सगळे विंचू ॥ ४३ ॥ केले समंधाचे सायास । राहेणें घातलें बहुवस । केलें नारिकेळें ब्राह्मणांस । आम्रदानें दीधलीं ॥ ४४॥ केलां नाना कोटाळे । पुत्रलोभें केलां ढाळे । तरी अदृष्ट फिरलें । पुत्र नाहीं ॥ ४५ ॥ वृक्षाखालें जाऊनि नाहाती । फळतीं झाडें करपती । ऐसे नाना दोष करिती । पुत्रलोभाकारणें ॥ ४६ ॥ सांडोनि सकळ वैभव । त्यांचा वारया वेधला जीव । तंव तो पावला खंडेराव । आणि कुळस्वामिनी ॥ ४७ ॥ आतां मनोरथ पुरती । स्त्रीपुरुषें आनंदती । सावध होऊनि श्रोतीं ।

---

१ इहलोक. २ अथवा. ३ परलोक. ४ येऊन ठेपलें. ५ उपाय. ६ यानें. ७ गृहप्रपंच. ८ सांठविलें. ९ मूल, अपत्य. १० एक दिवस भोजन, एक दिवस निराहार, अशा रीतीनें कांही नियामित कालपर्यंत केलेलें व्रत. ११ मूल झालें, वंश वाढला. १२ सोडीत नाहींत. १३ अकस्मात. १४ संतान, मूल. १५ नुकतेंच. १६ वंशवेल. १७ वतन. १८ धधगीत निखाऱ्यांच्या भूमीवरून. १९ भवानीस सेवेसाठीं वाहिलेला मनुष्य. २० केराचा ढीग. २१ देवाचा नवस म्हणून लहान मुलांच्या नाकांत नथ घालतात ती. २२ भूतबाधेवर उपाय. २३ देव अंगांत आणून बोलावितें. २४ बहुत. २५ देवसवया जादू वगैरे, २६ क्षुद्र साधनें व्रतें. २७ प्रारब्ध कर्म. २८ मनानें भ्रमूं लागला.

पुढें अवधान द्यावें ॥ ४८ ॥ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे तृतीयदशके द्वितीयसंबंधनिरूपणं नाम तृतीयः समासः ॥ ३ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ लेंकुरें उदंडे झालीं । तंव ते लक्ष्मी निघोन गेली । बापुडीं भिकेस लागलीं । कांहीं खावयासी मिळेना ॥ १ ॥ लेंकुरें खेळतों धाकुटीं । एकें रांगती एकें पोटीं । ऐसी घरभरी झाली दाटी । कन्या आणि पुत्रांची ॥ २ ॥ दिवसेंदिवस खर्च वाढला । यावा होता तो खुंटोनि गेला । कन्या उपवर झाल्या त्यांला । उजवावेया द्रव्य नाहीं ॥ ३ ॥ मायबापें होतीं संपन्न । त्यांचें उदंड होतें धन । तेणेंकरितां प्रतिष्ठा मान । जनीं झाला होता ॥ ४ ॥ भ्रम आहे लोकांचेयीं । पहिली नांदणूक नाहीं घरीं । दिवसेंदिवस अभ्यंतरीं । दरिद्र आलें ॥ ५ ॥ ऐसी घरवांत वाढली । खातां तोंडें मिळालीं । तेणें प्राणियासि लागली । काळजी उद्वेगाची ॥ ६ ॥ कन्या उपवर झाल्या । पुत्रास नोवऱ्या आल्या । आतां उजवण्या केल्या । पाहिजेत कीं ॥ ७ ॥ जरी मुलें तैसींच राहिलीं । तरी पुन्हां लोकलाज लागली । म्हणती कासया व्यालीं । जन्मेदरिद्रें ॥ ८ ॥ ऐसी लोकलाज होईल । वडिलांचें नांव जाईल । आंतां ऋण कोण देईल । लग्नापुरतें ॥ ९ ॥ मागें ऋण ज्याचें घेतलें । त्याचें परतोन नाहीं दिधलें । ऐसें आभाळ कोसळलें । उद्वेगाचें ॥ १० ॥ आपण खातों अन्नासी । अन्न खातें आपणासी । सर्वकाळ मानसा । चिंतातुर ॥ ११ ॥ पेंत अवघीच मोडली । वस्तुभाव गाहाण पंडली । आहा देवा वेळ आली । आतां दिवाळ्याची ॥ १२ ॥ कांहीं केला तोडामोडा । विकिला घरचा रेडापाडा । कांहीं पैका रोकडा । कोळांतरें काढिला ॥ १३ ॥ ऐसें ऋण घेतलें । लौकिकीं दंभ केलें । सकळ म्हणती नांव राखिलें । वडिलाचें ॥ १४ ॥ ऐसें ऋण उदंड झालें । ऋणाइतीं वेढूनि घेतलें । मग प्रयाणें आरंभिलें । विदेशाप्रती ॥ १५ ॥ दोन वर्षें बुडी मारिली । नीचसेवा अंगिकारिली । शरीरीं आपदा भोगिली । अतिशयेंसी ॥ १६ ॥ कांहीं मेळविलें विदेशीं । जीव लागला मनुष्यांपाशीं । मग पुसोनियां स्वामीसी । मुरडता झाला ॥ १७ ॥ तंव तीं अत्यंत पीडा पावलीं । वाट पाहात बैसली । म्हणती दिवसगंती कां लागली । काय करणें देवा ॥ १८ ॥ आतां आम्हीं काय खावें । किती उपवासी मरावें । ऐसीयांचे संगतीस देवें । कां पां घातलें आम्हांसी ॥ १९ ॥ ऐसें आपुलें सुख पाहती । परी त्याचें दुःख नेणती । आणि शक्ति गोलिया अंतीं । कोणीच कामा न येती ॥ २० ॥ असो ऐसी वाट पाहतां । दृष्टीं देखिला अवचितां । मुलें धांवती तातो ताता । भागलांसी म्हणोनी ॥ २१ ॥ स्त्री देखोनि आनंदली । म्हणे आमुचीं दैन्यें

---

१ बहुत. २ उत्पन्न, मिळकत. ३ लग्न करण्यास. ४ सर्वत्र लोकसमूहांत, चारचौघांत. ५ वैभव. ६ प्रपंच. ७ खाणारीं. ८ दुःखाची. ९ लग्नें. १० मुलें झालीं. ११ जन्मापासून दरिद्री. १२ कर्ज. १३ आब्रू, सचोटी. १४ घरांतील सामानसुमान. १५ कांहीं वस्तु विकून पैसा केला. १६ व्याजानें. १७ आव आणला. १८ कर्जदारांकडून. १९ निघून जाणें. २० परदेशाला. २१ लपून छपून बाहेर काढलीं. २२ नीच मनुष्यांची नोकरी. २३ क्लेश. २४ परदेशांत कांहीं द्रव्य मिळविल्यावर. २५ धन्याला. २६ परतला. २७ बहुत दिवस. २८ काय म्हणून. २९ बाबा, बाबा. ३० शिणलास, दमलास.

फिटलीं । तंव येरें दीधली । गांठोडी हातीं ॥ २२ ॥ सकळांस आनंद झाला । म्हणती आमुचा वडील आला । तेणें तरी आम्हांला । अंगड्या टोप्या आणिल्या ॥ २३ ॥ ऐसा आनंद चारी दिवस । संवेंचि[1] मांडिली कुसमुस[2] । म्हणती हे गोलिया आम्हांस । पुनः आपदा लागती ॥ २४ ॥ म्हणोनि आणिलें तें असावें । याणें मागुती विदेशा जावें । आम्हीं हें खाऊं न तों यावें । द्रव्य मेळवूनी ॥ २५ ॥ ऐसी वासना सकळांची । अवघीं सोयरीं सुखाचीं । स्त्री अत्यंत प्रीतीची । तेहि सुखाच लागली ॥ २६ ॥ विदेशीं बहुत दगदगला । विश्रांती घ्यावया घरीं आला । श्वासहि नाहीं टाकिला । तों जाणें वोढवलें[3] ॥ २७ ॥ पुढें अपेक्षा[4] जोशीयाची । केली विवंचेना[5] मुहूर्ताची । वृत्ति गुंतली तयाची । जातां प्रशस्त न वाटे ॥ २८ ॥ मायामंत्रा[6] सिद्ध केली । कांहीं सामुग्री बांधिली । लेंकरें दृष्टीं पाहिलीं । मार्गस्थ झाला ॥ २९ ॥ स्त्रियेसि अवलोकिलें । वियोगें परम दुःख वाटलें । प्रारब्धसूत्र तुटलें । ऋणानुबंधाचें[7] ॥ ३० ॥ कंठ सद्गदित जाहला । न सांवरेचि गहिंवर आला । लेंकुरें आणि पित्याला । ताडातोडी जाहली ॥ ३१ ॥ जरी ऋणानुबंध असेल । तरी मागुता भेटी होईल । नाहीं तरी संगति पुरेली[8] । येच भेटीनें तुमची ॥ ३२ ॥ ऐसें बोलोनि स्वार होये । मागुती फिरफिरोनि पाहे । वियोगदुःख न साहे । परंतु कांहीं न चले ॥ ३३ ॥ आपुला गांव राहिला मागें । चित्त भ्रमलें संसारउद्वेगें[9] । दुखावला प्रपंचसगें[10] । अभिमानास्तव ॥ ३४ ॥ ते समयीं माता आठवली । म्हणे धन्य धन्य ते माउली । मजकारणें बहुत कष्टली । परी मी नेणेचि मूर्ख ॥३५॥ आजि जरी ते असती । तरी मला कदा न विसंबती[11] । वियोग होतां आक्रंदती । ते पोटआगी[12] वेगळीच ॥ ३६ ॥ पुत्र वैभवहीन भिकारी । माता तैसाचि अंगिकारी । दगदगला देखोनि अंतरीं । त्याच्या दुःखें दुखावे ॥ ३७ ॥ प्रपंच विचारें पाहतां । हें सकळ जोडे, न जोडे माता । हें शरीर जियेकरितां[13] । निर्माण जाहलें ॥ ३८ ॥ लोंच[14] तरी ते माया । काय कराव्या सहस्र जाया[15] । परी भुलोनि गेलों वायां । मकरध्वजाचेनी[16] ॥ ३९ ॥ या एका कामाकारणें । जिवलगासी द्वंद्वें[17] घेणें । सखीं तींच पिशुनें[18] । ऐशीं वाटती ॥ ४० ॥ म्हणोनि धन्य धन्य ते प्रपंची जन । जे मायबापांचें भजन[19] । करिती न करिती मन । निष्ठुर जिवलगासी ॥ ४१ ॥ संगती[20] स्त्रियाबाळकांची । आहे साठी जन्मांची । परी मायबापें कैंचीं । मिळतील पुढें ॥ ४२ ॥ ऐसें पूर्वीं होतें ऐकिलें । परी तें समयीं नाहीं कळलें । मन हें बुडोन गेलें । रतिसुखाचिया[21] डोहीं ॥ ४३ ॥ हीं सखीं वाटतीं परी पिसुणें । मिळालीं वैभवाकारणें । रितें[22] जातां लाजिरवाणें । अत्यंत वाटे ॥ ४४ ॥ आतां भलतैसें करावें । परी द्रव्य मिळवुन न्यावें । रितें जातां स्वभावें ।

---

१ लागलीच, तत्क्षणीं. २ कुरकुर. ३ येऊन ठेपले. ४ इच्छा. ५ विचार. ६ सर्व लक्ष, चित्त. ७ सामानसुमान. ८ परस्पर मित्रभावाचें. ९ पुन्हां. १० संपेल. ११ संसाराच्या दुःखानें. १२ टाकिती. १३ पोटांतील आग, कळवळा, प्रेम. १४ प्रपंचांतील सर्व वस्तु मिळतील पण आई मिळणारनाहीं. १५ जिच्यापासून. १६ डाकीण, जखीण. १७ स्त्रिया. १८ कामविकारानें, मदनाकडून. १९ भांडण. २० शत्रू, वैरी. २१ जे मायबापांचें भजन करिती व जिवलगांसी मन निष्ठुर न करिती. २२ संगत. २३ विषयसुखाच्या. २४ रिकाम्या हातांनीं. २५ काय वाटेल तें करावें, पापपुण्य वरवाइट वगैरे कांहीं एक विचार करूं नये पण पैसा मिळवावा.

दुःख आहे ॥ ४५ ॥ ऐसी विवंचना करी । दुःख वाटलें अंतरीं । चिंतेचिये महापूरीं । बुडोनि गेला ॥ ४६ ॥ ऐसा हा देह आपुला । असतांचि पराधीन केला । ईश्वरीं कानेकोंडा झाला । कुटुंबकाबाडी ॥ ४७ ॥ या एका कामासाठीं । जन्म गेला आटाआटी । वय वेंचेल्या शेवटां । एकलेंचि जावें ॥ ४८ ॥ ऐसा मनों पस्तावला । क्षण एक उदास झाला । सर्वांचि प्राणी झळंबला । मायाजाळें ॥ ४९ ॥ कन्या पुत्र आठवलीं । मनोंहूनि श्रिति वाटली । म्हणे लेंकुरें अंतरलों । माझीं मज ॥ ५० ॥ मागील शब्द आठवले । जें जें होतें प्राप्त झालें । मग रुदन आरंभिलें । दीर्घ स्वरें ॥ ५१ ॥ अरण्यीं रुदन करितां । कोणी नाहीं बुझाविता । मग होय विचारिता । आपुले मनीं ॥ ५२ ॥ आतां कासया रडावें । प्राप्त होतें तें भोगावें । ऐसें बोलोनियां जीवें । धारिष्ट केलें ॥ ५३ ॥ ऐसा दुःखें दगदगला । मग विदेशाप्रति गेला । पुढें प्रसंग कैसा वर्तला । तो सावध ऐका ॥ ५४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे तृतीयदशके संपत्तिवेधनिरूपणं । नाम चतुर्थः समाप्तः ॥ ४ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ पुढें गेला विदेशासी । प्राणी लागला आपुल्या व्यासंगासी । आपुल्या जीवें सोयी । नाना श्रम ॥ १ ॥ ऐसा दुस्तर संसार । करितां कष्टला थोर । पुढें दोनी चारी संवत्सर । द्रव्य मिळविलें ॥ २ ॥ सर्वांचे आला देशासी । तों अवर्षण पडिलें देशीं । तेणें गुणें मनुष्यांसी । बहुत कष्ट जाहले ॥ ३ ॥ एकाच्या बैसल्या अमृतकळा । एकास चंद्री लागली डोळां । एक कापती चळचळां । दैन्यवाणी ॥ ४ ॥ एकें दीनरूप बैसली । एकें सुजलों आणि मेलों । ऐसीं कन्यापुत्रें देखिलीं । अकस्मात डोळां ॥ ५ ॥ तेणें बहुत दुःखी झाला । देखोनियां उभेड आला । प्राणी आक्रंदों लागला । दैन्यवाणें ॥ ६ ॥ तंव तीं अवघीं सावध झालीं । म्हणती बाबा जेऊं घालीं । अन्नालागीं मिटुकलीं । झेंडा घालिती ॥ ७ ॥ गांठोडें सोडोनि पाहती । हातां पडलें तेंचि खाती । कांहीं तोंडां कांहीं हातीं । प्राण जाती निघेनियां ॥ ८ ॥ तांतडी तांतडी जेऊं घाली । तों जेवितां जेवितां कांहीं मेलों । कांहीं होतीं धांदावलीं । तोंहीं मेलों अजीर्णें ॥ ९ ॥ ऐसीं बहुतेक मेलीं । एक दोन मुलें उरलीं । ताहि दैन्यवाणी झालीं । आपुलें मातेवांचुनी ॥ १० ॥ ऐसें अवर्षण आलें । तेणें घराचि बुडालें । पुढें देशीं सुभिक्ष झालें अतिशयेंसी ॥ ११ ॥ लेंकुरा नाहीं वोढावित । अन्न करावें लागें आपुलेनि हातें । बहु त्रास घेतला चित्तें । स्वयंपाकाचा ॥ १२ ॥ लोकीं भरीस घातलें । पुनः मागुतें लग्न केलें । द्रव्य होतें तें वेंचिलें । लग्नाकारणें ॥ १३ ॥ पुन्हा विदेशासि गेला । द्रव्य मे-

---

१ चिंता, काळजी. २ दुर्लक्ष करणारा. ३ कुटुंबाकारितां बाबाडकष्ट करणारा ४ मोठ्या श्रमानीं. ५ आयुष्य संपल्यावर. ६ गुंडाळला गेला, वेष्टला गेला. ७ दुःख. ८ समजून करणारा. ९ धंद्याला. १० तरून जाण्याला कठीण. ११ वर्षे. १२ दुष्काळ. १३ गालफडें. १४ डोळे फिरले, डोळ्यावर झांपड आली. १५ उमाळा, अनावर गहिवर. १६ आशाळभूत झालेलीं, उत्सुकलेला. १७ झडप, उड्या. १८ जलदीनें. १९ दुष्काळ. २० सर्वंगाई, सुकाळ. २१ वाढावेणारे. २२ भर घातली, उत्तेजन दिलें.

ळवुनि आला । तंव घरीं कलेहो लागला । सावत्र पुत्रांसी ॥ १४ ॥ स्त्री झाली न्हाती[2]-धुती । पुत्र देखों न शकती । भ्रताराची गेली शक्ति । वृद्ध झाला ॥ १५ ॥ सदा भांडण पुत्रांचें । कोणी नायकती कोणाचें । वनिता[3] अतिप्रीतीचें । प्रीतिपात्र ॥ १६ ॥ किंतु[4] बैसला मना । एके ठाईं पडेना । म्हणोनियां पांचजणां[5] । मेळविलें ॥ १७ ॥ पांचजण वांटे करिती । तों ते पुत्र नायकती । निवाडा नव्हेचि अंतीं । भांडण लागलें ॥ १८ ॥ बापलेंकांचें भांडण झालें । लेंकीं[6] बापास मारिलें । तंव तें मातेनें घेतलें । शंखतीर्थ ॥ १९ ॥ ऐकोनि मिळाले लोक । उभे पाहती कौतुक । म्हणती बापास लेक ॥ कामा आले ॥ २० ॥ ज्यांकारणें केले नवस । ज्याकारणें केले सायास । ते पुत्र पितयास । मारिती पाहा ॥ २१ ॥ ऐसा आला पापकळी[7] । आश्चर्य मानिलें सकळीं । उभे तोडिती कळी[8] । नागरीक लोक ॥ २२ ॥ पुढें बैसोन पांचजण । वांटे केले तत्समान । बापलेकांचें भांडण । तोडिलें तींहीं ॥ २३ ॥ बापास वेगळें घातलें । खोंपट बांधोनि दिधलें । मन कांतेचें लागलें । स्वार्थबुद्धि ॥ २४ ॥ कांता तरुण पुरुष वृद्ध । दोघांस पडिला संबंध । खेद सांडूनि आनंद । मानिला तींहीं ॥ २५ ॥ स्त्री सांपडली सुंदर । गुणवंत आणि चतुर । म्हणे माझें भाग्य थोर । वृद्धपणीं ॥ २६ ॥ ऐसा आनंद मानिला । दुःख सर्व विसरला । तंव तो गलबेला[9] झाला । परचक्रें[10] आलें ॥ २७ ॥ अकस्मात धाडी[11] आली । कांता बंदीं[12] करूनि नेली । वस्तभावेंही[13] गेली । प्राणियाची ॥ २८ ॥ तेणें दुःख जाहलें भारी । दीर्घस्वरें रुदन करी । मनीं आठवे सुंदरी । गुणवंत ॥ २९ ॥ तंव तिची वार्ता आली । तुमची कांता भ्रष्टविली । ऐकोनियां अंग घाली । पृथ्वीवरी ॥ ३० ॥ सैन्य[14] लोळे अपसैन्य[15] लोळे । जळें पाझरती डोळे । आठवितां चित्त पोळे । दुःखानळें[16] ॥ ३१ ॥ द्रव्य होतें मेळविलें । तेंहि लग्नास वेंचिलें[17] । कांतेसहि धरून नेलें । दुराचारी[18] ॥ ३२ ॥ मजहि वृद्धपण आलें । लेंकीं वेगळें घातलें । आहा देवा ओढवलें । अदृष्ट[19] माझें ॥ ३३ ॥ द्रव्य नाहीं कांता नाहीं । ठाव नाहीं शक्ति नाहीं । देवा मज कोणीच नाहीं । तुजवेगळें ॥ ३४ ॥ पूर्वीं देव नाहीं पूजिला । वैभव देखोनि भुलला । सेखीं[20] प्राणी पस्तावला । वृद्धपणीं ॥ ३५ ॥ देह अत्यंत खंगलें[21] । सर्वांग वाळोनि गेलें । वात पित्त उसळलें । कंठ दाटला कफें ॥ ३६ ॥ वळे जिव्हेची बोबडी । कफें कंठ घडघडी । दुर्गंधि सुटली तोंडीं । नाकीं श्लेष्मा[22] वाहे ॥ ३७ ॥ मान कांपे चळचळां । डोळे गळती भळभळां । वृद्धपणीं अवकळा[23] । ठाकोनि आली ॥ ३८ ॥ दंतपाटी[24] उखळली । तेणें बोचरखिंडी[25] पडली । मुखीं लाळ गळों लागली ।

---

१ भाडण. २ वयांत आली, मोठी झाली. ३ स्त्री. ४ संशय. ५ एके ठिकाणीं नांदणूक होईना. ६ तिऱ्हाइत पंच. ७ लेकांनीं. ८ शंख-ओरड करूं लागली. ९ पापमूलक कलह. १० कलह, भांडण. ११ ओरड. १२ शत्रूची स्वारी. १३ हल्ला, धाड. १४ बांधून, कैद करून. १५ सर्व माल. १६ डाव्या उजव्या बाजूला. १७ दुःखरूप अग्नीनें. १८ खर्च केलें. १९ दुष्ट लोकांनीं. २० लेकांनीं मला वेगळें काढिलें. २१ प्रारब्धकर्म. २२ ठिकाण. २३ शेवटीं. २४ खचला. २५ शेंबूड. २६ हीनदशा. २७ दंतपांक्ति. २८ मधले दांत पडून झालेली खिंड.

दुर्गंधीची ॥ ३९ ॥ डोळां पाहतां दिसेना । कानीं शब्द ऐकेना । दीर्घस्वरें बोलवेना दमा दाटे ॥ ४० ॥ शक्ति पायांची रोहिली । बैसवेना मुरकुंडी घाली । बृहंती वाजों लागली । तोंडाच ऐसी ॥ ४१ ॥ क्षुधा लागतां आवरेना । अन्न समयीं मिळेना । मिळालें तरी चावेना । दांत गेले ॥ ४२ ॥ पित्तें जिरेना अन्न । भक्षितांची होय वमनें । तैसेंच जाय निघोन । अपानद्वारें ॥ ४३ ॥ विष्ठा मूत्र आणि वळसे । भोंवतां वमनें केला नास । दुरोन जातां कोंडे श्वास । विश्वजनांचा ॥ ४४ ॥ नाना दुःखें नाना व्याधी । वृद्धपणों चळे बुद्धि । तरी पुरेना अवधी । आयुष्याची ॥ ४५ ॥ पापण्या-भोंवयांचे केश । पिकोनि झडले निःशेष । सर्वांगीं लोंबे मांस । चिरगुटासारिखें ॥ ४६ ॥ देह सर्व पांरिखें झालें । संवगडे निःशेष राहिले । सकळ प्राणिमात्र बोले । ' मरेना कां ' ॥ ४७ ॥ जे जन्मोनि पोशिलीं । तेचि फिरोनि पडिलीं । अंतीं विषमें वेळ आली । प्राणियासी ॥ ४८ ॥ गेलें तारुण्य गेलें बळ । गेलें संसाराचें सळ । वाताहात झालें सकळ । शरीर आणि संपत्ति ॥ ४९ ॥ जन्मवरी स्वार्थ केला । तितुकाही व्यर्थ गेला । कैसा विषमकाळ आला । अंतकाळीं ॥ ५० ॥ सुखाकारणें झुरला । सेखीं दुःखें कष्टी झाला । पुढें मागुती धोका आला । यमयातनेचा ॥ ५१ ॥ श्लोक ॥ ॥ जन्मदुःखं जरादुःखं नित्यदुःखं पुनः पुनः ॥ संसारसागरे दुःखं तस्माज्जागृहि जागृहि ॥ १ ॥ टी० जन्म अवघा दुःखमूळ । लागती दुःखाचे इंगळ । म्हणोनियां तात्काळ । स्वहित करावें ॥ ५२ ॥ असो ऐसें वृद्धपण । सकळांस आहे दारुण । म्हणोनियां शरण । भगवंतासि जावें ॥ ५३ ॥ पुढें वृद्धीसें तर्त्वतां । गर्भी पस्तावा होतां । तोचि आला मागुतां । अंतकाळीं ॥ ५४ ॥ म्हणोनि मागुतें जन्मांतर । प्राप्त मातेचें उदर । संसार हा अती दुर्धर । तोचि ठाकोनि आला ॥ ५५ ॥ भगवद्भजनावांचुनी । चुकेना हे जन्ममयोनी । तापत्रयाची जांचणी सांगिजेल पुढें ॥ ५६ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे तृतीयदशके कांताहरणं नाम पंचमः समासः ॥ ५ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ तापत्रयाचें लक्षण । आतां सांगिजेल निरूपण । श्रोतीं करावें श्रवण । एकाग्र होउनी ॥ १ ॥ जो तापत्रयीं पोळला । तो संतसंगें निवाला । आर्तभूत तोषला । पदार्थें जेवीं ॥ २ ॥ क्षुधाक्रांतास मिळे अन्न । तृषाक्रांतास जीवन । बंदीं पडिला त्याचें बंधन । तोडितां सुख ॥ ३ ॥ महापुरें जाजावला । तो पैलतीरास

---

१ खुटली. २ गुदद्वार. ३ ओकारी. ४ गुदस्थानमार्गें. ५ शेंबूड. ६ घाण म्हणून लोक नाकाला पदर लावतात, श्वास घेत नाहींत. ७ सर्व लोकांचा. ८ रोग. ९ शेवट होईना. १० परकीय, विन्मुख. ११ ज्यांस जन्मापासून पोसलें. १२ तींच उलटलीं. १३ कठिण. १४ अभिमान. १५ निखोरे. १६ भयंकर. १७ म्हातारपणीं. १८ खरेपणानें. १९ पश्चात्ताप. तृतीय दशक, समास पांचवा, ओवी ३४-३५ पहा. २० पुन्हा. २१ प्रपंच (जन्ममरण). २२ नेमका आला. २३ जन्मास येणें. २४ आध्यात्मिक, आधिदैविक, आधिभौतिक या तीन प्रकारच्या दुःखांची. २५ पीडा. २६ आतुर मनुष्य. २७ इष्टपदार्थप्राप्तीनें, हवा तो पदार्थ मिळाल्यानें. २८ क्षुधेनें पीडिलेल्यास. २९ तान्हेल्यास. ३० पाणी, उदक. ३१ पीडिला.

गेला । कां तो स्वप्नीचा चेइला[1] । स्वप्नदुःखी ॥ ४ ॥ कोणी एकासि मरण । येतां दीधलें जीवदान । संकटास निवारण । केलिया सुख ॥ ५ ॥ रोगियासि औषध । सप्रचीत[2] आणि शुद्ध । तयासि होय आनंद । आरोग्य होतां ॥ ६ ॥ तैसा संसारें दुखावला । त्रिविधतापें पोळला । तोचि एक अधिकारी जाहला । परमार्थासी ॥ ७ ॥ ते त्रिविधताप कैसे । आतां बोलिजेती तैसे । त्याविषयीं एक असे । वाक्याधार ॥ ८ ॥ श्लोक ॥ ॥ देहेंद्रियमनःप्राणैः सुखं दुःखं यदाप्यते । इममाध्यात्मिकं तापं विजानीयाद्धि देहिनाम् ॥ १ ॥ सर्वभूतैर्दैहयोगात् सुखं दुःखं यदाप्यते ॥ द्वितीयं तं विजानीयात्संतापं चाधिभौतिकम् ॥ २ ॥ शुभाशुभैः कर्मभिस्तैर्देहांते यमयातना । स्वर्नरकादिभोक्तव्यमिदं विद्धयादिदैविकम् ॥ ३ ॥ टी० ॥ एक ताप आध्यात्मिक । दुजा तो आधिभौतिक । तिसरा आधिदैविक । ताप जाणावा ॥ ९ ॥ आध्यात्मिक तो कोण । कैसी त्याची ओळखण । आधिभौतिकाचें लक्षण । जाणिजे कैसें ॥ १० ॥ आधिदैविक तो कैसा । कवण तयाची दशा । हेंही विशद कळे ऐसा । विस्तार किजे ॥ ११ ॥ हां जी म्हणोनि वक्ता । जाहला कथा विस्तारिता । आध्यात्मिक ताप आतां । सावध ऐका ॥ १२ ॥ देह इंद्रियें आणि प्राण । यांचेनि योगें आपण । सुखदुःखें शिणे जाण । या नांव आध्यात्मिक ॥ १३ ॥ देहामधून जें आलें । इंद्रियप्राणें दुःख झालें । तें आध्यात्मिक बोलिलें । तायत्रय ॥ १४ ॥ देहामधूनि काय आलें । प्राण्यास कोण दुःख झालें । आतां हें विशद केलें । पाहिजे कीं ॥ १५ ॥ खरूज खवडे पुळिया नारू । नखुरड्या[3] मांजेऱ्या[4] देवी गोंवरू । देहामधील विकारू । या नांव आध्यात्मिक ॥ १६ ॥ काखमांजरी केंसतोड[5] । ओखटे[6] वर्ण[7] काळफोड । व्याधि मूळव्याधि महाजड । या नांव आध्यात्मिक ॥ १७ ॥ अंगुळेंवेढें[8] गालफुगी । कंठ उठे जे वोंगी[9] । हिरडी सुजे भरे वेणेंगी[10] । या नांव आध्यात्मिक ॥ १८ ॥ वाउगे फोड उठती । कां ते सुजे अंगकांति । वात आणि तिडका लागती । या नांव आध्यात्मिक ॥ १९ ॥ नायटे अंदु[11] गजकरण । पेहाचें[12] पोट विस्तीर्ण । बैसलें टाळें फुटती कर्ण । या नांव आध्यात्मिक ॥ २० ॥ कुष्ट[13] आणि ओलें[14] कुष्ठ । पंडूरोग अतिश्रेष्ठ । क्षयरोगाचे कष्ट । या नांव आध्यात्मिक ॥ २१ ॥ वोटी[15] वटंक[16] वायगोळा । हातीं पायीं लागती कळा । भोवंडी[17] लागे वेळोवेळां । या नांव आध्यात्मिक ॥ २२ ॥ वोलंडी[18] आणि वळ । पोटशूळाची तळमळ । अर्धशिशी उठे कपाळ । या नांव आध्यात्मिक ॥ २३ ॥ दुखे मौज[19] आणि मान । पृष्ठी[20] ग्रीवी[21] आणि वदन[22] । अस्थि[23] मांस दुखती जाण । या नांव आध्या-

---

१ जागा झाला. २ अनुभवयुक्त. ३ दुखणें बरें झालें असतां. ४ अंतःकरणसंबंधी. ५ पृथ्वी, आप, तेज वायु आकाश या पंचभूतांसंबंधीं. ६ देव देवता भूतपिशाचासंबंधीं. ७ स्पष्ट, उघडपणें. ८ नखव्रण. ९ काखेतील गांठी. १० वाईट. ११ व्रण. १२ हाताचे बोटास होणारें कांडरूं. १३ व्यर्थ. १४ कळ. १५ हाड्यावर्ण. १६ पोटफुगीचें. १७ कोड. १८ ज्यांतून रस वाहते असें कोड. १९ गुडघी. २० वरच्या दुधाने लेंकरास होणारा एक रोग २१ घेरी, भोंवळ. २२ उपदंशासंबंधी विकार. २३ कंबर. २४ पाठ. २५ मान. २६ मुख. २७ हाडें.

त्मिक ॥ २४ ॥ कुळीक तरळ कामिणी । मुरडेम सुंठरे[५] मोळिणी । विदेशीं लागलें पाणी । या नांव आध्यात्मिक ॥ २५ ॥ जळशोष आणि हिवारें । गिरिविरी आणि अंधारें । ज्वर पाचोव आणि शीतारें । या नांव आध्यात्मिक ॥ २६ ॥ शैत्य उष्ण आणि तृषा । क्षुधा निद्रा आणि दिशा[८] । विषयतृष्णेची दुर्दशा । या नांव आध्यात्मिक ॥ २७ ॥ आळशी मूर्ख आणि अपेशी । भय उपजे मानसीं । विसराळू दुश्चित[९] अहर्निशीं[१०] । या नांव आध्यात्मिक ॥ २८ ॥ मुत्रकोंडे आणि परमे । रक्तपिती आणि रक्तपरमे । खडाचढाचेनि श्रमे । या नांव आध्यात्मिक ॥ २९ ॥ मुरडा हगवण उन्हाळे । दिशा कोंडतां आंदोळे[१२] । एक व्यथा असोन न कळे । या नांव आध्यात्मिक ॥ ३० ॥ गांठ ढळली झाले जंत । पडे आंव आणि रक्त । अन्न तैसेंचि पडत । या नांव आध्यात्मिक ॥ ३१ ॥ उचेकी लागली उशीत गेला । पित्त उसळलें उलेट झाला । खेरे[१४] पडसें आणि खोकला । या नांव आध्यात्मिक ॥ ३२ ॥ पोटकुगी आणि तेडस । भरेला हीर[१५] लागला घांस । फोडी[१६] लागतां कासाविस । या नांव आध्यात्मिक ॥ ३३ ॥ उसळला दम आणि धाप । पडजीभ ढासी[१७] आणि कफ । मोवेज्वर आणि संताप । या नांव आध्यात्मिक ॥ ३४ ॥ कोणी शेंदूर घातला । तेणें प्राणी निर्बुजला । घशामध्यें फोड आला । या नांव आध्यात्मिक ॥ ३५ ॥ गळसोट्या आणि जीभ झडे । सदा मुखीं दुर्गंधी पडे । दंतहीन लागती किडे । या नांव आध्यात्मिक ॥ ३६ ॥ जरंडी[२१] घोळाणा गंडमाळा । अवचितां स्वयें फुटे डोळा । आपणचि कापी अंगुळा । या नांव आध्यात्मिक ॥ ३७ ॥ कळा तिडका लागती । कां ते दंत उन्मळती । अधर जिव्हा रगडती । या नांव आध्यात्मिक ॥ ३८ ॥ कर्णदुःख नेत्रदुःख । नाना दुःखें घडे शोक । गर्भांध आणि नपुंसक । या नांव आध्यात्मिक ॥ ३९ ॥ फुलें वडस आणि पडळें । कीडगर्ता रातांधळें । दुश्चित भ्रमिष्ठ आणि खुळे । या नांव आध्यात्मिक ॥ ४० ॥ मुके बधिर रांखोंडे । थोटे चळले आणि वेडे । पांगुळ कुन्हें[४०] आणि पांवडे । या नांव आध्यात्मिक ॥ ४१ ॥ तोरसे[४४] घुलें[४४] कानें कैरे[४५] । गों-[४६] रोळें जामुन टापरे । पडांगुळें[४९] गेंगाणें[५०] विदिरें[५१] । या नांव आध्यात्मिक ॥ ४२ ॥

---

१ मोडशी. २ अजीर्णविकारानें हाग, ओक अशी विकृति. ३ कांवीळ. ४ तोंडावर येणाऱ्या पुळ्या. ५ गळवें, फोड. ६ नाकांत होणारे फोड. ७ वाघळें. ८ हिवताप. ९ दृष्ट लागून दुखणें उलटणें. १० शहारे, रोमांच. ११ हगवण. १२ विषयवासनेची १३ दुःखी. १४ रात्रंदिवस. १५ मुतखडा. १६ उपदंशसंबंधी विकार. १७ पोटांत खडा झाल्यामुळें. १८ भीतीनें कांपूं लागतो. १९ घशांत कांहीं अडकून ठसका लागला. २० घशांत घांस आडकणें. २१ वांती. २२ जिभेवरील कांटे. २३ पोटफुगीमुळें येणारी तिडीक. २४ लचक भरली. २५ लहान फोड. २६ दमा. २७ सुका खोकला. २८ एक प्रकारचा ताप. २९ भिऊन गेला. ३० गळ्यांतील एक रोग. ३१ पोटांतील रोग. ३२ घुणघुणा ३३ बोट. ३४ पडघात. ३५दांतांखालीं ओठ किंवा जीभ सांपडते. ३६ डोळ्यांत वाढलेलें फूल. ३७ पडदे ३८ कीड पडून झालेलें क्षत. ३९ जन्मा पासून ओंठतुटकें. ४० कुबडें. ४१ पांगळें. ४२ तारवटलेल्या डोळ्यांचें. ४३ मान घुलवून पाहणारें. ४४ चकणें. ४५ तिरव्या डोळ्याचें ४६ घारे डोळ्याचें. ४७ फार ठेंगणें ४८ घोडा टाप टाकून चालतो त्याप्रमाणें ठेंचाळत चालणारें. ४९ सहा बोटाचें. ५० नाकांतील स्वरांत बोलणारें. ५१ विरूप, कुरूप.

दांतेरें[1] बोंचेरें[2] घाणाळें[3] । घ्राणहीन श्रोत्रहीन बैरळ[4] । अतिकृश अतिस्थूळ । या नांव आध्यात्मिक ॥ ४३ ॥ तोतियें[5] बोबडें निर्बळ । रोगी कुरूप कुटिळें[6] । मत्सरी खादाड तपिळें[7] । या नांव आध्यात्मिक ॥ ४४ ॥ संतापी अनुतापी[8] मत्सरी । कामिकी[9] हेवा तिरस्कारी । पापी अवगुणी विकारी[10] । या नांव आध्यात्मिक ॥ ४५ ॥ उठंवणें[11] तोठा करेंक[12] । आवेटळें[13] आणि लेचेंक[14] । सुजी आणि चोळेंक[15] । या नांव आध्यात्मिक ॥ ४६ ॥ सेलें[16] आडवें गर्भपात । स्तन गुंतले सन्निपात । संसारकोडें[17] अपमृत्य । या नांव आध्यात्मिक ॥ ४७ ॥ नखविष आणि हिंगुरडे[18] । बोष्टे आणि वोवडें[19] । उगीच दांतखीळ पडे । या नांव आध्यात्मिक ॥ ४८ ॥ झडती पातीं[20] सुजती भोंवया । नेत्रीं होती रांजणेंवाडिया[21] । चोळसी[22] लागे प्राणिया । या नांव आध्यात्मिक ॥ ४९ ॥ वांगें[23] तीळ सुरेमे[24] लोंसें[25] । चामखीळ[26] गलंडे[27] मसे[28] । चुकेर[29] होइजे मानसें । या नांव आध्यात्मिक ॥ ५० ॥ नाना कुरुे आणि आंवाळें[30] । अंगीं दुर्गंधी प्रबळे । चाईचोटी[31] लाळ गळे । या नांव आध्यात्मिक ॥ ५१ ॥ नाना चिंतेची कोंजळी[32] । नाना दुःखें चित्त पोळी । व्याधीवांचून तळमळी । या नांव आध्यात्मिक ॥ ५२ ॥ वृद्धपणींच्या आपदा । नाना रोग होती सदा । देह क्षीण सर्वदा । या नांव आध्यात्मिक ॥ ५३ ॥ नाना व्याधि नाना दुःखें । नाना भोग नाना खांडकें[33] । प्राणी तळमळी शोकें । या नांव आध्यात्मिक ॥ ५४ ॥ ऐसा आध्यात्मिक ताप । पूर्वपापाचा संताप । सांगतां सरेना अमूप[34] । दुःखसागर ॥ ५५ ॥ बहुत काय बोलावें । श्रोतीं संकेतें[35] जाणावें । पुढें बोलिलें स्वभावें । आधिभौतिक ॥ ५६ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे तृतीयदशके आध्यात्मिक तापनिरूपणं नाम षष्ठः समासः ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ मागां झालें निरूपण । आध्यात्मिकाचें लक्षण । आतां आधिभौतिक तो कोण । सांगिजेल ॥ १ ॥ ॥ श्लोक ॥ सर्वभूतैर्देहयोगात्सुखं दुःखं यदाप्यते ॥ द्वितीयं तं विजानीयात्संतापं चाधिभौतिकम् ॥ १ ॥ टी० ॥ सर्व भूतांचेनि संयोगें । सुखदुःख उपजों लागे । ताप होतां मन भंगें । या नांव आधिभौतिक ॥ २ ॥ तरी आधिभौतिकाचें लक्षण । प्रांजळ[36] करूनि निरूपण । जेणें अनुभवास ये पूर्ण । ओळखी तापत्रयाची ॥ ३ ॥ ठेंचा लागती मोडती कांटे । वाजती शस्त्रांचे घायवटे ।

---

१ दांताळ. २ दांत पडलेलें. ३ लांब नाकाचा. ४ बडबड्या. ५ वांकडे. ६ तापट स्वभावाचे. ७ पश्चात्तापी. ८ अभिलाषी, कामी, स्त्रीलंपट. ९ विकार पावलेला. १० कळ. ११ ताठपणा. १२ उसण, लचक. १३ मान दुखणें, लचकणें. १४ हाडसरणें, लचकणें. १५ पायांचे संधीचा रोग. १६ न वाढतां बहुत दिवस गर्भ पोटांत राहणें. १७ संसारांतील अनेक व्यथा. १८ क्षत झाल्यावर हिंगस्पर्शानें किंवा तो खाल्यानें त्याचे जागीं मांसग्रंथी होतो तो. १९ ओशट. २० वातूळ पदार्थानें होणारा वातविशिष्ट विकार. २१ पापण्या. २२ डोळ्याच्या पापण्यावर फोड. २३ आरशी. २४ काळसर डाग किंवा पुळ्या. २५ पांढरे चट्टे. २६ लांसरूं. २७ चामखोड. २८ गळवे. २९ गोलाकार काळे डाग. ३० उद्वेगी, दुःखी. ३१ वाळुक. ३२ डोक्याचे केंस झडतात अशी एक व्याधि. ३३ काळेपणा, काळोख. ३४ गळवे. ३५ पुष्कळ, बहुतप्रकारें. ३६ थोडक्यांत, दिग्दर्शनानें. ३७ स्पष्ट. ३८ कथन. ३९ घाय.

सले[1] सिलेका[2] आणि सैराटे[3]। या नांव आधिभौतिक ॥ ४ ॥ आग्यॅा[4] आणि काचकुंहिरी[5]। अवचटें लागे शरीरीं। गांधील येऊनि दंश करी। या नांव आधिभौतिक ॥ ५ ॥ मासी गोमासी मोहळमासी। मुंगी तेलमुंगी डांस दंशी। सोटँ जळू लागे पायासी। या नांव आधिभौतिक ॥ ६ ॥ पिसा पिसोळे चांचर्ण[8]। कुसळे मुंगळे ढेंकूण। विसीफें[9] भोंवरें गोचडी जाण। या नांव आधिभौतिक ॥ ७ ॥ गोमी[10] विंचू आणि विखार[11]। व्याघ्र लांडगे आणि सूकर[12]। गोसायॅाळ[13] आणि सांबर। या नांव आधिभौतिक ॥ ८ ॥ रानगाई रानम्हैसे। रानशकेटँ[14] आसि रिसे[15]। रानहस्ती लांवपिसें[16]। या नांव आधिभौतिक ॥ ९ ॥ सुसरीनें ओढून नेलें। कां तें अवचीत[17] बुडालें। अथवा खेंळाळीं पडिलें। या नांव आधिभौतिक ॥ १० ॥ नाना विखारें अजगर। नाना मगर[18] जेंलचर[19]। नाना वनेंचर अपार। या नांव आधिभौतिक ॥ ११ ॥ अश्व वृषँभ आणि खर[20]। श्वानसूकर[21] जंबुकँ मार्जार[22]। ऐसी बहुविध क्रूर। या नांव आधिभौतिक ॥ १२ ॥ ऐसीं कर्कशें भयानकें[23]। बहुविध दुःखदायकें। दुःखें दारुण अनेकें। या नांव आधिभौतिक ॥ १३ ॥ भिंती मोंळवदें[24] पडती। कडे भुयारी कोसळती। वृक्ष अंगावर मोडती। या नांव आधिभौतिक ॥ १४ ॥ कोणी एकाचा शाप जडे। कोणी एकें केलें चेडें[25]। अधांतरी[26] होती वेडे। या नांव आधिभौतिक ॥ १५ ॥ कोणी एकें चाळविलें। कोणी एकें भ्रष्टवीलें। कोणी एकें धरूनि नेलें। या नांव आधिभौतिक ॥ १६ ॥ कोणी एकें दिधलें विष। कोणी लाविले दोष। कोणी एकें घातले पाश। या नांव आधिभौतिक ॥ १७ ॥ अवचिता शेरँ[27] लागला। नेणों बिबवा चिडला। प्राणी धुरें जाजावॅला[28]। या नांव आधिभौतिक ॥ १८ ॥ इंगळावरी[29] पाय पडे। शिळेखालीं हात सांपडे। धांवतां अडखळोनि पडे। या नांव आधिभौतिक ॥ १९ ॥ वॉपी[30] कूपँ सरोवर। गर्ता[31] कडा नदीतीर। अवचितें पडे शरीर। या नांव आधिभौतिक ॥ २० ॥ दुर्गाखालें[32] कोसळती। झाडावरुनी पडती। तेणें दुःखें आक्रंदती। या नांव आधिभौतिक ॥ २१ ॥ शीतें वोंठ तिडेंकेती[33]। हात पाय टांचा फुटती। चिखँल्या जिव्हॅोळ्या[34] लागती। या नांव आधिभौतिक ॥ २२ ॥ अशन-

---

१ शरीरांत कांटा शिरून त्यांचा अंश आंत राहतो तो. २ चोया. ३ गोखरू. ४ अंगाची आग करणारी एक वनस्पती. ५ खाजरी कुयली (खाज करणारी एक वनस्पती). ६ अकस्मात. ७ एक प्रकारचा चावणारा क्षुद्र जीव. ८ चांचड. ९ गुरांच्या आखाड्यांत असणारा किडा. १० भुंगा. ११ घोणी. १२ साप. १३ डुक्कर. १४ सायाळ जातीचा पक्षी. १५ सांबर. १६ एका जातीचें श्वापद. १७ अस्वलें. १८ जखीणीनें लावलेलें वेड. १९ अकस्मात. २० पाण्यांतील खडकाळ ठिकाणीं. २१ सुसरी. २२ पाण्यांतील सुसर, मगर, घड्याळ वगैरे प्राणी. २३ रानांतील जनावरें. २४ बैल. २५ गाढव. २६ कुत्रा. २७ कोल्हा. २८ भयंकरप्राणी. २९ धार्बी. ३० चेटक. ३१ मध्येंच. ३२ चीक अंगास लागला असतां सूज येते असें एक झाड (बोर्था-चिकाडा.) ३३ त्रासला, कष्टला. ३४ अग्नीवर. ३५ विहिरी. ३६ आड. ३७ खांचा, खळगे. ३८ किल्ल्याखालीं. ३९ थंडीनें ओंठ फुटतात. ४० पायाच्या बोटांतील विकार. ४१ नखाखालचा मांसळ भाग, नखें काढतांना कापला जातो अथवा नख अधिक निघतें तो विकार.

पोनाचिये वेळे । उष्णरसें जिव्हा पोळे । दांत करकरे आणि हरळे[2] । या नांव आधिभौतिक ॥ २३ ॥ पराधीन बाळपणीं । कुशब्द मार जाचणी । अन्नवस्त्रेंविण अळणी[3] । या नांव आधिभौतिक ॥ २४ ॥ सासुरवास गालोरे[4] । टुणेके लासणें चिमोरे[5] । आलें रुदन न धरे । या नांव आधिभौतिक ॥ २५ ॥ चुकतां कान पिळिती । कां तो डोळां हिंग घालिती । सर्वकाळ धारकीं धरिती[6] । या नांव आधिभौतिक ॥ २६ ॥ नानाप्रकारचे मार । दुर्जन मारिती अपार । दूरी अंतरे माहेर । या नांव आधिभौतिक ॥ २७ ॥ कर्ण नासिक विंधिले[7] । बळेंचि धरूनि गोंदिलें[8] । खोडी जालियां पोळविलें । या नांव आधिभौतिक ॥ २८ ॥ पैरचक्रीं धरूनी नेलें । नीच यातीसें[9] दिधलें । दुर्दशा होऊनि मेलें । या नांव आधिभौतिक ॥ २९ ॥ नाना रोग उद्भवले । जें आध्यात्मिक बोलिलें । वैद्य पंचाक्षरी आणिले । या नांव आधिभौतिक ॥ ३० ॥ नाना व्यथांचें निरसन[10] । ह्मावया औषध दारुण । बलात्कारें देती जाण । या नांव आधिभौतिक ॥ ३१ ॥ नाना वल्लींचे रस । काढे गर्गोंडे[11] कर्कश । घेतां होय कासाविस । या नांव आधिभौतिक ॥ ३२ ॥ ढाळ आणि उखाळ[12] देती । पथ्य कठिण सांगती । अनुपान चुकतां विपत्ती । या नांव आधिभौतिक ॥ ३३ ॥ फोडरक्त आणि फांसणी[13] । गुलडोगाची[14] जाचणी । तेणें दुःखें दुखवे प्राणी । या नांव आधिभौतिक ॥ ३४ ॥ रुचीकें[15] बिबवे घालिती । नाना दुःखें दडपे देती । शिरा तोडिती जळवा लाविती । या नांव आधिभौतिक ॥ ३५ ॥ बहु रोग बहु औषधें । सांगतां अपारें अगाधें । प्राणी दुखवे तेणें खेदें । या नांव आधिभौतिक ॥ ३६ ॥ बोलविला पंचाक्षरी । घूरमार पीडा करी । नाना यातना चतुरीं । आधिभौतिक जाणिजे ॥ ३७ ॥ दरवडे घालुनियां जना । तस्कर करिती यातना । तेणें दुःख होय मना । या नांव आधिभौतिक ॥ ३८ ॥ अग्नीचेनि ज्वालें पोळे । तेणें दुःखें आरंवळें[16] । हानि झाली विवळे[17] । या नांव आधिभौतिक ॥ ३९ ॥ नाना मंदिरें सुंदरें । नाना रत्नांचीं भांडारें । दिव्यांबरें[18] मनोहरें । दग्ध होतीं ॥ ४० ॥ नाना धान्यें नाना पदार्थ । नाना पशु नाना स्वार्थ[19] । नाना पात्रें नाना अर्थ[20] । मनुष्यें भस्म होती ॥ ४१ ॥ ऐसा अग्नि लागतां शेतीं । धान्यें बैणग्या खंडकुती[21] । इक्षुदंड जळोनि जाती । अकस्मात् ॥ ४२ ॥ ऐसा अग्नि लागला । अथवा कोणी लाविला । हानि झाली कां पोळला । या नांव आधिभौतिक ॥ ४३ ॥ ऐसें सांगतां बहुत । होती वन्हीचे आघात । तेणें दुःखें दुखवे चित्त । या नांव आधिभौतिक ॥ ४४ ॥ हारपे विसरे आणि सांडे । नासे गाहाळे

---

१ खाण्यापिण्याचे. २ दांतांत फटी पडणें, खडा लागून दांत दुखणें. ३ निस्तेज. ४ गालगुच्चे. ५ ठोंसे. ६ डाग देणें. ७ चिमटे घेणें. ८ धारेवर, धाकांत. ९ टोंचले. १० अंग टोंचून रंग भरले. ११ राज्यक्रांति होऊन दुसऱ्या राजानें, शत्रूनें. १२ जातीला. १३ नाश. १४ गर्गट, वाटून तयार केलेलें औषध. १५ वांतीचें औषध. १६ फाडून, कापून रक्त काढणें. १७ तुमडीनें वगैरे रक्त काढणें. १८ चोचे. १९ रुईचा चीक. २० चोर. २१ ओरडतो. २२ कण्हतो. २३ सुंदर वस्त्रें. २४ स्वहितकारक गोष्टी. २५ पदार्थ, चिजा. २६ बाजरीचीं बोंडें. २७ उन्हानें जळून जातात. २८ ऊस. २९ तडाके, सपाटे. ३० हरवते.

फुटे पडे । असाध्य होय कोणीकडे । या नांव आधिभौतिक ॥ ४५ ॥ प्राणी स्थानभ्रष्ट झाले । नाना पशूतें चुकले । कन्या पुत्र गाहळले । या नांव आधिभौतिक ॥ ४६ ॥ तस्कर अथवा दावेदार । अवचितें करिती संहार । लुटती घरें नेती खिलार[1] । या नांव आधिभौतिक ॥ ४७ ॥ नाना धान्यें केळों कापिती । पानमळा[2] मीठ घालिती । ऐसे नाना अघातं करिती । या नांव आधिभौतिक ॥ ४८ ॥ मैंदें उचैले खाँनोरी । सुवर्णपंथी भुररेकेरी । ठेकुं सिंतेरु वेरेपेकरी[3] । वरपा घालिती ॥ ४९ ॥ गंठीसोडे[3] द्रव्य सोडिती । नाना अलंकार काढिती । नाना वस्तु मूषेंक नेती । या नांव आधिभौतिक ॥ ५० ॥ वीज पडे हिंव पडे । प्राणी पर्जन्यीं सांपडे । का तो महापूरीं बुडे । या नांव आधिभौतिक ॥ ५१ ॥ भोंवरे वेळेणें आणि धारे । वोसणें[17] लाटा अपार । वृश्चिकें[18] गोंवी[19] आजगर । वाहूनि जाती ॥ ५२ ॥ तयांमध्यें प्राणी सांपडला । खडकीं बेटीं[20] अडकला । बुडत बुडत वांचला । या नांव आधिभौतिक ॥ ५३ ॥ मनासारिखा नसे संसार । कुरूप कर्कश स्त्री क्रूर । विधवा कन्या मूर्ख पुत्र । या नांव आधिभौतिक ॥ ५४ ॥ भूत पिशाच लागलें । अंगावरून वारें गेलें । अबद्ध मंत्रें प्राणी चळेले[21] । या नांव आधिभौतिक ॥ ५५ ॥ ब्राह्मणसंमंध[22] शरीरीं । बहुसाल पीडा करी । शनीश्वरांचा[23] धोका धरी । या नांव आधिभौतिक ॥ ५६ ॥ शिंक पिंगळा[24] आणि पाली । ओखटे होला[25] काक कलाली । चित्तीं काळजी लागली । या नांव आधिभौतिक ॥ ५७ ॥ नाना ग्रह काळ वार । काळतिथि घातचंद्र । काळवेल घातनक्षत्र । या नांव आधिभौतिक ॥ ५८ ॥ दिवटा[26] सर्वदा[27] भाकूंनि[28] गेला । अंतरीं धोका लागला । दुःस्वप्न जाजावला । या नांव आधिभौतिक ॥ ५९ ॥ भालु[29] भुंके श्वान[30] रडे । पाली अंगावरी पडे । नाना चिन्हें चिंता पवाडे[31] । या नांव आधिभौतिक ॥ ६० ॥ बाहेर निघतां अपशकुन । नाना प्रकारीं विच्छिन्न । तेणें गुणें भंगे मन । या नांव आधिभौतिक ॥ ६१ ॥ प्राणी बंदीं सांपडला । यातनें वरपडा[32] जाहला । नाना दुःखें दुखावला । या नांव आधिभौतिक ॥ ६२ ॥ प्राणी राजदंड पावत । जेरबंद[34] चाबुक वेत । दे मार तळवेमारे[35] होत । या नांव आधिभौतिक ॥ ६३ ॥ कोरडे[36] पारंब्या फोक[37] । बहु प्रकारें अनेक । बहु ताडिती

---

१ कांहीं केल्या सांपडत अथवा प्राप्त होत नाहीं. २ गुरेंढोरें. ३ पानवेलीच्या मळ्यांमध्यें. ४ संकटें. ५ फसवून लुटणारे. ६ चोरटे. ७ काळीजखाऊ. ८ सोन्याची किमया करणारे. ९ भुरळ पाडणारे. १० ठक. ११ भामटे फसविणारे. १२ लुटारू. १३ गठडीचोर. १४ उंदीर. १५ नदीच्या पाण्याचा रोंख. १६ वेगवान् नदीचा प्रवाह. १७ पुरांतील केरकचऱ्याचा समूह. १८ विंचू. १९ गोमी. २० केळी, वेळु, दर्भ इत्यादिकांच्या वनांमध्यें. २१ शास्त्रप्रमाणास विरुद्ध. २२ बुद्धिभ्रंश पावले. २३ ब्रह्मसंबंध. २४ शनीचा. २५ एकप्रकारचा पक्षी. २६ वाईट. २७ जोशी. २८ सरोदा, कुडबुड्या जोशी २९ भविष्य सांगून. ३० कोल्ही. ३१ कुत्रा. ३२ वाढते. ३३ पात्र. ३४ घोड्याच्या मागील पायांस बांधण्याकरितां केलेली चर्मी वादी. ३५ तापलेल्या तव्यावर उभें करून मारण्याचा प्रकार. ३६ चाबूक. ३७ लहान डहाळी.

आधिभौतिक । या नांव बोलिजे ॥ ६४ ॥ मोगरीमार बुधलेमार । चौखुरीनी डंगारणेंमार । बुक्या गचांडया गुडघेमार । या नांव आधिभौतिक ॥ ६५ ॥ लाता चपराका शेणमार । कानखडे दगडमार । नाना प्रकारींचे मार । या नांव आधिभौतिक ॥ ६६ ॥ टांगणें टिर्पऱ्या पिछोडे । बेडी बुधनार्ल कोलेदांडे । रक्षेण निग्रहे चहूंकडे । या नांव आधिभौतिक ॥ ६७ ॥ नाकेवेणी चुनेवेणी । मिठवणी रायेवेणी । गुळेवेणी यांची जाचणी या नांव आधिभौतिक ॥ ६८ ॥ जळामध्यें बुचकळती । हस्तीपुढें बांधून टाकिती । हांकिती छळती यातायाती । या नांव आधिभौतिक ॥ ६९ ॥ कर्णच्छेद घ्राणच्छेद हस्तच्छेद पादच्छेद । जिव्हाच्छेद अधरच्छेद । या नांव आधिभौतिक ॥ ७० ॥ तोरमार शुळी देती । नेत्र वृषण काढिती । नखांनखीं सुया मारिती । या नांव आधिभौतिक ॥ ७१ ॥ पारड्यामध्यें घालणें । कां कडेलोट करणें । कां भांड्यामुखीं उडवणें । या नांव आधिभौतिक ॥ ७२ ॥ भोते आणि बोटबोटीं । अथवा गळ घालणें कंठीं । सांडस लावुनि आटाआटीं । या नांव आधिभौतिक ॥ ७३ ॥ शिसें पाजणें विष देणें । अथवा शिरच्छेद करणें । कां पायातळीं घालणें । या नांव आधिभौतिक ॥ ७४ ॥ कानीं खुट्या आदळती । अपानीं मेखा मारिती । साल काढोनि टाकिती । या नांव आधिभौतिक ॥ ७५ ॥ सरडे मांजर भरिती । अथवा फांसी नेऊन देती । नानापरी पीडा करिती । या नांव आधिभौतिक ॥ ७६ ॥ श्वानप्रळय व्याघ्रप्रळय । भूतप्रळय सुसरीप्रळय । शस्त्रप्रळय वीजप्रळय । या नांव आधिभौतिक ॥ ७७ ॥ शिरा वोढोनि घेती । टेंभे लावुनि भाजिती । ऐशा नाना विपत्ती । या नांव आधिभौतिक ॥ ७८ ॥ मनुष्यहानि वित्तहानि । वैभवहानि महत्त्वहानि । पशुहानि पदार्थहानि । या नांव आधिभौतिक ॥ ७९ ॥ बाळपणीं मरे माता । तरुणपणीं मरे कांतां । वृद्धपणीं मृत्यु सुता । या नांव आधिभौतिक ॥ ८० ॥ दुःख दारिद्र्य आणि ऋण । विदेशपेळणी नागवण । आपदा

---

१ अपानद्वारीं मेख ठोकून मारण्याचा प्रकार. २ आंत दारू भरलेल्या बुधल्याला बांधून दारूला आग लावून मारण्याची रीत. ३ चोहींकडे तागून बांधून. ४ टिकोऱ्यांचा मार. ५ गुडघ्यांचा मार. ६ चाप लावून मार. ७ मागें हात बांधून मार. ८ झाडाचे बुंधाशीं नाळाप्रमाणें वांकवून दांड्याचा मार. ९ हातांत पाय आडकवून हात बांधणें व गुडघ्यांत लांब लांकूड आडकवून मारण्याचा प्रकार. १० सक्त देखरेख करून राखणें. ११ धाक दंडाची शिक्षा. १२ नाकांत कांहीं पदार्थ ओतून शिक्षा करणें. १३ चुन्याचें पाणी. १४ मोहऱ्याचें पाणी. १५ गुळाचें पाणी. १६ दगदग, त्रास. १७ नाक कापणें. १८ खालचा ओंठ कापणें. १९ अंड. २० मनुष्यास प्रतिदिवशीं त्याचें वजन कमी करण्याकरितां हाल हाल करणें. २१ तोफेच्या तोंडीं. २२ शिक्षेकरितां शस्त्रानें शरीरावरील त्वचा सोलून काढणे. २३ टोंचून मारणें. २४ चिमटा. २५ मोठा प्रयत्न. २६ भिंत, जोतें, घर, इत्यादिकांच्या पायाखाली पुरणें. २७ पश्चिमद्वारीं. २८ इजारींत सरड घालून इजार शिवून बंद करणें व या योगें माणसास मारणें. २९ पिसाळलेल्या मांजरास व मनुष्यास एके खोलींत कोंडून त्या मांजराकडून माणसास मारणें. ३० मशाल. ३१ परदेशांत पडून जाणें. ३२ चोरादिकांनीं लुटणें. ३३ विपत्ति.

अनुपत्ति[1] कदन्न[2] । या नांव आधिभौतिक ॥ ८१ ॥ आकांत वाखा प्रळय । युद्धीं होतां पराजय । जिवलगांचा होय क्षय । या नांव आधिभौतिक ॥ ८२ ॥ कठिण काळ आणि दुष्काळ । साशंक आणि ओखटी वेळ । उद्वेग चिंतेचे हळहळ । या नांव आधिभौतिक ॥ ८३ ॥ घाणा चरकीं शिरकला । चाकाखालीं सांपडला । नाना वन्हींत पडियेला । या नांव आधिभौतिक ॥ ८४ ॥ नान शस्त्रें भेदिला । नाना श्वापदें भक्षिला । नाना बंदीं पडियेला । या यांव आधिभौतिक ॥ ८५ ॥ नाना कुवासें निर्बुजे[3] । नाना अपमानें लाजे । नाना शोकें प्राणी झिजे । या नांव आधिभौतिक ॥ ८६ ॥ ऐसें सांगतां अपार । आहेत दुःखाचे डोंगर । श्रोतीं जाणावा विचार । आधिभौतिकाचा ॥ ८७ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे तृतीयदशके आधिभौतिकतापनिरूपणं नाम सप्तमः समासः ॥ ७ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ मागां बोलिलें आध्यात्मिक । त्या उपरी आधिभौतिक । आतां बोलिजेल आधिदैविक । तो सावध ऐका ॥ १ ॥ श्लोक ॥ शुभाशुभैः कर्मभिस्तै-र्देहांते यमयातना । स्वर्ननरकादि भोक्तव्यमिदं विद्ध्याधिदैविकम् ॥ १ ॥ टी० ॥ शुभाशुभ कर्मानें जना । देहांतीं यमयातना । स्वर्ग नरक भोग नाना । या नांव आधिदैविक ॥ २ ॥ नाना दोष पातकें । मदांधपणें अविवेकें । केलीं परी तीं दुःखदायकें । यमयातना भोगविती ॥ ३ ॥ अंगबळें द्रव्यबळें । मनुष्यबळें राजबळें । नाना सामर्थ्यांचेनि बळें । अकृत्यें[5] करिती ॥ ४ ॥ नीति सांडोनियां तत्त्वतां । करूं नये तेंचि करितां । यमयातना भोगितां । जीव जाय ॥ ५ ॥ डोळे झांकूनि स्वार्थबुद्धि । नाना अभिलाष कुबुद्धी । वृत्ति भूमिसीमा[6] साँधी । द्रव्य दारा पदार्थ ॥ ६ ॥ मातलेपणें उन्मत्त । जीवघात कुटुंबघात । अप्रमाण[7] क्रिया करित । म्हणोनि यमयातना ॥ ७ ॥ मर्यादा सांडोनि चालती । ग्रामा ग्रामी दंडी ग्रामाधिपति । देशा[10] दंडी देशाधिपति । नीति न्याय सांडितां ॥ ८ ॥ देशाधिपतीसि दंडी राव । रायासी दंडिता देव । राजा न करितां नीतिन्याय । म्हणोनियां यमयातना ॥ ९ ॥ अनीतीनें स्वार्थ[11] पाहे । राजा पापी होऊनि राहे । राज्यांतीं नरक आहे । म्हणोनियां ॥ १० ॥ राजा सांडितां राजनीति । तयासि यम गांजिती । यमें नीति सांडितां धांवती । देवगण ॥ ११ ॥ ऐसी मर्यादा दाविली देवें । म्हणोनी नीतीनें वर्तावें । नीति न्याय सांडितां भोगावें । यमयातनेसी ॥ १२ ॥ देवें प्रेरिलें[13] यम । म्हणोनि आधिदैविक नाम । तृतीय ताप दुर्गम । यमयातनेचा ॥ १३ ॥ यमदंड यमयातना । शास्त्रीं बोलिले प्रकार नाना । तो भोग कादापि चुकेना । या नांव आधिदैविक ॥ १४ ॥ यमयातनेचे खेद[14] । शास्त्रीं बोलिले विशेदें । शरीरीं घालूनि अप्रमाद[15] । नानाप्रकारें ॥ १५ ॥ पापपुण्याचीं शरीरें । स्वर्गीं असतीं कलेवरें[16] । त्यांत घालोनि नानाप्रकारें । पापपुण्यें भोगविती ॥ १६ ॥ नाना पुण्यें नाना विलास । नाना

---

१ दारिद्र्य. २ वाईट अन्न. ३ घाबरतो. ४ अविचारानें. ५ करूं नये तें, पापकर्म. ६ उपजीविकेच्या साधनभूत भूमीस. ७ बळकावतो. ८ स्त्री. ९ अशास्त्र, अनुचित. १० गांवाला. ११ देशाला. १२ स्वहित. १३ पाठविलें. १४ दुःख. १५ स्पष्ट. १६ सावधपणानें, न चुकतां. १७शरीरें.

दोषें यातना कर्कश । शास्त्रीं बोलिलें अविश्वास । मानूंचि नये ॥ १७ ॥ वेदाज्ञेनें न चालती । हरिभक्ति न करिती । त्यांस यम यातना करिती । या नांव आधिदैविक ॥ १८ ॥ अक्षोभ[1] नरकीं उदंड जीव । जुनाट किडे करिती रवरव । बांधोन टाकेती हातपाव । या नांव आधिदैविक ॥ १९ ॥ उदंड पैसे[2] लहान मुख । कुंभाकार[3] कुंड एक । दुर्गंधी उकाडा[4] कुंभीपाक[5] । या नांव आधिदैविक ॥ २० ॥ तप्तभूमिका तापविती[6] । जळत स्तंभ पोटा लाविती । नाना सांडस[7] लाविती । या नांव आधिदैविक ॥ २१ ॥ यमदंडाचे उदंड मार । यातनेची सामुग्री अपार । भोग भोगिती पापी नर । या नांव आधिदैविक ॥ २२ ॥ पृथ्वीमध्यें मार नाना । त्यांहून कठिण यमयातना । मारितां उसंतची[8] असेना । या नांव आधिदैविक ॥ २३ ॥ चौघे चहुंकडे वोढिती । एक ते झोंकून पाडिती । ताणिती मारिती वोढून नेती । या नांव आधिदैविक ॥ २४ ॥ उठवेना बैसवेना । रडवेना पडवेना । यातनेवरी यातना । या नांव आधिदैविक ॥ २५ ॥ आक्रंदे रडे आणि फुंजे[10] । धकधकीनें निर्बुजे[11] । झुरझुरोन पंजर[12] होऊनि झिजे । या नांव आधिदैविक ॥ २६ ॥ कर्कश वचन कर्कश मार । यातनेचा नाना प्रकार । त्रास पावती दोषी नर । या नांव आधिदैविक ॥ २७ ॥ मागां बोलिला राजदंड । त्याहुनि यमदंड उदंड । तेथील यातना प्रचंड । भीमरूप[13] दारुण ॥ २८ ॥ आध्यात्मिक आधिभौतिक । त्याहुनि विशेष आधिदैविक । अल्प संकेतें कांहींएक । कळावया बोलिलों ॥ २९ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे तृतीयदशके आधिदैविकतापनिरूपणं नाम अष्टमः समासः ॥ ८ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ संसार म्हणजे संवेचि[14] स्वार । नाहीं मरणासि उसंत । मापीं लागलें शरीर । घडीनें घडी ॥ १ ॥ नित्य काळाची संगती । न कळे होणाराची गति । कर्मासारिखे प्राणी पडती । नाना देशीं विदेशीं ॥ २ ॥ सरतां संचितासि[15] विशेष । नाहीं क्षणाचा अवकाश । मरतां मरतां निमेष[16] । जाणें लागे ॥ ३ ॥ अवचित काळाचे म्हणियारे[17] । मारीत सुटती एकसरे । नेऊन घालिती पुढारे । मृत्युपंथें ॥ ४ ॥ होतां मृत्यूची आटाआटी । कोणी घालूं न शकती पाठीं । सर्वत्रास कुटाकुटी । मागें पुढें होतसे ॥ ५ ॥ मृत्युकाळ कांठी निकी । बैसे बळियांचे मस्तकीं । महाराजे बळिये लोकीं । राहों न शकती ॥ ६ ॥ मृत्यु न म्हणे कों हा क्रूर । मृत्यु न म्हणे हा झुंजार[18] । मृत्यु न म्हणे हा संग्रामशूर । समरांगणीं ॥ ७ ॥ मृत्यु न म्हणे हा कोपी । मृत्यु न म्हणे हा प्रतापी । मृत्यु न म्हणे हा उग्ररूपी । महाखळ ॥ ८ ॥ मृत्यु न म्हणे कीं हा बलाढ्य । मृत्यु न म्हणे कीं हा धनाढ्य । मृत्यु न म्हणें हा आढ्य[19] । सर्वगुणें ॥ ९ ॥ मृत्यु न

---

१ अत्यंत खोल. २ विस्तार. ३ घागरीच्या आकाराचें. ४ आग. ५ एक नरक. ६ तापवितात. ७ चिमटे. ८ पुष्कळ ९ विश्रांति. १० श्वासोच्छ्वास टाकतो. ११ घाबरा होतो. १२ पिंजरा. १३ अत्यंत भयंकर. १४ स्वतःच. १५ कालांतरींचा वायदा. १६ पापपुण्यात्मक कर्माचे. १७ डोळ्याचें पातें याचें स्वभाविक झांकणें व उघडणें यांमधील काळ. १८ नोकर. १९ दांडगा प्रयत्न. २० बळवानाचे. २१ मोठा लढवय्या. २२ संपन्न.

म्हणे हा विख्यात । मृत्यु न म्हणे हा श्रीमंत । मृत्यु न म्हणे हा अद्भुत । पराक्रमी ॥ १० ॥ मृत्यु न म्हणे हा भूपति । मृत्यु न म्हणे हा चक्रवर्ती । मृत्यु न म्हणे हा करामती । कैवाड जाणे ॥ ११ ॥ मृत्यु न म्हणे हयपति । मृत्यु न म्हणे हा गजपति । मृत्यु न म्हणे हा नरपति । विख्यात राजा ॥ १२ ॥ मृत्यु न म्हणे हा वरिष्ठ जनीं । मृत्यु न म्हणे हा राजकारणी । मृत्यु न म्हणे हा वेतनी । वेतनधर्ता ॥ १३ ॥ मृत्यु न म्हणे हा देसाई[6] । मृत्यु न म्हणे हा व्यवसायी । मृत्यु न म्हणे ठायीं ठायीं । पुंड राजे ॥ १४ ॥ मृत्यु न म्हणे मुद्राधारी । मृत्यु न म्हणे व्यापारी । मृत्यु न म्हणे परनारी । राजकन्या ॥ १५ ॥ मृत्यु न म्हणे कार्याकारण । मृत्यु न म्हणे वर्णावर्ण । मृत्यु न म्हणे हा ब्राह्मण । कर्मनिष्ठ ॥ १६ ॥ मृत्यु न म्हणे हा व्युत्पन्न । मृत्यु न म्हणे हा संपन्न । मृत्यु न म्हणे हा विद्वज्जन । समुदायीं ॥ १७ ॥ मृत्यु न म्हणे हा धूर्त । मृत्यु न म्हणे हा बहुश्रुत । मृत्यु न म्हणे हा पंडित । महा भला ॥ १८ ॥ मृत्यु न म्हणे हा पुराणिक । मृत्यु न म्हणे हा वैदिक । मृत्यु न म्हणे हा याज्ञिक । अथवा जोशी ॥ १९ ॥ मृत्यु न म्हणे हा अग्निहोत्री । मृत्यु न म्हणे हा श्रोत्री[12] । मृत्यु न म्हणे हा मंत्रतंत्री[13] । पूर्णागमी[14] ॥ २० ॥ मृत्यु न म्हणे हा शास्त्रज्ञ । मृत्यु न म्हणे वेदज्ञ । मृत्यु न म्हणे सर्वज्ञ । सर्व जाणे ॥ २१ ॥ मृत्यु न म्हणे ब्रह्महत्या । मृत्यु न म्हणे गोहत्या । मृत्यु न म्हणे नाना हत्या । स्त्रीबालकादिक ॥ २२ ॥ मृत्यु न म्हणे रागेज्ञानी । मृत्यु न म्हणे तालज्ञानी । मृत्यु न म्हणे तत्त्वज्ञानी । तत्त्ववेत्ता ॥ २३ ॥ मृत्यु न म्हण हा योगाभ्यासी । मृत्यु न म्हणे संन्यासी । मृत्यु न म्हणे काळासी । वंचूं[23] जाणे ॥ २४ ॥ मृत्यु न म्हणे हा सावध । मृत्यु न म्हणे हा सिद्ध[24] । मृत्यु न म्हणे वैद्य प्रसिद्ध । पंचाक्षरी ॥ २५ ॥ मृत्यु न म्हणे हा गोसांवी । मृत्यु न म्हणे तपस्वी । मृत्यु न म्हणे हा मनस्वी । उदासीन ॥ २६ ॥ मृत्यु न म्हणे ऋषीश्वर । मृत्यु न म्हणे कवीश्वर । मृत्यु न म्हणे दिगंबर[25] । समाधिस्त ॥ २७ ॥ मृत्यु न म्हणे हटयोगी । मृत्यु न म्हणे हा राजयोगी । मृत्यु न म्हणे हा वीतरागी । निरंतर ॥ २८ ॥ मृत्यु न म्हणे हा ब्रह्मचारी । मृत्यु न म्हणे हा जटाधारी । मृत्यु न म्हणे हा निराहारी । योगीश्वर ॥ २९ ॥ मृत्यु न म्हणे हा संत । मृत्यु न म्हणे हा महंत[26] । मृत्यु न म्हणे हा गुप्त । होत असे ॥ ३० ॥ मृत्यु न म्हणे स्वाधीन । मृत्यु न म्हणे पराधीन । सकळ जीवांसी प्रेरीन । मृत्युच करी ॥ ३१ ॥ ऐक मृत्युमार्गी

---

१ राजा. २ सार्वभौमराजा. ३ कारस्थान, कौशल्य. ४ पुष्कळ घोड्यांचा मालक. ५ नेमणूकदार. ६ देशमुख. ७ उद्योगी. ८ भेचरीआदि मुद्रा धारण करणारा. ९ उच्चनीच जातींचा. १० सुशिक्षित, मोठा विद्वान्. ११ श्रीमंत. १२ वेदवेत्ता. १३ मंत्र आणि तंत्रशास्त्र जाणणारा. १४ धर्मशास्त्रें वगैरेमध्यें पूर्ण प्रवीण. १५ गायनविद्याकुशल. १६ आत्मस्वरूप ओळखणारा. १७ फसाविण्याला. १८ ब्रह्मस्वरूपास पोंचलेला. १९ मन ताब्यांत ठेवणारा. २० दिशारूप वस्त्रें परिधान करणारा नग्न परमहंस. २१ ब्रह्मस्वरूपाचें ध्यान करीत राहिलेला. २२ प्राणवायूचा निरोध करून त्यामुळें अंतःकरणवृत्ती एकाग्र करणारा. २३ प्राणनिरोध न करतां अंतःकरणाची एकाग्रता करणारा. २४ वैराग्यवान् २५ मठाधिपति. २६ पिऊन टाकतो. २७ म्हातारे.

लागले । एकीं अर्ध पंथें क्रमिलें । एक ते शेवटास गेले । वृद्धपणीं ॥ ३२ ॥ मृत्यु न ह्मणे बाळ तरुण । मृत्यु न म्हणे हा सुलक्षण[1] । मृत्यु न म्हणे हा विचक्षण[2] । बहु बोलका ॥ ३३ ॥ मृत्यु न ह्मणे हा धीर । मृत्यु न ह्मणे हा उदार । मृत्यु न ह्मणे हा सुंदर चतुरंग[3] जाणे ॥ ३४ ॥ मृत्यु न ह्मणे हा पुण्यपुरुष[4] । मृत्यु न ह्मणे हरिदास । मृत्यु न ह्मणे हा विशेष । सुकृती नर ॥ ३५ ॥ आतां अस्तो हें बोलणें । मृत्युपासूनि सुटिजे कोणें । मागें पुढें विश्वास जाणें । मृत्युपंथें ॥ ३६ ॥ चारी खाणी चारी वाणी । चौऱ्यायशीलक्ष जीवयोनी । जन्मास आले तितुके प्राणी । मृत्यु पावती ॥ ३७ ॥ मृत्युभेणें पळोनि जातां । तरी मृत्यु सोडिना तत्त्वतां । मृत्यूस न ये को चुकवितां । काहीं केल्या ॥ ३८ ॥ मृत्यु न म्हणे हा स्वदेशीं । मृत्यु न ह्मणे हा विदेशीं[5] । मृत्यु न ह्मणे हा उपवासी । निरंतर ॥ ३९ ॥ मृत्यु न ह्मणे थोर थोर । मृत्यु न ह्मणे हरिहर मृत्यु न ह्मणे अवतार । भगवंताचे ॥ ४० ॥ श्रोतां कोप न करावा । हा मृत्युलोक सर्वांस ठावा । उपजला प्राणी जाईल बरवा । मृत्युपंथें ॥ ४१ ॥ येथें न मानावा किंत[6] । हा मृत्युलोक विख्यात । प्रकट जाणती समस्त । लहान थोर ॥ ४२ ॥ तथापि किंतु मानिजेल । तरी हा मृत्युलोक नव्हेल । या कारणें नासेल । उपजला प्राणी ॥ ४३ ॥ ऐसे जाणोनियां जीवें । याचें सार्थकचि करावें । जनीं परोनि उरवावे । कीर्तिरूप ॥ ४४ ॥ येरझारी प्राणी लहानथोर । मृत्यु पावती हा निर्धार । बोलिलें हें अन्यथा उत्तर । मानूंचि नये ॥ ४५ ॥ गेले बहुत वैभवाचे । गेले बहुत आयुष्याचे । गेले अगाध महिमेचे । मृत्युपंथें ॥ ४६ ॥ गेले बहुत पराक्रमी । गेले बहुत कपटकर्मी । गेले बहुत संग्रामी । संग्रामशूर ॥ ४७ ॥ गेले बहुत बळाचे । गेले बहुत काळाचे । गेले बहुत कुळांचे । कुळवंत राजे ॥ ४८ ॥ गेले बहुतांचे पालक । गेले बुद्धीचे चाळक । गेले युक्तीचे तार्किक[7] तर्कवादी ॥ ४९ ॥ गेले विद्येचे सागर । गेले बळाचे डोंगर । गेले धनाचे कुबेर[8] । मृत्युपंथें ॥ ५० ॥ गेले बहुत पुरुषार्थाचे । गेले बहुत विक्रमाचे । गेले बहुत आटोपाचे । कार्यकर्ते ॥ ५१ ॥ गेले बहुत शस्त्रधारी । गेले बहुत परोपकारी । गेले बहुत नानापरी । धर्मरक्षक ॥ ५२ ॥ गेले बहुत प्रतापाचे । गेले बहुत सत्कीर्तीचे । गेले बहुत नीतीचे । नीतिवंत राजे ॥ ५३ ॥ गेले बहुत मतवादी । गेले बहुत कार्यवादी[9] । गेले बहुत विवादी । बहुतां परींचे ॥ ५४ ॥ गेलें पंडितांचें थाटें । गेलीं शब्दांचीं कचाटें ।

---

१ निमे वय म्हणजे सुमारें ५० वर्षांच्या वयाचे. २ मार्ग. ३ उत्तम लक्षणांचा. ४ व्यवहारचतुर. ५ हत्ती, घोडे, रथ व पायदळ अशी चार प्रकारची सेना. ६ पुण्यवान्. ७ जगास, जगांतील सर्व लोकांस. ८ स्वेदज जारज, उद्भिज्ज आणि अंडज अशा चार प्रकारची जीवसृष्टि. ९ परा, पश्यंती, मध्यमा आणि वैखरी या चार प्रकारची वाणी. १०. ९ लक्ष जलचर, ४ लक्ष मनुष्य, २७ लक्ष स्थावर, ११ लक्ष कृमि १० लक्ष पक्षी, २३ लक्ष चतुष्पाद मिळून ८४ लक्ष. ११ मृत्यूला भिऊन. १२ परदेशीं. १३ संशय. १४ उक्ति, असत्य. १५ लढवय्ये. १६ प्रवर्तक. १७ तर्कवान्. १८ अत्यंत श्रीमान्. १९ सामर्थ्यवान्. २० पराक्रमी. २१ निरनिराळी मतें प्रतिपादन करणारे. २२ कार्यसाधू. २३ समुदाय, मंडळी. २४ व्यापार, उलाढाली, खटपटी.

गेलीं वादकें अचाटें । नाना मतें ॥ ५५ ॥ गेले तापसांचे भार । गेले संन्यासी अपार ।[1] गेले विचारकर्ते सार । मृत्युपंथें ॥ ५६ ॥ गेले बहुत संसारी । गेले बहुत वेषधारी । गेले बहुत नानापरी । नाना छंद करोनी ॥ ५७ ॥ गेले ब्राह्मणसमुदाय । गेले बहुत आचार्य । गेले बहुत सांगों काय । किती म्हणोनि ॥ ५८ ॥ असो ऐसे सकळ गेले । परंतु एकचि राहिले । जे स्वरूपाकार झाले । आत्मज्ञानी ॥ ५९ ॥ इति श्रीदासबोधे गुरु-शिष्यसंवादे तृतीयदशके मृत्युनिरूपणं नाम नवमः समासः ॥ ९ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ संसार म्हणिजे महापूर । माजीं जलचरें अपार । डंखूं धांवती विखार । काळसर्प ॥ १ ॥ आशा ममता देहीं बेडी । सुसरी करिताती ताडातोडी । नेऊनि दुःखाचे सांगडी-। माजीं घालिती ॥ २ ॥ अहंकारनक्रें उडविलें । नेऊनि पाताळीं बुडविलें । तेथूनियां सोडविलें । न वचे प्राणी ॥ ३ ॥ काममगरामठी सुटेना । तिरस्कार लागला तुटेना । मद मत्सर वोहटेना । भुली पडली ॥ ४ ॥ वासनाधामणि पडली गळां । घालोनि वेंटाळें वमी गरळा । जिव्हा लळलळी वेळोवेळां । भयानक ॥ ५ ॥ माथां प्रपंचाचें वोझें । घेऊनि म्हणे माझें माझें । बुडतांहि न सोडी फुंजे । कुळाभिमानें ॥ ६ ॥ पडिलें भ्रांतीचें अंधारें । नागविलें अभिमानचोरें । आलें अहंतेचें कावरें । भूतबाधा । ॥ ७ ॥ बहुतेक आवर्तीं पडिले । प्राणी वाहताचि गेले । जिहीं भगवंतासि बोभाईलें । भावार्थबळें ॥ ८ ॥ देवें आपण घालोनि उडी । तयांसी नेलें पैलथडी । येर तीं अभाविकें बापुडीं । वाहतचीं गेलीं ॥ ९ ॥ भगवंत भावाचा भुकेला । भावार्थ देखोनि भुलला । संकटीं पावे भाविकांला । रक्षित असे ॥ १० ॥ जया भगवंत आवडे । तयाचें देवास सांकडें पडे । संसारदुःख समूळ झडे । निजदासांचें ॥ ११ ॥ जे अंकिते ईश्वराचे । तयांसि सोहळे निजसुखाचें । धन्य तोचि दैवाचे । भाविकजन ॥ १२ ॥ जैसा भाव जयापाशीं । तैसाचि देव तयापाशीं । जाणे भाव अंतरसाक्षी । प्राणिमात्रांचा ॥ १३ ॥ जरी भाव असला मायिक । तरी देव होय महाठक । नवल तयाचें कौतुक । जैशासि तैसा ॥ १४ ॥ जैसें जयाचें भजन । तैसेंचि दे समाधान । भाव होतां किंचित न्यून । आपणही दुरावें ॥ १५ ॥ दर्पणीं प्रतिबिंब दिसे । जैशासि तैसें भासे । तयाचें सूत्र असे । आपणाचपाशीं ॥ १६ ॥ जैसें आपण करावें । तैसेंचि तेणें म्हावें । जरी डोळे पसरोनि पाहावें । तरी तेंही टवकारे ॥ १७ ॥

---

१ वाद घालणारे. २ विलक्षण. ३ तत्त्वाचा विचार करणारे. ४ मोठमोठे विद्वान् धर्मगुरू. ५ ब्रह्मस्वरूप. ६ चावायला. ७ विषारी. ८ अहंकार—गर्व, मीपणा, हाच कोणी मगर. ९ प्राणी सोडविता येत नाहींत. १० कर्मा होत नाहीं. ११ भ्रांति, भुरळ. १२ इच्छारूपी नागीण. १३ आंकित. १४ विषाला. १५ संसाराचें १६ अभिमानानें फुगतो. १७ मीपणाचें. १८ वेड १९ भोवऱ्यांत. २० हाक मारली. २१ मोठ्या निष्ठेनें. २२ दुसरी, इतर. २३ ईश्वराचे ठिकाणीं अविश्वास. २४ संकट. २५ सेवक. २६ संस्कार, उत्साह. २७ अंतर्यामीचा साक्षी ईश्वर. २८ खोटा, वरवरचा. २९ आपण दूर होतो. ३० आरशामध्यें. ३१ मूळ कारण. ३२ डोळे वटारून पहातें.

भ्रुकुटीसे घालूनियां गांठी । पाहतां तेंहि क्रोधें उठी । आपण हास्य करितां पोटीं । तेंहि आनंदे ॥ १८ ॥ जैसा भाव प्रतिबिंबला । तयाचाचि देव झाला । जो जैसा भजेल त्याला । तैसाचि वोळे ॥ १९ ॥ भावें परमार्थाचिया वाटा । वाहती भक्तांचिया पेंठा । भरला मोक्षाचा चोहटा । सज्जनसंगें ॥ २० ॥ भावें भजनीं जे लागले । ते ईश्वरीं पावन झाले । भावार्थबळें उद्धरले । पूर्वज तेही ॥ २१ ॥ आपण स्वर्गे तरले । जनांसिही उपयोगा आले । कीर्तिश्रवणें झाले । अभक्त भावार्थी ॥ २२ ॥ धन्य तयांची जननी । जे लागले हरिभजनीं । त्यांहींच एक जन्म जनीं । सार्थक केला ॥ २३ ॥ तयांची वर्णूं काय थोरी । जयांचा भगवंत कैवारी । कांसे लावूनि उतरी । पार दुःखाचा ॥ २४ ॥ बहुत जन्मांच्या शेवटीं । जेणें चुके आटाआटी । तो हा नरदेह भेटी । करी भगवंतीं ॥ २५ ॥ म्हणोनि धन्य ते भाविक जन । जींहीं जोडलें हरिनिधान । अनंत जन्मांतरींचें पुण्य । फळासि आलें ॥ २६ ॥ आयुष्य हेंचि रत्नपेटी— । माजीं भजनरत्नें गोमटीं । ईश्वरीं अर्पुनियां लुटी । आनंदाची करावी ॥ २७ ॥ हरिभक्त वैभवें कनिष्ठ । परी तो ब्रह्मादिकां वरिष्ठ । सदासर्वदा संतुष्ट । नैराश्यबोधें ॥ २८ ॥ धरूनि ईश्वराची कांस । केली संसाराची निरासे । तया भाविका जगदीश । सेबाह्य सांभाळी ॥ २९ ॥ जया संसाराचें दुःख । विवेकें वाटे परम सुख । संसारदुःखाचेनि पढतमूर्ख । लोंधोनि पडती ॥ ३० ॥ जयांचा ईश्वरी जिव्हाळा । ते भोगिती स्वानंद सोहळा । जयांचा जनांवेगळा । ठेवा अक्षयी ॥ ३१ ॥ ते अक्षय सुखें सुखावले । संसारदुःखें विसरले । विषयरंगीं वोरंगले । श्रीरंगरंगीं ॥ ३२ ॥ तयांस फावली नरदेहपेटी । केली ईश्वरेसी भेटी । येरे अभाविकें करंटी । नरदेह गेला ॥ ३३ ॥ अबेचटें निधान जोडलें । ते कवडीचे बदल नेलें । तैसें आयुष्य निघोन गेलें । अभाविकाचें ॥ ॥ ३४ ॥ बहुत तपाचा सांठा । तेणें लाधला परिस गोमटा । परी तो ठायींचा करंटा । भोगूंचि नेणे ॥ ३५ ॥ तैसा संसारासि आला । मायाजाळीं गुंडाळला । अंतीं एकलाच गेला । हात झाडोनी ॥ ३६ ॥ या नरदेहाचे संगतीं । बहुत पावले उत्तम गति । एकें बापुडीं यातायाती । वैरपडीं जाहलीं ॥ ३७ ॥ या नरदेहाचेनि लाभें- वेगें । सार्थक करावें संतसंगें । नीचयोनिदुःख मागें । बहुत भोगिलें ॥ ३८ ॥ कोण समय येईल कैसा । याचा न कळे कीं भरंवसा । जैसे पक्षी दाही दिशा । उडोनि जाती ॥ ३९ ॥ तैसें वैभव हें सकळ । कोण जाणे कैशी वेळ । पुत्रकलत्रादि सकळ ।

---

१ भुवईला. २ पावनो. ३ चव्हाटा. ४ परमेश्वराची कीर्ति ऐकून. ५ परमेश्वराची कीर्ति ऐकूनें अभक्त जे होते ते भावार्थी झाले. ६ सफल. ७ कटकट, त्रास. ८ परमेश्वररूपी जोड, ठेवा. ९ सुंदर. १० कमी, हीन. ११ आशारहित असल्यामुळें. १२ निराशा, आशाभंग. १३ बाहेरून व आंतून, सर्वप्रकारें. १४ विचारानें. १५ झोंबणें, चिकटणें. १६ प्रेमा. १७ ब्रह्मानंदरूपी उत्साह. १८ नाशरहित. १९ अहो. २० मिळाल्याचें सार्थक झालें. २१ अदलाबदल, आपलेपणा देऊन ईश्वर घेतला. २२ अकस्मात. २३ मोठा ठेवा. २४ मूळचा. २५ दगदगीमध्यें. २६ पात्र. २७ जलदीनें, तावडतोब. २८ साफल्य. २९ पुत्र, स्त्री वगैरे.

बिघडोनि जाती ॥ ४० ॥ पहिली घडी[1] नव्हे आपुली । वयसा[2] तरी निघोनि गेली । देह पडतांच ठेविली । आहे नीचयोनी ॥ ४१ ॥ श्वानसूकरादि[3] नीच याति । भोगणें घडे नाना विपत्ति । तेथें कांहीं उत्तम गति । पाविजेत नाहीं ॥ ४२ ॥ मागें गर्भवासीं आटाआटी । भोगितां झालासी रे हिंपुटी । तेथोनियां थोर कष्टी[4] । सुटलासि दैवें ॥ ४३ ॥ दुःख भोगिलें आपुले जीवें । तेथें कैंचीं होतीं सर्वें । तैसेंचि पुढें एकलें जावें । लागेल बापा ॥ ४४ ॥ कैंची माता कैंचा पिता । कैंची बहिण कैंचा भ्रात[5] । कैंचीं सुहृदें[6] कैंची धनिता । पुत्रकलत्रादिक ॥ ४५ ॥ हीं तूं जाण मोवेचीं[7] । अवघीं सोयरीं[8] सुखाचीं । हे तुझ्या दुःखाचीं । सांगातीं[9] नव्हतीं ॥ ४६ ॥ कैंचा प्रपंच कैंचें कुळ । कासया होतोसि व्याकुळ । धन केणें[10] लक्ष्मी सकळ । जोडिजणें[11] ॥ ४७ ॥ कैंचें घर कैंचा संसार । कायसा करिसि जोजार[12] । जन्मवरि वाहोनि भार । सेखीं[13] सांडोनि जाशी ॥ ४८ ॥ कैंचें तारुण्य कैंचें वैभव । कैंचें सोहळे हावभाव । हें सकळही जाण मोवें । मायिकें[14] मोयें ॥ ४९ ॥ याच क्षणीं मरोनि जाशी । तरी रघुनाथीं अंतरलासी । माझें माझें म्हणतोसी । म्हणोनियां ॥ ५० ॥ तुवां भोगिल्या पुनरावृत्ती[15] । ऐसीं मायबापें किती । स्त्री कन्या पुत्र होती । लक्षानुलक्ष ॥ ५१ ॥ कर्मयोगें सकळ हीं मिळालीं । एके स्थळीं जन्मासि आलीं । तीं तुवां आपुलीं मानिलीं । कैसीं रे पढतमूर्खा ॥ ५२ ॥ तुझें तुज नव्हे शरीर । तेथें इतरांचा कोण विचार । आतां एक भगवंत सोचार[16] । धरीं भावार्थबळें ॥ ५३ ॥ एका दुर्भराकारणें[17] । नाना नीचांची सेवा करणें । नाना स्तुति आणि स्तवनें । मर्यादा धरावी ॥ ५४ ॥ जो अन्न देतो उदरासी । शरीर विकावें लागे त्यासी । मा[18] जेणें घातलें जन्मासी । त्यास कैसें विसरावें ॥ ५५ ॥ अहोर्निशीं ज्या भगवंता । सकळ जीवांची लागली चिंता । मेघ वर्षे जयाची सत्ता । सिंधु[19] मर्यादा धरी ॥ ५६ ॥ भूमि धरिली धराधारें[20] । प्रकट होइजे दिवाकरें[21] । ऐसी सृष्टि सत्तामात्रें । चालवी जो कां ॥ ५७ ॥ ऐसा कृपाळु देवाधिदेव । नेणवे जयाचें लाघव[22] । जो सांभाळी सकळ जीव । कृपाळुपणें ॥ ५८ ॥ ऐसा सर्वात्मा श्रीराम । सांडूनि धरिती विषयकाम[23] । ते प्राणी दुरात्मे अधम । केलें पार्वती ॥ ५९ ॥ रामेंविण जे जे आस[24] । तितुकी जाणावी निराश । माझें माझें सावकाश[25] । शिणाचि[26] उरे ॥ ६० ॥ जयासि वाटे शीण व्हावा । तेणें विषय चिंतीत जावा । विषय न मिळतां जीवा । तळमळ सुटे ॥ ६१ ॥ सांडूनि राम आनंदघन[27] । ज्याचे मनीं विषयचिंतन[28] । त्यासि कैंचें समाधान । लोलंगतासी[29] ॥ ६२ ॥

---

१ ताटातूट होऊन. २ घटका, संसाराची मांडगी. ३ वय. ४ कुत्रें डुकर वगैरे. ५ कष्टी. ६ बंधु. ७ मित्रमंडळी. ८ स्त्री. ९ मायेचीं, लटकीं. १० सोबती. ११ धान्य. १२ जाणारें, अशाश्वत. १३ खटपट. १४ शेवटीं. १५ कपट. १६ अज्ञानामुळें भासणारे. १७ अवस्तूचे ठायीं वस्तुत्वबुद्धि होण्याचें कारण, अज्ञान, भ्रम. १८ जन्ममरणाचे फेरे. १९ खरोखर. २० भरायला कठीण असें पोट. २१ तर मग. २२ रात्रंदिवस. २३ समुद्र. २४ शेषानें. २५ सूर्यानें. २६ कौशल्य. २७ विषयेच्छा. २८ जशीं कृत्यें करितात तसें फळ भोगतात. २९ इच्छा. ३० पुष्कळ काळपर्यंत व्यर्थ श्रम. ३१ आनंदाचा मेघ, आनंदवृष्टि करणारा. ३२ विषयांच्या ठिकाणीं आसक्ति ठेवणारास.

जयासि वाटे सुखचि असावें । तेणें रघुनाथभजनीं लागावें । स्वजन सकळहि त्यागावें । दुःखमूळ जे ॥ ६३ ॥ जेथें[1] वासना झांबोनि पडे । तेणेंचि अपायें दुःख जडे । म्हणोनि विषयवासना मोडे[2] । तो एक सुखी ॥ ६४ ॥ विषयजनित[3] जें जें सुख । तेथेंचि होतें परम दुःख । पूर्वीं गोड अंतीं शोक । नेमस्त[4] आहे ॥ ६५ ॥ गळ गिळितां सुख वाटे[5] । वोढोनि घेतां घसा फाटे । कां तें बापुडें मृग आपटे । चारा घेऊनि पळतां ॥ ६६ ॥ तैसी विषयसुखाची गोडी । गोड वाटे परी ते कुंडी[6] । म्हणोनियां आवडी । रघुनाथीं धरावी ॥ ६७ ॥ ऐकोनि बोले भाविक । कैसेनि घडे जी सार्थक । सांगा स्वामी यमलोक । चुके जेणें ॥ ६८ ॥ देवासि वास्तव्यें[7] कोठें । तो मज कैसेनि भेटे । दुःखमूळ संसार तुटें । कोणेपरी स्वामी ॥ ६९ ॥ धडकुंडी[8] भगवत्प्राप्ति[9] । होऊनि चुके अधोगति । ऐसा उपाय कृपामूर्ति । मज दीनासि करावा ॥ ७० ॥ वक्ता म्हणे हो एकभावें । भगवद्भजन करावें । तेणें होईल स्वभावें । समाधान ॥ ७१ ॥ कैसें करावें भगवद्भजन । कोठें ठेवावें हें मन । भगवद्भजनांचें लक्षण । मज निरूपावें ॥ ७२ ॥ ऐसा म्लानवदनें बोले । धरिलीं सुदृढ पाउलें । कंठ सद्गदित गळाले । अश्रुपात दुःखें ॥ ७३ ॥ देखोनि शिष्याची अनन्यता । भावें वोळला सद्गुरु दाता । स्वानंद तुंबळेल आतां । पुढिलिये समासीं ॥ ७४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे तृतीयदशके वैराग्यलक्षणनिरूपणं नाम दशमः समासः ॥ १० ॥ ओव्या ॥ ५७८ ॥

दशक चौथा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ जयजयाजी गणनाथा । तूं विद्यावैभवेसमर्था[10] । अध्यात्मविद्येच्या परमार्था[11] । मज बोलवावें ॥ १ ॥ नमो शारदा वेदजननी । सकळ सिद्धि जयेचेनी । मानस प्रवर्तलें मननीं । स्फूर्तिरूपें ॥ २ ॥ आतां आठवूं सद्गुरु । जो परांचाहि परु । जयाचेनि ज्ञानविचारु । कळों लागे ॥ ३ ॥ श्रोत्यांनीं पुसिलें बरवें । भगवद्भजन कैसें करावें । म्हणोनि बोलिलें स्वभावें । ग्रंथांतरीं[12] ॥ ४ ॥ सावध होऊनि श्रोतेजन । ऐका नवविधा भजन । सच्छास्त्रीं[13] बोलिलें पावन । होइजे येणें ॥ ५ ॥ श्लोक ॥ श्रवणं कीर्तनं विष्णोःस्मरणं पादसेवनम् । अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥ १ ॥ ॥ टी० ॥ श्रवण कीर्तन विष्णुस्मरण । पादसेवन अर्चन वंदन । दास्य सख्य आत्मनिवेदन । ऐसें हें नवविधा ॥ ६ ॥ नवविधा भजन बोलिलें । तेंचि पुढें प्रांजळ[14] केलें[15] ।

---

१ जेथे इच्छा चिकटते व पडते (निराशा होते) त्या पडण्याच्या अपायानें (निराशेनें) दुःख होतें. २ मोडतो, जिंकतो. ३ विषयांपासून उत्पन्न झालेलें. ४ ठरलेलें ५ माशाला आमिष गिळतांना सुख वाटतें. ६ वाईट. ७ रहाणें. ८ खचित. ९ नरकवास. १० एकनिष्ठा. ११ विद्या आणि वैभव यांनीं संपन्न अशा. १२ ब्रह्मविद्येच्या. १३ मुख्य तत्त्वा. १४ श्रेष्ठाहूनही श्रेष्ठ. १५ चांगल्या शास्त्रग्रंथांमध्यें. १६ स्पष्ट सांगितलें.

श्रोतीं अवधान दिधलें । पाहिजे आतां ॥ ७ ॥ प्रथम भजन ऐसें जाण । हरिकथा पुराणश्रवण । नाना अध्यात्मनिरूपण । ऐकत जावें ॥ ८ ॥ कर्ममार्ग उपासनामार्ग । ज्ञानमार्ग सिद्धांतमार्ग । योगमार्ग वैराग्यमार्ग । ऐकत जावे ॥ ९ ॥ नाना व्रतांचे महिमे । नाना तीर्थांचे महिमे । नाना दानांचे महिमे । ऐकत जावे ॥ १० ॥ नाना माहात्म्यें नाना स्थानें । नाना मंत्र नाना साधनें । नाना तपें पुरश्चरणें । ऐकत जावीं ॥ ११ ॥ दुग्धाहारी निराहारी । फळाहारी पर्णाहारी । तृणाहारी नानाहारी । कैसे ते ऐकावे ॥ १२ ॥ उष्णवास जळवास । शीतवास अरण्यवास । भूगर्भ आणि आकाशवास । कैसे तें ऐकावे ॥ १३ ॥ जपी तपी तामस योगी । नाना निग्रही हठयोगी । शाक्तागमी अघोर योगी । कैसे ते ऐकावे ॥ १४ ॥ नाना मुद्रा नाना आसनें । नाना देखणीं लक्षस्थानें । पिंडज्ञानें तत्त्वज्ञानें । कैसीं तीं ऐकावीं ॥ १५ ॥ नाना पिंडांची रचना । नाना भूगोलरचना । नाना सृष्टींची रचना । कैसी ती ऐकावी ॥ १६ ॥ चंद्र सूर्य तारामंडळें । ग्रहमंडळें मेघमंडळें । एकवीस स्वर्ग सप्त पाताळें । कैसीं तीं ऐकावीं ॥ १७ ॥ ब्रह्माविष्णुमहेशस्थानें । इंद्रदेवऋषिस्थानें । वायुवरुणकुबेरस्थानें । कैसीं तीं ऐकावीं ॥ १८ ॥ नवे खंडें चौदा भुवनें । अष्टदिक्पालांचीं स्थानें । नाना वनें उपवनें गहनें । कैसीं तीं ऐकावीं ॥ १९ ॥ गण गंधर्व विद्याधर । यक्ष किन्नर नारद तुंबर । अष्ट नायिका संगीत विचार । कैसा तो ऐकावा ॥ २० ॥ रागज्ञान तालज्ञान । नृत्यज्ञान वाद्यज्ञान । अमृतवेळा प्रसंगज्ञान । कैसें तें ऐकावें ॥ २१ ॥ चौदा विद्या

---

१ ब्रह्मज्ञानाचें विवेचन. २ भक्तिपूर्वक ईश्वरभजनाचा मार्ग. ३ गुरुभक्तिमार्ग. ४ महिमा वर्णन करणारे ग्रंथ. ५ गायत्रीपुरश्चरण वगैरे अनुष्ठानें. ६ दुधावरच राहणारे. ७ पाला खाऊन निर्वाह करणारे. ८ उन्हामध्यें सारखें तप करीत राहणें. ९ नदीच्या वगैरे पाण्यांत तप करीत सारखें उभें राहणें. १० पृथ्वीच्या पोटांत म्हणजे गुहेमध्यें वगैरे. ११ अंतराळीं म्हणजे वृक्षांवर वगैरे राहणें. १२ इंद्रियास ताब्यांत ठेवणारे. १३ हठयोग—प्राणवायूचानिरोध—करून अंतःकरणवृत्तीची एकाग्रता करणारे. १४ वाममार्गी, देवीउपासक. १५ कूर्मासनादिक बसण्याचे प्रकार. १६ सुंदर. १७ शरीरज्ञानें. १८ यथार्थज्ञानें. १९ ज्योति, शीत, विमळ, अभियागता, प्रकाशविख्यात, सदोदितरम्य, सहज, सिद्ध, आनंद, दिव्य, एकांत, अमळ तृप्ति, निर्मळ, प्रेम, निज, लय, अंत, नित्य अति, शिव, हे एकवीस स्वर्ग. २० सप्त पातालें—अतळ, वितळ, सुतळ, रसातळ, महातळ, तळातळ, पाताळ. २१ नवखंडें:—भरत, वृत्त, रम्य, द्रव्यमाला, केतुमाल, हरि, विधिमाला, हर्ण, सुवर्ण. २२ चौदा भुवनें:—सप्तलोक किंवा सप्तस्वर्ग आणि सप्तपातालें. २३ इंद्र, अग्नि, यम, नैऋत, वरुण, वायु, कुबेर, शिव या आठ अधिपतींची. २४ अरण्यें. २५ बाग. २६ देवांतील एक भेद. २७ खंडिता, अभिसारिका, उत्कंठा, स्वाधीना, पतिका, योगिनी, कलहांतरिता, विप्रगल्भा, वासवसज्जिका या अष्टनायिका. २८ कोणत्याही कार्याला उत्तम काल. २९ चौदा विद्या—ब्रह्मज्ञान, रसायण. स्वरधर वेद, ज्योतिष, व्याकरण, धनुर्विद्या, जलतरण, न्याय, कोक, अश्वारोहण, नट, कृषी, वैद्य.

चौसेष्टि कळा । सामुद्रिकें लक्षणें सकळा कळा । बत्तीस लक्षणें नाना कळा । कैशा त्या ऐकाव्या ॥ २२ ॥ मंत्र मोहरे तोडगे सिद्धी । नाना वल्ली नाना औषधी । धातु रसायनें बुद्धी । नाडीज्ञानें ऐकावीं ॥ २३ ॥ कोण्या दोषें कोण रोग । कोण्या रोग्यास कोण प्रयोग । कोण्या प्रयोगास कोण योग । साधे तो ऐकावा ॥ २४ ॥ रौरवादि कुंभीपाक । नाना यातना यमलोक । सुखदुःखादि स्वर्ग नरक । कैसा तो ऐकावा ॥ २५ ॥ कैशा नवविधा भक्ती । कैशा चतुर्विधा मुक्ती । कैसी पाविजे उत्तम गति । ऐसें हें ऐकावें ॥ २६ ॥ पिंडब्रह्मांडींची रचना । नाना तत्त्वविवेचना । सारासार-विचारणा । कैसी ती ऐकावी ॥ २७ ॥ सायुज्यतामुक्ति कैसी होते । कैसें पाविजे मोक्षातें । याकारणें नाना मतें । शोधीत जावीं ॥ २८ ॥ वेदशास्त्र आणि पुराणें । महावाक्यांचीं विवरणें । तनुचतुष्टयनिरसनें । कैसा तीं ऐकावीं ॥ २९ ॥ ऐसें हें अवघेंचि ऐकावें । परंतु सार शोधूनि घ्यावें । असार तें जाणोनि त्यागावें । या नांव श्रवण-भक्ति ॥ ३० ॥ सगुणाचीं चरित्रें ऐकावीं । कां ते निर्गुण अध्यात्में शोधावीं । श्रवण-भक्तीचीं जाणावीं । लक्षणें ऐसीं ॥ ३१ ॥ सगुण देवाचीं चरित्रें । निर्गुणाचीं तत्त्वें यंत्रें । हीं दोन्हीं परम पवित्रें । ऐकत जावीं ॥ ३२ ॥ जयंत्या उपोषणें नाना साधनें । मंत्र यंत्र जप ध्यानें । कीर्ति स्तुति स्तवनें भजनें । नानाविधें ऐकावीं ॥ ३३ ॥ ऐसें श्रवण सगुणाचें । अध्यात्मनिरूपण निर्गुणाचें । विभक्ति सांडून भक्तीचें । मूळ शोधावें ॥ ३४ ॥ श्रवणभक्तीचें निरूपण । निरूपिलें असे जाण । पुढें कीर्तनभजनाचें लक्षण । बोलिलें असे ॥ ३५ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चतुर्थदशके श्रवणभक्तिनिरूपणं नाम प्रथमः समासः ॥ १ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ श्रोतीं भगवद्भजन पुसिलें । तें नवविधाप्रकारें बोलिलें । त्यांत प्रथम श्रवण निरूपिलें । दुसरें कीर्तन ऐका ॥ १ ॥ सगुण हरिकथा करावी । भगवत्कीर्ति वाढवावी । अखंड वैखरी वदवावी । यथायोग्य ॥ २ ॥ बहुत करावें पाठांतर । कंठीं धरावें अर्थांतर । भगवत्कथा निरंतर । करीत जावी ॥ ३ ॥ आपुलिया सुखस्वार्था । केलीच करावी हरिकथा । हरिकथेविण सर्वथा । राहूंचि नये ॥ ४ ॥ नित्य नवा हव्यास धरावा । सांक्षेप अर्थतांचि करावा । हरिकीर्तनें भरावा । ब्रह्मगोळ

---

१ वाद्य, नृत्य, नाट्य, आलेख्य, वगैरे. २ शरीरावरील चिन्हसंबंधी. ३ पांच ठिकाणें बारीकक्केश, दंत वगैरे; पांच दीर्घ—भुज, नेत्र वगैरे; सात आरक्त—तळहात, नेत्रकोरा वगैरे; सहा उन्नत—वक्ष-स्थळ, स्कंध इ०; तीन रुंद—वक्षस्थळ, कटी इ०; तीन आंखूड—ग्रीवा, जंघा इ०; तीन गंभीरस्वर कर्ण इ०. ४ सापाच्या मस्तकांतील मणि. ५ कुवेडीं, कोयाडीं. ६ कांही विशेष सामर्थ्य. ७ योजना. ८ संबंध. ९ रौरव नरक वगैरे. १० श्रवण, कीर्तन वगैरे नऊ प्रकारच्या. ११ सलोकता, समीपता सरूपता व सायुज्यता. १२ एका व्यक्तीपासून तों यावत् ब्रह्मांडाची—सर्व शरीरांची. १३ वेदवाक्यांचीं. १४ स्थूळ, सूक्ष्म, कारण, महाकारण या चार तनूंची—शरीरांची बाधा. १५ ब्रह्मज्ञानप्रतिपादक ग्रंथ. १६ मुख्य तत्त्वाचें ज्ञान देणारीं. १७ जन्मादिवसांचे उत्सव. १८ स्तुति. १९ भेद. २० सांगितलें. २१ स्पष्ट-वाचा. २२ अर्थ, मतलब, अभिप्राय. २३ छंद, नाद. २४ उद्योग. २५ ब्रह्मांड.

अवघा ॥ ५ ॥ मनापासोनि आवडी । जीवापासून अत्यंत गोडी । सदा सर्वदा तांतडी । हरिकीर्तनाची ॥ ६ ॥ भगवंतासि कीर्तन प्रिय । कीर्तनें समाधान होय । बहुत जनांसि उपाय । हरिकीर्तन कलियुगीं ॥ ७ ॥ विविध विचित्रें ध्यानें । वर्णावीं अलंकार भूषणें । ध्यानमूर्ति अंतःकरणें । लक्षून कथा करावी ॥ ८ ॥ यशकीर्ति प्रतापमहिमा । आवडी वर्णावा परमात्मा । जेणें भगवद्भक्तांचा आत्मा । संतुष्ट होय ॥ ९ ॥ कथान्वय लापणिका । नामघोष करतालिका । प्रसंगें बोलाव्या अनेका । धोत भाता नेमस्त ॥ १० ॥ ताल मृदंग हरिकीर्तन । संगीत नृत्य तानमान । नाना कथा अनुसंधान । तुटोंचि न द्यावें ॥ ११ ॥ करुणाकीर्तनाच्या लोटें । कथा करावी घडघडाटें । श्रोतयांचीं श्रवणपुटें । आनंदें भरावीं ॥ १२ ॥ कंप रोमांच स्फुरणें । प्रेमाश्रुसहित गाणें । देवद्वारीं लोटांगणें । नमस्कार घालावें ॥ १३ ॥ पदें दोहरे श्लोकप्रबंध । घाटी मुद्रा अनेक छंद । वीरभाटवि विनोद । प्रसंगें करावें ॥ १४ ॥ नाना नवरसिक शृंगारिक । गद्यपद्यांचें कौतुक । नाना वचनें प्रस्तावीक । शास्त्राधारें बोलावीं ॥ १५ ॥ भक्तिज्ञानवैराग्यलक्षण । नीति न्याय स्वधर्मरक्षण । साधनमार्ग अध्यात्मनिरूपण । प्रांजळ बोलावें ॥ १६ ॥ प्रसंगीं हरिकथा करावी । सगुणीं सगुणकीर्ति धरावी । निर्गुणप्रसंगीं वाढवावी । अध्यात्मविद्या ॥ १७ ॥ पूर्वपक्ष त्याहून सिद्धान्त । निरूपण करावें नेमस्त । बहुधा बोलणें अस्ताव्यस्त । बोलोंचि नये ॥ १८ ॥ करावें वेदपारायण । सांगावें जनांसि पुराण । मायाब्रह्मींचें विवरण । संकल्प वदावें ॥ १९ ॥ ब्राह्मण्य रक्षावें आदरें । उपासनेचीं भजनद्वारें । गुरुपरंपरा निर्धारें । चळोंच न द्यावीं ॥ २० ॥ करावें वैराग्यरक्षण । रक्षावें ज्ञानाचें लक्षण । परमदक्ष विचक्षण । सर्वहि सांभाळीं ॥ २१ ॥ कीर्तन ऐकतां संदेह पडे । सत्य समाधान तें उडे । नीतिन्यायसाधन गोडे । ऐसें न बोलावें ॥ २२ ॥ सगुणहरिकथा या नांव कीर्तन । अद्वैत म्हणजे निरूपण । सगुण रक्षून निर्गुण । बोलत जावें ॥ २३ ॥ असो वक्तृत्वाचा अधिकार । अल्पास न घडे सत्योत्तर । वक्ता पाहिजे साचार । अनुभवाचा ॥ २४ ॥ सकळ रक्षून ज्ञान सांगे । जेणें वेदाज्ञा न भंगे । उत्तम सन्मार्ग लागे । प्राणिमात्रासी ॥ २५ ॥ असो हें सकळहि सांडून । करावें गुणानुवादकीर्तन । या नांव भगवद्भजन । दुसरी भक्ति ॥ २६ ॥ कीर्तनें महादोष जाती । कीर्तनें होय उत्तम गति । कीर्तनें भगवत् प्राप्ति । यैसेंथीं संशय नाहीं ॥ २७ ॥ कीर्तनें वाचा पवित्र । कीर्तनें होय सत्पात्र । हरिकीर्तनें प्राणिमात्र । सुशीळ होती ॥ २८ ॥

---

१ सत्वरपणा. २ कथेचा संबंध. ३ पद्धत, लांबगोष्टी. ४ टाळ्या, हातांत पितळेच्या चपट्या पट्या वाजवितात, त्या. ५ गीतप्रबंध आख्याने. ६ गोष्टी. ७ पूर्वापरसंबंध. ८ श्लोकरचना. ९ धाटणी, रीत. १० तोंडवळा, अभिनय. ११ कवितेंतील अनुष्टुभ्, त्रिष्टुभ् इत्यादि छंद. १२ वीरांची स्तुति. १३ शृंगार, वीर, करुणा, इत्यादि नऊ रसांतील. १४ उपोद्घातरूप. १५ निर्गुणरूपाचे विवेचनाचे वेळीं. १६ दुसऱ्याच्या उत्तराची इच्छा करून शंकापूर्वक कांहीं मताचा केलेला उपन्यास–उपक्रम–तो. १७ सांगणें. १८ वेदपठन. १९ स्पष्टीकरण २० सकल. २१ ब्राह्मणपणा. २२ शहाणा, हुशार. २३ अल्पज्ञान्यास सत्य उत्तर देतां येत नाहीं. २४ खरा. २५ ज्याविषयीं.

कीर्तनें अव्यग्रता घडे । कीर्तनें निश्चय सांपडे । कीर्तनें संदेह उडे । श्रोत्यावक्त्यांचा ॥ २९ ॥ सदासर्वदा हरिकीर्तन । ब्रह्मसुत करी आपण । तेणें नारद तोचि नारायण । बोलिजेत आहे ॥ ३० ॥ ह्मणोन कीर्तनाचा अगाध महिमा । कीर्तनें संतोषे परमात्मा । सकळ तीर्थें आणि जगदात्मा । हरिकीर्तनीं वसे ॥ ३१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चतुर्थदशके कीर्तन-भजननिरूपणं नाम द्वितीयःसमासः ॥ २ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ मागां निरूपिलें कीर्तन । जें सकळांसि करी पावन । आतां ऐका विष्णुस्मरण । तिसरी भक्ति ॥ १ ॥ स्मरण देवांचें करावें । अखंड नाम जपत जावें । नामस्मरणें पावावें । समाधान ॥ २ ॥ नित्य नेम प्रातःकाळीं । मध्यान्हकाळीं सायंकाळीं । नामस्मरण सर्वकाळीं । करीत जावें ॥ ३ ॥ सुख दुःख उद्वेग चिंता । अथवा आनंदरूप असतां । नामस्मरणेंविण सर्वथा । राहोंचि नये ॥ ४ ॥ हर्षकाळीं विषमकाळीं । पर्वकाळीं प्रस्तावेकाळीं । विश्रांतिकाळीं निद्राकाळीं ॥ नामस्मरण करावें ॥ ५ ॥ कोडें सांकडें संकट । नाना संसारखटपट । अवस्था लागतां चटपट । नामस्मरण करावें ॥ ६ ॥ चालतां बोलतां धंदा करितां । खातां जेवितां सुखी होतां । नाना उपभोग भोगितां । नाम विसरूं नये ॥ ७ ॥ संपत्ति अथवा विपत्ति । जैसी पडेल काळगति । परी नामस्मरणाची स्थिति । सांडूच नये ॥ ८ ॥ वैभव सामर्थ्य आणि सत्ता । नाना पदार्थ चालतां । उत्कट भाग्यश्री भोगितां । नाम सांडूं नये ॥ ९ ॥ आधीं अवदसा मग दशा । अथवा दशे उपरी अवदसा । प्रसंग भलतैसा । परंतु नाम सांडूं नये ॥ १० ॥ नामें संकटें नासती । नामें विघ्नें निवारती । नामस्मरणें पाविजेती । उत्तम पदें ॥ ११ ॥ भूत पिशाच नाना छंद । ब्रह्मग्रह ब्राह्मणसंबंध । मंत्रचळ नाना खेद । नामनिष्ठें नासती ॥ १२ ॥ नामें विषबाधा हरती । नामें चेडें चेटके नासती । नामें होय उत्तम गति । अंतकाळीं ॥ १३ ॥ बाळपणीं तरुणकाळीं । कठिणकाळीं वृद्धापकाळीं । सर्वकाळीं अंतकाळीं । नामस्मरण असावें ॥ १४ ॥ नामाचा महिमा जाणे शंकर । जना उपदेशी विश्वेश्वर । वाराणसी मुक्तिक्षेत्र । रामनामें करूनी ॥ १५ ॥ उफराट्या नामासाठीं । वाल्मीक तरला उठाउठी । भविष्य वदला शतकोटी । चरित्र रघुनाथाचें ॥ १६ ॥ हरिनामें प्रल्हाद तरला । नाना आघातांपासून सुटला । नारायणनामें पावन झाला । आजामेळ ॥ १७ ॥ नामें पाषाण तरले । असंख्यात भक्त उद्धरले । महापापी तेचि झाले । परम पवित्र ॥ १८ ॥ परमेश्वराचीं अनंत नामें । स्मरतां तरिजे नित्य नेमें । नामस्मरण करितां यमें । बाधिजेना ॥ १९ ॥ सहस्रनामांमध्यें

---

१ चित्ताची समाधानता. २ संशय. ३ नारद. ४ मोठा. ५ पवित्र. ६ सर्वकाल. ७ खेद, अस्वास्थ्य. ८ संकटकाळी. ९ ग्रहणादि स्नानदानादि पुण्यकर्माचे काळी. १० गोष्टीच्या प्रारंभी. ११ कचाट, अडचण. १२ संकट. १३ भाग्योदय. १४ वाईट स्थिति. १५ नाद, चाळे. १६ ब्रह्मराक्षस. १७ मंत्राच्या चुकीनें लागलेले वेड. १८ पिशाच्चबाधा. १९ जादू. २० काशी क्षेत्रांतील विश्वेश्वर. २१ वरुणा व अशी या दोन नद्यांमधील क्षेत्र, काशी. २२ 'राम' याच्या उलट 'मरा' अशा जपानें. २३ तत्काल. २४ संकटांपासून.

कोणी एक । म्हणतां होतसे सार्थक । नामस्मरणें पुण्यश्लोक[1] । होइजे स्वयें ॥ २० ॥ कांहींच न करून प्राणी । रामनाम जपे वाणी । तेणें संतुष्ट चक्रपाणि[2] । भक्तांलागीं सांभाळी ॥ २१ ॥ नाम स्मरे निरंतर । तें जाणावें पुण्यशरीर । महादोषांचे गिरिवर[3] रामनामें नासती ॥ २२ ॥ अगाध महिमा नें वेंचे वदला । नामें बहुत जन उद्धरला । हालाहलापासून[4] सुटला । प्रत्यक्ष चंद्रमौळी[5] ॥ २३ ॥ चहूं वर्णांस नामाधिकार । नामीं नाहीं लहानथोर । जडमूढ पैलपार । पावती नामें ॥ २४ ॥ म्हणोनि नाम अखंड स्मरावें । रूप मनीं आठवावें । तिसरे भक्तीचें स्वभावें । लक्षण ऐसें ॥ २५ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चतुर्थदशके नामस्मरणनिरूपणं नाम तृतीयः समासः ॥ ३ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ मागां जाहलें निरूपण । नामस्मरणाचें लक्षण । आतां ऐका पादसेवन । चौथी भक्ति ॥ १ ॥ पादसेवन तेंचि जाणावें । कायावाचामनोभावें । सद्गुरुपाय सेवावे । सद्भक्तिकारणें ॥ २ ॥ या नांव पादसेवन । सद्गुरुपदीं अनन्यशरण[6] । निरसावया जन्ममरण[7] । यातायाती ॥ ३ ॥ सद्गुरुकृपेविण कांहीं । भवतरणोपाय नाहीं । याकारणें लवलाही[8] । सद्गुरुपाय सेवावे ॥ ४ ॥ सद्वस्तु दाखवी सद्गुरु । सकळ सारासार विचारू । परब्रह्माचा निर्धारू[9] । अंतरीं बाणे ॥ ५ ॥ जे वस्तु दृष्टी दिसेना । आणि मनासही भासेना । संगत्यागेविण येइना[10] । अनुभवासी ॥ ६ ॥ अनुभव घेतां संगत्याग नसे । संगत्यागाविण अनुभव न दिसे । हें अनुभवियासीच भासे । येरां गोंधागोंवों[11] ॥ ७ ॥ संगत्याग[12] ज्ञाणि निवेदनें[13] । विदेहस्थिति[14] अलिप्तपणें[15] । सहजस्थिति उन्मनी विज्ञान[16] । हे सप्तहि एकरूपी ॥ ८ ॥ यांहीं वेगळा नामाभिधानें[17] । समाधानाचीं संकेतवचनें[18] । हें सकळहि पादसेवनें । उमजों लागे ॥ ९ ॥ वेद[19] श्रुतिगर्भ[20] वेदांत[21] । सिद्धभावगर्भ सिद्धान्त[22] । अनुभव अनिर्वाच्य धर्मदांत[23] । सत्यवस्तु ॥ १० ॥ बहुधा अनुभवाचीं अंगें । सकळ कळती संतसंगें । चौथे भक्तीचे प्रसंगें । गौप्य[24] तें प्रकटे ॥ ११ ॥ प्रकट असोनि नसे । गौप्य असोनि भासे । भासाअभासाहुनि अनारिसें[25] । गुरुगम्य मार्ग[26] ॥ १२ ॥ मार्ग होय परी अंतरिक्ष[27] । जेथें सर्वहि पूर्वपक्ष[28] । पाहूं जातां अलक्ष[29] । लक्षवेना ॥ १३ ॥ लक्षें जयासि लक्षावें । ध्यानें जयासि ध्यावें । तैसें तेंचि आपण व्हावें ।

---

१ ज्याचे नामकीर्तनानें पुण्य लागतें असा. २ विष्णु. ३ मोठेपर्वत. ४ सांगतां येत नाहीं. ५ हालाहल विषापासून. ६ शंकर. ७ सर्वस्वीं शरण. ८ नाश करण्याकरितां. ९ ब्रह्मस्वरूप. १० निश्चय. ११ देहबुद्धि टाकल्यावांचून. १२ घोटाळा. १३ परमेश्वराचे ठिकाणीं अर्पणें. १४ देहबुद्धिविरहित अवस्था. १५ वैराग्य. १६ ब्रह्मस्थिति. १७ मनाचा लय होतो ती पांचवी अवस्था. १८ अनुभवज्ञान. १९ नामें, संज्ञा. २० सूत्रें, अडाखे. २१ समजूं लागतें. २२ चारवेद. २३ वेदश्रुतींचा सारांश. २४ ब्रह्माशीं जीवाचें ऐक्य प्रतिपादन करणारा वेदांचा शेवटचा भाग, उपनिषदें वगैरे. २५. सिद्धांच्या अभिप्रायांचें रहस्य. २६ गुरुप्रतीति २७ सांगण्यांत अशक्य. २८ शास्त्रमतास अनुकूल असो वा नसो, आपल्या स्वतःच्या अनुभवानेंच ठरविलेला सिद्धांत. २९ परब्रह्म. ३० गुप्त गोष्ट. ३१ वेगळा. ३२ गुरूपासूनच कळणारा. ३३ अलक्ष, गूढ. ३४ शंका. ३५ लक्षांत न येणारा.

त्रिविधा[1] प्रचिती ॥ १४ ॥ असो हीं अनुभवाचीं द्वारें । कळती सारासारविचारें । सत्संगेंकरूनि सत्योत्तरें । प्रत्ययासी येती ॥ १५ ॥ सत्य पाहतां नाहीं असत्य । असत्य पाहतां नाहीं सत्य । सत्य असत्याचें कृत्य । पाहणारापासीं ॥ १६ ॥ पाहणार पाहणें जया लागलें । तें तद्रूपत्वें प्राप्त जाहलें । तरी मग जाणावें बाणलें । समाधान ॥ १७ ॥ नाना समाधानें[2] पाहतां । बाणतीं सद्गुरुकृपेंकरितां[3] । सद्गुरुविण सर्वथा । सन्मार्ग नसे ॥ १८ ॥ प्रयोग साधनें सायास । नाना सौक्ष्मेंपें[4] विद्याभ्यास । अभ्यासें कांहीं गुरुगम्यास । पाविजेत नाहीं ॥ १९ ॥ जें अभ्यासें अभ्यासितां नये । जें साधनें असाध्य होय । तें हें सद्गुरुविण काय । उमजो जाणें ॥ २० ॥ या कारणें ज्ञानमार्ग । कळाया धरावा सत्संग । सत्संगेविण प्रसंग[5] । बोलोंचि नये ॥ २१ ॥ सेवावे सद्गुरुचे चरण । या नांव पादसेवन । चौथे भक्तीचें लक्षण । तें हें निरूपिलें ॥ २२ ॥ देव ब्राह्मण महानुभाव[6] । सत्पात्रें भजनाचा ठाव । ऐसिये ठायीं सद्भाव । दृढ धरावा ॥ २३ ॥ हें प्रवृत्तीचें बोलणें । बोलिलें रक्षायाकारणें । परंतु सद्गुरुपादसेवणें । या नांव पादसेवन ॥ २४ ॥ पादसेवन चौथी भक्ति । पावन करितसे त्रिजगतीं । जेयेकरितां सायुज्यमुक्ति[7] । साधकांसि होय ॥ २५ ॥ म्हणोनि थोराहूनि थोर । चौथे[8] भक्तीचा निर्धार । जेयेकरितां[9] पैलपार । बहुत प्राणी पावती ॥ २६ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चतुर्थदशके पादसेवनभक्तिनिरूपणं नाम चतुर्थः समास ॥ ४ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ मागें जाहलें निरूपण । चौथे[10] भक्तीचें लक्षण । आतां ऐका सावधान । पांचवी भक्ति ॥ १ ॥ पांचवी भक्ति ते अर्चनें[11] । अर्चन म्हणजे देवतार्चन । शास्त्रोक्त पूजाविधान । केलें पाहिजे ॥ २ ॥ नाना आसनें उपकरणें । वस्त्रें अलंकारभूषणें । मानसपूजा मूर्तीध्यानें । या नांव पांचवी भक्ति ॥ ३ ॥ देव ब्राह्मण अग्निपूजन । संत साधु अतिथिपूजन । यति[12] महानुभाव गायत्रीपूजन । या नांव पांचवी भक्ति ॥ ४ ॥ धातु पाषाण मृत्तिकापूजन । चित्रलेपें[13] सत्पात्रपूजन । आपुले गृहींचें देवतार्चन । या नांव पांचवी भक्ति ॥ ५ ॥ शिळा सप्तांकित[14] नवांकित[15] । शाळग्रामशंकेलें[16] चक्रांकित[17] । लिंगें[18] सूर्यकांत सोमकांत । बाण तांदळे[19] नर्मदे[20] ॥ ६ ॥ भैरवभगवती मल्लारी । मुंजा नृसिंह बनशंकरी । नाग नाणीं नानापरी । पंचायतनेंपूजा ॥ ७ ॥

---

१ गुरुप्रतीति, शास्त्रप्रतीति आणि आत्मप्रतीति अशा तीन प्रकारच्या प्रतीति म्हणजे अनुभव आहेत. २ अनुभव. ३ ब्रह्माकार होऊन. ४ सद्गुरूमुळें. ५ प्रयत्नांनीं. ६ समय, व्यवहार. ७ महात्मे, मोठे. ८ विधिनिषेधयुक्त व्यवहारिक मार्गाचें. ९ जिच्यामुळें. १० ईश्वरस्वरूपी मिळविणारी चौथी मुक्ति ११ मोक्षादि कार्य संपादन करण्याविषयीं अत्यंत उत्सुक त्यांस. १२ पादसेवन. १३ जिच्यामुळें. १४ पूजन. १५ शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें. १६ पूजेचीं भांडीं. १७ संन्यासी. १८ महात्मे, साधु. १९ सुवर्णादिकधातूंच्या मूर्ती. २० तसबीर, चित्र. २१ साताच्या अथवा नवाच्या आंकड्याच्या वळणाची चक्रें असलेले शाळिग्राम. २२ खंड किंवा तुकडे. २३ चक्राचें चिन्हांनींयुक्त पांढरे दगड. २४ सूर्यकिरणांच्या स्पर्शानें ज्यांतून अग्नि उत्पन्न होतो असा तेजस्वी पाषाण. २५ चंद्र किरणांनीं पाझरणारा पाषाण. २६ अवयवरहित सिंदूरलिप्त पाषाणाचे देव. २७ नर्मदा नदींतील गणपति, बाण. २८ शिवपार्वती. २९ विष्णु, शंकर, देवी, सूर्य व गणपति यांचें पूजन.

गणेश शारदा विठ्ठलमूर्ति । रंगनाथ जगन्नाथ तांडवमूर्ति । श्रीरंग हनुमंत गरुडमूर्ति । देवतार्चनीं पूजाव्या ॥ ८ ॥ मत्स्य कूर्म वराहमूर्ति । नृसिंह भार्गव वामनमूर्ति । राम कृष्ण हयग्रीवमूर्ति । देवतार्चनीं पूजाव्या ॥ ९ ॥ केशव नारायण माधवमूर्ति । गोविंद विष्णु मधुसूदनमूर्ति । त्रिविक्रम वामन श्रीधरमूर्ति । हृषीकेश पद्मनाभ ॥ १० ॥ दामोदर संकर्षण वासुदेवमूर्ति । प्रद्युम्न अनिरुद्ध पुरुषोत्तममूर्ति । अधोक्षज नारसिंह अच्युतमूर्ति । जनार्दन आणि उपेंद्र ॥ ११ ॥ हरिहरांच्या अनंतमूर्ती । भगवंत जगदात्मा जगदीशमूर्ति । शिवशक्तींच्या बहुधा मूर्ती । देवतार्चनीं पूजाव्या ॥ १२ ॥ अश्वत्थ-नारायण सूर्यनारायण । लक्ष्मीनारायण त्रिमल्लनारायण । श्रीहरि नारायण आदिनारायण । शेषशायी परमात्मा ॥ १३ ॥ ऐशा परमेश्वराच्या मूर्ती । पाहूं जातां उदंड असती । त्यांचें अर्चन करावें भक्ति । पांचवी ऐसी ॥ १४ ॥ याही वेगळे कुळधर्म । सोडूं नये अनुक्रम । उत्तम अथवा मध्यम । करीत जावे ॥ १५ ॥ जाखमाता मायराणी । बाळा बगळा मानविणी । पूजावि मांगणी जोगिणी । कुळधर्म करावे ॥ १६ ॥ नाना तीर्थीं क्षेत्रीं जावें । तेथें त्या देवाचें पूजन करावें । नाना उपचारें पूजावें । परमेश्वरासी ॥ १७ ॥ पंचामृतें गंधाक्षतें । पुष्पें परिमळद्रव्यें बहुतें । धूप दीप असंख्यातें । नीरांजनें कर्पुरांचीं ॥ १८ ॥ नाना खाद्य नैवेद्य सुंदर । नाना फळें तांबुलप्रकार । दक्षिणा नाना अलंकार । दिव्यांबरें वनमाळा ॥ १९ ॥ शिबिका छत्रें सुखासनें । माहि मेघडंबरें सूर्यपानें । दिंड्या पताका निशाणें । ताल घोळ मृदंग ॥ २० ॥ नाना वाद्यें नाना उत्साव । नाना भक्तसमुदाव गाती हरिदास सद्भाव । लागला भगवंता ॥ २१ ॥ वापी कूप सरोवरें । नाना देवालयें शिखरें ॥ । राजांगणें मनोहरें । वृंदावनें भुयारीं ॥ २२ ॥ मठ मंडप धर्मशाळा । देवद्वारीं पडशाळा । नाना उपकरणें नक्षत्रमाळा । नाना वस्त्रसामुग्री ॥ २३ ॥ नाना पडदे मंडप चांदवे । नाना रत्नें घोंस लोंबती बरवे । नाना देवालयीं समर्पावे । हस्ती घोडे शकटें ॥ २४ ॥ अलंकार आणि अलंकारपात्रें । द्रव्य आणि द्रव्यपात्रें । अन्नोदक आणि अन्नोदकपात्रें । नाना प्रकारचीं ॥ २५ ॥ वनें उपवनें पुष्पवाटिका । तापसांच्या पर्णकुटिका । ऐसी पूजा जगन्नायका । यथासांग समर्पावी ॥ २६ ॥ शुकें सारिका मयूरें । बदक चक्रवाकें चकोरें । कोकिळा चितळे सामरें । देवालयीं समर्पावीं ॥ २७ ॥ सुगंधमृगें आणि मार्जारें । गाई महिषी वृषभ वानरें । नाना पदार्थ आणि लेंकुरें । देवालयीं

---

१ नृत्य करणारी मूर्ति. २ परशुराम. ३ हयग्रीव=विष्णूचा एक अवतार, त्याची मान घोड्या-सारखी व खालील भाग मनुष्यासारखा होता. ४ पिंपळ. ५ शेषावर शयन करणारा. ६ देवता-विशेष. ७ सुवासिक गंधकर्पूरादि पदार्थ. ८ पुष्कळ. ९ आरती ओंवाळणें. १० विड्यांचे वेगवेगळे प्रकार. ११ सुंदर उंची वस्त्रें. १२ वन्य पुष्पांच्या माला. १३ पालख्या. १४ सुखानें बसण्यास योग्य असें वाहन मेणा वगैरे. १५ छत्री. १६ मोठी छत्री; मूर्तीवर वगैरे धरतात ती. १७ अब्दागिरी. १८ छबिने. १९ घुमट, कळस. २० मोठेमोठे चौक. २१ कागदांच्या वगैरे सुंदर फुलांच्या माळा करून त्या काठीस बांधून समारंभापुढें चालवितात त्या; सत्तावीस मोत्यांचे हार. २२ छतें. २३ गाडे. २४ झोंपड्या. २५ पोपट. २६ मैना. २७ सांबर, हरण. २८ कस्तूरीमृग. २९ बैल.

समर्पावीं ॥ २८ ॥ काया वाचा आणि मनें । चित्तें वित्तें आणि प्राणें । सद्भावें भगवद्चर्चनें । या नांव अर्चनभक्ती ॥ २९ ॥ ऐसींचि सद्गुरूचें भजन । करूनि असावें अनन्य । या नांव भगवद्भजन । पांचवी भक्ति ॥ ३० ॥ ऐसी पूजा न घडे बरवी । तरी मानसपूजा करावी । मानसपूजा अगत्य व्हावी । परमेश्वरासी ॥ ३१ ॥ मनें भगवंतासि पूजावें । कल्पून सर्वहि समर्पावें । मानसपूजेचें जाणावें । लक्षण ऐसें ॥ ३२ ॥ जें जें आपणासि पाहिजे । तें तें कल्पून वाहिजे । येणें प्रकारें कीजे । मानसपूजा ॥ ३३ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चतुर्थदशके अर्चनभक्तिनिरूपणं नाम पंचमः समासः ॥ ५ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ मागें झालें निरूपण । पांचवे भक्तीचें लक्षण । आतां ऐका सावधान । सहावी भक्ति ॥ १ ॥ सहावी भक्ति ते वंदन । करावें देवासि नमन । संत साधु आणि सज्जन । नमस्कारीत जावे ॥ २ ॥ सूर्यासि करावे नमस्कार । देवासि करावे नमस्कार । सद्गुरूस करावे नमस्कार । साष्टांग भावें ॥ ३ ॥ साष्टांग नमस्कारासि अधिकारू । नाना प्रतिमा देव गुरू । अन्यत्र नमनाचा विचारू । अधिकारें करावा ॥ ४ ॥ छप्पन्न कोटी वसुमती । मध्यें विष्णुमूर्ति असती । तयांस नमस्कार प्रीतीं- साष्टांग घालावे ॥ ५ ॥ पशुपति श्रीपति आणि गभस्ती । यांचिया दर्शनें दोष जाती । तैसाचि नमावा मारुती । नित्य नेमें विशेष ॥ ६ ॥ ॥ श्लोक ॥ शंकरः शेषशायी च मार्तंडो मारुतिस्तथा । एतेषां दर्शनं पुण्यं नित्यनेमे विशेषतः ॥ १ ॥ भक्त ज्ञानी आणि वीतरागी । महानुभाव तापसी योगी । सत्पात्र देखोनि वेगीं । नमस्कार घालावे ॥ ७ ॥ वेदज्ञ शास्त्रज्ञ आणि सर्वज्ञ । पंडित पुराणिक आणि विद्वज्जन । याज्ञिक वैदिक पवित्र जन । नमस्कारीत जावे ॥ ८ ॥ जेथें दिसती विशेष गुण । तेचि सद्गुरूचें अधिष्ठान । याकारणें तयासि नमन । अत्यादरें करावें ॥ ९ ॥ गणेश शारदा नाना शक्ती । हरिहरांच्या अवतारमूर्ती । नाना देव सांगू किती । पृथगाकारें ॥ १० ॥ सर्व देवासि नमस्कारिलें । तें एका भगवंतासि पावलें । यदर्थीं एक वचन बोलिलें । आहे तें ऐका ॥ ११ ॥ ॥ श्लोक ॥ आकाशात्पतितं तोयं यथा गच्छति सागरं । सर्वदेवनमस्कारः केशवं प्रति- गच्छती ॥ १ ॥ याकारणें सर्व देवांसी । नमस्कारावें अत्यादरेंसी । अधिष्ठान मानितां देवासी । परम सौख्य वाटे ॥ १२ ॥ देव देवांचीं अधिष्ठानें । सत्पात्र सद्गुरूचीं स्थानें । या कारणें नमस्कार करणें । उभयमार्गीं ॥ १३ ॥ नमस्कारें लीनता घडे । नमस्कारें विकल्प मोडे । नमस्कारें सख्य घडे । नाना सत्पात्रांसी ॥ १४ ॥ नमस्कारें दोष जाती । नमस्कारें अन्याय क्षमिती[16] । नमस्कारें मोडली जडती । समाधानें ॥ १५ ॥ सीसापर्यंता नाहीं दंड । ऐसें बोलती उदंड[17] । या कारणें अखंड । देवभक्त वंदावे ॥ १६ ॥ नमस्कारें कृपा उचंबळे । नमस्कारें प्रसन्नता प्रबळे । नमस्कारें गुरुदेव वोळे[18] । साधकावरी ॥ १७ ॥ विशेष करितां

---

१ एकाच ठिकाणीं निष्ठा ठेवून. २ मूर्ति. ३ पृथ्वी. ४ शिव. ५ विष्णु. ६ सूर्य. ७ महात्मे. ८ स्थान. ९ देवता. १० वेगळे वेगळे आकारांनीं, निरनिराळ्या प्रकारांनीं. ११ याविषयीं. १२ योग्य. १३ दोषांनाही, देवास व सद्गुरूस. १४ नम्रपणा. १५ विरुद्ध कल्पना. १६ क्षमा केले जातात. १७ मस्तकाहून. १८ पुष्कळ. १९ सर्वदा. २० वाढते. २१ वळतो, प्रसन्न होतो. २२ मोक्षाचीं साधनें करणाऱ्याला.

नमस्कार । नासती दोषांचे गिरिवर[1] । आणि मुख्य परमेश्वर । कृपा करी ॥ १८ ॥ नमस्कारें पतित पावन । नमस्कारें संतासि शरण । नमस्कारें जन्म-मरण । दूरी दूरावे ॥ १९ ॥ परम अन्याय करून आला । आणि साष्टांग[2] नमस्कार घातला । तरी तो अन्याय क्षमा केला । पाहिजे श्रेष्ठीं ॥ २० ॥ या कारणें नमस्कारापरतें । आणिक नाहीं अनुसरतें[3] । नमस्कारें प्राणियातें । सद्बुद्धि लागे ॥ २१ ॥ नमस्कारासि वेंचावें[4] नलगे । नमस्कारासि कष्टावें नलगे । नमस्कारासि कांहींच नलगे । उपकरण[5] सामुग्री[6] ॥ २२ ॥ नमस्काराऐसें नाहीं सोपें । नमस्कार करावा अनन्यरूपें । नाना साधनीं साँक्षेपें[7] । कासया शिणावें ॥ २३ ॥ साधक भावें नमस्कार घाली । त्याची चिंता साधूस लागली । सुगम पंथें[8] नेऊन घाली । जेथील तेथें ॥ २४ ॥ या कारणें नमस्कार श्रेष्ठ । नमस्कारें वोळती वरिष्ठ । येथें सांगीतली स्पष्ट । सहावी भक्ति ॥ २५ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चतुर्थदशके वंदनभक्तिनिरूपणं नाम षष्ठः समासः ॥ ६ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ मागें जाहलें निरूपण । सहावे भक्तीचें लक्षण । आतां ऐका सावधान । सातवी भक्ति ॥ १ ॥ सातवें भजन तें दास्य जाणावें । पहिलें कार्य तितुकें करावें । सदा सन्निधचि असावें । देवद्वारीं ॥ २ ॥ देवाचें वैभव सांभाळावें । न्यूनपूर्ण पडूंचि न द्यावें । चढतें वाढतें वाढवावें । भजन देवाचें ॥ ॥ ३ ॥ भंगली[9] देवालयें करावीं[10] । मोडिलीं सरोवरें बांधावीं । सोपे धर्मशाळा चालवावीं । नूतनची[11] कार्यें ॥ ४ ॥ नाना रचना जीर्ण जर्जर[12] । त्यांचें करावे जीर्णोद्धार[13] । पडिलें कार्य तें सत्वर । चालवीत जावें ॥ ५ ॥ गज रथ तुरंग[14] सिंहासनें । चौकियां[15] शिबिका[16] सुखासनें । मंचक[17] डोल्हारे[18] विमानें । नूतनची करावीं ॥६॥ मेघडंबरें[19] छत्रें चामरें । सूर्यपानें[20] निशाणें अपारें । नित्य नूतन अत्यादरें । सांभाळीत जावीं ॥ ७ ॥ नाना प्रकारचीं यानें[21] । बैसावयाचीं उत्तम स्थानें[22] । बहुविधा सुवर्णासनें । यत्नें करीत जावीं ॥ ८ ॥ भुवनें[23] पेट्या कोट्या मांदुसा[24] । रांझण कोहळी[25] घागरी बहुवसा[26] । संपूर्ण द्रव्यांश ऐसा । अति यत्नें करावा ॥९॥ भुयारीं तळघरें आणि विवरें[27] । नाना स्थळें गुप्तद्वारें । अनैर्घ्य[28] वस्तूंचीं भांडारें[29] । यत्नें करीत जावीं ॥ १० ॥ अलंकार भूषणें दिव्यांबरें[30] । नाना रत्नें मनोहरें । नाना धातू सुवर्णपात्रें । यत्नें करीत जावीं ॥ ११ ॥ पुष्पवाटिका नाना वनें । नाना तरुवरांचीं बनें[31] । पावतीं करावीं

---

१ मोठमोठेपर्वत. २ जानुभ्यां च तथा पद्भ्यां पाणिभ्यामुरसा धिया । शिरसा वचसा दृष्ट्या प्रणामोऽष्टांग ईरितः' असा आठ अंगांचा प्र०. ३ योग्य, विशेष उपयोगी. ४ खर्च करावें लागत नाहीं. ५ पूजेचीं भांडीं वगैरे सामान. ६ एकनिष्ठतेनें. ७ प्रयत्नानें. ८ कशाकरितां. ९ सोप्या मार्गानें. १० कर्मीजास्त. ११ मोडलेलीं. १२ अगदीं नवीं. १३ मोडकळीस आलेलीं. १४ जीर्ण मंदिरें, देवालयें इत्यादि नवीं करणें. १५ घोडे. १६ लहान चौरंग. १७ पालख्या. १८ पलंग. १९ लहानसे झोंपाळे. २० मोठ्या छत्र्या. २१ चवऱ्या. २२ अब्दागिरी. २३ वाहनें. २४ स्थानें, मंदिरें. २५ मोठ्या पेट्या. २६ आंत द्रव्य ठेवण्याकरितां तयार केलेले मोठमोठे कोहळे. २७ अनेक प्रकारच्या. २८ खोल बिळें. २९ अमूल्य. ३० कोठारें. ३१ उंचीं वस्त्रें. ३२ वनांचे. ३३ उत्तम वृक्षांची. ३४ झाडी, राई.

जीवनें[1] । तयां वृक्षांसी ॥ १२ ॥ नाना पशूंचिया शाळा । नाना पक्षी चित्रशाळा । नाना वाद्यें नाटकेंशाळा । गुणी गायक बहुसाल[2] ॥ १३ ॥ स्वयंपाकगृहें भोजनशाळा । सामुग्रीगृहें धर्मशाळा[3] । निद्रिस्थाकारणें पडशाळा । विशाळ स्थळें ॥ १४ ॥ नाना परिमळद्रव्याची[4] स्थळें । नाना खाद्यफळांचीं स्थळें । नाना रसांचीं नाना स्थळें । यत्नें करीत जावीं ॥ १५ ॥ नाना वस्तूंचीं नाना स्थानें । भंगलीं करावीं नूतनें । देवाचें वैभव वैचनें । किती म्हणून सांगावें ॥ १६ ॥ सर्वांठायीं अतिसादर । आणि दास्यत्वासही तत्पर । कार्यभागाचा विसर । पडणार नाहीं ॥ १७ ॥ जयंत्या पर्वे महोत्सव । असंभाव्य चालवावें वैभव । जे देखतांची स्वर्गींचे देव । तटस्थ होती ॥ १८ ॥ ऐसें वैभव चालवावें । आणि नितें[5] दास्यत्वहि करावें । पडिले प्रसंगीं सावध असावें । सर्वकाळ ॥ १९ ॥ जें जें कांहीं पाहिजे । तें तें तात्काळाचि दीजे । अत्यंत आवडी कीजे । सकळ सेवा ॥ २० ॥ चरणक्षालनें स्नानें आचमनें । गंधाक्षतें वस्त्रेंनें भूषणें । आसनें जीवनें[6] नाना सुमनें[7] । धूप दीप नैवेद्य ॥ २१ ॥ शयनाकारणें उत्तम स्थळें । जळें ठेवावीं सुशीतळें । तांबुलें गायनें रसाळें । रागरंगें करावीं ॥ २२ ॥ परिमळद्रव्यें आणि फुलेलें[8] । नाना सुगंधिक तैलें । खाद्य फळें बहुसालें । सन्निधचि असावीं ॥ २३ ॥ सडे संमार्जनें करावीं । उदकपात्रें उदकें भरावीं । वसनें प्रक्षालून आणावीं । उत्तमोत्तमें ॥ २४ ॥ सकळांचें करावें पारपत्य । आलियाचें करावें आतिथ्य । ऐसी हे जाणावी सत्य । सातवी भक्ति ॥ २५ ॥ वचनें बोलावीं करुणेचीं । नाना प्रकारें स्तुतीचीं । अंतरें[9] निवती सकळांची । ऐसें वदावें ॥ २६ ॥ ऐसी हे सातवी भक्ति । निरूपिली यथामति । प्रत्यक्ष न घडे तरी चित्तीं । मानसपूजा करावी ॥ २७ ॥ ऐसें दास्य करावें देवाचें । येणेंचि प्रकारें सद्गुरूचें । प्रत्यक्ष न घडे तरी मानसपूजेचें । करीत जावें ॥ २८ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चतुर्थदशके दास्यभक्तिनिरूपणं नाम सप्तमः समासः ॥ ७ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ मागें जाहलें निरूपण । सातवे भक्तीचें लक्षण । आतां ऐका सावधान । आठवी भक्ति ॥ १ ॥ देवासि परम सख्य करावें । प्रेम प्रीतीनें बांधावें । आठवे भक्तीचें जाणावें । लक्षण ऐसें ॥ २ ॥ देवास जयाची अत्यंत प्रीति । आपण वर्तावें तेणेंचि रीतीं । येणेकरितां[10] भगवंतीं । सख्य घडे नेमस्त ॥ ३ ॥ भक्तिभावें आणि भजन । निरूपण आणि कथाकीर्तन । प्रेमळ भक्तांचें गायन । आवडे देवा ॥ ४ ॥ आपण तैसेंचि वर्तावें । आपणासि तेंच आवडावें । मनासारिखें होतांचि स्वभावें । सख्य घडे नेमस्त ॥ ५ ॥ देवाच्या सख्यत्वाकारणें । आपुलें सौख्य सोडून देणें । अनन्यभावें जीवें प्राणें । शरीर तेंहि वेंचावें[11] ॥ ६ ॥ सांडून आपली संसारव्यर्था । करीत जावी देवाची चिंता । निरूपण कीर्तन कथा वार्ता[12] । देवाच्या सांगाव्या ॥ ७ ॥

---

१ उदकें. २ नृत्यशाळा. ३ बहुत. ४ धर्मशाळा ५ सुगंधी पदार्थांची. ६ शब्दानें. ७ सेवेलाही. ८ अंगीकार केलेल्या कामाचा. ९ घडण्यास कठिण असें. १० नित्य, रोज. ११ परम प्रीतीनें. १२ पाय धुणें. १३ वस्त्रें. १४ पाणी. १५ पुष्पें. १६ विडे करावे. १७ गोड. १८ निरनिराळ्या रागांत मधुर गायन करावें. १९ अत्तरें. २० अनेक प्रकारची. २१ धुवून. २२ हृदयें. २३ यामुळें. याचे योगानें. २४ निष्ठा. २५ कथन, विवेचन. २६ एकनिष्ठेनें. २७ खर्ची घालावें. २८ संसाराचेंदुःख. २९ गोष्ट.

देवाच्या सख्यत्वासाठीं । पाडाव्या जिवलगांसि तुटी । सर्व अर्पावें शेवटीं । प्राण तोहि वेंचावा ॥ ८ ॥ आपुलें अवघेचि जावें । परी देवासि सख्य रहावें । ऐसी प्रीति जीवेंभावें । भगवंतीं लागावी ॥ ९ ॥ देव म्हणजे आपुला प्राण । प्राणासी न करावें निर्वाण[1] । प्रेम प्रीतीचें लक्षण । तें हें ऐसें असें ॥ १० ॥ ऐसें परम सख्य धरितां । देवास लागे भक्ताची चिंता । पांडव लाक्षाजोहरीं[2] जळतां । विवरद्वारें काढिलें ॥ ११ ॥ देव सख्यत्वें राहे आपणासी । हें तों वर्म आपणाचपासीं । आपण वचनें बोलावीं जैसीं । तैसीं येती पडसादें[3] ॥ १२ ॥ आपण असतां अनन्यभावें । देव तात्काळाचि पावे । आपण त्रास घेतां जीवें । देवहि त्रासे ॥ १३ ॥ श्लोकार्ध ॥ ॥ ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम् ॥ भ० गी० अ० ४ श्लो० ११ ॥ टीका ॥ ॥ जैसें जयाचें भजन । तैसाच देवहि आपण । म्हणोनि हें अवघें जाण । आपणाचि पासीं ॥ १४ ॥ आपुल्या मनासारिखें न घडे । तेणें गुणें निष्ठा मोडे । तरी गोष्टी आपणाकडे । सहजचि आली ॥ १५ ॥ मेघ चातकावरी वोळेना । तरी चातक पालटेना । चंद्र वेळेसि उगवेना । तरी चकोर अनन्य[4] ॥ १६ ॥ ऐसें असावें सख्यत्व । विवेकें धरावें सत्व[5] । भगवंतावरील ममत्व[6] । सांडूं नये कीं ॥ १७ ॥ सखा मानावा भगवंत । माता पिता गणगोत । विद्या लक्ष्मी धन वित्त । सकळही परमात्मा ॥ १८ ॥ देवावेगळें[7] कोणी नाहीं । ऐसें बोलती सर्वही । परंतु त्यांची निष्ठा कांहीं । तैसीचि नसे ॥ १९ ॥ म्हणोनि ऐसें न करावें । सख्य तरी खरेंच करावें । अंतरीं[8] सदृढ धरावें । परमेश्वरासी ॥ २० ॥ आपुलिया मनोगताकारणें[9] । देवावरी क्रोधासी येणें । ऐसीं नव्हेत कीं लक्षणें । सख्यभक्तीचीं ॥ २१ ॥ देवाचें जें मनोगत[10] । तेंचि आपुलें उचित[11] । इच्छेसाठीं भगवंत । अंतरूं नये कीं ॥ २२ ॥ देवाचे इच्छेनें वर्तावें । देव करील तें मानावें । मग सहजचि स्वभावें[12] । कृपाळु देव ॥ २३ ॥ पाहतां देवाचे कृपेसी । मातेची कृपा कायसी । माता वधी[13] बाळकासी । विपत्तिकाळीं[14] ॥ २४ ॥ देवें भक्त कोण वधिला । कधीं देखिला ना ऐकिला । शरणांगतांसि देव झाला । वज्रपंजरू[15] ॥ २५ ॥ देव भक्तांचा कैवारी । देव पतितासि[16] तारी । देव होय सहाकारी[17] । अनाथांचा ॥ २६ ॥ देव अनाथांचा कैपक्षी[18] । नाना संकटांपासून रक्षी । धाविन्नला अंतरसाक्षी[19] । गजेंद्राकारणें ॥ २७ ॥ देव कृपेचा सागर । देव करुणेचा जलधर[20] । देवासि भक्तांचा विसर । पडणार नाहीं ॥ २८ ॥ देव प्रीति राखों जाणें । देवांसी करावें साजेसें[21] । जिवलगें अवघीं पिसुणें[22] । कामा न येती ॥ २९ ॥ सख्य देवाचें तुटेना । प्रीति देवाची विटेना[23] । देव कदां

---

१ वियोग. २ अंत, नाश. ३ लाक्षागृहांतील अग्नीमध्यें. ४ प्रतिध्वनीनें. ५ वृष्टि करीना, प्रसन्न होईना. ६ एकनिष्ठ. ७ धैर्य, नेट ८ प्रीति, ममता. ९ सौंदर्य, शोभा. १० देवावांचून. ११ हृदयांत. १२ बळकट. १३ मनांतील हेतूकरितां. १४ हित. १५ आपल्या भक्तीनें. १६ ठार करी. १७ संकटाचे वेळीं. १८ शरण आलेल्यांस. १९ वज्राचा पिंजरा, दुर्भेद्य कवच, पक्का रक्षण करणारा. २० पाण्यांना. २१ मदत करणारा. २२ बाजू घेणारा. २३ मनांतील ओळखणारा. २४ मेघ. २५ सख्य, मैत्री. २६ वाईट, अनिष्ट करणारीं, २७ कंटाळा येत नाहीं, नाहींशी होत नाहीं.

पालटेना । शरणांगतांसी ॥ ३० ॥ म्हणोनि सख्य देवासि करावें । हितगुज तयास सांगावें । आठवे भक्तीचें जाणावें । लक्षण ऐसें ॥ ३१ ॥ जैसा देव तैसा गुरु । शास्त्रीं बोलिला हा विचारू । म्हणोनियां सख्यत्वाचा निर्धारू । सद्गुरूसी अभावा ॥ ३२ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चतुर्थदशके सख्यभक्तिनिरूपणं नाम अष्टमः समासः ॥ ८ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ मागें जाहलें निरूपण । आठवे भक्तीचें लक्षण । आतां ऐका सावधान । नववी भक्ति ॥ १ ॥ नवमीं निवेदन जाणावें । आत्मनिवेदन करावें । तेंहि सांगिजेल स्वभावें । प्रांजळ करूनी ॥ २ ॥ ऐका निवेदनाचें लक्षण । देवासि वाहावें आपर्ण । करावें तत्त्वविवरण । म्हणिजे कळे ॥ ३ ॥ मी भक्त ऐसें म्हणावें । आणि विभक्तपर्णें भजावें । हें अवघेंचि जाणावें । विलक्षण ॥ ४ ॥ लक्षण असोनि विलक्षण । ज्ञान असोनि अज्ञान । एक असोन विभक्तपण । तें हें ऐसे ॥ ५ ॥ भक्त म्हणजे विभक्त नव्हे । आणि विभक्त म्हणजे भक्त नव्हे । विचारेंविण कांहींच नव्हे । समाधान ॥ ६ ॥ तस्मात् विचार करावा । देव कोण तो ओळखावा । आपला आपण शोध घ्यावा । अंतर्यामीं ॥ ७ ॥ मी कोण ऐसा निवाडा । पाहों जातां तत्त्वझाडा । विचार पाहतां उघडा । आपण नाहीं ॥ ८ ॥ तत्त्वें तत्त्व जेव्हां सरे । तेव्हां आपण कैंचा उरे । आत्मनिवेदन येणेंप्रकारें । सहजाचि झालें ॥ ९ ॥ तत्त्वरूप सकळ भासे । विवेक पाहतां निरसे । प्रकृति निरसे आत्मा असे । आपण कैचा ॥ १० ॥ एक मुख्य परमेश्वर । दुसरी प्रकृति जगदाकार । तिसरा कैचा आपण चोर । आणिला मध्यें ॥ ११ ॥ ऐसें हें सिद्धचि असतां । नाथिलीचे लागे देहअहंता । परंतु विचारें पाहतां । कांहींच नसे ॥ १२ ॥ पाहतां तत्त्वविवेचना । पिंडब्रह्मांडरचना । विश्वाधारें व्यक्ति नाना । तत्त्वें विस्तारलीं ॥ १३ ॥ तत्त्वें साक्षित्वें ओसरतीं । साक्षित्व निरसे आत्मप्रतीतीं । आत्मा असे आदि अंतीं । आपण कैचा ॥ १४ ॥ आत्मा एक स्वानंदघन । आणि 'अहं आत्मा' हें वचन । तरी मग आपण कैचा भिन्न । उरला तेथें ॥ १५ ॥ सोहं हंसो हें उत्तर । याचें पाहावें अर्थांतर । पाहतां आत्मयाचा विचार । आपण कैचा तेथें ॥ १६ ॥ आत्मा निर्गुण निरंजन । तयासि असावें अनन्य । अनन्य ह्मणजे नाहीं अन्य । आपण कैचा

---

१ अंतर देणे, बदलणें, उलटणें. २ यस्य देवे पराभक्तिर्यथादेवेतथा गुरौ, तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशंते महात्मनः ॥३॥ श्वेताश्वतरोपनिषत्. ३ निश्चय. ४ अर्पिणें. ५ आपलें स्वतःचें अर्पण. ६ आपल्या स्वतःला ७ तत्त्वाचें विस्तारपूर्वक कथन. ८ वेगळेपणानें. ९ खऱ्या गोष्टींचा थांग, पृथिव्यादि एक एकतत्त्व मी नाहीं, असा मायेपर्यंत पत्ता लावीत गेलें असतां. १० नाहींसें होतें. ११ माया. १२ खोटी. १३ तत्त्व-विचार केला असतां. १४ पिंड–व्यष्टि (प्रत्येक जीवशरीर) आणि ब्रह्मांड–समष्टि (सर्व जीवशरीरे एकत्रपणें.) १५ आकार. १६ पृथिव्यादि भूतें. १७ आत्म्याला गोचर असल्यामुळें, आत्मा तत्त्वांचा साक्षी असल्यामुळें. १८ आत्मा म्हणजे मी, हा तत्त्वापैकीं एक नाहीं असें ठरतें. १९ आत्मानुभवांत, सर्व एक आत्मा असल्यामुळें, साक्षित्वही नाहींसें होतें. २० आत्मानुभवांत. २१ साक्षी. २२ आपल्या आनंदाचा बोध, स्वानंदपूर्ण. २३ ब्रह्मरूप आत्मा तो मीच. २४ हंस (ब्रह्मरूप) परमात्मा तो मीच. २५ प्रत्यय, अर्थ. २६ सत्त्व रज तम या तीन गुणांशिवाय. २७ मायेवांचून २८ एकनिष्ठ. २९ दुसरें.

तेथें ॥ १७ ॥ आत्मा म्हणिजे तो अद्वैत[1] । जेथें नाहीं द्वैताद्वैत[2] । तेथें मीपणाचा हेत[3] । उरेल कैचा ॥ १८ ॥ आत्मा पूर्णत्वें परिपूर्ण । तेथें नाहीं गुणागुण[4] । निखळ[5] निर्गुणीं आपण । कोण कैंचा ॥ १९ ॥ त्वंपद[6] तत्पद[7] असिपद[8] । निरसूनि सकळ भेदाभेद[9] । वस्तु-ठायींची[10] अभेद । आपण कैंचा ॥ २० ॥ निरसितां जीवशिवेउपाधि[11] । जीव शिवाचे कैंचे आधीं । स्वरूपीं होतां दृढबुद्धि । आपण कैंचा ॥ २१ ॥ आपण मिथ्या, साच देव । देव भक्त अनन्यभाव । या वचनाचा अभिप्राव । अनुभवी जाणती ॥ २२ ॥ या नांव आत्मनिवेदन । ज्ञानियांचें समाधान । नववे भक्तीचें लक्षण । निरूपिलें ॥ २३ ॥ पंचभूतांमध्यें आकाश । सकळ देवांमध्यें जगदीश । नवविधा भक्तीमध्यें विशेष । भक्ति नववी ॥ २४ ॥ नववी भक्ति आत्मनिवेदन । न होतां न चुके जन्ममरण । हें वचन सत्य प्रमाण । अन्यथा नव्हे ॥ २५ ॥ ऐसी हे नवविधा भक्ति । केलिया पाविजे सायुज्यमुक्ति । सायुज्यमुक्तीस कल्पांतीं[12] । चळण नाहीं ॥ २६ ॥ तिहीं मुक्तीस आहे चळण । सायुज्यमुक्ति अचळ[13] जाण । त्रैलोक्यास होतां निर्वाण[14] । सायुज्यमुक्ति चळेना ॥ २७ ॥ अवघिया चारी मुक्ती । वेदशास्त्रें बोलती । त्यांमध्यें तीन नासतीं । चौथी ते अविनाश ॥ २८ ॥ पहिली मुक्ति ते सलोकता[15] । दुसरी ते समीपता[16] । तिसरी ते सरूपता[17] । चौथी सायुज्यतामुक्ति[18] ॥ २९ ॥ ऐसिया चारी मुक्ती । भगद्भजनें प्राणी पावती । हें निरूपण प्रांजळ श्रोतां । सावध पुढें परिसावें ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चतुर्थदशके आत्म-निवेदननिरूपणं नाम नवमः समासः ॥ ९ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ मूळीं ब्रह्म निराकार । तेथें स्फूर्तिरूप[19] अहंकार । तो पंच-भूतांचा विचार । ज्ञानदशकीं[20] बोलिला ॥ १ ॥ तो अहंकार वायुरूप । तयावरी तेजाचें[21] स्वरूप । तया तेजाच्या आधारें आप[22] । आवर्णोदक[23] दाटलें ॥ २ ॥ तया आवर्णोदकाच्या आधारें । धरा[24] धरिली फणिवरें[25] । वरती छप्पन्नकोटि विस्तारें । वसुंधरा हे ॥ ३ ॥ इयेवरी परिघ[26] सप्त सागर[27] । मध्यें मेरु हा थोर । अष्ट दिक्पाळ तो परिवार[28] । अंतरें वेष्टित राहिला ॥ ४ ॥ तो सुवर्णाचा महामेरू । पृथ्वी तयाचा आधारु । चौऱ्यांशी सहस्र विस्तारू । रुंदी तयाची ॥ ५ ॥ उंच तरी मर्यादेवेगळा । भूमीमध्यें सहस्र गोळा । तया भोंवता वेष्टित पाळा । लोकालोक पर्वताचा ॥ ६ ॥ तया अलीकडे हिमाचळ । जेथें पांडव गळाले सकळ । धर्म आणि तेमाळनीळ[29] । पुढें गेले ॥ ७ ॥ तेथें जावया

---

१ द्वैतरहित, फक्त एक. २ भेदाभेद. ३ विचार. ४ गुण किंवा दोष. ५ केवळ, शुद्ध. ६ त्वंपदार्थ-जीवात्मा. ७ ईश्वर, परमात्मा. ८ जीवात्मा आणि परमात्मा या दोहोंचें ऐक्य त्वंतत् असि=तूं तें आहेस. ९ अनेकपणा व एकपणा. १० मूळची. ११ जीवाची उपाधि अविद्या व शिवाची उपाधि माया यांचा निरास म्हणजे बाधा केल्यावर. १२ ब्रह्माशीं तदाकार होणें. १३ प्रलयकाळीं १४ अढळ. १५ शेवट. १६ ईश्वराचे लोकीं राहणें. १७ ईश्वराचें सांनिध्य. १८ ईश्वरासारखें स्वरूप होणें. १९ स्फुरणरूप. २० आठवा दशक. २१ अग्नीचें. २२ उदक. २३ आच्छादनरूप उदक २४ पृथ्वी. २५ शेषानें. २६ घेर. २७ समुद्र. २८ मंडळी. २९ वेढा. ३० सूर्याचे किरणांचा जेथ पर्यंत प्रकाश होतो तेथपर्यंत पसरलेला एक पर्वत. ३१ कृष्ण.

मार्ग नाहीं । मार्गीं पसरले महा अहि[1] । शीतसुखें सुखावले तेहि । पर्वतरूप भासती ॥ ८ ॥ तया अलीकडे शेवटीं[2] जाण । बद्रिकाश्रम बद्रिनारायण । तेथें महा तापसी निर्वाणीं[3] । देहत्यागार्थ जाती ॥ ९ ॥ तया अलीकडे बद्रिकेदार । पाहून येती लहान थोर । ऐसा हा अवघा विस्तार । मेरु पर्वताचा ॥ १० ॥ तया मेरुपर्वता पाठारी[4] तीन शृंग[5] विषम हारीं[6] । परिवारें[7] राहिले तयावरी । ब्रह्मा विष्णु महेश ॥ ११ ॥ ब्रह्मशृंग तो पर्वताचा । विष्णुशृंग तो मेघांजाचा[8] । शिवशृंग तो स्फटिकाचा । कैलास नाम त्याचें ॥ १२ ॥ वैकुंठ नाम विष्णुशृंगाचें । सत्यलोक नाम ब्रह्मशृंगाचें । अमरावती इंद्राचें । स्थळ खालतें ॥ १३ ॥ तेथें गण गंधर्व लोकपाळ । तेहतीस कोटि देव सकळ । चौदा लोक सुवर्णाचेळें[9] । वेष्टित राहिले ॥ १४ ॥ तेथें कामधेनूंचीं खिल्लारें[10] । कल्पतरूंचीं वनें अपारें । अमृताचीं सरोवरें । ठायीं ठायीं उचंबळतीं[11] ॥ १५ ॥ तेथें उदंड चिंतामणी[12] । हिरे परिसांचिया खाणी । तेथें सुवर्णमय धरणी । लखलखायमान ॥ १६ ॥ परम रमणीय फांकती किळा[13] । नवरत्नांचिया पाषाणशिळा । तेथें अखंड हर्षवेळा[14] । आनंदमय ॥ १७ ॥ तेथें अमृताचीं भोजनें । दिव्य गंधें दिव्य सुमनें[15] । अष्टनायिका गंधर्वगायनें । निरंतर ॥ १८ ॥ तेथें तारुण्य ओसरेना[16] । रोग व्याधिहि असेना । वृद्धपण आणि मरण येईना । कदाकाळीं ॥ १९ ॥ तेथें एकाहूनि एक सुंदर । एकाहूनि एक चतुर । धीर उदार आणि शूर । मर्यादेवेगळे[17] ॥ २० ॥ तेथें दिव्यदेह[18] ज्योतिरूपें । विद्युल्लतेसारखीं स्वरूपें । तेथे यश कीर्ति प्रतापें । सीमा सांडिली ॥ २१ ॥ ऐसें तें स्वर्गभुवन । सकल देवांचें वसतिस्थान । तया स्थळांचें महिमान । बोलिजे तितुकें थोडें ॥ २२ ॥ येथें ज्या देवाचें भजन करावें । तेथें त्या देवलोकीं राहावें । सलोकता मुक्तीचें जाणावें । लक्षण ऐसें ॥ २३ ॥ लोकीं रहावें ते सलोकता । समीप असावें ते समीपता । स्वरूपींच राहावें स्वरूपता । तिसरी मुक्ति ॥ २४ ॥ देवस्वरूप जाहला देहीं[19] । श्रीवत्स[20] कौस्तुभ लक्ष्मी नाहीं । स्वरूपतेचें लक्षण पाहीं । ऐसें असे ॥ २५ ॥ सुकृत[21] आहे तों भोगिती । सुकृत सरतां लोटून देती । आपण देव ते असती । जैसे तैसे ॥ २६ ॥ म्हणोनि तीनी मुक्ती नाशवंत । सायुज्यमुक्ति ते शाश्वत[22] । तीही निरूपिली सावचित्त[23] । ऐका आतां ॥ २७ ॥ ब्रह्मांड नासेल कल्पांतीं । पर्वतासहित जळेल क्षिती[24] । तेव्हां अवघेचि देव जाती । मा मुक्ति कैच्या तेथें ॥ २८ ॥ तेव्हां निर्गुण परमात्मा निश्चळ[25] । निर्गुण भक्ति तेही अचळ । सायुज्यमुक्ति ते केवळ । जाणिजे ऐसी ॥ २९ ॥ निर्गुणीं अनन्य असतां । तेणें होय सायुज्यता । सायुज्यता म्हणजे स्वरूपता । निर्गुण[26] भक्ति

---

१ सर्प. २ थंडीच्या सुखानें. ३ शेवटच्या, अंतीच्या. ४ पाठीवर. ५ शिखरें. ६ वांकड्या. ७ ओळीनीं. ८ मंडळीसहवर्तमान. ९ पाच नांवाच्या रत्नाचा. १० मेरुपर्वत. ११ समूह. १२ कल्पवृक्षांचीं. १३ इच्छा केलेली वस्तु करून देणारा मणी. १४ प्रभा १५ फुलें. १६ नाहींसें होत नाहीं. १७ अपार, असंख्य. १८ विजेसारखीं. १९ देहधारी, मनुष्य. २० विष्णूच्या छातीवरील पांढरा केशमय भोंवरा. २१ पुण्य २२ अविनाशी. २३ सावध होऊन. २४ पृथ्वी. २५ सर्व. २६ अढळ. २७ सत्त्व, रज तमविरहित निरंतर ब्रह्माची उपासना.

॥ ३० ॥ सगुण भक्ति ते चळे । निर्गुण भक्ति ते न चळे । हें अवघें प्रांजळ कळे । सद्गुरु केलिया ॥ ३१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चतुर्थदशके मुक्तिचतुष्टयनिरूपणं नाम दशमः समासः ॥ १० ॥

दशक पांचवा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ जयजयाजी सद्गुरु पूर्णकामा । परमपुरुषा आत्मयारामा । अनिर्वाच्य तुमचा महिमा । वर्णिला न वचे ॥ १ ॥ जें वेदासि सांकडें । जें शब्दासि कोंनडें । तें सच्छिष्यासि रोकडें । अलभ्य लाभे ॥ २ ॥ जें योगियांचें निजवर्म । जें शंकराचें निजधाम । जें विश्रांतीचें निजविश्राम । परम गुह्य अगाध ॥ ३ ॥ तें ब्रह्म तुमचेनि योगें । स्वयें आपणचि होइजे अंगें । दुर्घट संसाराचेनि पांगे । पांगिजेना सर्वथा । ॥ ४ ॥ आतां स्वामीचेनि लडिवाळपणें । गुरुशिष्यांचीं लक्षणें । सांगिजेती तेणें-प्रमाणें । मुमुक्षें शरण जावें ॥ ५ ॥ गुरु तो सकळांसि ब्राह्मण । जरी तो जाहला क्रियाहीनें । तरी तयासि शरण । अनन्यभावें असावें ॥ ॥ ६ ॥ अहो या ब्राह्मणाकारणें । अवतार घेतला नारायणें । विष्णूनें श्रीवत्स मिरवणें । तेथें इतर ते किती ॥ ७ ॥ ब्राम्हणवचनें प्रमाण । होती शूद्राचें ब्राह्मण । धातुपाषाणीं देवपण । ब्राह्मणाचेनि मंत्रें ॥ ८ ॥ मुंजीबंधनाविरहित । तो शूद्रचि निश्चितें । द्विजेन्मा म्हणोनि सतत । द्विजे ऐसें नाम त्याचें ॥ ९ ॥ सकळांसि पूज्य ब्राह्मण । हे मुख्य वेदाज्ञा प्रमाण । वेदविरहित तें अप्रमाण । अप्रिय भगवंता ॥ १० ॥ ब्राह्मणीं योगे यागे व्रतें दानें । ब्राह्मणीं सकळ तीर्थाटणें । कर्ममार्ग ब्राह्मणाविणें । होणार नाहीं ॥ ११ ॥ ब्राह्मण वेद मूर्तिमंत । ब्राह्मण तोचि भगवंत । पूर्ण होती मनोरथ । विप्रवाक्यें करूनी ॥ १२ ॥ ब्राह्मणपूजनें शुद्ध वृत्ती । होऊनी जडे भगवंतीं । ब्राह्मणतीर्थें उत्तम गति । पावती प्राणी ॥ १३ ॥ लक्षभोजनीं पूज्य ब्राह्मण । अन्य यातीस पुसे कोण । परी भगवंतासी भावें प्रमाण । येरां चाड नाहीं ॥ १४ ॥ असो ब्राह्मणास सुरवर वंदिती । तेथें मानव बापुडे किती । जरी ब्राह्मण मूढमति । तरी तो जगद्वंद्य ॥ १५ ॥ अंत्यजें शब्दज्ञाता बरवा । परी तो नेऊनि काय करावा । ब्राह्मणासन्निध पूजावा । हें तों घडेना कीं ॥ १६ ॥ जें जें जना वेगळें

---

१ ज्याचे मनोरथ तृप्त झाले आहेत, अप्त. २ सांगतां येत नाहीं असा. ३ गूढ, कठीण. ४ दुर्बोध. ५ रोख, साक्षात. ६ मर्म, गुप्त गोष्ट. ७ स्वस्थान. ८ गुप्त. ९ इच्छनें, अपेक्षेनें परस्वाधीनतेनें. १० दीन होत नाहीं. ११ मोक्षाचीं साधनें करणाऱ्यानें. १२ आचारहीन. १३ भृगूनें मारलेल्या लाथेनें छातीवर झालेलें चिन्ह. १४ खरोखर, निःसंशय. १५ दोन जन्म घेणारा मातेपासूनचा एक जन्म व दुसरा मौंजीबंधनकालीं गायत्रीमंत्राची प्राप्ति झाल्याचा. १६ दोन जन्म पावणारा, ब्राह्मण. १७ मानण्याला अयोग्य. १८ अंतःकरणवृत्तीचा निरोध. १९ यज्ञ. २० अंतःकरण. २१ भक्ति. २२ आवड, गरज. २३ मोठेमोठे देव. २४ मूर्ख, जडबुद्धीचा. २५ महार. २६ शास्त्र जाणणारा.

केलें । तें तें वेदें अव्हेरिलें । म्हणोनि तयास नाम ठेविलें । पाखांड मत ॥ १७ ॥ असो जो हरिहरदास । तयास ब्राह्मणीं विश्वास । ब्राह्मणभजनें बहुतांस । पावन केलें ॥ १८ ॥ ब्राह्मणें पाविजे देवाधिदेवा । तरी किमर्थ सद्गुरु करावा । ऐसें म्हणाल तरी निजैठेवा । सद्गुरूविण नाहीं ॥ १९ ॥ स्वधर्मकर्मीं पूज्य ब्राह्मण । परी ज्ञान नव्हे सद्गुरूविण । ब्रह्मज्ञान नसतां शीर्ण । जन्ममृत्यु चुकेना ॥ २० ॥ सद्गुरूविण ज्ञान कांहीं । सर्वथा होणार नाहीं । अज्ञान प्राणी प्रवाहीं । वाहताचि गेले ॥ २१ ॥ ज्ञानविरहित जें जें केलें । तें तें जन्मासि मूळ झालें । म्हणोनि सद्गुरूचीं पाउलें । सदृढ धरावीं ॥ २२ ॥ जयास वाटे देव घ्हावा । तेणें सत्संग धरावा । सत्संगेविण देवाधिदेवा । पाविजेत नाहीं ॥ २३ ॥ नाना साधनें बापुडीं । सद्गुरूविण करिती वेडीं । गुरुकृपेविण कुडंकुडीं । व्यर्थचि होती ॥ २४ ॥ कार्तिकस्नानें माघस्नानें । व्रतें उद्यापनें दानें । गोरांजेनें धूम्रपानें । साधिती पंचाग्नि ॥ २५ ॥ हरिकथा पुराणश्रवण । आदरें करिती निरूपण । सर्व तीर्थें परम कठीण । फिरती प्राणी ॥ २६ ॥ झळफळीत देवतार्चनें । स्नान संध्या दर्भासनें । टिळे माळा गोपीचंदनें । ठसे श्रीमुद्रांचे ॥ २७ ॥ अर्घ्यपात्रें संपुष्टें गोकर्णें । मंत्रयंत्रांचीं ताम्रपर्णें । नानाप्रकारीं उपकर्णें । साहित्यशोभा ॥ २८ ॥ घंटा घणघणा वाजती । स्तोत्रें स्तवनें आणि स्तुति । आसनें मुद्रा ध्यानें करिती । प्रदक्षिणा नमस्कार ॥ २९ ॥ पंचायतनपूजा केली । मृत्तिकेचीं लिंगें लाखोली । बेलें नारिकेळें भरलीं । संपूर्ण सांग पुजा ॥ ३० ॥ उपोषणें निष्ठानेम । परम सायासीं केलें कर्म । फळाचि पावती वर्म । चुकले प्राणी ॥ ॥ ३१ ॥ यज्ञादिक कर्में केलीं । हृदयीं फळाशा कल्पिली । आपुले इच्छेनें घेतली । सूति जन्माची ॥ ३२ ॥ करूनि नाना सायास । केला चौदाविद्यांचा अभ्यास । ऋद्धिसिद्धि सावकाश । वोळंग्या जरी ॥ ३३ ॥ तरी सद्गुरुकृपेविरहित । सर्वथा न घडे स्वहित । यमपुरीचा अनर्थ । चुकेना येणें ॥ ३४ ॥ जंव नाहीं ज्ञानप्राप्ति । तंव चुकेना यातायाती । गुरुकृपेविण अधोगति । गर्भवास चुकेना ॥ ३५ ॥ ध्यान धारणा मुद्रा आसन । भक्तिभाव आणि भजन । सकळहि फोल ज्ञान । जंव तें प्राप्त नाहीं ॥ ३६ ॥ सद्गुकृपा न जोडे । आणि भलतीकडे वावडे । जैसे आंधळें चांचरूनी पडे । गोरीं आणि

---

१ त्याग केला, टाकिला. २ वेदशास्त्रविरुद्ध, अधर्मी. ३ पवित्र केलें. ४ काय म्हणून. ५ आत्मप्राप्ति. ६ कष्ट, कटकट, त्रास. ७ घट्ट, निष्ठापूर्वक. ८ दुःखी. ९ ईश्वरप्रीत्यर्थ स्वतःस जाळून घेणें. १० अग्नीवर उलटें टांगून घेऊन धूर पिणें. ११ उन्हाळ्यांत चार बाजूला चार अग्नि व वर सूर्य अशा स्थितींत तप करतात तें. १२ पूजेचीं पात्रें. १३ कांहीं विशेष आकाराचे धातु इत्यादिकांचें पात्र. १४ गाईच्या कानाच्या आकाराचीं पात्रें. १५ ग्रहादिकांची आराधना करण्यासाठीं तांब्याच्या पत्र्यावर मंत्राक्षरासह कांहीं विशिष्ट आकृत्या काढतात त्यास 'यंत्र' म्हणतात. १६ तांब्याचे पत्रे. १७ उत्तम पूजासाधनांनीं आलेलें सौंदर्य. १८ नारळ. १९ सर्व अंगांनीं परिपूर्ण. २० मर्म, तत्त्वाची गोष्ट. २१ विसार, बयाणा, कारण. २२ चार वेद, चार उपवेद व सहाशास्त्रें मिळून चवदा विद्या. २३ वैभव व दैवी शक्ती. २४ प्राप्त झाल्या. २५ जन्ममरणाची कटकट, श्रम. २६ नरकवास. २७ चिंतन. २८ अंतःकरणाची एकाग्र स्थिति. २९ व्यर्थ. ३० फिरतो, भटकतो. ३१ भुलून. ३२ खळीमध्यें.

गडदरा ॥ ३७ ॥ जैसे नेत्रीं घालितां अंजन । पडे दृष्टीस निधान । तैसें सद्गुरुवचनें ज्ञान– । प्रकाश होय ॥ ३८ ॥ सद्गुरूविण जन्म निर्फळ । सद्गुरूविण दुःख सकळ । सद्गुरूविण तळमळ । जाणार नाहीं ॥ ३९ ॥ सद्गुरूचेनि अभयकरें । प्रकट होईजे ईश्वरें । जन्मदुःखें अपारें । नासूनि जाती ॥ ४० ॥ मागां झाले थोरथोर । संत महंत मुनीश्वर । तयांसहि ज्ञानविचार । सद्गुरूचेनि ॥ ४१ ॥ श्रीरामकृष्णादिकरूनी । अतितत्पर गुरुभजनीं । सिद्ध साधू आणि सज्जनीं । गुरुदास्य केलें ॥ ४२ ॥ सकळ सृष्टीचे चाळक । हरिहरब्रह्मादिक । तेही सद्गुरुपदीं रंक । महत्त्वा न चढती ॥ ४३ ॥ असो जयास मोक्ष व्हावा । तेणें सद्गुरु करावा । सद्गुरूविणें मोक्ष पावावा । हें कल्पांतीं न घडे ॥ ४४ ॥ आतां सद्गुरु ते कैसे । नव्हेत इतरा गुरू ऐसे । जयांचे कृपेनें प्रकाशे । शुद्ध ज्ञान ॥ ४५ ॥ त्या सद्गुरूची वोळखण । पुढिले समासीं निरूपण । बोलिलें असें श्रोतीं श्रवण । अनुक्रमें करावें ॥ ४६ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे पंचमदशके गुरुनिश्चयनिरूपणं नाम प्रथमः समासः ॥ १ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ जे करामती दाखविती । तेहि गुरू म्हणिजेती । परंतु सद्गुरू नव्हेती । मोक्षदाते ॥ १ ॥ सभामोहन भुरंखे चेटके[1] । सांबरीमंत्र कौटाळे[2] अनेके । नाना चमत्कार कौतुकें । असंभाव्य सांगती ॥ २ ॥ सांगती औषधीप्रयोग । कां सुवर्णधातूचा मार्ग । दृष्टिबंधनें लोंगवेग[3] । अभिलाषाचा ॥ ३ ॥ साहित्य[4] संगीत रागज्ञान । गीतें[5] नृत्यें तानमान । नाना वाद्यें शिकविती जन । तेहि एक गुरू ॥ ४ ॥ विद्या शिकविती पंचाक्षरी । ताडेतोडगे[6] नानापरी । कां पोटभरे जयावरी । ते विद्या शिकविती ॥ ५ ॥ जे यातीचा जो व्यापार । शिकविती भरावया उदर । तेहि गुरू परी सांचार[7] । सद्गुरू नव्हेत ॥ ६ ॥ आपुली माता आणि पिता । तेहि गुरूचि तत्त्वतां । परी पैलपार पाविता । तो सदगुरु वेगळाची ॥ ७ ॥ गायत्रीमंत्राचा उच्चारू । सांगे तो साचार कुळगुरु । परी ज्ञानेविण पैलपारू । पाविजेत नाहीं ॥ ८ ॥ जो ब्रह्मज्ञान उपदेशी । अज्ञानअंधार निरसी[8] । जीवात्मया परमात्मयाशीं । ऐक्यता करी ॥ ९ ॥ विघडे[9] देव आणि भक्त । जीवशिवपणें द्वैत[10] । तयां देवभक्तां एकांत । करी तो सद्गुरु ॥ १० ॥ भवव्याघ्रें घालूनि उडी । गोवत्सांस ताडातोडीं । केली देखोनि शीघ्र सोडी । तो सद्गुरु जाणावा ॥ ११ ॥ वासनानदीमहापुरीं[11] । प्राणी बुडतां ग्लानी करी । तेथें उडी

---

१ खोल खऱ्ग्यात. २ ठेवा. ३ मोठे साधू. ४ ब्रह्मस्वरूपास पोंचलेले. ५ गुरूची सेवा. ६ हलके, दीन. ७ सद्गुरूपुढें आपल्या महत्त्वानें चढून जात नाहींत. ८ कौशल्य, चमत्कार. ९ सभेंतील सर्व लोकांना चकविणें. १० भुरळ घालणारे. ११ चेटुक करणारे. १२ शाबर (दृष्टि-बंधादिक्रिया) संबंधी मंत्रविद्या. १३ जारणमारण करणारे. १४ किमयेनें सोनें करण्याची विद्या. १५ नजरबंद. १६ अति त्वरा. १७ अलंकारशास्त्र. १८ गाणें. १९ नाचणें. २० गायनांतील आलापांचें प्रमाण. २१ मांत्रिक. २२ कुवेडीं. २३ खरोखर. २४ नाहींसा करतो. २५ देवाचा विघड, वियोग होतो. २६ द्विधाभाव. २७ एकी. २८ संसार हाच कोणी वाघ त्यानें. २९ गाई आणि वासरांची. ३० इच्छारूपी दीच्या महापुरांत. ३१ दुःख.

घालूनि तारी । तो सद्गुरु जाणावा ॥ १२ ॥ प्राणी मायाजाळीं पडिले । संसारदुःखें दुखवले । ऐसें जेणें मुक्त केले । तो सद्गुरु जाणावा ॥ १३ ॥ गर्भवास अतिसांकडी इच्छाबंधनाची बेडी । ज्ञान देऊनि शीघ्र सोडी । तो सद्गुरु जाणावा ॥ १४ ॥ फोडूनि शब्दांचें अंतर । वस्तु दाखवी निजसार । तोचि सद्गुरु माहेर । अनाथांचें ॥ १५ ॥ जीव एकदेशी बापुडें । तयासि ब्रह्मचि करी रोकडें । फेडी संसारसांकडें । वचनमात्रें ॥ १६ ॥ जें वेदाचें अभ्यंतरीं । तें काढूनि अपत्यापरी । शिष्यश्रवणीं कवळ भरी । उदारवचनें ॥ १७ ॥ वेदशास्त्र महानुभाव । पाहतां एकाचि अनुभव । तोचि एक गुरुराव । ऐक्यरूपें ॥ १८ ॥ संदेह निःशेष जाळी । स्वधर्म आदरें प्रतिपाळी । वेदविरहित टवाळी । करूंचि नेणें ॥ १९ ॥ जें जें मन अंगिकारी । तें तें स्वयें भुंके करी । तो गुरु नव्हे भिकारी । झाडे आला ॥ २० ॥ शिष्यांसि न लाविती साधन । न करविती इंद्रियदमन । ऐसें गुरु अर्डक्याचे तीन । मिळाले तरी टाकावे ॥ २१ ॥ जो कोणी ज्ञान बोधी । समूळ अविद्या छेदी । इंद्रियदमन प्रतिपादी । तोचि सद्गुरु जाणावा ॥ २२ ॥ एक द्रव्याचे विकिले । एक शिष्याचे आंखिले । ऐसे दुराशेनें केलें । दीनरूप ॥ २३ ॥ जें जें रुचे शिष्यांचे मनीं । तैसीच करी मनधरणी । ऐसी कामना पापिणी । पडिली गळां ॥ २४ ॥ जो गुरु भीडसारू । तो अधमाहुनि अधम थोरू । चोरटा मंद पामरू । द्रव्यभोंदू ॥ २५ ॥ जैसा वैद्य दुराचारी । केली सर्वस्वें वोहरी । आणि शेखीं भीड करी । घातघेणा ॥ २६ ॥ तैसा सद्गुरु नसावा । जेणें अंतर पडे देवा । भीड करूनियां गोवी । घाली बंधनाचा ॥ २७ ॥ जेथें शुद्ध ब्रह्मज्ञान । आणि स्थूळ क्रियेचें साधन । तोचि सद्गुरु निधान । दाखवी डोळां ॥२८॥ देखणें दाखविती आदरें । मंत्र फुंकिती कर्णद्वारें । इतुकेंच ज्ञान तीं पामरें । अंतरलीं भगवंता ॥ २९ ॥ बाणे तिहींची खूण । तोचि गुरु सुलक्षण । तेथेंचि रिघावें शरण । अत्यादरें मुमुक्षीं ॥ ३० ॥ अद्वैतनिरूपणीं अगाध वक्ता । परी विषयीं लोलंगता । ऐसिया गुरूचेनि सार्थकता । होणार नाहीं ॥ ३१ ॥ जैसा निरूपणसमय । तैसेंचि मनहि करी वोय । कृतबुद्धीचा निश्चय । जाहलाचि नाहीं ॥ ३२ ॥ निरूपणीं सामर्थ्यसिद्धे । श्रवण होतां दुराशा बाधी । नाना चमत्कारें बुद्धि । डळमळूं लागे ॥ ३३ ॥ पूर्वीं ज्ञाते विरक्त भक्त । जयांस सादृश्य भगवंत । आणि सामर्थ्यहि अद्भुत । सिद्धीचेनि योगें ॥ ३४ ॥ ऐसें तयांचें सामर्थ्य । आमुचें ज्ञान नुसतें

---

१ आंत काठेण, संकट. २ शब्दाचा खरा अर्थ अथवा मर्म प्रकट करून. ३ आत्मतत्त्व. ४ अल्पव्यापी. ५ साक्षात्, तात्काळ. ६ नाहींसें करी. ७ शिष्यांच्या कर्णपुटांत. ८ घांस. ९ ब्रह्मानुभवी. १० संशय. ११ चटोरपणा. १२ मनसोक्त खुशालपणे १३ उडी घालून आशाळभुताप्रमाणें आला. १४ यमनियमादि साधनें. १५ इंद्रियांवर दाब. १६ दमडीचे. १७ अज्ञान. १८ स्वाधीन, अंकित. १९ इच्छा. २० भिकारी. २१ लुटारू. २२ नीच. २३ नागवण, नाश. २४ घातकी, घातकरणारा. २५ गुंता. २६ जड (व्यावहारिक) व्यापारांचें. २७ ठेवा. २८ गरीबबापडीं. २९ शास्त्रप्रतीति गुरुप्रतीति आणि आत्मप्रतीति या तिहींची. ३० उत्तम लक्षणांचा. ३१ मोक्षाची इच्छा करणारांनीं. ३२ आसक्ति. ३३ बायां, बायफळ, व्यर्थ ३४ सारखेपणा. ३५ जे भगवंताच्या उपमेचे होते.

व्यर्थ । ऐसा सामर्थ्याचा स्वार्थ । हृदयीं वसे ॥ ३५ ॥ निःशेष दुराशा तुटे । तरीच भगवंत भेटे । दुराशा धरिती ते वोखटे । शब्दज्ञाते कामिकें ॥ ३६ ॥ बहुत ज्ञाती नागवलीं । कामनेनें वेडीं केलीं । कामना इच्छितांच मेलीं । बापुडीं मूर्खें ॥ ३७ ॥ निःशेष कामनारहित । ऐसा तो विरळा संत । अवघियां वेगळें मत । अक्षय ज्याचें ॥ ३८ ॥ अक्षय ठेवा सकळांचा । तरी पांग फिटेना शरीराचा । तेणें मार्ग ईश्वराचा । चुकोनि जातो ॥ ३९ ॥ सिद्धि आणि सामर्थ्य जाहलें । सामर्थ्यें देहास महत्त्व आलें । पुढें बेचाड बळकाविलें । देहबुद्धीचें ॥ ४० ॥ सांडूनि अक्षयसुख । सामर्थ्य इच्छिती ते मूर्ख । कामनेसारिखें दुःख । आणिक नाहीं ॥ ४१ ॥ ईश्वरविण जे कामना । तेणें गुणें नाना यातना । पावती होती पतना- । वरपडे प्राणी ॥ ४२ ॥ होतां शरीराचा अंत । सामर्थ्यहि निघोन जात । शेखीं अंतरला भगवंत । कामनागुणें ॥ ४३ ॥ म्हणोनि निष्कामनाविचारू । दृढबुद्धीचा निर्धारू । तोचि सद्गुरु पैलपारू । पाववी भवाचा ॥ ४४ ॥ मुख्य सद्गुरूचें लक्षण । आधीं पाहिजे विमळ ज्ञान । निश्चयाचें समाधान । स्वरूपस्थिति ॥ ४५ ॥ याहीवरी वैराग्य प्रबळ । वृत्ति उदासीन केवळ । विशेष आचारें निर्मळ । स्वधर्माविषयीं ॥ ४६ ॥ याहीवरि आध्यात्मश्रवण । हरिकथानिरूपण । जेथें परमार्थविवरण । निरंतर ॥ ४७ ॥ जेथें सारासारविचार । तेथें होय जगदुद्धार । नवविधाभक्तीचा आधार । बहुत जनांसी ॥ ४८ ॥ म्हणोनि नवविधा भजन । जेथें प्रतिष्ठिलें साधन । हें सद्गुरूचें लक्षण । श्रोतीं वोळखावें ॥ ४९ ॥ अंतरीं शुद्ध ब्रह्मज्ञान । बाह्य निष्ठेचें भजन । तेथें बहुत भक्तजन । विश्रांति पावती ॥ ५० ॥ नाहीं उपासनेचा आधार । तो परमार्थ निराधार । कर्मविण अनाचार । भ्रष्ट होती ॥ ५१ ॥ म्हणोनि ज्ञान वैराग्य आणि भजन । स्वधर्मकर्म आणि साधन । कथानिरूपण श्रवण-मनन । नीति न्याय मर्यादा ॥ ५२ ॥ यांमध्यें एक उणें असें । तेणें तें विलक्षण दिसें । म्हणोनि सर्वहि विलसें । सद्गुरूपाशीं ॥ ५३ ॥ जो बहुतांचें पालन कर्ता । त्यास बहुतांची असे चिंता । नाना साधनें समर्था- । सद्गुरूपासीं ॥ ५४ ॥ साधनेंविण परमार्थ प्रतिष्ठे । तो मागुतां सवेंचि भ्रष्टे । या कारणें दूरदृष्टे । महानुभाव ॥ ५५ ॥ आचार उपासना सोडिती । ते भ्रष्ट अभक्त दिसती । जळो तयांची महंती । कोण पुसे ॥ ५६ ॥

---

१ वाईट. २ आशाखोर. ३ ज्ञानी लोक. ४ इच्छेनें. ५ नेहमीं. ६ नाशरहित. ७ ताबेदारी, परस्वाधीनपणा. ८ जुंबाड, मोठी जाळी. ९ देहाभिमानाचें. १० अधोगतीस पात्र. ११ शेवटीं. १२ संसाराचा. १३ शुद्ध. १४ अंतःकरणाची एकाग्र स्थिति. १५ ब्रह्माशीं ऐक्यता. १६ आत्मज्ञानसंबंधीं ऐकणें. १७ नित्यानित्यविवेक, परमार्थसंबंधीं विवेचन. १८ स्थापन केलें. १९ जरी आंत म्हणजे हृदयांत ब्रह्मज्ञान आहे, तरी बाहेरून एकनिष्ठेनें भजनकरणें चालू असतें. २० भक्तीचा. २१ भक्तीच्या आधाराशिवाय जो परमार्थ तो निराधार म्हणजे पायारहित अहे. २२ मागचे ओंवींत सांगितलेल्या जितक्या गोष्टी त्यांत जर एक कमी असेल तर ते गैरहिस्त होय; म्हणून सद्गुरूजवळ अंतरंगज्ञान व बाहेर सदाचार हे दोन्ही असतात. २३ स्थापन करितो. २४ दूरदर्शी. २५ ब्रह्मानुभवी, महात्मे. २६ मोठेपणा.

कर्म उपासनेचा अभाव । तेथें भेकादेसी झाला ठाव । तो कानकोंडा समुदाव । प्रपंचीं हांसती ॥ ५७ ॥ नीच यातीचा गुरु । तोही कानकोंडा विचारू । ब्रह्मसभेसि जैसा चोरू । तैसा दंडे ॥ ५८ ॥ ब्रह्मसभेंत देखतां । तयाचें तीर्थ नये घेतां । अथवा प्रसाद सेवूं जातां । प्रायश्चित्त पडे ॥ ५९ ॥ तीर्थप्रसादाची सांडी केली । तेथें नीचता दिसोन आली । गुरुभक्ति ते सेटवली । एकाएकीं ॥ ६० ॥ गुरूची मर्यादा राखता । ब्राह्मण क्षोभती तत्त्वतां । तेथें ब्राह्मण्य रक्षूं जातां । गुरुक्षोभ घडे ॥ ६१ ॥ ऐसीं सांकडीं दोहींकडे । तेथें पस्तावा घडे । नीच यातीस सद्गुरुत्व न घडे । याकारणें ॥ ६२ ॥ तथापि आवडी घेतली जीवें । तरी आपणचि भ्रष्टावें । बहुत जनास भ्रष्टवावें । हें तों दूषणचि कीं ॥ ६३ ॥ आतां असो हा विचारू । स्वयातीचा पाहिजे गुरु । नाहीं तरी भ्रष्टकारू । नेमस्त घडे ॥ ६४ ॥ जे जे कांहीं उत्तम गुण । ते ते सद्गुरुचें लक्षण । तथापि सांगों ओळखण । होय जेणें ॥ ६५ ॥ एक गुरु एक मंत्रगुरु । एक यंत्रगुरु एक तंत्रगुरु । एक वस्तादगुरु एक राजगुरु । म्हणती जनीं ॥ ६६ ॥ एक कुळगुरु एक मानिला गुरु । एक विद्यागुरु एक कुविद्यागुरु । एक असद्गुरु एक यातिगुरु । दंडकर्ते ॥ ६७ ॥ एक माता गुरु एक पिता गुरु । एक राजागुरु एक देवगुरु । एक बोलिजे जगद्गुरु । सकळ कळा ॥ ६८ ॥ ऐसे हे सत्रा गुरू । याहीवेगळे आणिक गुरू । ऐक तयांचा विचारू । सांगिजेल ॥ ६९ ॥ एक स्वप्नगुरु एक दीक्षागुरु । एक म्हणती प्रतिमा गुरु । एक म्हणती स्वयें गुरु । आपुला आपण ॥ ७० ॥ जे जे यातीचा जो व्यापारू । ते ते त्याचे तितुके गुरू । याचा पाहतां विचारू । उदंड आहे ॥ ७१ ॥ असो ऐसे उदंड गुरु । नाना मतांचा विचारू । परि जो मोक्षदाता सद्गुरू । तो वेगळाची असे ॥ ७२ ॥ नाना सद्विद्येचे गुण । याहीवरी कृपाळूपण । सद्गुरूचें हें लक्षण । जाणिजे श्रोतीं ॥ ७३ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे पंचमदशके सद्गुरुलक्षणनिरूपणं नाम द्वितीयः समासः ॥ २ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ मागां सद्गुरूचें लक्षण । विशेद केलें निरूपण । आतां सच्छिष्याची वोळखण । सावध ऐका ॥ १ ॥ सद्गुरूविण सच्छिष्य । तो वायां जाय निःशेष । कां सच्छिष्येविण विशेष । सद्गुरुपणे ॥ २ ॥ उत्तम भूमि शोधिली शुद्ध । तेथें बीज पेरिलें किडकें खाद । कां तें उत्तम बीज परी संबंध । खडकेसि पडिला ॥ ३ ॥ तैसा सच्छिष्य तो सत्पात्र । परी गुरु सांगे मंत्रतंत्र । तेथें अस्त्र ना परस्त्र । कांहींच नाहीं ॥ ४ ॥ अथवा गुरु पूर्ण कृपा करी । परी शिष्य अनधिकारी । भाग्यपुरुषाचा भिकारी । पुत्र जैसा ॥ ५ ॥ तैसें एकाविण एक । होतसे निरर्थक । परलोकींचें जें

१ कुचेष्टा, उपहास. २ पात्र, जागा. ३ चोरटा, लाजिरवाणा, सकोचित. ४ त्याग. ५ नष्ट झाली. ६ क्रोध पावतात. ७ ब्राह्मणपणा. ८ संकटें. ९ पश्चात्ताप. १० खास, ठाम. ११ स्वप्नांत उपदेश करणारा. १२ पूजा वगैरेची दीक्षा–शिक्षण–देणारा. १३ पुष्कळ. १४ स्पष्ट. १५ पूर्णपणें. १६ श्रमतो. १७ नांगरून तयार केली. १८ कीड लागलेलें. १९ अथवा बीज उत्तम आहे पण खडकावर पेरलें. २० इहलोक. २१ परलोक. २२ अयोग्य. २३ भाग्यवान् पुरुषाचा.

सार्थक । तें दुरावें ॥ ६ ॥ म्हणोनि सद्गुरु आणि सच्छिष्य । तेथें न लागती सायास । त्या उभयतांचा हव्यास । पुरे एकसरां ॥ ७ ॥ सुभूमि आणि उत्तम कण । उगवेना पर्जन्येंविण । तैसें अध्यात्मनिरूपण । नसतां होय ॥ ८ ॥ शेत पेरिलें आणि उगवलें । परंतु निगेविणें गेलें । साधनेंविण तैसें झालें । साधकासी ॥ ९ ॥ जोंवरी पीक आपणासि भोगें । तोंवरी अवघेंचि करणें लागे । पीक आलियाहि उगें । राहूंच नये ॥ १० ॥ तैसें आत्मज्ञान झालें । परी साधन पाहिजे केलें । एक वेळ उदंड जेविलें । तरी सामुग्री पाहिजे ॥ ११ ॥ म्हणोनि साधन अभ्यास आणि सद्गुरु । सच्छिष्य आणि सच्छास्त्रविचारू । सत्कर्म आणि सद्वासना पारू । पावती भवाचा ॥ १२ ॥ सदुपासना आणि सत्कर्म । सच्छिष्य सत्क्रिया आणि स्वधर्म । सत्संग आणि नित्यनेम । निरंतर ॥ १३ ॥ ऐसें हें अवघेंचि मिळे । तरीच विमळ ज्ञान निवळे । नाहीं तरी पाषांड संचरे बळें । समुदायीं ॥ १४ ॥ येथें शब्द नाहीं शिष्यासी । हें अवघें सद्गुरूपाशीं । सद्गुरु पालटी अवगुणांसी । नाना यत्नेंकरूनी ॥ १५ ॥ सद्गुरूचेनि असच्छिष्य पालटे । परंतु सच्छिष्यें सद्गुरुच पालटे । कां जे थोरपण तुटे । म्हणोनियां ॥ १६ ॥ या कारणें सद्गुरु पाहिजे । तरीच सन्मार्ग लाहिजे । नाहीं तरी होइजे । पाषांडवेरपडे ॥ १७ ॥ येथें सद्गुरुचि कारण । येर सर्व निष्कारण । तथापि सांगों वोळखण । सच्छिष्याची ॥ १८ ॥ मुख्य सच्छिष्याचें लक्षण । सद्गुरुवचनीं विश्वास पूर्ण । अनन्यभावें शरण । त्या नांव सच्छिष्य ॥ १९ ॥ शिष्य हाहिजे निर्मळ । शिष्य पाहिजे आचारशीळ । शिष्य पाहिजे केवळ । विरक्त अनुतापी ॥ २० ॥ शिष्य पाहिजे निष्ठावंत । शिष्य पाहिजे शुचिष्मंत । शिष्य पाहिजे नेमस्त । सर्व प्रकारीं ॥ २१ ॥ शिष्य पाहिजे साक्षेपी विशेष । शिष्य पाहिजे परम दक्ष । शिष्य पाहिजे अलक्ष । लक्षी ऐसा ॥ २२ ॥ शिष्य पाहिजे अतिधीर । शिष्य पाहिजे अति उदार । शिष्य पाहिजे अतितत्पर । परमार्थविषयीं ॥ २३ ॥ शिष्य पाहिजे परोपकारी । शिष्य पाहिजे निर्मत्सरी । शिष्य पाहिजे अर्थांतरी । प्रवेशकर्ता ॥ २४ ॥ शिष्य पाहिजे परम शुद्ध । शिष्य पाहिजे परम सावध । शिष्य पाहिजे गाधि । उत्तम गुणांचा ॥ २५ ॥ शिष्य पाहिजे प्रज्ञावंत । शिष्य पाहिजे प्रेमळ भक्त । शिष्य पाहिजे नीतिवंत । मर्यादेचा ॥ २६ ॥ शिष्य पाहिजे युक्तिवंत । शिष्य पाहिजे बुद्धिवंत । शिष्य पाहिजे संतासंत-। विचारघेता ॥ २७ ॥ शिष्य पाहिजे धारिष्टाचा । शिष्य असावा दृढ व्रताचा । शिष्य पाहिजे उत्तम कुळींचा । पुण्यशीळ ॥ २८ ॥ शिष्य असावा सात्त्विक । शिष्य असावा

---

१ नाद, छंद. २ एकदम, एकाच वेळीं. ३ उत्तम जमीन. ४ बीं धान्य. ५ न जपल्यामुळें. ६ धान्य खाण्यास तयार होतें. ७ स्वस्थ. ८ पुष्कळ. ९ सतत मेहनत. १० पलीकडले तीर. ११ संसाराचा. १२ शुद्ध. १३ प्रकट होतें. १४ नास्तिक मत. १५ दोष, अपराध. १६ दुर्गुणांस. १७ वाईट चेला. १८ नासे. १९ संपादन केला जातो. २० पाखांडीपणास पात्र, वश. २१ सदाचारी. २२ पवित्र. २३ उद्योगी. २४ अलक्ष्य—लक्ष्यांच्या पलीकडील-जी वस्तु ब्रह्म त्याला पाहणारा. २५ अर्थामध्यें. २६ खोल, अपार. २७ बुद्धिवान्. २८ सदसद्, नित्यानित्य. २९ विचार करणारा.

भजक। शिष्य असावा साधक । साधनकर्ता ॥ २९ ॥ शिष्य असावा विश्वासी । शिष्य असावा कायाक्लेशी । शिष्य असावा परमार्थासी । वाढवूं जाणें ॥ ३० ॥ शिष्य असावा स्वतंत्र । शिष्य असावा जगन्मित्र । शिष्य असावा सत्पात्र । सर्व गुणें ॥ ३१ ॥ शिष्य असावा सद्विद्येचा । शिष्य असावा सद्भावाचा । शिष्य असावा अंतरींचा । परम शुद्ध ॥ ३२ ॥ शिष्य नसावा अविवेकी । शिष्य नसावा गर्भसुखी । शिष्य असावा संसार-दुःखी । संतप्तदेहीं ॥ ३३ ॥ जो संसारदुःखें दुखवला । जो त्रिविधतापें पोळला । तोचि अधिकारी झाला । परमार्थासी ॥ ३४ ॥ बहु दुःख भोगिलें जेणें । तयासीच परमार्थ बाणें । संसारदुःखाचेनि गुणें । वैराग्य उपजे ॥ ३५ ॥ जयास संसाराचा त्रास । तयासीच उपजे विश्वास । विश्वासबळें दृढ कांस । धरिली सद्गुरूची ॥ ३६ ॥ अविश्वासें कांस सोडिली । ऐसीं बहुतेकें भवीं बुडालीं । नाना जळचरीं तोडिलीं । मध्यंचि सुखदुःखें ॥ ३७ ॥ या कारणें दृढ विश्वास । तोचि जाणा सच्छिष्य । मोक्षाधिकारी विशेष । अग्रगण्य ॥ ३८ ॥ जो सद्गुरुवचनें निवाला। तो सायुज्यतेचा आंखिलां । संसारपांगें पांगिला । नेवचे कदा ॥ ३९ ॥ सद्गुरूहुनि देव मोठा । जयास वाटे तो शिष्य करंटा । सुटला वैभवाचा फांटा । सामर्थ्यापिसें ॥ ४० ॥ सद्गुरुस्वरूप तें संत । आणि देवास मांडे कल्पांत। तेथें कैचें उरेल सामर्थ्य। हरिहरांचें ॥ ४१ ॥ म्हणोनि सद्गुरुसामर्थ्य अधिक । जेथें अटती ब्रह्मादिक । अल्पबुद्धि मानव रंक । तयासि हें कळेना ॥ ४२ ॥ गुरु देवां बराबरी। तरी तो शिष्य दुराचारी । भ्रांति बैसली अभ्यंतरीं । सिद्धांत नेणवे ॥ ४३ ॥ देव मनुष्यीं भाविला। मंत्रीं देवपणासि आणिला । सद्गुरु तो नवचे कल्पिला । ईश्वराचेनी ॥ ४४ ॥ म्हणोनि सद्गुरु पूर्णपणें । देवाहूनि अधिक कोटिगुणें । जयास वर्णितां भांडणें । वेदशास्त्रां लागलीं ॥ ४५ ॥ असो सद्गुरुपदापुढें । दुजें कांहींच न चढे । देवसामर्थ्य तें केवढें । मायाजनित ॥ ४६ ॥ अहो सद्गुरुकृपा जयासी । सामर्थ्य न चले तयापाशीं । ज्ञानबळें वैभवासी । तृणतुल्य केलें ॥ ४७ ॥ सद्गुरुकृपेचेनि बळें। अपरोक्षज्ञानाचेनि उसाळें । मायेसहित ब्रह्मांड सगळें । दृष्टीस न ये ॥ ४८ ॥ ऐसें सच्छिष्याचें वैभव । सद्गुरुवचनीं दृढ भाव । तेणें गुणें देवराव । स्वयेंचि होती ॥ ४९ ॥ अंतरीं अनुतापें तापलें । तेणें अंतर शुद्ध जालें । पुढें सद्गुरुवचनें निवाले । सच्छिष्य ऐसे ॥ ५० ॥ लागतां सद्गुरुवचनपंथें । जालें ब्रह्मांड पालथें । तरी जयाच्या शुद्ध भावार्थें । पालट न धरिजे ॥ ५१ ॥ शरण सद्गुरूसि गेले । सच्छिष्य ऐसे निवडले ।

---

१ शरीरक्लेश सोसणारा. २ चांगल्या निश्चयाचा. ३ उत्पत्तिकालापासून सुखी, गर्भश्रीमंत. ४ ठसतो, वठतो. ५ उत्पन्न होतो. ६ संसारांत. ७ प्राण्यांचे मगर वगैरे प्राणी यांनीं. ८ मोक्षाला अधिकारी, सत्पात्र. ९ श्रेष्ठ. १० नेमला. ११ संसारसंबंधीं अडचणी. १२ पीडिला जात नाहीं. १३ सामर्थ्याच्या वेडानें. १४ ओढे, वाटे. १५ प्रलयकाल. १६ थकतात, नाहींसे होतात. १७ भिकारी, दीन. १८ मनामध्यें. १९ खरी गोष्ट. २० कल्पना केला गेला. २१ मंत्रांच्या योगानें. २२ गवतासमान. २३ ब्रह्मसाक्षात्काराच्या. २४ उसळण्यानें, भरतीनें. २५ सद्गुरूंच्या सांगण्याच्या मार्गानें चालत असतां. २६ निष्ठेनें.

क्रियापालटें[1] झालें । पावन ईश्वरीं ॥ ५२ ॥ ऐसा सद्भाव अंतरीं । तेचि मुक्तीचे वांटेकरी । येर मायिक वेषधारी । असच्छिष्य ॥ ५३ ॥ वाटे विषयांचें सुख । परमार्थ संपादणें लौकिकें[2] । देखोवेखीं[3] पढतमूर्ख । शरण गेले ॥ ५४ ॥ झाली विषयीं वृत्ति अनावर । दृढ धरिला संसार । परमार्थचर्चेचा विचार । गलिन जाहला ॥ ५५ ॥ मोडें[4] घेतला परमार्थाचा । हव्यासें धरिला प्रपंचाचा । भारवाही कुटुंबाचा । काबाडी जाहला ॥ ५६ ॥ मानिला प्रपंचीं आनंद । केला परमार्थीं विनोद[5] । भ्रांत मूढ मतिमंद । लोभला कामीं ॥ ५७ ॥ सूकर[6] पूजिलें विलेपनें[7] । म्हैसा मर्दिला चंदनें । तैसा विषयी[8] ब्रह्मज्ञानें । विवेकें बोलिला ॥ ५८ ॥ रासभ उकरडां लोळे । तयास परिमळसोहळे[9] । उलूक अंधारीं पळे । तया केली हंसपंगती[10] ॥ ५९ ॥ तैसा विषयेंदारींचा[11] बेरोडी[12] । घाली अधःपतनीं[13] उडी । तयास भगवंतीं आवडी । सत्संग कैचा ॥ ६० ॥ वरती करून दांताळी[14] । श्वानपुत्र हाडें चर्घळी[15] । तैसा विषयीं तळमळी । विषयसुखाकारणें ॥ ६१ ॥ तया श्वानमुखीं परमान्न[16] । मर्कटासि सिंहासन । तैसें विषयासक्तास ज्ञान । जिरेल कैचें ॥ ६२ ॥ रासभें राखतां जन्म गेला । तो पंडितांमध्यें प्रतिष्ठिला । न वचे, तैसा आसक्ताला । परमार्थ नाहीं ॥ ६३ ॥ मिळाला राजहंसांचा मेळा । तेथें आला डोंबकावळा । लक्षुनियां विष्ठेचा गोळा । हंस म्हणवी ॥ ६४ ॥ तैसे सज्जनाचे संगतीं । विषयी[17] सज्जन म्हणविती । विषय अमेध्य[18] चित्तीं । गोळा लक्षिला ॥ ६५ ॥ कांखे घेऊनियां दोरा[19] । म्हणे मज संन्यासी करा । तैसा विषयी सैरावैरा[20] । ज्ञान बडबडी ॥ ६६ ॥ असो ऐसे पढतमूर्ख । ते काय जाणती अद्वैतसुख । नारकी प्राणी नरक । भोगिती स्वइच्छा ॥ ६७ ॥ वेश्येची करील सेवा । तो कैसा मंत्री[21] म्हणावा । तैसा विषयदास मानावा । भक्तराज केंवी ॥ ६८ ॥ तैसे विषयी बापुडे । तयास ज्ञान कोणीकडे । वाचाळ शाब्दिक बडबडे । वेरपडे[22] जाहले ॥ ६९ ॥ ऐसे शिष्य परम नष्ट । कनिष्ठांमध्यें कनिष्ठ । हीन अविवेकी आणि दुष्ट । खळ खोटे दुर्जन ॥ ७० ॥ ऐसे जे कां पापरूप । दीर्घदोषी वज्रलेप[23] । तयांस प्रायश्चित्त अनुताप । उद्भवतां[24] आहे ॥ ७१ ॥ तिहीं पुनः शरण जावें । सद्गुरुसि संतोषवावें । कृपादृष्टि जाहल्या व्हावें । पुनः शुद्ध ॥ ७२ ॥ स्वामीद्रोह जयास घडे । तो यावच्चंद्रसूर्य[25] नरकीं पडे तयासि उपायची न घडे । स्वामी तुटल्यावांचून[26] ॥ ७३ ॥ स्मशानवैराग्यें[27] आलें । [illegible] नि लोटांगण घातलें । तेणें गुणें उपतिष्ठलें[28] । नाहीं ज्ञान ॥ ७४ ॥ भाव आणिला जाणाचा । मंत्र घेतला गुरूचा । शिष्य झाला दों

---

१ वाईट आचरण टाकून शुद्ध आचरणामुळें. २ वरपंगी, दिखाऊ. ३ विचार न करतां. ४ कंटाळा. ५ नाद. ६ थट्टा. ७ वेधला, ८ डुक्कर. ९ सुगंधी पदार्थ [illegible]न. १० कामासक्त पुरुष. ११ गाढव. १२ सुगंधी द्रव्यांचे संस्कार. १३ घुबड. १४ हंसाची बरोबरी. १५ विषयाच्या दारांतील आशाळभूत. १६ अधोगतीमध्यें. १७ दांतांची कवळी. १८ चावतो. १९ पक्वान्न. २० विषयी पुरुष. २१ अपवित्र. २२ स्त्री. २३ मनसोक्त. २४ ब्रह्मानंद. २५ नरकवासी. २६ मंत्रशास्त्री. २७ बडबड करणारे. २८ पक्के. २९ त्यांस पश्चात्ताप झाला असतां प्रायश्चित्त आहे, पश्चात्ताप झाला नाहीं तर प्रायश्चित्त नाहीं. ३० चंद्रसूर्य आहेत तोंपर्यंत. ३१ अल्पकालिक वैराग्य. ३२ प्राप्त झालें. ३३ उसना.

दिवसांचा । मंत्राकारणें ॥ ७५ ॥ ऐसे केले गुरु उदंड । शब्द शिकला पाषांड । झाला तोंडाळ तेरमुंड । महा पाषांडी ॥ ७६ ॥ घडी एक रडे आणि पडे । घडी एक वैराग्य चढे । घडी एक अहंभाव जडे । ज्ञातेपणाचा ॥ ७७ ॥ घडी एक विश्वास धरी । सें-वेंचि घडी एक गुर्गुरी । ऐसे नाना छंद करी । पिसाट जैसा ॥ ७८ ॥ काम क्रोध मद मत्सर । लोभ मोह नाना विकार । अभिमान कापट्य तिरस्कार । हृदयीं नांदती ॥ ७९ ॥ अहंकार आणि देहेपांग । अनाचार आणि विषयसंग । संसार प्रपंच उद्वेग । अंतरीं वसे ॥ ८० ॥ दीर्घसूत्री कृतघ्न पापी । कुंकर्मी विकल्पी । अभक्त अभावी शीघ्रकोपी । निष्ठुर परघातक ॥ ८१ ॥ हृदयशून्य आणि आळशी । अविवेकी आणि अविश्वासी । अधीर अविचार संदेहासी । दंडधर्ता ॥ ८२ ॥ आशा मनीषा तृष्णा कल्पना । कुबुद्धि दुर्वृत्ति दुर्वासना । अल्पबुद्धि विषयकामना । हृदयीं वसे ॥ ८३ ॥ ईर्षणी असूया तिरस्कारें । निंदेसि प्रवर्ते आदरें । देहाभिमानें हुंबरे । जाणपणें ॥ ८४ ॥ क्षुधा तृषा आवरेना । निद्रा सहसा धरवेना । कुटुंबचिंता ओसरेना । भ्रांति पडिली ॥ ८५ ॥ शाब्दिक बोले उदंड वाचा । लेश नाहीं वैराग्याचा । अनुताप धारिष्ट साधनांचा । मार्ग न धरी ॥ ८६ ॥ भक्ति विरक्ति ना शांति । सद्वृत्ति लीनता ना दांती । कृपा दया ना तृप्ति । सद्बुद्धि असेचि ना ॥ ८७ ॥ कायाक्लेशीं । शरीरहीन । धर्माविषयीं परम कृपण । क्रिया पालटेना कठिण । हृदय जयाचें ॥ ८८ ॥ ओजेव नाहीं जनांसी । जो अप्रिय सज्जनांसी । जयाचे जीवीं अहर्निशीं । परन्यून वसे ॥ ८९ ॥ सदां सर्वकाळ लटिका । बोले मायिक लांपणिका । क्रिया विचार पाहतां एका । वचनीं सत्य नाहीं ॥ ९० ॥ परपीडेविषयीं तत्पर । जैसा विंचु आणि विखार । तैसा कुशब्दें जिव्हारें । भेदी सकळांचें ॥ ९१ ॥ आपुले झांकी अवगुण । पुढिलांसि बोले कठिण । मिथ्या गुणदोषविण । गुणदोष लावी ॥ ९२ ॥ स्वयें पापात्मा अंतरीं । पुढिलांची कर्णव न करी । जैसा हिंसक दुराचारी । परदुःखें शिणेना ॥ ९३ ॥ दुःख पराधें नेणती । दुर्जन गांजिलेचि गांजिती । श्रम पावतां आनंदती । आपुले मनीं ॥ ९४ ॥ स्वदुःखें झुरे अंतरीं । आणि परदुःखें हास्य करी । तयास प्राप्त यमपुरी । यमदूत झोडिती ॥ ९५ ॥ असो ऐसे मदांध बापुडे । तयास भगवंत कैचा जोडे । जनांस सुबुद्धि नावडे । पूर्वपातकेंकरूनी ॥ ९६ ॥ तयांस देहाच्या अंतीं । [illegible] पावती । जिवलगें वोसंडिती ।

१ आंत घुसणारा, लुडबुड्या. २ लागलींच. ३ मीपणा. ४ देहाची ताबेदारी, देहाचा अंकित असणें. ५ दुःख, त्रास. ६ चेंगट, नेहमीं [illegible]र लावणारा. ७ वाईट कर्में करणारा. ८ नानाप्रकारच्या विरुद्ध कल्पना मनांत आणणारा. ९ [illegible]न ठेवणारा. १० ज्याला काळिज नाहीं असा, निष्काळजी. ११ उतावळा. १२ संशया चिकटून बसणारा. १३ विषयांची इच्छा. १४ इच्छा. १५ मत्सर. १६ गुरगुरतो, घुमतो. १७ कमी होत नाहीं, हटत नाहीं. १८ दमन. १९ शरीरास कष्ट पडणाऱ्या कामीं अंगचोरणारा, कुचर. २० चिकु, कंजूष. २१ सरळपणा. २२ खोटी. २३ भाषणपद्धति. २४ सर्प. २५ मन, हृदय. २६ इतरांस. २७ पापी. २८ दया, करुणा. २९ हिंसा करणारा. ३० दुसऱ्यास कष्ट झाले असतां. ३१ हांसतें. ३२ टाकतात.

प्राणी बापुडा जीवात्मा । काय जाणे ॥ ३४ ॥ सकळ तीर्थांची संगती । स्नानदानांची फळश्रुति । त्याहूनि ज्ञानाची स्थिति । विशेष कोटिगुणें ॥ ३५ ॥ ॥ श्लोक ॥ पृथिव्यां यानि तीर्थानि स्नानदानेषु यत्फलम् । तत्फलं कोटिगुणितं ब्रह्मज्ञानसमं हि न ॥ ४ ॥ टीका ॥ म्हणोन जें आत्मज्ञान । ते गहनाहूनि गहन । ऐक तयाचें लक्षण । सांगिजेल ॥ ३६ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे पंचमदशके उपदेशलक्षणं नाम चतुर्थः समासः ॥ ४ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ जंव तें ज्ञान नाहीं * प्रांजळ । तंव सर्व कांहीं निष्फळ । ज्ञानरहित तळमळ । जाणार नाहीं ॥ १ ॥ ज्ञान म्हणतां वाटे भ्रम । कायरे बा असेल वर्म । म्हणोनि हा अनुक्रम । सांगिजेल आतां ॥ २ ॥ भूत भविष्य वर्तमान । ठाउकें आहे परिच्छिन्न । यासीहि म्हणिजेत ज्ञान । परी तें ज्ञान नव्हे ॥ ३ ॥ बहुत केलें विद्यापठण । संगीतशास्त्र रागरंग । वैदिक शास्त्र वेदाध्ययन । हेंहि ज्ञान नव्हे ॥ ४ ॥ नाना व्यवसायांचें ज्ञान । नाना दीक्षेचें ज्ञान । नाना परीक्षेचें ज्ञान । हें ज्ञान नव्हे ॥ ५ ॥ नाना वनितांची परीक्षा । नाना मनुष्यांची परीक्षा । नाना व्यवहारांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ ६ ॥ नाना अश्वांची परीक्षा । नाना गजांची परीक्षा । नाना श्वापदांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ ७ ॥ नाना पशूंची परीक्षा । नाना पक्ष्यांची परीक्षा । नाना भूतांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ ८ ॥ नाना यानांची परीक्षा । नाना वस्त्रांची परीक्षा । नाना शस्त्रांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ ९ ॥ नाना धातूंची परीक्षा । नाना नाण्यांची परीक्षा । नाना रत्नांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १० ॥ नाना पाषाणपरीक्षा । नाना काष्ठांची परीक्षा । नाना वाद्यांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ ११ ॥ नाना भूमींची परीक्षा । नाना जळांची परीक्षा । नाना तेजपरीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १२ ॥ नाना रसांची परीक्षा । नाना बीजांची परीक्षा । नाना अंकुरपरीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १३ ॥ नाना पुष्पांची परीक्षा । नाना फळांची परीक्षा । नाना वल्लींची परीक्षा । हें ज्ञान नव्हें ॥ १४ ॥ नाना दुःखांची परीक्षा । नाना रोगांची परीक्षा । नानां चिन्हांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १५ ॥ नाना मंत्रांची परीक्षा । नाना यंत्रांची परीक्षा । नाना मूर्तींची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १६ ॥ नाना क्षेत्रांची परीक्षा । नाना गृहांची परीक्षा । नाना यंत्रांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १७ ॥ नाना होणार परीक्षा । नाना समयांची परीक्षा । नाना तर्कांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १८ ॥ नाना अनुमानपरीक्षा । नाना नेमस्त परीक्षा । नाना प्रकारपरीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १९ ॥ नाना विद्यांची परीक्षा । नाना कळांची परीक्षा । नाना आश्चर्य परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ २० ॥ नाना शब्दांची परीक्षा । नाना अर्थांची परीक्षा । नाना भाषांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ २१ ॥ नाना स्वरांची परीक्षा । नाना वेदांची परीक्षा । नाना लेखनपरीक्षा ।

---

१ सफलता. २ अत्यंत दुर्गम, खोल, कठीण. * सरळ, शुद्ध. ३ यथायोग्य. ४ उद्योगांचें. ५ निरनिराळ्या आचारांच्या रीतीचें. ६ स्त्रियांची. ७ विश्वांतील चेतनाचेतन पदार्थांची. ८ पालखी, मेणे, गाडी इत्यादि वाहनांची. ९ तेजस्वी पदार्थांची परीक्षा. १० रोपांची परीक्षा. ११ शेतजमिनींची. १२ पुढें काय होईल हें सांगणें. १३ अटकळ. १४ अक्षरांची.

हें ज्ञान नव्हे ॥ २२ ॥ नाना मतांची परीक्षा । नाना ज्ञानांची परीक्षा । नाना वृत्तींची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ २३ ॥ नाना रूपांची परीक्षा । नाना रसनांची परीक्षा । नाना सुगंधांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ २४ ॥ नाना सृष्टींची परीक्षा । नाना विकारपरीक्षा । नाना पदार्थपरीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ २५ ॥ नेमकेंचि बोलणें । तत्काळचि प्रतिवचन देणें । शीघ्रचि कवित्व करणें । हें ज्ञान नव्हे ॥ २६ ॥ नेत्रपल्लवी नादकळा । पल्लवी भेदकळा । स्वरपल्लवी संकेतकळा । हें ज्ञान नव्हे ॥ २७ ॥ काव्यकुशल सं ळा । गीत प्रबंधें नृत्यकळा । सभाचातुर्य शब्दकळा । हें ज्ञान नव्हे ॥ २८ ॥ वाग्वैलास मोहनकळा । रम्य रसाळ गायनकळा । हास्य विनोद काव्यकळा । हें ज्ञान नव्हे ॥ २९ ॥ नाना लाघवें चित्रकळा । नाना संगीतकळा । नाना प्रकारें विचित्रकळा । हें ज्ञान नव्हे ॥ ३० ॥ आदिकरूनि ष्ट कळा । यांहि वेगळ्या नाना कळा । चौदा विद्या सिद्धिसकळा । हें ज्ञान नव्हे ॥ ॥ असो सकळ कळाप्रवीण । विद्यामात्र परिपूर्ण । परी तें कौशल्य ज्ञान । म्हणों नये ॥ ३२ ॥ हें ज्ञान * होयसे भासे । परंतु मुख्य ज्ञान तें अनारिसें । जेथें प्रकृतीचें प्रं । समूळ * वाव ॥ ३३ ॥ जाणावें दुसऱ्याचें जीवाचें । हें ज्ञान वाटे साचें । परंतु हें * मज्ञानाचें । लक्षण नव्हे ॥ ३४ ॥ महानुभाव महा भला । मानसपूजा रेतां चुकल कोणी एकें पाचारिला । 'ऐसें नव्हे' म्हणोनी ॥ ३५ ॥ ऐसी जाणें अंतरस्थिति । तथास परम ज्ञाता म्हणती । परंतु जेणें मोक्षप्राप्ति । तें हें ज्ञान नव्हे ॥ ३६ ॥ बहुत प्रकारींचीं ज्ञानें । सांगों जातां असाधारणें । सायुज्यप्राप्ति होय जेणें । तें ज्ञान वेगळें । ३७ ॥ तरी तें कैसें आहे ज्ञान । कैसें समाधानाचें लक्षण । ऐसें हें विशद करून । मज निरूपावें ॥ ३८ ॥ ऐसें शुद्ध ज्ञान पुशिलें । तें पुढिलिये समासीं निरूपिलें । श्रोतीं अवधान दिधलें । पाहिजे पुढें ॥ ३९ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे पंचमदशके बहुधाज्ञाननिरूपणं नाम पंचमः समासः ॥ ५ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ऐका ज्ञानाचें लक्षण । ज्ञान म्हणिजे आत्मज्ञान । पाहावें आपणास आपण । या नांव ज्ञान ॥ १ ॥ ख्य देवास जाणावें । सत्य स्वरूप ओळखावें । नित्यानित्य विचारावें । ॥ जेथें दृश्य प्रकृति सरे । पांचभौतिक हें वोसरे । समूळ ांव ज्ञान ॥ ३ ॥ मनोबुद्धिअगोचर । न चले तर्काचा वि पर । या नांव ज्ञान ॥ ४ ॥ जेथें नाहीं दृश्य-

१ भावनांची. २ डोळ्यांनी खुणा करणें. ५ वेगवेगळे नाद-आवाज करणें. ६ हातांच्य लट-वृत्ति करण्याचें चातुर्य. ८ श्वासावरून संज्ञा. ९ खुणांनीं समजा उत्तम वक्तृत्वशक्ति. १२ गोड. १३ कौशल्यें. १४ गीत, वाद्य, नृत्य, नाटक आहे असें. १५ ब्रह्मज्ञान, वेद, ज्योतिष इत्यादि चौदा विद्या. १६ निराळेंच. १७ अ. १८ साधुपुरुष. १९ विशेष. २० दिसणारें सर्व मायामय विश्व. २१ पृथ्वी, आप, ते भूतांपासून होणारें सर्व. २२ मिथ्या असें दिसतें, बाधा होते. २३ द्विधाभाव. २४ मन ह तही दुर्गम्य. २५ निर्देश. २६ परावाणीच्याही पलीकडे.

भाने । जेथें जाणीव हें अज्ञान । विमळ शुद्ध स्वरूपज्ञान । यासि बोलिजे ॥ ५ ॥ सर्वसाक्षिणी अवस्था तुर्या । ज्ञान ऐसें म्हणती तया । परी तें जाणिजे वायां । पदार्थ-ज्ञान ॥ ६ ॥ दृश्य पदार्थ जाणिजे । त्यास पदार्थज्ञान बोलिजे । शुद्ध स्वरूप जाणिजे । या नांव स्वरूपज्ञान ॥ ७ ॥ जेथें सर्वांचि नाहीं ठायींचें । तेथें सर्वसाक्षित्व कैचें । म्हणोनि शुद्ध ज्ञान तुर्येचें । मानूंचि नये ॥ ८ ॥ ज्ञान म्हणजे अद्वैत । तुर्या प्रत्यक्ष द्वैत । म्हणोनि शुद्ध ज्ञान तें सतत । वेगळेंचि असे ॥ ९ ॥ ऐक शुद्ध ज्ञानाचें ल । शुद्ध स्वरूपाचि आपण । या नांव शुद्ध स्वरूपज्ञान । जाणिजे श्रोतां ॥ १० ॥ क्य उपदेश भला । परी त्याचा जप नाहीं बोलिला । तेथींचा तो विचार . पाहिजे साधकें ॥ ११ ॥ महावा उपदेशसार । परी घेतला पाहिजे विचार । त्याच्या जपें अंधकार । न फिटे भ्रांत ॥ १२ ॥ महावाक्याचा अर्थ घेतां । आपण वस्तूचि तत्त्वतां । त्याचा जप करितां वृथां शिण होय ॥ १३ ॥ महावाक्याचें विवरण । हें मुख्य ज्ञानाचें लक्षण । शुद्ध ांशें आपण । वस्तूचि आहे ॥ १४ ॥ आपला आपणासि लाभ । हें ज्ञान परम दुर्ल । जें आदि अंतीं स्वयंभ । स्वरूपाचि स्वयं ॥ १५ ॥ जेथूनि हें सर्वहि प्रकटे । आणि ळहि जेथें आटे । तें ज्ञान झालिया फिटे । भ्रांति बंधनाची ॥ १६ ॥ मतें आणि मतां । जेथें हो निर्विकारें । अति सूक्ष्म विचारें । पाहातां ऐक्य ॥ १७ ॥ जें या चरा चराचें मूळ । शुद्ध स्वरूप निर्मळ । या नांव ज्ञान केवळ । वेदांतमतें ॥ १८ ॥ शोधितां आपण मूळस्थान । सहजचि उडे अज्ञान । या नांव म्हणिजे ब्रह्मज्ञान । मोक्षदायक ॥ १९ ॥ आपणासि ओळखों जातां । अंगीं वागे सर्वज्ञता । तेणें ऐकदेशी वार्ता । निःशेष घडे ॥ २० ॥ मी कोण ऐसा हेत । धरूनि पाहतां देहातीत । अवलोकितां नेमस्त । स्वरूपचि होय ॥ २१ ॥ असो पूर्वीं थोर थोर । जेणें ज्ञानें पैलपार । पावले ते सर्वांचार । ऐक आतां ॥ २२ ॥ व्यास वसिष्ठ महामुनी । शुक नारद समाधानी । जनकादिक महाज्ञानी । येणेंचि ज्ञानें ॥ २३ ॥ वामदेवादिक योगीश्वर । वाल्मीक अत्रि ऋषीश्वर । शौनकादि अध्यात्मसार । वेदांतमतें ॥ २४ ॥ सनकादिक मुख्य करूनी । आदिनाथ मीन गोरक्ष । ऐसे बोलतां वचनीं । अगाध असती ॥ २५ ॥ सिद्ध मुनि महानुभाव । च । जेणें सुखें महादेव । डुल्लत सदा ॥ २६ ॥ जें वेदशास्त्रांचें सार । ज्याची प्राप्ति

---

१ दिसणाऱ्या सर्वांची—जगताची—कल्पना. न. ३ सर्व पाहणारी; जागृति, स्वप्न, सुषुप्ति या तीनही स्थितींची साक्षिणी. ४ तुर्या. ५ दृष्टीस दिसणारा. ६ जीव आणि ब्रह्म एक न हा भाव. ७ अ तिपादन करणारीं ' तत्त्वमसि ' इत्यादि वचनें. ८ सांगितला. ९ परब्रह्म. श्रेष्ठ जो ब्रह्मप्रत्यगात्मा. ११ स्वयंभू, स्वतःसिद्ध. १२ बंधनाचा भ्रम नाहीं. निराळीं मतें. १४ निरर्थक, निरुपयोगी. १५ स्थावरजंगमात्मक जगताचें. १६ पणा. १७ देहाबाहेरचा, देहापलीकडचा. १८ खरोखर. १९ मत्स्येंद्रनाथ. २० अंतःकरणभाव. २२ गुरुप्रतीति व आत्मानुभव यांचा विचार.

भावानुसार । भाविकांसि होय ॥ २७ ॥ साधु संत आणि सज्जन । भूत भविष्य वर्तमान । सर्वज्ञांचें गुह्यज्ञान । तें सांगिजेल आतां ॥ २८ ॥ तीर्थें व्रतें तपें दानें । जें न जोडे धर्मानें । पंचाग्नि गोरांजनें । जें प्राप्त नव्हे ॥ २९ ॥ सकळ साधनांचें फळ । ज्ञानाची [illegible]ळ । जेणें संशयाचें मूळ । निःशेष तुटे ॥ ३० ॥ छप्पन्न भाषा तितुके ग्रंथ । आ[illegible] वेदांत । या इतुक्यांचा गौहनार्थ । एकचि असे ॥ ३१ ॥ जें नेणवें पुराणीं । जेथें शिणल्या वेदवाणी । तेंचि आतां येच क्षणीं । बोधीन गुरुकृपें ॥ ३२ ॥ पाहिलें नसतां संस्कृत । रीगे नाहीं महाराष्ट्र ग्रंथीं । हृदयीं वसिल्या कृपामूर्ति । सद्गुरु स्वामी ॥ ३३ ॥ [illegible]नलगे संस्कृत । अथवा ग्रंथ प्राकृत । माझा स्वामी कृपेसहित । हृदयीं वसे ॥ ३४ ॥ न करितां वेदाभ्यास । अथवा [illegible]यास । प्रयत्नेंविण सुरस । सद्गुरुकृपा ॥ ३५ ॥ ग्रंथ मात्र महाराष्ट्र । त्याहू [illegible]त श्रेष्ठ । त्या संस्कृतामध्यें श्रेष्ठ । थोर तो वेदांत ॥ ३६ ॥ त्या वेदांतापरते कांहीं [illegible]धा श्रेष्ठ नाहीं । जेथें गर्भ सर्वही । प्रकट जाहला ॥ ३७ ॥ असो ऐसा जो [illegible] त्याचाहि अति गहन जो परमार्थ । तो तूं ऐक आतां ॥ ३८ ॥ अरे सद्गुरुवचन । सद्गुरुवचनें समाधान । नेणे[illegible]त आहे ॥ ३ सद्गुरुवचन तोचि सिद्धांत । सद्गुरुवचन तो [illegible]न । सें गहन । माझे स्वामीचें वचन । जेणे माझें [illegible]समाधान । ए जीवीचें [illegible]गुज । मी सांगेन म्हणतों तुज । जरी अवधान क्षणीं ॥ ४२ ॥ तंव शिष्य म्लानवदनें बोले । धरिलीं स[illegible] भिलें । गुरुदेवें ॥ ४३ ॥ अहं ब्रह्मास्मि महावाक्य । तेथींचा ऐक्य । गुरु शिष्य जेथें ॥ ४४ ॥ ऐक शिष्या येथींचें [illegible] येविषयीं संदेह भ्रम । धरूंच नको ॥ ४५ ॥ नवविध [illegible] निवेदनें । तें समग्र प्रकारें कथन[illegible] कीजेल आतां ॥ ४६ ॥ [illegible] नासती यथान्वयें । प्रकृति[illegible]ति ब्रह्म होती ॥ ४ हि नुरे तत्त्वतां । ऐक्यरूपें [illegible]गाहे ॥ ४८ ॥ ऐक्यता । पिंड ब्रह्मांड [illegible]कोनें केर आटे । तदाकारें मूल

---

१ निष्ठेप्रमाणें. २ अग्नि व वर सूर्य अ[illegible] शिरोभाग. ६ [illegible] गंभीर, खोल अ[illegible] अध्यात्मज्ञान, [illegible]ई मी ब्रह्म आहें. १७ [illegible] त्याचा त्यांत लय [illegible] मात्मा.) २२ [illegible]

वोसरे । सहजचि येणें प्रकारें । झालें आत्मनिवेदन ॥ ५१ ॥ असो सद्गुरूचे ठायीं अनन्यता
तरी तुज कायसी रे चिंता । वेगळेपणें अभक्ता । उरोंचि नको ॥ ५२ ॥ आतां हेंचि दृढी-
करण । व्हावया करी सद्गुरुभजन । सद्गुरुभजनें समाधान । *नेमस्त आहे ॥ ५३ ॥ या नांव
शिष्या आत्मज्ञान । येणें पाविजे समाधान । भवभयाचें बंधन । समूळ मिथ्या ॥
मी ' घाटे ज्या नरा । तो जाणावा आत्महत्यारा । देहाभिमानें येरझारा । भोगि
॥५५॥ असो चौदा देहांवेगळां । जन्मकर्मनिराळा । सकळ अबाळगोंबळा । संबं
कोणासीच नाहीं बंधन । भ्रांतिस्तव भुललें जन । दृढ घेतला देहाभिमान । ह
शिष्या एकांतीं बैसावें । स्वरूपीं विश्रांतीस जावें । तेणें गुणें दृढ व्हावें । परमा ॥ ५८ ॥
अखंड घडे श्रवण मनन । पाविजे समाधान । पूर्ण झालिया ब्रह्मज्ञान । वैराग्य भरे
अंगीं ॥ ५९ ॥ शिष्या अनर्गल । करिसी इंद्रियें बाष्कळें । तेणें नाहीं तळमळ ।
पर नाहीं ॥ ६० ॥ वैराग्य उपजलें । तबासीच पूर्ण ज्ञान झालें । मणि टाकितांचि
राज्य जेवीं ॥ ऐक शिष्या सावधान । आतां भविष्य मी सांगेन । जया पुरु-
प्राप्त ॥ ६२ ॥ म्हणोनी जे अविद्या । सांडूनि धरावी सुविद्या ।
॥६३॥ सन्निपाचेनि दुःखें । भयानक दृष्टीस देखे । औषध
॥ ते सन्निपातें । मिथ्या दृष्टीस दिसतें । ज्ञान औ-
॥ ६५ ॥ शिष्या स्वप्नें वोसंडीला । तो जागृतीस आ-
निर्भय जे ॥ ६६ ॥ मिथ्याच परी सत्य वाटलें । तेणें गुणें
लें । हें तों घडेना ॥ ६७ ॥ मिथ्या आहे जागृतीसी । परी
झालिया तयासी । भयचि नाहीं ॥ ६८ ॥ परी अविद्याझोंप
पूर्ण जागृति श्रवणद्वारें मननें करावी ॥ ६९ ॥ जागृतीची
ती विषयीं विरक्त पूर्ण । अंतरीं वासूनी ॥ ७० ॥ जेणें विर-
जाणावें । तेणें साधन करावें । थोरीव सांडूनि ॥ ७१ ॥
पणें बद्ध झाला । पू भला । ज्ञानाधिकारी ॥७२॥
भूचें लक्षण । वण । कैसी जाणावी ॥७३॥
अवधान द्यावें ॥७४॥
नाम समासः ॥६॥

स्थूळ, सूक्ष्म, कारण,
वें, स्वच्छंद रीतीनें.
कांचेचा किंवा
राज्य मिळालें,
पित्त, कफ यांचा
स्वरूप. १८ स्वप्न हें
१२ अज्ञानरूपी
णारा. २४ लक्ष.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ सृष्टीं जे कां चैराचर । जीव दाटले अपार । परी ते अवघे चार । बोलिजेती ॥ १ ॥ ऐक तयांचें लक्षण । चार ते कोण कोण । बद्ध मुमुक्षु साधक जाण । चौथा तो सिद्ध ॥ २ ॥ या चौघांविरहित कांहीं । चराचरीं पांचवा नाहीं । आतां असो हीं सर्वही । विशद करूं ॥ ३ ॥ बद्ध म्हणिजे तो कोण । कैसें मुमुक्षूचें लक्षण । साधकसिद्धवोळखण । कैसी जाणावी ॥ ४ ॥ श्रोतीं व्हावें सावध । प्रस्तुत ऐका बद्ध । मुमुक्षु साधक आणि सिद्ध । पुढें निरूपिजेल ॥ ५ ॥ आतां बद्ध तो जाणिजे ऐसा । अंधारीचा अंध जैसा । चक्षुविण दाही दिशा । शून्याकार ॥ ६ ॥ भक्त ज्ञाता तापसी । योगी वीतरागी संन्यासी । पुढें देखतां दृष्टीसी । येणार नाहीं ॥ ७ ॥ न दिसे नेणे कर्माकर्म । न दिसे नेणे धर्माधर्म । न दिसे नेणे सुगम । परमार्थपंथ ॥ ८ ॥ तयास न दिसे सच्छास्त्र । सत्संगति सत्पात्र । सन्मार्ग जो कां पवित्र । तोही न दिसे ॥ ९ ॥ नकळे सारासारविचार । नकळे स्वधर्म आचार । नकळे कैसा परोपकार । दान पुण्य ॥ १० ॥ नाहीं पोटीं भूतदया । नाहीं शुचिष्मंत काया । नाहीं जनांसि निववावया । वचन मृदु ॥ ११ ॥ नकळे भक्ति नकळे ज्ञान । नकळे वैराग्य नकळे ध्यान । नकळे मोक्ष नकळे साधन । या नांव बद्ध ॥ १२ ॥ नकळे देव निश्चयात्मक । नकळे संतांचा विवेक । नकळे मायेचें कौतुक । या नांव बद्ध ॥ १३ ॥ नकळे परमार्थाची खूण । नकळे अध्यात्मनिरूपण । नकळे आपणासि आपण । या नांव बद्ध ॥ १४ ॥ नकळे जीवाचें जन्ममूळ । नकळे साधनांचें फळ । नकळे तत्त्व केवळ । या नांव बद्ध ॥ १५ ॥ नकळे कैसें तें बंधन । नकळे मुक्तीचें लक्षण । नकळे वस्तु विलक्षण । या नांव बद्ध ॥ १६ ॥ नकळे शास्त्रार्थ बोलिला । नकळे निजस्वार्थ आपुला । नकळे संकल्पें बांधिला । या नांव बद्ध ॥ १७ ॥ जयास नाहीं आत्मज्ञान । हें मुख्य बद्धाचें लक्षण । तीर्थ व्रतें दान पुण्य । कांहींच नाहीं ॥ १८ ॥ दया नाहीं करुणा नाहीं । आर्जव नाहीं मैत्री नाहीं । शांति नाहीं क्षमा नाहीं । या नांव बद्ध ॥ १९ ॥ जें ज्ञानाविषयीं उणें । तेथें कैचीं ज्ञानाचीं लक्षणें । बहुसाल कुलक्षणें । या नांव बद्ध ॥ २० ॥ नानाप्रकारचे दोष । करितां वाटे परम संतोष । बाष्कळपणाचा हव्यास । या नांव बद्ध ॥ २१ ॥ बहु काम बहु क्रोध । बहु गर्व बहु मद । बहु द्वंद्वें बहु खेद । या नांव बद्ध ॥ २२ ॥ बहु दर्प बहु दंभ । बहु विषय बहु लोभ । बहु कर्कश बहु अशुभ । या नांव बद्ध ॥ २३ ॥ बहु ग्रामणी बहु मत्सर । बहु असूया तिरस्कार । बहु पापी बहु विकार । या नांव बद्ध ॥ २४ ॥ बहु अभिमान बहु ताठा । बहु अहंकार बहु फांटा । बहु कुकर्मांचा सांटा । या नांव बद्ध ॥ २५ ॥ बहु कापट्य वादविवाद । बहु कुतर्क भेदाभेद । बहु क्रूर कुपामंद । या नांव बद्ध ॥ २६ ॥ बहु निंदा बहु द्वेष । बहु

---

१ स्थावरजंगमात्मक. २ स्पष्ट. ३ सोपा. ४ परमार्थ संपादण्याचा मार्ग. ५ शुद्ध, पवित्र. ६ शरीर. ७ 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' हा विचार. ८ ब्रह्मज्ञानसंबंधी विवेचन. ९ परब्रह्म. १० अंतःकरणांत उठणाऱ्या वृत्तीनें, वासनेनें. ११ सरळपणा. १२ पुष्कळ प्रकारचा. १३ भांडण, तंटा. १४ ढोंग. १५ हरामीपणा. १६ मत्सरी बुद्धि. १७ गर्व. १८ बडबड. १९ ज्याला दया क्वचित् येते.

अधर्म बहु अभिलाष । बहु प्रकारींचे दोष । या नांव बद्ध ॥ २७ ॥ बहु भ्रष्ट अनाचार । बहु नष्ट एकंकार । बहु अनीति अविचार । या नांव बद्ध ॥ २८ ॥ बहु निष्ठुर बहु घातकी । बहु हत्यारा बहु पातकी । बहु तपिळे[1] कुविद्या अनेकी । या नांव बद्ध ॥ २९ ॥ बहु दुराशा बहु स्वार्थी । बहु कलह बहु अनर्थी । बहु डाईक[2] दुर्मति । या नांव बद्ध ॥ ३० ॥ बहु कल्पना बहु कामना । बहु तृष्णा बहु वासना । बहु ममता बहु भावना । या नांव बद्ध ॥ ३१ ॥ बहु विकल्पी[3] बहु विषादी । बहु मूर्ख बहु संमंधी[4] । बहु कुविद्येची बुद्धि । या नांव बद्ध ॥ ३२ ॥ बहु वाचाळ बहु पाषांडी । बहु दुर्जन बहु थोतांडी[5] । बहु पैशुन्य[6] बहु खोडी । या नांव बद्ध ॥ ३३ ॥ बहु अभाव[7] बहु भ्रम । बहु भ्रांति बहु तेम[8] । बहु विक्षेप[9] बहु विराम[10] । या नांव बद्ध ॥ ३४ ॥ बहु कृपण बहु खंदस्ती[11] । बहु अदेखणा बहु मस्ती । बहु असत्क्रिया व्यर्थस्ती[12] । या नांव बद्ध ॥ ३५ ॥ परमार्थाविषयीं अज्ञान । प्रपंचाचें उदंड[13] ज्ञान । नेणें स्वयें समाधान । या नांव बद्ध ॥ ३६ ॥ परमार्थाचा अनादर । प्रपंचाचा अत्यादर । संसारभार जोजार[14] । या नांव बद्ध ॥ ३७ ॥ सत्संगाची नाहीं गोडी । संतनिंदेची आवडी । देहबुद्धीची घातली बेडी । या नांव बद्ध ॥ ३८ ॥ हातीं द्रव्याची जपमाळ । कांतांध्यान सर्वकाळ । सत्संगाचा दुष्काळ । या नांव बद्ध ॥ ३९ ॥ नेत्रीं द्रव्य दारा पहावी । श्रवणीं द्रव्य दारा ऐकावी । चिंतनीं द्रव्य दारा चिंतावी । या नांव बद्ध ॥ ४० ॥ काया वाचा आणि मन । चित्त वित्त जीव प्राण । द्रव्य दारेचें करी भजन । या नांव बद्ध ॥ ४१ ॥ इंद्रियें करूनि निश्चळ । चंचळ होऊं नेदी पळ । द्रव्य दारेसि लावी सकळ । या नांव बद्ध ॥ ४२ ॥ द्रव्य दारा तेंचि तीर्थ । द्रव्य दारा तोचि परमार्थ । द्रव्य दारा सकळ स्वार्थ । या नांव बद्ध ॥४३॥ व्यर्थ जाऊं नेदी काळ । संसारचिंता सर्वकाळ । कथा वार्ता तेंचि सकळ । या नांव बद्ध ॥४४॥ नाना चिंता नाना उद्वेग[15] । नाना दुःखाचे संसर्ग[16] । करी परमार्थाचा त्याग । या नांव बद्ध ॥ ४५ ॥ घटिका निमेष पळभरी । दुश्चित[17] नव्हता अंतरीं । सर्वकाळ ध्यान धरी । द्रव्यदाराप्रपंचाचें ॥ ४६ ॥ तीर्थ यात्रा दान पुण्य । हरिकथा निरूपण । मंत्र पूजा जप ध्यान । सर्वहि द्रव्य दारा ॥ ४७ ॥ जागृतीं स्वप्नीं रात्रंदिवस । ऐसा लागला विपर्यय[18]ास । नाहीं क्षणाचा अवकाश । या नांव बद्ध ॥ ४८ ॥ ऐसें बद्धाचें लक्षण । मुमुक्षुपणीं पालटे जाण । ऐक तेंहि वोळखण । पुढिले समासीं ॥ ४९ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे पंचमदशके बद्धलक्षणनिरूपणं नाम सप्तमः समासः ॥ ७ ॥

---

१ वर्णसंकर. २ अत्यंत तापट. ३ संकटें आणणारा. ४ पोटांत दंश ठेवणारा. ५ इच्छा. ६ मनोविकार. ७ संशयखोर, विरुद्ध कल्पना मनांत आणणारा. ८ खेद करणारा. ९ नातलगांचा हव्यास करणारा. १० वेदशास्त्राधाररहित वागणारा. ११ दंभ माजविणारा. १२ दुष्टपणा. १३ अविश्वास. १४ क्रोधादिकांच्या योगानें कर्तव्याकर्तव्यतेचा विचार, याविषयीं अंधार–अज्ञान. १५ चंचलता, चळ. १६ विश्रांति, विसावा. १७ दांडगाई करणारा. १८ हेवा करणारा. १९ उलटी, उरफाटी. २० पुष्कळ. २१ यातायात, दगदग. २२ स्त्रीचें चिंतन. २३ स्त्री. २४ दुःखें. २५ स्पर्श, संबंध. २६ दुःखी, कष्टी. २७ विषयांचें चिंतन.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ संसारमदाचेनि गुणें । नाना हीनें कुलक्षणें । जयाचे मुखावलोकनें । दोषचि लागे ॥ १ ॥ ऐसा प्राणी जो का बध्द । संसारीं वर्ततां अबद्ध । तयास प्राप्त झाला खेद । काळांतरीं ॥ २ ॥ संसारदुःखें दुखावला । त्रिविध तापें पोळला । निरूपणें पस्तावला । अंतर्यामीं ॥ ३ ॥ झाला प्रपंचीं उदास । मनें घेतला विषयत्रास । म्हणे आतां पुरे सोस । संसाराचा ॥ ४ ॥ प्रपंच जाईल सकळ । येथील श्रम तो निष्फळ । आतां कांहीं आपुला काळ । सार्थक करूं ॥ ५ ॥ ऐसी बुद्धि प्रस्तावली । पोटीं अवस्था लागली । म्हणे माझी वयसा गेली । व्यर्थचि अवघी ॥ ६ ॥ पूर्वी नाना दोष केले । ते अवघेच आठवले । पुढें येऊनि उभे ठेले । अंतर्यामीं ॥ ७ ॥ आठवे यमाची यातना । तेणें भयचि वाटे मना । नाहीं पापासी गणना । म्हणोनियां ॥ ८ ॥ नाहीं पुण्याचा विचार । झाले पापाचे डोंगर । आतां दुस्तर हा संसार । कैसा तरूं ॥ ९ ॥ आपुले दोष आच्छादिले । भल्यास गुणदोष लाविले । देवा म्यां व्यर्थचि निंदिले । संत साधु सज्जन ॥ १० ॥ निंदे ऐसे नाहीं दोष । ते मज घडले विशेष । माझे अवगुणीं आकाश । बुडों पाहे ॥ ११ ॥ नाहीं ओळखिले संत । नाहीं अर्चिला भगवंत । नाहीं अतीत अभ्यागत । संतुष्ट केले ॥ १२ ॥ नाहीं कष्टविलें शरीर । नाहीं केला परोपकार । नाहीं रक्षिला आचार । कोंममदें ॥ १३ ॥ पूर्वपाप वोढवलें । मज पुण्य नाहीं घडलें । मन अधोहाटीं पडिलें । सर्वकाळ ॥ १४ ॥ भक्तिमाता हे बुडविली । शांतिविश्रांति मोडिली । मूर्खपणें म्यां बिघडली । सद्बुद्धि सद्वासना ॥ १५ ॥ आतां कैसेनि घडेल सार्थक । दोष केले निरर्थक । पाहों जातां विवेक । उरला नाहीं ॥ १६ ॥ कोण उपाय करावा । कैसा परलोक पावावा । कोण्या गुणें देवाधिदेवा । पाविजेल ॥ ॥ १७ ॥ नाहीं सद्भाव उपजला । अवघा लौकिक संपादिला । दंभ वरपंगें केला । खटाटोप कर्माचा ॥ १८ ॥ कीर्तन केलें पोटासाठीं । देव मांडिले हाटवटीं । आहा देवा बुद्धि खोटी । माझी मीच जाणें ॥ १९ ॥ पोटीं धरूनि अभिमान । शेवटीं बोले निरभिमान । अंतरीं वांछूनियां धन । ध्यानस्थ जाहलों ॥ २० ॥ व्युत्पत्तीनें लोक भोंदले । पोटासाठीं संत निंदिले । माझे पोटीं दोष भरले । नाना प्रकारींचे ॥ २१ ॥ सत्य तेंचि उच्छेदिलें । मिथ्या तेंचि प्रतिपादिलें । ऐसें नाना कर्म केलें । उदर भरावयाकारणें ॥ २२ ॥ ऐसा पोटीं प्रस्तावला । निरूपणें पालटला । तोचि मुमुक्षु बोलिला । ग्रंथांतरीं ॥ २३ ॥ सन्मार्ग पोठीं धरी । सत्संगाची वांच्छा करी । विरक्त झाला संसारी । या नांव मुमुक्षु ॥ २४ ॥ गेले राजे चक्रवर्ती । माझें वैभव तें किती । म्हणे धरूं सत्संगति । या नांव मुमुक्षु ॥ २५ ॥ आपले अवगुण देखे । विरक्तिबळें वोळखे । आपणासि निंदी दुःखें । या नांव मुमुक्षु ॥ २६ ॥ म्हणें मी काय दंभधारी । म्हणे मी

---

१ तोंड पाहतां. २ स्वच्छंद रीतीनें. ३ हांव. ४ पश्चात्ताप पावली. ५ काळजी, चिंता. ६ वय. ७ झांकिले. ८ वाईट गुणांनीं. ९ पूजिला. १० विषयांध होऊन. ११ वाईट मार्गांत. १२ श्रमांच्या शेवटीं अवश्यक लागणारी विश्रांति=स्वास्थ्य. १३ साफल्य. १४ वरवर. १५ भरबाजारांत. १६ फक्त बोलण्यांत. १७ विद्वत्तेनें. १८ नाशिलें. १९ सिद्ध केलें. २० पस्तावला. २१ सार्वभौम. २२ दांभिक.

काय अनाचारी । म्हणे मी काय अनुपकारी । या नांव मुमुक्षु ॥ २७ ॥ म्हणे मी पतित चांडाळ । म्हणे मी दुराचारी खळ । म्हणे मी पापी केवळ । या यांव मुमुक्षु ॥ २८ ॥ म्हणे मी अभक्त दुर्जन । म्हणे मी हीनाहूनि हीनें । म्हणे मी जन्मलों पाषाण । या नांव मुमुक्षु ॥ २९ ॥ म्हणे मी दुरभिमानी । म्हणे मी तापिळ जनीं । म्हणे मी नाना-व्यसनीं । या नांव मुमुक्षु ॥ ३० ॥ म्हणे मी आळशी अंगचोर । म्हणे मी कपटी कातर । म्हणे मी मूर्ख अविचार । या नांव मुमुक्षु ॥ ३१ ॥ म्हणे मी निकामी वाचाळ । म्हणे मी पाषांडी तोंडाळ । म्हणे मी कुबुद्धि कुटिळ । या नांव मुमुक्षु ॥ ३२ ॥ म्हणे मी कांहींच नेणें । म्हणे मी सकलांहूनि उणें । आपलीं वर्णी कुलक्षणें । या नांव मुमुक्षु ॥ ३३ ॥ म्हणे मी कुश्चिळ अघोरी । म्हणे मी नीचें नानापरी । म्हणे मी अनधिकारी । या नांव मुमुक्षु ॥ ३४ ॥ म्हणे मी काय आपस्वार्थी । म्हणे मी काय अनर्थी । म्हणे मी नव्हे परमार्थी । या नांव मुमुक्षु ॥ ३५ ॥ म्हणे मी अवगुणांचा राशि । म्हणे मी व्यर्थ आलों जन्मासी । म्हणे मी भार झालों भूमीसी । या नांव मुमुक्षु ॥ ३६ ॥ आपणास निंदी सावकाश । पोटीं संसाराचा त्रास । धरी सत्संगाचा हव्यास । या नांव मुमुक्षु ॥ ३७ ॥ नाना तीर्थें धुंडाळिलीं । शमदमादि साधनें केलीं । नाना ग्रंथांतरें पाहिलीं । शोधूनियां ॥ ३८ ॥ तेणें नव्हे समाधान । वाटे अवघाच अनुमान । म्हणे रिघूं संतांस शरण । या नांव मुमुक्षु ॥ ३९ ॥ देहाभिमान कुलाभिमान । द्रव्याभिमान मानाभिमान । सांडूनि संतचरणीं अनन्य । या नांव मुमुक्षु ॥ ४० ॥ अहंता सांडूनि दूरी । आपणासि निंदी नानापरी । मोक्षाची अपेक्षा करी । या नांव मुमुक्षु ॥ ४१ ॥ ज्याचें मन थोरपणा लाजे । जो परमार्थाकारणें झिजे । संतपायीं विश्वास उपजे । या नांव मुमुक्षु ॥ ४२ ॥ स्वार्थ सांडूनि प्रपंचाचा । हव्यास धरिला परमार्थाचा । अंकित होईन सज्जनांचा । या नांव मुमुक्षु ॥ ४३ ॥ ऐसा मुमुक्षु जाणिजे । संकेतें चिन्हें ओळखिजे । पुढें श्रोतीं अवधान दीजे । साधकलक्षणीं ॥ ४४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे पंचमदशके मुमुक्षुलक्षणनिरूपणं नाम अष्टमः समासः ॥ ८ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ मागां मुमुक्षूचें लक्षण । संकेतें केलें कथन । आतां परिसा सावधान । साधक तो कैसा ॥ १ ॥ अवगुणांचा करूनि त्याग । जेणें धरिला संतसंग । तयासि बोलिजे मग । साधक ऐसा ॥ २ ॥ जो संतांशीं शरण गेला । संतजनीं आश्वासिला । मग तो साधक बोलिला । ग्रंथांतरीं ॥ ३ ॥ उपदेशिलें आत्मज्ञान । तुटलें संसारबंधन । दृढतेकारणें करी साधन । या नांव साधक ॥ ४ ॥ धरी श्रवणाची आवडी । अद्वैतनिरूपणाची गोडी । मननें अर्थांतर काढी । या नांव साधक

---

१ वाईट वर्तनाचा. २ दुसऱ्यांनीं केलेले उपकार न मानणारा. ३ पापी. ४ नीचापेक्षां नीच. ५ तापट. ६ अंग चुकारू. ७ भित्रा. ८ निरुपयोगी. ९ मलिन, मलिच्छ. १० भयंकर गोष्टी करणारा. ११ स्वतःचेंच हित करणारा. १२ अनर्थ, संकटें आणणारा. १३ सदासर्वदा. १४ नाद. १५ मनाची शांति व इंद्रियनिग्रह वगैरे. १६ एकनिष्ठ. १७ इच्छा, अभिलाष. १८ नोकर, दास. १९ थोडक्यांत, २० उत्तेजिला, धीर दिला. २१ अर्थाचें रहस्य.

॥ ५ ॥ होतां सारासार विचार । एके होऊनि तत्पर । संदेह छेदूनि दृढोत्तर । आत्मज्ञान पाहे ॥ ६ ॥ नाना संदेहनिवृत्ती । व्हावया धरी सत्संगति । आत्मशास्त्रगुरुप्रतीति । ऐक्यतेसि आणि ॥ ७ ॥ देहबुद्धि विवेकें वारी । आत्मबुद्धीस दृढ धरी । श्रवण मनन केलेंचि करी । या नांव साधक ॥ ८ ॥ विसंचूनि दृश्यभान । दृढ धरी आत्मज्ञान । विचारें राखे समाधान । या नांव साधक ॥ ९ ॥ तोडोनि द्वैताची उपाधि । अद्वैतवस्तु साधनें साधी । लावी ऐक्यतेचा समाधि । या नांव साधक ॥ १० ॥ आत्मज्ञान जीर्ण जर्जर । त्याचा करी जीर्णोद्धार । विवेकें पावे पैलपार । या नांव साधक ॥ ११ ॥ उत्तम साधूचीं लक्षणें । अंगिकारी निरूपणें । बळेंचि स्वरूपाकार होणें । या नांव साधक ॥ १२ ॥ असत्क्रिया ते सोडिली । आणि सत्क्रिया ते वाढविली । स्वरूपस्थिति बळावली । या नांव साधक ॥ १३ ॥ अवगुण त्यागी दिवसेंदिवस । करी उत्तम गुणांचा अभ्यास । स्वरूपीं लावी निजध्यास । या नांव साधक ॥ १४ ॥ दृढनिश्चयाचेनि बळें । दृश्य असतांच नाडळे । सदा स्वरूपीं मिसळे । या नांव साधक ॥ १५ ॥ प्रत्यक्ष माया अलक्ष करी । अलक्ष्य वस्तु लक्षी अंतरीं । आत्मस्थितीची धारणा धरी । या नांव साधक ॥ १६ ॥ जें या जनांसीं चोरलें । मनासि नेवंचे अनुमानलें । तेंचि जेणें दृढ केलें । या नांव साधक ॥ १७ ॥ जें बोलतांच वाचा धरी । जें पाहतांचि अंध करी । तेंचि साधी नानापरी । या नांव साधक ॥ १८ ॥ जें साधूं जातां साधवेना । जें लक्षूं जातां लक्षवेना । तेंचि अनुभवें आणी मना । या नांव साधक ॥ १९ ॥ जेथें मनचि मावळे । जेथें तर्कचि पांगुळें । तेंचि अनुभवा आणि बळें । या नांव साधक ॥ २० ॥ स्वानुभवाचेनि योगें । वस्तु साधी लागवेगें । तेचि वस्तु होय अंगें । या नांव साधक ॥ २१ ॥ अनुभवाची अंगें जाणे । योगियांचे खुणे बाणे । कांहींच न होनें असणें । या नांव साधक ॥ २२ ॥ परती सारूनि उपाधि । असाध्य वस्तु साधनें साधी । स्वरूपीं करी दृढ बुद्धि । या नांव साधक ॥ २३ ॥ देवाभक्तांचें मूळ । शोधूनि पाहे सकळ । साध्याचि होय तात्काळ । या नांव साधक ॥ २४ ॥ विवेकबळें गुप्त झाला । आपेंआप मावळला । दिसतो परि देखिला । नाहींच कोणी ॥ २५ ॥ मीपण मागें सांडिलें । स्वयें आपणासि धुंडिलें । तुर्येसहित वोलांडिलें । या नांव साधक ॥ २६ ॥ पुढें उन्मनीच्या शेवटीं । आपली आपणास अखंड भेटी । अखंड अनुभवीं

---

१ संशय. २ अगदी दृढ रीतीनें. ३ आपला अनुभव, शास्त्राचा सिद्धांत व गुरूचा उपदेश हीं तिन्हीं एकच आहेत असा अनुभव घेतो. ४ निवारण करितो. ५ निरास करून, बाधा करून. ६ दृश्य वस्तूचा भास. ७ उपसर्ग, संबंध. ८ परब्रह्मस्वरूप. ९ ध्यानाची पक्कदशा, एकाग्रता. १० वाइट कृत्य. ११ आत्मस्थिति. १२ सत्य असें भासत नाहीं. १३ प्रत्यक्ष जगदाकार रूपानें माया दिसते, पण ती मिथ्या असें समजतो. १४ दृष्टीस न पडणारी. १५ न दिसणारें ब्रह्म विचारदृष्टीनें पहातो. १६ एकसारखा आठव, अनुभव. १७ कल्पना करितां येत नाहीं. १८ वाणी–बोलणें–बंद करिते. १९ सत्य ब्रह्म पाहिलें असतां मिथ्या जग दिसत नाहीं. २० न होऊन. २१ पदार्थसंबंध. २२ आत्मस्वरूपीं. २३ चौथी अवस्था जी तुर्या, तीसह. २४ ब्रह्माशीं ऐक्य करणारी जी पांचवी अवस्था, तिच्या.

जयाची दृष्टि । या नांव साधक ॥ २७ ॥ द्वैताचा तटका तोडिला । भासाचा भास मोडिला । देहीं असोनि विदेही[1] झाला । या नांव साधक ॥ २८ ॥ जयास अखंड स्वरूपस्थिति[2] । नाहीं देहाची अहंकृति[3] । सकळ संदेहनिवृत्ति[4] । या नांव साधक ॥ २९ ॥ पंचभूतांचा विस्तार । जयास वाटे स्वप्नाकार । निर्गुणी[5] जयाचा निर्धार । या नांव साधक ॥ ३० ॥ स्वप्नीं भय जें वाटलें । तें जागृतीस नाहीं आलें । सकळ मिथ्या निर्धारिलें[6] । या नांव साधक ॥ ३१ ॥ मायेचें जें प्रत्यक्षपण । जनास वाटे हें प्रमाण । स्वानुभवें अप्रमाण । साधकें केलें ॥ ३२ ॥ निद्रा सांडूनि चेईरा[7] झाला । तो स्वप्नभयापासूनि सुटला । माया सांडूनि तैसा गेला । साधक स्वरूपीं ॥ ३३ ॥ ऐसी अंतरस्थिति बाणली । बाह्य निस्पृहता अवलंबिली । संसारउपाधि[8] त्यागिली । त्या नांव साधक ॥ ३४ ॥ कामापासूनि सुटला । क्रोधापासूनि पळाला । मदमत्सर सांडिला । एकीकडे ॥ ३५ ॥ कुळाभिमानासि सांडिलें । लोकलाजेसि लाजाविलें । परमार्थासी माजाविलें । विरक्तिबळें ॥ ३६ ॥ अविद्येपासूनि फटकला[9] । प्रपंचापासूनि निष्टला[10] । लोभाचे हातींचा गेला । अकस्मात ॥ ३७ ॥ थोरपणासि पाडिलें[11] । वैभवासि लिथाडिलें[12] । महत्त्वासी झिंजाडिलें[13] । विरक्तिबळें ॥ ३८ ॥ भेदाचा मेडघा मोडिला । अहंकार झोडूनि पाडिला । पायीं धरूनि आपटिला । संदेहशत्रु ॥ ३९ ॥ विकल्पाचा केला वेधू[14] । थापें मारिला भवेसिंधू[15] । सकळ भूतांचा विरोधू[16] । तोडूनि टाकिला ॥ ४० ॥ भवभयासि भडकाविलें । काळाचे टांगें मोडिलें[17] । मस्तक हाणोनि फोडिलें । जन्ममृत्यूचें ॥ ४१ ॥ देहसंबंधावरी लोटला । संकल्पावरी उठावला । कल्पनेचा घात केला । अकस्मात ॥ ४२ ॥ अपेधाकासि[18] तोडिलें । लिंगदेहासि[19] विभांडिलें[20] । पापांडासि पेंछाडिलें[21] । विवेकबळें ॥ ४३ ॥ गर्वावरी गर्व केला । स्वार्थ अनर्थीं घातला । अनर्थ तोहि निर्दाळिला[22] । नीतिन्यायें ॥ ४४ ॥ मोहासि मर्ध्येचि तोडिलें । दुःखासि दुधेडाचि केलें । शोकासि खंडूनि[23] सांडिलें । एकीकडे । ॥ ४५ ॥ द्वेष केला देशघडी[24] । अभावाची चेपिली नरडी । धाकें उदर तडाडी । कुतर्कांचें ॥ ४६ ॥ ज्ञानें विवेक माजला । तेणें निश्चय बळावला । अवगुणांचा संहार[25] केला । वैराग्यबळें ॥ ४७ ॥ अधर्मास स्वधर्में लुटिलें । कुकर्मास सत्कर्में झुगटिलें[26] । लोटूनि वांटा लाविलें । विचारें अविचारासी ॥ ४८ ॥ तिरस्कार तो चिरडिला । द्वेष खिरडून[27] सांडिला । विषाद अविषादें घातला

---

१ संबंध. २ देहरहित. ३ परब्रह्मस्थिति. ४ अभिमान. ५ संशयाचा नाश. ६ स्वप्नाप्रमाणें. ७ गुणातीत ब्रह्माच्याठिकाणीं. ८ निश्चय केला. ९ जागा. १० निरिच्छपणा. ११ संसाराचा उपसर्ग. १२ अज्ञानापासून. १३ निघून गेला. १४ निसटून गेला. १५ त्याग केला. १६ लाथ मारिली. १७ झाडून टाकले. १८ घर, मठ. १९ नाश. २० प्रहारानें. २१ संसाररूपी समुद्र. २२ विरुद्धपणा, वैर. २३ पाय. २४ अंतःकरणवृत्तीवर. २५ आपल्या भीतीला. २६ मारलें, नाहींसें केलें. २७ पांच ज्ञानेंद्रियें, पांच कर्मेंद्रियें, पंचप्राण, मन आणि बुद्धि अशीं सत्रा मिळून झालेल्या सूक्ष्म देहाला. २८ पराभव केला, नाश केला. २९ पाठलाग केला, पराभव केला. ३० नाश करून टाकला. ३१ तोडून टाकिलें. ३२ तोडून टाकलें. ३३ हद्दपार. ३४ नाश. ३५ झुगारून दिलें. ३६ उपटून.

पायांतळीं ॥ ४९ ॥ कोपावरी घालेणें घातलें । कापट्य अंतरीं कुटिलें । सख्य आपुलें मानिलें । विश्वजनीं ॥ ५० ॥ प्रवृत्तीचा केला त्याग । सुहृदांचा सोडिला संग । निवृत्तिपंथें ज्ञानयोग । साधिता जाहला ॥ ५१ ॥ विषयमैंदासि सिंतरिलें । कुविद्येसि वेढांविलें । आपणासि सोडविलें । आप्ततस्करांपासूनी ॥ ५२ ॥ पराधीनतेवरी कोपला । ममतेवरी संतापला । दुराशेचा त्याग केला । एकाएकीं ॥ ५३ ॥ स्वरूपीं घातलें मना । यातनेसि केली यातना । साक्षेपें आणि प्रयत्ना । प्रतिष्ठिलें ॥ ५४ ॥ अभ्यासाचा संग धरिला । साक्षेपासरिसा निघाला । प्रयत्न सांगातीं घेतला । साधनपंथें ॥ ५५ ॥ सावध देखे तो साधक । पाहे नित्यानित्यविवेक । संग त्यागूनि एक । सत्संग धरी ॥ ५६ ॥ बळेंचि सारिला संसार । विवेकें टाकिला जोजार । शुद्धाचारें अनाचार । भ्रष्टविला ॥ ५७ ॥ विसरास विसरला । आळसाचा आळस केला । सावध नाहीं दुश्चित झाला । दुश्चितपणासी ॥ ५८ ॥ आतां असो हें बोलणें । अवगुण सांडी निरूपणें । तो साधक ऐसा येणेंप्रमाणें । बुझावा ॥ ५९ ॥ बळेंचि अवघा त्याग कीजे । म्हणोनि साधक बोलिजे । आतां सिद्ध तोचि जाणिजे । पुढिलें समासीं ॥ ६० ॥ येथें संशय उठिला । निस्पृहे तोचि साधक झाला । त्याग न घडे संसारिकाला । तरी तो साधक नव्हे कीं ॥ ६१ ॥ ऐसें श्रोतयांचें उत्तर । त्याचें कैसें प्रत्युत्तर । पुढिलें समासीं तत्पर । होऊनि ऐका ॥ ६२ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे पंचमदशके साधकलक्षणनिरूपणं नाम नवमः समासः ॥ ९ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ मागें बोलिला संसारिक । त्यागेविण नव्हे कीं साधक । ऐका याचा विवेक । ऐसा असे ॥ १ ॥ सन्मार्ग तोचि जीवों धरणें । असन्मार्गाचा त्याग करणें । संसारिका त्याग येणें । प्रकारें ऐसा ॥ २ ॥ कुबुद्धित्यागाविणें कांहीं । सुबुद्धि लागणार नाहीं । संसारिका त्याग पाहीं । ऐसा असे ॥ ३ ॥ प्रपंचीं वीट मानिला । मनें विषयत्याग केला । तरीच पुढें अवलंबिला । परमार्थमार्ग ॥ ४ ॥ त्याग घडे अभावांचा । त्याग घडे संशयाचा । त्याग घडे अज्ञानाचा । शनैः शनैः ॥ ५ ॥ ऐसा सूक्ष्म अंतरत्याग । उभयतांस घडे सांग । निस्पृहास बाह्यत्याग । विशेष घडे ॥ ६ ॥ संसारिका ठायीं ठायीं । बाह्य त्याग घडे कांहीं । नित्यनेम श्रवण नाहीं । त्यागेविण ॥ ७ ॥ फिटली आशंका स्वभावें । त्यागेविण साधक नव्हे । पुढें कथेच्या अन्वयें । सावध ऐका ॥ ८ ॥ मागा झालें निरूपण । साधकाची वोळखण । आतां सांगिजेल खूण । सिद्ध लक्षणाची ॥ ९ ॥ साधु वस्तु होऊनि ठेला । संशय ब्रह्मांडाबाहेरि गेला । निश्चय चळेना ऐसा झाला । या नांव सिद्ध ॥ १० ॥ बद्धपणाचे अवगुण । मुमुक्षुपणीं

---

१ हल्ला केला. २ ऐहिक व्यवहारवृत्तीचा, प्रपंचाचा. ३ मित्रांचा. ४ परमार्थमार्गानें. ५ विषय हेच कोणी मोह घालून लुटणारे चोर, त्यांस. ६ ठकाविलें. ७ पराभव केला. ८ परस्वाधीनपणावर. ९ दीर्घ उद्योग. १० स्थापिलें. ११ यत्नाबरोबर. १२ हुशार, निपुण १३ दगदग. १४ जाणावा. १५ निरिच्छ. १६ वाईट बुद्धि टाकिल्यावांचून. १७ अभक्तांचा, अविश्वासाचा. १८ हळूहळू. १९ मनानें त्याग. २० पूर्ण. २१ परब्रह्म.

नाहीं जाण । मुमुक्षुपणाचें लक्षण । साधकपणीं नाहीं ॥ ११ ॥ साधकास संदेहवृत्ति। पुढें होतसे निवृत्ति । याकारणें निःसंदेह श्रोतीं । साधु ओळखावा ॥ १२ ॥ संशय रहित जें ज्ञान । तेंचि साधूचें लक्षण । सिद्धा अंगीं संशय जाण । लागेल कैसा ॥ १३ ॥ कर्ममार्ग संशयें भरला । साधनीं संशय कालवला । सर्वांमध्यें संशय भरला । साधु तो निःसंदेह ॥ १४ ॥ संशयाचें ज्ञान खोटें । संशयाचें वैराग्य पोरटें । संशयाचें भजन वोखटें । निष्फळ होय ॥ १५ ॥ व्यर्थ संशयाचा देव । व्यर्थ संशयाचा भाव । व्यर्थ संशयाचा स्वभाव । निश्चयेविण ॥ १६ ॥ व्यर्थ संशयाचें व्रत । व्यर्थ संशयाचें तीर्थ। व्यर्थ संशयाचा परमार्थ । निश्चयेविण ॥ १७ ॥ व्यर्थ संशयाची भक्ति । व्यर्थ संशयाची प्रीति । व्यर्थ संशयाची संगति । संशय वाढवी ॥ १८ ॥ व्यर्थ संशयाचें जिणें । व्यर्थ संशयाचें धरणें । व्यर्थ संशयाचें करणें । सर्व कांहीं ॥ १९ ॥ व्यर्थ संशयाची पोथी । व्यर्थ संशयाची व्युत्पत्ति । व्यर्थ संशयाची गति । निश्चयेविण ॥ २० ॥ व्यर्थ संशयाचा दर्क्ष । व्यर्थ संशयाचा पक्ष । व्यर्थ संशयाचा मोक्ष । होणार नाहीं ॥ २१ ॥ व्यर्थ संशयाचा संत । व्यर्थ संशयाचा पंडित । व्यर्थ संशयाचा बहुश्रुत । निश्चयेविण ॥ २२ ॥ व्यर्थ संशयाची श्रेष्ठता । व्यर्थ संशयाची व्युत्पन्नता । व्यर्थ संशयाचा ज्ञाता । निश्चयेविण ॥ २३ ॥ निश्चयेविण सर्व कांहीं । अणुमात्र तें प्रमाण नाहीं । व्यर्थचि पाडिलें प्रवाहीं । संदेहाचे ॥ २४ ॥ निश्चयेविण जें बोलणें । तें अवघेंचि कंटाळवाणें । बाष्कळ बोलिजे वाचाळपणें । निरर्थक ॥ २५ ॥ असो निश्चयेविण जे वल्गना । ते अवघी विटंबना । संशयें कांहीं समाधाना । उरी नाहीं ॥ २६ ॥ म्हणोनि संदेहरहित ज्ञान । निश्चयाचें समाधान । तेंचि सिद्धांचें लक्षण । निश्चयेसी ॥ २७ ॥ तंव श्रोता करी प्रश्न । निश्चय करावा कवण । मुख्य निश्चयाचें लक्षण । मज निरूपावें ॥ २८ ॥ ऐक निश्चय तो ऐसा । मुख्य देव आहे कैसा । नाना देवांचा वेळेसा । करूंचि नये ॥ २९ ॥ जेणें निर्मिलें चराचर । त्याचा करावा विचार । शुद्ध विवेकें परमेश्वर । वोळखावा ॥ ३० ॥ मुख्य देव तो कोण । भक्तांचें कैसें लक्षण । असत्य सांडून वोळखण । सत्याची धरावी ॥ ३१ ॥ आपल्या देवास ओळखावें । मग मी कोण हें पाहावें । संग त्यागून राहावें । वस्तुरूप ॥ ३२ ॥ तोडावा बंधनाचा संशय । करावा मोक्षाचा निश्चय । पाहावा भूतांचा अन्वय । व्यतिरेक ॥ ३३ ॥ पूर्वपक्षेसि सिद्धांत । पाहावा प्रकृतीचा अंत । मग पाहावा निवांत । निश्चय देवाचा ॥ ३४ ॥ देहाचेनि योगें संशय । करी समाधानाचा क्षय । तरी चळों न द्यावा निश्चय । आत्मत्वाचा ॥ ३५ ॥ सिद्ध असतां आत्मज्ञान । संदेह वाढवी देहाभिमान । याकारणें समाधान । आत्मनिश्चयें

---

१ चांगल्या रीतीनें वागणारा. २ मिसळला. ३ संशयरहित. ४ वाईट. ५ विद्वत्ता. ६ सावध, हुशार. ७ संशयाचे. ८ व्यर्थ बडबड. ९ ठाव. १० सांगावें. ११ घोटाळा. १२ एकाच्या अस्तित्वावर दुसऱ्याचें अस्तित्व अवलंबून असणें तो अन्वय, व एकाचे नसण्यावर दुसऱ्याचें नसणें तो व्यतिरेक. जसें बीज आणि वृक्ष यांचा अन्वयव्यतिरेक आहे. अन्वयव्यतिरेकानें कार्यकारणभाव सिद्ध होतो. १३ मायेचा. १४ शांतपणे.

राखावें ॥ ३६ ॥ आठवतां देहबुद्धि । उडे विवेकाची शुद्धि । याकारणें आत्मबुद्धि । सदृढ धरावी ॥ ३७ ॥ आत्मबुद्धि निश्चयाची । तेचि दशा मोक्षश्रीची । अहमात्मा हें कधींची । विसरोंचि नये ॥ ३८ ॥ निरूपिलें निश्चयाचें लक्षण । परी हें नकळे सत्संगेविण । संतांसि गेलिया शरण । संशय तुटती ॥ ३९ ॥ आतां असो हें बोलणें । ऐका सिद्धांचीं लक्षणें । मुख्य निःसंदेहपणें । सिद्ध बोलिजे ॥ ४० ॥ सिद्धस्वरूपीं नाहीं देहो । तेथें कैचा हो संदेहो । याकारणें सिद्ध पाहा हो । निःसंदेही ॥ ४१ ॥ देहसंबंधाचेनि गुणें । लक्षणासि काय उणें । देहातीताचीं लक्षणें । काय म्हणोनि सांगावीं ॥ ४२ ॥ जें लक्षवेना चक्षूसीं । त्याचीं लक्षणें सांगावीं कैसीं । निर्मळ वस्तु सिद्ध त्यासी । लक्षणें कैचीं ॥ ४३ ॥ लक्षणें म्हणिजे केवळ गुण । वस्तु ठायींच निर्गुण । तेंचि सिद्धांचें लक्षण । वस्तुरूपें ॥ ४४ ॥ तथापि ज्ञानदशकीं बोलिलें । म्हणोनि वक्तृत्व आटोपिलें । न्यूनपूर्ण क्षमा केलें । पाहिजे श्रोतीं ॥ ४५ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे पंचमदशके सिद्धलक्षणनिरूपणं नाम दशमः समासः ॥ १० ॥

दशक सहावा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ चित्त सुचित करावें । बोलिलें तें जीवीं धरावें । सावध होऊन बैसावें । निमेप एक ॥ १ ॥ कोणी एके ग्रामीं अथवा देशीं । राहणें आहे आपणासी । न भेटतां तेथल्या प्रभूशीं । सौख्य कैंचें ॥ २ ॥ म्हणोन ज्यास जेथें राहणें । तेणें त्या प्रभूची भेटी घेणें । म्हणिजे होय श्लाघ्यवाणें । सर्व कांहीं ॥ ३ ॥ प्रभूची भेटी न घेतां । तेथें कैची मान्यता । आपुलें महत्त्व जातां । वेळ नाहीं ॥ ४ ॥ म्हणोन रायापासून रंक । कोणीएक तरी नायक । त्यास भेटणें हा विवेक । विवेकी जाणती ॥ ५ ॥ त्यास न भेटतां त्याचे नगरीं । राहतां धरतील बेगारी[1][2] । तेथें न करितां चोरी । अंगीं लागे ॥ ६ ॥ याकारणें जो शाहणा । तेणें प्रभूस भेटावें जाणा । ऐसें न करितां दैन्यवाणा । संसार त्याचा ॥ ७ ॥ ग्रामीं थोर ग्रामाधिपति । त्याहून थोर देशाधिपति । देशाधिपतीहून नृपति । थोर जाणावा ॥ ८ ॥ राष्ट्रांचा प्रभु तो राजा । बहुराष्ट्र तो महाराजा । महाराजाचाहि राजा । तो चक्रवर्ती ॥ ९ ॥ एक नरपति एक गजपति । एक हयपति एक भूपति । सकळामध्यें चक्रवर्ती । थोर राजा ॥ १० ॥ असो ऐसीया समस्तां । एक ब्रह्मा निर्माणकर्ता । त्या ब्रह्मासहि निर्मिता[16] । कोण आहे ॥ ११ ॥ ब्रह्मा विष्णु आणि हर । त्यासि निर्मिता तोचि थोर । तो वोळखावा परमेश्वर । नाना यत्नें ॥ १२ ॥ तो देव ठायीं पडेना[17] । तरी यमयातना चुकेना । ब्रह्मांडनायका चोजवेना[18] ।

---

१ मोक्षरूपी लक्ष्मीची. २ मी आत्मा अशी वृत्ति. ३ संशय. ४ संशयविरहित. ५ विदेहस्थितीप्रत गेला त्याचीं. ६ डोळ्यांना. ७ परब्रह्म. ८ सत्त्व, रज, तम या गुणांनीं रहित. ९ स्थिर, शांत. १० मालक, अधिकारी. ११ स्तुत्य. १२ वेंठीस धरून नेतील. १३ गांवांतील प्रमुख अधिकारी. १४ राजा. १५ सार्वभौम. १६ निर्माण करणारा. १७ कळेना, सांपडत नाहीं. १८ जागवत नाहीं.

हें बरें नव्हें ॥ १३ ॥ जेणें संसारीं घातलें । अवघें ब्रह्मांड निर्माण केलें । त्यासि नाहीं वोळखिलें । तोचि पतितें ॥ १४ ॥ ह्मणोनि देव ओळखावा । जन्म सार्थकचि करावा । नकळे तरी सत्संग धरावा । ह्मणजे कळे ॥ १५ ॥ जो जाणेल भगवंत । तया नांव बोलिजे संत । शाश्वत आणि अशाश्वत । निवाडा करी ॥ १६ ॥ चळेना ढळेना देव । ऐसा ज्याचा अंतरभाव । तोचि जाणिजे महानुभाव । संत साधु ॥ १७ ॥ जो जनांमध्यें वागे । परी जनावेगळी गोष्टी सांगे । ज्याचे अंतरीं ज्ञान जागे । तोचि साधु ॥ १८ ॥ जाणिजे परमात्मा निर्गुण । त्यासीच म्हणावें ज्ञान । त्यावेगळें तें अज्ञान । सर्व कांहीं ॥ १९ ॥ पोट भरायाकारणें । नानाविद्या अभ्यास कारणें । त्यास ज्ञान म्हणती परी तेणें । सार्थक नव्हे ॥ २० ॥ देव ओळखावा एक । तेंचि ज्ञान तेंचि सार्थक । येर अवघेंचि निरर्थक । पोटविद्या ॥ २१ ॥ जन्मवरी पोट भरिलें । देहाचें संरक्षण केलें । पुढें अवघेंचि व्यर्थ गेलें । अंतकाळीं ॥ २२ ॥ ऐसें पोट भरायाची विद्या । तयासि म्हणों नये सद्विद्या । सर्व व्यापक वस्तु सांडया । पाविजे तें ज्ञान ॥ २३ ॥ ऐसें जयापाशीं ज्ञान । तोचि जाणावा सज्जन । तयापाशीं समाधान । पुसिलें पाहिजे ॥ २४ ॥ अज्ञानास भेटतां अज्ञान । तेथें कैंचें सांपडेल ज्ञान । करंट्यास करंट्याचें दर्शन । होतां भाग्य कैंचें ॥ २५ ॥ रोग्यापाशीं रोगी गेला । तेथें कैंचें आरोग्य त्याला । निर्बळापाशीं निर्बळाला । पोठी कैंची ॥ २६ ॥ पिशाच्यापाशीं पिशाच्च गेलें । तेथें कोण सार्थकें झालें । उन्मत्तासि उन्मत्त भेटलें । त्यास उमेजवी कवण ॥ २७ ॥ भिकाऱ्यापाशीं मागतां भिक्षा । दीक्षाहीनापाशीं दीक्षा । उजेड पाहतां कृष्णपक्षा । पाविजे कैंचा ॥२८॥ अबुद्धापाशीं गेला अबुद्ध । तो कैसेनि होईल सुबुद्ध । बद्धास भेटतां बद्ध । सिद्ध नव्हे ॥ २९ ॥ देह्यापाशीं गेला देही । तो कैसेनि होईल विदेही । म्हणोनि ज्ञात्यावांचूनि नाहीं । ज्ञानमार्ग ॥ ३० ॥ याकारणें ज्ञाता पाहावा । त्याचा अनुग्रह घ्यावा । सारासारविचारें जीवा । मोक्ष प्राप्त ॥ ३१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे षष्ठदशके देवशोधननिरूपणं नाम प्रथमः समासः ॥ १ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ऐका उपदेशाचीं लक्षणें । सायुज्यप्राप्ति होय जेणें । नानामतांचें पेखणें । कामा नये सर्वथा ॥ १ ॥ ब्रह्मज्ञानाविण उपदेश । तो म्हणों नये विशेष । धान्येंविण जैसें भूस । खातां नये ॥ २ ॥ नाना काबाडें बडविलें । नातरी तेंकैंची घुसळिलें । अथवा धुवणाचि सेविलें । सावकाश ॥ ३ ॥ नाना साली भक्षिल्या । अथवा चोईटया चोखिल्या । खोबरें सांडून खादल्या । नरोट्या जैशा ॥ ४ ॥ तैसें ब्रह्मज्ञानाविण । नाना उपदेशांचा शिणे । सार सांडून असार कोण । शाहणा सेवी ॥ ५ ॥ आतां

---

१ पापी. २ नाशरहित. ३ मनोगत. ४ महात्मा, ब्रह्मानुभवी. ५ साफल्य, सफलता. ६ याप्रमाणें. ७ तत्काल, तत्क्षणीं. ८ अभाग्यास. ९ आश्रय, मदत. १० बेताल, बेशुद्ध त्यास. ११ समजूत करी. १२ ज्यास उत्तम रीत व आचार नाहीं, अशाजवळ. १३ निर्बुद्धाकडे, मूर्खाकडे १४ प्रपंचांत गुंतलेल्याला. १५ देहबुद्धि समूळ गेली आहे असा. १६ कृपाप्रसाद, ज्ञानोपदेश. १७ पहाणें. १८ कडबा. १९ लोणी काढलेलें ताक. २० चोखलेलीं उंसाचीं सालें. २१ श्रम.

ब्रह्म जें कां निर्गुण । तेंचि केलें निरूपण । सुचित करावें अंतःकरण । श्रोतेजनीं ॥ ६ ॥ सकळ सृष्टीची रचना । तें हें पांचभौतिक जाणा । परंतु हें तगेना । सर्वकाळ ॥ ७ ॥ आदि अंतीं ब्रह्म निर्गुण । तोचि शाश्वताची खूण । येर पांचभौतिक सगुण । नाशवंत ॥ ८ ॥ येरवीं हीं पाहतां भूतें । देव कैसें म्हणावें त्यांतें । भूत म्हणतां मनुष्यांतें । विषाद वाटे ॥ ९ ॥ मी तो जगन्नायक परमात्मा । त्यासि आणी भूतउपमा । ज्याचा कळेना महिमा । ब्रह्मादिकांसी ॥ १० ॥ भूतांऐसा जगदीश । म्हणतां उत्पन्न होतो दोष । याकारणें महापुरुष । सर्व जाणती ॥ ११ ॥ पृथ्वी आप तेज वायु आकाश । यां सबाह्य जगदीश । पंचभूतांस आहे नाश । आत्मा अविनाशरूपीं ॥ १२ ॥ जें जें रूप आणि नाम । तो तो अवघाच भ्रम । नामरूपातीत वर्म । अनुभवें जाणावें ॥ १३ ॥ पंचभूतें आणि त्रिगुण । ऐसी अष्टधा प्रकृति जाण । अष्टधा प्रकृतीस नामाभिधान । दृश्य ऐसें ॥ १४ ॥ तें हें दृश्य नाशवंत । ऐसें वेदश्रुति बोलत । निर्गुण बाह्य शाश्वत । जाणती ज्ञानी ॥ १५ ॥ जें शस्त्रें तोडितां तुटेना । जें पावकें जाळितां जळेना । जें कालवितां कालवेना । आपेंकरूनी ॥ १६ ॥ जें वायूचेनि उडेना । जें पडेना ना झडेना । जें घडेना ना दडेना । परब्रह्म तें ॥ १७ ॥ ज्यासि वर्णाचि नसे । जें सर्वांहूनि अनोरिसें । परंतु असताचि असे । सर्वकाळ ॥ १८ ॥ दिसेना तरी काय झालें । परंतु तें सर्वत्र संचलें । सूक्ष्मादि कोंदाटलें । जेथें तेथें ॥ १९ ॥ दृष्टीस लागली सवे । जें दिसेल तेंचि पाहावें । परंतु गुज तें जाणावें । गौप्य आहे ॥ २० ॥ प्रकट तें जाणावें असार । आणि गुप्त तें जाणावें सार । गुरुमुखें हा विचार । उमजों लागे ॥ २१ ॥ जें उमजेना तें उमजवावें । जें दिसेना तें पाहावें । जें कळेना तें जाणावें । विवेकबळें ॥ २२ ॥ गुप्त तेंचि प्रकटवावें । असाध्य तेंचि साधावें । कोनडेंचि अभ्यासावें । सावकाश ॥ २३ ॥ वेद विरंचि आणि शेष । जेथें शिणले निःशेष । तेंचि साधावें विशेष । परब्रह्म तें ॥ २४ ॥ तरी तें कोणेपरी साधावें । तेंचि बोलिलें स्वभावें । अध्यात्मश्रवणें पावावें । परब्रह्म तें ॥ २५ ॥ पृथ्वी नव्हे आप नव्हे । तेज नव्हे वायु नव्हे । वर्णव्यक्त ऐसें नव्हे । अव्यक्त तें ॥ २६ ॥ तयास म्हणावें देव । वरकड लोकांचा स्वभाव । जितुके गांव तितुके देव । जनाकारणें ॥ २७ ॥ ऐसा देवाचा निश्चय झाला । देव निर्गुण प्रत्ययां आला । आतां आपणाचि आपला । शोध घ्यावा ॥ २८ ॥ माझें शरीर ऐसें म्हणतो । तरी तो जाण देहावेगळाचि होतो । मन माझे ऐसें जाणतो । तरी तो मनहि नव्हे ॥ २९ ॥ पाहतां देहाचा विचार । अवघा तत्त्वांचा विस्तार । तरवें तत्त्व झाडितां सार । आत्माचि उरे ॥ ३० ॥

---

१ स्वस्थ. २ पृथिव्यादि पंचभूतांपासून उत्पन्न झालेलें. ३ टिकत नाहीं. ४ खेद. ५ तर मग. ६ उदक. ७ अग्नि. ८ आंतून व बाहेरून. ९ नाशरहित. १० नाम आणि रूप यांपलीकडील. ११ ...ग, मर्म. १२ आठ प्रकारची. १३ माया. १४ दिसणारें जग. १५ अग्नीनें. १६ पाण्यानें. १७ किंवा. १८ रंग, रूप. १९ वेगळें, निराळें. २० भरून गेलें. २१ संवय. २२ कठीण. २३ ब्रह्मदेव. २४ शास्त्या प्रकारें, कसें. २५ वेदांतश्रवणानें. २६ उदक. २७ प्रकट न होणारें. २८ अनुभवाला. २९ पंचमहाभूतांचा. ३० तत्वांत तत्वाचा लय केला असतां.

आपणासि ठावचि नाहीं । तेथें पाहणें नलगे कांहीं । तत्त्वें [illegible] ठायीं । विभागूनि गेलीं ॥ ३१ ॥ बांधली आहे तों गांठोडी । जो कोणी विचारे [illegible] खोडी । विचार पाहतां गांठोडी । आढळेना ॥ ३२ ॥ तत्त्वांचें गांठोडें शरीर । याचा पाहणार [illegible] विचार । एक आत्मा निरंतर । आपण नाहीं ॥ ३३ ॥ आपणासि ठावचि नाहीं । जन्ममृत्यु कैंचे काई । पाहतां वस्तूच्या ठायीं । पाप पुण्य नसे ॥ ३४ ॥ पाप पुण्य यमयातना । हें निर्गुणीं तों असेना । आपण तोचि तरी जन्ममरणा । ठाव कैंचा ॥ ३५ ॥ देहबुद्धीनें बांधला । तो विवेकें मोकळा केला । देहातीत होतां पावला । मोक्षपद ॥ ३६ ॥ झालें जन्माचें सार्थक । निर्गुण आत्मा आपण एक । परंतु हा विवेक । पाहिलाचि पाहावा ॥ ३७ ॥ जागें होतां स्वप्न सरे । विवेक पाहतां दृश्य वोसरे । स्वरूपानुसंधानें तरे । प्राणिमात्र ॥ ३८ ॥ आपणास निवेदावें । आपण विवेकें नुरावें । आत्मनिवेदन जाणावें । याचें नांव ॥ ३९ ॥ आधीं अध्यात्मश्रवण । मग सद्गुरुपादसेवन । पुढें आत्मनिवेदन । सद्गुरुप्रसादें ॥ ४० ॥ आत्मनिवेदनाउपरी । निखळ वस्तु निरंतरी । 'आपण आत्मा' हा अतरीं । बोध जाहला ॥ ४१ ॥ त्या ब्रह्मबोधें ब्रह्मचि झाला । संसारखेद तो उडाला । देह प्रारब्धीं ठाकिला । सावकाश ॥ ४२ ॥ यासि म्हणिजे आत्मज्ञान । येणें पाविजे समाधान । परब्रह्मीं अभिन्न । भक्तचि जाहला ॥ ४३ ॥ आतां होणार तें होईना कां । आणि जाणार तें जाईना कां । तुटली मनांतील आशंका । जन्ममृत्यूची ॥ ४४ ॥ संसारीं पुंडावे चुकले । देवा भक्तां ऐक्य झालें । मुख्य देवास ओळखिलें । सत्संगें करूनी ॥ ४५ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे षष्ठदशके ब्रह्मप्रतिपादननिरूपणं नाम द्वितीयः समासः ॥ २ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ निर्गुण आत्मा तो निर्मळ । जैसा आकाश अंतराळ । घनदाट निर्मळ निश्चळ । सदोदित ॥ १ ॥ जें खंडलेंचि नाहीं अखंड । जें उदंडाहूनि उदंड । जें गगनाहूनि वाडें । आणि सूक्ष्म ॥ २ ॥ जें दिसेना ना भासेना । जें उमजेना ना नासेना । जें येईना ना जाईना । परब्रह्म तें ॥ ३ ॥ जें चळेना ना ढळेना । जें तुटेना ना फुटेना । जें रचेना ना खचेना । परब्रह्म तें ॥ ४ ॥ जें सन्मुखचि सर्वकाळ । जें निष्कलंक आणि निखळ । सर्वांतर आकाश पाताळ । व्यापूनि असे ॥ ५ ॥ अविनाश तें ब्रह्म निर्गुण । नासे ते माया सगुण । सगुण आणि निर्गुण । कालवलें ॥ ६ ॥ या कर्दमाचा विचार । करूं जाणती योगीश्वर । जैसें क्षीर आणि नीर । राजहंस निवडिती ॥ ७ ॥ जड सबळ पांचभौतिक । त्यामध्यें आत्मा व्यापक । तो नित्यानित्य विवेक । पहातां कळे ॥ ८ ॥ उंसामधील घेइजे रस । येर तें सांडिजे बोकस । तैसा जगामध्यें जगदीश । विवेकें वोळखावा ॥ ९ ॥ रस नाशवंत पातळ । आत्मा शाश्वत

---

१ ठिकाण. २ परब्रह्माच्या. ३ निर्गुण आत्मा. ४ देहाभिमानानें. ५ देहाभिमान सोडल्यावर. ६ नाश पावतें. ७ परब्रह्मस्वरूपाच्या ठिकाणी सर्व अंतःकरणवृत्ति लावून. ८ अर्पावें. ९ केवल, शुद्ध. १० शीण, दुःख. ११ प्रारब्धाच्या हवालीं केला. १२ वेगळा नव्हे, तद्रूप च. १३ पोकळींतील. १४ मोठें. १५ आपल्यापुढें. १६ केवळ, शुद्ध. १७ चिखलाचा. १८ दूध. १९ पाणी. २० चोयटी, चोथा.

निश्चळ । रस अपूर्ण आत्मा केवळ । परिपूर्ण जाणावा ॥ १० ॥ आत्म्यासारिखें एक असावें । ❀ मा तें दृष्टांतासि द्यावें । दृष्टांतमिषें समजावें । कैसें तरी ॥ ११ ॥ ऐसी आत्मस्थिति संचली । तेथें माया कैसी झाली । जैशी आकाशीं वाहिली । झुळुक वायूची ॥ १२ ॥ वायूपासून तेज झालें । तेजापासून आप निपजलें । आपापासून आकारलें । भूमंडळ ॥ १३ ॥ भूमंडळापासून उत्पत्ति । जीव नेणों झाले किती । परंतु ब्रह्म आदि अंतीं । व्यापूनि आहे ॥ १४ ॥ जें जें कांहीं निर्माण झालें । तें तें अवघेंचि नासलें । परी मुळीं ब्रह्म तें संचलें । जैसें तैसें ॥ १५ ॥ घटापूर्वीं आकाश असे । घटामध्येंहि आकाश भासे । घट फुटतां न नासे । आकाश जैसें ॥ १६ ॥ तैसें परब्रह्म केवळ । अचळ आणि अढळ । मध्यें होत जात सकळ । चराचर ॥ १७ ॥ जें जें कांहीं निर्माण झालें । तें तें आधीं ब्रह्में व्यापिलें । सर्व नासतां उरलें । अविनाश ब्रह्म ॥ १८ ॥ ऐसें ब्रह्म अविनाश । तेंचि सेविती ज्ञाते पुरुष । तत्त्वनिरसनें आपणास । आपण लाभे ॥ १९ ॥ तत्त्वें तत्त्व मेळविलें । त्यासि देह ऐसें नाम ठेविलें । तें जाणतें पुरुषीं शोधिले । तत्त्वें तत्त्व ॥ २० ॥ तत्त्वझाडा निःशेष होतां । तेथें निमोली देहअहंता । निर्गुण ब्रह्मीं ऐक्यता । विवेकें जाहली ॥ २१ ॥ विवेकें देहाकडे पाहिलें । तों तत्त्वें तत्त्व वोसरलें । आपण कांहीं नाहीं आलें । प्रत्ययासी ॥ २२ ॥ आपला आपण शोध घेतां । आपली तों मायिकें वार्ता । तत्त्वांतीं उरलें तत्त्वतां । निर्गुण ब्रह्म ॥ २३ ॥ आपणाविणें निर्गुण ब्रह्म । हेंचि निवेदनाचें वर्म । तत्त्वासरिसा गेला भ्रम । मीतूंपणाचा ॥ २४ ॥ 'मी'पण पाहतां आढळेना । निर्गुण ब्रह्म तें चळेना । आपण तेंचि परी कळेना । सद्गुरुविण ॥ २५ ॥ सारासार अवघें शोधिलें । तों असार तें निघून गेलें । पुढें सार तें उरलें । निर्गुण ब्रह्म ॥ २६ ॥ आधीं ब्रह्म निरूपिलें । तेंचि सकळांमध्यें व्यापिलें । सकळ अवघेंचि नासलें । उरलें तें केवळ ब्रह्म ॥ २७ ॥ होतां विवेकें संहार । तेथे निवडे सारासार । आपला आपणासि विसर । ठायीं पडे ॥ २८ ॥ आपण कल्पिलें मीपण । मीपण शोधितां नुरे जाण । मीपण गेलिया निर्गुण । आत्माचि स्वयें ॥ २९ ॥ झालिया तत्त्वांचें निरसन । निर्गुण आत्मा तोचि आपण । कां दाखवावें मीपण । तत्त्वनिरसनाउपरी ॥ ३० ॥ तत्त्वांमध्यें मीपण गेले । तरी निर्गुण सहजचि उरलें । सोहंभावें प्रत्यया आलें । आत्मनिवेदन ॥ ३१ ॥ आत्मनिवेदन होतां । देवभक्तांसी ऐक्यता । सोंचार भक्त विभक्तता । सांडूनि जाहला ॥ ३२ ॥ निर्गुणासि नाहीं जन्ममरण । निर्गुणासि नाहीं पापपुण्य । निर्गुणीं अनन्य होतां आपण । मुक्त जाहला ॥ ३३ ॥ तत्त्वीं वेंटाळूनि घेतला । प्राणी संशयें गुंडाळला । आपणास आपण भुलला । कोहं म्हणे ॥ ३४ ॥ तत्त्वीं

❀ आणि मग. १ ब्रह्मस्वरूपता. २ अग्नि. ३ पाणी. ४ पृथिव्यादिपंचभूतांचा निरास केला असतां. ५नाहीशी झाली. ६ देहाभिमान. ७ नाहींसें झालें. ८ अनुभवाला. ९ लटकी, खोटी. १० अर्पण करण्याचें. ११ तत्त्वज्ञान होतांच. १२ ब्रह्मच. १३ नाश. १४ सार आणि असार वेगळी केली जातात. १५ समजून येतो. १६ तत्त्वांचा नाश झाल्यावर. १७ तोच (ईश्वर) मी असा भाव होतांच. १८ अनुभवाला. १९ खरोखर. २० द्वैत. २१ एकनिष्ठ. २२ मी कोण.

गुंतला म्हाणे कोहं । विवेकें पाहतां म्हणे सोहं । अनन्य होतां 'अहं' 'सोहं'। मावळलीं ॥ ३५ ॥ याउपरी उर्वरित । तेंचि सत्स्वरूप संत । देहीं असोनि देहातीत । जाणिजे ऐसा ॥ ३६ ॥ संदेहवृत्ति ते न भंगे । म्हणोनि बोलिलेंच बोलावें लागे । आम्हांसि हें घडलें प्रसंगें । श्रोतां क्षमा केली पाहिजे ॥ ३७ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे षष्ठदशके मायोद्भवनिरूपणं नाम तृतीयः समासः

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ कृतयुग सत्रा लक्ष अठ्ठावीस सहस्र । त्रेतायुग बारा लक्ष शहाण्णव सहस्र । द्वापर आठ लक्ष चौसष्ट सहस्र । आतां कलियुग ऐका ॥ १ ॥ कलियुग चार लक्ष बत्तीस सहस्र । चतुर्युगें त्रेचाळीस लक्ष वीस सहस्र । ऐशीं चतुर्युगें सहस्र । तो ब्रह्मयाचा एक दिवस ॥ २ ॥ ऐसे ब्रह्मे सहस्र देखा । तेव्हां विष्णूची एक घटिका । विष्णु सहस्र होतां ऐका । पळ एक ईश्वराचें ॥ ३ ॥ ईश्वर जाय सहस्रवेळ । तैं शक्तीचें अर्ध पळ । ऐसी संख्या बोलिली सकळ । शास्त्रांतरीं ॥ ४ ॥ चतुर्युग सहस्राणि दिनमेकं पितामहम् । पितामहसहस्राणि विष्णोर्घटिकमेवच ॥ १ ॥ विष्णोरेकसहस्राणि पलमेकं महेश्वरम् । महेश्वरसहस्राणि शक्तेरर्धं पलं भवेत् ॥ २ ॥ ऐशा अनंत शक्ति होती । अनंत रचना होती जाती । तरी अखंड खंडेना स्थिति । परब्रह्माची ॥ ५ ॥ परब्रह्मासि कैंची स्थिति । परी ही बोलावयाची रीति । वेदश्रुति नेतिनेति । परब्रह्मीं ॥ ६ ॥ चार सहस्र सातशें साठी । इतुकी कलियुगाची राहाटी । उरल्या कलियुगाची गोष्टी । ऐसी असे ॥ ७ ॥ चार लक्ष सत्तावीस सहस्र । दोनशें चाळीस संवत्सर । पुढें अन्योन्य वर्णसंकर । होणार आहे ॥ ८ ॥ ऐसें रचलें चराचर । येथें एकाहूनि एक थोर । पाहतां येथींचा विचार । अंत न लागे ॥ ९ ॥ एक म्हणती विष्णु थोर । एक म्हणती रुद्र थोर । एक म्हणती शक्ति थोर । सकळांमध्यें ॥ १० ॥ ऐसें आपुलालेपरी बोलती । परंतु अवघेंची नासेल कल्पांतीं । 'यद्दृष्टं तन्नष्टं' हे श्रुति । बोलतसे ॥ ११ ॥ आपुलाली ‡ उपासना । अभिमान लागला जना । याचा निश्चय निवडेना । साधुविण ॥ १२ ॥ साधु निश्चय करिती एक । आत्मा सर्वत्र व्यापक । येर हें अवघेंची मायिक । चराचर ॥ १३ ॥ चित्रीं लिहिली लहान सेना । त्यांत कोण थोर कोण सानें । हें कां तुम्ही विचाराना । आपुले ठायीं ॥ १४ ॥ स्वप्नीं उदंड देखिलें । लहान थोरहि कल्पिलें । परंतु जागें झालिया झालें । कैसें पहा ॥ १५ ॥ पाहतां जागृतीचा विचार । कैंचें लहान कैंचें थोर । झाला अवघा विचार । स्वप्नरचनेचा ॥ १६ ॥ अवघाचि मायिक विचार । कैंचें लहान कैंचें थोर । लहान थोर हा निर्धार । जाणती ज्ञानी ॥ १७ ॥ जो जन्मासी येऊनी गेला । तो 'मी थोर' म्हणतांच मेला । परी याचा

---

१ तोच मी. २ बाकी राहिलेले. ३ देहापलीकडे गेलेला. ४ संशयाची वृत्ति. ५ मायेचे. ६ अविनाशी. ७ असें नाहीं, असें नाहीं. ८ क्रम, नांदणूक. ९ एकंदर कलियुगाचीं ४३२००० वर्षें, त्यांतून ४७६९ इतकीं गेलीं; बाकी ४२७२४० इतकीं राहिलीं. १० वर्षें. ११ परस्परांमध्यें. १२ जातींचें मिश्रण. १३ शंकर. १४ देवी. १५ आपआपल्या समजुतीप्रमाणें. १६ प्रलयकालीं. १७ जें दिसणारें तें सर्व नाश पावणारेंच. ‡ उपासनेचा. १८ लटकें. १९ लहान. २० पुष्कळ.

विचार पाहिला । पाहिजे श्रेष्ठीं ॥ १८ ॥ जयांस झालें आत्मज्ञान । तोचि थोर महाजन । वेदशास्त्रपुराण । साधुसंत बोलिले ॥ १९ ॥ एवं सकळांमध्यें थोर । तो एकचि परमेश्वर । तयामध्यें हरिहर । होती जाती ॥ २० ॥ तो निर्गुण निराकार । तेथें नाहीं उत्पत्ति स्थिति संहार । स्थानमानाचा विचार । ऐलीकडे ॥ २१ ॥ नांव रूप स्थान मान । हा तों अवघाचि अनुमान । तथापि होईल निदान । ब्रह्मप्रलयीं ॥ २२ ॥ ब्रह्म प्रलयो-वेगळें । ब्रह्म नांवरूपानिराळें । ब्रह्म कोणी एक्या काळें । जैसें तैसें ॥ २३ ॥ करिती ब्रह्मनिरूपण । जाणती ब्रह्म संपूर्ण । तोचि जाणावे ब्राह्मण । ब्रह्मविद् ॥ २४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे षष्ठदशके ब्रह्मनिरूपणं नाम चतुर्थः समासः ॥ ४ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ श्रोते पुसती ऐसें । माया ब्रह्म तें कैसें । श्रोत्यावक्त्याचे मिषें । निरूपण ऐका ॥ १ ॥ ब्रह्म निर्गुण निराकार । माया सगुण साकार । ब्रह्मासि नाहीं पारावार । मायेसि आहे ॥ २ ॥ ब्रह्म निर्मळ निश्चळ । माया चंचळ चपळ । ब्रह्म निरुपाधि केवळ । माया उपाधिरूप ॥ ३ ॥ माया दिसे ब्रह्म दिसेना । माया भासे ब्रह्म भासेना । माया नासे ब्रह्म नासेना । कल्पांतकाळीं ॥ ४ ॥ माया रचे ब्रह्म रचेना । माया खचे ब्रह्म खचेना । माया रुचे ब्रह्म रुचेना । अज्ञानासी ॥ ५ ॥ माया उपजे ब्रह्म उपजेना । माया मरे ब्रह्म मरेना । माया धरे ब्रह्म धरेना । धारणेसी ॥ ६ ॥ माया फुटे ब्रह्म फुटेना । माया तुटे ब्रह्म तुटेना । माया विटे ब्रह्म विटेना । अविट तें ॥ ७ ॥ माया विकारी ब्रह्म निर्विकारी । माया सर्व करी ब्रह्म कांहींच न करी । माया नानारूपें धरी । ब्रह्म तें अरूप ॥ ८ ॥ माया पांचभौतिक अनेक । ब्रह्म तें शाश्वत एक । माया ब्रह्माचा विवेक । विवेकी[1] जाणती ॥ ९ ॥ माया लहान ब्रह्म थोर । माया असार ब्रह्म सार । ¶ माया अर्ति, पार[2] । ब्रह्मासी नाहीं ॥ १० ॥ सकळ माया विस्तारली । ब्रह्मस्थिति आच्छादिली । परी ते निवडून घेतली । साधुजनीं ॥ ११ ॥ गोंडोळा सांडून नीर[3] घेईजे । नीर सांडून क्षीर[4] सेविजे । माया सांडून अनुभविजे । परब्रह्म तैसें ॥ १२ ॥ ब्रह्म आकाशाऐसें निर्वाळ[5] । माया वसुंधरा डहूळ[6] । ब्रह्म सूक्ष्म केवळ । माया स्थूळरूप ॥ १३ ॥ ब्रह्म तें अप्रत्यक्ष असे । माया ते प्रत्यक्ष दिसे । ब्रह्म तें सभाचि असे । माया ते विषमरूप ॥ १४ ॥ माया लक्षे ब्रह्म अलक्ष । माया साक्ष ब्रह्म असाक्ष । मायेमध्यें दोनी पक्ष । ब्रह्मीं पक्षचि नाहीं ॥ १५ ॥ माया पूर्वपक्षे ब्रह्म सिद्धांत[7] । माया असंत[8] ब्रह्म संत[9] । ब्रह्मासि नाहीं करणें हेत[10] । मायेसि आहे ॥ १६ ॥ ब्रह्म अखंड घनदाट । माया पांचभौतिक पोंचट[11] । ब्रह्म तें निरंतर निघोट[12] । माया ते जुनी जर्जरी[13] ॥ १७ ॥

---

१ नाश. २ अलीकडील. ३ शेवट, निर्णय. ४ ब्रह्मदेवाचीं शंभर वर्षें होतांच प्रलय होऊन ब्रह्मदेवासह सर्व विश्व नाहींसें होतें त्या काळीं. ५ नाशाच्या पलीकडे. ६ ब्रह्म जाणणारे. ७ अंत, पार. ८ उपसर्गरहित. ९ बुद्धीला. १० विकार पावणारी, नाशवंत. ११ शाते. ¶ अलीकडची. १२ ब्रह्माला सीमा नाहीं. १३ झांकली. १४ शेवाळ. १५ पाणी. १६ दूध. १७ निर्मळ. १८ पृथ्वी. १९ गढूळ. २० अगोचर. २१ दृश्य, प्रत्यक्ष. २२ उत्तरानें खंडन करतां येणारी शंका. २३ प्रमाणादिकांनीं ठरलेली सत्य गोष्ट. २४ खोटी, अनित्य. २५ खरें, नित्य. २६ हेतु, उद्देश. २७ पोकळ. २८ पूर्ण. २९ म्हातारी.

माया घडे ब्रह्म घडेना । माया पडे ब्रह्म पडेना । माया विघडे ब्रह्म विघडेना । जैसें तैसें ॥ १८ ॥ ब्रह्म असताचि असे । माया निरसतांच ‡ निरसे । ब्रह्मास कल्पांत नसे । मायेसि असे ॥ १९ ॥ माया कठिण ब्रह्म कोमळ । माया अल्प ब्रह्म विशाळ । माया नसे सर्वकाळ । ब्रह्माचि असे ॥ २० ॥ वस्तु नव्हे बोलिजे ऐशी । माया जैशी बोलिजे तैसी । काळ पावेना वस्तूसी । मायेसी झाडपी ॥ २१ ॥ नाना रूप नाना रंग । तितुका मायेचा प्रसंग । माया भंगे ब्रह्म अभंग । जैसें तैसें ॥ २२ ॥ आतां असो हा विस्तार । चालत जातें सचराचर । तितुकी माया परमेश्वर । सबाह्य अभ्यंतरीं ॥ २३ ॥ सकळ उपाधिवेगळा । तो परमात्मा निराळा । जळीं असोन नातळे जळा । आकाश जैसें ॥ २४ ॥ मायाब्रह्माचें विवरण । करितां चुके जन्ममरण । संतांसि गेलिया शरण । मोक्ष लाभे ॥ २५ ॥ अरे या संतांचा महिमा । बोलावया नाहीं सीमा । जयाचेनि जगदात्मा । अंतरचि होय ॥ २६ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे षष्ठदशके माया-ब्रह्मनिरूपणं नाम पंचमः समासः ॥ ५ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ सृष्टिपूर्वी ब्रह्म असे । तेथें सृष्टि मुळींच नसे । आतां सृष्टि दिसत असे । तें सत्य कीं मिथ्या ॥ १ ॥ तुम्ही सर्वज्ञ गोसावी । माझी आशंका फेडावी । ऐसा श्रोता विनवी । वक्त्यासी ॥ २ ॥ आतां ऐका प्रत्युत्तर । कथेसि व्हावें तत्पर । वक्ता सर्वज्ञ उदार । बोलता जाहला ॥ ३ ॥ जीवेभूतः सनातनः । ऐसें गीतेचें वचन । येणें वाक्यें सत्यपण । सृष्टीस आलें ॥ ४ ॥ 'यद्दृष्टं तन्नष्टं' येणें । वाक्यें सृष्टि मिथ्यापणें । सत्य मिथ्या ऐसें कोणें । निवडावें ॥ ५ ॥ सत्य म्हणों तरी नासे । मिथ्या म्हणों तरी दिसे । आतां जैसें आहे तैसें । बोलिजेल ॥ ६ ॥ सृष्टीमध्यें बहु जन । अज्ञान आणि सज्ञान । म्हणोनियां समाधान । होत नाहीं ॥ ७ ॥ ऐका अज्ञानाचें मत । सृष्टि आहे ते शाश्वत । देव धर्म तीर्थ व्रत । सत्याचि आहे ॥ ८ ॥ बोले सर्वज्ञांचा राजा । मूर्खस्य प्रतिमापूजा । ब्रह्मप्रलयाच्या पैजा । घालूं पाहे ॥ ९ ॥ तंव बोले तो अज्ञान । तरी कां करिशी संध्या स्नान । गुरुभजन तीर्थाटन । कासया करावें ॥ १० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तीर्थें तीर्थें निर्मलं ब्रह्मवृंदम् । वृंदे वृंदे तत्त्वचिंतानुवादः ॥ वादे वादे जायते तत्त्वबोधो बोधे बोधे । भासते चंद्रचूडः ॥ १ ॥ ऐसें चंद्रचूडाचें वचन । सद्गुरूचें उपासन । गुरुगीतानिरूपण । बोलिलें हरें ॥ ११ ॥ गुरूसि कैसें भजावें । आधीं तयास ओळखावें । त्याचें समाधान घ्यावें । विवेकें स्वयें ॥ १२ ॥ श्लोक ॥ ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिम् । द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादि लक्ष्यम् ॥ एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतम् । भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि ॥ १ ॥

---

‡ बाध होतो. १ परब्रह्म. २ काळाची सत्ता ब्रह्मावर चालत नाहीं. ३ पकडतो. ४ संबंध. ५ उपसर्ग-रहित. ६ स्पर्श करीत नाहीं. ७ मनच परमात्मा होतें. ८ समर्थ, सिद्ध. ९ शंका, संशय. १० 'ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः'—गीता. जीव हा माझाच अंश सनातन—शाश्वत—आहे. ११ जें जें दिसतें तें नाश पावतेंच. १२ शान्यांच्या राजा, श्रीकृष्ण. १३ मूर्खाला मूर्तिपूजन. १४ पण, प्रतिज्ञा, पार. १५ शंकराचें.

गुरुगीतेचें वचन । ऐसें सद्गुरूचें ध्यान । तेथें सृष्टिमिथ्याभान । उरेल कैंचें ॥ १३ ॥ ऐसें सज्ञान बोलिला । सद्गुरु तो वोळखिला । सृष्टि मिथ्या ऐसा केला । निश्चितार्थ ॥ १४ ॥ श्रोता ऐसें न मानी कदा । अधिक उठिला विवादा । म्हणे कैसा रे गोविंदा । अज्ञान म्हणतोसि ॥ १५ ॥ * जीवभूत सनातन । ऐसें गीतेंचें वचन । तयासि तूं अज्ञान । म्हणतोसि कैसा ॥ १६ ॥ ऐसा श्रोता आक्षेपें करी । विषादें मानिला अंतरीं । याचें प्रत्युत्तर चतुरी । सावध परिसावें ॥ १७ ॥ गीतेंत बोलिला गोविंद । त्याचा न कळे तुज भेद । म्हणोनियां व्यर्थ खेद । वाहतोसि ॥ १८ ॥ श्लोक ॥ ‡ अश्वत्थः सर्व वृक्षाणां ॥ टी० माझी विभूति पिंपळ । म्हणोनि बोलिला गोपाळ । वृक्ष तोडितां तात्काळ । तुटत आहे ॥ १९ ॥ ॥ श्लोक ॥ † ॥ नैनं छिंदन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः । न चैनं क्लेदयंत्यापो न शोषयति मारुतः ॥ १ ॥ ॥ टी० ॥ ॥ शस्त्रांचेनि तुटेना । अग्नीचेनि जळेना । उदकामध्यें कालवेना । स्वरूप माझें ॥ २० ॥ पिंपळ तुटे शस्त्रानें । पिंपळ जळे पावकानें । पिंपळ कालवे उदकानें । नाशवंत ॥ २१ ॥ तुटे जळे बुडे उडे । आतां ऐक्य कैसें घडे । म्हणोनि हें उजेडे । सद्गुरुमुखें ॥ २२ ॥ § इंद्रियाणां मनश्चास्मि । कृष्ण म्हणे मन तो मी । तरी कां आवरावी ऊर्मी । चंचळ मनाची ॥ २३ ॥ ऐसें कृष्ण कां बोलिला । साधनमार्ग दाखविला । खडे मांडूनि शिकविला । ओनामा जेवीं ॥ २४ ॥ ऐसा आहे वाक्यभेद । सर्व जाणे तो गोविंद । देहबुद्धीचा विवाद । कामा नये ॥ २५ ॥ वेद शास्त्र श्रुति स्मृति । तेथें वाक्यभेद पडती । ते सर्वहि ¶ निवडती । सद्गुरूचेनि वचनें ॥ २६ ॥ वेदशास्त्रांचें भांडण । शस्त्रें तोडी ऐसा कोण । हें निवडेना साधूविण । कदा कल्पांतीं ॥ २७ ॥ पूर्वपक्ष आणि सिद्धांत । शास्त्रीं बोलिला संकेत[1] । याचा होय निश्चितार्थ । साधुमुखें ॥ २८ ॥ येन्हवीं वादाचीं उत्तरें । एकाहूनि एक थोरें । बोलूं जातां अपारें । वेदशास्त्रीं ॥ २९ ॥ म्हणोनि वादविवाद । सांडूनि कीजे संवाद । तेणें होय ब्रह्मानंद । स्वानुभवें ॥ ३० ॥ एके कल्पनेचे पोटीं । होती जाती अनंत सृष्टि । तया सृष्टीची गोष्टी । साच केंवी ॥ ३१ ॥ कल्पनेचा केला देव । तेथें झाला दृढभाव देवालागीं येता खेव[2] । भक्त दुःखें दुखावला ॥ ३२ ॥ पाषाणाचा देव केला । एके दिवशीं भंगोनि गेला । तेणें भक्त दुखावला । रडे पडे आक्रंदे ॥ ३३ ॥ देव हारपला घरचे घरीं । एक देव नेला चोरीं । एक देव दुराचारीं । फोडिला बळें ॥ ३४ ॥ एक देव जोपाणिला । एक देव उदकीं टाकिला । एक देव नेऊन घातला । पायांतळीं ॥ ३५ ॥ काय सांगों तीर्थमहिमा । मोडोनि गेला दुरात्मा[3] । थोर सत्त्व होतें तें मा । काय जाहलें कळेना ॥ ३६ ॥ देव घडिला सोनारीं । देव वोतिला वोतारीं[4] । एक देव घडिला पाथरा । पाषाणाचा ॥ ३७ ॥ नर्मदागंडिकातीरीं । देव पडिले लक्षवरी ।

---

१ निश्चयपूर्वक सिद्धांत. * भ०गी०१५-७. २ शंका, हरकत. ३ खेद. ४ तेज, ऐश्वर्य. ‡ भ०गी०१०-२६. † भ० गी० २-२३. ५ अग्नीनें. ६ प्रकट होत, कळतें. § भ० गी० १०-२४. ७ इंद्रियांतील मी मन आहें. ८ लाट, लहर. ९ परमेश्वरप्राप्तीच्या उपायाची वाट. १० फरक, विसंगतपणा. ¶ संगति लागणें, उलगडणें. ११ थोडक्यांत. १२ अडचण, संकट. १३ भ्रष्ट केला. १४ दुष्ट. १५ मूर्ति ओतणाऱ्यांनीं. १६ पाथरवटानें.

त्यांची संख्या कोण करी । असंख्यात गोटे ॥ ३८ ॥ चक्रतीर्थीं चक्रांकित । देव असती असंख्यात । नाहीं मनीं निश्चितार्थ । एक देव ॥ ३९ ॥ बाण तांदळे ताम्रनाणें । स्फटिक देव्हारां पूजणें । ऐसें देव कोण जाणे । खरे कीं खोटे ॥ ४० ॥ देवें रोशिमाचा केला । तोहि तुटोनियां गेला । आतां नवा नेम धरिला । मृत्तिकेच्या लिंगाचा ॥ ४१ ॥ आमचा देव बहु सत्य । आम्हांस आकांतीं पावत । पूर्ण करी मनोरथ । सर्वकाळ ॥ ४२ ॥ आतां याचें सत्त्व गेलें । प्राप्त होतें तें झालें । प्राक्तन नवचे पालटिलें । ईश्वराचेनि ॥ ४३ ॥ धातु पाषाण मृत्तिका । चित्रलेप काष्ट देखा । तेथें देव कैंचा मूर्खा । भ्रांति पडिली ॥ ४४ ॥ हे आपुलाली कल्पना । प्राक्तना ऐशीं फळें जाणा । परी त्या देवाचिया खुणा । वेगळ्याची ॥ ४५ ॥ ॥ श्लोक ॥ नानाशास्त्राविदो लोका नानादैवतपूजकाः ॥ आत्मज्ञानं विना पार्थ सर्वकर्म निरर्थकम् ॥ १ ॥ म्हणोनि हें मायाभ्रमणें । सृष्टि मिथ्या कोटिगुणें । वेद शास्त्र पुराणें । ऐसींच बोलती ॥ ४६ ॥ साधु संत महानुभाव । त्यांचा ऐसाच अनुभव । पंचभूतातीत देव । सृष्टि मिथ्या ॥ ४७ ॥ सृष्टीपूर्वी, सृष्टि चालतां । सृष्टि अवघी संहारतां । शाश्वत देव तत्त्वतां । आदि अंतीं ॥ ४८ ॥ ऐसा सर्वांचा निश्चय । यदर्थीं नाहीं संशय । व्यतिरेकें आणि अन्वय । कल्पनारूप ॥ ४९ ॥ एके कल्पनेचे पोटीं । बोलिजेती अष्ट सृष्टी । तये सृष्टीची गोष्टी । सावध ऐका ॥ ५० ॥ एक कल्पनेची सृष्टि । दुसरी शाब्दिक सृष्टि । तिसरी प्रत्यक्ष सृष्टि । जाणती सर्व ॥ ५१ ॥ चौथी चित्रलेप सृष्टि । पांचवी स्वप्नसृष्टि । सहावी गंधर्वसृष्टि । ज्वरसृष्टि सातवी ॥ ५२ ॥ आठवी दृष्टिबंधन । ऐशा अष्ट सृष्टी जाण । यांमध्यें श्रेष्ठ कोण । सत्य मानावीं ॥ ५३ ॥ म्हणोन सृष्टि नाशवंत । जाणती संत महंत । सगुण भजावें निश्चित । निश्चयालागीं ॥ ५४ ॥ सगुणाचेनि आधारें । निर्गुण पाविजे निर्धारें । सारासारविचारें । संतसंगें ॥ ५५ ॥ आतां असो हें बहुत । संतसंग कळे नेमस्त । येरवीं चित्त दुश्चित । संशयीं पडे ॥ ५६ ॥ तंव शिष्यें ओळखिलें । सृष्टि मिथ्या ऐसें कळलें । परी हें दृश्य अवघें नाथिलें । तरी दिसतें कां ॥ ५७ ॥ दृश्य प्रत्यक्ष दिसतें । म्हणोनि सत्याचि वाटतें । यासि काय करावें तें । सांगा स्वामी ॥ ५८ ॥ याचें प्रत्युत्तर भलें । पुढिले समासीं बोलिलें । श्रोतीं श्रवण केलें । पाहिजे पुढें ॥ ५९ ॥ एवं सृष्टि मिथ्या जाण । जाणोन रक्षावें सगुण । ऐसी हे अनुभवाची खूण । अनुभवी जाणती ॥ ६० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे षष्ठदशके सृष्टिकथननिरूपणं नाम षष्ठः समासः ॥ ६ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ज्ञानें दृश्य मिथ्या झालें । तरी कां पाहिजे भजन केलें ।

---

१ वर चक्राचे आकार असलेले दगड. २ शेंदूर इत्यादिकांनीं लिप्त असे पुजले जाणारे लहान व लंबट दगड. ३ अनंत वगैरे. * संकटकालीं ४ प्रारब्ध, दैव. ५ चित्ररचना. ६ सर्व. ७ नाश पावतां. ८ याविषयीं. ९ ज्याच्या अभावीं जें नाहीं, तो व्यतिरेक. १० ज्याचें अस्तित्व असतां जें आहे, तो अन्वय. ११ शब्दांनीं बोलण्याची. १२ आकाशांत नगराकृतीचें वगैरे ढगांचे दिसणारें देखावे. १३ ज्वराच्या भ्रमांत दिसणारी. १४ नजरबंद होऊन दिसणारी. १५ शंका काढली. १६ खोटें. १७ दिसणारें जगत.

तेणें काय प्राप्त झालें । हें मज निरूपावें ॥ १ ॥ ज्ञानाहून थोर असेना । तरी कां पाहिजे उपासना । उपासनेनें जनां । काय प्राप्त ॥ २ ॥ मुख्य सार तें निर्गुण । तेथें दिसेचिना सगुण । भजन केलियाचा गुण । मज निरूपावा ॥ ३ ॥ जें प्रत्यक्ष[1] नाशवंत । त्यासि भजावें किंनिमित्त[2] । सत्य सांडून असत्य । कोणें भजावें ॥ ४ ॥ असत्याचा प्रत्यय[3] आला । तरी मग नेम कां लागला । सत्य सांडून गलबला । कासया करावा ॥ ५ ॥ निर्गुणानें मोक्ष होतो । प्रत्यक्ष प्रत्यय येतो । सगुण काय देऊं पाहातो । सांगा स्वामी ॥ ६ ॥ सगुण नाशवंत ऐसें सांगतां । पुनः भजन करावें म्हणतां । तरी कशासाठीं आतां । भजन करूं ॥ ७ ॥ स्वामीचे भिडेनें बोलवेना । येऱ्हवीं कांहींच मानेना । साध्यचि झालिया साधना । कां प्रवर्तावें ॥ ८ ॥ ऐसें श्रोतयाचें बोलणें । शब्द बोले निर्बुजलेपेंणें[4] । याचें उत्तर ऐकणें । म्हणे वक्ता ॥ ९ ॥ गुरूचें वचन प्रतिपाळण । हें मुख्य परमार्थाचें लक्षण । वचनभंग करितां विलक्षण । सहजचि जाहलें ॥ १० ॥ म्हणोनि आज्ञेसी वंदावें । सगुणभजन मानावें । श्रोता म्हणे हें देवें । कां प्रयोजिलें ॥ ११ ॥ काय मानिला उपकार । कोण झाला साक्षात्कार[5] । किंवा प्रारब्धाचें अक्षर । पुसिलें देवें ॥ १२ ॥ होणार तें तों पालटेना । भजनें काय करावें जना । हें तों पाहतां अनुमाना[6] । कांहींच न ये ॥ १३ ॥ स्वामीची आज्ञा प्रमाणें । कोण करील अप्रमाण । परंतु याचा काय गुण । मज निरूपावा ॥ १४ ॥ वक्ता म्हणे सावधपणें । सांगा ज्ञानाचीं लक्षणें । तुज कांहीं लागे करणें । किंवा नाहीं ॥ १५ ॥ करणें लागे भोजन । करणें लागे उदकप्राशन । मळमूत्रत्याग लक्षण । तेंहि सुटेना ॥ १६ ॥ जनाचें समाधान राखावें । आपुलें पारिखें वोळखावें । आणि भजनाचि मोडावें । हें कोण ज्ञान ॥ १७ ॥ ज्ञान विवेकें मिथ्या झालें । परंतु अवघें नाहीं टाकिलें । तरी मग भजनेंचि काय केलें । सांग बापा ॥ १८ ॥ साहेबास लोटांगणीं जावें । नीचासारिखें व्हावें । आणि देवास न मानावें । हें कोण ज्ञान ॥ १९ ॥ हरिहर ब्रह्मादिक । हे जयाचे आज्ञाधारक । तूं एक मानवी रंक[7] । भजसिना तरी काय गेलें ॥ २० ॥ आमुचे कुळीं रघुनाथ । रघुनाथ आमुचा परमार्थ । जो समर्थाचाहि समर्थ । देवां सोडविता ॥ २१ ॥ त्याचे आम्ही सेवकजन । सेवा करितां झालें ज्ञान । तेथें अभाव[8] धरितां पतन । पाविजेल कीं ॥ २२ ॥ गुरु सांगती सारासार । त्यास कैसें म्हणावें असार । तुज काय सांगणें विचार । शाहाणे जाणती ॥ २३ ॥ समर्थाचे मनींचें[9] तुटे[10] । तेंचि जाणावें अदृष्ट खोटें । राज्यपदापासूनि करंटे[11] । चेवलें[12] जैसे ॥ २४ ॥ मी थोर वाटे मनीं । तो नव्हे ब्रह्मज्ञानी । विचार पाहतां देहाभिमानी । प्रत्यक्ष दिसे ॥ २५ ॥ वस्तुभजन करीना । नाहीं न करीं ऐसेंहि म्हणेना । तरी हे जाणावी कल्पना । दंडोन[13] राहिली ॥ २६ ॥ ना तें ज्ञान ना तें भजन । उगाचि

---

१ भक्ति. २ साक्षात. ३ काय म्हणून. ४ अनुभव. ५ अडखळून, घाबरून. ६ नशीबीं असलेलें. ७ मान्य. ८ परक्याचें. ९ भिकारडा. १० निष्ठा न ठेविली तर. ११ मनांतून उतरतो, गैर मर्जी होते. १२ प्रारब्ध कर्म. १३ दैवहीन. १४ भ्रष्ट झालें. १५ ब्रह्मचिंतन. १६ अथवा. १७ लपून.

आला देहाभिमान । येथें नाहीं कीं अनुमान । प्रत्यय[1] तुझा ॥ २७ ॥ तरी आतां ऐसें न करावें । रघुनाथभजनीं लागावें । तेणेंचि ज्ञान बोलावें । चळेना ऐसें ॥ २८ ॥ करी दुर्जनाचा संहार[2] । भक्तजनाचा आधार । ऐसा हा तो चमत्कार । रोकडा चाले ॥ २९ ॥ मनीं धरावें तें होतें । विघ्न अवघेंचि नासोनि जातें । कृपा केलिया रघुनाथें । प्रतीतें[3] येथें ॥ ३० ॥ रघुनाथभजनें ज्ञान झालें । रघुनाथभजनें महत्त्व वाढलें । म्हणोनि तुवां केलें । पाहिजे आधीं ॥ ३१ ॥ हें तों आहे सप्रतीत[4] । आणि तुज वाटेना प्रतीत । साक्षात्कारें[5] नेमस्त[6] । प्रत्यय करावा ॥ ३२ ॥ रघुनाथ स्मरोन कार्य करावें । तें तात्काळचि सिद्धि पावे । कर्ता राम हें असावें । अभ्यंतरीं[7] ॥ ३३ ॥ कर्ता राम, मी नव्हे आपण । ऐसें सगुणनिवेदन[8] । निर्गुणीं तें अनन्य । निर्गुणचि होईजे ॥ ३४ ॥ मी कर्ता ऐसें म्हणतां । कांहींच घडेना सर्वथा । प्रतीत पाहासी तरी आतां । शीघ्रचि पाहे ॥ ३५ ॥ मी कर्ता ऐसें म्हणसी । तेणें तूं कष्टी होसी । राम कर्ता म्हणतां पावसी । यश कीर्ति प्रताप ॥ ३६ ॥ एके भावनेसाठीं । देवासि पडे तुटी । कां[10] ते होय कृपादृष्टी । देव कर्ता भाविता[11] ॥ ३७ ॥ आपण आहे दों दिवसांचा । आणि देव बहुतां काळांचा । आपण थोडे वोळखीचा । देवासी त्रैलोक्य जाणे ॥ ३८ ॥ याकारणें रघुनाथभजन । त्यासि मानिती बहुत जन । ब्रह्मादिक आदिकरून । राम-भजनीं तत्पर ॥ ३९ ॥ ज्ञानबळें उपासना । आम्ही भक्त जरी मानूं ना । तरी या दोषाचिया पतना । पावों अभक्तपणें ॥ ४० ॥ देव उपेक्षी[12] थोरपणें । तरी मग त्याचें तोचि जाणें । अप्रमाण तें श्लाघ्यवाणें[13] । नव्हेचि कीं श्रेष्ठा ॥ ४१ ॥ देहास लागली उपासना[14] । आपण विवेकें उरेना[15] । ऐशी स्थिति सज्जना-। अंतरींची ॥ ४२ ॥ सकळ मिथ्या होऊन जातें । हें रामभजनें कळों येतें । दृश्य ज्ञानियांचेनि मतें । स्वप्न जैसें ॥ ४३ ॥ मिथ्या स्वप्न-विवंचना[16] । तैसी हे सृष्टिरचना । दृश्य मिथ्या साधुजनां । कळों आलें ॥ ४४ ॥ आक्षेप[17] झाला श्रोतयांसी । मिथ्या तरी का दिसतें आम्हांसी । त्याचें उत्तर पुढिले समासीं । बोलिलें असे ॥ ४५ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे पञ्चदशके सगुणभजननिरूपणं नाम सप्तमः समासः ॥ ७ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ मागां श्रोतीं पुसिलें होतें । दृश्य मिथ्या तरी कां दिसतें । त्याचें उत्तर बोलिजेल तें । सावध ऐका ॥ १ ॥ देखिलें तें सत्याचि मानावें । हें ज्ञात्याचें देखणें नव्हे । जड मूढ अज्ञान जीवें । हें सत्य मानिजे ॥ २ ॥ एका देखिल्यासाठीं । लटिक्या कराव्या ग्रंथकोटी[18] । संत महंतांच्या गोष्टी । त्याही मिथ्या मानाव्या ॥ ३ ॥ माझें दिसतें हेंचि खरें । तेथें चालेना दुसरें । ऐसिया संशयाच्या भरें । भरोंचि

---

१ अनुभव. २ नाश. ३ अनुभवयुक्त. ४ प्रत्यक्ष. ५ ठाम, खरा. ६ ध्यावा. ७ मनामध्यें. ८ अर्पिणें. ९ कल्पनेमुळें. १० अथवा. ११ देव कर्ता आहे, अशी भावना ठेविली असतां. १२ मानीत नाहीं. १३ स्तुत्य. १४ देहाला उपासने कडे लावतो. १५ आपण आत्मज्ञानानें देहाहून वेगळा राहतो—म्हणजे त्याचें देहतादात्म्य नाहींसे होतें. १६ स्वप्नसंबंधीं कल्पना. १७ संशय, शंका. १८ कोट्यावधी ग्रंथ.

नये ॥ ४ ॥ मृगें देखिलें मृगजेळ । तेथें धांवतें बरळ । जळ नव्हे मिथ्या सकळ । त्या पशूसि कोणी म्हणावें ॥ ५ ॥ रात्रौ स्वप्न देखिलें । बहुत द्रव्य सांपडलें । बहुत जनांसी केव्हांरिलें । तें खरें कैसेनि मानावें ॥ ६ ॥ कुशल चितारी विचित्र । तेणें निर्माण केलें चित्र । देखतां उठे प्रीतिमात्र । परंतु तेथें मृत्तिका ॥ ७ ॥ नाना वनितां हत्ती घोडे । रात्रौ देखतां मन बुडे । दिवसां पाहतां कातडें । कंटाळवाणें ॥ ८ ॥ काष्ठी पाषाणी पुतळ्या । नाना ठंकारें निर्मिल्या । परम सुंदर वाटल्या । परंतु तेथें पाषाण ॥ ९ ॥ नाना गोपुरीं पुतळ्या असती । वक्रांगें वक्रदृष्टी पाहती । लाघव देखतां भरे वृत्ति । परंतु तेथें विभांस ॥ १० ॥ खेळतां नेटकें दशावतारी । तेथें येती सुंदर नारी । नेत्र मोडिती कळाकुसरीं । परी तें अवघें घटिंगेणें ॥ ११ ॥ सृष्टि बहुरंगी असत्य । बहुरूपांचें हें कृत्य । तुज वाटे दृश्य सत्य । परी ही जाण अविद्या ॥ १२ ॥ मिथ्या साचासारिखें देखिलें । परी तें पाहिजे विचारिलें । दृष्टि तेरळतां भासलें । तें साच कैसें मानावें ॥ १३ ॥ वरी पाहतां पालथें आकाश । उदकीं पाहतां उताणें आकाश । मध्यें चांदण्यांचाहि प्रकाश । परी तें अवघें मिथ्या ॥ १४ ॥ नृपतीनें चितारी आणले । ज्याचे त्याऐसे पुतळे केले । पाहतां तेचि ऐसे गमले । परी तें अवघें मायिक ॥ १५ ॥ नेत्रीं कांहीं बाहुली नसे । जेव्हां जें पाहावें तेव्हां तें भासे । डोळां प्रतिबिंब दिसे । तें साच कैसेनी ॥ १६ ॥ जितुके बुडबुडे उठती । तितुक्यांमध्यें रूपें दिसतीं । क्षणामध्यें फुटोन जाती । रूपें मिथ्या ॥ १७ ॥ लघुदर्पणें दोनी चारी † हातीं । तितुकीं मुखें प्रतिबिंबती । परी तीं मिथ्या आदि अंतीं । एकचि मुख ॥ १८ ॥ नदीतीरीं भार जातां । दुसरा भार दिसे पालथा । कां पडसादाचा अवचिता । गजर उठे ॥ १९ ॥ वापी सरोवरांचें नीर । तेथें पशु पक्षी नर वानर । पत्रें वृक्षविस्तार । दिसे दोहीं सवा ॥ २० ॥ एक शस्त्र झाडूं जातां । दोन दिसती तत्त्वतां । नाना ‡ तंतु टणत्कारितां । द्विधा भासती ॥ २१ ॥ कां ते दर्पणाचे मंदिरीं । बैसली सभा दिसे दुसरी । बहुत दीपांचिये हारीं । बहुत छाया दीसती ॥ २२ ॥ ऐसें हें बहुविध भासे । साचासारिखें दिसे । परी हें सत्य म्हणोन कैसें । विश्वासावें ॥ २३ ॥ माया मिथ्या बाजीगिरी । दिसे साचाचियेपरी । परी हे जाणत्यानें खरी । मानूंचि नये ॥ २४ ॥ लटिके * साचाऐसें भावावें । तरी मग पारखी कासया असावें । एवं ये अविद्येचे गोवें । ऐसेंचि असे ॥ २५ ॥ मनुष्यांची बाजीगिरी । बहुत जनां वाटे खरी । शेवट पाहतां

---

१ बरड जमिनीवर सूर्यकिरणांच्या ठांयीं होणारी जलाची भ्रांति. २ वेडावलेलें. ३ सांगावें. ४ व्यवहार केला. ५ स्त्रिया. ६ मनोहर. ७ देवालयाचें अगदीं बाहेरल्या दरवाज्यावर लोडासारखी आडवी व कित्येक मजल्याची इमारत. ८ बाहुल्या. ९ कौशल्य. १० भास. ११ डोळ्यांनीं हावभाव करतात. १२ मोठ्या कौशल्यानें. १३ पुरुषच. १४ माया, अज्ञान. १५ चलित झाली असतां. १६ लहान लहान आरसे. † हातामध्यें. १७ भारा, ओझें. १८ प्रतिध्वनीचा. १९ एकदम. २० विहीर. २१ उदक. २२ दोन्ही बाजूंना, खालींवर. ‡ तार. २३ आरसेमहालांत. २४ खऱ्यासारखें. २५ गारुडीविद्या. * खऱ्यासारखें. २६ परीक्षक. २७ मायेची गुंतागुंत.

निर्धारीं । मिथ्या होय ॥ २६ ॥ तैशीच मोव राक्षसाची । देवांसहि वाटे साची । पंचवटिकेसी मृगाची । पाठीं घेतली रामें ॥ २७ ॥ पूर्व काया पालटती । एकाचेचि बहुत होती । रक्तबिंदीं जन्मती । रजनीचर ॥ २८ ॥ नाना पदार्थ फळेंचि झाले । द्वारकेमध्यें प्रवेशले । कृष्णें दैत्य किती वधिले । कपटरूपीं ॥ २९ ॥ कैसें कपट रावणाचें । शिर केलें मावेचें । काळनेमीच्या आश्रमाचें । अपूर्व कैसें ॥ ३० ॥ नाना दैत्य कपटमति । जे देवांसहि नाटोपती । मग निर्माण होऊन शक्ति । संहार केला ॥ ३१ ॥ ऐसी राक्षसांची मोव । जाणों न सकती देव । कपटविद्येचें लाघव । अघटित ज्यांचें ॥ ३२ ॥ मनुष्यांची बाजीगिरी । राक्षसांची वोडंबरी । भगवताची नानापरी । विचित्र माया ॥ ३३ ॥ हे साचासारखीच दिसे । विचारितांचि निरसे । मिथ्याचपरी आभासे । निरंतर ॥ ३४ ॥ साच म्हणावी तरी हे नासे । मिथ्या म्हणावी तरी हे दिसे । दोहीं पदार्थीं अविश्वासे । सांगतां मन ॥ ३५ ॥ परंतु हें नव्हे सांचार । मायेचा मिथ्या विचार । दिसतें हें स्वप्नाकार । जाण बापा ॥ ३६ ॥ तथापि अज्ञान तुजला । भासचि सत्य वाटला । तरी येथें चुका पाडिला । ऐक बापा ॥ ३७ ॥ दृश्य-भास अविद्यात्मक । तुझाहि देह तदात्मक । म्हणोनि हा अविवेक । तेथें संचरला ॥ ३८ ॥ दृष्टीनें दृश्य देखिलें । मन भासावरी बैसलें । तरी तें लिंगदेह झालें । अविद्यात्मक ॥ ३९ ॥ अविद्येनें अविद्या देखिली । म्हणोन गोष्टी विश्वासली । तुझी कोंया अवघी संचली । अविद्येची ॥ ४० ॥ तेचि काया मी आपण । हें देहबुद्धीचें लक्षण । येणें करितां झालें प्रमाण । दृश्यें अवघें ॥ ४१ ॥ इकडे सत्य मानिला देह । तिकडे दृश्यें सत्य हा निर्वाह । दोहींमध्यें महा संदेह । पैसावाला बळें ॥ ४२ ॥ देहबुद्धि केली बळकट । आणि ब्रह्म पाहों गेला धीट । तों दृश्यानें रोधिली वाट । परब्रह्माची ॥ ४३ ॥ तेथें साच मानिलें दृश्याला । निश्चयचि बाणोनि गेला । पाहा हो केव्हडा चुका पडिला । अकस्मात ॥ ४४ ॥ आतां असो हें बोलणें । ब्रह्म न पाविजे मीपणें । देहबुद्धीचीं लक्षणें । दृश्य भाविती ॥ ४५ ॥ अस्थीच्या देहीं मांसाचा डोळा । पाहेन म्हणे ब्रह्मींचा सोहळा । तो ज्ञाता नव्हे आंधळा । केवळ मूर्ख ॥ ४६ ॥ दृष्टीस दिसे मनास भासे । तितुकें काळांतरीं नासे । म्हणोनि दृश्यातीत असे । परब्रह्म तें ॥ ४७ ॥ परब्रह्म तें शाश्वत । माया तेचि अशाश्वत । ऐसा बोलिला निश्चितार्थ । नानाशास्त्रीं ॥ ४८ ॥ आतां पुढें निरूपण । देहबुद्धीचें लक्षण । चुका पडिला तो मी कोण । बोलिलें असे ॥ ४९ ॥ मी कोण हें जाणावें । मीपण त्यागून अनन्य व्हावें । मग समाधान तें स्वभावें । अंगीं बाणे

---

१ कपट, माया. २ रक्तबिंदूपासून. ३ राक्षस. ४ कालनेमी नांवाच्या राक्षसाच्या. ५ नवल. ६ कौशल्य, चातुर्य. ७ राक्षसी माया, मंत्रविद्या. ८ विचार केल्यावर. ९ नाहींशी होते. १० खरें. ११ मायिक. १२ अविद्यात्मक. १३ पांच ज्ञानेंद्रियें, पांच कर्मेंद्रियें, पंचप्राण, मन, बुद्धि, अशी सतरा तत्त्वें मिळून जो सूक्ष्म देह तो. १४ शरीर. १५ जग. १६ निश्चय. १७ विस्तरला. १८ हाडांच्या. १९ दृश्य=दिसणारें, त्याच्या अतीत-पलीकडे गेलेलें, त्याहून निराळें, दिसणाऱ्या वस्तूंहून अगदीं वेगळेंच. २० एकनिष्ठ.

॥ ५० ॥ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे षष्ठदशके दृश्यनिरसनं नाम अष्टमः समासः ॥ ८ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ गुप्त आहे उदंड धन । काय जाणती सेवक जन । तयांस आहे तें ज्ञान । बाह्याकाराचें ॥ १ ॥ गुप्त ठेविले उदंड अर्थ । आणि प्रकट दिसती पदार्थ । शहाणे शोधिती स्वार्थ । अंतरीं असे ॥ २ ॥ तैसें दृश्य हें मायिक । पाहत असती सकळ लोक । परी जयास ठाउका विवेक । ते अंतर जाणती ॥ ३ ॥ द्रव्य ठेवून जळ सोडिलें । लोक म्हणती सरोवर भरलें । तयाचें अभ्यंतर कळलें । समर्थजनासी ॥ ४ ॥ तैसे ज्ञाते जे समर्थ । तिहीं वोळखिला परमार्थ । इतर ते करिती स्वार्थ । दृश्य पदार्थांचा ॥ ५ ॥ काबाडी वाहती काबाडं । श्रेष्ठ भोगिती रत्नें जाड । हें जयाचें त्यास गोड । कर्मयोगें ॥ ६ ॥ एक ‡ काष्टस्वार्थ करिती । एक शुंभा एकवटिती । तैसे नव्हेत कीं नृपति । सारभोक्ते ॥ ७ ॥ जयांस आहे विचार । ते सुखासनीं झाले स्वार । इतर ते जेवळींल भार । वाहाताचि मेले ॥ ८ ॥ एक दिव्यान्नें भक्षिती । एक विष्ठा सांवडंती । आपण वर्तल्याचा घेती । साभिमान ॥ ९ ॥ सार सेविजे श्रेष्ठीं । असार घेइजे वृथा पुष्टीं । सारासारांची गोष्टी । सज्ञान जाणती ॥ १० ॥ गुप्त परिस चिंतामणि । प्रकट खडे कांचमणि । गुप्त हेम रत्नखाणी । प्रकट पाषाण मृत्तिका ॥ ११ ॥ अव्हेा शंख अव्हावेल । गुप्त वनस्पती अमोल । एरंड धोत्रे बहुसाल । प्रकट शिंपी ॥ १२ ॥ कोठें दिसेना कल्पतरु । उदंड शेरांचा विस्तारू । पाहातां नाहीं मैलागरू । बोरी बाभळी उदंड ॥ १३ ॥ कामधेनु जाणिजे इंद्रें । सृष्टींत उदंड खिल्लारें । महद्भाग्य भोगिजे नृपवरें । इतरां कर्मानुसार ॥ १४ ॥ नाना व्यापार करिती जन । अवघेचि म्हणती सकांचन । परंतु कुबेराचें महिमान । कोणासीच नये ॥ १५ ॥ तैसा ज्ञानी योगीश्वर । गुप्तार्थलाभाचा ईश्वर । इतर ते पोटाचे किंकर । नाना मतें धुंडिती ॥ १६ ॥ तस्मात् सार तें दिसेना । आणि असार तें दिसे जना । सारासारविवंचना । साधु जाणती ॥ १७ ॥ इतरांस हें काय सांगणें । खरें खोटें कोण जाणे । साधुसंताचिये खुणे । साधुसंत जाणती ॥ १८ ॥ दिसेना जें गुप्त धन । तयास करणें लागे अंजन । गुप्त परमात्मा सज्जन-। संगतीं शोधावा ॥ १९ ॥ रायाचे सन्निध होतां । सहजचि लाभे श्रीमंतता । तैसा हा सत्संग धरितां । सद्वस्तु लाभे ॥ २० ॥ सद्वस्तूस लाभे सद्वस्तु । अभ्यवस्थासि अभ्यवस्थु । पाहतां प्रशस्तासि प्रशस्तु । विचार लाभे ॥ २१ ॥ म्हणोनि हें दृश्यजात । अवघेंचि आहे

---

१ पुष्कळ. २ बाहेरील आकाराचें. ३ धन. ४ज्यांस गुप्त धन ठाऊक असतें. ५ आंत, गुप्त. ६ जगत्. ७ मोळी. ‡ लाकडाच्या मोळीवर निर्वाह. ८ गोवऱ्या. ९ पालखी वगैरे सुखदायक वाहनांत. १० जवळचे. ११ जमा करतात. १२ व्यर्थ माजलेल्यांनीं, निरुद्योगी जे त्यांनीं. १३ इच्छित वस्तु प्राप्तकरून देणारा मणि. १४ सोनें. १५ उजवा. १६ उजवीकडून, वेटाळे असलेली वेल. १७ कुंपणाचें भिकार झाड. १८ मलय गिरिचंदन. १९ गाई व म्हशींचे समूह. २० सुवर्णवान्, धनवान्. २१ नोकर. २२ डोळ्यांला स्वच्छ दिसावें म्हणून त्यांत जें औषध घालतात तें. २३ सज्जनांची संगत. २४ सर्व दिसणारें जगत.

अशाश्वत । परमात्मा अच्युत अनंत । तो या दृश्यावेगळा ॥ २२ ॥ दृश्यावेगळा दृश्य अंतरीं । सर्वात्मा तो चराचरीं । विचार पाहतां अंतरीं । निश्चय बाणे ॥ २३ ॥ संसारत्याग न करितां । प्रपंचउपाधि न सांडतां । जनांमध्यें सार्थकता । विचारेंचि होय ॥ २४ ॥ हें प्रचीतीचें बोलणें । विवेकें † प्रचीत बाणे । प्रचीत पाहतील ते शाहणे । अन्यथा नव्हे ॥ ॥ २५ ॥ प्रचीत आणि अनुमान । उधार आणि रोकडें धन । मानसपूजा प्रत्यक्ष दर्शन । यांस महदंतर ॥ २६ ॥ पुढें जन्मांतरीं होणार । हा तों अवघाच उधार । तैसें नव्हे सारासार । तात्काळ लाभे ॥ २७ ॥ तात्काळचि लाभ होतो । प्राणी संसारीं सुटतो । संशय अवघाचि तुटतो । जन्ममरणांचा ॥ २८ ॥ याचि जन्में येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळें । मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ २९ ॥ ये गोष्टीस कैंची अनमान । तो सिद्धाचि पावेल पतन । मिथ्या वदेल त्यास आण । उपासनेची ॥ ३० ॥ हें यथार्थाचि आहे बोलणें । विवेकें शीघ्रचि मुक्त होणें । असोनि कांहींच नसणें । जनांमध्यें ॥ ३१ ॥ देवपद आहे निर्गुण । देवपदीं अनन्यपण । हाचि अर्थ पहातां पूर्ण । समाधान बाणे ॥ ३२ ॥ देहींच विदेह होणें । करून कांहींच न करणें । जीवनन्मुक्तांचीं लक्षणें । जीवन्मुक्त जाणती ॥ ३३ ॥ येरवीं हें खरें न वाटे । अनुमानोंचि संदेह वाटे । संदेहाचें मूळ तुटे । सद्गुरुवचनें ॥ ३४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे षष्ठदशके सारशोधननिरूपणं नाम नवमः समासः ॥ ९ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ समाधान पुसतां कांहीं । म्हणतां बोलिजे ऐसें नाहीं । तरी तें कैसें आहे सर्वही । मज निरूपावें ॥ १ ॥ मुक्यानें गूळ खादला । गोडी नये सांगायाला । याचा अभिप्राय मजला । निरूपण कीजे ॥ २ ॥ अनुभवहि पुसों जातां । म्हणती नये कीं सांगतां । तरी कोणापाशीं पुसों आतां । समाधान ॥ ३ ॥ जे ते अगम्य सांगती । नये माझिये प्रचीती । ¶ विचार कैसे माझे चित्तीं । ऐसें करावें ॥ ४ ॥ ऐसें श्रोतयाचें उत्तर । याचें कैसें प्रत्युत्तर । निरूपिजेल तत्पर । होऊन ऐका ॥ ५ ॥ जें समाधानाचें स्थळ । कीं तो अनुभवचि केवळ । तेंचि स्वरूप प्रांजळ । बोलून दावूं ॥ ६ ॥ जें बोलास आकळेना । बोलिल्याविणहि कळेना । जयासी कल्पितां कल्पना । हिंपुटी होय ॥ ७ ॥ तें जाणावें परब्रह्म । जें वेदांचें गुह्य परम । धरितां संतसमागम । सर्वहि कळे ॥ ८ ॥ तेंचि आतां सांगिजेल । जें समाधान सखोल° । ऐक अनुभवाचे बोल । अनिर्वाच्य वस्तु ॥ ९ ॥ सांगतां नये तें सांगणें । गोडी कळाया गूळ देणें । ऐसें हें सद्गुरुविणें । होणार नाहीं ॥ १० ॥ सद्गुरुकृपा कळे त्यासी । जो शोधील आपणाशीं । पुढें कळेल अनुभवासी । आपेआप वस्तु ॥ ११ ॥ दृढ करोनियां बुद्धि । आधीं घ्यावी आपुली शुद्धि । तेणें लागे समाधि । अकस्मात् ॥ १२ ॥ आपुलें मूळ बरें शोधितां । आपुली तों मायिक वार्ता । पुढें वस्तूच तत्त्वतां । समाधान ॥ १ ॥ आत्मा आहे सर्व-

---

१ अनुभवाचें. † अनुभव. २ तुच्छ मानील. ३ शपथ. ४ देहरहित. ५ जीवंत असून देहादि अभिमान सुटून शोनकरून जे मुक्त ते. ६ जाणण्यास कठीण. ७ अनुभवाला. ¶ मला त्याचा विचार कळेल अशी युक्ती करा. ८ शब्दांनीं सांगतां येत नाहीं. ९ कष्टी. १० गहन. ११ चित्ताची एकाग्रता.

साक्षी । हें बोलिजे पूर्वपक्षीं । जो कोणी सिद्धांत लक्षी । तोचि साधु ॥ १४ ॥ सिद्धांत-वस्तु लक्षूं जातां । सर्वसाक्षिणी ते अवस्था । आत्मा तीहून परता । अवस्थातीत ॥ १५ ॥ पदार्थज्ञान जेव्हां सरे । द्रष्टा द्रष्टेपणें नुरे । ते समयीं फुंजे उतरे । मीपणाचा ॥ १६ ॥ जेथें मुरालें मीपण । तेचि अनुभवाची खूण । अनिर्वाच्य समाधान । या कारणें बोलिजे ॥ १७ ॥ अत्यंत विचाराचे बोल । तरी ते मायिकाचे फोल । शब्द सबाह्य सखोल । अर्थचि अवघा ॥ १८ ॥ शब्दार्कारितां कळे अर्थ । अर्थ पाहतां शब्द व्यर्थ । शब्द सांगे तें यथार्थ । परी † आपण मिथ्या ॥ १९ ॥ शब्दार्कारितां वस्तु भासे । वस्तु पाहतां शब्द नासे । शब्द फोल अर्थ असे । घनवटपणें ॥ २० ॥ भुसार्कारितां धान्य निपजे । धान्य घेऊन भूस टाकिजे । तैसा भूस शब्द जाणिजे । अर्थ धान्य ॥ २१ ॥ पोंचटामध्यें घनवट । घनवटीं उडे पोंचट । तैसा शब्द हा फलगट । परब्रह्मीं ॥ २२ ॥ शब्द बोलूनि राहे । अर्थ शब्दापूर्वीच आहे । याकारणें न साहे । उपमा तया अर्थासी ॥ २३ ॥ भूस सांडून कण घ्यावा । तैसा वाच्यांश त्यजावा । कण लक्ष्यांश लक्षावा । शुद्ध स्वानुभवें ॥ २४ ॥ दृश्या वेगळें बोलिजे । त्यासी वाच्यांश ह्मणिजे । त्याचा अर्थ तो जाणिजे । शुद्ध लक्ष्यांश ॥ २५ ॥ ऐसा जो शुद्ध लक्ष्यांश । तोचि जाणावा पूर्वपक्ष । स्वानुभव तो * अलक्ष । लक्षिला नवचे ॥ २६ ॥ जेथें गाळून सांडिलें नेभां । जो अनुभवाचा गाभा । ऐसा तोहि उभा । कल्पित केला ॥ २७ ॥ मिथ्या कल्पनेपासून झाला । स्वरूपपण कैसें असेल त्याला । म्हणोनि तेथें अनुभवाला । ठावचि नाहीं ॥ २८ ॥ दुजेविण अनुभव । हें बोलणेंचि तों वाव । याकारणें नाहीं ठाव । अनुभवासी ॥ २९ ॥ अनुभवें त्रिपुटी उपजे । अद्वैतीं द्वैतचि लाजे । म्हणोनियां बोलणें साजे । अनिर्वाच्य ॥ ३० ॥ दिवसरजनीचें परिमित । करावया मूळ आदित्य । तो आदित्य गेलिया उर्वरित । त्यासि काय ह्मणावें ॥ ३१ ॥ शब्दमौनाचा विचार । ह्मावया मूळ ॐकार । तो ॐकार गेलिया उच्चार । कैसा करावा ॥ ३२ ॥ अनुभव आणि अनुभविता । सकळ ये मायेचि-करितां । ते माया मुळीं नसतां । त्यासी काय म्हणावें ॥ ३३ ॥ वस्तु एक आपण एक । ऐशी असती वेगळिक । तरी अनुभवाचा विवेक । बोलोंयेता सुखें ॥ ३४ ॥ वेगळे-पणाची भ्रांता । ते लटिकी, वंध्येची सुतां । म्हणूनियां अभिन्नता । मुळींच आहे ॥ ३५ ॥ अजन्मा होता निजेला । तेणें स्वप्नीं स्वप्न देखिला । सद्गुरुसि शरण गेला । संसारदुःखें ॥ ३६ ॥ ‡ सद्गुरुकृपेस्तव । झाला संसार वाव । ज्ञान झालिया ठाव । पुसे अज्ञानाचा ॥ ३७ ॥ आहे तितुकें नाहीं झालें । नाहीं, नाहींपणें निमालें । आहे नाहीं जाऊन उरलें ।

---

१ जागृति, स्वप्न, सुषुप्ति या अवस्थांपलीकडील. २ पाहणारा. ३ गर्व, अभिमान. ४ आंतबाहेर. ५ गंभीर. † शब्द स्वतः. ६ शब्दापासून. ७ निःसार, कोंड्याप्रमाणें. ८ कोंड्यापासून. ९ फोलामध्यें. १० दाट, भरगच्च कण. ११ बाहेरून दिसणारें स्वरूप. १२ आंतील, वास्तविक स्वरूप. * लक्षांत न येणारा. १३ आकाशाला. १४ दुसऱ्यावांचून. १५ ज्ञेय, ज्ञाता, ज्ञान; किंवा कार्य, कर्ता, व कर्म. १६ दिवस व रात्र यांचें ४ कारण. १७ सूर्य. १८ बाकी राहिलेलें. १९ आई जी माया. २० मुलगी. २१ अभिन्नपणा, एकरूपता. २२ न जन्मलेला. ‡ सद्गुरुकृपेमुळें. २३ स्थान. २४ नाहींसें झालें.

नसोन कांहीं ॥ ३८ ॥ शून्यत्वातीत शुद्ध ज्ञान । तेणें झालें समाधान । ऐक्यरूपें अभिन्न । सहजस्थिति ॥ ३९ ॥ अद्वैतनिरूपण होतां । निमाली द्वैताची वार्ता । ज्ञानचर्चा बोलों जातां । जागृति आली ॥ ४० ॥ श्रोतीं व्हावें सावधान । अर्थीं घालावें मन । खुणे पावतां समाधान । अंतरीं कळे ॥ ४१ ॥ तेणें जितुकें ज्ञान कथिलें । तितुकें स्वप्नावारी गेलें । अनिर्वाच्य सुख उरलें । शब्दातीत ॥ ४२ ॥ येथें शब्देंविण ऐक्यता । अनुभव ना अनुभविता । ऐसा निवांत तो मागुता । जागृति आला ॥ ४३ ॥ तेणें स्वप्नीं स्वप्न देखिला । जागा होऊन जागृतीस आला । तेथें शब्द कुंठित जाहला । अंत नलगे ॥ ४४ ॥ या निरूपणाचें मूळ । केलेंच करूं प्रांजळ । तेणें अंतरीं निवळ । समाधान कळे ॥ ४५ ॥ तंव शिष्यें विनविलें । जी हें आतां निरूपिलें । तें पाहिजे बोलिलें । मागुतें स्वामी ॥ ४६ ॥ मन कळाया कारण । केलेंचि करावें निरूपण । येथील जें कां निजखूण । ते मज अनुभवावी ॥ ४७ ॥ अजन्मा तो सांग कवण । तेणें देखिला कैसा स्वप्न । येथें कैसें निरूपण । बोलिलें आहे ॥ ४८ ॥ जाणोनि शिष्याचा आदर । स्वामी देती प्रत्युत्तर । तेंचि आतां अति तत्पर । श्रोतीं येथें परिसावें ॥ ४९ ॥ ऐक शिष्या सावधान । अजन्मा तो तूंचि जाण । तुवां देखिला स्वप्नीं स्वप्न । तोहि आतां सांगतों ॥ ५० ॥ स्वप्नीं स्वप्नाचा विचार । तो तूं हा जाण संसार । येथें तुवां सारासार । विचार केला ॥ ५१ ॥ रिघोनि सद्गुरुसि शरण । काढून शुद्ध निरूपण । याची करिसी उणखूण । प्रत्यक्ष आतां ॥ ५२ ॥ याचाचि घेतां अनुभव । बोलणें तितुकें होतें वावें । निवांत विश्रांतीचा ठाव । ते तूं जाण जागृति ॥ ५३ ॥ ज्ञानगोष्टीचा गलबला । सरोन अर्थ प्रकटला । याचा विचार घेतां आला । अंतरीं अनुभव ॥ ५४ ॥ तुज वाटे हे जागृति । मज झाली अनुभवप्राप्ति । या नांव केवळ भ्रांति । फिटलीच नाहीं ॥ ५५ ॥ अनुभव अनुभवीं विराला । अनुभवेंविण अनुभव आला । हाहि स्वप्नींचा चेईला । नाहींच बापा ॥ ५६ ॥ जागा झालिया स्वप्नऊर्मी । स्वप्नीं म्हणसी अजन्मा तो मी । जागेपणें स्वप्नऊर्मी । गेलीच नाहीं ॥ ५७ ॥ स्वप्नीं वाटे जागेपण । तैसी अनुभवाची खूण । आली परी तें सत्य स्वप्न । भ्रमरूप ॥ ५८ ॥ जागृति या पलीकडे । तें सांगणें केवीं घडे । जेथें धारणाचि मोडे । विवेकाची ॥ ५९ ॥ म्हणोनि तें समाधान । बोलतांचि नये ऐसें जाण । निःशब्दाची ऐसी खूण । वोळखावी ॥ ६० ॥ ऐसें आहे समाधान । बोलतांच नये जाण । इतुकेन बाणली खूण । निःशब्दाची ॥ ६१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे षष्ठदशके अनिर्वाच्यनिरूपणं नाम दशमः समासः ॥ १० ॥

---

१ परब्रह्मरूप. २ शुद्ध ब्रह्माचें विवेचन. ३ शब्दांच्या पलीकडील, सांगतां येणार नाहीं असें. ४ वाटाघाट. ५ व्यर्थ. ६ जागा झाला. ७ स्वप्नाची लहर. ८ बुद्धि. ९ जेथें शब्दांची गति कुंठित होते अशा परब्रह्माची.

दशक सातवा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ विद्यावंताचा पूर्वज[1] । गजानन एकदंत[2] । त्रिनयन[3] चतुर्भुज । परशुपाणि[4] ॥ १ ॥ कुबेरापासून अर्थ[5] । वेदांपासून परमार्थ । लक्ष्मीपासून समर्थ । भाग्यासि आले ॥ २ ॥ तैशी मंगळमूर्ति आद्या[6]-। पासून झाल्या सकळ विद्या । तेणें कवी लाघवपद्या[7] । सत्पात्रें जाहलीं ॥ ३ ॥ जैशीं सामर्थ्याचीं लेंकुरें[8] । नाना अलंकारीं सुंदरें । मूळपुरुषाचेनि द्वारें । तैसे कवी ॥ ४ ॥ नमूं ऐसिया गणेंद्रा । विद्याप्रकाशपूर्णचंद्रा । जयाचेन बोधसमुद्रा[9] । भरितें दाटे ॥ ५ ॥ जो कर्तृत्वास आरंभ । मूळपुरुष मूलारंभ । जो परात्पर स्वयंभ[10] । आदिअंतीं ॥ ६ ॥ तयापासून प्रमदा । इच्छाकुमारी[11] शारदा । आदित्यापासून गोदा । मृगजळ वाहे ॥ ७ ॥ जे मिथ्या म्हणतांच गोंवी[12] । मायिकपणें लाघवी । वक्त्यास वेढा लावी । वेगळेपणें ॥ ८ ॥ जे द्वैताची[13] जननी । कीं ते अद्वैताची खाणी । मूळमाया गवसणी[14] । अनंत ब्रह्मांडांची ॥ ९ ॥ कीं ते औदुंबरी[15] वल्ली । अनंतब्रह्मांडीं लगडली । मूळपुरुषाची माउली । दुहितारूपें[16] ॥ १० ॥ वंदूं ऐशी वेदमाता । आदिपुरुषाची जे सत्ता । आतां आठवीन समर्था । सद्गुरूसी ॥ ११ ॥ जयाचेनि कृपादृष्टि । होय आनंदाची वृष्टि । तेणें गुणें सर्व सृष्टि । आनंदमय ॥ १२ ॥ कीं तो आनंदाचा जनक । सायुज्यमुक्तीचा नायक । कैवल्यपददायक[17] । अनाथबंधु ॥ १३ ॥ मुमुक्षुचातकीं सुस्वर[18] । करुणा[19] पाहिजे अंबर[20] । वोळे[21] कृपेचा जळधर[22] । साधकावरी ॥ १४ ॥ कीं ते भवार्णवींचें तारूं[23] । बोधें पाविजे पैलपारु । महा आवर्तीं आधारू[24] । भाविकांसी ॥ १५ ॥ कां तो काळाचा नियंता[25] । नानासंकटीं सोडवितां । कां ते भाविकांची माता । परम स्नेहाळ ॥ १६ ॥ कीं तो पवित्रीचा आधारू । कीं तो विश्रांतीचा † थारू । नातरी सुखाचें माहेरू । सुस्वरूप ॥ १७ ॥ ऐसा सद्गुरु पूर्णपणीं । तुटे भेदाची कवडसणी[26] । देहेंविणें[27] लोटांगणीं । तया प्रभूसी ॥ १८ ॥ साधुसंत आणि सज्जन । वंदूनियां श्रोतेजन । आतां कथानुसंधान । सावध ऐका ॥ १९ ॥ संसार हाचि दीर्घ स्वप्न । लोभें वोसंडती[28] जन । " माझी कांता माझें धन । कन्या पुत्र माझे " ॥ २० ॥ ज्ञानसूर्य मावळला । तेणें प्रकाश लोपला । अंधकारें पूर्ण झाला ।

---

१ वडील, मूळपुरुष. २ एकदंत. ३ तीन डोळे असलेला. ४ परशु हातांत घेतलेला. ५ धन. ६ अध्यात्मविद्या. ७ गणपति. ८ आरंभीची, मूळची. ९ कवितेचे कौशल्य, कुशलता. १० श्रीमंताची. ११ ज्ञानरूपी समुद्राला. १२ परमात्मा. १३ स्वयंभू, स्वतःसिद्ध. १४ स्त्री. १५ सर्वदा स्वेच्छेनें कौमार्यावस्थेतच राहणारी. १६ सरस्वती. १७ गुंतवून टाकी. १८ भुलवी. १९ भेदाची, दृश्य जगताची. २० खोळ, आभ्रा. २१ औदुंबरी=ओडंबरी=मायावी, जादूनें केलेली. २२ कन्येच्या रूपानें. २३ मोक्षपदाचा देणारा. २४ करुणायुक्त मुद्रेनें आकाशाकडे पाहिलें कीं. २५ आकाश. २६ वृष्टि करतो. २७ मेघ. २८ संसारसागरांतील. २९ मोठ्या भोवऱ्यांत. ३० नियामक. ३१ परलोकचा. † जागा. ३२ दोरी, बंधन. ३३ देहाहंकार टाकून. ३४ वरळतात.

ब्रह्मगोळ अवघा ॥ २१ ॥ नाहीं सत्त्वाचें चांदणें । कांहीं मार्ग दिसे जेणें । सर्व भ्रांतीचेनि गुणें । आपेंआप न दिसे ॥ २२ ॥ देहबुद्धि अहंकारें । निजले घोरती घोरें । दुःखें आक्रंदती थोरें । विषयसुखाकारणें ॥ २३ ॥ निजले असतां मेले । पुनः उपजतांच निजले । ऐसे आले आणि गेले । बहुत लोक ॥ २४ ॥ निद्रसुरेपणेंचि सैरा । बहुतीं केल्या येरझारा । नेणोनियां परमेश्वरा । भोगिले कष्ट ॥ २५ ॥ तयां कष्टांचें निरसन । व्हावया पाहिजे आत्मज्ञान । म्हणोनि हें निरूपण । अध्यात्मग्रंथीं ॥ २६ ॥ सकळ विद्येमध्यें सार । अध्यात्मविद्येचा विचार । दशमाध्यायीं शार्ङ्गधर । भगवद्गीतेंत बोलिला ॥ २७ ॥ ॥ श्लोक ॥ अध्यात्मविद्या विद्यानां वादः प्रवदातामहम् ॥ याकारणें अद्वैत ग्रंथ । अध्यात्मविद्येचा परमार्थ । पाहावया तोचि समर्थ । जो सर्वांगें श्रोता ॥ २८ ॥ जयाचें चंचळ हृदय । तेणें ग्रंथ सोडूंचि नय । सोडितां अलभ्य होय । अर्थ येथींचा ॥ २९ ॥ जयास जोडिला परमार्थ । तेणें पहावा हा ग्रंथ । अर्थ शोधितां परमार्थ । निश्चयें बाणे ॥ ३० ॥ जयास नाहीं परमार्थ । तयास न कळे येथींचा अर्थ । नेत्रेंविण निर्धानस्वार्थ । अंधास न कळे ॥ ३१ ॥ एक म्हणती मराठें काय । हें तों भल्यानें ऐकों नय । तीं मूर्खें नेणती सोय । अर्थान्वयाची ॥ ३२ ॥ लोहाची मांदूस केली । नाना रत्नें सांठविलीं । तीं अभाग्यानें त्यागिलीं । लोखंड म्हणोनि ॥ ३३ ॥ तैसी भाषा प्राकृत । अर्थवादे आणि सिद्धांत । नेणोनि त्यागिती भ्रांत । मंदबुद्धीस्तव ॥ ३४ ॥ ओंहाच सांपडतां धन । त्याग करणें मूर्खपण । द्रव्य घ्यावें सांठवण । पाहों नये ॥ ३५ ॥ परिस देखिला अंगणीं । मार्गीं सांपडला चिंतामणि । आव्हावेले महागुणी । कूपामध्यें ॥ ३६ ॥ तैसें प्राकृतीं अद्वैत । सुगम आणि सप्रचीत । अध्यात्म लाभे अकस्मात् । तरी अवश्य घ्यावें ॥ ३७ ॥ न करितां व्युत्पत्तीचा श्रम । सकळ शास्त्रार्थ होय सुगम । सत्समागमाचें वर्म । तें हें ऐसें असे ॥ ३८ ॥ जें व्युत्पत्तीनें न कळे । तें सत्समागमें कळे । सकळ शास्त्रार्थ आकळे । स्वानुभवासी ॥ ३९ ॥ म्हणोनि कारण सत्समागम । तेथें नलगे व्युत्पत्तिश्रम । जन्मसार्थकाचें वर्म । वेगळेंचि आहे ॥ ४० ॥ श्लोक ॥ ॥ भाषाभेदाश्च वर्तंते ह्यर्थ एको न संशयः ॥ पात्रद्वये यथा खाद्यं स्वादभेदो न विद्यते ॥ १ ॥ ॥ टीका ॥ भाषा पालटे कांहीं । अर्थ वायां जात नाहीं । कार्य सिद्ध तें सर्वही । अर्थाचपाशीं ॥ ४१ ॥ तथापि प्राकृताकरितां संस्कृताची सार्थकता । येऊनियां त्या गुप्तार्था । कोण जाणे ॥ ४२ ॥ आतां असो हें बोलणें । भाषा त्यागून अर्थ घेणें । उत्तम घेऊन त्याग करणें । साली टरफलांचा ॥ ४३ ॥ अर्थ सार भाषा पोंचट । अभिमानें करावी खटपट । नाना अहंतेनें वाट । रोधिली मोक्षाची ॥ ४४ ॥ शोध घेतां

---

१ अखिल ब्रह्मांड. २ सत्वगुणांत ज्ञानाचा प्रकाश असतो. ३ झोंपाळूपणें, अज्ञानानें. ४ स्वच्छंद रीतीनें. ५ नाश. ६ ब्रह्मज्ञानविद्येचा. ७ श्रीकृष्ण परमात्मा. ८ द्रव्याचा ठेवा. ९ अर्थाच्या संबंधाची. १० मोठी पेटी. ११ स्तुति, पाल्हाळ. १२ सहज. १३ वरील आच्छादन, वारदान. १४ उजव्या वळणाची वेल. १५ विहिरीमध्यें. १६ अनुभवाचें. १७ कळतो. १८ विद्वत्तेचे कष्ट. १९ साफल्य. २० गूढ अर्थाच्या संस्कृताला. २१ अभिमानानें. २२ बंद केली, अडविली.

लक्ष्यांशाचा । तेथें आधीं वाच्यांश कैंचा । अगाध महिमा भगवंताचा । कळला पाहिजे ॥ ४५ ॥ मुकेपणाचें बोलणें । हें जयाचे तोचि जाणे । स्वानुभवाचिये खुणे । स्वानुभवीं पाहिजे ॥ ४६ ॥ अर्थ जाणे अध्यात्माचा । ऐसा श्रोता मिळेल कैंचा । जयासि बोलतां वाचेचा । हैंव्यासाचि पुरे ॥ ४७ ॥ परीक्षावंतापुढें रत्न । ठेवितां होय समाधान । तैसें ज्ञानियापुढें ज्ञान । बोलावें वाटे ॥ ४८ ॥ मायाजाळें दुश्चित होय । तें निरूपणीं कामा नय । संसारिका कळे काय । अर्थ येथींचा ॥ ४९ ॥ श्लोक ॥ व्यवसायात्मिका बुद्धिरेकेह कुरुनंदन ॥ बहुशाखा ह्यनंताश्च-बुद्धयो व्यवसायिनाम् ॥ १ ॥ टीका ॥ व्यवसायी जो मलिन । त्यासि नकळे निरूपण । येथें पाहिजे सावधपण । अतिशयेंसि ॥ ५० ॥ नाना रत्नें नाना नाणीं । दुश्चितपणें घेतां हीणी । परीक्षा नेणतां प्राणी । ठकला तेथें ॥ ५१ ॥ तैसें निरूपणीं जाणा । आहाँच पाहतां कळेना । मराठेंचि उमजेना । कांहीं केल्या ॥ ५२ ॥ जेथें निरूपणाचें बोल । आणि अनुभवाची वोल । तें संस्कृतापरीस खोल । अध्यात्मश्रवण ॥ ५३ ॥ मायाब्रह्म वोळखावें । तयास अध्यात्म ह्मणावें । तरी तें मायेचें जाणावें । स्वरूप आधीं ॥ ५४ ॥ माया सगुण साकार । माया सर्व विकार । माया जाणिजे विस्तार । पंचभूतांचा ॥ ५५ ॥ माया दृश्य दृष्टीस दिसे । माया भास मनास भासे । माया क्षणभंगुर नासे । विवेकें पाहतां ॥ ५६ ॥ माया अनेक विश्वरूप । माया विष्णूचें स्वरूप । मायेची सीमा अमूप । बोलिजे तितुकी ॥ ५७ ॥ माया बहुस्वरूपी बहुरंग । माया ईश्वराचा संग । माया पाहतां अभंग । अखिल वाटे ॥ ५८ ॥ माया सृष्टीची रचना । माया आपुली कल्पना । माया तोडितां तुटेना । ज्ञानेविण ॥ ५९ ॥ ऐसी माया निरूपिली । स्वल्प संकेतें बोलिली । पुढें वृत्ति सावध केली । पाहिजे श्रोतीं ॥ ६० ॥ पुढें ब्रह्मनिरूपण । निरूपिलें ब्रह्मज्ञान । जेणें तुटे मायाभान । ऐकेसरें ॥ ६१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सप्तमदशके मंगलाचरणनिरूपणं नाम प्रथमः समासः ॥ १ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ब्रह्म निर्गुण निराकार । ब्रह्म निःसंग निर्विकार । ब्रह्मास नाहीं पारावार । बोलती साधू ॥ १ ॥ ब्रह्म सर्वांस व्यापक । ब्रह्म अनेकीं एक । ब्रह्म शाश्वत हा विवेक । बोलिला शास्त्रीं ॥ २ ॥ ब्रह्म अच्युत अनंत । ब्रह्म सदोदित संथ । ब्रह्म कल्पनेरहित । निर्विकल्प ॥ ३ ॥ ब्रह्म या दृश्यावेगळें । ब्रह्म शून्यत्वेंनिराळें । ब्रह्म इंद्रियाच्या मेळें । चोजवेना ॥ ४ ॥ ब्रह्म दृष्टीस दिसेना । ब्रह्म मूर्खासी असेना । ब्रह्म साधूविण येईना । अनुभवासी ॥ ५ ॥ ब्रह्म सकळांहूनि थोर । ब्रह्माऐसें नाहीं सार । ब्रह्म सूक्ष्म अगोचर । ब्रह्मादिकांसी ॥ ६ ॥ ब्रह्म शब्दीं ऐसें तैसें । बोलिजे त्याहूनि

---

१ शुद्ध परब्रह्माचा. २ उपाधियुक्त जीवेश्वरादि वाचेनें बोलण्याजोगा अंश. ३ नाद, छंद. भ० गी० २-४८. ४ उद्योगी. ५ निष्काळजीपणानें. ६ तोटा. ७ वरवर, सहज. ८ वेदांतश्रवण. ९ सत्त्व, रजतमांनीं युक्त, प्रत्यक्ष दिसणारी. १० पुष्कळ. ११ एकदम. १२ शेवट, मर्यादा. १३ नाशरहित. १४ स्थिर. १५ कल्पनाविरहित. १६ शून्यत्व (कांहीं नसणें) त्याहून वेगळें. १७ कळत नाहीं. १८ मूर्खाच्या दृष्टीनें ब्रह्म नाहीं. १९ न कळणारें.

अनारिसें । परी तें श्रवणअभ्यासें । पाविजे ब्रह्म ॥ ७ ॥ ब्रह्मास नामें अनंत । परी तें ब्रह्म नामातीत । ब्रह्मास हेतदृष्टांत । देतां न शोभती ॥ ८ ॥ ब्रह्मासारिखें दुसरें । पाहतां काय आहे खरें । ब्रह्म दृष्टांतउत्तरें । कदा न साहे ॥ ९ ॥ यतो वाचो निवर्तंते अप्राप्य मनसासह ॥ येथें वाचा निवर्तती । मनासी नाहीं ब्रह्मप्राप्ति । ऐसी बोलिली श्रुति । सिद्धांत-वचन ॥ १० ॥ कल्पनारूप मन पाहीं । ब्रह्मीं कल्पनाचि नाहीं । म्हणोनि हें वाक्य कांहीं । अन्यथा नव्हे ॥ ११ ॥ आतां मनासि जें अप्राप्त । तें कैसेनि होईल प्राप्त । ऐसें म्हणाल तरी कृत्य । सद्गुरूविण नाहीं ॥ १२ ॥ भांडारगृहें भरलीं । परी असतीं अडकलीं । हातास न येतां किल्ली । सर्वही अप्राप्त ॥ १३ ॥ तरी ते किल्ली ते कवण । मज करावी निरूपण । ऐसा श्रोता पुसे खूण । वक्त्यासी ॥ १४ ॥ सद्गुरुकृपा तेचि किल्ली । जेणें बुद्धि प्रकाशली । द्वैतकपाटें उघडलीं । एकसरां ॥ १५ ॥ तेथें सुख असे वाडें । नाहीं मनासि पवाड । मनेंविण कवाड । साधनाचा ॥ १६ ॥ त्याची मनाविण प्राप्ति । कीं वासनेविण तृप्ति । तेथें न चले व्युत्पत्ति । कल्पनेची ॥ १७ ॥ तें परेहूनि पर । मन-बुद्धि अगोचर । संग सोडितां सत्वर । पाविजे तें ॥ १८ ॥ संग सोडावा आपुला । मग पाहावें तयाला । अनुभवी तो या बोला । सुखावेल गा ॥ १९ ॥ आपण म्हणिजे मीपण । मीपण म्हणजे जीवपण । जीवपण म्हणिजे अज्ञान । संग जडला ॥ २० ॥ सोडितां तया संगासी । ऐक्य होय निःसंगासी । कल्पनेविण प्राप्तीसी । अधिकार ऐसा ॥ २१ ॥ मी कोण ऐसें नेणिजे । तया नांव अज्ञान बोलिजे । अज्ञान गेलिया पाविजे । परब्रह्म तें ॥ २२ ॥ देहबुद्धीचें थोरपण । परब्रह्मीं न चले जाण । तेथें होतसे निर्वाण । अहंभावासी ॥ २३ ॥ उंच नीच नाहीं परी । रावरंका एकच सरी । झाला पुरुष अथवा नारी । तरी एकचि पद ॥ २४ ॥ ब्राह्मणाचें ब्रह्म तें सोंवळें । शूद्राचें ब्रह्म तें ओवळें । ऐसें वेगळें आगळें । तेथें असेचिना ॥ २५ ॥ उंच ब्रह्म तें रायासी । नीच ब्रह्म तें परिवारासी । ऐसा भेद तयापासीं । मुळींच नाहीं ॥ २६ ॥ सकळांस मिळोन ब्रह्म एक । तेथें नाहीं अनेक । रंक अथवा ब्रह्मादिक । तेथेंचि जाती ॥ २७ ॥ स्वर्ग मृत्यु आणि पाताळ । तिहीं लोकींचे ज्ञाते सकळ । सकळांसि मिळोनि एकाचि स्थळ । विश्रांतीचें ॥ २८ ॥ गुरुशिष्यां एकचि पद । तेथें नाहीं भेदाभेद । परी या देहाचा संबंध । तोडिला पाहिजे ॥ २९ ॥ देहबुद्धीच्या अंतीं । सकळांसि एकाचि प्राप्ति । एकं ब्रह्म द्वितीयं नास्ति । हें श्रुतीचें वचन ॥ ३० ॥ साधु दिसती वेगळाले । परी ते स्वरूपीं मिळाले । अवघे मिळोनि एकाचि झाले । देहातीत वस्तु ॥ ३१ ॥

---

१ निराळें. २ नांवाच्या पलीकडे. ३ हेतु व उपमा. ४ दृष्टांताचें भाषण. ५ जेथून वाचा परत येतात. ६ वेद. ७ खजीनें. ८ द्वैतरूप दरवाजे. ९ एकदम. १० मोठें. ११ महत्त्व, विस्तार, अवकाश. १२ युक्ती, तजवीज, कारस्थान. १३ विद्वत्ता. १४ परा वाणीच्याही पलीकडे. १५ मन व बुद्धि यांस न कळणारे. १६ विषयासक्ति. ॥ बोलण्यानें १७ संगरहित आत्मा. १८ शेवट, अंत. १९ प्रकार, भेद. २० श्रीमंत व गरीबांना. २१ योग्यता. २२ अधिक. २३ पदरच्या लोकांना. २४ एकमेवाद्वितीयं ब्रह्म—श्रुतिवचन. २५ दुसरें नाहीं. २६ देहाविरहित, निराकार. २७ परब्रह्म.

ब्रह्म नाहीं नवें जुनें । ब्रह्म नाहीं अधिक उणें । उणें भावील तें सुणें । देहबुद्धीचें ॥ ३२ ॥ देहबुद्धीचा निश्चय । करी समाधानाचा क्षय[1] । चुके समाधानसमय । देह-बुद्धि योगें ॥ ३३ ॥ देहाचें जें थोरपण[2] । तेंचि देहबुद्धीचें लक्षण । मिथ्या जाणोन विचक्षण[3] । निंदिती देह ॥ ३४ ॥ देह पांवे जंववरी मरण । तंववरी धरी देहाभि-मान । पुन्हा दाखवी पुनरागमन[4] । देहबुद्धि मागुती[5] ॥ ३५ ॥ देहाचेनि थोरपणें । समाधानासि आलें उणें । देह पडेल कोण्या गुणें । हेंहि कळेना ॥ ३६ ॥ हित आहे देहा-तीत । म्हणोनि निरूपिती संत । देहबुद्धीनें अनहित । होऊंचि लागे ॥ ३७ ॥ सामर्थ्यबळें देहबुद्धि । योगियांस तेहि बाधी । देहबुद्धीचा उपाधि । पैसावो[6] लागे ॥ ३८ ॥ म्हणोन देहबुद्धि झाडे । तरीच परमार्थ घडे । देहबुद्धीनें बिघडे[7] । ऐक्यता ब्रह्मांची ॥ ३९ ॥ विवेक वस्तूकडे वोढी । देहबुद्धि तेथुनि पाडी । अहंता लावूनि निवडी । वेगळे-पणें ॥ ४० ॥ विचक्षणें याकारणें । देहबुद्धि त्यजावी श्रवणें[8] । सत्यब्रह्मीं साचारपणें । मिळोन जावें ॥ ४१ ॥ सत्यब्रह्म तें कवण । ऐसा श्रोता करी प्रश्न । प्रत्युत्तर दे आपण । वक्ता श्रोतयासी ॥ ४२ ॥ ह्मणे ब्रह्म एकचि असे । परी तें बहुविधें[9] भासे । अनुभव देहीं अनो-रिसें[10] । नाना मतीं ॥ ४३ ॥ जें जें जया अनुभवलें । तेंचि तयासि मानलें । तेथेंचि त्याचें विश्वा-सलें । अंतःकरण ॥ ४४ ॥ ब्रह्म नामरूपातीत[11] । असोनि नामें बहुत । निर्मळ निश्चळ निवांत । निजानंद ॥ ४५ ॥ अरूप अलक्ष अगोचर । अच्युत अनंत अपार । अदृश्य अतर्क्य अपार । ऐसीं नामें ॥ ४६ ॥ नादरूप[12] ज्योतिरूप[13] । चैतन्यरूप[14] सत्तारूप । स्वस्वरूप[15] साक्षरूप । ऐसीं नामें ॥ ४७ ॥ शून्य आणि सनातन[16] । सर्वेश्वर आणि सर्वज्ञ । सर्वात्मा जगज्जीवन[17] । ऐसीं नामें ॥ ४८ ॥ सहज[18] आणि सदोदित । शुद्ध बुद्ध[19] सर्वातीत[20] । शाश्वत आणि शब्दातीत । ऐसीं नामें ॥ ॥ ४९ ॥ विशाळ विस्तीर्ण विश्वंभर । विमल वस्तु व्योमाकार[21] । आत्मा परमात्मा परमेश्वर । ऐसीं नामें ॥ ५९ ॥ परमात्मा ज्ञानघन[22] । एकरूप पुरातन[23] । चिद्रूप[24] चिन्मात्र जाण । नामें अनाम्याचीं[25] ॥ ५१ ॥ ऐसीं नामें असंख्यात । परी तो परेश नामातीत[26] । त्याचा करावा[27] निश्चितार्थ । ठेविली नामें ॥ ५२ ॥ तो विश्रांतीचा विश्राम । आदिपुरुष आत्माराम[28] । तें एकचि परब्रह्म । दुसरें नाहीं ॥ ५३ ॥ तेंचि कळायाकारणें । चौदा ब्रह्मांचीं लक्षणें । सांगिजेती तेणें श्रवणें । निश्चय बाणे ॥ ५४ ॥ खोटें निवडितां एकसरें[29] । उरलें तें जाणिजे खरें[30] । चौदा ब्रह्में शास्त्राधारें । बोलिजेती ॥ ५५ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे ससदशके ब्रह्मनिरूपणं नाम द्वितीयः समासः ॥ २ ॥

---

१ कुत्रें. २ नाश. ३ मोठेंपणा, गौरव. ४ विद्वान्. ५ देह मरणपावेपर्यंत. ६ पुनर्जन्म. ७ पुनः ८ देहाहून निराळेंच. ९ पसरूं लागतो. १० बिघडते. ११ शहाण्यानें. १२ अध्यात्म-श्रवण करून. १३ खरेंपणानें. १४ अनेक प्रकारचें. १५ वेगवेगळें. १६ नाम आणि रूप यांच्या पलीकडचें. १७ ध्वनिरूप. १८ प्रकाशरूप. १९ ज्ञानरूप. २० आपलेंच मूळस्वरूप. २१ अनादिसिद्ध. २२ सर्वव्यापी. २३ सर्व जगताचें पालन करणारा. २४ स्वतःसिद्ध २५ ज्ञानस्वरूप. २६ सर्वांच्या पलीकडील. २७ आकाशस्वरूप. २८ ज्ञानपूर्ण. २९ जुना, अनादि. ३० नामरहि-तांची. ३१ नामापलीकडील. ३२ करावया, करण्याकरितां. ३३ स्वस्वरूपीं रममाण होणारा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ श्रोतीं व्हावें सावधान । आतां सांगतों ब्रह्मज्ञान । जेणें होय समाधान । साधकांचें ॥ १ ॥ रत्नें साधायाकारणें । मृत्तिका लागे एकवटणें । चौदा ब्रह्मांचीं लक्षणें । जाणिजे तैसीं ॥ २ ॥ पदार्थेविण संकेत । द्वैतावेगळा दृष्टांत । पूर्वपक्षेविण सिद्धांत । बोलतांचि नये ॥ ३ ॥ आधीं मिथ्या उभारावें । मग तें ओळखोन सांडावें । पुढें सत्य तें स्वभावें । अंतरीं बाणे ॥ ४ ॥ म्हणोन चौदा ब्रह्मांचा संकेत । बोलिला कळावया सिद्धांत । येथें श्रोतीं सावचित्त । क्षण एक असावें ॥ ५ ॥ पाहिलें तें शब्दब्रह्म । दुजे ओमित्येकाक्षर ब्रह्म । तिसरें खंब्रह्म । बोलिली श्रुति ॥ ६ ॥ चौथें जाण सर्वब्रह्म । पांचवें चैतन्यब्रह्म । सहावें सत्ताब्रह्म । साक्षिब्रह्म सातवें ॥ ७ ॥ आठवें सगुण ब्रह्म । नववें निर्गुण ब्रह्म । दाहावें वाच्यब्रह्म । जाणावें पैं ॥ ८ ॥ अनुभव तें अकरावें । आनंदब्रह्म तें बारावें । तदाकार तें तेरावें । चौदावें अनिर्वाच्य ॥ ९ ॥ ऐसीं हीं चौदा ब्रह्में । यांचीं निरूपिलीं नामें । आतां स्वरूपाचीं वर्में । संकेतें दाऊं ॥ १० ॥ अनुभवेंविण भ्रम । या नांव शब्दब्रह्म । आतां ओमित्येकाक्षर ब्रह्म । तें एकाक्षर ॥ ११ ॥ खं शब्दें आकाशब्रह्म । महदाकाश व्यापक धर्म । आतां बोलिजे सूक्ष्म । सर्वब्रह्म ॥ १२ ॥ पंचभूतांचें कुवेडें । जें जें तत्व दृष्टीस पडे । तें तें ब्रह्माचि चोखडें । बोलिजेत आहे ॥ १३ ॥ या नांव सर्वब्रह्म । श्रुतिआश्रयाचें वर्म । आतां चैतन्यब्रह्म । बोलिजेल ॥ १४ ॥ पंचभूतादि मायेतें । चैतन्याचि चेतवितें । म्हणोनियां चैतन्यातें । चैतन्यब्रह्म बोलिजे ॥ १५ ॥ चैतन्यास ज्याची सत्ता । तें सत्ताब्रह्म तत्त्वतां । तये सत्तेस जाणता । या नांव साक्षिब्रह्म ॥ १६ ॥ साक्षित्व जयापासूनी । तेंहि ओंकळिलें गुणीं । सगुण ब्रह्म हे वाणी । तयासि वेदे ॥ १७ ॥ जेथें नाहीं गुणवार्ता । तें निर्गुण ब्रह्म तत्त्वतां । वाच्यब्रह्म तेंहि आतां । बोलिजेल ॥ १८ ॥ जें वाचे बोलतां आलें । तें वाच्यब्रह्म बोलिलें । अनुभवासि कथिलें । नवचे सर्वथा ॥ १९ ॥ या नांव अनुभवब्रह्म । आनंदवृत्तीचा धर्म । परंतु याचेंहि वर्म । बोलवेना ॥ २० ॥ ऐसें हें ब्रह्म आनंद । तदाकार तें अभेद । अनिर्वाच्यें संवाद । तुटोनि गेला ॥ २१ ॥ ऐसीं हीं चौदा ब्रह्में । निरूपिलीं अनुक्रमें । साधकें पाहेतां भ्रमें । बाधिजेना ॥ २२ ॥ ब्रह्म जाणावें शाश्वत । माया तेचि अशाश्वत । चौदा ब्रह्मांचा सिद्धांत । होईल आतां ॥ २३ ॥ शब्दब्रह्म तें शाब्दिक । अनुभवेंविण मायिक । शाश्वताचा विवेक । तेथें नाहीं ॥ २४ ॥ जेथें क्षर ना अक्षर । तेथें कैंचें ओमित्येकाक्षर । शाश्वताचा विचार । तेथें न दिसे ॥ २५ ॥ खंब्रह्म ऐसें वचन । तरी शून्यातें नाशी ज्ञान । शाश्वताचें अधिष्ठान । तेथें न दिसे ॥ २६ ॥ सर्वत्रांस आहे अंत । सर्वब्रह्म नाशवंत । प्रळय

---

१ माती. २ खूण. ३ ओंकाररूप. ४ आकाशब्रह्म. ५ अस्तिस्वरूप ब्रह्म. ६ शब्दांनी बोलण्याजोगें. ७ तत्स्वरूप. ८ सांगतां न येणारे. ९ थोडक्यांत. १० गुंतागुंत. ११ चिच्छक्ति. १२ जागृत करतें. १३ आवरिलें. १४ न सांगतां येण्या जोगा. १५ साधकानें या चौदा ब्रह्मांचा विचार केला असतां त्यास भ्रमाची बाधा होणार नाहीं. १६ नाश. १७ ठिकाण.

बोलिला निश्चित । वेदांतशास्त्रीं ॥ २७ ॥ ब्रह्मप्रळय मांडेल जेथें । भूताम्वेय कैंचा तेथें । म्हणोनियां सर्वब्रह्मातें । नाश आहे ॥ २८ ॥ अचळासि आणी चळण । निर्गुणास लावितां गुण । साकारास विचक्षण । मानीतना ॥ २९ ॥ जें निर्माण पंचभूत । तें प्रत्यक्ष नाशवंत । सर्वब्रह्म हे मात । घडे कैंवी ॥ ३० ॥ असो आतां हें बहुत । सर्वब्रह्म नाशवंत । वेगळेपणास अंत । पाहणें कैंचें ॥ ३१ ॥ आतां जयास चेतवावें । तोंचि मायिक स्वभावें । तेथें चैतन्याच्या नांवें । नाश आला ॥ ३२ ॥ परिवारेंविण सत्ता । ते सत्ता नव्हे तत्त्वतां । पदार्थेविण साक्षता । तेहि मिथ्या ॥ ३३ ॥ सगुणास नाश आहे । प्रत्यक्षास प्रमाण काये । सगुण ब्रह्म निश्चयें । नाशवंत ॥ ३४ ॥ निर्गुण ऐसें जें नांव । त्या नांवास कैचा ठाव । गुणेंविण गौरव । येईल कैंचें ॥ ३५ ॥ माया जैसें मृगजळ । ऐसें बोलतां सकळ । कां तें कल्पनेचें आभाळ । नाथिलेंचि ॥ ३६ ॥ ग्रामो नास्ति कुतः सीमा । जन्मेविण जीवात्मा । अद्वैतासि उपमा । द्वैताची ॥ ३७ ॥ मायेविरहित सत्ता । पदार्थाविण जाणता । अविद्येविण चैतन्यता । कोणास आली ॥ ३८ ॥ सत्ता चैतन्यता साक्षी । सर्वहि गुणांचिये पाशीं । ठायीचें निर्गुण त्यासी । गुण कैंचे ॥ ३९ ॥ ऐसें जें गुणरहित । तेथें नामाचा संकेत । तोचि जाणावा अशाश्वत । निश्चयेंसी ॥ ४० ॥ निर्गुण ब्रह्मासि † संकेतें । नामें ठेविलीं बहुतें । तें वाच्यब्रह्म त्यातें । नाश आहे ॥ ४१ ॥ आनंदाचा अनुभव । हाहि वृत्तीचाच भाव । तदाकारीं ठाव । वृत्तीस नाहीं ॥ ४२ ॥ अनिर्वाच्यें याकारणें । संकेत वृत्तीच्या गुणें । तया संकेतास उणें । निवृत्तीनें आणिलें ॥ ४३ ॥ अनिर्वाच्य ते निवृत्ति । तोचि उन्मनीची स्थिति । निरुपाधि विश्रांति । योगियांची ॥ ४४ ॥ वस्तु जे कां निरुपाधि । तेचि सहज समाधि । जेणें तुटे आधिव्याधि । भवदुःखाची ॥ ४५ ॥ जो उपाधीचा अंत । तोचि जाणावा सिद्धांत । सिद्धांत आणि वेदांत । धादांत आत्मा ॥ ४६ ॥ असो ऐसें जें शाश्वत ब्रह्म । जेथें नाहीं मायाभ्रम । अनुभवी जाणें वर्म । स्वानुभवें ॥ ४७ ॥ आपुलेनि अनुभवें । कल्पनेसि मोडावें । मग सुकाळीं पडावें । अनुभवाचे ॥ ४८ ॥ निर्विकल्पासि कल्पावें । कल्पना मोडे स्वभावें । मग नसोनि असावें । कल्पकोटी ॥ ४९ ॥ कल्पनेचें एक बरें । मोहरितांच मोहरे । स्वरूपीं घालितां भरे । निर्विकल्पीं ॥ ५० ॥ निर्विकल्पासी कल्पितां । कल्पनेची नुरे वार्ता । निःसंगास भेटों जातां । निःसंग होईजे ॥ ५१ ॥ पदार्थाऐसें ब्रह्म नव्हे । * मा तें हातीं धरूनि द्यावें । अलो हें अनुभवावें । सद्गुरुमुखें

---

१ पृथ्वी, आप इत्यादि पंच भूतांचा संबंध. २ चेतना द्यावी, जीववावें. ३ बरड जमिनीवर सूर्यकिरणांच्या ठायीं जलाची भ्रांति होते, ते मिथ्या जल. ४ खोटेंच. ५ गांवच नाहीं तर सीमा कोठून. ६ अज्ञानावांचून. ७ ज्ञान. ८ मूळचें, स्वभावतः. † खूण, बोली. ९ ब्रह्मानुभवांत. १० सांगतां येण्यास कठीण, अवर्णनीय. ११ लय, मोक्ष. १२ पांचव्या अवस्थेची, आनंदस्वरूप स्थितीची, निर्विकल्प समाधीची. १३ मानसीक आणि शारीरिक व्यथा. १४ हेतुवाद, युक्तिवाद. १५ आत्मस्वरूप. १६ कोट्यावधि कल्प (कल्प=ब्रह्मदेवाचा एक दिवस), अनंत कालपर्यंत. १७ पुढें सन्मुख करितांच. १८ सन्मुख होतें. १९ ब्रह्मी * तर, मग कीं.

॥ ५२ ॥ पुढें कथेचा अन्वये । केलाचि करूं निश्चये । जेणें अनुभवास ये । केवळ ब्रह्म ॥ ५३ ॥ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सप्तमदशके चतुर्दशब्रह्मनिरूपणं नाम तृतीयः समासः ॥ ३ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ब्रह्म नभाहूनि निर्मळ । पाहतां तैसेंचि पोकळ । अरूप आणि विशाळ । मर्यादेवेगळें ॥ १ ॥ एकवीस स्वर्ग सप्त पाताळ । मिळोन एक ब्रह्मगोळ । ऐसें अनंत तें निर्मळ । व्यापून असे ॥ २ ॥ अनंत ब्रह्मांडांखालतें । अनंत ब्रह्मांडांवरुतें । तेणेंविण स्थळ रितें[3] । अणुमात्र नाहीं ॥ ३ ॥ जळीं स्थळीं काष्ठीं पाषाणीं । ऐशी वदे लोकवाणी । तेणेंविण रिता प्राणी । एकहि नाहीं ॥ ४ ॥ जलचरांस जैसें जळ । बाह्याभ्यंतरीं निखळ । तैसें ब्रह्म हें केवळ । जीवमात्रांसी ॥ ५ ॥ जळावेगळा ठाव आहे । ब्रह्माबाहेरी जातां नये । म्हणोनि उपमा न साहे । जळाची तया ॥ ६ ॥ आकाशाबाहेरी पळों जातां । पुढें आकाशचि तत्त्वतां । तैसा तया अनंता । अंतचि नाहीं ॥ ७ ॥ परी जें अखंड भेटलें । सर्वांगास लिगाडिलें । अतिनिकटपणीं चोरलें[6] । सकळांसि जें ॥ ८ ॥ तयामध्यें चि असिजे । परी तयासि नेणिजे । उमजे भास, नुमजे । परब्रह्म तें ॥ ९ ॥ आकाशामध्यें आभाळ । तेणें आकाश वाटे डहुळ । परी तें मिथ्या, निवळ । आकाशाचि असे ॥ १० ॥ न्योहार देतां आकाशीं । चक्रें दिसतीं डोळ्यांशीं । तैसें दृश्य ज्ञानियांशीं । मिथ्यारूप ॥ ११ ॥ मिथ्याचि परी आभासे । निद्रितासी स्वप्न जैसें । जागा झालिया आपैसें[12] । बुझों लागे ॥ १२ ॥ तैसें आपुलेनि अनुभवें । ज्ञानें जागृतीस यावें । मग मायिक स्वभावें । कळों लागे ॥ १३ ॥ आतां असो हें कुवाडें । जें ब्रह्मांडापलीकडे । तेंचि आतां ‡ निवाडें । उमजोनि दावूं ॥ १४ ॥ ब्रह्म ब्रह्मांडीं कालवलें । पदार्थमात्रासि व्यापूनि ठेलें । सर्वांमध्यें विस्तारलें । अंशमात्रें ॥ १५ ॥ ब्रह्मामध्यें सृष्टि भासे । सृष्टीमध्यें ब्रह्म असे । अनुभव घेतां आभासे । अंशमात्रें ॥ १६ ॥ अंशमात्रें सृष्टिभीतरीं । बाहेरी मर्यादा कोण करी । सगळें ब्रह्म ब्रह्मांडोदरीं । मोहीयेलें कैसें ॥ १७ ॥ ओसंतीमध्ये आकाश । सगळें सांठवतां प्रयास । म्हणोन तयाचा अंश । बोलिजे तो ॥ १८ ॥ ब्रह्म तैसें कालवलें । परी तें नाहीं हालवलें । सर्वांत परी संचलें । संचलेपणें ॥ १९ ॥ पंचभूतीं असे मिश्रित । परंतु तें पंचभूतातीत । * पंकी आकाश अलिप्त । असोनि जैसें ॥ २० ॥ ब्रह्मास दृष्टांत न घडे । बुझावया देणें पडे । परि दृष्टांतीं साहित्य[19] पडे । विचारितां[21] आकाश ॥ २१ ॥ "खंब्रह्म" ऐसी श्रुति । गगनसदृश हे स्मृति । म्हणोन ब्रह्मास दृष्टांतीं । आकाश घडे ॥ २२ ॥ काळिमा नसतां पितळ । मग तें सोनेंचि केवळ । शून्यत्व नसतां निर्मळ ।

---

१ संबंध. २ आकाशाहून. ३ रिकामे. ४ केवळ. ५ जागा. ६ सोसत नाहीं, योग्य नाहीं. ७ चिकटलें. ८ कोणाकडूनही जाणलें जात नाहीं. ९ समजलेसें वाटतें, तो मिथ्याभ्रम पण वास्तविक तें समजत नाहीं. १० मळकट. ११ अवलोकन. १२ आपोआप. १३ समजूं लागतें. १४ कूट, कोडें. ‡ स्पष्ट. १५ खरे समजावून. १६ नावेल. १७ वैष्णवांचें तीर्थ ठेवण्याचें भांडें. १८ चिखलामध्यें. * चिखलांत. १९ समजण्याकरितां. २० सामुग्री, कांहीं सादृश्य. २१ विचार करितां. २२ आकाशासारखें.

आकाश ब्रह्म ॥ २३ ॥ म्हणोन ब्रह्म जैसें गगन । आणि माया जैसा † पवन । आढळे परी दर्शन । नव्हे त्यांचें ॥ २४ ॥ शब्दसृष्टीची रचना । होत जात क्षणक्षणा । परंतु ते स्थिरावेना । वायूऐसी ॥ २५ ॥ असो ऐसी माया मायिक । शाश्वत तें ब्रह्म एक । पाहों जातां अनेक । व्यापून असे ॥ २६ ॥ पृथ्वीसि भेदूनि आहे । परी तें ब्रह्म कठिण नव्हे । दुजी उपमा न साहे । तया मृदुत्वासी ॥ २७ ॥ पृथ्वीहूनि मृदु जळ । जळाहूनि तो अनळ । अनळाहूनि कोमळ । वायु जाणावा ॥ २८ ॥ वायुहूनि तें गगन । अत्यंताचि मृदु जाण । गगनाहूनि मृदु पूर्ण । ब्रह्म जाणावें ॥ २९ ॥ वज्रास असे भेदिलें । परी मृदुत्व नाहीं गेलें । उपमेरहित संचलें । कठिण ना मृदु ॥ ३० ॥ पृथ्वीमध्यें व्यापूनि असे, । पृथ्वी नाशे, तें न नासे । जळ शोषे, तें न शोषे, । जळीं असोनी ॥ ३१ ॥ तेजीं असे, परी जळेना । पवनीं असे, परी चळेना । गगनीं असे, परी गळेना । परब्रह्म तें ॥ ३२ ॥ शरीरीं अवघें व्यापिलें । परी तें नाहीं आढळलें । जवळीच दुरावलें । नवल कैसें ॥ ३३ ॥ सन्मुखाचि चहूंकडे । तयामध्यें पहाणें घडे । बाह्याभ्यंतरीं रोकडें । सिद्धचि आहे ॥ ३४ ॥ तयामध्येंचि आपण । आपणा सबाह्य तें जाण । दृश्यावेगळी खूण । गगनासारिखी ॥ ३५ ॥ कांहीं नाहींसें वाटलें । तेथेंचि तें कोंदाटलें । जैसें न दिसें आपुलें । आपणासि धन ॥ ३६ ॥ जो जो पदार्थ दृष्टीस पडे । तें त्या पदार्थापैलीकडे । अनुभवें हें कुवाडें । उकलावें ॥ ३७ ॥ मागें पुढें आकाश । पदार्थेविण जो पैसे । पृथ्वीविण भकाश । एकरूप ॥ ३८ ॥ जें जें रूप आणि नाम । तो तो नाथिलाचि भ्रम । नामरूपातीत वर्म । अनुभवी जाणती ॥ ३९ ॥ नभीं धूम्राचें डोंगर । उचलती थोर थोर । तैसें दावी वोडंबर । मायादेवी ॥ ४० ॥ ऐशी माया अशाश्वत । ब्रह्म जाणावें शाश्वत । सर्वांठायीं सदोदित । भरलें असे ॥ ४१ ॥ पोथी वाचूं जातां पाहे । मात्रकांमध्यें भरलें आहे । नेत्रा रिघोनियां राहे । मृदुपणें ॥ ४२ ॥ श्रवणें शब्द ऐकतां । मनें विचार पाहतां । मनसबाह्य तेथवेतां । परब्रह्म तें ॥ ४३ ॥ चरणें चालतां मार्गीं । जें आढळे सर्वांगीं । करें घेतां वस्तुलागीं । आडवें ब्रह्म ॥ ४४ ॥ असो इंद्रियसमुदाव । तयामध्यें वर्ते सर्व । जाणों जातां मोडे हावें । इंद्रियांची ॥ ४५ ॥ जें जवळींच असे । पाहों जातां न दिसे । न दिसोन वसे । कांहीं एक ॥ ४६ ॥ जें अनुभवेंचि जाणावें । सृष्टीचेनि अभावें । आपुलेनि स्वानुभवें । पाविजे ब्रह्म ॥ ४७ ॥ ज्ञानदृष्टीचें देखणें । चर्मदृष्टीं पाहों नेणें । अंतर्वृत्तीचिये खुणें । अंतरवृत्तिसाक्ष ॥ ४८ ॥ जाणे ब्रह्म जाणे माया । जाण अनुभवाच्या ठाया । ते एक जाणावी तुर्या । सर्वसाक्षिणी ॥ ४९ ॥ साक्षित्व वृत्तीचें कारण । उन्मनी तें निवृत्ति जाण ।

---

१ आकाश. † वायु. २ तेज, अग्नि. ३ जवळ असून दूर असल्यासारखे झाले. ४ बाहेर व आंत. ५ कोडे, कूट. ६ सोडवावें. ७ विस्तार, जागा. ८ ओसाड. ९ खोटाच. १० खूण. ११ गारुडी विद्या. १२ नाश पावणारी. १३ अक्षरांमध्ये. १४ कानानें. १५ खरोखर. १६ सोस, नाद. १७ डोळ्यांनीं. १८ अंतर्ज्ञानाच्या. १९ जागृति, स्वप्न, सुषुप्ति यां पुढची चौथी ज्ञानावस्था. २० वृत्तिरहित स्थिति. २१ मोक्ष.

तेथें विरे[1] जाणपण । विज्ञान[2] तें ॥ ५० ॥ जेथें अज्ञान सरे । ज्ञान तेंहि नुरें । विज्ञान-वृत्ति मुरे । परब्रह्मीं ॥ ५१ ॥ ऐसें ब्रह्म शाश्वत । जेथें कल्पनेसि अंत । योगिजनांचा एकांत । अनुभवें जाणावें ॥ ५२ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सप्तमदशके विमलब्रम्हानिरूपणं नाम चतुर्थः समासः ॥ ४ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ केवळ ब्रह्म जे बोलिलें । तें अनुभवास आलें । आणि मायेचेंहि लागलें । अनुसंधानें[3] ॥ १ ॥ ब्रह्म अंतरीं प्रकाशे । आणि माया ही प्रत्यक्ष दिसे । आतां हें द्वैत निरसे । कवणेपरी ॥ २ ॥ तरी आतां सावधान । एकाग्र करूनियां मन । माया ब्रह्म हें कवण । जाणताहे ॥ ३ ॥ सत्य ब्रह्माचा संकल्प । मिथ्या मायेचा विकल्प । ऐसिया द्वैताचा जल्प[4] । मनचि करी ॥ ४ ॥ जाणे ब्रह्म जाणे माया । ते एक जाणावी तुर्या । सर्व जाणे म्हणोनियां सर्वसाक्षिणी ॥ ५ ॥ ऐक तुर्येचें लक्षण । जेथें सर्व जाणपण । सर्वचि नाहीं कवण । जाणेल गा ॥ ६ ॥ संकल्पविकल्पाची सृष्टि । झाली मनाचिये पोटीं । तें मनचि मिथ्या शेवटीं । साक्षी कवण ॥ ७ ॥ साक्षित्व चैतन्यत्वसत्ता[5] । हे गुण ब्रह्माचिया माथां । आरोपिले जाण वृथा । मायागुणें ॥ ८ ॥ घट-मठांचेनि गुणें । त्रिविध[6] आकाश हें बोलणें । मायाचेनि खरेपणें । गुण ब्रह्मीं ॥ ९ ॥ जंव खरेपण मायेसी । तंवचि साक्षित्व ब्रह्मासी । * माये[7] अविद्येचे निरासीं[8] । द्वैत कैंचें ॥ १० ॥ म्हणोन सर्वसाक्षी मन । तेंचि झालिया उन्मन[9] । मग तुर्यारूप ज्ञान । तें मावळोन गेलें ॥ ११ ॥ जयास द्वैत भासलें । तें मन उन्मन झालें । द्वैताद्वैतांचें तुटलें । अनुसंधान[10] ॥ १२ ॥ एवं द्वैत आणि अद्वैत । होय वृत्तीचा † संकेत । वृत्ति झालिया निवृत्ति[11] । द्वैत कैंचें ॥ १३ ॥ वृत्तिरहित जें ज्ञान । तेंचि पूर्ण समाधान । जेथें तुटे अनुसंधान[12] । मायाब्रह्मीचें ॥ १४ ॥ मायाब्रह्म ऐसा हेत[13] । मनें कल्पिला संकेत । ब्रह्म कल्पनेरहित । जाणती ज्ञानी ॥ १५ ॥ जें मनबुद्धिअगोचर । जें कल्पनेहून पर । तें अनुभवितां साचार[14] । द्वैत कैंचें ॥ १६ ॥ द्वैत पाहतां ब्रह्म नसे । ब्रह्म पाहतां द्वैत नासे । द्वैताद्वैत भासे । कल्पनेसी ॥ १७ ॥ कल्पना माया निवारी । कल्पना ब्रह्म थोवरी[15] । संशय धरी आणि ‡ वारी । तेहि कल्पना ॥ १८ ॥ कल्पना करी बंधन । कल्पना दे समाधान । ब्रह्मीं लावी अनुसंधान । तेहि कल्पना ॥ १९ ॥ कल्पना द्वैताची माता । कल्पना ज्ञानिसि[16] तत्त्वतां । बद्धता आणि मुक्तता । कल्पनागुणें[17] ॥ २० ॥ कल्पना अंतरीं सबळ । नसते दावी ब्रह्मगोळ । क्षणैक[18] एकांत निर्मळ । स्वरूप कल्पी ॥ २१ ॥ क्षणएक धोका वाहे । क्षणएक स्थिर राहे । क्षणएक पाहे । विस्मित होऊनी ॥ २२ ॥ क्षणा एकांतें उमजे । क्षणा एकांतें निवुंजे[19] । नाना विकार करिजे । ते कल्पना जाणावी ॥ २३ ॥ कल्पना जन्माचें मूळ । कल्पना भक्तीचें फळ । कल्पना तेचि केवळ । मोक्षदात्री[20] ॥ २४ ॥ असो ऐसी हे कल्पना ।

---

१ विरघळतें. २ अनुभवयुक्तज्ञान. ३ संबंध. ४ दुजेपणाचा. ५ बडबड. ६ अस्तित्व. ७ तीन प्रकारचें, (१ महदाकाश २ मठाकाश ३ घटाकाश.) * मग. ८ ह्या. ९ अज्ञानाचे. १० नाशी, नाश झाला असतां. ११ मनोधर्मरहित. १२ संबंध. † खूण, बोली. १३ नाहींशी. १४ खरेपणानें. १५ स्थिर करी. ‡ घालविते. १६ ज्ञान. १७ कल्पनेमुळें. १८ एका क्षणांत. १९ घाबरून जाणें. २० मोक्षाची प्राप्ति करून देणारी.

साधनें दे समाधाना । येन्हवीं हे पतना । मूळाचि कीं ॥ २५ ॥ म्हणोनि सर्वांचें मूळ । ते हे कल्पनाचि केवळ । इचें कोलिया निर्मूळ । ब्रह्मप्राप्ति ॥ २६ ॥ श्रवण आणि मनन । निजध्यासें समाधान । मिथ्या कल्पनेचें भान । उडोनि जाते ॥ २७ ॥ शुद्धब्रह्माचा निश्चय । करी कल्पनेचा जय । निश्चितार्थें संशय । तुटोनि जाय ॥ २८ ॥ मिथ्या कल्पनेचें कोडें[1] । कैसें राहे साचापुढें । जैसें सूर्याचेनि उजेडें । नासे तम ॥ २९ ॥ तैसे ज्ञानाचेनि प्रकाशें । मिथ्या कल्पना हे नासे । मग हे तुटे आपैसें । द्वैतानुसंधान ॥ ३० ॥ कल्पनेनें कल्पना उडे । जैसा मृगें मृग सांपडे । कां शरें शर आतुडे । आकाश-मार्गीं ॥ ३१ ॥ शुद्ध कल्पनेचें बळ । झालिया नासे सबळ । हेंचि वचन प्रांजळ । सावध ऐका ॥ ३२ ॥ शुद्ध कल्पनेची खूण । स्वयें कल्पिजे निर्गुण । स्वस्वरूपीं विस्मरण । पडोंचि नेदी ॥ ३३ ॥ सदा स्वरूपानुसंधान । करी द्वैताचें निरसन । अद्वैत निश्चयाचें ज्ञान । तेचि शुद्ध कल्पना ॥ ३४ ॥ अद्वैत कल्पी ते शुद्ध । द्वैत कल्पी तें अशुद्ध । अशुद्ध तेंचि प्रसिद्ध । सबळ जाणावें ॥ ३५ ॥ शुद्ध कल्पनेचा अर्थ । अद्वैताचा निश्चितार्थ । आणि सबळ तें व्यर्थ । द्वैत कल्पी ॥ ३६ ॥ अद्वैतकल्पना प्रकाशे । तेच क्षणीं द्वैत नासे । द्वैतासरसी निरसे । सबळकल्पना ॥ ३७ ॥ कल्पनेनें कल्पना सरे । ऐसे जाणावें चतुरें । सबळ गेलिया नंतरें । शुद्ध उरली ॥ ३८ ॥ शुद्ध कल्पनेचें रूप । तेंचि जे कल्पी स्वरूप । कल्पितां तद्रूप । होय आपण ॥ ३९ ॥ कल्पनेसि मिथ्यात्व आलें । सहजचि तद्रूप झालें । आत्मनिश्चयें नाशिलें । कल्पनेसी ॥ ४० ॥ जेचि क्षणीं निश्चय चळे । तेचि क्षणीं द्वैत उफाळे । जैसा अस्तमानीं प्रबळे । अंधकार ॥ ४१ ॥ तैसें ज्ञान होतां मलिन । अज्ञान प्रबळे जाण । याकारणें श्रवण । अखंड असावें ॥ ४२ ॥ आतां असो हें बोलणें झालें । आशंका फेडूं एका बोलें । जयास द्वैत भासलें । तें तूं नव्हेसी सर्वथा ॥ ४३ ॥ मागील आशंका फिटली । इतुकेन हे कथा संपली । पुढें वृत्ति सावध केली । पाहिजे श्रोतीं ॥ ४४ ॥ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सप्तमदशके द्वैतकल्पनानिरसननिरूपणं नाम पंचमः समासः ॥ ५ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ अद्वैत ब्रह्म निरूपिलें । जें कल्पनेरहित संचलें । क्षणएक तदाकार केलें । मज या निरूपणें ॥ १ ॥ परी म्यां तदाकार व्हावें । ब्रह्मचि होऊन असावें । पुनः संसारास न यावें । चंचळपणें सर्वथा ॥ २ ॥ कल्पनेरहित जें सुख । तेथें नाहीं संसारदुःख । म्हणोनि तेंचि एक । होऊन असावें ॥ ३ ॥ ब्रह्मचि होइजे श्रवणें । पुन्हा वृत्तीवरी लागे येणें । ऐसे सदा येणें जाणें । चुकेना कीं ॥ ४ ॥ मनें अंतरीं जावें क्षणक्षण ब्रह्मचि व्हावें । पुन्हा तेथून कोसळावें । वृत्तीवरी मागुती ॥ ५ ॥ प्रत्यावृत्ति सैरावैरा । किती करूं येरझारा । पायीं लावूनियां दोरा । कीटकें जैसा ॥ ॥ ६ ॥ उपदेश-काळीं तदाकार । होतां पडे हें शरीर । अथवा नेणें आपपर । ऐसें जाहलें पाहिजे ॥ ७ ॥

---

१ कूट. कठीणपणा. २ खऱ्यापुढें. ३ काळोख, अंधकार. ४ आपोआप. ५ द्विधाभावाचा संबंध. ६ हातीं लागतो. ७ शबल, उपाधियुक्त. ८ परब्रह्मस्वरूपी. ९ नाश. १० शबल. ११ विस्तार पावतें, वाढतें. १२ तद्रूप, परब्रह्मस्वरूप. १३ पुनरावृत्ति. १४ जाणें येणें. १५ भुंगा. १६ आपण व दुसरा.

ऐसें नसतां जें बोलणें । तेंचि वाटे लाजिरवाणें । ब्रह्म होऊन संसार करणें । हेंहि विपरीत दिसे ॥ ८ ॥ जो स्वयें ब्रह्मचि झाला । तो मागुता कैंसा आला । ऐसें ज्ञान माझें मजला । प्रशस्त न वाटे ॥ ९ ॥ ब्रह्म होऊनि जावें । कां तें संसारींच असावें । दोहींकडे भेरंगळावें । किती म्हणोनि ॥ १० ॥ निरूपणीं ज्ञान प्रबळे । उठोन जातां तें मावळे । मागुता काम क्रोध खवळे । † ब्रह्मरूपासी ॥ ११ ॥ ऐसा कैसा ब्रह्म झाला । दोहींकडे अंतरला । वोडंगम्तपणेंचि गेला । संसार त्याचा ॥ १२ ॥ घेतां ब्रह्मसुखाची गोडी । * संसारिक मागें वोढी । संसार करितां आवडी । ब्रह्मीं उपजे मागुती ॥ १३ ॥ ब्रह्मसुख नेलें संसारें । संसार गेला ज्ञानद्वारें । दोन्हीं अपुरीं, पुरें । एकहि नाहीं ॥ १४ ॥ याकारणें माझें चित्त । चंचळ झालें दुश्चित । काय करणें निश्चत । एकहि नाहीं ॥ १५ ॥ ऐसा श्रोता करी विनंति । आतां रहावें कोणे रीतीं । म्हणे अखंड माझी मति । ब्रह्माकार नाहीं ॥ १६ ॥ आतां यांचें प्रत्युत्तर । वक्ता देईल सुंदर । श्रोतीं व्हावें § निरुत्तर । क्षणएक आतां ॥ १७ ॥ ब्रह्मचि होऊन जे पडिले । तेचि मुक्तिपदास गेले । येर ते काय बुडाले । व्यासादिक ॥ १८ ॥ श्रोता विनंति करी पुढती । शुकों मुक्तो वामदेवो वा हे श्रुति । दोघेचि मुक्त आदि अंतीं । बोलत असे ॥ १९ ॥ वेदें बद्ध केलें सर्व । मुक्त शुक वामदेव । वेदवचनीं अभाव । कैसा धरावा ॥ २० ॥ ऐसा श्रोता वेदाधारें । देता झाला प्रत्युत्तरें । दोघेचि मुक्त अत्यादरें । प्रतिपार्थ केलें ॥ २१ ॥ वक्ता बोले याउपरी । दोघेचि मुक्त सृष्टीवरी । ऐसें बोलतां उरी । कोणास आहे ॥ २२ ॥ बहु ऋषी बहु मुनी । सिद्ध योगी आत्मज्ञानी । झाले पुरुष समाधानी । असंख्यात ॥ २३ ॥ श्लोक ॥ प्रह्लादनारदपराशरपुंडरीक । व्यासांबरीषशुकशौनकभीष्मदाल्भ्यान् ॥ रुक्मांगदार्जुनवसिष्ठविभीषणादीन् । पुण्यानिमान्परमभागवतान्स्मरामि ॥ १ ॥ कविर्हरिरंतरिक्षः प्रबुद्धः पिप्पलायनः ॥ आविर्होत्रोऽथद्रुमिलश्चमसः करभाजनः ॥ २ ॥ यांही वेगळे थोर थोर । ब्रह्मा विष्णु महेश्वर । आदिकरून दिगंबर । विदेहादिक ॥ २४ ॥ शुक वामदेव मुक्त झाले । येर हे अवघेच बुडाले । या वचना विश्वासले । ते पडतमूर्ख ॥ २५ ॥ तरी वेद कैसा बोलिला । तो काय तुम्हीं मिथ्या केला । ऐकोन वक्ता देता झाला । प्रत्युत्तर ॥ २६ ॥ वेद बोलिला पूर्वपक्ष । मूर्ख तेथेंचि लावी लक्ष । साधु आणि व्युत्पन्न दक्ष । त्यास हें न माने ॥ २७ ॥ तथापि हें जरी मानलें । तरी वेदसामर्थ्य बुडालें । वेदाचेनि उद्धरिलें । नवचे कोणा ॥ २८ ॥ वेदाअंगी सामर्थ्य नसे । तरी या वेदासि कोण पुसे । म्हणोनि वेदीं सामर्थ्य नसे । जन उद्धरावया ॥ २९ ॥ वेदाक्षर ‡ घडे ज्यासी । तो बोलिजे पुण्यराशि । म्हणोनि वेदीं सामर्थ्यासी । काय उणें ॥ ३० ॥ वेद शास्त्र पुराण । भाग्यें झालिया श्रवण । तेणें होइजे पावन । हें बोलती साधु ३१ ॥ श्लोक अथवा श्लोकार्ध । नाहीं तरी श्लोकपाद । श्रवण होतां एक शब्द ।

---

१ घोटाळावें † ब्रह्मरूप झालेल्याचे ठिकाणी.२ ओढाताणीने. * संसारिक सुख. § स्वस्थ, स्थिर.३ शुक मुक्त किंवा वामदेव मुक्त. ४ वेद. ५ अश्रद्धा. ६ प्रतिपादण्याला योग्य. ७ स्थिति, ठिकाण. ८ दिशारूपवस्त्रें परिधान करणारे. ९ जनक वगैरे. १० विद्वान्. ११ हुशार. ‡ प्राप्त होतें, येतें. १२ श्लोकाचा चरण.

नाना दोष जाती ॥ ३२ ॥ वेदशास्त्रीं पुराणीं । ऐशा वाक्यांच्या ओयणी । अगाध महिमा व्यासवाणी । वदोनि गेली ॥ ३३ ॥ एकाक्षर होतां श्रवण । तात्काळाचि होइजे पावन । ऐसें ग्रंथाचें महिमान । ठायीं ठायीं बोलिलें ॥ ३४ ॥ † दोहींवेगळा तिजा[1] नुद्धरे । तरी महिमा कैंचा उरे । असे हें जाणिजे चतुरें । येरां गाथाँगोवी ॥ ३५ ॥ वेदशास्त्रें पुराणें । कैशीं होतीं अप्रमाणें । दोघांवांचूनि तिसरा कोणें[2] । उद्धरावा ॥ ३६ ॥ म्हणसी काष्ठ होऊनि पडिला । तोचि एक मुक्त झाला । शुक तोहि अनुवादला[3] । नाना निरूपणें ॥ ३७ ॥ शुक मुक्त ऐसें वचन । वेद बोलिला हें प्रमाण । परी तो नव्हता अचेतन[4] । ब्रह्माकार ॥ ३८ ॥ अचेतन ब्रह्माकार । असतां शुक योगीश्वर । तरी सारासार-विचार-। बोलणें न घडे ॥ ३९ ॥ जो ब्रह्माकार झाला । तो काष्ठ होऊन पडिला । शुक भागवत बोलिला । परीक्षितीपुढें ॥ ४० ॥ निरूपण हें सारासार । बोलिला पाहिजे विचार । धांडोळांवें चराचर । दृष्टांताकारणें ॥ ४१ ॥ क्षणएक ब्रह्माचि व्हावें । क्षणएक दृश्य धांडोळावें । नाना दृष्टांतीं संपादावें । वक्तृत्वासी ॥ ४२ ॥ असो भागवतनिरूपण । शुक बोलिला आपण । तया अंगीं बद्धपण । लावूं नये कीं ॥ ४३ ॥ म्हणोनि बोलतां चालतां । निचेष्टित पांडिलें नसतां । मुक्ति लाभे सायुज्यता । सद्गुरुबोधें ॥ ४४ ॥ एक मुक्त एक नित्यमुक्त । एक जाणावें जीवन्मुक्त । एक योगी विदेहमुक्त । समाधानी ॥ ४५ ॥ सचेतन[5] ते जीवन्मुक्त । अचेतन ते विदेहमुक्त । दोहींवेगळें नित्यमुक्त । योगीश्वर जाणावे ॥ ४६ ॥ स्वरूपबोधें स्तब्धता[6] । ते जाणावी तटस्थता । तटस्थता आणि स्तब्धता । हा देहसंबंध ॥ ४७ ॥ येथें अनुभवासीच कारण । येर सर्व निष्कारण । तृप्ति पावावी आपण । आपल्या स्वानुभवें ॥ ४८ ॥ कंठमर्यादें[7] जेविला । त्यास म्हणती भुकेला[8] । तेणें शब्दें जोजावला[9] । हें तों घडेना ॥ ४९ ॥ स्वरूपीं नाहीं देह । तेथें कांहीसा संदेह[10] । बद्ध मुक्त ऐसा भाव । देहोंचकडे[11] ॥ ॥ ५० ॥ देहबुद्धि धरून चित्तीं । मुक्त ब्रह्मादिक नव्हेती । तेथें शुकाची कोण गति । मुक्तपणाची ॥ ५१ ॥ मुक्तपण हेंचि बद्ध । मुक्त बद्ध हें अबद्ध[12] । स्वस्वरूप स्वतःसिद्ध । बद्ध ना मुक्त ॥ ५२ ॥ मुक्तपणाची पोटीं शिळा । बांधतां जाइजे पाताळा । देहबुद्धीची अर्गळा[13] । स्वरूपीं नसंटे[14] ॥ ५३ ॥ मीपणापासून सुटला । तोचि एक मुक्त जाहला । मुका अथवा बोलिला । तरी तो मुक्त ॥ ५४ ॥ जयास बांधावें तें वोवे[15] । तेथें कैंचा मुक्तभाव । पाहों जातां सकळ वाव । गुणवार्ता[16] ॥ ५५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ * बद्धो मुक्त इति व्याख्या गुणतो मे न वस्तुतः ॥ गुणस्य मायामूलत्वान्न मे मोक्षो न बंधनम् ॥ ७ ॥ ॥ टीका ॥ ॥ तत्त्वज्ञाता परम शुद्ध । तयासि नाहीं मुक्त बद्ध । मुक्त बद्ध हा विनोद । मायागुणें

---

१ म्हण, मालिका. † शुक वामदेवाशिवाय. २ तिसरा. ३ उद्धरत नाहीं. ४ गुंतागुंत. ५ बोलला. ६ देह भानावर नाहीं असा, मुका. ७ शोधावे. ८ मूर्छित. ९ ब्रह्मस्वरूपी ऐक्य पावणें. १० देह भानावर असणारे, बोलके. ११ परब्रह्मज्ञानामुळें. १२ घशाशी अन्न येईपर्यंत. १३ त्रास पावला. १४ संशय. १५ देहसंबंधानें. १६ असंगत. १७ लोढणें, अडसर. १८ सांठवत नाहीं. १९ व्यर्थ. २० सत्त्वरजतमादि त्रिगुणांची वार्ता, गोष्ट. * श्रीमद् भागवत ११-११-१.

॥ ५६ ॥ जेथें नामरूप हें सरे । तेथें मुक्तपण कैंचें उरे । मुक्त बद्ध हें विसरे । विसरलेपेणेसी ॥ ५७ ॥ बद्ध. मुक्त झाला कोण । ऐसा श्रोता करी प्रश्न । बाधक जाणावे मीपण । धर्त्यासं बाधी ॥ ५८ ॥ ऐवं हा अवघा भ्रम । अहंतेचा जाण भ्रम । मॅायातीत जो विश्रामें । सेविला नाहीं ॥ ५९ ॥ असो बद्धता आणि मुक्तता । आली कल्पनेच्या माथां । ते कल्पना तरी तत्त्वतां । साच आहे ॥ ६० ॥ म्हणोनि हें मृगजळ । माया नाथिलें आभाळ । स्वप्न मिथ्या तात्काळ । जागृतीस होय ॥ ६१ ॥ स्वप्नीं बद्धमुक्त झाला । तो जागृतीस नाहीं आला । कैंचा कोण काय झाला । कांहीं कळेना ॥ ६२ ॥ म्हणोन मुक्त विश्वजन । जयांस झालें आत्मज्ञान । शुद्धज्ञानें मुक्तपण । समूळ वावें ॥ ६३ ॥ बद्ध मुक्त हा संदेह । धरी कल्पनेचा देह । साधु सदा निःसंदेह । देहातीत वस्तु ॥ ६४ ॥ आतां असो हे पुढती । पुढें रहावें कोणे रीतीं । तेंचि निरूपण श्रोतीं । सावध परिसावें ॥ ६५ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सप्तमदशके बद्धमुक्तनिरूपणं नाम षष्ठः समासः ॥ ६ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ वस्तूसि जरी कल्पावें । तरी तें निर्विकल्प स्वभावें । तेथें कल्पनेच्या नांवे । शून्याकार ॥ १ ॥ तथापि कैल्पूं जातां । नये कल्पनेच्या हातां । वोळखी ठायीं न पडे चित्ता । भ्रंश पडे ॥ २ ॥ कांहीं दृष्टीस न दिसे । मनास तेंहि न भासे । न भासे न दिसे कैसें । वोळखावें ॥ ३ ॥ पाहों जातां निराकार । मनासि पडे शून्याकार । कल्पूं जातां अंधकार । भरला वाटे ॥ ४ ॥ कल्पूं जातां वाटे काळें । परी तें[१०] काळें ना पिंवळें । आरक्त निळें ना ढवेळें । वर्णरहित ॥ ५ ॥ जयास वर्णव्यक्ती नसे । भासांहूनि अनैरिसें । रूपचि नाहीं कैसें । वोळखावें ॥ ६ ॥ न दिसतां वोळखण । किती धरावी आपण । हें तों श्रमासीच कारण । होत असे ॥ ७ ॥ जो निर्गुण गुणातीत । जो अदृश्य अव्यक्त । जो अचिंत्य चिंतनातीत । परमपुरुष ॥ ८ ॥

॥ श्लोक ॥ ॥ अचिंत्याव्यक्तरूपाय निर्गुणाय गुणात्मने । समस्तजगदाधारमूर्तये ब्रह्मणे नगः ॥ १ ॥ टीका ॥ ॥ अचिंत्य तें चिंतावें । अव्यक्तास आठवावें । निर्गुणास ओळखावें । कोणेपरी ॥ ९ ॥ जें दृष्टीसचि न पडे । जें मनासहि नातुडे । तया कैसें पाहणे घडे । निर्गुणासी ॥ १० ॥ असंगाचा संग धरणें । निरालंबी[१६] वास करणें । निःशब्दासि अनुवादणें । कोणेपरी ॥ ११ ॥ अचिंत्यासि चिंतूं जातां । निर्विकल्पासि कल्पितां अद्वैताचें ध्यान करितां । द्वैतचि उठे ॥ १२ ॥ आतां ध्यानचि सांडावें । अनुसंधान मोडावें । तरी मागुतें पडावें । महासंशयीं ॥ १३ ॥ द्वैताच्या भेणें[१७] अंतरीं । वस्तु न * पाहिजे तरी । तेणें समाधाना उरी[१८] । कदा असेचि ना ॥ १४ ॥ सवे[१९] लावितां सवे पडे । सवे पडतां वस्तु आतुडे । नित्यानित्यविचारें घडे । समाधान ॥ १५ ॥ वस्तु

---

१ विसरण्याच्या ज्ञानासह, मी विसरलों हें भानही रहात नाहीं. २ अभिमान धरणाऱ्यास. ३ अशा प्रकारें. ४ मायेपलीकडील. ५ विश्रांति. ६ खोटें. ७ व्यर्थ. ८ कल्पनेपलीकडे. ९ विचार करूं. १० ब्रह्म. ११ पांढरें. १२ रंग व आकार. १३ वेगळें. १४ अप्रकट. १५ सांपडत नाहीं, प्राप्त होत नाहीं. १६ आश्रयरहित, स्वतंत्र. १७ भीतीनें. * पहावी. १८ जागा. १९ संवय. २० सांपडलें.

चिंतिता द्वैत उपजे । सोडीकरितां कांहींच[1] नुमजे । शून्यत्वें † संदेहीं पडिजे । विवेकेंविण ॥ १६ ॥ म्हणोनि विवेक धरावा । ज्ञानें प्रपंच सांडावा । अहंभाव वोसरावा । परी तो वोसरेना ॥ १७ ॥ परब्रह्म तें अद्वैत । कल्पितांच उठे द्वैत । तेथें हेतु आणि दृष्टांत[2] । कांहींच न चले ॥ १८ ॥ तें आठवितां विसरिजे । कां तें विसरोन आठविजें । जाणोनियां नेणिजे । परब्रह्म तें ॥ १९ ॥ त्यास न भेटतां होय भेटी । भेटों जातां पडे तुटी[7] । ऐशी हे नवल गोष्टी । मुकेपणाची[8] ॥ २० ॥ तें साधूं जातां साधवेना । नातरी सोडितां सुटेना । लागला संबंध तुटेना । निरंतर ॥ २१ ॥ तें असतचि सदा असे । नातरी पाहतां दुरासे[9] । न पाहतां प्रकाशे । जेथें तेथें ॥ २२ ॥ जेथें अपाय तोचि उपाय । आणि उपाय तोचि अपाय । हें अनुभवेविण काय । उमजों जाणें ॥ २३ ॥ तें नुमजतांचि उमजे । उमजोन कांहींच नुमजे । तें वृत्तिविर्ण[10] पावीजे । निवृत्तिपद[11] ॥ २४ ॥ तें ध्यानीं धरितां नये[12] । चिंतनीं चिंतावें तें काये । मनामध्यें न समाये[13] । परब्रह्म तें ॥ २५ ॥ त्यास उपमे द्यावें जळ । तरी तें निर्मळ निश्चळ । विश्व बुडालें सकळ । परी तें कोरडेंचि असे ॥ २६ ॥ नव्हे प्रकाशासारिखें । अथवा नव्हे काळोखें । आतां तें कासयासारिखें । सांगावें हो ॥ २७ ॥ ऐसें ब्रह्म निरंजन[14] । कदा नव्हे दृश्यमान । लावावें तें ‡ अनुसंधान । कोणेपरी ॥ २८ ॥ अनुसंधान लावूं जातां । कांहीं नाहीं वाटे आतां । तेणें मनाचिये माथां । संदेह वाजे ॥ २९ ॥ लटिकेंचि काय पाहावें । कोठें जाऊन राहावें । अभाव[15] घेतला जीवें । सत्यस्वरूपाचा ॥ ३० ॥ अभावचि म्हणों सत्य । तरी वेदशास्त्र कैसें मिथ्य । आणि व्यासादिकांचें कृत्य[16] । वावुगें[17] नव्हे ॥ ३१ ॥ म्हणोनि मिथ्या म्हणतां नय । बहुत ज्ञानाचे उपाय । बहुतीं निर्मिलें तें काय । मिथ्या म्हणावें ॥ ३२ ॥ अद्वैतज्ञानाचा उपदेश । गुरुगीता तो महेश[18] । सांगता होय पार्वतीस । महाज्ञान ॥ ३३ ॥ अवधूतें गीता केली । गोरक्षास निरूपिली । ते अवधूतगीता बोलिली । ज्ञानमार्ग ॥ ३४ ॥ विष्णु होऊन राजहंस । विधीसे[19] केला उपदेश । ते हंसगीता जगदीश । बोलिला स्वमुखें ॥ ३५ ॥ ब्रह्मा नारदातें उपदेशित । चतुःश्लोकी भागवत । पुढें व्यासमुखें बहुत । विस्तारिलें ॥ ३६ ॥ वासिष्ठसार[20] वासिष्ठऋषी । सांगता झाला रघुनाथासी । कृष्ण सांगे अर्जुनासी । सप्तश्लोकी गीता ॥ ३७ ॥ ऐसें सांगावे तें किती । बहुत ऋषि बोलिले बहुतीं । अद्वैतज्ञान आदिअंतीं । सत्यचि असे ॥ ३८ ॥ म्हणोन मिथ्या आत्मज्ञान । म्हणतां पावीजे पतन[21] । प्रज्ञेरहितें[22] जे जन । तयास हें कळेना ॥ ३९ ॥ जेथें शेषाची प्रज्ञा मंदली । श्रुतीसे[23] मौनमुद्रा[24] पडिली । जाणपणें[25] न वचे वदली । स्वरूपस्थिति[26] ॥ ४० ॥ आपणास नुमजे बरवें । म्हणोनि मिथ्या

---

१ त्याचें ध्यान सोडलें असतां.२ न समजे. † संशयांत.३ मीपणा.४नाहींसाकरावा.५ उपमा.६वियोग. ७ दूरावतें, दूर जातें.८ कल्पनेवांचून. ९ मोक्षपद.१० मावत नाहीं. ‡ ध्यान. ११ मायामलरहित, शुद्ध. १२ नसणें. १३ व्यासादिकांनीं सांगितलेल्या कथा. १४ खोटें. १५ शंकर. १६ ब्रह्मदेवाला. १७ योगवासिष्ठ. १८ पुष्कळ ग्रंथांमध्यें. १९ अधोगति. २० बुद्धीरहित. २१ वेदाला. २२ मुकेपणा. २३ ज्ञानानें, पांडित्यानें. २४ ब्रह्मस्वरूप.

कैसें करावें । नातरी सदृढ धरावें । सद्गुरुमुखें ॥ ४१ ॥ मिथ्या तेंचि सत्य झालें । सत्य असोनि मिथ्या केलें । संदेहसागरीं[1] बुडालें । अकस्मात् मन ॥ ४२ ॥ मनास कल्पायाँची[2] सवे । मनें कल्पिलें तें नव्हे । तेणेंगुणें संदेह धावे । मीपणाचेनि पंथें[3] ॥ ४३ ॥ तरी तो पंथचि मोडावा । मग परमात्मा जोडावा । समूळ संदेह तोडावा । साधुचेनि संगतीं ॥ ४४ ॥ मीपण शस्त्रें तुटेना । मीपण फोडितां फुटेना । मीपण सोडितां सुटेना । कांहीं केल्या ॥ ४५ ॥ मीपणें वस्तु नाकळे । मीपणें भक्ति मावळे । मीपणें शक्ति गळे । वैराग्याची ॥ ४६ ॥ मीपणें प्रपंच न घडे । मीपणें परमार्थ बुडे । मीपणें सकळहि उडे । यश कीर्ति प्रताप ॥ ४७ ॥ मीपणें मैत्री तुटें । मीपणें प्रीति † आटे । मीपणें लिगटे[4] । अभिमान अंगीं ॥ ४८ ॥ मीपणें विकल्पँ[5] उठे । मीपणें ‡ कलह सुटे । मीपणें [6] संमोह कुटे । ऐक्यतेचा ॥४९॥ मीपण कोणासीच न साहे । तें भगवंतीं कैसेनि साहे । म्हणून मीपण सांडून राहे । तोचि समाधानी ॥५०॥ मीपण कैसें त्यागावें । ब्रह्म कैसें अनुभवावें । समाधान कैसें पावावें । कोण्या प्रकारें ॥ ५१ ॥ मीपण जाणोन त्यागावें । ब्रह्म होऊन अनुभवावें । समाधान तें पावावें । निःसंगपणें[7] ॥ ५२ ॥ आणिक एक समाधान । मीपणेविण साधन । करूं जाणें तोचि धन्य । समाधानी ॥ ५३ ॥ मी ब्रह्माचि झालों स्वतां । साधन कोण करील आतां । ऐसें मनीं कल्पूं जातां । कल्पनाचि[8] उठे ॥ ५४ ॥ ब्रह्मीं कल्पना न साहे । तेचि तेथें उभी राहे । तयेसि शोधूनि पाहे । तोचि साधु ॥ ५५ ॥ निर्विकल्पासि कल्पावें । परी कल्पितें[9] तें आपण न व्हावें । मीपणास त्यागावें । येणें रीतीं ॥ ५६ ॥ यां ब्रह्मविद्येच्या लेपनीं[10] । कांहींच न व्हावें असोनी । देखे आणि समाधानी । तोचि हें जाणे ॥ ५७ ॥ जयास आपण कल्पावें । तेंचि आपण स्वभावें । येथें कल्पनेच्या नांवें । शून्य आलें ॥ ५८ ॥ पदींहून चळों नये । करावें साधन उपाये । तरीच सांपडे सोय[11] । अलिप्तपँणाची[12] ॥ ५९ ॥ राजा राज्यपदीं असतां । उगीच चाले सर्वसत्ता । साध्यचि होऊन तत्त्वतां । साधन करावें ॥ ६० ॥ साधन आलें देहाच्या माथां । आपण देह नव्हे सर्वथा । ऐसा करूनि अंकितां[13] । सहजचि आहे ॥ ६१ ॥ देह आपण ऐसें कल्पावें । तरीच साधन त्यागावें । देहातीत असतां स्वभावें । देह कैंचा ॥ ६२ ॥ ना तें साधन ना तें देह । आपण आपला निःसंदेहे[14] । देहींच असोन विदेहे[15] । स्थिति ऐसी ॥ ६३ ॥ साधनेविण ब्रह्म होतां । लागों पाहे देहेंममता[16] । आळस प्रबळे तत्त्वतां । ब्रह्मज्ञानमिसें[17] ॥ ६४ ॥ परमार्थमिसें अर्थ[18] जागे । ध्यानमिसें निद्रा लागे । मुक्तिमिसें दोष भोगे[19] । अनर्गळता[20] ॥ ६५ ॥ निरूपणमिसें निंदा घडे । संवादमिसें विवाद पडे । उपाधिमिसें येऊन जडे । अभिमान अंगीं ॥ ६६ ॥ तैसा ब्रह्मज्ञान-

---

१ संशयसमुद्रामध्ये. २ कल्पना करण्याची. ३ संचय. ४ त्यामुळें. ५ मार्गानें. † नाहींशी होते. ६ चिकटतो. ७ विरुद्ध कल्पना. ‡ भांडण लागतें. [6] भ्रम, विचारशून्यता. ८ सर्वसंगत्याग करून. * नाहींशी होते. ९ आपण कल्पनाकरणारे एक वेगळे आहोत असे वेगळेपण नको. १० भाषणांमध्ये. ११ तत्पर, शाहणा. १२ वाट. १३ वैराग्याची. १४ न करणारा. १५ निःसंशय. १६ देहाविरहित. १७ देहाभिमान. १८ ब्रह्मज्ञानाच्या निमित्तानें. १९ स्वार्थ. २० लागतो. २१ स्वछंदपणा.

मिसें । आळस अंतरीं प्रवेशे । म्हणे साधनाचें † पिसें । काय करावें ॥ ६७ ॥ श्लोक ॥ किं करोमि क्व गच्छामि किं गृण्हामि त्यजामि किम् । आत्मना पूरितं सर्वं महाकल्पांबुना यथा ॥ १ ॥ टीका ॥ वचन आधारीं लाविलें । जैसें शस्त्र फिरविलें । स्वतां हाणोनि घेतलें । जयापरी ॥ ६८ ॥ तैसा उपायाचा अपाय । विपरीतपणें स्वहित जाय । साधन सोडितां होय । मुक्तपणें बद्ध ॥ ६९ ॥ साधन करितां सिद्धपण । हातीचें जाईल निघोन । तेणें गुणें साधन । करूंच नावडे ॥ ७० ॥ लोक म्हणती हा साधकें । हेंचि लज्जा वाटे एक । साधन करिती ब्रह्मादिक । हें ठाउकें नाहीं ॥ ७१ ॥ आतां असो हें अविद्या । अभ्यास-सारिणी विद्या । अभ्यासें पाविजे आद्या । पूर्ण ब्रह्म ॥ ७२ ॥ अभ्यास करावा कवणें । ऐसा श्रोता करी प्रश्न । परमार्थाचें साधन । बोलिलें पाहिजे ॥ ७३ ॥ याचें उत्तर श्रोतयांसी । दीधलें पुढिलिये समासीं । निरूपिलें साधनाशीं । परमार्थाच्या ॥ ७४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सप्तमदशके साधनप्रतिष्ठानिरूपणं नाम सप्तमः समासः ॥ ७ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ऐक परमेश्वराचे साधन । जेणें होय समाधान । तें तूं जाण गा श्रवण । निश्चियेंसी ॥ १ ॥ श्रवणें आतुडे भक्ति । श्रवणें उद्भवे विरक्ति । श्रवणें तुटे आसक्ति । विषयांची ॥ २ ॥ श्रवणें घडे चित्तशुद्धि । श्रवणें होय दृढबुद्धि । श्रवणें तुटे उपाधि । अभिमानाची ॥ ३ ॥ श्रवणें निश्चय घडे । श्रवणें ममता मोडे । श्रवणें अंतरीं जडे । समाधान ॥ ४ ॥ श्रवणें आशंका फिटे । श्रवणें संशय तुटे । श्रवण होतां पालटे । पूर्व गुण आपुला ॥ ५ ॥ श्रवणें आवरे मन । श्रवणें घडे समाधान । श्रवणें तुटे बंधन । देहबुद्धीचें ॥ ६ ॥ श्रवणें मीपण जाय । श्रवणें धोका नय । श्रवणें नाना अपाय । भस्म होती ॥ ७ ॥ श्रवणें होय कार्यसिद्धि । श्रवणें लागे समाधि । श्रवणें घडे सर्वसिद्धि । समाधानाची ॥ ८ ॥ सत्संगावरी श्रवण । तेणें कळे निरूपण । श्रवणें होइजे आपण । तदाकार ॥ ९ ॥ श्रवणें प्रबोधे[1] वाढे । श्रवणें प्रज्ञा चढे । श्रवणें विषयाचे ओढे[13] । तुटोनि जाती ॥१०॥ श्रवणें विचार कळे । श्रवणें ज्ञान हें प्रबळे । श्रवणें वस्तु निवळे[14] । साधकांसी ॥ ११ ॥ श्रवणें सद्बुद्धि लागे । श्रवणें विवेक जागे । श्रवणें मन हें[4] मागे । भगवंतासी ॥ १२ ॥ श्रवणें कुसंग तुटे । श्रवणें काम वोहटे[15] । श्रवणें धोका आटे । एकसरां ॥ १३ ॥ श्रवणें मोह नासे । श्रवणें स्फूर्ति प्रकाशे । श्रवणें सद्वस्तु भासे । निश्चयात्मक ॥ १४ ॥ श्रवणें होय परम गति । श्रवणें आतुडे शांति । श्रवणें पाविजे निवृत्ति[17] । अचळपद ॥ १५ ॥ श्रवणाऐसें सार नाहीं । श्रवणें घडे सर्व कांहीं । भवनदीच्या प्रवाहीं । तरणोपायें श्रवणें ॥ १६ ॥ श्रवण भजनाचा आरंभ । श्रवण सर्वीं सर्वारंभ । श्रवणें होय स्वयंभ[20] । सर्व कांहीं ॥ १७ ॥ प्रवृत्ति अथवा निवृत्ति[22]

---

† वेड. १ मोक्ष साधण्याविषयी प्रवृत्त. २ अज्ञान. ३ अभ्यासाने येणारी. ४ अनादि, जगत्कारण. ५ कोणचा. ६ सांपडते, प्राप्त होते. ७ वैराग्य. ८ उपसर्ग. ९ चित्ताची एकाग्रता. १० तद्रूप ११ जाणतेपणा. १२ बुद्धि. १३ बंध. १४ प्रकट होतें. ¶ इच्छाकरिते. १५ नाहींसा होतो. १६ मिळते. १७ मोक्ष. १८ संसाररूपी नदीच्या. १९ तरून जाण्याला साधन. २० स्वतःसिद्ध. २१ कर्ममार्ग. २२ मोक्षमार्ग.

श्रवणेविण न घडे प्राप्ति । हे तों सकळांस प्रचीती । प्रत्यक्ष आहे ॥ १८ ॥ ऐकिल्याविण कळेना । हें ठाउकें आहे जना । त्याकारणें मूळ प्रयत्ना । श्रवण आधीं ॥ १९ ॥ जें जन्मीं ऐकिलेंचि नाहीं । तेथें पडिजे संदेहीं । म्हणोनियां दुजे कांहीं । साम्यता न घडे ॥ २० ॥ बहुत साधनें पाहतां । श्रवणास न घडे साम्यता । श्रवणेविण तत्त्वतां कार्य न चले ॥ २१ ॥ न देखतां दिनकर । पडे अवघा अंधकार । श्रवणेविण प्रकार । तैसा होय ॥ २२ ॥ कैसी नवविधा भक्ति । कैसी चतुर्विधा मुक्ति । कैसी आहे सहजस्थिति । हें श्रवणेविण नकळे ॥ २३ ॥ न कळे षट्कर्माचरण । न कळे कैसें पुरश्चरण । न कळे कैसें उपासन । विधियुक्त ॥ २४ ॥ नाना व्रतें नाना दानें । नाना तपें नाना साधनें । नाना योग तीर्थाटणें । श्रवणेविण न कळती ॥ २५ ॥ नाना विद्या पिंडज्ञान । नाना तत्त्वांचें शोधन । नाना कळा ब्रह्मज्ञान । श्रवणेविण न कळे ॥ २६ ॥ अठरांभार वनस्पति । ‡ एक्या जळें प्रबळती । एक्या रसें उत्पत्ति । सकळ जीवांची ॥ २७ ॥ सकळ जीवां एक पृथ्वी । सकळ जीवां एक रवि । सकळ जीवां वर्तवी । एक वायु ॥ २८ ॥ सकळ जीवां एक पैसे । जयास बोलिजे आकाश । सकळ जीवांचा † वास । एका परब्रह्मी ॥ २९ ॥ तैसें सकळ जीवांस मिळोन । सार एकचि साधन । तें हें जाण श्रवण । प्राणिमात्रांसी ॥ ३० ॥ नाना देश भाषा मतें । भूमंडळीं असंख्यातें । सर्वांस श्रवणापरतें । साधनचि नाहीं ॥ ३१ ॥ श्रवणें घडे उपरति । बद्धाचे मुमुक्षु होती । मुमुक्षूंचे साधक ¶ अती-। नेमेंसि चालती ॥ ३२ । साधकांचे होती सिद्ध । अंगीं बाणतां प्रबोध । हें तों आहे प्रसिद्ध । सकळांस ठाउकें ॥ ३३ ॥ ठायींचे खळ चांडाळ । तेचि होती पुण्यशीळ । ऐसा हा गुण तात्काळ । श्रवणाचा ॥ ३४ ॥ जो दुर्बुद्धि दुरात्मा । तोचि होय पुण्यात्मा । अगाध श्रवणाचा महिमा । बोलिलों नवचे ॥ ३५ ॥ तीर्थव्रताची फळश्रुति । पुढें होणार सांगती । तैसें नव्हे हातींच्या हातीं । सप्रचीत श्रवणें ॥ ३६ ॥ नाना रोग नाना व्याधी । तात्काळ तोडिजे औषधीं । तैसी आहे श्रवणसिद्धि । अनुभवी जाणती ॥ ॥ ३७ ॥ श्रवणाचा विचार कळे । तरीच भाग्यश्री प्रबळे । मुख्य परमात्मा आकळे । स्वानुभवासी ॥ ३८ ॥ या नांव जाणावें मनन । अर्थालागीं सावधान । निदिध्यासें समाधान । होत असे ॥ ३९ ॥ बोलिल्याचा अर्थ कळे । तरीच समाधान निवळे । अकस्मात् अंतरीं वोळे । निःसंदेहता ॥ ४० ॥ संदेह जन्माचें मूळ ।

---

१ अनुभव. २ उघड. ३ सूर्य. ४ श्रवण, कीर्तन वगैरे नऊ प्रकारची. ५ सलोकता, समीपता, सरूपता व सायुज्यता अशी चार प्रकारची. ६ ब्रह्मस्थिति. ७ अध्ययन, अध्यापन, यजन, याजन, दान, प्रतिग्रह या सहा कर्मांचें आचरण. ८ मंत्रप्राप्तीकरितां त्या मंत्राचा अमुक संख्या जप मंत्रशास्त्रांत सांगितल्याप्रमाणें करणें. ९ भक्ति, पूजन. १० शरीरज्ञान. ‡ एका पाण्यानेंच वाढतात. ११ अनेक. १२ विस्तृत पोकळी. † राहणें. १३ विरक्ति. १४ विषयत्याग करून मोक्षमार्गीं लागतात. १५ मोक्षादिकार्य साधण्याविषयीं प्रवृत्त. ¶ फार नियमितपणानें. १६ ब्रह्मस्वरूपाप्रत पोंचलेले. १७ ज्ञान. १८ मूळचे. १९ सांगतां येत नाहीं. २० फलकथा. २१ अनुभवयुक्त. २२ भाग्यरूप लक्ष्मी. २३ निरंतर ध्यासानें, चिंतनानें. २४ प्रकाशित होतें. २५ येते.

तें श्रवणें होय निर्मूळ । पुढें सहजचि † प्रांजळ । समाधान ॥ ४१ ॥ जेथें नाहीं श्रवण मनन । तेथें कैचें समाधान । मुक्तपणाचें बंधन । जडलें पायीं ॥ ४२ ॥ मुमुक्षु साधक अथवा सिद्ध । श्रवणेविण तो अबद्ध । श्रवणमननें शुद्ध । चित्तवृत्ति होय ॥ ४३ ॥ जेथें नाहीं नित्य श्रवण । तें जाणावें विलक्षण । तेथें साधकें एक क्षण । क्रमूं नये सर्वथा ॥ ४४ ॥ जेथें नाहीं श्रवणस्वार्थ । तेथें कैंचा हो परमार्थ । मागें केलें तितुकें व्यर्थ । श्रवणेविण होय ॥ ४५ ॥ तस्मात् श्रवण करावें । साधन मनीं धरावें । नित्यनेमें तरावें । संसारसागरीं ॥ ४६ ॥ सेविलेंचि सेवावें अन्न । घेतलेंचि घ्यावें जीवन । तैसें श्रवणमनन । केलेंच करावें ॥ ४७ ॥ श्रवणाचा अनादर । आळस करी जो नर । त्याचा होय अपहार । स्वहिताविषयीं ॥ ४८ ॥ आळसाचें संरक्षण । परमार्थाची बुडवण । याकारणें नित्य श्रवण । केलेंचि पाहिजे ॥ ४९ ॥ आतां श्रवण कैसें करावें । कोण्या ग्रंथास पहावें । पुढिलिये समासीं अघवें । सांगिजेल ॥ ५० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सप्तदशके श्रवणनिरूपणं नाम अष्टमः समासः ॥ ८ ॥

श्रीगणेशायनमः ॥ ॥ आतां श्रवण कैसें करावें । तेंहि सांगिजेल स्वभावें । श्रोतीं अवधान द्यावें । एकचित्तें ॥ १ ॥ एक वक्तृत्व श्रवणीं पडे । तेणें झालें[५] समाधान मोडे । केला[६] निश्चय ‡ विघडे । अकस्मात् ॥ २ ॥ तें वक्तृत्व त्यागावें । जें मायिकें[७] स्वभावें । जेथें निश्चयाच्या नांवें । शून्यार्कार ॥ ३ ॥ एक्या ग्रंथें निश्चय केला । तो दुजयानें उडविला । तेणें संशयचि वाढला । जन्मवरी ॥ ४ ॥ जेथें संशय तुटती । होय आशंकानिवृत्ति[१०] । अद्वैतग्रंथें[११] परमार्थी[१२] । श्रवण करावे ॥ ५ ॥ जो मोक्षाचा अधिकारी । तो परमार्थपंथ धरी । प्रीति लागली अंतरीं । अद्वैतग्रंथाची ॥ ६ ॥ जेणें सांडिला इहलोक । जो परलोकींचा साधक । तेणें पहावा विवेक । अद्वैतशास्त्रीं ॥ ७ ॥ जयास पाहिजे अद्वैत । तयापुढें ठेवितां द्वैत । तेणें क्षोभलें उठे चित्त । श्रोतयांचें ॥ ८ ॥ आवडीसारिखें मिळे । तेणें सुखचि उचंबळे । नाहीं तरी कंटाळे । मानस ऐकतां ॥ ९ ॥ ज्याची उपासना[१३] जैसी । त्यासि प्रीति वाटे तैसी । तेथें वर्णितां दुजयासी । प्रशस्त न वाटे ॥ १० ॥ प्रीतीचें लक्षण ऐसें । अंतरीं उठे अनायासें[१४] । पाणी § पाणवाटे जैसें । आपणचि धांवें ॥ ११ ॥ तैसा जो आत्मज्ञानी नर । तयास नावडे इतर । तेथें पाहिजे सारासार–। विचारणा ते ॥ १२ ॥ जेथें कुळदेवी भगवती । तेथें पाहिजे सप्तशती[१५] । इतर देवांची स्तुति । कामा नये सर्वथा ॥ १३ ॥ घेतां अनंताच्या व्रता । तेथें न लागे भगवद्गीता । साधुजनांसि वार्ता । फळाशेची नाहीं ॥ १४ ॥ वीरकंकण घालितां नाकीं । परी तें शोभा पावेना कीं । जेथीलें[१६] तेथें, आणिकीं[१७] । काम नये सर्वथा ॥ १५ ॥ नाना माहात्म्यें बोलिलीं । जेथील तेथें वंद्यें[१८] झालीं । विपरीत करून वाचिलीं । तरी तें

† खरें, सरळ. १ अव्यवस्थित. २ पाणी. ३ नाश. ४ सर्व. ५ पूर्वी झालेलें. ६ पूर्वी केलेला. ‡ बिघडतो. ७ लटकें. ८ पूज्य. ९ दुसऱ्यानें. १० शंकानिरसन. ११ अद्वैत प्रतिपादन करणारे वेदांत ग्रंथ. १२ परमार्थाचें–मोक्षमार्गाचें–प्रतिपादन करणारें. १३ भक्ति. १४ सहज. § पाटानें. १५ मार्कंडेय पुराणांतील देवीच्या उपासनापर एक भाग. १६ जेथला अलंकार तेथेंच पाहिजे. १७ दुसऱ्या ठिकाणीं. १८ पूज्य.

विलक्षण ॥ १६ ॥ मल्लारिमाहात्म्य द्वारकेसी । द्वारकामाहात्म्य नेलें काशीसी । काशी-माहात्म्य व्यंकटेशीं । शोभा न पावे ॥ १७ ॥ ऐसें सांगतां असे वोड । परी जेथील तेथेंचि गोड । तैसी ज्ञानियांस चाड । अद्वैतग्रंथाची ॥ १८ ॥ योगियांपुढें रोहिणी[1] । परीक्षावंतापुढे पाषाण । पंडितापुढें डफगाण[2] । शोभा न पावे ॥ १९ ॥ वेदज्ञापुढें जेती[3] । निस्पृहापुढें फलश्रुति । ज्ञानियापुढें पोथी । कोकशास्त्राची[4] ॥ २० ॥ ब्रह्मचाऱ्या-पुढें नाचणी[5] । रासक्रीडा निरूपणीं । राजहंसापुढें पाणी । ठेविलें जैसें ॥ २१ ॥ तैसें अंतर्निष्ठापुढें[6] । ठेविलें शृंगारिक टिपडे[7] । तेणें त्याचें कैसें घडे । समाधान ॥ २२ ॥ रायास रंकाची आशा[8] । तैसें सांगणें पीयूषा[9] । संन्यासास वोवसा[10] । उच्छिष्ट चांडाळा[11] ॥ २३ ॥ कर्मनिष्ठा वशीकरण[12] । पंचाक्षरीया निरूपण । तेथें भंगे अतःकरण । सहजचि त्याचें ॥ २४ ॥ तैसे पारमार्थिके[13] जन । तयांस नसतां आत्मज्ञान । ग्रंथ[14] वाचितां समाधान । होणार नाहीं ॥ २५ ॥ आतां असो हें बोलणें । जयासी स्वहित करणें । तेणें सदा विचरणें[15] । अद्वैतग्रंथी ॥ २६ ॥ आत्मज्ञानीं एकचित्त । तेणें पाहणें अद्वैत । एकांत-स्थळीं निवांत । समाधान ॥ २७ ॥ बहुत प्रकारें पाहतां । ग्रंथ नाहीं अद्वैतापरता । परमार्थास तत्त्वतां । तारूंचि कीं ॥ २८ ॥ इतर जें प्रापंचिक । हास्य विनोद नवरासिक । हित नव्हे तें पुस्तक । परमार्थासी ॥ २९ ॥ जेणें परमार्थ वाढे । अंगीं अनुताप[16] चढे । भक्तिसाधन आवडे । त्या नांव ग्रंथ ॥ ३० ॥ जो ऐकतांच गर्व गळे । कां ते भ्रांतीच मावळे । नातरी एकसरें[17] वोळे । मन भगवंतीं ॥ ३१ ॥ जेणें होय उपरति[18] । अवगुण अवघे पालटती । जेणे चुके अधोगति[19] । त्या नांव ग्रंथ ॥ ३२ ॥ जेणें धारिष्ट चढे । जेणें परोपकार घडे । जेणें विषयवासना मोडे । त्या नांव ग्रंथ ॥ ३३ ॥ जेणें परत्र-साधन[20] । जेणें ग्रंथें होय ज्ञान । जेणें होइजे पावन । त्या नांव ग्रंथ ॥ ३४ ॥ ग्रंथ बहुत असती । नानाविधानें फळश्रुति । जेथें नुपजे विरक्ति भक्ति । तो ग्रंथचि नव्हे ॥ ३५ ॥ मोक्षेविण फळश्रुति । ते दुराशेची पोथी । ऐकतां ऐकतां पुढती । दुराशाचि वाढे ॥ ३६ ॥ श्रवणीं लोभ उपजेल जेथें । विवेक कैंचा असेल तेथें । बैसलों दुराशेचीं भुतें । तया अधोगति ॥ ३७ ॥ ऐकोनीच फळश्रुति । पुढें तरी पावों म्हणती । तयां जन्म अधो-गति । सहजचि जाहली ॥ ३८ ॥ नाना फळें पक्षी खाती । तेणेंचि तयां होय तृप्ति । परी त्या चकोरांचे[21] चित्तीं । अमृत वसे ॥ ३९ ॥ तैसें संसारी मनुष्य । पाहे संसाराची वास[22] । परी जे भगवंताचे अंश । ते भगवंत इच्छिती ॥ ४० ॥ ज्ञानियास पाहिजे

---

१ पुष्कळ. २ आवड. ३ नऊ वर्षांची मुलगी. ४ डफ वाजवून म्हणावयाचे गाणे (लावणी वगैरे.) ५ बौद्धधर्मी पाषांड. ६ कामशास्त्राची. ७ नृत्य करणारी स्त्री. ८ वेदांत कथेत राम-क्रीडेचे वर्णन शोभा देत नाही. ९ ब्रह्मनिष्ठासमोर. १० चोपडी, वही. ११ ताक. १२ म्हणणें. १३ अमृताला. १४ व्रत. १५ जारण मारण मंत्रांपैकी एका मंत्राचें अनुष्ठान. १६ कोणी वश होण्याविषयी मंत्रसाधन करतात ते. १७ परमार्थाची इच्छा करणारे. १८ ब्रह्मज्ञानरहित पुस्तकें. १९ संचारकरणें, विचारपूर्वक वाचणें. २० नाव. २१ पश्चात्ताप. † लागतें. २२ विरक्ति. २३ पतन. २४ परलोकाचा उपाय. २५ चकोरनामक पक्ष्यांचे. २६ चंद्रकिरणद्वारां प्राप्त होणारें अमृत. २७ वाट, आशा.

ज्ञान । भजकास पाहिजे भजन । साधकास पाहिजे साधन । इच्छेसारिखें ॥ ४१ ॥ परमार्थ्यास पाहिजे परमार्थ[1] । स्वार्थ्यास पाहिजे स्वार्थ । कृपणास पाहिजे अर्थ[2] । मनापासूनी ॥ ४२ ॥ योगियास पाहिजे योग । भोगियास[3] पाहिजे भोग । रोगियास पाहिजे रोगहरती[4] मात्रा ॥ ४३ । कवीस[5] पाहिजे प्रबंध । तार्किकास पाहिजे तर्कवाद । भाविकांस संवाद । गोड वाटे ॥ ४४ ॥ पंडितास पाहिजे व्युत्पत्ति[6] । विद्वानास अध्ययनप्रीति[7] । कलावंता आवडती । नाना कळा ॥ ४५ ॥ हरिदासां आवडे कीर्तन । शुचिभूर्तांस संध्यास्नान । कर्मनिष्ठा विधिविधान[8] । पाहिजे तें ॥ ४६ ॥ प्रेमळास पाहिजे करुणा । दक्षता पाहिजे विचक्षणा[9] । चातुर्य पाहे शाहाणा । आदरेंसी ॥ ४७ ॥ भक्त पाहे मूर्तिध्यान । संगीत[10] पाहे तालज्ञान । रागज्ञानी तानमान[11] । मूर्च्छना पाहे ॥ ४८ ॥ योगाभ्यासी पिंडज्ञान[12] । तत्त्वज्ञानी तत्त्वज्ञान । नाडीज्ञानी भोंव्राज्ञान[13] । पाहतसे ॥ ४९ ॥ कौमिक[14] पाहे कोकशास्त्र । चेटकी पाहे चेटकमंत्र । यत्री पाहे नानायंत्र । आदरेंसी ॥ ५० ॥ टवाळासि आवडे विनोद । उन्मत्तास नाना छंद । तामसास प्रमाद[15] । गोड वाटे ॥ ५१ ॥ मूर्ख होय नादलुब्धी[16] । निंदक पाहे उणी संधि । पापी पाहे पापबुद्धि[17] । लावून अंगा ॥ ५२ ॥ एकां पाहिजे रसाळ । एकां पाहिजे पाल्हाळ । एकां पाहिजे केवळ । सांबडी भक्ति[18] ॥ ५३ ॥ आगमी[19] पाहे आगम । शूर पाहे संग्राम । एक पाहती नानाधर्म । इच्छेसारिखे ॥ ५४ ॥ मुक्त पाहे मुक्तलीला । सर्वज्ञ पाहे सर्वकळा । ज्योतिषी भविष्य[20] पिंगळा[21] । वर्णू पाहे ॥ ५५ ॥ ऐसे सांगावे ते किती । आवडीसारिखें ऐकती । नाना पुस्तकें वाचिती । सर्वकाळ ॥ ५६ ॥ परी परब्रह्मसाधनेविण । म्हणों नये तें श्रवण । जेथें नाहीं आत्मज्ञान । तया नांव कर्मणुक[22] ॥ ५७ ॥ गोडीविण गोडपण । नाकेविण सुलक्षण[23] । ज्ञानेविण निरूपण । बोलोंचि नये ॥ ५८ ॥ आतां असो हें बहुत । ऐकावा परमार्थग्रंथ । परमार्थग्रंथेविण व्यर्थ । गोंधळगोवी[24] ॥ ५९ ॥ म्हणोनि नित्यानित्य विचार । जेथें बोलिला सारासार । तोचि ग्रंथ पैलपार । पावावी विवेकें ॥ ६० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सप्तमदशके श्रवणनिरूपणं नाम नवमः समासः ॥ ९ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ मिथ्या तेंचि झालें सत्य । सत्य तेंचि झालें असत्य । मायाविभ्रमाचें कृत्य[25] । ऐसें असे पाहतां ॥ १ ॥ सत्य कळावयाकारणें । बोलिलीं नाना निरूपणें । तरी उठेना धैर्यगुणें[26] । असत्याचें ॥ २ ॥ असत्य अंतरीं बिंबलें । न सांगतां तें

---

१ लोभ्याला. २ द्रव्य. ३ कामी मनुष्याला ४ रोगहरणी करणारी. ५ काव्यरचना. ६ विद्वत्ता, अर्थज्ञान. ७ शिकण्याची आवड. ८ सदाचाऱ्याला. ९ विधीचे अनुष्ठान. १० व्यवहारचतुराला. ११ गाणारा. १२ सप्तस्वरांत प्रथम स्वरापासून द्वितीय स्वरास आरंभ होईपर्यंत मधील तीन स्वरांश होतात ते. १३ शरीरज्ञान. १४ हेमगर्भादि मात्रांचें ज्ञान. १५ विषयी. १६ कामशास्त्र. १७ तमोगुणी मनुष्याला. १८ चुकी, भलतेंच करणे, १९ कांहीं कमी पडण्याची अथवा चूक होण्याची. २० भोळी, साधी. २१ वेदाभ्यासी. [1] वेद. २२ लढाई. २३ पुढे होणाऱ्या गोष्टी. २४ मेढेजोशी. २५ परलोकाच्या साधनावांचून. २६ गुंतागुंत. २७ मायेच्या मोहाचें. २७ हट्टानें बसणें, बांध.

दृढ झालें । सत्य असोनि हरपलें । जैथील तेथें ॥ ३ ॥ वेद शास्त्रें पुराणें सांगती । सत्याचा निश्चय करिती । तरी न ये आत्मप्रचीती[1] । सत्यस्वरूप[2] ॥ ४ ॥ सत्य असोन आच्छादलें । मिथ्या असोन सत्य झालें । ऐसें विपरीत वर्तलें । देखतदेखतां ॥ ५ ॥ ऐसी मायेची करणी । कळों आली तत्क्षणीं । संतसंगें निरूपणीं । विचार घेतां ॥ ६ ॥ मागां झालें निरूपण । देखिलें आपणासि आपण । तेणें बाणली खूण । परमार्थाची ॥ ७ ॥ तेणें समाधान झालें । चित्त चैतन्यीं मिळालें । निजरूपें ओळखिलें निर्जीववस्तूसी[3] ॥ ८ ॥ प्रारब्धीं टाकिला देहो[4] । बोधें फिटला संदेहो । आतांचि पडो अथवा राहो । मिथ्या केलेवर[5] ॥ ९ ॥ ज्ञानियांचें जें शरीर । तें मिथ्यात्वें निर्विकार । जेथें पडे तेचि सार[6] । पुण्यभूमि ॥ १० ॥ साधुदर्शनें पावन तीर्थ । पुरती त्यांचे मनोरथ । साधु न येतां जिणें व्यर्थ । तया पुण्यक्षेत्राचें ॥ ११ ॥ पुण्यनदीचें जें तीर । तेथें पडावें हें शरीर । हा इतरजनांचा विचार । साधु तो नित्यमुक्त[7] ॥ १२ ॥ उत्तरायण तें उत्तम । दक्षिणायन तें अधम । हा संदेहीं वसे भ्रम । साधु तो निःसंदेही ॥ १३ ॥ शुक्लपक्ष उत्तरायण । गृहीं दीप दिवामरण[8] । अंतीं राहावें स्मरण । गतीकारणें ॥ १४ ॥ इतुकें नलगे योगियासी । तो जितांचि मुक्त पुण्यराशी । तिळांजलि[9] पापपुण्याशीं । दिधली तेणें ॥ १५ ॥ देहाचा अंत बरा आला । देह सुखरूप गेला । त्यास म्हणती धन्य झाला । अज्ञान जन ॥ १६ ॥ जनाचें विपरीत मत । अंतीं भेटतो भगवंत । ऐसें कल्पून घात । करिती आपुला स्वयें ॥ १७ ॥ जितां[10] सार्थक नाहीं केलें । व्यर्थ आयुष्य निघोन गेलें । मुळीं धान्यचि नाहीं पेरिलें । तें उगवेल कैचें ॥ १८ ॥ जरी केलें ईश्वरभजन । तरीच होइजे पावन । जैसें वेव्हरितां[11] धान्य । राशी मोठां लाभे ॥ १९ ॥ दीधल्याविण पाविजेना । पेरिल्याविण उगवेना । ऐसें हें वाक्य जना । ठाउकेंचि आहे ॥ २० ॥ न करितां सेवेचा व्यापारा । स्वामीस म्हणणें कोठें मुर्शारा[12] । तैसें अंतीं अभक्त नरा । स्वहित न घडे ॥ २१ ॥ जितां[13] नाहीं भगवद्भक्ति । मेल्या कैंची होईल मुक्ति । असो जे जे जैसें करिती । ते ते पावती तैसें ॥ २२ ॥ एवं न करितां भगवद्भजन । अंतीं न होइजे पावन । जरी आलें बरवें मरण । तरी भक्तिविण अधोगती[14] ॥ २३ ॥ म्हणोन साधूनें आपुलें । जीत असतांच सार्थक केलें । शरीर कारणी लाविलें[15] । धन्य त्याचें ॥ २४ ॥ जे कां जीवन्मुक्त ज्ञानी । त्यांचें शरीर पडो रानीं । अथवा पडो स्मशानीं । तरी धन्य झाले ॥ २५ ॥ साधूचा देह खितपलें[16] । अथवा श्वानादिकीं भक्षिला । हें प्रशस्त न वाटे मनाला ।

---

१ आत्मानुभव. २ आत्मस्वरूपी. ३ परब्रह्माला. ४ प्रारब्धावर देह सोपविला. ५ शरीर. ६ मुख्य. ७ मकरसंक्रांतीपासून सहा महिन्यांचा काळ. ८ कर्कसंक्रांतीपासून धनसंक्रांतीपर्यंत सहा राशींत सूर्यादिकांची स्थिति असेपावेतो सहा महिन्यांचा काळ. ९ घरामध्यें. १० दिवसाला मरण. ११ सबंध तोडला. १२ जीवंत असतां. १३ धान्याचा व्यवहार केला असतां. १४ धान्य पेरलें किंवा वाढीदिढीनें लाविलें तर त्याची राम डोक्याइतकी उंच होते. १५ म्हण. १६ वेतन, पगार. १७ पतन, नरकवास. १८ जीवंत असूनही देहादि अभिमान सुटून शांतीकरून मुक्त. १९ दुःखित किंवा झुरत पडला. २० कुत्र्यांनीं वगैरे.

मंदबुद्धीस्तव ॥ २६ ॥ अंत बरा नव्होचि म्हणोन । कष्टी होती इतर जन । परी ते बापुडे अज्ञान । नेणती वर्म ॥ २७ ॥ जो जन्मलाचि नाहीं ठायींचा । त्यास मृत्यु येईल कैंचा । विवेकबळें जन्ममृत्यूंचा । घोंटें भेरिला जेणें ॥ २८ ॥ स्वरूपानुसंधानबळें । सगळी मायाच नाढळे । तयाचा पौर नकळे । ब्रह्मादिकांसी ॥ २९ ॥ तो जिताचि असतां मेला । मरणास मारून † ज्याला । जन्ममृत्यु न स्मरे त्याला । विवेकबळें ॥ ३० ॥ तो जनीं दिसतो परी वेगळा । वर्ततां भासे निराळा । दृश्य पदार्थ त्या निर्मळा । स्पर्शलाचि नाहीं ॥ ३१ ॥ असो ऐसे साधुजन । त्यांचें घडलिया भजन । तेणें भजनें पावन । इतर जन होती ॥ ३२ ॥ सद्गुरूचा जो अंकित साधक । तेणें केलाच करावा विवेक । विवेक केलिया तर्क । फुटे निरूपणीं ॥ ३३ ॥ हेंचि साधकासि निरवणें । अद्वैत प्रांजळ निरूपणें । तुमचेहि समाधान बाणे । साधूच ऐसें ॥ ३४ ॥ जो संतास शरण गेला । तो संतचि होऊन ठेला । इतरजनांस उपयोगा आला । कृपाळूपणें ॥ ३५ ॥ ऐसें संताचें महिमानें । संतसंगें होतें ज्ञान । संतसंगापरतें साधन । आणिक नाहीं ॥ ३६ ॥ गुरुभजनाचेनि आधारें । निरूपणाचेनि विचारें । क्रियाशुद्धि निर्धारें । पाविजे पदें ॥ ३७ ॥ परमार्थाचें जन्मस्थान । तेंचि सद्गुरूचें भजन । सद्गुरुभजनें समाधान । अकस्मात् बाणे ॥ ३८ ॥ देह मिथ्या जाणोनि जीवें । यांचें सार्थकाचि करावें । भजनभावें तोषवावें । चित्त सद्गुरूचें ॥ ३९ ॥ शरणागतांची वाहे चिंता । तो एक सद्गुरु दाता । जैसें बालक वाढवी माता । नाना यत्नेकरूनी ॥ ४० ॥ ॥ श्लोक ॥ यस्य देवे परा भक्तिर्यथा देव तथा गुरौ ॥ तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशंते महात्मनः ॥ श्वेताश्वतरउपनिषत्. ६—२३ ॥ म्हणोन सद्गुरूचें भजन । जयास घडे तोचि धन्य । सद्गुरूविण समाधान । आणिक नाहीं ॥ ४१ ॥ सरली शब्दाची खटपट । आला ग्रंथाचा शेवट । येथें सांगितलें स्पष्ट । सद्गुरुभजन ॥ ४२ ॥ सद्गुरुभजनापरतें कांहीं । मोक्षदायेंक दुसरें नाहीं । जयांस न मानें तीहीं । अवलोकावी गुरुगीता ॥ ४३ ॥ तेथें निरूपिलें बरवें । पार्वतीप्रति सदाशिवें । याकारणें सद्भावें । सद्गुरुचरण सेवावे ॥ ४४ ॥ जो ये ग्रंथीचा विवेक । विवंचूनी पाहे साधक । तयास सांपडे एक । निश्चय ज्ञानाचा ॥ ४५ ॥ ज्या ग्रंथीं बोलिलें अद्वैत । तो म्हणूं नये प्राकृत । सत्य जाणावा वेदांत । अर्थाविषयीं ॥ ४६ ॥ प्राकृतें वेदांत कळे । सकळ शास्त्रीं पाहतां ‡ मिळे । आणि समाधान निवळे । अंतर्यामीं ॥ ४७ ॥ तें प्राकृत म्हणो नय । जेथें ज्ञानाचे उपाय । मूर्खासि हें कळे काय । मर्कटी नारिकेळें जैसे ॥ ४८ ॥ आतां असो हें बोलणें । अधिकार

---

१ मूळचा. २ नाहींसा केला. ३ ब्रह्मस्वरूपाच्या ठिकाणीं सर्व मनोवृत्ति जडविल्याकारणानें. ४ आढळत नाहीं, अनुभवास येत नाहीं. ५ अंत. † जगला. ६ जिवंत राहिला. ७ आत्मानात्मविवेकाच्या बलानें त्याला जन्ममृत्यूंचें स्मरण नसतें. ८ संसारांत वागत असतां. ९ त्या शुद्ध पुरुषाला. १०साधकावर सोपविणें.११ माहात्म्य.१२ मोक्षपद.१३ देहाचें.१४ मोक्षसुखदेणारें. १५ खरें वाटत नाहीं. १६ विचार करून. ‡ जुळतो. १७ माकडाला. १८ नारळ.

परत्वें घेणें । शिंपीमधील मुक्त [1]उणें । म्हणों नये ॥ ४९ ॥ जेथें नेति[2] नेति[3] श्रुति । तेथें न चले भाषाव्युत्पत्ति[4] । परब्रह्म आदि अंतीं । अनिर्वाच्य[5] ॥ ५० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सप्तमदशके देहातीतनिरूपणं नाम दशमः समासः ॥ १० ॥

ज्ञानदशक.

दशक आठवा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ श्रोतीं व्हावें सावध । विमळ[6] ज्ञान बालबोध । गुरुशिष्यांचा संवाद । अतिसुगम परियेसा ॥ १ ॥ नाना शास्त्रें धांडोळितां । आयुष्य पुरेना सर्वथा । अंतरीं संशयाची व्यथा । वाढोंचि लागे ॥ २ ॥ नाना तीर्थें थोरथोरें । सृष्टीमध्यें अपारें । सुगमें दुर्गमें दुष्करें । पुण्यदायकें ॥ ३ ॥ ऐशीं तीर्थें सर्वहि करी । ऐसा कोण रे संसारीं । फिरों जातां जन्मवरी । आयुष्य पुरेना ॥ ४ ॥ नाना तपें नाना दानें । नानायोग नानासाधनें । हीं सर्वहि देवाकारणें । करिजेत आहे ॥ ५ ॥ पावावया देवाधिदेवा । बहुविध श्रम करावा । तेणें देव ठायीं पडावा । हें सर्वमत ॥ ६ ॥ पावावया भगवंतातें । नानापंथ नानामतें । तया देवाचें स्वरूप तें । कैसें आहे ॥ ७ ॥ बहुत देव सृष्टीवरी । त्यांची गणना कोण करी । एक देव कोणेपरी । ठायीं[7] पडेना ॥ ८ ॥ बहुविध उपासना । ज्याची जेथें पुरे कामना । तो तेथेंचि राहिला मना । सदृढ करूनी ॥ ९ ॥ बहु देव बहु भक्त । इच्छा झाले आसक्त । बहु ऋषि बहु मत । वेगळाले ॥ १० ॥ बहु निवडितां निवडेना । एक निश्चय घडेना । शास्त्रें भांडतीं पडेना । निश्चय ठायीं ॥ ११ ॥ बहुत शास्त्रीं बहुत भेद । मतांमतांमि विरोध । ऐसा करितां विवाद । बहुत गेले ॥ १२ ॥ सहस्त्रामध्यें कोणी एक । पाहे देवाचा विवेक[8] । परी त्या देवाचें कौतुक । ठायीं नें[9] [10]पडे ॥ १३ ॥ ठायीं न पडें ऐसें म्हणतां । तेथेंचि लागली अहंता[11] । देव राहिला परता । अहंतागुणें ॥ १४ ॥ आतां असो हें बोलणें । नाना योगें[12] ज्या कारणें । तो देव कोण्यागुणें । ठायीं पडे ॥ १५ ॥ देव कोणास म्हणावें । कैसें तयास जाणावें । तेंचि बोलणें स्वभावें । बोलिजेल ॥ १६ ॥ जेणें केलें चराचर । केले सृष्ट्यादि व्यापार । सकळकर्ता निरंतर । नाम जयाचें ॥ १७ ॥ जेणें केल्या मेघभोळा । चंद्राबिंबीं अमृतकळा । तेज दिधलें रविमंडळा । जया देवें ॥ १८ ॥ ज्याची मर्यादा सागरा । जेणें स्थापिलें फणिवरा[13] । जयाचेनि गुणें तारा । अंतरिक्षीं[14] ॥ १९ ॥

---

१ मोती. २ कर्मा, हलकें. ३ असें नाहीं, असें नाहीं. ४ वेद. ५ भाषेची विद्वत्ता. ६ वर्णन करण्यास कठीण. ७ निर्मळ. ८ सोपें व स्पष्ट. ९ प्राप्त व्हावा, कळावा. १० इच्छा. ११ देवाविषयीं विचार करितो. १२ समजत नाहीं. १३ मीपणा, अभिमान. १४ योगसाधनें. १५ सर्व स्थावरजंगम सृष्टि. १६ मेघांचे समूह. १७ अमृताच्या कला (अंश) १८ शेषाला. १९ चांदण्या. २० आकाशांत.

चारी खाणी[1] चारी वाणी । चौऱ्यायंशीं लक्ष[2] योनी । जेणें निर्मिले लोक[3] तिन्ही[4] । तया नांव देव ॥ २० ॥ ब्रह्मा विष्णु आणि हर[5] । हे जयाचे अवतार । तोचि देव हा निर्धार । निश्चयेसी ॥ २१ ॥ देव्हारांचा[6] उठोनि देव । करू नेणे सर्व जीव । तयाचेनि ब्रह्मकटाव[7] । † निर्मिला नवचे ॥ २२ ॥ ठायीं ठायीं देव असती । तींहीं केली नाहीं क्षिति[8] । चंद्र सूर्य तारा जीमूती[9] । तयांचेनि नव्हे ॥ २३ ॥ सर्वकर्ता तोचि देव । पाहूं जातां निरवयव[10] । ज्याची कळा लीला लाघव । नेणती ब्रह्मादिक ॥ २४ ॥ येथें आशंका उठिली । ती पुढिलिये समासीं फिटली । आतां वृत्ति सावध केली । पाहिजे श्रोतीं ॥ २५ ॥ पैस अवकाश आकाश[11] । कांहींच नाहीं जे भकाश[12] । तया निर्मळीं वायूस[13] । जन्म जाहला ॥ २६ ॥ वायूपासूनि झाला वन्ही[14] । वन्हीपासूनि झालें पाणी । ऐशी जयाची करणी । अघटित घडली ॥ २७ ॥ उदकापासूनि क्षिति[15] झाली । स्तंभेंविण[16] उभारिली । ऐशी विचित्र कळा केली । त्या नांव देव ॥ २८ ॥ देवें निर्मिली हे क्षिति । तिचे पोटीं पाषाण होती । तयासीच देव म्हणती । विवेकहीन ॥ २९ ॥ जो सृष्टिनिर्माणकर्ता । तो ये सृष्टीपूर्वी होता । मग हे तयाची ‡ सत्ता । निर्माण[17] जाहली ॥ ३० ॥ कुलाल[18] पात्रापूर्वी आहे । पात्र कांहीं कुलाल नव्हे । तैसा देव पूर्वीच आहे । पाषाण नव्हे सर्वथा ॥ ३१ ॥ मृत्तिकेचें सैन्य केलें । कर्तेवेगळें राहिलें । कार्य कारण एक केलें । तरी होणार नाहीं ॥ ३२ ॥ तथापि होईल पांचभौतिक । निर्गुण नव्हे कांहीं एक । कार्यकारणाचा विवेक । भूतांपरता नाहीं ॥ ३३ ॥ अवघी सृष्टि जो कर्ता । तो ते सृष्टीहूनि परता । तेथें संशयाची वार्ता । काढूंच नये ॥ ३४ ॥ खांबसूत्रींची बाहुली[19] । जेणें पुरुषें नाचविली । तोचि बाहुली हे बोली । घडे केवीं ॥ ३५ ॥ छोयामंडपींची सेना[20] । सृष्टीसारखी रचना । सूत्रें चाळी परी तो[21] नाना । व्यक्ती नव्हे ॥ ३६ ॥ तैसा सृष्टिकर्ता देव । परी तो नव्हे सृष्टीभाव[22] । जेणें केले नाना जीव । तो जीव कैसेनी ॥ ३७ ॥ जें जया करणें पडे । तो तें हें कैसें घडे । म्हणोनि वायांचि बापुडे । संदेहीं पडती ॥ ३८ ॥ सृष्टिऐसींचे स्वभावें । गोपुरें[23] निर्मिलें बरवें । परी तो गोपुरकर्ता नव्हे । निश्चयेसी ॥ ३९ ॥ तैसें जग निर्मिलें जेणें । तो वेगळा पूर्णपणें । एक म्हणती मूर्खपणें । जग तोचि जगदीश ॥ ४० ॥ एवं जगदीश तो वेगळा । जगनिर्माण ज्याची कळा । तो सर्वांमध्यें परी निराळा । असोनि सर्वीं ॥ ४१ ॥ म्हणोनि भूतांचा

---

१ उद्भिज्ज, अंडज, जारज, स्वेदज. २ परा, पश्यंती, मध्यमा, वैखरी. ३ एकवीस लक्ष अंडज खाणीत, एकवीस लक्ष जारज खाणीत, एकवीस उद्भिज्ज खाणीत आणि एकवीस लक्ष स्वेदज खाणीत. ४ स्वर्ग, मृत्यु, पाताल. ५ शंकर. ६ देव्हाऱ्यांतील. ७ ब्रह्मांड गोल. † उत्पन्न केला जाणार नाही. ८ पृथ्वी. ९ मेघ. १० अवयवरहित. ११ पोकळ. १२ अग्नि. १३ चमत्कारिक. १४ पृथ्वी. १५ खांबाशिवाय. ‡ त्याच्या सत्तेनें. १६ उत्पन्न. १७ कुंभार. १८ क्रियासिद्धीचें साधन. १९ बारीक शुभ्र वस्त्राचा पडदा सोडून आंत दिवा ठेवून त्यामधून मनुष्यादिकांचीं कागदांचीं चित्रें फिरविल्यानें ज्या पडद्यावर त्यांच्या मोठ्या छाया दिसतात तो पडदा. २० चाळविणारा. २१ सृष्टीतील पदार्थ. २२ देवळाच्या पुढील दरवाज्यावर लोडाचे आकाराचा उंच मनोरा.

कर्दम[1] । त्यासि अलिप्त[2] आत्माराम । अविद्यागुणें माया[3]भ्रम । सत्यचि वाटे ॥ ४२ ॥ मायोपाधि[4] जगडंबर[5] । आहे सर्वहि साचार[6] । ऐसा विपरीत विचार । कोठेंचि नाहीं ॥ ४३ ॥ म्हणोनि जग मिथ्या, साच आत्मा । सर्वांपर जो परमात्मा । अंतर्बाह्य अंतरात्मा । व्यापूनि असे ॥ ४४ ॥ तयास म्हणावें देव । येर हें अवघेंचि वाव । ऐसा आहे अंतर्भाव[7] । वेदांतींचा ॥ ४५ ॥ पदार्थ वस्तु नाशवंत । हें तों अनुभवास येत । याकारणें भगवंत । पदार्थावेगळा[8] ॥ ४६ ॥ देव निर्मळ आणि अचळ । शास्त्रें बोलती सकळ । तया निश्चळास चंचळ । म्हणों नये सर्वथा ॥ ४७ ॥ देव आला देव गेला । देव उपजला[9] देव मेला । ऐसें बोलतां दुरितालागे[10] । काय उणें ॥ ४८ ॥ जन्ममरणांची वार्ता । देवास न लागे सर्वथा । देव अमर जयाची सत्ता । त्यास मृत्यु कैसेनी ॥ ४९ ॥ उपजणें आणि मरणें । येणें जाणें दुःख भोगणें । हें त्या देवाचें करणें । तो कारणावेगळा ॥ ५० ॥ अंतःकरण पंचप्राण । बहुतत्त्वीं पिंडज्ञान[11] । या सर्वांस आहे चळण । म्हणोनि देव नव्हती ॥ ५१ ॥ एवं कल्पनेरहित । तया नांव भगवंत । तेथें देवपणाची मात । भासत नाहीं ॥ ५२ ॥ तंव शिष्यें आक्षेपिलें[12] । तरी हें कैसें ब्रह्मांड केलें । कर्तेपणें कारण पडिलें । कार्यामध्यें ॥ ५३ ॥ द्रष्टेपणें द्रष्टा दृश्यीं । जैं सांपडे अनायासीं । कर्तेपणें निर्गुणासी । गुण तैसे ॥ ५४ ॥ ब्रह्मांडकर्ता कवण । कैसी त्याची वोळखण । देव सगुण कीं निर्गुण । मज निरूपावा ॥ ५५ ॥ एक म्हणती त्या ब्रह्मातें । इच्छामात्रें सृष्टिकरितें । सृष्टिकरितें त्यापरतें । कोण आहे ॥ ५६ ॥ आतां असो हे बहुबोली । सकळ माया कोठूनि झाली । ते हे आतां निरूपिली । पाहिजे स्वामी ॥ ५७ ॥ ऐसें ऐकून वचन । वक्ता म्हणे सावधान । पुढिलिये समासीं निरूपण । सांगिजेल ॥ ५८ ॥ ब्रह्मीं माया कैसी झाली । पुढें असे निरूपिली[13] । श्रोतीं वृत्ति सावध केली । पाहिजे आतां ॥ ५९ ॥ पुढें हेंचि निरूपण । विशद केलें श्रवण । जेणें होय समाधान । साधकांचें ॥ ६० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अष्टमदशके देवदर्शननिरूपणं नाम प्रथमः समासः ॥ १ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ मागां श्रोतीं आक्षेपिलें । तें पाहिजे निरूपिले । निरवयवीं कैसें झालें । चराचर[14] ॥ १ ॥ याचें ऐसें प्रतिवचन[15] । ब्रह्म जें कां सनातन । तेथें माया मिथ्या भान[16] । विवर्तरूप[17] भासे ॥ २ ॥ आदि एक परब्रह्म । नित्य मुक्त अक्रिय[18] परम । तेथें अव्याकृत[19] सूक्ष्म । जाहली मूळमाया ॥ ३ ॥ ॥ श्लोक ॥ आद्यमेकं परब्रह्म नित्यमुक्तमविक्रियम् । तस्य मायासमावेशो जीवमव्याकृतात्मकम् ॥ १ ॥ आशंका ॥ एक ब्रह्म निराकार । मुक्त अक्रिय निर्विकार । तेथें मायाविडंबर[20] । कोठूनि जाहली ॥ ४ ॥ ब्रह्म

---

१ चिखल. २ वेगळा. ३ अज्ञानामुळे. ४ मायेचा मोह. ५ मायारूप उपाधीने (उपसर्गाने) असणारे. ६ जगद्रूप पसारा. ७ खरे. ८ अभिप्राय. ९ जन्मला. १० पापाला. ११ शरीरज्ञान. १२ शंका काढली. १३ सांगितली. १४ उघड, स्पष्ट. १५ अवयवरहित, निराकार, त्याच्या ठिकाणी. १६ स्थावरजंगमात्मक सृष्टि. १७ उत्तर. १८ अनादिसिद्ध, शाश्वत. १९ भास. २० मूळ वस्तूच्या ठायीं अन्यरूपानें दिसणारें. २१ क्रियाविरहित. २२ अप्रकट. २३ मायारूपी गारुडी विद्या.

अखंड निर्गुण । तेथें इच्छा धरी कोण । निर्गुणीं सगुणेविण । इच्छा नाहीं ॥ ५ ॥ मुळीं असेचिना सगुण । म्हणोनि नामें निर्गुण । तेथें जाहलें सगुण । कोणेपरी ॥ ६ ॥ निर्गुणाचि गुणा आलें । ऐसें जरी अनुवादलें[1] । तरी पाहे येथें बोलें । मूर्खपण ॥ ७ ॥ एक म्हणती निरवयव । करून अकर्ता तो देव । त्याची लीला बापुडे जीव । काय जाणती ॥ ८ ॥ एक म्हणती तो परमात्मा । कोण जाणे त्याचा महिमा । प्राणी बापुडा जीवात्मा । काय जाणे ॥ ९ ॥ उगाच महिमा सांगती । शास्त्रार्थ अवघाच लोपिती । बळेंच निर्गुणास म्हणती । करूनि अकर्ता ॥ १० ॥ मुळींच नाहीं कर्तव्यता । कोण करूनि अकर्ता । कर्ता अकर्ता हे वार्ता । समूळ मिथ्या ॥ ११ ॥ जें ठायींचें निर्गुण । तेथें कैचें कर्तेपण । तरी हे इच्छा धरी कोण । सृष्टि रचावयाची ॥ १२ ॥ इच्छा परमेश्वराची । ऐसी युक्ति बहुतेकांची । परी त्या निर्गुणास इच्छा कैंची । हें कळेना ॥ १३॥ तरी हें इतुकें कोणें केलें । किंवा आपणचि झालें । देवेविण उभारिलें । कोणेपरी ॥ १४ ॥ देवेविण जाहलें सर्व । मग देवास कैंचा ठाव । येथें देवाचा अभाव[2] । दिसोन आला ॥ १५ ॥ देव म्हणों सृष्टिकर्ता । तरी येऊं पाहे सगुणता । निर्गुणपणाची वार्ता । देवाची बुडाली ॥ १६ ॥ देव ठायींचा निर्गुण । तरी सृष्टिकर्ता कोण । ‡ कर्तेपणाचें सगुण । नाशवंत ॥ १७ ॥ येथें पडिला कीं विचार । कैसें जाहलें चराचर । माया म्हणों स्वतंत्र । तरी हें विपरीत दिसे ॥ १८ ॥ माया कोणी नाहीं केली । हे आपणचि विस्तारली । ऐसें बोलतां बुडाली । देवाची वार्ता ॥ १९ ॥ देव निर्गुण स्वतःसिद्ध । त्यासि मायेसी काय संबंध । ऐसें बोलतां विरुद्ध । दिसोन आलें ॥ २० ॥ सकळ कांहीं कर्तव्यता । आली मायेच्याचि माथां । तरी भक्तांसि उद्धरितां[4] । देव नाहीं कीं ॥ २१ ॥ देवेविण नुसती माया । कोण नेईल[5] विलया । आम्हां भक्तांस सांभाळाया । कोणीच नाहीं ॥ २२ ॥ म्हणोनि माया स्वतंत्र । ऐसा न घडे कीं विचार । मायेसि निर्मिता[6] सर्वेश्वर । तो एकचि आहे ॥ २३ ॥ तरी तो कैसा आहे ईश्वर । मायेचा कैसा विचार । तरी हें आतां सविस्तर । बोलिलें पाहिजे ॥ २४ ॥ श्रोतीं व्हावें सावधान । एकाग्र करूनियां मन । आतां कथानुसंधान[7] । सावध ऐका ॥ २५ ॥ एके आशंकेचा भाव । जनीं वेगळाले अनुभव । तेहि बोलिजेती सर्व । यथानुक्रमें ॥ २६ ॥ एक म्हणती देवें केली । म्हणोनि हे विस्तारली । देवास इच्छा नसती झाली । तरी हे माया कैंची ॥ २७ ॥ एक म्हणती देव निर्गुण । तेथें इच्छा तरी कोण । माया मिथ्या हे आपण । जाहलीच नाहीं ॥ २८ ॥ एक म्हणती प्रत्यक्ष दिसे । तयेसि नाहीं म्हणतां कैसे । माया हे अनादि असे[8] । शक्ति ईश्वराची ॥ २९ ॥ एक म्हणती साच असे । तरी हे ज्ञाने कैसी निरसे[9] । साचासारखीच दिसे । परी हे मिथ्या ॥ ३० ॥ एक म्हणती मिथ्या स्वभावें । तरी साधन कासया करावें । भक्तिसाधन बोलिलें देवें । मायात्यागा-

---

१ सांगितलें. २ मूळचें. ३ नसणें. ‡ कर्ता जर सगुण असेल तर तो नाशवंत आहे. ४ उद्धार करणारा. ५ नाशाला, लयाला. ६ उत्पन्न करणारा. ७ कथेचा संबंध. ८ जीस आरंभ नाहीं असी. ९ नाश पावते.

कारणें ॥ ३१ ॥ एक म्हणती मिथ्या दिसतें । भय अज्ञानसन्निपातें । साधनऔषध घेइजे तें । परी तें दृश्य मिथ्या ॥ ३२ ॥ अनंत साधनें बोललीं । नाना मतें भांबावलीं । तरी माया नेवचे त्यागिली । मिथ्या कैसी म्हणावी ॥ ३३ ॥ मिथ्या बोले योगवाणी । मिथ्या वेदशास्त्रीं पुराणीं । मिथ्या नाना निरूपणीं । बोलिली माया ॥ ३४ ॥ माया मिथ्या म्हणतां गेली । हे वार्ता नाही ऐकिली । मिथ्या म्हणतांच लागली । समागमें ॥ ३५ ॥ जयाचे अंतरीं अज्ञान । नाहीं वोळखिले सज्जन । तयास माया मिथ्याभान । सत्याचि वाटे ॥ ३६ ॥ जेणें जैसा निश्चय केला । तयासि तैसाच फेळला । पाहे तोचि दिसे बिंबला । तैसी माया ॥ ३७ ॥ एक म्हणती माया कैंची । आहे तें सर्व ब्रह्मची । थिजल्या विघुरल्या घृताची । ऐक्यता न मोडे ॥ ३८ ॥ थिजलें आणि विघुरलें । हें स्वरूपीं नाहीं बोलिलें । साहित्य भंगलें येणें बोलें । म्हणती एक ॥ ३९ ॥ एक म्हणती सर्व ब्रह्म । हें नकळे ज्यास वर्म । तयाचे अंतरींचा भ्रम । गेलाचि नाहीं ॥ ४० ॥ एक म्हणती एकचि देव । तेथें कैंचें आणिलें सर्व । सर्व ब्रह्म हें अपूर्व । आश्चर्य वाटे ॥ ४१ ॥ एक म्हणती एकचि खरें । तेथें आनुही नाहीं दुसरें । सर्व ब्रह्म येणेंप्रकारे । सहजचि जाहलें ॥ ४२ ॥ सर्व मिथ्या एकसरें । उरलें तेंचि ब्रह्म खरें । ऐसीं वाक्यें शास्त्राधारें । बोलती एक ॥ ४३ ॥ अलंकार आणि सुवर्ण । तेथें नाहीं भिन्नपण । आटाआटी व्यर्थ शिण । म्हणती एक ॥ ४४ ॥ हीनें उपमा एकदेशी । कैसी † साहेल वस्तूसी । वर्णव्यक्त अव्यक्तासी । साम्यता न घडे ॥ ४५ ॥ सुवर्णीं दृष्टि घालितां । मुळींच आहे व्यक्तता । अलंकार सोनें पाहतां । सोनेंचि असे ॥ ४६ ॥ मुळीं सोनेंचि व्यक्त । जड एकदेशी पीतें । पूर्णास अपूर्णाचा दृष्टांत । केवी घडे ॥ ४७ ॥ दृष्टांत तितुका एकदेशी । देणें लागे कळायासी । सिंधु आणि लहरीसी । भिन्नत्व कैंचें ॥ ४८ ॥ उत्तम मध्यम कनिष्ठ । एका दृष्टांतें कळे स्पष्ट । एका दृष्टांतें नष्ट । संदेह वाटे ॥ ४९ ॥ कैंचा सिंधु कैंची लहरी । अचळास चळाची सरी । साच ऐसी वोडंबरी । मानूंच नये ॥ ५० ॥ वोडंबरी हे कल्पना । नाना भास दाखवी जना । येरव्हीं हें जाणा । ब्रह्माचि असे ॥ ५१ ॥ ऐसा वाद एकमेकां । लागतां राहिली आशंका । तेचि आतां पुढें ऐका । सावध होऊनि ॥ ५२ ॥ माया मिथ्या कळों आली । परी ते ब्रह्मीं कैसी झाली । म्हणावी ते निर्गुणें केली । तरी तें मुळींच मिथ्या ॥ ५३ ॥ मिथ्या शब्दीं

---

१ अज्ञान हाच कोणा सन्निपात ज्वर त्याने. २ टाकिला जात नाही. ३ साधला, मिळाला. ४ आरशांत जो पहातो त्याचेंच प्रतिबिंब दिसतें. ५ पातळ झालेल्या. ६ तुपाची ७ सारखेपणा, उपमा. ८ तूप थिजते व विघुरते पण स्वरूपीं थिजणें व विघुरणें मुळींच नाहीं म्हणून तूप व स्वरूप यांचा सारखेपणा नाहीं. ९ अणुमात्र, किंचितही. १० एकदम. ११ सोनें. १२ कमी. १३एकतर्फी. † सोसेल, लागू पडेल.१४ वर्णामुळें–रूपामुळें–प्रकट.१५ अप्रकट जो त्याला.१६ ज्याचें रूप व्यक्त आहे तें व ज्याचे रूप अव्यक्त आहे ते, यां दोहोंत साम्यता नाहीं. १७ स्पष्ट रूप. १८ पिंवळें. १९ उपमा. २० नाहींसा झालेला. २१ बरोबरी, उपमा. २२ जादूनें उत्पन्न केलेला पदार्थ.

कांहींच नाहीं । तेथें केलें कोणें काई । करणें निर्गुणाचे ठायीं । हेंहि अघटित ॥ ५४ ॥ कर्ता ठायींचा अरूप । केलें तेंहि मिथ्यारूप । तथापि फेडूं आक्षेप[1] । श्रोतयांचा ॥ ५५ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अष्टमदशके आशंकानिरूपणं नाम द्वितीयः समासः ॥ २ ॥

श्रीगणेशायनमः ॥ ॥ अरे जें झालेंचि नाहीं । त्याची वार्ता पुसशी काई । तथापि सांगों जेणें कांहीं । संशय नुरे ॥ १ ॥ दोरीकरितां भुजंग[2] । जळा करितां तरंग[3] । मार्तंडाकरितां चांग[4] । मृगजळ वाहे ॥ २ ॥ कल्पनेकरितां स्वप्न दिसे । शिंपीकरितां रुपें भासे । जळाकरितां गार वसे । निमिष एक ॥ ३ ॥ माती-करितां भिंती झाली । सिंधूकरितां लहरी आली । तिळाकरितां पुतळी[5] । दिसों लागे ॥ ४ ॥ सोन्याकरितां अलंकार । तंतूकरितां झालें चीर[6] । कांसवाकरितां विस्तार । हातापायांचा ॥ ५ ॥ तप होतें तरी थिजलें । तरीकरितां मीठ[7] झालें । बिंबाकरितां बिंबलें । प्रतिबिंबे[8] ॥ ६ ॥ पृथ्वीकरितां झालें झाड । झाडाकरितां छाया वाड[9] । धातू-करितां पर्वाड[10] । उंच नीच वर्णांचा ॥ ७ ॥ आतां असो हे दृष्टांत[11] । अद्वैतास कैंचें द्वैत । द्वैतेविण अद्वैत । बोलतांच नये ॥ ८ ॥ भासाकरितां भास भासे । दृश्या-करितां अदृश्य दिसे । अदृश्यास उपमा नसे । म्हणोनि निरुपम ॥ ९ ॥ कल्पनेविरहित हेत । दृश्यावेगळा दृष्टांत । द्वैतावेगळें अद्वैत । कैसें जाहलें ॥ १० ॥ विचित्र भग-वंताची करणी[12] । वर्णवेना सहस्रफणी[13] । तेणें केली उभवणी[14] । अनंत ब्रह्मांडांची ॥ ११ ॥ परमात्मा परमेश्वर । सर्वकर्ता जो ईश्वर । तयापासूनि विस्तार । सकळ जाहला ॥ १२ ॥ ऐसीं अनंत नामें धरी । अनंत शक्ति निर्माण करी । तोचि जाणावा चतुरीं । मूळपुरुष ॥ १३ ॥ त्या मूळ पुरुषाची वोळखण । ते मूळमायाचि आपण । सकळ कांहीं कर्तेपण । तेथेंचि आलें ॥ १४ ॥ ॥ श्लोक ॥ कार्यकारणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिरुच्यते ॥ भ० गी० १३-२०. हें उघड बोलतां नय । मोडों पहातो ‡ उपाय । येऱ्हवीं हें पहातां काय । साच आहे ॥ १५ ॥ देवापासून सकळ झालें । हें सर्वांस मानलें । परी त्या दे-वास वोळखिलें । पाहिजे ॥ १६ ॥ सिद्धाचें जें निरूपण[15] । तें साधकांस न मने[16] जाण । पक्क नाहीं अंतःकरण । म्हणोनियां ॥ १७ ॥ अविद्यागुणें[17] बोलिजे जीव । मायागुणें[18] बोलिजे शिव । मूळमायागुणें देव । बोलिजे तो ॥ १८ ॥ म्हणोनि कारण मूळमाया । अनंत शक्ति धरावया । तेथींचा अर्थ जाणावया । अनुभवी पाहिजे ॥ ॥ १९ ॥ मूळमाया तोचि मूळपुरुष । तोचि सर्वांचा ईश । अनंतनामी जगदीश । तयासीच बोलिजे ॥ २० ॥

---

१ मूळचा. २ शंका. ३ सत्य दोरीच्या अस्तित्वावर मिथ्या भुजंग भासतो. ४ सर्प. ५ लाट. ६ सूर्यामुळें. ७ चांगलें. ८ पळभर. ९ डोळ्यांतील तीळ त्यापासून. १० बाहुली. ११ वस्त्र. १२ खाडीपासून. १३ छाया. १४ मोठी. १५ सुवर्णादि धातूपासून. १६ मोठेपणा. १७ उपमा. १८ कृत्य. १९ शेषाला. २० रचना. २१ द्वैत नाहीं, असें म्हटल्यावर श्रवणमननादि ब्रह्मप्राप्तीचे उपाय नष्ट होतील, म्हणून द्वैत नाहीं असें उघड बोलतां येत नाहीं. ‡ साधन. २२ सिद्धांचा "द्वैत नाहीं" हा जो सिद्धांत तो साधकांस मानत नाहीं; कारण त्याचें हृदय पक्क नसतें. २३ मलिनसत्त्वमाये. मुळें २४ शुद्धसत्त्व प्रधान माया.

अवघी माया विस्तारली । परी हे निःशेष नाथिली । ऐशीया वचनाची खोली । विरळा जाणे ॥ २१ ॥ ऐसें अनिर्वाच्य बोलिजे । परी हें स्वानुभवें जाणिजे । संतसंगेविण नुमजे । कांहीं केल्या ॥ २२ ॥ माया तोचि मूळपुरुष । साधकां न मने हें निःशेष । परी अनंतनामी जगदीश । कोणास म्हणावें ॥ २३ ॥ नामरूप मायेस लागलें । तरी हें बोलणें नीटाचि झालें । तेथें श्रोतीं अनुमानिलें । कासयासी ॥ २४ ॥ आतां असो हें सकळ बोली । मागील आशंका राहिली । निराकारीं कैशी झाली । मूळमाया ॥ २५ ॥ दृष्टिबंधन मिथ्या सकळ । परी तो कैसा झाला खेळ । हें अवघें निवळ । करूनि दाऊं ॥ २६ ॥ आकाश असतां निश्चळ । मध्यें झाला वायु चंचळ । तैसी जाणावी केवळ । मूळमाया ॥ २७ ॥ रूप वायूचें झालें । तेणें आकाश भंगलें । ऐसें हें सत्य मानिलें । नवचे कीं कदा ॥ २८ ॥ तैसी मूळमाया झाली । आणि निर्गुणता संचली । येणें दृष्टांतें तुटली । मागील आशंका ॥ २९ ॥ वायु नव्हे पुरातन । तैसी मूळमाया जाण । साच म्हणतां पुनः लीन । होत असे ॥ ३० ॥ वायु रूपें कैसा आहे । तैसी मूळमाया आहे । भासे परी ते न लाहे । रूप तयेचें ॥ ३१ ॥ वायु सत्य म्हणों जातां । परी तो न ये दाखवितां । तयाकडे पाहों जातां । धुळीच दिसे ॥ ३२ ॥ ऐसी मूळमाया भासे । भासे परी ते न दिसे । पुढे विस्तारली असे । माया अविद्या ॥ ३३ ॥ जैसें वायूचेनि योगें । दृश्य उडे गगनमार्गें । मूळमायेच्या संयोगें । तैसें जग ॥ ३४ ॥ गगनीं आभाळ नाथिलें । अकस्मात् उद्भवलें । मायेचेनि गुणें झालें । तैसें जग ॥ ३५ ॥ नाथिलेंचि गगनें नव्हते । अकस्मात् आलें तेथें । तैसें दृश्य झालें येथें । तैसीयापरी ॥ ३६ ॥ परी तया आभाळाकारितां । गगनाची गेली निश्चळता । वाटे परी तें तत्त्वतां । तैसेंचि आहे ॥ ३७ ॥ तैसें मायेकरितां निर्गुण । वाटे झालें सगुण । परी तें पाहतां संपूर्ण । जैसें तैसें ॥ ३८ ॥ आभाळ आलें आणि गेलें । तरी गगन तें संचलें । तैसें गुणा नाहीं आलें । निर्गुण ब्रह्म ॥ ३९ ॥ नभ माथां लागलें दिसे । परी तें जैसें तैसें असे । तैसें जाणावें विश्वासें । निर्गुण ब्रह्म ॥ ४० ॥ ऊर्ध्व पाहतां आकाश । नीलिमा दिसे सावकाश । परी तो जाणिजे मिथ्या भास । भासला असे ॥ ४१ ॥ आकाश पालथें घातलें । चहूंकडे आटोपलें । वाटे विश्वास कोंडिलें । परी तें मोकळेंचि असे ॥ ४२ ॥ पर्वतीं निळा रंग दिसे । परी तो तया लागला नसे । अलिप्त जाणावें तैसें । निर्गुण ब्रह्म ॥ ४३ ॥ रथ धांवतां पृथ्वी चंचळ । वाटे, परी ते असे निश्चळ । तैसें परब्रह्म केवळ । निर्गुण जाणावें ॥ ४४ ॥ † आभाळाकरितां तो मृगांक । वाटे धांवतो निःशंक । परी तें अवघें § मायिक । * आभाळ चळे ॥ ४५ ॥ झळे अथवा अग्निज्वाळ । तेणें कांपत दिसे अंतराळ । वाटे परी तें निश्चळ । जैसें तैसें ॥ ४६ ॥ तैसें स्वरूप हें संचलें–। असतां वाटे गुणें ओलें । ऐसें कल्पनेसीं गमलें । परी तें मिथ्या ॥ ४७ ॥

---

१ खोटी. २ नजरबंद. ३ स्पष्ट. ४ दिसणारी धूळ. ५ आकाश. ६ आभाळाच्या योगानें. ७ खरोखर. ८ सांठलें. ९ वर. १० निळेपणा. ११ कांहीं संबंध नसलेलें. † ढगांमुळें. १२ चंद्र. § खोटें. * ढग पळतात. १३ सूर्याची प्रखर किरणें, अथवा जाळ. १४ पोकळी. १५ आकार पावलें.

दृष्टिबंधनाचा खेळ । तैसी हे माया चंचळ । वस्तु शाश्वत निश्चळ । जैसी तैसी ॥ ४८ ॥ ऐसी वस्तु निरवयव । माया दाखवी अवयव । इचा ऐसाचि स्वभाव । ¶ नाथिलीचि हे ॥ ४९ ॥ माया पाहतां मुळींच नसे । परी हे साचीऐसी भासे । उद्भवे आणि निरसे । आभाळ जैसें ॥ ५० ॥ ऐसी माया उद्भवली । वस्तु निर्गुण संचली । अहं ऐसी स्फूर्ति झाली । तेचि माया ॥ ५१ ॥ गुणमायेचे पवाडे । निर्गुणीं हें कांहींच न घडे । परी हें घडे आणि मोडे । स्वस्वरूपीं ॥ ५२ ॥ जैसी दृष्टि तरळली । तेणें सेनाच भासली । पाहतां आकाशींच झाली । तरी ते मिथ्या ॥ ५३ ॥ मिथ्या मायेचा खेळ । उद्धव बोलिला सकळ । नाना तत्त्वाचा पोल्हाळ । सांडूनियां ॥ ५४ ॥ तत्त्वें मुळींच आहेती । ओंकार वायूची गति । तेथींचा अर्थ जाणती । दक्ष ज्ञानी ॥ ५५ ॥ मूळमायेचें चळण । तेंचि वायूचें लक्षण । सूक्ष्मतत्त्वें तेंचि जाण । जडत्वा पावलीं ॥ ५६ ॥ ऐसीं पंचमहाभूतें । पूर्वी होतीं अव्यक्तें । पुढें झाली व्यक्तें । सृष्टिरचनेसी ॥ ५७ ॥ मूळमायेचें लक्षण । तेंचि पांचभौतिक जाण । त्याची पाहे वोळखण । सूक्ष्मदृष्टीं ॥ ५८ ॥ आकाशीं वायूविण । इच्छाशब्द करी कोण । इच्छाशक्ति तेचि जाण । तेजस्वरूप ॥ ५९ ॥ मृदुपण तेंचि जळ । जडत्व पृथ्वी केवळ । ऐसी मूळमाया सकळ । पांचभौतिक जाणावी ॥ ६० ॥ एकएका भूतापोटीं । पंचभूतांची रोहटी । सर्व कळे सूक्ष्मदृष्टीं । घालून पाहतां ॥ ६१ ॥ पुढें जडत्वास आलीं । तरी असतीं कालवलीं । ऐशी माया विस्तारली । पांचभौतिक ॥ ६२ ॥ मूळमाया पाहतां मुळीं । अथवा अविद्या भूमंडळीं । स्वर्ग मृत्यु पाताळीं । पांचचि भूतें ॥ ६३ ॥ श्लोक ॥ स्वर्गे मृत्यौ च पाताले यत्किंचित्सचराचरं ॥ सर्वं तत्पंचभौतिक्यं पष्टं किंचिन्न दृश्यते ॥ टीका ॥ ॥ सत्यस्वरूप आदि अतीं । मध्यें पंचभूतें वर्तती । पांचभौतिक जाणिजे श्रोतीं । मूळमाया ॥ ६४ ॥ येथें उठली आशंका । सावध होऊन ऐका । पंचभूतें झालीं एका । तमोगुणापासूनी ॥ ६५ ॥ मूळमाया गुणापरती । तेथें भूतें कैंचीं होतीं । ऐसी आशंका श्रोतीं । घेतली मागां ॥ ६६ ॥ ऐसें श्रोतीं आक्षेपिलें । संशयास उभें केलें । याचें उत्तर दीधलें । पुढिलिये समासीं ॥ ६७ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अष्टमदशके सूक्ष्मशंकानिरूपणं नाम तृतीयः समासः ॥ ३ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ मागील आशंकेचें मूळ । आतां होईल प्रांजळ । वृत्ति करावी निवळ । निमिष एक ॥ १ ॥ ब्रम्हीं मूळमाया झाली । तिच्या पोटीं गुणमाया आली । मग ते गुणास प्रसवली । म्हणोनि गुणक्षोभिणी ॥ २ ॥ पुढें तिजपासीं कोण । सत्त्व रज तमोगुण । तमोगुणापासून निर्माण । जाहलीं पंचभूतें ॥ ३ ॥ ऐसीं

---

१ नजरबंद. ¶ खोटी. २ खऱ्याप्रमाणें. ३ नाश पावते. ४ मी. ५ कीर्ति. ६ परब्रह्मरूपीं. ७ भ्रमली चळली. ८ गंधर्व नगर. ९ उत्पत्ति. १० विस्तार. ११ ओम् हा उच्चार. १२ अप्रकट. १३ बोटेल तो शब्द. १४ अग्निरूप. १५ संचार. १६ मलिनसत्त्वप्रधान माया. १७ शंका काढिली. १८ उघड, स्पष्ट. १९ गुणांचा क्षोभ–फैलाव–करणारी. २० तिच्यापासून.

भूतें उद्भवलीं । पुढें तत्त्वें विस्तारलीं । एवं तमोगुणापासून झालीं । पंच महाभूतें ॥ ४ ॥ मूळमाया गुणापरती । तेथें भूतें कैचीं होतीं । ऐसी आशंका श्रोतीं । घेतली मागें ॥ ५ ॥ आणिक एकएके भूतीं । पंचभूतें असती । तेहि आतां कैशी स्थिति । प्रांजळ करूं ॥ ६ ॥ सूक्ष्मदृष्टीचें कौतुक । मूळमाया पांचैभौतिक । श्रोतीं विमळ विवेक । केला पाहिजे ॥ ७ ॥ आधीं भूतें तीं जाणावीं । रूपें कैसीं वोळखावीं । मग तीं शोधून पहावीं । सूक्ष्मदृष्टीं ॥ ९ ॥ वोळखी नाहीं अंतरीं । ते वोळखावी कोणेपरी । म्हणोनि वोळखी चतुरीं । नावेकै[3] पारिसावी ॥ ९ ॥ जें जें जड आणि कठिण । तें तें पृथ्वीचें लक्षण । मृदु आणि ओलेपण । तितुकें आप ॥ १० ॥ जें जें उष्ण आणि सतेज । तें तें जाणावें पै[5] तेज । आतां वायुहि सहज । निरूपिजेल ॥ ११ ॥ चैतन्य[6] आणि चंचळ । तो हा वायुचि केवळ । शून्य अवकाशें[7] निर्मळ । आकाश जाणावें ॥ १२ ॥ ऐशीं पंचमहाभूतें । वोळखी धरावी संकेतें[8] । आतां ऐकीं पंचभूतें । सावध ऐका ॥ १३ ॥ जे त्रिगुणाहूनि † पर । त्याचा सूक्ष्म विचार । यालागीं अति तत्पर । होऊनि ऐका ॥ १४ ॥ सूक्ष्म आकाशीं कैशी पृथ्वी । तेचि आधीं निरूपावी । येथें धारणा धरावी । श्रोतेजनीं ॥ १५ ॥ आकाश म्हणजे अवकाश शून्य । शून्य म्हणिजे तें अज्ञान । अज्ञान म्हणिजे जडत्व जाण । तेचि पृथ्वी ॥ १६ ॥ आकाश स्वयें आहे मृद । तेंचि आप स्वतःसिद्ध । आतां तेजहि विशद । करून दावूं ॥ १७ ॥ अज्ञानें भासला भास । तोचि तेजाचा प्रकाश । आतां वायु सावकाश । सांकल्यें सांगों ॥ १८ ॥ वायु आकाशा नाहीं भेद । आकाशाइतुका असे स्तब्ध । तथापि आकाशीं जो निरोधै[3] । तोचि वायु ॥ १९ ॥ आकाशीं आकाश मिसळलें । हें तों नलगेचि बोलिलें । येणें प्रकारें निरूपिलें । आकाश पंचभूत ॥ २० ॥ वायुमध्यें पंचभूतें । तींहि ऐका एकाचित्तें । बोलिजेती समस्तें । यथान्वयें[14] ॥ २१ ॥ हेळू[15] फूल तरी जडै[16] । हेळू वारा, तरी निबिडै[17] । वायु लागतां कडाड । मोडती झाडें ॥ २२ ॥ तोलेविणें[18] झाड मोडे । ऐसें हें कांहींच न घडे । तोल तोचि तये जडे[19] । पृथ्वीचा अंश ॥ २३ ॥ येथें श्रोते आशंका घेती । तेथें कैचीं झाडें होतीं । झाडें नव्हती तरी शक्ति । कठिणरूप आहे ॥ २४ ॥ वन्हिस्फुलिंग[20] लहान । कांहीं तरी असे उष्ण । तैसें सूक्ष्मीं जडपण । सूक्ष्मरूपें ॥ २५ ॥ मृदुपण तेंचि आप । भास तेजाचें स्वरूप । वायु तेथें चंचळरूप । सहजचि आहे ॥ २६ ॥ सकळांस मिळोन आकाश । सहजाचि आहे अवकाश । पंचभूतांचे अंश । वायुमध्यें निरूपिलें ॥ २७ ॥ आतां तेजाचें लक्षण । भासलें पण तेंचि कठिण । तेजीं ऐसी वोळखण । पृथ्वीयेची ॥ २८ ॥ भासला भास वाटे मृदै[21] । तेजीं आप तेंचि प्रसिद्ध । तेजीं तेज स्वतःसिद्ध । सांगणेंचि

---

१ पृथ्व्यादिपंचभूतात्मक. २ स्वच्छ, शुद्ध. ३ क्षणभर. ४ उदक. ५ निश्चयेकरून. ६ चेतनायुक्त. ७ पोकळी, जागा. ८ सुणेनें. ९ एकेक. † पलीकडचें. १० सांगावी. ११ बुद्धि. १२ सविस्तर, पूर्णपणें. १३ प्रतिबंध. १४ अनुक्रमानें. १५ हलका. १६ ज्या वाऱ्याच्या मानानें फूलहि जड आहे. १७ दाट. १८ जड ओझें झाल्यावांचून. १९ त्या जड पृथ्वीचा अंश. २० विस्तवाची ठिणगी. २१ मऊ.

नलगे ॥ २९ ॥ तेजीं वायु तो चंचळ । तेजीं आकाश निश्चळ । तेजीं पंचभूतें सकळ । निरूपिलीं ॥ ३० ॥ आतां आपाचें लक्षण । आप तेंचि जें मृदुपण । मृदुपण तें कठिण । तेचि पृथ्वी ॥ ३१ ॥ आपी आप सहजचि असे । तेज मृदुपणें भासे । वायु स्तब्धपणें दिसे । मृदुत्वाअंगीं ॥ ३२ ॥ आकाश नलगे सांगावें । तें व्यापकाचि स्वभावें । आणि पंचभूतांचीं नांवें । सूक्ष्में निरूपिलीं ॥ ३३ ॥ आतां पृथ्वीचें लक्षण । कठिण पृथ्वी आपण । कठिणत्वीं मृदुपण । तेंचि आप ॥ ३४ ॥ कठिणत्वाचा जो भास । तोचि तेजाचा प्रकाश । कठिणत्वीं निरोधांश । तोचि वायु ॥ ३५ ॥ आकाश सकळांस व्यापक । हा तों प्रकटचि विवेक । आकाशींच कांहींएक । भास भासे ॥ ३६ ॥ आकाश तोडितां तुटेना । आकाश फोडितां फुटेना । आकाश पेरतें होइना । तिळमात्र ॥ ३७ ॥ असो आतां पृथ्वीअंत । दाविला भूतांचा संकेत । एके भूतीं पंचभूत । तेंहि निरूपिलें ॥ ३८ ॥ परी हें आहाच पहातां नातुडे । बळेंच पोटीं संदेह पडे । भ्रांतिरूपें अहंता जडे । अकस्मात् ॥ ३९ ॥ सूक्ष्मदृष्टीनें पाहतां । वायुचि वाटे तत्त्वतां । सूक्ष्मवायु शोधूं जातां । पंचभूतें दिसती ॥ ४० ॥ एवं पांचभौतिक पवन । तेचि मूळमाया जाण । माया आणि सूक्ष्म त्रिगुण । तेहि पांचभौतिक ॥ ४१ ॥ भूतें गुण मेळविजे । त्यासि अष्टधा बोलिजे । पांचभौतिक जाणिजे । अष्टधा प्रकृति ॥ ४२ ॥ शोधूनि पाहिल्याविण । संदेह धरणें मूर्खपण । याची पहावी वोळखण । सूक्ष्मदृष्टीं ॥ ४३ ॥ गुणापासून भूतें । पावलीं स्पष्टदशेतें । जडत्वा येऊनि समस्तें । तत्त्वें जाहलीं ॥ ४४ ॥ पुढें तत्त्वविवंचना । पिंडब्रह्मांडतत्त्वरचना । बोलिलीसे ते जना । प्रकटचि आहे ॥ ४५ ॥ हा भूतेकर्दम बोलिला । सूक्ष्मसंकेतें दाविला । ब्रह्मगोळ उभा राहिला । तत्पूर्वी ॥ ४६ ॥ या ब्रह्मांडापैलीकडील गोष्टी । जें झाली नव्हती सृष्टि । मूळमाया सूक्ष्मदृष्टीं । वोळखावी ॥ ४७ ॥ सप्तकंचुक प्रचंड । झाले नव्हते ब्रह्मांड । मायाअविद्येचें बंड । ऐलीकडे ॥ ४८ ॥ ब्रह्मा विष्णु महेश्वर । हा ऐलीकडील विचार । पृथ्वी मेरु सप्त सागर । ऐलीकडे ॥ ४९ ॥ नाना लोक नाना स्थानें । चंद्र सूर्य तारांगणें । सप्त द्वीपें चौदा भुवनें । ऐलीकडे ॥ ५० ॥ शेष कूर्म सप्त पाताळ । एकवीस स्वर्ग अष्ट दिक्पाळ । तेहतीस कोटि देव सकळ । ऐलीकडे ॥ ५१ ॥ बारा आदित्य अकरा रुद्र । नव नाग सप्त ऋषीश्वर । नाना देवांचे अवतार । ऐलीकडे ॥ ५२ ॥ मेघ मनु चक्रवर्ती । नाना जीवांची उत्पत्ति । आतां असो सांगों किती । विस्तार हा ॥ ५३ ॥ सकळ विस्ताराचें

---

१ व्यापून राहणारे. २ स्वतः. ३ अग्नीचा. ४ प्रतिबंध करणारा धर्म. ५ दूर. ६ सहज, बरबर. ७ समजत नाहीं. ८ पृथ्व्यादि पंचभूते, त्यांशीं. ९ सत्त्व, रज, तम. १० आठ प्रकारची. 'भूमिरापोनलो वायुः खं मनोबुद्धिरेव च । अहंकार इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा' भ० गी० ७-४. ११ भूतांचा चिखल, भूतांचे एकमेकांशीं मिश्रण. १२ ब्रह्मांड. १३ पंचभूतें, अहंकार व महत्तत्त्व मिळून सप्त कंचुक-आवरणें. १४ जंबु, प्लक्ष, शाल्मली, कुश, क्रौंच, शाक, पुष्कर. १५ सप्तस्वर्ग आणि सप्त पाताळ. १६ इंद्र, अग्नि यम इत्यादि आठ दिशांचे पति. १७ सूर्य. १८ ब्रह्मदेवाचे दिवसांत चवदा मनु (कालाधिकारी) होतात. १९ सार्वभौम.

मूळ । ते मूळमायाच केवळ । मागां निरूपिलें सकळ । पांचभौतिक ॥ ५४ ॥ सूक्ष्म भूतें जे बोलिली । तेचि पुढें जडत्वा आली । ते सकळहि बोलिली । पुढिलिये समासीं ॥ ५५ ॥ पंचभूतें पृथगाकारें । पुढें निरूपिलीं विस्तारें । वोळखीकारणें अत्यादरें । श्रोतीं श्रवण करावीं ॥ ५६ ॥ पांचभौतिक ब्रह्मगोळ । जेणें कळे हा प्रांजळ । दृश्य सांडून केवळ । वस्तुचि पाविजे ॥ ५७ ॥ महाद्वार वोलांडावें । मग देवदर्शन घ्यावें । तैसें दृश्य हें सांडावें । जाणोनियां ॥ ५८ ॥ म्हणोनि दृश्याचें पोटीं । आहे पंचभूतांची दाटी । एकपणें पडिली मिठी । दृश्य पंचभूतां ॥ ५९ ॥ पंचभूतांचींच दृश्य । सृष्टि रचिली सावकाश । श्रोतीं करूनि अवकाश । श्रवण करावें ॥ ६० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अष्टमदशके सूक्ष्मपंचभूतनिरूपणं नाम चतुर्थः समासः ॥ ४ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ केवळ मूर्ख तें नेणे । म्हणोनि घडलें सांगणें । पंचभूतांचीं लक्षणें । विशद करूनि ॥ १ ॥ पंचभूतांचा कर्दमे जाहला । आतां नवचे वेगळा केला । परंतु कांहीं वेगळाला । करून दावूं ॥ २ ॥ पर्वत पाषाण शिळा शिखरें । नाना वर्णें लहान थोरें । खडे गुंडे बहुप्रकारें । जाणिजे पृथ्वी ॥ ३ ॥ नाना रंगांची मृत्तिका । नाना स्थळोस्थळीं जे कां । वाळुके वाळू अनेका । मिळोन पृथ्वी ॥ ४ ॥ पुरें पट्टणें मनोहरें । नाना मंदिरें दुमदुमरें । नाना देवालयें शिखरें । मिळोन पृथ्वी ॥ ५ ॥ सप्तद्वीपवती पृथ्वी । काय म्हणोनि सांगावी । नवखंडें मिळोनि जाणावी । वसुंधरा ॥ ६ ॥ नाना देश नाना नृपती । नाना भाषा नाना रीती । लक्ष चौऱ्यांशी उत्पत्ति । मिळोन पृथ्वी ॥ ७ ॥ नाना उद्वसें वनें । नाना तरुवरांचीं बनें । गिरिकंदरें नाना स्थानें । मिळोन पृथ्वी ॥ ८ ॥ नाना रचना केली देवीं । जे जे निर्मिली मानवीं । सकळ मिळोन पृथ्वी । जाणिजे श्रोतीं ॥ ९ ॥ नाना धातु सुवर्णादिक । नाना रत्नें जीं अनेक । नाना काष्ठ वृक्षादिक । मिळोन पृथ्वी ॥ १० ॥ आतां असो हें बहुवस । जडांश आणि कठिणांश । सकळ पृथ्वी हा विश्वास । मानिला पाहिजे ॥ ११ ॥ बोलिलें पृथ्वीचें रूप । आतां सांगिजेल आपें । श्रोतीं वोळखावें रूप । सावध होऊनि ॥ १२ ॥ वापी कूपें सरोवर । नाना सरितांचें जें नीर । मेघ आणि सप्तसागर । मिळोन आप ॥ १३ ॥ ॥ श्लोकार्ध ॥ ॥ क्षारक्षीरसुरासर्पिर्दधिचेक्षुजलं तथा ॥ ॥ क्षारसमुद्र दिसताहे । सकळ जन दृष्टीस पाहे । जेथें लवण होत आहे । तोचि क्षारसिंधु ॥ १४ ॥ एक दुधाचा सागर । त्या नांव क्षीरसागर । देवें दिधला निरंतर । उपमन्यूसी ॥ १५ ॥ एक समुद्र मद्याचा । एक जाणा घृताचा । एक निखळ दह्याचा । समुद्र असे ॥ १६ ॥ एक उसाच्या रसाचा । एक तो शुद्ध जळाचा । ऐसा सातां समुद्रांचा । वेढा पृथ्वीसी ॥ १७ ॥ एवं भूमंडळींचें जळ । नाना स्थळींचें जें

---

१ वेगवेगळ्या आकारांनीं. २ ब्रह्मांड. ३ स्पष्ट. ४ स्पष्ट. ५ चिखल, कालवा. ६ वाळूचे ढीग. ७ श्रीमंतांच्या हवेल्या. ८ पृथ्वी. ९ उजाड, भयाण. १० राई. ११ पर्वतांच्या गुहा. १२ उदक. १३ विहिरी. १४ आड. १५ नद्यांचें. १६ खारट समुद्र. १७ मीठ. १८ शंकरानीं. १९ दारूचा. २० केवळ.

सकळ । मिळोन अवघें केवळ । आप जाणावें ॥ १८ ॥ पृथ्वीगर्भीं कितीक । पृथ्वी-तळीं आवरणोदेक[1] । तिहीं लोकींचें उदक । मिळोन आप ॥ १९ ॥ नाना वल्ली बहुवस[2] । नाना तरुवरांचे रस । मध पारा अमृत विष । मिळोन आप ॥ २० ॥ नाना रस स्नेहादिक[3] । यांहि वेगळे अनेक । जळाऐसें आवश्यक । आप बोलिजे ॥ २१ ॥ सौद्र आणि शीतळ । जळासारिखें पातळ । शुक्र शोणितें[4] मूत्र लाळ[5] । आप बोलिजे ॥ २२ ॥ आप संकेतें जाणावें । पातळ ओलें वोळखावें । मृदु शीतळ स्वभावें । आप बोलिजे ॥ २३ ॥ झाला आपाचा संकेत । पातळ मृदु गुळगुळीत । स्वेद[6] श्लेष्मा अश्रु समस्त । आप जाणावें ॥ २४ ॥ तेज ऐका सावधपणें । चंद्र सूर्य तारागणें । दिव्य देह सतेजपणें । तेज बोलिजे ॥ २५ ॥ वन्हि मेघीं विद्युल्लता । वन्हि सृष्टिसंहारिता । वन्हि सागरा जाळिता । वडवानळ[8] ॥ २६ ॥ वन्हि शंकराचे नेत्रींचा । वन्हि काळाचे क्षुधेचा । वन्हि परिघे[9] भूगोळाचा । तेज बोलिजे ॥ २७ ॥ जें जें सतेज प्रकाशरूप । तें तें तेजाचें स्वरूप । शोषक उष्णादि आरोप । तेज जाणावें ॥ २८ ॥ वायु जाणावा चंचळ । चैतन्य चेतवी[11] केवळ । बोलणें चालणें सकळ । वायूमुळें ॥ २९ ॥ डोले हाले तितुका पवन । कांहींच न चले पवनेविण । सृष्टि चालाया[12] कारण । मूळ तो वायु ॥ ३० ॥ चळण वळण प्रसरण । निरोधन आणि आकुंचन । सकळ जाणावा पवन । चंचळरूपी ॥ ३१ ॥ प्राण अपान आणि व्यान । चौथा उदान पांचवा समान[13] । नाग कूर्म कृकल जाण । देवदत्त धनंजय[14] ॥ ३२ ॥ जितुकें कांहीं होतें चळण[15] । तितुकें वायूचें लक्षण । चंद्र सूर्य तारागण । वायुचि धर्ता ॥ ३३ ॥ आकाश जाणावें पोकळ[16] । निर्मळ आणि निश्चळ । अवकाशरूप सकळ । आकाश जाणावें ॥ ३४ ॥ आकाश सकळांस व्यापक । आकाश अनेकीं एक । आकाशामध्यें कौतुक । चहूं भूतांचें ॥ ३५ ॥ आकाशाऐसें नांहीं सार । आकाश सकळांहूनि थोर । पाहतां आकाशाचा विचार । स्वरूपासारिखा[19] ॥ ३६ ॥ तंव श्रोतीं केलां आक्षेप[20] । दोहींचें सारखेंचि रूप । तरी आकाशचि स्वरूप[21] । कां ह्मणों नये ॥ ३७ ॥ आकाश स्वरूपा कोण भेद । पाहतां दिसती अभेद । आकाशवस्तु स्वतःसिद्ध[22] । कां न म्हणावी ॥ ३८ ॥ वस्तु अचळ अढळ । वस्तु निर्मळ निखळ । तैसेंच आकाश केवळ । वस्तुसारिखें ॥ ३९ ॥ ऐकोनि वक्ता बोले वचन । वस्तु निर्गुण पुरातन । आकाशाअंगीं सप्त गुण । शास्त्रीं निरू-पिले ॥ ४० ॥ काम क्रोध शोक मोहो । भय अज्ञान शून्यत्व पाहो । ऐसा सप्तविध[23] स्वभावो । आकाशाचा ॥ ४१ ॥ ऐसें शास्त्रकारें बोलिलें । ह्मणोनि आकाश भूत झालें । स्वरूप निर्विकार संचलें । उपमेरहित ॥ ४२ ॥ कांचबंदी[24] आणि जळ । सारि-

---

१ वेष्टनरूप जल. २ तेल वगैरे स्निग्ध पदार्थ. ३ ओलसर. ४ रेत. ५ रक्त. ६ घाम. ७ कफ, लाळ. ८ समुद्रातील अग्नि. ९ वेढा. १० सजीव वस्तु. ११ जागृत करतो. १२ हालचाल होण्याकरितां. १३ प्रतिबंध. १४ हे पंचप्राण. १५, १६ नाग, कूर्म, कृकल, देवदत्त व धनंजय हे पंच उपप्राण आहेत. १७ हालचाल. १८ पोकळीरूप. १९ परब्रह्मासारखा. २० शंका काढली. २१ परब्रह्म. २२ स्वयंभू. २३ सात प्रकारांचा. २४ कांचेची जमीन.

खोंचि वाटे सकळ । परी एक कांच एक जळ । शाहणे जाणती ॥ ४३ ॥ स्वामध्यें स्फटिक पडिला । लोकीं तद्रूप देखिला । तेणें कपाळमोक्ष झाला । कापुस न करी ॥ ४४ ॥ तांदुळामध्यें श्वेत खडे । तांदुळासारिखे वांकडे । चाऊं जातां दांत पडे । तेव्हां कळे ॥ ४५ ॥ विभागामध्यें खडा अने । विभागासारिखाचि भासे । शोधूं जातां वेगळा दिसे । कठिणपणें ॥ ४६ ॥ गुळासारिखा गुळदगड । परी तो कठिण निचाड । नागकांडी आणि वेखंड । एक म्हणों नये ॥ ४७ ॥ सोनें आणि सोनपितळ । एकचि वाटती केवळ । परी पितळेस लागतां ज्वाळ । काळिमा चढे ॥ ४८ ॥ असो हे हीन दृष्टांत । आकाश म्हणिजे केवळ भूत । तें भूत आणि अनंत । एक कैसें ॥ ४९ ॥ वस्तूसि वर्णाचि नसे । आकाश श्यामवर्ण भासे । दोहींस साम्यता कैसे । करिती विचक्षण ॥ ५० ॥ श्रोते ह्मणती कैचें रूप । आकाश ठायींचें अरूप । आकाश वस्तूच तद्रूप । भेद नाहीं ॥ ५१ ॥ चहूंभूतांस नाश आहे । आकाश कैसें नासताहे । आकाशां न साहे । वर्णव्यक्तिविकारें ॥ ५२ ॥ आकाश अचळ दिसतें । त्याचें काय नासों पाहतें । पाहतां आमुचेनि मतें । आकाश शाश्वत ॥ ५३ ॥ ऐसें ऐकोन वचन । वक्ता बोले प्रतिवचन । ऐक आतां लक्षण । आकाशाचें ॥ ५४ ॥ आकाश तमापासून झालें । म्हणोनि कामक्रोधें वेष्टिलें । अज्ञान शून्यत्व बोलिलें । नाम तयाचें ॥ ५५ ॥ अज्ञानें कामक्रोधादिक । मोह भय आणि शोक । हा अज्ञानाचा विवेकें । आकाशगुणें ॥ ५६ ॥ नास्तिक नकारवचन । तेंचि शून्याचें लक्षण । तयास म्हणती हृदयशून्य । अज्ञान प्राणी ॥ ५७ ॥ आकाश स्तब्धपणें शून्य । ह्मणिजे तें अज्ञानशून्य । अज्ञान ह्मणिजे कठिण । रूप तयाचें ॥ ५८ ॥ कठिण शून्य विकारवंत । तयास कैसें म्हणावें संत । मनास वाटे हें तद्वत । आहाच दृष्टि ॥ ५९ ॥ अज्ञान कालवलें आकाशीं । तया कर्दमीं ज्ञान नाशी । म्हणोनियां आकाशासी । नाश आहे ॥ ६० ॥ तैसें आकाश आणि स्वरूप । पाहतां वाटती एक रूप । परी दोहींमध्यें विक्षेप । शुन्यत्वाचा ॥ ६१ ॥ आहाच पाहतां कल्पनेसी । सारिखेंच वाटे निश्चयेसी । परी आकाश स्वरूपासी । भेद आहे ॥ ६२ ॥ उन्मनी आणि सुषुप्तिअवस्था । सारिखीच वाटे तत्त्वतां । परी विवंचून पाहूं जातां । भेद आहे ॥ ६३ ॥ खोटें खऱ्यासारिखें भाविती । परी परीक्षावंत निवडिती । कां कुरंगें देखोनि भुलती । मृगजळासी ॥ ६४ ॥ आतां असोत हे दृष्टांत । बोलिलों कळाया संकेत । म्हणोनि भूत आणि अनंत । एक नव्हेती ॥ ६५ ॥ आकाश वेगळेपणें पाहावें । स्वरूपीं स्वरूपचि व्हावें । वस्तूचें पाहणें स्वभावें । ऐसें असें ॥ ६६ ॥ येथें

---

१ कापसामध्यें. २ कपाळ फुटणें. ३ पांढरे. ४ चुना, वाळू, ताग यांचा गारा, त्यामध्यें. ५ गुळांतील दगड. ६ केवळ, निखालस. ७ वचनाग. ८ कमी. ९ पंडित. १० मूळचें. ११ आकाश हें मूर्तिमंत ब्रह्मच आहे. १२ रंग, आकार हे भेद. १३ विचार. १४ अंतःकरण शून्य. १५ सतत राहणारें, सत्य. १६ त्याचप्रमाणें. १७ वरवर पाहिलें असतां. १८ निखलाला. १९ आड-थळा, विघ्न, प्रतिबंध. २० पांचवी आनंदाची अवस्था. २१ जागृति आणि स्वप्न या दोहोंहून तिसरी अवस्था, गाढ झोंप. २२ मानिती. २३ हरिणें. २४ ब्रह्माचें.

शंका फिटली । संदेहवृत्ति मावळली । भिन्नपणें नवचे अनुभविली । स्वरूपस्थिति ॥ ६७ ॥ आकाश अनुभवा येतें । स्वरूप अनुभवापरतें । म्हणोनियां आकाशातें । साम्यता न घडे ॥ ६८ ॥ दुग्धासारिखा जळांश । निवडूं जाणती राजहंस । तैसें स्वरूप आणि आकाश । संत जाणती ॥ ६९ ॥ सकळ माया गोंथागोवी । संतसंगें हे उगवावी । पाविजे मोक्षपदवी । सत्समागमें ॥ ७० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अष्टमदशके पंचमहाभूतस्वरूपाकाशभेदनिरूपणं नाम पंचमः समासः ॥ ५ ॥

श्रीगणेशायनमः ॥ ॥ श्रोता विनवी वक्त्यासी । सत्संगाची महिमा कैसी । मोक्ष लाभे किती दिवशीं । हें मज निरूपावें ॥ १ ॥ धरितां साधूची संगति । किती दिवशीं होते मुक्ति । हा निश्चय कृपामूर्ति । मज दीनास करावा ॥ २ ॥ मुक्ति लाभे तत्क्षणीं । विश्वासतां निरूपणीं । दुश्चितपणें हानी । होत असे ॥ ३ ॥ सुचितपणें दुश्चित । मन होतें अकस्मात् । त्यास करावें निवांत । कोणेपरी ॥ ४ ॥ मनाच्या तोडून वोढी । श्रवणीं बैसावें आवडीं । सावधपणें घडीनें घडी । काळ सार्थक करावा ॥ ५ ॥ अर्थप्रमेयें ग्रंथांतरीं । शोधूनि घ्यावें अभ्यंतरीं । दुश्चितपण आलें तरी । पुन्हा श्रवण करावें ॥ ६ ॥ अर्थांतर पाहिल्याविण । उगेचि करी जो श्रवण । तो श्रोता नव्हे पाषाण । मनुष्यवेषें ॥ ७ ॥ येथें श्रोते मानितील शिणें । आम्हांसि केलें पाषाण । तरी पाषाणाचें लक्षण । सावध ऐका ॥ ८ ॥ वांकुडा तिकुडा फोडिला । पाषाण घडून नीट केला । दुसरे वेळेस पाहिला । तरी तो तैसाचि असे ॥ ९ ॥ टांकीनें खपली फोडिली । ते मागुतीं नाहीं जडली । मनुष्याची कुबुद्धि झाडिली । तरी ते पुन्हा लागे ॥ १० ॥ सांगतां अवगुण गेला । पुन्हा मागुता जडला । याकारणें महा भला । पाषाणगोटा ॥ ११ ॥ ज्याचा अवगुण झडेना । तो पाषाणाहून उणा । पाषाण आगळा जाणा । कोटिगुणें ॥ १२ ॥ कोटिगुणें कैसा पाषाण । त्याचेहि ऐका लक्षण । श्रोतीं करावें श्रवण । सावध होऊनि ॥ १३ ॥ माणिक मोतीं प्रवाळ । पाच वैडूर्य वज्र नीळ । गोमेदमणि परिस केवळ । 'पाषाण' बोलिजे ॥ १४ ॥ यांहि वेगळे बहुत । सूर्यकांत सोमकांत । नाना मोहोरे सप्रचीत । औषधाकारणें ॥ १५ ॥ यांहे वेगळे पाषाण भले । नाना तीर्थीं जे लागले । वापी कूपें सेखी झाले । हरिहरमूर्ती ॥१६॥ याचा पाहतां विचार । पाषाणाऐसें नाहीं सार । मनुष्य तें काय पामर । पाषाणापुढें ॥ १७ ॥ तरी तो ऐसा नव्हे पाषाण । जो अपवित्र निष्कारण । तयासारिखा देह जाण । दुश्चित अभक्तांचा ॥ १८ ॥ आतां असो हें बोलणें । घात होतो दुश्चितपणें । दुश्चितपणाचेनि गुणें । प्रपंच ना परमार्थ ॥ १९ ॥ दुश्चितपणें कार्य नासे । दुश्चितपणें चिंता वसे । दुश्चितपणें स्मरण नसे ।

---

१ गुंतागुत. २ उकलावी. ३ दुर्लक्ष्यानें. ४ स्वस्थ बसल्यानें. ५ शांत. ६ वृत्ति. ७ अर्थाचें ज्ञान, सिद्धांत, तत्त्व. ८ ग्रंथांमध्ये. ९ हृदयांत. १० दुःख, त्रास. ११ दुर्गुण. १२ कमी, हीन. १३ अधिक. १४ पोंबळें. १५ एकजातीचा रत्नमणि. १६ हिरा. १७ औषधमणि. १८ विहिरी. १९ आड. २० सरतेशेवटीं.

क्षणक्षण पाहतां ॥ २० ॥ दुश्चितपणें शत्रुजिणें[1] । दुश्चितपणें जन्ममरणें । दुश्चितपणाचेनि गुणें । हानि होय ॥ २१ ॥ दुश्चितपणें नव्हे साधन । दुश्चितपणें न घडे भजन । दुश्चितपणें नव्हे ज्ञान । साधकासी ॥ २२ ॥ दुश्चितपणें नव्हे निश्चय । दुश्चितपणें न घडे जय । दुश्चितपणें होय क्षय । आपुल्या स्वहिताचा ॥ २३ ॥ दुश्चितपणें न घडे श्रवण । दुश्चितपणें न घडे विवरण[2] । दुश्चितपणें निरूपण । हातींचें जाय ॥ २४ ॥ दुश्चितपणें बैसलासि दिसे । परी तो असताचि नसे । चंचळचक्रीं पडिलें असे । मानस तयाचें ॥ २५ ॥ वेडें पिशाच निरंतर । अंध मुके आणि बधिर । तैसा जाणावा संसार । दुश्चित प्राणियांचा ॥ २६ ॥ सावध असोनि उमजेना । श्रवण[3] असोन ऐकेना । ज्ञान असोन कळेना । सारासार विचार ॥ २७ ॥ ऐसा जो दुश्चित आळशी । परलोक कैंचा त्यासी । जयाचे जीवीं अहर्निशीं[4] । आळस वसे ॥ २८ ॥ दुश्चितपणापासून सुटला । तरी तो सर्वेंचि[5] आळस आला । आळसाहातीं प्राणियाला । उसंतचि[6] नाहीं ॥ २९ ॥ आळसें राहिला विचार । आळसें बुडाला आचार । आळसें नव्हे पाठांतर । कांहीं केल्ना ॥ ३० ॥ आळसें घडेना श्रवण । आळसें नव्हे निरूपण । आळसें परमार्थाची खूण । मलिन जाहली ॥ ३१ ॥ आळसें नित्यनेम राहिला । आळसें अभ्यास बुडाला । आळसें आळस वाढला । असंभाव्य[7] ॥ ३२ ॥ आळसें गेली धारणा धृति[8] । आळसें मलिन झाली वृत्ति । आळसें विवेकाची गती । मंद जाहली ॥ ३३ ॥ आळसें निद्रा वाढली । आळसें वासना विस्तारली । आळसें शून्याकार झाली । सद्बुद्धि निश्चयाची ॥ ३४ ॥ दुश्चितपणासवें आळस । आळसें निद्राविलास । निद्राविलासें केवळ नाश । आयुष्याचा ॥ ३५ ॥ निद्रा आळस दुश्चितपण । हेंचि मुर्खाचें लक्षण । येणेंकरितां निरूपण । उमजेचि ना ॥ ३६ ॥ हीं तिन्हीं लक्षणें जेथें । विवेक कैंचा असेल तेथें । अज्ञानास यापरतें । सुखचि नाहीं ॥ ३७ ॥ क्षुधा लागतांच जेविला । जेऊन उठतां आळस आला । आळस येतांच निजला । सावकाश ॥ ३८ ॥ निजोन उठतांच दुश्चित । कदा नाहीं सावचित[9] । तेथें कैंचें आत्महित । निरूपणीं ॥ ३९ ॥ मर्कटाशी दिलें रत्न । पिशाचाहातीं निधान[10] । दुश्चितापुढें निरूपण । तयापरी होय ॥ ४० ॥ आतां असो हें उपपत्ति[11] । आशंकेची कोण गति । किती दिवसां होते मुक्ती । सज्जनाचेनि संगें ॥ ४१ ॥ ऐका याचें प्रत्युत्तर । श्रोतीं व्हावें निरुत्तर[12] । संतसंगाचा विचार । ऐसा असे ॥ ४२ ॥ लोह परिसासि लागला । थेंबुटा सागरीं मिळाला । गंगे सरिते संगम झाला । तत्क्षणींच ॥ ४३ ॥ सावध साक्षेपी आणि दक्ष । तयांस तात्काळचि मोक्ष । इतरांसि तें अलक्ष[13] । लक्षिलें नेवंचे[14] ॥ ४४ ॥ येथें शिष्यप्रज्ञाच केवळ । प्रज्ञावंता न लागे वेळ । अनेन्यास तात्काळ । मोक्ष लाभे ॥ ४५ ॥ प्रज्ञावंत आणि अनन्य । तयास नलगे एक क्षण ।

---

१ शत्रु जिंकतो. २ तत्त्वविवचन. ३ कान. ४ रात्रंदिवस. ५ लागलीच. ६ विसांवा. ७ कल्पनाहि करितां येणार नाहीं असा. ८ बुद्धि. ९ धैर्य. १० भूक. ११ सावधपणा. १२ द्रव्याचा ठेवा. १३ सयुक्तिक गोष्ट. १४ श्रोत्यांनीं मध्यें बोलूं नये. १५ पाण्याचा बिंदु. १६ नदीला. १७ उद्योगी. १८ लक्षांत येण्यास अशक्य. १९ लक्षांत येत नाहीं. २० शिष्याची मति. २१ एकनिष्ठाला.

अनन्य भावार्थेविण । प्रज्ञा खोटी ॥ ॥ ४६ ॥ प्रज्ञेविण अर्थ न कळे । विश्वासेविण वस्तु नाकळे । प्रज्ञाविश्वासें गेळे । देहाभिमान ॥ ४७ ॥ देहाभिमानाचे अंतीं । सहजचि वस्तुप्राप्ति[1] । सत्संगें होय सद्गति । विलंबाचि नाहीं ॥ ४८ ॥ सावध[2] साक्षेपी[3] आणि दक्ष[4] । प्रज्ञावंत आणि विश्वास । तयास साधनीं सायास । करणेंचि नलगे ॥ ४९ ॥ इतर भाविक[5] साबंडे । तयास साधनीं मोक्ष जोडे । साधुसंगें तात्काळ उघडे । विवेकदृष्टि ॥ ५० ॥ परी तें साधन मोडूं नये । निरूपणाच्या उपायें । निरूपणें लागे सोये । सर्वत्रांसी ॥ ५१ ॥ आतां मोक्ष आहे कैसा । कैसी स्वरूपाची दशा । त्याचे प्राप्तीचा भरंवसा । सत्संगें केवीं ॥ ५२ ॥ ऐसें निरूपण प्रांजळ । पुढें बोलिलें असे सकळ । श्रोतीं होवोनियां निश्चळ । अवधान द्यावें ॥ ५३ ॥ अवगुण त्यागावयाकारणें । न्यायें निष्ठुर लागे बोलणें । श्रोतीं कोप न धरणें । ऐसिया वचनाचा ॥ ५४ ॥ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अष्टमदशके दुश्चितलक्षणनिरूपणं नाम षष्ठः समासः ॥ ६ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ मागां श्रोतयांचा पक्ष[6] । किती दिवसां होतो मोक्ष । तेचि कथा श्रोते दक्ष । होऊन ऐका ॥ १ ॥ मोक्षास कैसें जाणावें । मोक्ष कोणास म्हणावें । सत्संगें पावावें । मोक्षास कैसें ॥ २ ॥ तरी बद्ध म्हणिजे बांधला । आणि मोक्ष म्हणिजे मोकळा झाला । तो संतसंगें कैसा लाधला[7] । तेंहि ऐका ॥ ३ ॥ प्राणी संकल्पें बांधला । जीवपणें बद्ध झाला । तो विवेकें मुक्त केला । साधुजनीं ॥ ४ ॥ 'मी जीव' ऐसा संकल्प । दृढ धरितां गेलें कल्प[8] । तेणें प्राणी झाला अल्प । देहबुद्धीचा ॥ ५ ॥ मी जीव मज बंधन । मज आहे जन्ममरण । केल्या कर्मांचें फळ आपण । भोगीन आतां ॥ ६ ॥ पापाचें फळ तें दुःख । आणि पुण्याचें फळ तें सुख । पापपुण्य आवश्यक । भोगणें लागे ॥ ७ ॥ पापपुण्यभोग सुटेना । आणि गर्भवासहि तुटेना । ऐसी जयाची कल्पना । दृढ जाहली ॥ ८ ॥ तया नांव बांधला । जीवपणें बद्ध झाला । जैसा स्वयें बांधोनि कोसला[9] । मृत्यु पावे ॥ ९ ॥ तैसा प्राणी तो अज्ञान । नेणें भगवंताचें ज्ञान । म्हणे माझें जन्ममरण । सुटेचि ना ॥ १० ॥ आतां कांहीं दान करूं । पुढिलिया जन्मास आधारू । तेणें सुखरूप संसारू । होईल माझा ॥ ११ ॥ पूर्वीं दान नाहीं केलें । म्हणोनि दरिद्र प्राप्त झालें । आतां तरी कांहीं केलें । पाहिजे कीं ॥ १२ ॥ म्हणोनि दिलें वस्त्र जुनें । आणि एक ताम्रनाणें[10] । ह्मणे आतां कोटिगुणें[11] । पावेन पुढें ॥ १३ ॥ कुशावर्तीं[12] कुरुक्षेत्रीं । महिमा ऐकोन दान करी । आशा धरिली अभ्यंतरीं । कोटिगुणाची ॥ १४ ॥ रुको[13] अर्धका[14] दान केला । अतीतासि[15] तुकडा घातला । ह्मणे माझा ढीग झाला । कोटि तुकड्यांचा ॥ १५ ॥ तो मी खाईन पुढिले जन्मीं । ऐसें

---

१ नाहींसा होतो. २ ब्रह्मप्राप्ति. ३ उद्योगी. ४ भोळे. ५ लक्ष. ६ बाजूचें म्हणणें. ७ मोक्ष. ८ मिळाला. ९ हेतूनें, कल्पनेनें. १० ब्रह्मदेवाचे अनेक दिवस, अनंत काल. ११ आपलें घर आपणच आंतून बंद करून आंत मरणारा किडा. १२ तांब्याचें नाणें, पैसा वगैरे. १३ कोटिपट. १४ कुशावर्त क्षेत्रामध्यें. १५ पै, आण्याचा द्वादशांश. १६ रुक्याचा चतुर्थांश. १७ अतिथीला.

कल्पीं अंतर्यामीं । वासना गुंतली जन्मकर्मीं । प्राणियाची ॥ १६ ॥ आतां मी जे देईन । तें पुढिले जन्मीं पावेन । ऐसें कल्पी तो अज्ञान । बद्ध जाणावा ॥ १७ ॥ बहुतां जन्मांचे अंतीं । होय नरदेहाची प्राप्ति । येथें न होतां ज्ञानें सद्गति । गर्भवास चुकेना ॥ १८ ॥ गर्भवास नरदेहीं घडे । ऐसें हें सर्वथा न घडे । अकस्मात् भोगणें पडे । पुन्हा नीच योनी ॥ १९ ॥ ऐसा निश्चय शास्त्राधारीं । बहुतीं केला बहुतांपरी । नरदेह संसारीं । परम दुर्लभ असे ॥ २० ॥ पापपुण्यसमता घडे । तरीच नरदेह जोडे । येरव्हीं हा जन्म न घडे । हें व्यासवचन भागवतीं ॥ २१ ॥ श्लोक ॥ ॥ नृदेहमाद्यं सुलभं सुदुर्लभम् । प्लवं सुकल्पं गुरुकर्णधारम् ॥ मयानुकूलेन नवस्वतेरितम् । पुमान् भवाब्धिं न तरेत्स आत्महा ॥१॥ श्री० भा० ११-२०-१७ ॥ टीका ॥ नरदेह परम दुर्लभ । अल्प संकल्पाचा लाभ । गुरु कर्णधार स्वयंभ । सुख पावावी ॥ २२ ॥ देव अनुकूळ नव्हे जया । स्वयें पापी तो प्राणिया । भवाब्धि न तरवे तया । आत्महत्यारा बोलिजे ॥ २३ ॥ ज्ञानेविण प्राणियासी । जन्ममृत्यु लक्ष चौऱ्यांशी । तितुक्या आत्महत्या त्यासी । म्हणोनि आत्महत्यारा ॥ २४ ॥ नरदेहीं ज्ञानेविण । कदा न चुके जन्ममरण । भोगणें लागती दारुण । नाना नीच योनी ॥ २५ ॥ रीस मर्कट श्वान सूकर । अश्व वृषभ म्हैसा खर । काक कुक्कुट जंबूक मार्जार । सरडे बेडूक मक्षिका ॥ २६ ॥ इत्यादिक नीच योनी । ज्ञान नसतां भोगणें जनीं । आशा धरी मूर्ख प्राणी । पुढिलिया जन्माची ॥ २७ ॥ हा नरदेह पडतां । तोचि पाविजे मागुता । ऐसा विश्वास धरितां । लाज नाहीं ॥ २८ ॥ कोण पुण्याचा संग्रहो । जे पुन्हा पाविजे नरदेहो । दुराशा धरिली पाहा हो । पुढिलिया जन्माची ॥ २९ ॥ ऐसे मूर्ख अज्ञान जन । केलें संकल्पें बंधन । शत्रु आपणास आपण । होऊनि ठेला ॥ ३० ॥ श्लोकार्ध ॥ ॥ आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ॥ भ० गी० ६-५ ॥ टीका ॥ ऐसें संकल्पाचें बंधन । संतसंगें तुटे जाण । ऐक तयाचें लक्षणं । सांगिजेल ॥ ३१ ॥ पांचा भूतांचें शरीर । निर्माण झालें चराचर । प्रकृति स्वभावें जगदाकार । वर्तों लागे ॥ ३२ ॥ देहीं अवस्था अभिमानें । स्थानें भोग मात्रा गुण । शक्ति आदिकरूनि लक्षण । चौपुटी ॥ ३३ ॥ ऐसी पिंडब्रह्मांडरचना । विस्तारें वाढली कल्पना । निर्धारितां तत्त्वज्ञाना । मतें भांबावलीं ॥ ३४ ॥ नाना मतीं नाना भेद । भेदें वाढती विवाद । परी ऐक्यतेचा संवाद । साधु जाणती ॥ ३५ ॥ तया संवादाचें

---

१ चित्तांत मानी, विचारकरी. २ पुढला जन्म मनुष्याचा मिळेल असा नेम नाहीं. ३ मनुष्याच्या खालच्या पशुपक्षादि जाती. ४ शास्त्रामध्यें. ५ मनुष्यजन्म. ६ नावाडी. ७ संसारसागर. ८ आत्मघातकी. ९ अस्वल. १० कुत्रें. ११ डुक्कर. १२ बैल. १३ गाढव. १४ कोंबडा. १५ कोल्हा. १६ माशी. १७ स्वाभाविकपणेंच. १८ जागृति स्वप्न, व सुषुप्ति या 'तीन' अवस्था. १९ मी माझें वगैरे अभिमान; जागृतीचा अभिमानी विश्व, स्वप्नाचा तैजस व सुषुप्तीचा प्राज्ञ. २० नेत्र, कंठ व हृदय. २१ स्थूळ, प्रविविक्त (सूक्ष्म) आणि आनंद. २२ पृथिव्यादि पंचभूतांचे सूक्ष्म अंश-शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध. २३ सत्त्व, रज, तम. २४ माया. २५ चौपदरी झोळी. २६ एकाव्यक्तीपासून सर्व जगताची घडण. २७ निश्चय करितां. २८ बोलणें.

लक्षण । पांचभौतिक देह जाण । त्या देहामध्यें कारण । आत्मा ओळखावा ॥ ३६ ॥ देह अंतीं नसोन जाये । त्यास आत्मा म्हणों नये । नाना तत्त्वांचें समुदाये । देहामध्यें आले ॥ ३७ ॥ अंतःकरण प्राणादिक । विषय इंद्रियदशक । हा सूक्ष्माचा विवेक । बोलिला शास्त्रीं ॥ ३८ ॥ घेतां सूक्ष्माची शुद्धि । भिन्न अंतःकरण मन बुद्धि । नाना तत्त्वांची उपाधी । वेगळा आत्मा ॥ ३९ ॥ स्थूल सूक्ष्म कारण । महाकारण विराट हिरण्य । अव्याकृते मूळप्रकृति जाण । ऐसे अष्ट देह ॥ ४० ॥ चारी पिंडीं चारी ब्रह्मांडीं । ऐसी अष्टदेहांची प्रौढि । प्रकृतिपुरुषांची वाढी । दश देह बोलिजे ॥ ४१ ॥ ऐसें तत्त्वांचें लक्षण । आत्मा साक्षी विलक्षण । कार्य कर्ता कारण । दृश्य तयाचें ॥ ४२ ॥ जीवशिव पिंडब्रह्मांड । मायाअविद्येचें बंड । हें सांगतां असें उदंड । परी तो आत्मा वेगळा ॥ ४३ ॥ पाहो जातां आत्मे चारी । त्यांचें लक्षण अवधारीं । हें जाणोनि अभ्यंतरीं । सदृढ धरावें ॥ ४४ ॥ एक जीवात्मा दुसरा शिवात्मा । तिसरा परमात्मा जो विश्वात्मा । चौथा जाणिजे निर्मळात्मा । ऐसे चारी आत्मे ॥ ४५ ॥ भेदें उंच नीच भासती । परी चारी एकचि असती । येविषयीं दृष्टांतसंमति । सावध ऐका ॥ ४६ ॥ घटाकाश मठाकाश । महदाकाश चिदाकाश । अवघें मिळोन आकाश । एकचि असे ॥ ४७ ॥ तैसा जीवात्मा आणि शिवात्मा । परमात्मा आणि निर्मळात्मा । अवघा मिळोन आत्मा । एकचि असे ॥ ४८ ॥ घटीं व्यापक जें आकाश । तया नांव घटाकाश । पिंडीं व्यापक जो ब्रह्मांश । त्यासि जीवात्मा बोलिजे ॥ ४९ ॥ मठीं व्यापक जें आकाश । तया नांव मठाकाश । तैसा ब्रह्मांडीं जो ब्रह्मांश । त्यास शिवात्मा बोलिजे ॥ ५० ॥ मठाबाहेरील आकाश । तया नांव महदाकाश । ब्रह्मांडाबाहेरील जो ब्रह्मांश । त्यासि परमात्मा बोलिजे ॥ ५१ ॥ उपाधीवेगळें आकाश । तया नांव चिदाकाश । तैसा निर्मळात्मा परेश । तो उपाधीवेगळा ॥ ५२ ॥ उपाधीयोगें वाटे भिन्न । परी तें आकाश अभिन्न । तैसा आत्मा स्वानंदेंघन । एकचि असे ॥ ५३ ॥ दृश्यासबाह्यअंतरीं । सूक्ष्मात्मा निरंतरीं । त्याची वर्णावया थोरी । शेष समर्थ नव्हे ॥ ५४ ॥ ऐसें आत्म्याचें लक्षण । जाणतां नाहीं जीवपण । उपाधि शोधितां अभिन्न । मुळींच आहे ॥ ५५ ॥ जीवपणें एकदेशी । अहंकारें जन्म सोशी । विवेकें पाहतां प्राणियांसी । जन्म कैंचा ॥ ५६ ॥ जन्ममृत्यूपासून सुटला । या नांव जाणिजे मोक्ष झाला । तत्त्व शोधितां पावला । तेंचि वस्तु ॥ ५७ ॥ तेचि वस्तु ते आपण । हें महावाक्याचें लक्षण । साधु करिती निरूपण । आपुलेनि मुखें ॥ ५८ ॥ जेचि क्षणीं अनुग्रह केला । तेचि क्षणीं

१ पंचप्राण—प्राण, अपान, व्यान, उदान आणि समान. २ शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध. ३ पांच कर्मेन्द्रियें व पांच ज्ञानेंद्रियें मिळून दहा इंद्रियांचा समूह. ४ लिंगदेहाचा. ५ विचार. ६ चौकशी, शोध. ७ उपसर्ग. ८ स्थूलदेह—दृश्यदेह. ९ जगदाकार ईश्वराचा देह. १० समष्टी सूक्ष्म देह. ११ समष्टी कारण देह. १२ समष्टी महाकारण देह. १३ प्रकृति—माया व पुरुष—आत्मा, यांची वाढ. १४ सर्व पाहणारा. १५ दिसणाऱ्या पदार्थांहून निराळा. १६ स्वानंदपूर्ण. १७ परब्रह्म. १८ कृपा.

मोक्ष झाला । बंधन कांहीं आत्मयाला । बोलोंचि नये ॥ ५९ ॥ ऐतें आशंका फिटली । संदेहवृत्ति मावळली । संतसंगें तात्काळ झाली । मोक्षपदवी ॥ ६० ॥ स्वप्नामध्यें जो बांधला । तो जागृतीनें मोकळा केला । ज्ञानविवेकें प्राणियाला । मोक्षप्राप्ति ॥ ६१ ॥ अज्ञाननिशीच्या अंतीं[1] । संकल्पदुःखें नासती । तेणें गुणें होय प्राप्ति । तत्काळ मोक्षाची ॥ ६२ ॥ तोडावया स्वप्नबंधन । नलगे आणीक साधन । तयास प्रयत्न जागृतीविण । बोलोंचि नये ॥ ६३ ॥ तैसा संकल्पें बांधला जीव । त्यास आणीक नाहीं उपाव । विवेकां[†] पाहतां वाव[3] । बंधन होय ॥ ६४ ॥ विवेक पाहिल्याविण । जो जो उपाय तो तो शिण । विवेक पाहतां आपण[5] । आत्माच असे ॥ ६५ ॥ आत्मयाच्या ठायीं कांहीं । बंध मोक्ष दोन्ही नाहीं । जन्ममृत्यु हे सर्वही । आत्मत्वीं न घडे ॥ ६६ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अष्टमदशके मोक्षलक्षणनिरूपणं नामः सप्तम समासः ॥७॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ मागां झालें निरूपण । परमात्मा तो तूंचि जाण । तया परमात्मयाचें लक्षण । तें हें ऐसें असें ॥ १ ॥ जन्म नाहीं मृत्यु नाहीं । येणें नाहीं जाणें नाहीं । बंध मोक्ष दोन्ही नाहीं । परमात्मयासी ॥ २ ॥ परमात्मा निर्गुण निराकार । परमात्मा अनंत अपार । परमात्मा नित्य निरंतर । जैसा तैसा ॥ ३ ॥ परमात्मा सर्वांस व्यापक । परमात्मा अनेकीं एक । परमात्मयाचा विवेक । अतर्क्य आहे ॥ ४ ॥ ऐसी परमात्मयाची स्थिति । बोलताति वेदश्रुति[2] । परमात्मा पाविजे भक्तीं । येथें संशय नाहीं ॥ ५ ॥ तये भक्तीचें लक्षण । भक्ति नवविधा भजन । नवविधा भजनें पावन । बहु भक्त जाहले ॥ ६ ॥ तये नवविधेमध्यें सार । आत्मनिवेदन थोर । तयेचा करावा विचार । स्वानुभवें स्वयें ॥ ७ ॥ आपुलिया स्वानुभवें । आपणास निवेदावें[4] । आत्मनिवेदन जाणावें । ऐसें असे ॥ ८ ॥ महत्पूजेच्या अंतीं । देवास मस्तक वाहती । तैसी आहे निकट भक्ति[7] । आत्मनिवेदनाची ॥ ९ ॥ आपणास निवेदिती । ऐसे भक्त थोडे असती । तयांस परमात्मा मुक्ति । तात्काळ देतो ॥ १० ॥ आपणास कैसें निवेदावें । कोठें जाऊन पडावें । किंवा मस्तक तोडावें । देवापुढें ॥ ११ ॥ ऐसें ऐकोन बोलणें । वक्ता वदे सर्वज्ञपणें । श्रोतीं सावधान होणें । एकाग्रचित्तें ॥ १२ ॥ आत्मनिवेदनाचें लक्षण । आधीं पाहावें मी कोण । मग परमात्मा निर्गुण । तो वोळखावा ॥ १३ ॥ देवा भक्तांचें शोधन । करितां होतें आत्मनिवेदन । देव आहे पुरातन । भक्त पाहे ॥ १४ ॥ देवास वोळखों जातां । तेथें झाली तद्रूपता । देवभक्तांची विभक्तता[9] । मुळींच नाहीं ॥ १५ ॥ विभक्त नाहीं म्हणोन भक्त । बद्ध नाहीं म्हणोन मुक्त । अयुक्त[8] नाहीं बोलणें युक्त । शास्त्राधारें ॥ १६ ॥ देवाभक्तांचें पाहतां मूळ । होय भेदांचें निर्मूळ[10] । एक परमात्मा सकळ । दृश्यावेगळा ॥ १७ ॥ तयासि होतां मिळणी । ‡उरी नाहीं दुजेपणीं । देव भक्त हे *कडसणी[9] । निरसोनि गेली ॥ १८ ॥ आत्म-

---

१ अज्ञानरूपी रात्रीच्या. २ अहंवृत्तीनें. † विवेकाचा उदय झाला असतां. ३ व्यर्थ. ४ ‘ एकमेवाद्वितीयं ’ इ० वेदवाक्यें. ५ आपलें अर्पण. ६ अर्पण करावें. ७ अगदीं जवळची भक्ति. ८ वेगळेपणा. ९ अयोग्य. १० नाश. ‡ बाकी. * विचार

निवेदनाच्या अंतीं । जे कां घडली अभेदभक्ति । तये नांव सायुज्यमुक्ति । सत्य जाणावी ॥ १९ ॥ जो संतासि शरण गेला । अद्वैतनिरूपणें बोधला । मग जरी वेगळा केला । तरी होणार नाहीं ॥ २० ॥ नदी मिळाली सागरीं । ते निवेडावी कोणेपरी । लोहें सोनें होतां माघारी । काळिमा नये ॥ २१ ॥ तैसा भगवंतीं मिळाला । तो नवचे वेगळा केला । देव भक्त आपण झाला । विभक्त नव्हे ॥ २२ ॥ देव भक्त दोनी एक । ऐसें ज्ञान जया निश्चयात्मक । साधुजनीं मोक्षदायक । तोचि जाणावा ॥ २३ ॥ आतां असो हें बोलणें । देव पहावा भक्तपणें । तेणें त्याचें ऐश्वर्य बाणें । तत्काळ अंगीं ॥ २४ ॥ देहाचि होऊनी राहिजे । तेणें देहदुःख सोसिजे । देहातीत होतां पाविजे । परब्रह्म तें ॥ २५ ॥ देहातीत कैसें होणें । कैसें परब्रह्म पावणें । ऐश्वर्याचीं लक्षणें । कैंवण सांगिजे ॥ २६ ॥ ऐसें श्रोतीं आक्षेपिलें । याचें उत्तर काय बोलिलें । तेंचि आतां निरूपिलें । सावध ऐका ॥ २७ ॥ देहातीत वस्तु आहे । तें तूं परब्रह्म पाहें । देहसंग हा न साहे । तुज विदेहासी ॥ २८ ॥ ज्याची बुद्धि ऐसी । वेद वर्णिती तयासी । शोधितां नानाशास्त्रांशीं । न पडे ठायीं ॥ २९ ॥ ऐश्वर्य ऐसें तत्त्वतां । बाणे देहबुद्धि सोडितां । देह मी ऐसें भाविता । अधोगति ॥ ३० ॥ याकारणें साधुवचन । मानूं नये अप्रमाण । मिथ्या मानितां दूषण । लागों पाहे ॥ ३१ ॥ साधुवचनें तें कैसें । काय धरावें विश्वासें । एक वेळ स्वामी ऐसे । मज निरूपावें ॥ ३२ ॥ सोहं आत्मा स्वानंदघन । अजन्मा तो तूंचि जाण । हेंचि साधूचें वचन । सदृढ धरावें ॥ ३३ ॥ महावाक्याचें अंतर । तूंचि ब्रह्म निरंतर । ऐसीया वचनाचा विसर । पडों नये ॥ ३४ ॥ देहास होईल अंत । मग मी पावेन अनंत । ऐसें बोलणें निर्भांत । मानूंचि नये ॥ ३५ ॥ एक मूर्ख ऐसें म्हणती । माया नासेल कल्पांतीं । मग आम्हांस ब्रह्मप्राप्ति । येरवीं नाहीं ॥ ३६ ॥ मायेसि होईल कल्पांत । अथवा देहास होईल अंत । ते काळीं पावेन निवांत । परब्रह्म मी ॥ ३७ ॥ हें बोलणें अप्रमाण । ऐसें नव्हे समाधान । समाधानाचें लक्षण । वेगळेंचि असे ॥ ३८ ॥ सैन्य अवघेंचि मरावें । मग राज्यपद प्राप्त व्हावें । सैन्य असतांच राज्य करावें । हें कळेना ॥ ३९ ॥ माया असोनीच नाहीं । देह असतांच विदेही । ऐसें समाधान कांहीं । वोळखावें ॥ ४० ॥ राज्यपद हातासि आलें । मग परिवारें काय केलें । परिवार देखतां राज्य गेलें । हें तों घडेना ॥ ४१ ॥ प्राप्त झालिया आत्मज्ञान । तैसें दृश्य देहभान । दृष्टीं पडतां समाधान । जाणार नाहीं ॥ ४२ ॥ मार्गीं मुळीं सर्पाकार । देखतां भय आलें

---

१ वेगळी करावी. २ लोखंड, परिसाच्या स्पर्शानें सोनें झाल्यावर. ३ पुन्हा. ४ उपासक. ५ सहन करावें. ६ देहाभिमान सोडल्यावर. ७ कोणती. ८ शंका काढली. ९ देहाचा संबंध. १० सोसत नाहीं, उपयोगी नाहीं. ‡ समजत नाहीं ११ मानल्यास, जाणल्यास. १२ पतन, जननमरण इत्यादि. १३ तो मी. १४ जन्मरहित. १५ ' तत्त्वमसि ' इत्यादि महावाक्यांचें. १६ गर्भितार्थ. १७ अंतरहित ब्रह्माला. १८ निश्चित. १९ प्रलय. २० सर्व. २१ देहाभिमान टाकलेला असा. २२ पदरच्या इष्टआप्तादि मंडळीनें. २३ देहज्ञान.

थोर । कळतां तेथींचा विचार मग मारणें काय ॥ ४३ ॥ तेसी माया भयानकें । विचार पाहतां मायिकें । मग तयेचा धाक । कासया धरावा ॥ ४४ ॥ देखतां मृग-जळाचा पूर । म्हणे कैसा पावूं पैलपार । कळतां तेथींचा विचार । मग सांकेंडे कैंचें ॥ ४५ ॥ देखतां स्वप्न भयानकें । स्वप्नीं वाटे परम धाक । जागृति झालिया साशंकें । कासया व्हावें ॥ ४६ ॥ तथापि माया कल्पनेसि दिसे । आपण कल्पनातीतें असे । तेथें उद्वेगें कायसे । निर्विकल्पासी ॥ ४७ ॥ "अंतीं मति तेचि गति"। ऐसें सर्वत्र बोलती । तुझ्या अंतीं तुझी प्राप्ति । सहजचि झाली ॥ ४८ ॥ चौदेहांचा अंत । आणि जन्म-मुळाचा प्रांत । आतां प्रांतासि अलिप्त । तो तूं आत्मा ॥ ४९ ॥ जयास ऐसी आहे मति । तयास ज्ञानें आत्मगति । गति आणि अवगति । वेगळाचि तूं ॥ ५० ॥ मति खुंटली वेदांची । तेथें गति आणि अवगति कैंची । आत्मशास्त्र गुरुप्रचीतीची । ऐक्यता आली ॥ ५१ ॥ जीवपणाची फिटली भ्रांति । वस्तु आली आत्मप्रचीती । प्राणी पावला उत्तम गति । सद्गुरुबोधें ॥ ५२ ॥ सद्गुबोध जेव्हां झाला । चौदेहांस अंत आला । तेणें निजध्यास लागला । स्वस्वरूपीं ॥ ५३ ॥ तेणें निजध्यासें प्राणी । ध्येयचि झाला निर्वाणीं । सायुज्यमुक्तीचा धनी । होऊन बैसला ॥ ५४ ॥ दृश्य पदार्थ वोसरतां । अवघा आत्माचि तत्त्वतां । नेहटून विचारें पाहतां । दृश्य मुळींच नाहीं ॥ ५५ ॥ मिथ्या मिथ्यात्वें पाहिलें । मिथ्यापणें अनुभवा आलें । श्रोतीं पाहिजे ऐकिलें । या नांव मोक्ष ॥ ५६ ॥ सद्गुरुवचन हृदयीं धरी । तोचि मोक्षाचा अधिकारी । श्रवण मनन केलेंचि करी । अत्यादरें ॥ ५७ ॥ जेथें आटती दोनी पक्ष । तेथें लक्ष ना अलक्ष । या नांव जाणिजे मोक्ष । नेमस्त आत्मा ॥ ५८ ॥ जेथें ध्यान धारणा सरे । कल्पना निर्विकल्पीं मुरे । केवळ ज्ञप्ति मात्र उरे । सूक्ष्मब्रह्म ॥ ५९ ॥ भवमृगजळ आटलें । लटिकें बंधन तुटलें । अजन्म्यास मुक्त केलें । जन्मदुःखापासूनी ॥ ६० ॥ निःसंगाची संगव्याधि । विदेहाची देहबुद्धि । विवेकें तोडिली उपाधि । निष्प्रपंचाची ॥ ६१ ॥ अद्वैताचें तोडिलें द्वैत । एकांतासि दीधला एकांत । अनंतास दीधला अंत । अनंताचा ॥ ६२ ॥ जागृतीस चेवविलें । चेइलेयास सावध केलें । निजबोधासि प्रबोधिलें । आत्मज्ञान ॥ ६३ ॥ अमृतास केलें अमर । मोक्षास मुक्तीचें घर । संयोगास निरंतर । योगें केला ॥ ६४ ॥ निर्गुणास निर्गुण केलें । सार्थकाचें सार्थक झालें । बहुतां दिवसां भेटलें । आपणास आपण ॥ ६५ ॥ तुटला द्वैताचा पडदा ।

---

१ भीतिकारक. २ खोटी, अज्ञानमूलक. ३ अडचण, संकट. ४ शंकायुक्त. ५ कल्पनेपलीकडील. ६ दुःख. ७ स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण, या चार देहांचा. ८ जन्माच्या कारणाचा. ९ नाश, क्षय. १० निराळा,. वेगळा. ११ दुर्गति. १२ गुरूच्या अनुभवाची. १३ परब्रह्म. १४ एकाग्रतेनें चिंतन. १५ज्याचें ध्यान करतो तें. १६ शेवटीं. १७ नाहींसें झालें असतां. ‡ वृत्ति अंतर्मुख करून .१८ बुद्धीवर एकसारखें ध्येय ठेवणें. १९ ज्ञान, जाणीव. २० संसाररूपी मृगजळ (भ्रम). २१ ठाव, शेवट. २२ जागृत केलें. २३ जागा झालेल्यास. २४ ब्रह्मज्ञान. २५ एकत्र केला.

अभेदें तोडिलें भेदा । भूतपंचकाची बाधा । निरसोनि गेली ॥ ६६ ॥ झालें साधनाचें फळ । निश्चळास केलें निश्चळ । निर्मळाचा गेला मळ । विवेकबळें ॥ ६७ ॥ होतें सन्निधें चुकलें । ज्याचें त्यास प्राप्त झालें । आपणा देखतां फिटलें । जन्मदुःख ॥ ६८ ॥ दुःस्वप्नें जाजावलों । ब्राह्मण नीचयाती झाला । आपणासि आपण सांपडला । जागेपणें ॥ ६९ ॥ ऐसें जयास झालें ज्ञान । तया पुरुषाचें लक्षण । पुढिलें समासीं निरूपण । बोलिलें असे ॥ ७० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अष्टमदशके आत्मनिदर्शननिरूपणं नाम अष्टमः समासः ॥ ८ ॥

श्रीगणेशायनमः ॥ ॥ अंतरीं गेलिया अमृत । बाहेरी कोया लखलखित । अंतरस्थिति बाणतां संत-। लक्षणें कैसीं ॥ १ ॥ झालें आत्मज्ञान बरवें । हें कैसेनि पां जाणावें । म्हणोन बोलिलीं स्वभावें । साधुलक्षणें ॥ २ ॥ ऐका सिद्धाचें लक्षण । सिद्ध म्हणिजे स्वरूप जाण । तेथें पाहतां वेगळेपण । मुळींच नाहीं ॥ ३ ॥ स्वरूप होऊनि राहिजे । तथा नांव सिद्ध बोलिजे । सिद्धस्वरूपींच साजे । सिद्धपण ॥ ४ ॥ वेदशास्त्रीं जें प्रसिद्ध । स्वस्वरूप स्वतः सिद्ध । तयासीच बोलिजे सिद्ध । अन्यथा न घडे ॥ ५ ॥ तथापि बोलों कांहींएक । साधका कळावया विवेक । सिद्धलक्षणाचें कौतुक । तें हें ऐसें असे ॥ ६ ॥ अंतरास्थिति स्वरूप झाली । पुढें काया कैसी वर्तली । जैसी स्वप्नींची नाथिली । स्वप्नरचना ॥ ७ ॥ तथापि सिद्धाचें लक्षण । कांहीं करूं निरूपण । जेणें बाणें अंतरखूण । परमार्थाची ॥ ८ ॥ सदा स्वरूपानुसंधानें । हें मुख्य साधूचें लक्षण । जनीं असोनि आपण । जनावेगळा ॥ ९ ॥ स्वरूपीं दृष्टि पडतां । तुटोन गेली संसारचिंता । पुढें लागली ममता । निरूपणाची ॥ १० ॥ हें साधकांचें लक्षण । परी सिद्धाअंगीं असे जाण । सिद्धलक्षणें साधनेविण । बोलोंचि नये ॥ ११ ॥ बाह्य साधकाचे परी । आणि स्वरूपाकार अंतरीं । सिद्धलक्षण तें चतुरीं । जाणिजे ऐसें ॥ १२ ॥ संदेहरहित साधन । तेंचि सिद्धाचें लक्षण । अंतेबाह्य समाधान । चळेना ऐसें ॥ १३ ॥ अचळ झाली अंतरस्थिति । तेथें चळणास कैंची गति । ❀स्वरूपीं लागतां वृत्ति । स्वरूपाचि जाहली ॥ १४ ॥ मग तो चळतांच अचळ । चंचळपणें निश्चळ । निश्चळ असोनि चंचळ । देह त्याचा ॥ १५ ॥ स्वरूपीं स्वरूपाचि झाला । मग तो पडोनीच राहिला । अथवा उठोन पळाला । तरी तो चळेना ॥ १६ ॥ येथें कारण अंतरास्थिति । अंतरींच पाहिजे निवृत्ति । अंतर लागलें भगवंतीं । तोचि साधु ॥ १७ ॥ बाह्य भलतैसें असावें । परी अंतर स्वरूपीं लागावें । मग लक्षणें दिसती स्वभावें । साधुअंगीं ॥ १८ ॥ राज्यीं बसतां अवलीळा । अंगीं बाणें राज्यकळा । स्वरूपीं लागता जिव्हाळा । लक्षणें बाणती ॥ १९ ॥ येरवीं अभ्यास करितां । हातां न चढती सर्वथा । स्वरूपीं राहावें तत्त्वतां ।

---

१ नाहींशी झाली. २ जवळ. ३ दुःखी झाला. ४ हलक्या जातीचा. ५ शरीर. ६ आत्मस्थिति अंतःकरणांत बाणली असतां. ७ अहो. ८ सिद्ध–स्वतःसिद्ध–अशा ब्रह्मस्वरूपाचे ठिकाणी. ९ खोटी. १० परब्रह्म स्वरूपाचें सतत चिंतन करून तदाकार होणें. ११ आंत बाहेर. १२ आंतील स्थिति. ❀ आत्मस्वरूपीं १३ मनोवृत्ति. १४ प्रपंचापासून पराङ्मुखता. १५ सहज. १६ ममता, प्रेम.

स्वरूप होऊनि ॥ २० ॥ अभ्यासाचा मुकुटमणी । वृत्ति रहावी निर्गुणीं । संतसंगें निरूपणीं । स्थिति बाणे ॥ २१ ॥ ऐसीं लक्षणें बरवीं । स्वरूपाकारें अभ्यासावीं । स्वरूप सोडितां गोसावी । भांबावती ॥ २२ ॥ आतां असो हें बोलणें । ऐका साधूचीं लक्षणें । जेणें समाधान बाणें । साधकाअंगीं ॥ २३ ॥ स्वरूपीं भरतां कल्पना । तेथें-कैंची उरेल कामना । म्हणोनियां साधुजनां । कामचि नाहीं ॥ २४ ॥ कल्पिला विषय हातींचा जावा । तेणेंगुणें क्रोध यावा । साधुजनांचा अक्षयी ठेवा । जाणार नाहीं ॥ २५ ॥ म्हणोनि ते क्रोधरहित । जाणती स्वस्वरूप संत । नाशवंत हे पदार्थ । सांडूनियां ॥ २६ ॥ जेथें नाहीं दुसरी परी । क्रोध यावा कोणावरी । क्रोधरहित चराचरीं । साधु-जन वर्तती ॥ २७ ॥ आपुला आपण स्वानंद । कोणावरी करावा मद । याकारणें वादविवाद । तुटोनि गेला ॥ २८ ॥ साधुस्वरूप निर्विकार । तेथें कैचा तिरस्कार । आपला आपण मत्सर । कोणावरी करावा ॥ २९ ॥ साधु वस्तु अनायासें । याकारणें मत्सर नसे । मदमत्सरांचें पिसें । साधूसि नाहीं ॥ ३० ॥ साधु स्वरूप स्वयंभ । तेथें कैंचा असेल दंभ । जेथें द्वैताचा आरंभ । जाहलाचि नाहीं ॥ ३१ ॥ जेणें दृश्य केलें विसंचें । तयास कैंचा होय प्रपंच । याकारणें निष्प्रपंच । साधु जाणावा ॥ ३२ ॥ अवघें ब्रह्मांड त्याचें घर । पांचभौतिक हा जोजार । मिथ्या जाणोनि सत्वर । त्याग केला ॥ ३३ ॥ याकारणें लोभ नसे । साधु सदा निर्लोभ असे । जयाची वासना सम-[1]रसें । शुद्ध स्वरूपीं ॥ ३४ ॥ आपला आपण आघवा । शोक कोणाचा करावा । म्हणोनि साधु तो जाणावा । शोकरहित ॥ ३५ ॥ दृश्य सांडूनि नाशवंत । स्वरूप सेविलें शाश्वत । याकारणें शोकरहित । साधु जाणावा ॥ ३६ ॥ शोकें दुखवावी वृत्ति । तरी ते झाली निवृत्ति । म्हणोनि साधु आदिअंतीं । शोकरहित ॥ ३७ ॥ मोहें झळंबावें[2] मन । तरी तें मनचि झालें उन्मन[3] । याकारणें साधुजन । मोहातीत ॥ ३८ ॥ साधु वस्तु अद्वय । तेथें कैंचें वाटेल भय । परब्रह्म तें निर्भय । तोचि साधु ॥ ३९ ॥ याकारणें भया-तीत । साधु निर्भय निवांत । सकळांस मांडेल अंत । साधु अनंतरूपीं ॥ ४० ॥ सत्यस्वरूपीं अमर झाला । भय कैंचें वाटेल त्याला । याकारणें साधुजनाला । भयचि नाहीं ॥ ४१ ॥ जेथें नाहीं द्वैतभेद । आपला आपण अभेद । तेथें कैचा उठेल खेद । देहबुद्धीचा[4] ॥ ४२ ॥ बुद्धीनें नेमिलें[5] निर्गुणा । त्यास कोणीच नेईना । याकारणें साधु-जनां । खेदचि नाहीं ॥ ४३ ॥ आपण एकला ¶ठायींचा । स्वार्थ करावा कोणाचा । दृश्य नसतां स्वार्थाचा । ठावचि नाहीं ॥ ४४ ॥ साधु आपणाचि एक । तेथें कैंचा दुःखशोक । दुजे-विण अविवेक । येणार नाहीं ॥ ४५ ॥ आशा धरितां परमार्थाची । दुराशा तुटली स्वार्थाची । म्हणोनि नैराश्यता साधूची । वोळखावी ॥ ४६ ॥ मृदुपणें जैसें गगन । तैसें साधूचें लक्षण । याकारणें साधुवचन । कठिण नाहीं ॥ ४७ ॥ स्वरूपाच्या संयोगीं । स्वरूपाचि

---

१ वासना. २ प्रकार. ३ स्थावरजंगमात्मक जगतांमध्यें. ४ गर्व, उन्मत्तपणा. ५ ब्रह्म. ६ स्वतःसिद्ध. ७ ढोंग. ८ नाहींसे. ९ खटखट. १० तदाकार होऊन जाते. ११ सर्व. १२ व्यापून टाकावें. १३ वृत्तिरहित. १४ देहाभिमानाचा. १५ निश्चय केला. ¶ मूळचा. १६ आकाश.

झाला योगी । याकारणें वीतरागी । निरंतर ॥ ४८ ॥ स्थिति बाणतां स्वरूपाची । चिंता सोडिली देहाची । याकारणें होणारांची । चिंता नाहीं ॥ ४९ ॥ स्वरूपीं लागतां बुद्धि । तुटे अवघी उपाधि । याकारणें निरुपाधि । साधुजन ॥ ५० ॥ साधु स्वरूपींच राहे । तेथें संगाचि न साहे । म्हणोनि साधु तो न पाहे । मानापमान ॥ ५१ ॥ अलक्षास लाविती लक्ष । म्हणोन साधु परम दक्ष । वोढूं जाणती कैंपक्ष । परमार्थाचा ॥ ५२ ॥ स्वरूपीं न साहे मळ । म्हणोनि साधु तो निर्मळ । साधु स्वरूपाचे केवळ । म्हणोनियां ॥ ५३ ॥ सकळ धर्मामध्यें धर्म । स्वरूपीं राहणें हा स्वधर्म । हेंचि जाणेजे मुख्य वर्म । साधुलक्षणाचें ॥ ५४ ॥ धरितां साधूची संगति । आपैसींचि लागे स्वरूपस्थिति । स्वरूपस्थितीनें बाणती । लक्षणें अंगीं ॥ ५५ ॥ ऐसीं साधूंचीं लक्षणें । अंगीं बाणती निरूपणें । परंतु स्वरूपीं राहणें । निरंतर ॥ ५६ ॥ निरंतर स्वरूपीं राहतां । स्वरूपचि होईजे तत्त्वतां । मग लक्षणें अंगीं बाणतां । वेळ नाहीं ॥ ५७ ॥ स्वरूपीं राहिल्या मति । अवगुण अवघेच सांडती । परंतु यासी सत्संगति–। निरूपण पाहिजे ॥ ५८ ॥ सकळ सृष्टीच्या ठायीं । अनुभव एकचि नाहीं । तो बोलिजेल सर्वही । पुढिले समासीं ॥ ५९ ॥ कोणे स्थितीनें राहती । कैसा अनुभव पाहती । रामदास म्हणे श्रोतीं । अवधान द्यावें ॥ ६० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अष्टमदशके सिद्धलक्षणानिरूपणं नाम नवमः समासः ॥ ९ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ जनाचे अनुभव पुसतां । कलह उठला अवचितां । हा कथाकल्लोळ श्रोतां । कौतुकें ऐकावा ॥ १ ॥ एक म्हणती हा संसारू । करितां पाविजे पैलपारू । आपुला नव्हे कीं जोजारू । जीव देवाचे ॥ २ ॥ एक म्हणती हें न घडे । लोभ येउनि अंगीं जडे । पोटास्तव करणें पडे । सेवा कुटुंबाची ॥ ३ ॥ एक म्हणती स्वभावें । संसार करावा सुखेनैवें । कांहीं दान पुण्य करावें । सद्गतीकारणें ॥ ४ ॥ एक म्हणती संसार खोटा । वैराग्यें घ्यावा देशवटा । तेणें स्वर्गींच्या वाटा । मोकळ्या होती ॥ ५ ॥ एक म्हणती कोठें जावें । उगेंच कासया हिंडावें । आपुले आश्रमीं असावें । आश्रमधर्म करूनी ॥ ६ ॥ एक म्हणती कैंचा धर्म । अवघा होतसे अधर्म । † ये संसारीं नाना कर्म । करणें लागे ॥ ७ ॥ एक म्हणती बहुतांपरी । वासना असावी बरी । येणेंचि तरिजे संसारीं । अनायासे ॥ ८ ॥ एक म्हणती कारण भावें । भावेंचि पाविजे देव । येरें हें अवघेंच वाव । गोंधळगोवी ॥ ९ ॥ एक म्हणती वडिलें जीवीं । अवघीं देवचि मानावीं । मायबापें पूजीत जावीं । एकभावें ॥ १० ॥ एक म्हणती देवब्राह्मण । त्यांचें करावें पूजन । मायबाप नारायण । विश्वजनाचा ॥ ११ ॥ एक म्हणती शास्त्र पाहावें । तेथें निरूपिलें देवें । तेणें प्रमाणेंचि जावें । परलोकासी ॥ १२ ॥ एक म्हणती अहो जना । शास्त्र पाहतां पुरवेना । याकारणें साधुजनां । शरण जावें ॥ १३ ॥

---

१ वैराग्यशील. २ बाजू, कैवार. ३ आपोआप. ४ दुर्गुण. ५ एकदम. ६ कथेचा ओघ, लाट. ७ पलीकडली बाजू ८ खटपट. ९ सुखेनैव, खुशाल. १० देशांतर. ११ कशाकरितां. † खा. १२ श्रमावांचून. १३ निष्ठा. १४ इतर. १५ गुंतागुंत. १६ अंतःकरणानें. १७ सर्व लोकांचा.

एक म्हणती सांडों गोष्टी । वायांचि करितां चावटी । सर्वांसं कारण पोटीं । भूतदया असावी ॥ १४ ॥ एक म्हणती एकचि बरवें । आपुले आचारें असावें । अंत काळीं नाम घ्यावें । देवाचें ॥ १५ ॥ एक म्हणती पुण्य असेल । तरीच वाचें नाम येईल । नाहीं तरी भुली पडेल । अंतकाळीं ॥ १६ ॥ एक म्हणती जितें असावें । तंवाचि सार्थक करावें । एक म्हणती फिरावें । तीर्थाटण ॥ १७ ॥ एक म्हणती हे अंटाटी । पाणी पाषाणाची भेटी । बुचकळ्या मारितां हिंपुंटी । कासया व्हावें ॥ १८ ॥ एक म्हणती सांडा वोचाळी । अगाध महिमा भूमंडळीं । दर्शनमात्रें होय होळी । महापातकांची ॥ १९ ॥ एक म्हणती तीर्थ स्वभावें । कारण मनचि असावें । एक म्हणती कीर्तन करावें । सावकाश ॥ २० ॥ एक म्हणती योग बरवा । मुख्य तोचि आधीं साधावा । देह अमरचि करावा अकस्मात् ॥ २१ ॥ एक म्हणती ऐसें काय । काळवंचना करूं नय । एक म्हणती धरावी सोये । भक्तिमार्गाची ॥ २२ ॥ एक म्हणती ज्ञान बरवें । एक म्हणती साधन बरवें । एक म्हणती मुक्त असावें । निरंतर ॥ २३ ॥ एक म्हणती अनर्गळा । धरी पापाचा कंटाळा । एक म्हणती रे मोकळा । मार्ग आमुचा ॥ २४ ॥ एक म्हणती हें विशेष । करूं नये निंदा द्वेष । एक म्हणती सावकाश । दुष्टसंग त्यागावा ॥ २५ ॥ एक म्हणती ज्याचें खावें । त्या सन्मुखचि मरावें । तेणें तत्काळचि पावावें । मोक्षपद ॥ २६ ॥ एक म्हणती सांडा गोष्टी । आधीं पाहिजे ते रोटी । मग करावी चावटी । सावकाश ॥ २७ ॥ एक म्हणती पाउस असावा । मग सकळ योग बरवा । कारण दुष्काळ न पडावा । म्हणिजे बरें ॥ २८ ॥ एक म्हणती तपोनिधि । होतां वोळती सकळ सिद्धी । एक म्हणती रे आधीं । इंद्रपद साधावें ॥ २९ ॥ एक म्हणती आगम पाहावा । वेताळ प्रसन्न करून घ्यावा । तेणें पाविजे देवा । स्वर्गलोकीं ॥ ३० ॥ एक म्हणती अघोरमंत्र । तेणें होइजे स्वतंत्र । श्रीहरि जयेचा केलत्र । तेचि वोळे ॥ ३१ ॥ तिज लागले सर्व धर्म । तेथें कैचें क्रियाकर्म । एक म्हणती कुकर्म । तिच्या मदें ॥ ३२ ॥ एक म्हणती एकें साक्षेप । करवा मृत्युंजयाचा जप । तेणें गुणें सर्व संकल्प । सिद्धीतें पावती ॥ ३३ ॥ एक म्हणती बटुभैरव । तेणें पाविजे भैरव । एक म्हणती झोटिंग सर्व । पुरवितसे ॥ ३४ ॥ एक म्हणती कोंळी कंकाळी । एक म्हणती भद्रकाळी । एक म्हणती उच्छिष्टचांडाळी । साह्य करावी ॥ ३५ ॥ एक म्हणती विघ्नहर । एक म्हणती भोळा शंकर । एक म्हणती सत्वर । पावे भगवती ॥ ३६ ॥ एक म्हणती मल्लारि । सत्वराचि सभाग्य करी । एक म्हणती महा बरी । भक्ति व्यंकटेशाची ॥ ३७ ॥ एक म्हणती पूर्वठेवा । एक म्हणती प्रयत्न करावा ।

---

१ प्राणिमात्रावर दया. २ जिवंत. ३ खटपट. ४ कष्टी. ५ बडबड. ६ रास्वरांगोळी. ७ पवित्र, शुद्ध. ८ काळाला फसविणें. ९ वाट. आश्रय १० आडकाठीवांचून. ११ तपस्वी. १२ मिळतात, वर्षाव करतात. १३ शास्त्र. १४ जारणमारणाचें मंत्र. १५ स्त्री, विष्णूची स्त्री लक्ष्मी. लक्ष्मी=संपत्ती. १६ प्राप्त होते. १७ एकच उद्योग. १८ शिवाचा. १९ इच्छा. २० एक क्षुद्र देवता २१ गणपति. २२ देवी, जगदंबा. २३ प्रारब्ध.

एक म्हणती भार घालावा । देवावरी ॥ ३८ ॥ एक म्हणती देव कैंचा । अंतचि पाहतो भल्यांचा । एक म्हणती हा युगाचा । युगधर्म ॥ ३९ ॥ एक आश्चर्य मानिती । एक विस्मय करिती । एक कंटाळोन म्हणती । काय होईल तें पाहावें ॥ ४० ॥ ऐसे प्रापंचिक जन । लक्षणें सांगतां गहनें । परंतु कांहींएक चिन्ह । अल्पमात्र बोलिलें ॥ ४१ ॥ आतां असो हा स्वभाव । ज्ञात्याचा कैसा अनुभव । तोहि सांगिजेल सर्व । सावध ऐका ॥ ४२ ॥ एक म्हणती करावी भक्ति । श्रीहरि देईल सद्गति । एक म्हणती ब्रह्मप्राप्ति । कर्मींचि होय ॥ ४३ ॥ एक म्हणती भोग सुटेना । जन्ममरण हें तुटेना । एक म्हणती ऊर्मी नाना । अज्ञानाच्या ॥ ४४ ॥ एक म्हणती सर्व ब्रह्म । तेथें कैंचें क्रियाकर्म । एक म्हणती हा अधर्म । बोलोंचि नये ॥ ४५ ॥ एक म्हणती सर्व नासे । उरलें तेंचि ब्रह्म असे । एक म्हणती ऐसें नसे । समाधान ॥ ४६ ॥ सर्व ब्रह्म केवळ ब्रह्म । दोन्ही पूर्वपक्षाचे भ्रम । अनुभवाचें वेगळें वर्म । म्हणती एक ॥ ४७ ॥ एक म्हणती हें न घडे । अनिर्वाच्य वस्तु न जोडे । जे बोलतां मौन पडे । वेदशास्त्रांसी ॥ ४८ ॥ तंव श्रोता अनुवादलाँ । म्हणे निश्चय कोणी केला । सिद्धांतमतें अनुभवाला । उरी कैंची ॥ ४९ ॥ अनुभव देहीं वेगळाले । हें पूर्वींच बोलिलें । आतां कांहींएक केलें । नवचे कीं ॥ ५० ॥ एक साक्षित्वें वर्तती । साक्षी वेगळाचि म्हणती । आपण द्रष्टा ऐसी स्थिति । स्वानुभवाची ॥ ५१ ॥ दृश्यापासून द्रष्टा वेगळा । ऐसी अलिप्तपणाची कळा । आपण साक्षित्वें निराळा । स्वानुभव ॥ ५२ ॥ सकळ पदार्थ जाणता । तो पदार्थाहूनि परता । देही असोन अलिप्तता । सहजचि जाहली ॥ ५३ ॥ एक ऐसें स्वानुभवें । म्हणती साक्षित्वें वर्तावें । दृश्य असोनि वेगळें व्हावें । द्रष्टेपणें ॥ ५४ ॥ एक म्हणती नाहीं भेद । वस्तु ठायींचीच अभेद । तेथें कैंचा मतिमंद । द्रष्टा आणिला ॥ ५५ ॥ अवघी साकरचि स्वभावें । तेथें कडू काय निवडावें । द्रष्टा कैंचा स्वानुभवें । अवघेंचि ब्रह्म ॥ ५६ ॥ प्रपंच परब्रह्म अभेद । भेदवादी मानिती भेद । परी हा आत्मा स्वानंद । आकारला ॥ ५७ ॥ विघरलें तूप थिजलें । तैसें निर्गुणाचि गुणा आलें । तेणें काय वेगळें केलें । द्रष्टेपणें ॥ ५८ ॥ म्हणोनि द्रष्टा आणि दृश्य । अवघा एकचि जगदीश । द्रष्टेपणाचा सायास । कासयासी ॥ ५९ ॥ ब्रह्मचि आकारलें सर्व । ऐसा एकाचा अनुभव । ऐसे हे दोनी स्वभाव । निरूपिले ॥ ६० ॥ अथवा आत्मा आकारला । आपण भिन्न कैंचा उरला । दुसरा अनुभव बोलिला । ऐसियापरी ॥ ६१ ॥ ऐक तिसरा अनुभव । प्रपंच सारूनियां सर्व । कांहीं नाहीं तोचि देव । ऐसें म्हणती ॥ ६२ ॥ दृश्य अवघें वेगळें केलें । केवळ अदृश्याचि उरलें । तेंचि ब्रह्म अनुभवलें । म्हणती एक ॥ ६३ ॥ परी तें ब्रह्म म्हणों नय । उपायासारिखा अपाय । शून्यत्वास ब्रह्म काय । म्हणों येईल ॥ ६४ ॥ दृश्य अवघें बोलांडिलें । अदृश्य शून्यत्वीं पडिलें । ब्रह्म म्हणोनि मुरंडिलें । तेथूनचि मागें ॥ ६५ ॥

---

१ कठिण. २ उत्तम गति, मोक्ष. ३ लाटा, विकार. ४ शंका काढणाराचे. ५ खुग. ६ बोलला. ७ स्थिति. ८ वेगळेपणाची. ९ पातळ झालेलें. १० फिरले.

इकडे दृश्य तिकडे देव । मध्यें शून्यत्वाचा ठाव । तयास मंदबुद्धीस्तव । प्राणी ब्रह्म म्हणे ॥ ६६ ॥ राया[1]सि नाहीं वोळखिलें । सेवकास †राव ऐसें कल्पिलें । परी तें अवघें व्यर्थ गेलें । राजा देखतां ॥ ६७ ॥ तैसें शून्यत्व कल्पिलें ब्रह्म । पुढें देखतां परब्रह्म । शून्यत्वाचा अवघा भ्रम । तुटोनि गेला ॥ ६८ ॥ परी हा सूक्ष्म अडथळा । वारी विवेकें वेगळा । जैसें दुग्ध घेऊनि जळा । राजहंस सांडिती ॥ ६९ ॥ आधीं दृश्य हें सोडिलें । मग शून्यत्व वोलांडिलें । मूळमायेपरतें देखिलें । परब्रह्म ॥ ७० ॥ वेगळेपणें पाहणें घडे । तेणें वृ[2]त्ति शून्यत्वीं पडे । पोटीं संदे[3]हो पवाडे । शून्यत्वाचे ॥ ७१ ॥ भिन्नपणें अनुभविलें । तयास शून्य ऐसें बोलिलें । वस्तु लक्षितां अभिन्न झालें । पाहिजे आधीं ॥ ७२ ॥ व[4]स्तु आपणचि होणें । ऐसें वस्तूचें पाहणें । निश्चयेंसि भिन्नपणें । शून्यत्व लाभे ॥ ७३ ॥ याकारणें शून्य कांहीं । परब्रह्म होणार नाहीं । वस्तुरूप होऊनि पाहीं । स्वानुभवें ॥ ७४ ॥ आपण वस्तु सिद्धचि आहे । मन मी ऐसें कल्पूं नये । साधु सांगती उपाये । तूंचि आत्मा ॥ ७५ ॥ मन मी ऐसें नाथिलें । संतीं नाहीं निरूपिलें । मानावें कोणाच्या बोलें । मन मी ऐसें ॥ ७६ ॥ संतवचनीं ठेवितां भा[5]व । तोचि शुद्ध स्वानुभव । मनाचा तैसाच स्वभाव । आपण वस्तु ॥ ७७ ॥ जयाचा घ्यावा अनुभव । तोचि आपण निरवय[6]वें । आपुलाला घेती अनुभव । विश्वे[7]जन ॥ ७८ ॥ लोभी धन साधूं गेले । तंव ते लोभी धनचि झाले । मग तें भाग्य पुरुषीं भोगिलें । सावकाश ॥ ७९ ॥ तैसें देहबुद्धि सोडितां । साधकास झालें तत्त्वतां । अनुभवाची मुख्य वार्ता । ते हे ऐसी ॥ ८० ॥ आपण वस्तु मुळीं एक । ऐसा ज्ञानाचा विवेक । येथून हा ज्ञानदशक । संपूर्ण जाहला ॥ ८१ ॥ आत्मज्ञान निरूपिलें । यथामतीनें बोलिलें । न्यूनपूर्ण क्षमा केलें । पाहिजे श्रोतीं ॥ ८२ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अष्टमदशके शून्यत्वनिरूपणं नाम दशमः समासः

दशक नववा. (गुणरूपनाम.)

श्रीगणेशायनमः ॥ ॥ निराकार म्हणिजे काय । निराधार म्हणजे काय । निर्विकल्प म्हणिजे काय । मज निरूपावें ॥ १ ॥ निराकार म्हणिजे आकार नाहीं । निराधार म्हणिजे आधार नाहीं । निर्विकल्प म्हणिजे कल्पना नाहीं । परब्रह्मीं ॥ २ ॥ निरामय म्हणिजे काय । निराभास म्हणिजे काय । निरवयव म्हणिजे काय । मज निरूपावें ॥ ३ ॥ निरामय म्हणिजे आ[8]मय नाहीं । निराभास म्हणिजे भा[9]सचि नाहीं । निरवयव म्हणिजे अवयव नाहीं । परब्रह्मीं ॥ ४ ॥ निष्प्रपंच म्हणिजे काय । निष्कलंक म्हणिजे काय । निरुपाधि म्हणिजे काय । मज

---

१ कांहींएक नसणें, त्याचा. २ राजाला. † राजा. ३ अंत.करणाची धाव. ४ संशय. ५ शिरतो. ६ परब्रह्म. ७ खोटें. ८ विश्वास. ९ अवयवरहित. १० सर्व लोक. ११ देहाभिमान. १२ रोग. १३ रूप, वर्ण.

निरूपावें ॥ ५ ॥ निष्प्रपंच म्हणिजे प्रपंच नाहीं । निष्कलंक म्हणिजे कलंक नाहीं । निरुपाधि म्हणिजे उपाधि नाहीं । परब्रह्मीं ॥ ६ ॥ निरुपम म्हणिजे काय । निरालंब म्हणिजे काय । निरपेक्ष म्हणिजे काय । मज निरूपावें ॥ ७ ॥ निरुपम म्हणिजे उपमा नाहीं । निरालंब म्हणिजे अवलंब नाहीं । निरापेक्ष म्हणिजे अपेक्षा नाहीं । परब्रह्मासी ॥ ८ ॥ निरंजन म्हणिजे काय । निरंतर म्हणिजे काय । निर्गुण म्हणिजे काय । मज निरूपावें ॥ ९ ॥ निरंजन म्हणिजे अंजनचि नाहीं । निरंतर म्हणिजे अंतर नाहीं । निर्गुण म्हणिजे गुणचि नाहीं । परब्रह्मासी ॥ १० ॥ निःसंग म्हणिजे काय । निर्मळ म्हणिजे काय । निश्चळ म्हणिजे काय । मज निरूपावें ॥ ११ ॥ निःसंग म्हणिजे संगाचि नाहीं । निर्मळ म्हणिजे मळचि नाहीं । निश्चळ म्हणिजे चळण नाहीं । परब्रह्मासी ॥ १२ ॥ निःशब्द म्हणिजे काय । निर्दोष म्हणिजे काय । निवृत्ति म्हणिजे काय । मज निरूपावें ॥ १३ ॥ निःशब्द म्हणिजे शब्दाचि नाहीं । निर्दोष म्हणिजे दोषचि नाहीं । निवृत्ति म्हणिजे वृत्तिच नाहीं । परब्रह्मासी ॥ १४ ॥ निष्काम म्हणिजे काय । निर्लेप म्हणिजे काय । निष्कर्म म्हणिजे काय । मज निरूपावें ॥ १५ ॥ निष्काम म्हणिजे कामाचि नाहीं । निर्लेप म्हणिजे लेपाचि नाहीं । निष्कर्म म्हणिजे कर्माचि नाहीं । परब्रह्मासी ॥ १६ ॥ अनाम म्हणिजे काय । अजन्मा म्हणिजे काय । अप्रत्यक्ष म्हणिजे काय । मज निरूपावें ॥ १७ ॥ अनाम म्हणिजे नामाचि नाहीं । अजन्मा म्हणिजे जन्माचि नाहीं । अप्रत्यक्ष म्हणिजे प्रत्यक्ष नाहीं । परब्रह्म तें ॥ १८ ॥ अगणित म्हणिजे काय । अकर्तव्य म्हणिजे काय । अक्षय म्हणिजे काय । मज निरूपावें ॥ १९ ॥ अगणित म्हणिजे गणित नाहीं । अकर्तव्य म्हणिजे कर्तव्य नाहीं । अक्षय म्हणिजे क्षय नाहीं । परब्रह्मासी ॥ २० ॥ अरूप म्हणिजे काय । अलक्ष्य म्हणिजे काय । अनंत म्हणिजे काय । मज निरूपावें ॥ २१ ॥ अरूप म्हणिजे रूपाचि नाहीं । अलक्ष्य म्हणिजे लक्षित नाहीं । अनंत म्हणिजे अंताचि नाहीं । परब्रह्मासी ॥ २२ ॥ अपार म्हणिजे काय । अढळ म्हणिजे काय । अतर्क्य म्हणिजे काय । मज निरूपावें ॥ २३ ॥ अपार म्हणिजे पारांचि नाहीं । अढळ म्हणिजे ढळाचि नाहीं । अतर्क्य म्हणिजे तर्कत नाहीं । परब्रह्म तें ॥ २४ ॥ अद्वैत म्हणिजे काय । अदृश्य म्हणिजे काय । अच्युत म्हणिजे काय । मज निरूपावें ॥ २५ ॥ अद्वैत म्हणिजे द्वैतचि नाहीं । अदृश्य म्हणजे दृश्याचि नाहीं । अच्युत म्हणिजे च्युत नाहीं । परब्रह्म तें ॥ २६ ॥ अच्छेद्य म्हणिजे काय । अदाह्य म्हणिजे काय । अक्लेद्य म्हणिजे काय । मज निरूपावें ॥ २७ ॥ अच्छेद्य म्हणिजे छेदेना । अदाह्य म्हणिजे जळेना । अक्लेद्य म्हणिजे कोलवेना । परब्रह्म तें ॥ २८ ॥ परब्रह्म म्हणिजे सकळां परतें । तयास पाहतां आपणाचि तें । हें कळें अनुभवमतें । सद्गुरु केलिया ॥ २९ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे नवमदशके आशंका निरूपणं नाम प्रथमः समासः ॥ १ ॥

---

१ उपसर्ग, कोणत्याही प्रकारचा संबंध. २ योग्य दृष्टांत. ३ आश्रय. ४ आशा, इच्छा. ५ अज्ञान, अशुद्धपणा. ६ भेद. ७ गोचर. ८ मोजलेलें. ९ नाश. १० मनाला समजत नाहीं. ११ मर्यादा, अंत. १२ नाश पावणारें. १३ तोडलें जात नाहीं. १४ भिजविलें जात नाहीं.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ जें जें कांहीं साकारें[1] दिसे । तें तें कल्पांतीं[2] नासे । स्वरूप तें असताचि असे । सर्वकाळ ॥ १ ॥ जें सकळांमध्यें सार । मिथ्या नव्हे तें साचार । जें कां नित्य निरंतर । संचलेंचि असे ॥ २ ॥ तें भगवंताचें निजरूप । त्यासि बोलिजे स्वरूप । याहि वेगळीं अमूप[3] । नामें तयाचीं ॥ ३ ॥ त्यास नामाचा संकेत । कळावया हा दृष्टांत । परी तें स्वरूप नामातीत[4] । असताचि असे ॥ ४ ॥ दृश्यासबाह्य संचलें । परी तें विश्वास[5] चोरलें । जवळीच नाहींसें झालें । असताचि कैसें ॥ ५ ॥ ऐसा ऐकोनियां देव । उठे दृष्टीचा भावें । पाहों जातां दिसे सर्व । दृश्यचि अवघें ॥ ६ ॥ दृष्टीचा विषय दृश्य । तोचि झालिया सादृश्य[6] । तेणें दृष्टि पावे संतोष । परी तें देखणें नव्हे ॥ ७ ॥ दृष्टीस दिसे तें नासे । एतद्विषयीं † श्रुति असे । म्हणोनि जें दृष्टीस दिसे । तें स्वरूप नव्हे ॥ ८ ॥ स्वरूप तें निराभास । आणि दृश्य भासलें साभास[7] । भासास बोलिला नाश । वेदांतशास्त्रीं ॥ ९ ॥ आणि पाहतां दृश्यचि भासे । वस्तु दृश्यावेगळी[8] असे । स्वानुभवें पाहतां दिसे । दृश्यासबाह्य[9] ॥ १० ॥ जें निराभास निर्गुण । त्याची काय सांगावी खूण । परी तें स्वरूप जाण । सन्निधचि असे ॥ ११ ॥ जैसा आकाशीं भासला भास । आणि सकळांमध्यें आकाश । तैसा जाणिजे जगदीश । सबाह्य अभ्यंतरीं ॥ १२ ॥ उदकामध्यें परी भिजेना । पृथ्वीमध्यें परी झिजेना । वन्ही मध्यें परी शिजेना । स्वरूप देवाचें ॥ १३ ॥ तें व्योमामध्यें[10] परी बुडेना । तें वायूमध्यें परी उडेना । सुवर्णीं[11] असे परी घडेना । सुवर्णासारिखें ॥ १४ ॥ ऐसें जें संचलें सर्वदा[12] । परी तें आवळेना कदा । अभेदामाजी वाढवी भेदा । ते हे अहंता[13] ॥ १५ ॥ तिच्या स्वरूपाची खूण । सांगों कांहीं वोळखण । अहंतेचें निरूपण । सावध ऐका ॥ १६ ॥ जे स्वरूपाकडे पावे । अनुभवासवें झेपावें[14] । अनुभवाचे शब्द आघवे । बोलोन दावी ॥ १७ ॥ म्हणे आतां मीच स्वरूप । तोंचि अहंतेचें रूप । निराकारीं आपोआप । वेगळी पडे ॥ १८ ॥ स्वयें मीच आहे ब्रह्म । ऐसा अहंतेचा भ्रम । ऐसीये सूक्ष्मीं सूक्ष्म । पाहतां दिसे ॥ १९ ॥ कल्पना आकळी हेत । वस्तु कल्पनातीत । म्हणोन नाकळे अंत । अनंताचा ॥ २० ॥ अन्वय[15] आणि व्यतिरेक[16] । हा शब्दभेद कोणीएक । निःशब्दाचा अंतर्विवेक । शोधिला पाहिजे ॥ २१ ॥ आधीं घेईजे वाच्यांश[17] । मग वोळखिजे लक्ष्यांश[18] । लक्ष्यांशीं पाहतां वाच्यांश । असेल कैंचा ॥ २२ ॥ सर्व ब्रह्म आणि विमळ ब्रह्म[19] । हा वाच्यांशाचा अनुक्रमें[20] । शोधितां लक्ष्यांशाचें वर्म[21] । वाच्यांश नासे ॥ २३ ॥ सर्व विमळ[22] दोन्ही पक्ष ।

---

१ आकार युक्त. २ प्रलयकाळीं. ३ पुष्कळ. ४ दिसणारें जगत्, त्याच्या. ५ विश्वांतील (जगतांतील) लोकांस दिसत नाहीं. ६ धर्म. ७ गोचरीभूत. † "यद् दृष्टं तन्नष्टं" ८ आभासासह. ९ परब्रह्म. १० आंतबाहेर. ११ चिखलामध्यें १२ कळत नाहीं. १३ मीपणा. १४ असते, क्रीडा करते. १५ सर्व. १६ अन्वय=असणें. व्यतिरेक=नसणें. (ज्याच्या असण्यांत ज्याचें असणें असतें तो अन्वय, व ज्याच्या असण्यांत ज्याचें असणें नसतें, तो व्यतिरेक.) जसें, दागिन्यांत सुवर्णाचा अन्वय व सुवर्णांत दागिन्यांचा व्यतिरेक. १७ बोलतां येतो असा भाग. १८ मुख्य सामान्य भाग. १९ संगति, संबंध. २० सर्व ब्रह्म आणि मायारहित ब्रह्म.

वाच्यांशीं आटती प्रत्यक्ष । लक्ष्यांशीं लावितां लक्ष । ❀पक्षपात घडे ॥ २४ ॥ हें लक्ष्यांशे अनुभवणें । तेथें नाहीं वाच्यांश बोलणें । मुख्य अनुभवाचे खुणे । वाचारंभे कैंचा ॥ २५ ॥ परा पश्यंती मध्यमा वैखरी । जेथें वोसरती चारी । तेथें शब्द कैंळाकुसरी । कोणे काज ॥ २६ ॥ शब्द बोलतां सर्वांचे नासे । तेथें शाश्वतता कोठें असे । प्रत्यक्षास प्रमाण नसे । बरें पहा ॥ २७ ॥ शब्द प्रत्यक्ष नाशवंत । म्हणोन घडे पक्षपात । सर्व विमळ ऐसा हेत । अनुभवीं नाहीं ॥ २८ ॥ ऐक अनुभवाचें लक्षण । अनुभव-म्हणिजे अनन्यपण । ऐक अनन्याचें लक्षण । ऐसें असे ॥ २९ ॥ अनन्य म्हणिजे अन्य नसे । आत्मनिवेदैंन जैसें । संगैभंगें असताचि असे । आत्मा आत्मपणें ॥ ३० ॥ आत्म्यास नाहीं आत्मपण । हें निःसंगाचें लक्षण । हें वाच्यांशें बोलिलें जाण । कळावयाकारणें ॥ ३१ ॥ येऱ्हवीं लक्ष्यांश तो वाच्यांशें । सांगिजेल हें घडे कैसें । वाक्यविवरणें आपैसें । कळों लागे ॥ ३२ ॥ करावें तत्त्वविवरण । शोधावें ब्रह्म निर्गुण । पाहावें आपणास आपण । म्हणजे कळे ॥ ३३ ॥ हें न बोलतांचि विवरिजे । विवरोन विरोनैं राहिजे । मग अबोलणेंचि सांजे । महापुरुषीं ॥ ३४ ॥ शब्दचि निःशब्द होती । श्रुति नेति[1] नेति[1] म्हणती । हें तों आलें आत्मप्रचीती । प्रत्यक्ष आतां ॥ ३५ ॥ प्रचीतैं[2] आलिया अनुमान । हा तो प्रत्यक्ष दुरभिमान । तरी आतां मी अज्ञान । मज कांहींच न कळे ॥ ३६ ॥ मी लटिका माझें बोलणें लटिकें । मी लटिका माझें चालणें लटिकें । मी माझें अवघेंचि लटिकें । काल्पनिक ॥ ३७ ॥ मज मुळींच नाहीं ठावैं । माझें बोलणें अवघेंचि वाव । हा प्रकृैतीचा स्वभाव । प्रकृति लटिकी ॥ ३८ ॥ प्रकृति आणि पुरुैष । या दोहीस जेथें निरासैं । तेथें मीपण विशेष । हें केवीं घडे ॥ ३९ ॥ जेथें सर्वहि अशेषैं[7] झालें । तेथें विशेष कैंचें आलें । मी मौनी म्हणतां भंगलें । मौन जैसें ॥ ४० ॥ आतां मौन न भंगावें । करून कांहींच न करावें । असोन निःशेष नसावें । विवेकबळें ॥ ४१ ॥ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे नवमदशके ब्रह्मनिरूपणं नाम द्वितीयः समासः ॥ २ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ श्रोतीं केलें अनुैमान । ऐसें कैसें ब्रह्मज्ञान । कांहींच नाहीं असोन । हें केवीं घडे ॥ १ ॥ सकळ करूनि अकर्ता । सकळ भोगून अभोक्ता । सकळांमध्यें अलिप्तैता । येईल कैंची ॥ २ ॥ तथापि तुम्ही म्हणतां । योगी भोगून अभोक्ता । तरी स्वर्ग नरकही आतां । येणेंचि न्यायें ॥ ३ ॥ जन्ममृत्यु भोगिलेच भोगी । परी तो भोगून अभोक्ता योगी । पातक नाहीं तयालागीं । येणेंचि[10] पाडें[10] ॥ ४ ॥ कुटून नाहीं कुटिला । रडोन नाहीं रडला । कुंथोन नाहीं कुंथिला । योगीश्वर ॥ ५ ॥

❀ पक्षाचा नाश होतो. १ शब्दांची प्रवृत्ति. २ मागें हटतात. ३ शब्दाचे कलाकौशल्य. ४ स्वरूपांत ऐक्य पावणें. ५ देहाचा अभिमान गेल्यानें. ६ 'तत्त्वमसि' इत्यादि महावाक्यांच्या विवेचनानें. ७ आपोआप. ८ विचार करणें, बोलणें. ९ लीन होऊन. १० शोभतें ११ असें नाहीं, असें नाहीं. १२ अनुभव. १३ ठिकाण. १४ मायेचा. १५ प्रकृतीस आधार जो जगदात्मा, शंकर. १६ बाधा, न उरणें. १७ शून्य. १८ तर्क. १९ वेगळेपणा. २० या मानानें, या न्यायानें.

जन्म नसोन घातला । पतित नसोन झाला । यातना नसोन पावला । नानापरी ॥ ६ ॥ ऐसें श्रोतयांचें अनुभव । श्रोतीं घेतलें आडराने[1] । आतां याचें समाधान । केलें पाहिजे ॥ ७ ॥ वक्ता म्हणे सावध व्हावें । तुम्ही बोलतां धरवें । परी हें तुमच्याच अनुभवें । तुम्हांस घडे ॥ ८ ॥ ज्याचा अनुभव जैसा । तो तो बोलतो तैसा । संपदेविण जो धिंवसा[2] । तो निरर्थक ॥ ९ ॥ नाहीं ज्ञानाची संपदा । अज्ञानदरिद्रें आपदा । भोगिल्याच भोगी सदा । शब्दज्ञानें ॥ १० ॥ ज्ञानी वोळखावा ज्ञानेश्वरें । योगी वोळखावा योगीश्वरें । महा चतुर तो चतुरें । वोळखावा ॥ ११ ॥ अनुभवी अनुभवियासि कळे । अलिप्त अलिप्तपणें निवळे । विदेहाचा[3] देहभाव गळे । विदेही देखतां ॥ १२ ॥ बद्धासारिखा सिद्ध । आणि सिद्धासारिखा बद्ध । एक भावीलें[4] तो अबद्ध । म्हणावाच नलगे ॥ १३ ॥ झाडपला[5] तो देहधारी । आणि देहधारक पंचाक्षरी । परंतु दोघां एकसरी[6] । कैसी द्यावी ॥ १४ ॥ तैसा अज्ञान पतित । आणि ज्ञानी जीवन्मुक्त । दोघां समान मानी तो युक्त । कैसा म्हणावा ॥ १५ ॥ आतां असो हे दृष्टांत । प्रचीत बोलों कांहीं हेत । येथें श्रोतीं सावचित्त । क्षण एक व्हावें ॥ १६ ॥ जो ज्ञानें मुक्त झाला । जो विवेकें विराला । जो अनन्यपणें उरला । नाहींच कांहीं ॥ १७ ॥ तयास कैसें गवसावें[7] । शोधूं जातां तोचि व्हावें । तोचि होतां म्हणावें । नलगें कांहीं ॥ १८ ॥ देहीं पाहतां दिसेना । तत्त्वें शोधितां भासेना । ब्रह्म आहे निवडेना । कांहीं केल्या ॥ १९ ॥ दिसतो तरी देहधारी । परी कांहींच नाहीं अंतरीं । तयास पाहतां वरिवरि । कळेल कैसा ॥ २० ॥ कळाया शोधावें अंतर[8] । तंव तो नित्य निरंतर[9] । जयास धुंडितां विकार[10] । निर्विकार होती ॥ २१ ॥ तो परमात्मा केवळ । तयास नाहीं मायामळ । अखंड हेतूचा विटाळ । झालाच नाहीं ॥ २२ ॥ ऐसा जो कां योगिराज । तो आत्मा सहजीं सहज । पूर्णब्रह्म वेदबीजें[11] । देहाकारें कळेना ॥ २३ ॥ देह भावितां देहहि दिसे । अंतर अनारिसें[12] असे । तयास शोधितां नसे । जन्ममरण ॥ २४ ॥ जयास जन्ममरण व्हावें । तें तो नव्हेचि स्वभावें । नाहींच तें आणावें । कोठून कैंचें ॥ २५ ॥ निर्गुणास जन्म कल्पिला[13] । अथवा निर्गुण उडविला । तरी उडाला आणि जन्मला । आपला आपण ॥ २६ ॥ मध्यान्हीं थुंकितां सूर्यावरी । तो थुंका पडे आपणावरी । दुसऱ्यास चिंतितां अंतरीं । आपणास घडे ॥ २७ ॥ समर्थ रायाचें महिमानें[14] । जाणतां होतें समाधान । परंतु भुंकों लागलें श्वान । तरी तें श्वानचि असे ॥ २८ ॥ ज्ञानी तो सत्यस्वरूप[15] । अज्ञान देखे मनुष्यरूप । भावासारिखा फलद्रूप[16] । देव तैसा ॥ २९ ॥ देव निराकार निर्गुण । लोक भावितो पाषाण[17] । पाषाण फुटतो, निर्गुण । फुटेल कैसा ? ॥ ३० ॥ देव सदोदित संचला[18] । लोकीं[19] बहुविध केला । परंतु बहुविध

---

१ आडमार्ग. २ धैर्य ३ देहाभिमानरहिताचा. ४ मानील. ५ झपाटला. ६ बरोबरी. ७ विरघळला. ८ शोधून काढावें. ९ अंतःकरण, आंतला भाग. १० अगदी जवळ, आंत बाहेर एकच. ११ कामक्रोधादि विकार. १२ वेदाचें तत्त्व. १३ कल्पना केली असतां १४ निराळेंच. १५ मोठेपणा. १६ तिन्ही काळीं नष्ट न होणारा. १७ कल्पनेसारखा १८ देवाला पाषाण मानतात. १९ व्यापून आहे. २० लोकांनीं २१ नानाप्रकारचा.

झाला । हें तों घडेना ॥ ३१ ॥ तैसा साधु आत्मज्ञानी । बोधें पुर्ण समाधानी । विवेकें आत्मनिवेदनीं । आत्मरूपी ॥ ३२ ॥ जळोन काष्ठाचा आकार । अग्नि दिसे काष्ठाकार । परी काष्ठ होईल हा विचार । बोलोंच नये ॥ ३३ ॥ कर्पूर असे तो जळतां दिसे । तैसा ‡ ज्ञानीदेह भासे । तेयासि जन्मवितां कैसे । कर्दळीउदरीं ॥ ३४ ॥ बीज भाजलें उगवेना । वस्त्र जळालें उंकलेना । वोघ निवडितां निवडेना । गंगेमध्यें ॥ ३५ ॥ वोघ गंगेमागें दिसें । गंगा एकदेशीं असे । साधु कांहींच न भासे । आत्मा सर्वगत ॥ ३६ ॥ सुवर्ण नव्हे लोखंड । साधूसि जन्म थोतांड । अज्ञान प्राणी जड मूढ । तयांसि हें उमजेचिना ॥ ३७ ॥ अंधास कांहींच न दिसे । तरी ते लोकं आंधळे कैसे । सन्निपातें बरळतसें । सन्निपाती ॥ ३८ ॥ जो स्वप्नामध्यें भ्याला । स्वप्नभयें वोसंणला । तें भय जागत्याला । केवीं लागे ॥ ३९ ॥ मुंळी सर्पाकार देखिली । एक भ्याले एकें वोळखिली । दोघांची अवस्था लेखिली । सारखीच कैसी ॥ ४० ॥ हातीं धरितांही डसेना । हें एकास भासेना । तरी ते त्याची कल्पना । तयासीच बाधी ॥ ४१ ॥ विंचू सर्प डसला । तेणें तोचि जोकंळला । तयाचेनि लोक झाला । कासावीस कैसा ॥ ४२ ॥ आतां तुटलें अनुमान । ज्ञानियास कळे ज्ञान । अज्ञान्यास जन्ममरण । चुकोचि ना ॥ ४३ ॥ एका जाणण्यासाठीं । लोक पडिले आटाआटी । नेणतपणें हिंपुटी । होती जन्ममृत्यु ॥ ४४ ॥ तेंचि कथानुसंधान । पुढें केलें परिच्छिन्न । सावधान सावधान । म्हणे वक्ता ॥ ४५ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे नवमदशके निःसंदेहनिरूपणं नाम तृतीयः समासः ॥ ३ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ पृथ्वीमध्यें लोक सकळ । एक संपन्न एक दुर्बळ । एक निर्मळ एक ओंगळ । काय निमित्तें ॥ १ ॥ कित्येक राजे नांदती । कित्येक दरिद्र भोगिती । कित्येकांची उत्तम स्थिति । कित्येक अधमाधर्म ॥ २ ॥ ऐसें काय निमित्त झालें । हें मज पाहिजे निरूपिलें । याचें उत्तर ऐकिलें । पाहिजे श्रोतीं ॥ ३ ॥ हें सकळ गुणापासीं गती । सगुण भाग्यश्री भोगिती । अवगुणास दरिद्रप्राप्ति । यदर्थी संदेह नाहीं ॥ ४ ॥ जो जो जेथें उपजला । तो ते व्यवसायी उमजला । तयास लोक म्हणती भला । कार्यकर्ता ॥ ५ ॥ जाणता तो कार्य करी । नेणता कांहींच न करी । जाणता तो पोट भरी । नेणता भीक मागे ॥ ६ ॥ हें तों प्रकटाचि असे । जनीं पाहतां प्रत्यक्ष दिसे । विद्येविण करंटा वसे । विद्या तो भाग्यवंत ॥ ७ ॥ आपुली विद्या न सिकसी । तरी काय भीक मागसी । जेथें तेथें बुद्धि ऐसी । वडिलें सांगती ॥ ८ ॥

---

१ लांकडाचा. २ कापुरास. ‡ ज्ञान्याचा देह. ३ वेळीच्या पोटांत. ४ पसरवत नाहीं. ५ एका बाजूला. ६ साधु हा सर्वगत आत्मा असल्यामुळें तो कांहींच दिसत नाहीं. ७ परिसानें लोखंडाचें सोनें होतें, पण त्या सोन्याचें पुनः लोखंड होत नाहीं; त्याप्रमाणें साधूस पुनः जन्म नाहीं. ८ डोळस लोक. ९ निजेंत बोलला. १० झाडाची मुळी. ११ मानिली. १२ चावत नाहीं. १३ दुःखी झाला. १४ दगदगीमध्यें. १५ कष्टी. १६ विशद, स्पष्ट. १७ घाणेरडे. १८ नीचांहून नीच. १९ गुणी लोक. २० भाग्यरूप संपत्ति. २१ ह्याविषयीं. २२ उद्योगी.

वडील आहे करंटा । आणि समर्थ होय धाकुटा । कां जे विद्येनें मोठा । म्हणोनियां ॥ ९ ॥ विद्या नाहीं बुद्धि नाहीं । विवेक नाहीं संक्षेप नाहीं । कुशलता नाहीं व्याप नाहीं । म्हणोन प्राणी करंटा ॥ १० ॥ इतुकेंहि जेथें वसें । तेथें वैभवास उणे नसे । वैभव सोडितां आपैसें । पाठी लागे ॥ ११ ॥ वडील समर्थ धाकुटा भिकारी । ऐका याची कैसी परी । वडिलांऐसा व्याप न करी । म्हणोनियां ॥ १२ ॥ जैसी विद्या तैसी हांव । जैसा व्याप तैसें वैभव । ‡ तोलासारिखा हावभाव । लोक करिती ॥ १३ ॥ विद्या नसे वैभव नसे । तेथें निर्मळ कैचा असे । करंटपणें वोखटा दिसे । वेंगळ आणि विकारी ॥ १४ ॥ पशु पक्षी गुणवंत । त्यास कृपा करिती समर्थ । गुण नसतां जिणें व्यर्थ । प्राणिमात्रांचें ॥ १५ ॥ गुण नाहीं गौरव नाहीं । सामर्थ्य नाहीं महत्त्व नाहीं । कुशलता नाहीं तर्क नाहीं । प्राणिमात्रांसी ॥ १६ ॥ याकारणें उत्तम गुण । तेंचि भाग्याचें लक्षण । लक्षणेंविण †अवलक्षण । सहजचि झालें ॥ १७ ॥ जनांमध्यें जो जाणता । त्यास आहे मान्यता । कोणी एक विद्या असतां । महत्त्व पावे ॥ १८ ॥ प्रपंच अथवा परमार्थ । जाणता तोचि समर्थ । नेणता जाणिजे व्यर्थ । निष्कारण ॥ १९ ॥ नेणतां विंचू सर्प डसे । नेणतां जीवघात असे । नेणतां कार्य नासे । कोणी एक ॥ २० ॥ नेणतां प्राणी सिंतरे । नेणपणें तृष्णे भरे । नेणपणें ठके विसरे । पदार्थ कांहीं ॥ २१ ॥ नेणतां वैरी जिंकिती । नेणतां अपायीं पडती । नेणतां संहारिती । घडती जीवनाश ॥ २२ ॥ आपुलें स्वहित नकळे जनां । तेणें भोगिती यातना । ज्ञान नेणतां अज्ञाना । अधोगति ॥ २३ ॥ माया ब्रह्म जीव शिव । सारासार भावाभावें । ❀ जाणिल्यासाठीं होतें वावें । जन्ममरण ॥ २४ ॥ कोण कर्ता निश्चयेसी । बद्ध मोक्ष तो कोणासी । ऐसें जाणतां प्राणियांसी । सुटका घडे ॥ २५ ॥ जाणिजे देव निर्गुण । जाणिजे मी तो कोण । जाणिजे अनन्यलक्षण । म्हणिजे मुक्त ॥ २६ ॥ जितुकें जाणोन सांडिलें । तितुकें दृश्य वोलांडिलें । जाणत्यास जाणतां तुटलें । मूळ मीपणाचें ॥ २७ ॥ न जाणतां कोटिवरी । साधनें केलीं परोपरी । तरी मोक्षास अधिकारी । होणार नाहीं ॥ २८ ॥ माया ब्रह्म वोळखावें । आपणास आपण जाणावें । § इतुक्यासाठीं स्वभावें । चुके जन्म ॥ २९ ॥ जाणतां समर्थांचें अंतर । प्रसंगें वर्ते तदनंतर । भाग्य वैभव अपार । तेणेंचि पावे ॥ ३० ॥ म्हणोन जाणणें नव्हे सामान्य । जाणतां होईजे सर्वमान्य । कांहींच नेणता अमान्य । सर्वत्र करिती ॥ ३१ ॥ पदार्थ देखोन भूत भावी । नेणते झडपोन प्राण घेवी । मिथ्या आहे उठाठेवी । जाणते जाणती ॥ ३२ ॥ जाणत्यास कळे वर्म । नेणत्याचें खोटें कर्म । सकळ कांहीं धर्माधर्म । जाणतां कळे ॥ ३३ ॥ नेणत्यास यमयातना । जाणत्यास कांहींच लागेना । सकळ जाणोन विवंचना । करी तो मुक्त ॥ ३४ ॥ नेणतां कांहीं राजकारण । अपमान

---

१ भाग्ययान्, सत्पात्र. २ उद्योग. ३ पसारा. ४ आपोआप, सहज. ‡ योग्यतप्रमाणें, प्रसंगाप्रमाणें. ५ वाईट. † वाईट लक्षण. ६ फसतो. ७ नादीं पडतो. ८ संकटांत. ९ पतन. १० असणें व नसणें. ❀ जाणल्यानें. ११ व्यर्थ. १२ एकनिष्ठाचें चिन्ह. § येवढ्यानें. १३ पिशाच. १४ समजतो.

करून घेती प्राण । नेणतां कठिण वर्तमान । समस्तांस होय ॥ ३५ ॥ म्हणोनियां नेणतें खोटें । नेणते प्राणी ते करंटे । जाणतां विवरतां तुटे । जन्ममरण ॥ ३६ ॥ म्हणोन अलक्ष करूं नये । जाणणें हाचि उपाये । जाणतां सांपडे सोये । परलोकाची ॥ ३७ ॥ जाणणें सकळांस प्रमाण । मूर्खांस वाटे अप्रमाण । परंतु अलिप्तपणाची खूण । जाणतां कळे ॥ ३८ ॥ एक जाणणें करून परतें । कोण सोडील प्राणियातें । कोणी एक कार्य जें तें । जाणिल्याविण न कळे ॥ ३९ ॥ जाणणें म्हणिजे स्मरण । नेणणें म्हणिजे विस्मरण । दोहींमध्यें कोण प्रमाण । शाहणे जाणती ॥ ४० ॥ जाणते लोक ते शाहाणे । नेणते वेडे दैन्यवाणे । विज्ञान तेंहि जाणतपणें । कळों आलें ॥ ४१ ॥ जेथें जाणतेपण खुंटलें । तेथें बोलणेंहि तुटलें । हेतुरहित जाहलें । समाधान ॥ ४२ ॥ श्रोते म्हणती हें प्रमाण । झालें परम समाधान । परी पिंडब्रह्मांडऐक्यलक्षण । आम्हां निरूपावें ॥ ४३ ब्रह्मांडीं तेंचि पिंडीं असे । बहुत बोलती ऐसें । परंतु याचा प्रत्यय † विलसे । ऐसे केलें पाहिजे ॥ ४४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे नवमदशके जाणपणानिरूपणं । नाम चतुर्थः समासः ॥ ४ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ पिंडासारिखी ब्रह्मांडरचना । नये आमुच्या अनुमाना । प्रचीत पाहतां नाना । मतें भांबावती ॥ १ ॥ जें पिंडीं तेंचि ब्रह्मांडीं । ऐसी बोलावयाची प्रौढि । हें वचन घडीनें घडी । तत्त्वज्ञ बोलती ॥ २ ॥ पिंडब्रह्मांड एक रोहाटी । ऐसी लोकांची धाटी । परी प्रत्ययाचे परिपाठीं । तगों न शके ॥ ३ ॥ स्थूल सूक्ष्म कारण महाकारण । हे पिंडीचे चार देह जाण । विराट हिरण्यगर्भ अव्याकृत मूळ प्रकृति हे खूण । ब्रह्मांडाची ॥ ४ ॥ हे * शास्त्रधाटी जाणावी । परी प्रचीति कैसी आणावी । प्रचीत पाहतां ❀ गाथागोवी । होत आहे ॥ ५ ॥ पिंडीं आहे अंतःकरण । तरी ब्रह्मांडीं विष्णु जाण । पिंडीं बोलिजेतें मन । ब्रह्मांडीं चंद्रमा ॥ ६ ॥ पिंडीं बुद्धि ऐसें बोलिजे । तरी ब्रह्मांडी ब्रह्मा ऐसे जाणिजे । पिंडीं चित्त ब्रह्मांडीं वोळखिजे । नारायण ॥ ७ ॥ पिंडीं बोलिजे अहंकार । ब्रह्मांडी रुद्रे हा निर्धार । ऐसा बोलिला विचार । शास्त्रांतरीं ॥ ८ ॥ तरी कोण विष्णूचें अंतःकरण । चंद्राचें कैसें मन । ब्रह्मयाचें विलक्षण । मज निरूपावें ॥ ९ ॥ नारायणाचें कैसें चित्त । रुद्र अहंकाराचा हेत । हा विचार पाहोन नेमस्त । मज निरूपावा ॥ १० ॥ प्रचीतनिश्चयापुढें अनुमान । जैसें सिंहापुढें आलें श्वान । खऱ्यापुढें खोटें प्रमाण । होईल कैसें ॥ ११ ॥ परी यासि पारखी पाहिजे । पारखीनें निश्चय लाहिजे । परीक्षा नसतां राहिजे । अनुमानसंशयीं ॥ १२ ॥ विष्णु चंद्रमा आणि ब्रह्मा । नारायण आणि रुद्रनामा । या पांचांचीं अंतःकरणपंचकें आम्हां । स्वामी निरूपावीं ॥ १३ ॥ येथें प्रचीत हें प्रमाण । नलगे शास्त्राचें अनुमान । अथवा शास्त्रीं तरी पाहोन । प्रत्यय आणावा ॥ १४ ॥

---

१ दैवहीन. २ विवेचन करता. ३ वेगळेपणाची. ४ अनुभवज्ञान. ५ एकाव्यक्तीपासून तों सर्व जगत. ६ अनुभव. † प्रत्यक्ष होणें, चमकणें ७ देहासारखी. ८ गोंधळून जातात. ९ क्रम. १० रीत. * शास्त्राची रीत. ❀ गोंधळ, गुंतागुंत. ११ शंकर. १२ पारखकरणारा. १३ मिळविला जातो.

प्रचीतीविण जें बोलणें । तें अवघेंचे कंटाळणें । तोंड पसरोन जैसें सुणें । रडोन गेलें ॥ १५ ॥ तेथें काय हो ऐकावें । आणि काय शोधूनि पाहावें । जेथें प्रत्ययाच्या नावें । शून्याकार ॥ १६ ॥ अवघे आंधळेचि मिळाले । तेथें डोळसांचें काय चाले । अनुभवाचे नेत्र गेले । तेथें अंधकार ॥ १७ ॥ नाहीं दूध नाहीं पाणी । केली विष्टेची सारणी । तेथें निवडावयाचे धनी । ते एक डोंबकावळे ॥ १८ ॥ आपुले इच्छेनें बोलिलें । पिंडाऐसें ब्रह्मांड कल्पिलें । तरी तें प्रचीतीस आलें । कोण्या प्रकारें ॥ १९ ॥ म्हणोन हें अवघेंच अनुमान । अवघें कल्पनेचें रान । भल्यांनीं न घ्यावें ❀ आडरान । तस्करीं घ्यावें ॥ २० ॥ कल्पून निर्मिले मंत्र । देव ते कल्पनामात्र । देव नाहीं स्वतंत्र । मंत्राधीन ॥ २१ ॥ जेथें न बोलतां जाणावें । बोलणें विवेका आणावें । † आंधळें पाउलीं ओळखावे । विचक्षणें ॥ २२ ॥ जयास जैसें भासलें । तेणें तैसें कवित्व केलें । परी हें पाहिजे निवडिलें । प्रचीतीनें ॥ २३ ॥ ब्रह्मयानें सकळ निर्मिलें । ब्रम्ह्यास कोणें निर्माण केलें । विष्णूनें विश्व पालिलें । विष्णूस पालिता कोण ॥ २४ ॥ रुद्र विश्वसंहारकर्ता । परी त्या रुद्रास कोण संहारिता । कोण काळाचा नियंता । कळला पाहिजे ॥ २५ ॥ याचा कळेना विचार । तो अवघा अंधकार । म्हणोनियां सारासार । विचार करणें ॥ २६ ॥ ब्रह्मांड स्वभावेंचि झालें । परंतु हें पिंडाकार कल्पिलें । कल्पिलें परी प्रत्यया आलें । नाहीं कदा ॥ २७ ॥ पाहतां ब्रह्मांडाची प्रचीति । कित्येक संशय उठती । हें काल्पनिक श्रोतीं । नेमस्त जाणावें ॥ २८ ॥ पिंडासारखी ब्रह्मांडरचना । कोण आणितो अनुमाना । ब्रह्मांडीं पदार्थ नाना । ते पिंडीं कैचे ॥ २९ ॥ औटकोटि भूतावळी । औटकोटि तीर्थावळी । औटकोटि मंत्रावळी । पिंडीं कोठें ॥ ३० ॥ तेहतीस कोटि सुरवर । अठ्ठ्यायशीं सहस्र ऋषीश्वर । नवकोटि कात्यायनीचा विचार । पिंडीं कोठें ॥ ३१ ॥ चामुंडा छपन्नकोटी । कित्येक जीव कोट्यानुकोटी । चौऱ्यांयशीं लक्ष योनींची दाटी । पिंडीं कोठें ॥३२॥ ब्रह्मांडीं पदार्थ निर्माण झाले । पृथ्वीगाकारें वेगळाले । तेहि तितुके निरूपिले । पाहिजेत पिंडीं ॥३३॥ जितुक्या औषधीं तितुकीं फळें । नानाप्रकारचीं रसाळें । नाना बीजें धान्यें सकळें । पिंडीं निरूपावीं ॥३४॥ हें सांगतां पुरवेना । तरी उगेच बोलावेना । बोलिलें न येतां अनुमाना । लाजिरवाणें ॥३५॥ तरी हें निरूपिलें नवचे । फुकट बोलतां काय वेंचे । याकारणें अनुमानाचें । कार्य नाहीं ॥ ३६ ॥ पांच भूतें तीं ब्रह्मांडीं । आणि पांचचि वर्तती पिंडीं । यांची पाहावी रोकडी । प्रचीत आतां ॥ ३७ ॥ पांचां भूतांचें ब्रह्मांड । आणि पांचभौतिक हें पिंड । या वेगळें तें उदंड । अनुमानज्ञान ॥ ३८ ॥ जितुकें अनुमानाचें बोलणें । तितुकें वमनप्राय त्यागणें । निश्चयात्मक तेंचि बोलणें । प्रत्ययाचें

---

१ सर्व. २ कुत्रे. ३ पूज्य, नसणे. ४ गटार. ५ शरिरासारखें. ६ चतुर्दश भुवनात्मक ईश्वरनिर्मित अंडाकार रचना. ❀ भलत्या कल्पना, भलते मार्ग. ७ चोरांनीं. ८ मंत्राच्या स्वाधीन. † आंधळ्याचे डोळे जरी नीट धड असे दिसले तरी त्याचे चालण्यावरून तो आंधळा आहे असें जाणतां येतें. ९ शहाण्यानें. १० शंकर. ११ सृष्टीचा नाश करणारा. १२ शासन करणारा. १३ साडेतीन कोटी. १४ भूतांची आवलि-पंक्ति, समूह. १५वेगवेगळ्या आकाराने. १६गोड. १७ खर्च होने. १८ तर्काचें. १९ ओकीसारखें.

॥ ३९ ॥ जें पिंडीं तेंचि ब्रह्मांडीं । प्रचीत नाहीं कीं रोकडी । पंचभूतांची तांतडी । दोहींकडे ॥ ४० ॥ म्हणोनि दोहींचें स्थानमान । तें तीं अवघेंचि अनुमान । आतां एक समाधान । मुख्य तें कैसे ॥ ४१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे नवमदशके अनुमाननिरसननिरूपणं नाम पंचमः समासः ॥ ५ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ आकाश जैसें निराकार । तैसा ब्रह्माचा विचार । तेथें वायूचा विकार । तैशा मूळमाया ॥ १ ॥ हे दासबोधीं अर्थें बोलिलें । ज्ञानदशकीं ‡ प्रांजळ केलें । मूळमायेंत दाखविलें । पांचभौतिक ॥ २ ॥ तेथें जाणीव तो सत्त्वगुण । मध्यें तो रजोगुण । नेणीव तो तमोगुण । जाणिजे श्रोतां ॥ ३ ॥ म्हणाल तेथें कैंची जाणीव । तरी ऐका याचा अभिप्राव । पिंडीं महाकारणदेहीं सर्व-। साक्षिणी अवस्था ॥ ४ ॥ तैसी मूळप्रकृति ब्रह्मांडींचें । देह महाकारण साचें । म्हणोनि तेथें जाणिवेचें । अधिष्ठान आलें ॥ ५ ॥ असो मूळमायेभीतरीं । गुप्त त्रिगुण वास करी । स्पष्ट होती संधिचेतुरीं । जाणावी गुणक्षोभिणी ॥ ६ ॥ जैसा † तृणाचा पोटरा कळा । पुढें उकलोन होय मोकळा । तैसी मूळमाया अवलीळा । गुणा प्रसवली ॥ ७ ॥ मूळमाया वायुस्वरूप । ऐका गुणक्षोभिणीचें रूप । गुणविकार होतांचि अल्प । गुणक्षोभिणी बोलिजे ॥ ८ ॥ पुढें जाणीव मध्यस्थ नेणीव । मिश्रित चालिला स्वभाव । तेथें मातृकास ठाव । शब्द जाहला ॥ ९ ॥ तो शब्द गुण आकाशींचा । ऐसा अभिप्राय येथींचा । शब्दींचि वेदशास्त्रांचा । आकार जाहला ॥ १० ॥ पंचभूतें त्रिगुणाकार । अवघा वायूचा विकार । जाणीवनेणिवेचा विचार । वायूचकरितां ॥ ११ ॥ वायु नसतां कैंची जाणीव । जाणीव नसतां कैंची नेणीव । जाणीव नेणिवेसि ठाव । वायुगुणें ॥ १२ ॥ जेथें मुळींच नाहीं चळण । तेथें कैंचें जाणीवलक्षण । म्हणोन वायूचा गुण । नेमस्त जाणावा ॥ १३ ॥ एकापासून एक झालें । हें एक उगेंच दिसोन आलें । स्वरूप मुळींच भासलें । त्रिगुण भूतांचें ॥ १४ ॥ ऐसा हा मुळींचा कर्दम । पुढें स्पष्टतेचा अनुक्रम । सांगतां एकापासून एक उगम । हेंहि खरें ॥ १५ ॥ वायूचा कर्दम बोलिला । तयापासून अग्नि झाला । तोहि पहातां देखिला । कर्दमाचि ॥ १६ ॥ अग्नीपासून झालें ओपें । तेंहि कर्दमस्वरूप । आपापासून पृथ्वीचें रूप । तेंहि कर्दमरूपी ॥ १७ ॥ येथें आशंका उठली । भूतांत जाणीव कोठें देखिली । तरी भूतांत जाणीव ऐकिली । नाहीं वार्ता ॥ १८ ॥ जाणीव म्हणजे जाणतें चळण । तेंचि वायूचें लक्षण । वायुअंगीं सकळ गुण । मागां निरूपिले ॥ १९ ॥ म्हणोन जाणीवनेणीवमिश्रित । अवघें चालिलें पंचभूत । म्हणोनियां भूतांत । जाणीव असे ॥ २० ॥ कोठें दिसे कोठें न दिसे । परी तें भूतीं व्यापून असे । तीक्ष्णबुद्धि करितां भासे । स्थूळ सूक्ष्म ॥ २१ ॥ पंचभूतें आकारलीं । भूतीं भूतें कालवलीं । परी पहातां भासलीं । एक स्थूळ एक सूक्ष्में

---

१ व्याप्ति. ‡ स्पष्ट. २ जाणतेपणा. ३ न जाणणें, अज्ञान. ४ स्थूल, सूक्ष्म, कारण या तीन देहांना जाणणारा, देह. ५ कालवेऱ्यांनां. ६ त्रिगुण प्रकट करणारी. † उकलण्यापूर्वीचें कणीस ७ सहज, अकस्मात. ८ अकारादि अक्षरांस. ९ चिखल, मिश्रण. १० उदक. ११ पंचभूतांत.

॥ २२ ॥ निरोधें[1] वायु न भासे । तैसी जाणीव न दिसे । न दिसे परी ते असे । भूतरूपें ॥ २३ ॥ काष्ठीं अग्नि दिसेना । निरोधवायु भासेना । जाणीव तैसी लक्षेना । एकाएकीं ॥ २४ ॥ भूतें वेगळालीं दिसतीं । पहातां एकाचि भासतीं । बहुत धूर्तपणें प्रचीति । वोळखावी ॥ २५ ॥ ब्रह्मापासून मूळमाया । मूळमायेपासून गुणमाया । गुणमायेपासून तयां । गुणांस जन्म ॥ २६ ॥ गुणापासूनियां भूतें । पावलीं स्पष्ट दशेतें । ऐसीं यांचीं रूपें समस्तें । निरूपिलीं ॥ २७ ॥ आकाश गुणापासून जाहलें । हें कदापि नाहीं घडलें । शब्दगुणास कल्पिलें । आकाश वायां ॥ २८ ॥ एक सांगतां एकाचि भावी । उगीच करी § गाथागोवी । तया वेड्याची उगवी । कोणें करावी ॥ २९ ॥ शिकविल्याहि कळेना । उमजविल्याहि उमजेना । दृष्टांतेंहि तर्केना । मंदरूप ॥ ३० ॥ भूतांहून भूत थोर । हाहि दाखविला विचार । परी भूतांवडील स्वतंत्र । कोण आहे ॥ ३१ ॥ जेथें मूळमाया पांचभौतिकें । तेथें काय राहिला विवेक । मूळमायेपरतें एक । निर्गुण ब्रह्म ॥ ३२ ॥ ब्रह्मीं मूळमाया झाली । तिची लीला परीक्षिली । तंव ते निखळ वोतिली । भूतें त्रिगुणांचीं ॥ ३३ ॥ भूतें विकारवंत चार । आकाश पाहतां निर्विकार । आकाश भूत हा विचार । उपाधीवरितां ॥ ३४ ॥ पिंडीं व्यापक म्हणोन जीव । ब्रह्मांडीं व्यापक म्हणोन शिव । तैसाचि हाहि अभिप्राव । आकाशाचा ॥ ३५ ॥ उपाधीमध्यें सांपडलें । सूक्ष्म पाहतां भासलें । इतुक्यासाठीं आकाश झालें । भूतरूप ॥ ३६ ॥ आकाश अवकाश तो भकाश । परंतु ब्रह्म तें निराभास । उपाधि नसतां जें आकाश । तेंचि ब्रह्म ॥ ३७ ॥ जाणीव नेणीव मध्यमान । हेंचि गुणांचें प्रमाण । येथें निरूपिलें त्रिगुण । रूपेंसहित ॥ ३८ ॥ प्रकृति पावली विस्तारातें । पुढें एकाचें एकचि होतें । विकारवंताचि तयातें । नेम कैंचा ॥ ३९ ॥ काळें पांढरें मेळवितां । पारवें होय तत्त्वतां । काळें पिंवळें मेळवितां । हिरवें होय ॥ ४० ॥ ऐसे रंग नानापरी । मेळवितां पालट धरी । तैसें दृश्य हें विकारी । विकारवंत ॥ ४१ ॥ एका जीवनें[11] नाना रंग । उमटों लागती तरंग[12] । पालटाचा लागवेग । किती म्हणोन पहावा ॥ ४२ ॥ एका उदकाचे विकार । पाहतां दिसती अपार । पांचभूतांचा विस्तार । चौऱ्यांयशीं लक्ष योनी ॥ ४३ ॥ नाना देहांचें बीज उदक । उदकापासून सकळ लोक । किडा मुंगी श्वापदादिक । उदकेंचि होय ॥ ४४ ॥ शुक्रें शोणितें[13] म्हणिजे नीर । त्या नीरांचें हें शरीर । नखें दंत अस्थि[14] मात्र । उदकाच्या होती ॥ ४५ ॥ मुळाचे बारीक पागोरे[15] । तेणें[16] पंथें[17] उदक भरे । त्या उदकेंचि विस्तारें । वृक्षमात्र ॥ ४६ ॥ आम्रवृक्ष मोहरा आले । अवघे उदकाकरितां झाले । फळीं फुलीं लगडले । सावकाश ॥ ४७ ॥ खोडें[18] फोडून आंबे पहातां । तेथें दिसेना सर्वथा । खांद्याचे ढेपळे काढितां । वोली साल ॥ ४८ ॥ मुळापासून शेव-

---

१ स्तंभनानें, प्रतिबंधानें. २ अवस्थेला, स्वरूपाला. § गोंधळ. ३ कल्पना करी. ४ समजून. ५ पंचभूतात्मक, पंचभूतांनीं झालेली. ६ केवळ, सर्व. ७ मायेमुळें, मर्यादित स्थितीमुळें. ८ ईश्वर. ९ शून्य. १० निळसर. ११ उदकानें. १२ लहरी. १३ त्वरा. १४ हिंसक जनावरें. १५ रेत. १६ रक्त. १७ हाडें. १८ तंतुरूप मुळ्या. १९ त्या वाटेनें. २० भरून आले. २१ लांकूड. २२ मोठया साली.

टवरी । फळ नाहीं तेदतरी । जळरूप फळ चतुरीं । विवेकें जाणावें ॥ ४९ ॥ तेंचि जळ शेंड्यासि चढे । तेव्हां वृक्षमात्र लिगडे । एकाचें एकचि घडे । येणें प्रकारें ॥ ५० ॥ पत्रें पुष्पें फळें भेद । किती करावा अनुवाद । सूक्ष्म दृष्टीनें विशद । होत आहे ॥ ५१ ॥ भूतांचे विकार सांगं किती । क्षणक्षणा पालटती । एकाचे एकचि होती । नाना वर्ण ॥ ५२ ॥ त्रिगुणभूतांची लटपट । पाहों जातां हे खटपट । बहु रूप बहु पालट । किती म्हणोन सांगावा ॥ ५३ ॥ ये प्रकृतीचा ❀ निरास । विवेकें करावा सावकाश । मग परमात्मा परेश । अनन्यभावें भजावा ॥ ५४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे नवम दशके गुणरूपनिरूपणं नाम षष्ठः समासः ॥ ६ ॥

श्रीगणेशायनमः ॥ ॥ आधीं स्थूळ आहे एक । तरी मग अंतःकरणपंचक । जाणतेपणाचा विवेक । स्थूळाकरितां ॥ १ ॥ तैसें ब्रह्मांडेविणें कांहीं । मूळमायेसि जाणीव नाहीं । तया स्थूळाच्या आधारें सर्वही । कार्य चाले ॥ २ ॥ तें स्थूळचि नसतां निर्माण । कोठें राहील अंतःकरण । ऐसा श्रोतीं केला प्रश्न । याचें प्रत्युत्तर आइका ॥ ३ ॥ कोसलें अथवा कांटेघरें । नाना पृष्टभागीं चालतीं घरें । जीव करिती लहानथोरें । शक्त्यनुसार ॥ ४ ॥ शंख शिंपीं घुला कवडे । आधीं त्यांचे घर घडे । किंवा आधीं निर्माण किडे । हें विचारावें ॥ ५ ॥ आधीं प्राणी ते होती । मग घरें निर्माण करिती । हे तों प्रत्यक्ष प्रचीति । सांगणें नलगे ॥ ६ ॥ तैसें आधीं सूक्ष्म जाण । मग स्थूळ निर्माण । येणें दृष्टांतें प्रश्न । फिटला श्रोतयांचा ॥ ७ ॥ तंव श्रोता पुसे आणिक । जी आठवलें कांहींएक । जन्ममृत्यूंचा विवेक । मज निरूपावा ॥ ८ ॥ कोण जन्मास घालितें । आणि मागुता कोण जन्म घेतें । हें प्रत्यया कैसें येतें । कोण्या प्रकारें ॥ ९ ॥ ब्रह्मा जन्मास घालितो । विष्णु प्रतिपाळ करितो । रुद्र अवघें संहारितो । ऐसें बोलती ॥ १० ॥ तरी हें प्रवृत्तीचें बोलणें । प्रत्ययास आणी उणें । प्रत्यय पहातां श्लाघ्यवाणें । होणार नाहीं ॥ ११ ॥ ब्रह्म्यास कोणें जन्मास घातले । विष्णूस कोणें प्रतिपालिलें । रुद्रास कोणें संहारिलें । महाप्रळयीं ॥ १२ ॥ म्हणोनि हा सृष्टिभाव । अवघा मायेचा स्वभाव । कर्ता म्हणोनि निर्गुण देव । तरी तो निर्विकारी ॥ १३ ॥ म्हणावें माया जन्मास घाली । तरी हे आपणचि विस्तारली । आणि विचारितां थावरली । हेंहि घडेना ॥ १४ ॥ आतां जन्मतो कोण । कैसी त्याची वोळखण । आणि संचिताचें लक्षण । तेंहि निरूपावें ॥ १५ ॥ पुण्याचें कैसें रूप । आणि पापाचें कैसें स्वरूप । याहि शब्दांचा आक्षेप । कोण कर्ता ॥ १६ ॥ हें कांहींच नये अनुमाना । म्हणती जन्म घेते वासना । तरी ते पाहतां दिसेना । ना धरितां न ये ॥ १७ ॥ वासना कामना आणि कल्पना । हेतु भावना मति नाना । ऐशा अनंत वृत्ति जाणा । अंतःकरणपंचकाच्या

---

१ त्याच्या आंत. २ भरून येतो ३ चर्चा. ❀ नाश. ४ पचभूतात्मक शरीर. ५ कोसल्याकिड्यांचीं घरें. ६ वासनात्मक लिंगशरीर. ७ शंकर. ८ नाश करतो. ९ संसारांतील व्यावहारिक. १० स्तुत्य. ११ रक्षण केलें. १२ प्रलयकालीं. १३ सृष्टीची स्थिति. १४ स्थिर झाली. १५ पूर्वजन्मार्जिताचें. १६ विचार.

॥ १८ ॥ असो हें अवघें जाणीवयंत्र । जाणीव म्हणजे स्मरणमात्र । त्या स्मरणास जन्मसूत्र । कैसें लागे ॥ १९ ॥ देह निर्माण पांचभूतांचा । वायु चालक तयांचा । जाणणें हा मनाचा । मनोभाव ॥ २० ॥ ऐसें हें सहजचि घडलें । तत्त्वांचें गुंथाडें झालें । कोणास कोणें जन्मविलें । कोण्या प्रकारें ॥ २१ ॥ तरी हें पाहतां दिसेना । म्हणोनि जन्माचि असेना । उपजला प्राणी येईना । मागुती जन्मा ॥ २२ ॥ कोणासीच जन्म नाहीं । तरी सत्संगें केलें कांहीं । ऐसा अभिप्राय सर्वहि । श्रोतयांचा ॥ २३ ॥ पूर्वी स्मरण ना विस्मरण । मध्येंचि हें झालें स्मरण । अंतर्यामीं अंतःकरण । जाणती कळा ॥ २४ ॥ सावध आहे तों स्मरण । विकळ होतां विस्मरण । विस्मरण पडतां । मरण । पावती प्राणी ॥ २५ ॥ स्मरण विस्मरण राहिलें । मग देहास मरण आलें । पुढें जन्मास घातलें । कोणास कोणें ॥ २६ ॥ म्हणोनि जन्माचि असेना । आणि यातनाहि दिसेना । अवघी व्यर्थाचि कल्पना । बळावली ॥ २७ ॥ म्हणोनि जन्माचि नाहीं कोणासी । श्रोतयांची आशंका ऐसी । मरोन गेले ते जन्मासी । मागुतीं न ये ॥ २८ ॥ वाळलें काष्ठ हिरवेळेना । पडिलें फळ पुन्हा लागेना । तैसें पडिलें शरीर येईना । जन्मास मागुतें ॥ २९ ॥ मडकें अवाचितें फुटलें । फुटलें तें फुटोनी गेलें । तैसेंचि पुन्हा जन्मलें । नाहीं मनुष्य ॥ ३० ॥ येथें अज्ञान आणि सज्ञान । सारिखेंचि झालें समान । ऐसें बळावलें अनुमान । श्रोतयांसी ॥ ३१ ॥ वक्ता म्हणे हो ऐका । अवघें पाखांड करूं नका । सावध होऊन विवेका । अवलोकावें ॥ ३२ ॥ प्रयत्नोविण कार्य झालें । जेविल्याविण पोट भरलें । ज्ञानेविण मुक्त झालें । हें तों घडेना ॥ ३३ ॥ स्वयें आपण जेविला । त्यास वाटे लोक धाला । परंतु हें समस्तांला । घडलें पाहिजे । ॥ ३४ ॥ पोहणें शिकला तो तरेल । पोहणें नेणें तो बुडेल । येथेंहि अनुमान करील । ऐसा कवणू ॥ ३५ ॥ तैसें जयांस ज्ञान झालें । ते ते तितुकेच तरले । ज्याचें बंधन तुटलें । तोचि मुक्त ॥ ३६ ॥ मोकळा म्हणे नाहीं बंधन । आणि प्रत्यक्ष बंदीं पडिले जन । त्यांचें कैसें समाधान । तें तुम्हीं पाहा ॥ ३७ ॥ नेणे दुसऱ्याची तळमळ । तें मनुष्य परदुःखें शीतळ । तैसाचि हाहि केवळ । अनुभव जाणावा ॥ ३८ ॥ जयास आत्मज्ञान झालें । तत्त्वें तत्त्व विवंचिलें । खुणेसि पावतां बाणलें । समाधान ॥ ३९ ॥ ज्ञानें चुके जन्ममरण । सांगट बोलणें अप्रमाण । वेद शास्त्र आणि पुराण । मग कासयासी ॥ ४० ॥ वेदशास्त्रविचारबोली । महानुभवांची मंडळी । भूमंडळीं लोक सकळी । हें मानीतना ॥ ४१ ॥ अवघें होतां अप्रमाण । मग आपुलेंच काय प्रमाण । म्हणोनि जेथें आत्मज्ञान । तोचि मुक्त ॥ ४२ ॥ अवघेच मुक्त पाहतां नर । हाहि ज्ञानाचा ‡ उद्गार । ज्ञानेविण तो उद्धार । होणार नाहीं ॥ ४३ ॥ आत्मज्ञान कळों आलें । म्हणोनि दृश्य मिथ्या झालें । परंतु वेढां लावविलें । सकळांस येणें ॥ ४४ ॥

---

१ मिश्रण, गुंतावा. २ जाणीव शक्ति. ३ धट्टाकट्टा, हुशार. ४ विकृतिग्रस्त, विव्हळ. ५ ओलें हात नाहीं. ६ अकस्मात. ७ तृप्त झाला. ८ दुःख. ९ परदुःख न वाटणें. १० विवेचन केलें, शोधलें. ११ सकल. ‡ बोलणें. १२ भ्रमविलें.

आतां प्रश्न फिटला । ज्ञानी ज्ञानें मुक्त झाला । अज्ञान तो बांधला । आपुले कल्पनेनें ॥ ४५ ॥ विज्ञानासारिखें अज्ञान । आणि मुक्तासारिखें बंधन । निश्चयासारिखें अनुमान । मानूंचि नये ॥ ४६ ॥ बंधन म्हणिजे कांहींच नाहीं । परी वेढां लाविलें सर्वहि । यासि उपायचि नाहीं । कळल्यावांचूनी ॥ ४७ ॥ कांहींच नाहीं आणि बाधी । हेंचि नवल पाहतां आधीं । मिथ्या जाणिजेना बंधीं । म्हणोनि बद्ध ॥ ४८ ॥ भोळा भाव सिद्धीस जाव । हा उधाराचा उपाव । रोकडा मोक्षाचा अभिप्राव । विवेकें जाणावा ॥ ४९ ॥ प्राणी व्हावया मोकळा । आधीं पाहिजे जाणिवकळा । सकळ जाणतां निराळा । सहजचि होय ॥ ५० ॥ कांहींच नेणिजे तें अज्ञान । सकळ जाणिजे तें ज्ञान । जाणीव राहतां विज्ञान । स्वयंचि आत्मा ॥ ५१ ॥ अमृत सेवून अमर झाला । तो म्हणे मृत्यु कैसा येतो जनाला । तैसा विवेकी म्हणे बद्धाला । जन्म तो कैसा ॥ ५२ ॥ जाणता म्हणे जनांतें । तुम्हांस भूत कैसें झडपितें । तुम्हांस विष कैसें चढतें । निर्विष म्हणे ॥ ५३ ॥ आधीं बद्धासारिखें व्हावें । मग हें नलगोचि पुसावें । विवेक दूरी ठेऊन पाहावें । लक्षण बद्धाचें ॥ ५४ ॥ निजल्यास चेईला तो । म्हणे हा कां रे वोसेणतो । अनुभव पाहणेंचि आहे तो । तरी मग निजोन पाहावा ॥ ५५ ॥ ज्ञात्याची उगवली वृत्ति । बद्धाऐसी न पडे गुंती । भुकेल्याची अनुभवप्राप्ति । धाल्यासि नाहीं ॥ ५६ ॥ इतुकेन आशंका तुटली । ज्ञानें मोक्षप्राप्ति झाली । विवेक पहातां बाणली । अंतरस्थिति ॥ ५७ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे नवमदशके विकल्पनिरसननिरूपणं नाम सप्तमः समासः ॥७॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ज्ञानी सुटला ज्ञानमतें । परंतु जन्म कैसा बद्धातें । बद्धाचें काय जन्मतें । अंतकाळीं ॥ १ ॥ बद्ध प्राणी मरोन गेले । तेथें कांहींच नाहीं उरलें । जाणिवेचें विस्मरण झालें । मरणापूर्वीं ॥ २ ॥ ऐसी घेतली आशंका । याचें उत्तर ऐका । आतां दुश्चित होऊं नका । म्हणे वक्ता ॥ ३ ॥ पंचप्राण स्थळें सोडिती । प्राणरूप वासनावृत्ति । वासनामिश्रित प्राण जाती । देह सोडूनियां ॥ ४ ॥ वायूसरसी वासना गेली । ते वायुरूपेंचि राहिली । पुन्हा जन्म घेऊनि आली । हेतुपरत्वें ॥ ५ ॥ कित्येक प्राणी निःशेष मरती । पुन्हा मागुते जीव येती । टाकून दिल्हे तेणें दुखवती । हस्तपादादिक ॥ ६ ॥ सर्पदंश झालियावरी । तीन दिवसां उठवी धन्वंतरी । तेव्हां ते माघारी । वासना येते कीं ॥ ७ ॥ कित्येक शेवें होऊन पडतीं । कित्येक तयांस उठविती । यमलोकांहून आणिती । माघारे प्राणी ॥ ८ ॥ कित्येक पूर्वी शापिले । ते शापदेह पावले । उःशापकाळीं पुनः आले । पूर्वदेहीं ॥ ९ ॥ कित्येकां बहु जन्म घेतले । कित्येक परकाया प्रवेशले । ऐसे आले आणि गेले । बहुत लोक ॥ १० ॥

---

१ अनुभवयुक्त ज्ञानासारखें. २ बंधन हें मिथ्या आहे, हें ठाऊक नाही म्हणूनच तो बद्ध. ' ज्ञानाची स्फूर्ति थांबली असतां ३ न मरणारा. ४ जागा झालेला. ५ बरळतो. ६ तृप्त झालेल्यास. ७ शंका. ८ परब्रह्मस्थिति. ९ दुर्लक्ष करणारे. १० प्राण, अपान, व्यान, उदान आणि समान मिळून पंचप्राण. ११ कारणपरत्वें. १२ वैद्य. १३ प्रेतें. १४ शापाच्या अंतसमयी. १५ दुसऱ्याच्या शरिरांत.

फुंकिल्यासरिसा वायु गेला । तेथें वायुसुत[1] निर्माण झाला । म्हणोन वायुरूप वासनेला । जन्म आहे ॥ ११ ॥ मनाच्या वृत्ति नाना । त्यांत जन्म घेते वासना । वासना पाहतां दिसेना । परंतु आहे ॥ १२ ॥ वासना जाणिजे जाणीवहेतु । जाणीव मुळींचा मूळतंतु । मूळमायेंत असे मिश्रितु । कारणरूपें ॥ १३ ॥ कारणरूपें आहे ब्रह्मांडीं । कार्यरूपें वर्ते पिंडीं[2] । अनुमानितां तांतडी । अनुमानेना ॥ १४ ॥ परंतु आहे सूक्ष्मरूप । जैसें वायूचें स्वरूप । सकळ देव वायुरूप । आणि भूतसृष्टि[3] ॥ १५ ॥ वायूमध्यें विकार नाना । वायु तरी पहातां दिसेना । तैसी जाणीव वासना । अति सूक्ष्म ॥ १६ ॥ त्रिगुण आणि पंचभूतें । हीं वायूमध्यें मिश्रितें । अनुमानेना म्हणोनि त्यातें । मिथ्या म्हणों नये ॥ १७ ॥ सहज वायु चाले । तरी सुगंध दुर्गंध कळों आले । उष्ण शीतळ तेंहि[4] निवाले । प्रत्यक्ष प्राणी ॥ १८ ॥ वायूचेनि मेघ वोळती । वायूचेनि नक्षत्रें चालती । सकळ सृष्टीची वर्तती गति । सकळ तो वायु ॥ १९ ॥ वायुरूपें दैवतें भूतें । अंगीं भरतीं अकस्मातें । विधि[6] केलिया प्रेतें । सावध होतीं ॥ २० ॥ राहणें ब्राह्मणसमंध जाती । राहणें ठेवणी सांपडती । नाना गुंतले उगवती । प्रत्यक्ष रहाणें ॥ २१ ॥ वारें निराळें न बोले । देहामध्यें भरोन डोले । ओळी घेऊन जन्मा आले । कित्येक प्राणी ॥ २२ ॥ ऐसा वायुचा विकार । एवंच कळेना विस्तार । सकळ कांहीं चराचर । वायूमुळें ॥ २३ ॥ वायु स्तब्धरूपें[11] सृष्टिधर्ता । वायु चंचलरूपें सृष्टिकर्ता । न कळे तरी विचारीं प्रवर्ततां । म्हणिजे कळे ॥ २४ ॥ मुळापासून शेवटवरी । वायुचि सकळ कांहीं करी । वायुवेगळें कर्तृत्व चतुरीं । मज निरूपावें ॥ २५ ॥ जाणीवरूप मूळमाया । जाणीव जाते आपुल्या ठायां । गुप्त प्रकट होऊनियां । विश्वीं वर्ते ॥ २६ ॥ कोठें गुप्त कोठें प्रकटे । जैसें जीवन[12] उफाळे आटे । पुढें मागुतां ओघ लोटे । भूमंडळीं ॥ २७ ॥ तैसाच वायूमध्यें जाणीवप्रकार । उमटे[13] ओटे निरंतर । कोठें विकारें[15] कोठें समीरें[16] । उगाच वाजे ॥ २८ ॥ वारीं अंगावरून जाती । तेणें हात पाय वाळती । वारा वाजतां करपतीं । † आलीं पिकें ॥ २९ ॥ नाना रोगांचीं नाना वारीं । पीडा करिती पृथ्वीवरी । वीज कडाडी अंबरीं[17] । वायुमुळें ॥ ३० ॥ वायूकरितां रोगोद्धार[18] । कळे ओळखीचा निर्धार । दीप लागे, मेघ पडे, हा चमत्कार । रागोद्धारीं ॥ ३१ ॥ वायु फुंकितां भुली पडती । वायु फुंकितां खांडकें[19] करपती । वायूकरितां चालती । नाना मंत्र ॥ ३२ ॥ मंत्रीं देव प्रकटती । मंत्रीं भूतें आवरतीं । बोजीगिरी[20] वोडंबरी[21] करिती । मंत्रसामर्थ्यें ॥ ३३ ॥ राक्षसांची मोहरचना[22] । ते हे देवादिकां कळेना । विचित्र सामर्थ्यें नाना । स्तंभनमोहनादिके ॥ ३४ ॥ भडचि पिसें करावें । पिसेंच उमजवावें ।

---

१ अग्नि. २ देहामध्यें. ३ पंचभूतात्मक सृष्टि. ४ संताप पावलेले ५ प्राप्त होतात. ६ विधिविधान, मंत्रप्रयोग, उतारा. ७ अंगांत दैवत आणल्यानें. ८ ठेव. ९ हट्ट, इच्छा, वासना. १० सृष्टीला धारण करणारा. ११ ज्ञानरूप. १२ उदक. १३ उसळतें, वृद्धि पावते. १४ प्रकट होतो. १५ नाहींसा होतो, गुप्त होतो. १६ स्वरूप बदलतें. १७ वारा. † आलेलीं १ - आकाशामध्यें. १९ गाण्यांतील राग निघणें. २० फोड, गळूं २१ नजरबंदी. २२ गारुडी विद्या. २३ मायावीपणाच्या गोष्टी.

नाना विकार सांगावे । किती म्हणोनि ॥ ३५ ॥ मंत्रीं संग्रामें देवाचा । मंत्रीं साभिमान ऋषींचा । महिमा मंत्रसामर्थ्याचा । कोण जाणे ॥ ३६ ॥ मंत्रीं पक्षी आटोपिती । मूषकें श्वापदें[2] बांधिती । मंत्रीं महासर्प खिळिती । आणि धनलाभ ॥ ३७ ॥ आतां असो हा प्रश्न झाला । बद्धाचा जन्म प्रत्यया आला । मागील प्रश्न फिटला । श्रोतयांचा ॥ ३८ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे नवमदशके देहातीतनिरूपणं नाम अष्टमः समासः ॥ ८ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ब्रह्म वारितां वारेना । ब्रह्म सारितां सरेना । ब्रह्म कांहीं वोसरेना[3] । एकीकडे ॥ १ ॥ ब्रह्म भेदितां भेदेना । ब्रह्म छेदितां छेदेना । ब्रह्म पैरतें होईना । केलें तरी ॥ २ ॥ ब्रह्म खंडेना अखंड । ब्रह्मीं नाहीं दुसरें बंड । तरी कैसें हें ब्रह्मांड । शिरकलें मध्यें ॥ ३ ॥ पर्वत पाषाण शिळा शिखरें । नाना स्थळें स्थळांतरें । भूगोलरचना कोण्या प्रकारें । झाली परब्रह्मीं ॥ ४ ॥ भूगोल आहे ब्रह्ममध्यें । ब्रह्म आहे भूगोलामध्यें । पाहतां एक एकांमध्यें । प्रत्यक्ष[4] दिसे ॥ ५ ॥ ब्रह्मीं भूगोलें पैसें[5] केला । आणि भूगोलहि ब्रह्में भेदिला । विचार पाहतां प्रत्यय आला । प्रत्यक्ष आतां ॥ ६ ब्रह्में ब्रह्मांड भेदिलें । हें तों पाहतां नीटाचि झालें । परी ब्रह्मांड ब्रह्मांडें भेदिलें । हें विपरीत दिसे ॥ ७ ॥ भेदिलें नाहीं म्हणावें । तरी ब्रह्मीं ब्रह्मांड स्वभावें । हें सकळांस अनुभवें । दिसतचि आहे ॥ ८ ॥ तरी हें आतां कैसें झालें । विचारून पाहिजे बोलिलें । ऐसें श्रोतीं आक्षेपिलें[6] । आक्षेपवचन ॥ ९ ॥ आतां याचें प्रत्युत्तर । सावध ऐका निरुत्तर । येथें पडिलें कीं विचार । संदेहाचे ॥ १० ॥ ब्रह्मांड नाहीं म्हणों तरी दिसे । आणि दिसे म्हणों तरी नासे । आतां हें समजती कैसे । श्रोते जन ॥ ११ ॥ तंव श्रोते झाले उदित[7] । अहो म्हणती सावचित[8] । प्रसंगें बोलों उचित । प्रत्युत्तर ॥ १२ ॥ आकाशीं दीपासि लाविलें । दीपें आकाश परतें केलें । हें तों घडेना पाहिलें । पाहिजे श्रोतीं ॥ १३ ॥ आप[9] तेज[10] अथवा पवन । सारूं न शकती गगन । गगन पाहतां सघन[11] । चळेल कैसें ॥ १४ ॥ अथवा कठिण झाली मेदिनी[12] । तरी गगनें केली चाळणी । पृथ्वीचें सर्वांग भेदूनी । राहिलें गगन ॥ १५ ॥ याची प्रचीत ऐसी असे । जें जडत्वा आलें तितुकें नासे । आकाश जैसें तैसें असें । चळणार नाहीं ॥ १६ ॥ वेगळेपणें पाहावें । तयास आकाश म्हणावें । अभिन्न होतां स्वभावें । आकाश ब्रह्म ॥ १७ ॥ तस्मात् आकाश चळेना । भेद गगनाचा कळेना । भासलें ब्रह्म तयास जाणा । आकाश म्हणावें ॥ १८ ॥ निर्गुण ब्रह्मसें भासलें । कल्पूं जातां अनुमानलें । म्हणोन आकाश बोलिलें । कल्पनेसाठीं ॥ १९ ॥ कल्पनेसि भासे भास । तितुकें जाणावें आकाश । परब्रह्म निराभास । निर्विकल्प ॥ २० ॥ पंचभूतांमध्यें वास । म्हणोनि बोलिजे आकाश । भूतांवरी जो ब्रह्मांश । तेंचि गगन ॥ २१ ॥ प्रत्यक्ष होतें आणि जातें ।

---

१ युद्ध. २ उंदीर. ३ पशुपक्ष्यादि. ४ मागें हटत नाहीं, कमी होत नाहीं. ५ दूर. ६ साक्षात. ७ विस्तार. ८ अनुभव. ९ शंका काढली. १० उत्कंठित, तत्पर, तयार. ११ लक्षपूर्वक. १२ पाणी. १३ अग्नि. १४ अत्यंत दाट. १५ पृथ्वी. १६ पंचभूतांमध्यें.

अचळ कैसें म्हणावें त्यातें । म्हणोनियां गगनातें । भेदिलेंचि नाहीं ॥ २२ ॥ पृथ्वी विरोन उरे जीवन । जीवन नसतां उरे अग्न । अग्नि विझतां उरे पवन । तोहि नासे ॥ २३ ॥ मिथ्या आलें आणि गेलें । तेणें खरें तें भंगलें । ऐसें हें प्रचीतीस आलें । कोणेपरी ॥ २४ ॥ भ्रमें प्रत्यक्ष दिसतें । विचारपाहतां काय तेथें. । भ्रममूळ या जगातें । खरें कैसें म्हणावें ॥ २५ ॥ भ्रम शोधितां कांहींच नाहीं । तेथें भेदिलें कोणें कायीं । भ्रमें भेदिलें म्हणतां ठायीं । भ्रमाचि मिथ्या ॥ २६ ॥ भ्रमाचें रूप मिथ्या झालें । मग सुखें म्हणावें भेदिलें । मुळीं लटिकें त्याणें केलें । तेंहि तैसें ॥ २७ ॥ लटिक्यानें उदंड केलें । तरी आमुचें काय गेलें । केलें म्हणतांच नाथिलें । शाहाणे जाणती ॥ २८ ॥ सागरामध्ये खसखस । तैसें परब्रह्मीं दृश्य । मतीसारिखा मतिप्रकाश । अंतरीं वाढे ॥ २९ ॥ मति करितां विशाळ । कवळों लागे अंतराळ । पाहतां भासे ब्रह्मगोळ । कांविट जैसें ॥ ३० ॥ वृत्ति त्याहूनि विशाळ । करितां ब्रह्मांड बदरीफळें । ब्रह्माकार होतां केवळ । कांहींच नाहीं ॥ ३१ ॥ आपण विवेकें विशाळला । मर्यादेवेगळा झाला । मग ब्रह्मगोल देखिला । वेटबीजन्यायें ॥ ३२ ॥ होतां त्याहून विस्तीर्ण । वेटबीज कोटिप्रमाण । आपण होतां परिपूर्ण । कांहींच नाहीं ॥ ३३ ॥ आपण भ्रमें † लहानाळला । केवळ देहधारी झाला । तरी मग ब्रह्मांड त्याला । कवळेल कैसें ॥ ३४ ॥ वृत्ति ऐसी वाढवावी । पसरून नाहींच करावी । पूर्ण ब्रह्मास पुरवावी । चहूंकडे ॥ ३५ ॥ जव एक सुवर्ण आणितां । तेणें ब्रह्मांड मढवितां । कैसें होईल तें तत्त्वतां । बरें पाहा ॥ ३६ ॥ वस्तु वृत्तीस कवळे । तेणें वृत्ति फाटोन वितळे । निर्गुण आत्माच निवळे । जैसा तैसा ॥ ३७ ॥ येथें फिटली आशंका । श्रोते हो संदेह धरूं नका । अनुमान असेल तरी विवेका । अवलोकावें ॥ ३८ ॥ विवेकें तुटे अनुमान । विवेकें होतें समाधान । विवेकें आत्मनिवेदन । मोक्ष लाभे ॥ ३९ ॥ केली मोक्षाची उपेक्षा । विवेकें सारिलें पूर्वपक्षा । सिद्धांत आत्मा प्रत्यक्षा–। प्रमाण नलगे ॥ ४० ॥ हीं प्रचीतीची उत्तरें । कळती सारासारविचारें । मननध्यासें साक्षात्कारें । पावन होइजे ॥ ४१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे. नवमदशके संदेहवारणनिरूपणं नाम नवमः समासः ॥ ९ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ देवळामध्यें जगन्नायक । आणि देवळावरी बैसला कांके । परी तो देवाहूनि अधिक । म्हणों नये कीं ॥१॥ सभा बैसली राजद्वारीं । आणि मर्कट बैसले स्तंभावरी । परी तें सभेहून श्रेष्ठ चतुरीं । कैसें मानावें ॥ २ ॥ ब्राह्मण स्नानसंध्या करून गेले । आणि बकें तैसेच बैसले । परी ते ब्राह्मणापरीस भले । कैसे मानावे ॥ ३ ॥ ब्राह्मणामध्यें कोणी नेमस्त । कोणी जाहले अस्ताव्यस्त । आणि श्वानें सदा ध्यानस्त । परी ते उत्तम नव्हे ॥ ४ ॥

---

१ विरघळून, नाहींशी होऊन. २ भ्रम आहे मूळ ज्याचें असें जग. ३ खोटें. ४ पुष्कळ. ५ समुद्रामध्यें. ६ धरलें जातें, ग्रहण केलें जातें. ७ आकाश. ८ कवठ. ९ मनोवृत्ति. १० मोठी. ११ बोरें. १२ अमर्याद. १३ ज्याप्रमाणें वटवृक्ष अत्यंत विशाल आणि त्याचें बीज अत्यंत सूक्ष्म, तरी त्यांत वटवृक्ष सूक्ष्मरूपानें आहेच त्याप्रमाणें. १४ वटवृक्षाचें बी. † लहान झाला. १५ परब्रह्म. १६ शंका, संशय. १७ आत्मसमर्पण. १८ हयगय. १९ चिंतनानें. २० अनुभवानें. २१ कावळा. २२ माकड. २३ खांबावर. २४ बगळे. २५ कुत्रा.

ब्राह्मण लक्ष्यमुद्रा नेणे । मार्जार लक्ष्याविशीं शाहाणें । परी ब्राह्मणापरीस विशेष कोणें । म्हणावें तयासी ॥ ५ ॥ ब्राह्मण पाहे भेदाभेद । मक्षिका सर्वांसि अभेद । परी तीस जाहला ज्ञानबोध । हें तों न घडे ॥ ६ ॥ उंच वस्त्रें नीच लेयाला । आणि समर्थ उघडाच बैसला । परी तो आहे परीक्षिला । परीक्षावंतीं ॥ ७ ॥ बाह्याकार केला अधिक । परी तो अवघा लौकिक । येथें पाहिजे मुख्य एक । अंतर्निष्ठ ॥ ८ ॥ लौकिक बरा संपादिला । परी अंतरीं सावध नाहीं जाहला । मुख्य देवास चुकला । तो आत्मघातकी ॥ ९ ॥ देवास भजतां देवलोक । पित्रांस भजतां पितृलोक । भूतांस भजतां भूतलोक पाविजेतो ॥ १० ॥ जेणें जयास भजावें । तेणें त्या लोकांस जावें । निर्गुणीं भजतां व्हावें । निर्गुणाचि स्वयें ॥ ११ ॥ निर्गुणाचें कैसें भजन । निर्गुणीं असावें अनन्यें । अनन्य होतां होइजे धन्य । निश्चयेसी ॥ १२ ॥ सकळ कलियाचें सार्थक । देव वोळखावा एक । आपण कोण हा विवेक । पाहिला पाहिजे ॥ १३ ॥ देव पाहतां निराकार । आपला तो मायिक विचार । सोहं आत्मा हा निर्धार । बाणोन गेला १४ ॥ आतां अनुमानें तों काई । वस्तु आहे वस्तूच्या ठायीं । देहभाव कांहींच नाहीं । धांडोळितां ॥ १५ ॥ सिद्धास आणि साधन । हें तों अवघेंचि अनुमान । मुक्तास आणि बंधन । आढळेना ॥ १६ ॥ साधनें जें कांहीं साधावें । तें तो आपणाचि स्वभावें । आतां साधकाच्या नांवें । शून्याकार ॥ १७ ॥ कुलाल पावला राज्यपदवी । आतां रोसेभें कासया राखावीं । कुलालपणाची उठाठेवी । कासया पाहिजे ॥ १८ ॥ तैसा अवघा वृत्तिभाव । नाना साधनांचा उपाव । साध्य झालिया कैंचा ठाव । साधनासी ॥ १९ ॥ साधनें काय साधावें । नेमें काय फळ द्यावें । आपण वस्तु भरंगळावें । कासयासी ॥ २० ॥ देह तरी पांचा भूतांचा । जीव तरी अंश ब्रह्माचा । परमात्मा तरी अनन्याचा । ठाव पाहा ॥ २१ ॥ उगेंच पाहतां मीपण दिसे । शोध घेतां कांहींच नसे । तत्त्वें तत्त्व निरसे । पुढें निखळें आत्मा ॥ २२ ॥ आत्मा आहे आत्मपणें । जीव आहे जीवपणें । माया आहे मायापणें । विस्तारली ॥ २३ ॥ ऐसें हें अवघेंचि आहे । आणि आपणहि कोणी एक आहे । हें सकळ शोधून पाहे । तोचि ज्ञानी ॥ २४ ॥ शोधूं जाणे सकळांसी । परी जाणों नेणे आपणासि । ऐसा ज्ञानी एकदेशी । वृत्तिरूपें ॥ २५ ॥ तें वृत्तिरूप जरी पाहिलें । तरी मग कांहींच नाहीं राहिलें । प्रकृतिनिरासें अवघेंचि गेलें । विकारवंत ॥ २६ ॥ उरलें तें निखळें निर्गुण । विवंचितां तेंचि आपण । ऐसी हे परमार्थाची खूण । अगाध आहे ॥ २७ ॥ फळ एक आपण एक । ऐसा नाहीं हा विवेक । फळाचें फळ कोणी एक । स्वयेंचि होइजे ॥ २८ ॥ रंक होता तो राजा जाहला । बरें पहातां प्रत्यय आला । रंकपणाचा गलबला । रंकीं करावा ॥ २९ ॥ वेद शास्त्रें पुराणें । नाना साधनें निरूपणें । सिद्ध साधु ज्याकारणें । नाना सायास करिती

---

१ एकाग्रतेचें ध्यान. २ मार्शी. ३ पांघरला. ४ हुशार, जागता. ५ एकनिष्ठ. ६ तो मी. ७ शंका, कल्पना. ८ सर्व. ९ पूज्य. १० कुंभार. ११ गाढवें. १२ गोंधळावें, भ्रमावे. १३ नाश पावतें. १४ केवळ, सर्व. १५ मायेच्या नाशानें. १६ विचार करून पाहतां. १७ भिकारी.

॥ ३० ॥ तें ब्रह्मरूप आपणचि अंगें । सारासारविचारप्रसंगें । करणें न करणें वाउगें । कांहींच नाहीं ॥ ३१ ॥ रंक राजाज्ञेसि भ्याले । तेचि पुढें राजे जाहले । मग तें भयचि उडालें । रंकपणासरिसें ॥ ३२ ॥ वेदें वेदाज्ञेनें चालावें । सच्छास्त्रें शास्त्र अभ्यासावें । तीर्थें तीर्थास जावें । कोण्या प्रकारें ॥ ३३ ॥ अमृतें सेवावें अमृत । अनंतें पहावा अनंत । भगवंतें लक्षावा भगवंत । कोण्या प्रकारें ॥ ३४ ॥ संतें[2] असंत त्यागावें । निर्गुणें निर्गुणास भावावें । स्वरूपें स्वरूपीं रंगावें । कोण्या प्रकारें ॥ ३५ ॥ अंजनें[3] लेयावें अंजन । धनें साधावें धन । निरंजनें[4] निरंजन । कैसें अनुभवावें ॥ ३६ ॥ साध्यांचि करावें साधनासी । ध्येयेंचि धरावें ध्यानासी । उन्मनें[5] आवरावें मनासीं । कोण्या प्रकारें ॥ ३७ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे नवमदशके अलिप्तस्थिति निरूपणं नाम दशमः समासः ॥ १० ॥

दशक दहावा (जगज्ज्योतीनाम).

श्रीगणेशायनमः ॥ ॥ सकळांचें अंतःकरण एक । किंवा एक नव्हे अनेक । ऐसें हें निश्चयात्मक । मज निरूपावें ॥ १ ॥ ऐसें श्रोतयानें पुशिलें । अंतःकरण एक कीं वेगळालें । याचें उत्तर ऐकिलें । पाहिजे श्रोतीं ॥ २ ॥ समस्तांचें अंतःकरण एक । निश्चय जाणावा नेमक । हा प्रत्ययाचा विवेक । तुज निरूपिला ॥ ३ ॥ श्रोता म्हणे वक्तयासी । अंतःकरण एक समस्तांसी । तरी मिळेना एकएकासी । काय निमित्त ॥ ४ ॥ एक जेवितां अवघे धालें । एक निवतां अवघे निवाले । एक मरतां अवघे मेले । पाहिजेत कीं ॥ ५ ॥ एक सुखी एक दुःखी । ऐसें वर्ततें लौकिकीं । एक अंतःकरणाची वोळखी । कैसी जाणावी ॥ ६ ॥ जनीं वेगळाली भावना । कोणास कोणीच मिळेना । म्हणोन हें अनुमानों । येत नाहीं ॥ ७ ॥ अंतःकरण एक असतें । तरी एकाचें एकास कळों येतें । कांहीं चोरितांच न येतें । गोप्य गुह्य ॥ ८ ॥ याकारणें अनुमानेना । अंतःकरण एक हें घडेना । विरोधें[1] लागला जना । काय निमित्त ॥ ९ ॥ सर्प डसाया येतो । प्राणी भिऊन पळतो । एक अंतःकरण तरी तो । विरोध नसावा । ॥ १० ॥ ऐसी श्रोतयांची आशंका । वक्ता म्हणे चळों नका । सावध होऊन ऐका । निरूपण ॥ ११ ॥ अंतःकरण म्हणिजे जाणीव । जाणीव जाणता स्वभाव । देहरक्षणाचा उपावो । जाणती कळा ॥ १२ ॥ सर्प जाणोनि डंखू[11] आला । प्राणी जाणोनि पळाला । दोहींकडे जाणिवेला । बरें पाहा ॥ १३ ॥ दोहींकडे जाणिवेसि पाहिलें । तरी अंतःकरण एकचि जाहलें । विचारितां प्रत्यया आलें । जाणीवरूपें ॥ १४ ॥ जाणीवरूपें अंतः-

१ व्यर्थ. २ चांगल्यानें. ३ दृष्टि चांगली होण्याकरितां डोळ्यांत घालतात तें. ४ घालावें. ५ मिळवावें. ६ अंजन–अज्ञान–त्या विरहित जो ज्ञानी त्यानें. ७ ध्यान करण्यास योग्य त्यानें. ८ मनोधर्मरहितानें. ९ तृप्त झाले. १० तर्काला. ११ उलटपणा. १२ चावायला.

करण । सकळांचे एक हें प्रमाण । जीवमात्रासे[1] जाणपण एकाचि असे ॥ १५ ॥ एके दृष्टीचें देखणें । एके जिव्हेचें चाखणें । ऐकणें स्पर्शणें वास घेणें । सर्वत्रांस एक ॥१६॥ पशु पक्षी किडा मुंगी । जीवमात्र निर्माण जगीं । जाणीवकळा सर्वांलागीं एकाचि आहे ॥ १७ ॥ सर्वांस जळ तें शीतळ । सर्वांस अग्नि तेजाळ[2] । सर्वांस अंतःकरण केवळ । जाणती कळा ॥ १८ ॥ आवडे नावडे ऐसें जाहलें । तरी हें देहस्वभावावरी गेलें । परी हें कळों आलें । अंतःकरणयोगें ॥ १९ ॥ सर्वांचें अंतःकरण एक । ऐसा निश्चय निश्चयात्मक । जाणती याचें कौतुक । चहूंकडे ॥ २० ॥ इतुकेन फिटली आशंका । आतां अनुमान करूं नका । जाणणें तितुकें ऐका । अंतःकरणाचें ॥ २१ ॥ जाणोन जीव चारा घेती । जाणोन भीती लपती । जाणोनियां पळोन जाती । प्राणिमात्र ॥ २२ ॥ किडामुंगीपासून ब्रह्मादिक । समस्तांस अंतःकरण एक । ये गोष्टीचें कौतुक । प्रत्ययें जाणावें ॥ २३ ॥ थोर लहान तरी अग्नि । येकें बहुत तरी प्राणी । न्यूनपूर्ण तरी प्राणी । अंतःकरण जाणती ॥ २४ ॥ कोठें उणें कोठें अधिक । परंतु जिन्नस मासला एक । जंगमें[3] प्राणी कोणी एक । जाणिल्याविण नाहीं ॥ २५ ॥ जाणीव म्हणिजे अंतःकरण । अंतःकरण विष्णूचा अंश जाण । विष्णु करितो प्रतिपाळणें[4] । येणेंप्रकारें ॥ २६ ॥ नेणतां प्राणी संहारितो[5] । नेणीवें[6] तमोगुण बोलिजेतो । तमोगुणें रुद्र संहारितो[7] । येणें प्रकारें ॥ २७ ॥ कांहीं जाणीव कांहीं नेणीव । हा रजोगुणाचा स्वभाव । जाणतां नेणतां जीव । जन्मास येती ॥ २८ ॥ जाणिवेनें होतें सुख । नेणिवेनें होतें दुःख । सुखदुःख आवश्यक । उत्पत्तिगुणें ॥ २९ ॥ जाणण्या नेणण्याची बुद्धि । तोचि देहीं जाणावा त्रिविधी[8] । स्थूळदेहीं ब्रह्मा त्रिशुद्धी[9] । उत्पत्तिकर्ता ॥ ३० ॥ ऐसा उत्पत्ति स्थिति[10] संहार[11] । प्रसंगें बोलिला विचार । परंतु याचा निर्धार । प्रत्ययें पाहावा ॥ ३१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे दशमदशके अंतःकरणनिरूपणं नाम प्रथमः समासः ॥ १ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ स्वामीनें विचार दाखविला । तेथें विष्णूचा अभाव दिसोन आला । ब्रह्मा विष्णु महेशाला । उरी[12] नाहीं ॥ १ ॥ उत्पत्ति स्थिति संहार । ब्रह्मा विष्णु महेश्वर । यांचा पाहतां विचार । प्रत्यय नाहीं[13] ॥ २ ॥ ब्रह्मा उत्पत्तिकर्ता चौमुखांचा[14] । येथें प्रत्यय नाहीं त्याचा । पालनकर्ता विष्णु चौभुजांचा । तोहि ऐकोनि जाणों ॥ ३ ॥ महेश[15] संहार करितो । हाहि प्रत्यय कैसा येतो । महिमा लिंगपुराणीं तो । विपरीत बोलिला ॥ ४ ॥ मूळमायेस कोणें केलें । हें तों पाहिजे कळलें । तिहीं देवांचें रूप झालें । ऐलीकडे ॥ ५ ॥ मूळमाया लोकजननी । तयेपासून गुणक्षोभिणी । गुणक्षोभिणीपासून त्रिगुणीं । जन्म देवां ॥ ६ ॥ ऐसें बोलती शास्त्रकार । आणि प्रवृत्तीचेहि लोक । प्रत्यय पुसतां कित्येक । आकांत करिती ॥ ७ ॥ म्हणोनि त्यांस पुस-

---

१ प्रत्येक जीवाला. २ तेजस्वरूप. ३ कमी. ४ चालणारे. ५ रक्षण. ६ नाश करितो. ७ अज्ञान. ८ शंकर. ९ ब्रह्मदेव. १० अगदीं सत्य. ११ पालन. १२ नाश. १३ ठाव, ठिकाण, स्थिती. १४ अनुभव. १५ चार तोंडांचा, १६ शंकर. १७ त्रिगुणांला प्रकट करणारी. १८ शास्त्रकर्ते. १९ कर्ममार्गी.

वेना । त्यांचेन प्रत्यय आणवेना । प्रत्ययेंविण प्रयत्न नाना । ठकाठकी ॥ ८ ॥ प्रचीतीविण वैद्य म्हणवी । उगीच करी उठाठेवी । तया मूर्खाला गोंवी[1] । प्राणिमात्र ॥ ९ ॥ तैसाच हाहि विचार । प्रत्ययें करावा निर्धार । प्रत्यय नसतां अंधकार । गुरुशिष्यांशीं ॥ १० ॥ बरें लोकांसि काय म्हणावें । लोक म्हणती तेंचि बरवें । परंतु स्वामीनें सांगावें । विशद करूनी ॥ ११ ॥ म्हणों देवीं माया केली । जरी देवांची रूपें मायेंत आलीं । जरी म्हणों मायेनें माया केली । तरी दुसरी नाहीं ॥ १२ ॥ जरी म्हणों भूतीं केली । तरी ते भूतांचीच वळली । म्हणावी जरी परब्रह्में केली । तरी ब्रह्मीं कर्तृत्व नाहीं ॥ १३ ॥ आणि माया खरी असावी । तरी ब्रह्मीं कर्तृत्वाची गोंवी[2] । माया मिथ्या ऐसी जाणावी । तरी कर्तृत्व कैंचें ॥ १४ ॥ आतां हें अवघेंच उगवें । आणि मनासि प्रत्ययें फावे । ऐसें केलें पाहिजे देवें । कृपाळुपणें ॥ १५ ॥ वेद मातृकेविण नाहीं । मातृका देहाविण नाहीं । देह निर्माण होत नाहीं । देहावेगळा ॥ १६ ॥ तया देहामध्यें नरदेहो । त्या नरदेहांत ब्राह्मणदेहो । तया ब्राह्मणदेहास पाहो । अधिकार वेदीं ॥ १७ ॥ असो वेद कोठून झाले । देह कासयाचे केले । देव कैसे प्रकटले । कोण्या प्रकारें ॥ १८ ॥ ऐसें बळावलें अनुमान । केलें पाहिजे समाधान । वक्ता म्हणे सावधान । होईं आतां ॥ १९ ॥ प्रत्यय पाहतां सांकडी । अवघी होते बिघडाबिघडी । अनुमानितां घडीनें घडी । काळ जातो ॥ २० ॥ लोकघाटी शास्त्रनिर्णय । येथें बहुविध निश्चय । म्हणोनियां एक प्रत्यय । येणार नाहीं ॥ २१ ॥ आतां शास्त्रांची भीड धरावी । तरी सुटेना ही ×गाथागोवी । गाथागोवी हे उगवावी । तरी शास्त्रभेद दिसे ॥ २२ ॥ शास्त्र रक्षून प्रत्यय आणिला । पूर्वपक्ष त्यागून सिद्धांत पाहिला । शहाणा मूर्ख समजाविला । एका वचनें ॥ २३ ॥ शास्त्रींच पूर्वपक्ष बोलिला । पूर्वपक्ष म्हणावें लटिक्याला । विचार पाहतां आम्हांला । शब्द नाहीं ॥ २४ ॥ तथापि बोलों कांहीं एक । शास्त्र रक्षून कौतुक । श्रोतीं सादरें विवेक । कला पाहिजे ॥ २५ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे दशमदशके देहाशंकानिरूपणं नाम द्वितीयः समासः ॥ २ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ उपाधिविणें जें कां आकाश । तेंचि ब्रह्म निराभास । ते निराभासीं मूळमायेस । जन्म जाहलें ॥ १ ॥ तें मूळमायेचें लक्षण । वायुस्वरूपचि जाण । पंचभूतें आणि त्रिगुण । वायुअंगीं ॥ २ ॥ आकाशापासून वायु झाला । तो वायुदेव बोलिला । वायूपासून अग्नि झाला । तो अग्निदेव ॥ ३ ॥ अग्नीपासून झालें आप । तें नारायणाचें स्वरूप । आपापासून पृथ्वीचें रूप । तें बीजाकारें[14] ॥ ४ ॥ ते पृथ्वीचे पोटीं पाषाण । बहु देवांचें लक्षण । नाना प्रचीत प्रमाण । पाषाणदेवी ॥ ५ ॥ नाना वृक्ष मृत्तिका । प्रचीत रोकडी विश्वलोकां[15] । समस्त देवांचा थारा एका । वायुमध्यें ॥ ६ ॥ देव यक्षिणी कात्यायनी । चामुंडा जखिणी मानविणी । नाना

---

१ गुंतविती. २ गुंतागुंत. ३ उकलेल, समजेल. ४ अनुभव. ५ येईल. ६ अक्षरावांचून. ७ संकट, अडचण. ९ लोकांतील व्यवहार. × गोंधळ १० स्पष्ट करावी, उघड करावी. ११ उपसर्ग. १२ भासरहित. १३ पाणी. १४ बीजरूप. १५ सर्व लोकांना.

नाना स्थानीं। देशपरत्वें ॥ ७ ॥ पुरुषनामें कितीएक । देव असती अनेक । भूतें दैवतें नपुंसक । नामें बोलिजेती ॥ ८ ॥ देव देवता देवतें भूतें । पृथ्वीमध्यें असंख्यातें । परंतु या समस्तांतें । वायुस्वरूप बोलिजे ॥ ९ ॥ वायुस्वरूप सदा असणें । प्रसंगें नाना देह धरणें । गुप्त प्रकट होणें जाणें । समस्तांसी ॥ १० ॥ वायुस्वरूपें विचरती। वायूमध्यें जगज्ज्योती । जाणतीकळा वासनावृत्ति । नाना भेदें ॥ ११ ॥ आकाशापासून वायु झाला । तो दों प्रकारें विभागला । सावधपणें विचार केला । पाहिजे श्रोतीं ॥ १२ ॥ एक वारा सकळ जाणती । एक वायूमधील जगज्ज्योति । जगज्ज्योतीच्या अनंत मूर्ती । देवदेवतांच्या ॥ १३ ॥ वायु बहुत विकारला । परंतु दों प्रकारें विभागला । आतां विचार ऐकिला । पाहिजे तेजाचा ॥ १४ ॥ वायूपासून तेज झालें । ऊष्ण शीतळ प्रकाशलें । द्विधारूप ऐकिलें । पाहिजे तेजाचें ॥ १५ ॥ उष्णापासून झाला भानु । प्रकाशरूपें दैदीप्यमानु । सर्वभक्ष हुताशनु। आणि विद्युल्लता ॥ १६ ॥ शीतळापासून आप अमृत । चंद्र तारा आणि सीत । आतां परिसा † सावचित्त । होऊन श्रोते ॥ १७ ॥ तेज बहुत विकारिलें । परंतु द्विधाच बोलिलें । आपहि द्विधाच निरूपिलें । आप आणि अमृत ॥ १८ ॥ ऐके पृथ्वीचा विचार । पाषाण मृत्तिका निरंतर । आणिक दुसरा प्रकार । सुवर्ण परिस नाना रत्नें ॥ १९ ॥ बहुरत्ना वसुंधरा । कोण खोटा कोण खरा । अवघें कळे विचारा-। रूढ होतां ॥ २० ॥ मनुष्यें कोठून झालीं । हें मुख्य आशंका राहिली । पुढें वृत्ति सावध केली । पाहिजे श्रोतीं २१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे दशमदशके देहाशंकानिरूपणं नाम तृतीयः समासः ॥ ३ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ आतां पाहों जातां उत्पत्ति । मनुष्यापासून मनुष्यें होतीं । पशूपासून पशु निपजेती । प्रत्यक्ष आतां ॥ १ ॥ खेचरें[१] आणि भूचरें । वनचरें आणि जळेचरें । नानाप्रकारचीं शरीरें । शरीरापासून होती ॥ २ ॥ प्रत्यक्षास आणि प्रमाण । निश्चयास आणि अनुमान । मार्ग सांडून आडरान । घेऊंच नये ॥ ३ ॥ विपरीतापासून विपरीतें होती । परी शरीरेंचि बोलिजेति । शरीरावांचून उत्पत्ति । होणार नाहीं ॥ ४ ॥ तरी हे उत्पत्ति कैसी झाली । कासयाची कोणें केली । जेणें केली त्याची निर्मिली । काया कोणें ॥ ५ ॥ ऐसें पाहतां उदंड[२] लांबले । परी मुळीं शरीर कैसें झालें । कासयाचें उभारिलें । कोणें कैसें ॥ ६ ॥ ऐसी हे मागील आशंका । राहत गेली ते ऐका । कदापि जाँजु घेऊं नका । प्रत्यय आलियानें ॥ ७ ॥ प्रत्ययचि आहे प्रमाण । मूर्खास वाटे अप्रमाण । पिंडें प्रचीतशब्दें जाण । विश्वासासी ॥ ८ ॥ ब्रह्मीं मूळमाया झाली। तेचि अर्धधा प्रकृति बोलिली । भूतीं त्रिगुणीं कालवली । मूळमाया ॥ ९ ॥ ते मूळमाया वायुस्वरूप । वायूमध्यें जाणविचें रूप । तेचि इच्छा परी आरोप । ब्रह्मीं न घडे

१ १ फिरतात. २ जगताची जीवनशक्ति. ३ ज्ञानकला. ४ दोन प्रकारचें. ५ सूर्य. ६ अत्यंत प्रकाशणारा. ७ सर्व खाणारा. ८ अग्नि. ९ वीज. १० पाणी. † सावधान चित्तानें. ११ पृथ्वी. १२ जन्म पावतात. १३ आकाशांत फिरणारे, पक्षी वगैरे. १४ पृथ्वीवर संचार करणारे, पशू वगैरे. १५ पाण्यांत संचार करणारे मत्स्य वगैरे. १६ पुष्कळ. १७ संशय, वितंडवाद. १८ आठ प्रकारची.

॥ १० ॥ तथापि ब्रह्मा कल्पिला । तरी तो शब्दाचि वायां गेला । आत्मा निर्गुण संचला । शब्दातीत ॥ ११ ॥ आत्मा निर्गुण वस्तु ब्रह्म । नाममात्र तितुका भ्रम । कल्पून लाविला संभ्रम । तरी लागणार नाहीं ॥ १२ ॥ तथापि आग्रहें लाविला । जरी धोंडा अंतरीं मारिला । आकाशावरी कुंथिला । तरी तें तुटेना ॥ १३ ॥ तैसें ब्रह्म निर्विकार । निर्विकारीं लाविती विकार । विकार नासे निर्विकार । जैसें तैसें ॥ १४ ॥ आतां ऐका प्रत्यय । जाणोनि धरावा निश्चय । तरीच पाहिजे जय । अनुभवाचा ॥ १५ ॥ मायाब्रह्मीं जो समीर । त्यातें जाणता तो ईश्वर । ईश्वर आणि सर्वेश्वर । तयासीच बोलिजे ॥ १६ ॥ तोचि ईश्वर गुणासि आला । त्याचा त्रिगुणभेद झाला । ब्रह्मा विष्णु महेश उपजला । तये ठायीं ॥ १७ ॥ सत्त्व रज आणि तम । हे त्रिगुण उत्तमोत्तम । यांच्या स्वरूपाचा अनुक्रम । मागां निरूपिला ॥ १८ ॥ जाणता विष्णु भगवान् । जाणतानेणता चतुरानन । नेणता महेश पंचानन । अत्यंत भोळा ॥ १९ ॥ त्रिगुण त्रिगुणीं कालवले । कैसे होती वेगळाले । परी विशेष न्यून भासले । ते बोलावे लागती ॥ २० ॥ वायूमध्यें विष्णु होता । तो वायुस्वरूपाचि तत्त्वतां । पुढें झाला देहधर्ता । चतुर्भुज ॥ २१ ॥ तैसाच ब्रह्मा आणि महेश । देह धरिती सावकाश । गुप्त प्रकट होतां तयांस । वेळ नाहीं ॥ २२ ॥ आतां रोकडी प्रचीती । मनुष्यें गुप्त प्रकटती । भूतां त्या देवांच्याच मूर्ती । सामर्थ्यवंत ॥ २३ ॥ देव देवता भूतें दैवतें । चढतें सामर्थ्य आहे तेथें । येणेंचि न्यायें राक्षसांतें । सामर्थ्यकळा ॥ २४ ॥ झोटिंगें वायुस्वरूप असती । सवेंचि खुळखुळा चलती । खोबरीं खारिका टाकूनी देती । अकस्मात् ॥ २५ ॥ अवघेंचि न्याल अभावें । तरी हें बहुतेकांस ठावें । आपुलाल्या अनुभवें । विश्वलोकें जाणती ॥ २६ ॥ मनुष्यें धरिती शरीरवेश । नाना परकायाप्रवेश । मग तो परमात्मा जगदीश । कैसा न धरी ॥ २७ ॥ म्हणोन वायुस्वरूप देह धरिले । ब्रह्मा विष्णु महेश झाले । पुढें तेचि विस्तारले । पुत्रपौत्रीं ॥२८॥ अंतरींचे स्त्रिया कल्पिल्या । तीं ल्या कल्पितांच निर्माण झाल्या । परी तयांपासून प्रजा निर्मिल्या । नाहींत कदा ॥ २९ ॥ इच्छून पुत्र कल्पिले । ते ते प्रसंगीं निर्माण झाले । येणेप्रकारें वर्तले हरिहरादिकें ॥ ३० ॥ पुढें ब्रह्म्यानें सृष्टि कल्पिली । इच्छेसरिसी सृष्टि झाली । जीवसृष्टि निर्माण केली । ब्रह्मदेवें ॥ ३१ ॥ नानाप्रकारचे प्राणी कल्पिले । इच्छेसरिसे निर्माण झाले । अवघे जोडेचि उदेले । अंडजें जारजादिक ॥ ३२ ॥ एक जळस्वेदापासून झाले । ते प्राणी स्वेदजें बोलिले । एका वायूकरितां झाले । अकस्मात उद्भिजें ॥ ३३ ॥ मनुष्यांची गौडविद्या । राक्षसांची वोडंबरीविद्या । ब्रह्मयाची सृष्टिविद्या ।

---

१ विकार, उपाधि. २ वायु. ३ ब्रह्मदेव. ४ महादेव. ५ देह धारण करणारा. ६ मग. ७ पिशाचांवेगेंष. ८ हें सर्व खोटें आहे असें म्हणाल तर. ९ अविश्वासानें. १० सर्व लोक. ११ दुसऱ्याच्या शरीरांत प्रवेश करणें. १२ मुलगे व नातू या रूपानें. १३ मनामध्यें. १४ विष्णु, शिव वगैरे. १५ स्त्रीपुरुषाचा जोडा, बरोबरच. १६ उत्पन्न झाले. १७ पक्षी. १८ मनुष्यें गाई वगैरे. १९ घामापासून. २० वृक्ष वगैरे. २१ गारुडी.

येणें प्रकारें ॥ ३४ ॥ कांहींएक मनुष्यांची । त्याहून विशेष राक्षसांची । त्याहून विशेष ब्रह्मयाची । सृष्टिविद्या ॥ ३५ ॥ जाणते नेणते प्राणी निर्मिले । वेद वदोन मार्ग लाविले । ब्रह्मयानें निर्माण केलें । येणेंप्रकारें ॥ ३६ ॥ मग शरीरापासून शरीरें । सृष्टि वाढिली विकारें । सकळ शरीरें येणें प्रकारें । निर्माण जाहलीं ॥ ३७ ॥ येथें आशंका फिटली । सकळ सृष्टि विस्तारली । विचार पाहतां प्रत्यया आली । यथान्वयें ॥ ३८ ॥ ऐसी सृष्टि निर्माण केली । पुढें विष्णूनें कैसी प्रतिपाळिली । हेहि विवंचना पाहिली । पाहिजे श्रोतीं ॥ ३९ ॥ सकळ प्राणी निर्माण झाले । ते मूळरूपें जाणोन पाळिले । शरीरें दैत्य निर्दाळिले । नानाप्रकारींचे ॥ ४० ॥ नाना अवतार धरणें । दुष्टांचा संहार करणें । धर्म स्थापावयाकारणें । विष्णूस जन्म ॥ ४१ ॥ म्हणोन धर्म-स्थापनेचे नर । तेहि विष्णूचे अवतार । अभक्त दुर्जन रजनीचर । सहजचि झाले ॥ ४२ ॥ आतां प्राणी जे जन्मले । ते नेणोन संहारिले । मूळरूपें संहारिले । येणें प्रकारें ॥ ४३ ॥ शरीरें रुद्र खवळेल । तें जीवसृष्टि संहारेल । अवघें ब्रह्मांडचि जळेल । संहारकाळी ॥ ४४ ॥ एवं उत्पत्ति स्थिति संहार । यांचा ऐसा आहे विचार । श्रोतीं होऊन तत्पर । अवधान द्यावें ॥ ४५ ॥ कल्पांतीं संहार घडेल । तोचि पुढें सांगिजेल । पंच प्रळय ओळखेल । तोचि ज्ञानी ॥ ४६ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे दशम-दशके बीजलक्षणनिरूपणं नाम चतुर्थः समासः ॥ ४ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ऐक प्रळयाचें लक्षण । पिंडीं दोनी प्रळय जाण । एक निद्रा एक मरण । देहांतकाळ ॥ १ ॥ देहधारक तिनी मूर्ति । निद्रा जेव्हां संपादिती । तो निद्राप्रळय श्रोतीं । ब्रह्मांडांचा जाणावा ॥ २ ॥ तिहीं मूर्तीस होईल अंत । ब्रह्मांडास मांडेल कल्पांत । तेव्हां जाणावा नेमस्त । ब्रह्मप्रळय जाहला ॥ ३ ॥ दोनी पिंडीं दोनी ब्रह्मांडीं । चारी प्रळय नवखंडी । पांचवा प्रळय उदंडीं । जाणिजे विवेकाचा ॥ ४ ॥ ऐसे हे पांच प्रळये । सांगितले यथान्वयें । आतां हें अनुभवास ये । ऐसें करूं ॥ ५ ॥ निद्रा जेव्हां संचरे । तेव्हां जागृतिव्यापार सरे । सुषुप्ति अथवा स्वप्न भरे । अकस्मात अंगीं ॥ ६ ॥ या नांव निद्राप्रळय । जागृतीचा होय क्षय । आतां ऐका देहांतसमय । म्हणजे मृत्युप्रळय ॥ ७ ॥ देहीं रोग बळावती । अथवा कठिण प्रसंग पडती । तेणें पंचप्राण जाती । व्यापार सांडूनी ॥ ८ ॥ तिकडे गेला मनपवनू । इकडे राहिली नुसती तनु । दुसरा प्रळय अनुमानु । असेचिना ॥ ९ ॥ तिसरा ब्रह्मा निजेला । तों हा मृत्युलोक गोळा झाला । अवघा व्यापार खुंटला । प्राणिमात्रांचा ॥ १० ॥ तेव्हां प्राणियांचें सूक्ष्मांश । वायुचक्रीं करिती वास । कित्येक काळ जातां ब्रह्मयास । जागृति घडे ॥ ११ ॥ पुनः मागुती सृष्टि रची । विसंचले जीव मागुते संची ।

---

१ अनुक्रमानें २ विचार. ३ नाहींसे केले. ४ राक्षस. ५ शंकर. ६ नाशकाळीं. ७ पालन. ८ शरीराच्या ठिकाणीं. ९ प्रळय, नाश. १० गाढ झोंप. ११ प्राण अपान इत्यादि पंचवायू. १२ मनोवायु. १३ शरीर. १४ संशय. १५ विकारलेले. १६ गोळा करितो, रचतो.

सीमा होतां आयुष्याची । ब्रह्मप्रळय मांडे ॥ १२ ॥ शतवरुषें मेघ जाती । तेणें प्राणी मृत्यु पावती । असंभाव्य तेंडके क्षिती[1] । मर्यादेवेगळी ॥ १३ ॥ सूर्य तपे बाराकळीं[3] । तेणें पृथ्वीची होय होळी । अग्नि पावतां पाताळीं । शेष विष वमी[4] । ॥ १४ ॥ आकाशीं सूर्याच्या ज्वाळा । पाताळीं शेष वमी गरळा । दोहींकडून जळतां भूगोळा । उरी कैंची[5] ॥ १५ ॥ सूर्यास खडतरता चढे । हलकल्लोळ चहूंकडे । कोसळती मेरूचे कडे । घडघडायमान[6] ॥ १६ ॥ अमरावती सत्यलोक । वैकुंठ कैलासादिक । यांहि वेगळे नाना लोक । भस्मोन जाती ॥ १७ ॥ मेरू अवघाच घसरे । तेथील महिमाच ओसरे । देवसमुदाय वावरे । वायुचक्रीं ॥ १८ ॥ भस्म झालिया धरित्री । पर्जन्य पडे शुंडाधारी । मही[9] विरे जळांतरीं । निमिषमात्रें ॥ १९ ॥ पुढें नुसतें उरलें जळ । तयास शोषील अनळ । पुढे ऐकवटतील ज्वाळ । मर्यादेवेगळे[10] ॥ २० ॥ समुद्रींचा वडवानळ । शिवनेत्रींचा नेत्रानळ । सप्तकंचुकीचा आवरणानळ[11] । सूर्य आणि विद्युल्लता ॥ २१ ॥ ऐसे ज्वाळ एकवटती । तेणें देव देह सोडिती । पूर्वरूपें मिळोन जाती । प्रभंजनीं[12] ॥ २२ ॥ तो वारा झडपी वैश्वानरा । वन्हि विझेल एकसरां । वायु धांवे सैरावैरा । परब्रह्मीं ॥ २३ ॥ धूम्र वितळे आकाशीं । तैसें होईल समीरासी[13] । बहुतांमध्यें थोडियासी । नाश बोलिला ॥ २४ ॥ वायु वितळतांच जाण । सूक्ष्म भूतें आणि त्रिगुण । ईश्वर सांडी अधिष्ठान[14] । निर्विकल्पीं ॥ २५ ॥ तेथें जाणीव राहिली । आणि जगज्ज्योति निमाली[15] । शुद्ध सारांश उरली । स्वरूपस्थिति ॥ २६ ॥ जितुकीं कांहीं नामाभिदानें । तये प्रकृतीचेनि गुणें[16] । प्रकृति नसतां बोलणें । कैसें बोलावें ॥ २७ ॥ प्रकृति असतां विवेक कीजे । त्यास विवेकप्रळय बोलिजे । पांचहि प्रलय वोजें[17] । तुज निरूपिले ॥ २८ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे दशमदशके पंचप्रलयनिरूपणं नाम पंचमः समासः ॥ ५ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ उत्पत्ति स्थिति संहार । यांचा निरूपिला व्यवहार । परमात्मा निर्गुण निराकार । जैसा तैसा ॥ १ ॥ होतें वर्ततें आणि जातें । यांचा संबंध नाहीं तेथें । आदि मध्यें अवसानीं तें[18] । संचलेंचि आहे ॥ २ ॥ परब्रह्म असतांचि असे । मध्येंचि हा भ्रम भासे । भासे परंतु अवघा नासे । काळांतरीं ॥ ३ ॥ उत्पत्ति स्थिति संहारत । मध्येंहि अखंड होत जात । पुढें शेवटीं कल्पांत । सकळांस आहे ॥ ४ ॥ यांमध्यें ज्यास विवेक आहे । तो आधींच जाणताहे । सारासार विचारें पाहे । म्हणोनियां ॥ ५ ॥ बहुत भ्रमिष्ट मिळाले । त्यांत उमजल्याचें काय चाले । सृष्टीमध्यें उमजले । ऐसे थोडे ॥ ६ ॥ त्या उमजल्याचें लक्षण । कांहीं करूं निरूपण । भ्रमाहून

---

१ दुभंग होते. २ पृथ्वी. ३ बारा कलांनीं. ४ ओकतो. ५ विषाला. ६ ओरड, हाहाकार. ७ घडघडां ८ इन्द्रनगरी. ९ नाहींसा होतो. १० सोडसारिख्या धारांनीं. ११ पृथ्वी विरघळून जाते. १२ अग्नि. १३ एकत्र होतील. १४ अमर्याद. १५ पंच तत्त्वें, अहंकार व महत्तत्त्व मिळून सप्तकंचुकयुक्त जें ब्रह्मांड, त्या ब्रह्मांडाचा. १६ आच्छादनरूप अग्नि. १७ वाऱ्यामध्यें. १८ अग्नीला. १९ वाऱ्याला १९ स्थान. २० जगाची चेतनाशक्ति. २१ मायेच्या. २२ उत्तम रीतीनें. २३ शेवटीं.

विलक्षण । महापुरुष ॥ ७ ॥ भ्रम हा नसेल जयासी । मनीं बोलखावें तयासी । ऐका आतां भ्रमासी । निरूपिजेले ॥ ८ ॥ एक परब्रह्म संचलें । कदापि नाहीं विकारलें । त्यावेगळें जें भासलें । तें भ्रमरूप ॥ ९ ॥ जयास बोलिला कल्पांत । त्रिगुण आणि पंचभूत । हें अवघेंच समस्त । भ्रमरूप ॥ १० ॥ मी तूं हा भ्रम । उपासनाहि भ्रम । ईश्वर हाहि भ्रम । निश्चयेसी ॥ ११ ॥ ॥ श्लोक ॥ भ्रमेणाहं भ्रमेण त्वं भ्रमेणोपासका जनाः । भ्रमेणेश्वरभावत्वं भ्रममूलमिदं जगत् ॥ १ ॥ टीका ॥ ॥ याकारणें सृष्टि भासत । परंतु भ्रमचि हा समस्त । यामध्यें जे विचारवंत । तेचि धन्य ॥ १२ ॥ आतां भ्रमाचा विचारू । अत्यंताचि प्रांजळ करूं । दृष्टांतद्वारें विवरूं । श्रोतयांसी ॥ १३ ॥ भ्रमण करितां दूर देशीं । दिशाभुली आपणासी । कां ओळखी मोडे जिवलगासी । या नांव भ्रम ॥ १४ ॥ कां उन्मत्तद्रव्य सेविलें । तेणें अनेक भासों लागलें । नाना व्यथा कां झडपिलें । भूतें तो भ्रम ॥ १५ ॥ दशावतारी वाटती नारी । कां ते मांडली बाजीगिरी । उगाच संदेह अंतरीं । या नांव भ्रम ॥ १६ ॥ ठेविला ठाव तो विसरला । कां मार्गीं जातां मार्ग चुकला । पट्टणामध्यें भांबावला । या नांव भ्रम ॥ १७ ॥ वस्तु आपणापासीं असतां । गेली म्हणोन होय दुश्चिता । आपुलें आपण विसरतां । या नांव भ्रम ॥ १८ ॥ कांहीं पदार्थ विसरोन गेला । कां जें शिकला तें विसरला । स्वप्नदुःखें घाबरा झाला । या नांव भ्रम ॥ १९ ॥ दुश्चिन्ह अथवा अपशकुन । मिथ्या वार्तेनें भंगे मन । वंचके पदार्थ देखोन । या नांव भ्रम ॥ २० ॥ वृक्ष काष्ठ पशु देखिले । मनांत वाटे भूत आलें । कांहींच नसतां हडबडिलें । या नांव भ्रम ॥ २१ ॥ आतां कांच म्हणोनि उदकांत पडे । कां सभा देखोन दर्पणीं पवाडे । द्वार चुकोन भलतीकडे । जाणें या नांव भ्रम ॥ २२ ॥ एक असतां एक वाटे । एक सांगतां एक निवटे । एक दिसतां एक उठे । या नांव भ्रम ॥ २३ ॥ आतां जें जें देहजेतें । तें तें पुढें पाविजेतें । मेलें माणूस भोजना येते । या नांव भ्रम ॥ २४ ॥ ये जन्मींचे पुढिले जन्मीं । कांहींएक पावेन मी । प्रीति गुंतली मनुष्याचे नामीं । या नांव भ्रम ॥ २५ ॥ मेलें मनुष्य स्वप्नीं आलें । तेणें कांहीं मागीतलें । मनीं अखंड बैसलें । या नांव भ्रम ॥ २६ ॥ अवघें मिथ्या म्हणोन बोलें । आणि सामर्थ्यावरी मन चाले । ज्ञाते वैभवें दडपिले । या नांव भ्रम ॥ २७ ॥ कर्मठपणें ज्ञान विटे । कां ज्ञातेपणें बळेंचि भ्रष्टे । कोणी एक सीमा फिटे । या नांव भ्रम ॥ २८ ॥ देहाभिमान कर्माभिमान । जात्याभिमान कुळाभिमान । ज्ञानाभिमान मोक्षाभिमान । या नांव भ्रम ॥ २९ ॥ कैसा न्याय तो न कळे । केला अन्याय तो नाढळे ।

---

१ सांगितलें जाईल. २ भक्ति. * स्पष्ट. ३ उदाहरणें देऊन. ४ निशा उत्पन्न करणारी वस्तु, अमली पदार्थ. ५ जादूचा खेळ, गारूड. ६ जेथें आपली वस्तु ठेविली तें ठिकाण. ७ नगरामध्यें. ८ दुःखी. ९ भय पावतो. १० गडबड उडाली. ११ दिवाणखाना, आरसेमहाल. १२ आरशामध्यें. १३ आरशांत दुसरा दिवाणखाना आहे असें वाटून आरशांतून पलीकडे जायला पहातो. १४ ना हींसें होई. १५ जातीसंबंधी अभिमान.

उगाच अभिमानें खवळे । या नांव भ्रम ॥ ३० ॥ मागील कांहीं आठवेना । पुढील विचार सुचेना । अखंड आरूढ अनुमाना । या नांव भ्रम ॥ ३१ ॥ प्रचीतीविण औषध घेणें । प्रचीत नसतां पथ्य करणें । प्रचीतीविण ज्ञान सांगणें । या नांव भ्रम ॥ ३२ ॥ फळश्रुतीविण प्रयोग । ज्ञानेविण नुसता योग । उगाच शरीरें भोगी भोग । या नांव भ्रम ॥ ३३ ॥ ब्रह्मा लिहितो अदृष्टी । आणि वाचून जाते सेटी । ऐशा प्रकारांच्या गोष्टी । या नांव भ्रम ॥ ३४ ॥ उदंड भ्रम विस्तारला । अज्ञानजनीं पैसावला । अल्प-संकेतें बोलिला । कळावयाकारणें ॥ ३५ ॥ भ्रमरूप विश्व स्वभावें । तेथें काय म्हणोन सांगावें । निर्गुण ब्रह्मावेगळें आघवें । भ्रमरूप ॥ ३६ ॥ ज्ञात्यास नाहीं संसार । ऐसें बोलती अपार । गत ज्ञात्यांचे चमत्कार । या नांव भ्रम ॥ ३७ ॥ येथें आशंका उठिली । ज्ञात्यांची समाधि पूजिली । तेथें कांहीं प्रचीत आली । किंवा नाहीं ॥ ३८ ॥ तैसेचि अवतारी संपले । त्यांचेंहि सामर्थ्य उदंड चाले । तरी ते काय गुंतले । वासना धरूनि ॥ ३९ ॥ ऐशी आशंका उद्भवली । समर्थें पाहिजे निरसली । इतुकेन हे संपली । कथा भ्रमाची ॥ ४० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे दशमदशके भ्रमनिरूपणं नाम षष्टः समासः ॥ ६ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ अवतारादिक ज्ञानी संत । सारासार विचारें मुक्त । त्यांचें सामर्थ्य चालत । कोण्या प्रकारें ॥ १ ॥ हे श्रोतयांची आशंका । पाहतां प्रश्न केला ‡ निका । सावध होऊन ऐका । म्हणे वक्ता ॥ २ ॥ ज्ञानी मुक्त होऊन गेले । मागें त्यांचें सामर्थ्य चाले । परंतु ते नाहीं आले । वासना धरूनी ॥ ३ ॥ लोकांस होतो चमत्कार । लोक मानिती साँचार । परंतु याचा विचार । पाहिला पाहिजे ॥ ४ ॥ † जित असतां नेणों किती । जनांमध्यें चमत्कार होती । ऐसीयांची सद्यः प्रचीती । रोकडी पाहावी ॥ ५ ॥ तो तरी आपण नाहीं गेला । लोकीं प्रत्यक्ष देखिला । ऐसा हा चमत्कार झाला । यास काय म्हणावें ॥ ६ ॥ तरी हा लोकांचा भावार्थ । भाविकां देव यथार्थ । अन्यत्र कल्पना व्यर्थ । कुतर्काची ॥ ७ ॥ आवडे तें स्वप्नीं देखिलें । तरी काय तेथूनि आलें । म्हणाल तेणें आठविलें । तरी द्रव्य कां दिसे ॥ ८ ॥ एवं आपली कल्पना । स्वप्नीं येती पदार्थ नाना । तरी ते पदार्थ चालतीना । अथवा आठवू नाहीं ॥ ९ ॥ येथें तुटली आशंका । ज्ञात्यास जन्म कल्पूं नका । उमजेना तरी विवेका । बरें पाहा ॥ १० ॥ ज्ञानी मुक्त होऊन गेले । त्यांचें सामर्थ्य उगेंचि चाले । कां जे पुण्यमार्गें चालिले । म्हणोनियां ॥ ११ ॥ याकारणें पुण्यमार्गें चालावें । भजन देवाचें वाढवावें । न्याय सोडून न जावें । अन्यायमार्गें ॥ १२ ॥ नाना पुरश्चरणें करावीं । नाना तीर्थाटणें फिरावीं । नाना सामर्थ्यें वाढवावीं । वैराग्यबळें ॥ १३ ॥ निश्चय बैसे वस्तूकडे । तरी ज्ञानमार्गेंहि सामर्थ्य चढे । कोणी एक एकांत मोडे । ऐसें न करावें ॥ १४ ॥ एक गुरु एक

---

१ सदोदित. २ नेहमी साशंकवृत्ति. ३ सफलतेशिवाय. ४ कपाळावर, प्रारब्धामध्यें. ५ सटवाई, षष्ठी देवता. ६ विस्तारला. ७ थोडक्यांत. ८ मागें होऊन गेलेले. ९ साधु. ‡ बरा. १० खरा. † जीवंत. ११ तात्कालिक. १२ हट्ट, समजूत. १३ ब्रह्मविषयीं.

देव । कोठें तरी असावा भावें । भावार्थ नसतां ‡ वाव । सर्व कांहीं ॥ १५ ॥ निर्गुण-ज्ञान झालें । म्हणोन सगुण अलक्ष्य केलें । तरी ते ज्ञाते नागविले । दोहींकडे ॥ १६ ॥ नाहीं भक्ति नाहीं ज्ञान । मध्येंचि पैसावला अभिमान । म्हणोनियां जप ध्यान । सांडूंचि नये ॥ १७ ॥ सांडील सगुणभजनासी । तरी तो ज्ञाता परी अपेशी । म्हणोनियां सगुणभजनासी । सांडूंचि नये ॥ १८ ॥ निष्कामबुद्धीचिया भजना । त्रैलोक्यीं नाहीं ❀ तुळणा । सामर्थ्येविण घडेना । निष्काम भजन ॥ १९ ॥ कामनेनें फळ घडे । निष्काम-भजनें भगवंत जोडे । फळभगवंतासि कोणीकडे । महदंतर ॥ २० ॥ नाना फळें देवापाशीं । आणि फळ अंतरी भगवंतासी । याकारणें परमेश्वरासी । निष्काम भजावें ॥ २१ ॥ निष्काम भजनाचें फळ आगळें । सामर्थ्य चढे मर्यादेवेगळें । तेथें बापुडीं फळें । कोणीकडे ॥ २२ ॥ भक्तें जें मनीं धरावें । तें देवें आपणाचि करावें । तेथें वेगळें † भावावें । नलगे कदा ॥ २३ ॥ दोनी सामर्थ्यें एक होतां । काळासि नाटोपे सर्वथा । तेथें इतरांची काय कथा । कीर्टकन्यायें ॥ २४ ॥ म्हणोनि निष्काम भजन । वरी विशेष ब्रह्मज्ञान । तयास तुळितां त्रिभुवन । उणे वाटे ॥ २५ ॥ येथें बुद्धीचा प्रकाश । आणिक न चढे विशेष । प्रताप कीर्ति आणि यश । निरंतर ॥ २६ ॥ निरूपणाचा विचार । आणि हरिकथेचा गजर । तेथें होती तत्पर । प्राणिमात्र ॥ २७ ॥ जेथें भ्रष्टाकार घडेना । तो परमार्थहि दडेना । समाधान बिघडेना । निश्चयाचें ॥ २८ ॥ सारासार विचार करणें । न्यायअन्याय अखंड पाहणें । बुद्धि भगवंताचें देणें । पालटेना ॥ २९ ॥ भक्त भगवंतीं अनन्य । त्यासि बुद्धि देतो आपण । येदर्थीं भगवद्वचन । सावध ऐका ॥ ३० ॥ ॥ श्लोकार्ध ॥ ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयांति * ते ॥ म्हणोन सगुणभजन । वरी विशेष ब्रह्मज्ञान । प्रत्ययाचें समाधान । दुर्लभ जगीं ॥ ३१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे दशमदशके सगुणभजननिरूपणं नाम सप्तमः समासः ॥ ७ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ऐका प्रचीतीचीं लक्षणें । प्रचीत पाहर्ताल ते शाहणे । येरे[1] वेडे दैन्यवाणे । प्रचीतीविण ॥ १ ॥ नाना रत्नें नाना नाणीं । परीक्षून न घेतां होय हानि । प्रचीत न येतां निरूपणीं । बैसोंच नये ॥ २ ॥ तुरंगें[2] शस्त्र देमूंन पाहिले । बरें पाहतां प्रचीतीस आलें । तरी मग पाहिजे घेतले । जाणते पुरुषीं ॥ ३ ॥ बीज उगवेल ऐसें पाहावें । तरी मग द्रव्य घालून घ्यावें । प्रचीत आलिया ऐकावें । निरूपण ॥ ४ ॥ देहीं आरोग्यता झाली । ऐसी जनास प्रचीत आली । तरी मग अगत्य घेतली । पाहिजे मात्रा ॥ ५ ॥ प्रचीतीविण औषध घेणें । तरी मग

‡ व्यर्थ. १ निष्ठा. ❀ जोड, उपमा. २ दुर्लक्ष्य. ३ विस्तारला. ४ वासनारहित. ५ फळाला व भगवंताला किती अंतर ? कुठें कामिकांचें क्षुद्र फळ व कुठें षड्गुणैश्वर्य भगवंत ! ६ अंतरवितें, दूर करतें. ७ विशेष, अधिक. † कल्पावें, समजावें. ८ क्षुद्र किड्याप्रमाणें इतरांची ती काय कथा ? ९ त्याच्याबरोबर किंमत केली असतां, तुलना केली असतां. १० एकनिष्ठ. ११ ह्याविषयी. * श्रीमत्भगवद्गीता अध्याय १० श्लोक १०. १२ इतर लोक. १३ अनुभव. १४ घोडे. १५ अत्यंत श्रम करून. १६ जाणणाऱ्या पुरुषांनीं.

धडाचि बिघडणें । अनुमानें जें कार्य करणें । तेंचि मूर्खपण ॥ ६ ॥ प्रचीतीस नाहीं आलें । आणि सुवर्ण करविलें । तरी मग जाणावें ठकिलें । देखत देखतां ॥ ७ ॥ शोधून पाहिल्याविण । कांहीं तरी एक कारण । होणार नाहीं, निर्वाण । प्राणास घडे ॥ ८ ॥ म्हणोन अनुमानाचें कार्य । भल्यानें कदापि करूं नये । उपाय पाहतां अपाय । नेमस्त घडे ॥ ९ ॥ पाण्यांतील म्हैसीची सोटी । करणें हे बुद्धिच खोटी । शोधिल्याविण हिंपुटी । होणें घडे ॥ १० ॥ विश्वासें घर घेतलें । ऐसें कधीं नाहीं ऐकिलें । मैंदें मैंदावे केलें । परी तें शोधिलें पाहिजे ॥ ११ ॥ शोधिल्याविण अन्नवस्त्र घेणें । तेणें प्राणास मुकणें । लटिक्याचा विश्वास धरणें । हेंचि मूर्खपण ॥ १२ ॥ संगति चोरांची धरितां । घात होईल तत्त्वतां । ठक सिंतरू शोधितां । ठायीं पंडे ॥ १३ ॥ गैरसोळ † तामगिरी । कोणी नवी मुद्रा करी । नाना कपट परोपरी । शोधून पहावें ॥ १४ ॥ दिवाळखोराचा मांडे । पाहतां वैभवहि दिसे उदंडे । परी तें अवघें थोतांड । भंडे पुढें ॥ १५ ॥ तैसें प्रचीतीविण ज्ञान । तेथें नांहीं समाधान । करून बहुतांचें अनुमान । अनहित केलें ॥ १६ ॥ मंत्र यंत्र उपदेशिले । नेणते प्राणी गोविले । जैसे झांकून मारिलें । दुखणाईत ॥ १७ ॥ वैद्य पाहिला परी कांचा । तरी प्राण गेला पोराचा । येथें उपाय दुसऱ्याचा । काय चाले ॥ १८ ॥ स्वदुःखें अंतरीं झिजे । आणि वैद्य पुसतां लाजे । तरी मग तयासि साजे । आत्महत्यारेपण ॥ १९ ॥ जाणत्यावरी गर्व केला । परी तो नेणत्याकरितां बुडाला । येथें कोणाचा घात झाला । बरें पाहा ॥ २० ॥ पापाची खंडणा झाली । जन्मयातना चुकली । ऐसी स्वयें प्रचीत आली । म्हणिजे बरें ॥ २१ ॥ परमेश्वरासी वोळखिलें । आपण कोण ऐसें कळलें । आत्मनिवेदन झालें । म्हणिजे बरें ॥ २२ ॥ ब्रह्मांड कोणें केलें । कासयाचें उभारलें । मुख्य कर्त्यास ओळखिलें । म्हणजे बरें ॥ २३ ॥ येथें अनुमान राहिला । तरी परमार्थ केला तो वायां गेला । प्राणी संशयीं बुडाला । प्रचीतीविण ॥ २४ ॥ हेंचि परमार्थाचें वर्म । लटिकें बोलेल तो अधम । लटिकें मानील तो अधमाधम । यथार्थ जाणावा ॥ २५ ॥ येथें बोलण्याची झाली सीमा । नेणतां न कळे परमात्मा । असत्य नाहीं सर्वोत्तमा । तूंचि जाणसी ॥ २६ ॥ माझे उपासनेचा बडिवार । ज्ञान सांगावें साचार । मिथ्या बोलतां उत्तर । प्रभूसी लागे ॥ २७ ॥ म्हणोनि सत्यचि बोलिलें । कर्त्यास पाहिजे ओळखिलें । मायाब्रह्मवाचें शोधिलें । पाहिजे मूळ ॥ २८ ॥ तेंचि पुढें निरूपण । बोलिलेंचि बोलिलें प्रमाण । श्रोतीं सावध अंतःकरण । घातलेंचि घालावें ॥ २९ ॥ सूक्ष्म निरूपण लागलें । तेथें बोलिलेंचि मागुती बोलिलें । श्रोतयांस पाहिजे उमजलें ।

---

१ खराब होणें. २ इष्ट कार्य. ३ सिद्धीस जाणार नाहीं. ४ अंत, नाश. ५ बदल, खरेदी, सवदा. ६ कष्टी. ७ लुटाऱ्यानें. ८ मैंदपणा, फांस घालणें. ९ फसविणारा. १० सांपडतो, प्राप्त होतो. ११ खोडसाळ. † तामसी, रागीट. १२ खोटें नाणें. १३ पसारा, व्यापार. १४ बहुत. १५ फजिती. १६ अकल्याण. १७ कच्चा. १८ आत्मघातकीपणा. १९ नीच. २० नीचाहून नीच. २१ पसारा. २२ मायेच्या उत्पत्तीचें.

म्हणोनियां ॥ ३० ॥ प्रचीत पाहतां निकट[1] । उठोन जाती परिपाठ[2] । म्हणोन हें खट-पट । करणें लागे ॥ ३१ ॥ परिपाठींचि जरी बोलिले । तरी प्रचीतसमाधान बुडालें । प्रचीतसमाधान राखिलें । तरी परिपाठ उडे ॥ ३२ ॥ ऐसीं सांकडीं[3] दोहींकडे । म्हणोनि बोलिलेंचि बोलणें घडे । दोन्ही राखोनियां कोडें[4] । उकलून दाऊं ॥ ३३ ॥ परिपाठ आणि प्रचीत प्रमाण । दोन्ही राखोन निरूपण । श्रोते परम विचक्षण । विवेरोत[5] पुढें ॥ ३४ ॥ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे दशमदशके प्रचीतिनिरूपणं नाम अष्टमः समासः ॥ ८ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ आकाशीं वायु झाला निर्माण । तैसी ब्रह्मीं मूळमाया जाण । त्या वायूमध्यें त्रिगुण । आणि पंचभूतें ॥ १ ॥ वटबीजीं अपे वड[6] । फोडून पाहतां न दिसे झाड । नाना वृक्षांचे जुंबाड[7] । बीजापासून होती ॥ २ ॥ तैसी बीजरूप मूळमाया । विस्तार झाला तेथूनियां । तिचें स्वरूप शोधनियां । बरें पाहावें ॥ ३ ॥ तेथें दोनी भेद दिसती । विवेकें पाहावी प्रचीति । निश्चळीं जे चंचळ स्थिति । तोचि वायु ॥ ४ ॥ तयामध्यें जाणीवकळा । जगज्योतीचा जिव्हाळा[8] । वायु जाणीव मिळोनि मेळा[9] † । मूळमाया बोलिजे ॥ ५ ॥ सरितें[10] म्हणतां बायको भासे । तेथें पाहतां पाणीच असे । विवेकी हो समजा तैसें । मूळमायेसी ॥ ६ ॥ वायु जाणीव जगज्ज्योति । तयास मूळमाया म्हणती । पुरुष आणि प्रकृति । याचेंच नांव ॥ ७ ॥ वायूस म्हणती प्रकृति । आणि पुरुष म्हणती जगज्ज्योति । पुरुष प्रकृति शिव शक्ति । याचेंच नांव ॥ ८ ॥ वायूमध्यें जाणीव विशेष । तोचि प्रकृतीमध्यें पुरुष । ये गोष्टीचा विश्वास । धरिला पाहिजे ॥ ९ ॥ वायु शक्ति जाणीव ईश्वर । अर्धनारीनटेश्वर । लोक म्हणती निरंतर । येणेंप्रकारें ॥ १० ॥ वायूमध्यें जाणीव गुण । तेंचि ईश्वराचें लक्षण । तयापासून त्रिगुण । पुढें जाहलें ॥ ११ ॥ तया गुणामध्यें सत्त्वगुण । निखेळ[11] जाणीवलक्षण । त्याचा देहधारी आपण । विष्णु जाहला ॥ १२ ॥ त्याच्या अंशें जग चाले । ऐसें ‡ भगवद्गीता बोले । गुंतलें तेंचि उगवलें[12] । विचार पाहतां ॥ १३ ॥ एक जाणीव वांटली । प्राणिमात्रास विभागली । जाणजाणों वांचविली । सर्व कायां[13] ॥ १४ ॥ तयेचें नांव जगज्ज्योति । प्राणिमात्र तिचेनि जगती । याची रोकडी[14] प्रचीति । प्रत्यक्ष पाहावी ॥ १५ ॥ पक्षी श्वापद किडा मुंगी । कोणी एक प्राणी जगीं । जाणीव खेळे त्याचे अंगीं । निरंतर ॥ १६ ॥ जाणोन काया पळविती[15] । तेणें गुणें प्राणी वांचती । दडती आणि लपती । जाण जाणों ॥ १७ ॥ अवघ्या जगास वांचविती । म्हणोन नामें जगज्ज्योती । ते गेलिया प्राणी मरती । जेथील तेथें ॥ १८ ॥ मुळींचे जाणीवेचा विकार । पुढें झाला विस्तार । जैसे उदकाचे तुषार[16] । अनंत रेणू ॥ १९ ॥ तैसे देव देवता दैवतें

---

१ जवळ. २ चाली, रीति. ३ संकटें. ४ गूढ गोष्ट. ५ स्पष्ट करोत. ६ वडाच्या बीजामध्यें. ७ समूह, पसारे. ८ जगाच्या जीवनशक्तीची. ९ झरा, अंतःप्राण. † समूह, मिश्रण. १० नदी. ११ माया. १२ सर्व, केवळ. ‡ श्रीमत्भगवद्गीता अध्याय १० श्लोक ४२. १३ उलगडलें, समजुतीला आलें. १४ शरीर. १५ तात्कालिक. १६ कण.

भूतें । मिथ्या म्हणों नये त्यांतें । आपुलाल्या सामर्थ्यें ते । सृष्टीमध्यें फिरती ॥ २० ॥ सदा विचरती वायुस्वरूपें । स्वइच्छा पालटती रूपें । अज्ञान प्राणी भ्रमें संकल्पें । त्यासि बाधिती ॥ २१ ॥ ज्ञात्यास संकल्पचि असेना । म्हणोन त्याचेनि बाधवेना । याकारणें आत्मज्ञाना । अभ्यासावें ॥ २२ ॥ अभ्यासिल्या आत्मज्ञान । सर्व कर्मास होय खंडण । हे रोकडी प्रचीत प्रमाण । संदेह नाहीं ॥ २३ ॥ ज्ञानेविण कर्म बिघडे । हें तों कल्पांतीं न घडे । सद्गुरूविण ज्ञान जोडे । हेंहि अघटित ॥ २४ ॥ म्हणोन सद्गुरु करावा । सत्संग शोधून धरावा । तत्त्वविचारें विवरावा । अंतर्यामीं ॥ २५ ॥ तत्त्वें तत्त्व निरसोन जातां । आपला आपणाचि तत्त्वतां । अनन्यभावें सार्थकता । सहजचि जाहली ॥ २६ ॥ विचार न करितां जें जें केलें । तें तें वाउगेंच व्यर्थ गेलें । म्हणोनि विचारीं प्रवर्तलें । पाहिजे आधीं ॥ २७ ॥ विचार पाहील तो पुरुष । विचार न पाहे तो पशु । ऐसीं वचनें सर्वेशु । ठायीं ठायीं बोलिला ॥ २८ ॥ सिद्धांत साधावयाकारणें । पूर्वपक्षें लागे उंडवणें । परंतु साधकां निरूपणें । साक्षात्कार ॥ २९ ॥ श्रवण मनन निदिध्यास । प्रचीतीनें बाणतां विश्वास । रोकडा साक्षात्कार सायास । करणेचि नलगे ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे दशमदशके प्रकृतिपुरुषनिदर्शननिरूपणं नाम नवमः समासः ॥ ९ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ गगनासारिखें ब्रह्म पोकळ । उदंड उंच अंतराळ । निर्गुण निर्मळ निश्चळ । सदोदित ॥ १ ॥ त्यास परमात्मा म्हणती । आणिक नामें नेणों किती । परी तें जाणिजे आदिअंतीं । जैसें तैसें ॥ २ ॥ विस्तीर्ण पसरला पैसे । भोंवता दाटला अवकाश । भासाचि नाहीं निराभास । जैसें तैसें ॥ ३ ॥ चहूंकडे पाताळातळीं । अंताचि नांहीं अंतराळीं । कल्पांतकाळीं सर्वकाळीं । संचलेंचि असे ॥ ४ ॥ ऐसें कांहींएक चंचळ । तें अचंचळीं भासे चंचळ । त्या नामें ही पुष्कळ । विविधप्रकारें ॥ ५ ॥ न दिसतां नाम ठेवणें । न देखतां खूण सांगणें । असों हें जाणायाकारणें । नामाभिधानें ॥ ६ ॥ मूळमाया मूळप्रकृति । मूळपुरुष ऐसें म्हणती । शिवशक्ति नामें किती । नाना प्रकारें ॥ ७ ॥ परी जें नाम ठेविलें जया । आधीं ओळखावें तया । प्रचीतीविण कासया । वल्गना करावी ॥ ८ ॥ रूपाची न धरितां सोय । नामासरिसें भरंगळों नये । प्रत्ययेविण गळेगाँ होय । अनुमानज्ञानें ॥ ९ ॥ निश्चळ गगनीं चंचळ वारा । वाजों लागला भरारां । परी त्या गगना आणि समीरा । भेद आहे ॥ १० ॥ तैसें निश्चळ परब्रह्म । चंचळ माया भासला भ्रम । त्या भ्रमाचा संभ्रम । करून दाऊं ॥ ११ ॥ जैसा गगनीं चालिला पवन । तैसें निश्चळीं झालें चळण । † इच्छा स्फूर्तिलक्षण । स्फुरण रूप ॥ १२ ॥ अहंपणें जाणीव झाली । तेचि मूळप्रकृति बोलिली । महाकारण काया

---

१ हिंडतात. २ कल्पनेनें, हेतूनें. ३ विघडते. ४ हृदयांत विचार करावा, स्पष्ट करावा. ५ आशंका, संशय. ६ खंडन करणें. ७ अनुभव. ८ एकसारखें चिंतन. ९ पोकळ, आधाररहित. १० विस्तृत. ११ विस्तार. १२ पोकळी. १३ भ्रम पावूं नये. १४ गोंधळ. १५ वाऱ्याला. १६ विस्तार, उलगडा. १७ वारा. † "एकोऽहं बहुस्याम्" मी एक आहे तो अनेक व्हावें, अशी मूळ स्फूर्ति.

रचिली ब्रह्मांडाची ॥ १३ ॥ महामाया मूळप्रकृति । कारण ते अव्याकृति । सूक्ष्म हिरण्यगर्भ म्हणती । विराट तें स्थूळ ॥ १४ ॥ ऐसें पंचीकरणशास्त्रप्रमेय । ईश्वरतनु-चतुष्टय । म्हणोन हें बोलणें होय । जाणिव मूळमाया ॥ १५ ॥ परमात्मा परमेश्वर । परेश ज्ञानघन ईश्वर । जगदीश जगदात्मा जगदीश्वर । पुरुषनामें ॥ १६ ॥ सत्तारूप ज्ञान-स्वरूप । प्रकाशरूप ज्योतिरूप । कारणरूप चिद्रूप । शुद्ध सूक्ष्म अलिप्त ॥ १७ ॥ आत्मा अंतरात्मा विश्वात्मा । द्रष्टा साक्षी सर्वात्मा । क्षेत्रज्ञ शिवात्मा जीवात्मा । देहीं कूटस्थ बोलिजे ॥ १८ ॥ इंद्रात्मा ब्रह्मात्मा हरिहरात्मा । यमात्मा धर्मात्मा नैर्ऋतात्मा । वरुण-वायुकुबेरात्मा । ऋषिदेवमुनिधर्ता ॥ १९ ॥ गण गंधर्व विद्याधर । यक्ष किन्नर नारद तुंबर । सर्व लोकांचें अंतर । तो परमात्मा बोलिजे ॥ २० ॥ चंद्र सूर्य तारामंडळें । भूमंडळें मेघमंडळें । एकवीस स्वर्गें सप्त पाताळें । अंतरात्माच वर्तवी ॥ २१ ॥ गुप्त वल्ली पाल्हाळली । तिचीं पुरुषनामें घेतलीं । आतां स्त्रीनामें ऐकिली । पाहिजे श्रोतीं ॥ २२ ॥ मूळमाया जगदीश्वरी । परमविद्या परमेश्वरी । विश्ववंद्या विश्वेश्वरी । त्रैलोक्यजननी ॥ २३ ॥ अंतर्हेतु अंतर्कळा । मौनगर्भ जाणिवकळा । चपळा जगज्ज्योति जीवनकळा । परा पश्यंती मध्यमा ॥ २४ ॥ युक्ति बुद्धि मति धारणा । सावधानता नाना चाळणा । भूत भविष्य वर्तमाना । उकलून दावी ॥ २५ ॥ जागृति स्वप्न सुषुप्ति जाणे । तुर्या तटस्था अवस्था जाणे । सुख दुःख सकळ जाणे । मानापमाना ॥ २६ ॥ ते परम कठिण कृपाळू । ते परम कोमळ स्नेहाळू । ते परम क्रोधी लोभाळू । मर्यादेवेगळी ॥ २७ ॥ शांति क्षमा विरक्ति भक्ति । अध्यात्मविद्या सायुज्यमुक्ति । विचारणा सहजस्थिती । जयाचेनी ॥ २८ ॥ पूर्वीं पुरुषनामें बोलिलीं । उपरी स्त्रीनामें निरूपिलीं । आतां नपुंसक-नामें ऐकिलीं । पाहिजे चंचळाचीं ॥ २९ ॥ जाणणें अंतःकरण चित्त । श्रवण मनन चैतन्य जीवित । येतें जातें सुचिते । होऊन ऐका ॥ ३० ॥ मीपण तूंपण जाणपण । ज्ञातेपण सर्वज्ञपण । जीवपण शिवपण ईश्वरपण । अलिप्तपण बोलिजे ॥ ३१ ॥ ऐसीं नामें उदंडें असती । परी ते एकचि जगज्ज्योति । विचारवंत ते जाणती । सर्व अंतरात्मा ॥ ३२ ॥ आत्मा जगज्ज्योति सर्वज्ञपण । तिन्ही मिळोनि एकचि जाण । अंतःकरणाचि प्रमाण । ज्ञप्तिमात्र ॥ ३३ ॥ ढीग झाले पदार्थांचे । पुरुष स्त्री नपूंसक नामांचे । परंतु सृष्टिरचनेचे । किती म्हणोन सांगावे ॥ ३४ ॥ सकळांसी चाळिता एक । अंतरात्मा वर्तवी अनेक । मुंगीपासून ब्रह्मादिक । तेणेंचि चालती ॥ ३५ ॥ तो अंतरात्मा आहे कैसा । प्रस्तुत ओळखावा आभासा । नाना प्रकारींचा

---

१ नामरूपविकाररहित. २ आकाशादि भूतांचे देहादिकांच्या उत्पत्तीसाठी ईश्वरनिर्मित संमिश्रण, त्यासंबंधी शास्त्रसिद्धांत. ३ ईश्वराचे चार देह. ४ ज्ञानपूर्ण. ५ शरीराचा अभिमानी. ६ देहद्वयाला आधार असणारें चैतन्य ७ विस्तारली. ८ जिच्या अंतःस्थ रूपाविषयीं मति कुंठते ती. ९ गाढ झोप. १० चवथी अवस्था. ११ आत्मज्ञानसंबंधी विद्या, वेदांतविद्या. १२ ब्रह्मस्वरूपी एकरूप होणें. १३ सविकल्पस्थिति. १४ निर्विकल्पस्थिति. १५ चंचल प्रकृतीची, मायेची. १६ चेतनाशक्ति. १७ स्वस्थ, चांगलें चित्त देऊन. १८ पुष्कळ. १९ जगताची चेतनाशक्ति. २० केवळ ज्ञानरूप. २१ अंमळसा, जरासा.

तमाशा । येथेंचि आहे ॥ ३६ ॥ तो कळतो परी दिसेना । प्रचीत येत्ये परी भासेना । शरीरीं असे परी वसेना । एके ठायीं ॥ ३७ ॥ तीक्ष्णपेणें गगनीं भरे । सरोवर देखतांच पसरे । पदार्थ रक्षून उरे । चहूंकडे ॥ ३८ ॥ जैसा पदार्थ दृष्टीस दिसतो । तो त्या पदार्थासारिखाच होतो । वायूहून विशेष तो । चंचळविषयीं ॥ ३९ ॥ कित्येक दृष्टीनें देखे । कित्येक रसनेनें चाखे । कित्येक ते वोळखे । मनेंकरूनी ॥ ४० ॥ श्रोत्रीं बैसोन शब्द ऐकतां । घ्राणेंद्रियें वास घेतो । त्वचेंद्रियें जाणतो । शीतोष्णादिक ॥ ४१ ॥ ऐशा जाणे अंतरकळा । सकळांमध्यें परी निराळा । पाहतां त्याची अगाध लीला । तोचि जाणे ॥ ४२ ॥ तो पुरुष ना सुंदरी । बाळ तरुण ना कुमारी । नपुंसकाचा देहधारी । परी नपुंसक नव्हे ॥ ४३ ॥ तो चालवी सकळ देहासी । करून अकर्ता म्हणती त्यासी । तो क्षेत्रज्ञ क्षेत्रवासी । देहीं कूटस्थ बोलिजे ॥ ४४ ॥ ॥ श्लोक ॥ द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एव च । क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोऽक्षर उच्यते ❀ ॥ १ ॥ ॥ टीका ॥ ॥ दोनी पुरुष लोकीं असती । क्षराक्षर बोलिजेती । सर्व भूतें क्षर म्हणती । अक्षर कूटस्थ बोलिजे ॥ ४५ ॥ उत्तम पुरुष तो आणिक ‡ । निष्प्रपंच आणि निष्कलंक । निरंजन परमात्मा एक । निर्विकारी ॥ ४६ ॥ चारी देह निरसावे । साधकें देहातीत व्हावें । देहातीत होतां जाणावें । अनन्य भक्त ॥ ४७ ॥ देहमात्र निरसोन गेला । तेथें अंतरात्मा कैंचा उरला । निर्विकारीं विकाराला । ठावचि नाहीं ॥ ४८ ॥ निश्चळ परब्रह्म एक । चंचळ जाणावें मायिक । ऐसा प्रत्यय निश्चयात्मक । विवेकें पाहावा ॥ ४९ ॥ येथें बहुत नलगे खळखळ । एक चंचळ एक निश्चळ । शाश्वत कोण हें केवळ । ज्ञानें ओळखावें ॥ ५० ॥ असार त्यागून घेइजे सार । म्हणोन सारासार विचार । नित्यानित्य निरंतर । पाहती ज्ञानी ॥ ५१ ॥ जेथें ज्ञानाचि होतें विज्ञान । जेथें मनाचि होतें उन्मन । तेथें कैंचे चंचळपण । आत्मयासी ॥ ५२ ॥ † सांगणावांगणीचें काम नव्हे । आपुल्या अनुभवें जाणावें । प्रत्ययेविण सिणावें । तेंचि पाप ॥ ५३ ॥ सत्याएवढें सुकृत नाहीं । असत्याएवढें पाप नाहीं । प्रचीतीविण कोठेंचि नाहीं । समाधान ॥ ५४ ॥ सत्य म्हाणिजे स्वरूप जाण । असत्य माया हें प्रमाण । येथें निरूपिलें पाप पुण्य । रूपेसहित ॥ ५५ ॥ दृश्य पाप ओसरलें । पुण्य परब्रह्म उरलें । अनन्य होतांच झालें । नामातीत॥५६॥ आपण वस्तूच स्वतः सिद्ध । तेथें नाहीं देहसंबंध । पापराशी होती दग्ध । येणें प्रकारें ॥ ५७ ॥ येरव्हीं ब्रह्मज्ञानेविण । जें जें साधन तो तो शीणे ।

---

१ सूक्ष्मरीतीनें. २ चंचलपणामध्यें. ३ जिभेनें. ४ कानांनीं. ५ नाकानें. ६ कांतडीनें, त्वचेनें. ७ स्त्री. ८ शरीराचा जाणता. ९ शरीरांत रहाणारा. १० आत्मा. ❀ श्रीमत् भगवद्गीता अध्याय १५ श्लोक १६. ११ नाश पावणारीं. ‡ श्रीमत् भ. गी. अ. १५ श्लोक १७. १२ मायारहित. १३ मिथ्या आहेत असें अनुभवावें. १४ देहाभिमानरहित. १५ खोटें. १६ अनुभवयुक्तज्ञान. १७ कल्पनारहित. † नुसतें सांगून होण्यासारखें. १८ श्रमावें. १९ पुण्य. २० नाहींसे झालें. २१ एकनिष्ठा. २२ नामाविरहित. २३ जळून खाक. २४ कष्ट, त्रास.

नाना दोषांचें क्षालण[1] । होईल कैसें ॥ ५८ ॥ पापाचें वळलें शरीर । पापाचि घडे तदनंतर । अंतरीं रोग वरी वरी उपचार । काय करी ॥ ५९ ॥ नाना क्षेत्रीं हें मुंडलें । नाना तीर्थीं हें दंडिलें । नाना निग्रहीं[2] खंडिलें । ठायीं ठायीं ॥ ६० ॥ नाना मृत्तिकेनें घांसिलें । अथवा तप्तमुद्रेनें लांछिलें[3] । जरी हें वरी वरी ताशिलें । तरी शुद्ध नव्हे ॥ ६१ ॥ शेणाचे गोळे गिळिले । गोमूत्राचे मोघे[4] घेतले । माळा रुद्राक्ष घातले । काष्ठमणी ॥ ६२ ॥ वेष वरि वरि केला । अंतरीं दोष भरला । त्या दोषाच्या दहनालों[5] । आत्मज्ञान पाहिजे ॥ ६३ ॥ नाना व्रतें नाना दानें । नाना योग तीर्थाटणें । सर्वांहून कोटिगुणें । महिमा आत्मज्ञानाचा ॥ ६४ ॥ आत्मज्ञान पाहे सदा । त्याच्या पुण्यास नाहीं मर्यादा । दुष्ट पातकांची बाधा । निरसोन गेली ॥ ६५ ॥ वेदशास्त्रीं सत्यस्वरूप । तेंचि ज्ञानियाचें रूप । पुण्य झालें अमूप[6] । सुकृतें सीमा सांडिली ॥ ६६ ॥ ह्या प्रचीतीच्या गोष्टी । प्रचीत पाहावी आत्मदृष्टी । प्रचीतीवेगळें कष्टी । होऊं नये ॥ ६७ ॥ अगा हे प्रचीतीचे लोक हो । प्रचीत नसतां अवघा शोक हो । रघुनाथकृपेनें राहो । प्रत्यय निश्चयाचा ॥ ६८ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे दशमदशके चळाचळनिरूपणं नाम दशमः समासः ॥ १० ॥

दशक अकरावा. (भौमदशक)

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ आकाशापासून वायु होतो । हा तो प्रत्यय येतो । वायूपासून अग्नि होतो । सावध ऐका ॥ १ ॥ वायूची कठिण घैसणी[7] । येथें निर्माण झाला वन्ही[8] । मंद वायु शीतळ पाणी[9] । तेथून जाहलें ॥२॥ आपापासून झाली पृथ्वी । ते नाना बीजरूप जाणावी । बीजापासून उत्पत्ति व्हावी । हा स्वभावाचि आहे ॥ ३ ॥ मुळीं सृष्टि कल्पनेची । कल्पना आहे मूळची । जयापासून देवेत्रयांची[10] । कोंया[11] जाहली ॥ ४ ॥ निश्चळामध्यें चंचळ । तेचि कल्पना केवळ । अष्टधा प्रकृतीचें[12] मूळ । कल्पनारूप ॥ ५ ॥ कल्पना तेचि अष्टधा प्रकृति । अष्टधा तेचि कल्पनामूर्ति[13] । मूळाग्रापासून उत्पत्ति[14] । अष्टधा जाणावी ॥ ६ ॥ पंचभूतें तीन गुण । आठ झालीं दोनी मिळोन । म्हणोनि अष्टधा प्रकृति जाण । बोलिजेते ॥ ७ ॥ मुळीं कल्पनारूप झाली । पुढें तेचि फोंपावली[15] । केवळ जडत्वास आली । सृष्टिरूपें ॥ ८ ॥ मुळीं झाली ते मूळमाया । त्रिगुण झाले ते गुणमाया । जडत्व पावली ते अविद्यामाया । सृष्टिरूपें ॥ ९ ॥ पुढें चौरी[16] खाणी झाल्या । चारी खाणी विस्तारल्या[17] । नाना योनी प्रकटल्या । नाना व्यक्ती[18] ॥ १० ॥ ऐशी झाली उभारणी । आतां ऐका संहारणी । मागिले दशकीं विशद करूनी । बोलिलें असे ॥ ११ ॥ परंतु आतां संकलित[19] । बोलि-

---

१ धुवून टाकणें. २ नानाप्रकारच्या शिक्षांनीं. ३ डागणें. ४ गाडगीं. ५ जाळण्याला. ६ पुष्कळ. ७ घर्षण. ८ अग्नि. ९ पाण्यापासून. १० ब्रह्मा, विष्णु, महेश यांची. ११ शरीर. १२ भूमिरापोनलो इत्यादि, आठ प्रकारच्या. भ. गी. ७–४. १३ मायचें. १४ विस्तारली. १५ जारज, अंडज. स्वेदज, उद्भिज, या चार खाणी. १६ आकार. १७ रचना. १८ थोडक्यांत.

जेत संहारसंकेत[1] । श्रोते वक्ते एकचित्त । होऊन ऐका ॥ १२ ॥ शत वरुषें अनावृष्टि । तेणें आटेल जीवसृष्टि । ऐशा कल्पांताच्या[2] गोष्टी । शास्त्रीं निरूपिल्या ॥ १३ ॥ बारा कैळीं[3] तपे सूर्य । तेणें पृथ्वीची रक्षा होय । मग ते रक्षा विरोनि[4] जाय । जळांतरीं ॥ १४ ॥ तें जळ शोषी वैश्वानर[5] । वन्हि झडपी समीर[6] । समीर वितुळे निराकार[7] । जैसें तैसें ॥ १५ ॥ ऐसी सृष्टिसंहारिणी झाली । मागें विस्तारें बोलिली । मायानिरासें[8] उरली । स्वरूपस्थिति ॥ १६ ॥ तेथें जीव शिव पिंड ब्रह्मांड । आटोनि गेलें थोतांड[9] । माये अविद्येचें बंड । वितळोन गेलें ॥ १७ ॥ विवेकेंचि बोलिला क्षय । म्हणोनि विवेकप्रलय[10] । विवेकी जाणती सोय । मूर्खांस कळेना ॥ १८ ॥ सृष्टि शोधितां सकळ । एक चंचळ एक निश्चळ । चंचळास कर्ता चंचळ । चंचळरूपीं ॥ १९ ॥ जो सकळ शरीरीं वर्ते । सकळ कर्तृत्वास प्रवर्ते । करून अकर्ता हा वर्ते । शब्द जया ॥ २० ॥ राव रंक ब्रह्मादिक । सकळांमध्ये वर्ते एक । नाना शरीरीं चाळक । इंद्रियद्वारें ॥ २१ ॥ त्यास परमात्मा बोलती । सकळकर्ता ऐसें म्हणती । परी तो नासेल प्रचीति । विवेकें पाहावी ॥ २२ ॥ जो श्वानामध्यें गुरगुर करितो । जो सूकरामध्यें कुर्कुरितो[11] । गाढवीं भरोन भुंकितो[12] । अट्टहासें[13] ॥ २३ ॥ लोक नाना देह देखती । विवेकी देहांतरें[14] पावती । पंडित समदर्शनें घेती । येणें प्रकारें ॥ २४ ॥ ॥ श्लोक[15] ॥ ॥ विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गविहस्तिनि ॥ शुनि चैव श्वपाकेच पंडिताः समदर्शिनः ॥ १ ॥ टीका ॥ देह पाहतां वेगळाले । परंतु अंतर एकचि झालें । प्राणिमात्रा देखिलें । एका अंतरें ॥ २५ ॥ अनेक प्राणी निर्माण होती । परी एकचि कळा वर्तती । तया नांव जेगँज्योति[16] । जाणती कळा ॥ २६ ॥ श्रोत्रीं[17] नाना शब्द जाणे । त्वचेमध्यें शीतोष्ण जाणे । चक्षूमध्यें पाहों जाणे । नाना पदार्थ ॥ २७ ॥ रसनेमध्यें रस जाणे । घ्राणामध्यें वास तो जाणे । कर्मेंद्रियामध्यें जाणे । नाना विषयस्वादु[18] ॥ २८ ॥ सूक्ष्मरूपें स्थूळ रक्षी । नाना सुखदुःखें परीक्षी । त्या म्हणती अंतरसाक्षी । अंतरात्मा ॥ २९ ॥ आत्मा अंतरात्मा विश्वात्मा । चैतन्य सर्वात्मा सूक्ष्मात्मा । जीवात्मा शिवात्मा परमात्मा । द्रष्टा साक्षी सत्तारूप ॥ ३० ॥ विकारांमधील विकारी । अखंड नाना विकार करी । तयास वस्तु म्हणती भिकारी । परम हीनें[19] ॥ ३१ ॥ सर्व एकचि देखती । अवघा एकंकार करिती । अवघी मायिक स्थिति । चंचळामध्यें ॥ ३२ ॥ चंचळ माया ते मायिक । निश्चळ परब्रह्म एक । नित्यानित्यविवेक । याकारणें ॥ ३३ ॥ जाणता जीव तो ज्ञान । नेणता जीव तो अज्ञान । जन्मतो जीव तो जाण । वासनात्मक ॥ ३४ ॥ ऐक्यजीव तो ब्रह्मांश । जेथें पिंडब्रह्मांडनिरास । येथें सांगितलें विशेष । चार जीव[20] ॥ ३५ ॥ असो हें अवघें चंचळ । चंचळ जाईल सकळ ।

---

१ नाशाचें चिन्ह. २ अवर्षण. ३ प्रलयाच्या. ४ कलांनीं. ५ राख. ६ विरघळून. ७ अग्नि. ८ वायु. ९ मायेच्या नाशानें. १० बड. ११ विवेकानें नाश. १२ डुकरांमध्यें. १३ मोठ्यानें. १४ नाना देह. १५ सारखें पाहणें. १६ श्रीमत् भगवद्गीता अध्याय ५ श्लोक १८. १७ जगाची चेतनाशक्ति. १८ कानांनीं. १९ डोळ्यांनीं. २० विषयांची गोडी. २१ पाहणारा. २२ क्षुद्र. २३ एका व्यक्तीपासून तों सर्व जगताची बाधा. २४ जारज, अंडज, स्वेदज, उद्भिज.

निश्चळ तें निश्चळ । आदिअंतीं ॥ ३६ ॥ आद्य मध्य अवसानें । जे वस्तु समसमान । निर्गुण निर्विकारी निरंजन । निःसंग निष्प्रपंच ॥ ३७ ॥ उपाधिनिरासें तत्त्वतां । जीवशिवांस ऐक्यता । विवंचून पाहूं जातां । उपाधि कैंची ॥ ३८ ॥ असो जाणणें तितुकें ज्ञान । परंतु होतसे विज्ञानें । मनें ओळखावें उन्मनें । कोण्या प्रकारें ॥ ३९ ॥ वृत्तीस न कळे निवृत्ति । गुणास कैंची निर्गुणप्राप्ति । गुणातीत साधक संतीं । विवेकें केलें ॥ ४० ॥ श्रवणापरीस मनन थोर । मननें कळे सारासार । निदिध्यास साक्षात्कार । निःसंग वस्तु ॥ ४१ ॥ निर्गुणीं जे अनन्यता । तेचि मुक्ति सायुज्यता । लक्ष्यांश वाच्यांश आतां । पुरे झाला ॥ ४२ ॥ अलक्ष्यीं राहिलें लक्ष । सिद्धांतीं कैंचा पूर्वपक्ष । अप्रत्यक्षास कैंचें प्रत्यक्ष । असोन नाहीं ॥ ४३ ॥ असोन मायिक उपाधि । तेचि सहज समाधि । श्रवणें वेळांवी बुद्धि । निश्चयाची ॥ ४४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे एकादशदशके सिद्धांतनिरूपणं नाम प्रथमः समासः ॥ १ ॥

श्रीगणेशायनमः ॥ ॥ एक निश्चळ एक चंचळ । चंचळीं गुंतलें सकळ । निश्चळ तें निश्चळ । जैसें तैसें ॥ १ ॥ पाहे निश्चळाचा विवेक । ऐसा लक्षांमध्यें ऐक । निश्चळाऐसा निश्चयात्मक । निश्चळचि तो ॥ २ ॥ या निश्चळाच्या गोष्टी सांगती । पुनः चंचळाकडे धांवती । चंचळचक्रीं निघोन जाती । ऐसे थोडे ॥ ३ ॥ चंचळीं चंचळ जन्मलें । चंचळामध्यें वाढलें । अवघें चंचळाचि बिंबलें । जन्मवरी ॥ ४ ॥ पृथ्वी अवघी चंचळाकडे । करणें तितुकें चंचळीं घडे । चंचळ सांडून निश्चळीं पवाडे । ऐसा कैंचा ॥ ५ ॥ चंचळ कांहीं निश्चळेना । निश्चळ कदापि चळेना । नित्यानित्यविवेकें जना । उमजे कांहीं ॥ ५ ॥ कांहीं उमजलें तरी नुमजे । कांहीं समजलें तरी न समजे । काहीं बुझे तरी निर्बुजे । किंचित् मात्र ॥ ७ ॥ संदेह अनुमान आणि भ्रम । अवघा चंचळामध्यें श्रम । निश्चळीं कदा नाहीं, वर्म । समजलें पाहिजे ॥ ८ ॥ चंचळाकार तितुकी माया । मायिक जाय विलया । लहान थोर म्हणावया । कार्य नाहीं ॥ ९ ॥ सगट माया विस्तारली । अष्टधा प्रकृति फोंफावली । चित्र विचित्र विकारली । नाना रूपें ॥ १० ॥ नाना उत्पत्ति नाना विकार । नाना प्राणी लहान थोर । नाना पदार्थ चमत्कार । नाना रूपें ॥ ११ ॥ विकारवंत विकारलें । सूक्ष्म जडत्वास आलें । अमर्याद दिसों लागलें । कांहींच्या बाहीं ॥ १२ ॥ मग नाना शरीरें निर्माण झालीं । नाना नामाभिधानें ठेविलीं । भाषापरत्वें वळों आलीं । कांहीं कांहीं ॥ २३ ॥ मग नाना रीती नाना दंडके । आचार एकाहूनि एक । वर्तों लागले सकळ लोक । लोकाचारें ॥ १४ ॥ अष्टधा प्रकृतीचीं शरीरें । निर्माण झालीं लहान थोरें । पुढें आपल्या प्रकारें । वर्तों लागलीं

---

१ शेवट. २ मायाविरहित. ३ देह. ४ अनुभवज्ञान, साक्षात्कार. ५ कल्पनारहित स्थिति. ६ संतीं साधक विवेकें गुणातीत केलें=संतांनी साधकांस विवेकानें गुणातीत केलें. ७ श्रवण—ऐकणें—त्याहून. ८ एकाग्रचिंतनानें. ९ शंका. १० वळवावी. ११ लाखांत एखादा. १२ शिरतो. १३ समजतें. १४ घाबरतो. १५ संशय. १६ तर्क, शंका. १७ खूण. १८ नाशाला. १९ सर्व. २० पसरली. २१ नांवें. २२ भाषानुसार. २३ चाली.

॥ १५ ॥ नाना मतें निर्माण झालीं । नाना पाषांडें वाढलीं । नाना प्रकारचीं उठिलीं । नाना बंडें ॥ १६ ॥ जैसा प्रवाह पडिला । तैसाच लोक चालिला । कोण वारील कोणाला । एक नाहीं ॥ १७ ॥ पृथ्वीचा झाला गलांटा । एक लहान एक मोठा । कोण खरा कोण खोटा । कोण जाणे ॥ १८ ॥ आचार बहु चकित पडिला । कित्येक पोटासाठीं बुडाला । अवघा वैरपंगाचि झाला । साभिमानें ॥ १९ ॥ देव झाले उदंड । देवांचें मांडिलें भंड । भूतां देवतांचें थोतांड । एकाचि जाहलें ॥ २० ॥ मुख्य देव तो कळेना । कशास कांहींच मिळेना । एकास एक वळेना । अनावर ॥ २१ ॥ ऐसा नासला विचार । कोण पाहतो सारासार । कैंचा लहान कैंचा थोर । कळेचि ना ॥ २२ ॥ शास्त्रांचा बाजार भरला । देवांचा गलबला झाला । लोक कामनेच्या व्रताला । झोंबोन पडती ॥ २३ ॥ ऐसें अवघें नासलें । सत्यासत्य हारपलें । अवघें ❀ अनायक झालें । चहूंकडे ॥ २४ ॥ मतामतांचा गलबला । कोणी पुसेना कोणाला । जो जे मतीं सांपडला । तयासी तेंचि थोर ॥ २५ ॥ असत्याचा साभिमान । तेणें पाविजे पतन । म्हणोनियां ज्ञाते जन । सत्य शोधिती ॥ २६ ॥ लोक वर्तती सकळ । ते ज्ञात्यांस करतळामळे । आतां ऐका केवळ । विवेकी हो ॥ २६ ॥ लोक कोण्या पंथें जाती । आणि कोण्या देवास भजती । ऐसी हे रोकडी[१०] प्रचीती । सावध ऐका ॥ २८ ॥ मृत्तिका धातु पाषाणादिक । ऐसीया प्रतिमा अनेक । बहुतेक लोकांचा दंडके[११] । प्रतिमा[१२] देवों ॥ २९ ॥ नाना देवांचे अवतार । चरित्रें ऐकती एक नर । जप ध्यान निरंतर । करिती पूजा ॥ ३० ॥ एक सकळांचा अंतरात्मा । विश्वीं वर्ते जो विश्वात्मा । द्रष्टा साक्षी ज्ञानात्मा । मानिती एक ॥ ३१ ॥ ते निर्मळ निश्चळ । कदापि नव्हेती चंचळ । अनन्यभावें केवळ । वस्तुच ते ॥ ३२ ॥ एक नाना प्रतिमा । दुसरा अवतारमहिमा । तिसरा तो अंतरात्मा । चौथा तो निर्विकारी[१३] ॥ ऐसे हे चार देव । सृष्टीमधील स्वभाव । यावेगळा अंतर्भावे[१४] । कोठेंचि नाहीं ॥ ३४ ॥ अवघे एकचि मानिती । ते साक्ष देव जाणती । परंतु अष्टधा प्रकृती[१५] । वोळखिली पाहिजे ॥ ३५ ॥ प्रकृतीमधील देव । तो प्रकृतीचा स्वभाव । भावातीत महानुभाव । विवेकें जाणावा ॥ ३६ ॥ जो निर्मळास ध्यायील । तो निर्मळचि होईल । जो जयास भजेल । तो तद्रूप जाणावा ॥ ३७ ॥ क्षीरें[१६] नीरें[१७] निवडिती । ते राजहंस बोलिजेती । सारासार जाणती । ते महानुभव ॥ ३८ ॥ अरे जो चंचळास भजेल । तो सहजचि चळेल । जो निश्चळास भजेल । तो निश्चळचि ॥ ३९ ॥ प्रकृतीसारिखें चालावें । परी अंतरीं शाश्वत वोळखावें । सत्य होऊन वर्तावें । लोकांऐसें ॥ ४० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे एकादशदशके चत्वारदेवनिरूपणं । नाम द्वितीयः समासः ॥ २ ॥

---

१ नास्तिकमते. २ दुर्दशा. ३ विलक्षण. ४ वरवर. ५ पुष्कळ. ६ बंड. ७ वासनेच्या. ❀ ज्यास शास्ता किंवा पुढारी नाहीं असें. ८ अधोगति. ९ हातांतील आवळ्याप्रमाणें, अगदीं स्पष्ट. १० तात्कालिक. ११ चाल, रीत. १२ मूर्ति. १३ विकाररहित. १४ कल्पना. १५ जिचे आठ प्रकार आहेत अशी माया. १६ कल्पनेच्या पलीकडे. १७ उत्तम अनुभव. १८ चिंतन करील. १९ दूध. २० पाणी.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ बहुतां जन्मांचा शेवट । नरदेह सांपडे अवचट । येथें वर्तावें चोखट[1] । नीतिन्यायें ॥ १ ॥ प्रपंच करावा नेमक । पाहावा परमार्थविवेक । जेणें करितां उभय लोकें[2] । संतुष्ट होती ॥ २ ॥ शत वरुषें वय नेमिलें । त्यांत बालत्व नेणतां गेलें । तारुण्य अवघें वेंचिलें । विषयांकडे ॥ ३ ॥ वृद्धपणीं नाना रोग । भोगणें लागे कर्मभोग । आतां भगवंताचा योग । कोणे वेळे ॥ ४ ॥ राजिकें[3] वैदिक उद्वेग चिंता । अन्नवस्त्र देहममता । नाना प्रसंगें अवचिंता[4] । जन्म गेला ॥ ५ ॥ लोक मरमरों जाती । वडिलें गेलीं हे प्रचीती[5] । जाणत जाणत निश्चितीं । काय मानिलें ॥ ६ ॥ अग्नि गृहासि लागला । आणि सावकाश निजेला । तो कैसा म्हणावा भला । आत्महत्यारा[6] ॥ ७ ॥ पुण्यमार्ग अवघा बुडाला । पापसंग्रह उदंड जाहला । यमयातनेचा ‡ झोला । कठिण आहे ॥ ८ ॥ तरी आतां ऐसें न करावें । बहुत विवेकें वर्तावें । इहलोक परत्र[7] साधावे । दोहींकडे ॥ ९ ॥ आळसाचें फळ रोकडें । जांभया देऊन निद्रा पडे । सुख म्हणोन आवडे । आळसी लोकां ॥ १० ॥ साक्षेपें[8] करितां कष्टती । परंतु पुढें सुरवाडती[9] । खाती जेवती सुखी होती । यत्नेंकरूनी ॥ ११ ॥ आळस ❀ उदास † नागवणा । आळस प्रयत्नबुडवणा । आळसें करंटपणाच्या खुणा । प्रकट होती ॥ १२ ॥ म्हणोन आळस नसावा । तरीच पाविजे वैभवा । अरत्रीं[10] परत्रीं जीवा । समाधान ॥ १३ ॥ प्रयत्न करावा तो कोण । हेंचि ऐका निरूपण । सावध करूनि अंतःकरण । निमीषें[11] एक ॥ १४ ॥ प्रातःकाळीं उठावें । कांहीं पाठांतर करावें । यथानुशक्ति आठवावें । सर्वोत्तमासी ॥ १५ ॥ मग दिशेकडे[12] जावें । * जें कोणासीच नव्हे ठावें । शौच आचमन करावें । निर्मळ जळें ॥ १६ ॥ ¶ मुखमार्जन प्रातःस्नान । संध्यातर्पण देवतार्चन । पुढें वैश्वदेव उपासन[13] । यथौसांग ॥ १७ ॥ कांहीं फळाहार घ्यावा । मग संसार धंदा करावा । * सुशब्दें राजी राखावा । सकळ लोक ॥ १८ ॥ ज्याचा जो व्यापार । तेथें असावें खबरदार । दुश्चितपणें तरी पोर । वेढा लावी[14] ॥ १९ ॥ चुके ठके विसरे सांडी । आठवण झालिया चरफडी । दुश्चित आळसाची रोकडी । प्रचीत पाहा ॥ २० ॥ याकारणें सावधान । एकाग्र असावें मन । तरी मग जेवितां भोजन । गोड वाटे ॥ २१ ॥ पुढें भोजन झालियावरी । कांहीं वाची चर्चा करी । एकांतीं जाऊन विवरी[15] । नाना ग्रंथ ॥ २२ ॥ तरीच प्राणी शाहाणा होतो । नाहीं तरी मूर्खांचि राहतो । लोक खाती आपण पाहतो । दैन्यवाणा ॥ २३ ॥ ऐका सदैवपणाचें लक्षण । रिकामा जाऊं नेदी एक क्षण । प्रपंचव्यवसायाचें ज्ञान । बरें पाहे ॥ २४ ॥ कांहीं मेळवी मग जेवी । गुंतलेया[16] लोकास उगवी । शरीर कारणीं लावी । कांहीं तरी ॥ २५ ॥ कांहीं धर्मचर्चा पुरा । हरिकथानिरूपण । वायां जाऊं नेदी

---

१ एकाएकीं. २ चांगल्या. ३ मनुष्यलोक व स्वर्गलोक. ४ राजविषयक. ५ संकटांना. ६ अनुभव. ७ आत्मघातकी. ‡ झोंका, तडाका. ८ परलोक. ९ उद्योग. १० सुख पावतात. ❀ हिताकडे दुर्लक्ष करविणारा. † नागवण करणारा. ११ इहलोकीं. १२ क्षणभर. १३ शौचविधीला, * गुप्त जागेंत. ¶ तोंड धुणें. १४ पूजन. १५ विधिपूर्वक. * गोड बोलून. १६ फसवील. १७ शोधून पाही, व्याख्या करी. १८ संकटांत सांपडलेल्या लोकांस सोडवितो.

क्षण । दोहींकडे ॥ २६ ॥ ऐसा जो सर्वसावध । त्यास कैंचा असेल खेद । विवेकें तुटला संबंध । देहबुद्धीचा ॥ २७ ॥ आहे तितुकें देवाचें । ऐसें वर्तणें निश्चयाचें । मूळ तुटे उद्वेगाचें । येणें रीतीं ॥ २८ ॥ प्रपंचीं पाहिजे सुवर्ण । परमार्थीं पंचीकरण । महावाक्याचें ❀ विवरण । करितां सुटे ॥ २९ ॥ कर्म उपासना आणि ज्ञान । येणें राहे समाधान । परमार्थाचें जें साधन । तेंचि ऐकत जावें ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे एकादशदशके शिक्षानिरूपणं नाम तृतीयः समासः ॥ ३ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ब्रह्म म्हणिजे निराकार । गगनासारिखा विचार । विकार नाहीं निर्विकार । तेंचि परब्रह्म ॥ १ ॥ ब्रह्म म्हणिजे निश्चळ । अंतरात्मा तो चंचळ । द्रष्टा साक्षी केवळ । बोलिजे तया ॥ २ ॥ तो अंतरात्मा म्हणिजे देव । त्याचा चंचळ स्वभाव । पाळितोहे सकळ जीव । अंतरीं वसोनी ॥ ३ ॥ त्यावेगळे जड पदार्थ । तेणेंविण देह व्यर्थ । तेणेंचि कळे परमार्थ । सकळ कांहीं ॥ ४ ॥ कर्ममार्ग उपासनामार्ग । ज्ञानमार्ग सिद्धांतमार्ग । प्रवृत्तिमार्ग निवृत्तिमार्ग । देवचि चालवी ॥ ५ ॥ चंचळेविण निश्चळ कळेना । चंचळ तरी स्थिरावेना । ऐसे हे विचार नाना । बरें पाहा ॥ ६ ॥ चंचळनिश्चळांचा संधि । तेथें भांबावते बुद्धि । कर्ममार्गांचा जो विधि । तो मग * ऐलीकडे ॥ ७ ॥ देव या सकळांचें मूळ । देवास मूळ ना डोहाळ । परब्रह्म तें निश्चळ । निर्विकारी ॥ ८ ॥ निर्विकारी आणि विकारी । एक म्हणेल तो भिकारी । विचाराची होते वोरी । देखत देखतां ॥ ९ ॥ सकळ परमार्थाचें मूळ । पंचीकरण महावाक्य केवळ । तें विवरावें प्रांजळ । पुनः पुन्हां ॥ १० ॥ पहिला देह स्थूळकाया । आठवा देह मूळमाया । ¶ अष्ट देह निरसलियां । विकार कैंचा ॥ ११ ॥ याकारणें विकारी । साचाऐशी बोजीगिरी । एक समजे एक खरी । मानिताहे ॥ १२ ॥ उत्पत्ति स्थिति संहार । यांवेगळा निर्विकार । कळायासाठीं सारासार । विचार केला ॥ १३ ॥ सार असार दोन्ही एक । तेथें कैचा उरला विवेक । परीक्षा नेणती रंक । पापी करंटे ॥ १४ ॥ जो एकचि विस्तारला । तो अंतरात्मा बोलिला । नाना विकारीं विकारला । निर्विकारी नव्हे ॥ १५ ॥ ऐसें प्रकटाचि आहे । आपुल्या प्रत्ययें पाहे । काय राहे काय न राहे । हेंहि कळेना ॥ १६ ॥ जें अखंड होत जातें । जें सर्वदां संहारतें । रोकडें प्रचीतीस येतें । जनामध्यें ॥ १७ ॥ एक रडे एक चरफडी । एकाची एक धरी नरडी । एकमेकां झोंबती बराँडी । दुर्कुळलें जैसें ॥ १८ ॥ नाहीं न्याय नाहीं नीति । ऐसे हे लोक वर्तती । आणि अवघेंच सार म्हणती । विवेकहीनें ॥ १९ ॥ धोंडे सांडून सोनें घ्यावें । माती सांडून अन्न खावें । आणि अवघेंच सार म्हणावें । बाष्कळपणें

---

१ प्रपंच व परमार्थ या दोहोंविषयीं. २ दुःखाचें. ३ धन, संपत्ती. ४ पांच भूतांपैकीं प्रत्येकांत इतर चार भूतांचा एकेक अंश व स्वतांचा अर्धा असे पांच मिळविणें म्हणजे पंचीकरण. ❀ स्पष्टीकरण, व्याख्यान. ५ भक्ति. ६ रक्षण करीत आहे. ७ गुरुप्रतितिमार्ग. ८ प्रपंचमार्ग. ९ विषयांपासून मन फिरविणें, मोक्षमार्ग. * अलीकडे. १० फांदी. ११ फेरी, शेवट. १२ स्पष्ट. ¶ व्यष्टी चार देह, व समष्टी चार देह. १३ मिथ्या असें कळलें असतां. १४ विकार पावणारा. १५ नजरबंदी. १६ अनुभवानें. १७ अधाशी. १८ दुष्काळांतील. १९ विचारशून्य. २० विचार न करतां बडबड करून.

॥ २० ॥ म्हणोन हा विचार करावा । सत्य मार्ग तोचि धरावा । लाभ जाणोन घ्यावा । विवेकाचा ॥ २१ ॥ सार * गार एकचि सेरी । तेथें परीक्षेस कैंची उरी । याकारणें चतुरीं । परीक्षा करावी ॥ २१ ॥ जेथें परीक्षेचा अभावें । तेथें दे घाव घे घाव । संगट सारिखा स्वभाव । लौंदपणाचा ॥ २३ ॥ घेऊं ये तेंचि घ्यावें । घेऊं नये तें सांडावें । उंच नीच ओळखावें । या नांव ज्ञान ॥ २४ ॥ संसार सोंतेसि आलें । एक लाभें अंभर झालें । एक ते कैंरंटे ठकलें । मुद्दल गेलें ॥ २५ ॥ जाणत्यानें ऐसें न करावें । सार तेंचि शोधून घ्यावें । असार तें जाणोन त्यागावें । वमन जैसें ॥ २६ ॥ तें वमन करी प्राशन । तरी तें श्वानाचें लक्षण । तेथें शुचिर्भूत ब्राह्मण । काय करी ॥ २७ ॥ जिहीं जैसें संचितें केलें । तयास तैसेंच घडलें । जे अभ्यासीं पडोन जडलें । तें तों सुटेना ॥ २८ ॥ एक दिव्यान्नें भक्षिती । एक विष्ठा भांडितो । आपल्या वडिलांचा धेती । साभिमान ॥ २९ ॥ असो विवेकेविण । बोलणें निरुका शीण । कोणी एकें श्रवण मनन । केलेंचि करावें ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे एकादशदशके विवेकनिरूपणं नाम चतुर्थः समासः ॥ ४ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ कर्म केलेंचि करावें । ध्यान धरिलेंचि धरावें । विवरलेंचि विवरावें । पुनः निरूपण ॥ १ ॥ तैसें आम्हांस घडलें । बोलिलेंचि बोलणें पडलें । कां जें बिघडलेंचि घडलें । पाहिजे समाधान ॥ २ ॥ अनन्य राहे ❀ समुदाव । इतर जनास उमजे भाव । ऐसा आहे अभिप्राव । उपायाचा ॥ ३ ॥ ऐकें हरिकथानिरूपण । दुसरें तें राजकारण । तिसरें तें सावधपण । सर्व विषयीं ॥ ४ ॥ चौथा अत्यंत सांक्षेप । फेडावे नाना आक्षेप । अन्याय थोर अथवा अल्प । क्षमा करीत जावे ॥ ५ ॥ जाणावें पेरांचें अंतर । उदासीनता निरंतर । नीति न्यायास अंतर । पडोंच न द्यावें ॥ ६ ॥ संकेतें लोक वेधावा । एकोनेकें बोधावा । प्रपंचहि सांवरावा । यथानुशक्त्या ॥ ७ ॥ प्रसंग समय वोळखावा । धीर बहुत असावा । संबंध पडों न द्यावा । अति परिचयाचा ॥ ८ ॥ उपाधीस निस्तारावें । उपाधींत न सांपडावें । नीचत्व पाहिलेंच घ्यावें । आणि मूर्खपण ॥ ९ ॥ दोष देखोन झांकावे । अवगुण अखंड न बोलावे । दुर्जन सांपडोन सोडावें । परोपकार करूनी ॥ १० ॥ तऱ्हे भरोंच नय । सुचावे नाना उपाय । नव्हे तेंचि करावें कार्य । दीर्घ प्रयत्नें ॥ ११ ॥ फंडे नासोंच न द्यावा । पडिला प्रसंग सांवरावा । अतिवाद न करावा । कोणी एकासी ॥ १२ ॥ दुसऱ्याचें अभीष्ट जाणावें । बहुतांचें बहुत सोसावें । न सोसे तरी जावें । दिगंतरासी ॥ १३ ॥ दुःख दुसऱ्याचें जाणावें । ऐकोन

---

* असार. १ योग्यता. २ नसणें. ३ सरमकट. ४ नीचटपणाचा. ५ बाजाराला. ६ वैभवानें युक्त. ८ दुर्दैवी, दीन. ८ आंक. ९ पवित्र. १० पूर्व जन्मार्जित पापपुण्यात्मक कर्म. ११ श्रीमंती अन्न. १२ भरतात. ❀ समाज. १३ प्रथम, मुख्य. १४ व्यवसाय, उद्योग. १५ शंका. १६ दुसऱ्याचें. १७ अंतःकरण, हेतु. १८ योजनेनें. १९ सर्व. २० लचांड, अडथळ्याला. २१ नाहींसें करावें. २२ नम्रता, हार. २३ दुर्गुण. २४ नादीं लागूं नये. २५ मंडळीची, एकी, जूट. २६ कल्याण. २७ दुसऱ्या दिशेला, दुसऱ्या देशाला.

तरी वांटोन घ्यावें । बरें वाईट सोसावें । ❀ समुदायाचें ॥ १४ ॥ अपार असावें पाठांतर । सन्निध असावा विचार । सर्वदा सर्व तत्पर । परोपकारासी ॥ १५ ॥ शांति करून करवावी । * तऱ्हे सांडून सांडवावी । क्रिया करून करवावी । बहुतांकरवी ॥ १६ ॥ करणें असला अपाय । तरी बोलोन दाखऊं नय । परस्परेंचि प्रत्यय । प्रचीतीस आणावा ॥ १७ ॥ जो बहुतांचें सोसीना । त्यास बहुत लोक मिळेना । बहुत सोसितां उरेना । महत्त्व आपुलें ॥ १८ ॥ राजकारण बहुत करावें । परंतु कळोंच न द्यावें । परपीडेवरी नसावें । अंतःकरण ॥ १९ ॥ लोक पारखून सोडावे । राजकारणें अभिमान झाडावे । पुनः मेळवूनि घ्यावे । दुरील दोरें ॥ २० ॥ हिरवटासि दूरी धरावें । कचरटासि न बोलावें । संबंध पडतां सोडूनि जावें । एकीकडे ॥ २१ ॥ ऐसें असे राजकारण । सांगतां तें असाधारण । सुचित असतां अंतःकरण । राजकारण जाणिजे ॥ २२ ॥ वृक्षारूढासें उचलावें । युद्धकर्त्यास ढकलून द्यावें । कारभाराचें सांगावें । अंग कैसें ॥ २३ ॥ पाहतां तरी सांपडेना । कीर्ति करूं तरी राहेना । आलें वैभव अभिलाषिना । कांहीं केल्या ॥ २४ ॥ एकाची पाठी राखणें । एकास देखों न शकणें । ऐसी नव्हेत कीं लक्षणें । चातुर्याचीं ॥ २५ ॥ न्याय बोलतांहि मानेना । हित तेंचि नये मना । येथें कांहींच चालेना । त्यागाविणें ॥ २६ ॥ श्रोतीं कळोन आक्षेपिलें । म्हणोनि बोलिलेंचि बोलिलें । न्यूनपूर्ण क्षमा केलें । पाहिजे श्रोतीं ॥ २७ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे एकादशदकके राजकारणनिरूपणं नाम पंचमः समासः ॥ ५ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ नेटकें ल्याहावें । लिहोन शुद्ध शोधावें । शोधून शुद्ध वाचावें । चुकों नये ॥ १ ॥ विस्कळित मातृकों नेमस्त कराव्या । † धाट्या जाणोनि सदृढ धराव्या । रंग राखोन भराव्या । नाना कथा ॥ २ ॥ जाणायाचें सांगतां नये । सांगायाचें नेमस्त नये । समजल्याविण कांहींच नये । कोणी एक ॥ ३ ॥ हरिकथा निरूपण । नेमस्तपणें राजकारण । वर्तायाचें लक्षण । तेंहि असावें ॥ ४ ॥ पुसों जाणे सांगों जाणे । अर्थांतर करूं जाणे । सकळिकांचें राखों जाणे । समाधान ॥ ५ ॥ दीर्घसूचना आधींच कळे । सावधपणें तर्क प्रबळे । जाण जाणोनि निवळे । यथायोग्य ॥ ६ ॥ ऐसा जाणे जो समस्त । तोचि महंत बुद्धिवंत । यावेगळे अंतवंत । सकळ कांहीं ॥ ७ ॥ ताल वेळ तानमानें । प्रबंध कविता जोडेवचनें । मेळाळसी नाना चिन्हें । सुचती जया ॥ ८ ॥ जो एकांतास तत्पर । आधीं करी पाठांतर । अथवा शोधी अर्थांतर । ग्रंथगभींचें ॥ ९ ॥ आधींच शिकोन जो शिकवी । तोचि पावे श्रेष्ठ पदवी । गुंतल्या लोकांस उगवी । विवेकबळें ॥ १० ॥ अक्षर सुंदर वाचणें सुंदर । बोलणें सुंदर चालणें सुंदर । भक्ति ज्ञान वैराग्य सुंदर । करूनि दावी ॥ ११ ॥ जयास प्रयत्नचि आवडे । नाना

❀ लोकांचें. * एककलीपणा, नाद. १ अविचाऱ्याला. २ नीच मनुष्याशी. ३ महत्त्वाचें. ४ स्वस्थ, शांत. ५ भीतीनें झाडावर चढलेल्याला. ६ इच्छित नाहीं. ७ टाकल्यावांचून. ८ नीट, चांगलें. ९ अक्षरें. † प्रकार, वळणें. १० निरीनरोळ अर्थ. ११ पुढील होणाऱ्या गोष्टी. १२ थोर. १३ नाश पावणारें. १४ ग्रंथरचना. १५ मोठमोठीं वचनें. १६ राजसभेचीं. १७ सोडवी, समजवी.

प्रसंगीं पवाडे । धीटपणें प्रकटे, दडे-। ऐसा नव्हे ॥ १२ ॥ सांकडीमध्यें वर्तों जाणे । उपाधीमध्यें मिळों जाणे । अलिप्तपणें राखों जाणे । आपणासी ॥ १३ ॥ आहे तरी सर्वांठायीं । पाहों जातां कोठेंचि नाहीं । जैसा अंतरात्मा ठायींचा ठायीं । गुप्त जाहला ॥ १४ ॥ त्यावेगळें कांहींच नसे । पाहों जातां तो न दिसे । न दिसोन वर्तवीतसे । प्राणीमात्रांसी ॥ १५ ॥ तैसाचि हाहि नानापरी । बहुत जनांसि शाहणें करी । नाना विद्या त्या विवेरी ॥ स्थूळ सूक्ष्मा ॥ १६ ॥ आपणाकरितां शाहाणे होती । ते सहजचि सोयें धरिती । जाणतेपणासी महती । ऐसी असे ॥ १७ ॥ राखों जाणे नीति न्याय । न करी न करवी अन्याय । कठिण प्रसंगीं उपाय । करूं जाणे ॥ १८ ॥ ऐसा पुरुष धीरणेचा । तोचि आधार बहुतांचा । दास म्हणे रघुनाथाचा । गुण घ्यावा ॥ १९ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे एकादशदशके महंतलक्षणनिरूपणं नाम षष्ठः समासः ॥ ६ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ❀ चंचळ नदी गुप्त गंगा । स्मरणें पावन करी जगा । प्रचीत रोकडी पहा गा । अन्यथा नव्हे ॥ १ ॥ केवळ अचंचळी निर्माण झाली । * अधोमुखें बळें चालिली । अखंड वाहे परी देखिली । नाहींच कोणी ॥ २ ॥ वळणें वांकाणें भोंवरे । उसळया तरंगे झरे । लोंढा लाटा कातरे । ठायीं ठायीं ॥ ३ ॥ शुष्क जळाचें चेळाळ । धारा धबाबे खळाळ । चिपळ्या चेळक्या भेळाळ । चपळ पाणी ॥ ४ ॥ फेन फुगे हेलावे । सैरावैरा उदक धांवे । थेंब फुई मोजावे । अणुरेणु किती ॥ ५ ॥ वोसाणे वाहती उदंड । झोतावे दुर्कुटे दगड । खडकें बेटें आड । वळसा उठे ॥६॥ मृदु भूमि तुटोन गेल्या । कठिण तैशाच राहिल्या । ठायीं ठायीं उदंड पाहिल्या । सृष्टीमध्यें ॥ ७ ॥ एक ते वाहतचि गेले । एक ते वळशामध्यें पडिले । एक सांकडींत अडकले । अधोमुखें ॥ ८ ॥ एक आपट आपटोच गेलीं । एक चिर्डचिर्डोच मेलीं । कितीएक तीं फुगलीं । पाणी भरलें ॥ ९ ॥ एक बळाचे निवडिले । ते पोहतचि उगमासि गेले । उगमदर्शनें पवित्र झाले । तीर्थरूपें ॥ १० ॥ तेथें ब्रह्मादिकांचीं भुवनें । ब्रह्मांडदेवतांचीं स्थानें । उफराटी गंगा पाहतां मिळणें । सकळांस तेथें ॥ ११ ॥ त्या जळाऐसें नाहीं निर्मळ । त्या जळाऐसें नाहीं चंचळ । आपोनारायण केवळ । बोलिजे त्यासी ॥ १२ ॥ महानदीपरी अंतरोळीं । प्रत्यक्ष वाहे सर्वकाळीं । स्वर्गमृत्युपाताळीं । पसरली पाहा ॥ १३ ॥ अधोर्ध्व अष्टहि दिशा । तिचें उदक करी वळसा । जाणते जाणती जगदीशा । सारिखीचि ते ॥ १४ ॥ अनंतपात्रीं उदक भरिलें । कोठें पाझपाझरोनि गेलें ।

---

१ शिरतो. २ अडचणीच्या वेळीं. ३ अनेकसंबंधामध्यें. ४ वेगळेपणानें. ५ विवेचन करतो. ६ आपोआप, स्वप्रयत्नानें. ७ नीट मार्गाला लागतात. ८ मोठेपणा. ९ दृढनिश्चयी. ❀ येथें चंचळनदीच्यारूपानें मायेचें वर्णन केलें आहे. १० पवित्र. * खालीं तोंड करून. ११ वांक. १२ वरखालीं होणें. १३ लाट. १४ आपटणें, चिखल. १५ तिरकस दोन ओघांचे मेळ. १६ चळचळ. १७ धबधबे. १८ पाणी उडणें. १९ पाण्याची चिळकांडी, भळभळ. २० फेंस. २१ बुडबुडे. २२ तुषार. २३ पुरांमधील केरकचरा. २४ बहुत. २५ वाहून आलेलीं लांकडे. २६ भोंवरा. २७ संकटांत. २८ प्रसिद्ध, गणलेले २९ पवित्र. ३० उदकरूपी नारायण. ३१ आकाशांत. ३२ खालीं व वर.

कितीएक तें वेंचलें । संसारासी ॥ १५ ॥ एक्यासंगें तें कडवट । एक्यासंगें तें गुळचट । एक्यासंगें तें तिखट । तुरट क्षार ॥ १६ ॥ ज्या ज्या पदार्थास मिळे । तेथें तद्रूपाचि मिसळे । सखोल भूमीस तुंबळे[1] । सखोलपणें ॥ १७ ॥ विषामध्यें विषचि होतें । अमृतामध्यें मिळोन जातें । सुगंधीं सुगंध तें । दुर्गंधीं दुर्गंध ॥ १८ ॥ गुणीं अवगुणीं मिळे । ज्याचें त्यापरी निवळे । त्या उदकाचा महिमा न कळे । उदकेविण ॥ १९ ॥ उदक वाहे अपरंपार । न कळे नदी कीं सरोवर । जळवास करून नर । राहिले कितीएक ॥ २० ॥ उगमापैलीकडे गेले । तेथें परतोन पाहिलें । तंव तें पाणीच आटलें । कांहींच नाहीं ॥ २१ ॥ वृत्तिशून्य[2] योगीश्वर । याचा पाहावा विचार । दास म्हणे वारंवार । किती सांगों ॥ २२ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे एकादशदशके चंचलनदीनिरूपणं नाम सप्तमः समासः ॥ ७ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ आधीं वंदूं सकळकर्ता । समस्त देवांचा जो भर्ता । त्याचे भजनीं प्रवर्ता । कोणी तरी ॥ १ ॥ तेणेंविण कार्य न चले । पडिलें पर्ण[3] तेंहि न हाले । अवघें त्रैलोक्याचि चाले । जयाचेनि ॥ २ ॥ तो अंतरात्मा सकळांचा । देवदानवमानवांचा । चारखाणीचारवाणींचा । प्रवर्तक ॥ ३ ॥ तो एकलाचि सकळां घटीं[4] । करी भिन्नभिन्न राहाटी । सकळ सृष्टीची गोष्टी । किती म्हणोन सांगावी ॥ ४ ॥ ऐसा जो गुप्तेश्वर । त्यास म्हणावें ईश्वर । सकळ ऐश्वर्य थोर थोर । जयाचेनि भोगिती ॥ ५ ॥ ऐसा जेणें वोळखिला । तो विश्वंभराचि झाला । समाधि आणि सहजस्थितीला । कोण पुसे ॥ ६ ॥ अवघें त्रैलोक्य विवरावें । तेव्हां वर्म[5] पडे ठावें । अवचटें घबाड[6] सिणावें[7] । नलगेचि कांहीं ॥ ७ ॥ पाहतां ऐसा कोण आहे । तो अंतरात्मा विवरोन पाहे । अल्प स्वल्प कळोन राहे । समाधानें ॥ ८ ॥ अरे हें पाहिलेंचि पाहावें । विवरलेंचि मागुतें विवरावें[8] । वाचिलेंचि वाचावें । पुनः पुन्हां ॥ ९ ॥ अंतरात्मा केवढा कैसा । पाहाणाराची कोण दशा । देखिल्या ऐकिल्या ऐसा । विवेक सांगे ॥ १० ॥ उदंड देखिलें ऐकिलें । अंतरात्म्यास नवचे पुरवलें । प्राणी देहधारी बाहुलें । काय जाणे ॥ ११ ॥ पूर्णास अपूर्ण पुरवेना । कां जें अखंड विवरेना । विवरतां विवरतां उरेना । देवावेगळा ॥ १२ ॥ विभक्तपणें[9] नसावें । तरीच भक्त म्हणवावें । नाहीं तरी व्यर्थचि शिणावें । खटाटोपें ॥ १३ ॥ उगाच घर पाहोन गेला । घरधनी नाहीं वोळखिला । राज्यामधूनचि आला । परी राजा नेणे ॥ १४ ॥ देहसंगें[10] विषय भोगिलें । देहसंगें[11] प्राणी मिरवले । देहधर्त्यास चुकले । नवल मोठें ॥ १५ ॥ ऐसे लोक अविवेकी । आणि म्हणती आम्ही विवेकी । बरें ज्याची जैसी[12] टांकी । तैसें करावें ॥ १६ ॥ मूर्ख अंतर राखों नेणें । म्हणोन असावें शाहणे । ते शाहणेहि दैन्यवाणे । होऊन गेले ॥ १७ ॥ अंतरीं ठेवणें

---

१ तुंबून राहतें. २ मनोधर्मरहित. ३ पोषण करणारा. ४ लागा. ५ पडलेलें पान. ६ राक्षस. ७ देहांमध्यें. ८ वर्तन, वागणें. ९ जगताचा पोषक. १० चित्तैकाग्रतेनें देहतादात्म्य सुटणें. ११ ब्रह्माशीं ऐक्यतेला. १२ धुंडावें. १३ खूण. १४ अकल्पित. १५ बहुत. १६ कष्ट, त्रास पावावा. १७ स्पष्ट करावें. व्याख्यान करावें. १८ वेगळेपणानें. १९ देहाभिमानानें. २० रीति, सामर्थ्य.

चुकलें । दारोदारीं धुंडूं लागले । तैसें अज्ञानासि झालें । देव न कळे ॥ १८ ॥ या देवांचें ध्यान करी । ऐसा कोण सृष्टीवरी । वृत्ति एकदेशी § तरतरी । पवाडेल कोठें ॥ १९ ॥ ब्रह्मांडों दाटले प्राणी । बहुरूपें बहुवाणी । भूगर्भीं आणि पाषाणीं । कितीएक ॥ २० ॥ इतुक्या ठायीं पुरवला । अनेकीं एकच वर्तला । गुप्त आणि प्रकटला । कितीएक ॥ २१ ॥ चंचळें न होइजे निश्चळ । प्रचीत जाणावी केवळ । चंचळ तें नव्हे निश्चळ । परब्रह्म तें ॥ २२ ॥ तत्त्वें तत्त्व जेव्हां उडे । तेव्हां देहबुद्धि झडे । निर्मळ निश्चळ चहूंकडे । निरंजन ॥ २३ ॥ आपण कोण कोठें कैंचा । ऐसा मार्ग विवेकाचा । प्राणी जो स्वयें काँचा । त्यास हें कळेना ॥ २४ ॥ भल्यानें विवेक धरावा । दुस्तर संसार तरावा । अवघा वंश उद्धरावा । हरिभक्ति करूनी ॥ २५ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे एकादशदशके अंतरात्माविवरणनिरूपणं नामं अष्टमः समासः ॥ ८ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ आधीं कर्माचा प्रसंग । कर्म केलें पाहिजे सांग । कदाचित् पडिलें भ्यंग । तरी प्रत्यवाय घडे ॥ १ ॥ म्हणोन कर्म आरंभिलें । कांहीं एक सांग घडलें । जेथें जेथें अंतर पडिलें । तेथें हरिस्मरण करावें ॥ २ ॥ तरी तो हरि आहे कैसा । विचार पाहावा ऐसा । संध्येंपूर्वी जगदीशा । चौवीसा नामीं स्मरावें ॥ ३ ॥ चौवीस नामीं सहस्र नामीं । अनंतनामीं तो अनामी । तो कैसा आहे अंतर्यामी । विवेकें वोळखावा ॥ ४ ॥ ब्राह्मण स्नानसंध्या करून आला । मग तो देवार्चनासि बैसला । यथासांग तो पूजिला । प्रतिमादेवें ॥ ५ ॥ नाना देवांच्या नाना प्रतिमा । लोक पूजिती धरूनि प्रेमा । ज्याच्या प्रतिमा तो परमात्मा । कैसा आहे ॥ ६ ॥ ऐसें वोळखिलें पाहिजे । वोळखोन भजन कीजे । जैसा साहेब नमस्कारीजे । वोळखिल्या उपरी ॥ ७ ॥ तैसा परमात्मा परमेश्वर । बरा वोळखावा पाहोन विचार । तरीच पाविजे पार । भवसागराचा ॥ ८ ॥ पूजा घेताती प्रतिमा । अंगां येतो अंतरात्मा । अवतारी तरी निजधामा । येऊनि गेले ॥ ९ ॥ परी ते निजरूपें असती । तें निजरूप तें जगज्ज्योती । सत्त्वगुण तयेस म्हणती । जाणती कळा ॥ १० ॥ तये कळेचे पोटीं । देव असती कोट्यानुकोटी । या नांव अनुभवाच्या गोष्टी । प्रत्ययें पहाव्या ॥ ११ ॥ देहपुरामध्यें ईश । म्हणोन तया नांव पुरुष । जगामध्यें जगदीश । तैसा वोळखावा ॥ १२ ॥ जाणीवरूपें जगदंतरें । प्रस्तुत वर्तती शरीरें । अंतःकरणविष्णु येणेंप्रकारें । वोळखावा ॥ १३ ॥ तो विष्णु आहे जगदंतरीं । तोचि आपुले अंतरीं । कर्ता भोक्ता चतुरीं । अंतरात्मा वोळखावा ॥ १४ ॥ ऐके देखे हुंगे चाखे । जाणोनि विचारें वोळखे । कितीएक आपुले पारखे । जाणताहे ॥ १५ ॥ एकचि जगाचा जिव्हाळा । परी देहलोभाचा अडथळा । देहसंबंधें वेगळा । अभिमान धरी ॥ १६ ॥ उपजे वाढे मरे मारी । जैशा उसळती लहरि-

§ ताजी, चपल. १ शिरेल, विस्तारेल. २ जर्मनीचे पोटांत. ३ मायारहित ब्रह्म. ४ कच्चा. ५ संपूर्ण. ६ न्यून. ७ दोष. ८ नामरहित. ९ हृदयामध्यें असणारा. १० देवपूजेला. ११ मूर्तिरूप देव. १२ संसारसमुद्राचा. १३ आपल्या घराला. १४ जगताला चेतना देणारे. १५ देहरूपी नगरामध्यें. १६ ज्ञानरूपें. १७ परके.

यांवरी लहरी । चंचळ सागरीं भरोवरी । त्रैलोक्य होत जाते ॥ १७ ॥ त्रैलोक्य वर्तवितो एक । म्हणोनि त्रैलोक्यनायक । ऐसा प्रत्ययाचा विवेक । पाहा ना कैसा ॥ १८ ॥ ऐसा अंतरात्मा बोलिला । परी तोहि तत्त्वांमध्यें आला । पुढें विचार पाहिजे केला । महावाक्याचा ॥ १९ ॥ आधीं देखिला देहधारी । मग पाहावें जगदंतरीं । तयाचेनि या उपरी । परब्रह्म पावावें ॥ २० ॥ परब्रह्माचा विचार । होतां निवडे सारासार । चंचळ जाईल हा निर्धार । चुकेना कीं ॥ २१ ॥ उत्पत्ति स्थिति संहार जाण । त्याहून वेगळा निरंजन । येथें ज्ञानाचें विज्ञान । होत आहे ॥ २२ ॥ अष्ट देह स्थान मान । जाणोन झालिया निरसन । पुढें उरे निरंजन । विमळ ब्रह्म ॥ २३ ॥ विचारेंचि अनन्य झाला । पाहणाराविण प्रत्यय आला । तेहि वृत्ति निवृत्तीला । बरें पाहा ॥ २४ ॥ येथें राहिला वाच्यांश । पाहोन सांडिला लक्ष्यांश । लक्ष्यांशासारिखा वृत्तिलेश । तोहि गेला ॥ २५ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे एकादशदशके उपदेशनिरूपणं नाम नवमः समासः ॥ ९ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ मूर्ख एकदेशी होतो । चतुर सर्वत्र पाहतो । जैसा बहुधा होऊनि भोगितो । नाना सुखें ॥ १ ॥ तोचि अंतरात्मा महंत । तो कां होईल संकोचित । प्रशस्त जाणता समस्त । विख्यात योगी ॥ २ ॥ कर्ता भोक्ता तत्त्वता । भूमंडळीं सर्व सत्ता । त्या वेगळा त्यास ज्ञाता । पाहेसा कवण ॥ ३ ॥ ऐसें महंतें असावें । सर्व सार शोधूनि घ्यावें । पाहों जातां न सांपडावें । एकाएकीं ॥ ४ ॥ कीर्तिरूपें उदंड ख्यात । जाणती लहान थोर समस्त । वेष पाहतां शाश्वत । एकहि नाहीं ॥ ५ ॥ प्रकट कीर्ति ते ढळेना । बहुत जनांस कळेना । पाहों जातां आढळेना । काय कैसें ॥ ६ ॥ वेषभूषण तें दूषण । कीर्तिभूषण तें भूषण † चाळणेविण एक क्षण । जांऊंच नेदी ॥ ७ ॥ त्यागी ओळखीचे जन । सर्वकाळ नित्य नूतन । लोक शोधून पाहती मन । परी इच्छा दिसेना ॥ ८ ॥ पुर्ते कोणाकडे पाहेना । पुर्ते कोणासी बोलेना । पुर्ते एके स्थळीं राहेना । उठोन जातो ॥ ९ ॥ * जाते स्थळ तें सांगेना । सांगितलें तरी तेथें जाईना । आपली स्थिति अनुमाना । येऊंच नेदी ॥ १० ॥ लोकीं केलें तें चुकवी । लोकीं भाविलें तें उलथवी । लोकीं तर्किलें तें दावी । निष्फळ करूनी ॥ ११ ॥ लोकांस पाह्याचा आदर । तेथें याचा अनादर । लोक सर्वकाळ तत्पर । तेथें याची अनिच्छा ॥ १२ ॥ एवं कल्पितां कल्पेना । ❀ ना तर्कितांहि तर्केना । कदापि भावितां भावेना । योगेश्वर ॥ १३ ॥ ऐसें अंतर सांपडेना । शरीर ठायीं पडेना । क्षण एक विसंबेना । कथाकीर्तन ॥ १४ ॥ लोक संकल्प विकल्प करिती । ते अवघेच निष्फळ होती । जनाची

---

१ लाटांवर लाटा. २ मायासमुद्रामध्यें. ३ पुष्कळ. ४ मायारहित ब्रह्म ५ अनुभवयुक्त ज्ञान. ६ पिंडींचे चार व ब्रह्मांडींचे चार. ७ मिथ्यात्वाचें ज्ञान. ८ शुद्ध. ९ कल्पनारहितपणाला. १० बोलण्याचा भाग. ११ वाच्यांश टाकून अवशिष्ट ब्रह्मप्रत्यगात्मा. १२ एकाच बाजूनें विचार करणारा. १३ खरोखर. १४ कीर्तिरूप अलंकार. † चालनाशिवाय, स्वरूपानुसंधानावांचून. * ज्या स्थळाला जावयाचें तें स्थळ. १५ तर्काला. ❀ अथवा १६ कंटाळा. १७ चुकवीना, टाळीना.

जनां लाजवी वृत्ती । तेव्हां योगेश्वर ॥ १५ ॥ बहुतीं शोधून पाहिलें । बहुतांच्या मनास आलें । तरी मग जाणावें साधिलें । महत्कृत्य ॥ १६ ॥ अखंड एकांत सेवावा । अभ्यासचि करित जावा । काळ सार्थकाचि करावा । जनांसहित ॥ १७ ॥ उत्तम गुण तितुके घ्यावे । घेऊन जनांस शिकवावे । उदंड समुदाय करावें । परी गुप्तरूपें ॥ १८ ॥ अखंड कामाची लगबग । उपासनेस लावावे जग । लोक समजोन मग । आज्ञा इच्छिती ॥ १९ ॥ आधीं कष्ट मग फळ । कष्टाचि नाहीं तें निष्फळ । साक्षेपेविण केवळ । वृथा पुष्ट ॥ २० ॥ लोक बहुत शोधावे । त्यांचे अधिकार जाणावे । जाणजाणोनि धरावे । जवळीं दुरीं ॥ २१ ॥ अधिकारपरत्वें कार्य होतें । अधिकार नसतां व्यर्थ जातें । जाणोन शोधावीं चित्तें । नानाप्रकारें ॥ २२ ॥ अधिकार पाहोन कार्य सांगणें । साक्षेपें पाहोन विश्वास धरणें । आपला मगजे राखणें । कांहीं तरी ॥ २३ ॥ हें प्रचीतीनें बोलिलें । आधीं केलें मग सांगितलें । मानेल तरी पाहिजे घेतलें । कोणीएकें ॥ २४ ॥ महंतें महंत करावे । युक्तिबुद्धीनें भरावे । जाणते करून विखरावें । नाना देशीं ॥ २५ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे एकादशदशके निःस्पृहवर्तननिरूपणं नाम दशमः समासः ॥ १० ॥

दशक बारावा. (विवेकवैराग्यदशक)

श्रीगणेशायनमः ॥ ॥ आधीं प्रपंच करावा नेटका । मग घ्यावें परमार्थविवेका । येथें आळस करूं नका । विवेकी हो ॥ १ ॥ प्रपंच सांडून परमार्थ कराल । तेणें तुम्ही कष्टी व्हाल । प्रपंचपरमार्थ चालवाल । तरी तुम्ही विवेकी ॥ २ ॥ प्रपंच सांडून परमार्थ केला । तरी अन्न मिळेना खावयाला । मग तया करंट्याला । परमार्थ कैंचा ॥ ३ ॥ परमार्थ सांडूनि प्रपंच करिसी । तरी तूं यमयातना भोगिसी । अंतीं परम कष्टी होसी । यमयातना भोगितां ॥ ४ ॥ साहेब कामास नाहीं गेला । गृहींच सुरवडोन बैसला । तरी साहेब कुटिल तयाला । पाहती लोक ॥ ५ ॥ तेव्हां महत्त्वाचि गेलें । दुर्जनाचें हांसें झालें । दुःख उदंड भोगिलें । आपुल्या जीवें ॥ ६ ॥ तैसेचि होणार अंतीं । म्हणोनि भजावें भगवंतीं । परमार्थाची प्रचीती । रोकडी घ्यावी ॥ ७ ॥ संसारीं असतां मुक्त । तोचि जाणावा संयुक्त । अखंड पाहे युक्तायुक्त । विचारणा हे ८ ॥ प्रपंचीं जो सावधान । तो परमार्थ करील जाण । प्रपंचीं जो अप्रमाण । तो परमार्थीं खोटा ॥ ९ ॥ म्हणोन सावधानपणें । प्रपंच परमार्थ चालवणें । ऐसें न करितां भोगणें । नाना दुःखें ॥ १० ॥ पर्णोळी पाहोन उचले । जीवसृष्टि विवेकें चाले । आणि पुरुष होऊन भ्रमले ।

---

१ खंड न पडतां, नेहमीं, २ उद्योगाशिवाय. ३ अधिकारासारखें. ४ उद्योग, व्यवसाय. ५ मेंदु, बुद्धि. ६ पाठवावें, पसरावें. ७ सुखांत निमग्न होऊन. ८ तात्काल, ९ योग्य प्रकारानें आत्म्याशीं युक्त. १० खोटा. ११ झाडाच्या पानावरील कीड दुसऱ्या पानाचा आधार मिळाल्यावर मागील पानावरून पाय सोडते. व्रजंस्तिष्ठन् पदैकेन यथैवैकेन गच्छति । यथा तृणजलूकैवं देही कर्मगतिं गतः ॥ श्री. भागवत १० पू–१–४० १२ याप्रमाणें सृष्टींतील जीव विचारानें चालतात.

यासि काय म्हणावें ॥ ११ ॥ म्हणोन असावी दीर्घसूचना । अखंड करावी चालना । पुढील होणार अनुमाना-। आणून सोडावें ॥ १२ ॥ सुखी असतो खबरदार । दुःखी होतो बेखबर । ऐसा हा लौकिक विचार । दिसतचि आहे ॥ १३ ॥ म्हणोन सर्वसावधान । धन्य तयाचें महिमान । जनीं राखे समाधान । तोचि एक ॥ १४ ॥ चाळणेचा आळस केला । तरी अवचितां पडेल घाला । ते वेळे सांवरायाला । अवकाश कैंचा ॥ १५ ॥ म्हणोन दीर्घसूचनेचे लोक । त्यांचा पाहावा विवेक । लोकांकरितां लोक । शाहणे होती ॥ १६ ॥ परी ते शाहणे वोळखावे । गुणवंताचे गुण घ्यावे । अवगुण देखोन सांडावे । जनांमध्यें ॥ १७ ॥ मनुष्य पारखूं राहेना । आणि कोणाचें मन तोडीना । मनुष्यमात्र अनुमाना । आणून पाहे ॥ १८ ॥ दिसे सकळांसि सारिखा । पाहता विवेकी नेटका । कोमी निकोमी लोकां । बरें पाहे ॥ १९ ॥ जाणोन पाहिजेत सर्व । हेंचि तयाचें अपूर्व । ज्यांचें त्यापरी गौरव । राखों जाणे ॥ २० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे द्वादशदशके विमललक्षणनिरूपणं नाम प्रथमः समासः ॥ १ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ऐका संसारासि आले हो । स्त्री पुरुष निःस्पृह हो । सुचितपणें पाहो । अर्थांतर ॥ १ ॥ काय म्हणते वासना । काय कल्पिते कल्पना । अंतरींचे तरंग नाना । प्रकारें उठती ॥ २ ॥ बरें खावें बरें जेवावें । बरें ल्यावें बरें नेसावें । मनासारिखेंच असावें । सकळ कांहीं ॥ ३ ॥ ऐसें आहे मनोगत । तरी तें कांहींच न होत । बरें करितां अकस्मात । वाईट होतें ॥ ४ ॥ एक सुखी एक दुःखी । प्रत्यक्ष वर्तते लोकीं । कष्टी होऊनियां सेखीं । प्रारब्धावरि घालिती ॥ ५ ॥ अचूक यत्न करवेना । म्हणोन केलें तें समजेना । आपुला अवगुण जाणवेना । कांहीं केल्या ॥ ६ ॥ जो आपुला आपण नेणे । तो दुसऱ्याचें काय जाणे । न्याय सोडितां दैन्यवाणे । होती लोक ॥ ७ ॥ लोकांचें मनोगत कळेना । लोकांसारिखें वर्तवेना । मूर्खपणें लोकीं नाना । कलह उठती ॥ ८ ॥ मग ते कलह वाढविती । परस्परें कष्टी होती । प्रयत्न राहतां अंतीं । श्रमचि होय ॥ ९ ॥ ऐसी नव्हे वर्तणूक । परीक्षावे नाना लोक । समजलें पाहिजे नेमकें । ज्याचें त्यापरी ॥ १० ॥ शब्दपरीक्षा अंतरपरीक्षा । कांहीं एक कळे देक्षा । मनोगत नेतद्दृष्टा । काय कळे ॥ ११ ॥ दुसऱ्यास शब्द ठेवणें । आपला कैपक्षे घेणें । पाहों जातां लौकिक लक्षणें । बहुतेक ऐसीं १२ ॥ लोकीं बरें म्हणायाकारणें । भल्यास लागतें सोसणें । न सोसितां भंडवाणें । सहचचि होय ॥ १३ ॥ आपणास जें मानेना । तेथें कदापि राहवेना । उरी तोडून जावेना । कोणी एकें ॥ १४ ॥

---

१ दूरदृष्टीपणा. २ विचार. ३ निष्काळजी. ४ अखंड विचार, अखंड आवर्तन. ५ एकाएकीं. ६ फुरसत. ७ लोकांपासून, एकाचें पाहून दुसरे ८ दुर्गुण. ९ पारख केल्याशिवाय. १० विषयी. ११ निर्विषयी लोकांस. १२ विशेष. १३ अर्थाचें मर्म. १४ कल्पना, लहरी. १५ धारण करावें, घालावें. १६ हेतु, इच्छा. १७ शेवटीं. १८ सिद्धीस जात नाहीं. १९ तंटे बखेडे. २० बरोबर. २१ हुशार जो त्याला. २२ मूर्खाला, करंट्याला. २३ बाजू. २४ फजीती, त्रास. २५ भीड.

बोलतो खरें चालतो खरें । त्यास मानिती लहानथोरें । न्याय अन्याय परस्परें । सहजचि कळे ॥ १५ ॥ लोकांस कळेना तंववरी । विवेकें क्षमा जो न करी । तेणें करितां बराबरी । होत जाते ॥ १६ ॥ जंववरी चंदन झिजेना । तंववरी तो सुगंध कळेना । चंदन आणि वृक्ष नाना । सगटे होती ॥ १७ ॥ जंव उत्तम गुण न कळे । तो या जनांस काय कळे । उत्तम गुण देखतां निवळे । * जगदंतर ॥ १८ ॥ जगदंतर निवळत गेलें । जगदंतरीं सख्य झालें । तरी मग जाणावें वोळखे । विश्वजन ॥ १९ ॥ जनीं जनार्दन वोळखा । तरी काय उणें तयाला । राजी राखावें सकळांला । कठिण आहे ॥ २० ॥ पेरिलें तें उगवतें । उसनें द्यावें घ्यावें लागतें । वर्म काढितां भंगतें । पैरांतर ॥ २१ ॥ लौकिकीं बरेंपण केलें । तेणें सौख्य वाढलें । उत्तरासारिखें आलें । प्रत्युत्तर ॥ २२ ॥ हें अवघें आपणापासीं । येथें बोल नाहीं जनांसी । शिकवावें आपुल्या मनासी । क्षणक्षणां ॥ २३ ॥ खळ दुर्जन भेटला । क्षमेचा धीर बुडाला । तरी मौनेंचि स्थळत्याग केला । पाहिजे साधकें ॥ २४ ॥ लोक नाना परीक्षा जाणती । परी अंतरपरीक्षा नेणती । तेणें प्राणी करंटे होती । संदेह नाहीं ॥ २५ ॥ आपणास आहे मरण । म्हणोन राखावें बरेंपण । कठिण आहे लक्षण । विवेकाचें ॥ २६ ॥ थोर लहान समान । आपुले पारिखे सकळ जन । चढतें वाढतें सनेधान । करितां बरें ॥ २७ ॥ बरें करितां बरें होतें । हें तों प्रत्ययास येतें । आतां पुढें सांगावें तें । कोणास काय ॥ २८ ॥ हरिकथानिरूपण । बरेंपणें राजकारण । प्रसंग पाहिल्याविण । सकळ खोटें ॥ २९ ॥ विद्या उदंडचि शिकला । प्रसंगमान चुकतचि गेला । मग तये विद्येला । कोण पुसे ॥ ३० ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे द्वादशदशके प्रत्ययनिरूपणं नाम द्वितीयः समासः ॥ २ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ पृथ्वीमध्यें बहुत लोक । तिहीं पाहावा विवेक । इहलोक आणि परलोक । बरा पाहावा ॥ १ ॥ इहलोक साधावयाकारणें । जाणत्याची संगति धरणें । परलोक साधावयाकारणें । सद्गुरु पाहिजे ॥ २ ॥ सद्गुरूसी काय पुसावें । हेंहि कळेना स्वभावें । अनन्यभावें एकभावें । दोनी गोष्टी पुसाव्या ॥ ३ ॥ दोनी गोष्टी त्या कोण । देव कोण आपण कोण । त्या दों गोष्टींचें विवरण । केलेंचि करावें ॥ ४ ॥ आदि मुख्य देव तो कोण । मग आपण भक्त तो कोण । पंचीकरण महावाक्यविवरण । केलेंचि करावें ॥ ५ ॥ सकळ केलियाचें फळ । शाश्वत वोळखावें निश्चळ । आपण कोण हा केवळ । शोध घ्यावा ॥ ६ ॥ सारासार विचार घेतां । पदार्थास नाहीं शाश्वतता । आदिकारण भगवंता । वोळखिलें पाहिजे ॥ ७ ॥ निश्चळ चंचळ आणि जड । अवघा मायेचा पेवाड । यामध्यें वस्तु जोडे । जाणार

---

१ सारखे. * विश्व. २ प्राप्त झाले, अनुकूल झाले. ३ सर्व लोक. ४ दुसऱ्याचें मन. ५ जसें आपण बोलावें तसा प्रतिध्वनि येतो. ६ स्थान सोडणें. ७ बरोबरीचे ८ परके. ९ सान्निधान, संबंध परिचय. १० बहुत. ११ वेळेची योग्यता. १२ एकनिष्ठपणानें. १३ विचार, व्याख्यान, खल. १४ आधीं. १५ आकाशादि भूतांचें देहादिकांच्या उत्पत्तीसाठीं ईश्वरशक्तीनें झालेलें परस्पर संमिश्रण. १६ 'तत्त्वमसि' इत्यादिक वेदवाक्यांचें विवेचन. १७ विस्तार. १८ ब्रह्म. १९ घन.

नाहीं ॥ ८ ॥ तें परब्रह्म धुंडावें । विवेकें त्रैलोक्य हिंडावें । मायिक विचारें खंडावें । परीक्षावंतीं ॥ ९ ॥ खोटें सांडून खरें घ्यावें । परीक्षावंतीं परीक्षावें । मायेचें अवघेंचि जाणावें । रूप मायिकें ॥ १० ॥ पांचभौतिक हे माया । मायिक जाय विलया । पिंडें ब्रह्मांडें अष्टकाया । नाशवंत ॥ ११ ॥ दिसेल तितुकें नासेल । उपजेल तितुकें मरेल । रचेल तितुकें खचेल । रूप मायेचें ॥१२ ॥ वाढेल तितुकें मोडेल । येईल तितुकें जाईल । भूतांस भूत खाईल । कल्पांतकाळीं ॥ १३ ॥ देहधारक तितुके नासती । हे तों रोकडी प्रचीती । मनुष्येंविण उत्पत्ति । रेतें कैंचें ॥ १४ ॥ अन्न नसतां रेत कैंचें । ओषधी नसतां अन्न कैंचें । ओषधीस जिणें कैंचें । पृथ्वी नसतां ॥ १५ ॥ आप नसतां पृथ्वी नाहीं । तेज नसतां आप नाहीं । वायु नसतां तेज नाहीं । ऐसें जाणावें ॥ १६ ॥ अंतरात्मा नसतां वायु कैंचा । विकार नसतां अंतरात्मा कैंचा । निर्विकारीं विकार कैंचा । बरें पाहा ॥ १७ ॥ पृथ्वी नाहीं आप नाहीं । तेजें नाहीं वायु नाहीं । अंतरात्मा विकार नाहीं । निर्विकारीं ॥ १८ ॥ निर्विकार जें निर्गुण । तेंचि शाश्वताची खूण । अष्टधा प्रकृति संपूर्ण । नाशवंत ॥ १९ ॥ नाशवंत समजोन पाहिलें । तों तें असतांच नसतें झालें । सारासारें कळों आलें । समाधान ॥ २० ॥ विवेकें पाहिला विचार । मनास आलें सारासार । येणें करितां विचार । सदृढ जाहला ॥ २१ ॥ शाश्वत देव तो निर्गुण । ऐशी अंतरीं बाणली खूण । देव कळला, मी कोण । कळलें पाहिजे ॥ २२ ॥ मी कोण पाहिजे कळलें । देहतत्त्व तितुकें शोधिलें । मनोवृत्तीच्या ठायीं आलें । मीतूंपण ॥ २३ ॥ सकळदेहाचा शोध घेतां । मीपण दिसेना पाहतां । मीतूंपण हें तत्त्वतां । तत्त्वीं मावळलें ॥ २४ ॥ दृश्य पदार्थांचि वोसरे । तत्त्वें तत्त्व तेव्हां सरे । मीतूंपण हें कैंचें उरे । तत्त्वतां वस्तु ॥ २५ ॥ पंचीकरण तत्त्वविवरण । महावाक्यें वस्तु आपण । निःसंगपणें निवेदन । केलें पाहिजे ॥ २६ ॥ देवभक्तांचें मूळ । शोधून पाहतां सकळ । उपाधिवेगळा केवळ । निरुपाधि आत्मा ॥ २७ ॥ मीपण तें बुडालें । विवेकें वेगळेपण गेलें । निवृत्तिपदास प्राप्त झालें । उन्मनीपद ॥ २८ ॥ विज्ञानीं राहिलें ज्ञान । ध्येयीं राहिलें ध्यान । सकळ कांहीं कार्याकारण । पाहोन सांडिलें ॥ २९ ॥ जन्ममरणाचें चुकलें । पाप अवघेंचि बुडालें । यमयातनेचें झालें । निसंतान ॥ ३० ॥ निर्बंध अवघाच तुटला । विचारें मोक्ष प्राप्त झाला । जन्म सार्थकचि वाटला । सकळ कांहीं ॥ ३१ ॥ नाना * किंतु निवारले । धोके अवघेच तुटले । ज्ञानविवेकें पावन झाले । बहुत लोक ॥ ३२ ॥ पतितपावनाचे दास । तेहि पावन करिती जगास । ऐसी हे प्रचीत मनास । बहुतांच्या आली ॥ ३३ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे द्वादशदशके देवभक्तनिरूपणं नाम तृतीयः समासः ॥ ३ ॥

---

१ ब्रह्म अनंत आहे. २ खोटें. ३ नाशाला. ४ शरीर. ५ चतुर्दशभुवनात्मक ईश्वरनिर्मित रचना. ६ पिंडाचे चार व ब्रह्मांडाचे चार देह. ७ प्रलयकाळा. ८ शुक्र, वीर्य. ९ वनस्पति, झाडें. १० अग्नी. ११ नाश पावतो. १२ परब्रह्म. १३ उपसर्गरहित. १४ मोक्षपदवीला. १५ निर्विकल्पस्थिति. १६ प्रतिबंध. * संशय. १७ पतित—पापी—त्याला पावन—शुद्ध—करणाऱ्याचे म्हणजे रामाचे दास.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ महद्भाग्य हातासि आलें । परी भोगू नाहीं जाणितलें । तैसें वैराग्य उत्पन्न झालें । परी विवेक नाहीं १ ॥ आदळतें आफळतें । कष्टी होतें दुःखी होतें । ऐकेतें देखतें येतें । वैराग्य तेणें ॥ २ ॥ नाना प्रपंचाच्या ओढी[3] । नाना संकटें सांकडीं । संसार सांडून देशोघडीं । होय तेणें ३ ॥ तो चिंतेपासून सुटला । पराधीनतेपासून[4] पळाला । दुःखत्यागें मोकळा झाला । रोगी जैसा ॥ ४ ॥ परी तो होऊं नये मोकाट । नष्ट भ्रष्ट आणि चाट । सीमाचि नाहीं सैराट[5] । गुरू जैसे ॥ ५ ॥ विवेकेविण वैराग्य केलें । तरी अविवेकें अनर्थीं घातलें । अवघें व्यर्थाचि गेलें । दोहींकडे ॥ ६ ॥ ना प्रपंच ना परमार्थ । अवघें जिणेंचि झालें व्यर्थ । अविवेकें अनर्थ । ऐसा केला ॥ ७ ॥ कां व्यर्थाचि ज्ञान बडबडिला । परी वैराग्यरोग नाहीं घडला । जैसा कोरागृहीं अडकला[12] । पुरुषार्थ सांगे ॥ ८ ॥ वैराग्येविण ज्ञान । तो व्यर्थाचि साभिमान । लोभदंभें घोळसून[13] । कासावीस केला ॥ ९ ॥ श्वान बांधिलें तरी भुंके । तैसा स्वार्थामुळें थिंके[14] । पैरोधिक[15] देखों न शके । साभिमानें ॥ १० ॥ हें एकेंवीण एक । तेणें उगाच वाढे शोक । आतां वैराग्य आणि विवेक । योग ऐका ॥ ११ ॥ विवेकें अंतरीं सुटला । वैराग्यें प्रपंच तुटला । अंतर्बाह्य मोकळा झाला । निःसंग योगी ॥ १२ ॥ जैसें मुखें ज्ञान बोले । तैसीच सर्वें क्रिया चाले । दीक्षा देखोनी चकित झालें । शुचिष्मंतें[16] ॥ १३ ॥ आस्था त्रैलोक्याची । स्थिति बाणली वैराग्याची । यत्नविवेक-धारणेची । सीमा नाहीं ॥ १४ ॥ संगीत रसाळ हरिकीर्तन । तालबद्ध तानमान । प्रेमळ आवडीचें भजन । अंतरापासूनी ॥ १५ ॥ तात्काळचि सन्मार्ग लागे । ऐसा अंतरीं विवेक जागे । वक्तृत्व करितां न भंगे । साहित्यें[17] प्रत्ययाचें ॥ १६ ॥ सन्मार्गें जगास मिळाला । म्हणजे जगदीश बोलेला । प्रसंग पाहिजे कळला । कोणीएक ॥ १७ ॥ प्रखर वैराग्य उदासीन । प्रत्ययाचें ब्रह्मज्ञान । स्नान संध्या भगवद्भजन । पुण्यमार्ग ॥ १८ ॥ विवेकवैराग्य तें ऐसें । नुसतें वैराग्य हेकांडपिसें[18] । शब्दज्ञान येळीलसें[19] । आपणाचि वाटे ॥ १९ ॥ म्हणोन विवेक आणि वैराग्य । तेंचि जाणिजे महद्भाग्य । रामदास म्हणे योग्य । साधू जाणती ॥ २० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे द्वादश-दशके विवेकवैराग्यनिरूपणं नाम चतुर्थः समासः ॥ ४ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ रेखांचें[22] गुंडाळें केलें । मातृकाक्षरीं शब्द झाले । शब्द मेळ-ऊन चाले । श्लोक गद्यें[23] प्रबंध[24] ॥ १ ॥ वेद शास्त्रें पुराणें । नाना काव्यें निरूपणें । ग्रंथ भेद अनुवादणें[25] । किती म्हणोनी ॥ २ ॥ नाना ऋषी नाना मतें । पाहों जातां असं-

१ दुःखकारक बातमी ऐकल्यानें. २ दुःखकारक प्रसंग पाहिल्यानें ३ अनेक उद्योगांचा नेट ४ अडचणी. ५ हद्दपार. ६ परस्वाधीनपणापासून. ७ दुःख टाकून. ८ उनाड, मोकळा. ९ चावट चघळपणा करणारा. १० स्वच्छंद ११ कैदेंत. १२ अडकलेला. १३ लोळवन. १४ चरफडतो. १५ दुसऱ्याचा मोठेपणा, परोत्कर्ष. १६ आपोआप, बरोबर. १७ पवित्र. १८ सामुग्री. १९ पावला, २० हेकेखोरपणाचें वेड. २१ शिळें, कंटाळवाणें, दीनवाणें. २२ रेघांचें. २३ मात्रा व वर्ण मिळून. २४ अक्षरें, मात्रा यांचा नियम नाहीं अशी प्रबंधरचना. २५ ग्रंथ रचना. २६ सांगणें.

ख्यातें। भाषा लिपी जेथें तेथें । काय उणे ॥ ३ ॥ वेर्ग ऋचा श्रुति स्मृती । अध्याय सर्ग स्तबक जाती। प्रसंग मानें समास पोथी । बहुधा नामें ॥ ४ ॥ नाना पदें नाना श्लोक । नाना बीरें नाना कडकें । नाना साख्या दोहरे अनेक । नामाभिधानें ॥ ५ ॥ डफगाणें माचीगीणें । दिंडीगाणें कथागाणें । नानामानें नाना जैसणें । नाना खेळ ॥ ६ ॥ ध्वनि घोष नाद रेखा। चहूं वाचामध्यें देखा । वाचारूपेंहि ऐका । नानाभेद ॥ ७ ॥ उन्मेषें परा, ध्वनि पश्यंती। नांद मध्यमा, शब्द चौथी । वैखरीपासून उमटती । नाना शब्दरत्नें ॥ ८ ॥ अकार उकार मकार । अर्धमात्रेचे अंतर । और्टमात्रा तदनंतर । बावन मातृका ॥ ९ ॥ नाना भेद रागज्ञान । नृत्यभेद तानमान । अर्थभेद तत्त्वज्ञान । विवंचना ॥ १० ॥ तत्त्वांमध्यें मुख्य तत्त्व । तें जाणावें शुद्ध सत्त्व । अर्धमात्रा महत्तत्त्व । मूळमाया ॥ ११ ॥ नाना तत्त्वें लहान थोरें । मिळोन अष्टहि शरीरें । अष्टधा प्रकृतीचें वारें । निघोन जातें ॥ १२ ॥ वारें नसतां जें गगन । तैसें परब्रह्म सघन । अष्टदेहांचें निरसन । करून पाहावें ॥ १३ ॥ ब्रह्मांडपिंडउभार । पिंडब्रह्मांडसंहार । दोहीं वेगळें सारासार । विमळ ब्रह्म ॥ १४ ॥ पदार्थ जड आत्मा चंचळ । विमळ ब्रह्म ते निश्चळ । विवरोनि विरे तात्काळ । तद्रूप होय ॥ १५ ॥ पदार्थ मनें काया वाचा। मी हा अवघा देवाचा । जडआत्मनिवेदनाचा । विचार ऐसा ॥ १६ ॥ चंचळ कर्ता तो जगदीश । प्राणिमात्र त्याचा अंश । त्याचा तोचि आपणास । ठाव नाहीं ॥ १७ ॥ चंचळ आत्मनिवेदन । त्याचें सांगितलें लक्षण । कर्ता देव तो आपण । कोठेंचि नाहीं ॥ १८ ॥ चंचळ चळे स्वप्नाकार । निश्चळ देव तो निराकार । आत्मनिवेदनाचा प्रकार । जाणिजे ऐसा ॥ १९ ॥ ठावचि नाहीं चंचळाचा । तेथें आधीं आपण कैंचा । निश्चळ आत्मनिवेदनाचा । विवेक ऐसा ॥ २० ॥ तिहींप्रकारें आपण । नाहीं नाहीं दुजेपण । आपण नसतां मीपण । नाहींच कोठें ॥ २१ ॥ पाहतां पाहतां अनुमानलें । कळतां कळतां कळों आलें । पाहतां अवघें निवांत झालें । बोलणें आतां ॥ २२ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे द्वादशदशके आत्मनिवेदननिरूपणं नाम पंचमः समास ॥ ५ ॥

श्रीगणेशाय एमः ॥ ॥ ब्रह्म निर्मळ निश्चळ । शाश्वत सार अमल विमळ । अवकाश घन पोकळ । गगनाऐसें ॥ १ ॥ तयास करणें ना धरणें । तयास जन्म ना मरणें । तेथें जाणणें ना नेणणें । शून्यातीत ॥ २ ॥ तें रचेना ना खचेना । तें होयना ना जायना । मायातीत निरंजनी । पारचि नाहीं ॥ ३ पुढें संकल्प उठिला । षेडगुणेश्वर बोलिजे त्याला । अर्धनारीनटेश्वराला । बोलिजेतें ॥ ४ ॥ सर्वेश्वर सर्वज्ञ । साक्षी द्रष्टा ज्ञानघन । परेश परमात्मा जगज्जीवन । मूळ पुरुष ॥ ५ ॥ ते मूळमाया बहुगुणी । अधोमुखें गुणक्षोभिणी ।

---

१ ऋग्वेदांतील अध्यायाचे भाग. २ काव्याचे व चंपूचे भाग. ३ अध्याय, जसे रुक्मिणीस्वयंवराचे, दासबोधाचे. ४ हिंदुस्थानी भाषेंतील छंद. ५ मृदंगावर गायें. ६ आडकथा. ७ अंतःकरणाचें स्फुरण. ८ साडेतीन मात्रा. ९ आठ प्रकारच्या १० दाट. ११ ब्रह्मांड आणि पिंड–शरीर यांची रचना. १२ शुद्ध. १३ कांहीं नाहीं त्याच्या पलीकडचा. १४ शुद्ध परब्रह्माला. १५ यश, श्री, औदार्य, ज्ञान, वैराग्य, ऐश्वर्य यांहीं युक्त. १६ पराङ्मुखतेनें. १७ त्रिगुणांस प्रकट करणारी.

गुणत्रय तिजपासूनी । निर्माण झालें ॥ ६ ॥ पुढें विष्णु झाला निर्माण । जाणतीकळा सत्वगुण । जो करिताहे पाळण । त्रैलोक्याचें ॥ ७ ॥ पुढें जाणीवनेणीवमिश्रित । ब्रह्मा जाणावा नेमस्त । त्याच्या गुणें उत्पत्ति होत । भुवनत्रयीं ॥ ८ ॥ पुढें रुद्र तमोगुण । सकळसंहाराचें कारण । सकळ कांहीं कर्तेपण । तेथेंचि आलें ॥ ९ ॥ तेथून पुढें पंचभूतें । पावलीं स्पष्टदशेतें । अष्टधाप्रकृतीचें स्वरूप तें । मुळींच आहे ॥ १० ॥ निश्चळीं झालें चळण । तेंचि वायूचें लक्षण । पंचभूतें आणि त्रिगुण । सूक्ष्म अष्टधा ॥ ११ ॥ आकाश म्हणिजे अंतरात्मा । प्रत्ययें पाहावा महिमा । त्या आकाशापासून जन्मा । वायु आला ॥ १२ ॥ तया वायूच्या दोन्ही झुलुका । उष्ण शीतळ ऐका । शीतळापासूनि तारा मृगांका । जन्म जाहला ॥ १३ ॥ उष्णापासून रवि वैन्हि । विद्युल्लता आदिकरूनी । शीतळ उष्ण मिळोनी । तेज जाणावें ॥ १४ ॥ तया तेजापासून झालें आप । आप ‡ आळोनि पृथ्वीचें रूप । पुढें औषधी अमूप । निर्माण जाहल्या ॥ १५ ॥ औषधीपासून नाना रस । नाना बीजें अन्नरस । चौऱ्याशी लक्षयोनींचा वास । भूमंडळीं ॥ १६ ॥ ऐशी झाली सृष्टिरचना । विचार आणिला पाहिजे मना । प्रत्ययेविण अनुमाना । पात्र होइजे ॥ १७ ॥ ऐसा झाला आकार । येणेंचि न्यायें संहार । सारासारविचार । यासी बोलिजे ॥ १८ ॥ जें जें जेथूनि निर्माण झालें । तें तें तेथेंचि † निमालें । येणेंचि न्यायें संहारिलें । महाप्रलयीं ॥ १९ ॥ आद्य मध्य अवसान । जें शाश्वत निरंजन । तेथें लावावें अनुसंधान । जाणते पुरुषीं ॥ २० ॥ होते जाते नाना रचना । परी कांहींच तगेना । सारासारविचारणा । याकारणें ॥ २१ ॥ द्रष्टा साक्षी अंतरात्मा । सर्वत्र बोलती महिमा । परी हे सर्वसाक्षीणीअवस्था मी । प्रत्ययें पाहावी ॥ २२ ॥ मूळापासूनि शेवटवरी । अवघी मायेची भैरोवरी । नानाविद्या कळा कुसरी । तयेमध्यें ॥ २३ ॥ जो उपाधीचा शेवट पावेल । त्यास भ्रम ऐसें वाटेल । जो उपाधीमध्यें आडकेल । त्यास काढितो कवण ॥ २४ ॥ विवेकप्रत्ययाचीं कामें । कैसीं घडती अनुमानभ्रमें । सारासारविचाराचेनि संभ्रमें । पाविजे ब्रह्म ॥ २५ ॥ ब्रह्मांडींचें महाकारण । ते मूळमाया जाण । अपूर्णास म्हणती ब्रह्म पूर्ण । विवेकहीनें ॥ २६ ॥ सृष्टीमध्यें बहुत जन । एक भोगिती नृपासन । एक विष्ठा टाकिती जाण । प्रत्यक्ष आतां ॥ २७ ॥ ऐसे उदंड लोक असती । आपणांस थोर म्हणविती । परी ते विवेकी जाणती । सकळ कांहीं ॥ २८ ॥ ऐसा आहे समाचार । कारण पाहिजे विचार । बहुतांच्या बोलें हा संसार । नासूं नये ॥२९॥ पुस्तकज्ञानें निश्चय धरणें । तरी गुरु कासया करणें । याकारणें विवरणें । आपुल्या प्रत्ययें ॥३०॥ जो बहुतांचे बोलीं लागला । तो नेमस्त जाणावा बुडाला । एक साहेब नसतां कोणाला । भुंशारा मागावा ॥३१॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे द्वादशदशके सृष्टिक्रमनिरूपणं नाम षष्ठ समासः ॥६॥

---

१ जाणीवशक्ति. २ चंद्राला. ३ सूर्य. ४ अग्नि. ५ पाणी. ‡ घट्ट होऊन. ६ पुष्कळ. ७ नाश, लय. † नाहींसें झालें. ८ अंत, शेवट. ९ शुद्ध. १० अंतःकरणवृत्ति. ११ टिकत नाहीं. १२ तर मग. १३ सामुग्री विस्तार. १४ कौशल्य. १५ काढगारा. १६ उपायानें. १७ विचारशून्य १८ राजपदवी. १९ नरक. २० वेतन.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ न्याय निष्ठुर बोलणें । बहुतांस वाटे कंटाळवाणें । मळमळ करितां जेवणें । विहित नव्हे ॥ १ ॥ बहुतीं विषय निंदिलें । आणि तेचि सेवीत गेले । विषयत्यागें देह चाले । हें तो घडेना ॥ २ ॥ बोलणें एक चालणें एक । त्याचें नांव हीनविवेकें । तेणें करितां सकल लोक । हांसो लागती ॥ ३ ॥ विषयत्यागेविण तों कांहीं । परलोक तो प्राप्त नाहीं । ऐसें बोलणें ठायीं ठायीं । बरें पाहा ॥ ४ ॥ प्रपंची खाती जेविती । परमार्थी काय उपास करिती । उभयतां सारिखे दिसती । विषयाविषयीं ॥ ५ ॥ देह चालतां विषय त्यागी । ऐसा आहे कोण जगीं । त्याचा निर्वाह मजलागीं । देवें निरूपावा ॥ ६ ॥ विषय अवघा त्यागावा । तरीच परमार्थ करावा । ऐसें पाहतां गोवा । दिसतो कीं ॥ ७ ॥ ऐसा श्रोता अनुवादला । वक्ता उत्तर देता झाला । सावध होऊन मन घाला । एताद्विषयीं ॥ ८ ॥ वैराग्यें करावा त्याग । तरीच परमार्थयोग । प्रपंचत्यागें सर्व सांग । परमार्थ घडे ॥ ९ ॥ मागें ज्ञानी होऊन गेले । तिहीं बहुत कष्ट केलें । तरी मग विख्यात झाले । भूमंडळीं ॥ १० ॥ येरें मत्सर करितांच गेली । अन्न अन्न करितांचि मेलीं । कित्येक तीं भ्रष्टलीं । पोटासाठीं ॥ ११ ॥ वैराग्य मुळींहून नाहीं । ज्ञान प्रत्ययाचें नाहीं । शुचि आचार तोहि नाहीं । भजन कैंचें ॥ १२ ॥ ऐसे प्रकारिचे जन । आपणांस म्हणती सज्जन । पाहों जातां अनुमान । अवघेंच दिसे ॥ १३ ॥ जयास नाहीं अनुताप । हेंचि एक पूर्व पाप । क्षणक्षणा विक्षेप । पराधिकेपणें ॥ १४ ॥ मज नाहीं तुज साजेना । हें तों अवघें ठावकें आहे जना । खोट्याच नेखोतें देखों शकेना । ऐसें आहे ॥ १५ ॥ भाग्य पुरुष थोर थोर । त्यांस निंदिती दिवाळखोर । सोवास देखतां चोर । चरफडी जैसा ॥ १६ ॥ वैराग्यापरतें नाहीं भाग्य । वैराग्य नाहीं तें अभाग्य । वैराग्य नसतां योग्य । परमार्थ नव्हे ॥ १७ ॥ प्रत्ययज्ञानी वीतरागी । विवेकबळें सकळत्यागी । तो जाणिजे महायोगी । ईश्वरी पुरुष ॥ १८ ॥ अष्टसिद्धींची उपेक्षा । करून घेतली योगदीक्षा । घरोघरीं मागे भिक्षा । महादेव ॥ १९ ॥ ईश्वराची बराबरी । कैसा करील वेषधारी । म्हणोनियां सगटसरी । होत नाहीं ॥ २० ॥ उदास आणि विवेक । त्यासि शोधिती सकळ लोक । जैसे लालची मूर्ख रंक । ते दैन्यवाणें ॥ २१ ॥ जे विचारापासून चेवले । जे आचारापासून भ्रष्ट झाले । विचार करूं विसरले । विषयलोभी ॥ २२ ॥ भजन तरी आवडेना । पुरश्चरण कदापि घडेना । भल्यांस त्यांस पडेना । एतन्निमित्य ॥ २३ ॥ वैराग्येंकरून भ्रष्टेना । ज्ञान भजन सांडिना । व्युत्पन्न आणि वाद घेना । ऐसा थोडा ॥ २४ ॥ कष्ट करितां शेत पिके । उंच वस्तु तात्काळ विके । जाणत्या लोकांच्या कौतुकें । उड्या पडती ॥ २५ ॥ येर तें अवघेंच

---

१ योग्य, हितकारक. २ विवेकरहित. ३ प्रपंचवाल. ४ परमार्थवाले ५ गोवळ. ६ पूर्णपणें. ७ पथ्थीवर. ८ इतर. ९ पवित्र. १० पश्चात्ताप. ११ चित्ताचा चंचलपणा. १२ दुसऱ्याच्या मोठेपणानें १३ खाणाराच. १४ न खाणारा. १५ प्रामाणिक, अबूदार. १६ अनुभवाचें ज्ञान मिळविलेलें. १७ वैराग्यवान्. १८ अणिमा, गरिमा वगैरे आठ सिद्धींची. १९ हयगय, तिरस्कार. २० सगळ्यांची सारखी योग्यता २१ भ्रष्ट झाले. २२ मंत्राचें अनुष्ठान. २३ पटेना. २४ यामुळें. २५ विद्वान्

मंदलें । दुराशेनें खोटें झालें । कानकोंडें ज्ञान केलें । भ्रष्टाकारें ॥ २६ ॥ सकळ विषय त्यागणें । शुद्ध कार्याकारण घेणें । विषयत्यागाचीं लक्षणें । वोळखावीं ऐशीं ॥ २७ ॥ सकळ कांहीं कर्ता देव । नाहीं प्रकृतीचा ठाव । विवेकाचा अभिप्राव । विवेकी जाणती ॥ २८ ॥ शूरत्वविषयीं खडतर । त्यास मानिती लहान थोर । कामगार आणि अंगचोर । एक कैसा ॥ २९ ॥ त्यागात्याग तार्किके जाणे । बोलाऐसें चालों जाणे । पिंडब्रह्मांड सकळ जाणे । यथायोग्य ॥ ३० ॥ ऐसा जो सर्व जाणता । उत्तम लक्षणीं पुरता । तयाचेनि सार्थकता । सहजचि होय ॥ ३१ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे द्वादशदशके विषयत्यागनिरूपणं नाम सप्तमः समासः ॥ ७ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ मूळ माया जगदीश्वर । पुढें अष्टधेचा विस्तार । सृष्टिक्रमें आकार । आकारला ॥ १ ॥ हें अवघेंचि नसतां निर्मळ । जैसें गगन अंतराळ । निराकारीं काळ वेळ । कांहींच नाहीं ॥ २ ॥ उपाधीचा विस्तार झाला । तेथें काळ दिसोन आला । येरव्हीं पाहतां काळाला । ठाँवचि नाहीं ॥ ३ ॥ एक चंचळ एक निश्चळ । यावेगळा केंठें काळ । चंचळ आहे तावत्काळ । काळ म्हणावें ॥ ४ ॥ आकाश म्हणिजे अवकाश । अवकाश बोलिजे विलंबास । त्या विलंबरूप काळास । जाणोन घ्यावें ॥ ५ ॥ सूर्याकरितां विलंब कळे । गणना सकळांची आकळे । पळापासून निवळे । युगपर्यंत ॥ ६ ॥ पळ घटिका प्रहर दिवस । अहोरात्र पक्ष मास । षण्मास वर्ष युगास । ठाव जाहला ॥ ७ ॥ कृत त्रेत द्वापार कली । संख्या चालली भूमंडळी । देवांचीं आयुष्यें आंगळीं । शास्त्रीं निरूपिलीं ॥ ८ ॥ ते देवत्रयांची खटपट । सूक्ष्मरूपें विलगट । दंडकें सांडितां चटपट । लोकांस होते ॥ ९ ॥ मिश्रित त्रिगुण निवडेना । तेणें आद्यंत सृष्टिरचना । कोण थोर कोण साना । कैसा म्हणावा ॥ १० ॥ असो हीं जाण्त्याचीं कामें । नेणता उगाचि गुंते भ्रमें । प्रत्यय जाणजाणों वर्मे । ठायीं पाडावीं ॥ ११ ॥ उत्पन्नकाळ सृष्टिकाळ । स्थितिकाळ संहारकाळ । आद्यंत अवघा काळ । विलंबरूपी ॥ १२ ॥ जें जें † जयें प्रसंगीं झालें । तेथें काळाचें नांव पडिलें । बरें नसेल अनुमानलें । तरी पुढें ऐका ॥ १३ ॥ पर्जन्यकाळ शीतकाळ । उष्णकाळ संतोषकाळ । सुखदुःख आनंदकाळ । प्रत्यय येतो ॥ १४ ॥ प्रातःकाळ मध्यान्हकाळ । सायंकाळ वसंतकाळ । पर्वकाळ कठिणकाळ । जाणिजे लोकीं ॥ १५ ॥ जन्मकाळ बाळत्वकाळ । तारुण्यकाळ वृद्धापकाळ । अनंतकाळ विषमकाळ । वेळरूपें ॥ १६ ॥ सुकाळ आणि दुकाळ । प्रदोषकाळ पुण्यकाळ । सकळ वेळा मिळोन काळ । तयास म्हणावें ॥ १७ ॥ असतें एक वाटतें एक । त्याचें नांव हीनविवेक । नाना प्रवृत्तीचे लोक । प्रवृत्ति जाणती

---

१ संकुचित. २ आवश्यक, निर्वाहापुरतें. ३ मायेचा. ४ पक्का, मागेपुढें न पहाणारा, ५ तर्कवान्, तर्काचा विषय. ६ पोकळी. ७ पार, मर्यादा. ८ समजून येतें. ९ उत्तम कळते. १० पंधरवडा. ११ महिना. १२ अधिक. १३ वेगवेगळी. १४ रूढि, संप्रदाय. १५ मुळापासून शेवटपर्यंत. † ज्या १६ दुपारचा वेळ. १७ अमावास्या पूर्णिमा इत्यादि स्नानदानादि पुण्यकर्मांविषयीं सांगितलेले काळ. १८ संध्याकाळ. १९ विचारशून्यता २० चालीचे.

॥ १८ ॥ प्रवृत्ति चाले अधोमुखें । निवृत्ति धांवे ऊर्ध्वमुखें । ऊर्ध्वमुखें नानामुखें । विवेकी जाणतां ॥ १९ ॥ ब्रह्मांडरचना जेथूनि झाली । तेथें विवेकी दृष्टि घाली । विवेंरतां विवरतां लाधली । पूर्वापर स्थिति ॥ २० ॥ प्रपंचीं असोन परमार्थ पाहे । तो हे स्थितीतें लाहे । प्रारब्धयोगें करून राहे । लोकांमध्यें ॥ २१ ॥ सकळांचें एकचि मूळ । एक जाणते एक बाष्कळ । विवेकेकरून तात्काळ । परलोक साधावा ॥ २२ ॥ तरीच जन्माचें सार्थक । भले पाहती उभयलोक । कारण मुळींचा विवेक । केला पाहिजे ॥ २३ ॥ विवेकहीन जे जन । ते जाणावे पशुसमान । त्यांचें ऐकतां भाषण । परलोक कैंचा ॥ २४ ॥ बरें आमचें काय गेलें । जें केलें तें फळास आलें । पेरिलें तें उगवलें । भोगती आतां ॥ २५ ॥ पुढेंहि करी तो पावे । भक्तियोगें भगवंत ❀ पावे । देवभक्त मिळतां दुणावे । समाधान ॥ २६ ॥ कीर्ति करून नाहीं मेले । ते उगेचि आले आणि गेले । शाहणे होऊन भ्रमले । काय सांगावें ॥ २७ ॥ येथील येथें अेवघेंचि राहतें । ऐसें प्रत्ययास येतें । कोण काय घेऊन जातें । सांगाना कां ॥ २८ ॥ पदार्थी असावें उदास । विवेक पाहावा सावकाश । येणेंकरितां जगदीश । अलभ्य लाभे ॥ २९ ॥ जगदीशापरता लाभ नाहीं । कार्याकारण सर्व कांहीं । संसार करित असतांहि । समाधान ॥ ३० ॥ मागां होते जनकादिक । राज्य करितहि अनेक । तैसेचि आतां पुण्यश्लोक । कित्येक असती ॥ ३१ ॥ राजा असतां मृत्यु आला । लक्ष कोटि कबूल झाला । तरी सोडिना तयाला । मृत्यु कांहीं ॥ ३२ ॥ ऐसें हें पराधीन जिणें । यामध्यें दुखणें बाहणें । नाना उद्वेग चिंता करणें । किती म्हणोनी ॥ ३३ ॥ हांट भरला संसाराचा । नफा पाहावा देवाचा । तरीच या कष्टाचा । परिहार होतो ॥ ३४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे द्वादशदशके कालनिरूपणं नाम अष्टमः समासः ॥ ८ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ दुर्बळ नाचारी वोडंगस्त । आळसी खादाड ऋणग्रस्त । मूर्खपणें अवघें अव्यवस्थ । कांहींच नाहीं ॥ १ ॥ खाया नाहीं जेवाया नाहीं । लेयाँ नाहीं नेसाया नाहीं । आंथराया नाहीं पांघराया नाहीं । खोंपट नाहीं अभागी ॥ २ ॥ सोयरे नाहीं धायरे नाहीं । इष्ट नाहीं मित्र नाहीं । पाहतां कोठें वोळख नाहीं । आश्रयेविण परदेशी ॥ ३ ॥ तेणें कैसें करावें । काय जीवेंसि धरावें । वांचावें कीं मरावें । कोण्या प्रकारें ॥ ४ ॥ ऐसें कोणी एकें पुसिलें । कोणी एकें उत्तर दीधलें । श्रोतीं सावध ऐकिलें । पाहिजे आतां ॥ ५ ॥ लहान थोर काम कांहीं । केल्याविणें होत नाहीं । करंट्या सावध पाहीं । सदैवें[९] होसी ॥ ६ ॥ अंतरीं नाहीं सावधानता । यत्न ठाकेना पुरता । सुखसंतोषाची वार्ता । तेथें कैंची ॥ ७ ॥ म्हणोनि आळस

---

१ खाली तोंड करून, अज्ञानानें. २ मोक्षमार्ग. ३ वर तोंड करून, सुविचारदृष्टीनें. ४ शोधतां शोधतां. ५ पूर्वीपासूनची. ६ प्राप्त करून घेतो. ७ बडबड करणारे. ❀ सांपडतो. ८ दुष्पट होतें. ९ सदा. १० कार्याचे निर्वाहापुरतें आवश्यक. ११ जनक वगैरे. १२ पवित्र कीर्तीनें युक्त, कीर्तिवान्. १३ बाजार. १४ नाश. १५ आश्रयरहित. १६ अडचणींत असलेला. १७ कर्जानें व्यापलेला. १८ धारण करण्याला. १९ दैववान्.

सोडावा । यत्न साक्षेपें[1] जोडावा । दुश्चितपणाचा मोडावा । *थारा बळें ॥ ८ ॥ प्रातःकाळीं उठत जावें । प्रातःस्मरामि[2] करावें । नित्य नेमें स्मरावें । पाठांतर ॥ ९ ॥ मागील उजळणी पुढें पाठ । नेम धरावा निकट । बाष्कळपणाची वटवट । करूंच नये ॥ १० ॥ दिशेकडे[3] दुरी जावें । शुचिष्मंत[4] होऊन यावें । येतां कांहीं तरी आणावें । रितें[5] खोटें ॥ ११ ॥ धूत[6] वस्त्रें घालावीं पिळून । करावें चरणक्षालन[7] । देवदर्शन देवतार्चन[8] । यथासांग ॥ १२ ॥ कांहीं फळाहार घ्यावा । पुढें व्यवसाय[9] करावा । लोक आपला पेरावा[10] । म्हणत जावा ॥ १३ ॥ सुंदर अक्षर ल्याहावें । स्पष्ट नेमस्त[11] वाचावें । विवरविवरोनि[12] जाणावें । ¶ अर्थांतर ॥ १४ ॥ नेमस्त नेटकें पुसावें । विशद[13] करून सांगावें । प्रत्ययेविण बोलावें । तेंचि पाप ॥ १५ ॥ सावधानता असावी । नीति मर्यादा राखावी । जनास माने ऐसी करावी । क्रिया शुद्ध ॥ १६ ॥ आलियाचें समाधान । हरिकथानिरूपण । सर्वदा प्रसंग पाहोन । वर्तत जावें ॥ १७ ॥ ताळ घाटी मुद्रा शुद्ध । अर्थप्रमेय[14] अन्वय[15] शुद्ध । गद्य पद्य दृष्टांत[16] शुद्ध । अन्वयाचे ॥ १८ ॥ गाणें वाजवणें नाचणें । हस्तन्यास[17] दाखवणें । सभारंजकें[18] वचनें । आडकथा छंदबंध[19] ॥ १९ ॥ बहुतांचें समाधान राखावें । बहुतांस मानेल तें बोलावें । विलग[20] पडोंचि न द्यावें । कथेमध्यें ॥ २० ॥ लोकांसि उदंड[21] वोंजी आणूं नय । लोकांचें उंकलावें[22] हृदय । तरी मग स्वभावोंचि होय । नामघोष[23] ॥ २१ ॥ भक्ति ज्ञान वैराग्य योग । नाना साधनांचे प्रयोग । जेणें तुटे भवरोग[24] । मननमात्रें ॥२२॥ तैसें बोलणें बोलावें । तैसेंचि चालणें चालावें । मग महंतलीला स्वभावें । अंगीं बाणे ॥ २३ ॥ युक्तिविण साजिरा[25] योग । तो दुराशेचा रोग । संगतीच्या लोकांचा भोग । उभा ठेला ॥ २४ ॥ ऐसें न करावें सर्वथा । जनास पाववूं नये व्यथा । हृदयीं चिंतावें समर्था । रघुनाथजीसी ॥ २५ ॥ उदासवृत्तीस मानवे जन । विशेष कथानिरूपण । रामकथा ब्रह्मांड भेदून । पैलाड[26] न्यावी ॥२६॥ सांग महंतीं[27] संगीत गाणें । तेथें वैभवास काय उणें । नभोमाजीं[28] तारांगणें[29] । तैसें लोक ॥२७॥ † अकलबंद नाहीं जेथें । अवघेंचि ‡ विस्कळित तेथें । एक अकलेविण तें । काय आहे ॥ २८ ॥ घालून अकलेचा पवाड[30] । व्हावें ब्रह्मांडाहून वाड[31] । तेथें कैंचें आणिलें द्वाड[32] । करंटपण ॥ २९ ॥ येथें आशंका फिटली । बुद्धि यत्नीं प्रवेशली । कांहीं एक आशा वाटली । अंतर्यामीं ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे द्वादशदशके यत्नशिक्षानिरूपणं नाम नवमः समासः ॥ ९ ॥

---

१ उद्योगानें. * आश्रय २ प्रातःस्मरण. ३ शौचविधीला. ४ पवित्र. ५ रिकामे. ६ धुतलेलीं. ७ पाय धुणें. ८ देवपूजा. ९ विविधपूर्वक. १० उद्योग. ११ परका. १२ नीटपणें. १३ पुनः पुनः विचार करून. ¶ निरनिराळा अर्थ. १४ उघड. १५ अर्थाचें तत्त्व. १६ संबंध, क्रमानें जोडणें. १७ उपमा. १८ हावभाव. १९ सभेचें रंजन करणारीं. २० छंदरचना. २१ संबंधरहित, उणें. २२ जिकीर, त्रास. २३ हेतु समजावा. २४ नामगर्जना, कीर्ति. २५ संसाररूपी रोग. २६ शोभिवंत. २७ पलीकडे. २८ महंत—साधु लोक—त्यामध्यें. २९ आकाशामध्यें. ३० ताऱ्यांचे समूह. † बुद्धिवान्. ‡ अव्यवस्थित. ३१ विस्तार ३२ मोठें.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ आपण यथेष्ट जेवणें । उरलें अन्न तें वांटणें । परंतु वायां दवडणें । हा धर्म नव्हे ॥ १ ॥ तैसें ज्ञानें तृप्त व्हावें । तेंचि ज्ञान जनास सांगावें । तेरतेंन बुडों न द्यावें । बुडतयासी ॥ २ ॥ उत्तम गुण स्वयें घ्यावे । ते बहुतांस सांगावें । वर्तल्याविण बोलावे । ते शब्द मिथ्या ॥ ३ ॥ स्नान संध्या देवतार्चन । एकात्र करावें जपध्यान । हरिकथानिरूपण । केलें पाहिजे ॥ ४ ॥ शरीर परोपकारीं लावावें । बहुतांच्या कार्यास यावें । उणें पडों न द्यावें । कोणी एकाचें ॥ ५ ॥ अडलें गांजलें जाणावें । यथाशक्ति कामास यावें । मृदुवचनें बोलत जावें । कोणी एकासी ॥ ६ ॥ दुसऱ्याचे दुःखें दुःखी व्हावें । परसंतोषें सुखी व्हावें । प्राणिमात्रास मेळवून घ्यावें । बऱ्या शब्दें ॥ ७ ॥ बहुतांचे अन्याय क्षमावे । बहुतांचे कार्यभाग करावे । आपल्यापरी व्हावे । पारिखे जन ॥ ८ ॥ दुसऱ्याचें अंतर जाणावें । तदनुसाराचि वर्तावें । लोकांस परीक्षीत जावें । नाना प्रकारें ॥ ९ ॥ नेमकेंचि बोलावें । तात्काळचि ‡ प्रतिवचन द्यावें । कदापि रागासि न यावें । क्षमारूपें ॥ १० ॥ आळस अवघाच दवडावा । यत्न उदंडचि करावा । शब्दमत्सर न करावा । कोणी एकाचा ॥ ११ ॥ उत्तम पदार्थ दुसऱ्यास द्यावा । शब्द निवडून बोलावा । सावधपणें करीत जावा । संसार आपुला ॥ १२ ॥ मरणाचें स्मरण असावें । हरिभक्तीसि साहर व्हावें । मरोन कीर्तीस उरवावें । येणें प्रकारें ॥ १३ ॥ नेमकपणें वर्तों लागला । तो बहुतांस कळों आला । सर्व आजंवी तयाला । काय उणें ॥ १४ ॥ ऐसा उत्तमगुणीं विशेष । तयास म्हणावें पुरुष । जयाच्या भजनें जगदीश । तृप्त होय ॥ १५ ॥ उदंड धिक्कारून बोलती । तरी चळों न द्यावी शांति । दुर्जनासि मिळोन जाती । धन्य ते साधू ॥ १६ ॥ उत्तम गुणीं शृंगारिला । ज्ञानें वैराग्यें शोभला । तोचि एक जाणावा भला । भूमंडळीं ॥ १७ ॥ स्वयें आपण कष्टावें । बहुतांचें सोशीत जावें । झिजोन कीर्तीस उरवावें । नाना प्रकारें ॥ १८ ॥ कीर्ति पाहूं जातां सुख नाहीं । सुख पाहतां कीर्ति नाहीं । विचारेविण कोठेंचि नाहीं । समाधान ॥ १९ ॥ परांतरास न लावावा § ढका । कदापि पडों न द्याव्या चुका । क्षमाशीळ तयाचा तुका । हानि नाहीं ॥ २० ॥ आपलें अथवा परावें । कार्य अवघेंचि करावें । प्रसंगीं कामास चुकावें । हें विहित नव्हे ॥ २१ ॥ बरें बोलतां सुख वाटतें । हें तों प्रत्यक्ष कळतें । आत्मवत् परावें तें । मानीत जावें ॥ २२ ॥ कठिण शब्दें वाईट वाटतें । हें तों प्रत्ययास येतें । तरी मग वाईट बोलावें तें । काय निमित्त ॥ २३ ॥ आपणास चिमोटा घेतला । तेणें कासावीस झाला । आपणा वरून दुसऱ्याला । राखीत जावें ॥ २४ ॥ जें दुसऱ्यास दुःख करी । तें अपवित्र वैखरी । आपणास घात करी । कोणी एके प्रसंगीं ॥ २५ ॥ पेरिलें तें उगवतें । बोलण्यासारिखें उत्तर येतें । तरी मग कर्कश बोलावें तें । काय निमित्त ॥ २६ ॥ आपुल्या पुरुषार्थ-

---

१ पोहणाऱ्यानें. २ देवपूजन. ३ दुसरे, इतर. ४ मन. ‡ उत्तर. ५ पृथ्वीवर. ६ दुसऱ्याच्या अंतःकरणास. § धक्का. ७ मोठपणा, महत्व. ८ दुसऱ्याचें. ९ योग्य, उचित. १० आपल्याचप्रमाणें परक्याला. ११ चिमटा. १२ वाणी. १३ आपण बोलावें तसा प्रतिध्वनि येतो, १४ लागेल असें, अपशब्द. १५ पुरुषार्थ—पराक्रम—त्याच्या वैभवानें—उत्कर्षानें.

वैभवें । बहुतांस सुखी करावें । परंतु कष्टी करावें । हे राक्षसी क्रिया ॥ २७ ॥ दंभ दर्प अभिमान । क्रोध आणि कठिण वचन । हें अज्ञानाचें लक्षण । भगवद्गीतेंत बोलिलें ॥ २८ ॥ जो उत्तमगुणें शोभला । तोचि पुरुष महा भला । कित्येक लोक तयाला । शोधित फिरती ॥ २९ ॥ क्रियेविण शब्दज्ञान । तेंचि श्वानाचें वमन । भले तेथें अवलोकन । कदापि न करिती ॥ ३० ॥ मनापासून भक्ति करणें । उत्तम गुण अंगत्व धरणें । तया महापुरुषाकारणें । धुंडित येती ॥ ३१ ॥ ऐसा जो महानुभाव । तेणें करावा समुदाव । भक्तियोगें देवाधिदेव । आपला करावा ॥ ३२ ॥ आपण अवचितें मरोन जावें । मग भजन कोणें करावें । याकारणें भजनास लावावे । बहुत लोक ॥ ३३ ॥ आमची प्रतिज्ञा ऐसी । कांहीं न मागावें शिष्यासी । आपणामागें जगदीशासी । भजत जावें ॥ ३४ ॥ याकारणें समुदाव । झाला पाहिजे महोत्साव । हातोपोतीं देवाधिदेव । वोळेसा करावा ॥ ३५ ॥ आतां समुदायाकारणें । पाहिजेत दोनी लक्षणें । श्रोतीं येथें सावधपणें । मन घालावें ॥ ३६ ॥ जेणें बहुतांस घडे भक्ति । ते हे रोकडी प्रबोधशक्ति । बहुतांचें मनोगतें हातीं । घेतलें पाहिजे ॥ ३७ ॥ मागां बोलिले उत्तम गुण । तयांस मानिती प्रमाण । प्रबोधशक्तीचें लक्षण । पुढें चाले ॥ ३८ ॥ बोलण्यासारखें चालणें । स्वयें करून बोलणें । तयांचीं वचनें प्रमाणें । मानिती जनीं ॥ ३९ ॥ जें जें जनासी मानेना । तें तें जनहि मानीना । आपण एकला जन नाना । सृष्टीमध्यें ॥ ४० ॥ म्हणोन सांगातीं असावें । मानत मानत शिकवावें । हळू हळू शेवटा न्यावें । विवेकानें ॥ ४१ ॥ परंतु हीं विवेकाचीं कामें । विवेकी करील नेमें । इतर ते बापुडे भ्रमें । भांडोंच लागले ॥ ४२ ॥ बहुतांसि भांडतां एकला । सैन्यावांचून पुरवला । याकारणें बहुतांला । राजी राखावें ॥ ४३ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे द्वादशदशके उत्तमपुरुषनिदर्शननिरूपणं नाम दशमः समासः ॥ १० ॥

नामरूपदशक तेरावा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ आत्मानात्मविवेक करावा । करून बरा विवरावा । विवरोन सदृढ करावा । जीवामध्यें ॥ १ ॥ आत्मा कोण अनात्मा कोण । त्यांचें करावें विवरण । तेंचि आतां निरूपण । सावध ऐका ॥ २ ॥ चारी खाणी चारी वाणी । चौऱ्यांयशी लक्ष जीवयोनी । संख्या बोलिली पुराणीं । वर्तती आतां ॥ ३ ॥ नाना प्रकारचीं शरीरें । सृष्टींत दिसती अपारें । तयामध्यें निर्धारें । आत्मा कवण ॥ ४ ॥ दृष्टीमध्यें पाहतो । श्रवणामध्यें ऐकतो । रसनेमध्यें स्वाद घेतो । प्रत्यक्ष आतां ॥ ५ ॥ घ्राणामध्यें

---

१ ढोंग. २ गर्व. ३ भ. गी. अ. १६ श्लोक ४. ४ ओक. ५ चांगले मनुष्य, सज्जन. ६ लोक शोधीत येतात. ७ महाश्रेष्ठ, महापराक्रमी. ८ एकाएकीं ९ हातचेहातीं, तात्काळ. १० प्रसन्न होईलसा. ११ उपदेशाचें महात्म्य. १२ हट्टत. १३ चैतन्य व जडाविषयीं विचार. १४ विचार करावा. १५ आहेत. १६ निश्चयपूर्वक. १७ जिव्हेनें. १८ नाकानें.

वास घेतो । सर्वांगीं तो स्पर्शतो । वाचेमध्यें बोलवितो । जाणोनि शब्द ॥६॥ सावधान आणि चंचळ । चहूंकडे चळवळ । एकलाचि चालवी सकळ । इंद्रियद्वारें ॥ ७ ॥ पाय चालवी हात हालवी । भ्रुकुटी[1] पालवी डोळा घालवी । संकेत खुणा बोलवी । तोचि आत्मा ॥ ८ ॥ धिटावी[2] लाजवी खाजवी । खोंकवी ओकवी थुंकवी । अन्न जेऊन उदक सेवी । तोचि आत्मा ॥ ९ ॥ मळमूत्रत्याग करी । शरीर मात्र सांवरी । प्रवृत्ति[3] निवृत्ति[4] विवरी । तोचि आत्मा ॥ १० ॥ ऐके देखे हुंगे चाखे । नाना प्रकारें वोळखे । संतोष पावे आणि धाके[5] तोचि आत्मा ॥ ११ ॥ आनंद विनोद उद्वेग चिंता । काया छाया माया ममता । जीवत्वें पावे समता । तोचि आत्मा ॥ १२ ॥ पदार्थांची आस्था धरी । जरी[6] वाईट बरें करी । आपल्यां राखे पराव्यां मारी । तोचि आत्मा ॥ १३ ॥ युद्ध होतां दोन्हींकडे । नाना शरीरीं वावडे[7] । परस्परें पाडी पडे । तोचि आत्मा ॥ १४ ॥ तो येतो जातो देहीं वर्ततो । हांसतो रडतो पस्तावतो । समर्थ करंटा होतो । व्यापा-सारिखा ॥ १५ ॥ होतो लंडी[8] होतो बळकट । होतो विद्यावंत होतो धीट[9] । न्यायवंत होतो उद्धट । तोचि आत्मा ॥ १६ ॥ धीर उदार कृपण । वेडा आणि विचक्षण । उत्संगळ[10] आणि सहिष्णु[11] तोचि आत्मा ॥ १७ ॥ विद्या कुविद्या दोहींकडे । आनंदरूप वावडे । जेथें तेथें सर्वांकडे । तोचि आत्मा ॥ १८ ॥ निजे उठे बैसे चाले । धांवें † धांवडी डोले तोले । सोइरे धाइरे केले । तोचि आत्मा ॥ १९ ॥ पोथी वाची अर्थ सांगे । ताल धरी गाऊं लागे । वाद विवाद वाउगे । तोचि आत्मा ॥ २० ॥ आत्मा नसतां देहांतरीं[12] । मग तें प्रेत चराचरीं । देहसंगें आत्मा करी । सकळ कांहीं ॥ २१ ॥ एकेविण एक काय । कामा नये वायां जाय । म्हणोनि हा उपाय । देहात्ममयोगें[13] ॥ २२ ॥ देह अनित्य[14] आत्मा नित्य । हाचि विवेक नित्यानित्य । अवघें सूक्ष्माचें कृत्य । जाणती ज्ञानी ॥ २३ ॥ पिंडीं[15] देहधर्ता जीव । ब्रह्मांडीं देहधर्ता शिव । ईश्वरतनुचतुष्टय[16] सर्व । ईश्वर धर्ता ॥ २४ ॥ त्रिगुणापरता जो ईश्वर । अर्धनारीनटेश्वर[17] । सकळ सृष्टीचा विस्तार । तेथून जाहला ॥ २५ ॥ बरवें विचारून पाहीं । स्त्रीपुरुष तेथें नाहीं[18] । चंचळ रूप येतें कांहीं । प्रत्ययासी ॥ २६ ॥ मुळींहूनि शेवटवरी । ब्रह्मादि पिपीलिकेंपर्यंत[19] देहधारी । नित्या-नित्यविवेक चतुरीं[20] । जाणिजे ऐसा ॥२७॥ जड तितुकें अनित्य । आणि सूक्ष्म तितुकें नित्य । याहींमध्यें नित्यानित्य । पुढें निरूपिलें ॥ २८ ॥ स्थूळ[21] सूक्ष्म[22] वोलांडिलें । कारण[23] महाकारण[24] सांडिलें । विराट[25] हिरण्यगर्भ[26] खांडिलें । विवेकानें ॥ २९ ॥ अव्याकृत[27] मूळप्रकृति[28] । तेथें जाऊनि बैसली वृत्ति[29] । ते वृत्ति व्हावया निवृत्ति[30] । निरूपण ऐका ॥ ३० ॥ आत्मानात्म-

---

१ भोंवयांनां खुणावतो. २ धीट करवितो. ३ प्रपंच. ४ मोक्ष. ५ भिऊन जातो. ६ त्रास, दुःख. ७ इतरांना. ८ वावरतो, भटकतो. ९ उद्योगाप्रमाणें. १० भित्रा. ११ धीट, निश्चयी. १२ व्यवहारचतुर. १३ आडदांड, स्वच्छंद. १४ सोशिक. † धांवावयास लावतो. १५ शरीरामध्यें. १६ देह आणि आत्मा यांच्यायोगें. १७ नाशवंत. १८ लिंगशरीराचें. १९ शरीरीं. २० ईश्वराचें चार देह. २१ अर्धा पुरुष व अर्धी स्त्री. २२ मुंगी. २३ पिंडाचे चार देह. २४ ईश्वराचे चार देह. २५ मनोवृत्ति. २६ नाहीं. २७ विवेचन.

विवेक बोलिला । चंचळ आत्मा प्रत्यया आला । पुढिलिये समासीं निरूपिला । सारासारविचार ॥ ३१ ॥ इति श्रीदासबोधे गुरु-शिष्यसंवादे त्रयोदशदशके आत्मानात्मविवेकनिरूपणं नाम प्रथमः समासः ॥ १ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ऐका सारासारविचार । उभारले जगडंबेर । त्यांत कोण सार कोण असार । विवेकें वोळखा ॥ १ ॥ दिसेल तें नासेल । आणि येईल तें जाईल । जें असतचि असेल । तेंचि सार ॥ २ ॥ मागां आत्मानात्मविवेक बोलिला । अनात्मा वोळखून सांडिला । आत्मा जाणतां लागला । मुळींचा मूलतंतु ॥ ३ ॥ मुळीं जें राहिली वृत्ति । ते झाली पाहिजे निवृत्ति । सारासार विचार श्रोतीं । बरा पाहावा ॥ ४ ॥ नित्यानित्य विवेक केला । आत्मा नित्यसा निवडिला । निवृत्तिरूपें हेत उरला । निर्विकारीं ॥ ५ ॥ हेत म्हणिजे तो चंचळ । निर्गुण म्हणिजे तें निश्चळ । सारासारविचारें चंचळ । होऊन जातें ॥ ६ ॥ चळे म्हणोनि तें चंचळ । न चळे म्हणोनि निश्चळ । निश्चळीं उडे चंचळ । निश्चयेसी ॥ ७ ॥ ज्ञान आणि उपासना । दोन्ही एकचि पाहाना । उपासनेकरितां जना । जगदुद्धार ॥ ८ ॥ द्रष्टा साक्षी जाणता । ज्ञानघन चैतन्यसत्ता । ज्ञान देवचि तत्त्वतां । बरें पाहा ॥ ९ ॥ त्या ज्ञानाचें विज्ञान होतें । शोधून पाहा बहुमतें । चंचळ अवघें नासतें । येणेंप्रकारें ॥ १० ॥ नाशवंत नासेल कीं नासेना । ऐसा अनुमानाचि आहे मना । तरी तो पुरुष सहसा ज्ञाना-। अधिकारी नव्हे ॥ ११ ॥ नित्य निश्चय केला । संदेह उरतचि गेला । तरी तो जाणावा वाहावला । महामृगजळीं ॥ १२ ॥ क्षयचि नाहीं जो अक्षयी । व्यापकपणें सर्वांठायीं । तेथें हेतु संदेह नाहीं । निर्विकारीं ॥ १३ ॥ जें उदंड घनदाट । आद्य मध्य शेवट । अचळ अढळ अतुट । जैसें तैसें ॥१४॥ पाहातां जैसें गगन । गगनाहून तें सघन । जनचि नाहीं निरंजन । सदोदित ॥ १५ ॥ चर्मचक्षु ज्ञानचक्षु । हा तो अवघा पूर्वपक्षु । निर्गुण ठायींचा अलक्षु । लक्षवेना ॥ १६ ॥ संगत्यागेविण कांहीं । परब्रह्म होणार नाहीं । संगत्याग करूनि पाहीं । मौनेगर्भा ॥ १७ ॥ निरसितां[16] अवघेंच निरसिलें । चंचळ तितुकें निघोन गेलें । निश्चळ परब्रह्म उरलें । तेंचि सार ॥ १८ ॥ आठवा देह मूळमाया । निरसोन गेल्या अष्टकाया । साधु सांगती उपाया । कृपाळूपणें ॥ १९ ॥ सोहंहंसः[17] तत्त्वमसि । तें तूं ब्रह्म आहेसी । विचार पाहतां स्थिति ऐसी । सहजचि होते ॥ २० ॥ साधक असोन ब्रह्म उरलें । तेथें वृत्तिशून्य झालें । सारासार विचारिलें । येणें प्रकारें ॥ २१ ॥ तें तापेना ना निवेना । तें * उजळेना ना काळवंडेना । डहुळेना ना निवळेना । परब्रह्म तें ॥ २२ ॥ तें भिजेना ना वाळेना । तें विझेना ना जळेना । जयास कोणीच नेईना । परब्रह्म तें ॥ २३ ॥ दिसेना ना भासेना ।

---

१ जगाचा विस्तार. २ विकाररहित परब्रह्माचे ठिकाणीं. ३ भक्ति. ४ पाहागारा. ५ ज्ञानपूर्ण. ६ अनुभवज्ञान. ७ संशय, शंका. ८ संशय. ९ दाट. १० व्यापक. ११ जनरहित. १२ शंका, आक्षेप. १३ मूळचा. १४ न पहातां येण्यासारखा. १५ अनिर्वाच्य ब्रह्माला. १६ नाहींसें करतां. १७ तो मी, मी तो. १८ तें तूं आहेस. १९ वृत्तिरहित. * स्वच्छ होत नाहीं, २० काळें होत नाहीं. २१ गदुळ होत नाहीं, ढवळलें जात नाहीं.

उपजेना ना नासेना । तें येईना ना जाईना । परब्रह्म तें ॥ २४ ॥ जें सन्मुखाचि चहूंकडे । जेथें दृश्यभास घडे । धन्य साधु तो पैहुंडे । निर्विकारीं ॥ २५ ॥ निर्विकल्पीं कल्पनातीत । तोचि वोळखावा संत । येर अवघेंचि असंत । भ्रमरूप ॥ २६ ॥ खोटें सांडून खरें घ्यावें । तरीच परीक्षवंत म्हणावें । असार सांडून सार घ्यावें । परब्रह्म तें ॥ २७ ॥ जाणतां जाणतां जाणीव जाते । आपुली वृत्ति तद्रूप होते । आत्मनिवेदन भक्ति ते । ऐसी आहे ॥ २८ ॥ वाच्यांशें भक्ति मुक्ति बोलावी । लक्ष्यांशें तद्रूपता विवरावी । विवरितां हेतु नुरवी । ते तद्रूपता ॥ २९ ॥ सद्रूप चिद्रूप आणि तद्रूप । स्वस्वरूप म्हणिजे आपलें रूप । आपलें रूप म्हणिजे अरूप । तत्त्वनिरसनाउपरी ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे त्रयोदशदशके सारासार निरूपणं नाम द्वितीयः समासः ॥ २ ॥

श्रीगणेशाय एमः ॥ ॥ ब्रह्म घन आणि पोकळ । आकाशाहूनि विशाळ । निर्मळ आणि निश्चळ । निर्विकारी ॥ १ ॥ ऐसें असतां कितेक काळ । तेथें आरंभिला भूगोळ । तया भूगोळाचें मूळ । सावध ऐका ॥ २ ॥ परब्रह्म असतां निश्चळ । तेथें संकल्प उठिला चंचळ । तयासि बोलिजे केवळ । आदिनारायण ॥ ३ ॥ मूळमाया जगदीश्वर । त्यासि म्हणिजे षड्गुणेश्वर । अष्टधा प्रकृतीचा विचार । तेथें पाहा ॥ ४ ॥ ऐलीकडे गुणक्षोभिणी । तेथें जन्म घेतला त्रिगुणीं । मूळ ओंकाराची मांडणी । तेथूनि जाणावी ॥ ५ ॥ अकार उकार मकार । तिन्हीं मिळोनि ओंकार । पुढें पंचभूतांचा विस्तार । विस्तारला ॥ ६ ॥ आकाश म्हणिजे अंतरात्म्यासी । तयापासोनि जन्म वायूसी । तया वायूपासून तेजासी । जन्म जाहला ॥ ७ ॥ वायूचा कातरा घसवटे । तेणें उष्णें वन्हि पेटे । सूर्यबिंब तें प्रकटे । तये ठायीं ॥ ८ ॥ वारा वाजतो शीतळ । तेथें निर्माण झालें जळ । तें जळ आळूनि भूगोळ । निर्माण झाला ॥ ९ ॥ त्या भूगोळाचे पोटीं । अनंत बीजांचिया कोटी । पृथ्वीपाण्या होतां भेटी । अंकुर निघती ॥ १० ॥ वृक्ष वल्ली नानारंग । पत्रें पुष्पांचे तरंग । नाना स्वाद तेथें मग । फळें जाहलीं ॥ ११ ॥ पत्रें पुष्पें फळें मूळें । नानावर्णें नाना रसाळें । नाना धान्यें अन्नें केवळें । तेथून जाहलीं ॥ १२ ॥ अन्नापासूनि झालें रेत । रेतापासून प्राणी निपजत । ऐसी हे रोकडी प्रचीत । उत्पत्तीची ॥ १३ ॥ अंडज जारज स्वेदज उद्भिज । पृथ्वी पाणी सकळांचें बीज । ऐसें हें नवल चोज । सृष्टिरचनेचें ॥ १४ ॥ चारी खाणी चारी वाणी । चौऱ्यांयशी लक्ष जीवयोनी । निर्माण झाले लोक तिन्ही । पिंडब्रह्मांड ॥ १५ ॥ मुळीं अष्टधा प्रकृति । अवघे पाण्यापासून जन्मती । पाणी

---

१ निजतो. २ तदाकार. ३ वाचेनें बोलण्याजोगा भाग त्यानें. ४ उपासना. ५ वाच्यांश टाकून अवशिष्ट ब्रह्म–प्रयगात्मा त्यानें. ६ ज्ञानरूप. ७ तत्त्वविवेचनानंतर. ८ दाट, भरलेलें ९ मोठें. १० आठ प्रकारच्या. ११ मायेचा. १२ गुणांना प्रकट करणारी. १३ अग्नीला. १४ तिरकस येणारे दोन ओघ. १५ घट्ट होऊन. १६ वेल. १७ समुदाय. १८ गोड. १९ शुक्र. २० पक्षी वगैरे. २१ मनुष्यें वगैरे. २२ घामापासून झालेले, उवा वगैरे. २३ वृक्ष वगैरे. २४ कौतुक. २५ अंडज, जारज, स्वेदज, उद्भिज या चार खाणी. २६ परा, पश्यंती, मध्यमा, वैखरी, या चार वाणी. २७ एका जीवयोनीपासून तों सर्व जगत.

नसतां मरती । सकळ प्राणी ॥ १६ ॥ नव्हे अनुमानाचें बोलणें । याचा बरा प्रत्यय[1] घेणें । वेद शास्त्रें पुराणें । प्रत्ययें घ्यावीं ॥ १७ ॥ जें आपल्या प्रत्यया येईना । तें अनुमानिक घ्यावें ना । प्रत्ययेंविण सकळ जना । व्यवसाय[2] नाहीं ॥ १८ ॥ व्यवसाय[3] प्रवृत्ति[4] निवृत्ति[5] । दोहींकडे पाहिजे प्रचीति । प्रचीतीवीण अनुमानें अज्ञती । ते विवेकहीनें ॥ १९ ॥ ऐसा सृष्टिरचनेचा विचार । संकलित[6] बोलिला प्रकार । आतां विस्ताराचा[7] संहार[8] । तोहि ऐका ॥ २० ॥ मुळापासून शेवटवरी । अथवा अंतरात्माचि करी । करी आणि विवरी[9] । यथायोग्य ॥ २१ ॥ पुढें संसार निरोपिला । श्रोतीं पाहिजे ऐकिला । इतुक्या उत्तरी झाला । समास पूर्ण ॥ २२ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे त्रयोदशदशके उभारणीनिरूपणं नाम तृतीयः समासः ॥ ३ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ पृथ्वीस होईल अंत । भूतांस मांडेल कैलासांत । ऐसा समाचार सांगत[10] । शास्त्रीं निरोपिला ॥ १ ॥ शतवर्षें अनावृष्टि । तेणें जळेल हे सृष्टि । पर्वत मोंती ऐसी पृथ्वी[11] । भूमीची तेंडके ॥ २ ॥ बारा कळीं सूर्यमंडळा । किरणापासूनी निघती ज्वाळा । शत वरुषें भूगोळा । देहेंन होय ॥ ३ ॥ ❀ सिंदूरवर्ण वसुंधरा[12] । ज्वाळा लागती फणिवरा[13] । तो आंहाळोन सरोरां[14] । विष वमी[15] ॥ ४ ॥ त्या विषाच्या ज्वाळा निघती । तेणें पाताळें जळती । महापावकें भस्म होती । पाताळलोक ॥ ५ ॥ तेथें महाभूतें खवळती । प्रळयवात सुटती । प्रळयपावक वाढती । चहूंकडे ॥ ६ ॥ तेथें अक्रा रुद्रें खवळले । बारा सूर्य कडाडिले । पावकमात्र एकवटिले । प्रळयकाळीं ॥ ७ ॥ वायु विजांचे तडाके । तेणें पृथ्वी अवघीच तडके । कठिणत्व अवघेंचि फांके । चहूंकडे ॥ ८ ॥ तेथें मेरूची कोण गणना । कोण सांभाळील कोणा । चंद्र सूर्य तारांगणा[16] । सूप जाहली ॥ ९ ॥ पृथ्वीनें विरी[17] सांडिली । अवघी धगधगायमान झाली ब्रह्मांडभट्टी जळोन गेली । एकसरां ॥ १० ॥ जळोनि विरी सांडिली । विशेष महावृष्टि झाली । तेणें पृथ्वी विराली । मळामध्यें ॥ ११ ॥ भाजला चुना जळीं विरे[18] । तैसा पृथ्वीस धीर न धरे । विरी सांडूनिया त्वरें । जळीं मिळाली ॥ १२ ॥ शेष कूर्म वराह गेला । पृथ्वीचा आधार तुटला । सत्त्व सांडून * जळाला । मिळोन गेली ॥ १३ ॥ तेथें प्रळयमेघ उचलले । कठिण घोषें गर्जिन्नले । अखंड विजा कडकडिले । ध्वनिघोष[19] ॥ १४ ॥ पर्वतप्राय पडती गारा । पर्वत उडती ऐसा वारा । निबिड तया अंधकारा । उपमाच नाहीं ॥ १५ ॥ सिंधु नद्या एकवटल्या । नेणों नभींहूनि रिचेवल्या ।

---

१ अनुभव. २ उद्योग, धंदा. ३ प्रपंचमार्ग, ४ मोक्षमार्ग. ५ विचारशून्य. ६ थोडक्यांत. ७ सृष्टिविस्ताराचा. ८ नाश. ९ स्पष्ट–उघड करतो. १० हें संक्षेपाने–थोडक्यांत–विवेचन. ११ कल्पाचे शेवटीं होणारा प्रळय. १२ आरंभापासून अखेरपर्यंत संपूर्ण. १३ अवर्षण. १४ मातील. १५ पृष्ठभाग. १६ फाटते, तडकते. १७ जळणें. ❀ शेंदरी रंगाच्या. १८ पृथ्वी. १९ शेषाला. २० पोळून. २१ सरसरां. २२ ओकतो २३ मोठ्या अग्नीनें. २४ शंकर. २५ मित्र, रवि, सूर्य, भानु, इत्यादि बारा सूर्य. २६ ताऱ्यांच्या समूहाला. २७ वीर्य, शक्ति, काठिण्यपणा. २८ विरघळून जातो. * पाण्यांत २९ गर्जना. ३० ओतल्या.

संधी नाहीं धारा मिळाल्या । अखंड पाणी ॥ १६ ॥ तेथें मत्स्य कूर्म सर्प पडती । पर्वतासारखे दिसती । गर्जना होतां मिसळती । जळांत जळें ॥ १७ ॥ सप्त सिंधू आवरणीं गेले । आवरण वेढे मोकळे झाले । जळरूप झालिया खवळले । प्रळयपावक ॥ १८ ॥ ब्रह्मांडाऐसा तप्त लोहो । शोषी जळाचा समूहो । तैसें जळा झालें पाहो । अपूर्व मोठें ॥ १९ ॥ तेणें आटोन गेलें पाणी । असंभाव्य माजला वन्ही । तया वन्हीस केली झडपणी । प्रळयवातें ॥ २० ॥ दीपास पालवें घातला । तैसा प्रळयपावक विझाला । पुढें वायु प्रबळला । असंभाव्य ॥ २१ ॥ उदंड पोकळी थोडा वारा । तेणें वितळोन गेला सारा । पंचभूतांचा पसारा । आटोपला ॥ २२ ॥ महद्भूत मूळमाया । विस्मरणें वितळे काया । पदार्थ मात्र राहावया । ठाव नाहीं ॥ २३ ॥ दृश्य हलकल्लोळें नेलें । जड चंचळ वितुळलें । याउपरी शाश्वत उरलें । परब्रह्म तें ॥ २४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे त्रयोदशदशके प्रलयनिरूपणं नाम चतुर्थः समासः ॥ ४ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ कोणी एक दोघे जण । पृथ्वी फिरती उदासीन । कालक्रमणेलागून । कथा आरंभिली ॥ १ ॥ श्रोता पुसे वक्तयासी । काहणी सांगा जी बरवीसी । वक्ता म्हणे श्रोतयासी । सावध ऐका ॥ २ ॥ एकें स्त्रीपुरुषें होतीं । उभयतांमध्यें बहु प्रीति । एकरूपेंचि वर्तती । भिन्न नाहीं ॥ ३ ॥ ऐसा कांहींएक काळ लोटला । तयांस एक पुत्र झाला । * कार्यकर्ता आणि भला । सर्वविषयीं ॥ ४ ॥ पुढें त्यासहि झाला कुमर । तो पित्याहून आतुर । कांहीं तेदर्धे चतुर । व्यापकपणें ॥ ५ ॥ तेणें व्योप उदंड केला । बहुत कन्यापुत्रीं व्याला । उदंड लोक संचिला । नाना प्रकारें ॥ ६ ॥ त्याचा पुत्र जो ज्येष्ठ । तो अज्ञान आणि रागीट । अथवा चुकतां नीट । संहार करी ॥ ७ ॥ पिता उगाच बैसला । लेकें बहुत व्याप केला । सर्व जाणता भला । ज्येष्ठ पुत्र ॥ ८ ॥ नातू त्याचें अर्ध जाणे । पणतू तो कांहींच नेणें । चुकतांचि संहारणें । महाक्रोधी ॥ ९ ॥ लेंक सकळांचें पाळण करी । नातू मेळवी वरच्यावरी । पणतू चुकल्या संहार करी । अकस्मात् ॥ १० ॥ नेमस्तपणें वंश वाढला । विस्तार उदंडाचे झाला । ऐसा बहुत काळ गेला । आनंदरूप ॥ ११ ॥ विस्तार वाढला गणवेना । वाडिलांस कोणीच मानीना । परस्परें किंतु मना । बहुत पडिले ॥ १२ ॥ उदंड घरकलह लागला । तेणें कित्येक संहार झाला । विपत्ति पडिलें थोर थोरांला । बेबंद जाहलें ॥ १३ ॥ नेणपणें भरीं भरले । मग ते अवघे संहारले । जैसे यादव निमाले । उन्मत्तपणें ॥ १४ ॥ बाप लेंक नातू पणतू । सकळांचा झाला निःपातू । कन्यापुत्रहेतुमातू । अणुमात्र नाहीं ॥ १५ ॥ ऐसी कहाणी जो विवरला । तो जन्ममृत्यूपासून सुटला । श्रोता वक्ता धन्य झाला ।

---

१ आच्छादनामध्यें. २ प्रलयकालचे अग्नी. ३ लोखंड. ४ पदर. ५ स्फुरण बंद होतांच. ६ सनातन, अविनाशी. ७ गोष्ट. ८ अहो. ९ चांगलीशी. १० प्रकृति व पुरुष. ११ रहात होते. १२ सत्वगुण विष्णु. * उद्योगी. १३ मुलगा, रजोगुण, ब्रह्मदेव. १४ त्याच्या अध्यांनें. १५ पसारा. १६ सर्व स्त्रीपुरुष प्रजा. १७ तमोगुण, रुद्र, शंकर. १८ पुरुष. १९ सत्वगुणानें, विष्णूनें. २० सत्वगुण, विष्णु. २१ रजोगुण, ब्रह्मा. २२ तमोगुण, शंकर. २३ नाश करणें. २४ सत्वगुण, विष्णु. २५ रजोगुण, ब्रह्मा. २६ तमोगुण, शंकर. २७ संशय. २८ वैर. २९ कोणी शास्ता नाहीं असे अव्यवस्थित. ३० नाशपावले. ३१ नाश. ३२ मुली, मुलगे, यासंबंधीं उद्देश किंवा गोष्ट. ३३ जाणून चुकला.

प्रचीतीनें ॥ १६ ॥ ऐसी कहाणी अपूर्व जे ते । उदंड घेळ होते जाते । इतुकें बोलून गोसावी ते । निवांत जाहले ॥ १७ ॥ आमची कहाणी सरो । तुमचे अंतरीं भरो । ऐसें हें बोलणें विवरो । कोणी तरी ॥ १८ ॥ चुकत वाकत आठवलें । तितुकें संकोळित बोलिलें । न्यून पूर्ण क्षमा केलें । पाहिजे श्रोतीं ॥ १९ ॥ ऐसी काहाणी निरंतर । विवेकें ऐकती जे नर । दास म्हणे जगदोद्धार । तेचि करिती ॥ २० ॥ त्या जगदोद्धाराचें लक्षण । केलें पाहिजे विवरण । सार निवडावें निरूपण । यासी बोलिजे ॥ २१ ॥ निरूपणीं प्रत्ययें विवरावें । नाना तत्त्वकोडें उकलावें । समजतां समजतां व्हावें । निःसंदेह ॥ २२ ॥ विवरोन पाहतां अष्टदेह । पुढें सहजचि निःसंदेह । अखंड निरूपणें राहे । समाधान ॥ २३ ॥ तत्त्वांचा गलबला जेथें । निवांत कैसें असेल तेथें । याकारणें गुंलीपरतें । कोणी एकें असावें ॥ २४ ॥ ऐसा सूक्ष्म संवाद । केलाचि करावा विशद । पुढिले समासीं लघु बोध । सावध ऐका ॥ २५ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे त्रयोदशदशके काहाणी-निरूपणं नाम पंचमः समासः ॥ ५ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ जें बोलिजेती पंचतत्त्वें । त्यांचीं अभ्यासाया नांवें । तदुपरी स्वानुभवें । रूपें जाणावीं ॥ १ ॥ यामध्यें शाश्वत कोण । आणि अशाश्वत कोण । ऐसें करावें विवरण । प्रत्ययाचें ॥ २ ॥ पंच भूतांचा विचार । नांव रूप सारासार । तोचि बोलिजेल निर्धारें । सावध ऐका ॥ ३ ॥ पृथ्वी आप तेज वायु आकाश । नांवें बोलिलीं सावकाश । आतां रूपाचा विश्वास । श्रवण करावा ॥ ४ ॥ पृथ्वी म्हणिजे ते धरणी । आप म्हणिजे तें पाणी । तेज म्हणिजे अग्नि तरणी । सतेजादिक ॥ ५ ॥ वायु म्हणिजे तो वारा । आकाश म्हणिजे पैसे सारा । आतां शाश्वत तें विचारा । आपुलें मनीं ॥ ६ ॥ एक शीत चांचपावें । म्हणिजे वर्म पडे ठावें । तैसें थोड्या अनुभवें । बहुत जाणावें ॥ ७ ॥ पृथ्वी रचते आणि खचते । हें तों प्रत्ययास येतें । नाना रचना होत जाते । सृष्टीमध्यें ॥ ८ ॥ म्हणोन रचतें तें खचतें । आप तेंहि आटोन जातें । तेजहि प्रकटोन विझतें । वारेंहि न राहे ॥ ९ ॥ आकाश नाम मात्र आहे । तेंहि विचारितां न राहे । एवं पांचभौतिकें राहे । हें तों घडेना ॥ १० ॥ ऐसा पांचा भूतांचा तो विस्तार । नाशवंत हा निर्धार । शाश्वत आत्मा निराकार । सत्य जाणावा ॥ ११ ॥ आत्मा कोणास कळेना । ज्ञानेविण आकळेना । म्हणोनिया संतजना । विचारावें ॥ १२ ॥ विचारितां सज्जनांसी । ते म्हणती कीं अविनाशी । जन्म मृत्यु आत्मयासी । बोलोंच नये ॥ १३ ॥ निराकारीं भासे आकार । आणि आकारीं भासे निराकार । निराकार आणि आकार । विवेकें ओळखावा ॥ १४ ॥ निराकार जाणावा नित्य । आकार जाणावा अनित्य । यासि बोलिजे नित्यानित्य-। विचारणा ॥ १५ ॥ सारीं भासे असार । आणि असारीं भासे सार । सारासार विचार । शोधून पहावा ॥ १६ ॥ पांचभौतिक ते मायिकें । परंतु

१ संक्षेपानें. २ तत्त्वांतील मर्म. ३ संशयरहित. ४ गलबल्यापलीकडे. ५ निश्चय. ६ पाणी. ७ अग्नि. ८ सूर्य. ९ विस्तार. १० पृथ्वी, आप इत्यादि पंचभूतांपासून झालेलें ११ समजत नाहीं. १२ लटकें, खोटें.

भासे अनेक । आणि आत्मा एक । व्यापून असे ॥ १७ ॥ चहूं भूतांमध्यें गगन । तैसें गगनीं असे सघन । नेहटून पाहतां अभिन्न । गगन आणि वस्तु ॥ १८ ॥ उपाधि-योगेंचि आकाश । उपाधि नसतां निराभास । निराभास तें आवेनाश । तैसें गगन ॥ १९ ॥ आतां असो हे विवंचना । परंतु जें पाहतां नासेना । तेंगे तेंचि अनुमाना । विवेकें आणावें ॥ १९ ॥ परमात्मा तो निराकार । जाणिजे हाहि विचारसार । आणि आपण कोण हा विचार । पाहिजे ॥ २० ॥ देहास अंत येतां । वायु जातो तत्त्वतां । हें लटिकें म्हणाल तरी आतां । श्वासोच्छ्वास धरावा ॥ २२ ॥ श्वास कोंडता देह पडे । देह पडतां म्हणती मेलें । मड्यास कर्तृत्व न घडे । कदा काळीं ॥ २३ ॥ देहा-वेगळा वायु न करी । वायुवेगळा देह न धरी । विचार पाहतां कांहींच न करी । एकावेगळें एक ॥ २४ ॥ उगेंच पाहतां मनुष्य दिसे । विचार घेतां कांहींच नसे । अभेदभक्तीचें लक्षण ऐसें । वोळखावें ॥ २५ ॥ कर्ता आपण ऐसें म्हणावें । तरी आपले इच्छेसारिखें व्हावें । इच्छेसारिखें न होतां मानावें । अवघेंचि ♔ वाव ॥ २६ ॥ म्हणोन कर्ता नव्हे कीं आपण । तेथें भोक्ता कैंचा कोण । हेंहि विचाराचें लक्षण । अविचारें न घडे ॥ २७ ॥ अविचार आणि विचार । जैसा प्रकाश आणि अंधकार । विकार आणि निर्विकार । एक नव्हे कीं ॥ २८ ॥ जेथें नाहीं विवं-चना । तेथें कांहींच चालेना । खरें तेंचि अनुमाना । कदा न ये ॥ २९ ॥ प्रत्ययासि बोलिजे न्याय । अप्रत्यय तो अन्याय । जात्यंधास परीक्षा काय । नाना रत्नांची ॥ ३० ॥ म्हणो ज्ञाता धन्यधन्य । जो निर्गुणासि अनन्य । आत्मनिवेदनें मान्य । परम पुरुष ॥ ३१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे त्रयोदशदशके लघुबोध निरूपणं नाम षष्ठः समासः ॥ ६ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ निर्मळ निश्चळ निराभास । तयास दृष्टांत आकाश । आकाश म्हणिजे अवकाश । पसरला पैस ॥ १ ॥ आधीं* पैस मग पदार्थ । प्रत्यय पाहतां यथार्थ । प्रत्ययेविण पाहतां व्यर्थ । सकळ कांहीं ॥ २ ॥ ब्रह्म म्हणिजे तें निश्चळ । आत्मा म्हणिजे तो चंचळ । तयांस दृष्टांत केवळ । वायु जाणावा ॥ ३ ॥ घटाकाश दृष्टांत ब्रह्माचा । घटबिंब दृष्टांत आत्म्याचा । विवरितां अर्थ दोहींचा । भिन्न आहे ॥ ४ ॥ भूत म्हणिजे जितुकें झालें । झालें तितुकें निमालें । चंचळ आलें आणि गेलें । ऐसें जाणावें ॥ ५ ॥ अविद्या जड आत्मा चंचळ । जड कर्पूर आत्मा अनळ । दोन्ही जळोन तात्काळ । विझोन जाती ॥ ६ ॥ ब्रह्म आकाश निश्चळ जाती । आत्मा वायु चंचळ जाती । परीक्षवंत परीक्षिती । खरें कीं खोटें ॥ ७ ॥ जड अनेक आत्मा एक । ऐसा आत्मानात्मविवेक । जगा वर्तविता जगन्नायक । तयास म्हणावें ॥ ८ ॥

---

१ दाट. २ लक्ष्य लावून. ३ उपसर्गामुळें. ४ टिकतें. ५ प्रेत. ♔ व्यर्थ, खोटें. ६ जन्मतःच जो अंधळा त्याला. ७ एकनिष्ठ. ८ देहसमर्पणानें. * पोकळी, जागा. ९ घागरीतील आकाश, पोकळी. १० घागरींतील पाण्यांत दिसणारी आकृति. ११ नाश पावलें. १२ अज्ञान, माया. १३ अग्नि. १४ आत्मा—चैतन्य आणि अनात्मा—जड यासंबंधीं विचार.

जड आनात्मा चेतवी आत्मा । सर्वीं वर्ते सर्वात्मा । अवघा मिळोन चंचळ आत्मा । निश्चळ नव्हे ॥ ९ ॥ निश्चळ तें परब्रह्म । जेथें नाहीं दृश्यभ्रम । विमळ ब्रह्म तें निर्भ्रम जैसें तैसें ॥ १० ॥ आधीं आत्मानात्मविवेक थोर । मग सारासारविचार । सारासार-विचारें संहार । प्रकृतीचा ॥ ११ ॥ विचारें प्रकृति संहारें । दृश्य असतांच वोसरे । अंत-रात्मा निर्गुणी संचरे । अध्यात्मश्रवणें ॥ १२ ॥ चढता अर्थ लागला । तरी अंतरात्मा चढतचि गेला । उतरल्या अर्थें उतरला । भूमंडळीं ॥ १३ ॥ अर्थासारिखा आत्मा होतो । जिकडे नेला तिकडे जातो । अनुमानें संदेहीं पडतो । कांहीं एक ॥ १४ ॥ निःसंदेह अर्थ चालिला । तरी आत्मा निःसंदेहचि झाला । अनुमान अर्थें झाला । अनुमानरूपी ॥ १५ ॥ नेवरसिक अर्थ चाले । श्रोते तद्रूपचि झाले । चाटपणें होऊन गेले चाटचि अवघे ॥ १६ ॥ जैसा जैसा घडे संग । तैसे गुहिऱ्याचे रंग । याकारणें उत्तम मार्ग । पाहोन धरावा ॥ १७ ॥ उत्तम अन्नें बोलत गेलें । तरी मन अन्नाकाराचि झालें । लावण्य वनितेचें वर्णिलें । तरी मग तेथेंचि बैसे ॥ १८ ॥ पदार्थवर्णन आवघें । किती म्हणोन सांगावें । परंतु अंतरीं समजावें । होय कीं नव्हे ॥ १९ ॥ जें जें देखिलें आणि ऐकिलें । तें अंतरीं सदृढ बैसलें । हित अनहित परीक्षिलें । परीक्षावंतीं ॥ २० ॥ याकारणें सर्व सांडावें । एक देवास धुंडावें । तरीच वर्म पडे ठावें । कांहीं एक ॥ २१ ॥ नाना सुखें देवें केलीं । लोकें तयास चुकलीं । ऐसी चुकतांच गेलीं । जन्मवरी ॥ २२ ॥ सर्व सांडून शोधा मजला । ऐसा देवचि बोलिला । लोकीं शब्द अमान्य केला । भग-वंताचा ॥ २३ ॥ म्हणोनि नाना दुःखें भोगिती । सर्वकाळ कष्टी होती । मनीं सुखचि इच्छिती । परी तें कैंचें ॥ २४ ॥ उदंड सुख जया लागलें । वेडे तयास चुकले । सुख सुख म्हणतांच मेले । दुःख भोगित ॥ २५ ॥ शाहण्यानें ऐसें न करावें । सुख होय तेंचि करावें । देवास धुंडीत जावें । * ब्रह्मांडापरतें ॥ २६ ॥ मुख्य देवचि ठायीं पडला । मग काय उणें तयाला । लोक वेडे विवेकाला । सांडूनि जाती ॥ २७ ॥ विवेकाचें फळ तें सुख । अविवेकाचें फळ तें दुःख । यांत मानेल तें अवश्यक । केलें पाहिजे ॥ २८ ॥ कर्त्यासि वोळखावें । यासि विवेक म्हणावें । विवेक सांडितां व्हावें । परम दुःखी ॥ २९ ॥ आतां असो हें बोलणें । कर्त्यास वोळखणें । आपलें हित विचक्षणें । चुकों नये ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे त्रयोदशदशके प्रत्ययनिरूपणं नाम सप्तमः समासः ॥ ७ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ श्रोता म्हणे वक्त्यासी । कोण कर्ता निश्चयेंसी । सकळ सृष्टि ब्रह्मांडासी । कोणें केलें ॥ १ ॥ तंव बोलिले सभानायक । जें बोलिलें एकाहून

---

१ दृश्य=जड त्याचे मिथ्या भान. २ मायेचा. ३ वेदांतश्रवणानें, आत्मज्ञानाच्या ऐकण्यानें. ४ तर्काप्रमाणेंच. ५ शृंगार, वीर, करुणा, अद्भुत, हास्य, भयानक, बीभत्स, रौद्र, शांत ह्यासंबंधी. ६ तन्मयच. ७ चावटपणामुळें. ८ इच्छेसारखा रंग धारण करणारा एक सरड्या-सारखा प्राणी त्याचे. ९ स्त्रीचें. १० अकल्याण. ११ बहुत, * ब्रह्मांडापलीकडे. १२ सांपडला. १३ शहाण्यानें. १४ यच्चयावत् जगताला.

एक । या बोलण्याचें कौतुक । श्रोतीं सावध परिसावें ॥ २ ॥ एक म्हणती कर्ता देव । एक म्हणती कोण देव । आपुलाला अभिप्राव । सृष्टीमध्यें बोलती ॥ ३ ॥ उत्तम मध्यम कनिष्ठ । भावार्थें बोलती स्पष्ट । आपुलाली उपासना श्रेठ । मानिती जनीं ॥ ४ ॥ कोणी एक ऐसें म्हणती । कर्ता देव मंगळमूर्ति । एक म्हणती सरस्वती । सर्व करी ॥ ५ ॥ एक म्हणती कर्ता भैरव । एक म्हणती खंडेराव । एक म्हणती बीरदेव । एक म्हणती भगवती ॥ ६ ॥ एक म्हणती नरहरि । एक म्हणती बनशंकरी । एक म्हणती सर्व करी । नारायण ॥ ७ ॥ एक म्हणती श्रीराम कर्ता । एक म्हणती श्रीकृष्ण कर्ता । एक म्हणती भगवंत कर्ता । केशवराज ॥ ८ एक म्हणती पांडुरंग । एक म्हणती श्रीरंग । एक म्हणती झोटिंग । सर्व करी ॥ ९ ॥ एक म्हणती मुंज्या कर्ता । एक म्हणती सूर्य कर्ता । एक म्हणती अग्नि कर्ता । सर्व कांहीं ॥ १० ॥ एक म्हणती लक्ष्मी करी । एक म्हणती मारुती करी । एक म्हणती धरित्री करी । सर्व कांहीं ॥ ११ ॥ एक म्हणती तुकाई । एक म्हणती यमाई । एक म्हणती सटवाई । सर्व करी ॥ १२ ॥ एक म्हणती भार्गवें कर्ता । एक म्हणती वामन कर्ता । एक म्हणती परमात्मा कर्ता । एकचि आहे ॥ १३ ॥ एक म्हणती विरंणा कर्ता । एक म्हणती बस्वंणा कर्ता । एक म्हणती रेवंणा कर्ता । सर्व कांहीं ॥ १४ ॥ एक म्हणती खळ्या कर्ता । एक म्हणती स्वामि कार्तिक कर्ता । एक म्हणती व्यंकटेश कर्ता । सर्व कांहीं ॥ १५ ॥ एक म्हणती गुरु कर्ता । एक म्हणती दत्त कर्ता । एक म्हणती मुख्य कर्ता । § वोड्या जगन्नाथ ॥ १६ ॥ एक म्हणती ब्रह्मा कर्ता । एक म्हणती विष्णु कर्ता । एक म्हणती महेश कर्ता । निश्चयेंसी ॥ १७ ॥ एक म्हणती पर्जन्यकर्ता । एक म्हणती वायु कर्ता । एक म्हणती करून अकर्ता । निर्गुण देव ॥ १८ ॥ एक म्हणती माया करी । एक म्हणती जीव करी । एक म्हणती सर्व करी । प्रारब्धयोग ॥ १९ ॥ एक म्हणती प्रयत्न करी । एक म्हणती स्वभाव करी । एक म्हणती कोण करी । कोण जाणे ॥ २० ॥ ऐसा कर्त्यांचा विचार । पुसतां भरला बाजार । आतां कोणाचें उत्तर । खरें मानावें ॥ २१ ॥ जिहीं जो देव मानिला । कर्ता म्हणती तयाला । ऐसा लोकांचा गलबला । वोसरेना ॥ २२ ॥ आपुलाल्या साभिमानें । निश्चय केला मनें । याचा विचार पाहणें । घडेचि ना ॥ २३ ॥ बहुत लोकांचा बहु विचार । अवघा राहों द्या बाजार । परंतु याचा विचार । ऐसा आहे ॥ २४ ॥ श्रोतीं व्हावें सावधान । निश्चयें तोडावें अनुमान । प्रत्ययें मानावें प्रमाण । जाणते पुरुषीं ॥ २५ ॥ जें जें कर्तेयानें केलें । तें तें त्याउपरी झालें । कर्त्यापूर्वी आढळलें । न पाहिजे कीं ॥ २६ ॥ केलें तें पांचभौतिक । आणि पांचभौतिक ब्रह्मादिक । तरी भूताशें पांचभौतिक । केलें तें घडेना ॥ २७ ॥ पंचभूतांस वेगळें करावें । मग कर्त्यास वोळखावें । पांचभौतिक स्वभावें । कर्त्यांत आलें ॥ २८ ॥ पंचभूतांवेगळे निर्गुण । तेथें नाहीं कर्तेपण । निर्विकारासि विकार कोण । लावूं शके ॥ २९ ॥ निर्गुणास कर्तृत्व न

---

१ सगुण भक्ति. २ गणपति. ३ पृथ्वी. ४ परशुराम. ५ देवताविशेष. § ओढिया प्रांतांतील जगन्नाथ ६ नाहींसा होत नाहीं. ७ तर्क, संशय. ८ पृथ्व्यादिपंचभूतात्मक. ९ विकाररहिताला.

घडे । सगुण * झाल्यांत सांपडे । आतां कर्तव्यता कोणीकडे । पडे पाहा ॥ ३० ॥ लटिक्याचा कर्ता कोण । हें पुसणेंचि अप्रमाण । म्हणोन हेंचि प्रमाण । जें स्वभावेंचि जाहलें ॥ ३१ ॥ एक सगुण एक निर्गुण । कोठें लावूं कर्तेपण । या नांव अर्थाचें विवरण । बरे पाहा ॥ ३२ ॥ सगुणें सगुण केलें । तरी तें पूर्वीच आहे झालें । निर्गुणास कर्तव्य लाविलें । नेवचे कदा ॥ ३३ ॥ येथें कर्ता दिसेना । प्रत्यय आणावा अनुमाना । दृश्य सत्यत्वें असेना । म्हणोनिया ॥ ३४ ॥ केलें तें अवघेंहि लटिकें । तरी कर्ता हें बोलणेंचि फिकें । वक्ता म्हणे रे विवेकें । बरें पाहा ॥ ३५ ॥ बरें पाहतां प्रत्यय आला । तरी कां करावा गलबला । प्रचीत आलिया आपगाला । अंतर्यामीं ॥ ३६ ॥ आतां असो हें बोलणें । विवेकी तोचि हें जाणें । पूर्वपक्ष लागे उडवणें । येरुहवीं अनिर्वाच्य ॥ ३७ ॥ तंव श्रोता करी प्रश्न । देहीं सुखदुःख भोक्ता कोण । पुढें हेंचि निरूपण । बोलिलें असे ॥ ३८ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे त्रयोदशदशके कर्तेनिरूपणं नाम अष्टमः समासः ॥ ८ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ आत्म्यास शरीरयोगें । उद्वेग चिंता करणें लागे । शरीरयोगें आत्मा जगे । हें तों प्रकटचि आहे ॥ १ ॥ देह अन्नाचि खाईना । तरी आत्मा कदापि जेंवेना । आत्म्याविण चेतना । देहास कैंची ॥ २ ॥ हें एकावेगळें एक । करूं जातां निरर्थक । उभययोगें कोणीएक । कार्य चाले ॥ ३ ॥ देहाला नाहीं चेतना । आत्म्यास पदार्थ उचलेना । स्वप्नभोजनें भरेना । पोट कांहीं ॥ ४ ॥ आत्मा स्वप्नअवस्थेंत जातो । परंतु देहामध्येंहि असतो । निर्दसुरेंपणें खाजवितो । चमत्कार पाहा ॥ ५ ॥ अन्नरसें वाढे शरीर । शरीराप्रमाणें विचार । वृद्धपणीं तदनंतर । दोन्ही लेहानाळती ॥ ६ ॥ उन्मत्त द्रव्य देह खातो । देहयोगें आत्मा भुलतो । विस्मरणें शुद्धि सांडितो । सकळ कांहीं ॥ ७ ॥ देहानें घेतलें विष । आत्मा जाय सावकाश । वाढणें मोडणें आत्मयास । नेमस्त आहे ॥ ८ ॥ वाढणें मोडणें जाणें येणें । सुखदुःख देहाचेनि गुणें । नाना प्रकारें भोगणें । आत्मयासि घडे ॥ ९ ॥ वारूळ म्हणिजे पोकळ । मुंग्यांचे मार्गाचि सकळ । तैसेंचि हें केवळ । शरीर जाणावें ॥ १० ॥ शरीरीं नाडीचा खेटा । नाडीमध्यें पोकळ वाटा । लहान थोर संगटा । दाटल्या नाडी ॥ ११ ॥ प्राणी अन्नोदक घेतो । त्यांचा अन्नरस होतो । त्यास वायु प्रवर्ततो । श्वासोच्छ्वासें ॥ १२ ॥ नाडीद्वारां धांवे जीवन । जीवनामध्यें खेळ पवन । त्या पवनसारिखा जाण । आत्माहि विचरे ॥ १३ ॥ तृषेनें शोषलें शरीर । आत्म्यास कळे हा विचार । मग उठवून धावें शरीर । उदकाकडे ॥ १४ ॥ उदक मागे शब्द बोलवी । मार्ग पाहोन शरीर चालवी । शरीर अवघेंच हालवी । प्रसंगानुसार ॥ १५ ॥ क्षुधा लागते ऐसें जाणतो । मग देहाला उठवितो । अंचावाचा बोलवितो । ज्यासी त्यासी ॥ १६ ॥ बायकांत म्हणे झालें झालें । देह सोंवळें करूनि

---

* झालेल्या पदार्थात, कार्यात. १ लाविलें जात नाहीं. २ व्यर्थ. ३ मनामध्यें ४ सांगतां येण्यास अशक्य. ५ टिकत नाहीं. ६ कोणतेंहि. ७ स्वप्नांतील जेवणानें. ८ अज्ञानानें, झोंपेनें. ९ क्षीण होतात. १० मद उत्पन्न करणारा पदार्थ. ११ गर्दी, दाटी, १२ एकसारख्या. १३ उदक. १४ वारा. १५ तहानेनें. १६ ताळतंत्र नाहीं अशा रीतीनें.

आणिलें । पायांत भरोन चालविलें । तांतेडी तांतडी ॥ १७ ॥ त्यांस पात्रावरी बैसविलें । नेत्रीं भरोन पात्र पाहिलें । हातांकरवीं आरंभिलें । आपोशन[1] ॥ १८ ॥ हातांकरवीं उचलवी । मुखीं जाऊनि मुख पसरवी । दांतांकरवीं चाववी । नेटें[2] नेटें ॥ १९ ॥ आपण जिव्हेमध्यें खेळे । पाहतो परिमळसोहळे । केश काडी खडा कळे । तत्काळ थुंकी ॥ २० ॥ आळणी कळतां मीठ मागे । बायलेस म्हणे अगे कांगे । डोळे ताणून पाहों लागे । रागें रागें ॥ २१ ॥ गोडी लागतांच आनंदे । गोड नसतां परम खेदे[3] । वांकडी गोष्टी अंतेरीं भेदे । आत्मयासी ॥ २२ ॥ नाना अन्नांची गोडी । नाना रसें स्वाद निवडी । तिखट लागतांच मस्तक झाडी । आणि खोकी[4] ॥ २३ ॥ मिरपुडी घातली फार । कायसें करितें खापर[5] । जिव्हेकरवीं कठिणोत्तर । बोलवी रागें ॥ २४ ॥ आज्य उदंड जेविला । सवेंच तांब्या उचलिला । घळघळां घेऊं लागला । सावकाश ॥ २५ ॥ देहीं सुखदुःख भोक्ता । तो एक आत्माचि पाहता । आत्म्याविण देह वृथा । मेंडें[6] होय ॥ २६ ॥ मनाच्या अनंत वृत्ति । जाणणें तेंचि आत्मस्थिति । त्रैलोक्यीं जितुक्या व्यक्ती । तदनंतरीं आत्मा ॥ २७ ॥ जगामध्यें जगदात्मा । विश्वामध्यें विश्वात्मा । सर्व चालवी सर्वात्मा । नाना रूपें ॥ २८ ॥ हुंगे चाखे ऐके देखे । मृदु कठिण वोळखे । शीत उष्ण ठाउकें । तात्काळ होय ॥ २९ ॥ सावधपणें लाघवी । बहुत करी उठाठेवी । या भूतांच्या उगवी । धूर्तांचि करी ॥ ३० ॥ वायुसरिसा परिमळ[7] येतो । परी तो परिमळ वितळोन जातो । वायु धुळी घेऊन येतो । परी तेहि जाय ॥ ३१ ॥ शीत उष्ण वायुसरिसें । सुवासें अथवा कुवासें । असिजे परी सावकाशें । तेगणें[8] न घडे ॥ ३२ ॥ वायुसरिसे रोग येती । वायुसरसीं भूतें धांवती । धूर आणि धुकटें येती । वायुसवें ॥ ३३ ॥ वायुसवें कांहींच जगेना । आत्म्यासवें वायु तगेना[9] । आत्म्याची चपळता जाणा । अधिक आहे ॥ ३४ ॥ वायु कठिणास आडतो । आत्मा कठिणास भेदून जातो । कठिण पाहों तरि तो । छेदेहि ना ॥ ३५ ॥ वायु झडझडां वाजे । आत्मा कांहींच न वाजे । मौनेंचि अंतरीं समजे । विवरोन पाहतां ॥ ३६ ॥ शरीरास वरं केलें । तें आत्म्यासि पावलें । शरीरयोगें झालें । समाधान ॥ ३७ ॥ देहावेगळे उपाय नाना । करितां आत्म्यास पावेना । समाधान पावे वासना[10] । देहाचेनी[11] ॥ ३८ ॥ देह आत्मयांचें कौतुक । पाहों जातां असे अनेक । देहावेगळी[12] आडणुक । आत्म्यास होय ॥ ३९ ॥ एक असतां उदंड घडे[13] । वेगळें पाहतां कांहींच नें[14] घडे । विवेकें त्रैलोक्यीं पवाडे[15] । देहात्मयोगें ॥ ४० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे त्रयोदशदशके आत्मविवरणनिरूपणं नाम नवमः समासः ॥ ९ ॥

---

१ अति घाईनें. २ भोजनाचे आरंभीं व अंतीं तळहातावर उदक घेऊन प्राशन करितात तें, ३ जोरानें. ४ दुःखी होतो. ५ हृदयामध्यें. ६ ठसका लागून खोकतो. ७ खापराप्रमाणें जड (मूर्ख स्त्री). ८ तूप. ९ पाण्याचे घोंट घेऊं लागला. १० प्रेत. ११ युक्तिवान्. १२ समजुतदार. १३ सुगंध. १४ टिकणें. १५ टिकत नाहीं. १६ थांबतो. १७ कामना, इच्छा १८ देहाशिवाय. १९ आत्मा व देह एकत्र असता पुष्कळ कार्यें घडतात. २० वेगळे असले तर कांहींच कार्य होणार नाहीं. २१ कीर्ति.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ पालेमाळा सुमनमाळा । फळमाळा बीजमाळा । पाषाणमाळा कवडेमाळा । सूत्रें चालती ॥ १ ॥ स्फटिकमाळा मोहरेमाळा । काष्ठमाळा गंधमाळा । धातुमाळा रत्नमाळा । जाळया वेली चांदवे ॥ २ ॥ परी हें तंतूनें चालतें । तंतु नसतां विस्कळित होतें । तैसें म्हणों आत्मयातें । तरी साहित्यें न पडे ॥ ३ ॥ तंतूस मणि ओंविला । तंतूमध्येंचि राहिला । आत्मा सर्वांगीं व्यापला । पहाना कां ॥ ४ ॥ आत्मा चपळ सहजगुणें । दोरी काय चळों जाणे । म्हणोनि दृष्टांत देणें । साहित्य न घडे ॥ ५ ॥ नाना वल्लींत जळांश । उसामध्यें दाटला रस । परी तो रस आणि * बाकस । एक नव्हे ॥ ६ ॥ देहीं आत्मा देह अनात्मा । त्यांहून पर तो परमात्मा । निरंजनास उपमा । असेचि ना ॥ ७ ॥ रायापासूनि रंकवरी । अवघ्या मनुष्यांच्या हारी । सगट समान सरी । कैसी करावी ॥ ८ ॥ देव दानव मानव । नीच योनी हीन जीव । पापी सुकृती अभिप्राव । उदंड आहे ॥ ९ ॥ ऐकांशें जग चाले । परी सामर्थ्य वेगळालें । एका संगें मुक्त केलें । एका संगें रौरवें ॥ १० ॥ साकर माती पृथ्वी होय । परी ते माती खाता नय । गरळ आप नव्हे काय । परी तें खोटें ॥ ११ ॥ पुण्यात्मा आणि पापात्मा । दोहोंकडे अंतरात्मा । साधु भोंदू सीमा । सांडूंच नये ॥ १२ ॥ अंतर एक तों खरें । परी सांगातें घेऊं न येती भाहारें । पंडित आणि चाट पोरें । एक कैसीं ॥ १३ ॥ मनुष्य आणि गाधडे । राजहंस आणि कोंबडें । राजें आणि माकडें । एक कैसीं ॥ १४ ॥ भागीरथीचें जळ आप । मोरी संवेदणी तेंहि आप । कुश्चिळें उदक अल्प । सेववेना ॥ १५ ॥ याकारणें आचारशुद्ध । त्याउपरी विचारशुद्ध । वीतरागी आणि सुबुद्ध । ऐसा पाहिजे ॥ १६ ॥ शूराहूनि मानिले लंडी । तरी युद्धप्रसंगीं नरकाडी । श्रीमंत सांडूनि बराडी । सेवितां कैसें ॥ १७ ॥ एका † उदकें सकळ झालें । परी पाहोन पाहिजे सेविलें । सगट अवघेंचि सेविलें । तरी तें मूर्खपण ॥ १८ ॥ जीवनाचेंच झालें अन्न । अन्नाचें झालें वमन । परी वमनाचें भोजन । करितां नये ॥ १९ ॥ तैसें निंद्य सोडूनि द्यावें । वंद्य तें हृदयीं धरावें । सत्कीर्तीनें भरावें । भूमंडल ॥ २० ॥ उत्तमास उत्तम माने । कनिष्ठास तें न माने । म्हणोन करंटे देवानें । करून ठेविलें ॥ २१ ॥ सांडा अवघें करंटपण । धरावें उत्तम लक्षण । हरिकथापुराण-नीतिन्यायें ॥ २२ ॥ वर्तायाचा विवेक । राजी राखणें सकळ लोक । हळूहळू पुण्यश्लोक । कीरत जावें ॥ २३ ॥ मुलांचे चालीनें चालावें । मुलांच्या मनोगतें बोलावें । तैसें जनास शिकवावें । हळूहळू ॥ २४ ॥ मुख्य मनोगत राखणें । हीं चातुर्याचीं

---

१ फुलाच्या माळा. २ सूत, दोरा. ३ मोहरा म्हणून एक औषधी मणी आहे. तो नागाचे फडींत सांपडतो व तो विषावर उत्तम औषध आहे. ४ छनें. ५ दृष्टांत. * चोथा, चिपाड. ६ जड. ७ माधारहित ब्रह्माला. ८ रांगा. ९ सर्व एकसारखी. १० बरोबरी, योग्यता. ११ राक्षस. १२ पुण्यवान्. १३ एका भागानें. भ. गी. १०–४२. १४ नरक. १५ विष. १६ पाणी. १७ महार. १८ चावट. १९ धोब्याचे वस्त्रें धुण्याचें भांडें. २० घाणेरडें, वाईट. २१ चांगला, ज्ञानी. २२ भित्रे. २३ फजीती. २४ आशाबद्ध. † पाण्यानें २५ ओक. २६ पवित्र कीर्तीचे.

लक्षणें । चतुर तो चतुरांग जाणे । इतर ते वेडे ॥ २५ ॥ वेड्यास वेडे म्हणूं नये । वर्म कदापि बोलूं नये । तरीच घडे दिग्विजये । निःस्पृहासि ॥ २६ ॥ उदंड स्थळीं उदंड प्रसंग । जाणोनि करणें यथासांग । प्राणिमात्राचा अंतरंगें । होऊन जावें ॥ २७ ॥ मनोगत राखोन जातां । परस्परें होय अवस्था । मनोगत तोडितां व्यवस्था । बरी नाहीं ॥ २८ ॥ याकारणें मनोगत । राखेल तो मोठा महंत । मनोगत राखतां समस्त । वोढोनि येती ॥ २९ ॥ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे त्रयोदशदशके बोधनिरूपणं नाम दशमः समासः ॥ १० ॥

अखंडध्याननाम दशक चवदावा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ऐका निःस्पृहाची शिकवण । युक्ति बुद्धि शहाणपण । जेणें राहे समाधान । निरंतर ॥ १ ॥ सोपा मंत्र परी नेमस्त । साधें औषध गुणवंत । साधे बोलणें सप्रचीत । तैसें माझें ॥ २ ॥ तात्काळाचि अवगुण जाती । उत्तम गुणांची होय प्राप्ति । शब्दऔषध तीव्रे श्रोतीं । सांक्षेपें सेवावें ॥ ३ ॥ निःस्पृहता धरूं नये । धरिली तरी सोडूं नये । सोडिली तरी हिंडूं नये । वोळखीमध्यें ॥ ४ ॥ कांता दृष्टी राखूं नये । मनास गोडी चाखवूं नये । धारिष्ट चळतां दाखवूं नये । मुख आपुलें ॥ ५ ॥ एके स्थळीं राहूं नये । कोनकोंडें साहूं नये । द्रव्य देरा पाहूं नये । ओळकेपणें ॥ ६ ॥ आचारभ्रष्ट होऊं नये । दिल्या द्रव्य घेऊं नये । उणा शब्द येऊं नये । आपणावरी ॥ ७ ॥ भिक्षेविषयीं लाजूं नये । बहुत भिक्षा घेऊं नये । पुसतांहि देऊं नये । वोळखी आपुली ॥ ८ ॥ धड मळीण नेसूं नये । गोड अन्न खाऊं नये । दुराग्रह करूं नये । प्रसंगें वर्तावें ॥ ९ ॥ भोगीं मन असूं नये । देहदुःखें त्रासूं नये । पुढें आशा धरूं नये । जीवित्वाची ॥ १० ॥ विरक्ति गळों देऊं नये । धारिष्ट चळों देऊं नये । ज्ञान मळीण होऊं नये । विवेकबळें ॥ ११ ॥ करुणाकीर्तन सोडूं नये । अंतरध्यान मोडूं नये । प्रेमतंतु तोडूं नये । सगुणमूर्तीचा ॥ १२ ॥ पोटीं चिंता धरूं नये । कष्टें खेद मानूं नये । समयीं धीर सोडूं नये । कांहीं केल्या ॥ १३ ॥ अपमानितां सिणों नये । निखंदितां कष्टों नये । धिक्कारितां झुरों नये । कदाकाळीं ॥ १४ ॥ लोकलाज धरूं नये । लाजवितां लाजूं नये । खिजवितां खिजूं नये । विरक्तपुरुषें ॥ १५ ॥ शुद्धमार्ग सांडूं नये । दुर्जनासि तंडूं नये । संबंध पडूं देऊं नये । चांडाळासी ॥ १६ ॥ तपिळे

---

१ चातुर्याची गोष्ट. २ न्यून, ममभेदक. ३ सर्वत्र विजय. ४ निरिच्छाला, ५ विश्वासपात्र. ६ उत्कंठा. ७ साधु. ८ आपण होऊन. ९ अनुभवयुक्त. १० लवकर. ११ यत्नानें. १२ चांगले लक्षपूर्वक कानांनीं हे गुण ध्यावे. १३ धैर्य. १४ संकुचितपणें, भित्रेपणें. १५ स्त्री. १६ बुभुक्षितपणें, मोठया उत्कंठेनें. १७ उपभोगामध्यें १८ वैराग्यवृत्ति. १९ अंतःकरणामध्यें परमेश्वराचें ध्यान. २० श्रमूं नये. २१ टोंचून बोललें असतां, निषेध केला असतां. २२ चिडवितां. २३ वाद करूं नये. २४ तापटपणा.

पणा धरूं नये । भांडवितां भांडूं नये । उडवितां उडों नये । निजस्थिती आपुली ॥ १७ ॥ हांसवितां हांसूं नये । बोलवितां बोलूं नये । चालवितां चालूं नये । क्षणक्षणा ॥१८॥ एकवेष धरूं नये । एकसोज करूं नये । एकदेशीं होऊं नये । भ्रमण करावें ॥१९॥ सलगी पडों देऊं नये । *प्रतिग्रह घेऊं नये । सभेमध्यें बैसों नये । सर्वकाळ ॥२०॥ नेम अंगीं लावूं नये । भरंवसा कोणास देऊं नये । अंगिकार करूं नये । नेमस्तपणाचा ॥२१॥ नित्यनेम सांडूं नये । अभ्यास बुडों देऊं नये । परतंत्र होऊं नये । कांहीं केल्या ॥२२॥ स्वतंत्रता मोडूं नये । निरपेक्षा तोडूं नये । परापेक्षे होऊं नये । क्षणक्षणां ॥२३॥ वैभव दृष्टीं पाहों नये । उपाधिसुखें राखों नये । एकांत मोडूं देऊं नये । स्वरूपस्थितीचा ॥ २४ ॥ अनर्गलता धरूं नये । लोकलाज धरूं नये । कोठें तरी होऊं नये । आसक्त कदा ॥ २५ ॥ परंपरा तोडूं नये । उपासना मोडूं नये । ज्ञानमार्ग सोडूं नये । कदाकाळीं ॥ २६ ॥ कर्ममार्ग सांडूं नये । वैराग्य मोडों देऊं नये । साधन भजन खंडूं नये । कदाकाळीं ॥ २७ ॥ अतिवाद करूं नये । अनीति पोटीं धरूं नये । रागें भरीं भरूं नये । भलतीकडे ॥ २८ ॥ न मानी त्यास सांगों नये । कंटाळवाणें बोलों नयें । बहुसाल असों नये । एके स्थळीं ॥ २९ ॥ कांहीं उपाधि करूं नये । केली तरी धरूं नये । धरिली तरी सांपडूं नये । उपाधिमध्यें ॥ ३० ॥ थोरपणें असूं नये । महत्त्व धरून बैसूं नये । कांहीं मान इच्छूं नये । कोठें तरी ॥ ३१ ॥ साभेपण सांडूं नये । सोनेपण मोडूं नये । बलात्कारें जोडूं नये । अभिमान अंगीं ॥ ३२ ॥ अधिकारें-विण सांगूं नये । दाटून उपदेश देऊं नये । कोनकोंडा करूं नये । परमार्थ कदा ॥ ३३ ॥ कठिण शब्द बोलूं नये । कठिण आज्ञा करूं नये । कठिणतां धरूं नये । कोणेके विषयीं ॥ ३४ ॥ कठिण वैराग्य सांडूं नये । कठिण अभ्यास मोडूं नये । कठिण धीरत्व सोडूं नये । कांहीं केल्या ॥ ३५ ॥ आपण आसक्त होऊं नये । केल्याविण सांगूं नये । बहुसाल मागूं नये । शिष्यवर्गासी ॥ ३६ ॥ उद्धट शब्द बोलूं नये । इंद्रियेस्मरण करूं नये । शाक्तमार्गें भरूं नये । मुक्तपणें भरीं ॥ ३७ ॥ नीचेकृतीं लाजों नये । वैभव होतां माजों नये । क्रोधें भरीं भरों नये । जाणपणें ॥ ३८ ॥ थोरपणें चुकों नये । न्याय नीती सांडूं नये । अप्रमाण वर्तों नये । कांहीं केल्या ॥ ३९ ॥ कळल्याविण बोलूं नये । अनुमानें निश्चय करूं नये । सांगतां दुःख धरूं नये । मूर्खपणें ॥ ४० ॥ सावधपण सोडूं नये । व्यापकपण सांडूं नये । कदा सुख मानूं नये । निर्लज्जपणाचें ॥ ४१ ॥ विकल्प पोटीं धरूं नये । स्वार्थआज्ञा करूं नये । केली तरी टाकूं नये । आपणास पुढें

---

१ एकाच प्रकारचा समारंभ. २ एकाकी. * दान घेणे. ३ दुराग्रहाचा. ४ निरिच्छा. ५ दुसऱ्याची अपेक्षा–इच्छा करणारा. ६ कोणताही संबंध. ७ ब्रह्मस्थितीचा. ८ निष्प्रतिबंधपणा. ९ भक्ति. १० निरंतर. ११ लहानपण. १२ भित्रा, लाजिरवाणा, संकुचित. १३ विषयेच्छा. १४ देवीउपासकांच्या वाम मार्गानें. १५ स्वच्छंद होऊन. १६ हलकें काम करण्यास. १७ कोणत्याही गोष्टीविषयीं नुसते अंदाजावरून ठाम मत देऊं नये. १८ कोणी आपली चुकी सांगितली अथवा आपलें मनाविरुद्ध उपदेश केला तर. १९ निर्लज्जपणाचें, लोकरीती सोडून वागण्याचें. २० संशय. २१ स्वार्थाची (फायद्याचा) आज्ञा.

॥ ४२ ॥ प्रसंगेविण बोलूं नये । अन्वयेविण गाऊं नये । विचारेविण जाऊं नये । अविचारेंपंथें ॥ ४३ ॥ परोपकार सांडूं नये । परपीडा करूं नये । विकल्प पडों देऊं नये । कोणीएकासी ॥ ४४ ॥ संशयात्मक बोलूं नये । बहुत निश्चय करूं नये । निर्वाहेविणें धरूं नये । ग्रंथ हातीं ॥ ४५ ॥ जाणपणें पुसों नये । अहंभाव दिसों नये । सांगेन ऐसें म्हणों नये । कोणीएकासी ॥ ४६ ॥ ज्ञानगर्व धरूं नये । सहसा छळणा करूं नये । कोठें वाद घालूं नये । कोणीएकासी ॥ ४७ ॥ नेणपण सांडूं नये । महंतपण सोडूं नये । द्रव्यासाठीं हिंडूं नये । कीर्तन करीत ॥ ४८ ॥ स्वार्थबुद्धि जडों नये । कारभारीं पडों नये । कार्यकर्ते होऊं नये । राजद्वारीं ॥ ४९ ॥ कोणास भार घालूं नये । जेंडाभिक्षा मागों नये । भिक्षेसाठीं सांगों नये । परंपरा आपुली ॥ ५० ॥ सोयरिकींत पडों नये । मध्यवर्ती घडों नये । प्रपंचाची जडों नये । उपाधि अंगीं ॥ ५१ ॥ प्रपंचप्रस्थीं जाऊं नये । बाष्कळ अन्न खाऊं नये । पाहुण्यासरिसें घेऊं नये । आमंत्रण कदा ॥ ५२ ॥ श्राद्ध पक्ष सेटी सोमासें । शांति फळेशोभन बारसें । भोगे रहाणें बहुवसें । नवस व्रतें उद्यापनें ॥ ५३ ॥ तेथें निःस्पृहें जाऊं नये । त्याचें अन्न खाऊं नये । येळिलेवाणें करूं नये । आपणासी ॥ ५४ ॥ लग्नमुहूर्तीं जाऊं नये । पोटासाठीं गाऊं नये । मोलें कीर्तन करूं नये । कोठेंतरी ॥ ५५ ॥ आपली भिक्षा सोडूं नये । वारें अन्न खाऊं नये । निःस्पृहासि घडों नये । मोलें यात्रा॥ ५६ ॥ मोलें सुकृत करूं नये । मोलें पुजारी होऊं नये । दिलें तरी घेऊं नये । इनाम निःस्पृहें ॥ ५७ ॥ कोठें मठ करूं नये । केला तरी तो धरूं नये । मठपति होऊन बैसों नये । निःस्पृह पुरुषें ॥ ५८ ॥ निःस्पृहें अवघेंचि करावें । परी आपण तेथें न सांपडावें । परस्परें उभारावें । भक्तिमार्गासी ॥ ५९ ॥ प्रयत्नेविण राहों नये । आळस दृष्टीस आणूं नये । देह असतां पाहों नये । वियोग उपासनेचा ॥ ६० ॥ उपाधिमध्यें दडों नये । उपाधि अंगीं जडों नये । भजनमार्ग मोडूं नये । निःसंगपणें ॥ ६१ ॥ बहु उपाधि करूं नये । उपाधिविण कामा नये । सगुण भक्ति सोडूं नये । विभक्ति खोटी ॥ ६२ ॥ बहुसाल धावों नये । बहुसाल राहों नये । बहुकष्ट करूं नये । * असुदें खोटें ॥ ६३ ॥ बहुसाल बोलूं नये । अबोलणें कामा नये । बहु अन्न जेऊं नये । उपवास खोटा ॥ ६४ ॥ बहुसाल निजों नये । बहुत निद्रा मोडों नये । बहु नेम धरूं नये । वाष्कळ खोटें ॥ ६५ ॥ बहु जनीं असों नये । बहु अरण्य सेवूं नये । बहु देह पाळूं नये । आत्महत्या खोटी ॥ ६६ ॥ बहु संग धरूं नये ।

---

१ संबंधावांचून. २ कुमार्गानें ३ समजावून सांगण्याची शक्ति नसतां. ४ लोकांस घालावयास जड वाटेल अशी मोठी भिक्षा. ५ मध्यस्थी करूं नये. ६ प्रपंचाचें फार प्रस्ताव माजवूं नये. ७ वाईट, भलतेंसलतें. ८ पाहुण्याबरोबर. ९ जन्माचा सहावा दिवस, दुर्गापूजा. १० सहा महिन्याचें श्राद्ध. ११ गर्भाधानसंस्कार. १२ जन्माचा बारावा दियस. १३ मेजवान्या. १४ अंगांत भुतें आणण्याचा समारंभ. १५ व्रतांच्या अंतींचा विशेष कर्म. १६ ओशाळलें, केविलवाणें, दीनवाणें. १७ वार लावून. १८ पुण्यकर्म. १९ अभक्तपणा. * आयतें, श्रमावांचून मिळालेलें.

संतसंग सोडूं नये । कर्मठपणें[1] कामा नये । अनाचार खोटा ॥ ६७ ॥ बहु लौकिक सांडूं नये । लोकांआधीनें[2] होऊं नये । बहु प्रीति कामा नये । निष्ठुरता खोटी ॥ ६८ ॥ बहु संशय धरूं नये । मुक्तमार्ग[3] कामा नये । बहु साधनीं पडों नये । साधनेंविण खोटें ॥ ६९ ॥ बहु विषय भोगूं नये । विषयत्याग करितां नये । देहलोभ धरूं नये । बहु त्रास खोटा ॥ ७० ॥ वेगळा अनुभव घेऊं नये । अनुभवेविण कामा नये । आत्मस्थिति[4] बोलों नये । स्तब्धता खोटी ॥ ७१ ॥ मन उरों देऊं नये । मनेविण कामा नये । अलक्ष वस्तु लक्षितां नये । लक्षेविण खोटें ॥ ७२ ॥ मनबुद्धिअगोचर । बुद्धिविण अंधकार । जाणिवेचा पडो विसर । नेणीव खोटी ॥ ७३ ॥ ज्ञातेपण धरूं नये । ज्ञानेविण कामा नये । अतर्क्य वस्तु तर्कूं नये । तर्केविण खोटें ॥ ७४ ॥ दृश्यस्मरण कामा नये । विस्मरण पडों देऊं नये । कांहीं चर्चा करूं नये । केल्याविण न चले ॥ ७५ ॥ जगीं भेद कामा नये । वर्णसंकरें[5] करूं नये । आपुला धर्म उडवूं नये । अभिमान खोटा ॥ ७६ ॥ आशाबद्ध बोलों नये । विवेकेविण चालों नये । समाधान हालों नये । कांहीं केल्या ॥ ७७ ॥ अबद्ध[6] पोथी सिहों नये । पोथिविण कामा नये । अबद्ध कदा वाचूं नये । वाचिल्याविण खोटें ॥ ७८ ॥ निःस्पृहें वक्तृत्व सोडूं नये । आशंका घेतां भांडों नये । श्रोतयाचा मानूं नये । वीट कदा ॥ ७९ ॥ हे शिकवणें धरितां चित्तीं । सकळ सुखें वोळंगिती[7] । अंगीं बाणे महंती[8] । अकस्मात ॥८० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चतुर्दशदशके निःस्पृहलक्षणनिरूपणं नाम प्रथमः समासः ॥ १ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ब्राह्मणाची मुख्य दीक्षा । मागीतली पाहिजे भिक्षा । ओं[9]भवति या[10] पक्षा । रक्षिलें पाहिजे ॥ १ ॥ भिक्षा मागोन जो जेविला । तो निराहारी बोलिला । प्रतिग्रहावेगळा[11] झाला । भिक्षा मागतां ॥ २ ॥ संतासंत[12] जे जन । तेथें कोरान्न[13] मागोन । करी जो भोजन । तेणें केलें अमृतपान । प्रतिदिनीं ॥ ३ ॥ ॥ श्लोक ॥ भिक्षाहारी निराहारी भिक्षा नैव प्रतिगृहः । सदसद्गृहभिक्षान्नं सोमपानं दिने दिने ॥ १ ॥ टीका ॥ ऐसा भिक्षेचा महिमा । भिक्षा माने सर्वोत्तमा । * ईश्वराचा अगाध महिमा । तोहि भिक्षा मागे ॥ ४ ॥ दत्त गोरक्ष आदिकरूनी । सिद्धभिक्षा[14] मागती जनीं । निःस्पृहता भिक्षेपासूनी । प्रकट होय ॥ ५ ॥ वार लावून बैसला । तरी तो पराधीन झाला । तैसीच नित्यावलीला[15] । स्वतंत्रता कैंची ॥ ६ ॥ आठां दिवसां धान्य मेळविलें । तरी तें कंटाळवाणें[16] झालें । प्राणी एकाएकीं चेवले[17] । नित्य नूतनतेपासूनी ॥ ७ ॥ नित्य नूतन हिंडावें । उदंड देशाटन करावें । तरीच भिक्षा मागतां बरवें । श्लाघ्यवाणें[18] ॥ ८ ॥ अखंड भिक्षेचा अभ्यास । तयास वाटेना परदेश । जिकडे तिकडे स्वदेश ।

---

१ कर्ममार्गीं अत्यंत आसक्ति. २ लोकांच्या स्वाधीन. ३ स्वच्छंदपणा. ४ आपली स्थिति. ५ जातींचें मिश्रण. ६ अशुद्ध. ७ प्राप्त होतात. ८ मोठेपणा. ९ 'ॐ भवति भिक्षां देहि' या रीतीला. १० दान वगैरे न घेणारा, भिक्षा घेणें हा प्रतिग्रह नव्हे, ११ चांगलें वाईट. १२ शिजल्यावांचूनच्या अन्नाची भिक्षा. * शंकर. १३ शिजविलेल्या अन्नाची भिक्षा. १४ दररोज परगृहीं जेवणास. १५ नवी उमेद याटली. १६ स्तुत्य.

लोकत्रयीं ॥ ९ ॥ भिक्षा मागतां किरकों नये । भिक्षा मागतां लाजों नये । भिक्षा मागतां भागों नये । परिभ्रमणें ॥ १० ॥ भिक्षा आणि चमत्कार । चाकाटंती लहान थोर । कीर्ति वर्णी निरंतर । भगवंताची ॥ ११ ॥ भिक्षा म्हणजे कामधेनु । सदा फळ नव्हे सामान्यू । भिक्षेस करी जो अमान्यू । तो करंटा योगी ॥ १२ ॥ भिक्षेनें वोळखी होती । भिक्षेनें भ्रम चुकती । सामान्य भिक्षा मान्य करिती । सकळ प्राणी ॥ १३ ॥ भिक्षा म्हणिजे निर्भयस्थिति । भिक्षेनें प्रकटे महंती । स्वतंत्रता ईश्वरप्राप्ति । भिक्षा-गुणें ॥ १४ ॥ भिक्षेस नाहीं अडथळा । भिक्षाहारी तो मोकळा । भिक्षेकरितां सार्थक वेळा । काळ जातो ॥ १५ ॥ भिक्षा म्हणजे अमरवल्ली । जिकडे तिकडे लगडली । अवकाळीं फलदायिनी झाली । निर्लज्जासी ॥ १६ ॥ पृथ्वीमध्यें देश नाना । फिरतां उपवासी मरेना । कोणे एके ठायीं जना । जड नव्हे ॥ १७ ॥ गोरक्ष वाणिज्यें कृषी । त्याहून प्रतिष्ठा भिक्षेसी । विसंबो नये झोळीसी । कदाकाळीं ॥ १८ ॥ भिक्षेऐसें नाहीं वैराग्य । वैराग्यापरतें नाहीं भाग्य । वैराग्य नसतां अभाग्य । ऐकदेशी ॥ १९ ॥ कांहीं भिक्षा आहे म्हणावें । अल्पसंतोषी असावें । बहुत आणितां घ्यावें । मुष्टि एक ॥ २० ॥ सुखरूप भिक्षा मागणें । ऐसीं निःस्पृहतेचीं लक्षणें । मृदुवाग्विलास करणें । परम सौख्यकारी ॥ २१ ॥ ऐसी भिक्षेची स्थिति । अल्प बोलिलों यथामति । भिक्षा वांचवी विपत्ती । होणार काळीं ॥ २२ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चतुर्दशदशके भिक्षानिरूपणं नाम द्वितीयः समासः ॥ २ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ कवित्वशब्दसुमनमाळा । अर्थपरिमळें आगळा । तेणें संतषट्पदकुळा । आनंद होय ॥ १ ॥ ऐसी माळा अंतःकरणीं । गुंफून पूजा रामचरणीं । ओंकारतंतु अखंडणीं । खंडोचि नये ॥ २ ॥ परोपकाराकारणें । कवित्व अवश्य करणें । तया कवित्वाचीं लक्षणें । बोलिजेती ॥ ३ ॥ जेणें घडे भगवद्भक्ति । जेणें घडे विरक्ति । ऐशीया कवित्वाची युक्ति । आधीं वाढवावी ॥ ४ ॥ क्रियेवीण शब्दज्ञान । तया न मानिती सज्जन । म्हणोन देव प्रसन्न । अनुतापें करावा ॥ ५ ॥ देवाचेनि प्रसन्नपणें । जें जें घडे बोलणें । तें अत्यंत श्लाघ्यवाणें । या नांव प्रासादिक ॥ ६ ॥ धीट पाठ प्रासादिक । ऐसे बोलती अनेक । तरी हा * त्रिविध विवेक । बोलिजेल ॥ ७ ॥ धीट म्हणिजे धीटपणें केले । जें जें आपुल्या मनास आलें । बळेंचि कवित्व रचिलें । या नांव धीट बोलिजे ॥ ८ ॥ पाठ म्हणिजे पाठांतर । बहु पाहिलें ग्रंथांतर । तयासारिखा उतार । आपणहि केला ॥ ९ ॥ शीघ्राचि कवित्व केलें । दृष्टीं पडिलें तें वर्णिलें ।

---

१ कंटाळूं नये. २ फिरण्यानें. ३ चकित होतात. ४ मोठेपणा. ५ कल्पवृक्ष. ६ भरून आली. ७ संकटकाळीं. ८ फळ देणारी. ९ गाई राखणें. १० व्यापार. ११ शेतकी. १२ एकपक्षीं. १३ नम्र व गोड बोलणें. १४ कवितेंतील शब्द ह्याच कोणी पुष्पमाळा. १५ अर्थरूपी सुगंध. १६ विशेष, अधिक. १७ सज्जनरूपी भ्रमर-समुदायाला. १८ ओंकाररूपी तंतु. १९ पश्चात्तापानें. २० स्तुत्य. * धीट, पाठ, प्रासादिक, असे तीन प्रकारचे वक्ते आहेत, असें म्हणतात. २१ नानाप्रकारचे ग्रंथ.

भक्तीवांचून जें झालें । या नांव धीटपाठ ॥ १० ॥ कामिकें रतिक शृंगारिक । वीर-हास्यप्रस्ताविक[1] । कौतुक विनोद अनेक । या नांव धीटपाठ ॥ ११ ॥ मन झालें कामाकार[2] । तैसेच निघती उद्गार । धीटपाठें परपार[3] । पाविजेत नाहीं ॥ १२ ॥ व्हावया उदरशांति । करणें लागे नरस्तुति[4] । तेथें केली जे व्युत्पत्ति । या नांव धीटपाठ ॥ १३ ॥ कवित्व नसावें धीटपाठ । कवित्व नसावें खटपट । कवित्व नसावें उद्धट[5] । पाषांडमत[6] ॥ १४ ॥ कवित्व नसावें वादांग । कवित्व नसावें रसभंग । कवित्व नसावें रंगभंग । दृष्टांतहीन[7] ॥ १५ ॥ कवित्व नसावें पाल्हाळ । कवित्व नसावें बाष्कळ । कवित्व नसावें कुटिळ । लक्षूनियां ॥ १६ ॥ हीन कवित्व नसावें । बोलिलेंचि न बोलावें । छंदभंग न करावें । मुद्राहीन[8] ॥ १७ ॥ व्युत्पत्तिहीन तर्कहीन । कळाहीन शब्दहीन । भक्तिज्ञान वैराग्यहीन । कवित्व नसावें ॥ १८ ॥ भक्तिहीन जें कवित्व । तेंचि जाणावें ठोंबें मत । आवडीविण जें वक्तृत्व । कंटाळवाणें ॥ १९ ॥ भक्तीविण जो अनुवाद । तोचि जाणावा विनोद । प्रीतिविण संवाद । घडे केवीं ॥ २० ॥ असो धीटपाठ ते ऐसें । नाथिलें अहंतेचें पिसें । आतां प्रसादिक तें कैसें । सांगिजेल ॥ २१ ॥ वैभव कांता कांचन[9] । ज्यासि वाटे हें वमन । अंतरीं लागलें ध्यान । सर्वोत्तमाचें ॥ २२ ॥ जयास घडीनें घडी । भगवंतीं लागे आवडी । चढती वाढती गोडी । भगवद्भजनाची ॥ २३ ॥ जो भगवद्भजनेवीण । जाऊं नेदी एक क्षण । सर्वकाळ अंतःकरण । भक्तिरंगें रंगलें ॥ २४ ॥ जया अंतरीं भगवंत । अचल राहिला निवांत । तो स्वभावें जें बोलत । तें ब्रह्मनिरूपण ॥ २५ ॥ अंतरीं बैसला गोविंद । तेणें लागला भक्तिछंद । भक्तिविण अनुवाद । आणिक नाहीं ॥ २६ ॥ आवडी लागली अंतरीं । तैसीच वदे वैखरी[10] । भावें करुणाकीर्तन करी । प्रेमभरें नाचत ॥ २७ ॥ भगवंतीं लागलें मन । तेणें नाठवे देहभान । शंका लज्जा पळून । दुरी ठेली ॥ २८ ॥ तो प्रेमरंगें रंगला । तो भक्तिमदें मातला । तेणें अहंभावें[11] घातला । पायांतळीं ॥ २९ ॥ गात नाचत निःशंक । तयास कैचे दिसती लोक । दृष्टीं त्रैलोक्यनायक । वसोनि ठेला ॥ ३० ॥ ऐसा भगवंतीं रंगला । आणिक कांहीं नलगे त्याला । स्वइच्छा वर्णूं लागला । ध्यान कीर्ति प्रताप ॥ ३१ ॥ नाना ध्यानें नाना मूर्ती । नाना प्रताप नाना कीर्ति । तयापुढें नरस्तुति[12] । तृणतुल्य वाटे ॥ ३२ ॥ असो ऐसा भगवद्भक्त । जो ये संसारीं विरक्त । तया मानिती मुक्त । साधु जन ॥ ३३ ॥ त्याचें भक्तीचें कौतुक । त्या नांव प्रासादिक । सहज बोलतां विवेक । प्रकट होय ॥ ३४ ॥ ऐका कवित्वलक्षण । केलेंचि करूं निरूपण । जेणें निवे अंतःकरण । श्रोतयांचें ॥ ३५ ॥ कवित्व असावें निर्मळ । कवित्व असावें रसाळ । कवित्व असावें प्रांजळ[13] । अन्वयाचें[14] ॥ ३६ ॥ कवित्व असावें भक्तिबळें । कवित्व असावें

---

१ विषयसंबंधीं. २ वीर, हास्य इत्यादि रसांनीं युक्त. ३ विषयांत गुंग. ४ पैलपार. ५ नास्तिक मत. ६ दाखल्याशिवाय. ७ श्लोकरचनेमध्यें गुरु लघु असे वर्णविशिष्ट भेद न पाळणें. ८ लक्षणरहित. ९ खोटें. १० सुवर्ण. ११ वाणी. १२ मीपणा, अभिमान. १३ मानवप्राण्याची स्तुति. १४ उघड, स्पष्ट. १५ संबंधाचें.

अर्थागळें । कवित्व असावें वेगळें । अहंतेसी ॥ ३७ ॥ कवित्व असावें कीर्तिवाड । कवित्व असावें स्फय गोड । कवित्व असावें जाड । प्रतापविषयीं ॥ ३८ ॥ कवित्व असावें सोपें । कवित्व असावें अल्परूपें । कवित्व असावें सुरूपें । चरणबद्ध ॥ ३९ ॥ मृदु मंजुळ कोमळ । भव्य अद्भुत विशाळ । गौल्यें माधुर्य रसाळ । भक्तिरस ॥ ४० ॥ अक्षरबंध पदबंध । नाना चातुर्य प्रबंध । नाना कौशल्यता छंदबंध । धाटी मुद्रा अनेक ॥ ४१ ॥ नाना युक्ति नाना बुद्धि । नाना कला नाना सिद्धि । नाना अर्थान्वयें साधी । या नांव कवित्व ॥ ४२ ॥ नाना साहित्य नाना दृष्टांत । नाना तर्क धातुमत । नाना संमति सिद्धांत । पूर्वपक्षेसी ॥ ४३ ॥ नाना गति नाना व्युत्पत्ति । नाना मति नाना स्फूर्ति । नाना धारणा नाना धृति । या नांव कवित्व ॥ ४४ ॥ शंका आशंका प्रत्यंतरें । नाना वाक्यें शास्त्राधारें । तुटे संशय निर्धारें । निर्धारितां ॥ ४५ ॥ नाना प्रसंग नाना विचार । नाना तत्त्वचर्चासार । नाना योग नाना विवरें । या नांव कवित्व ॥ ४६ ॥ नाना साधनें पुरश्चरणें । नाना तपें तीर्थाटणें । नाना संदेह फेडणें । या नांव कवित्व ॥ ४७ ॥ जेणें अनुताप उपजे । जेणें लौकिक लाजे । जेणें ज्ञान उपजे । या नांव कवित्व ॥ ४८ ॥ जेणें ज्ञान हें प्रबळें । जेणें वृत्ति हे मावळे । जेणें भक्तिमार्ग कळे । या नांव कवित्व ॥ ४९ ॥ जेणें देहबुद्धि तुटे । जेणें भवसिंधु आटे । जेणें भगवंत प्रकटे । या नांव कवित्व ॥ ५० ॥ जेणें सद्वस्तु भासे । जेणें भास हा निरसे । जेणें भिन्नत्व नासे । या नांव कवित्व ॥ ५१ ॥ जेणें सद्बुद्धि लागे । जेणें पाषांड भंगे । जेणें विवेक जागे । या नांव कवित्व ॥ ५२ ॥ जेणें घडे समाधान । तेणें तुटे संसार-बंधन । जयास मानिती सज्जन । या नांव कवित्व ॥ ५३ ॥ ऐसें कवित्वलक्षण । सांगतां तें असाधारण । परंतु कांहीं एक निरूपण । बुझावया केलें ॥ ५४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चतुर्दशदशके कवित्वलक्षणनिरूपणं नाम तृतीयः समासः ॥ ३ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ * ॥ कलियुगीं कीर्तन करावें । केवळ कोमळ कुशळ गावें । कठिण कर्कश कुटें सांडावें । एकीकडे ॥ १ ॥ खटखट खुंटून टाकावी । खळखळ खळासि न करावी । खरें खोटें खवळों न द्यावी । वृत्ति आपुली ॥ २ ॥ गर्वगाणें गाऊं नये । गातां गातां गळों नये । गौप्य गुज गर्जों नये । गुण गावे ॥ ३ ॥ † घष्टणी घिसणी घस्मरपणें । घसरघसरूं घसा खाणें । घुमघुमोचि घुमणें । योग्य नव्हे ॥ ४ ॥

---

१ अर्धपूर्ण. २ कीर्तिकारक. ३ प्रज्ञा–बुद्धि व माक्षेप–उद्योग यांहीं पूर्ण, सुरेख. ४ चरणाचे प्रास बरोबर असावेत. ५ गोडी. ६ धाटणी. ७ लक्षणें. ८ अर्थसंबंधानें. ९ अलंकारादि सामुग्री. १० उपमा. ११ धातूंचे शुद्ध रूपांनीं युक्त, व्याकरणानें शुद्ध. १२ शंकांनीं युक्त. १३ बुद्धि. १४ धैर्य. १५ वेगवेगळीं प्रमाणें. १६ विवरण. १७ पश्चात्ताप. १८ प्रपंची लोक. १९ देहाभिमान. २० संसारसागर. २१ परब्रह्म. २२ दृश्य, माया. २३ कठिण. २४ समजण्याकरितां. * या समासांत क पासून क्ष पर्यंत ३५ अक्षरें दर एक ओवींत एक अक्षर याप्रमाणें साधलीं आहेत. २५ कापटयाचें. † घासाघासी, २६ घिसघिस. २७ घसाघस.

नाना नामें भगवंताचीं । नाना ध्यानें सगुणांचीं । नाना कीर्तनें कीर्तीचीं । अद्भुत करावीं ॥ ५ ॥ चकचक चुकावेना । चाट चावट चळावेना । चरचर चुरचूर लागेना । ऐसें करावें ॥ ६ ॥ छळछळ छळणा करूं नये । छळितां छळितां छळों नये । छळणें छळणा करूं नये । कोणी एकांची ॥ ७ ॥ जी जी जी जी म्हणावें ना । जो जो जागे तो तो पावेना । जपजपों जनीं जनार्दना । संतुष्ट करावें ॥ ८ ॥ झिरपे झरे पाझरे जळ । झळके दूरून झळाळ । झडझडां झळकती सकळ । प्राणी तेथें ॥ ९ ॥ या या या या म्हणावें नलगे । याया याया उपाय नलगे । या या या या कांहींच नलगे । सुबुद्धासी ॥ १० ॥ टक टक टक करूं नये । टाळाटाळी टिकों नये । टम टम टम लावूं नये । कंटाळवाणी ॥ ११ ॥ ठसठोंबेंस ठाकावेना । ठक ठक ठक करवेना । ठाके ठमके ठसावेना । मूर्तिध्यान ॥ १२ ॥ डळमळ डळमळ डकों नये । डगमग डगमग कामा नये । डंडळ डंडळ चुकों नये । हेकाडपणें ॥ १३ ॥ ढिसाळ ढाळा ढळती * कुंचे । ढोबळा ढसकण डुले नाचे । ढळेचि ना ढिगढिगाचे । कंटाळवाणे ॥ १४ ॥ नाना नेटक नागर । नाना नम्र गुणागार । नाना नेमक मधुर । नेमस्त गाणें ॥ १५ ॥ ताल तंबुरे नाना माने । तालबद्ध तंतगाणें । तूतं तार्किक तनेंमनें । तल्लीन होती ॥ १६ ॥ थरथरां थरकती रोमांच । थै थै थै स्वरें ऊंच । थीर थीर थिरावे नाच । प्रेमळ भक्तांचा ॥ १७ ॥ दक्षदाक्षिण्यें दाटलें । बंदें प्रबंदें कोंदाटलें । दमदम दुम दुमों लागलें । जगदंतर ॥ १८ ॥ धूर्त तूर्त धांवोनि आला । धिग्बुद्धीनें धिग्ग झाला । धाकें धाकें धोकेला । रंग अवघा ॥ १९ ॥ नाना नाटक नेटकें । नाना मानें तुकें कौतुकें । नाना नेमक अनेकें । विद्यापात्रें ॥ २० ॥ पाप पळोन गेलें दूरी । पुण्य पुष्कळ प्रकटे वरी । परतपरतो परे अंतरीं । चटक लागे ॥ २१ ॥ फुकट फाकट फेंटवणें नाहीं । फेंटकळ फुगडी पिंगा नाहीं । फिकें फसकट फोल नाहीं । ‡ भकांद्या निंदा ॥ २२ ॥ बरें बरें बरें म्हणती । बाबा बाबा उदंड करिती । बळें बळेंचि बळाविती । कथेलागीं ॥ २३ ॥ भला भला भला लोकीं । भक्तिभावें भव्य अनेकीं । भूषण भाविकलोकीं । परोपकारें ॥ २४ ॥ मानेल तरी मानावें मनें । मत्त न व्हावें ममतेनें । मी मी मी मी बहुतजनें । म्हणिजेत आहे ॥ २५ ॥ एके टेंकत एकापाशीं । येऊं येऊं येती झेंडेसी । या या या या असें तयांसी । म्हणावें नलगे ॥ २६ ॥ राग रंग रसाल सुरंगें । अंतर संगीत रागें । रत्नपरीक्षा रत्नामागें । धांवती लोक ॥ २७ ॥ लवलवां लवती लोचन । लकलकां ❀ लकलें मन । लपलपों लपती जन । आवडीनें ॥ २८ ॥ वचनें वाउगीं वदेना । वावरें विवरें वसेना । वक्तृत्वें विवरी जना । विनीत होऊनी ॥ २९ ॥ सारासार समस्तांला । शिकऊं शिकऊं जनाला । साहित्य संगीत सज्जनाला । बरें वाटे ॥ ३० ॥ खरें खोटें खरें वाटलें । खर्खर खुर्खूर खुंटलें ।

---

१ सगुण मूर्तींचीं २ चघळपणा करणारा. ३ पाझरणारें. ४ चमकतें. ५ मूखे, निलाजरा. ६ हेकेखोरपणानें. ७ मोठाले. * चवऱ्या. ८ चांगले, सुंदर. ९ गुणांचें स्थान. १० तंतुवाद्यांवर गाणें. ११ कौशल्य. १२ त्वरित. १३ भरला. १४ महत्त्वानें. १५ हृदयांत. १६ फसबणें. १७ दुर्भाषणयुक्त. १८ नाचणें. ‡ कुचेष्टा. १९ उड्या घालून. ❀ चकित झालें. २० नम्र.

खोटें खोटेंपणें गेलें । खोटें म्हणोनियां ॥ ३१ ॥ शाहणें शोधितां शोधेना । शास्त्रार्थ श्रुतिबोधेना । शुक सारिका शमेना । शब्द तयाचा ॥ ३२ ॥ हर्षें हर्षें हांसिला । हाहा होहोनें भुलला । हित होईना तयाला । परत्रीचें ॥ ३३ ॥ लक्षावें लक्षितां अलक्षीं । लक्षिलें लोचनातें लक्षी । लागलें लेय तें अलक्षीं । विहंगममार्गें ॥ ३४ ॥ क्षेत्रें क्षेत्रज्ञ क्षोभतो । क्षमेनें क्षमून क्षमवितो । क्षमणें क्षोभणें क्षेत्रज्ञ तो । सर्वांठायीं ॥ ३५ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चतुर्दशदशके कीर्तनलक्षणनिरूपणं नाम चतुर्थः समासः ॥ ४ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ मागां हरिकथेचें लक्षण । श्रोतीं केला होता प्रश्न । सावध होऊन विचक्षण । परिसोत आतां ॥ १ ॥ हरिकथा कैसी करावी । रंगें कैसी भरवावी । जेणें पाविजे पदवी । रघुनाथकृपेची ॥ २ ॥ सोनें आणि परिमळें । इक्षुदंडा लागती फळें । गौल्य माधुर्य रसाळें । तरी ते अपूर्वता ॥ ३ ॥ तैसा हरिदास आणि विरक्त । ज्ञाता आणि प्रेमळभक्त । व्युत्पन्न आणि वादरहित । तरी हेही अपूर्वता ॥ ४ ॥ राग. ज्ञानी तालज्ञानी । सकळ कळा ब्रह्मज्ञानी । निरभिमानें वर्ते जनीं । तरी हेहि अपूर्वता ॥ ५ ॥ मत्सर नाहीं जयासी । जो अत्यंत प्रिय सज्जनासी । चतुरंग जाणें मानसीं । अंतर्निष्ठ ॥ ६ ॥ जयंत्यादिकें नाना पर्वें । तीर्थें क्षेत्रें जीं अपूर्वें । जेथें वसिजे देवाधिदेवें । सामर्थ्यरूपें ॥ ७ ॥ तया तीर्थातें जे न मानिती । शब्दज्ञानें मिथ्या म्हणती । तयां पामरां श्रीपति । जोडेल कैंचा ॥ ८ ॥ निर्गुण नेलें संदेहानें । सगुण नेलें ब्रह्मज्ञानें । दोहींकडे अभिमानें । वोस केलें ॥ ९ ॥ पुढें असतां सगुण मूर्ति । निर्गुणकथा जे करिती । प्रतिपादून उच्छेदिती । तेचि पढतमूर्ख ॥ १० ॥ ऐसी न कीजे हरिकथा । अंतर पडे उभय पंथा । परिसा लक्षणें आतां । हरिकथेचीं ॥ ११ ॥ सगुणमूर्तीपुढें भावें । करुणाकीर्तन करावें । नाना ध्यानें वर्णावें । प्रतापकीर्तीतें ॥ १२ ॥ ऐसें गातां स्वभावें । रसाळ कथा वोढवे । सर्वांतरीं हेलावे । प्रेमसुख ॥ १३ ॥ कथा रचायाची खूण । सगुणीं नेणावें निर्गुण । न बोलावे दोष गुण । पुढिलांचे कदा ॥ १४ ॥ देवाचें वर्णावें वैभव । नाना प्रकारीं महत्त्व । सगुणीं ठेवूनियां भाव । हरिकथा करावी ॥ १५ ॥ लाज सांडून जनांची । आस्था सांडून धनांची । नित्य नवी कीर्तनाची । आवडी धरावी ॥ १६ ॥ नम्र होऊनि * राजांगणीं । निःशंक जावें लोटांगणीं । करतालिकी नृत्य वाणी । नामघोषें गर्जावी ॥ १७ ॥ एकाची कीर्ति एकापुढें । वर्णितां साहित्य न पडे । म्हणोनियां पवाडे । जेथील तेथें ॥ १८ ॥ मूर्ति नसतां सगुण । श्रवणीं

---

१ वेद. १ परलोकसंबंधी. ३ परब्रह्माच्या ठिकाणीं. ४ डोळ्याला. ५ अंतःकरणाची एकाग्रता. ६ विहंगम=पक्षी जसे एकदम उडून झाडावर बसतात तसें दृढयोगानें एकदम ब्रह्मीं पोंचणें. ७ शरीर. ८ जीव. ९ हुशार. १० उंसाला. ११ गोडी. १२ चातुर्य. १३ जयंत्यादि उत्सव. १४ देवाधिदेव–देवश्रेष्ठ राहतो. १५ नीचांना. १६ ओसाड. १७ ऐहिक व पारमार्थिक दोनी मार्गांना. १८ डुलूं लागतें. १९ आणूं नये. २० दुसऱ्यांचे * राजवाड्याच्या पुढील मोकळें पटांगण. २१ एक वाद्य, हातानें वाजवावयाचें वाद्य. २२ परमेश्वराच्या नांवाच्या गर्जनेनें, २३ सामुग्री, उपयोग. २४ थोरवी.

बैसले साधुजन । तरी अद्वैतनिरूपण । अवश्य करावें ॥ १९ ॥ नाहीं मूर्ति नाहीं सज्जन । श्रवणीं बैसले भाविक जन । तरी करावें कीर्तन । प्रस्ताविकें वैराग्यें ॥ २० ॥ शृंगारादि नवरसिक । त्यांमध्यें सांडावें एक । स्त्रियादिकांचें कौतुक । वर्णूंच नये ॥ २१ ॥ लावण्य स्त्रियांचें वर्णितां । विकार बाधिजे तत्त्वतां । धारिष्टापासोन श्रोता । चळे तात्काळ ॥ २२ ॥ म्हणोनि तें त्यागावें । जें बाधक साधकां स्वभावें । घेतां अंतरीं ठसावें । ध्यान स्त्रियांचें ॥ २३ ॥ लावण्य स्त्रियांचें ध्यान । कामाकार झालें मन । कैंचें आठवेल भजन । ईश्वराचें ॥ २४ ॥ स्त्री वर्णितां सुखावला । लावण्याचे भरीं भरला । तो स्वयें जाणावा चेवला । ईश्वरापासूनी ॥ २५ ॥ हरिकथेसि भावबळें । गेला रंग तो * तुंबळे । निमिषें एक जरी आकळे । ध्यानीं परमात्मा ॥ २६ ॥ ध्यानीं गुंतलें मन । कैंचें आठवेल जन । निःशंक निर्लज्ज कीर्तन । करितां रंग माजे ॥ २७ ॥ रागज्ञान तालज्ञान । स्वरज्ञानेंसि व्युत्पन्न । अर्थान्वयोंचें कीर्तन । करूं जाणें ॥ २८ ॥ छप्पन्न भाषा नाना कळा । कंठमाधुर्य कोकिळा । परी तो भक्तिमार्ग वेगळा । भक्तचि जाणती ॥ २९ ॥ भक्तांस देवाचें ध्यान । देवावांचून नेणती आन । कळावंतांचें जें मन । कळाकार झालें ॥ ३० ॥ श्रीहरीवांचून जे कळा । ते जाणवी अवकळा । देव सांडून वेगळा । प्रत्यक्ष पडिला ॥ ३१ ॥ सर्पीं वेढिलें चंदनासी । निर्धाना आड विवेकी नाना कळा देवासी । आड तैशा ॥ ३२ ॥ सोडून देव सर्वज्ञ । नादामध्यें व्हावें मग्न । हेंचि प्रत्यक्ष विघ्न । आडवें आलें ॥ ३३ ॥ एक मन तें गुंतलें स्वरीं । कोणें चिंतावा श्रीहरी । बळेंच धरूनियां चोरीं । शुश्रूषा घेतली ॥ ३४ ॥ करितां देवाचें दर्शन । आडवें आलें रागज्ञान । तेणें धरूनियां मन । स्वरामागें लाविलें ॥ ३५ ॥ भेटों जातां राजद्वारीं । मध्येंचि धरिला बेगारी । कवळतां तैशी परी । कळेनें केली ॥ ३६ ॥ मन ठेऊन ईश्वरीं । कोणी हरिकथा करी । तोचि एक संसारीं । धन्य जाणावा ॥ ३७ ॥ जयास हरिकथेची गोडी । उठे नित्य नवी आवडी । तयास जोडली जोडी । सर्वोत्तमाची ॥ ३८ ॥ हरिकथा मांडली जेथें । सर्व सांडून धांवे तेथें । आलस्य निद्रा दवडून स्वार्थें । हरिभक्तीसि सादर ॥ ३९ ॥ हरिभक्तांचिये घरीं । नीच कृत्य अंगिकारी । साह्यभूत सर्वांपरी । सांक्षेपें होय ॥ ४० ॥ तया नांव हरिदास । जयास नामीं विश्वास । तेथूनि हा समास । संपूर्ण झाला ॥ ४१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चतुर्दशदशके हरिकथानिरूपणं नाम पंचमः समासः ॥ ५ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ रूप लावण्य अभ्यासितां न ये । सहज गुणास न चले उपाये । कांहीं तरी धरावी सोये । आगंतुक गुणाची ॥ १ ॥ काळें माणूस गोरें होयना । वेणीळास यत्न चालेना । मुक्यास वाचा फुटेना । हा सहज गुण ॥ २ ॥ आंधळे डोळेसें होईना । बधिर ते ऐकेना । पांगुळ पाय घेईना । हा सहज गुण ॥ ३ ॥ कुरू-

---

१ पश्चात्तापयुक्त. २ कामपीडित. ३ ढळला, भ्रष्ट झाला. * उचंबळे. ४ क्षणभर. ५ अर्थसंबंधयुक्त. ६ दुसरें. ७ वाईट दशा. ८ ठेव्याला. ९ भूत, पिशाच. १० सेवा. ११ प्राप्ति. १२ उद्योगानें. १३ तोंडावर देवीचे वण पडले आहेत अशास. १४ दृष्टियुक्त.

पतेचीं लक्षणें । किती म्हणोन सांगणें । रूप लावण्य याकारणें । पालटेना ॥ ४ ॥ अवगुण सोडितां जाती । उत्तम गुण अभ्यासितां येती । कुविद्या सांडूनि शिकती । शाहणे विद्या ॥ ५ ॥ मूर्खपण सांडितां जातें । शहाणपण शिकतां येतें । कारभार करितां उमजतें । सकळ कांहीं ॥ ६ ॥ ऐसी प्रचीत येते मना । तरी स्वहित कां कराना । सन्मार्गें चालतां जाणा । सज्जना माने ॥ ७ ॥ मा[illegible]ना आवडे जीवीं । तरी उपेक्षा कां करावी । चातुर्येविण उंच पदवी । कदापि नाहीं ॥ ८ ॥ अंतर्कळा शृंगारावी । नानापरीं उमजवावी । संपदा मेळवून भोगावी । सावकाश ॥ ९ ॥ देह नेटकें शृंगारिलें । परी तें चातुर्येविण नासलें । गुणेविण साँजिरें केलें । बाष्कळ जैसे ॥ १० ॥ यत्नकरीना ना शिकेना । शरीर तेंहि कष्टवीना । उत्तम गुण घेईना । सदा कोपी ॥ ११ ॥ आपण दुसरियास करावें । तें उसणें सवेंचि घ्यावें । जना कष्टवितां कष्टावें । लागेल बहु ॥ १२ ॥ न्यायें वर्तेल तो शाहणा । अन्यायी तो दैन्यवाणा । नाना चातुर्याच्या खुणा । चतुर जाणे ॥ १३ ॥ जें बहुतांस मानलें । तें बहुतीं मान्य केलें । येरें तें व्यर्थचि गेलें । जगनिंद्य ॥ १४ ॥ लोक आपणासी वोळावे । किंवा अवघेंचि कोसळावें । आपणासि समाधान फावे । ऐसें करावें ॥ १५ ॥ समाधानें समाधान वाढे । मैत्रीनें मैत्री जडे । मोडितां क्षणमात्रें मोडे । बरेपण ॥ १६ ॥ अहो कांहो, अरे कांरे । जनीं ऐकिजे की रे । कळत असतांच कां रे । निकामीपणें ॥ १७ ॥ चातुर्यें शृंगारे अंतर । वस्त्रें शृंगारें शरीर । दोहींमध्यें कोण थोर । बरें पाहा ॥ १८ ॥ बाह्यात्कारें शृंगारिलें । तेणें लोकांच्या हातास काय आलें । चातुर्यें बहुतांसी रक्षिलें । नाना परी ॥ १९ ॥ बरें खावें बरें जेवावें । बरें ल्यावें बरें नेसावें । समस्तीं बरें म्हणावें । ऐसी वासना ॥ २० ॥ तेनें मनें झिजावें । तेणें भले म्हणोन घ्यावें । उगेंचि कल्पितां सिणावें । लागेल पुढें ॥ २१ ॥ लोकीं कार्यभाग आवडे । तो कार्यभाग जेथें घडे : लोक सहजचि वोढे । कामासाठीं ॥ २२ ॥ म्हणोन दुसऱ्यास सुखी करावें । तेणें आपण सुखी व्हावें । दुसऱ्यास कष्टवितां कष्टावें । लागेल स्वयें ॥ २३ ॥ हें तो प्रकटचि आहे । पाहिल्याविण कामा नये । समजणें हाचि उपाये । सर्वत्रांसी ॥ २४ ॥ समजले आणि वर्तले । तेचि भाग्यपुरुष झाले । यावेगळे उरले । ते करंटे पुरुष ॥ २५ ॥ जितुका व्यापे तितुकें वैभव । वैभवासारिखा हावभाव । समजले पाहिजे उपाव । प्रकटचि आहे ॥ २६ ॥ आळसें कार्यभाग नासतो । सांक्षेपें होत होत होतो । दिसते गोष्टी कळेना तो । शाहणा कैसा ॥ २७ ॥ मैत्री करितां होतें कृत्य । वैर करितां होतो मृत्य । बोलिलें हें सत्य । कीं असत्य वोळखावें ॥ २८ ॥ आपणास शाहणें करूं नेणें । आपलें हित आपण नेणे । जनीं मैत्रिकी[11] राखों नेणें । वैर करी ॥ २९ ॥ ऐसे प्रकारींचे जन । त्यास म्हणावें अज्ञान । तयांचेपाशीं समाधान । कोण पावे ॥ ३० ॥ आपण एकाकी एकला । सृष्टींत भांडत चालिला । बहुतांमध्यें

---

१ दुर्गुण. २ हयगय. ३ मनोवृत्ति. ४ सुशोभित. ५ इतर. ६ व्यर्थ. ७ शरीरानें ८ श्रमावें. ९ विस्तार. १० व्यवसायानें. ११ मैत्री.

एकल्याला । यश कैंचें ॥ ३१ ॥ बहुतांचे मुखीं उरावें । बहुतांचें अंतरीं भरावे । उत्तम गुणीं विवेरावें । प्राणिमात्रांसी ॥ ३२ ॥ शाहणे करावे जन । पतितें करावे पावनें । सृष्टिमध्यें भगवद्भजन । वाढवावें ॥ ३३ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चतुर्दशदशके चातुर्यलक्षणनिरूपणं नाम षष्ठः समासः ॥ ६ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ नाना वेष नाना आश्रमें । सर्वांचें मूळ गृहस्थाश्रम । जेथें पावती विश्राम । त्रैलोक्यवासी ॥ १ ॥ देव ऋषि मुनि योगी । नाना तापसी वीतरागी । पितृ आदिकरूनि विभागी । अतीत अभ्यागत ॥ २ ॥ गृहस्थाश्रमीं निर्माण झाले । आपुला आश्रम टाकून गेले । परंतु गृहस्थागृहीं हिंडों लागले । कीर्तिरूपें ॥ ३ ॥ याकारणें गृहस्थाश्रम । सकळांमध्यें उत्तमोत्तम । परंतु पाहिजे स्वधर्म । आणि भूतदया ॥ ४ ॥ जेथें षट्कर्में चालती । विधियुक्त क्रिया आचरती । वाङ्माधुर्यें बोलती । प्राणिमात्रासी ॥ ५ ॥ सर्व प्रकारें नेमक । शास्त्रोक्त करणें कांहीं एक । त्याहीमध्यें अलौकिक । तो हा भक्तिमार्ग ॥ ६ ॥ पुरश्चरणी कायाक्लेशी । दृढव्रती परम सायासी । जगदीशावेगळे जयासी । थोर नाहीं ॥ ७ ॥ काया वाचा जीवें प्राणें । कष्टे भगवंताकारणें । मनें घेतलें धरणें । भजनमार्गीं ॥ ८ ॥ ऐसा भगवंताचा भक्त । विशेष अंतरीं विरक्त । संसार सोडून झाला मुक्त । भगवंताकारणें ॥ ९ ॥ अंतरापासून वैराग्य । तेंचि जाणावें महद्भाग्य । लोलंगते ऐवढें अभाग्य । आणिक नाहीं ॥ १० ॥ राजे राज्य सोडून गेले । भगवंताकारणें हिंडों लागले । कीर्तिरूपें पावन झाले । भूमंडळीं ॥ ११ ॥ ऐसा जो कां योगेश्वर । अंतरीं प्रत्ययाचा विचार । उकलूं जाणें अंतर । प्राणिमात्रांचें ॥ १२ ॥ ऐसी वृत्ति उदासीन । त्याहिवरी विशेषे आत्मज्ञान । दर्शनमात्रें समाधान । पावती लोक ॥ १३ ॥ बहुतासि करी उपाय । तो जगाच्या वांट्या नय । अखंड जयाचें हृदय । भगवद्रूप ॥ १४ ॥ जनास दिसे हा दुश्चित । परी तो असे सावचित्त । अखंड जयाचें चित्त । परमेश्वरीं ॥ १५ ॥ उपासनामूर्तिध्यानीं । अथवा आत्मानुसंधानीं । नाहीं तरी श्रवणमननीं । निरंतर ॥ १६ ॥ पूर्वजांच्या पुण्यकोटी । संग्रहीं असिल्या गांठीं । तरीच ऐसियाची भेटी । होय जनासी ॥ १७ ॥ प्रचीतीविण जें ज्ञान । तो अवघाच अनुमान । तेथें कैंचें परत्रसाधन । प्राणियासी ॥ १८ ॥ या कारणें मुख्य प्रत्ययें । प्रचीतीविण कामा नये । उपायासारिखा अपाये । शाहणे जाणती ॥ १९ ॥ वेडे संसार सांडून गेले । तरी ते कष्टकष्टोंचि गेले । दोहींकडे अंतरले । इहलोक परत्रीं ॥ २० ॥ रागें रागें निघोन गेला । तरी तो भांडभांडोंच मेला । बहुत

---

१ विवरण, विवेचन करणें. २ पापी. ३ पवित्र. ४ आश्रम चार आहेत=ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ, संन्यास. ५ वैराग्यशील. ६ प्राणिमात्रांवर दया. ७ यजन, याजन, दानादि सहा कर्में. ८ विधियुक्त. ९ पुरश्चरण करणारा. १० शरीरास कष्ट देणारा. ११ दृढनिश्चयी. १२ ईश्वराहून १३ पिच्छा. १४ आसक्तीसारखें. १५ समजूं शकतो. १६ मन. १७ दुःखी. १८ सावध. १९ परब्रह्माच्या ठिकाणीं एकाग्र मनोवृत्ति लावण्यामध्यें. २० अनुभवावांचून. २१ परलोकासंबंधी विचार.

लोक कष्टी केला । आपणहि कष्टी ॥ २१ ॥ निघोन गेला परी अज्ञान । त्याचे संगतीस लागले जन । गुरुशिष्य दोघे समान । अज्ञानरूपें ॥ २२ ॥ आशाबद्ध अनाचारी[1] । निघोन गेला देशांतरीं । तरी तो अनाचाराचि करी । जनामध्यें ॥ २३ ॥ गृहीं पोटें-विण कष्टती । कष्टी होऊन निघोन जाती । त्यास ठायींठायीं मारिती । चोरीं भरतां ॥ २४ ॥ संसार मिथ्या ऐसा कळला । ज्ञान समजोन निघोन गेला । तेणें जन पावन केला । आपणाऐसा ॥ २५ ॥ एके संगतीनें तरती । एके संगतीनें बुडती । याकारणें सत्संगति । बरी पाहावी ॥ २६ ॥ जेथें नाहीं विवेकपरीक्षा । तेथें कैंची असेल दीक्षा[2] । घरोघरीं मागतां भिक्षां । कोठेंहि मिळेना ॥ २७ ॥ जो दुसऱ्यांचें अंतर जाणे । देश काळ प्रसंग जाणे । तया पुरुषा काय उणें । भूमंडळीं ॥ २८ ॥ नीच प्राणी गुरुत्व पावला । तेथें आचाराचि बुडाला । वेदशास्त्रब्राह्मणाला । कोण पुसे ॥ २९ ॥ ब्रह्मज्ञानाचा विचारु । त्याचा ब्राह्मणासीच अधिकारु । वर्णांनां ब्राह्मणो गुरु[3] । ऐसें हें वचन ॥ ३० ॥ ब्राह्मण बुद्धीपासून चेवले[4] । आचारापासून भ्रष्टले[5] । गुरुत्व सांडून झाले । शिष्य शिष्यांचे ॥ ३१ ॥ कित्येक दावलमलकास[6] जाती । कित्येक पिरासी भजती । कित्येक तुरक होती[7] । आपुले इच्छेनें ॥ ३२ ॥ ऐसा कलियुगीं आचार । कोठें राहिला विचार । पुढें पुढें वर्णसंकर[8] । होणार आहे ॥ ३३ ॥ गुरुत्व आलें नीचयाती । कांहीं एक वाढली महंती । शूद्र आचार बुडविती । ब्राह्मणांचा ॥ ३४ ॥ हें ब्राह्मणांस कळेना । त्याची वृत्तीच वळेना । मिथ्याअभिमान गळेना । मूर्खपणाचा ॥ ३५ ॥ राज्य नेलें म्लेंच्छीं क्षेत्रीं[9] । गुरुत्व नेलें कुपात्रीं । आपण अत्रीं ना परत्रीं[10] । कांहींच नाही ॥ ३६ ॥ ब्राह्मणास ब्राह्मणीनें बुडविलें । विष्णूनें श्रीवत्स मिरविलें[11] । त्याच विष्णूनें शापिलें । परशुरामें[12] ॥ ३७ ॥ आम्हींहि तेचि ब्राह्मण । दुःखें बोलिलों हें वचन । वडील गेले ब्राह्मणी करून । आम्हांभोंवतें ॥ ३८ ॥ आतांच्या ब्राह्मणीं काय केलें । अन्न मिळेना ऐसें झालें । तुम्हां बहुतांचे प्रचीतीस आलें । किंवा नाहीं ॥ ३९ ॥ बरें वडिलांस काय म्हणावें । ब्राह्मणाचें अदृष्ट[13] जाणावें । प्रसंगें बोलिलें स्वभावें । क्षमा केले पाहिजे ॥ ४० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चतुर्दशदशके युगधर्मनिरूपणं नाम सप्तमः समासः ॥ ७ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ बरें ऐसा प्रसंग झाला । झाला तो होऊन गेला । आतां तरी ब्राह्मणीं आपणाला । शाहणें करावें ॥ १ ॥ देव पूजावा विमळहस्तीं[14] । तेणें भाग्य पाविजे समस्तीं । मूर्ख अभक्त वेस्ती[15] । दरिद्र भोगिजे ॥ २ ॥ आधीं देवास ओळखावें । मग अनन्यभावें भजावें । अखंड ध्यान धरावें । सर्वोत्तमाचें ॥ ३ ॥ सर्वांमध्यें जो

---

१ दुराचारी. २ उत्तम आचरण. ३ सर्व वर्णांमध्यें ब्राह्मण हाच गुरु (श्रेष्ठ) आहे. ४ भ्रष्ट झाले. ५ दावलमलक पीराला. ६ तुर्क, मुसलमान. ७ सर्व जातींचें मिश्रण, एकत्रटणें. ८ म्लेंछांच्या देशांत. ९ या लोकींहि नाहीं, आणि परलोकींहि नाहीं. १० जातिविषयक गोष्टींनीं. ११ ब्राह्मणाच्या लाथेचें लांछन १२ कृतघ्नपणा, आपआपसांतील भांडणें, हराभीपणा. १३ नशीब. १४ पवित्र हातांनीं. १५ व्यस्ती, अव्यवस्थित.

उत्तम । तया नांव सर्वोत्तम । आत्मानात्मविवेकेंकरूं[1] ‡ ठायीं पाडावें ॥ ४ ॥ जाण-जाणों देह रक्षी । आत्मा द्रष्टा अंतरसाक्षी[2] । पदार्थमात्रांस परीक्षी । जाणपणें[3] ॥ ५ ॥ तो सकळ देहांमध्यें वर्ततो । इंद्रियग्राम[4] चेष्टवितो । प्रचीतीनें प्रत्यय येतो । प्राणिमात्रांसी ॥ ६ ॥ प्राणिमात्रें जगदंतरें[5] । म्हणोनि राखावीं अंतरें[6] । दाता भोक्ता परस्परें । सकळ कांहीं ॥ ७ ॥ देव वर्ततो जगदंतरीं । तोचि आपुले अंतरीं । त्रैलोक्यींचे प्राणिमात्रीं । बरें पहा ॥ ८ ॥ मुळीं पाहणार तो एकला । सकळांठायीं विभागला । देहप्रकृतीनें झाला । भिन्न भिन्न ॥ भिन्न भासे देहाकारें । प्रस्तुत एकाचि अंतरें । बोलणें चालणें निर्धारें । त्यासीच घडे ॥ १० ॥ आपुले पांरिखे सकळ लोक । पक्षी श्वापद पशादिक । किडा मुंगी देहधारक । सकळ प्राणी ॥ ११ ॥ खेचर[7] भूचर[8] वनचर । नाना प्रकारींचे जळचर । चार खाणी विस्तार । किती म्हणोनि सांगावा ॥ १२ ॥ समस्त जाणिवेनें[10] वर्तती । रोकडीं पाहावी प्रचीति । त्याची आपुली संगति । अखंड आहे ॥ १३ ॥ जग-दंतरें वोळेला[11] धणी । किती एकवटील प्राणी । परी ते वोळायाची करणी । आप-णापासीं ॥ १४ ॥ हें आपणाकडेच येतें । राजी राखावें समस्तांतें । देहासि बरें करावें तें । आत्मयासि पावे ॥ १५ ॥ दुर्जन प्राणी त्यांतील देव । त्याचा * लाताड स्वभाव । रागास आला जरी राव । तरी तंडों[12] नये कीं ॥ १६ ॥ प्रसंगीं सांडीच करणें । पुढें विवेकें विवरणें । विवेकें सज्जनचि होणें । सकळ लोकीं ॥ १७ ॥ आत्मत्वीं दिसतो भेद । हा अवघाचि देहसंबंध । एका जीवनें[13] नाना स्वाद । ओषधी भेदें ॥ १८ ॥ गेरूळ[14] आणि अमृत झालें । परी ¶ आपपण नाहीं गेलें । साक्षित्वें आत्मयासि पाहिलें । पाहिजे तैसें ॥ १९ ॥ अंतरनिष्ठ जो पुरुष । तो अंतरनिष्ठेनें विशेष । जगामध्यें जो जगदीश । तो तयास वोळखे ॥ २० ॥ नयनींचि पाहावें नयन । मनें शोधावें मन । तैसाचि हा भगवान । सकळां घटीं[15] ॥ २१ ॥ तेणेंविण कार्यभाग अडे । सकळ कांहींच तेणेंचि घडे । प्राणी विवेकीं पवाडे[16] । तेणेंचि योगें ॥ २२ ॥ जागृतीस व्यापार घडतो । संबंध तयासीच पडतो । स्वप्नामध्यें घडे जो तो । येणेंचि न्यायें ॥ २३ ॥ अखंड ध्यानाचें लक्षण । अखंड देवाचें स्मरण । याचें कळतां विवरण[17] । सहजचि घडे ॥ २४ ॥ सहज सांडून सायास । हाचि कोणी एक दोष । आत्मा सांडून अनात्म्यास[18] । ध्यानीं धरिती ॥ २५ ॥ परी तें धरितांहि धरवेना । ध्यानीं येती[19] व्यक्ति नाना । उगेंचि कष्टविती मना । कासावीस करूनी ॥ २६ ॥ मूर्तिध्यान करितां सायासें । तेथें एकाचें एक दिसे । भासों नये तेंचि भासे । विलक्षण ॥ २७ ॥ ध्यान देवाचें धरावें । किंवा देवालयाचें[20] करावें । हेंचि बरवें विवरावें । आपुलें ठायीं ॥ २८ ॥ देह देऊळ आत्मा देव । कोठें

---

१ चैतन्य व जड यांविषयीं विचार. ‡ समजावन घ्यावें. २ अंतर्यामी वा साक्षी—पाहणारा. ३ इंद्रियसमूह ४ जगांत सर्वत्र. ५ अंत:करणें. ६ नाना देहामुळें. ७ परके. ८ आकाशांत फिरणारे पक्षी वगैरे. ९ पृथ्वीवर संचार करणारे. १० जाणण्याच्या शक्तीनें, ज्ञानानें. ११ प्राप्त झाला. * लाथा मारणार. १२ भांडूं नये. १३ उदकानें. १४ विष. ¶ पाणीपणा. १५ देहामध्यें. १६ शिरतो. १७ विचार १८ जडाला, शरीर इत्यादिकाला. १९ आकार. २० देवस्थानाचें.

धरूं पाहतां भाव । देव वोळखोन जीव । तेथींचि लावावा ॥ २९ ॥ अंतरनिष्ठा ध्यान ऐसें । दंडकध्यान अनारिसें । प्रत्ययेविण सकळ पिसें । अनुमानध्यान ॥ ३० ॥ अनुमानें अनुमान वाढे । ध्यान धरितां सर्वांचि मोडे । उगेचि कष्टती बापुडे । स्थूळध्यानें ॥ ३१ ॥ देवास देहधारी कल्पिती । तेथें नाना विकल्प उठती । भोगणें त्यागणें विपत्ती । देहयोगें ॥ ३२ ॥ ऐसें मनीं आठवतें । विचारितां भलतेंचि होतें । दिसों नये तेंचि दिसतें । नाना स्वप्नीं ॥ ३३ ॥ दिसतें तें सांगतां नये । बळें भावार्थ धरितां नये । साधक कासाविस होये । अंतर्यामीं ॥ ३४ ॥ सांगोपांग घडे ध्यान । त्यास साक्षी आपुलें मन । मनामध्यें विकल्पदर्शन । होऊंच नये ॥ ३५ ॥ फुटकें मन एकवटिलें । तेणें तुटकें ध्यान केलें । तेणें कोण सार्थक झालें । पाहाना कां ॥ ३६ ॥ अखंड ध्यानें न घडे हित । तरी तो जाणावा पतित । हाचि अर्थ सावचित । बरा पाहावा ॥ ३७ ॥ ध्यान धरितें ते कोण । ध्यानीं आठवितें तें कोण । दोनीमध्यें अनन्यलक्षण । असिलें पाहिजे ॥ ३८ ॥ अनन्य सहजाचि आहे । साधक शोधून न पाहे । ज्ञानी तो विवरोन राहे । समाधानें ॥ ३९ ॥ ऐशीं हीं प्रत्ययाचीं कामें । प्रत्ययेंविण बाधिजे भ्रमें । लोकदंडकसंभ्रमें । चालती प्राणी ॥ ४० ॥ दंडकध्यानाचें लक्षण । धरूनि बैसलें अवलक्षण । प्रमाण आणि अप्रमाण । बाजारी नेणती ॥ ४१ ॥ मिथ्या समाचार उठविती । वाउग्याच बोंबा घालिती । मनास आणितां अंतीं । अवघेंच मिथ्या ॥ ४२ ॥ कोणी एक ध्यानस्थ बैसला । कोणी एक शिकवी त्याला । मुकुट काढून माळा घाला । म्हणिजे बरें ॥ ४३ ॥ मनाच्या येथें काय दुष्काळ । जे आंखूड कल्पिली माळ । सांगते ऐकते केवळ । मूर्ख जाणावे ॥ ४४ ॥ प्रत्यक्ष कष्ट करावे न लागती । दोरें फुलें गुंफावीं न लागती । कल्पनेची माळ थिटी करिती । काय निमित्त ॥ ४५ ॥ बुद्धिवीण प्राणी सकळ । ते ते अवघेचि बाष्कळ । तया मूर्खासि खेळखळ । कोणें करावी ॥ ४६ ॥ जेणें जैसा परमार्थ केला । तैसाच पृथ्वीवरी दंडक चालिला । सांतां पांचांचा बळावला । साभिमान ॥ ४७ ॥ प्रत्ययेविण साभिमान । रोगी मारिले झांकून । तेथें अवघेंचि अनुमान । ज्ञान कैंचें ॥ ४८ ॥ सर्व साभिमान सांडावा । प्रत्ययें विवेक मांडावा । माया

---

१ मनःपूर्वक भक्ति. २ वरवर लोकरीतीचे ३ वेगळें. ४ जडाच्या ध्यानानें. ५ कल्पना. ६ हृदयांत. ७ यथासांग. ८ साफल्य. ९ सावध मनानें. १० लोकरीतीस भुलून. ११ दुर्लक्षण. १२ बाजारांतील दुकानदार वगैरे. १३ बातमी. १४ एकजण देवाची मूर्ति ध्यानांत आणून त्या मूर्तीस मानसिक फुलाची माळ घालूं लागला, पण देवाचे डोक्यावरील मुकुट मोठा असल्यानें ती देवाचे गळयांत जाईना, तेव्हां जवळ असलेल्या मनुष्यास त्यानें ही अडचण सांगितली. तो मनुष्य म्हणाला अहो मुकुट काढून माळ घाला, पण माळच जरा मोठी कल्पिली असती म्हणजे सर्व नीट झालें असतें, पण तसें न करितां मुकुट काढून माळ घाला म्हणून म्हणणारा व तसें करणारा हे दोघेही मूर्ख होत. १५ आंखूड. १६ कटकट १७ रीत, चाल. १८ काम, क्रोध, शोक, मोह, भय, अज्ञान, व शून्यत्व, हे सात विकार त्यांचा. १९ शब्द, स्पर्श, रूप, रस, व गंध या पांच विषयांचा. २० ताठा.

पूर्वपक्ष खंडावा । विवेकबळें ॥ ४९ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चतुर्दशदशके अखंडध्याननिरूपणं नाम अष्टमः समासः ॥ ८ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ पिंडाचें पाहिलें कौतुक । शोधिला आत्मानात्मविवेक । पिंड अनात्मा आत्मा एक । सकळ कर्ता ॥ १ ॥ आत्म्यास अनन्यता बोलिली । ते विवेकें प्रत्यया आली । आतां पाहिजे समजली । ब्रह्मांडरचना ॥ २ ॥ आत्मानात्मविवेक पिंडीं । सारासारविचार ब्रह्मांडीं । ‡ विवरविवरीं हे गोडी । घेतली पाहिजे ॥ ३ ॥ पिंड कार्य ब्रह्मांड कारण । यांचें करावें * विवरण । हेंचि पुढें निरूपण । बोलिलें असे ॥ ४ ॥ असार म्हणिजे नाशवंत । सार म्हणिजे तें शाश्वत । जयास होईल कल्पांत । तें सार नव्हे ॥ ५ ॥ पृथ्वी जळापासूनि झाली । पुढें तें जळीं मिळाली । जळाची उत्पत्ति वाढली । तेजापासूनी ॥ ६ ॥ तें जळ तेजें शोषिलें । महातेजें आटोनि गेलें । पुढें तेजचि उरलें । सावकाश ॥ ७ ॥ तेज झालें वायूपासूनी । वायु झडपी तयालागूनी । तेज जाऊन दाटणी । वायूचीच जाहली ॥ ८ ॥ वायु गगनापासूनि झाला । मागुता तेथेंचि विरोला । ऐसा हा कल्पांत बोलिला । वेदांतशास्त्रीं ॥ ९ ॥ गुणमाया मूळमाया । परब्रह्मीं पावती लया । तें परब्रह्म विवराया । विवेक पाहिजे ॥ १० ॥ सर्व उपाधींचा शेवट । तेथें नाहीं दृश्य खटपट । निर्गुण ब्रह्म घनदाट । सकळां ठायीं ॥ ११ ॥ उदंड कल्पांत जाहला । तरी नाश नाहीं त्याला । मायात्यागें शाश्वतालागीं । वोळखावें ॥ १२ ॥ देव अंतरात्मा सगुण । सगुणें पाविजे निर्गुण । निर्गुणज्ञानें ❀ विज्ञान । होत असे ॥ १३ ॥ कल्पनेतीत जें निर्मळ । तेथें नाहीं मायामळ । मिथ्यात्वें दृश्य सकळ । होत जातें ॥ १४ ॥ जें होतें आणि † सवेंचि जातें । तें तें प्रत्ययास येतें । जेथें होणें जाणें नाहीं तें । विवेकें वोळखावें ॥ १५ ॥ एक ज्ञान एक अज्ञान । एक जाणावें विपरीत ज्ञान । हे त्रिपुटी[11] होय क्षीण । तेंचि विज्ञान ॥ १६ ॥ वेदांत सिद्धांत[12] धर्मदांत । तयाची पहावी प्रचीत । निर्विकारी सदोदित । जेथें तेथें ॥ १७ ॥ तें ज्ञान दृष्टीनें पाहावें । पाहोन अनन्य राहावें । मुख्य आत्मनिवेदन जाणावें । याचें नांव ॥ १८ ॥ दृष्टीस दिसतें तें दृश्य । मनासि भासतें तो भास । दृश्यभासातीत अविनाश । परब्रह्म तें ॥ १९ ॥ पाहों जातां दुरिच्या दुरी । परब्रह्म सेबाह्य अंतरीं । अंतचि नाहीं अनंत[14] सरी । कोणासी द्यावी ॥ २० ॥ चंचळ तें स्थिरावेना । निश्चळ तें कदापि चळेना । आभाळ येतें जातें गगना । चळण नाहीं ॥ २१ ॥ जें विकारें वाढे मोडे । तेथें शाश्वतता कैंची घडे । कल्पांत होतांचि विघडे । सकळ कांहीं ॥ २२ ॥ जे अंतरींच भ्रमले । मायासंभ्रमें संभ्रमले । तयांस हें कैसें उकले । अहंहाड चक्र ॥ २३ ॥ भिडेनें व्यवहार निवडेना ।

---

१ चैतन्य व जडासंबंधी विचार. २ जड. ३ ऐक्य, एकपणा. ‡ पुनः पुनः विचार करून. * स्पष्ट करणें. ४ नाश. ५ अग्नीपासून. ६ नाहींसा झाला. ७ गुणमाया=सत्त्व, रज, तमांपैकीं एकाद्या गुणातिरेकामुळें झालेली. ८ सत्त्व, रज, तम यांची समानावस्था, मूलप्रकृति. ९ पुष्कळ. १० सनातन परब्रह्माला. ❀ आत्मैक्यज्ञान. † लागलीच. ११ त्रयी. १२ गुरुप्रतीति. १३ स्वानुभवसिद्ध गोष्ट. १४ परमेश्वररूपीं आपलें अर्पण. १५ आंतबाहेर. १६ बरोबरी, उपमा. १७ ढग. १८ मोठें.

भिडेनें सिद्धांत कळेना। भिडेनें देव आकळेना । अंतर्यामीं ॥ २४ ॥ वैद्याची प्रचीत येईना । आणि भीडहि उल्लंघेना । तरी मग रोगी वांचेना। ऐसें जाणावें ॥ २५ ॥ जेणें राजा वोळखिला । तो राजा म्हणेना भलत्याला । जेणें देव वोळखिला । तो देवरूपी ॥ २६ ॥ जयास मायिकाची भीड । तें काय बोलेल द्वाड । विचार पाहतां उघड । सकळ कांहीं ॥ २७ ॥ भीड मायेऐलीकडे । परब्रह्म तें पैलीकडे । पैलीकडे ऐलीकडे । सदोदित ॥ २८ ॥ लटिकेयाची भीड धरणें । भ्रमें भलतेंच करणें । ऐशीं नव्हेत कीं लक्षणें । विवेकाचीं ॥ २९ ॥ खोटें अवघेंच सांडावें । खरें प्रत्ययें वोळखावें । माया-त्यागें समजावें । परब्रह्म तें ॥ ३० ॥ तेंचि मायेचें लक्षण । तेंचि पुढें निरूपण ❀ सुचितपणें विवरण। केलें पाहिजे ॥ ३१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चतुर्दश-दशके शाश्वतनिरूपणं नाम नवमः समासः ॥ ९ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ माया दिसे परि नासे । वस्तु न दिसे परि न नासे । माया सत्य वाटे परि मिथ्या असे । निरंतर ॥ १ ॥ † करंटा पडोन उताणा । करी नाना-परी कल्पना । परी तें कांहींच घडेना । तैसी माया ॥ २ ॥ द्रव्यदारेचें स्वप्नवैभव । नाना विलास हावभाव । क्षणिक वाटे परी मावँ । तैसी माया ॥ ३ ॥ गगनीं गंधर्वनगरें । दिसतातीं नाना प्रकारें । नाना रूपें नाना विकारें । तैसी माया ॥ ४ ॥ लक्ष्मी राय-विनोदाची । बोलतां वाटे साची । मिथ्या प्रचीत तेथींची । तैसी माया ॥ ५ ॥ दस-ऱ्याचे सुवर्णाचे लोँटे । लोक म्हणती परी ते खोटे । परी सर्वत्र रहाटे । तैसी माया ॥ ६ ॥ मेल्याचा महोत्सव करणें । सतीचें वैभव वाढवणें । मसणीं जाऊन रुदन करणें । तैसी माया ॥ ७ ॥ राखेसि म्हणती लक्ष्मी । दुसरी भारदोरी लक्ष्मी । तिसरी नाममात्र लक्ष्मी । तैसी माया ॥ ८ ॥ मुळीं बाळविधवा नारी । तिचें नांव जन्मसावित्री । कुबेर हिंडे घरोघरीं । तैसी माया ॥ ९ ॥ * दशावतारांतील कृष्णा । उपजे जीर्णवस्त्राची तृष्णा । कां नदी नामें पयोष्णा । तैसी माया ॥ १० ॥ बहुरूपांतील ‡ रामराव । ग्रामस्थांपुढें दाखवी हावभाव । कां महाराज म्हणोनि लाघव । तैसी माया ॥ ११ ॥ देव्हारीं असे अन्नपूर्णा । आणि गृहीं अन्नाचि मिळेना । नामें सरस्वती शिकेना । शुभावळू ॥ १२ ॥ सुपर्ण्यास व्याघ्र नाम ठेविलें । पुत्रासि इंद्रनामें पाचारिलें । कुरूप परी आळविलें । सुंदरा ऐसें ॥ १३ ॥ मूर्ख नामें सकळ कळा । रोसभी नामें कोकिळा । नातरी डोळसेचा डोळा । फुटका जैसा ॥ १४ ॥ मातं-गीचें नाम तुलसी । धार्मिकेचें नाम काशी । बोलती अतिशूद्रिणीसी । भागीरथी ऐसें

१ खोट्याची—जगाची. ❀ चांगले लक्षपूर्वक. † अभागी. २ धन व स्त्री यांचे. ३ स्वप्नांतील ऐश्वर्य. ४ खोटें. ५ आकाशांत, नगरासारख्या दिसणाऱ्या आकृति. ६ बहुरूप्याची. ७ भरे, ओझीं. ८ रांडेला. ९ भारलेला दोरा, बायका कमरेला बांधतात तो. * दशावतारच्या नाटकांत कृष्णाचें सोंग आणणारास जुनें वस्त्र मिळावें अशी इच्छा उत्पन्न होते. १० ऊन पाण्याची. ‡ रामराजा. ११ गांवच्या लोकांपुढें. १२ हलकेपणा, नीचपणा. १३ गोंवऱ्या लावणारी. १४ कुत्र्याला. १५ बोलाविलें. १६ गाढवी. १७ चांडाळणीचें. १८ चांभारणीचें. १९ महारणीला.

॥ १५ ॥ साउली आणि अंधकार । एक होतां तेथींचा विचार । उगाच दिसे भासमात्र । तैसी माया ॥ १६ ॥ श्रवण बोटें संघी करतळ । रविरश्मीं दिसती इंगळ । ❀ रम्य आरक्त रंगकल्लोळ । तैसी माया ॥ १७ ॥ भगवें वस्त्र देखतां मनाला । वाटे अग्निच लागला । विवंचितां प्रत्यय आला । तैसी माया ॥१८॥ जळीं चरणकरांगुळें । आंखूड लांब § किरकोळें । विपरीत काणे दिसती जळें । तैसी माया ॥ १९ ॥ भोवंडीनें पृथ्वी कलथली । कामिणीनें पिंवळी झाली । सन्निपातें अवस्था अनुभविली । तैसी माया ॥२०॥ कोणी एक पदार्थविकार । उगाच दिसे भासमात्र । अनन्याचा अन्य प्रकार । तैसी माया ॥ २१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चतुर्दशदशके मायानिरूपणं नाम दशमः समासः ॥ १० ॥

आत्मदशकनाम दशक पंधरावा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ अस्थिमांसांचीं शरीरें । त्यांत राहिजे जीवेश्वरें । नानाविकारीं विकारें । प्रवीण होइजे ॥ १ ॥ घनवट पोंचट स्वभावें । विवरोन जाणिजे जीवें । व्हावें न व्हावें अघवें । जीव जाणे ॥ २ ॥ एकीं मागमागों घेणें । एकां न मागतांच देणें । प्रचीतीनें सुलक्षणें । वोळखावीं ॥ ३ ॥ जीव जीवांत घालावा । आत्मा आत्म्यांत मिसळावा । राहराहो शोध घ्यावा । + परांतराचा ॥ ४ ॥ जानवें हेवेंडकारें झालें । ढिलेपणें हेवेंडं आलें । नेमस्तपणें शोभलें । दृष्टीपुढें ॥ ५ ॥ तैसींचि हें मनासी मन । विवेकें जावें मिळोन । ढिलेपणें अनुमान । होत आहे ॥ ६ ॥ अनुमानें अनुमान वाढतो । भिडेनें कार्यभाग नासतो । याकारणें प्रत्यय तो । आधीं पाहावा ॥ ७ ॥ दुसऱ्याचे जीवींचें कळेना । परांतर ते जाणवेना । वश्य होती लोक नाना । कोण्या प्रकारें ॥ ८ ॥ अकल सांडून परती । लोक वशीकरणें करिती । अपूर्णपणें हळूं पडती । ठायीं ठायीं ॥ ९ ॥ जगदीश आहे * जगदंतरीं । चेटकें करावीं कोणावरी । जो कोणी विवेकें विचरी । तोचि श्रेष्ठ ॥ १० ॥ श्रेष्ठ कार्य करी तो श्रेष्ठ । कृत्रिम करी तो कनिष्ठ । कर्मानुसार प्राणी ¶ नष्ट । अथवा भले ॥ ११ ॥ राजे जाती राजपंथें । चोर जाती चोरपंथें । वेडा ठके अल्पस्वार्थें । मूर्खपणें ॥ १२ ॥ मूर्खास वाटे मी शाहणा । परी तो वेडा दैन्यवाणा । नाना चातुर्यांच्या खुणा । चतुर जाणे ॥ १३ ॥ जो * जगदंतरीं मिळाला । तो जगदंतरचि झाला । अरत्रीं परत्रीं तयाला । काय उणें ? ॥ १४ ॥ बुद्धि देणें भगवंताचें । बुद्धिविना माणूस कांचें । राज्य सोडून फुकाचें । भीक मागे ॥ १५ ॥ जें जें जेथें निर्माण झालें । तें तें तयास मानलें । अभिमान देऊन गोंविलें । ठायीं ठायीं

---

१ कान. २ सूर्यकिरणांमध्यें. ३ निखारे. ❀ चांगलें. . ४ लालरंगाच्या लहरी. § बारीक.५वांकडी. ६ काविळी च्या विकारानें. ७ असावें एक व दिसावें दुसरें. ८ मनोवृत्तीनें. + दुसऱ्याच्या मनाचा. ९ गुंतलेलें. १० गुंतागुंत. ११ संशय. १२ वश करण्याचीं मंत्रादि साधनें. १३ कमी,कच्चे. १४ वशीकरण अपूर्ण व निष्फळ झाले म्हणजे थंडावतात. * जगांचे हृदयांत. ¶ वाईट, दुष्ट. १५ राजमार्गानें, मोठ्या रस्त्यानें. १६ इहलोकीं. १७ परलोकीं. १८ कच्चें.

॥ १६ ॥ अवघेचि म्हणती आम्ही थोर । अवघेचि म्हणती आम्ही सुंदर । अवघेचि म्हणती आम्ही चतुर । भूमंडळीं ॥ १७ ॥ ऐसा विचार आणितां मना । कोणीच लहान म्हणवीना । जाणते आणिती * अनुमाने । सकळ कांहीं ॥ १८ ॥ आपुल्याला साभिमानें । लोक चालिले * अनुमानें । परंतु हें विवेकानें । पाहिलें पाहिजे ॥ १९ ॥ लटिकेयाचा साभिमान घेणें । सत्य अवघेंच सांडणें । मूर्खपणाचीं लक्षणें । तीं हीं ऐशीं ॥ २० ॥ सत्याचा जो अभिमान । तो जाणावा निरभिमान । न्याय अन्याय समान । कदापि नव्हे ॥ २१ ॥ न्याय म्हणिजे तो शाश्वत । अन्याय म्हणिजे तो अशाश्वत । × बाष्कळ आणि ¶ नेमस्त । एक कैसें ॥ २२ ॥ एक उघड भाग्य भोगिती । एक तस्कर पळोन जाती । एकाची प्रकट महंती । एकाची कानकोंडी ॥ २३ ॥ आचारविचारेविण । जें जें करणें तो तो शीण । धूर्त आणि विचक्षण । तेचि शोधावे ॥ २४ ॥ उदंड बाजारीं मिळाले । परी ते धूर्तेंचि आकळिले । धूर्तापासीं कांहीं न चले । बाजाऱ्यांचें ॥ २५ ॥ याकारणें मुख्य मुख्य । तयांसी करावें सख्य । येणेंकरितां असंख्य । बाजारी मिळती ॥ २६ ॥ धूर्तासि धूर्तांचि आवडे । धूर्त धूर्तींच पेंवाडे । उगेचि हिंडती वेडे । कार्येविण ॥ २७ ॥ धूर्तासि धूर्तपण कळलें । तेणें मनासी मन मिळालें । परी हें गुप्तरूपें केलें । पाहिजे सर्व ॥ २८ ॥ समर्थांचें राखितां मन । तेथें येती उदंड जन । जन आणि सज्जन । आर्जव करिती ॥ २९ ॥ वोळखीनें वोळखी साधावी । बुद्धीनें बुद्धि बोधावी । नीतिन्यायें वाट रोधावी । पाखंडाची ॥ ३० ॥ वेष धरावा बावळा । अंतरीं असाव्या नाना कळा । संगट लोकांचा जिव्हाळा । मांडूंच नये ॥ ३१ ॥ निःस्पृह आणि नित्य नूतन । प्रत्ययाचें ब्रह्मज्ञान । प्रकट जाणता सज्जन । दुर्लभ जगीं ॥ ३२ ॥ नाना जिन्नसेंपाठांतरें । निवती सकळांचीं अंतरें । चंचळपणें & तदनंतरें । सकळांठायीं ॥ ३३ ॥ एके ठायीं बैसोनि राहिला । तरी मग + व्यापचि बुडाला । सावधपणें ज्याला त्याला । भेटी द्यावी ॥ ३४ ॥ भेटभेटीं ‡ उरी राखणें । हीं चातुर्याचीं लक्षणें । मनुष्यमात्र उत्तमगुणें । समाधान पावे ॥३५॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे पंचमदशके चातुर्यनिरूपणं नाम प्रथमः समासः ॥ १ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ पृथ्वीमध्यें मानवी शरीरें । उदंड दाटलीं लहान थोरें । पालटती मनोविकारें । क्षणक्षणां ॥ १ ॥ जितुक्या मूर्ति तितुक्या प्रकृती । सारिख्याच नसती आदिअंतीं । नेमचि नाहीं पाहावें किती । काय म्हणोनि ॥ २ ॥ कितेक म्लेंच्छ होऊन गेले । कितेक फिरंगणांत आटले । देशभाषेनें रोधिले । कितीएक ॥ ३ ॥ महाराष्ट्रदेश थोडा उरला । राजकारणें लोक रोधिला । अवकाश नाहीं जेवायाला । उदंड कामें ॥ ४ ॥ कित्येक युद्धप्रसंगीं गुंतले । तेणें गुणें उन्मत्त झाले । रात्रंदिवस करूं लागले ।

---

१ जाणतात. * तर्कानें. २ अभिमानानें. × अनियमित बोलणारा व वागणारा. ¶ नियमित बोलणारा व वागणारा. ३ चोरटी, गुप्त. ४ आपलेसें केलें. ५ शिरतो. ६ नास्तिक्याची ७ बेडगळ. ८ सर्व. ९ प्रेम. १० सभाषितें, काव्यांतील उत्तम वेंचे. ११ समाधान पावतात. & मग. + उद्योग. ‡ पुनः भेटण्याची इच्छा शिल्लक रहावी. १२ स्वभाव. १३ यवन वगैरे. १४ फिरंगी लोकांच्या देशांत. १५ नाहींसे झाले (धर्मांतर पावले). १६ आडला.

युद्धचर्चा ॥ ५ ॥ उदम्यांस[1] व्यासंग लागला । अवकाश नाहींसा झाला । अवघा पोटधंदा लागला । निरंतर ॥ ६ ॥ षट्दर्शनें[2] नानामतें । पाषांडें उठलीं बहुतें । पृथ्वीमध्यें जेथें तेथें । उपदेशिती ॥ ७ ॥ स्मार्तीं आणि वैष्णवीं । उरलीं सुरलीं नेलीं अघवीं । ऐशी पाहतां गाँथागोवी[3] । उदंड जाहली ॥ ८ ॥ कित्येक कामनेचे भक्त । ठायीं ठायीं झाले आसक्त । युक्त[4] अथवा अयुक्त[5] । पाहतो कोण ॥ ९ ॥ या गलबल्या-मध्यें गलबला । कोणीं कोणीं वाढविला । त्यास देखों शकेनासा झाला । वैदिक लोक ॥ १० ॥ त्यांहीमध्यें हरिकीर्तन । तेथें वोढले कित्येक जन । त्या प्रत्ययाचें ब्रह्मज्ञान । कोण पाहे ॥ ११ ॥ याकारणें ज्ञान दुर्लभ । पुण्यें घडे अलभ्य लाभ । विचारवंता सुलभ । सर्व कांहीं ॥ १२ ॥ विचार कळलाँ सांगतां नये । उदंड येती अंतरायें । उपाय योजितां अपाये । आडवे येती ॥ १३ ॥ त्यांहीमध्यें जो तीक्ष्ण । रिकामा जाऊं नेदी क्षण । धूर्त तार्किक विचक्षण[6] । सकळांस माने ॥ १४ ॥ नाना जिन्नस उदंड पाठ । वदों लागले घडघडाट । अंग्हाटांची[7] केली वाट । सामर्थ्यबळें ॥ १५ ॥ प्रबोधशक्तीचीं[8] अनंत द्वारें । जाणे सकळांचीं अंतरें[9] । निरूपणें तदनंतरें । चेटक[10] लागे ॥ १६ ॥ मतें मतांतरें सेगँट[11] । प्रत्यय बोलोन करी सपाट । दंडकें[12] सांडून नीट । वेधी जनां ॥ १७ ॥ नेमकें भेदकें वचनें । अखंड पाहे प्रसंगमानें । उदासवृत्तीच्या गुर्मीनें[13] । उठोन जातो ॥ १८ ॥ प्रत्यय बोलोन उठोन गेला । चटक लागली लोकांला । नाना मार्ग सांडून त्याला । शरण येती ॥ १९ ॥ परी तो कोठें आढळेना । कोणे स्थळीं सांपडेना । वेष पाहतां हीनदीना-। सारिखा दिसे ॥ २० ॥ उदंड करी गुप्तरूपें । भिकाऱ्यासारिखा स्वरूपें । तेथें यश कीर्ति प्रतापें । * सीमा सांडिली ॥ २१ ॥ ठायीं ठायीं भजन लावी । आपण तेथून चुकवी । मत्सरमताची[14] गोवी[15] । लागोंच नेदी ॥ २२ ॥ खेनाळामध्यें[16] जाऊन राहे । तेथें कोणीच न पाहे । सर्वत्रांची चिंता वाहे । सर्वकाळ ॥ २३ ॥ अवघडस्थळीं कठिण[17] लोक । तेथें राहणें नेमकें । सृष्टीमध्यें सकळ लोक । धुंडित येती ॥ २४ ॥ तेथें कोणाचें चालेना । अणुमात्र अनुमानेना । कैट[18] घालून राजकारणा । लोक लावी ॥ २५ ॥ लोकीं लोक वाढविले । तेणें अमर्याद झाले । भूमंडळीं सत्ता चाले । गुप्तरूपें ॥ २६ ॥ ठायींठायीं उदंड तोंबे[19] । मनुष्यमात्र तितुकें झोंबे । चहूंकडे उदंड लांबे । परमार्थबुद्धि ॥ २७ ॥ उपासनेचा गजर । स्थलोस्थळीं थोरथोर । प्रत्ययानें प्राणिमात्र । सोडविले ॥ २८ ॥ ऐसे कैवाडें[20] उदंड जाणे । तेणें लोक होती शाहणे । जेथें तेथें प्रत्यय बाणे । प्राणिमात्रासी ॥ २९ ॥ ऐशी कीर्ति करून जावें । तरीच संसारास यावें । दास म्हणे

---

१ व्यापाऱ्याला. २ सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, मीमांसा आणि वेदांत. ३ नास्तिकमतें, ४ गोंधळ. ५ योग्य. ६ अयोग्य, ७ समजलेला. ८ विद्वे. ९ शहाणा, चतुर. १० आडमार्गाची. ११ उपदेशाच्या सामर्थ्याचीं. १२ मनें. १३ गोडी. १४ सर्व. १५ रीत, संप्रदाय. १६ अधिकपणानें. * अमर्याद असतात. १७-१८ मत्सराचा संबंध-गुंतागुंत. १९ एकांतस्थळामध्यें. २० क्वचितच. २१ नेमानें. २२ एकमत. २३ समुदाय. २४ वेगवेगळे प्रकार, युक्ति, प्रयुक्ति.

हें स्वभावें । संकेतें बोलिलें ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे पंचमदशके निःस्पृहलक्षणनिरूपणं नाम द्वितीयः समासः ॥ २ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ मुळापासून सैरावैरा । अवघा पंचीकरणपसारा । त्यांत साक्षित्वाचा दोरा । तोचि तत्त्वरूप ॥ १ ॥ दुरस्तां दाटल्या फौजा । उंच सिंहासनीं राजा । याचा विचार समजा । अंतर्यामीं ॥ २ ॥ देहमात्र अस्थिमांसाचें । तैसेंचि जाणावें नृपतीचें । मुळापासून सृष्टीचें । तत्त्वरूप ॥ ३ ॥ रायाचे सत्तेनें चालतें । परंतु अवघीं पंचभूतें । मुळीं अधिक जाणीवेचें तें । अधिष्ठान आहे ॥ ४ ॥ विवेकें बहुत पैसावले । म्हणोन अवतारी बोलिले । मनु चैक्रवर्ती झाले । येणेंचि न्यायें ॥ ५ ॥ जेथें उदंड जाणीव । तेचि तितुके सदैव । थोडे जाणीवेनें निर्दैव । होती लोक ॥ ६ ॥ व्याप आटोप करिती । धक्के चपेटे सोसिती । तेणें प्राणी सदैव होती । देखतदेखतां ॥ ७ ॥ ऐसें हें आतां वर्तलें । मूर्खलोकांस कळेना तें । विवेकी मनुष्य समजतें । सकळ कांहीं ॥ ८ ॥ थोर लहान बुद्धीपाशीं । सगटें कळेना लोकांशीं । आधीं उपजले तयांसी । थोर म्हणती ॥ ९ ॥ वयें धाकुटा नृपति । वृद्ध तयास नमस्कार करिती । विचित्र विवेकाची गति । कळली पाहिजे ॥ १० ॥ सामान्य लोकांचें ज्ञान । तें अवघेंच अनुमान । दीक्षादंडैकांचें लक्षण । येणेंचि पोडें ॥ ११ ॥ नव्हे कोणास म्हणावें । सामान्यास काय ठावें । कोण कोणास म्हणावें । किती म्हणोनि ॥ १२ ॥ धाकुटा भाग्यास चढला । तरी तुच्छ करिती तयाला । याकारणें सलगीच्या लोकांला । दूरी धरावें ॥ १३ ॥ नेमस्त कळेना वचन । नेमस्त नये राजकारण । उगेचि धरिती थोरपण । मूर्खपणें ॥ १४ ॥ नेमस्त कांहींच कळेना । नेमस्त कोणीच मानीना । आधीं उपजलें त्या थोरपणा । कोण पुसे ॥ १५ ॥ वडिलां वडिलपण नाहीं । धाकुट्या धाकुटेंपण नाहीं । ऐसें बोलती त्यांस नाहीं । शहाणपण ॥ १६ ॥ गुणेविण वडिलपण । हें तो अवघेंच अप्रमाण । त्याची प्रचीत प्रमाण । थोरपणीं ॥ १७ ॥ तथापि वडिलांस मानावें । वडिलें वडिलपण जाणावें । नेणतां पुढें कष्टावें । थोरपणीं ॥ १८ ॥ तस्मात् वडिल अंतरात्मा । जेथें चेतला तेथें महिमा । हें प्रकटचि आहे आम्हां । शब्द नाहीं ॥ १९ ॥ याकारणें कोणी एकें । शहाणपण शिकवावें विवेकें । विवेक न शिकतां तुकें । तुटोन जाती ॥२०॥ तुक तुटलें म्हणिजे गेलें । जन्मास येऊन काय केलें । बळेंच सांदीस घातलें । आपणासी ॥ २१ ॥ सगटं बायका शिव्या देती । सांदीस पडला ऐसें म्हणती । मूर्खपणाची प्राप्ति । ठाकून आली ॥ २२ ॥ ऐसें कोणी एकें न करावें । सर्व सार्थकचि करावें । कळेना तरी विवरावें । ग्रंथांतरीं ॥ २३ ॥ शाहण्यास कोणी तरी बोलाती । मूर्खास लोक दवडून देती । जीवास आवडे संपत्ति । तरी शाहणें व्हावें ॥ २४ ॥ अहो या शहाण-

---

१ जिकडे तिकडे. २ आकाशादि भूतांचे देहादिकांच्या उत्पत्तीसाठी होणाऱ्या संमिश्रणाचा पसारा. ३ दुतर्फा. ४ ज्ञानाचें. ५ सार्वभौम. ६ भाग्यवान्. ७ करंटे. ८ थपडा. ९ सर्व. १० दीक्षे (संप्रदाया) च्या रीतीनें. ११ मानानें. १२ वजन, मर्यादा. १३ कोपऱ्यांत, अप्रसिद्ध जागी. १४ हटकून. १५ शोधावें. १६ वेगवेगळ्या ग्रंथांमध्यें. १७ बोलावतात.

पणाकारणें । बहुतांचें कष्ट करणें । परंतु शहाणपण शिकणें । हें उत्तमोत्तम ॥ २५ ॥ जो बहुतांस मानला । तो जाणावा शाहाणा झाला । जनीं शाहण्या मनुष्याला । काय उणें ॥ २६ ॥ आपुलें हित न करी लौकिकीं । तो जाणावा आत्मघातकी । त्या मूर्खाएवढा पातकी । आणिक नाहीं ॥ २७ ॥ आपण संसारीं कष्टतो । लोकांकरवीं रागेजोनें घेतो । जनामध्यें शाहणा तो । ऐसें न करी ॥ २८ ॥ साधकां शिकविलें स्वभावें । मानेल तरी सुखें घ्यावें । मानेना तरी सांडावें । एकीकडे ॥ २९ ॥ तुम्ही श्रोते परम दक्ष । अलक्ष्यास लावितां लक्ष । हें तों सामान्य प्रत्यक्ष । जाणतसां ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे पंचमदशके श्रेष्ठअंतरात्मनिरूपणं नाम तृतीयः समासः ॥ ३ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ पृथ्वीपासून झालीं झाडें । झाडांपासून होतीं लांकडें । लांकडें भस्मोन पुढें । पृथ्वीच होय ॥ १ ॥ पृथ्वीपासून वेल होती । नाना जिन्नस फांपोवती । वाळोन कुजोन मागुती । पृथ्वीच होय ॥ २ ॥ नाना धान्यांचीं नाना अन्नें । मनुष्यें करिती भोजनें । नाना विष्टा नाना वमनें । पृथ्वीच होय ॥ ३ ॥ नाना पक्ष्यादिकीं भक्षिलें । तरी पुढें तैसेंचि झालें । वाळोन भस्म होऊन गेलें । पुनः पृथ्वी ॥ ४ ॥ मनुष्यें मरतांच ऐका । कृमि भस्म कां मृत्तिका । ऐशा काया पडती अनेका । पुढें पृथ्वी ॥ ५ ॥ नाना तृणें पदार्थ कुजती । पुढें त्यांची होय माती । नाना किडे मरोन जाती । पुढें पृथ्वी ॥ ६ ॥ पदार्थ दाटले अपार । किती सांगावा विस्तार । पृथ्वीवांचून थार । कोणास नाहीं ॥ ७ ॥ झाड पाले आणि तृण । पशु भक्षितां होतें शेण । खातमूतभस्म मिळोन । पुन्हां पृथ्वी ॥ ८ ॥ उत्पत्तिस्थितिसंहारतें । तें तें पृथ्वीस मिळोन जातें । जितुकें होतें आणि जातें । पुनः पृथ्वी ॥ ९ ॥ नाना बीजांचिया राशी । विरूढोनि लागती गगनासी । पुढें शेवटीं पृथ्वीसी । मिळोन जाती ॥ १० ॥ लोक नाना धातु पुरिती । बहुतां दिवसां होय माती । सुवर्ण पाषाणांची गति । तैसीच आहे ॥ ११ ॥ मातीचें होतें सुवर्ण । आणि मृत्तिकेचे होती पाषाण । महा अग्निसंगें भस्मोन । पृथ्वीच होय ॥ १२ ॥ सुवर्णाचें * रज होतें । रज शेवटीं कुजोन जातें । रस होऊन वितुळतें । पुनः पृथ्वी ॥ १३ ॥ पृथ्वीपासून धातु निपजती । अग्निसंगें रस होती । तया रसाची होय जेगेती । कठिणरूपें ॥ १४ ॥ नाना जळांसि गंधी उठे । तेथें पृथ्वीचें रूप प्रकटे । दिवसेंदिवस जळ आटे । पुढें पृथ्वी ॥ १५ ॥ पत्रें पुष्पें फळें येती । नाना जीव खाऊन जाती । ते जीव मरतां जगती । नेमस्त होय ॥ १६ ॥ जितुका कांहीं झाला आकार । तितुक्यास पृथ्वी आधार । होती जाती प्राणिमात्र । शेवटीं पृथ्वी ॥ १७ ॥ हें किती म्हणोन सांगावें । विवेकें अवघेंचि जाणावें । खांजणी-भोंजणीचें समजावें । मूळ तैसें ॥ १८ ॥ आपें आळोन पृथ्वी झाली । पुनः आपींच

---

१ सेवा करणें. २ रागें भरून घेतो. ३ मोक्षादि कार्य साधण्याविषयीं प्रवृत्त त्यांना. ४ सावध, हुशार. ५ विस्तार पावतात. ६ अथवा. ७ शरीरें. ८ कचरा, खत. ९ वाढून. १० द्रव्यें. ११ सोनें. * सूक्ष्म कण. १२ पृथ्वी. १३ खास, ठाम. १४ उत्पत्ति व नाश यांचें. १५ उदक.

विरोली । अग्नियोगें भस्म झाली । म्हणोनियां ॥ १९ ॥ आप झालें तेजापासुनी । पुढें तेज घेतलें शोषूनी । तें तेज झालें वायूचेनी । पुढें वायु झडपी ॥ २० ॥ वायु गगनीं निर्माण झाला । पुढें गगनींच विराला । ऐसें खांजणीभांजणीला । बरें पाहा ॥ २१ ॥ जें जेथें निर्माण होतें । तें तेथें लया जातें । येणें रीतीं पंचभूतें । नाश पावती ॥ २२ ॥ भूत म्हणिजे निर्माण झालें । पुनः मागुतें निमालें । पुढें शाश्वत उरलें । परब्रह्म तें ॥ २३ ॥ तें परब्रह्म * जों कळेना । † तों जन्ममृत्यु चुकेना । चार खाणी जीव नाना । होणें घडे ॥ २४ ॥ जडाचें मूळ तें चंचळ । चंचळाचें मूळ तें निश्चळ । निश्चळास नाहीं मूळ । बरें पाहा ॥ २५ ॥ पूर्वपक्ष म्हणजे झालें । सिद्धांत म्हणिजे निमालें । पक्षातीत जें संचलें । परब्रह्म तें ॥ २६ ॥ हें प्रचीतीनें जाणावें । विचारें खुणेसि बाणावें । विचारेविण शिणावें । तेंचि मूर्खपण ॥ २७ ॥ ज्ञानी भिडेनें दडपिला । निश्चळ परब्रह्म कैंचें त्याला । उगाच करितो गलगला । मायेमध्यें ॥ २८ ॥ माया निःशेष नासली । पुढें स्थिति कैसी उरली । विचक्षणें विवरिली । पाहिजे स्वयें ॥ २९ ॥ निःशेष मायेचें निरसन । होतां आत्मनिवेदन । वाच्यांश नाहीं विज्ञान । कैसें जाणावें ॥ ३० ॥ लोकांचे बोलीं जो लागला । तो अनुमानेंचि बुडाला । याकारणें प्रत्ययाला । पाहिलेंचि पाहावें ॥ ३१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे पंचमदशके शाश्वतब्रह्मनिरूपणं नाम चतुर्थः समासः ॥ ४ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ दोघां[१] ऐसी[२] तीनें[३] चालती । अगुणी अष्टधाप्रकृति । अधोर्ध्व सांडून वर्तती । इंद्रधनुष्यऐसी ॥ १ ॥ पर्णतोंडें भक्षितो पर्णजा । मूळ बापास मारी वोजा[४] । × चुकाऱ्या गेला राजा । चौघांजणांचा ॥ २ ॥ देव[५] देवालयामध्यें लपाला । देऊळ पूजितां पावे त्याला । सृष्टिमध्यें ज्याला त्याला । ऐसेंचि आहे ॥ ३ ॥ दोनी[६] नामें एकोस पडलीं । लोकीं नेमस्त कल्पिलीं । विवेकें प्रत्ययें पाहिलीं । तीं एकाचि नाम ॥ ४ ॥ नाहीं पुरुष ना वनिता[७] । लोकीं कल्पिलें तत्त्वतां । याचा बरा शोध घेतां । कांहींच नाहीं ॥ ५ ॥ स्त्री नदी पुरुष खळाळ । ऐसें बोलती सकळ । विचार पाहतां निवळ । देह[८] नाहीं ॥ ६ ॥ आपण आपणास कळेना । पाहों जातां आकळेना । कशास कांहींच मिळेना । उदंडपणें ॥ ७ ॥ एकलाचि उदंड झाला । उदंडाचि

---

१ विरघळून गेली. २ अग्नीपासून. * जों पर्यंत. † तों पर्यंत. ३ आशंका. ४ निर्णयानें ठरलेला अर्थ. ५ नाहींसे झालें. ६ मतभेदाविरहित. ७ श्रमावें. ८ आत्मसमर्पण. ९ बोलण्याचा भाग. १० साक्षात्कार. ११ संशयानेंच. १२ माया व ब्रह्म यांच्या इच्छेप्रमाणें. १३ सत्त्व, रज, तम, हे त्रिगुण. १४ परब्रह्माच्या ठिकाणीं. १५ पंचमहाभूतें, बुद्धी, मन व अहंकार. १६ खाली वर, उत्पत्तिस्थान व लयस्थान. १७ इंद्रधनुष्याप्रमाणें. १८ वनस्पति, तमोगुण. १९ अग्नि. मूलमाया. २० माया. कार्य. २१ ब्रह्म, कारण. २२ कुशलतेनें. × भ्रमल्यासारखा. २३ कूटस्थ २४ चारी देहांचा. २५ आत्मा. २६ देहामध्यें. २७ पुरुष व प्रकृति. २८ ब्रह्मास. २९ स्त्री. ३० ओढा. ३१ रूप, आकार. ३२ एका ब्रह्मापासून सर्व उत्पन्न झालें आहे व सर्वांचा लयहि त्यांतच होणार.

एकला पडिला । आपणासि आपला * गलबला । सोसवेना ॥ ८ ॥ एक असोन फुटी पडली । फुटी असोन स्थिति एकली । विचित्र कळा ‡ पैसावली । प्राणिमात्रीं ॥ ९ ॥ ¶ वल्लीमध्यें जळ संचरे । कोरडेपणें हें वावरे । वोलेवांचून न × थिरे । कांहीं केल्या ॥ १० ॥ झाडामध्यें केली[१] आली । झाडें धांवती निराळीं । कित्येक झाडें अंतराळीं[२] । उडोन जाती ॥ ११ ॥ भूमीपासून वेगळीं झालीं । परी तीं नाहींत वाळलीं[३] । निराळींच[४] बळावलीं । जेथें तेथें ॥ १२ ॥ ० देवाकरितां[५] चालती + झाडें । देव नसतां होती लांकडें । नीटचि आहे कुंवाडें[६] । सर्वथा नव्हे ॥ १३ ॥ झाडापासून झाडें होतीं । तींहि अंतरिक्ष जाती । मूळांनीं भेदिली जगती[७] । कदापि नाहीं ॥ १४ ॥ झाडास झाडाचें खातपाणी । घालूंने पाळिती प्रतिदिनीं । बोलकीं झाडें शब्दमंथनीं[८] । विचार घेती ॥ १५ ॥ होणार तितुकें आधींच झालें । मग कल्पकल्पूनी बोलिलें । जाणत्यास कळलें । सकळ कांहीं ॥ १६ ॥ समजलें तरी उमजेना । उमजे तरी समजेना । प्रत्ययेविण अनुमानेना । सकळ कांहीं ॥१७॥ सर्वज्ञांचा वडिल कोण । हेचि पहावी वोळखण । भेटे आपणास आपण । जगदंतरें ॥१८॥ अंतर्निष्ठाची उंच कोटी । बैहिर्मुखाची संगति खोटी । मूर्ख काय समजेल गोष्टी । शाहणे जाणती ॥ १९ ॥ अंतरें राखतां राजी । भलत्यास भलताच नेवाजी[९] । अंतर न राखतां भाजी । मिळणार नाहीं ॥ २० ॥ ऐसें वर्ततें प्रत्यक्ष । अलक्ष्यीं[१०] लावावें लक्ष । दक्षास भेटतां दक्ष । समाधान होतें ॥ २१ ॥ मनास मिळतां मन । पाहोन येती[११] निरंजन[१२] । चंचळचक्र[१३] उल्लंघन । पैलाड जाती ॥२२॥ एकदां जाऊन पाहूनि आले । मग तें[१४] सन्निद्ध देखिलें । चर्मचक्षीं[१५] लक्षिलें । नवचे कदा ॥ २३ ॥ नाना शरीरीं चंचळ । अखंड करी चळवळ । परब्रह्म तें निश्चळ । सर्वांठायीं ॥२४॥ चंचळ धावे एकीकडे । वोस पडे दुसरीकडे । चंचळ पुरे सर्वांकडे । हें तो घडेना ॥ २५ ॥ चंचळ चंचळास पुरेना[१६] । अवघें चंचळ विवरेना । निश्चळें अपार अनुमाना । कैसें येतें ॥ २६ ॥ गगनीं चालिली हवाई[१७] । कैसी पावेल पार पदवी । जातां मध्येंचि विझावी । हा स्वभाव तिचा ॥ २७ ॥ मनोधर्म एकदेशी । कैसा आकळील वस्तूसी । निर्गुण सांडून आपेशी[१८] । सर्व ब्रह्म म्हणे ॥ २८ ॥ नाहीं सारासार विचार । तेथें अवघा एकंकार । खरें सांडून खोटें पोर । नेणतें घेतें ॥२९॥ ब्रह्मांडाचें महाकारण । तेथूनि हें पंचीकरण । महावाक्याचें विवरण । वेगळेंच असे ॥ ३० ॥ महत्तत्त्व महद्भूत । तोचि जाणावा भगवंत । उपासना हे समास । येथून झाली ॥ ३१ ॥ कर्म उपासना आणि ज्ञान । त्रिकांड[१९] वेद हे प्रमाण । ज्ञानाचें होतें विज्ञान । परब्रह्मीं ॥ ३२ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे पंचमदशके चंचललक्षणनिरूपणं नाम पंचमः समासः ॥ ५ ॥

---

* गोंधळ. १ भेद, अनेकत्व. ‡ विस्तारली. ¶ वेल. × टिकत नाहीं. २ क्रीडा. ३ आकाशांत. ४ कोरफड वगैरे. ० देवाच्या–आत्म्याच्यायोगानें. ५ सजीव. + देह. ६ कूट. ७ शब्दांच्या चर्चेनें. ८ परब्रह्माचा सर्वदा विचार करणाऱ्याची, सिद्धाची. ९ संसारी जनाची. १० नावाजतो. ११ लक्षांत न येणाऱ्या परब्रह्माच्या ठिकाणीं. १२ अज्ञानरहित ब्रह्म. १३ ज्याचे मनाला मन मिळालें आहे ते दोघे. १४ मायाचक्र. १५ आपल्या हृदयांत १६ डोळ्यांनीं. १७ माया. १८ मायेचा मायेला पत्ता लागेना. १९ ब्रह्म. २० वाण. २१ आपल्या ठिकाणी, करंटा. २२ कर्म, उपासना व ज्ञान मिळून तीन भाग.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ पतिपासून कृष्ण झालें । भूमंडळीं विस्तारलें । तेणेविण उमजलें । हें तों घडेना ॥ १ ॥ आहे तरी स्वल्प लक्षण । सर्वत्रांची साठवण । अधम आणि उत्तम गुण । तेथेंचि असती ॥ २ ॥ महीसुत सरसाविला । सरसावून द्विधा केला । उभयतां मिळोन चालला । कार्यभाग ॥ ३ ॥ श्वेताश्वेतास गांठी पडतां । मध्यें कृष्ण मिश्रित होतां । इहलोक सार्थकता । होत आहे ॥ ४ ॥ विवरतां याचा विचार । मूर्ख तोचि होय चतुर । सद्यः प्रचीत साक्षात्कार । परलोकींचा ॥ ५ ॥ सकळांस जें मान्य । तोंचि होतसे सामान्य । सामान्यास अनन्य । होईजेते नाहीं ॥ ६ ॥ उत्तम मध्यम कनिष्ठ रेखा । अदृष्टींची गुप्त रेखा । चत्वार अनुभव सारिखा । होत नाहीं ॥ ७ ॥ चौदा पिढ्यांचे पवाडे । सांगती ते शाहणे कीं वेडे । ऐकत्यानें घडे कीं न घडे । ऐसें पाहावें ॥ ८ ॥ रेखा तितुकी पुसोन जाते । प्रत्यक्ष प्रत्यया येते । डोळेझांकणी करावी ते । ते काय निमित्त ॥ ९ ॥ बहुतांचे बोलीं लागले । ते प्राणी अनुमानीं बुडाले । मुख्य निश्चय चुकले । प्रत्ययाचा ॥ १० ॥ उदंडाचें उदंड ऐकावें । परी तें प्रत्ययें पाहावें । खरें खोटें निवडावें । अंतर्यामीं ॥ ११ ॥ कोणासि नव्हे म्हणों नये । समजावे अपाय उपाये । प्रत्यय घ्यावा बहुत काये । बोलोनियां ॥ १२ ॥ माणूस हेकेंडे आणि कोंचें । मान्य करावें तयाचें । येणेंप्रकारें बहुतांचें । अंतर राखावें ॥ १३ ॥ अंतरीं पीळ पेंच वेळेसा । तोचि वाढवी बहुवसा । तरी मग शाहणा कैसा । निववूं नेणें ॥ १४ ॥ वेडे करावे शाहणे । तरीच जिणें श्लाघ्यवाणें । उगेंच वादांग वाढवणें । हें मूर्खपण ॥ १५ ॥ मिळोन जाऊन मिळवावे । पेडा घेऊन उलथावें । कांहींच कळों न द्यावें । विवेकबळ ॥ १६ ॥ दुसऱ्याचे चालीं चालावें । दुसऱ्याचे बोलणीं बोलावें । दुसऱ्याच्या मनोगतें जावें । मिळोनियां ॥ १७ ॥ जो दुसऱ्याच्या हितावरी । तो विपेट कांहींच न करी । मानेत मानेत विवरी । अंतर तयाचें ॥ १८ ॥ आधीं अंतर हातीं घ्यावें । मग हळूहळू उकलावें । नाना उपायें न्यावें । परलोकासी ॥ १९ ॥ हेकेंडास हेकाड मिळाला । तेथें गलबलाचि झाला । कलह उठतां चातुर्याला । ठाव कैंचा ॥ २० ॥ उगीच करिती बडबड । परी करून दाखवणें हें अवघड । परस्थळसाधणें जड । कठिण आहे ॥ २१ ॥ धक्के चपेटे सोसावे । नीच शब्द सोशीत जावे । प्रस्तावोन परावे । आपले होती ॥ २२ ॥ प्रसंग जाणोन बोलावें । जाणपण कांहींच न घ्यावें । लीनता धरून जावें । जेथें तेथें ॥ २३ ॥ कुग्रामें अथवा नगरें । पाहावीं घरांचीं घरें । भिक्षानिमित्तें लहान थोरें । परीक्षून सोडावीं ॥ २४ ॥ बहुतीं कांहीं तरी सांपडे । विचक्षणलोकीं मैत्री घडे ।

---

१ दिव्याची पिवळी ज्योत. २ काजळ. ३ बोरू. ४ काजळाची शाई व लेखणी. ५ कागद व काजळाची शाई. ६ लेखणी. ७ तात्कालिक अनुभव. ८ एकदेशी. ९ होतां येत नाहीं. १० नशीबाची. ११ पराक्रम. १२ संशयामध्यें. १३ हेकेखोर. १४ कच्चें. १५ अडचण, घोंटाळा. १६ स्तुत्य. १७ हार, कमीपणा. १८ वांकडें. १९ गोडीनें. २० हट्टी. २१ दुसऱ्याचें अंतःकरण अनुकूल करून घेणें. २२ पश्चात्तापानें २३ परकी. २४ भिक्षेच्या निमित्तानें २५ बहुत प्रवास केल्यानें, बहुत माणसांचा परिचय केल्यानें. २६ शाहाण्या लोकांमध्यें.

उगेंच बैसतां कांहीं न घडे । फिरणें विवरणें ॥ २५ ॥ सावधपणें सर्व जाणावें । वर्तमान आधींच घ्यावें । जाऊं ये तिकडे जावें । विवेकेसहित ॥ २६ ॥ नाना जिन्नस पाठांतरें । निवती सकळांचीं अंतरें । लिहोन देतां परोपकारें । सीमा सांडावी ॥ २७ ॥ जैसें जयास पाहिजे । तैसें तयासि दीजे । तरी मग श्रेष्ठ होइजे । सकळां मान्य ॥ २८ ॥ भूमंडळीं सकळां मान्य । तो म्हणूं नये सामान्य । कित्येक लोक अनन्यें । तया पुरुषासी ॥ २९ ॥ ऐशीं चातुर्याचीं लक्षणें । चातुर्यें दिग्विजय करणें । मग तयास काय उणें । जेथें तेथें ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे पंचमदशके चातुर्यलक्षणनिरूपणं नाम षष्ठः समासः ॥ ६ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ नाना विकारांचें मूळ । ते हे मूळमायाच केवळ । अैचंचळीं जें चंचळ । सूक्ष्मरूपें ॥ १ ॥ मूळमाया जाणिवेची । मुळींच्या मूळसंकल्पाची । वोळखी षड्गुणैश्वराची । येणेंचि न्यायें ॥ २ ॥ प्रकृतिपुरुष शिवशक्ति । अर्धनारीनटेश्वर म्हणती । परी ते अवघे जगज्योति । मूळ त्यासी ॥ ३ ॥ संकल्पाचें जें चळण । तेचि वायूचें लक्षण । वायु आणि त्रिगुण । आणि पंचभूतें ॥ ४ ॥ पाहतां कोणी एक वेल । त्याच्या मुळया असती खोल । पत्रें पुष्पें फळें केवळ । मूळाचपाशीं ॥ ५ ॥ याहि वेगळे नाना रंग । आकार विकार तरंग । नाना स्वाद अंतरंग । मुळामध्यें ॥ ६ ॥ तेंचि मूळ फोडून पाहतां । कांहींच नाहीं वाटे आतां । पुढें वाढतां वाढतां । दिसों लागे ॥ ७ ॥ कड्यावरी वेल निघाला । अधोमुखें बळें चालिला । फांपावोनैं पुढें आला । भूमंडळीं ॥ ८ ॥ तैशी मूळमाया जाण । पंचभूतें आणि त्रिगुण । मुळीं आहेत हें प्रमाण । प्रत्ययें जाणावें ॥ ९ ॥ अखंड वेल पुढें वाढला । नाना विकारीं शोभला । विकारांचा विकार झाला । असंभाव्य ॥ १० ॥ नाना फैडैगरें फुटलीं । नाना जुंबाडें वाढलीं । अनंत अग्रें चाललीं । सृष्टीमध्यें ॥ ११ ॥ कित्येक फळें तीं पडती । सवेंचि आणिक निघती । ऐशीं होती आणि जाती । सर्वकाळ ॥ १२ ॥ एक वेलचि वाळले । पुनः तेथेंचि फुटले । ऐसे आले आणि गेले । कितीएक ॥ १३ ॥ पानें झडती आणि फुटती । पुष्पें फळें तेणेंचि रीतीं । मध्यें जीव हे जगतीं । असंभाव्य ॥ १४ ॥ अवघा वेलाचि करपतो । मुळापासोन पुनः होतो । ऐसा अवघा विचार जो तो । प्रत्यक्ष जाणावा ॥ १५ ॥ मूळ खाणोन काढिलें । प्रैत्ययज्ञानें निर्मूळ केलें । तरी मग वाढणेंचि राहिलें । सकळ कांहीं ॥ १६ ॥ मुळीं बीज शेवटीं बीज । मध्यें जळरूप बीज । ऐसा हा स्वभाव सहज । विस्तारला ॥ १७ ॥ मुळामधील ज्या गोष्टी । सांगतां हे बीजसृष्टि । जेथील अंश तेथें कष्टी । न होतां जातो ॥ १८ ॥ जातो येतो पुनः जातो । ऐशा प्रैत्यावृत्ति करितो । परंतु आत्मज्ञानी जो तो । अन्यथा न घडे ॥ १९ ॥

---

१ विचार करणें. २ जातां येईल तिकडे. ३ वेंचे, उतारे. ४ एकनिष्ठ. ५ ब्रह्म. ६ माया. ७ यश, श्री, औदार्य, ज्ञान, वैराग्य, ऐश्वर्य, हे सहा गुण त्यांनीं युक्त, त्याची. ८ जगाची चेतनाशक्ति. ९ समुदाय. १० विस्तार पावून. ११ फांद्या, फाटे. १२ बेट, समुदाय, विस्तार. १३ अनुभवज्ञानानें. १४ येरझारा, फेऱ्या.

न घडे ऐसें जरी म्हणावें । तरी कांहीं तरी लागे जाणावें । अंतरीचे परी ठावें । सकळांस कैंचें ॥ २० ॥ तेणेंसीचें कार्यभाग करिती । परंतु तयास नेणती । दिसेना तें काय करिती । बापुडे लोक ॥ २१ ॥ विषयभोग तेणेंचि घडे । तेणेविण कांहींच न घडे । स्थूळ सांडून सूक्ष्मी पवाडे । ऐसा पाहिजे ॥ २२ ॥ जें आपलेंचि अंतर । तद्रूपचि जगदंतर । शरीरभेदाचे विकार । वेगळाले ॥ २३ ॥ अंगुळीची अंगुळीस वेदना । एकीची एकीस कळेना । हात पाय अवयव नाना । येणेंचि न्यायें ॥ २४ ॥ अवयवाचे अवयव नेणे । मा तो पराचें काय जाणे । परांतर याकारणें । जाणवेना ॥ २५ ॥ एकेंचि उदकें सकळ वनस्पती । नाना अग्रें भेद दिसती । खुडिलीं तितुकींच सुकती । येर तें टवटवित ॥ २६ ॥ येणेंचि न्यायें भेद झालां । कळेना एकाचें एकाला । * जाणपणें आत्मयाला भेद नाहीं ॥ २७ ॥ आत्मत्वीं भेद दिसे । देह प्रकृतीकरितां भासे । तरी जाणतचि असे । बहुतेक ॥ २८ ॥ देखोन ऐकोन जाणती । शाहणे अंतर परीक्षिती । धूर्त ते अवघेचि समजती । गुप्तरूपें ॥ २९ ॥ जो बहुतांचें पाळण करी । तो बहुतांचें अंतर विवरी । धूर्तपणें ठाउकें करी । सकळ कांही ॥ ३० ॥ आधीं मनोगत पाहती । मग विश्वास धरिती । प्राणिमात्र येणेंचि रीतीं । वर्तताहे ॥ ३१ ॥ स्मरणामागें विस्मरण । रोकडी प्रचीत प्रमाण । आपलें ठेवणें आपण । चुकताहे ॥ ३२ ॥ आपलेंच आपणा स्मरेना । बोलिलें तें आठवेना । उठती अनंत कल्पना । ठाउक्या कैंच्या ॥ ३३ ॥ ऐसें हें चंचळ चक्र । कांहीं नीट कांहीं वक्र । झाला रंक अथवा शक्र । तरी स्मरणास्मरणें ॥ ३४ ॥ स्मरण म्हणिजे देव । विस्मरण म्हणिजे दानव । स्मरणविस्मरणें मानव । वर्तती आतां ॥ ३५ ॥ म्हणोन दैवी आणि दानवी । संपत्ति द्विधा जाणावी । प्रचीत मानसीं आणावी । विवेकेसहित ॥ ३६ ॥ विवेकें विवेक जाणावा । आत्म्यानें आत्मा वोळखावा । नेत्रें नेत्रचि पाहावा । दर्पणींचा ॥ ३७ ॥ स्थूळें स्थूळ खाजवावें । सूक्ष्में सूक्ष्म समजावें । खुणेनें खुणेसि बाणावें । अंतर्यामीं ॥ ३८ ॥ विचारें जाणावा विचार । अंतरें जाणावें अंतर । अंतरें जाणावें परांतर । होऊनियां ॥ ३९ ॥ स्मरणामाजीं विस्मरण । हेंचि भेदाचें लक्षण । एकदेशी परिपूर्ण । होत नाहीं ॥ ४० ॥ पुढें शिके मागें विसरे । पुढें उजेड मागें अंधकारें । पुढें स्मरें मागें विस्मरे । सकळ कांहीं ॥ ४१ ॥ तुर्या जाणावी स्मरण । सुषुप्ति जाणावी विस्मरण । उभयतां शरीरीं जाण । वर्तती आतां ॥ ४२ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे पंचमदशके अधोर्ध्वनिरूपण नाम सप्तमः समासः ॥ ७ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ रेणू हून सूक्ष्म किडे । त्यांचें आयुष्य निपटें थोडें । युक्ति बुद्धि तेणेंचि पाडें । तयामध्यें ॥ १ ॥ ऐसे नाना जीव असती । पाहों जातां न

१ हृदयांत. २ त्यायोगानेंच. ३ जड शरीर. ४ अंतःकरणामध्यें. ५ शिरतो. ६ जगाचें अंतःकरण. ७ दुसऱ्याचें अंतःकरण. * ज्ञानाचे दृष्टीनें. ८ मायेमुळें. ९ इंद्र. १० राक्षस. ११ आसुरी. १२ दोन प्रकारची. १३ चवथी अवस्था. १४ गाढ झोंप. १५ अत्यंत बारीक कण. १६ अगदीं १७ त्याच प्रमाणाची.

दिसती । अंतःकरणपंचकाची स्थिति । तेथेंहि आहे ॥ २ ॥ त्यापुरतें त्यांचें ज्ञान । विषय इंद्रियें समान । सूक्ष्मशरीरें विवरोन । पाहतो कोण ॥ ३ ॥ त्यास मुंगी महाथोर । नेणों चालिला कुंजर । मुंगीस मुताचा पूर । ऐसें बोलती ॥ ४ ॥ ते मुंगीसमान शरीरें । उदंड असती सहान थोरें । समस्तांमध्यें जीवेश्वरें । वस्ति कीजे ॥ ५ ॥ ऐशिया किडियांचा संभार । उदंड दाटला विस्तार । अत्यंत सूक्ष्मदर्शी जो नर । तो विवरोनें पाहे ॥ ६ ॥ नाना नक्षत्रीं नाना किडे । त्यांस भासती पर्वताएवढें । आयुष्यहि तेणेंचि पाडें । उदंड वाटे ॥ ७ ॥ पक्ष्याएवढें लहान नाहीं । पक्ष्याएवढें थोर नाहीं । सर्प आणि मत्स्य पाहीं । येणेंचि पाडें ॥ ८ ॥ मुंगीपासून थोर थोरें । चढती वाढती शरीरें । त्यांचीं निर्धारितां अंतरें । कळों येती ॥ ९ ॥ नाना वर्ण नाना रंग । नाना जीवनाचे तरंग । एक सुरंग एक विरंग । किती म्हणोन सांगावें ॥ १० ॥ एक सुकुमारें एक कठोरें । निर्माण केलीं जगदीश्वरें । सुवर्णासारिखीं शरीरें । देदीप्यमानें ॥ ११ ॥ शरीरभेदें आहारभेदें । वाचाभेदें गुणभेदें । अंतरीं वसिजे अभेदें । एकरूपें ॥ १२ ॥ एक त्रासकें एक मारकें । पाहों जातां नाना कौतुकें । कितीएक अमोलिकें । सृष्टीमध्यें ॥ १३ ॥ ऐशीं अवघीं विवरोन पाहे । ऐसा प्राणी कोण आहे । आपुल्यापुरतें जाणोन राहे । किंचित्मात्र ॥ १४ ॥ नवखंड हे वसुंधरा । सप्तसागरांचा फेरा । ब्रह्मांडाबाहेरील नीरा । कोण पाहे ॥ १५ ॥ त्या नीरामध्यें जीव असती । पाहों जातां असंख्याती । त्या विशाळ जीवांची स्थिति । कोण जाणे ॥ १६ ॥ जेथें जीवन तेथें जीव । हा उत्पत्तीचा स्वभाव । पाहतां याचा अभिप्राव । उदंड असे ॥ १७ ॥ भूगर्भीं नाना नीरें ॥ त्या नीरामध्यें शरीरें । नाना जिन्नस लहान थोरें । कोण जाणे ॥ १८ ॥ एक प्राणी अंतरिक्षें असती । तिहीं नाहीं देखिली क्षिति । वरिच्यावरी उडोनि जाती । † पक्ष फुटल्यानंतर ॥ १९ ॥ नाना खेचरें आणि भूचरें । नाना वनचरें आणि जळचरें । चौऱ्यांशी लक्ष योनिप्रकारें । कोण जाणें ॥ २० ॥ उष्ण तेज वेगळे करूनी । जेथें तेथें जीवयोनी । कल्पनेपासून होती प्राणी । कोण जाणे ॥ २१ ॥ एक नाना सामर्थ्यें केलें । एक इच्छेपासून झाले । एक शब्दासरिसे पावले । शापदेह ॥ २२ ॥ एक देह बाजीगरीचें । एक देह वोडंबरीचे । एक देह देवतांचे । नाना प्रकारें ॥ २३ ॥ एक क्रोधापासून झाले । एक तपापासून जन्मले । एक उःशापें पावले । पूर्व देह ॥ २४ ॥ ऐसें भगवंताचें करणें । किती म्हणोन सांगणें । विचित्र मायेच्या गुणें । होत जाते ॥ २५ ॥ नाना अवघड करणीं केली । कोणी देखिली ना ऐकिली । विचित्र कळा समजली । पाहिजे सर्व

---

१ अंतःकरण, मन, बुद्धि, चित्त, अहंकार. २ हत्ती. ३ पुष्कळ, ४ उद्योगी. ५ शोधून. ६ निश्चय केला असतां. ७ समूह. ८ भरतखंड, घृतखंड, रम्यखंड, द्रव्यमालखंड, केतुमालखंड, हरिखंड, विधमालखंड, हर्णखंड, सुवर्णखंड, अशी नऊ खंडें. ९ पृथ्वी. १० क्षारोदक, इक्षुरसोदक, सुरोदक, घृतोदक, दधिमंडोदक, शुद्धोदक, क्षीरोदक. ११ उदकाला. १२ पृथ्वीचे पोटांत. १३ आकाशांत. † पंख. १४ पक्षी. १५ जमिनीवर फिरणारे. १६ जादूचे. १७ गारुडी मंत्रविद्येचे. १८ शापाची शांतता. १९ कृत्यें, कामें.

॥ २६ ॥ थोडेबहुत समजले । पोटापुरती विद्या शिकले । प्राणी उगेच गर्वें गेले । 'मी ज्ञाता' म्हणोनी ॥ २७ ॥ ज्ञानी एक अंतरात्मा । सर्वांमध्यें सर्वात्मा । त्याचा कळावया महिमा । बुद्धि कैची ॥ २८ ॥ सप्तकंचुक ब्रह्मांड । त्यांत सप्तकंचुक पिंडे । त्या पिंडामध्यें उदंड । प्राणी असती ॥ २९ ॥ आपुल्या देहांतील न कळे । मौं तें अवघें कैंचें कळे । लोक होती उताविळे । अल्प ज्ञानें ॥ ३० ॥ अणुरेणू ऐसे जिन्नस । त्यांचे आम्ही विराट पुरुष । आमुचें उदंडचि आयुष्य । त्यांच्या हिशोबें ॥ ३१ ॥ त्यांच्या रीती त्यांचें दंडक । वर्तायाचे असती अनेक । जाणे सर्वहि कौतुक । ऐसा कैचा ॥ ३२ ॥ धन्य परमेश्वराची करणी । अनुमानेना अंतःकरणीं । उगीच अहंता पापिणी । * वेढा लावी ॥ ३३ ॥ अहंता सांडून विवरणें । कित्येक देवाचें करणें । पाहतां मनुष्याचें जिणें । थोडें आहे ॥ ३४ ॥ थोडें जिणें अर्धपुडी कार्यो । गर्व करिताती रडाया । शरीर अवघें पडावया । वेळ नाहीं ॥ ३५ ॥ कुश्चिळें ठायीं जन्मले । आणि कुश्चिळ रसेंचि वाढले । त्यांस म्हणती थोरले । कोण्या हिशोबें ॥ ३६ ॥ कुश्चिळ आणि क्षणभंगुर । अखंड व्यथा चिंतातुर । लोक उगेंच म्हणती थोर । वेडेपणें ॥ ३७ ॥ काया माया दों दिवसांची । आदि अंतीं अवघें छी छी । झांकाथोपो दाऊन उगेची । थोरीव दाविती ॥ ३८ ॥ झांकिलें तरी उपंडेर पडे । दुर्गंधि सुटे जिकडे तिकडे । जो कोणी विवेकी पवाडे । तोचि धन्य ॥ ३९ ॥ उगेंच कासया तंडावें । मोडा अहंतेचे पुंडावे । विवेकें देवास धुंडावें । हें उत्तमोत्तम ॥ ४० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे पंचमदशके सूक्ष्मजीवनिरूपणं नाम अष्टमः समासः ॥ ८ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ † चौखाणींचे प्राणी होती । अवघे उदकेंचि वाढती । ऐसे होती आणि जाती । असंख्यात ॥ १ ॥ तत्वांचें शरीर झालें । अंतरात्म्यासगट वळलें । त्याचें मूळ जों शोधिलें । तों उदकरूप ॥ २ ॥ शरत्काळींचीं शरीरें । पिळपिळों झिरपती नीरें । उभय रेतें एकत्रें । मिसळती रक्तीं ॥ ३ ॥ अन्नरस देहरस । रक्तरेतें बांधे मूस । रसद्वयें सावकाश । वाढों लागे ॥ ४ ॥ वाढतां वाढतां वाढलें । कोमळाचें कठिण झालें । पुढें उदक पैसावलें । नाना अवयवीं ॥ ५ ॥ संपूर्ण होतां बाहेर पडे । भूमीस पडतां मग तें रडे । अवघ्यांचें अवघें घडे । ऐसें आहे ॥ ६ ॥ कुंडी वाढे कुबुद्धि वाढे । मुळापासोनि अवघें घडे । अवघेंच वाढे आणि मोडे । देखतां देखतां ॥ ७ ॥ पुढे अवधीयांचें शरीर । दिवसेंदिवस जाहलें थोर । सुचों लागला विचार । कांहीं कांहीं ॥ ८ ॥ फळामध्यें बीज आलें । तेणें न्यायें तेथें जाहलें । ऐकतां देखतां उमजलें सकळ कांहीं ॥ ९ ॥ बीजें उदकें अंकुरती । उदक नसतां उडोन जाती । एके ठायीं

---

१ पंचमहाभूतें, अहंकार व महत्तत्व मिळून सात आवरणें. २ देह. ३ अनेक. ४ मग. ५ विशाल. ६ चाली. * भ्रमांत पाडतें. ७ आयुष्य. ८ रात्रीमध्यें अर्ध आयुष्य जाऊन बाकीच्या अर्ध आयुष्याची. ९ शरीर. १० मळीण. ११ डामडौल व थापा. १२ ढोंग्याची उघडकी. १३ शिरतो. १४ बंडें. † उद्भिज, जारज, अंडज, स्वेदज हे चार प्रकार. १५ प्राणासहवर्तमान. १६ वाहतात. १७ शुक्र. १८ गर्भाशय. १९ शरीर. २० बीजांना अंकुर फुटतात.

उदक माती। होतां बरें ॥ १० ॥ दोहोंमध्यें असतां बीज । भिजोन अंकुर सहज । वाढतां वाढतां पुढें रिघे[1] । उदंड आहे ॥ ११ ॥ इकडे मुळ्या धांवे घेती । तिकडे अग्रें हेलावती[2] । मुळें अग्रें द्विधा होती । बीजापासूनी ॥ १२ ॥ मुळ्या चालिल्या पाताळीं । अग्रें धांवती अंतेराळीं[3] । नाना पत्रीं पुष्पीं फळीं । लगडलीं झाडें ॥ १३ ॥ फळां वडील सुमनें[4] । सुमना वडील पानें । पानां वडील अनुसंधानें[5] । काष्टें अवघीं ॥ १४ ॥ काष्ठां वडील मुळ्या बारीक । मुळ्यां वडील तें उदक । उदक * आळोनि कौतुक । भूमंडळाचें ॥ १५ ॥ याची ऐशी आहे प्रचीति । तेव्हां सकळां वडील जगती[6] जगतीं वडील मूर्ति[7] । आपोनारायणाची[8] ॥ १६ ॥ तया वडील अग्निदेव । अग्नि वडील वायुदेव । वायुदेवावडील स्वभाव । अंतरात्म्याचा ॥ १७ ॥ सकळां वडील अंतरात्मा । त्यासि नेणे तो दुरात्मा । दुरात्मा म्हणिजे दूर आत्मा । अंतरला तया ॥ १८ ॥ जवळीं असोन चुकलें । प्रत्ययास नाहीं सोकले[9] । उगेंचि आले आणि गेले । देवाच करितां ॥ १९ ॥ म्हणोन सकळां वडील देव । त्यासि होतां अनन्यभाव[10] । मग हे प्रकृतीचा स्वभाव । पालटों लागे ॥ २० ॥ करी आपुला व्यासंग[11] । कदापि नव्हे ध्यानभंग । बोलणें चालणें × व्यंग । पडोंच नेदी ॥ २१ ॥ जें वडिलीं निर्माण केलें । तें पाहिजे पाहिलें । काय काय वडिलीं केलें । किती पाहावें ॥ २२ ॥ तो वडील जेथें चेतलें[12] । तोचि भाग्यपुरुष झाला । अल्प चेतनें तयाला । अल्प भाग्य ॥ २३ ॥ तया नारायणाला मनीं । अखंड आठवावें ध्यानीं । मग ते लक्ष्मी तयापासूनी । जाईल कोठें ॥ २४ ॥ नारायण असे विश्वीं[13] । त्याची पूजा करीत जावी । याकारणें तोषवावी । कोणी तरी काया ॥ २५ ॥ उपासना शोधून पाहिली । तीं ते विश्वेपाळिती[14] झाली । नकळे लीला परीक्षिली । नवचे कोणा ॥ २६ ॥ देवाची लीला देवेविण । आणिक दुसरा पाहे कोण । पाहणें तितुकें आपण । देवचि असे ॥ २७ ॥ उपासना सकळांठायीं । अंतरात्मा कोठें नाहीं । याकारणें ठायीं ठायीं । रामें आटोपिलें ॥ २८ ॥ ऐसी माझी उपासना । आणितां नये अनुमाना । नेऊनि घाली निरंजना[15] । पैलीकडे ॥ २९ ॥ देवाकरितां कर्में चालती । देवाकरितां उपासक होती । देवाकरितां ज्ञानी असती । कितीएक ॥ ३० ॥ नाना शास्त्रें नाना मतें । देवचि बोलिला समस्तें । नेमकी नेमक व्यस्ताव्यस्तें । कर्मानुसार ॥ ३१ ॥ देवास अवघें लागे करावें । त्यांत घेऊं ये तितुकें घ्यावें । अधिकारासारिखें चालावें । म्हणिजे बरें ॥ ३२ ॥ आवाहन विसर्जन[16] । ऐसेंचि बोलिलें विधान[17] । पूर्वपक्ष झाला येथून । सिद्धांत[18] पुढें ॥ ३३ ॥ वेदांत सिद्धांत

---

१ आनंद, मौज. २ वाढतात. ३ पसरतात. ४ आकाशांत. ५ भरून आलीं. ६ फुलें. ७ संबंधानें. * आटून घट्टहोऊन. ८ पृथ्वी. ९ उदकरूपी विष्णूची. १० अनुभवाची ज्यांस चटक लागली नाहीं. ११ एकनिष्ठपणा. × कर्मपिणा. १२ तो अंतरात्मा जेथें प्रकाशला. १३ जगतांत. १४ जगताचें रक्षण करणारी. १५ भक्ति. १६ शुद्ध, ईश्वर. १७ नियमित व अनियमित. १८ भानगडीची व सरळ. १९ बोलविणें. २० निरोप देणें, सोडणें. २१ रीत. २२ शंका. २३ निर्णय.

धादांत । प्रचीतें प्रमाण नेमस्त । पंचीकरणें सांडून हित । वाक्यार्थ पाहावा ॥ ३४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे पंचमदशके पिंडोत्पत्तिनिरूपणं नाम नवमः समासः ॥ ९ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ गगनीं अवघेंचि होत जातें । गगनाऐसें तेंगेना तें । * निश्चळीं ❀ चंचळ नाना तें । येणेंचि न्यायें ॥ १ ॥ अंधार दाटला बळें । वाटे गगन झालें काळें । रविकिरणें तें पिंवळें । सर्वांचि वाटे ॥ २ ॥ उदंड होवें जेव्हां पडिलें । गमे गगन थंड झालें । उष्णझळेनें वाळलें । ऐसें वाटे ॥ ३ ॥ ऐसें जें कांहीं वाटलें । तें तें झालें आणि गेलें । आकाशासारिखें तगलें । हें तों घडेना ॥ ४ ॥ उत्तम जाणिवेचा जिन्नस । समजोन पाहे सावकाश । निराभास तें आकाश । भास मिथ्या ॥ ५ ॥ उदक पसरे वायु पसरे । आत्मा अत्यंतचि पसरे । तत्त्वें तत्त्व अवघेंचि पसरे । अंतर्यामीं ॥ ६ ॥ चळतें आणि चळेना तें । अंतरीं अवघेंच कळतें । विवरणेंचि निवळतें । प्राणिमात्रांसी ॥ ७ ॥ विवरतां विवरतां शेवटीं । निर्वृत्तिपदीं अखंड भेटी । झालियानें तुटी । होणार नाहीं ॥ ८ ॥ जेथें ज्ञानाचें होतें विज्ञान । आणि मनाचें होतें उन्मन । तत्त्वनिरसनीं अनन्य । विवेकें होतें ॥ ९ ॥ वडिलांसि शोधून पाहिलें । तों चंचळाचें निश्चळ झालें । देवभक्तपण गेलें । तये ठायीं ॥ १० ॥ ठाव म्हणतां पदार्थ नाहीं । पदार्थमात्र मुळींच नाहीं । जैसें तैसें बोलों कांहीं । कळावया ॥ ११ ॥ अज्ञानशक्ति निरसली । ज्ञानशक्ति मावळली । वृत्तिशून्य कैशी झाली । स्थिति पाहा ॥ १२ ॥ मुख्य शक्तिपात तो ऐसा । नाहीं चंचळाचा वेळैसा । * निवांतीं निवांत कैसा । निर्विकारी ॥ १३ ॥ चंचळाची विकार × बाळटे । तें चंचळाचि जेथें आटे । चंचळ निश्चळ घनवटे । हें तों घडेना ॥ १४ ॥ महावाक्यांचा विचार । तेथें संन्यासि अधिकार । दैवी कृपेचा जो नर । तोहि विवरोन पाहे ॥ १५ ॥ संन्यासी म्हणिजे षडंगेन्यासी । विचारवंत सर्व संन्यासी । आपुली करणी आपणापासी । निश्चयेंसी ॥ १६ ॥ जगदीश बोलैलयावरी । तेथें कोण अनुमान करी । आतां असो हें विचारी । विचार जाणती ॥ १७ ॥ जे जे विचारी समजले । ते ते निःसंग होऊन गेले । देहाभिमानी जे उरले । ते देहाभिमान लक्षिती ॥ १८ ॥ लक्षीं बैसलें अलैक्ष । उडोनि गेला पूर्वपक्ष । हेतुरूपें अंतरसाक्ष । तोहि मावळला ॥ १९ ॥ आकाश आणि पाताळ । दोन्ही नामें अंतेराळ । काढितां दृश्याचें चेर्डळ । अखंड झालें ॥ २० ॥ तें तों अखंडाचि आहे । मग उपाधि लक्षून पाहे । उपाधिनिरासें साहे । शब्द कैसा ॥ २१ ॥ शब्देपर कल्पनेपर । मनबुद्धीअगोचर । विचारें पाहावा विचार । अंतर्यामीं ॥ २२ ॥ पाहतां पाहतां कळों येतें । कळलें तितुकें व्यर्थ

---

१ स्वानुभव. २ पांचांभूतांचे ऐक्य. ३ टिकत नाहीं. * ब्रह्म. ❀ माया. ४ सूर्यकिरणानी. ५ थंडी. ६ उष्ण ज्वालेनें. ७ ज्ञानाचा. ८ मोक्षाचें ठिकाणीं. ९ मनोवृत्तिरहित स्थिति. १० तत्वांच्या मिथ्यामणाचें ज्ञान. ११ आत्म्यास. १२ वेढा, घोटाळा. × आळ. १३ 'तत्त्वमसि' इत्यादि वेदांतवाक्याचा १४ कामक्रोधादि सहांचा त्याग करणारा. १५ प्राप्त झाला असतां. १६ परब्रह्म. १७ पोकळी. १८ पापुद्रा, पडदा. १९ दुसऱ्या पदार्थांचा संबंध, उपसर्ग. २० सहन करील. २१ शब्दापलीकडे. २२ मनोबुद्धीला न समजणारे.

जातें । अवघड कैसें बोलावें तें । कोण्या प्रकारें ॥ २३ ॥ वाच्यार्थे वाच्यांशें शोधिला । अलक्षीं * लक्ष्यांश बुडाला । पुढें समजोन बोला । कोणी तरी ॥ २४ ॥ शाश्वतास शोधित गेला । तेणें ज्ञानी साच झाला । विकार सांडून मिळाला । निर्विकारीं ॥ २५ ॥ दुःस्वप्न उदंड देखिलें । जागें होतां लटिकें झालें । पुनः जरी तें आठवलें । तरी तें मिथ्या ॥ २६ ॥ प्रारब्धयोगें देह असे । असे अथवा नासे । विचार अंतरीं बैसे । चळेना ऐसा ॥ २७ ॥ बीज अग्नीनें भाजलें । त्याचें वाढणेंचि खुंटलें । ज्ञात्यास तैसें झालें । वासनाबीज ॥ २८ ॥ विचारें निश्चळ झाली बुद्धि । बुद्धीपासी कार्यसिद्धि । पाहतां वडिलांची बुद्धि । निश्चळीं गेली ॥ २९ ॥ निश्चळास ध्यातो तो निश्चळ । चंचळास ध्यातो तो चंचळ । भूतांस ध्यातो तो केवळ । भूत होय ॥ ३० ॥ जो पावला शेवटवरी । तयास हें कांहींच न करी । ❀ अंतर्निष्ठा बाजिगिरी । तैसी माया ॥ ३१ ॥ मिथ्या ऐसें कळों आलें । विचारानें सदृढ झालें । अवघें भयचि उडालें । अकस्मात ॥ ३२ ॥ उपासनेचें उत्तीर्ण व्हावें । भक्तें भजन वाढवावें । अंतरीं विवेकें उमजावें । सकळ कांहीं ॥ ३३ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे पंचमदशके सिद्धांतनिरूपणं नाम दशमः समासः ॥ १० ॥

दशक सोळावा सप्ततिन्वयाचा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ धन्य धन्य तो वाल्मीक । ऋषींमाजीं पुण्यश्लोकें । जयाचेनि हा त्रिलोकें । पावन जाहला ॥ १ ॥ भविष्य आणि शतकोटी । हे तों नाहीं देखिलें दृष्टीं । धांडोळितां सकळ सृष्टी । श्रुत नव्हे ॥ २ ॥ भविष्याचें एक वचन । कदाचित झालें प्रमाण । तरी आश्चर्य मानिती जन । भूमंडळींचे ॥ ३ ॥ नसतां रघुनाथ अवतार । नाहीं पाहिला शास्त्राधार । रामकथेचा विस्तार । विस्तारला जेणें ॥ ४ ॥ ऐसा जयाचा वाग्विलास । ऐकोनि संतोषला महेश । मग विभागिलें त्रैलोक्यास । शत कोटि रामायण ॥ ५ ॥ जयाचें कवित्व शंकरें पाहिलें । इतरां नवचे अनुमानलें । रामउपासकांस झालें । परम समाधान ॥ ६ ॥ ऋषि होते थोर थोर । बहुतीं केला कवित्वविचार । परी वाल्मीकासारिखा कवीश्वर । न भूतो न भविष्यति ॥ ७ ॥ पूर्वीं केलीं दुष्ट कर्में । परी पावन झाला रामनामें । राम जपतां दृढ नेमें । पुण्यें सीमा सांडिली ॥ ८ ॥ उफराटें नाम म्हणतां वाचें । पर्वत फुटले पापाचे । ध्वज उभारले पुण्याचे । ब्रह्मांडावरुते ॥ ९ ॥ वाल्मीकें जेथें तप केलें । तें वन पुण्यपावन झालें । शुष्ककाष्टीं अंकुर फुटले । तपोबळें जयाच्या ॥ १० ॥ पूर्वीं होता वाल्हा कोळी । जीवघातुक भूमंडळीं । तोचि वंदिजे सकळीं । विबुधीं आणि ऋषीश्वरीं ॥ ११ ॥ उपरति आणि अनुताप । तेथें कैंचें उरेल पाप । देहांततपें पुण्यरूप । दुसरा जन्म जाहला ॥ १२ ॥

---

१ शब्दार्थ. * वास्तविक अर्थ. ❀ आत्मनिष्ठ, ज्ञानी. २ जादूगिरी. ३ उतराई. ४ कीर्तिवान्. ५ स्वर्ग, मृत्यु, पाताळ. ६ वाक्चातुर्य. ७ झाला नाहीं. ८ होणार नाहीं. ९ पवित्र. १० प्राण्यांची हत्या करणारा. ११ देवांनीं. १२ वैराग्य. १३ पश्चात्ताप.

अनुतापें आसन घातलें । देहाचें वारुळ जाहलें । तेंचि नाम पुढें पडिलें । वाल्मीकें ऐसें १३ ॥ वारुळास वाल्मीक बोलिजे । म्हणोन वाल्मीक नाम साजे । जयाच्या तीव्र तपें झिजे । हृदय तापसाचें ॥ १४ ॥ जो तापसांमाजी श्रेष्ठ । जो कवीश्वरांमध्यें वरिष्ठ । जयाचें बोलणें स्पष्ट । निश्चयाचें ॥ १५ ॥ जो निष्ठावंताचें मंडण । रघुनाथ-भक्तीचें भूषण । ज्याची धारणा असाधारण । साधकांस दृढ करी ॥ १६ ॥ धन्य वाल्मीक ऋषीश्वर । समर्थ जा कवीश्वर । तयासि माझा नमस्कार । साष्टांग भावें ॥ १७ ॥ वाल्मीककृपि बोलिला नसता । तरी आम्हांस कैंची रामकथा । म्हणोनियां समर्था । काय म्हणोनि वर्णावें ॥ १८ ॥ रघुनाथकीर्ति प्रकट केली । तेणें तयाची महिमा वाढली । भक्तमंडळी सुखी जाहली । श्रवणमात्रें ॥ १९ ॥ आपुला काळ सार्थक केला । रघुनाथकीर्तीमध्यें बुडाला । भूमंडळीं उद्धारिला । बहुत लोक ॥ २० ॥ रघुनाथभक्त थोर थोर । महिमा जयांचा अपार । त्या समर्थांचा किंकर । रामदास म्हणे ॥ २१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे षोडश दशके वाल्मीकस्तवननिरूपणं नाम प्रथमः समासः ॥ १ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ धन्य धन्य हा सूर्यवंश । सकळ वंशांमध्यें विशेष । मार्तंड-मंडळाचा प्रकाश । फांकला भूमंडळीं ॥ १ ॥ सोमाअंगीं असे लांछन । एका पंक्षी होय क्षीण । रविकिरण फांकतां आपर्ण । कळाहीन होय ॥ २ ॥ याकारणें सूर्यापुढें । दुसरी साम्यता न घडे । ज्याच्या प्रकाशें उजेडे । प्राणिमात्रांसी ॥ ३ ॥ नाना धर्म नाना कर्में । उत्तमें मध्यमें अधमें । सुगमें दुर्गमें नित्यनेमें । सृष्टीमध्यें चालती ॥ ४ ॥ वेदशास्त्रें आणि पुराणें । मंत्र यंत्र नाना साधनें । संध्या स्नान पूजाविधानें । सूर्याविणें बापुडीं ॥ ५ ॥ नाना योग नाना मतें । पाहों जातां असंख्यातें । जाती आपुलाल्या पंथें । सूर्यउदय झालिया ॥ ६ ॥ प्रापंचिक अथवा पारमार्थिक । कार्य करणें कोणी एक । दिवसेविण निरर्थक । सार्थक नव्हे ॥ ७ ॥ सूर्याचें अधिष्ठान डोळे । डोळे नसतां सर्व आंधळे । याकारणें कांहींच न चले । सूर्याविण ॥ ८ ॥ म्हणाल अंध कवित्वें करिती । तरी हेहि सूर्याचीच गति । थंड झालिया आपुली मति । मग मति-प्रकाश कैंचा ॥ ९ ॥ उष्ण प्रकाश तो सूर्याचा । शीत प्रकाश तो चंद्राचा । उष्णत्व नसतां देहाचा । घात होतो ॥ १० ॥ याकारणें सूर्याविण । सहसा न चले कारण । श्रोते तुम्ही विचक्षण । शोधून पाहा ॥ ११ ॥ हरिहरांच्या अवतारमूर्ती । शिवशक्तीच्या अनंत व्यक्ती । यापूर्वी होता गेल्या बहुती । आतांहि आहे ॥ १२ ॥ जितुके संसारासी आले । तितुके सूर्याखालीं वर्तले । अंतीं देह त्यागून गेले । प्रभाकरा देखतां ॥ १३ ॥ चंद्र ऐलीकडे झाला । क्षीरसागरीं मंथनि काढिला । चवदा रत्नांमध्यें आला ।

---

१ वारूळ. २ अलंकार. ३ ग्रहणशक्ति. ४ चाकर. ५ सूर्यमंडळाचा. ६ चंद्राच्या अंगीं. ७ कृष्णपक्षामध्यें. ८ चंद्र. ९ मार्गानें. १० स्थान. ११ चतुर. १२ आकार. १३ सूर्य. १४ नुकता, अलीकडे. १५ लक्ष्मी, कौस्तुभ इत्यादि चवदा रत्नांमध्यें.

बंधु लक्ष्मीचा ॥ १४ ॥ विश्वचक्षु हा भास्कर । ऐसें[1] जाणती लहानथोर । याकारणें दिवाकर[2] । श्रेष्ठाहून श्रेष्ठ ॥ १५ ॥ अपार नभमार्ग[3] क्रमणें । ऐसेंच प्रत्यहीं[4] येणें जाणें । या लोकोपकाराकारणें । आज्ञा समर्थाची ॥ १६ ॥ दिवस नसतां अंधकार । सर्वांसि नकळे सारासार । दिवसेंविण तस्कर[5] । कां दिवाभीत[6] पक्षी ॥ १७ ॥ सूर्यापुढें आणिक दुसरें । कोण आणावें समोरें । तेजोराशि निर्धारें । उपमेरहित ॥ १८ ॥ ऐसा हा सविता[7] सकळांचा । पूर्वज होय रघुनाथाचा । अगाध महिमा मानवी वाचा । काय म्हणोन वर्णावा ॥ १९ ॥ रघुनाथवंश पूर्वापार । एकाहून एक थोर । मज मतिमंदास हा विचार । काय कळे ? ॥ २० ॥ रघुनाथाचा समुदाव । तेथें गुंतला अंतर्भाव । म्हणोनि वर्णितां महत्त्व । वाग्दुर्बळें मी ॥ २१ ॥ सकळ दोषांचा परिहारें । करितां सूर्यासि नमस्कार । स्फूर्ति वाढे निरंतर । सूर्यदर्शन घेतां ॥ २२ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे षोडशदशके सूर्यस्तवनिरूपणं नाम द्वितीयः समासः ॥ २ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ धन्य धन्य हे वेसुमती[8] । इचा महिमा वर्णावा किती । प्राणिमात्र तितुके राहती । तिच्या आधारें ॥ १ ॥ अंतरिक्षें[9] राहती जीव । तोहि पृथ्वीचा स्वभाव । देह जड नसतां जीव । कैसे तेगती[10] ॥ २ ॥ जाळिती पोळिती कुदळिती[11] । नांगरिती उकरिती खणिती । मलमूत्र तिजवरी करिती । आणि वमन ॥ ३ ॥ नासकें कुसकें जर्जर । पृथ्वीविण कैचा थार । देहांतकाळीं शरीर । तिजवरी पडे ॥ ४ ॥ बरें वाईट सकळ कांहीं । पृथ्वीविण थारा[12] नाहीं । नाना धातु द्रव्य तेंहि । भूमीचे पोटीं ॥ ५ ॥ एकास एक संहारिती । प्राणी भूमीवरी असती । भूमि सांडूनि जाती । कोणीकडे ॥ ६ ॥ गड कोट पुरे पट्टणें । नाना देश कळती अटणें[13] । देव दानव मानवां राहणें । पृथ्वीवरी ॥ ७ ॥ नाना रत्नें हिरे परिस । नाना धातु द्रव्यांश । गुप्त प्रकट करावयास । पृथ्वीविण नाहीं ॥ ८ ॥ मेरु मंदर हिमाचल । नाना अष्ट कुळाचल[14] । नाना पक्षी मत्स्य व्याल[15] । भूमंडळीं ॥ ९ ॥ नाना समुद्रांपैलीकडे । भोंवतें आवरणोदकाचें कडें । असंभाव्य तुटले कडे । भूमंडळाचे ॥ १० ॥ त्यामध्यें गुप्त विवरें । लहान थोरें अपारें । तेथें निबिड अंधकारें । वस्ती कीजे ॥ ११ ॥ आवरणोदक तें अपार । त्याचा कोण जाणे पार । उदंड दाटले जलचर । असंभाव्य मोठे ॥ १२ ॥ त्या जीवनास आधार पवन[16] । निबिड दाट आणि घन । कुटों शकेना जीवन । कोणीकडे ॥ १३ ॥ त्या प्रभंजनास[17] आधार । कठिणपणें अहंकार । ऐसा त्या भूगोलाचा पार । कोण जाणे ॥ १४ ॥ नाना पदार्थांच्या खाणी । धातुरत्नांच्या दाटणी । कल्पतरु चिंतामणि । अमृतकुंडें ॥ १५ ॥ नाना द्वीपें नाना खंडें । वसती उद्वेसें[18] उदंडें । तेथें नाना

---

१ जगताचा डोळा. २ सूर्य. ३ आकाशमार्ग. ४ प्रत्येक दिवशीं. ५ चोर. ६ घुबड. ७ सूर्य. ८ निष्ठा. ९ मुखदुर्बळ. १० नाश. ११ पृथ्वी. १२ आकाशांत. १३ टिकतील. १४ खणतात. १५ शरीराच्या नाशकाली. १६ आधार, जागा. १७ फिरण्यानें. १८ हिमालय, नील, निषध, विंध्य, माल्यवान, मलय, गंधमादन, हेमकूट मिळून आठ कुलपर्वत. १९ सर्प. २० आच्छादनरूपी जलाचें. २१ पाण्याला. २२ वायु. २३ ओसाड. २४ अनेक.

जीवांचीं बंडें । वेगळालीं ॥ १६ ॥ मेरूभोंवते कडे कापले । असंभाव्य केडोसे पडिले । निबिड तरु लागले । नाना जिनसी ॥ १७ ॥ त्यासन्निध लोकालोक । जेथें सूर्याचें फिरे चाक । चंद्रादि द्रोणादि मैनाक । महागिरि ॥ १८ ॥ नाना देशीं पाषाण-भेद । नाना जिनसी मृत्तिकाभेद । नाना विभूती छंदें बंदें । नाना खाणी ॥ १९ ॥ बहुरत्ना वसुंधरा । ऐसा पदार्थ कैंचा दुसरा । अफाट पडली सैरावैरा । जिकडे तिकडे ॥ २० ॥ अवघी पृथ्वी फिरोन पाहे । ऐसा प्राणी कोण आहे । दुजी तुळणा न साहे । धरणीविषयीं ॥ २१ ॥ नाना वल्ली नाना पिकें । देशोदेशीं अनेकें । पाहों जातां सारिख्यासारिखें । एकहि नाहीं ॥ २२ ॥ स्वर्ग मृत्यु पाताळें । अपूर्व रचिलीं तिन्हीं-तीळें । पाताळ लोकीं महाव्याळें । वस्ती कीजे ॥ २३ ॥ नाना वल्ली बीजांची खाणी । ते हे विशाळ धरणी । अभिनवे कर्त्याची करणी । होऊनि गेली ॥ २४ ॥ गड कोट नाना नगरें । पुरें पट्टणें मनोहरें । सकळां ठायीं जगदीश्वरें । वस्ती कीजे ॥ २५ ॥ महाबळी होऊनि गेले । पृथ्वीवरी चौताळले । सामर्थ्यें निराळे राहिले । हें तों घडेना ॥ २६ ॥ असंभाव्य हे जगती । जीव कितीएक जाती । नाना अवतारपंगती । भूमंडळावरी ॥ २७ ॥ सध्यां रोकडें प्रमाण । कांहीं करावें नलगें अनुमान । नानाप्रकारचें जीवन । पृथ्वीचेनि आधारें ॥ २८ ॥ कित्येक भूमि माझी म्हणती । शेवटीं आपणाचि मरोन जाती । कित्येक काळ होतां जगती । जैसी तैसी ॥ २९ ॥ ऐसा पृथ्वीचा महिमा । दुसरी काय द्यावी उपमा । ब्रह्मांदिकांपासोनि आम्हां । आश्चर्य वाटे ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे षोडशदशके पृथ्वीस्तवननिरूपणं नाम तृतीयः समासः ॥ ३ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ आतां सकळांचें जन्मस्थान । सकळ जीवांचें जीवन । जयास आपोनारायण । ऐसें बोलिजें ॥ १ ॥ पृथ्वीस आधार आवरणोदक । सप्तसिंधूंचें सिंधूदक । नाना मेघांचें मेघोदक । भूमंडळीं चालिलें ॥ २ ॥ नाना नद्या नाना देशीं । वाहत मिळाल्या सागरासी । लहान थोर पुण्यराशी । अगाध महिमे ॥ ३ ॥ नद्या पर्वताहून कोसळल्या । नाना सांकडीमधें रिचवल्या । धबधबां खळखळां चालिल्या । असंभाव्य ॥ ४ ॥ कूप बावी सरोवरें । उदंड तळीं थोरथोरें । निर्मळें उचंबळती नीरें । नाना देशीं ॥ ५ ॥ गायमुखें पाट जाती । नाना कालवे वाहती । न ना झरे झिरपती । झरती नीरें ॥ ६ ॥ डुरे विहरे पाझर । पर्वत फुटोन वाहे नीर । ऐसे उदकाचे प्रकार । भूमंडळीं ॥ ७ ॥ जितुके गिरी तितुक्या धारा । कोसळती भयंकरा । पांभळ वोहळ अपारा । उकळ्या सांडिती ॥ ८ ॥ भूमंडळींचें जळ अवघें । किती म्हणोनि सांगावें ।

---

१ कवडसे, छाया. २ त्या प्रवळ. ३ पर्वत विशेष. ४ द्रव्य. ५ गुप्त. ६ ठेवा. ७ पृथ्वी. ८ उपमा, बरोबरी. ९ भुवनें. १० नाग. ११ चमत्कारिक. १२ पराक्रम गाजवला. १३ पथ्वी. १४ प्रत्यक्ष. १५ दृष्टांत. १६ प्राणधारणाचें साधन. १७ उदकरूपी नारायण. १८ आच्छादनरूपी जल. १९ अडचणींच्या ठिकाणी. २० ओतल्या. २१ आड, जलाशय. २२ विहिरी. २३ पाण्यानें. २४ डहुरे. २५ पर्वत. २६ वेगवान झरा.

कारंजी आणावें । बांधोनि पाणी ॥ ९ ॥ डोहो डबके खेबाडीं टांकीं । नाना गिरिकंदरीं अनेकीं । नाना जळें नाना लोकीं । वेगळालीं ॥ १० ॥ तीर्थें एकाहून एक । महापवित्र पुण्यदायक । अगाध महिमा शास्त्रकारक । बोलोन गेले ॥ ११ ॥ नाना तीर्थांचीं पुण्योदकें । नाना स्थळींस्थळीं शीतळोदकें । तैशींच नाना उष्णोदकें । ठायीं ठायीं ॥ १२ ॥ नाना वल्लीमध्यें जीवन । नाना फळीं फुलीं जीवन । नाना कंदीं मुळीं जीवन । गुणकारक ॥ १३ ॥ क्षारोदकें शुद्धोदकें । विषोदकें पीयूषोदकें । नाना स्थळांतरीं उदकें । नाना गुणांचीं ॥ १४ ॥ नाना इक्षुदंडांचे रस । नाना फळांचे नाना रस । नाना प्रकारींचे गोरस । मद पारा गुळवा ॥ १५ ॥ नाना मुक्ताफळांचें पाणी । नाना रत्नीं तेळपे पाणी । नाना शस्त्रामध्यें पाणी । नाना गुणांचें ॥ १६ ॥ शुक्र शोणित लाळ मूत्र स्वेद । नाना उदकांचे नाना भेद । विवरोन पाहतां विशद । होत जातें ॥ १७ ॥ उदकाचें देह केवळ । उदकाचेंच भूमंडळ । चंद्रमंडळ सूर्यमंडळ । उदकाकरितां ॥ १८ ॥ क्षीरसिंधु क्षीरसिंधु । सेरासिंधु आज्यसिंधू । दधिसिंधु इक्षुरससिंधु । शुद्धसिंधु उदकाचा ॥ १९ ॥ ऐसें उदक विस्तारलें । मुळापासून शेवटास आलें । मध्येंहि ठायीं उमटलें । ठायीं ठायीं गुप्त ॥ २० ॥ जे जे बीजीं मिश्रित झालें । तो तो स्वाद घेऊनि उठिलें । उसामध्यें गोडीस आलें । परम सुंदर ॥ २१ ॥ उदकाचा बांधा हें शरीर । उदकाचि पाहिजे तदनंतर । उदकाचा उत्पत्तिविस्तार । किती म्हणोन सांगावा ॥ २२ ॥ उदक तारक उदक मारक । उदक नाना सुखदायक । पाहतां उदकाचा विवेक । अलौकिक आहे ॥ २३ ॥ भूमंडळीं धांवे नीर । नाना ध्वनि त्या सुंदर । धबाबां धबाबां थोर । रिचवती धारा ॥ २४ ॥ ठायीं ठायीं डोह तुंबती । विशाळ तळीं डबाबिती । चबाबिती थबाबिती कालवे पाट ॥ २५ ॥ एकी पालथ्या गंगा वाहती । उदकें सन्निधाचि असती । खळाळां झरे वाहती । भूमीचे पोटीं ॥ २६ ॥ भूमिगर्भीं डोह भरले । कोणी देखिले ना ऐकिले । ठायीं ठायीं झोविरे झाले । विद्युल्लतांचे ॥ २७ ॥ पृथ्वीतळीं पाणी भरलें । पृथ्वीमध्यें पाणी खेळे । पृथ्वीवरी प्रकटलें । उदंड पाणी ॥ २८ ॥ स्वर्ग मृत्यु पाताळीं । एक नदी तिन्ही तोळीं । मेघोदक अंतराळीं । पृथ्वीवरी वृष्टि करी ॥ २९ ॥ पृथ्वीचें मूळ जीवन । जीवनाचें मूळ दहन । दहनाचें मूळ पवन । थोराहून थोर ॥ ३० ॥ त्याहून थोर परमेश्वर । महद्भूतांचा विचार । त्याहून थोर परात्पर । परब्रह्म जाणावें ॥ ३१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे षोडशदशके आपनिरूपणं नाम चतुर्थः समासः ॥ ४ ॥

---

१ प्रवाह, ओघ. २ पाण्याची डबकी. ३ शास्त्रकर्ते. ४ खारट पाणी. ५ अमृतासारखें गोड पाणी. ६ गाईचें दूध. ७ मध. ८ गुळाचे तीन प्रकार (१ राब, २ काकवी, ३ गुळवणी). ९ झळकतें १० रेत. ११ रक्त. १२ घाम. १३ स्पष्ट. १४ खारट पाण्याचा समुद्र. १५ दुधाचा समुद्र. १६ मद्याचा समुद्र. १७ तुपाचा समुद्र. १८ दह्याचा समुद्र. १९ उसाच्या रसाचा समुद्र. २० विचार २१ विलक्षण. २२ ओततात. २३ झरे. २४ विजा पडून. २५ भुवर्ना. २६ आकाशामध्ये २७ अग्नि. २८ वायु.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ धन्य धन्य हा वैश्वानर । होय रघुनाथाचा श्वशुर । विश्व-व्यापक विश्वंभर । पिता जानकीचा ॥ १ ॥ ज्याच्या मुखें भगवंत भोक्ता । जो ऋषींचा फळदाता । तमहिमरोगहर्ता । भर्ता विश्वजनाचा ॥ २ ॥ नाना वर्ण नाना भेद । जीवमात्रास अभेद । अभेद आणि परमशुद्ध । ब्रह्मादिकांसी ॥ ३ ॥ अग्नीकरितां सृष्टि चाले । अग्नीकरितां लोक धाले । अग्नीकरितां सकळ झाले । लहान थोर ॥ ४ ॥ अग्नीनें आळलें भूमंडळ । लोकांस राहाया झालें स्थळ । दीप दीपिका नाना ज्वाळ । जेथें तेथें ॥ ५ ॥ पोटामध्यें जठराग्नि । तेणें क्षुधा लागे जनीं । अग्नीकरितां भोजनीं । रुचि येते ॥ ६ ॥ अग्नि सर्वांगीं व्यापक । उष्णें राहे कोणीएक । उष्ण नसतां सकळ लोक । मरोन जाती ॥ ७ ॥ आधीं अग्नि मंद होतो । पुढें प्राणी तो नासतो । ऐसा हा अनुभव येतो । प्राणिमात्रांसी ॥ ८ ॥ असतां अग्नीचें बळ । शत्रु जिंके तात्काळ । अग्नि आहे तावत्काळ । जिणें आहे ॥ ९ ॥ नाना रस निर्माण झाले । अग्नीकरितां निपजले । महारोगी आरोग्य झाले । निमिषमात्रें ॥ १० ॥ सूर्य सकळांहून विशेष । सूर्याउपरी अग्निप्रकाश । रात्रिभागीं लोक अग्नीस । साह्य करिती ॥ ११ ॥ अंत्यजगृहींचा अग्नि आणिला । त्यास दोष नाहीं बोलिला । सकळां गृहीं पवित्र झाला । * वैश्वानरू ॥ १२ ॥ अग्निहोत्र नाना याग । अग्नीकरितां होती सांग । अग्नि तृप्त होतां मग । प्रसन्न होय ॥ १३ ॥ देव दानव मानव । अग्नीकरितां चाले सर्व । सकळ जनांस उपाव । अग्नि आहे ॥ १४ ॥ लग्नें करिती थोर थोर । नाना दारूचा प्रकार । भूमंडळीं यात्रा थोर । दारूनें शोभती ॥ १५ ॥ नाना लोक रोगी होती । उष्ण औषधें सेविती । तेणें लोक आरोग्य होती । वन्हीकरितां ॥ १६ ॥ ब्राह्मणास तन मन । सूर्यदेव * हुताशन । एतद्विषयीं अनुमान । कांहींच नाहीं ॥ १७ ॥ लोकांमध्यें जेठरानळ । सागरीं आहे वडवानळ । भूगोलाबाहेर आवरणानळ । शिवनेत्रीं विद्युल्लता ॥ १८ ॥ कुपीपासुनि अग्नि होतो । उंच दर्पणीं अग्नि निघतो । कोष्ट-मंथनीं प्रकटतो । चकमकेनें ॥ १९ ॥ अग्नि सकळां ठायीं आहे । कठिण घसणीं प्रकट होये । अंग्यासर्पे दग्ध होये । गिरिकंदरें ॥ २० ॥ अग्नीकरितां नाना उपाय । अग्नी-करितां नाना अपाय । विवेकेविण सकळ होय । निरर्थक ॥ २१ ॥ भूमंडळीं लहान थोर । सकळांस वन्हीचा आधार । अग्निमुखें परमेश्वर । संतुष्ट होय ॥ २२ ॥ ऐसा अग्नीचा यहिमा । बोलिजे तितुकी उणी उपमा । उत्तरोत्तर अगाध महिमा । अग्नि-पुरुषाचा ॥ २३ ॥ जीते असतां सुखी करी । मेल्या प्रेत भस्म करी । सर्वभक्षक त्याची थोरी । काय म्हणोन सांगावी ॥ २४ ॥ सकळ सृष्टीचा संहार । प्रळय करी * वैश्वानर । वैश्वानरें पदार्थमात्र । कांहींच उरेना ॥ २५ ॥ नाना होम उदंड करिती ।

---

१ सर्व लोकांचा. २ घट्ट झाले. ३ जगणें. ४ क्षणामध्यें. ५ चांडाळाच्या घरचा. * अग्नि. ६ विधिपूर्वक. ७ उडवावयाची दारु (फटाके फुलबाजा वगैरे). ८ याविषयीं. ९ जठराग्नि. १० आवरणरूप आच्छादनरूप अग्नि. ११ वीज. १२ आरशामध्यें. १३ लांकुडाच्या घर्षणानें. १४ एक सर्पाची जात. १५ पर्वतावरील गुहा. १६ जीवंत.

घरोघरीं वैश्वदेव चालती । नाना क्षेत्रीं दीप जळती । देवापाशीं ॥ २६ ॥ दीपाराधनें नीरांजनें । देव ओवाळिजे जनें । खेरं खोटें निवडणें । दिव्य होतां ॥ २७ ॥ अष्टधा प्रकृति लोक तिन्ही । सकळ व्यापून राहिला वान्हि । अगाध महिमा वदनीं । किती म्हणोनि बोलावा ॥ २८ ॥ चारी शृंगें त्रिपदीं जात । दोन शिरें सप्त हात । ऐसा बोलिला शास्त्रार्थ । प्रचीतीविण ॥ २९ ॥ ऐसा वन्हि उष्णमूर्ति । तो मी बोलिलों यथामति । न्यून पूर्ण क्षमा श्रोतीं । केली पाहिजे ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे षोडशदशके अग्निस्तवननिरूपणं नाम पंचमः समासः ॥ ५ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ धन्य धन्य हा वायुदेव । याचा विचित्र स्वभाव । वायूकरितां सकळ जीव । वर्तती जनीं ॥ १ ॥ वायूकरितां श्वासोच्छ्वास । नाना विद्यांचा अभ्यास । वायूकरितां शरीरास । चळण घडे ॥ २ ॥ चळण वळण प्रसारण । निरोधन आणि आकुंचन । प्राण अपान व्यान उदान । समान वायु ॥ ३ ॥ नाग कूर्म कृकल वायु । देवदत्त धनंजयू । ऐसे हे वायूचे स्वभावू । उदंड असती ॥ ४ ॥ वायु ब्रह्मांडीं प्रकटला । ब्रह्मांडदेवतांस पुरवला । तेथून पिंडीं प्रकटला । नाना गुणें ॥ ५ ॥ स्वर्गलोकीं सकळ देव । तैसेच पुरुषार्थी दानव । मृत्युलोकींचें मानव । विख्यात राजे ॥ ६ ॥ नरदेहीं नाना भेदें । अनंत भेदांचीं श्वापदें । वनचरें जळचरें आनंदें । क्रीडा करिती ॥ ७ ॥ त्यां समस्तांमध्यें वायु खेळे । खेचरकुळ अवघें चळे । उठती वन्हीचे उमाळे । वायूकरितां ॥ ८ ॥ वायु मेघांचें भरण भरी । सर्वांचि पिटून परते सारी । वायूऐसा कारभारी । दुसरा नाहीं ॥ ९ ॥ परी ते आत्मयाची सत्ता । वर्ते शरीरीं तत्त्वतां । परी व्यापकपणें या समर्थां । तुलना नाहीं ॥ १० ॥ गिरीहून दाट फौजा । मेघ उठिले लोककाजा । गर्जगर्जोनि तडकती विजा । वायुबळें ॥ ११ ॥ चंद्र सूर्य नक्षत्रमाळा । ग्रहमंडळें मेघमाळा । ये ब्रह्मांडीं नाना कळा । वायूकरितां ॥ १२ ॥ एकवटलें तें निवडेना । कालवलें तें वेगळें होईना । तैसें हें बेचाड नाना । केवीं कळे ॥ १३ ॥ वायु सुटे सरारा । असंभाव्य पडती गारा । तैसे जीव हे नीरा-। सरिसे पडती ॥ १४ ॥ वायुरूपें कमळकळा । तोचि आधार जळा । तया जळाच्या आधारें भूगोळां । शेषें धरिलें ॥ १५ ॥ शेषास पवनाचा आहार । आहारें फुगे शरीर । तरी मग घेतला भार । भूमंडळाचा ॥ १६ ॥ महाकूर्माचें शरीर भलें । नेणो ब्रह्मांड पालथें घातलें । एवढें शरीर तें राहिलें । वायूचेनी ॥ १७ ॥ वेरोहें आपुले दंतीं । पृथ्वी धरिली होती । तयाची एवढी शक्ति । वायुबळें ॥ १८ ॥ ब्रह्मा विष्णु महेश्वर । चवथा आपण जगदीश्वर । वायुस्वरूप विचार । विवेकी जाणती ॥ १९ ॥ तेहतीस कोटी सुरवर । अठ्यांयशीं सहस्र ऋषीश्वर । सिद्धयोगी भारंभार । वायूकरितां ॥ २० ॥ नवकोटी कात्यायनी । छप्पन्नकोटि चामुंडिनी ।

---

१ वादाचा निकाल करण्याकरितां अग्नि किंवा तप्त लोह हातावर घेऊन दाखविणें. २ तीन पायांनीं. ३ असतात. ४ शरीरामध्यें. ५ पराक्रमी. ६ पक्ष्यांचें समूह. ७ मेघसमूह. ८ बेचळ, जुंबाड. ९ उदकाबरोबर. १० पृथ्वीला. ११ वराहअवतारानें. १२ देवताविशेष.

आठे कोटि भूतखाणी । वायुरूपें ॥ २१ ॥ भूतें दैवतें नाना शक्ति । वायुरूपें त्यांच्या व्यक्ति । नाना जीव नेणों किती । भूमंडळीं ॥ २२ ॥ पिंडीं ब्रह्मांडीं पुरवला । बाहेर कंचुकास[3] गेला । सकळां ठायीं पुरवला । समर्थ वायु ॥ २३ ॥ ऐसा हा समर्थ । पवन । हनुमंत जयाचा नंदन । रघुनाथस्मरणीं तेन मन । हनुमंताचें ॥ २४ ॥ हनुमंत वायूचा प्रसिद्ध । पित्यापुत्रास नाहीं भेद । म्हणोनि दोघेहि[1] अभेद । पुरुषार्थविषयीं[7] ॥ २५ ॥ हनुमंतास बोलिजे प्राणनाथ । येणें गुणें हा समर्थ । प्राणेविण सकळ व्यर्थ । होत जातें ॥ २६ ॥ मागें मृत्यु आला हनुमंता । तेव्हां वायु रोधला होता । सकळ देवांस अवस्था[8] । प्राणांत मांडलें ॥ २७ ॥ देव सकळ मिळोन । केलें वायूचें स्तवन । वायु प्रसन्न होऊन । मोकळे केले ॥ २८ ॥ म्हणोनि प्रतापी थोर । हनुमंत ईश्वरी अवतार । याचा पुरुषार्थ सुरवर । पाहतचि राहिले ॥ २९ ॥ देव कारागृहीं होते । हनुमंतें देखिले अवचितें । संहार करून लंकेभोंवतें । विटंबूनि पाडिलें ॥ ३० ॥ उसणें[2] घेतलें देवांचें । मूळ शोधिलें राक्षसांचें । मोठें कौतुक पुच्छकेतूचें[9] । आश्चर्य वाटे ॥ ३१ ॥ रावण होता सिंहासनावरी । तेथें जाऊन ठोंसरे मारी । लंकेमध्यें निरोधे[10] करी । उदक कैंचें ॥ ३२ ॥ देवांस आधार वाटला । मोठा पुरुषार्थ देखिला । मनामध्यें रघुनाथाला । करुणा करिती ॥ ३३ ॥ दैत्य अवघे संहारिले । देव तात्काळ सोडिले । प्राणिमात्र सुखी जाहले । त्रैलोक्यवासी ॥ ३४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे षोडशदशके वायुस्तवनिरूपणं नाम षष्ठः समासः ॥ ६ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ पृथ्वीचें मूळ जीवन । जीवनाचें मूळ अग्न । अग्नीचें मूळ पवन । मागां निरूपिलें ॥ १ ॥ आतां ऐका पवनाचें मूळ । तो हा अंतरात्माचि केवळ । अत्यंताचि चंचळ । सकळांमध्यें ॥ २ ॥ तो येतो जातो दिसेना । स्थिर होऊन बैसेना । ज्याचें रूप अनुमानेना । वेदश्रुतींसी ॥ ३ ॥ मुळीं मुळींचें स्फुरण । तेंचि अंतरात्म्याचें लक्षण । जगदीश्वरापासूनि त्रिगुण । पुढें जाहले ॥ ४ ॥ त्रिगुणापासूनि झालीं भुतें । पावलीं स्पष्टदशेतें । त्या भूतांचें रूप तें । विवेकें वोळखावें ॥ ५ ॥ त्यामध्यें मुख्य आकाश । चौं भूतांमध्यें विशेष । त्याच्या प्रकाशें प्रकाश । सकळ कांहीं ॥ ६ ॥ एक विष्णु महद्भूत । ऐसा भूतांचा संकेत । परंतु याची प्रचीत । पाहिली पाहिजे ॥ ७ ॥ विस्तारें बोलिलीं भूतें । त्या भूतांमध्यें व्यापक तें । विवरोन पाहतां येते । प्रत्ययासी ॥ ८ ॥ आत्मयाच्या चपळपणापुढें । वायु तें किती बापुडें । आत्म्याचें चपळपण रोकडें । समजोन पाहावें ॥ ९ ॥ आत्म्यावेगळें कर्म चालेना । आत्मा दिसेना ना आढळेना । गुप्तरूपें विचार नाना । पाहोन सोडी ॥ १० ॥ पिंडब्रह्मांड व्यापून भरलें । नाना शरीरीं विलासलें । विवेकी जनास भासलें । जगदंतरीं ॥ ११ ॥ आत्म्याविण देह चालती । हें तों न घडे कल्पांतीं । अष्टधा प्रकृतीच्या व्यक्ति । रूपासि आल्या ॥ १२ ॥ मुळापासूनि शेवटवरी । सकळ कांहीं आत्माच

---

१ साडेतीन. २ प्राण्यांच्या उत्पत्ति. ३ आच्छादण्याकरितां. ४ मुलगा ५ शरीर. ६ पराक्रमाविषयीं. ७ काळजी, चिंता ८ वंदिशाळेमध्यें. ९ शूड उगवला. १० मारुतीचें. ११ प्रतिबंध. १२ शोधून. १३ एका व्यक्तीपासून तों अखिल जगत. १४ जगामध्यें १५ आकार.

करी । आत्म्यापैलीकडे निर्विकारी । परब्रह्म तें ॥ १३ ॥ आत्मा शरीरीं वर्ततो । इंद्रियग्राम[1] चेष्टवितो[2] । नाना सुखदुःखें भोगितो । देहात्मयोगें[3] ॥ १४ ॥ सप्तकंचुक[4] हें ब्रह्मांड । त्यामध्यें सप्तकंचुक पिंड[5] । त्या पिंडामध्यें आत्मा जड[6] । विवेकें वोळखावा ॥ १५ ॥ शब्द ऐकोन समजतो । समजोन प्रत्युत्तरें देतो । कठिणमृदु शीतोष्ण जाणतो । त्वचेमध्यें ॥ १६ ॥ नेत्रीं भरोन पदार्थ पाहणें । नाना पदार्थ परीक्षणें । उंच नीच समजणें । मनामध्यें ॥ १७ ॥ क्रूरदृष्टि सौम्यदृष्टि । कपटदृष्टि कृपादृष्टि । नाना प्रकारच्या दृष्टि । भेद जाणे ॥ १८ ॥ जिव्हेमध्यें नाना स्वाद । निवडूं जाणे भेदाभेद । जें जें जाणे तें तें विशद[7] । करूनि बोले ॥ १९ ॥ उत्तम अन्नाचें परिमळ । नाना सुगंध परिमळ । नाना फळांचे परिमळ । घ्राणेंद्रिय जाणे ॥ २० ॥ जिव्हेनें स्वाद घेणें बोलणें । पाणींद्रियें[8] घेणें देणें । पादेंद्रियें[9] येणें जाणें । सर्वकाळ ॥ २१ ॥ शिश्नेंद्रियें सुरतभोग । गुदेंद्रियें मलोत्सर्ग । मनेंकरूनि सकळ सांग । कल्पूनि पाहे ॥ २२ ॥ ऐसे व्यापार[10] * परोपरी । त्रिभुवनीं एकलाचि करी । त्याची वर्णावया थोरी । दुसरा नाहीं ॥ २३ ॥ त्याविण दुसरा कैंचा । जे महिमा सांगावा तयाचा । व्याप आटोप आत्मयाचा । न भूतो न भविष्यति[11] ॥ २४ ॥ चौदाहि विद्या चौसष्ठ कळा । धूर्तपणाच्या नाना कळा । वेदशास्त्रपुराणजिव्हाळा[12] । तेणेंविण कैंचा ॥ २५ ॥ इहलोकींचा आचार । परलोकीं सारासारविचार । उभय लोकींचा निर्धार । आत्माच करी ॥ २६ ॥ नाना मतें नाना भेद । नाना संवाद विवाद । नाना निश्चयें भेदाभेद । आत्माच करी ॥ २७ ॥ मुख्य तत्त्व विस्तारलें । तेणें तयास रूप आणिलें । येणेंकरितां सार्थक झालें । सकळ कांहीं ॥ २८ ॥ लिहिणें वाचणें पाठांतर करणें । पुसणें सांगणें अर्थ करणें । गाणें वाजवणें नाचणें । आत्म्याचकरितां ॥ २९ ॥ नाना सुखें आनंदतो । नाना दुःखें कष्टी होतो । देह धरितो आणि सोडितो । नाना प्रकारें ॥ ३० ॥ एकलाच नाना देह धरी । एकलाच नटे परोपरी । नटनाट्यकळा कुसरी[13] । त्याविण नाहीं ॥ ३१ ॥ एकलाचि झाला बहुरूपी । बहुरूपी बहु सांक्षेपी[14] । बहुरूपें बहु प्रतापी । आणि लंडी[15] ॥ ३२ ॥ एकलाच विस्तारला कैसा । पाहे बहुविध तमाशा । दंपत्याविण कैसा । विस्तारला ॥ ३३ ॥ स्त्रियांस पाहिजे पुरुष । पुरुषांस पाहिजे स्त्रीवेष । ऐसा आवडीचा संतोष । परस्परें ॥ ३४ ॥ स्थूलाचें मूळ तें ❀ लिंग । लिंगामध्यें हे प्रसंग । येणेंप्रकारें जग । प्रत्यक्ष चाले ॥ ३५ ॥ पुरुषांचा जीव स्त्रियांचे जीवीं । ऐशी होते उठाठेवी । परी या सूक्ष्माची गोवी[16] । समजली पाहिजे ॥ ३६ ॥ स्थूळाकरितां वाटे भेद । सूक्ष्मीं अवघेच अभेद । ऐसें बोलणें निरुद्धं[17] । प्रत्यया आलें ॥ ३७ ॥ बायकोनें बायकोस भोगिलें । ऐसें नाहीं कीं घडलें । बायकोस अंतरीं लागलें ।

---

१ इंद्रियांचा समूह. २ व्यापार करवितो. ३ देह आणि आत्मा याची सांगड पडून. ४ सात कंचुकांनीं-आवरणांनीं युक्त. ५ देह. ६ जडाचा विचार करून. ७ स्पष्ट. ८ सुवास. ९ हातांनीं. १० पायांनीं. * नानाप्रकारचे. ११ विस्तार, खटाटोप. १२ झाला नाहीं व होणार नाहीं. १३ कौशल्य. १४ उद्योगी. १५ भित्रा. ❀ स्त्रीपुरुषजात. १६ गुंतागुंत. १७ निश्चित, सप्रमाण.

ध्यान पुरुषाचें ॥ ३८ ॥ स्त्रीस पुरुष पुरुषास वेधू । ऐसा आहे हा संबंधू । याकारणें सूक्ष्म संवादू । सूक्ष्मींच आहे ॥ ३९ ॥ पुरुषइच्छेमध्यें प्रकृति । प्रकृतीमध्यें पुरुषव्यक्ति । प्रकृतिपुरुष बोलती । येणें न्यायें ॥ ४० ॥ पिंडावरून ब्रह्मांड । पाहावें प्रचीतीनें प्रचीतीस घ्यावें । उमजेना तरी उमजावें । विवरविवरों ॥ ४१ ॥ द्वैतइच्छा होते मुळीं । तरी ते आली भूमंडळीं । भूमंडळीं आणि मुळों । रुंजू पाहावें ॥ ४२ ॥ येथें मोठा झाला माक्षेप । फिटला श्रोतयांचा ओक्षेप । जें प्रकृतिपुरुषांचें रूप । निवडोन गेलें ॥ ४३ ॥ इतिश्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे षोडशदशके महद्भूतस्तवननिरूपणं नाम सप्तमः समासः ॥ ७ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ नमूं गणपति मंगलमूर्ति जयाचेनि मतिस्फूर्ति । लोक भजती स्तवन करिती । आत्मयाचें ॥ १ ॥ नमूं वैखरी[1] वागीश्वरी । अभ्यंतरी प्रकाश करी । नाना भरोवरीं[2] विवरी । नाना विद्या ॥ २ ॥ सकळ जनांमध्यें नाम । रामनाम उत्तमोत्तम । श्रम जाऊन विश्राम । चंद्रमौळी[3] पावला ॥ ३ ॥ नामाचा महिमा थोर । रूप कैसें उत्तरोत्तर । परात्पर परमेश्वर । त्रैलोक्यधर्ता ॥ ४ ॥ आत्माराम चहूंकडे । लोक वावडे जिकडे तिकडे । देह पडे, मृत्यु घडे । आत्म्याविण ॥ ५ ॥ जीवात्मा शिवात्मा परमात्मा । जगदात्मा विश्वात्मा गुप्तात्मा । आत्मा अंतरात्मा सूक्ष्मात्मा । देव दानव मानवीं ॥ ६ ॥ सकळ मार्ग बोलती चालती । अवतारपंगतीची गति । आत्म्याकरितां होत जाती । ब्रह्मादिक ॥ ७ ॥ नादरूप ज्योतिरूप । साक्षरूप सत्तारूप । चैतन्यरूप सुखरूप । द्रष्टारूप जाणिजे ॥ ८ ॥ नरोत्तम वीरोत्तम । पुरुषोत्तम रघूत्तम । सर्वोत्तम उत्तमोत्तम । त्रैलोक्यवासी ॥ ९ ॥ नाना खटपट आणि चटपट । नाना लटपट आणि झटपट । आत्मा नसतां सर्व सपाट । चहूंकडे ॥ १० ॥ आत्म्याविण वेडें[4] कुडें[5] । आत्म्याविण मढें बापुडें । आत्म्याविण थडें[6] रोकडें[7] । शरीराचें ॥ ११ ॥ आत्मज्ञानी समजे मनीं । पाहे जनीं आत्मयालागुनी । भुवनीं अथवा त्रिभुवनीं । आत्म्याविण वोस[8] ॥ १२ ॥ परम सुंदर आणि चतुर । जाणे सकळ सारासार । आत्म्याविण अंधकार । उभय लोकीं ॥ १३ ॥ सर्वांगीं सिद्ध सावध । नाना भेद नाना वेध । नाना खेद आणि आनंद । तेणेंचिकरितां ॥ १४ ॥ रंक[9] अथवा ब्रह्मादिक । एकचि चालवी अनेक । पाहावा नित्यानित्यविवेक । कोणी एकें ॥ १५ ॥ ज्याचे घरीं पद्मिनी[10] नारी । आत्मा * तंवरी आवडी धरी । आत्मा गेलिया शरीरीं । तेज कैसें ॥ १६ ॥ आत्मा दिसेना + ना भासेना । बाह्यात्कारें अनुपानेना । नाना मनाच्या कल्पना । आत्मयाचेनी ॥ १७ ॥ आत्मा शरीरीं वास्तव्य[11] करी । अवघें ब्रह्मांड विवरी[12] भरी । वासना भावना परोपरी । किती म्हणोन सांगांव्या ॥ १८ ॥ मनाच्या अनंत

---

१ स्त्री. २ माया. ३ पुरुषाचा आकार. ४ बरोबर, तुलना करून पहावें. ५ शंका. ६ चौथी–स्पष्ट–वार्ता. ७ सरस्वती. ८ पूर्णता. ९ महादेव. १० चलन वलन करतात, फिरतात. ११ असुर. १२ शरीर. १३ थडगें. १४ तात्काल. १५ ओसाड. १६ भिकारी. १७ आतिथ्यादर. * आत्मा आहे तों पर्यंत. + अथवा. १८ वसति. १९ चालना करितो.

वृत्ति । अनंत कल्पना धरिती । अनंत प्राणी सांगों किती । अंतर त्यांचें ॥ १९ ॥ अनंत राजकारणें धरणें । कुबुद्धि सुबुद्धि विवरणें । कळों न देणें चुकावणें । प्राणिमात्रासी ॥ २० ॥ एकास एक जपती टपती । एकास एक खपती लपती । शत्रूपणाची स्थिति गति । चहूंकडे ॥ २१ ॥ पृथ्वीमध्यें परोपरी । एकास एक सिंतेरी । कित्येक भक्त परोपरी । परोपकार करिती ॥ २२ ॥ एक आत्मा अनंत भेद । देहेपरत्वें घेती स्वाद । आत्मा ठायींचा अभेद । भेदहि धरी ॥ २३ ॥ पुरुषास स्त्री पाहिजे । स्त्रीस पुरुष पाहिजे । नवरीस नवरी पाहिजे । हें तों घडेना ॥ २४ ॥ पुरुषांचा जीव स्त्रियांचे जीवीं । ऐसी नाहीं उठाठेवी । विषयसुखाची गोवी । तेथें भेद आहे ॥ २५ ॥ ज्या प्राण्यास जो आहार । तेथेंचि होती तत्पर । पशूचे आहारीं नर । अनादरें वर्तती ॥ २६ ॥ आहारभेद देहभेद । गुप्त प्रकट उदंड भेद । तैसाचि जाणावा आनंद । वेगळाला ॥ २७ ॥ सिंधू भूगर्भींचों नीरें । त्या नीरामधील शरीरें । आवरणोदकींचीं जळचरें । अत्यंत मोठीं ॥ २८ ॥ सूक्ष्मदृष्टि आणितां मना । शरीराचा अंत लागेना । जो तो अंतरात्मा अनुमाना । कैसा येतो ॥ २९ ॥ देहात्मयोग शोधूनि पाहिला । तेणें कांहीं अनुमानला । स्थूळ सूक्ष्मांचा गलबला । गाथागोवी ॥ ३० ॥ गाथागोवी उंगवावयाकारणें । केलीं नाना निरूपणें । अंतरात्मा कृपाळूपणें । बहुतां मुखें बोलला ॥ ३१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे षोडशदशके अंतरात्मनिरूपणं नाम अष्टमः समासः ॥ ८ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ पृथ्वीमध्यें लोक नाना । त्यांस नाना उपासना । भावार्थें प्रवर्तले भजना । ठायीं ठायीं ॥ १ ॥ आपुलाल्या देवास भजती । नाना स्तुति स्तवनें करिती । जे ते निर्गुण म्हणती । उपासनेसी ॥ २ ॥ याचा कैसा आहे भाव । मज सांगिजे अभिप्राव । अरे हा स्तुतीचा स्वभाव । ऐसा आहे ॥ ३ ॥ निर्गुण म्हणिजे बहुगुण । बहुगुणीं अंतरात्मा जाण । सकळ त्याचे अंश हें प्रमाण । प्रचीत पाहा ॥ ४ ॥ सकळ जनास मानावें तें । एका अंतरात्म्यास पावतें । अधिकारपरत्वें तें । मान्य कीजे ॥ ५ ॥ श्रोता म्हणे हें अनुमान । मुळीं घालावें जीवनें । तें पावे † पानोपान । हे संद्यः प्रचीती ॥ ६ ॥ वक्ता म्हणे तुलसीवरी । उदक घालावें पात्रभरी । वरी न थिरे निमिषेभरी भूमीस भेदे ॥ ७ ॥ थोर वृक्षास कैसें करावें । शेंड्यास पात्र कैसें न्यावें । त्याचा अभिप्राव देवें । मज निरूपावा ॥ ८ ॥ पर्जन्याचें उदक पडतें । तें तों मुळाकडेच येतें । हातचि पावेना तेथें । काय करिती ॥ ९ ॥ सकळांस मूळ सांपडे । ऐसें पुण्य कैंचे घडे । साधुजनांचें पवाडे । विवेकीं मन ॥ १० ॥ तथापि वृक्षाचेनि पडिपाडे जीवन घालितां कोठें पडे । ये गोष्टीचें सांकडे । कांहींच नाहीं ॥ ११ ॥ मागील

---

१ फसवी. २ देहाप्रमाणे. ३ अन्न. ४ समुद्र. ५ पृथ्वीच्या पोटांतली. ६ उदके. ७ तर, मग. ८ गोंधळ. ९ उकलण्याकरितां, समजण्याकरितां. १० भक्तिप्रकार. ११ अधिकारासारखें. १२ उदक. † झाडाच्या मुळास पाणी घातलें तर तें प्रत्येक पानास पोचतें. १३ रोकडा अनुभव. १४ राहत नाहीं, टिकत नाहीं. १५ क्षणभर. १६ अगदीं वरच्या भागाला. १७ जेथें हात पोंचत नाहीं. १८ शिरतें, विस्तारतें. १९ प्रमाणानें. २० संकट.

आशंकेचें निरसन । होतां जाहलें समाधान । आतां गुणास निर्गुण । कैसे म्हणती ॥ १२ ॥ चंचळपणें विकारलें । सगुण ऐसें बोलिलें । येर तें निर्गुण उरलें । गुणातीत ॥ १३ ॥ वक्ता म्हणे हा विचार । शोधून पाहावें सारासार । अंतरीं राहतां निर्धार । नांव नाहीं ॥ १४ ॥ विवेकांचि तो मुख्य राजा । आणि सेवकांचें नांव राजा । याचा विचार समजा । विवाद खोटा ॥ १५ ॥ कल्पांतप्रळयीं जें उरलें । तें निर्गुण ऐसें बोलिलें । येर तें अवघेंचि जाहलें । मायेमध्यें ॥ १६ ॥ सेना शहर बाजार । नाना यात्रा लहान थोर । शब्द उठती अपार । कैसे निवडावे ॥ १७ ॥ काळामध्यें पर्जन्यकाळ । मध्यरात्रीं होतां निवळ । नाना जीव बोलती सकळ । कैसे निवडावे ॥ १८ ॥ नाना देशभाषा मतें । भूमंडळीं असंख्यातें । बहु ऋषि बहु मतें । कैसीं निवडावीं ॥ १९ ॥ वृष्टि होतांच अंकुर । सृष्टीवरी निघती अपार । नाना तरु लहान थोर । कैसे निवडावे ॥ २० ॥ खेचरें भूचरें जळचरें । नाना प्रकारींचीं शरीरें । नाना रंग चित्रविचित्रें । कैसीं निवडावीं ॥ २१ ॥ कैसें दृश्य आकारलें । नानाप्रकारीं विकारले । उदंडांचि पैसावलें । कैसें निवडावें ॥ २२ ॥ पोकळी मध्यें गंधर्वनगरें । नाना रंग लहान थोरें । बहुत व्यक्ति बहु प्रकारें । कैशीं निवडावीं ॥ २३ ॥ दिवस-रजनीचा प्रकार । चांदणें आणि अंधकार । विचार आणि अविचार । कैसा निवडावा ॥ २४ ॥ विसर आणि आठवण । नेमस्त आणि बाष्कळपण । प्रचीत आणि अनुमान । येणें रीतीं ॥ २५ ॥ न्याय आणि अन्याय । होय आणि न होय । विवेकेविण काय । उमजों जाणे ॥ २६ ॥ कार्यकर्ता आणि निकामी । शूर आणि कुकर्मी । धार्मिक आणि अधर्मी । कळला पाहिजे ॥ २७ ॥ धनाढ्य आणि दिवाळखोर । * साव आणि तस्कर । खरें खोटें हा विचार । कळला पाहिजे ॥ २८ ॥ वरिष्ठ आणि कनिष्ठ । भ्रष्ट आणि अंतर्निष्ठ । सारासारविचार स्पष्ट । कळला पाहिजे ॥ २९ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे षोडशदशके उपासनानिरूपणं नाम नवमः समासः ॥ ९ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ पंचभूतें चाले जग । पंचभूतांची लगबग । पंचभूतें गेलिया मग । काय आहे ॥ १ ॥ श्रोता वक्तयास बोले । भूतांचे महिमे वाढविले । आणि त्रिगुण कोठें गेले । सांगा स्वामी ॥ २ ॥ अंतरात्मा पांचवें भूत । त्रिगुण त्याचे अंगभूत । सावध करूनिया चित्त । बरें पाहा ॥ ३ ॥ भूत म्हणिजे जितुकें झालें । त्रिगुण झाल्यांत आले । इतुकेन मूळ खंडलें । आशंकेचें ॥ ४ ॥ भूतावेगळे कांहीं नाहीं । भूतजात हें सर्वहि । एकावेगळें एक कांहीं । घडेचि ना ॥ ५ ॥ आत्म्याचेनि झाला पवन । पवनाचेनि प्रकटे अग्न । अग्नीपासून जीवन । ऐसें बोलती ॥ ६ ॥ जीवन अवघें डबोलिलें । तें रविमंडळें ओळलें । वन्हिवायूचेनि झालें । भूमंडल ॥ ७ ॥ वन्हि वायु रवि नसतां । तरी होती उदंड शीतळता । तैं शीतळतेमध्यें उष्णता । येणेंचि

---

१ पक्षी. २ दिसणारे जगत. ३ फार. ४ विस्तारलें. ५ आकाशांत नगरासारख्या दिसणाऱ्या आकृति. ६ दिवसाचा व रात्रीचा. ७ कार्यरहित. ८ श्रीमंत. * सद्गृहस्थ ९ चोर. १० त्वरा, घाई. ११ भूतांचा समूह. १२ भरून राहिलें. १३ शोधिलें. १४ सूर्य १५ थंडी.

न्यायें ॥ ८ ॥ अवघें वर्मास वर्म केलें । तरीच एवढें फांपावलें । देहमात्र तितुके झाले । वर्माकरितां ॥ ९ ॥ अवघें शीतळचि असतें । तरी प्राणिमात्र मरोनि जातें । अवघ्या उष्णेंचि करपतें । सकळ कांहीं ॥ १० ॥ भूमंडळ आळोनि गोठलें । तें रविकिरणें वाळोन गेलें । मग सहजाचि देवें रचिलें । उपायाशी ॥ ११ ॥ म्हणोनि केला पर्जन्यकाळ । थंड झालें भूमंडळ । पुढें उष्ण कांहीं शीतळ । शीतकाळ जाणावा ॥ १२ ॥ शीतकाळें कष्टले लोक । करपोनि गेले वृक्षादिक । म्हणोनि पुढें कौतुक । उष्णकाळाचें ॥ १३ ॥ त्यांहिमध्यें प्रातःकाळ । मध्यान्हकाळ सायंकाळ । शीतकाळ उष्णकाळ । निर्माण केलें ॥ १४ ॥ ऐसें एकामागें एक केलें । विल्हेनें नेमस्त लाविलें । येणेंकरितां जगलें । प्राणिमात्र ॥ १५ ॥ नानारसें रोग कठिण । म्हणोनि औषधि केल्या निर्माण । परंतु सृष्टिरचनेचें विवरण । केलें पाहिजे ॥ १६ ॥ देहमूळ रक्त रेतें । त्या आपाचे होती दांत । ऐशी भूमंडळीं प्रचीत । नाना रत्नांची ॥ १७ ॥ सकळांसि मूळ जीवनबांधा । जीवनें चाले सकळ धंदा । जीवनेंविण हरिगोविंदा । प्राणी कैंचे ॥ १८ ॥ जीवनाचें मुक्ताफळ । शुक्रासारिखें सुढाळ । हिरें[1] मौणिक इंद्रनीळ[2] । ते जळें झालें ॥ १९ ॥ महिमा कोणाचा सांगावा । झाला कैंदमचि अवघा । वेगवेगळा निवडावा । कोण्या प्रकारें ॥ २० ॥ परंतु बोलिलें कांहीं एक । मनास कळावया विवेक । जनामध्यें तार्किक लोक । समजती अवघे ॥ २१ ॥ अवघें समजलें हें घडेना । शास्त्रशास्त्रांसि पडेना । + अनुमानें निश्चय होईना । कांहीं एक ॥ २२ ॥ अगाध गुण भगवंताचे । शेष वर्णू न शके वाचे । वेद विधि[3] तेहि काचे । देवेंविण ॥ २३ ॥ आत्माराम सकळां पाळी । अवघे त्रैलोक्य सांभाळी । तया एकेविण धुळी । होय सर्वत्रांची ॥ २४ ॥ जेथें आत्माराम नाहीं । तेथें उरों न शके कांहीं । त्रैलोक्यांचे प्राणी सर्वहि । प्रेतरूपी ॥ २५ ॥ आत्मा नसतां येती मरणें । आत्म्याविण कैंचें जिणें । बरा विवेक समजणें । अंतर्यामी[4] ॥ २६ ॥ समजणें जें विवेकाचें । तेंहि आत्म्याविण कैंचें । कोणी एकें जगदीशाचें । भजन करावें ॥ २७ ॥ उपासना प्रकट झाली । तरी हे विचारणा कळली । याकारणें पाहिजे केली । विचारणा देवाची ॥ २८ ॥ उपासनेचा मोठा आश्रय । उपासनेविण निराश्रय । उदंड केलें तरी तो जय । प्राप्त नाहीं ॥ २९ ॥ समर्थाची नाहीं पाठी । तयास भलताच कुटी[5] । याकारणें उठाउठीं । भजन करावें ॥ ३० ॥ भजन साधन अभ्यास । येणेंचि पाविजे परलोकास । दास म्हणे हा विश्वास । धरिला पाहिजे ॥ ३१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे षोडशदशके गुणभूतनिरूपणं नाम दशमः समासः ॥ १० ॥

---

१ विरोरलें. २ क्रमाने. ३ विचार. ४ शुक्र. ५ उदकाचे. ६ उदकरचना. ७ मोत्यें. ८ शुक्राच्या चांदणीसारखें. ९ पाणीदार, तेजस्वी. १० रत्नविशेष. ११ हीं रत्नें जलापासून होतात. १२ चिखल, मिश्रण. + तर्कानें १३ ब्रह्मदेव. १४ हृदयांत. १५ भक्तिपूर्वक ईश्वराराधना. १६ आश्रय. १७ मारतो.

प्रकृतेपुरुषनाम दशक सतरावा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ निश्चळ ब्रह्मीं चंचळ आत्मा । सकळां पर जो परमात्मा । चैतन्यसाक्षी ज्ञानात्मा षड्गुणेश्वर ॥ १ ॥ सकळ जगाचा ईश्वर । म्हणोनि नामे जगदीश्वर । तयापासून विस्तार । विस्तारला ॥ २ ॥ ॥ शिवशक्ति जगदीश्वरी । प्रकृतिपुरुष परमेश्वरी । मूळमायागुणेश्वरी । गुणक्षोभिणी ॥ ३ ॥ क्षेत्रज्ञ द्रष्टा कूटस्थ साक्षी । अंतरात्मा सर्व लक्षी । शुद्ध सत्व महत्तत्व परीक्षी । जाणता साधू ॥ ४ ॥ ब्रह्मा विष्णु महेश्वर । नाना पिंडीं जीवेश्वर । त्यांस भासती प्राणिमात्र । लहान थोर ॥ ५ ॥ देहदेवळामध्यें बैसला । न भजतां मारितो देहाला । म्हणोनि त्याच्या भेणें तयाला । भजती लोक ॥ ६ ॥ जे वेळेसि भजन चुकलें । ते तेव्हां पळाडिले । आवडीनें भजों लागले । सकळ लोक ॥ ७ ॥ जें जें जेव्हां * आक्षेपिलें । तें तें तात्काळचि दीधलें । त्रैलोक्य भजों लागलें । येणेंप्रकारें ॥ ८ ॥ पांचा विषयांचा नैवेद्य । जेव्हां पाहिजे तेव्हां सिद्ध । ऐसें न करिती सेव्य । रोग होती ॥ ९ ॥ जेणें काळें नैवेद्य पावेना । तेणें काळें देव राहेना । भाग्य वैभव पदार्थ नाना । सांडून जातो ॥ १० ॥ जातो तो कळों देईना । कोणास ठाऊक होईना । देवेंविण अनुमानेना । कोणास देव ॥ ११ ॥ देव पहावयाकारणें । देउळें लागती पाहणें । कोठें तरी देउळाच्या गुणें । देव प्रकटे ॥ १२ ॥ देउळें म्हणिजे नाना शरीरें । तेथें राहिजे जीवेश्वरें । नाना शरीरें नाना प्रकारें । अनंत भेद ॥ १३ ॥ चालतीं बोलतीं देउळें । त्यांमध्यें राहिजे रोउळें । जितुकीं देउळें तितुकीं सकळें । कळलीं पाहिजे ॥ १४ ॥ मत्स्य कूर्म वराह देउळें । भूगोल धरिला सर्वकाळें । कैरोळेंविक्राळें निर्मळे । कितीएक ॥ १५ ॥ कितीएक देउळीं सौख्य पाहे । भरितें अवघें सिंधु आहे । परी तें सर्वकाळ न राहे । अशाश्वत ॥ १६ ॥ अशाश्वताचा मस्तकमणी । जयाची एवढी करणी । दिसेना तरी काय झालें धनी । तयासीच म्हणावें ॥ १७ ॥ उन्मुखोन्मुख होतां अभेद । विमुख होतां उदंड खेद । ऐसा अधोर्ध्व संवाद । होत जातो ॥ १८ ॥ सकळांचें मूळ दिसेना । भव्य भारी आणि भासेना । निमिष एक वसेना एके ठायां ॥ १९ ॥ ऐसा अगाध परमात्मा । कोण जाणे त्याचा महिमा । तुझी लीला सर्वोत्तमा । तूंचि जाणसी ॥ २० ॥ संसारास आलियाचें सार्थक । जेथें नित्यानित्यविवेक । इहलोक आणि परलोक । दोन्ही साधिलें ॥ २१ ॥ मननशीळ लोकांपांशीं । अखंड देव अहर्निशीं । पाहतां त्याच्या पूर्वसंचितासी । जोडी नाहीं ॥ २२ ॥ अखंड योग म्हणोनि योगी । योग नाहीं तो वियोगी । वियोगी तोहि योगी । योगबळें ॥ २३ ॥ भल्याची महिमा ऐसी । जे सन्मार्गी लावी

---

१ चित्स्वरूपाला जाणणारा. २ यश, श्री, औदार्य, ज्ञान, वैराग्य, ऐश्वर्य, या सहा गुणांनीं संपन्न. ३ त्रिगुण प्रकट करणारी. ४ शरीर जाणणारा, जीव. ५ पाहणारा. ६ निर्विकारी. ७ भीतीनें. * आपेक्षिलें, मागीतलें. ८ शब्द, स्पर्शादि विषयांचा. ९ तत्काल. १० जीवेश्वरानें. ११ भयंकर. १२ नाशवंत. १३ सर्वांत पहिल्याप्रतीचा अशाश्वत. १४ प्रकट होण्याला तयार. १५ उंचनीच. १६ अहोरात्र. १७ पूर्वजन्मार्जित पुण्याला. १८ तुलना, उपमा.

लोकांसी । पोहणार असतां बुडतयासी । बुडीं नेदी ॥ २४ ॥ स्थूळसूक्ष्मतत्त्वझाडा । पिंडब्रह्मांडाचा निवाडा । प्रचीत पाहे ऐसा थोडा । भूमंडळीं ॥ २५ ॥ वेदांतींचें पंचीकरण । अखंड तयाचें विवरण । महावाक्यें अंतःकरण । रहस्य पाहे ॥ २६ ॥ ये पृथ्वीमध्यें विवेकी असती । धन्य तयांची संगति । श्रवणमात्रें पावती गति । प्राणिमात्र ॥ २७ ॥ सत्संग आणि सच्छास्त्रश्रवण । अखंड होतसे विवरण । नाना सत्संग आणि उत्तम गुण । परोपकाराचे ॥ २८ ॥ जे सत्कीर्तीचे पुरुष । ते परमेश्वराचे अंश । धर्मस्थापनेचा हव्यास । तेथेंचि वसे ॥ २९ ॥ विशेष सारासारविचार । तेणें होय जगदुद्धार । संगत्यागें निरंतर । होऊन गेले ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सप्तमदशके देवबलात्कारनिरूपणं नाम प्रथमः समासः ॥ १ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ब्रह्म निर्मळ निश्चळ । जैसें गगन अंतराळ । निराकार केवळ । निर्विकारी ॥ १ ॥ अंताचि नाहीं तें अनंत । शाश्वत आणि सदोदित । असत् नव्हे ते सत् । सर्वकाळ ॥ २ ॥ परब्रह्म तें अविनाश । जैसें आकाश अवकाश । न तुटे न फुटे सावकाश । जैसें तैसें ॥ ३ ॥ तेथें ज्ञान ना अज्ञान । तेथें स्मरण ना विस्मरण । तेथें अखंड निर्गुण । निरवलंबी ॥ ४ ॥ तेथें चंद्र सूर्य ना पावक । नव्हे काळोख ना प्रकाशक । उपाधिवेगळें एक । निरुपाधि ब्रह्म ॥ ५ ॥ निश्चळीं स्मरण चेतलें । त्यास चैतन्य ऐसें कल्पिलें । गुणसमानत्वें झालें । गुणसाम्य ऐसें ॥ ६ ॥ गगनीं आली अभ्रछाया । तैशी जाणिजे मूळमाया । उद्भव आणि विलया । वेळ नाहीं ॥ ७ ॥ निर्गुणीं गुणविकार । तोचि षड्गुणेश्वर । अर्धनारीनटेश्वर । तयासि म्हणिजे ॥ ८ ॥ आदिशक्ति शिवशक्ति । मुळीं आहे सर्वशक्ति । तेथून पुढें नाना व्यक्ति । निर्माण झाल्या ॥ ९ ॥ तेथून पुढें शुद्ध सत्त्व । रजतमाचें गूढत्व । तयासि म्हणिजे महत्तत्त्व । गुणक्षोभिणी ॥ १० ॥ मुळीं असेचि ना व्यक्ति । तेथें कैंची शिवशक्ति । ऐसें म्हणाल तरी चित्तीं । सावधान असावें ॥ ११ ॥ ब्रह्मांडावरून पिंड । अथवा पिंडावरून ब्रह्मांड । अधोर्ध्व पाहतां निवाड । कळों येतें ॥ १२ ॥ बीज फोडून आणिलें मना । तेथें फळ तो दिसेना । वाढत वाढत पुढें नाना । फळें येती ॥ १३ ॥ फळ फाडितां बीज दिसे । बीज फोडितां फळ नसे । तैसा विचार असे । पिंडब्रह्मांडीं ॥ १४ ॥ नर नारी दोन्ही भेद । पिंडीं दिसती प्रसिद्ध । मुळीं नसतां विशद । होतील कैसीं ॥ १५ ॥ नाना बीजरूप कल्पना । तींत कायएक असेना । सूक्ष्म म्हणोन भासेना । एकाएकीं ॥ १६ ॥ स्थूळाचें मूळ तें वासना । ते वासना आधीं दिसेना । स्थूळावेगळें अनुमानेना । सकळ कांहीं ॥ १७ ॥ कल्पनेची सृष्टि केली । ऐशीं वेदशास्त्रें बोलिलीं ।

---

१ एका व्यक्तीपासून तों सर्व जगताचा. २ पंचतत्त्वांचें विशिष्ट मिश्रण. ३ तत्त्वमसि इत्यादि वेदांतवाक्यांनीं. ४ गुजगोष्ट. ५ ह्या. ६ नाद, छंद. ७ देहाभिमानाचा त्याग करून. ८ पोकळ. ९ नसणारें. १० आधाररहित. ११ अग्नि. १२ उपसर्गरहित. १३ ढगांची सावली. १४ उत्पत्ति. १५ नाशाला. १६ त्रिगुणांना प्रकट करणारी. १७ शरीर. १८ खाली वर, आदिअंत. १९ स्पष्ट.

दिसेना म्हणोन मिथ्या केली । न पाहिजे कीं ॥ १८ ॥ पडदा एकेक जन्माचा । तेथें विचार कळे कैंचा । परंतु गूढत्व हा नेमाचा । ठाव आहे ॥ १९ ॥ नाना पुरुषांचे जीव । नाना स्त्रियांचे जीव । एकाचि, परी देहस्वभाव । वेगळाले ॥ २० ॥ नवरीस नवरी नलगे । ऐसा भेद दिसों लागे । पिंडावरून उमगे । ब्रह्मांडबीज ॥ २१ ॥ नवरीचें मन नवऱ्यावरी । नवऱ्याचें मन नवरीवरी । ऐशी वासनेची परी । मुळींहून पाहावी ॥ २२ ॥ वासना मुळींच अभेद । देहसंबंधें झाला भेद । तुटतां देहाचा संबंध । भेद गेला ॥ २३ ॥ नरनारीचें बीज कारण । शिवशक्तीमध्यें जाण । देह धरितां प्रमाण । कळों आलें ॥ २४ ॥ नाना प्रीतींच्या वासना । एकाचें एकास कळेना । तीक्ष्ण दृष्टीनें अनुमाना । कांहींसें येतें ॥ २५ ॥ बाळकास वाढवी जननी । हें तों नव्हे पुरुषाचेनी । उपाधि वाढे जयेचेनी । ते हे वनिता ॥ २६ ॥ वीट नाहीं कंटाळा नाहीं । आलस्य नाहीं त्रास नाहीं । इतुकी माया कोठेंचि नाहीं । मातेवेगळी ॥ २७ ॥ नाना उपाधि वाढवूं जाणे । नाना मायेनें गोवूं जाणे । नाना प्रीति लावूं जाणे । नाना प्रपंचांची ॥ २८ ॥ पुरुषास स्त्रीचा विश्वास । स्त्रीपुरुषांचा संतोष । परस्परें वासनेस । बांधोन टाकिलें ॥ २९ ॥ ईश्वरें मोठें सूत्र केलें । मनुष्यमात्र गुंतोन राहिले । लोभाचें गुंडाळें केलें । उगवेना ऐसें ॥ ३० ॥ ऐशी परस्परें आवडी । स्त्रीपुरुषांची महा गोडी । हे मुळींहून चालली रोकडी । विवेकें पाहावी ॥ ३१ ॥ मुळीं सूक्ष्म निर्माण झालें । पुढें स्पष्ट दिसोन आलें । उत्पत्तीचें कार्य चाले । उभयतांकरितां ॥ ३२ ॥ मुळीं शिवशक्ति खरें । पुढें झालीं वैंधूवरें । चौऱ्यांशीं लक्ष विस्तारें । विस्तारली जे ॥ ३३ ॥ येथें शिवशक्तीचें रूप केलें । श्रोतीं मनास पाहिजे आणिलें । विवरल्याविण बोलिलें । तें व्यर्थ जाणावें ॥ ३४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सप्तदशके शिवशक्तिनिरूपणं नाम द्वितीयः समासः ॥ २ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ थांबा थांबा ऐका ऐका । आधींच ग्रंथ सोडूं नका । सांगीतलें तें ऐका । सावधपणें ॥ १ ॥ श्रवणामध्यें सार श्रवण । तें हें अध्यात्मनिरूपण । सुचित करूनि अंतःकरण । ग्रंथांमध्यें विवरावें ॥ २ ॥ श्रवणमननाचा विचार । निर्जे ध्यासें साक्षात्कार । रोकडा मोक्षाचा उधार । बोलोंच नये ॥ ३ ॥ नाना रत्नें परीक्षितां अथवा वजनें करितां । उत्तम सोनें पुटीं घालितां । सावधान असावें ॥ ४ ॥ नाना नाणीं मोजून घेणें । नाना परीक्षा करणें । विवेकी मनुष्यासी बोलणें । सावधान असावें ॥ ५ ॥ जैसें लाखोलीचें धान्य । निवडोन वेंचितां होतें मान्य । सर्गट मोजितां अनन्य । देव क्षोभे ॥ ६ ॥ एकांतीं नाजुक कारभार । तेथें असावें अति तत्पर । त्याच्या कोटिगुणें विचार । अध्यात्मग्रंथीं ॥ ७ ॥ काहाण्या कथा गोष्टी पैवांड । नाना अवतारचरित्रें वांडे । त्यां समस्तांमध्यें जाड । अध्यात्मविद्या ॥ ९ ॥ गत गोष्टीस ऐकिलें । तेणें

---

१ स्त्री. २ बंधन. ३ उकलेनासें, समजत नाहीं असें. ४ स्त्रीपुरुष. ५ स्वस्थ. ६ एकाग्र चित्तनानें. ७ मुशीमध्यें. ८ सरसकट. ९ आत्मज्ञानविषयक ग्रंथांमध्यें. १० पवाडे, वर्णनात्मक काव्यें. ११ मोठीं, पुष्कळ.

काय हातासि आलें । म्हणती पुण्य प्राप्त झालें । परी तें दिसेना कीं ९ ॥ तैसें नव्हे अध्यात्मसार । हा प्रचीतीचा विचार । कळतां अनुमानाचा संहार । होत जातो ॥ १० ॥ मोठे मोठे येऊन गेले । आत्म्याकारितांच वर्तले । त्या आत्म्याचाच महिमा बोले । ऐसा कवण ॥ ११ ॥ युगानुयुगें एकटा एक । चालवितो तिन्ही लोक । त्या आत्म्याचा विवेक । पाहिलाचे पाहावा ॥ १२ ॥ प्राणी आले येऊन गेले । ते जैसे जैसे वर्तले । ते वर्तणुकेचें कथन केलें । इच्छेसारिखें ॥ १३ ॥ जेथें आत्मा नाहीं दाट । तेथें अवघें सरसपाट । आत्म्याविण बापुडें काष्ठ । काय जाणे ॥ १४ ॥ ऐसें वरिष्ठ आत्मज्ञान । दुसरें नाहीं यासमान । सृष्टीमध्यें विवेकी जन । तोचि हें जाणती ॥ १५ ॥ पृथ्वी आणि आप तेज । यांचा पृथ्वीमध्यें समज । अंतरात्मा तत्त्वबीज । तें वेगळेंचि राहिलें ॥ १६ ॥ वायूपासून पैलीकडे । जो कोणी विवेकें पवाडे । जवळीच आत्मा सांपडे । तया पुरुषासी १७ ॥ वायु आकाश गुणमाया । प्रकृतिपुरुष मूळमाया । सूक्ष्मरूपें प्रचीत येया । कठिण आहे ॥ १८ ॥ मायादेवीच्या धांदली । सूक्ष्मीं कोण मन घाली । समजला त्याची तुटली । संदेहवृत्ति ॥ १९ ॥ मूळमाया चौथा देह । झाडा पाहिजे विदेह । देहातीत होऊन राहे । धन्य तो साधु ॥ २० ॥ विचारें ऊर्ध्व चढती । तयासीच ऊर्ध्वगति । येरां सकळां अधोगति । पदार्थज्ञानें ॥ २१ ॥ पदार्थ चांगले दिसती । परी ते सवेंचि नासती । अतोभ्रष्ट ततोभ्रष्ट होती । लोक तेणें ॥ २२ ॥ याकारणें पदार्थज्ञान । नाना जिनसांचें अनुमान । सर्व सांडूनि निरंजनें । धुंडीत जावें ॥ २३ ॥ अष्टांगयोग पिंडज्ञान । त्याहून थोर तत्त्वज्ञान । त्याहून थोर आत्मज्ञानें । तें पाहिलें पाहिजे ॥ २४ ॥ मूळमायेचे शेवटीं । हरिसंकल्प मुळीं उठी । उपासनायोगें मिठी । तेथें घातली पाहिजे ॥ २५ ॥ मग त्यापैलीकडे जाण । निखळ ब्रह्म निर्गुण । निर्मळ निश्चळ त्याची खूण । गगनासारखी ॥ २६ ॥ येथून तेथवरी दाटलें । प्राणिमात्रास भेटलें । पदार्थमात्रीं लिगटलें । व्यापून आहे ॥ २७ ॥ त्याऐसें नाहीं थोर । सूक्ष्माहूनि सूक्ष्म विचार । पिंडब्रह्मांडाचा संहार । होतां कळे ॥ २८ ॥ अथवा पिंडब्रह्मांड असतां । विवेकप्रळय पाहों जातां । शाश्वत कोण हें तत्त्वतां । उमजों लागे ॥ २९ ॥ करून अवघा तत्त्वझाडा । सारासारांचा निवाडा । सावधपणें ग्रंथ सोडा । सुखीनावें ॥ ३० ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सप्तदशदशके श्रवणोपदेशनिरूपणं नाम तृतीयः समासः ॥३॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ बहुत जनासि उपाये । वक्त्यास पुसतां त्रासूं नये । बोलतां बोलतां अन्वयें । सांडूंच नये ॥ १ ॥ श्रोतयानें आशंका घेतली । ते तात्काळ

---

१ एकसारखें पहात असावें; आत्मविचार केलेला तोच करावा. २ लांकूड, त्यासारखा देह. ३ शिरतो, विस्तारतो. ४ संशयस्थिति. ५ वर, मोक्षाकडे. ६ मोक्षप्राप्ती. ७ पतन. ८ येथें व तेथें दोनीहि ठिकाणीं भ्रष्ट होतात. ९ मायाज्ञान. १० अज्ञानरहिताला. ११ यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान व समाधि हे अष्टांगयोग. १२ शरीरज्ञान. १३ महदादि तत्त्वज्ञान. १४ आत्मस्वरूपज्ञान. १५ भरलेलें, चिकटलेलें. १६ विचाराचें नाहींसें होणें. १७ सुखेनैव, खुशाल. १८ संबंध.

पाहिजे फेडिली । स्वगोष्टीनें स्वगोष्टी पेंचैली । ऐसें न ह्मावें ॥ २ ॥ पुढें धरितां मागें पेंचला । मागें धरितां पुढें उडाला । ऐसा सांपडताचि गेला । ठायीं ठायीं ॥ ३ ॥ पोहणाराचि गुचक्या[1] खातो । जनांस कैसा काढूं पाहतो । आशयें[2] लोकांचा राहत जातो । ठायीं ठायीं ॥ ४ ॥ आपणचि बोलिला संहार । आपणचि बोलिजे सर्व सार । दुस्तर मायेचा पार । दाविला पाहिजे ॥ ५ ॥ जें जें सूक्ष्म नांव ध्यावें । त्यांचें रूप बिंबवूनि द्यावें । तरीच वक्ता म्हणवावें । विचारवंत ॥ ६ ॥ ब्रह्म कैसें मूळमाया कैसी । अष्टधा प्रकृति शिवशक्ति कैसी । षडगुणैश्वर्यांची स्थिति कैसी । गुणसाम्याची ॥ ७ ॥ अर्धनारी-नटेश्वर । प्रकृतिपुरुषांचा विचार । गुणक्षोभिणी तदनंतर । त्रिगुण कैसे ॥ ८ ॥ पूर्वपक्ष कोठून कोठवरी । वोंच्यांश[6] लक्ष्यांशाची परी । सूक्ष्म नाना विचार करी । धन्य तो साधू ॥ ९ ॥ नाना पाल्हाळीं पडेना । बोलिलोंचि बोलवेना । मौनेंगभें[7] अनुमाना । आणून सोडी ॥ १० ॥ घडीं एक विमळब्रह्म । घडीं एक सर्वब्रह्म । द्रष्टा साक्षी सत्ता ब्रह्म । क्षण एक ॥ ११ ॥ निश्चळ तेंचि झालें चंचळ । चंचळ तेंचि ब्रह्म केवळ । नाना प्रसंगीं खळखळ । निवाडा नाहीं ॥ १२ ॥ चळतें आणि निश्चळ । अवघें चैतन्यचि केवळ । रूपें वेगळालीं प्रांजळ । कदापि बोलवेना ॥ १३ ॥ उगीच करी गार्थागोवी[8] । तो लोकांस कैसा उगवी[9] । नाना निश्चयें नाना गोवी[10] । पडत जाते ॥ १४ ॥ भ्रमास म्हणे परब्रह्म । परब्रह्मास म्हणे भ्रम । ज्ञातेपणाचा संभ्रम[11] । बोलोन दावी ॥ १५ ॥ घाली शास्त्रांचें दडपण । प्रचीतीविण निरूपण । पुसों जातां उगाच शीणे[12] । अत्यंत मानी ॥ १६ ॥ ज्ञात्यास आणि पदार्थभिडा[13] । तो काय बोलेल बापुडा । सारा-सारांचा निवाडा । झाला पाहिजे ॥ १७ ॥ वैद्य मात्रेची स्तुति करी । मात्रा गुण कांहींच न धरी । प्रचीतीविण तैसी परी । ज्ञानाची झाली ॥ १८ ॥ जेथें नाहीं सारासार । तेथें अवघा अंधकार । नाना परीक्षांचे विचार । राहिले तेथें ॥ १९ ॥ पाप पुण्य स्वर्ग नरक । विवेक आणि अविवेक । सर्व ब्रह्मीं काय एक । सांपडलें नाहीं ॥ २० ॥ पावन आणि तें पतन । दोनी मानिलीं तत्समान । निश्चय आणि अनुमान । ब्रह्मरूप ॥ २१ ॥ ब्रह्मरूप झालें अवघें । तेथें काय निवडावें । अवघें साकाराचि टाकावें । काय कोठें ॥ २२ ॥ तैसें सार आणि असार । अवघा झाला एकंकार । तेथें बळावला अविचार । विचार कैंचा ॥ २३ ॥ वंद्य निंद्य एक झालें । तेथें काय हातास आलें । उन्मत्त द्रव्यें जे भुलले । ते भलतेंचि बोले ॥ २४ ॥ तैसा अज्ञानभ्रमें भुलला । सर्व ब्रह्म म्हणोन बैसला । महापापी आणि भला । एकाचि मानी ॥ २५ ॥

---

१ आपलें बोलणें आपणच उलट बोलून खोडूं नये; आपलें बोलणें आपणासच नडूं नये. २ गटंगळ्या. ३ शंका. ४ त्रिगुणांस प्रकट करणारी. ५ बोलण्याचा भाग. ६ वाच्यांश टाकून अवशिष्ट ब्रह्म–प्रत्यगात्मा, त्याची. ७ ज्याविषयीं अनुभव सांगतां येत नाहीं. ८ गुंतागुंत ९ उलगडून सांगे, समजूत करी. १० पसारा, डौल. ११ त्रास. १२ ज्ञात्या-लाच ' जगांतील पदार्थ मिथ्या आहेत ' असें वाटत नाहीं, तर तो लोकांस ब्रह्मच सत्य व जग मिथ्या हें कसें सांगणार. १३ सर्व. १४ मादक.

सर्वसंगपरित्याग । अथवा विषयभोग । दोघे एकचि मानी मग । काय उरलें ॥ २६ ॥ भेद ईश्वर करून गेला । तो याच्या बापाचेनि नवचे मोडिला । मुखामध्यें घास घातला । तो अंपानीं घालावा ॥ २७ ॥ ज्या इंद्रियास जो भोग । तो तो करी यथासांग । ईश्वराचें केलें जग । मोडितां उरेना ॥ २८ ॥ अवघी भ्रांतीची ठेकाठकी । प्रचीतीविण गोष्टी लटकी । वेड लागलें जे बंटकी । तो भलतेचि बोले ॥ २९ ॥ प्रत्ययें ज्ञाता सावधान । त्याचें ऐकावें निरूपण । आत्मसाक्षात्काराची खूण । तात्काळ बाणे ॥ ३० ॥ वेडें वांकुडें जाणावें । आंधळें पाउलीं वोळखावें । बाष्कळ बोलणें सांडावें । वमन जैसें ॥ ३१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सप्तदशदशके । अनुमाननिरूपणं नाम चतुर्थः समासः ॥४॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ एकवीस सहस्र साहाशें जंपा । नेमून गेली ते अजपा । विचार पाहतां सोपा । सकळ कांहीं ॥ १ ॥ मुखीं नासिकीं असिजे प्राणें । तयास अखंड येणें जाणें । याचा विचार पाहाणें । सूक्ष्मदृष्टीं ॥ २ ॥ मुळीं पाहतां एक स्वर । त्याचा तार मंद्र घोर । त्या घोराहून सूक्ष्मविचार । अजपेचा ॥ ३ ॥ स रि ग म प ध नि स । सरिं मातृका सायास । प्रथमस्वरें मातृकांस । म्हणोन पाहावें ॥ ४ ॥ परेवाचेहून * अतें । आणि पश्यंतीखालतें । स्वराचें जन्मस्थान तें । तेथून उठे ॥ ५ ॥ एकांतीं उगीच बैसावें । तेथें हें समजोन पाहावें । अखंड ध्यावें सोडावें । प्रभंजनासी ॥ ६ ॥ एकांतीं मौन धरून बैसे । सावध पाहतां कैसें भासे । सोहं सोहं ऐसे । शब्द होती ॥ ७ ॥ उच्चारेंविण जे शब्द । ते जाणावे सहज शब्द । प्रत्यया येती परंतु नाद । कांहींच नाहीं ॥ ८ ॥ ते शब्द सांडून बैसला । तो मौनी म्हणावा भला । योगाभ्यासाचा गलबला । याकारणें ॥ ९ ॥ एकांतीं मौन धरून बैसला । तेथें कोण शब्द झाला । सोहं ऐसा भासला । अंतर्यामीं ॥ १० ॥ धरितां सो टाकितां हं । अखंड चाले सोहं सोहं । याचा विचार पाहतां बहू । विस्तारला ॥ ११ ॥ देहधारक तितुका प्राणी । स्वेदज उद्भिजादिक खाणी । श्वासोच्छ्वास नसतां प्राणी । कैसे जगती ॥ १२ ॥ ऐसी हे अजपा सकळांसी । परंतु कळे जाणत्यासी । सहज सांडून सायासीं । पडोंच नये ॥ १३ ॥ सहज देव असतचि असे । सायासें देव फुटे नासे । नाशवंत देवासि विश्वासे । ऐसा कवण ॥ १४ ॥ जगदंतराचें दर्शन । सहज घडे अखंड ध्यान । आत्मइच्छेनें जन । सकळ वर्तती ॥ १५ ॥ आत्मयाचें समाधान । घडे तैसेंचि आसन । सांडणें फिटलें समर्पण । तयासीच होय ॥ १६ ॥ अग्निपुरुष पोटीं असती । तयांस अवदानें सकळ देती ।

---

१ सर्व संग टाकणारा. २ योग्यायोग्य न पाहतां, स्वच्छंदरीतीनें. ३ विषय भोगणारा. ४ गुदांत. ५ फसविण्याचे प्रकार. ६ बडबड्या. ७ अनुभवानें. ८ २१६०० श्वासोच्छ्वासाबरोबर होणारा जप तो, अजपा गायत्री. ९ नाकामध्यें. १० खंड न पडतां. ११ उच्च, मध्य व नीच षड्ज. १२ नीच षड्ज अथवा खर्ज त्याहून. १३ अक्षरांना. १४ पहिल्या वाणीहून. * अलीकडले, वरले. १५ दुसऱ्या वाणीच्या खालीं. १६ वायूला. १७ तो मी, तो मी. १८ हृदयांत. १९ घामापासून झालेले, उवा वगैरे. २० अंकुरादि रूपानें उत्पन्न होणारे, वृक्ष वगैरे. २१ योनी. २२ आहुति.

लोक आज्ञेमध्यें असती । आत्मयाचे ॥ १७ ॥ सहज देवजपध्यानें । सहज चालणें स्तुति स्तवनें । सहज घडे तें भगवानें । मान्य कीजे ॥ १८ ॥ सहज समजायाकारणें । नाना हटयोगे करणें । परंतु एकाएकीं समजणें । घडत नाहीं ॥ १९ ॥ द्रव्य चुकतें दरिद्र येतें । तळीं लक्ष्मी वरी वर्तते । प्राणी काय करील तें ? ठाउकें नाहीं ॥ २० ॥ तळघरांमध्यें उदंड द्रव्य । भिंतीमध्यें घातलें द्रव्य । स्तंभीं तुळवटीं द्रव्य । आपण मध्यें ॥ २१ ॥ लक्ष्मीमध्यें करंटा नांदे । त्याचें दरिद्र अधिक सादे । नवल केलें परमानंदें । परमपुरुषें ॥ २२ ॥ एक पाहती एक खाती । ऐशी विवेकाची गति । प्रवृत्ति अथवा निवृत्ती । येणेंचि न्यायें ॥ २३ ॥ अंतरीं असतां नारायणे । लक्ष्मीस काय उणें । ज्याची लक्ष्मी तो आपणे । बळकट धरावा ॥ २४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सप्तदशदशके अजपानिरूपणं नाम पंचमः समासः ॥ ५ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ आत्मा देहामध्यें असतो । नाना सुखदुःखें भोगितो । शेवटीं शरीर सांडून जातो । एकाएकीं ॥ १ ॥ शरीरशक्ति तारुण्यपणीं । नाना सुखें भोगिती प्राणी । अशक्त होतां वृद्धपणीं । दुःखें भोगी ॥ २ ॥ मरावेंना ऐशी आवडी । हात पाय * खोडून प्राण सोडी । नाना दुःखें अवघडी । वृद्धपणीं ॥ ३ ॥ देहात्मयाचे संगतीं । कांहींएक सुख भोगिती । चर्फडोंचर्फडून जाती । देहांतकाळीं ॥ ४ ॥ ऐसा आत्मा दुःखदायक । एकाचे प्राण घेती एक । आणि शेवटीं निरर्थक । कांहींच नाहीं ॥ ५ ॥ ऐसा दों दिवसांचा भ्रम । त्यास म्हणती परब्रह्म । नाना दुःखांचा संभ्रम । मानून घेतला ॥ ६ ॥ दुःखी होऊन चरफडून गेले । तेथें काय समाधान झालें । कांहीं एक सुख भोगिलें । तों सवेच दुःख ॥ ७ ॥ जन्मादारभ्य आठवावें । म्हणिजे अवघें पडेल ठावें । नाना दुःख मोजावें । किती म्हणोनि ॥ ८ ॥ ऐशी आत्मयाची संगति । नाना दुःखें प्राप्त होती । दैन्यवाणे होऊन जाती । प्राणिमात्र ॥ ९ ॥ कांहीं आनंद कांहीं खेद । जन्मवरी पडिला संबंध । नाना प्रकारीं विरुद्ध । तार्डातोडी ॥ १० ॥ निद्राकाळीं ढेकूण पिसा । नाना प्रकारीं वळसा । नाना उपायें वळसा । त्यांसे° होय ॥ ११ ॥ भोजनकाळीं माशा येती । नाना पदार्थ उंदीर नेती । पुढें त्यांचीहि फजिती । मोजीरें करिती ॥ १२ ॥ उवा चोमवा गोचिडे । गांधले कोनटे उदंडे । एकास एक चर्फड । दोहींकडे ॥ १३ ॥ विंचू सर्प वाघ रिसे । सुसर लांडगे माणसांस माणसें । परस्परें सुखसंतोषें । एकहि नाहीं ॥ १४ ॥ चौऱ्यांशी लक्ष उत्पत्ति । एकास एक भक्षिती । नाना पीडा दुखणीं किती । म्हणोन सांगावें ॥ १५ ॥ ऐशी अंतरात्म्याची करणी । नाना जीव दाटले धरणीं । परस्परें संहारिणी ।

---

१ प्राणवायूच्या निरोधानें अंतःकरणवृत्ती एकाग्र करणें. २ दुर्दैवी. ३ पूर्णपणें असतें. ४ प्रपंच. ५ मोक्षमार्ग. * झाडून. ६ भीति ७ जन्मापासून. ८ त्रास, दगदग, ९ उपद्रव. १० ढेकुणपिसांवर आपण उपाय केले म्हणजे त्यांस आपणाकडून उपद्रव होतो. ११ मांजरें. १२ त्वचेंत घुसून राहणाऱ्या गोचडी. १३ गाईच्या अंगावर होणारे जीव. १४ पुष्कळ. १५ अस्वलें. १६ पृथ्वीवर. १७ नाश.

एक एकाची ॥ १६ ॥ अखंड रडती चर्फडती । विवळविवळों प्राण देती । मूर्ख प्राणी त्यांस म्हणती । परब्रह्म ॥ १७ ॥ परब्रह्म जाणार नाहीं । कोणास दुःख देणार नाहीं । स्तुति निंदा दोनी नाहीं । परब्रह्मीं ॥ १८ ॥ उदंड शिष्या दिधल्या । तितुक्या अंतरात्म्यास लागल्या । विचार पाहतां प्रत्ययास आल्या । यथातथ्य ॥ १९ ॥ धगडीचा बटकीचा लंवडीचा । गधडीचा कुत्रीचा वोंगळीचा । ऐसा हिशेब शिष्यांचा । किती म्हणोन सांगावा ॥ २० ॥ इतुकें परब्रह्मीं लागेना । तेथें कल्पनाचि चालेना । ताडातोडीचें ज्ञान मानेना । कोणी एकाशीं ॥ २१ ॥ सृष्टीमध्यें सकळ जीव । सकळांस कैंचें वैभव । याकारणें ठायाठांव । निर्मिला देवें ॥ २२ ॥ उदंड लोक बाजारींचे । जें जें आलें तें तें वेंचे । उत्तम तितुकें भाग्याचें । लोक घेती ॥ २३ ॥ येणेंचि न्यायें अन्नवसन । येणेंचि न्यायें देवतार्चन । येणेंचि न्यायें ब्रह्मज्ञान । प्राप्तव्यासारिखें ॥ २४ ॥ अवघेचि लोक सुखी असती । संसार गोड करून नेती । महाराजे वैभव भोगिती । तें करंट्यास कैंचें ॥ २५ ॥ परंतु अंतीं नाना दुःखें । तेथें होतें सगट सारिखें । पूर्वीं भोगिलीं नाना सुखें । अंतीं दुःख सोसवेना ॥ २६ ॥ कठिण दुःख सोसवेना । प्राण शरीर सोडीना । मृत्युदुःख सकळ जना । कासाविस करी ॥ २७ ॥ नाना अवयवहीन झाले । तैसेंचि पाहिजे वर्तलें । प्राणी अंतकाळीं गेले । कासाविस होउनी ॥२८॥ रूप लावण्य अवघें जातें । शरीरसामर्थ्य तेंहि जातें । कोणी नसतां मरतें । आपदआपदों ॥ २९ ॥ अंतकाळ दैन्य दीन । सकळिकांस तत्समान । ऐसें चंचळ अवलक्षण । दुःखकारी ॥ ३० ॥ भोगून अभोक्ता म्हणती । हे तों अवघीच फजिती । लोक उगेच बोलती । पाहिल्याविण ॥ ३१ ॥ अंतकाळ आहे कठिण । शरीर सोडिना प्राण । बराड्यासारिखें लक्षण । अंतकाळीं ॥ ३२ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सप्तदशदशके देहात्मनिरूपणं नाम षष्ठः समासः ॥ ६ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ मुळीं उदक निवळें असतें । नाना वल्लीमध्यें जातें । संगदोषें तैसें होतें । आम्ल तीक्ष्ण कडवट ॥ १ ॥ आत्मा आत्मपणें असतो । देहसंगें विकारतो । साभिमानें भरीं भरतो । भलतीकडे ॥ २ ॥ बरी संगति सांपडली । जैशी उंसास गोडी आली । विषवल्ली फोंपावली । घातकी प्राणी ॥ ३ ॥ अठराभार वनस्पती । गुण सांगावे ते किती । नाना देहांचे संगती । आत्मयास होय ॥ ४ ॥ त्यामध्यें कोणी भले । ते संतसंगें निवाले । देहाभिमान सांडून गेले । विवेकबळें ॥ ५ ॥ उदकाचा नाशचि होतो । आत्मा विवेकें निघतो । ऐसा आहे प्रत्यय तो । विवेकें पाहावा ॥ ६ ॥ ज्यासी स्वहितचि करणें । त्यास किती म्हणोन सांगणें । हें ज्याचें त्याणें समजणें । सकळ काहीं ॥ ७ ॥आपला आपण करी कुर्डावा ।

---

१ बरोबर. २ रहावयास जागा. ३ विकतें, खपतें. ४ अन्नवस्त्र. ५ देवपूजन. ६ दैवाप्रमाणें. ७ घाबरे ८ त्रासत्रासून, विपत्तीत पडून ९ न भोगणारा. १० आशाखोराप्रमाणें. ११ शुद्ध. १२ देहाभिमानानें. १३ विस्तारली. १४ सर्व वनस्पति. १५ समाधान पावले. १६ संरक्षण.

तो आपला मित्र जाणावा । आपला नाश करी तो समजावा । वैरी ऐसा ॥ ८ ॥ आपलें आपण अनहित करावें । त्यास आडवें कोणें घिघावें । एकांतीं जाऊन जीवें । मारी आपणासी ॥ ९ ॥ जो आपला आपण घातकी । तो आत्महत्यारा पातकी । याकारणें विवेकी । धन्य साधु ॥ १० ॥ पुण्यवंता सत्संगति । पापिष्ठास असत्संगति । गति आणि अवगति । संगतियोगें ॥ ११ ॥ उत्तम संगति धरावी । आपली आपण चिंता करावी । अंतरीं बरी विवरावी । बुद्धि जाणत्याची ॥ १२ ॥ इहलोक आणि परलोक । जाणता तो सुखदायक । नेणत्याकरितां अविवेक । प्राप्त होतो ॥ १३ ॥ जाणता देवाचा अंश । नेणता म्हणजे तो राक्षसांश । यामध्यें जें * विशेष । तें जाणोन घ्यावें ॥ १४ ॥ जाणता तो सकळां मान्य । नेणता होतो अमान्य । जेणेंकरितां होइजे धन्य । तेंचि घ्यावें ॥ १५ ॥ सांक्षेपी शाहाण्याची संगति । तेणें साक्षेपी शाहाणे होती । आळशी मूर्खांची संगति । आळशी मूर्ख ॥ १६ ॥ उत्तमसंगतीचें फळ सुख । अधमसंगतीचें फळ दुःख । आनंद सांडूनियां शोक । कैसा घ्यावा ॥ १७ ॥ ऐसें हें प्रकट दिसे । जनामध्यें उदंड भासे । प्राणिमात्र वर्ततसे । उभययोगें ॥ १८ ॥ एका योगें सकळ योग । एका योगें सकळ वियोग । विवेकयोगें सकळ प्रयोग । करीत जावे ॥ १९ ॥ अवचितें सांकडींत पडिलें । तरी तेथून पाहिजे निघालें । निघोन जातां झालें । परम समाधान ॥ २० ॥ नाना दुर्जनांचा संग । क्षणक्षणां मनोभंग । याकारणें कांहीं रंग । राखोन जावें ॥ २१ ॥ शाहाणा यत्नी त्याच्या गुणें । पाहों जातां काय उणें । सुख संतोष भोगणें । नाना श्रेष्ठ्यता ॥ २२ ॥ आतां लोकीं ऐसें आहे । सृष्टीमध्यें वर्ततआहे । जो कोणी समजोन पाहे । त्यास घडे ॥ २३ ॥ बहुरत्ना वसुंधरा । जाणजाणों विचार करा । समजला प्रत्यय अंतरा-। मार्जी येतो ॥ २४ ॥ दुर्बल आणि संपन्न । वेडे आणि व्युत्पन्न । हे अखंडदंडायमान । असतचि असे ॥ २५ ॥ एक भाग्यपुरुष ❀ मोडती । एक नवे भाग्यवंत होती । तैशीच विद्या व्युत्पत्ति । होत जाते ॥ २६ ॥ एक भरे एक रितें । रितें मागुतें भरतें । भरतें तेंहि रितें होतें । कालांतरीं ॥ २७ ॥ ऐसी हे सृष्टीची चाली । संपत्ति दुपाराची साउली । वयेंसा तरी निघोन गेली । हळुहळू ॥ २८ ॥ बाळ तारुण्य आपलें । वृद्धपण प्रचीतीस आलें । ऐसें जाणोन सार्थक केलें । पाहिजे कोणी एकें ॥ २९ ॥ देह जैसें केलें तैसें होतें । यत्न केल्या कार्य साधतें । तरी मग † कष्टावें तें । काय निमित्त ॥३०॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सप्तदशदशके जगज्जीवननिरूपणं नाम सप्तमः समासः ॥७॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ नाभीपासून उन्मेषें वृत्ति । तेचि परा जाणिजे श्रोतीं । ध्वनिरूप पश्यंती । हृदयीं वसे ॥ १ ॥ कंठापासून नाद झाला । मध्यमा वाचा बोलिजे त्याला । उच्चार होतां अक्षराला । वैखरी बोलिजे ॥ २ ॥ नाभिस्थानीं परा वाचा ।

---

१ अकल्याण. २ आत्मघातकी. ३ दुर्गति, नरकवास. ४ शोधून पहावी. * अंतर, फरक. ५ उद्योगी. ६ कृत्य. ७ एकाएकीं. ८ संकटांत. ९ महत्त्व. १० स्तुति. ११ पृथ्वीवर अनेक चांगल्या वस्तु आहेत. १२ अव्याहत चालणारें. ❀ बाईट स्थितींत येतात. १३ विद्वत्ता. १४ रिकामें. १५ आयुष्य. † दुःखी व्हावें. १६ स्फुरणाची वृत्ति. १७ पहिली वाणी. १८ दुसरी वाणी.

तोचि ठाव अंतःकरणाचा । अंतःकरणपंचकाचा । निवाडा ऐसा ॥ ३ ॥ निर्विकल्प जें स्फुरण । उगेंच असतां आठवण । तें जाणावें अंतःकरण । जाणती कळा ॥ ४ ॥ अंतःकरणीं आठवलें । पुढें होय नव्हे गमलें । करूं न करूं ऐसें वाटलें । तेंचि मन ॥ ५ ॥ संकल्पविकल्प तेंचि मन । जेणेंकरितां अनुमान । पुढें निश्चय तोचि जाण । रूप बुद्धीचें ॥ ६ ॥ करीनाचि अथवा न करी । ऐसा निश्चय करी । तेंचि बुद्धि हे अंतरीं । विवेकें जाणावी ॥ ७ ॥ जे वस्तूचा निश्चय केला । पुढें तेचि चिंतूं लागला । तें चित्त बोलिल्या बोला । यथार्थ मानावें ॥ ८ ॥ पुढें कार्याचा अभिमान धरणें । हें कार्य तों अगत्य करणें । अशा कार्यास प्रवर्तणें । तोचि अहंकारू ॥ ९ ॥ ऐसें हें अंतःकरणपंचक । पंचवृत्ति मिळोन एक । कार्यभागें प्रकारपंचक । वेगळालें ॥ १० ॥ जैसे पांचहि प्राण । कार्यभागें वेगळाले जाण । नाहींतरी वायूचें लक्षण । एकाचि असे ॥ ११ ॥ सर्वांगीं व्याने नाभीं समान । कंठीं उदानें गुदीं अपानें । मुखीं नासिकीं प्राण । नेमस्त जाणावा ॥ १२ ॥ बोलिलें हें प्राणपंचक । आतां ज्ञानेंद्रियपंचक । श्रोत्र त्वचा चक्षु जिव्हा नासिक । ऐशीं हीं ज्ञानेंद्रियें ॥ १३ ॥ वाचा पाणि पाद शिश्न गुद । हीं कर्मेंद्रियें प्रसिद्ध । शब्द स्पर्श रूप रस गंध । ऐसें हें विषयपंचक ॥ १४ ॥ अंतःकरण प्राणपंचक । ज्ञानेंद्रिय कर्मेंद्रियपंचक । पांचवें विषयपंचक । ऐशीं हीं पांच पंचकें ॥ १५ ॥ ऐसे हे पंचवीस गुण । मिळोन सूक्ष्म देह जाण । यांचा कर्दम बोलिला श्रवण । केलें पाहिजे ॥ १६ ॥ अंतःकरण व्यान श्रवण वाचा । शब्द विषय आकाशाचा । पुढें विस्तार वायूचा । बोलिला असे ॥ १७ ॥ मन समान त्वचा पाणी । स्पर्श विषय हा पवनीं । ऐसे हे अडांखे साधूनी । कोठा करावा ॥ १८ ॥ बुद्धि उदान नयन चरण । रूप विषयाचें दर्शन । संकेतें बोलिलें मन । घालूनि पाहिजे ॥ १९ ॥ चित्त अपान जिव्हा शिश्न । रस विषय आप जाण । पुढें ऐका सावधान । पृथ्वीचें रूप ॥ २० ॥ अहंकार प्राण घ्राण । गुद गंध विषय जाण । ऐसें केलें निरूपण । शास्त्रमतें ॥ २१ ॥ ऐसा हा सूक्ष्मदेह । पाहतां होइजे निःसंदेह । येथें मन घालूनि पाहे । त्यासिच हें उमजे ॥ २२ ॥ ऐसें सूक्ष्म देह बोलिलें । पुढें स्थूळां निरूपिलें । आकाश पंचगुणें वर्तलें । कैसें स्थूळीं ॥ २३ ॥ काम क्रोध शोक मोह भय । हा पंचविध आकाशाचा अन्वय । पुढें पंचविध वायू । निरूपिला ॥ २४ ॥ चळण वळण प्रसरण । निरोध आणि आकुंचन । हें पंचविध लक्षण । प्रभंजनाचें ॥ २५ ॥ क्षुधा तृषा आलस्य निद्रा मैथुन । हे तेजाचे पंचविध गुण । आतां पुढें आपलक्षण । निरूपिलें पाहिजे ॥ २६ ॥ शुक्र शोणित लाळ मूत्र स्वेद । हा पंचविध आपाचा भेद । पुढें पृथ्वी विशद । केली पाहिजे ॥ २७ ॥ अस्थि मांस त्वचा नाडीं रोम । हे पृथ्वीचे पंचविध

---

१ अंतःकरण, मन, बुद्धि, चित्त अहंकार. २ वाटलें. ३ तयार होणें. ४ अभिमान, मीपणा. ५ पंचप्राणांपैकीं एक. ६ कान. ७ कातडें. ८ डोळे. ९ जीभ. १० नाक. ११ हात. १२ लिंगदेह. १३ मिश्रण. १४ वायूमध्यें. १५ मेळ, ताळे. १६ कोष्टक. १७ उदक. १८ स्थूल स्वरूपाला. १९ संबंध. २० भूक. २१ रेत. २२ रक्त. २३ घाम. २४ स्पष्ट. २५ केंस.

धर्म । ऐसें स्थूलदेहाचें वर्म । बोलिलें असे ॥ २८ ॥ पृथ्वी आप तेज वायु आकाश । हे पांचांचे पंचवीस[2] । ऐसे मिळोनि स्थूलदेहास । बोलिजेतें ॥ २९ ॥ तिसरा देह कारण अज्ञान । चौथा देह महाकारण ज्ञान । हे चारी देह निरसितां[3] विज्ञान । परब्रह्म तें ॥ ३० ॥ विचारें चौदेहावेगळें केलें । मीपण तत्त्वासरिसें गेलें । अनन्य आत्मनिवेदन झालें । परब्रह्मीं ॥ ३१ ॥ विवेकें चुकला जन्ममृत्य । नरदेहीं साधिलें महत्कृत्य । भक्तियोगें कृतकृत्य । सार्थक झालें ॥ ३२ ॥ इति श्रीपंचीकरण । केलेंचि करावें विवरण । लोहाँचें होतें सुवर्ण । परिसाचेनि योगें ॥ ३३ ॥ हाहि दृष्टांत घडेना । परिसाचेनि परिस करवेना । शरण जातां साधुजना । साधूचि होइजे ॥ ३४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सप्तदशदशके तत्त्वविवरणनिरूपणं नाम अष्टमः समासः ॥ ८ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ स्थूळ सूक्ष्म कारण महाकारण । ऐसे हे चार देह जाण । जागृति स्वप्न सुषुप्ति पूर्ण । तुर्या जाणावी ॥ १ ॥ विश्व तेजस प्राज्ञ । प्रत्यगात्मा हे अभिमान । नेत्रस्थान कंठस्थान । हृदयस्थान मूर्धा तें ॥ २ ॥ स्थूळ भोग प्रविविक्त[1] । भोग । आनंदभोग आनंदावभास भोग । ऐसे चारी भोग । चौदेहांचे ॥ ३ ॥ अकार उकार मकार । अर्ध मात्रा तो ईश्वर । ऐशा मात्रा चार । चौदेहांच्या ॥ ४ ॥ तमोगुण रजोगुण । सत्त्वगुण शुद्धसत्त्वगुण । ऐसे हे चार गुण । चौदेहांचे ॥ ५ ॥ क्रियाशक्ति द्रव्यशक्ति । इच्छाशक्ति ज्ञानशक्ति । ऐशा ह्या चार शक्ती । चौदेहांच्या ॥ ६ ॥ ऐशीं हीं बत्तीस तत्त्वें । दोहोंचीं पन्नास तत्त्वें । अवघीं मिळोन ब्यांयशी तत्त्वें । अज्ञान आणि ज्ञान ॥ ७ ॥ ऐशीं हीं तत्त्वें जाणावीं । जाणोन मायिक वोळखावीं । आपण साक्षी निरसावी । येणें रीतीं ॥ ८ ॥ साक्षी म्हणिजे तें ज्ञान । ज्ञानें वोळखावें अज्ञान । ज्ञानाज्ञानांचें निरसनें । देहांसरिसें[6] ॥ ९ ॥ ब्रह्मांडीं देह कल्पिले । विराट हिरण्यगर्भ बोलिले । ते हे विवेकें निरसिले । आत्मज्ञानें ॥ १० ॥ आत्मानात्मविवेक । पाहतां । सारासारविचार करितां । पंचभूतांची मायिक वार्ता । प्रचीत आली ॥ ११ ॥ अस्थि मांस त्वचा नाडी रोमें[7] । हे पांचहि पृथ्वीचे गुणधर्म । प्रत्यक्ष शरीरीं हें वर्म । शोधून पाहावें ॥ १२ ॥ शुक्र शोणित लाळ मूत्र स्वेद । हे आपाचे पंचभेद । तत्त्वें समजोन विशद । करून घ्यावीं ॥ १३ ॥ क्षुधा तृषा आलस्य निद्रा । मैथुन । हे पांचहि तेजाचे गुण । या तत्त्वांचें निरूपण । केलेंचि करावें ॥ १४ ॥ चळण वळण प्रसारण । निरोधन[14] आणि आकुंचन । हे पांचहि वायूचे गुण । श्रोतीं जाणावे ॥ १५ ॥ काम क्रोध शोक मोह भय । हा आकाशींचा पर्याय[15] । हें विवरिल्याविणें काय । समजों जाणे ॥ १६ ॥ असो ऐसें हें स्थूळ शरीर । पंचवीस तत्त्वांचा विस्तार ।

---

१ जड देहाचे. २ पंचवीस अंश. ३ बाधा करतां, मिथ्या समजतां. ४ लोखंडा नें. ५ गाढ झोंप. ६ चवथी अवस्था. ७ जागृतीचा साक्षी. ८ स्वप्नस्थितीचा साक्षी. ९ सुषुप्तीचा साक्षी. १० स्वतः प्रकाशस्वरूपी आत्मा. ११ डोकें. १२ स्वप्नांतील भोग. १३ समाधींतील आनंद. १४ लटकीं. १५ नाश. १६ देहाबरोबर. १७ केंस. १८ घाम. १९ पसरणें. २० प्रतिबंध २१ प्रकार, शब्दांतर.

आतां सूक्ष्म देहाचा विचार । बोलिजेल ॥ १७ ॥ अंतःकरण मन बुद्धि चित्त अहंकार । आकाशपंचकाचा विचार । पुढें वायु निरुत्तर । होऊन ऐका ॥ १८ ॥ व्यान समान उदान । अपान आणि प्राण । ऐसे हे पांचहि गुण । वायुतत्त्वाचे ॥ १९ ॥ श्रोत्र त्वचा चक्षु जिव्हा घ्राण । हे पांचहि तेजाचे गुण । आतां आप सावधान । होऊन ऐका ॥ २० ॥ वाचा पाणि पाद शिश्न गुद । हे आपाचे गुण प्रसिद्ध । आतां पृथ्वी विशद । निरूपिली ॥ २१ ॥ शब्द स्पर्श रूप रस गंध । हे पृथ्वीचे गुण विशद । ऐसे हे पंचवीस तत्त्वभेद । सूक्ष्म देहाचे ॥ २२ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सप्तदशदशके तनुचतुष्टय-निरूपणं नाम नवमः समासः ॥ ९ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ आवरणोदकीं हाटकेश्वर । त्यास न घडे नमस्कार । महिमा अत्यंतचि थोर । तया पाताळलिंगाचा ॥ १ ॥ परंतु तेथें जाववेना । शरीरें दर्शन घडेना । विवेकें आणावें अनुमाना । तया ईश्वरासी ॥ २ ॥ साता समुद्रांचे वेढे । उदंड भूमि पैलीकडे । शेवटीं तुटले कडे । भूमंडळाचे ॥ ३ ॥ सात समुद्र ओलांडावे । तेथें जाणें कैसें फावे । म्हणोनि विवेकीं असावें । साधुजनें ॥ ४ ॥ जे आपणास नव्हे ठावें । ते जाणतयास पुसावें । मनोवेगें तेनें फिरावें । हें तो घडेना ॥ ५ ॥ जें चर्मदृष्टीस नव्हे ठावें । तें ज्ञानदृष्टीनें पाहावें । ब्रह्मांड विवरोन राहावें । समाधानें ॥ ६ ॥ मध्यें आहे भूमीचें चडळ । म्हणोन आकाश आणि पाताळ । ते पडळ नसतां अंतराळ । चहूंकडे ॥ ७ ॥ तयास परब्रह्म म्हणावें । जे उपाधीवेगळें स्वभावें । जेथें दृश्यमायेच्या नांवें । शून्याकार ॥ ८ ॥ दृष्टीचें देखणें दृश्य । मनाचें देखणें भास । मनातीत निराभास । विवेकें जाणावे ॥ ९ ॥ दृश्यभास अवघा विघडे । विवेकी तेथें पवाडे । भूमंडळीं ज्ञाते थोडे । सूक्ष्मदृष्टीचे ॥ १० ॥ वाच्यांश वाचेनें बोलावा । न बोलतां लक्ष्यांश जाणावा । निर्गुण अनुभवास आणावा । गुणाचेनि-योगें ॥ ११ ॥ नाना गुणांस आहे नाश । निर्गुण तें अविनाश । ढोबळयाहून विशेष । सूक्ष्म देखणें ॥ १२ ॥ जें दृष्टीस न पडे ठावें । तें ऐकोन जाणावें । श्रवण-मननें पैलडे ठावें । सकळ कांहीं ॥ १३ ॥ अष्टधेचे जिन्नस नाना । उदंड पाहतां कळेना । अवघें सगट पिटावेना । कोणीएक ॥ १४ ॥ सगट सारिखी स्थिति झाली । तेथें परी-क्षाच बुडाली । * चवीनष्टानें कालविलीं । नाना अन्नें ॥ १५ ॥ टोणपा नव्हे गुणग्राहक । मूर्खास कळेना विवेक । विवेक आणि अविवेक । एकाचि म्हणती ॥ १६ ॥ उंच नीच कळेना ज्याला । तेथें अभ्यासाचि बुडाला । अनभ्यासें प्राणियाला । सुटका कैंची ॥ १७ ॥ वेड लागोन झाले ओंगळे । त्यांस सारिखेंच वाटे सकळ । ते जाणावे

---

१ कर्ण. २ डोळे. ३ नाक. ४ हात. ५ आच्छादनरूपी उदकामध्ये. ६ पाताळांतील एक लिंग. ७ मनाच्या वेगानें. ८ शरीरानें. ९ पापुदरा, पडदा. १० पोकळी, आकाश. ११ दृश्यरूपी मायेचा अभाव. १२ प्रवेश करितो. १३ स्थूलाहून. १४ ठाऊक होतें, कळतें. १५ अष्टधा प्रकृतीचे. १६ सारखें. १७ मानतां येत नाहींत. * ज्याला चव नाहीं अशा माणसानें. १८ मूर्ख १९ घाणेरडे, भ्रमिष्ट.

बाष्कळ। विवेकी नव्हेती ॥ १८ ॥ ज्यास अखंड होतो नाश । त्यासीच म्हणती अविनाश । बहूचकीच्या लोकांस । काय म्हणावें ॥ १९ ॥ ईश्वरें नाना भेद केलें । भेदें सकळ सृष्टि चाले । आंधळे परीक्षावंत मिळाले । तेथें परीक्षा कैंची ॥ २० ॥ जेथें परीक्षेचा अभाव । तो टोणपा समुदाव । गुणाचि नाहीं गौरव । येईल कैंचें ॥ २१ ॥ खरें खोटें एकाचि झालें । तरी विवेकानें काय केलें । असार सांडून सार घेतलें । साधुजनीं ॥ २२ ॥ उत्तम वस्तूची परीक्षा । कैसी घडे नेतद्रक्षा । दीक्षाहीनापाशीं दीक्षा । येईल कैंची ॥ २३ ॥ आपलेने वोंगळपणें । दिशाकरूनें शौचें नेणे । वेद शास्त्रें पुराणें । त्यास काय करिती ॥ २४ ॥ आधीं राखावा आचार । मग पाहावा विचार । आचारविचारें पैलपार । पाविजेतो ॥ २५ ॥ जें नेमकासें न कळे । तें बाष्कळांस केवीं कळे । डोळस ठकती, आंधळे । कोण्या कामाचे ॥ २६ ॥ पापपुण्य स्वर्गनरक । अवघेंचि मानिलें एक । विवेक आणि अविवेक । काय मानावे ॥ २७ ॥ अमृत विष एक म्हणती । परी विष घेतां प्राण जाती । कुकर्में होते फजिती । सत्कर्में कीर्ति वाढे ॥ २८ ॥ इहलोक आणि परलोक । जेथें नाहीं साकल्य विवेक । तेथें अवघें निरर्थक । सकळ कांहीं ॥ २९ ॥ म्हणोनि सत्संगेंचि जावें । सत्शास्त्राचि श्रवण करावें । उत्तम गुणास अभ्यासावें । नाना प्रयत्नें ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सप्तदशदशके टोणपसिद्धनिरूपणं नाम दशमः समासः ॥ १० ॥

दशक अठरावा. (बहुजिनसी)

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ तुज नमूं गजवदना । तुझा महिमाहि कळेना । विद्याबुद्धि देशी जना । लहानथोरांसी ॥ १ ॥ तुज नमूं सरस्वती । चारी वांचांसी तुझेनि स्फूर्ति । तुझें निजस्वरूप जाणती । ऐसे थोडे ॥ २ ॥ धन्य धन्य चतुराननो । त्वां केली सृष्टिरचना । वेद शास्त्रें भेद नाना । प्रकट केले ॥ ३ ॥ धन्य विष्णु पालन करिसी । एकांशें सकळ जीवांसी । वाढविशी वर्तविशी । जाणजाणों ॥ ४ ॥ धन्य धन्य भोळा शंकर । जयाच्या देण्यास नाहीं पार । रामनाम निरंतर । जपत आहे ॥ ५ ॥ धन्य धन्य इंद्रदेव । सकळ देवांचाहि देव । इंद्रलोकींचें वैभव । काय म्हणोन सांगावें ॥ ६ ॥ धन्य धन्य यमधर्म । सकळ जाणती धर्माधर्म । प्राणिमात्राचें वर्म । ठायीं पाडिती ॥ ७ ॥ व्यंकटेशीं महिमा किती । भले उभ्या अन्न खाती । वडे घिरडीं स्वाद घेती । आंतलस आपालांचा ॥ ८ ॥ धन्य तूं वो बनशंकरी । उदंड शाकांचिया हारी । विवराविवरों भोजन करी । ऐसा कैंचा ॥ ९ ॥ धन्य भीमे गोलां गोलो । कोरेवड्यांच्या उदंड माळा । दहीं वडे खातां सकळां । समाधान होय ॥ १० ॥

---

१ भ्रमिष्ट. २ विचाराचा उपयोग काय केला. ३ कृपणाला, करंट्याला. ४ शौचास जाऊन. ५ शुद्धपणा, स्वच्छपणा. ६ नियमानें वागणारास. ७ अनियमितपणें वागणारास. ८ समग्र, पूर्ण. ९ गजानन. १० स्फुरण. ११ ब्रह्मदेवा. १२ पक्वान्न विशेष. १३ ओळी, पंक्ती. १४ भयंकर. १५ मारुते. १६ उडदाच्या अकरा अकरा वड्यांच्या.

धन्य तूं गा खंडेराया । भंडारें होय पिंवळी काया । कांदे भरीत रोडगे खायां । सिद्ध होती ॥ ११ ॥ धन्य तुळजाभवानी । भक्तांस प्रसन्न होते जनीं । गुणवैभवास गणी । ऐसा कैंचा ॥ १२ ॥ धन्य धन्य पांडुरंग । अखंड कथेचा होतो धिंग । तानमानें रागरंग । नाना प्रकारीं ॥ १३ ॥ धन्य तूं गा क्षेत्रपाळा । उदंड जना लाविला चाळा । भावें भक्ति करितां फळा । वेळ नाहीं ॥ १४ ॥ रामकृष्णादि अवतार । त्यांचा महिमा अपार । उपासनेस बहुत नर । तत्पर झाले ॥ १५ ॥ सकळ देवांचें मूळ । तो हा अंतरात्माचि केवळ । भूमंडळीं भोग सकळ । त्यासींच घडे ॥ १६ ॥ नाना देव होऊन बैसला । नाना शक्तिरूपें झाला । भोक्ता सकळ वैभवाला । तोचि एक ॥ १७ ॥ याचा पाहतां विचार । उदंड लांबला जोंजार । होती जाती देव नर । किती म्हणोनी ॥ १८ ॥ कीर्ति आणि अपकीर्ति । उदंड निंदा उदंड स्तुति । सर्वत्रांची भोगप्राप्ति । अंतरात्म्यासींच घडे ॥ १९ ॥ कोणे देहीं काय करितो । कोणे देहीं काय भोगितो । भोगी त्यागी वीतरागी तो । एकाचि आत्मा ॥ २० ॥ प्राणी अभिमानें भुलले । देहाकडे पाहत गेले । मुख्य अंतरात्म्यास चुकले । अंतरों असोनी ॥ २१ ॥ अरे या आत्म्याची चळवळ पाहे । ऐसा भूमंडळीं कोण आहे । अगाध पुण्यें अनुसंधानें राहे । कांहीं एक ॥ २२ ॥ त्या अनुसंधानासरिसें । जळोन जाइजे किल्बिषें[9] । अंतर्निष्ठ ज्ञानी असे । विवरोन पाहतां ॥ २३ ॥ अंतर्निष्ठ तितुके तरले । अंतभ्रष्ट तितुके बुडाले । बाह्यात्कारें भरंगळले । लोकाचारें ॥ २४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अष्टादशदशके बहुदेवस्थाननिरूपणं नाम प्रथमः समासः ॥ १ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ * नेणपणें झालें तें झालें । झालें तें होऊनि गेलें । जाणतेपणें वर्तलें । पाहिजे नेमस्त ॥ १ ॥ जाणत्याची संगति धरावी । जाणत्याची सेवा करावी । जाणत्याची सद्बुद्धि घ्यावी । हळुहळू ॥ २ ॥ जाणत्यासीं लिहों शिकावें जाणत्यापाशीं वाचों शिकावें । जाणत्यापाशीं पुसावें । सकळ कांहीं ॥ ३ ॥ जाणत्यास करावे उपकार । जाणत्यास झिजवावें शरीर । जाणत्याचा पाहावा विचार । कैसा आहे ॥ ४ ॥ जाणत्याचे संगतीनें भजावें । जाणत्याचे संगतीनें झिजावें । जाणत्याचे संगतीनें रिझावें । विवरविवरों ॥ ५ ॥ जाणत्यापाशीं गावें गाणें । जाणत्यापाशीं वाजवणें । नाना आलाप शिकणें । जाणत्यापाशीं ॥ ६ ॥ जाणत्याच्या कांसेस लागावें । जाणत्याचें औषध घ्यावें । जाणता सांगेल तें करावें । पथ्य आधीं ॥ ७ ॥ जाणत्यापाशीं परीक्षा शिकणें । जाणत्यापाशीं तालिम करणें । जाणत्यापाशीं पोहणें अभ्यासावें ॥ ८ ॥ जाणता बोलेल तैसें बोलावें । जाणता सांगेल तैसें चालावें । जाणत्याचें ध्यान ध्यावें । नाना प्रकारीं ॥ ९ ॥ जाणत्याच्या कथा शिकाव्या । जाणत्याच्या युक्ति समजाव्या । जाणत्याच्या गोष्टी विवराव्या । सकळ कांहीं ॥ १० ॥ जाण-

---

१ हळदीनें. २ शरीर. ३ मोजील. ४ गर्जना, कल्लोळ. ५ क्षेत्राचें रक्षण करणारा देव ६ नाद, छंद. ७ खटपट. ८ ताठ्यानें. ९ संबंध. १० पापानें. ११ भुलून गेले. * अज्ञानानें.

त्याचे पेंच जाणावे। जाणत्याचे पीळ उकलावे। जाणता राखेल तैसे राखावे। लोक राजी ॥ ११ ॥ जाणत्याचे जाणावे प्रसंग। जाणत्याचे घ्यावे रंग । जाणत्याचे स्फूर्तीचे तरंग । अभ्यासावे ॥ १२ ॥ जाणत्याचा साक्षेप घ्यावा ॥ जाणत्याचा तर्क जाणावा। जाणत्याचा उल्लेख समजावा। न बोलतांची ॥ १३ ॥ जाणत्याचें धूर्तपण । जाणत्याचें राजकारण। जाणत्याचें निरूपण। ऐकत जावें ॥ १४ ॥ जाणत्याचीं कवित्वें शिकावीं । गद्यपद्यें वोळखावीं। माधुर्यवचनें समजावीं। अंतर्यामीं ॥ १५ ॥ जाणत्याचे पाहावे प्रबंध । जाणत्याचे वचनभेद। जाणत्याचे नाना संवाद। बरे शोधावे ॥ १६ ॥ जाणत्याची तीक्ष्णता । जाणत्याची सहिष्णुता। जाणत्याची उदारता। समजोन घ्यावी ॥ १७ ॥ जाणत्याची नाना कल्पना । जाणत्याची दीर्घसूचना। जाणत्याची विवंचना। समजोन घ्यावी ॥१८॥ जाणत्याचा काळ सार्थक। जाणत्याचा अध्यात्मविवेक। जाणत्याचे गुण अनेक। अवघेच घ्यावे ॥१९॥ जाणत्याचा भक्तिमार्ग। जाणत्याचा वैराग्ययोग। जाणत्याचा अवघा प्रसंग । समजोन घ्यावा ॥२०॥ जाणत्याचें पाहावें ज्ञान। जाणत्याचें शिकावें ध्यान। जाणत्याचें सूक्ष्म चिन्ह । समजोन घ्यावें ॥२१॥ जाणत्याचें अलिप्तपण। जाणत्याचें विदेहलक्षण। जाणत्याचें ब्रह्मविवरण । समजोन घ्यावें ॥ २२ ॥ जाणता एक अंतरात्मा। त्याचा काय सांगावा महिमा । विद्याकळा गुणसीमा। कोणें करावी ॥ २३ ॥ परमेश्वराचे गुणानुवाद । अखंड करावा संवाद । तेणेंकरितां आनंद । उदंड होतो ॥ २४ ॥ परमेश्वरें निर्मिलें तें । अखंड दृष्टीस पडतें । विवराविवरीं समजावें तें । विवेकी जनीं ॥ २५ ॥ जितुकें कांहीं निर्माण झालें । तितुकें जगदीश्वरें निर्मिलें । निर्माण वेगळें केलें । पाहिजे आधा ॥ २६ ॥ तो निर्माण करितो जना । परी पाहों जातां दिसेना। विवेकबळें अनुमाना । आणीत जावें ॥ २७ ॥ त्याचें अखंड लागतां ध्यान । कृपाळूपणें देतो दर्शन । सर्वकाळ संभाषण । तदंशोंचि करावें ॥ २८ ॥ ध्यान धरीना तो अभक्त। ध्यान धरील तो भक्त । संसारापासून मुक्त । भक्तांस करी ॥ २९ ॥ उपासनेचे शेवटीं। देवां भक्तां अखंड भेटी । अनुभवी जाणेल गोष्टी । प्रत्ययाची ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अष्टादशदशके सर्वज्ञसंगनिरूपणं नाम द्वितीयः समासः ॥ २ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ दुर्लभ शरीरीं दुर्लभ आयुष्य । याचा करूं नये नाश । दास म्हणे सावकाश । विशेष पाहावा ॥ १ ॥ न पाहतां उत्तम विवेक । अवघा होतो अविवेक । अविवेकें प्राणी रंकें-। ऐसा दिसे ॥ २ ॥ हें आपलें आपण केलें । आळसें उदास नागविलें । वाईट संगतीनें बुडविलें देखत देखतां ॥ ३ ॥ मूर्खपणाचा अभ्यास झाला । बाष्कळपणें घातला घाला । कोंम चांडाळ उठिला । तरुणपणीं ॥ ४ ॥ मूर्ख आळसी आणि तरुणा । सर्वाविषयीं दैन्यवाणा । कांहीं मिळेना कोणा । काय म्हणावें ॥ ५ ॥ जें जें पाहिजे तें तें नाहीं।

---

१ लहरी. २ उद्योग. ३ अभिप्राय. ४ हृदयांत ५ सोशिकपणा. ६ दूरदृष्टि. ७ तत्त्वज्ञानसंबंधीं विचार. ८ देहाभिमानरहितपणाची खूण. ९ वेगळेपणा. १० त्याच्याच-अंशानें-संबंधानें. ११ भिकारी. १२ मदन. १३ कोणाशीं पटत नाहीं.

अन्न वस्त्र तेंहि नाहीं । उत्तम गुण कांहींच नाहीं । अंतर्यामीं ॥ ६ ॥ बोलतां येईना बैसतां येईना । प्रसंग कांहींच कळेना । शरीर मन हें वळेना । अभ्यासाकडे ॥ ७ ॥ लिहिणें नाहीं वाचणें नाहीं । पुसणें नाहीं सांगणें नाहीं । नेमस्तपणाचा अभ्यास नाहीं । बाष्कळपणें ॥ ८ ॥ आपणास कांहींच येईना । आणि शिकविलेंहि मानेना । आपण वेडा, आणि सज्जना । बोल ठेवी ॥ ९ ॥ अंतरीं एक बाहेरी एक । ऐसा जयाचा दंडैक । परलोकाचें सार्थैक । कैसें घडे ॥ १० ॥ आपला संसार नासला । मनामध्यें पस्तावला । तरी मग अभ्यास केला । पाहिजे विवेकाचा ॥ ११ ॥ एकाग्र करूनियां मन । बळेंच धरावें साधन । यत्नीं आळसाचें दर्शन । होऊंच नये ॥ १२ ॥ अवगुण अवघें सांडावे । उत्तम गुण अभ्यासावे । प्रबंध पाठ करीत जावे । जाड अर्थ ॥ १३ ॥ पदप्रबंध श्लोकप्रबंध । नाना * धाटी मुद्रा छंद । प्रसंगज्ञानोंचि आनंद । होत आहे ॥ १४ ॥ कोणें प्रसंगीं काय म्हणावें । ऐसें समजोन जाणावें । उगेंच वाउगें शिणावें । कासयासी ॥१५॥ दुसऱ्याचें अंतर जाणावें । आदर देखोन म्हणावें । जें आठवेल तें गावें । हें मूर्खपण॥ १६॥ ज्याची जैशी उपासना । तेंचि गावें चुकावेना । रागज्ञान तालज्ञाना । अभ्यासावें ॥ १७ ॥ साहित्य संगीत प्रसंग मानें । करावीं कथेचीं घैमशाने । अर्थांतर श्रवण मननें । काढीत जावें ॥१८॥ पाठ उदंडचि असावें । सर्वकाळ उजळीत जावें । सांगीतले गोष्टीचें असावें । स्मरण अंतरीं ॥१९॥ अखंड एकांत सेवावा । ग्रंथमात्र धांडोळावा । प्रचीत येईल तो ध्यावा । अर्थ मनीं ॥२०॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अष्टादशदशके निःस्पृहनिरूपणं नाम तृतीयः समासः

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ देहाकरितां गणेशपूजन । देहाकरितां शारदावंदन । देहाकरितां गुरु सज्जन । संत श्रोते ॥ १ ॥ देहाकरितां कवित्वें चालती । देहाकरितां अध्ययनें करिती । देहाकरितां अभ्यासिती । नाना विद्या ॥ २ ॥ देहाकरितां ग्रंथलेखन । नाना लिपीं वोळखण । नाना पदार्थ शोधन । देहाकरितां ॥ ३ ॥ देहाकरितां महाज्ञानी । सिद्ध साधु ऋषि मुनी । देहाकरितां तीर्थाटणी । फिरती प्राणी ॥ ४ ॥ देहाकरितां श्रवण घडे । देहाकरितां मननीं पवाडे । देहाकरितां देहीं आतुडे । मुख्य परमात्मा ॥ ५ ॥ देहाकरितां कर्ममार्ग । देहाकरितां उपासनामार्ग । देहाकरितां ज्ञानमार्ग । भूमंडळीं ॥ ६ ॥ योगी वीतरागी तापसी । देहाकरितां नाना सायासी । देहाकरितां आत्मयासी । प्रकटणें घडे ॥ ७ ॥ इहलोक आणि परलोक । देहाकरितां सकळ सार्थक । देहाविण निरर्थक । सकळ कांहीं ॥ ८ ॥ पुरश्चरणें अनुष्ठानें । गोरांजनें धूम्रपानें । शीतोष्ण पंचाग्निसाधनें । देहाकरितां ॥ ९ ॥ देहाकरितां पुण्यशीळ । देहाकरितां पापी

---

१ नियम, रीत. २ साफल्य. * प्रकार. ३ श्रमावें. ४ लयलूट, चंगळ. ५ उजळणी करीत, आवर्तन करीत. ६ अनुभव. ७ सरस्वतीनमन. ८ पवित्र स्थळांच्या यात्रा करण्याकरितां. ९ शिरतो. १० प्राप्त होतो. ११ वैराग्यशील. १२ मंत्रप्राप्त्यर्थ मंत्रशास्त्रांत सांगितलेल्या जपाचें अनुष्ठान. १३ स्त्रियांचें अथवा पुरुषांचें ईश्वर प्राप्त्यर्थ अग्नींत जाळून घेणें. १४ तपश्चर्येसाठी अग्नीवर उलटें टांगून घेऊन धूम्र भक्षण करणें. १५ चारी बाजूंना चार अग्नि व वर सूर्य अशा स्थितींत तप करणें.

केवळ । देहाकरितां अनर्गळे । शुचिष्मंत ॥ १० ॥ देहाकरितां अवतारी । देहाकरितां वेषधारी । नाना बंडें पाषांडें करी । देहाकरितां ॥ ११ ॥ देहाकरितां विषयभोग । देहाकरितां सकळ त्याग । होती जाती नाना योग । देहाकरितां ॥ १२ ॥ देहाकरितां नवविधा भक्ति । देहाकरितां चतुर्विधा मुक्ति । देहाकरितां नाना युक्ति । नाना मतें ॥१३॥ देहाकरितां दान धर्म । देहाकरितां नाना वर्म । देहाकरितां पूर्वकर्म । म्हणती जनीं ॥ १४ ॥ देहाकरितां नाना स्वार्थ । देहाकरितां नाना अर्थ । देहाकरितां होइजे व्यर्थ । आणि धन्य ॥ १५ ॥ देहाकरितां नाना कळा । देहाकरितां उणा आगळा । देहाकरितां जिव्हाळा । भक्तिमार्गाचा ॥ १६ ॥ नाना सन्मार्गसाधनें । देहाकरितां तुटती बंधनें । देहाकरितां निवेदनें । मोक्ष लाभे ॥ १७ ॥ देह सकळांमध्यें उत्तम । देहीं राहिला आत्माराम । सकळां घटीं पुरुषोत्तम । विवेकी जाणती ॥ १८ ॥ देहाकरितां नाना कीर्ति । अथवा नाना अपकीर्ति । देहाकरितां होती जाती । अवतारमालिका ॥ १९ ॥ देहाकरितां नाना भ्रम । देहाकरितां नाना संभ्रम । देहाचेनि उत्तमोत्तम । भोगिती पदें ॥ २० ॥ देहाकरितां सकळ कांहीं । देहाविण कांहीं नाहीं । आत्मा विरे ठायींचा ठायीं । नव्हता जैसा ॥ २१ ॥ देह परलोकींचें तारूं । नाना गुणांचा गुणागरू । नाना रत्नांचा विचारू । देहाचेनि ॥ २२ ॥ देहाचेनि गायनकळा । देहाचेनि संतकळा । देहाचेनि अंतर्कळा । ठायीं पडे ॥ २३ ॥ देह ब्रह्मांडाचें फळ । देह दुर्लभचि केवळ । परि या देहास निवळ । उमजवावें ॥ २४ ॥ देहाकरितां लहान थोर । करिती आपुलाले व्यापार । त्यांहींमध्यें लहान थोर । कितीएक ॥ २५ ॥ जे जे देह धरोन आले । ते ते कांहीं करून गेले । हरिभजनें पावन झाले । कितीएक ॥ २६ ॥ अष्टधा प्रकृतीचें मूळ । संकल्परूपाचि केवळ । नाना संकल्पें देहफळ । घेऊनि आले ॥ २७ ॥ हरिसंकल्प मुळीं होता । तोचि फळी पाहावा आतां । नाना देहांतरीं तत्त्वतां । शोधितां कळे ॥ २८ ॥ वेलाचे मुळीं बीज । उदकरूप वेली समज । पुढें फळामध्यें बीज । मुळींच्या अंशें ॥ २९ ॥ मुळाकरितां फळ येतें । फळाकरितां मूळ होतें । येणें रीतीं होत जातें । भूमंडळ ॥ ३० ॥ असो कांहींएक करणें । कैसें घडे देहाविणें । देह सार्थकीं लावणें । म्हणिजे बरें ॥ ३१ ॥ आत्म्याकरितां देह झाला । देहाकरितां आत्मा तगला । उभययोगें उदंड चालिला । कार्यभाग ॥ ३२ ॥ चोरून गुप्तरूपें करावें । तें आत्मयास पाडे ठावें । कर्तृत्व याचेनि स्वभावें । सकळ कांहीं ॥ ३३ ॥ देहामध्यें आत्मा असतो । देह पूजितां आत्मा तोषतो । देह पीडितां आत्मा शोभतो । प्रत्यक्ष आतां ॥ ३४ ॥ देहावेगळी पूजा पावेना । देहाविण पूजा फावेना । जनीं जनार्दन

---

१ आडकाठीवांचून राहणारे, स्वच्छंदी. २ पवित्र, शुद्ध. ३ श्रवण कीर्तन इत्यादि नऊ प्रकारची भक्ति. ४ सलोकता, समीपता, सरूपता आणि सायुज्यता. ५ कमी अधिक. ६ देहामध्यें ७ उद्योग. ८ जागा, स्वर्गादि लोक. ९ गुणांची खाण. १० परिणाम. ११ वासनात्मक. १२ 'मी एक आहे तो अनेक व्हावा' असा मूळचा देवाचा संकल्प. १३ वेगवेगळ्या देहामध्यें. १४ टिकला. १५ कळतें.

म्हणोनि जना । संतुष्ट करावें ॥ ३५ ॥ उदंड प्रकटला विचार । धर्मस्थापना तदनंतर । तेथेंचि पूजेसि अधिकार । पुण्यशरीरीं ॥ ३६ ॥ सेगट भजन करूं येतें । तरी मूर्खपण अंगीं लागतें । गाढवास पूजितां कळतें । काय त्याला ॥ ३७ ॥ पूज्य पूजेसि अधिकार । उगेचि तोषवावे इतर । दुखवूं नये कोणाचें अंतर । म्हणिजे बरें ॥ ३८ ॥ सकळ जगदंतरींचा देव । क्षोभतां रहावया कैंचा ठाव । जनावेगळा जनांस उपाव । आणिक नाहीं ॥ ३९ ॥ परमेश्वराचे अनंत गुण । मनुष्यें काय सांगावी खूण । परंतु अध्यात्मग्रंथश्रवण । होतां उमजे ॥ ४० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्य-संवादे अष्टादशदशके देहदुर्लभनिरूपणं नाम चतुर्थः समासः ॥ ४ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ धान्य उदंड मोजिलें । परी त्या मापें नाहीं भक्षिलें । * विवरल्याविण तैसें झालें । प्राणियासी ॥ १ ॥ पाठ म्हणतां आवरेना । पुसतां कांहींच कळेना । अनुभव पाहतां अनुमानेना–। मध्यें पडे ॥ २ ॥ शब्दरत्नें परीक्षावीं । प्रत्ययाचीं पाहोन घ्यावीं । येर तीं अवघीं सांडावीं । ऐलीकडे ॥ ३ ॥ नांवरूप अवघें सांडावें । मग अनुभवास मांडीवें । सार असार एकाचि करावें । हें मूर्खपण ॥ ४ ॥ लेखकें कुळ समजवावें । किंवा उगेंचि वाचावें । येणें दृष्टांतें समजावें । कोणी तरी ॥ ५ ॥ जेथें नांहीं समजावीसें । तेथें अवघी कुसमुस । पुसों जातां वेसवस । वक्ता करी ॥ ६ ॥ नाना शब्द एकवटिले । प्रचीतीविण उपाव केले । परी तें अवघें व्यर्थ गेलें । फेडेप्रसंगीं ॥ ७ ॥ पसेवरी वैरणें घातलें । तांतडीनें जांतें वोढिलें । तेणें पीठ बारीक आलें । हें तों घडेना ॥ ८ ॥ घांसामागें घांस घेतला । अवकाश नाहीं चावायाला । अवघा बोकेणो भरिला । पुढें कैसें ॥ ९ ॥ ऐका फेडेणिशीचें लक्षण । विरंगे जाऊं नेदीं क्षण । समस्तांचें अंतःकरण । सांभाळीत जावें ॥ १० ॥ सूक्ष्मनामें सुखें घ्यावीं । तितुकीं रूपें वोळखावीं । वोळखोन समजवावीं । श्रोतयासी ॥ ११ ॥ समस्या पुरतां सुखी होती । श्रोते अवघे आनंदती । अवघे क्षणक्षणां वंदिती । गोसावियांसी ॥ १२ ॥ समस्या पुरतां वंदिती । समस्या न पुरतां निंदिती । गोसावी + चिणचिण करिती । कोण्या हिशेबें ॥ १३ ॥ शुद्ध सोनें पाहून घ्यावें । कसीं लावूनि तावावें । श्रवणमननें जाणावें । प्रत्ययासी ॥ १४ ॥ वैद्याची प्रचीत येईना । व्यथा परती होईना । आणि ❀ रोगेंजावें जना । कोण्या हिशेबें ॥ १५ ॥ खोटें कोठेंचि चालेना । खोटें कोणास मानेना । याकारणें अनुमाना । खरें आणावें ॥ १६ ॥ लिहिणें न येतां व्यापार केला ।

---

१ सरसकट. २ पूजन करण्यास योग्य, असा साधु. ३ आत्मज्ञानविषयक ग्रंथाचें श्रवण. * मनन केल्याशिवाय. ४ ज्या मापानें धान्य मोजलें तें माप कांहीं धान्य खात नाहीं. ५ संशय ६ अनुभव घेण्यास लागावें. ७ लेखकानें. ८ सर्व. ९ समजूत, समज. १० पंचाईत, टाळाटाळी. ११ रागावून ओरडणें. १२ सभेमध्यें बोलावयाचे वेळीं, मंडळी जमली आहे अशा वेळीं. १३ दळण्याकरितां जात्याचे पाळींत एकेक वेळ घालतात तें. १४ जलदीनें. १५ मोठा ग्रास. १६ श्रेष्ठपणाचें. १७ रिकामा, करमणुकीविरहित. १८ चौथा चरण दिला असतां बाकीचे तीन चरण घालून श्लोक पुरा करणें, श्लोकपूर्ति. १९ हरिदासांला. + कुरकुर. ❀ लोकावर रागावणें.

कांहींएक दिवस चालिला । पुसतां सुरनिसें भेटला । तेव्हां खोटें ॥ १७ ॥ सर्व अवघें हिशेबी ठावें । प्रत्ययसाक्षीनें बोलावें । मग सुरनिसें काय करावें । सांगाना कां ॥ १८ ॥ स्वयें आपणचि गुंते । समजावीसें कैसी होते । नेणता कोणीएक ते । आपदां लागती ॥ १९ ॥ बळेविण युद्धास गेला । तो सर्वस्वें नागवला । शब्द ठेवावा कोणाला । कोण कैसा ॥ २० ॥ जें प्रचीतीस आलें खरें । तेंचि घ्यावें अत्यादरें । अनुभवाविण जों उत्तरें । तीं फलकटें जाणावीं ॥ २१ ॥ शिकवूं जातां राग चढे । परंतु पुढें आदळे घडे । खोटा निश्चय तात्काळ उडे । लोकांमध्यें ॥ २२ ॥ खरें सांडून खोटें घेणें । भिकाधेस काय उणें । त्रिभुवनीं नारायणें । न्याय केला ॥ २३ ॥ तो न्याय सोडितां शेवटीं । अवघें जगाचि लागे पाठीं । जनीं भांडभांडोनि हिंपुटी । किती व्हावें ॥ २४ ॥ अन्यायें बहुतांस पुरवले । हें देखिलें ना ऐकिलें । वेडे उगेच भरीं भरले । असत्याचे ॥ २५ ॥ असत्य म्हणिजे तेंचि पाप । सत्य म्हणिजे स्वरूप । दोहींमध्यें संक्षेप । कोणाचा करावा ॥ २६ ॥ मायेमध्यें बोलणें चालणें साचे । माया नसतां बोलणें कैंचें । याकारणें निःशब्दाचें । मूळ शोधावें ॥ २७ ॥ वाच्यांश जाणोन सांडावा । लक्ष्यांश विवरोनें घ्यावा । याकारणें निःशब्द मुळाचा गोवा । आढळेना ॥ २८ ॥ अष्टधाप्रकृति पूर्वपक्ष । सांडून अलक्षीं लावावें लक्ष । मननशीळ परम दक्ष । तोचि जाणे ॥ २९ ॥ नाना भूस आणि कण । एकचि म्हणणें अप्रमाण । रस सांडून चोइटियें कोण । शाहणा सेवी ॥ ३० ॥ पिंडीं नित्यानित्यविवेक । ब्रह्मांडीं सारासार अनेक । सकळ शोधूनियां एक । सार घ्यावें ॥ ३१ ॥ मायेकरितां कोणी एक । अन्वय आणि व्यतिरेक । ते माया नसतां विवेक । कैसा करावा ॥ ३२ ॥ तत्त्वें तत्त्व सर्व शोधावें । महावाक्यीं प्रवेशावें आत्मनिवेदनें पावावें । समाधान ॥ ३३ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अष्टादशदशके करंटपरीक्षानिरूपणं नाम पंचमः समासः ॥ ५ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ नाना वस्त्रें नाना भूषणें । येणें शरीर शृंगारणें । विवेकें विचारें राजकारणें । अंतर शृंगारिजे ॥ १ ॥ शरीर सुंदर सतेज । वस्त्रें भूषणें केलें सज्ज । अंतरीं नसतां चातुर्यबीज । कदापि शोभा न पाविजे ॥ २ ॥ तुंदे हेकेंडे कठोरवचनीं । अखंड तोले साभिमानीं । न्याय नीति अंतःकरणीं । घेणार नाहीं ॥ ३ ॥ तरी शीघ्रकोपी सदा । कदापि न धरी मर्यादा । राजकारणें संवादा । मिळोंच नेणें ॥ ४ ॥

---

१ हिशेब तपासणारा, २ मुख्य कामगारानें. ३ समजूत ४ दुःखांत पडतात. ५ शक्तीशिवाय, सैन्याशिवाय. ६ व्यर्थ, निरर्थक . ७ अद्दल, दुःखकारक अनुभव, ठेंच. ८ कुचेष्टेला, खोटचा डोलाला. ९ कष्टी. १० अन्यायानें पुष्कळांची भरभराट. ११ नादी लागले. १२ अभ्यास, उद्योग. १३ बोलण्याचा भाग. १४ लक्षांत घेण्याचा भाग. १५ शोधून. १६ शब्दापलीकडील परब्रह्माचा. १७ शंका. १८ उंसाचीं चिपाडें. १९ एकाच्या अस्तित्वावर दुसऱ्याचें अस्तित्व असणें हा अन्वय, व एकाच्या नास्तित्वावर दुसऱ्याचें नास्तित्व असणें हा व्यतिरेक उ०=दोरीवर सर्पाचा भास अन्वयव्यतिरेक सिद्ध आहे. २० तत्त्वमसि इत्यादि वेदांतवाक्यामध्यें. २१ आत्म्याचें समर्पण करून. २२ मस्त. २३ हेकेखोर. २४ अभिमानामध्यें.

ऐसे लौंदे बेइमानी । कदापि सत्य नाहीं वचनीं । पापी अपस्मारे जनीं । राक्षस जाणावें ॥ ५ ॥ समयासारिखा समय येईना । नेम सहसा चालेना । नेम धरितां राजकारणा । अंतर पडे ॥ ६ ॥ अति सर्वत्र वर्जावें । प्रसंग पाहोन चालावें । हटनिग्रहीं न पडावें । विवेकी पुरुषें ॥ ७ ॥ बहुतांचि करितां हट । तेथें येऊन पडले * तट । कोणी एकाचा शेवट । झाला पाहिजे ॥ ८ ॥ बरें ईश्वर आहे साभिमानी । विशेष तुळजा भवानी । परंतु विचार पाहोनी । कार्य करणें ॥९॥ अखंडचि सावधाना । बहुत काय करावी सूचना । परंतु कांहींएक अनुमाना । आणिलें पाहिजे ॥ १० ॥ समर्थांपाशीं बहुत जन । राहिला पाहिजे साभिमान । निश्चळ करूनियां मन । लोक असती ॥ ११ ॥ म्लेंच्छ दुर्जन उदंड । बहुतां दिवसांचें माजलें बंड । याकारणें अखंड । सावधान असावें ॥ १२ ॥ सकळकर्ता तो ईश्वर । तेणें केला आंगिकार । तया पुरुषाचा विचार । विरळा जाणे ॥ १३ ॥ न्याय नीति विवेक विचार । नाना प्रसंग प्रकार । परीक्षणें परांतर । देणें ईश्वराचें ॥ १४ ॥ महायत्न सावधपणें । समयीं धारिष्ट धरणें । अद्भुतचि कार्य करणें । देणें ईश्वराचें ॥ १५ ॥ यश कीर्ति प्रताप महिमा । उत्तम गुणांसि नाहीं सीमा । नाहीं दुसरी उपमा । देणें ईश्वराचें ॥ १६ ॥ देव ब्राह्मण आचार विचार । कितीक जनास आधार । सदा घडे परोपकार । देणें ईश्वराचें ॥ १७ ॥ इहलोक परलोक पाहणें । अखंड सावधपणें राहणें । बहुत जनांचें साहणें । देणें ईश्वराचें ॥ १८ ॥ देवाचा कैंपक्ष घेणें । ब्राह्मणाची चिंता वाहणें । बहुत जनांस पाळणें । देणें ईश्वराचें ॥ १९ ॥ धर्मस्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार । झाले आहेत पुढें होणार । देणें ईश्वराचें ॥ २० ॥ उत्तम गुणांचा ग्राहक । तर्क तीक्ष्ण विवेक । धर्मस्थापना पुण्यश्लोक । देणें ईश्वराचें ॥ २१ ॥ सकळ गुणांमध्यें सार । तजविजा विवेक विचार । जेणें पाविजे पैलपार । अंतरपरत्रींचा ॥ २२ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अष्टादशदशके उत्तमपुरुषनिरूपणं नाम षष्ठः समासः ॥ ६ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ जनाचा लालुची स्वभाव । आरंभीच म्हणती देव । म्हणजे मजला कांहीं देव । ऐसी वासना ॥ १ ॥ कांहींच भक्ति केली नसतां । आणि इच्छिती प्रसन्नता । जैसें कांहींच सेवा न करितां । स्वामीस मागती ॥ २ ॥ कष्टेविण फळ नाहीं । कष्टाविण राज्य नाहीं । केल्याविण होत नाहीं । साध्य जनीं ॥ ३ ॥ आळसें काम नासतें । हें तों प्रत्ययास येतें । + कष्टाकडे चुकावितें । हीन जन ॥ ४ ॥ आधीं कष्टाचें दुःख सोसिती । ते पुढें सुखाचें फळ भोगिती । आधीं आळसें सुखावती । त्यांसि पुढें दुःख ॥ ५ ॥ इहलोक अथवा परलोक । दोहींकडे सारखाच विवेक । दीर्घसूचनेचें कौतुक । कळलें पाहिजे ॥ ६ ॥ मेळविती तितुकें भक्षिती । ते कठिणकाळीं मरोन जाती । दीर्घसूचनेनें वर्तती । तेचि भले ॥ ७ ॥ इहलोकींचा संचितार्थ । परलोकींचा परमार्थ । संचितेविण व्यर्थ । जितेचि मेले ॥ ८ ॥ एकदां मेल्यानें सुटेना । पुनः जन्मो-

---

१ गलेलठ्ठ, दांडगे. २ दुःख देणारे, दुष्ट. ३ हेका-आग्रहामध्यें. * दुफळी, फाटाफूट. ४ यवन वगैरे. ५ बाजू. ६ पवित्रकीर्तिवान्. ७ इहपरलोकींचा. ८ देवो. + कष्ट करण्यास टाळाटाळ करितात. ९ दूरदृष्टीचें. १० साठविलेलें • पुण्य. ११ जिवंत असूनहि.

जन्मीं यातना । आपणास मारी वांचवीना । तो आत्महत्यारा ॥ ९ ॥ प्रतिजन्मीं आत्मघात । कोणी करावें गणित । याकारणें जन्ममृत्य । केवीं चुके ॥ १० ॥ देव सकळ कांहीं करितो । ऐसें प्राणिमात्र बोलतो । त्याचे भेटीचा लाभ तो । अकस्मात झाला ॥ ११ ॥ विवेकाचा लाभ घडे । जेणें परमात्मा ठायीं पडे । विवेक पाहतां सांपडे । विवेकी जनीं ॥ १२ ॥ देव पाहतां आहे एक । परंतु करितो अनेक । त्या अनेकांस एक । म्हणों नये कीं ॥ १३ ॥ देवाचें कर्तृत्व आणि देव । कळला पाहिजे अभिप्राव । कळल्याविण कित्येक जीव । उगेच बोलती ॥ १४ ॥ उगेच बोलती मूर्खपणें । शाहाणपण वाढवायाकारणें । तृप्तीलागीं उपाव करणें : ऐसें झालें ॥ १५ ॥ जिहीं उदंड कष्ट केले । ते भाग्य भोगून ठेले । बेर ते बोलतचि राहिले । करंटे जन ॥१६॥ करंट्याचें करंटलक्षण । समजोन जाती विचक्षण । भल्याचें उत्तम लक्षण । करंट्यास कळेना ॥ १७ ॥ त्याची पैसावली कुबुद्धि । तेथें कैंची असेल शुद्धि । कुबुद्धि तोचि सुबुद्धि । ऐशी वाटे ॥ १८ ॥ मनुष्यें शुद्धीस सांडावें । त्याचें काय खरें मानावें । जेथें विचाराच्या नांवें । शून्याकार ॥ १९ ॥ विचारें इहलोक परलोक । विचारें होतसे सार्थक । विचारें नित्यानित्यविवेक । पाहिला पाहिजे ॥ २० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अष्टादशदशके जनस्वभावनिरूपणं नाम सप्तमः समासः ॥ ७ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ब्रह्म निराकार निश्चळ । आत्मा सविकार चंचळ । तयास म्हणती सकळ । देव ऐसें ॥ १ ॥ देवाचा ठावचि लागेना । एक देव नेमस्त कळेना । बहुत देव अनुमानेना । एक देव ॥ २ ॥ म्हणोनि विचार असावा । विचारें देव शोधावा । बहुत देवांचा गोवा । घडोंच नये ॥ ३ ॥ देव क्षेत्रीं पाहिला । त्यासारिखा धातूचा केला । पृथ्वीमध्यें दंडक चालिला । येणें रीतीं ॥ ४ ॥ नाना प्रतिमा देवांचें मूळ । तो हा क्षेत्रदेवचि केवळ । नाना क्षेत्रें भूमंडळ । शोधून पाहावें ॥ ५ ॥ क्षेत्रदेव पाषाणाचा । विचार पाहतां तयाचा । तंतु लागला मुळाचा । अवतारांकडे ॥ ६ ॥ अवतारी देव संपले । देह धरून वर्तोनि गेले । त्याहून थोर अनुमानले । ब्रह्मा विष्णु महेश ॥ ७ ॥ त्या तिन्ही देवांस ज्याची सत्ता । तो अंतरात्माचि पाहतां । कर्ता भोक्ता तत्त्वतां । प्रत्यक्ष आहे ॥ ८ ॥ युगायुगें तिन्ही लोक । एकला चालवी अनेक । हा निश्चयाचा विवेक । वेदशास्त्रीं पाहावा ॥ ९ ॥ आत्मा वर्तावितो शरीर । तोचि देव उत्तरोत्तर । जाणीवरूपें कलेवर । विवेकें वर्तवी ॥ १० ॥ तो अंतर्देव चुकती । धांवा घेऊन तीर्थां जाती । प्राणी बापुडे कष्टती । देवास नेणतां ॥ ११ ॥ मग विचारिती अंतःकरणीं । जेथें तेथें धोंडा पाणी । उगेंच वणवण हिंडोनी । काय होतें ॥ १२ ॥ ऐसा ज्यासि विचार कळला । तेणें सत्संग धरिला । सत्संगें देव सांपडला । बहुत जनांसी ॥ १३ ॥ ऐशीं हीं विवेकाचीं कामें । विवेकी जाणतील नेमें । अविवेकी भुलले

---

१ आत्मघातकी. २ भिकारी. ३ चतुर. ४ पसरली. ५ पूज्य. ६ गुंतागुंत. ७ पवित्र स्थळीं. ८ रीत, संप्रदाय. ९ मूर्ति. १० संबंध. ११ वाटले; कल्पना केली. १२ शरीर. १३ हृदयस्थ.

भ्रमें । त्यांस हें कळेना ॥ १४ ॥ अंतरवेधी अंतर जाणे । बाहेरमुद्रा कांहींच नेणे । म्हणोनी विवेकी शाहणे । अंतर शोधिती ॥ १५ ॥ विवेकाविणें जो भाव । तो भावचि अभाव । * मूर्खस्य प्रतिमा देव । ऐसें वचन ॥ १६ ॥ पाहत समजत शेवटास गेला । तोचि विवेकी म्हणावा भला । तत्त्वें सांडूनि पावला । निरंजनीं ॥ १७ ॥ अरे, जें आकारासि येते । तें अवघें नासोन जातें । मग गलबल्यावेगळें तें । परब्रह्म जाणावें ॥ १८ ॥ चंचळ देव निश्चळ ब्रह्म । परब्रह्मीं नाहीं भ्रम । प्रत्ययज्ञानें निर्भ्रम । होइजेतें ॥ १९ ॥ प्रचीतीविण जें केलें । तें अवघें व्यर्थ गेलें । प्राणी कष्टकष्टोंचि मेले । कर्मकचाटें ॥ २० ॥ कर्मावेगळें न व्हावें । तरी देवास कासया भजावें । विवेकी जाणती स्वभावें । मूर्ख नेणे ॥ २१ ॥ कांहीं अनुमानलें विचारें । देव आहे जगदंतरें । सगुणाकरितां निर्धारें । निर्गुण पाविजे ॥ २२ ॥ सगुण पाहतां मुळास गेला । सहजचि निर्गुण पावला । संगत्यागें मोकळा झाला । वस्तुरूप ॥ २३ ॥ परमेश्वरीं अनुसंधानें । लाविता होइजे पावन । मुख्य ज्ञानेंचि विज्ञान । पाविजेतें ॥ २४ ॥ ऐशीं हीं विवेकाचीं विवरणें । पाहावीं सुचित अंतःकरणें । नित्यानित्यविवेकश्रवणें । जगदुद्धार ॥ २५ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अष्टादशदशके अंतर्देवनिरूपणं नाम अष्टमः समास ॥ ८ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ वंदूनिया आदिपुरुष । बोलों निद्रेचा विलास । निद्रा आलिया सावकाश । जाणार नाहीं ॥ १ ॥ निद्रेनें व्यापिली काया । आळस अंगमोडे जांभया । तेणेंकरितां बैसावया । धीर नाहीं ॥ २ ॥ कडकडां जांभया येती । चटचटां चुटक्या वाजती । कडकडां डुलक्या येती । सावकाश ॥ ३ ॥ एकाचे डोळे झांकती । एकाचे डोळे लागती । एक ते वेंचकोन पाहती । चहूंकडे ॥ ४ ॥ एक उलथोन पडिले । तिहीं ब्रह्मविणे फोडिले । हुडुंकाचे तुकडे झाले । शुद्ध नाहीं ॥ ५ ॥ एक टेंकोन बैसले । तेथेंचि घोरों लागले । एक उताणे पसरले । सावकाश ॥ ६ ॥ कोणी मुरकुंडी घालिती । कोणी कोनेवडे निजती । कोणी चक्रों फिरती । चहूंकडे ॥ ७ ॥ एक हात हालविती । एक पाय हालविती । एक दांत खाती । कर्करांटें ॥ ८ ॥ एकांचीं वस्त्रें निघोन गेलीं । तीं नागवींच लोळों लागलीं । एकांचीं मुंडाशीं गडबडलीं । चहूंकडे ॥ ९ ॥ एक निजलीं अस्ताव्यस्तें । एक दिसती जैशीं प्रेतें । दांत पसरोन जैशीं भूतें । वाईट दिसती ॥ १० ॥ एक वोसणतांचि उठिले । एक अंधारीं फिरों लागले । एक जाऊनि निजले । उकिरड्यावरी ॥ ११ ॥ एक मडकीं उतरती । एक भूमि चांचपती । एक उठोन वाटा लागती । भलतीकडे ॥ १२ ॥ एक प्राणी वोसणती । एक स्फुंदस्फुंदों रडती । एक खदखदां हांसती । सावकाश ॥ १३ ॥ एक हांका मारूं लागले । एक

---

१ अंतःकरण, हृदय. * मूर्खाला मूर्ती हाच देव वाटतो. २ उपाधिरहित ब्रह्माच्या ठिकाणीं. ३ भ्रमरहित. ४ कर्माच्या खटपटीनें. ५ जगामध्यें सर्व. ६ निश्चयानें. ७ देहाभिमान टाकून. ८ परब्रह्मस्वरूप. ९ एकसारखें लक्ष. १० अनुभवयुक्त ज्ञान. ११ शरीर. १२ भिऊन. १३ एक प्रकारचा वीणा. १४ एक डमरूसारखें वाद्य, त्याचे. १५ कुशीवर. १६ पागोटी. १७ बरळत.

बोंबलत उठिले । एक वचकोन राहिले । आपुले ठायीं ॥ १४ ॥ एक क्षणक्षणां खुरडती । एक डोई खाजविती । एक कण्हों लागती । सावकाश ॥ १५ ॥ एकांच्या लाळा गळाल्या । एकांच्या पिका सांडल्या । एकीं * लघुशंका केल्या । सावकाश ॥ १६ ॥ एक राउत सोडिती । एक करपट ढेंकर देती । एक खांकरून थुंकती । भलतीकडे ॥ १७ ॥ एक हगती एक ओकती । एक खोकती एक शिंकती । एक ते पाणी मागती निद्रेसुऱ्यास्वरें ॥ १८ ॥ एक दुःस्वप्नें निर्बुजेले । एक सुस्वप्नें संतोषले । एक ते गांढमूंढीं पडिले । सुषुप्तीमध्यें ॥ १९ ॥ इकडे उजेडाया झालें । कोणी पठण आरंभिलें । कोणीं प्रातःस्मरामि मांडिलें । हरिकीर्तन ॥ २० ॥ कोणी आठविल्या ध्यानमूर्ती । कोणी एकांतीं जप करिती । कोणी पाठांतरें उजाळिती । नाना प्रकारें ॥ २१ ॥ नाना विद्या नाना कळा । आपलाल्या शिकती सकळा । तानमानें गायनकळा । एक गाती ॥ २२ ॥ मागें निद्रा संपली । पुढें जागृति प्राप्त झाली । व्यवसायीं बुद्धि आपली । प्रेरिते झालें ॥ २३ ॥ ज्ञाता तत्त्वे सांडून पळाला । तुरियेपलीकडे गेला । आत्मनिवेदनें झाला । ब्रह्मरूप ॥ २४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अष्टादशदशके निद्रानिरूपणं नाम नवमः समासः ॥ ९ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ कोणी एक कार्याचा संक्षेप । कांहीं तरी घडे विक्षेप । कांहीं सोहे तें आपेंआप । होत जातें ॥ १ ॥ कार्यभाग होत चालिला । तेणें प्राणी सुखी झाला । विचारहि सुचों लागला । दिवसेंदिवस ॥ २ ॥ कोणी प्राणी जन्मास येतो । कांहीं तरी काळ साह्य होतो । दुःखाउपरी सुख देतो । देव कृपाळूपणें ॥ ३ ॥ अवघाचि काळ जरी सजे । तरी अवघेच होती राजे । कांहीं सजे कांहीं न सजे । ऐसें आहे ॥ ४ ॥ इहलोक आणि परलोक । साधतां कोणी एक विवेक । अद्भुत होय स्वाभाविक । देणें ईश्वराचें ॥ ५ ॥ ऐकिल्याविण कळलें । शिकविल्याविण शहाणपण आलें । हें देखिलें ना ऐकिलें । भूमंडळीं ॥ ६ ॥ सकळ कांहीं ऐकतां कळे । कळतां कळतां वृत्ति निवळे । नेमस्त मनामध्यें आकळे । सारासार ॥ ७ ॥ श्रवण म्हणिजे ऐकावें । मनन म्हणिजे मनीं धरावें । येणें उपायें स्वभावें । त्रैलोक्य चाले ॥ ८ ॥ श्रवणाआड विक्षेप येती । नाना जिज्ञास सांगों किती । सावध असतां प्रत्यय येती । सकळ कांहीं ॥ ९ ॥ श्रवणीं लोक बैसले । बोलतां बोलतां एकाग्र झाले । त्याउपरी जे नूतन आले । ते एकाग्र न होती ॥ १० ॥ मनुष्य बाहेर हिंडून आलें । नाना प्रकारींचें ऐकिलें । उदंड गलबलूं लागले । उगें असेना ॥ ११ ॥ प्रसंग पाहोन चालती । ऐसे लोक थोडे असती । श्रवणीं नाना विक्षेप होती । तें हें ऐका ॥ १२ ॥ श्रवणीं बैसले ऐकाया । ‡ अडों लागली कांया । येती कडकडां जांभया । निद्राभरें ॥ १३ ॥

---

१ बसून सरकतात. २ थुंकी. * लघवी. ३ अपानवायु. ४ ज्याच्या डोळ्यावरील झोंप गेली नाहीं अशा माणसाच्या जड स्वरानें. ५ घाबरले. ६ अतिशयित गाढ. ७ गाढ झोपेमध्यें. ८ प्रातःस्मरण. ९ लांबिली. १० ज्ञेय विषय. ११ चौथ्या अवस्थेपलीकडे. १२ आत्मसमर्पणानें. १३ उद्योग. १४ विघ्न. १५ काळ साहाय्य करीत असला म्हणजे. १६ अनुकूल होईल. १७ नियमानें चालणाऱ्या. १८ कळतें. १९ वेगवेगळे प्रकार. ‡ बसण्याची अडचण होते. २० शरीर.

बैसले सुचित[1] करूनि मना । परी तें मनचि ऐकेना । मागें होतें ऐकिलें नाना । तेंचि धरूनं बैसलें ॥ १४ ॥ तत्पर केलें शरीर । परी मनामध्यें आणिक विचार । कल्पना कल्पी तो विस्तार । किती म्हणोन सांगावा ॥ १५ ॥ जें जें कांहीं श्रवणीं पडलें । तितुकें समजोन विवरलें । तरीच कांहीं सार्थक झालें । निरूपणीं ॥ १६ ॥ मन[3] दिसतें मा धरावें । ज्याचें त्याणें आवरावें । आवरून विवेकें धरावें । अंतरीं ॥ १७ ॥ निरूपणीं येऊन बैसला । परी तो उदंड जेवून आला । बैसतांचि कासावीस झाला । तृषाक्रांत ॥ १८ ॥ आधीं उदक आणाविलें । घळघळां उदंड घेतलें । तेणें मळमळां लागलें । उठोनि गेला ॥ १९ ॥ कर्पट[4] ढेंकर उचक्या देती । वारा सरतां मोठी फजिती । क्षणक्षणां उठोन जाती । लघुशंकेसी ॥ २० ॥ दिशेनें[5] कासावीस केला । अवघें सांडून धांवला । निरूपणप्रसंग निघोन नेला । अखंड ऐसा ॥ २१ ॥ दृष्टांतीं कांहीं अपूर्व आलें । अंतःकरण तेथेंचि राहिलें । कोठवरी काय वाचिलें । कांहीं कळेना ॥ २२ ॥ निरूपणीं येऊन बैसला । तों विंचवें फणकाविला[6] । कैचें निरूपण ? झाला । कासावीस ॥ २३ ॥ पोटामध्यें तिडीक उठली । पाठीमध्यें कैरक[7] भरली । चाळकें[8] चिकुल्या[9] पुळी झाली । बैसवेना ॥ २४ ॥ पिसोळा[10] चाऊन पळाला । तेणें प्राणी दुश्चित[11] झाला । कोणें नेटें गलबला केला । तेथेंचि धांवे ॥ २५ ॥ विषयी लोक श्रवणीं येती । ते बायकांकडेच पाहती । चोरटे लोक चोरून जाती । पादरक्षा[12] ॥ २६ ॥ होय नव्हे वादविवाद । तेणें उदंड झाला खेद । शिव्या गाळी अप्रमाद[13] । होतां चुकला ॥ २७ ॥ कोणी निरूपणीं बैसती । सावकाश गोष्टी लाविती । हरिदास ते रें रें करिती । पोटासाठीं ॥ २८ ॥ बहुत जाणते मिळाले । एकापुढें एक बोले । लोकांचे आशय[14] राहिले । कोण जाणे ॥ २९ ॥ माझें होय तुझें नव्हे । ऐशी अखंड जया सेवे[15] । न्यायनीति सांडूनि धांवे । अन्यायाकडे ॥ ३० ॥ आपल्या थोरपणासाठीं । * अचावचा ❀ तोंडपिटी । न्याय नाहीं तें शेवटीं । परम अन्यायी ॥ ३१ ॥ एकीकडे अभिमान उठे । दुसरीकडे उदंड पेटे । ऐसे श्रोते खरे खोटे । कोण जाणे ॥ ३२ ॥ म्हणोनि जाणते + विचक्षण । ते आधीच धरती नेणेपण[16] । मूर्ख टोणपा आपण । कांहींच नाहीं ॥ ३३ ॥ आपणाहून देव थोर । ऐसा जयास कळला विचार । सकळ कांहीं जगदंतर । तेंहि राखावें ॥ ३४ ॥ सभेमध्यें कलहो[17] झाला । शब्द येतो जाणत्याला । अंतरें राखों नाहीं शिकला । कैसा योगी ॥ ३५ ॥ अखंड आपणास सांभाळिती । क्षुल्लकपण येऊं न देती । थोर लोकांस क्षमा शांति । अगत्य करणें ॥ ३६ ॥ वैर करितां

---

१ स्वस्थ. २ ऐकलें. ३ मन ही कांहीं दृश्य वस्तु नाहीं कीं त्यास धरितां येईल. ४ वेगवेगळ्या अर्थांमध्यें. ५ ताहानेनें व्याप्त होऊन. ६ शौचाला जाऊन. ७ नांगीनें प्रहार केला. ८ लचक. ९ एक विकार. १० ओलीनें पायांचे मोटास होणारा विकार. ११ श्वेत टोळ. १२ दुःखी. १३ जोडे. १४ अत्यंत अवस्था. १५ अभिप्राय. १६ संशय. * संबंधरहित व निष्कारण. ❀ बडबड. + हुशार, चतुर. १७ अज्ञानपणा. १८ भांडण, तंटा. १९ दोष लागतो २० त्यास्तव

वैराचि वाढे । आपणास दुःख भोगणें घडे । म्हणोनि शाहाण्याचें कुंकडें । कळों आलें ॥ ३७ ॥ अवगुणापाशीं बैसला गुणी । अवगुण कळतो तत्क्षणीं । विवेकी पुरुषाची करणी । विवेकें होत्ये ॥ ३८ ॥ उपाय पर्याय दीर्घ प्रयत्न । विवेकबळें नाना यत्न । करील तयाचे महिमान । तोचि जाणे ॥ ३९ ॥ दुर्जनीं * वेवदरून + घेतला । बाष्कळ लोकीं घसरिला । विवेकापासून चेवला । विवेकी कैसा ॥ ४० ॥ न्यायें पर्याय उपाय । मूर्खास हें कळे काय । मूर्खाकरितां चिवडा होय । मैंजालसीचा ॥ ४१ ॥ मग ते शाहणे नीट करिती । स्वयें साहोन साहविती । स्वयें करून करविती । लोकां-करवीं ॥ ४२ ॥ पृथ्वीमध्यें उदंड जन । जनांमध्येंचि असती सज्जन । जयांकरितां समाधान । प्राणिमात्राशीं ॥ ४३ ॥ तो मनोगतांचीं अंगें जाणे । मान प्रसंग समय जाणे । संतसालागीं निववूं जाणे । नानाप्रकारें ॥ ४४ ॥ ऐसा तो जाणता लोक । समर्थ तयाचा विवेक । त्याचें करणें कांहींएक । जनास कळेना ॥ ४५ ॥ बहुत जनांस चाळवी । नाना मंडळें हालवी । ऐशी हे समर्थ पदवी । विवेकें होते ॥ ४६ ॥ विवेक एकांतीं करावा । जगदीश धारणेनें धरावा । लोक आपला आणि परावा । म्हणोंचि नये ॥ ४७ ॥ एकांतीं विवेक ठायीं पडे । एकांतीं यत्न सांपडे । एकांतीं तर्क वावडे । ब्रह्मांडगोळीं ॥ ४८ ॥ एकांतीं स्मरण करावें । चुकलें निधानें पडे ठावें । अंतरात्म्या-सरिसें फिरावें । कांहीं तरी ॥ ४९ ॥ जयासि एकांत मानला । अवघ्याआधीं कळे त्याला । त्यावेगळें वडीलपणाला । ठावाचि नाहीं ॥ ५० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अष्टादशदशके श्रोतावलक्षणनिरूपणं नाम दशमः समासः ॥ १० ॥

शिकवणनाम दशक एकोणिसावा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ब्राह्मणें बाळबोध अक्षर । घडसून करावें सुंदर । जें देख-तांचि चतुर । समाधानें पावती ॥ १ ॥ वाटोळें सरळ मोकळें । वोतलें मषीचें काळें । कुळकुळीत ओळी चालिल्या ढाळें । ❀ मुक्तमाळा जैशा ॥ २ ॥ अक्षर मात्र तितुकें नीट । नेमस्त $ पैस काने नीट । आडव्या मात्रा त्याहि नीट । अर्कुलीं वेलांट्या ॥ ३ ॥ पहिलें अक्षर जें काढिलें । ग्रंथ संपेतों पाहात गेलें । एका टांकेंचि लिहिलें । ऐसें वाटे ॥ ४ ॥ अक्षरांचें काळेपण । टांकाचें ठोंसरपण । तैसेंचि वळण वांकाण । सारिखेंचि ॥ ५ ॥ ओळीस ओळी लागेना । अर्कुलीं मात्रा भेदीना । खालींचे ओळीस स्पर्शेना । अथवा लंबाक्षर ॥ ६ ॥ पान शिशानें † रेखाटावें । त्यावरी नेमकचि लिहावें । दूर जवळी न व्हावें । अंतर ओळींचें ॥ ७ ॥ कोठें शोधासि आडेना । चुकी पाहतां सांपडेना । गरज केली हें घडेना । लेखकापासूनी ॥ ८ ॥ ज्याचें वय आहे नूतन । त्याणें लिहावें

१गूढ. २ क्रम, मार्ग. * विवाद करून. + घेरला. ३ भ्रष्ट झाला. ४समेचा. ५ अनेक. ६ बुद्धीनें, ध्यानानें. ७ परका. ८ कळतो. ९ चालतो. १० ब्रह्मांडामध्यें. ११ ठेवा. १२ नीट वळवून. १३ शाईचे १४ शोभेनें, हळूहळू. ❀ मोत्याच्या ओळी. $ अंतर. १५ रेफ. † आखावें १६ अडचण पडत नाहीं. १७ हलगर्जीपणा.

जपून । जनासि पडे मोहन । ऐसें करावें ॥ ९ ॥ बहु बारिक तरुणपणीं । कामा नये म्हातारपणीं । मध्यम लिहिण्याची करणी । केली पाहिजे ॥ १० ॥ भोंवते स्थळ सोडून द्यावें । मध्येंचि चमचमीत लिहावें । कागद झडतांहि झडावें । नलगोंचि अक्षर ॥ ११ ॥ ऐसा ग्रंथ जपोन लिहावा । प्राणिमात्रास उपजे हेवा । ऐसा पुरुष तो पाहावा । म्हणती लोक ॥ १२ ॥ काया बहुत कष्टवावी । उत्कट कीर्ति उरवावी । चटक लावून सोडावी । कांहीं एक ॥ १३ ॥ घट्ट कागद आणावे । जपोन नेमस्त खेळावे । लिहिण्याचे सामे असावे । नानापरी ॥ १४ ॥ सुऱ्या कातऱ्या जागाइत । खेळों घोटाळीं तागाईत । नाना सुरंगमिश्रित । जाणोनि घ्यावे ॥ १५ ॥ नाना देशींचे बारू आणावे । घट्ट बारिकसर घ्यावे । नाना रंगांचे आणावे । नानाजिनसी ॥ १६ ॥ नानाज़िनसी टांकतोडणी । नाना प्रकारें रेखाटणी । चित्रविचित्र करणी । सिसेंलोळ्यां ॥ १७ ॥ हिंगूळ संग्रहीं असावें । वाळलें ओलींतें पाहोन घ्यावें । सोपे भिजवून वाळवावें । संग्रह मेंघीचे ॥ १८ ॥ तगटीं इतिश्रियां कराव्या । बंदरीं फळ्या घोटाव्या । नाना चित्रीं चिताराव्या । उंच चित्रें ॥ १९ ॥ नाना गोफे नाना बासनें । मेणकापडें सिंदूरवर्णें । पेट्या कुलपें जपणें । पुस्तकाकारणें ॥ २० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे एकोनविंशति दशके लेखनक्रियानिरूपणं नाम प्रथमः समासः ॥ १ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ मागां बोलिले लेखनभेद । आतां ऐका अर्थभेद । नाना प्रकारींचे संवाद । समजोन घ्यावे ॥ १ ॥ शब्दभेद अर्थभेद । मुद्राभेद प्रबंधभेद । नाना शब्दांचे शब्दभेद । जाणोनि पाहावे ॥ २ ॥ नाना आशंका प्रत्युत्तरें । नाना प्रचीत साक्षात्कारें । जेणेंकरितां जगदंतरें । चमत्कारती ॥ ३ ॥ नाना पूर्वपक्षे सिद्धांतें । प्रत्यय पाहावा नेमस्त । अनुमानाचें खस्तव्यस्त । बोलोंच नये ॥ ४ ॥ प्रवृत्ति अथवा निवृत्ति । प्रचीतीविण अवघी भ्रांति । गळ्यायामधील जगज्योति । चेतेल कोठें ॥ ५ ॥ हेतु समजोन उत्तर देणें । दुसऱ्याचे जीवींचें समजणें । मुख्य चातुर्याचीं लक्षणें । तीं हीं ऐशीं ॥ ६ ॥ चातुर्याविणें खटपट । ते विद्याचि फेल्लकट । सभेमध्यें आटघाट । समाधान कैंचें ॥ ७ ॥ बहुत बोलणें ऐकावें । तेथें मौनाचि धरावें । अल्पचिन्हें समजावें । जगदंतर ॥ ८ ॥ बाष्कळांमध्यें बैसों नये । उद्धटासि तंडों नये । आपणा-

---

१ संचय. २ समाज, मार्जिन. ३ झिजून फाटला. ४ शरीर. ५ तुरटीच्या पाण्यांत भिजवून वाळवावे. ६ सामग्री, सामान. ७ समासफळी. ८ तुरटी. ९ घोटकवडा. १० तगण्याजोगे, टिकाऊ. ११ वेगवेगळ्या प्रकारचे. १२ शिशाच्या लांबट गोळ्या. १३ अळत्ता. १४ कापूस. १५ शाईचे. १६ शेवटच्या पृष्ठावर. १७ ग्रंथाच्या शेवटीं इतिश्री म्हणून समाप्ति करतात ती. १८ साग वगैरे मलबार वगैरे बंदरांतील. १९ रेशमी दोरी. २० नेष्टणें. २१ शंका. २२ निर्णय. २३ संशयाचें, तर्काचें. २४ अव्यवस्थित वाममार्गी. २५ कर्ममार्ग. २६ मोक्षमार्ग. २७ कचरा, गळाठा. २८ निरर्थक. २९ वायफळ खटपट, कष्ट. ३० जगांतील लोकांचीं मनें. ३१ आचरणांत ताळतंत्र नाहीं अशा मनुष्यांमध्यें. ३२ भांडूं नये, वाद करूं नये.

करितां खंडों नये । समाधान जनाचें ॥ ९ ॥ नेणपण सोडूं नये । जाणपणें फुगों नये । नाना जनांचें हृदय । मृदुशब्दें उकलावें ॥ १० ॥ प्रसंग जाणावा नेटका । बहुतांसि जोजूं घेऊं नका । खरें असतांचि नासका । फेंड होतो ॥ ११ ॥ शोध घेतां आळसों नये । भ्रष्टलोकीं बैसों नये । बैसलें तरी टाकूं नये । मिथ्या दोष ॥ १२ ॥ अंतर आर्तांचें शोधावें । प्रसंगीं थोडेंचि वाचावें । चटका लावून सोडावें । भल्या मनुष्यासी ॥ १३ ॥ मेजालसींत बैसों नये । समाराधनेसि जाऊं नये । जातां कोंविलवाणें होये । जिणें आपुलें ॥ १४ ॥ उत्तम गुण प्रकटवावे । मग भलत्यासि बोलतां फावे । भले पाहोन करावे । शोधून मित्र ॥ १५ ॥ उपासनेसारिखें बोलावें । सर्व जन तोषवावें । सगट बरेपण राखावें । कोणीएकासी ॥ १६ ॥ ठायीं ठायीं शोध घ्यावा । मग ग्रामीं प्रवेश करावा । प्राणिमात्र वोळखावा । आप्तपणें ॥ १७ ॥ उंच नीच म्हणों नये । सकळांचें निववावें हृदय । अस्तमानीं जाऊं नये । कोठें तरी ॥ १८ ॥ जगामध्यें जगमित्र । जिव्हेपाशीं असे सूत्र । कोठें तरी सत्पात्र । शोधून काढावें ॥ १९ ॥ कथा होती तेथें जावें । दूर दीनासारिखें बसावें । तेथील सकळ हरद्र घ्यावें । अंतर्यामीं ॥२०॥ तेथें भले आढळती । व्यापक तेहि कळों येती । हळू हळू मंद गति । रीघ करावी ॥ २१ ॥ सकळांमध्यें विशेष श्रवण । श्रवणाहून थोर मनन । मननें होय समाधान । बहुत जनांचें ॥२२॥ धूर्तपणें सकळ जाणावें । अंतरीं अंतर बाणावें । समजल्याविण शिणावें । कासयासी ॥ २३ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे एकोन विंशतिदशके विवरणनिरूपणं नाम द्वितीयः समासः ॥ २ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ सुचित करूनि अंतःकरण । ऐका करंटलक्षण । हें त्यागितां सदैवलक्षण । अंगीं बाणे ॥ १ ॥ पापाकरितां दरिद्र प्राप्त । दरिद्रें होय पाप संचित । ऐसेंचि होत जात । क्षणक्षणां ॥ २ ॥ याकारणें करंटलक्षणें । ऐकोनि त्यागचि करणें । म्हणजे कांहींएक बाणे । सदैवलक्षण ॥ ३ ॥ करंट्यास आळस आवडे । यत्न कदापि नावडे । त्याची वासना वावडे । अधर्मीं सदा ॥ ४ ॥ सदा भ्रमिष्ट निंदसुरा । उगेंचि बोले सैरावैरा । कोणि एकाच्या अंतरा । मानेचिना ॥ ५ ॥ लिहों नेणे वाचूं नेणे । सवदेसूत घेऊं नेणे । हिशेब कितेक राखों नेणे । धारणा नाहीं ॥ ६ ॥ हारवी सांडी पाडी फोडी । विसरे चुके नाना खोडी । भल्याचे संगतीची आवडी । कदापि नाहीं ॥ ७ ॥ चोट गडी मेळविले । कुकर्मीं मित्र केले । खटनट एकवटिले । चोरटे पापी ॥ ८ ॥ ज्यासी त्यासी कळंकटा । स्वयें सदाचा चोरटा । परघातकी धोटामोटा । वाटो पाडी ॥ ९ ॥ दीर्घसूचना सुचेचि ना । न्याय नीति हे रुचेचि ना । पराभिलाषवासना ।

---

१ वितंडवाद. २ मंडळी. ३ मर्म. ४ पीडितांचें. ५ सभेमध्यें. ६ मुक्तद्वार असतें तेथें. ७ साधन, किल्ली. ८ सज्जन, साधु. ९ सार, तात्पर्य, अभिप्राय. १० प्रवेश. ११ श्रमावें. १२ स्वस्थ. १३ भाग्यवंताचें चिन्ह. १४ शिरते. १५ डोळ्यावर झांपड असलेलों. १६ सवदा, व्यापार, व व्यापाराचे जिन्नस. १७ बुद्धि, ध्यान. १८ चावट. १९ वाईटसाईट लोक. २० भांडखोर. २१ धष्टपुष्ट. २२ भर रस्तावर टपून दुसऱ्यास लुटणें. २३ दूरदृष्टि. २४ परद्रव्य हरण करण्याची इच्छा.

निरंतर ॥ १० ॥ आळसें शरीर पाळिलें । परंतु पोटाविणें[1] गेलें । सुंडकें[2] मिळेनासें झालें । पांघरायासी ॥ ११ ॥ आळसें शरीर पिळी । अखंड कुशी कांडोळी । निद्रेचे सुकाळीं[3] । आपणासी ॥ १२ ॥ जनासि मैत्री करीना । कठिण शब्द बोले नाना । मूर्खपणें[4] आवरेना । कोणी एकासी ॥ १३ ॥ पवित्र लोकांमध्यें भिडावे[5] । वोंगळामध्यें निःशंक धांवे । सदा मनापासून मावे[6] । जननिंद्य क्रिया ॥ १४ ॥ तेथें कैंचा परोपकार । केला बहुतांचा संहार । पापी अनर्थी ¶ अपस्मार[7] । सर्व अबद्धि[8] ॥ १५ ॥ शब्द सांभाळून बोलेना । आवरितां आवरेना । कोणी एकाशीं मानेना । बोलणें त्याचें ॥ १६ ॥ कोणी एकाशीं विश्वास नाहीं । कोणी एकाशीं सख्य नाहीं । विद्या वैभव कांहींच नाहीं । उगाचि ताठा ॥ १७ ॥ राखावीं बहुतांचीं अंतरें[9] । भाग्य येतें तदनंतरें । ऐशीं विवेकाचीं उत्तरें । ऐकणार नाहीं ॥ १८ ॥ स्वयें आपणास कळेना । शिकविलें तें ऐकाना । तयासि उपाय नाना । काय करिती ॥ १९ ॥ कल्पना करी उदंड कांहीं । प्राप्तव्य तों कांहींच नाहीं । । अखंड पडिला संदेहीं । अनुमानाचे ॥ २० ॥ पुण्यमार्ग सांडिला मनें[8] । पाप झडावें कशानें । निश्चय नाहीं अनुमानें । नाश केला ॥ २१ ॥ कांहीं एक पुरतें कळेना । सभेमध्यें बोलों राहेना । बाष्कळ लबाड ऐसें जना । कळों आलें ॥ २२ ॥ कांहीं नेमकपणें आपुलें । बहुत जनांसि कळों आलें । तेंचि मनुष्य मान्य झालें । भूमंडळीं ॥ २३ ॥ झिजल्यावांचूनि कीर्ति कैंची । मान्यता नव्हे कीं फुकाची[10] । जिकडोतिकडे होते ‡ छी छी । अवलक्षणें ॥ २४ ॥ भल्यांची संगति धरीना । आपणास शाहाणे करीना । तो आपला आपण वैरी जाणा । स्वाहित नेणे ॥ २५ ॥ लोकांसि बरें करावें । तें उसणें सवेंचि घ्यावें । ऐसें जयाच्या जीवें । जाणिजेना ॥ २६ ॥ जेथें नाहीं उत्तम गुण । तें करंटपणाचें लक्षण । बहुतांसि न माने तें अवलक्षण । सहजचि झालें ॥ २७ ॥ कार्याकारण सकळ कांहीं । कार्याविण तों कांहींच नाहीं । * निकामा तो दुःखप्रवाहीं । वाहताचि गेला ॥ २८ ॥ बहुतांसि मान्य थोडा । त्याच्या पापासि नाहीं + जोडा । निराश्रयीं पडे उघडा । जेथें तेथें ॥ २९ ॥ याकारणें अवगुण त्यागावे । उत्तम गुण समजोन घ्यावे । तेणें मनासारखें फावे । सकळ कांहीं ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे एकोनविंशति दशके करंटलक्षणनिरूपणं नाम तृतीयः समासः ॥ ३ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ मागां बोलिलें करंटलक्षण । तें विवेकें सांडावें संपूर्ण । आतां ऐका सदैवलक्षण । परम[12] सौख्यदायक ॥ १ ॥ उपजत गुण शरीरीं । परोपकारी नाना परी । आवडे सर्वांचे अंतरीं । सर्वकाळ ॥ २ ॥ सुंदर अक्षर लिहों जाणे । चपळ शुद्ध वाचों जाणे । अर्थांतर[11] सांगों जाणे । सकळ कांहीं ॥ ३ ॥ कोणाचें मनोगत

---

१ उद्योग न केल्यामुळें पोट भरेना म्हणून शरीर वाळलें. २ भिकार वस्त्र. ३ खाजवितो. ४ विपुलतेमध्यें. ५ भीड धरतो, लाजतो. ६ फार आवडते. ¶ दुष्ट. ७ अनियमित. ८ मनें. ‡ तिरस्कार, अपकीर्ति. * ज्यास काम उद्योग नाहीं. + उपमा. ९ कांहीं दिल्याशिवाय मिळणारी, फुकटची. १० पूर्णपणें. ११ अर्थांतील रहस्य.

तोडीना । भल्याची संगति सोडीना । सैदैवलक्षणें अनुमाना । आणूनि ठेवी ॥ ४ ॥ तो सकळ जनासि ❀ व्हावा । जेथें तेथें नित्य नवा । मूर्खपणें अनुमानगोवा । कांहींच नाहीं ॥ ५ ॥ नाना उत्तम गुण सत्पात्र । तोचि मनुष्य जगामित्र । प्रकटकीर्ति स्वतंत्र । पराधीन नाहीं ॥ ६ ॥ राखे सकळांचें अंतर । उदंड करी पाठांतर । बेमस्तपणाचा विसर । पडणार नाहीं ॥ ७ ॥ नम्रपणें पुसों जाणे । नेमस्त अर्थ सांगों जाणे । बोलाऐसें वर्तों जाणे । उत्तम क्रिया ॥ ८ ॥ जो मानला बहुतांसी । कोणी बोलों न शके त्यासी । धगधगीत पुण्यराशि । महापुरुष ॥ ९ ॥ तो परोपकार करीतचि गेला । पाहिजे तो ज्याला त्याला । मग काय उणें त्याला । भूमंडळीं ॥ १० ॥ बहुत जन वास पाहे । वेळेसि तात्काळ उभा आहे । उणें कोणाचें न साहे । तया पुरुषाशी ॥ ११ ॥ चौदा विद्या चौसष्ट कळा । जाणे संगीत गायनकळा । आत्मविद्येचा जिव्हाळा । उदंड तेथें ॥ १२ ॥ सकळांसि नम्र बोलणें । मनोगत राखोन चालणें । अखंड कोणी एकाचें उणें । पडोंचि नेदी ॥ १३ ॥ न्याय नीति भजन मर्यादा । कालसार्थक करी सदा । दरिद्रपणाची आपदा । तेथें कैंची ॥ १४ ॥ उत्तम गुणें शृंगारिला । जो बहुतांमध्यें शोभला । प्रकट प्रतापें उगवला । मार्तंड जैसा ॥ १५ ॥ जाणता पुरुष असेल जेथें । कलह कैंचा उठेल तेथें । उत्तम गुणाविषयीं रिते । ते प्राणी करंटे ॥ १६ ॥ प्रपंची जाणे राजकारण । परमार्थीं * साकल्य विवरण । सर्वांमध्यें उत्तम गुण । त्याचा भोक्ता ॥ १७ ॥ मागें एक पुढें एक । ऐसा कदापि नाहीं दंडक । सर्वत्रांसि अलौकिक । तया पुरुषाची ॥ १८ ॥ अंतरासि लागेल ढका । ऐशी वर्तणूक करूं नका । जेथें तेथें विवेका । प्रकट करी ॥ १९ ॥ कर्मविधि उपासनाविधि । ज्ञानविधि वैराग्यविधि । विशालवक्तृत्वाची बुद्धि । चळेल कैशी ॥ २० ॥ पाहातां अवघे उत्तम गुण । तयास वाईट म्हणेल कोण । जैसा आत्मा संपूर्ण । सर्वांघटीं ॥ २१ ॥ आपल्या कार्यास तत्पर । लोक असती लहान थोर । तैसाचि करी परोपकार । मनापासूनी ॥ २२ ॥ दुसऱ्याच्या दुःखें दुखावे । दुसऱ्याच्या सुखें सुखावे । अवघेचि सुखी असावे । ऐशी वासना ॥ २३ ॥ उदंड मुलें नानापरी । वडिलांचें मन अवघ्यांवरी । तैशी अवघ्यांची चिंता करी । महापुरुष ॥ २४ ॥ जयास कोणाचें सोसेना । तयाची निष्कांचेन वासना । धिक्कारिल्या धिक्कारेना । तोचि महापुरुष ॥ २५ ॥ मिथ्या शरीर निंदिलें । तरी याचें काय गेलें । ज्ञात्यासि आणि जिंकिलें । देहबुद्धीनें ॥ २६ ॥ हें तों अवघें अवलक्षण । ज्ञाता देहीं विलक्षण । कांहीं तरी उत्तमगुण । जनीं दाखवावे ॥ २७ ॥ उत्तम गुणास मनुष्य वेधे । वाईट गुणास प्राणी खेदे । तीक्ष्णबुद्धि लोक साधे । काय जाणती ॥ २८ ॥ लोकीं अत्यंत क्षमा

---

१ भाग्यवंताचीं लक्षणें. ❀ हवासा वाटतो. २ वाट. ३ ब्रह्मविद्येचा. ४ विपत्ति. ५ सूर्य. ६ रिकामें. ७ दुर्दैवी. * मुळापासून. ८ संप्रदाय. ९ अपूर्वता, आवड. १० धक्का. ११ सर्व देहांमध्यें. १२ ज्याची कृति कोणी नांवें न ठेवील अशी असते. १३ द्रव्याची वासना नसते. १४ देहाभिमानानें. १५ देहांत असून देहाहून वेगळा. १६ साधे लोक तीक्ष्ण बुद्धीला काय जाणतात.

करिती । आलियां लोकांचे प्रचीती[1] । मग ते लोक पाठी राखिती । नाना प्रकारीं ॥ २९ ॥ बहुतांसि वाटे मी थोर । सर्वमान्य पाहिजे विचार । थोर उदार गंभीर । महापुरुष ॥ ३० ॥ जितुके कांहीं उत्तम गुण । तें समर्थांचें लक्षण । अवगुण तें करंटलक्षण । सहजचि झालें ॥ ३१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे एकोनविंशति दशके सदैवलक्षणनिरूपणं नाम चतुर्थः समासः ॥ ४ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ मातीचे देव धोंड्याचे देव । सोन्याचे देव रुप्याचे देव । कांस्याचे देव पितळेचे देव । तांब्याचे देव चित्रलेपें[3] ॥ १ ॥ रुईच्या लांकडाचे पोंवळ्याचे देव । बाण तांदळे नर्मदेचे देव[5] । शाळग्राम * काश्मीरदेव । सूर्यकांत सोमकांत ॥ २ ॥ ताम्रनाणीं × हेमनाणीं । कोणी पूजिती देवतार्चनीं । चक्रांकित चक्रतीर्थाहूनी । घेऊनि येती ॥ ३ ॥ उदंड उपासनेचे भेद । किती करावे विशद । आपलाले आवडीचा वेध । लागला जनीं ॥ ४ ॥ परी त्या सकळांचेंहि कारण । मुळीं पाहावें स्मरण । तया स्मरणाचे अंश जाण । नानादैवतें ॥ ५ ॥ मुळीं द्रष्टा देव तो एक । त्याचे झाले अनेक । समजोन पाहतां विवेक । उमजों लागे ॥ ६ ॥ ‡ देहावेगळी भक्ति फावेना । देहावेगळा देव पावेना । याकारणें मूळ भजना । देहचि आहे ॥ ७ ॥ देह मुळींच केला वांव[8] । तरी भजनास कैंचा ठाव । म्हणोनि भजनाचा उपाव । देहात्मयोगें ॥ ८ ॥ देहाविण देव कैसा भजावा । देहाविण देव कैसा पूजावा । देहाविण महोत्साह कैसा करावा । कोण्या प्रकारें ॥ ९ ॥ अत्र गंध पत्र पुष्प । फल तांबूल धूप दीप । नाना भजनाचा साक्षेप[11] । कोठें करावा ॥ १० ॥ देवाचें तीर्थ कैसें घ्यावें । देवासि गंध कोठें लावावें । मंत्रपुष्प तरी वाहावें । कोणे ठायीं ॥ ११ ॥ म्हणोनि देहाविण अडतें । अवघें सांकडेंचि[10] पडतें । $ देहाकरितां घडतें । भजन कांहीं ॥ १२ ॥ देव देवता भूतें दैवतें । मुळींचें सामर्थ्य आहे तेथें । अधिकारें नाना दैवतें । भजत जावीं ॥ १३ ॥ नाना देवीं भजन केलें । तें मूळपुरुषास पावलें । या कारणें सन्मानिलें । पाहिजे सकळ कांहीं ॥ १४ ॥ मायावल्ली फांपावेली[12] । नाना देहफळीं लगडली[13] । मुळींची जाणीव कळों आली । फळामध्यें ॥ १५ ॥ म्हणोनि येळीलें[14] न करावें । पहाणें तें येथोंचि पाहावें । तोळा पडतां राहावें[15] । समाधानें ॥ १६ ॥ प्राणी संसार टाकिती । देवास धुंडीत फिरती । नाना अनुमानीं[16] पडती । जेथें तेथें ॥ १७ ॥ लोकांची पाहतां रीती । लोक देवतार्चनें करिती । अथवा क्षेत्रदेव पाहती । ठायीं ठायीं ॥ १८ ॥ अथवा नाना अवतार । ऐकोनि धरिती निर्धार । परि तें अवघें सविस्तर । होऊनि गेलें ॥ १९ ॥ एक ब्रह्मा विष्णु महेश । ऐकोनि म्हणती हे विशेष । गुणातीत जो जगदीश । तो पाहिला पाहिजे ॥ २० ॥ देवास नाहीं स्थानमान[17] । कोठें करावें भजन । हा विचार

---

१ अत्यंत क्षमाशील आहेत असें लोकांचे अनुभवास आल्यावर. २ अनुभव. ३ चित्रें. ४ ओबड धोबड लहान लहान दगड. ५ नर्मदा नदींतील गणपति. * स्फटिकाचे. × सोन्याचीं नाणीं. ६ स्फूर्ति. ‡ देहाशिवाय. ७ मिथ्या, खोटा. ८ देहामुळें. ९ उद्योग. १० संकट. $ देहामुळें, ११ विस्तारली. १२ भरून आली. १३ कंटाळा. १४ अनुभवास आल्यावर. १५ संशयामध्यें. १६ ठिकाण, मर्यादा.

पाहतां अनुमान । होत जातो ॥ २१ ॥ नसतां देवाचें दर्शन । कैसेनि होइजे पावन[1] । धन्य धन्य ते साधुजन । सकळ जाणती ॥ २२ ॥ भूमंडळीं देव नाना । त्यांची भीड उल्लंघेना । मुख्य देव तो कळेना । कांहीं केल्या ॥ २३ ॥ कर्तृत्व वेगळें करावें । मग त्या देवासि पाहावें । तरी कांहींएक पडे[2] ठावें । गोप्य गुह्य ॥ २४ ॥ तें दिसेना ना भासेना । कल्पांतींहि[3] नासेना । सुकृतावेगळें[4] विश्वासेना । तेथें मन ॥ २५ ॥ उदंड कल्पिते कल्पना । उदंड इच्छिते वासना । अभ्यंतरींचे तरंग नाना । उदयातें पावती ॥ २६ ॥ म्हणोनि कल्पनारहित । तेचि वस्तु शाश्वत । अंत नाहीं म्हणोनि अनंत । बोलिजे तया ॥ २७ ॥ हें ज्ञानदृष्टीनें पाहावें । पाहोनि तेथेंचि राहावें । निजध्यासें तद्रूपें व्हावें । संगत्यागें[5] ॥ २८ ॥ नाना लीला नाना लाघवें[6] । तें काय जाणिजे बापुड्या जीवें । संतसंगें स्वानुभवें । स्थिति बाणे ॥ २९ ॥ ऐसी सूक्ष्म स्थिति गति । कळतां चुके अधोगति[7] । सद्गुरुवचनें सद्गति । तत्काळ होते ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे एकोनाविंशतिदशके देहमान्यनिरूपणं नाम पंचमः समासः ॥ ५ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ परमार्थीं आणि विवेकी । त्याचें करणें माने लोकीं । कां जे विवरविवरों चुकी । पडोंच नेदी ॥ १ ॥ जो जो संदेह वाटे जना । तो तो कदापि करीना । आदि अंत अनुमाना । आणून सोडी ॥ २ ॥ स्वतां निःस्पृह असेना । त्याचें बोलणेंचि मानेना । कठिण आहे जनार्दना । राजी राखणें ॥ ३ ॥ कोणी दाटून उपदेश देती । कोणी मध्यवर्ती घालिती । ते सहजचि हळू पडती । लालुचीनें ॥ ४ ॥ जयास सांगावा विवेक । तो जाणावा प्रतिकुंचक[8] । पुढें पुढें नाशक । कारभार होतो ॥ ५ ॥ भावास भाऊ उपदेश देती । पुढें पुढें होते फजिती । वोळखीच्या लोकांत महंती । मांडूंचि नये ॥ ६ ॥ पहिलें दिसे परी नासे । विवेकी मान्य करिती कैसे । अविवेकी ते जैसे तैसे । मिळती तेथें ॥ ७ ॥ भ्रतार शिष्य, स्त्री गुरु । हाहि फटकळ विचारू[9] । नाना भ्रष्टाकारीं प्रकारु । तैसाचि आहे ॥ ८ ॥ प्रकट विवेक बोलेना । झांकोतापा करी जना । मुख्य निश्चय अनुमाना । आणूंच नेदी ॥ ९ ॥ हुकीसरिसा[10] भरीं[11] भरे[12] । विवेक सांगतां न धरे[13] । दूरदृष्टीचे पुरे । साधु नव्हती ॥ १० ॥ कोणास कांहींच न मागावें । भगवद्भजन वाढवावें । विवेकबळें जन लावावे । भजनाकडे ॥ ११ ॥ परांतरें[14] रक्षायाची कामें । बहुत कठिण विवेकवर्में[15] । स्वइच्छेनें स्वधर्में । लोकराहाटी ॥ १२ ॥ आपण तुर्क[16] गुरु केला । शिष्य चांभार मेळविला । नीच यातीनें नासला । समुदाय ॥ १३ ॥ ब्राह्मणमंडळ्या मेळवाव्या । भक्तमंडळ्या मानाव्या । संतमंडळ्या शोधाव्या । भूमंडळीं ॥ १४ ॥ उत्कृष्ट भव्य तेंचि ध्यावें । मळमळीत अवघेंचि टाकावें । निःस्पृहपणें विख्यात व्हावें । भूमंडळीं ॥ १५ ॥ अक्षर बरें वाचणें बरें । अर्थांतर सांगणें बरें । गाणें

---

१ पवित्र. २ कळेल. ३ प्रळयकाळींहि. ४ पुण्याशिवाय. ५ तदाकार. ६ देहाभिमान टाकून. ७ कौशल्य. ८ नरकादि वाईट लोकांची प्राप्ती. ९ प्रतिकूळ. १० स्त्री गुरु व नवरा शिष्य हा प्रकार जरा फाजिलपणाचा आहे. ११ गुप्त ठेवा म्हणून सांगतो १२ उत्कंठेबरोबर. १३ नादीं लागतो. १४ ग्रहण करीत नाहीं. १५ दुसऱ्याचें मन. १६ तुर्क, यवन.

नाचणें अवघेंचि बरें । पाठांतर ॥ १६ ॥ दीक्षा बरी मैत्री बरी । तीक्ष्णबुद्धि राजकारणीं बरी । आपणास राखे नाना परी । अलिप्तपणें ॥ १७ ॥ अखंड हरिकथेचा छंद । सकलांस लागे नामवेध । प्रकट जयाचा प्रबोध । सूर्य जैसा ॥ १८ ॥ दुर्जनासि राखों जाणे । सज्जनासि निववूं जाणे । सकळांचे मनींचें जाणे । ज्याचें त्यापरी ॥ १९ ॥ संगतीचें मनुष्य पालटें । उत्तम गुण तात्काळ उठे । अखंड अभ्यासी लगटे । समुदाय ॥ २० ॥ जेथें तेथें नित्य नवा । जनासि वाटे हा असावा । परंतु लालुचेचा गोवा । पडोंच नेदी ॥ २१ ॥ उत्कृष्ट भक्ति उत्कृष्ट ज्ञान । उत्कृष्ट चातुर्य उत्कृष्ट भजन । उत्कृष्ट योग अनुष्ठान । ठायीं ठायीं ॥ २२ ॥ उत्कृष्ट निःस्पृहता धरिली । ज्याची कीर्ति दिगंतीं फांकली । उत्कृष्ट भक्तीनें निवाली । जनमंडळी ॥ २३ ॥ कांहींएक उत्कृष्टेविण । कीर्ति कदापि नव्हे जाण । उगेंच वणवण हिंडोन । काय होतें ॥ २४ ॥ नाहीं देहाचा भरंवसा । केव्हां सरेल वयसा । प्रसंग पडेल कैसा । कोण जाणे ॥ २५ ॥ याकारणें सावधान असावें । जितुकें होईल तितुकें करावें । भगवत्कीर्तीनें भरावें । भूमंडळ ॥ २६ ॥ आपणास जें जें अनुकूळ । तें तें करावें तात्काळ । होईना त्यास निवळ । विवेक उमजावा ॥ २७ ॥ विवेकामध्यें सांपडेना । ऐसें तों कांहींच असेना । एकांतीं विवेक अनुमाना । आणून सोडी ॥ २८ ॥ अखंड तजविजा चाळणा तेथें । पाहतां काय उणें तेथें । एकांतेविणें प्राणियातें । बुद्धि कैंची ॥ २९ ॥ एकांतीं विवेक करावा । आत्माराम वोळखावा । येथून तेथवरी गोवा । कांहींच नाहीं ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे एकोनविंशति दशके बुद्धिवादनिरूपणं नाम षष्ठः समासः ॥ ६ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ कथेचें घमंड भरून द्यावें । आणि निरूपणीं विवरावें । उणें पडोंच न द्यावे । कोणीएक विषयीं ॥ १ ॥ भजणार खालीं पडला । तो भजणारीं जाणितला । नेणतां लोक उगाचि राहिला । टकमकां पाहात ॥ २ ॥ उत्तर विलंबी पैडिलें । श्रोतयांस कळों आलें । म्हणिजे महत्त्व उडालें । वक्तयाचें ॥ ३ ॥ थोडें बोलोन समाधान करणें । * रागेजोन तरी मन धरणें । मनुष्य वेधींच लावणें । कोणीएक ॥ ४ ॥ सोसवेना चिणचिण केली । तेथें तामसवृत्ति दिसोन आली । अवघी आवडी उडाली । श्रोतयांची ॥ ५ ॥ कोण कोण राजी राखिले । कोण कोण मनीं भंगले । क्षणक्षणां परीक्षिले । पाहिजेत लोक ॥ ६ ॥ शिष्य विकल्पें[11] रानें घेतो[12] । गुरु मागें मागें धांवतो । विचार पाहों जातां तो । विकल्पाचि अवघा ॥ ७ ॥ आशाबद्ध क्रियाहीन । नाहीं चातुर्याचें लक्षण । ते महंतीची[13] भेणभण । † बंद नाहीं ॥ ८ ॥ ऐसे गोसांवी हेळे[14] पडती । ठायीं ठायीं कष्टी होती । तेथें संगतीचे लोक पावती । सुख कैंचें ॥ ९ ॥ जिकडे तिकडे

---

१ वैराग्यशीलतेनें. २ ज्ञान, जाणतेपणा. ३ याचे संगतींत असलेले. ४ समाधान पावली. ५ आयुष्य. ६ गुंतागुंत. ७ लयलूट, चंगळ. ८ रिकामा, कांहीं बोलणें सुचत नाहीं असा झाला. ९ बोलावयास वेळ लागला. * रागावले तरी मन न दुखविणें. १० कटकट. ११ संशयाने. १२ पळून जातो, भडकतो. १३ मोठेपणाची. १४ बोजवार. † ताळ, नियम. १५ महत्त्व कमी होतें, फिके पडतात.

कीर्ति माजे । सगट लोकांस हव्यासें उपजे । लोक राजी राखोन कीजे । सकळ कांहीं ॥ १० ॥ परलोकीं वास करावा । समुदाय उगाच पाहावा । मागण्याचा तगादा न लावावा । कांहींएक ॥ ११ ॥ जिकडे जग तिकडे जगन्नायक । कळला पाहिजे विवेक । रात्रंदिवस विवेकी लोक । संभाळीत जाती ॥ १२ ॥ जो जो लोक दृष्टीस पडिला । तो तो नष्ट ऐसा कळला । अवघेंच नष्ट, एकला भला । कशावरूनी ? ॥ १३ ॥ वोसें मुलखीं काय पाहावें । लोकांवेगळें कोठें राहावें । तऱ्हें खोटीं, सांडतें घ्यावें । कांहींएक ॥ १४ ॥ तस्मात् लौकिकीं वर्तता न ये । त्यास महंती कामा नये । परत्रसाधनाचा उपाये । श्रवण करून असावें ॥ १५ ॥ आपणांस बरें पोहतां न ये । लोक बुडवायाचें कोण कार्य । गोडी आवडी वांया जाये । विकल्पाचि अवघा ॥ १६ ॥ अभ्यासें प्रकट व्हावें । नाहीं तरी झांकोन असावें । प्रकट होऊन नासावें । हें बरें नव्हे ॥ १७ ॥ मंद हळूहळू चालतो । चपळ कैसा आटोपतो । अरबी फिरवणारा तो । कैसा असावा ॥ १८ ॥ हीं धकाधकीचीं कामें । तीक्ष्णबुद्धीचीं वर्में । भोळ्या भावार्थें संभ्रमें । कैसे घडे ॥ १९ ॥ शेत केलें, परी वाहेना । जेवार केलें, परी फिरेना । जन मेळविलें, परी धरीना । अंतर्यामीं ॥ २० ॥ जरी चढती वाढती आवडी उठे । तरी परमार्थ प्रकटे । घसघस करितां विटे । सगट लोक ॥ २१ ॥ आपलें लोकांस मानेना । लोकांचें आपणास मानेना । अवघा विकल्पाचि मना । समाधान कैंचें ॥ २२ ॥ नासक दीक्षा सिंतेरू लोक । तेथें कैंचा असेल विवेक । जेथें बळावला अविवेक । तेथें राहणें खोटें ॥ २३ ॥ बहुत दिवस श्रम केला । शेवटीं अवघाचि वायां गेला । आपणास टाकेना, गलबला । कोणें करावा ॥ २४ ॥ संगीतें चालिला तरी व्योप । नाहीं तरी अवघाचि संताप । क्षणक्षणां विशेष कोप । किती म्हणोन सांगावा ॥ २५ ॥ मूर्ख मूर्खपणें भरंगळती । ज्ञाते ज्ञातेपणें कलह करिती । होते दोहीकडे फजिती । लोकांमध्यें ॥ २६ ॥ कारभार आटोपेना करवेना । आणि उगेंहि राहेना । याकारणें सकळ जना । काय म्हणावें ॥ २७ ॥ नासक उपाधीस सोडावें । वय सार्थकीं घालावें । परिभ्रमणें कंठावें । कोठें तरी ॥ २८ ॥ परिभ्रमण करीना । दुसऱ्याचें कांहींच सोसीना । तरी मग उदंड यातना । विकल्पाची ॥ २९ ॥ आतां हें आपणाचपाशीं । बरें विचारावें आपणासी । अनुकूळ पडेल तैशी । वर्तणूक करावी ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे एकोनविंशतिदशके यत्ननिरूपणं नाम सप्तमः समाप्तः ॥ ७ ॥

---

१ छंद. २ दुसऱ्या लोकांमध्यें. ३ समाज. ४ लोकांजवळ मागणें, याचना करणें. ५ ओसाड. ६ अभिमान. ७ पडतें घ्यावें. ८ परलोकसाधनाचा. ९ अरबी घोडा. १० आवेशानें, गडबडीनें. ११ पण मेहनत करीत नाहीं. १२ व्यापार. १३ व्यापार करावयाचा व त्याकरितां फिरावयाचें नाहीं. १४ लोकांचीं मनें बळवावयाचीं नाहींत. १५ मनामध्यें. १६ कटकट, कंटाळा. १७ सर्व. १८ फसवेगिरीची. १९ ठक. २० सुव्यवस्थित. २१ उद्योग, खटाटोप. २२ बडबड करतात. २३ नासणाऱ्या, नाहींसे होणाऱ्या. २४ देहास, पदार्थास. २५ फिरफिरून.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ सृष्टीमध्यें बहुत लोक । परिभ्रमणें कळे कौतुक । नाना प्रकारींचे विवेक । आंडळों लागती ॥ १ ॥ किती प्रापंचिक जन । अखंड वृत्ती उदासीन । सुखदुःखें समाधान । डंडळेना ॥ २ ॥ स्वभावेंचि नेमक बोलती । सहजाचि नेमक चालती । अपूर्व बोलण्याची स्थिति । सकळांसि माने ॥ ३ ॥ सहजचि तालज्ञान येतें । स्वभावेंचि रागज्ञान उमटतें । सहजाचि कळत जातें । न्यायनीतिलक्षणें ॥ ४ ॥ एकादा आढळे गौजी । सकळ लोक अखंड राजी । सदा सर्वदा आवडे * ताजी । प्राणिमात्रांची ॥ ५ ॥ चुकोन उदंड आढळतें । भारी मनुष्य दृष्टीस पडतें । महंताचें लक्षणसें वाटतें । अकस्मात ॥ ६ ॥ ऐसें आढळतां लोक । चमत्कारें गुणग्राहक । क्रिया बोलणें नेमक । प्रत्ययाचें ॥ ७ ॥ सकळ अवगुणांमध्यें अवगुण । आपले अवगुण वाटती गुण । मोठें पाप करंटपण । चुकेना कीं ॥ ८ ॥ ढाळेंचि काम होतें सदा । जें जपल्यानें नव्हे सर्वदा । तेथें ❀ पीळपेंचाची आपदा । आढळेचिना ॥ ९ ॥ एकासि अभ्यासितां न ये । एकासि स्वभावेंचि ये । ऐसा भगवंताचा महिमा काये । कैसा कळेना ॥ १० ॥ मोठीं राजकारणें चुकती । राजकारणीं वेढा लागती । नाना चुकीची फजीती । चहूंकडे ॥ ११ ॥ याकारणें चुकों नये । म्हणिजे उदंड उपाये । उपायाचा अपाये । चुकतां होये ॥ १२ ॥ काय चुकलें तें कळेना । मनुष्याचें मनचि वळेना । खवळला अभिमान गळेना । दोहींकडे ॥ १३ ॥ अवघे फंडाचि नासती । लोकांचीं मनें भंगती । कोठें चुकते युक्ति । कांहीं कळेना ॥ १४ ॥ व्यापाविणें आंटोप केला । तो अवघा पसरतचि गेला । अकलेचा बंदे नाहीं घातला । दूरदृष्टीनें ॥ १५ ॥ एकादें मनुष्य तें शिळें । त्याचें करणोंचि बोचळें । नाना विकल्पाचें जाळें । करून टाकी ॥ १६ ॥ तें आपणासि उकलेना । दुसऱ्यास कांहींच कळेना । नाचे विकल्पे कल्पना । ठायीं ठायीं ॥ १७ ॥ त्या गुप्त कल्पना कोणास कळाव्या । कोणें येऊन आटोपाव्या । ज्याच्या त्याणें कराव्या । बळकट बुद्धि ॥ १८ ॥ ज्यासि उपाधि आवरेना । तेणें उपाधि वाढवावीना । सावेचित्त करूनिया मना । समाधानें असावें ॥ १९ ॥ धांवधांवो उपाधि वेष्टी । आपण कष्टी लोक कष्टी । हे कामा नये गोष्टी । कुसमुसोचि ॥ २० ॥ लोक बहुत कष्टी झाला । आपणहि अत्यंत त्रासला । व्यर्थाचि केला गलबला । कोसयासी ॥ २१ ॥ असो उपाधीचें काम ऐसें । कांहीं बरें कांहीं कोणेंसें । सकळ समजोन ऐसें । वर्ततां बरें ॥ २२ ॥ लोकांपाशीं भावार्थ कैंचा ? । आपण जगंवावा तयांचा । शेवट उपंढेर कोणाचा । पडोंचि नये ॥ २३ ॥ अंतरात्म्याकडे सकळ लागे । निर्गुणीं हें कांहींच न लागे । नाना प्रकारीं दगे । चंचळामध्यें ॥ २४ ॥ शुद्ध विश्रांतीचें स्थळ । तें एक निर्मळ निश्चळ ।

---

१ फिरल्यानें. २ आढळतात, भेटतात. ३ ढळत नाहीं. ४ पठ्या, प्रसिद्ध. * नवी ५ अनुभवाचें. ६ हकूहकू. ❀ वाकडेतिकडे कष्ट. ७ अडचण पडते. ८ मंडळी. ९ आवरण्याच्या शक्तीवांचून. १० पसारा. ११ बांध. १२ मूर्ख, जड. १३ वेडसर. १४ देहादिक संसाराचा पसारा. १५ सावधचित्त, स्वस्थ. १६ लावून घेतो. १७ धुसफुस, त्रास उत्पन्न करणारी. १८ काशाला. १९ वांकडें. २० त्याचा भावार्थ आपण जगवावा. २१ गोंधळ, ढोंगाची उघडकी.

तेथें विकाराचि सकळ । निर्विकार होती ॥ २५ ॥ उद्वेगे अवघे तुटोन जाती । मनास वाटे विश्रांति । ऐशी दुर्लभ परब्रह्मस्थिति । विवेकें सांभाळावी ॥ २६ ॥ आपणास मुळींच उपाधि नाहीं । ऋणानुबंधें मिळालें सर्वहि । आल्यागेल्याची क्षिति[3] नाहीं । ऐसें झालें पाहिजे ॥ २७ ॥ जो उपाधीस कंटाळला । तो निवांत होऊनि बैसला । आटोपेना तो गलबला । कासयासी ॥ २८ ॥ कांहीं गलबला कांहीं निवळ । ऐसा कंठित जावा काळ । तेणेंकरितां विश्रांतिवेळ । आपणाशी फावे ॥ २९ ॥ उपाधि कांहीं राहत नाहीं । समाधानाएवढें थोर नाहीं । नरदेह प्राप्त होत नाहीं । क्षणक्षणां ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे एकोनविंशतिदशके उपाधिलक्षणनिरूपणं नाम अष्टमः समास : ॥ ८ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ज्ञानी आणि उदास । समुदायाचा हव्यास[4] । तेणें अखंड सावकाश । एकांत सेवावा ॥ १ ॥ तेथें तजविजा कळती । अखंड चाळणा निघती । प्राणिमात्रांची स्थिति गति । कळों येते ॥ २ ॥ जरी हा चाळणाच करीना । तरी कांहींच समजेना । हिशेब झाडाचि पाहीना । दिवाळखोर ॥ ३ ॥ एक मिरासी साधिती । एक थिल्ल्या गमविती । व्यापकपणाची स्थिति । ऐशी आहे ॥ ४ ॥ जेणें जें जें मनीं धरिलें । तें तें आधींच समजलें । कृत्रिम अवघेंचि खुंटलें । सहजचि येणें ॥ ५ ॥ अखंड राहतां सलगी[5] होते । अतिपरिचयें अवज्ञा[6] घडते । याकारणें विश्रांतीतें[7] । घेतां नये ॥ ६ ॥ आळसें आळस केला । तरी मग कारभाराचि बुडाला । अंतरहेतें[8] चुकत गेला । समुदायाचा ॥ ७ ॥ उदंड उपासनेचीं कामें । लावित जावीं नित्यनेमें । अवकाश कैंचा कृत्रिमें । करावयासी ॥ ८ ॥ चोर भांडारीं करावा । घसरतांच सांभाळावा । गोवा मूर्खपणाचा काढावा । हळू हळू ॥ ९ ॥ ह्या अवघ्या पहिल्याच गोष्टी । प्राणी कोणी नव्हता कष्टी । राजकारणें मंडळ वेष्टी । चहूंकडे ॥ १० ॥ नष्टासि नष्ट योजावे । वाचाळासि वाचाळ आणावे । आपणावरी विकल्पाचे गोवे । पडोंचि नेदी ॥ ११ ॥ कांटीनें कांटी झाडावी । झाडावी परी तें कळों न द्यावी । कळकट्टपणाची[9] पदवी । असों न द्यावी ॥ १२ ॥ न कळतां करी कार्य जें तें । तें काम तात्काळाचि होतें । गिचेडींत[10] पडतां तें । चमत्कार नव्हे ॥ १३ ॥ ऐकोनि आवडी लागावी । देखोनि बळकटचि व्हावी । सलगीनें आपली पदवी[11] । सेवकामध्यें[12] ॥ १४ ॥ कोणी एक काम करितां होतें । न करितां मागें पडतें । याकारणें ढिलेपण तें । असोंचि नये ॥ १५ ॥ **जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला । जो आपणचि कष्टत गेला तोचि भला ॥१६॥** अवघ्यांस अवघें कळलें । तेव्हां तें रितें[13] पडिलें । याकारणें ऐसें घडलें । न पाहिजे कीं ॥ १७ ॥ मुख्य सूत्र हातीं घ्यावें । करणें तें लोकांकरवीं करवावें । कित्येक खेळुंक

---

१ चिंता, त्रास. २ प्रारब्ध संबधानें. ३ पर्वा. ४ प्राप्त होते. ५ नाद, छंद. ६ हक्कदारी. ७ जवळ असलेल्या. ८ उपद्व्यापाचीं. ९ मैत्री. १० अपमान. ११ याकरितां एकेच ठिकाणीं फार दिवस राहूं नये. १२ अभिप्राय. १३ भांडखोरपणाला पदवी म्हणजे ठिकाणच देऊं नये. १४ गर्दीमध्यें. १५ चव्हाट्यावर आणलें असतां त्यांत मजा नाहीं. १६ रिकामें. १७ लोक.

जगवांवे । राजकारणामध्यें ॥ १८ ॥ बोलके पहिलवान कैळकटे । तयासींच घ्यावे झंटे । दुर्जनें राजकारण दाटे । ऐसें न करावें ॥ १९ ॥ ग्रामण्य वर्मीं सांपडावें । रगडून पीठचि करावें । करून मागुती सांवरावें । बुडवूं नये ॥ २० ॥ खळदुर्जनासी भ्याले । राजकारण नाहीं राखिलें । तेणें अवघें प्रकट झालें । बरें वाईट ॥ २१ ॥ समुदाय पाहिजे मोठा । तरी तेणावा असावा बळकटा । मठ करून ताठा । धरूं नये ॥ २२ ॥ दुर्जन प्राणी समर्जावे । परी तें प्रकट न करावें । सज्जनापरी आळवांवे । महत्त्व देऊनी ॥ २३ ॥ जनामध्यें दुर्जन प्रकट । तरी मग अखंड खटखट । याकारणें ते वाट । बुझूनि टाकावी ॥ २४ ॥ गोलिमाच्या देखतां फौजा । रणशूराच्या फुर्फुरती भुजा । ऐसा पाहिजे की राजा । कैपेक्षी परमार्थी ॥ २५ ॥ तयास देखतां दुर्जन धाके । बैसवी प्रचीतीचे तडाखे । बंड पाषांडाचे वाखे । सहजचि होती ॥ २६ ॥ हीं धूर्तपणाचीं कामें । राजकारण करावें नेमें । ढिलेपणाच्या संभ्रमें[1] । जाऊं नये ॥ २७ ॥ कोठेंच पडेना दृष्टि । ठायीं ठायीं त्याच्या गोष्टी । वाग्विलासें सकळ सृष्टि । वेधिली तेणें ॥ २८ ॥ हुंब्यासि हुंबा लाऊन द्यावा । टोणप्यास टोणपा आणावा । लौंदापुढें करावा । दुसरा लौंद ॥ २९ ॥ धेटोसी आणावा धट । उद्धटासि पाहिजे उद्धट । खेटनटासि खटनट । अगत्य करी ॥ ३० ॥ जैशासी तैसा जेव्हां भेटे । तेव्हां मंजालसी थाटे । इतुकें होतें परी धनी खोटे । दृष्टीस न पडे ॥ ३१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे एकोनविंशतिदशके राजकारणनिरूपणं नाम नवमः समासः ॥ ९ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ जेथें अखंड नाना चाळणा । जेथें अखंड नाना धारणा । जेथें अखंड राजकारणा । मनासि आणिती ॥ १ ॥ सृष्टीमध्यें उत्तम गुण । तितुकें चाले निरूपण । निरूपणाविण क्षण । रिकामा नाहीं ॥ २ ॥ चर्चा आशंका प्रत्युत्तरें । कोण खोटें कोण खरें । नाना वक्तृत्वें शास्त्राधारें । नाना चर्चा ॥ ३ ॥ भक्तिमार्ग विशदे कळे । उपासनामार्ग आकळे । ज्ञानविचार निवळे । अंतर्यामीं ॥ ४ ॥ वैराग्याची बहु आवडी । उदासवृत्तीची गोडी । उदंड उपाधि तरी सोडी । लागोच नेदी ॥ ५ ॥ प्रबंधांचीं[2] पाठांतरें । उत्तरास संगीतें[3] उत्तरें । नेमक बोलतां अंतरें । निववी सकळांची ॥ ६ ॥ आवडी लागली बहु जना । तेथें कोणाचें कांहीं चालेना । दंडवट पडिला अनुमाना । येईल कैसा ॥ ७ ॥ उपासना करूयियां पुढें । पुरवले पाहिजे चहूंकडे । भूमंडळीं जिकडे तिकडे । जाणती तया ॥ ८ ॥ जाणती परी आढळेना । काय करितो तें कळेना । नाना देशींचे लोक नाना । येऊन जाती ॥ ९ ॥ तितुक्यांचीं अंतरें धरावीं ।

---

१ नेमावे, ज्याचा जितका उपयोग असेल तितका करून घ्यावा. २ भांडखोर. ३ हिसके, झोंबी. ४ ग्रामण्यामध्यें म्हणजे निरनिराळ्या तटांत वर्म पकडावें. ५ ताणदोर. ६ ओळखावे, जाणावे. ७ हाक मारावी, बोलवावे. ८ शत्रूच्या. ९ कैवार घेणारा. १० नास्तिक मतांचे. ११ नाश. १२ उद्योगानें. १३ घुम्या, जड, मंद याला. १४ लबाड. १५ धष्टपुष्ट. १६ वाईटसाईटाला. १७ सभा. १८ बुद्धि. १९ स्पष्ट. २० छंदरचनेची. २१ योग्य, समर्पक. २२ अभ्यास, संवय.

विवेकें विचारें भरावीं । कडोविकडीं दिवरावीं । अंतःकरणें ॥ १० ॥ किती लोक ते कळेना । किती समुदाय आकळेना । सकळ लोक श्रवणमनना । मध्यें घाली ॥ ११ ॥ फडसमजाविसी करणें । गद्यपद्य सांगणें । परांतरासि राखणें । सर्वकाळ ॥ १२ ॥ ऐसा जयाचा दंडक । अखंड पाहणें विवेक । सावधापुढें अविवेक । येईल कैचा ॥ १३ ॥ जितुकें कांहीं आपणास ठावें । तितुकें हळूहळू शिकवावें । शाहणे करूनि सोडावे । बहुत जन ॥ १४ ॥ परोपरी शिकवणें । ओडणुकी सांगत जाणें । निवळ करून सोडणें । निःस्पृहासी ॥ १५ ॥ होईल तें आपण करावें । न होतां जना करवीं करवावें । भगद्भजनें राहावें । हा धर्म नव्हे ॥ १६ ॥ आपण करावें करवावें । आपण विवरावें विवरवावें । आपण धरावें धरवावें । भजनमार्गासी ॥ १७ ॥ जुन्या लोकांचा कंटाळा आला । तरी नूतन प्रांत पाहिजे धरिला । जितुकें होईल तितुक्याला । आळस करूं नये ॥ १८ ॥ देहाचा अभ्यास बुडाला । म्हणिजे महंत बुडाला । लागवेगें नूतन लोकांला । शाहाण करावे ॥ १९ ॥ उपाधीत सांपडों नये । उपाधीस कंटाळों नये । * निसुगपण कामा नये । कोणीएकविषयीं ॥ २० ॥ काम नासणार नासतें । आपण वेडें उगेंच पाहतें । आळशी हृदयशून्य तें । काय करूं जाणे ॥ २१ ॥ धकाधकीचा मामला । कैसा घडे अशक्ताला । नाना बुद्धि शक्ताला । म्हणोनि शिकवाव्या ॥ २२ ॥ व्यापे होईल तों रहावें । व्याप राहतां उठोन जावें । आनंदरूप फिरावें । कोठें तरी ॥ २३ ॥ उपाधीपासून सुटला । तो निःस्पृहपणें बळावला । जिकडे अनुकूळ तिकडे चालिला । सावकाश ॥ २४ ॥ कीर्ति पाहतां सुख नाही । सुख पाहतां कीर्ति नाहीं । केल्याविण कांहींच नाहीं । कोठें तरी ॥ २५ ॥ येरवीं काय राहतें । होणार तितुकें होऊन जातें । प्राणिमात्र अशक्त तें । पुढें आहे ॥ २६ ॥ आधींच तेकैवा सोडिला । मध्यांचि धिवसा सांडिला । तरी संसार हा शेवटाला । कैसा पावे ॥ २७ ॥ संसार मुळींच नासका । विवेकें करावा नेटका । नेटका करितां फिका । होत जातो ॥ २८ ॥ ऐसा याचा जिनसाना । पाहतां कळों येतें मना । परंतु धीर सांडावा ना । कोणी एकें ॥ २९ ॥ धीर सांडितां काय होतें । अवघें सोसावें लागतें । नाना बुद्धि नाना मतें । शाहणा जाणे ॥ ३० ॥ इति श्री दासबोधे गुरुशिष्यसंवादे एकोनविंशतिदशके विवेकलक्षणनिरूपणं नाम दशमः समासः ॥ १० ॥

विसावा पूर्ण दशक.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ प्राणी व्यापक मन व्यापक । पृथ्वी आप तेज व्यापक । वायु आकाश त्रिगुण व्यापक । अंतरात्मा मूळमाया ॥ १ ॥ निर्गुण ब्रह्म तें व्यापक ।

---

१ युक्तीनीं. २ मंडळीस शिक्षण देणें. ३ दुसऱ्याच्या मनाला. ४ रीत, चाल. ५ अडचणी. * कोडगेपणा. ६ थांबावें, टाकावें. ७ देही जो मनुष्य त्याचा. ८ जलदीनें. ९ कोणत्याही संबंधांत. १० काम, बाबत. ११ उद्योग. १२ थांबल्यावर, संपल्यावर. १३ ताकद, शक्ति. १४ धैर्य. १५ माल, जिन्नस. १६ उदक. १७ अग्नि.

ऐसें अवघेंच व्यापक। तरी हे सगट कीं काय एक । भेद आहे ॥ २ ॥ आत्मा आणि निरंजन। येणें वाढतें अनुमान । आत्मा सगुण कीं निर्गुण। आणि निरंजन ॥ ३ ॥ श्रोता संदेहीं पडला । तेणें संदेह वाढला । अनुमान धरून बैसला। कोण तो कैसा ॥ ४ ॥ ऐका पहिली आशंका । अवघा गलबला करूं नका । प्रकट करून विवेका । प्रत्यय पाहावा ॥ ५ ॥ शरीरपाडें सामर्थ्यपाडें । प्राणी व्यापें करी निवाडे । परी पाहतां मनायेवढें । चपळ नाहीं ॥ ६ ॥ चपळपण एकदेशीं । पूर्ण व्यापकता नव्हे त्यासी । पाहतां पृथ्वीच्या व्यापासी । सीमा आहे ॥ ७ ॥ तैसेंचि आप आणि तेज । अपूर्ण दिसती सहज। वायु चपळ समज । एकदेशीं ॥ ८ ॥ गगन आणि निरंजन । तें पूर्ण व्यापक सघन । कोणीएक अनुमान । तेथें असेचिना ॥ ९ ॥ त्रिगुण गुणक्षोभिणी माया। मायिक जाईल विलया । अपूर्ण एकदेशी तया । पूर्ण व्यापकता न घडे ॥ १० ॥ आत्मा आणि निरंजन । हें दोहींकडे नामाभिधान । अर्थान्वय समजोन । बोलणें करावें ॥ ११ ॥ आत्मा मन अत्यंत चपळ । तरी हें व्यापक नव्होचि केवळ । सुचित अंतःकरण निवळ। करून पाहावें ॥ १२ ॥ अंतराळीं पाहतां पाताळीं नाहीं । पाताळीं पाहतां अंतराळीं नाहीं । पूर्णपणें वसत नाहीं। चहूंकडे ॥ १३ ॥ पुढें पाहतां मागें नाहीं । मागें पाहतां पुढें नाहीं । वोमे सव्य व्यापक नाहीं । दशादिशा ॥ १४ ॥ चहूंकडे निशाणें मांडावीं । एकसरी कैशी शिवावीं । याकारणें समजोन उगवी । प्रत्यय आपणासी ॥ १५ ॥ सूर्य जळीं प्रतिबिंबला । हाहि दृष्टांत न घडे वस्तूला । वस्तुरूप निर्गुणाला । म्हणिजेत आहे ॥ १६ ॥ घटाकाश मठाकाश । हाहि दृष्टांत विशेष। * तुळों जातां निर्गुणास। साम्यता येतें ॥ १७ ॥ ब्रह्मीचा अंश आकाश । आणि आत्म्याचा अंश मानस । दोहींचा अनुभव प्रत्ययास । येथें घ्यावा ॥ १८ ॥ गगन आणि हें मन । कैशी होती समान। मननशीळ महाजन। सकळहि जाणती ॥ १९ ॥ मन हें पुढें वोवंडे । मागें अवघेंचि रितें पडे। पूर्ण गगनास साम्यता घडे । कोण्या प्रकारें ॥ २० ॥ परब्रह्महि अचळ । आणि पर्वतासहि म्हणती अचळ। दोन्हीं एक केवळ। कैसें म्हणावें ॥ २१ ॥ ज्ञान अज्ञान विपरीतज्ञान । तिन्हीं कैसीं होती समान । याचा प्रत्यय मनन । करून पहावा ॥ २२ ॥ ज्ञान म्हणिजे जाणणें। अज्ञान म्हणिजे नेणणे । विपरीतज्ञान म्हणिजे देखणें। + एकाचें एक ॥ २३ ॥ जाणणें नेणणें वेगळें केलें। ढोबळें पांचभौतिक उरलें। विपरीतज्ञान समजलें । पाहिजे जीवीं ॥ २४ ॥ द्रष्टा साक्षी अंतरात्मा । जीवात्माचि होय शिवात्मा। पुढें शिवात्मा तोचि होय जीवात्मा । जन्म घेतो ॥ २५ ॥ आत्मत्वीं जन्ममरण न लागे । आत्मत्वीं जन्ममरण न भंगे। संभवामि युगे युगे । ऐसें

---

१ निर्मळ. २ उद्योग. ३ एकतर्फी. ४ दाट. ५ गुणांला प्रकट करणार. ६ लटकें. ७ नाशाला. ८ अर्थसंबंध. ९ स्वस्थ. १० आकाशांत. ११ डावा. १२ उजवा. १३ स्पर्श करितां येईल. १४ उपमा. १५ ब्रह्मस्वरूप. १६ मठांतील पोकळी. * तुलना करिता. १७ अनुभवाला. १८ चालतें. १९ रिकामें. + एकाचे ठिकाणीं दुसरें. २० स्पष्ट. २१ मी प्रत्येक युगामध्यें जन्म घेतो, भगवद्गीता अ० ४ श्लोक ८.

वचन ॥ २६ ॥ जीव एकदेशी नर । विचारें झाला विश्वंभर । विश्वंभरास संसार । चुकेना कीं ॥ २७ ॥ ज्ञान आणि अज्ञान । वृत्तिरूपें हें समान । निवृत्तिरूपें विज्ञान । झालें पाहिजे ॥ २८ ॥ ज्ञानें येवढें ब्रह्मांड केलें । ज्ञानें एवढें वाढविलें । नाना विकारांचें वळलें । तें हें ज्ञान ॥ २९ ॥ आठवें देह ब्रह्मांडींचें । तें हें ज्ञान होय साचें । विज्ञानरूप विदेहाचें । पद पाविजे ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे विंशति दशके पूर्णापूर्णनिरूपणं नाम प्रथमः समासः ॥ १ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ मूळमाया नसतां चंचळ । निर्गुण ब्रह्म तें निश्चळ । जैसें गगन अंतराळ । चहूंकडे ॥ १ ॥ जिकडे पहावें तिकडे अपार । कोणीकडे नाहीं पार । एकजिन्नसी स्वतंत्र । दुसरें नाहीं ॥ २ ॥ दृश्य आलें आणि गेलें । परब्रह्म तें संचलें । जैसें गगन कोंदाटलें । चहूंकडे ॥ ३ ॥ ब्रह्मांडावरतें बैसावें । अवकाश भैंकास अवलोकावें । तेथें चंचळ व्यापकाच्या नांवें । शून्याकार ॥ ४ ॥ दृश्य विवेकें काढिलें । मग परब्रह्म कोंदाटलें । कोणासीच अनुभवलें । नाहीं कदा ॥ ५ ॥ अधोर्ध्व पाहतां चहूंकडे । निर्गुण ब्रह्म जिकडे तिकडे । मन धांवेल कोणीकडे । अंत पाहावया ॥ ६ ॥ दृश्य चळे ब्रह्म चळेना । दृश्य कळे ब्रह्म कळेना । दृश्य आकळे ब्रह्म आकळेना । कल्पनेसी ॥ ७ ॥ कल्पना म्हणिजे कांहींच नाहीं । ब्रह्म दाटलें ठायींच्या ठायीं । वाक्यार्थ विवरत जाई । म्हणिजे बरें ॥ ८ ॥ परब्रह्माएवढें थोर नाहीं । श्रवणापरतें साधन नाहीं । कळल्याविण कांहींच नाहीं । समाधान ॥ ९ ॥ पिपीलिकामार्गें हळूहळू घडे । विहंगमें फळासि गांठी पडे । शोधक मननीं पुढें । म्हणिजे बरें ॥ १० ॥ परब्रह्मासारिखें दुसरें । कांहींच नाहीं खरें । निंदा आणि स्तुतीउत्तरें । परब्रह्मीं नाहीं ॥ ११ ॥ ऐसें परब्रह्म एकजिन्नसी । कांहींच तुळेना तयासी । महानुभाव पुण्यराशि । तेथें पहुडती ॥ १२ ॥ चंचळें होतें दुःखप्राप्ति । निश्चळायेवढी नाहीं विश्रांति । निश्चळ प्रत्ययें पाहाती । महानुभाव ॥ १३ ॥ मूळापासून शेवटवरी । विचारणा केलीच करी । प्रत्ययाचा निश्चय अंतरीं । तयासीच फावे ॥ १४ ॥ कल्पनेची सृष्टि जाहली । त्रिविध प्रकारें भासली । तीक्ष्णबुद्धीनें आणिली । पाहिजे मना ॥ १५ ॥ मूळमायेपासून त्रिगुण । अवघे एकदेशी लक्षण । पांचाभूतांचा ढोबळा गुण । दिसताचि आहे ॥ १६ ॥ पृथ्वीपासून चारी खाणी । चारी वेगळाली करणी । सकळ सृष्टीची चोंळणी येथूनी । पुढें नाहीं ॥ १७ ॥ सृष्टीचें विचित्र लक्षण । विशद करूं निरूपण । श्रोतीं सुचित अंतःकरण । केलें पाहिजे ॥ १८ ॥ मूळमाया जाणिवेची । मुळीं सूक्ष्म कल्पनेची । जैशी स्थिति परावाचेची । तद्रूपाचि ते ॥ १९ ॥ अष्टधा प्रकृतीचे मूळ । ते हे

---

१ वृत्ति नाहींशी होऊन. २ अनुभवयुक्त ज्ञान. ३ देहरहिताचे. ४ शून्य. ५ खालींवर. ६ मुंगीप्रमाणें मंदमंद तत्त्वाभ्यास करण्यानें. ७ पक्षिमार्गें, दृढाभ्यासानें पक्ष्याप्रमाणें, एकदम ब्रह्मवस्तूकडे जाणें. ८ स्थिर होतो. ९ एकटे एकच, एकरस. १० उपमेस येईना. ११ श्रेष्ठ, साधु. १२ कृति. १३ घडामोड. १४ परा नामक पहिल्या वाणीची. १५ आठ प्रकारच्या. १६ मायेचे.

मूळमायाच केवळ । सूक्ष्मरूप बीज सकळ । मुळींच आहे ॥ २० ॥ जडपदार्थ चेतवितें । म्हणोनि चैतन्य बोलिजेतें । सूक्ष्मरूपें संकेतें । समजोन घ्यावें ॥ २१ ॥ प्रकृतिपुरुषांचा[2] विचार । अर्धनारीनटेश्वर । अष्टधाप्रकृतीचा विचार[3] । सकळ कांहीं ॥ २२ ॥ गुण त्रिगुणांचें गूढत्व । म्हणोन संकेत महत्तत्व । गुप्तरूपें शुद्धसत्त्व । तेथेंचि वसे ॥ २३ ॥ जेथून गुण प्रकटती । तीस गुणक्षोभिणी म्हणती । त्रिगुणांचीं रूपें समजती धन्य ते साधू ॥ २४ ॥ गुप्तरूपें गुण सौम्य । म्हणोन बोलिजे गुणसाम्य । सूक्ष्मसंकेत अगम्य[4] । बहुतांस कैंचा[5] ॥ २५ ॥ मूळमायेपासून त्रिगुण । चंचळ एकदेशी लक्षण । प्रत्यय पाहतां खूण । अंतरीं येते ॥ २६ ॥ पुढें पंचभूतांचीं बंडें । वाढलीं विशाळें उदंडें । सप्तद्वीपें नवखंडें । वसुंधरा हे ॥ २७ ॥ त्रिगुणापासून पृथ्वीवरी । दुसऱ्या जिन्नसान्याची परी । दोनी जिन्नस याउपरी । तिसरा ऐका ॥ २८ ॥ पृथ्वी नाना जिनसांचें बीज । अंडज जारज[6] स्वेदज[7] उद्भिज[8] । चारी खाणी चारी वाणी सहज । निर्माण जाहल्या ॥ २९ ॥ खाणी वाणी होती जाती । परंतु तैशीच आहे जगती । ऐसे होती आणि जाती । उदंड प्राणी ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे विंशतिदशके त्रिविधसृष्टिलक्षण-निरूपणं नाम द्वितीयः समासः ॥ २ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ मुळींहूनि शेवटवरी । विस्तार बोलिला नानापरी । पुनः विवरत विरेत[9] माघारी । वृत्ति न्यावी ॥ १ ॥ चारी खाणी चारी वाणी । चौऱ्यांयशी लक्ष जीवयोनी । नाना प्रकारचे प्राणी । जन्मास येती ॥ २ ॥ अवघे होती पृथ्वीपासूनी । पृथ्वीमध्यें जाती नासोनी । अनेक येती जाती परी अंतु[10]नी । तैशीच आहे ॥ ३ ॥ ऐसें हें शेंड्याकडील खंड । दुसरें भूतांचें बंड । तिसरें नामाभिधानें उदंड । सूक्ष्मरूपें ॥ ४ ॥ स्थूल अवघें सांडून द्यावें । सूक्ष्मरूपें वोळखावें । गुणांपासून पाहिलेंच पाहावें । सूक्ष्मदृष्टीं ॥ ५ ॥ गुणांचीं रूपें जाणीव नेणीव । पाहिलाच पाहावा अभिप्राव । सूक्ष्म दृष्टीचें लाघव[11] । येथून पुढें ॥ ६ ॥ शुद्ध नेणीव तमोगुण । शुद्ध जाणीव सत्त्वगुण । जाणीव नेणीव रजोगुण । मिश्रित चालिला ॥ ७ ॥ त्रिगुणांचीं रूपें ऐशीं । कळों-लागलीं[12] ओपैसी[13] । गुणांपुढील कर्दमासी[14] । गुणक्षोभिणी बोलिजे ॥ ८ ॥ रज तम आणि सत्व । तिहींचें जेथें गूढत्व । तेंचि जाणिजे महत्तत्त्व । कर्दमरूप ॥ ९ ॥ प्रकृतिपुरुष शिवशक्ती । अर्धनारीनटेश्वर म्हणती । परी याची स्वरूपस्थिति । कर्दमरूप ॥ १० ॥ सूक्ष्मरूपें गुण सौम्य । त्यासीच म्हणिजे गुणसाम्य । तैसेंच चैतन्य अगम्य । सूक्ष्मरूपी ॥ ११ ॥ बहुजिन्नसी मूळमाया । महाकारण ब्रह्मांडांची काया[15] । ऐसिया सूक्ष्म अन्वया[16] । पाहिलेंचि पाहावें ॥ १२ ॥ चारी खाणी पांच भूतें । चौदा सूक्ष्म संकेतें । काय

---

१ ज्ञान. २ प्रकृति–सत्त्व, रज, तम, यांची साम्यावस्था आणि पुरुष=परमात्मा. ३ विवरण. ४ कळण्यास कठीण. ५ बहुत. ६ पृथ्वी. ७ माल, जिन्नस. ८ पक्षी वगैरे. ९ मनुष्यें वगैरे. १० घामापासून उत्पन्न होणारे जीव, उवा वगैरे. ११ वृक्ष वगैरे. १२ व्यतिरेक दृष्टीनें लय करीत. १३ पृथ्वी. १४ कौशल्य. १५ आपोआप. १६ मिश्रणाला. १७ देह. १८ संबंधाला.

पाहाणें तें येथें । शोधून पाहावें ॥ १३ ॥ अहाचें पाहतां कळेना । गरज केल्यानें समजेना । नाना प्रकारीं जनाच्या मना । संदेह पडती ॥ १४ ॥ * चौदा † पांच एकोणीस । एकोणीस × चार तेवीस । यामध्यें मूळ चतुर्दश । पाहिलेंचि पाहावें ॥ १५ ॥ जो विवरोन समजला । तेथें संदेहचि नाहीं उरला । समजल्याविण जो गलबला । तो निरर्थक ॥ १६ ॥ सकळ सृष्टीचें बीज । मूळमायेंत असे सहज । अवघें समजतां सेज । परमार्थ होतो ॥ १७ ॥ समंजलें माणूस चाळवेना । निश्चयीं अनुमान धरीना । सांवळागोंदी करीना । परमार्थ कदा ॥ १८ ॥ शब्दातीत बोलतां आलें । त्यास वाच्यांश असें बोलिलें । शुद्ध लक्ष्यांशें लक्षिलें । पाहिजे विवेकें ॥ १९ ॥ पूर्वपक्ष म्हणिजे माया । सिद्धांतें जाय विलया । माया नसतां मग तया । कांय म्हणावें ॥ ॥ २० ॥ अन्वय आणि व्यतिरेकें । हा पूर्वपक्षाचा विवेक । सिद्धांत म्हणिजे शुद्ध एक । दुसरें नाहीं ॥ २१ ॥ अधोमुखें भेद वाढतो । ऊर्ध्वमुखें भेद तुटतो । निःसंगपणें निर्गुणी तो । महायोगी ॥ २२ ॥ माया मिथ्या ऐशी कळली । तरी मग भीड कां लागली । मायेचे भिडेनें घसरली । स्वरूपस्थिति ॥ २३ ॥ लटकें मायेनें दपटावें । सत्य परब्रह्म सांडावें । मुख्य निश्चयें हिंडावें । कासयासी ॥ २४ ॥ पृथ्वीमध्यें बहुत जन । त्यांमध्यें असती सज्जन । परी साधूस वोळखतो कोण । साधूवेगळा ॥ २५ ॥ म्हणोन संसार सांडावा । मग साधूचा शोध घ्यावा । फिरफिरों ठायीं पाडावा । साधुजन ॥ २६ ॥ उदंड हुंडकावे संत । सांपडे प्रचीतीचा महंत । प्रचीतीवीण स्वहित । होणार नाहीं ॥ २७ ॥ प्रपंच अथवा परमार्थ । प्रचीतीविण अवघे व्यर्थ । प्रत्ययज्ञानी तो समर्थ । सकळांमध्यें ॥ २८ ॥ रात्रंदिवस पाहावा अर्थ । अर्थ पाहेल तो समर्थ । परलोकींचा निजस्वार्थ । तेथेंचि घडे ॥ २९ ॥ म्हणोनि पाहिलेंचि पाहावें । आणि शोधिलेंचि शोधावें । अवघें कळतां स्वभावें । संदेह तुटती ॥ ३० ॥ इतिश्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे विंशतिदशके सूक्ष्मनामाभिधान निरूपणं नाम तृतीयः समासः ॥ ३ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ सकळ जनांस प्रार्थना । उगेंच उदास करावेना । निरूपण आणावें मना । प्रत्ययाचें ॥ १ ॥ प्रत्यय राहिला एकीकडे । आपण धांवतो भलतीकडे । तरी मग सारासाराचे निवाडे । कैसे होती ॥ २ ॥ उगीच पाहतां सृष्टी । गलबला दिसतो दृष्टि । परी ते रजसत्तेची गोष्टी । वेगळीच ॥ ३ ॥ पृथ्वीमध्यें जितुकीं शरीरें । तितुकीं भगवंताचीं घरें । नाना सुखें येणें द्वारें । प्राप्त होती ॥ ४ ॥ त्याचा महिमा कळेल कोणाला । माता वांटून कृपाळू झाला । प्रत्यक्ष जगदीश जगाला ।

---

१ वर वर पहाणें. * मायेचीं चौदा नांवें. † पंचमहाभूतें. × चार खाणी. २ तयार. ३ बोलत नाहीं. ४ गोंधळ. ५ वाच्यांश टाकून तात्पर्याला अनुकूल अशा अर्थानें. ६ नाशाला. ७ दोरी आहे म्हणून तिजवर सर्पाची कल्पना हा अन्वय आणि दोरीच नाहीं यामुळें सर्पकल्पनाहि नाहीं हा व्यतिरेक. ८ प्रपंचदृष्टीनें. ९ परमार्थविचारानें. १० सोधावे. ११ अनुभव घेतलेला, नुसता बोलका नव्हे. १२ अपरोक्ष ज्ञानी. १३ परमेश्वरी अधिकाराची, १४ मातादारें, आईच्या रूपानें.

रक्षीतसे ॥ ५ ॥ सत्ता पृथ्वीमध्यें वाटली । जेथें तेथें विभागली । कळेनें सृष्टी चालली । भगवंताच्या ॥ ६ ॥ मूळ जाणत्या पुरुषाची सत्ता । शरीरीं विभागली तत्त्वतां । सकळ कळा चातुर्यता । तेथें वसे ॥ ७ ॥ सकळ पुरांचा ईश । जगामध्यें तो जगदीश । नाना शरीरीं सावकाश । करूं लागे ॥ ८ ॥ पाहतां सृष्टीची रचना । ते एकाचेन चालेना । एकलाचि चालवी नाना । देह धरूनी ॥ ९ ॥ नाहीं उंच नीच विचारिलें । नाहीं बरें वाईट पाहिलें । कार्य चालों ऐसें झालें । भगवंतासी ॥ १० ॥ किंवा नेणणें आडवें केलें । किंवा अभ्यासीं घातलें । हें कैसें कैसें केलें । त्याचा तोचि जाणे ॥ ११ ॥ जगदंतरीं अनुसंधान । बरें पाहणें हेंचि ध्यान । ध्यान आणि तें ज्ञान । एकरूप ॥ १२ ॥ प्राणी संसारासि आला । कांहीं एक शाहाणा झाला । मग तो विवरों लागला ॥ भूमंडळीं ॥ १३ ॥ प्रकट रामाचें निशाण । आत्माराम ज्ञानघन । विश्वंभर विद्यमान । भाग्यें कळे ॥ १४ ॥ उपासना धुंडोन वासना धरिली । तरी ते लांबतचि गेली । महिमा न वचे बोलिलीं । यथार्थाचि आहे ॥ १५ ॥ द्रष्टा म्हणिजे पाहता । साक्षी म्हणिजे जाणता । अनंतरूपीं अनंता । वोळखावें ॥ १६ ॥ संगती असावी भल्याची । धाटी कथानिरूपणाची । कांहीं एक मनाची । विश्रांति आहे ॥ १७ ॥ त्याहीमध्यें प्रत्ययज्ञान । जाळून टाकिलें अनमान । प्रचीतीविण समाधान । पाविजेल कैंच ॥ १८ ॥ मूळसंकल्प तो हरिसंकल्प । मूळमायेमधील साक्षेप । जगदंतरीं तेंचि रूप । देखिजेतें ॥ १९ ॥ उपासना ज्ञानस्वरूप । ज्ञानीं चौथा देह आरोप । याकारणें सर्व संकल्प । सोडून द्यावा ॥ २० ॥ पुढें परब्रह्म विशाळ । गगनासारिखें पोकळ । घनपातळ कोमळ । काय म्हणावें ॥ २१ ॥ उपासना म्हणिजे ज्ञान । ज्ञानें पाविजे निरंजन । योगियांचें समाधान । येणें रीतीं ॥ २२ ॥ विचार नेहटूनसा पाहे । उपासना आपणचि आहे । एक जाय एक राहे । वासना धरूनी ॥ २३ ॥ अखंड ऐशी घालमेली । पूर्वापर होत गेली । आतांहि तैशीच चालिली । उत्पत्तिस्थिति ॥ २४ ॥ वनांवरी वनचरांची सत्ता । जळांवरी जळचरांची सत्ता । भूमंडळीं भूपाळांची सत्ता । येणेंचि न्यायें ॥ २५ ॥ सामर्थ्य आहे चळवळेचें । जो जो करील तयाचें । परंतु येथें भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे ॥ २६ ॥ कर्ता जगदीश हें तों खरें । परी विभाग आला पृथगाकारें । येथें अहंतेचें कोंविरें । बाधिजेना ॥ २७ ॥ हरिदाता हरिभोक्ता । ऐसें चालतें तत्त्वतां । ये गोष्टीचा आतां । विचार पाहावा ॥२८॥ सकळ कर्ता परमेश्वरू । आपला मायिक विचारू । जैसें कळेल तैसें करूं । जगदंतरीं ॥ २९ ॥ देवायेवढें चपळ नाहीं । ब्रह्मायेवढें निश्चळ नाहीं । पायरीनें पायरी चढोनि पाहीं । मूळपर्यंत ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे विंशतिदशके आत्मनिरूपणं नाम चतुर्थः समासः ॥ ४ ॥

---

१ देहरूपी नगरांचा २ लक्ष. ३ शोधूं. ४ ज्ञानपूर्ण. ५ बरोबर. ६ अनुभवज्ञान. ७ उद्योग. ८ जोरानें, खोल. ९ राजांची. १० आश्रय, आधार, पाठबळ. ११ अभिमानाचें. १२ भ्रम, वेड. १३ हरी देणारा. १४ हरी भोगणारा. १५ जगामध्यें.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ येथून पाहतां तेथवरी । चारी जिन्नस अवधारीं । एक चौदा पांचे चारी । ऐसें आहे ॥ १ ॥ परब्रह्म सकळांहून वेगळें । परब्रह्म सकळांहून आगळें । नाना कल्पनेनिराळें । परब्रह्म तें ॥ २ ॥ परब्रह्माचा विचार । नाना कल्पनेहून * पर । निर्मळ निश्चळ निर्विकार । अखंड आहे ॥ ३ ॥ परब्रह्मास कांहींच + तुळेना । हा एक मुख्य जिन्नसाना । दुसरा जिन्नस नाना कल्पना । मूळमाया ॥ ४ ॥ नाना सूक्ष्मरूप । सूक्ष्मरूप आणि कर्दमरूप । मुळींच्या संकल्पाचा आरोप । मूळमाया ॥ ५ ॥ हरिसंकल्प मुळींचा । आत्माराम सकळांचा । संकेत नामाभिधानाचा । ऐसा आहे ॥ ६ ॥ ॥ निश्चळीं चंचळ चेतलें । म्हणोनि चैतन्य बोलिलें । गुणसमानत्वें झालें । गुणसाम्य ऐसें ॥ ७ ॥ अर्धनारीनटेश्वर । तोचि षड्गुणेश्वर । प्रकृति पुरुषाचा विचार । शिवशक्ती ॥ ८ ॥ शुद्ध सत्त्वगुणाची मांडणी । अर्धमात्रा गुणक्षोभिणी । पुढें तिहीं गुणांची करणी । प्रकट झाली ॥ ९ ॥ मन माया अंतरात्मा । चौदा जिन्नसांची सीमा । विद्यमान ज्ञानात्मा । इतके ठायीं ॥ १० ॥ ऐसा हा दुसरा जिन्नस । अभिधानें चतुर्दश । आतां तिसरा जिन्नस । पंचमहाभूतें ॥ ११ ॥ येथें पाहतां जाणीव थोडी । आदिअंत हे रोकडी । खाणी निरूपिल्या तांतडी । तो चौथा जिन्नस ॥ १२ ॥ चारी खाणी अनंत प्राणी । जाणिवेची झाली दाटणी । चारी जिन्नस येथूनी । संपूर्ण झाले ॥ १३ ॥ बीज थोडे पेरिजेतें । पुढें त्याचें उदंड होतें । तैसें झालें आत्मयातें । खाणी वाणी प्रकटतां ॥ १४ ॥ ऐशी सत्ती प्रबळली । थोडे सत्तेची उदंड झाली । मनुष्यवेषें सृष्टि भोगिली । नाना प्रकारें ॥ १५ ॥ प्राणी मारून श्वापद पळे । वरकड त्यास काय कळे । नाना भोग तो निवळे । मनुष्यदेहीं ॥ १६ ॥ नाना शब्द नाना स्पर्श । नाना रूप नाना रस । नाना गंध ते विशेष । नरदेह जाणे ॥ १७ ॥ अमूल्य रत्नें नाना वस्त्रें । नाना यानें नाना शस्त्रें । नाना विद्या कळाशास्त्रें । नरदेह जाणे ॥ १८ ॥ पृथ्वी सत्तेनें व्यापली । स्थूळास्थूळा आटोपली । नाना विद्या कळा केली । नाना धारणा ॥ १९ ॥ दृश्य अवघेंचि पाहावें । स्थानमान सांभाळावें । सारासार विचारावें । नरदेह जाहलिया ॥ २० ॥ इहलोक आणि परलोक । नाना प्रकारचा विवेक । विवेक आणि अविवेक । मनुष्य जाणें ॥ २१ ॥ नाना पिंडब्रह्मांडरचना । नाना मुळींची कल्पना । नाना प्रकारीं धारणा । मनुष्य जाणे ॥ २२ ॥ अष्ट भोग नवरस । नाना प्रकारचा विलास । वाच्यांश लक्ष्यांश सारांश । मनुष्य जाणे ॥ २३ ॥ मनुष्यें सकळांसि आंकिलें । त्या मनुष्यास देवें पाळिलें । ऐसें हें अवघें कळलें । नरदेहयोगें

---

१ ब्रह्म. २ मायेचीं चौदा नांवें. ३ पंचमहाभूतें. ४ चार खाणी. ५ अधिक. * पलीकडे. + उपमा देतां येत नाहीं. ६ वस्तु. ७ मिश्रणरूप. ८ यश, श्री, ऐश्वर्य ज्ञान, औदार्य, वैराग्य यांनीं युक्त. ९ जलदीनें. १० वाहनें. ११ ढोबळ व सूक्ष्म. १२ बुद्धि. १३ एका व्यक्तीपासून ता सर्व जगताची रचना. १४ सुगंध, वनिता, तांबूल, वस्त्र, गायन, भोजन, शय्या, द्रव्य. १५ शृंगार, हास्य, करुणा, रौद्र, वीर, भयानक, बीभत्स, अद्भुत, शांति. १६ आकलन केलें, ताब्यांत ठेविलें.

॥ २४ ॥ नरदेह परम दुर्लभ । येणें घडे अलभ्य लाभ । दुर्लभ तें सुलभ । होत जातें ॥ २५ ॥ वरकड देह हें कोबाड । नरदेह मोठें घबाड । परंतु पाहिजे जाड । विवेक-रचना ॥ २६ ॥ येथें ज्याणें आळस केला । तो सर्वस्वें बुडाला । देव नाहीं वोळखिला विवेकबळें ॥ २७ ॥ नर तोचि नारायण । जरी प्रत्ययें करी श्रवण । मननशीळ अंतः-करण । सर्वकाळ ॥ २८ ॥ नेणें स्वयेंचि पोहावें । त्यासि कासेस नलगे लागावें । स्वतंत्र-पणें शोधावें । सकळ कांहीं ॥ २९ ॥ सकळ शोधून राहिला । संदेह कैंचा तयाला पुढें विचार कैसा झाला । त्याचा तोचि जाणें ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे विंशतिदशके चत्वारिंजिन्नसनिरूपणं नाम पंचमः समासः ॥ ५ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ पाहों जातां भूमंडळ । ठायीं ठायीं असे जळ । कित्येक ते निर्मळ माळ । जळेंविण पृथ्वी ॥ १ ॥ तैसें दृश्य विस्तारलें । कांहीं एक जाणीवेनें शोभलें । जाणीवेरहित उरलें । कितीएक दृश्य ॥ २ ॥ चारी खाणी चारी वाणी । चौऱ्यांयशी लक्ष जीवयोनी । शास्त्रीं अवघें नेमूनी । बोलिलें असे ॥ ३ ॥ मनुष्यें चारी लक्ष । पशु वीस लक्ष । कृमि अकरा लक्ष । बोलिले शास्त्रीं ॥ ४ ॥ दहा लक्ष ते खेचर । नव लक्ष जळचर । तीस लक्ष स्थावर । बोलिलें शास्त्रीं ॥ ५ ॥ ऐशी चौऱ्यायशीं लक्ष जीवथोनी । जितुका तितुका जाणता प्राणी । अनंत देहाची मांडणी । मर्यादा कैंची ॥ ६ ॥ अनंत प्राणी होती जाती । त्यांचें अधिष्ठानें जगती । जगतीवेगळी स्थिति । त्यासि कैंची ॥ ७ ॥ पुढें पाहतां पंचभूतें । पावलीं स्पष्टदशेतें । कोणी विद्यमान कोणी ते । उगीचें असती ॥ ८ ॥ अंतरात्म्याची वोळखण ; तेचि जेथें चपळ-पण । जाणीवेचें अधिष्ठान । सावध ऐका ॥ ९ ॥ सुखदुःख जाणता जीव । तैसाच जाणावा सदाशिव । अंतःकरणपंचकें अपूर्व । अंश आत्मयाचा ॥ १० ॥ स्थूळीं आका-शाचे गुण । अंश आत्म्याचे जाण । सत्त्व रज तमोगुण । गुण आत्म्याचे ॥ ११ ॥ नाना चाळणा नाना धृती । नवविधा भक्ति चतुर्विधा मुक्ति । अलिप्तपणें सहजस्थिति । गुण आत्मयाचे ॥ १२ ॥ द्रष्टा साक्षी ज्ञानघन । सत्ता चैतन्य पुरातन । श्रवण मनन विव-रण । गुण आत्मयाचे ॥ १३ ॥ दृश्य द्रष्टा दर्शन । ध्येय ध्याता ध्यान । ज्ञेय ज्ञाता ज्ञान । आत्मरूप ॥ १४ ॥ वेदशास्त्रपुराणार्थ । गुप्त चालिला परमार्थ सर्वज्ञपणें समर्थ । गुण आत्मयाचे ॥ १५ ॥ बद्ध मुमुक्षु साधक सिद्ध । विचार पाहाणें शुद्ध । बोध आणि प्रबोध । गुण आत्मयाचे ॥ १६ ॥ जागृति स्वप्न सुषुप्ति तुर्या । प्रकृति पुरुष मूळमाया । पिंडब्रह्मांड अष्टकाया । गुण आत्मयाचे ॥ १७ ॥ परमात्मा आणि

---

१ संकट कष्ट. २ अत्यंत लाभदायक. ३ खडकाळ जमीन. ४ पक्षी. ५ झाडें वगैरे. ६ आश्रयस्थान. ७ पृथ्वी. ८ प्रकट, हयात. ९ लक्षांत न येणारे, गुप्त. १० अंतःकरण, मन, बुद्धि, चित्त, अहंकार. ११ धैर्य. १२ वेगळेपण. १३ अनादि. १४ ध्यान करण्यास योग्य. १५ ध्यान करणारा. १६ प्रपंचांत आसक्त. १७ मोक्षाची इच्छा करणारे. १७ परमार्थ साध-ण्याचा यत्न करणारे. १९ तत्वज्ञानी. २० निर्णयात्मक ज्ञान. २१ गाढझोंप. २२ चतुर्थावस्था २३ स्थूळ, सूक्ष्म, कारण, महाकारण, विराट, हिरण्यगर्भ, अव्याकृत आणि मूळमाया.

परमेश्वरी । जगदात्मा आणि जगदीश्वरी । महेश आणि माहेश्वरी । गुण आत्मयाचे ॥ १८ ॥ सूक्ष्म जितुकें नामरूप । तितुकें आत्मयाचें स्वरूप । संकेत नामाभिधानें अमूप । सीमा नाहीं ॥ १९ ॥ आदिशक्ति शिवशक्ति । मुख्य मूळमाया सर्वशक्ति । नाना जिन्नस उत्पत्ति स्थिती । तितुके गुण आत्मयाचे ॥ २० ॥ पूर्वपक्ष आणि सिद्धांत । गाणें वाजाविणें संगीत । नाना विद्या अद्भुत । गुण आत्मयाचे ॥ २१ ॥ ज्ञान अज्ञान विपरीतज्ञान । असद्वृत्ति सद्वृत्ति जाण । ज्ञप्तिमात्र अलिप्तपण । गुण आत्मयाचे ॥ २२ ॥ पिंडब्रह्मांडतरुवक्षाडा । नाना तत्त्वांचा निवाडा । विचार पाहाणें उघडा । गुण आत्मयाचे ॥ २३ ॥ नाना ध्यानें अनुसंधानें । नाना स्थिति नाना ज्ञानें । अनन्यआत्मनिवेदनें । गुण आत्मयाचे ॥ २४ ॥ तेहतीस कोटी सुरवर । अठ्ठ्यायशी सहस्र ऋषीश्वर । भूत खेचर अपार । गुण आत्मयाचे ॥ २५ ॥ भूतावळी औटें कोटी । चामुंडा छप्पन्न कोठी । कात्यायनी नव कोटी । गुण आत्मयाचे ॥ २६ ॥ चंद्र सूर्य ताशमंडळें । नाना नक्षत्रें गृहमंडळें । शेष कूर्म मेघमंडळें । गुण आत्मयाचे ॥ २७ ॥ देव दानव मानव । नाना प्रकारींचे जीव । पाहतां सकळ भावाभाव । गुण आत्मयाचे ॥ २८ ॥ आत्मयाचे नाना गुण । ब्रह्म निर्विकार निर्गुण । जाणणें एकदेशी पूर्ण । गुण आत्मयाचे ॥ २९ ॥ आत्मारामउपासना । तेणें पावलों निरंजना । निःसंदेह, अनुमाना । ठावचि नाहीं ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे विंशतिदशके आत्मनिरूपणं नाम षष्ठः समासः ॥ ६ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ अनिर्वाच्य समाधान झालें । तें पाहिजे बोलिलें । बोलल्यासाठीं समाधान गेलें । हें तों घडेना ॥ १ ॥ कांहीं सांडावें लागत नाहीं । कांहीं मांडावें लागत नाहीं । एक विचार शोधून पाहीं । म्हणिजे कळे ॥ २ ॥ मुख्य काशीविश्वेश्वर । सेतुबंध रामेश्वर । मल्लिकार्जुन भीमाशंकर । गुण आत्मयाचे ॥ ३ ॥ जैशीं मुख्य बारा लिंगें । यांहीवेगळीं अनंत लिंगें । प्रचीत जाणिजे जगें । गुण आत्मयाचे ॥ ४ ॥ भूमंडळीं अनंतशक्ती । नाना साक्षात्कार चमत्कार होती । नाना देवांच्या सामर्थ्यमूर्ती । गुण आत्मयाचे ॥ ५ ॥ नाना सिद्धांचीं सामर्थ्यें । नाना मंत्रांचीं सामर्थ्यें । नाना मोहरे * वल्लींत सामर्थ्यें । गुण आत्मयाचे ॥ ६ ॥ नाना तीर्थांचीं सामर्थ्यें । नाना क्षेत्रांचीं सामर्थ्यें । नाना भूमंडळीं सामर्थ्यें । गुण आत्मयाचे ॥७॥ जितुकें कांहीं उत्तम गुण । तितुकें आत्मयाचें लक्षण । बरें वाईट तितुकें जाण । आत्म्याचकरितां ॥८॥ शुद्ध आत्मा उत्तमगुणीं । शबळ आत्मा अवलक्षणीं । बरें वाईट अवघी करणी । आत्मयाची ॥ ९ ॥ नाना साभिमानें घरणें । नानाकृति सृष्टि करणें । नाना शापउःशापलक्षणें । आत्मयाचेनी ॥ १० ॥ पिंडाचा बरा शोध घ्यावा । तत्त्वांचा पिंड शोधावा । तत्वें शोधितां पिंड आघवा । कळों येतो ॥ ११ ॥ जडदेह मूतांचा । चंचळ गुण आत्मयाचा । निश्चळ ब्रह्मावेगळा ठाव कैंचा । जेथें तेथें ॥ १२ ॥ निश्चळ चंचळ आणि जड । पिंडीं करावा निवाड । प्रत्ययावेगळे जाड ।

---

१ पुष्कळ, २ शंका. ३ ज्ञानमात्र. ४ संबंध. ५ साडेतीन कोटी. ६ असुर. ७ अज्ञानरहित परब्रह्माला. ८ निःसंशय. ९ शंका. १० औषधिमणि. * वेल, वनस्पति. ११ उपाधियुक्त. १२ ताठा, अभिमान.

बोलणें नाहीं ॥ १३ ॥ पिंडामधून आत्मा जातो । तेव्हां निवाडा कळों येतो । देह जड हा पडतो । देखतदेखतां ॥ १४ ॥ जड तितुकें पडलें । चंचळ तितुकें निघोन गेलें । जड चंचळाचें स्वरूप आलें । प्रत्ययासी ॥ १५ ॥ निश्चळ आहे सकळांठायीं । हें तों पाहणें नलगे कांहीं । गुणविकार तेथें नाहीं । निश्चळासी ॥ १६ ॥ जैसें पिंड तैसें ब्रह्मांड । विचार दिसतो उघड । जड चंचळ जातां जाड । परब्रह्मचि आहे ॥ १७ ॥ महाभूतांचा खंबीरे केला आत्मा घालून पुतळा झाला । चालिला सृष्टीचा गलबला । येणें रीतीं ॥१८॥ आत्मा मायाविकार । करी । आळ घालिती ब्रह्मावरी । प्रत्ययें सकळ कांहीं विवरी । तोचि भला ॥१९॥ ब्रह्म व्यापक अखंड । वरकड व्यापकता खंड । शोधून पाहतां जड । कांहींच नाहीं ॥२०॥ गगनास खंडितां नये । गगनाचें नासेल काय । जरी झाला महाप्रळय । सृष्टि-संहार ॥२१॥ जें संहारामध्यें सांपडलें । तें सहजाचि नाशवंत झालें । जाणते लोकीं उगविलें । पाहिजे कोडें ॥२२॥ न कळतां वाटे कोडें । कळतां अवघें दिसे उघडें । म्हणोनि एकांतीं निवाडें । विचार पाहावा ॥ २३ ॥ मिळतां प्रत्ययाचे संत । एकांतापरीस एकांत । केली पाहिजे सावचित्ते । नाना चर्चा ॥२४॥ पाहिल्यावेगळें कळत नाहीं । कळतां कळतां संदेह नाहीं । विवेक पाहतां कोठेंचि नाहीं । मायाजाळ ॥ २५ ॥ गगनीं आभाळ आलें । मागुतीं सर्वोचि उडालें । आत्म्याकरितां दृश्य झालें । उंडेल तैसें ॥२६॥ मूळापासून शेवटवरी । विवेकी विवकें विवरी । तोचि निश्चय स्थावरी । चळेना ऐसा ॥२७॥ वरकड निश्चय अनुमानाचे । अनुमानें बोलतां काय वेंचे । जाणते पुरुष प्रचीतीचे । ते तों मानीतना ॥ २८ ॥ उगीच बोलणें अनुमानाचें । अनुमानाचें कोण्या कामाचें । येथें सगट विचाराचें । काम नाहीं ॥ २९ ॥ सगट विचार तो अविचार । किती एक म्हणती एकंकार । एकंकारें भ्रष्टाकार । करूं नये ॥ ३० ॥ कृत्रिम अवघें सांडावें । कांहीं एक शुद्ध ध्यावें । जाणजाणो निवडावें । सारासार ॥ ३१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे विंशतिदशके आत्मनिरूपणं नाम सप्तमः समासः ॥ ७ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ विधिप्रपंचतेरु वाढला । वाढतां वाढतां विस्तीर्ण झाला । फळें येतां विश्रांति पावला । बहुत प्राणी ॥ १ ॥ नाना फळें रसाळें लागलीं । नाना जिन्नसें गोडीस आलीं । गोडी पाहावया निर्माण केलीं । नाना शरीरें ॥ २ ॥ निर्माण जाहले उत्तम विषय । शरीराविणें भोगितां नये । म्हणोनि निर्मिला उपाय । नाना शरीरें ॥ ३ ॥ ज्ञानेंद्रियें निर्माण केलीं । भिन्न भिन्न गुणांचीं निर्मिलीं । एका शरीरास लागलीं । परी वेगळालीं ॥ ४ ॥ श्रोतेंद्रियीं शब्द पडिला । त्याचा भेद पाहिजे कळला । ऐसा उपाय निर्माण केला । इंद्रियामध्यें ॥ ५ ॥ त्वचेंद्रियें शीतोष्ण भासे । चक्षुरिंद्रियें सकळ दिसे । इंद्रियांमध्यें गुण ऐसे । वेगळाले ॥ ६ ॥ जिव्हेमध्यें रस चाखणें । घ्राणेंमध्यें

---

१ जोडणी, मिलाफ. २ अनुभवानें. ३ सृष्टीचा नाश. ४ सोडविलें. ५ स्वस्थपणें. ६ लागलेंच. ७ आत्मज्ञानानें नाहींसें होईल. ८ स्थिर करी. ९ खर्च होतें १० सरसकट. ११ ब्रह्मदेवाचा प्रपंचरूपी वृक्ष. १२ गोड. १३ कानानें १४ डोळ्यानें. १५ नाकानें.

परिमळ घेणें । इंद्रियांमध्यें वेगळाल्या गुणें । भेद केलें ॥ ७ ॥ वायुपंचकीं अंतःकरण पंचक । मिसळोन फिरे निःशंक । ज्ञानेंद्रियें कर्मेंद्रियें सकळिक । सावकाश पाहे ॥ ८ ॥ कर्मेंद्रियें लागवेगीं । जीव भोगी विषयांलागीं । ऐसा हा उपाय जगीं । ईश्वरें केला ॥ ९ ॥ विषय निर्माण झाले बरवे । शरीरेविण कैसें भोगावें । नाना शरीरांचे गोवे । याचकारणें ॥ १० ॥ अस्थिमांसाचें शरीर । त्यामध्यें गुणप्रकार । शरीरासारिखें यंत्र । आणीक नाहीं ॥ ११ ॥ ऐसीं शरीरें निर्माण केलीं । विषयभोगें वाढविलीं । लहानथोर निर्माण झालीं । येणेंप्रकारें ॥ १२ ॥ अस्थिमांसांचीं शरीरें । निर्माण केलीं जगदीश्वरें । विवेकें गुणविचारें । करूनियां ॥ १३ ॥ अस्थिमांसांचा पुतळा । जाणे ज्ञानें सकळ कळा । शरीरभेद वेगळा । ठायीं ठायीं ॥ १४ ॥ तो भेद कार्याकारण । त्याचा उदंड आहे गुण । सकळ तीक्ष्णबुद्धीविण । काय कळे ॥ १५ ॥ सकळ करणें ईश्वराला । म्हणोनि भेद निर्माण केला । ऊर्ध्वमुख होतां भेदाला । ठाव कैंचा ॥ १६ ॥ सृष्टिकर्मीं अगत्य भेद । संहारें सहजचि अभेद । भेद अभेद हा संवाद । मायागुणें ॥ १७ ॥ मायेमध्यें अंतरात्मा । न कळे तयाचा महिमा । झाला चतुर्मुख ब्रह्मा । तोहि संदेहीं पडे ॥ १८ ॥ पीळ पेंच कडोविकडी । तर्क तीक्ष्ण घडीनें घडी । मनासि होय तातडी । विवरण करितां ॥ १९ ॥ आत्मत्वीं लागे सकळ कांहीं । निरंजनीं हें कांहींच नाहीं । एकांतकाळीं समजोन पाहीं । म्हणिजे बरें ॥ २० ॥ देह सामर्थ्यानुसार । सकळ करी जगदीश्वर । थोर सामर्थ्यें अवतार । बोलिजेती ॥ २१ ॥ शेष कूर्म वराह झाले । येवढें देह विशाळ धरिलें । तेणेंकरितां रचना चाले । सकळ सृष्टीची ॥ २२ ॥ ईश्वरें केवढें सूत्र केलें । सूर्यबिंब धांवाया लाविलें । घुंकटांकरवीं धरविलें । अगाध पाणी ॥ २३ ॥ पर्वताऐसे ढग उचलती । सूर्यबिंबास आच्छादिती । तेथें सर्वांचि वायूची गति । प्रकट होय ॥ २४ ॥ झिडझिडकूं धांवे वारा । जैसा काळाचा म्हणियारा । ढग मारून दिनकरा । मोकळें करी ॥ २५ ॥ बैसती विजांचे तडाखे । प्राणिमात्र भेवंचितां धाके । गगन कडकडून तकके । स्थळावरी ॥ २६ ॥ एकासि एक वर्म केलें । महद्भूतें महद्भूत ओंळिलें । सकळ समभागें चालिलें । सृष्टिरचनेसी ॥ २७ ॥ ऐसे अनंत भेद आत्मयाचे । सकळ जाणती ऐसे कैंचे । विवरतां विवरतां मनाचे । फेडके होती ॥ २८ ॥ ऐसी माझी उपासना । उपासकीं आणावी मना । अगाध महिमा चतुराननां । काय कळे ॥ २९ ॥ आवाहन विसर्जनें । हेंचि भजनाचें लक्षण । सकळ जाणती सज्जन । मी काय सांगों ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे विंशतिदशके देहक्षेत्रनिरूपणं नाम अष्टमः समासः ॥ ८ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ मृत्तिकापूजन करावें । आणि सर्वांचे विसर्जावें । हें मानेना स्वभावें । अंतःकरणासी ॥ १ ॥ देव पुजावा आणि टाकावा । हें प्रशस्त न

---

१ जलदीनें. २ गुंतागुंती. ३ ब्रह्मरूप झालें असतां. ४ संशयामध्यें. ५ पेंच, युक्ति. ६ घाई. ७ वाफेकडून, मेघांकडून. ८ सेवक. ९ सूर्याला. १० एकाएकीं. ११ आवरून धरलें, शांत केलें. १२ तुकडे. १३ ब्रह्मदेवाला. १४ बोलावणें. १५ निरोप देणें.

वाटे जीवा । याचा विचार पाहावा । अंतर्यामीं ॥ २ ॥ देव करिजे ऐसा नाहीं । देव टाकिजे ऐसा नाही । म्हणोन याचा कांहीं । विचार पाहावा ॥ ३ ॥ देव नाना शरीरें धरितो । धरूनि मागुती सोडितो । तरी तो देव कैसा आहे तो । विवेकें वोळखावा ॥ ४ ॥ नाना साधनें निरूपणें । देव शोधायाकारणें । सकळ आपल्या अंतःकरणें । समजलें पाहिजे ॥ ५ ॥ ब्रह्मज्ञानाचा उपाय । समजल्याविण देतां नये । पदार्थ आहे मा घे जाय । ऐसें म्हणावें ॥ ६ ॥ संगट लोकांचे अंतरींचा भाव । मज प्रत्यक्ष भेटवावा देव । परंतु विवेकाचा उपाव । वेगळाचि आहे ॥ ७ ॥ विचार पाहतां तंगेना । त्यास देव ऐसें म्हणावेना । परंतु जन राहेना । काय करावें ॥ ८ ॥ थोर लोक मरोन जाती । त्यांच्या सुरतो करूनि पाहती । तैशाचि आहे हेही गति । उपासनेची ॥ ९ ॥ थोर व्यापार ठाकेना जनीं । म्हणोनि केली रखतवांनी । राजसंपदा तयाचेनी । प्राप्त कैंची ॥ १० ॥ म्हणोनि जितका भोळा भाव । तितुका अज्ञानाचा स्वभाव । अज्ञानें तरी देवाधिदेव । पाविजेल कैंचा ॥ ११ ॥ अज्ञानासि ज्ञान न माने । ज्ञात्यास अनुमानें न माने । म्हणोनि सिद्धांचिये खुणें । पावलें पाहिजे ॥ १२ ॥ माया सांडून मूळासि जावें । तरीच समाधान पावावें । ऐसें न होतां भेरंगळावें । भलतीकडे ॥ १३ ॥ माया उल्लंघाया-कारणें । देवासि नाना उपाय करणें । अध्यात्मश्रवणपंथेंचि जाणें । प्रत्ययानें ॥ १४ ॥ ऐसें न करितां लौकिकीं । अवघीच होते चुकामुकी । स्थिति खरी आणि लटिकी । ऐशी वोळखावी ॥ १५ ॥ खोट्याचे वाटें जाऊं नये । खोट्याची संगति धरूं नये । खोटें संग्रहीं करूं नये । कांहीं एक ॥ १६ ॥ खोटें तें खोटेंचि खोटें । खऱ्यासि तगेनातें बोलटें ! मन अधोमुखें उफराटें । केलें पाहिजे ॥ १७ ॥ अध्यात्मश्रवण करीत जावें । म्हणजे सकळ कांहीं फावे । नाना प्रकारींचे गोवे । तुटोनि जाती ॥ १८ ॥ सूत गुंतलें तें उकलावें । तैसें मन उगवावें । मानत मानत घालावें । मूळाकडे ॥ १९ ॥ सकळ कांहीं कालवलें । त्या सकळाचें सकळ जाहलें । शरीरीं विभागिलें । सकळ कांहीं ॥ २० ॥ काय तें येथेंचि पाहावें । कैसें तें येथेंचि शोधावें । सूक्ष्माचीं चौदा नांवें । येथेंचि समजावीं ॥ २१ ॥ निर्गुण निर्विकारी एक । तें सर्वांठायीं व्यापक । देहामध्यें तें नि-ष्कलंक । आहे कीं नाहीं ॥ २२ ॥ मूळमाया संकल्परूप । तें अंतःकरणाचें स्वरूप । जड चेतवी चैतन्यरूप । तेंहि शरीरीं आहे ॥ २३ ॥ समान गुण गुणसाम्य । सूक्ष्म विचार तो अगम्य । सूक्ष्म साधु जाण ते प्रेणम्य । तया समस्तांसी ॥ २४ ॥ द्विधा भासतें शरीर । वामांग दक्षिणांगे विचार । तोचि अर्धनारीनटेश्वर । पिंडीं वोळखावा ॥ २५ ॥ तोचि

---

१ हृदयामध्यें. २ ब्रह्मज्ञान हा काय पदार्थ आहे, की तो जा घे, असें म्हणतां येईल. ३ सर्व. ४ टिकत नाहीं. ५ चेहरें, चित्रें. ६ मजूरी, शाई, द्रोण, पानें वगैरे पुरविणें. ७ राज्यलक्ष्मी, ८ संशयात्मक कल्पना. ९ भ्रमावें, आडवाटेला जावें १० टिकत नाहीं. ११ खोटें १२ प्रपंचासक्त, १३ अधोमुख मन उफराटे (उर्ध्वमुख) केलें पाहिजे. १४ प्रणामाला–नमस्कार करण्याला योग्य. १५ दोन प्रकारचें १६ डावी बाजू, १७ उजवी बाजू.

प्रकृतिपुरुष जाणिजे । शिव शक्ति वोळखिजे । षड्गुणेश्वर बोलिजे । तया कर्दमासी । ॥२६॥ तयासीच म्हणिजे महत्तत्व । जेथें त्रिगुणाचें गूढत्व । अर्ध मात्रा शुद्धसत्त्व । गुणक्षोभिणी ॥ २७ ॥ त्रिगुणें चालतें शरीर । प्रत्यक्ष दिसे विचार । मुळींच्या कर्दमाचें शरीर । ऐसें जाणावें ॥ २८ ॥ मन माया आणि जीव । हाहि दिसतो स्वभाव । चौदा नामाचा अभिप्राव । पिंडीं पाहावा ॥ २९ ॥ पिंड पडतां अवघेंचि जातें । परंतु परब्रह्म राहतें । शाश्वत समजोन मग तें । दृढ धरावें ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे विंशतिदशके सूक्ष्मनिरूपणं नाम नवमः समासः ॥ ९ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ धरूं जातां धरितां नयें । टाकूं जातां टाकितां नये । जेथें तेथें आहेच आहे । परब्रह्म तें ॥ १ ॥ जिकडे तिकडे जेथें तेथें । विन्मुख होतां सन्मुख होतें । सन्मुखपण चुकेना तें । कांहीं केल्या ॥ २ ॥ बैसलें माणूस उठोन गेलें । तेथें आकाशाचि राहिलें । आकाश चहूंकडे पाहिलें । तरी सन्मुखचि आहे ॥ ३ ॥ जिकडे तिकडे प्राणी पळोन जाते । तिकडे आकाशाचि भोंवते । बळें आकाशाबाहेर तें । कैसें जावें ॥ ४ ॥ जिकडे जिकडे प्राणी पाहे । तिकडे सन्मुखचि आहे । समस्तांचे मस्तकीं राहे । मध्यान्हीं मार्तंड जैसा ॥ ५ ॥ परी तो आहे एकदेशी । दृष्टांत न घडे वस्तूशीं । कांहीं एक चमत्काराशी । देऊन पाहिला ॥ ६ ॥ नाना तीर्थें नाना देशीं । कष्टत जावें पाहावयासी । तैसें नलगे परब्रह्मासी । बैसले ठायीं ॥ ७ ॥ प्राणी बैसोनीच राहतां । अथवा बहुत पळोन जातां । परब्रह्म तें तैसेंचि तत्त्वतां । समागमें ॥ ८ ॥ पक्षी अंतराळीं गेला । भोंवतें आकाशाचि तयाला । तैसें परब्रह्म प्राणियाला । व्यापून असे ॥ ९ ॥ परब्रह्म पोकळ घनदाट । परब्रह्म शेवटचा शेवट । ज्यासि त्यासि ब्रह्म नीट । सर्वकाळ ॥ १० ॥ दृश्यासबाह्यअंतरीं । ब्रह्म दाटलें ब्रह्मांडोदरीं । अरे त्या निर्मळाची सरी । कोणास द्यावी ॥ ११ ॥ वैकुंठ कैलास स्वर्ग लोकीं । इंद्रलोकीं चौदा लोकीं । पन्नगादि पाताळलोकीं । तेथेंहि आहे ॥ १२ ॥ काशीपासून रामेश्वर । अवघें दाटलें अपार । परतो परतो पारावार । त्यास नाहीं ॥ १३ ॥ परब्रह्म तें एकलें । एकदाचि सकळांसि व्यापिलें । सकळांस स्पर्शोन राहिलें । सकळां ठायीं ॥ १४ ॥ परब्रह्म पाउसें भिजेना । अथवा चिखलें भरेना । पुरामध्यें परी वाहेना । पुरासमागमें ॥ १५ ॥ एकसरें सन्मुखविन्मुख । वामेसव्य दोहींकडे एक । अधोर्ध्व प्राणी सकळिक । व्यापून आहे ॥ १६ ॥ आकाशाचा डोहो भरला । कदापि नाहीं उचंबळला । असंभाव्य पसरला । जिकडे तिकडे ॥ १७ ॥ एकेंजिन्नसी गगन उदास । जेथें नाहीं दृश्यभास । भासेविण निराभास परब्रह्म जाणावें ॥ १८ ॥ संत साधु महानुभावो । देव दानव मानवा । परब्रह्म सकळांस विसांवा । विश्रांति ठाव ॥ १९ ॥ कोणीकडे शेवटास जावें ।

---

१ मिश्रणाला. २ तोंड फिरविलें असतां. ३ आपल्या समोर. ४ भरदुपारीं. ५ सूर्य. ६ खरोखर. ७ आकाशामध्यें. ८ दृश्याच्या बाहेर व आंत. ९ तुलना, उपमा. १० सर्प वगैरेच्या. ११ पलीकडे व त्याच्याहि पलीकडे. १२ डावी उजवीकडे. १३ खालींवर. १४ एकच प्रकारचें. १५ महाश्रेष्ठ साधूला. १६ अमर

कोणीकडे काय पाहावें । असंभाव्य तें नेमावें । काय म्हणोनी ॥ २० ॥ स्थूल नव्हे सूक्ष्म नव्हे । कांहींएकासारिखें नव्हे । ज्ञानदृष्टीविण नव्हे । समाधान ॥ २१ ॥ पिंड-ब्रह्मांडनिरास । मग तें ब्रह्म निराभास । येथून तेथवरी अवकाश । भकाशरूपें ॥ २२ ॥ ब्रह्म व्यापक हें तों खरें । दृश्य आहे तों हें उत्तरें । व्याप्येविण कोण्याप्रकारें । व्यापक म्हणावें ॥ २३ ॥ ब्रह्मासि शब्दाचि लागेना । कल्पना कल्पूं शकेना । कल्पनेतीत निरंजना । विवेकें वोळखावें ॥ २४ ॥ शुद्ध सारश्रवण । शुद्ध प्रत्ययाचें मनन । विज्ञानीं पावतां उन्मन । सहजाचि होतें ॥ २५ ॥ झालें साधनाचें फळ । संसार झाला सफळ । निर्गुण ब्रह्म तें निश्चळ । अंतरीं बिंबलें ॥ २६ ॥ हिशेब झाला मायेचा । झाला निवाडा तत्त्वांचा । साध्य होतां साधनांचा । ठाव नाहीं ॥ २७ ॥ स्वप्नीं जें जें देखिलें । तें तें जागृतीस उडालें । सहजाचि अनिर्वाच्य झालें । बोलतां नये ॥ ॥ २८ ॥ ऐसें हें विवेकें जाणावें । प्रत्ययें खुणेसि बाणावें । जन्ममृत्यूंच्या नांवें । शून्याकार ॥ २९ ॥ भक्तांचेनि साभिमानें । कृपा केली दशारथीनें । समर्थकृपेचीं वचनें । तो हा दासबोध ॥ ३० ॥ वीस दशक दासबोध । श्रवणद्वारें घेतां शोध । मनन कर्त्यास विशद । परमार्थ होतो ॥ ३१ ॥ वीस दशक दोनशें समास । साधकें पाहावे सावकाश । विवरतां विशेषा-विशेष । कळों लागे ॥ ३२ ॥ ग्रंथाचें करावें स्तवन । स्तवनाचें काय प्रयोजन । येथें प्रत्ययास कारण । प्रत्यय पाहावा ॥ ३३ ॥ देह तंव पांचाभूतांचा । कर्ता आत्मा तेथीचा । आणि कवित्वप्रकार मनुष्यांचा । कशावरूनी ॥ ३४ ॥ सकळ करणें जगदीशाचें । आणि कवित्वाचि काय मनुष्याचें । ऐशा अप्रमाण बोलण्याचें । काय घ्यावें ॥ ३५ ॥ सकळ देहांचा झाडा केला । तत्त्वसमुदाय उडाला । तेथें कोण्या पदार्थाला । आपुलें म्हणावें ॥ ३६ ॥ ऐशीं हीं विचाराचीं कामें । उगीच भ्रमों नये भ्रमें । जगदीश्वरें अनुक्रमें । सकळ केलें ॥ ३७ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे विंशतिदशके विमलब्रह्मनिरूपणं नाम दशमः समासः ॥ १० ॥

॥ दासबोध समाप्त ॥

---

१ शून्य. २ अज्ञानरहित ब्रह्माला. ३ मनोवृत्तिरहित. ४ सांगतां येत नाहीं असे. ५ दशरथाचा पुत्र राम त्यानें. ६ स्पष्ट. ७ स्तुती